180390

ગોવીંદ ચિમણાજી ભાટે.

अर्थशास्त्राची

# अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें

लेखक
गोविंद चिमणाजी भाटे.

134

अर्थशास्त्राची मूलतत्त्वे

# प्रस्तावना.

लेखक गोविंद चिमणाजी भावे

जी डेक्कन व्हर्न्याक्यूलर ट्रान्सलेशन सोसायटीची जाहिरात या ग्रंथाच्या लेख-नास निमित्तकारण झाली, त्या जाहिरातीला आज बरोबर तीन वर्षे झालीं. त्या जाहिरातीस निमित्तकारण झणण्याचें कारण हें कीं, कर्तव्य म्हणून, जिज्ञासा झणून, किंवा आवड म्हणून पाश्चात्य शास्त्रवाङ्मयरूपी विस्तीर्ण उद्यानांत ज्या ज्या सुंदर वाटिकांत फिरण्याचा मला प्रसंग आला त्या त्या वाटिकांचें शब्दचित्र ळ मराठी वाचकांकरितां रेखाटावें अशी पुष्कळ दिवसांची मनीषा होती. परंतु उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथाः " या उक्तीप्रमाणें आजपर्यंत दारिद्र्या- े मनांतील हेतू मनांत राहिले. माझें हें दारिद्र्य दुहेरी आहे. मी ज्या संस्थे- तहाहयात सभासद आहें त्या संस्थेचें काम इतकें असतें कीं, ग्रंथलेखनास मानसिक स्वस्थता व जी फुरसत लागते ती मिळत नाहीं. शिवाय आपल्या देशांत अजून या बाबतींत श्रमविभागाचें तत्त्व अंमलांत आलें नसल्यामुळें ग्रंथ-लेखकास ग्रंथप्रकाशकाचीही जबाबदारी व काळजी अंगावर घ्यावी लागते. पण ती घेण्याचें मला सामर्थ्य नव्हतें. परन्तु वर उल्लेख केलेल्या जाहिरातीनें ही अडचण त्यास दूर होईल असें पाहून जाहिरातीप्रमाणें पुस्तक लिहिण्याचा बेत तर म केला. परंतु बेत कायम करणें व तो हातून शेवटास जाणें यांत किती अडचणी उत्पन्न होतात, त्याप्रमाणें येथेंही झालें. मनुष्याच्या मनाला अगदीं करून टाकणारी, त्याची मानसिक स्वस्थता घालविणारी अशी प्रियपत्नीच्या ाध्य रोगाची घरगुती अडचण उत्पन्न झाली. व यामुळें सोसायटीच्या जाहि-रातींतील दोन वर्षे केव्हांच निघून गेलीं व पुस्तकाच्या लेखनास प्रारंभही झाला हीं. तरी पण प्रियपत्नीच्या आजारांत व तिच्याच प्रोत्साहनानें कायम केलेला त शेवटास न्यावयाचा असा विचार करून पुस्तकास प्रारंभ केला. अशी या स्तकलेखनाची पूर्वपीठिका आहे. अर्थात् हें पुस्तक गेल्या नऊदहा महिन्यांतच यः लिहिलें गेलें आहे. इतक्या थोड्या अवकाशांत सर्व पुस्तक लिहावें लाग-ामुळें रात्रीचा दिवस करून काम करावें लागलें हें सांगणें नकोच. झणूनच या स्तकांत घाईच्या लेखनाची छटा जागोजाग दृष्टीस पडेल. हें पुस्तक कोणत्याही

एका पुस्तकाच्या आधारानें लिहिलेलें नाहीं. एकंदर अर्थशास्त्रावरील वाङ्मयाचा थोडाफार व्यासंग जो माझे हातून झाला त्यावरून या शास्त्रांतील प्रश्नांवर जीं माझीं मतें बनलीं तीं स्वतंत्रपणें देण्याचा या ग्रंथांत प्रयत्न केला आहे. या विषयावर मराठींत दोनतीन लहानलहान पुस्तकें झालेलीं आहेत असें मला ठाऊक आहे. परन्तु तीं सामान्यतः भाषांतररूप असून अगदीं प्राथमिक आहेत असें ऐकलें असल्यामुळें त्या पुस्तकांचा मीं कांहींच उपयोग केला नाहीं किंवा तीं पाहिलींहि नाहींत. नवीन विषयावर मराठींत नवीन ग्रंथ लिहावयाचा म्हणजे पारिभाषिक शब्दांची मोठी अडचण येते. तशी अडचण येथेंही मला पडली. परन्तु पुष्कळ विचार करून या पुस्तकांत बहुतेक सर्व इंग्रजी पारिभाषिक शब्दांना नवे मराठी शब्द केले आहेत. नवीन बनविलेले हे शब्द जितके लहान व जितके अन्वर्थक व जितके सुलभ करतां येतील तितके करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेंच होतां होईल तों निवळ मराठी वाचकांस सुद्धां विषय समजावा अशा तऱ्हेनें विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत सिद्ध झाला आहे हें ठरविणें वाचकवर्गाकडे आहे.

वर सांगितलेंच आहे कीं, या ग्रंथांतील विवेचन स्वतंत्रपणें केलेलें आहे. तरी पण पाश्चात्य भाषेंतील पुष्कळ अर्थशास्त्रविषयक पुस्तकांचा मला उपयोग झालेला आहे. त्या सर्व पुस्तकांची यादी देत बसण्यांत अर्थ नाहीं. त्यांतल्या त्यांत अमेरिकन अर्थशास्त्री सेलिग्मन व इंग्रजी अर्थशास्त्रज्ञ निकलसन यांच्या ग्रंथांचा मला पुष्कळ उपयोग झालेला आहे हें येथें सांगणें जरूर आहे.

शेवटीं ज्या डे. व्ह. ट्रॉ. सोसायटीच्या जाहिरातीमुळें हें पुस्तक लिहिलें गेलें, त्या सोसायटीचे आभार मानणें रास्त आहे. या सोसायटीनें माझें पुस्तक उशीरानें पुरें झालें असतांही तें परीक्षणास घेण्याचें कबूल केलें, याबद्दलही तिचे आभार मानणें अवश्य आहे. ज्यांचा अर्थशास्त्रविषयक व्यासंग दोनतीन तपांचा आहे, ज्यांचा हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीबद्दलच्या ज्ञानामध्यें आज कोणी हात धरणारा नाहीं व राज्यव्यवस्थेशीं प्रत्यक्ष संबंध असल्यामुळें ज्यांना हिंदुस्थानच्या स्थितीचें अन्तर्बाह्य ज्ञान आहे असे महाराष्ट्रांतील दोन अर्थशास्त्रज्ञ व ज्यांचा मराठी भाषेचा व्यासंग आज २५।३० वर्षांचा आहे, जे स्वतः मराठी उत्तम लेखक व कवी आहेत व जे मार्मिक टीकाकार आहेत असे महाराष्ट्रांतील

एक प्रसिद्ध ग्रंथकार अशा तिघांची या पुस्तकांच्या परीक्षणाची कमिटी आहे. अशा कमिटीकडून 'प्रथम प्रयत्न या नात्यानें पुस्तक बरें आहे' एवढा जरी अभिप्राय मला मिळाला तरी केलेल्या श्रमाचें सार्थक झालें असें मला वाटेल.

गद्र्यांचा वाडा,
शनिवार पेठ, पुणें.
ता. १३ आक्टोबर १९१० } लेखक,
गोविंद चिमणाजी भाटे.

---

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

बहुतेक एका तपाच्या काळानंतर या पुस्तकाची दुसरी आवृत्ति आज निघत आहे. महायुद्धापासून अर्थशास्त्रविषयक प्रश्नाकडे बहुजनसमाजाचें जास्त लक्ष लागूं लागलें आहे. तेव्हां या दुसऱ्या आवृत्तीकडे पहिल्यापेक्षां जलद व पहिल्यापेक्षां जास्त जनसमूहाचें लक्ष लागेल अशी मला आशा आहे.

मूळचें पुस्तक डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीच्या इच्छेनुरूप तयार केलें होतें व त्या संस्थेला तें पसंत पडून ठरलेलें पांचशें रुपये बक्षीस या पुस्तकास मिळालें होतें. परीक्षकांनीं त्या वेळीं कांहीं दोष, नजरचुक्या व उणीवा दाखविल्या होत्या व त्या दुसऱ्या आवृत्तीचे वेळीं दुरुस्त करण्याची सूचना केली होती. त्या चुका या दुसऱ्या आवृत्तीचे वेळीं दुरुस्त केल्या आहेत.

या माझ्या पुस्तकाचा काय योगायोग असेल तो असो. पहिलें पुस्तक जितक्या घाईनें लिहिलें गेलें त्यापेक्षां जास्त घाईनें त्याची फेरतपासणी झाली. दोन्ही वेळां माझी सबब एकच आहे व ती ह्मणजे फुरसतीचा अभाव. तरी पण दुसऱ्या आवृत्तीकरितां पुस्तक तपासतांना माझे मित्र व सहाध्यापक बापुसाहेब सप्रे यांच्या अर्थशास्त्रविषयक नव्या ज्ञानाची मीं पुष्कळ मदत घेतली. पुस्तकाच्या उत्तरार्धांतील कांहीं कांहीं भाग तर त्यांनींच दुरुस्त केला. या त्यांच्या मदतीबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे. कोठें टीपा देऊन, कोठें एखादुसरें कलम नवें घालून, कोठें एखादें नवें कोष्टक करून, कोठें एखादें नवें प्रकरण लिहून एकंदर सर्व विषयप्रतिपादन आजतागाईत केलें आहे. हिंदुस्थान-

विषय. पृष्ठ.
भाग ५ वा–व्याज ... ... ... ... ... ... १६१
भाग ६ वा–नफा ... ... ... ... ... ... १६८
भाग ७ वा–जमीनधाऱ्याच्या पद्धति ... ... ... ... १७६
भाग ८ वा–अर्धेलीची कृषिपद्धति ... ... ... ... १८२
भाग ९ वा–प्रचंड शेती आणि छोटी शेती ... ... ... १८५
भाग १० वा–हिंदुस्थानांतील जमीनधाऱ्याच्या पद्धति ... ... १९३
भाग ११ वा–चढाओढीनें ठरलेल्या वांटणीची असमता व ती नाहींशी करण्याचे उपाय ... ... ... ... ... २००
भाग १२ वा–संप व त्यांचे सांपत्तिक परिणाम ... ... ... २०९
भाग १३ वा–मजुरांचे संघ व त्यांची उपयुक्तता ... ... २१६
भाग १४ वा–सहकारिता ... ... ... ... ... ... २२४
भाग १५ वा–सहकारी पतपेढ्या ... ... ... ... ... २३१
भाग १६ वा–हिंदुस्थानांतील सहकारी पतपेढयांचा इतिहास ... २३८
भाग १७ वा–सामाजिकपंथाचा इतिहास ... ... ... २४५
भाग १८ वा–सामाजिकपंथी योजनांचा विचार ... ... ... २६६
४. पुस्तक चवथें—विनिमय .... .... ....२८५–४१५
भाग १ ला–सामान्य विचार ... ... ... ... ... २८५
भाग २ रा–मोल व किंमत ... ... ... ... ... २८९
भाग ३ रा–बाजार व त्याची उत्क्रांति ... ... ... २९८
भाग ४ था–मागणी व पुरवठा यांचे नियम ... ... ... ३०२
भाग ५ वा–मूळ किंमतीची मीमांसा ... ... ... ... ३०८
भाग ६ वा–पैसा ... ... ... ... ... ... ३१६
भाग ७ वा–नाणीं व धात्वात्मक पैशाचे प्रकार ... ... ३२३
भाग ८ वा–द्विचलनपद्धति ... ... ... ... ... ३३२
भाग ९ वा–हिंदुस्थानांतील नाणीं व त्यांची चलनपद्धति ... ३४७
भाग १० वा–धात्वात्मक पैशाच्या मोलाची मीमांसा ... ... ३५४
भाग ११ वा–अधात्वात्मक पैसा व त्याचे प्रकार ... ... ३६०

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| भाग १२ वा–पेढीची उत्पत्ति ... ... ... ... ... | ३७२ |
| भाग १३ वा–पेढीचें स्वरूप व उपयोग ... ... ... | ३७९ |
| भाग १४ वा–बहिर्व्यापार व त्याची मीमांसा ... ... ... | ३८७ |
| भाग १५ वा–विनिमयपत्रें ... ... ... ... ... | ३९७ |
| भाग १६ वा–अप्रतिबंध व्यापार विरुद्ध संरक्षण... ... ... | ४०७ |
| **५. पुस्तक पांचवें—राष्ट्रीय जमाखर्च .... ....** | **४१६–४९४** |
| भाग १ ला–सामान्य विचार ... ... ... ... ... | ४१६ |
| भाग २ रा–ॲडाम स्मिथच्या मताप्रमाणें सरकारचीं कर्तव्यकर्में | ४२० |
| भाग ३ रा–सरकारचीं कर्तव्यकर्में ... ... ... ... | ४३३ |
| भाग ४ था–सरकारच्या उत्पन्नाच्या बाबी ... ... ... | ४३७ |
| भाग ५ वा–कराचीं तत्वें ... ... ... ... ... ... ... | ४४१ |
| भाग ६ वा–कराची संपातमीमांसा ... ... ... ... | ४४६ |
| भाग ७ वा–राष्ट्रीय कर्ज ... ... ... ... ... ... | ४५२ |
| भाग ८ वा–हिंदुस्थानसरकारचें कर्ज ... ... ... ... | ४७० |
| भाग ९ वा–हिंदुस्थानचा जमाखर्च ... ... ... ... | ४८१ |
| **६. पुस्तक सहावें—हिंदुस्थानाची सद्यःसांपत्तिक स्थिति व तिला लागू पडण्यासारख्या सिद्धांतांचें विवेचन.... ....** | **४९५–५२८** |

# या पुस्तकांत उल्लेखिलेले लेखक व इतर इसम यांच्या नांवांची सूची.


अ

अकबर ५५; ३४८.
अशोक ३०८; ३४७.
अँडरसन २४.
ॲरिस्टॉटल ७; १७; १६३; २५१; २५२.
ऑकलंड लॉर्ड ४८०.
इलिझाबेथ ४७३; ५०५.
एडवर्ड–थी थर्ड ३२६.
एलफिन्स्टन् १९८.
ओवेन रॉबर्ट २४६; २५२; २५३.
औरंगजेब ५५.

क

कझन २७.
कनिंगहॅम ११.
कर्झन २३९.
कॅनिंग १९८.
कॅरे ३१; १०४; १४६, १४७; १४८; ३९५; ४१२.
कार्लाइल ३०; ९१.
कार्व्हर ४०.
कॉबडन् १३.
कॉर्नवॉलीस–लॉर्ड १९७; १९८.
कुर्ने २९७.
केअर्नेस २७.
कोटिभास्कर ८१.
कोम्ट् ३०.
कोलबर्ट १२; १३; १४.
कोलंबस ८; ३७३; ३८९; ५०१.
कौटिल्य २.

क्रॉमवेल १२; १३.
क्रोंझिअर ३१.

ग

गजर–प्रोफेसर ८१.
गामा डि वास्को ८; ३७३; ३८९; ४५७; ५००.
गोडविन् २१.
गिफिन् २७३.
गोखले–नामदार ४८२.
ग्रेशॅम ३३१; ३३२; ३३४; ३३५; ३४१; ३६४; ३७४.
ग्लॅडस्टन् ४४५; ४६४.

च

चार्लस पहिला ३७४; ३७५; ४५८.
चार्लस दुसरा ४५८.
चेंबरलेन २८२.

ज

जेम्स पहिला ४७६.
जेव्हन्स ३१; २९५; २९७; ३२४.

झ

झेनाफन् ७.

द

दत्त–रमेशचंद्र ५१२.

न

नाइस् ३०.
नानासाहेब पेशवे ४५३.
निकॉलसन २७.
नेपोलियन ३१०; ३४२, ३३९.
न्यूटन ३३५.

ट

टाटा ८०; ८१; १०८; १२९.

टॉसिग्–ई डब्ल्यु ४०.

ट्रॅव्हेलिन–सर चार्लस ३५०.

ड

डलहौसी–लॉर्ड ४८०

डायोजिनिस ५६.

डार्विन १.

डेलीच–स्काट्स २३२; २३३; २३५; २३७.

प

पिट् १८;

पीटर–धी ग्रेट ४२५.

पील–सर रॉबर्ट ३६७; ४४५.

पेगु २७.

प्रुढां २६२.

प्लेटो ७; २५२; २६७.

फ

फोडलर ३५२.

फॉसेट २७.

फिलिप ४२५.

फोरियर २५३.

ब

बकुनिन २६२; २६३.

बर्के ४७८; ४९९.

बाजीराव पेशवा–पहिला ४५१.

बिस्मार्क–प्रिन्स २६४; २६६; २७८; २७९.

बृहस्पती [ अर्थशास्त्र ] २.

बेकन २०.

बेडन–पॉवेल ४९०.

बेन–प्रोफेसर ३१.

बेन्टिंग्ज–लॉर्ड विल्यम १९८; ४८०.

ब्राइट १३.

म

मनरो १९८; १९९.

मॅकलावुड ३२; २८५.

माधवराव थोरले–पेशवे ४५३.

मावजी पुरुषोत्तम ३११.

मार्क्स २५६; २५७; २५८; २५९; २६०; २६१; २६२.

मार्शल २७; ३१.

मालथस २०; २१; २२; २४; २७; १०६; १०७; १०८; १०९; ११०; १११; ११२; ११३; ११४; २६१.

मिडस [ राजा ] २९३.

मिल्ल–जॉन स्टुअर्ट २५; २६; २७; ६४; ७२; ७३; ७४; ७५; ७६; ७७; ७८; ८७; ११५; ११८; १३३; १३४; १४५; १५५; १५६; १८६; १९०; २७०; २७१; २७२; २७३; ४१३; ४७८.

मुल्लर ॲडम २८.

मेकॉले ४७८; ५०८; ५०९.

य

यंग ऑर्थर १८८.

र

रफेसिन् २३२; २३३; २३५; २३६.

रास्किन. ३०; ९१.

रहिमतुल्ला ऑ–सर इब्राहिम ४०८; ४९४.

रानडे–रावसाहेब २३९; ४७५.

रिकार्डो २०२; २५६; २६१; २७०; २७३; २८७; ३११; ३१२;

४८७.
रोशर ३०.

ल

लॅझेली फर्डिनंड २५३; २५४; २५६.
लायकरगस ३२४.
लॉ जॉन ३७०.
लॉक १४.
लिटन ४६१.
लिस्ट फ्रेडरिक् २८; २९; ४१४; ५०२; ५२३; ५२४.
लुई चवदावा ३७६.
लेक्लेअर २२७; २२८.

व

वेट २०३.
वाड रावबहादुर ४५२.
वॉकर ३१.
वॉगनर २६४; २६५; २६६; २७९.
वॉलेस २७०.
विक्रमांकदेव ३.
विल्कस ४९०.
विल्यम् तिसरा ३७६; ४५८.
विल्सन ५२३.
वेडरबर्न २३९.
वेलस्ली--लॉर्ड ४८०,
वेस्ट २४.

श

शांबूक ४.
शिकंदर ४२५.
शिवाजी ३४८; ३४९.
शेक्सपियर ३१०.

स

सायमन् सेन्ट २५३.
सॉक्रेटीस ३७.
सिजविक २७.
से-जे. बी. २७.
सेलिगमन ४०.
स्पेन्सर--हर्बर्ट १; ११२; ३२४.
स्मिथ- अडम ९; ११; १७; १८; १९; २०; २५; २६; २८; ३४; ३५; ३७; ४८; ५८; ५९; ६४; ६९; ८३; ८५; ८७; ९५; ९६; ९७; ११२; १५६; १५९; १६६; १७३; २०७; २९२; २९३; २९५; ३७८; ३८४; ३९१; ४०७; ४११; ४१७; ४१९; ४२०; ४२१, ४३०; ४३१; ४३२; ४३३.
स्मिथ-बॅबिंगटन-४०३.

ह

हर्शेल ३४७; ३५१,
हॅल्डीबांड ३०.
हॅनीबॉल ५३.
हेन्री-जॉर्ज २७०; २७१; २७२.
हेन्री-पोर्तुगालचे युवराज ३८८.
होमर ३२४.
ह्यूम १७.

# अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें.

## पुस्तक पहिलें.

### भाग पहिला.

#### उपोद्घात.

#### अर्थशास्त्राचा इतिहास.

एकोणिसाव्या शतकांतील जर कोणत्या एका शोधानें सर्व शास्त्रीय कल्पनांमध्यें मोठी क्रांति घडवून आणली असेल तर ती उत्क्रांतितत्वानें होय. डार्विननें प्रथम या तत्त्वाचा प्राणिशास्त्रांत उपयोग केला खरा, तरी पण त्यानें व कांहींसें त्याचे पूर्वींच हर्बर्ट स्पेन्सरनें तें तत्त्व सर्व विषयांस व सर्व शास्त्रांस सारखेंच लागू आहे असें सिद्ध केलें. तेव्हांपासूनच ऐतिहासिक पद्धतीला महत्त्व आलें व प्रत्येक शास्त्राचीं तात्त्विक व ऐतिहासिक अशीं दोन स्वतंत्र अंगें बनत चाललीं. पहिल्यामध्यें एखाद्या शास्त्राचीं मूलतत्त्वें, त्यावरून निघणारीं प्रमेयें, सिद्धांत व उपसिद्धांत यांचें सविस्तर विवेचन असावयाचें; व दुसऱ्या अंगामध्यें त्या शास्त्राच्या उदयापासून तों पूर्ण वाढीपर्यंतचा इतिहास असावयाचा. हा ऐतिहासिक भाग तात्त्विक भागापेक्षां स्वाभाविकच मनोरंजक असून त्याच्या योगानें शास्त्राचीं तत्त्वें व प्रमेयें सुलभ रीतीनें समजूं लागतात. म्हणून अलीकडे प्रत्येक शास्त्राचे इतिहास प्रसिद्ध होत आहेत. तेव्हां हातीं घेतलेल्या शास्त्राच्या तत्त्वांचें व प्रमेयांचें सुलभ रीतीनें आकलन व्हावें अशा हेतूनें या उपोद्घातांत अर्थशास्त्राचा थोडक्यांत इतिहास देण्याचा विचार केला आहे; परंतु हा इतिहास युरोपीय राष्ट्रांमधलाच देणें अपरिहार्य कां आहे हें खालील विवेचनावरून ध्यानांत येईल.

पाश्चात्य विद्या व वाङ्मय आणि संस्कृत विद्या व वाङ्मय यांची तुलना केल्यास संस्कृतांतील कांहीं उणिवा चटदिशीं ध्यानांत आल्यावांचून राहात नाहींत. आमच्यामध्यें जगाच्या कविमालेमध्यें पहिल्या रांगेंत बसण्यायोग्य असे कवी झाले आहेत; सर्व जगांतील सहृदय विद्वान लोकांनीं ज्यांच्या कृती वाचून आनंदानें माना डोलवाव्या असे नाटयकार झाले आहेत; ज्यांच्या कांहीं बाबतींतील ज्ञानाबद्दल अजूनही पाश्चात्य लोकांना आश्चर्य वाटतें असे नामांकित गणिती व ज्योतिषी झाले आहेत; ज्यांच्या कांहीं कांहीं वैद्यकविषयक उपपत्ति व योजना सुधारलेल्या देशांत अलीकडे पसंत पडत आहेत असे प्रसिद्ध वैद्यक-ग्रंथकार झाले आहेत. धर्मशास्त्र व वेदांतशास्त्र याबद्दल तर संस्कृत वाङ्मयाचा हात कोणत्याही वाङ्मयाला धरतां येणार नाहीं असें पाश्चात्य राष्ट्रें सुद्धां कबूल करतात. पाश्चात्य वाङ्मयाचा विशेष म्हणजे आधिभौतिक शास्त्रें व तत्संबंधीं वाङ्मय होय. परंतु अलीकडील शोधांवरून रसायनशास्त्रासारख्या शास्त्राचेंही वाङ्मय संस्कृतांत आहे असें दिसतें. मात्र इतिहास व अर्थशास्त्र या दोन विषयांसंबंधीं पुष्कळ अंशानें आपल्याला मान खालीं घालावी लागेल, हें कबूल करणें भाग आहे. या दोन विषयांत आमच्या इकडे नामांकित ग्रंथकार झाले नाहींत इतकेंच नव्हे, तर या विद्यांचा व विषयांचा शास्त्रीय व सोपपत्तिक विचारच मुळीं आमच्या पूर्वजांनीं केलेला दिसत नाहीं. आमच्या विस्तीर्ण वाङ्मयप्रदेशांत या दोन विषयांचे भूमिभाग कधींही लागवड न केलेल्या ओसाड जमिनीप्रमाणें आहेत. *

---

* इतिहास व अर्थशास्त्र या विषयांच्या आपल्या वाङ्मयांतील अभावासंबंधींचें हें विधान आक्षेपार्ह आहे असें सकृद्दर्शनीं वाटण्याचा संभव आहे. विशेषतः कौटिल्यांच्या व बृहस्पतीच्या 'अर्थशास्त्र' या नांवाच्या ग्रंथांच्या प्रसिद्धीपासून तर वरील विधान असत्य आहे असेंही कोणी म्हणतील. पण कौटिल्याचें 'अर्थशास्त्र' व यूरोपांतील 'अर्थशास्त्र' यांमध्यें शब्दाखेरीज कांहींच साम्य नाहीं. कौटिल्याचें अर्थशास्त्र हा मौर्य घराण्याच्या काळच्या राज्यव्यवस्थेची व राज्यकारभाराची सविस्तर माहिती देणारा ग्रंथ आहे. त्यांत बाजार, श्रेष्ठी, मजुरी व कारखाने वगैरे व्यापारविषयक व संपत्तिविषयक संस्थांचा उल्लेख आलेला आहे खरा; पण तो राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें आलेला आहे. राष्ट्रीय संपत्तीच्या शास्त्रीय मीमांसेच्या दृष्टीनें त्या संस्थांचा त्या ग्रंथांत विचार केलेला नाहीं. युरोपीयन अर्थशास्त्राचा तर राष्ट्रीय संपत्तीचें स्वरूप व उत्पत्ति यांचें

हे प्रांत असे ओसाड कां राहिले हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. या विषयांवर आमच्यांत सर्वमान्य ग्रंथ होते; परंतु काळाच्या प्रचंड ओघांत ते नाहींसे झाले व त्यामुळेंच ते उपलब्ध नाहींत असें सकृद्दर्शनीं कोणी म्हणेल; परंतु अशी वस्तुस्थिति असती तर बाकी विषयांचे ज्याप्रमाणें थोडेथोडे ग्रंथ राहिले त्याप्रमाणें या विषयाचेही कांहीं कांहीं ग्रंथ रहावयास पाहिजे होते. दुसरें, ही गोष्ट निव्वळ काकतालीय आहे, असें म्हणणें युक्तीस धरून दिसत नाहीं. तसेंच आमच्या हीनबुद्धीमुळें असें झालें असें म्हणावें, तर तेंही बरोबर नाहीं. कारण ज्या आमच्या पूर्वजांनीं आपल्या बुद्धिसामर्थ्यानें इतकीं शास्त्रें व विद्या निर्माण केल्या व त्यांवर नामांकित ग्रंथरचना केली, त्यांना या दोन विषयांवर सर्वमान्य ग्रंथरचना करतां आली नसती असें समंजस मनुष्य म्हणणार नाहीं. तर मग आमच्या वाङ्मयांतील या विषयांच्या अभावाची मीमांसा काय?

आमची समजूत अशी आहे कीं, या अभावाला कांहीं सबळ कारणें आहेत, व त्यांचा थोडासा विचार करणें येथें अप्रासंगिक होणार नाहीं. ज्या अर्थी या उपोद्घाताचा प्रत्यक्ष संबंध अर्थशास्त्राशीं आहे, त्या अर्थी या शास्त्राच्या आमच्या वाङ्मयांतील अभावाचा मुख्यत्वेंकरून येथें विचार करणें बरें.

आर्यलोक प्रथमतः हिंदुस्थानांत आले, त्या वेळीं त्यांचेमध्यें वर्ण व जाती हा भेद नव्हता, ही गोष्ट आतां निर्विवाद सिद्ध झाली आहे. परंतु येथें आल्यानंतर वर्णाची कल्पना समाजांत बद्धमूल होऊं लागली व येथल्या मूळच्या काळ्या वर्णाच्या रहिवाशांना आर्यलोकांनीं शूद्र या नांवाच्या चौथ्या वर्णामध्यें सामील केल्यापासून तर वर्णावर्णांमधील भेद कडक होत चालले. धर्मशास्त्रदृष्ट्या जरी विद्या व ज्ञान मिळविण्याचा अधिकार वरच्या तीनही आर्यवर्णांस होता, तरी प्रत्यक्ष व्यवहारांत ज्ञानाची गुरुकिल्ली ब्राह्मणांच्या हातांत आली व बाकीचे वर्ण

---

विवेचन करण्याचा प्रधान हेतु आहे. तेव्हां या युरोपीयन शास्त्रीय दृष्टीनें आमच्या वाङ्मयांत अर्थशास्त्रविषयक वाङ्मयाचा अभाव आहे, या विधानाला बाध येत नाहीं. आमच्या संस्कृत वाङ्मयांत इतिहास-वाङ्मयाचा अभाव आहे, ही सर्वमान्य गोष्ट आहे. राजतरंगिणी किंवा विक्रमांकदेवचरित अशा ग्रंथांनीं अर्थात् इतिहासग्रंथांची उणीव नाहींशी होत नाहीं. कारण वर निर्दिष्ट केलेले ग्रंथ हे काव्यग्रंथ होत. ते इतर काव्यांप्रमाणें कल्पनाशक्तीनें निर्माण केलेले आहेत. त्यांत इतिहासकाराची सत्यान्वेषण-बुद्धि नाहीं हें उघड आहे.

आपापल्या धंद्यांत चूर होऊन गेले. विद्या व ज्ञान मिळविणें, तें जतन करून ठेवणें व वाढविणें आणि तें दुसऱ्यास शिकविणें हें काम फक्त ब्राह्मणांचें, असा सक्त नियम झाला. दुसऱ्या वर्णाच्या मनुष्यानें ब्राह्मणांचें काम करणें किंवा त्यांचे आचार पाळणें म्हणजे एक मोठें पाप आहे, असा दृढ समज झाला. याचें प्रत्यंतर रामायणांतील शंबुकाच्या गोष्टीवरून खासें येतें. रामासारख्या सत्व-शील राजाला तपश्चर्या करणाऱ्या शूद्र शंबुकाचा गुन्हा देहान्त प्रायश्चितास योग्य असा वाटला. या कडक नियमानुरूप समाजांतील ब्राह्मणवर्गच काय तो विद्या-व्यासंगी वर्ग राहिला; व आपल्या विशिष्ट धंद्याखेरीज त्यांना जे कामधंदे करतां आले किंवा प्रसंगानें करणें भाग पडलें तितक्या धंद्यासंबंधी सोपपत्तिक ज्ञानाचें वाङ्मय त्यांनीं भाषेंत निर्माण केलें. धार्मिक आचार चालविणें व समाजाला धर्मशिक्षण देणें हें त्यांचें मुख्य काम असल्यामुळें धर्मशास्त्र व वेदान्तशास्त्र यांतच त्यांनीं आपलें बहुतेक बुद्धिसर्वस्व खर्च केलें व म्हणूनच हें वाङ्मय संस्कृतांत अपरंपार आहे. परंतु धार्मिक आचार योग्य तऱ्हेनें पाळण्याकरितां आमच्या धर्मांत मुहूर्त, विशेष काळ व ऋतु सांगितलेले असल्यामुळें ही काल-गणना करण्याकरितां ब्राह्मणांना ज्योतिषशास्त्राची उपपत्ति करावी लागली व अंकगणित, बीजगणित, त्रिकोणमिति वगैरेसारख्या गणितशास्त्रांच्या शाखांची आवश्यकता, ग्रह व तारे यांच्या गतीचें ज्ञान होण्यास अवश्य असल्यामुळें हेंही शास्त्र ब्राह्मणांनीं वाढविलें. गांवचे उपाध्याय, गांवचे जोशी, गांवचे धर्मोपदेशक व गांवचे शिक्षक या नात्यानें ब्राह्मणांना गांवांत व समाजांत साहजिक प्रमुखत्व होतें; व जुन्या काळीं वैद्यक व फलज्योतिष यांचा पुष्कळ संबंध असल्यामुळें ब्राह्मणांकडे वैद्यकीचा धंदाही ओघानेंच आला. म्हणूनच वैद्यकशास्त्र व त्याला उपयोगी असें वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, शारीरशास्त्र व रोगचिकित्साशास्त्र यांचाही थोडाबहुत व्यासंग ब्राह्मणांस करणें भाग पडलें व यामुळेंच या आधि-भौतिक शास्त्रांचें थोडेंबहुत वाङ्मय आमच्यामध्यें सांपडतें.

परंतु ब्राह्मणांनीं पूर्वकाळीं वाणिज्यवृत्ति कधींच पत्करलेली दिसत नाहीं. यामुळें उद्योगधंदे, कलाकौशल्य व व्यापारउदीम यांची शास्त्रीय उपपत्ति करून त्यांचें एक स्वतंत्रशास्त्र बनविण्याची कल्पना साहजिकपणें त्यांच्या डोक्यांत आली नाहीं. आपल्या समाजांत कलाकौशल्याची, उद्योगधंद्याची व व्यापार-

उदीमाची वाढ व प्रगति वैश्यवर्गानें पुष्कळ केली. ही वाढ व प्रगति युरोप ज्यावेळीं अगदीं रानटी स्थितींत होतें त्या वेळेपासून झालेली होती हेंही खरें. आमच्या वैश्यवर्गानें हस्तकौशल्य, प्रत्यक्ष अनुभव व कामाचा सराव यानें येणारें ज्ञान उत्तम तऱ्हेनें मिळविलें होतें; परंतु तें ज्ञान ' बापापासून लेंकाला ' अशा सांप्रदायस्वरूपानें मिळे. यामुळें तें ज्ञान पुस्तकांत ग्रथित करून त्यावरून सामान्य तत्वें व सिद्धांत काढणें व त्याची उपपत्ति बसविणें हें काम वैश्यवर्णाला शक्य नव्हतें. कारण, विद्या व ज्ञान यांला ते अगदीं पारखे असल्यामुळें, असल्या तऱ्हेचा बुद्धिविकास त्यांच्यामध्यें झालेला नव्हता यामुळें जरी आमच्या इकडे औद्योगिक प्रगति झाली व तत्संबंधी संस्थाही पूर्णत्वास आल्या तरी त्यांची उपपत्ति व मीमांसा करणारें शास्त्र निर्माण झालें नाहीं. याचें एक उदाहरण अर्थशास्त्रांतील एका विषयाचें घेतां येईल. अर्थशास्त्रांतील एक महत्वाचा व मनोरंजक भाग म्हणजे पैसा व विनिमय हा होय. या भागांत पैशाचें स्वरूप व त्याच्यायोगानें होणाऱ्या अदलाबदलीचें स्वरूप, पेढ्या व त्यांचा उपयोग, हुंडीचा व्यापार व त्याची उपयुक्तता वगैरे विषयांचा ऊहापोह केलेला असतो. आतां आमच्या समाजांत या सर्व गोष्टी पूर्णतेस आल्या होत्या व या संबंधाचा स्वतंत्र धंदा करणारे सराफ व पेढीवाले हेही होते. पैशाची देवघेव करणें, नाणीं पारखून घेणें, पेढीचा व्यापार चालविणें, हुंडीचा व्यवहार करणें वगैरे कामें हे लोक करीत, व मोठमोठ्या शहरीं सराफांचा सराफकट्टा असे. व सर्व देशभर पेढ्यांचें जाळें पसरलेलें असे. पुण्यास पैसे भरले असतां काशीस हुंडी दाखवून पैसे मिळत अशाबद्दल जुने दाखले सांपडतात. पेढ्यांच्या व्यवहारासंबंधीं बहुतेक पारिभाषिक शब्द आमच्या भाषेंत रूढ झालेले होते. परंतु या भागाची इतकी व्यावहारिक प्रगति झाली असतांना या विषयावर एखादा ग्रंथ झाला नाहीं. कारण, या उपयुक्त व्यवहाराची मीमांसा करण्यास लागणारा बुद्धिविकास वैश्य जातींत झाला नव्हता. तेव्हां आमच्या वाङ्मयांतील अर्थशास्त्राच्या अभावाचें एक मोठें कारण म्हणजे आमच्यांतील तीव्र जातिभेद होय असें म्हणणें प्राप्त आहे.

या अभावाचें दुसरें कारण म्हणजे आमच्या तत्वज्ञानानें आमच्यांत रूढ झालेल्या कांहीं कल्पना व भावना ह्या होत. " संसार हा असार आहे;

विषयसुखाची इच्छा ही मनुष्यास अधोगतीस नेणारी आहे; संपत्ति ही सर्व दुःखाचें मूळ आहे; मानवी आयुष्य क्षणभंगुर आहे. संसार, मानवी वासना, संपत्ति, विषयसुख या सर्व गोष्टी नश्वर आहेत; या सर्व मायामय आहेत; यांमध्यें सत्यत्व व सनातनत्व नाहीं; यामुळें या सर्व मोक्षविघातक आहेत; ज्याला मोक्षाची इच्छा आहे त्यानें ह्या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष केलें पाहिजे." अशा प्रकारच्या निवृत्तिपर वेदान्ताचा आमच्या ब्राह्मणवर्गावर बराच अंमल होता. यामुळेंच इतिहास, राजनीति व अर्थशास्त्र या तिन्ही विषयांकडे आमच्या ब्राह्मणांचें लक्ष गेलें नाहीं. कारण, हे तिन्हीं विषय नश्वर गोष्टींबद्दल ऊहापोह करणारे; तेव्हां यांत तथ्य किंवा सनातनत्व तें काय असणार असें त्यांना वाटणें साहजिक होतें.

अर्थशास्त्राच्या उदयास अडथळा करणारीं अशींच कारणें प्राचीन ग्रीक लोकांमध्येंही होतीं. त्यांच्यामध्यें गुलामगिरीचा प्रघात जारीनें चालू होता, व कलाकौशल्याचीं कामें तेच गुलाम करीत; यामुळें उद्योगधंदे व व्यापारउदीम हीं हलक्या दर्ज्याचीं कामें अशी ग्रीक नागरिकांमध्यें दृढ समजूत होती. त्यांच्या मताप्रमाणें नागरिकांस योग्य असे धंदे म्हणजे शिपाईगिरी व राज्यकारभार. ग्रीक लोकांमध्यें प्रजासत्ताक राज्यपद्धति असल्यामुळें नागरिकांचा बहुतेक वेळ राजकीय उलाढालींत जात असे. ह्यामुळें त्या लोकांमध्यें इतिहास व राजनीति या शास्त्रांचा उदय झाला. या विषयांत त्यांनीं इतकी पारंगतता मिळविली कीं, ग्रीक लोकांसारखे प्रख्यात इतिहासकार, प्रख्यात मुत्सद्दी व प्रख्यात राजनीतिकोविद फारच थोड्या राष्ट्रांच्या वांट्याला आलेले आहेत. परंतु ज्याप्रमाणें आमच्यांत जातिभेद व संसाराची असारता ह्या कल्पनांमुळें अर्थशास्त्राचा उदय होऊं शकला नाहीं त्याप्रमाणेंच ग्रीक लोकांतील गुलामगिरी व त्यांची उद्योगधंद्याबद्दलची तुच्छताबुद्धि यांच्यायोगानें अर्थशास्त्राचा उदय त्या लोकांत होऊं शकला नाहीं. येथपर्यंतच्या विवेचनावरून ज्या शास्त्राची पूर्वपीठिका आपल्यास पहावयाची आहे तें शास्त्र फार जुनें नाहीं, हें तेव्हांच ध्यानांत येईल. परंतु इतर शास्त्रांच्या इतिहासाचे तीन काळ कल्पिण्याचा युरोपियन ग्रंथकारांचा रिवाज आहे त्याला अनुसरून अर्थशास्त्राच्या इतिहासकारांनींही अर्थशास्त्राच्या इतिहासाचे तीन काळ कल्पिले आहेत. एक ग्रीक व रोमन लोकांच्या सुधारणेचा

जुना काळ; दुसरा क्रिश्चन व रोमन कॅथलिक धर्मांच्या प्रसाराचा व वाढीचा मध्यकाळ व तिसरा प्राटेस्टंट धर्माच्या उदयापासूनचा अर्वाचीन काळ.

ग्रीक व रोमन लोकांमध्यें गुलामगिरीच्या प्रघातामुळें अर्थशास्त्राचा उदय होऊं शकला नाहीं हें वर सांगितलेंच आहे. परंतु ग्रीक लोकांनीं समाजशास्त्र व राजनीतिशास्त्र यांची चांगली वाढ केली होती; व या शास्त्रांच्या प्रमेयांचा विचार करतांना प्रसंगोपात्त ग्रीक तत्त्वज्ञान्यांनीं अर्थशास्त्रविषयक कांहीं तत्त्वांचा उल्लेख केला आहे. अर्थशास्त्राच्या इतिहासकारांनीं या उल्लेखांचा एकत्र संग्रह करून त्यालाच अर्थशास्त्राची पूर्वपीठिका मानिली आहे. ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो यानें " प्रजासत्ताक राज्य " म्हणून एक नामांकित ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्यें श्रमविभाग या अर्थशास्त्राच्या एका तत्त्वाचें सुंदर तऱ्हेनें वर्णन केलें आहे. त्याप्रमाणेंच ॲरिस्टॉटल यानें आपल्या सुप्रसिद्ध " नीतिशास्त्र व राजनीतिशास्त्र " या ग्रंथांमध्यें व्यापाराच्या स्वरूपाचें व पैशाच्या उत्पत्तीचें व कार्याचें सोडें मुद्देसूद व मार्मिक विवरण केलें आहे. तसेंच झेनाफन् या इतिहासकारानेंही आपल्या ग्रंथांत अर्थशास्त्रविषयक कांहीं बाबींचा विचार केलेला आहे. रोमन लोक शास्त्रांच्या कामांत ग्रीक लोकांच्या पुढें कधींच गेले नाहींत. ग्रीक लोकांनीं मिळविलेलें ज्ञान त्यांनीं आपल्या भाषेंत आणिलें इतकेंच. यामुळें अर्थशास्त्राला त्यांनीं एकही महत्त्वाच्या तत्त्वाची जोड करून दिली नाहीं यांत कांहीं एक आश्चर्य नाहीं.

युरोपाचा मध्यकाळ सन ४०० पासून १५०० अखेर किंवा पंधराव्या शतकाच्या अर्ध्यापर्यंत मानतात. या सुमारास मुसलमान लोकांनीं कॉन्स्टंटिनोपल हें शहर काबीज केलें व त्यामुळें तेथल्या बादशहाच्या पदरीं असलेले ग्रीक व लॅटिन या भाषा अवगत असणारे विद्वान् लोक यांचा राजाश्रय नाहींसा होऊन ते लोक सर्व युरोपभर पसरले व त्यांनीं तेथें ग्रीक व लॅटिन भाषा सामान्य जनांस शिकविण्याची सुरुवात केली. याच काळाला विद्येच्या पुनरुज्जीवनाचा काळ म्हणतात, व येथून अर्वाचीन काळाला प्रारंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. या मध्यकाळांत जरी अर्थशास्त्राचा प्रत्यक्ष उदय झाला नाहीं तरी त्या उदयास अनुकूल अशी परिस्थिति याच काळांत निर्माण झाली. प्रथमतः ग्रीक व रोमन लोकांमध्यें प्रचलित असलेली गुलामगिरी क्रिश्चन धर्माच्या उदार कल्पनांनीं

लुप्तप्राय झाली व सर्व धंद्यांना व उद्योगांना एक प्रकारची मान्यता आली. युरोपामध्यें निरनिराळीं स्वतंत्र राज्यें व राष्ट्रें निर्माण झालीं. युरोपियन लोकांनीं येशूची जन्मभूमि जी जेरुसलेम ती मुसलमानांपासून हस्तगत करून घेण्याकरितां कित्येक शतकें धर्मयुद्धें केलीं. त्यांचा युरोपाच्या उद्योगधंद्यावर व व्यापारउदीमावर हितकर परिणाम झाला. प्रथमतः या युद्धाच्या योगानें सरदारांच्या जमिनी मध्यमस्थितीच्या, उद्योगी व भांडवलवाल्या अशा लोकांच्या हातीं आल्या; त्यामुळें शेतकींत सुधारणा होऊं लागली. "दमास्कस येथें धर्मयोद्ध्यांनीं कापड करण्याची व धातूचीं कामें करण्याची कला हस्तगत करून घेतली. रेशमाचा धंदा व रेशमी किडे वाढविण्याची विद्या युरोपांत धर्मयोद्ध्यांनीं नेली. टायर येथील कारखाने पाहून व्हेनिसच्या व्यापाऱ्यांनीं आपल्या कांचेच्या कारखान्यांत सुधारणा केली." धर्मयुद्धांमुळें नौकानयनास व लोकांच्या साहसवृत्तीस उत्तेजन मिळालें. याचे योगानें आशिया व युरोप यांच्यामध्यें दळणवळण वाढून या दोन खंडांमध्यें जारीनें व्यापार सुरू झाला आणि आशिया व हिंदुस्थान येथील उत्तम कलाकौशल्याचा माल युरोपमध्यें आऊन तेथें लोकांना त्याची गोडी लागली व तसले कारागिरीचे धंदे युरोपांत सुरू करण्याची प्रवृत्ति सुरू झाली. याप्रमाणें धर्मयुद्धाचा मूळ उद्देश सिद्धीस गेला नाहीं तरी इसापनीतींतील शेतांत पुरून ठेवलेल्या संपत्तीच्या शोधार्थ शेत नांगरणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलांप्रमाणें युरोपियन राष्ट्रांचा या धर्मयुद्धापासून फार फायदा झाला.

याप्रमाणें युरोपामध्यें व्यापारधंदा वाढत असतांना त्यांत भर पाडणारीं आणखी कारणें उत्पन्न झालीं. छापण्याच्या कलेचा शोध लागल्यामुळें ज्ञानप्रसार सामान्य लोकांत सुद्धां झपाट्यानें होऊं लागला. ज्योतिष, रसायन वगैरे शास्त्रांत जे नवीन शोध लागले त्यामुळें ज्ञानलालसा वाढून सर्व शास्त्रांची भराभर वाढ होत गेली. धर्मयुद्धानें आधींच नौकानयनास व लोकांच्या दर्यावर्दीपणास उत्तेजन मिळालें होतें; त्यांतच होकायंत्राच्या शोधाची भर पडून युरोपांतील लोकांच्या धाडसास व साहसास अधिक जोर आला व एकीकडे **कोलंबसानें** अमेरिका खंड शोधून काढिलें व त्याला हिंदुस्थानाचा पश्चिम किनारा समजून पश्चिम हिंदुस्थान असें नांव दिलें. तर दुसरीकडे **वास्कोडिगामा** यानें आफ्रिका ओलांडून केप ऑफ गुड होपच्या मार्गें खऱ्या हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून

काढिला. या दोन शोधांमुळें युरोपांतील जुन्या व्यापारी मार्गावरील राष्ट्रांचें व शहरांचें औद्योगिक व व्यापारी वर्चस्व कमी कमी होत जाऊन तें स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स, इंग्लंड व हॉलंड या अटलांटिक महासागरावरील राष्ट्रांना येऊं लागलें. शिवाय या राष्ट्रांनीं आफ्रिकेंत व विशेषतः अमेरिकेंत आपल्या वसाहती केल्या व या वसाहतींचा सर्व व्यापार या देशांच्या ताब्यांत आला. याप्रमाणें युरोपांतील वर निर्दिष्ट केलेल्या देशांमध्यें उद्योगधंद्याची व व्यापारउदीमाची प्रगति होऊं लागून त्यांची संपत्ति वाढत चालली. त्यांतल्या त्यांत अमेरिकेमध्यें सोन्यारुप्याच्या खाणींचा शोध लागला व या पैशाच्या लोभानें हजारों लोक अमेरिकेंत जाऊं लागले व गबर होऊन परत येऊं लागले. यामुळें युरोपखंडांत सोन्यारुप्याचा ओघ सुरू झाला व तिकडून पुढें तो ओघ हिंदुस्थानाकडेही वळला. युरोपांतल्या बहुतेक देशांत नाण्यांचा सुकाळ झाला व पदार्थांच्या किंमती अतोनात वाढूं लागल्या. ज्याप्रमाणें अलीकडील दहा बारा वर्षांमध्यें हिंदुस्थानांत पदार्थांच्या बाजारभावांत विलक्षण क्रांति होत चालली आहे व यामुळें लहान–थोर, अशिक्षित–सुशिक्षित, गरीबश्रीमंत वगैरे सर्व वर्गांच्या लोकांचें लक्ष या विषयाकडे लागलें आहे, त्याप्रमाणें त्या काळीं युरोपखंडांतही स्थिति झाली. दहावीस वर्षांत पदार्थांच्या भावांत जमीनअस्मानाचें अंतर पडलें. या सर्व कारणांनीं विचारी लोकांचें लक्ष या संपत्तीच्या विषयाकडे लागलें व याचेंच फळ अर्थशास्त्राचा उदय हें होय.

संपत्तीसंबंधानें युरोपियन लोकांच्या व राष्ट्रांच्या मनांत विचार येऊं लागून त्यांना जें पहिलें व्यवस्थित स्वरूप आलें त्यालाच अर्थशास्त्राचे इतिहासकार अर्थशास्त्रांतील पहिला पंथ ह्मणतात. या पंथाचें नांव उदीमपंथ होय. या पंथाचीं हल्लीं दोन भिन्न भिन्न वर्णनें सांपडतात. या पंथाच्या प्रवर्तकांनीं किंवा त्याच्या अनुयायांनीं या पंथाचीं तत्त्वें व मतें यांचा सविस्तरपणें विचार करून लिहिलेले ग्रंथ पुष्कळ काळपर्यंत उपलब्ध नव्हते. बराच काळपावेतों या पंथाच्या तत्त्वाची जी माहिती लोकांना होती ती या पंथाचा विरोधक अॅडम स्मिथ याच्या ग्रंथावरून काय ती होती. अॅडम स्मिथनें या पंथाचें खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

या पंथाच्या मताप्रमाणें संपत्ति ह्मणजे सोनेंनाणें किंवा पैसा होय. अर्थात् संपत्ति व पैसा हे समानार्थक शब्द, इतकेंच नव्हे तर संपत्तीचें सारसर्वस्व

ह्मणजे पैसा. ज्याप्रमाणें एखाद्या व्यक्तीजवळ हजारों रुपये असले ह्मणजे आपण त्याला श्रीमंत ह्मणतों, त्याप्रमाणेंच ज्या देशांत पैसा व सोनेरुपें मुबलक आहे तो देश श्रीमंत होय. म्हणूनच ज्या देशाला आपली भरभराट व्हावी अशी इच्छा असेल त्यानें देशांत पैसा जास्त येण्याचें धोरण ठेविलें पाहिजे. ज्या देशांत सोन्यारुप्याच्या खाणी आहेत, तेथें विशेष तजवीज करण्याची गरज नाहीं, परंतु जेथें अशी स्थिति नाहीं, तेथें बाहेरून देशांत सोनेरुपें येईल व देशांतील सोनेरुपें बाहेर न जाईल अशी तजवीज केली पाहिजे व ह्मणूनच या पंथाच्या पुरस्कर्त्यांनीं प्रथमतः सोन्यारुप्याचा निर्गत व्यापार कायद्यानें बंद केला. परंतु असले कायदे सहज मोडतां येतात असें दिसून आल्यावरून या प्रत्यक्ष प्रतिबंधापेक्षां दुसरा एक सुलभ उपाय त्यांनीं शोधून काढला. तो उपाय ह्मणजे देशांतल्या आयातनिर्गत व्यापारावर निर्बंध ठेवून देशांत पैसा जास्त येईल असें करणें हा होय. देशाबाहेर जो माल जातो त्याबद्दल देशांतील व्यापाऱ्यांना पैसे मिळतात, व देशांत जो माल येतो त्याबद्दल पैसे देशाबाहेर जातात. तेव्हां निर्गत मालाची किंमत आयात मालापेक्षां नेहमीं जास्त राहिली ह्मणजे या दोहोंमधली बाकी देशामध्यें पैशाच्या रूपानें येईल. यालाच उदीमपंथी लोक व्यापाराचा आढावा ह्मणतात. व प्रत्येक देशानें हा आढावा आपल्याला अनुकूल करून घेण्याचें धोरण ठेविलें पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता व हा आढावा आपल्याला अनुकूल करून घेण्याकरितां उदीमपंथी मुत्सद्यांनीं व राष्ट्रांनीं सहा उपायांची योजना केली होती. निर्गत व्यापार वाढविण्याकरितां योजावयाचे उपाय ह्मणजेः—

१ बाहेर–देशीं माल पाठविणारास दरशेंकडा कांहीं प्रमाणानें बक्षिस देणें.

२ त्यांना जकातीची सूट किंवा सवलत देणें.

३ दुसऱ्या देशांत आपला माल पुष्कळ खपावा अशा तऱ्हेचे फायदेशीर तह त्या देशाशीं करवून घेणें.

४ आपल्या ताब्यांतल्या वसाहती स्थापून त्यांच्याकडील सर्व व्यापार आपल्या ताब्यांत ठेवणें.

५ आयात मालाचा व्यापार कमी करण्याकरितां त्यावर जबर जकाती ठेवणें.

६ कायद्यांनीं मालाची आयात अजीबाद बंद करणें.

या षट्साधनांनीं आपल्या देशाचा निर्गत व्यापार अतोनात वाढेल व व्यापाराचा आढावा आपल्याला अत्यंत अनुकूल झाल्यानें देशांत मुबलक पैसा व सोनेंनाणें खेळतें राहील असा उदीमपंथी लोकांचा दृढ समज होता.

**ॲडम स्मिथनें** आपल्या 'राष्ट्रांची संपत्ति' या पुस्तकामध्यें उदीमपंथाच्या तत्त्वांचीं व मतांची ही हकीकत दिली आहे. **ॲडम स्मिथच्या** काळीं उदीमपंथाच्या स्थापनेला शेंदोनशें वर्षें होऊन गेलीं होतीं व त्याच्या धोरणाचा कांहींसा अतिरेक झाला होता. कारण या पंथाचा राज्यकर्त्यांच्या व मुत्सद्यांच्या मनांवर पूर्ण पगडा बसून त्यासंबंधीं अतोनात कायदे होऊन हजारों पदार्थांवर निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या कारणांनीं जबर जकाती बसविलेल्या होत्या व यामुळें **ॲडम स्मिथचें** वर्णन कांहीं अंशीं त्या काळीं तरी उदीमपंथाला लागू होतें. शिवाय **ॲडम स्मिथ** हा उदीमपंथाचा विरोधक होता व त्याच्या पुस्तकाचा एक हेतु उदीमपंथाच्या मतांचें व धोरणाचें खंडन करणें हा होता. यामुळें त्याचें वर्णन एकतर्फी व एककली व्हावें व त्याला उदीमपंथांत कांहीं एक ग्राह्यांश नाहीं असें वाटावें हें स्वाभाविक होतें.

परंतु एकोणिसाव्या शतकांत ऐतिहासिक पद्धतीला प्राधान्य मिळालें व प्रत्येक शास्त्राचा पूर्व इतिहास व पूर्वपीठिका तत्कालीन कागदपत्रांवरून व लेखांवरून निःपक्षपातबुद्धीनें ठरविण्याचा प्रघात सुरू झाला व त्यामुळेंच या पंथाबद्दलही पुष्कळ नवी माहिती उपलब्ध झाली व कनिंगहॅमसारख्या औद्योगिक चळवळीच्या इतिहासकारांनीं या पंथाबद्दल पुष्कळ विश्वसनीय माहिती मिळवून या पंथाचें यथार्थ स्वरूप जगापुढें आणिलें व या विस्तृत माहितीचा अलीकडील अर्थशास्त्राच्या इतिहासकारांनीं आपल्या इतिहासांत उपयोग केला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, उदीमपंथाच्या प्रवर्तकांचें आपलें औद्योगिक धोरण ठरविण्यांत चार राष्ट्रीय हेतु होते. ते हेतु हेः—

१. देशांतील कलाकौशल्यांना उत्तेजन देणें व होतां होईल तों देशांतील कच्च्या मालाचा पक्का माल तयार करून परदेशीं पाठविणें; असा पक्का माल देशांतल्या देशांत झाल्यानें देशांतील मजूर व कारागीर यांना भरपूर काम मिळतें व पक्क्या मालाला कच्च्या मालापेक्षां किंमत पुष्कळच जास्त येत असल्या-

मुळें तो सर्व फायदा देशांतील व्यापाऱ्यांस व कारखानदारांस मिळतो.

२. देशाच्या संरक्षणास व सामर्थ्यास देशामध्यें खलाशांचा मोठा वर्ग असणें व मोठें व्यापारी आरमार असणें जरूर आहे. याकरितां होडया, बोटी व गलबतें बांधण्याच्या धंद्यास व त्यास लागणाऱ्या दुसऱ्या धंद्यांस उत्तेजन देणें; तसेंच मासेमारीच्या धंद्यास मदत करणें व दर्यावर्दी लोकांस साहाय्य करणें; अशा योगानें देशांत खलाशांचा वर्ग तयार होईल व व्यापारी आरमारही सज्ज राहील.

३. परचक्र आलें असतां देशांतील लोकांना दुसऱ्याच्या तोंडाकडे पहाण्याचा प्रसंग राहूं नये म्हणून लोकसंख्येपुरती अन्नसामग्री देशांतल्यादेशांत उत्पन्न व्हावी, याकरितां शेतीला उत्तेजन देणें; शिवाय देशांत शेतकीची भरभराट असली म्हणजे देशाला प्रसंगीं मोठें सैन्य जमवितां येतें; कारण शेतकरी हा थोड्याशा शिक्षणानें उत्तम शिपाई बनतो असा सर्वत्र अनुभव आहे; तेव्हां देशांतील शेतकरीवर्ग सुसंपन्न असला म्हणजे तें एक देशाचें मोठें गुप्त सामर्थ्यच आहे.

४. शेवटीं देशाच्या स्वातंत्र्यास व संरक्षणास खजिन्याची भरपूर तयारी पाहिजे व म्हणून सरकाराजवळ व देशांत भरपूर नाणें व सोनेंरुपें राहील अशी तजवीज करणें.

अर्वाचीन इतिहासकारांच्या मतें उदीमपंथाचे वर निर्दिष्ट केलेले चार हेतू होते. परंतु हें हेतुचतुष्टय सुद्धां दुसऱ्या एका अंतिम हेतूचें साधनचतुष्टयच होय. हा अंतिम हेतु म्हणजे देशाचा दर्जा, वैभव व सामर्थ्य वाढविणें हा होय. व हा अंतिम हेतु सिद्ध करण्याकरितां जरी देशांतील कांहीं व्यक्ति अगर एखादा वर्ग यांचें नुकसान झालें तरी हरकत नाहीं; परंतु या अंतिम हेतूच्या सिध्यर्थ व्यापार-उदीम व कलाकौशल्य यांवर दाब ठेवण्याचा सरकारास अधिकार आहे असें त्यांच्या व्यापारी धोरणाचें एक तत्व होतें. इंग्लंडमध्यें क्रॉमवेल व फ्रान्समध्यें कोलबर्ट हे या पंथाचे पुरस्कर्ते व अभिमानी असें समजले जातें. या दोघांनीं आपापल्या देशांतील कलाकौशल्याला प्रत्यक्ष मदत दिली व परकीय मालावर जबर जकाती बसवून आपल्या देशांतील कारागिरांना परकीय कारागिरांच्या स्पर्धेपासून सोडविलें व या योगानें आपल्या देशाची सांपत्तिक स्थिति व तिच्या

द्वारें देशाचें वैभव व सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला. क्रॉमवेलच्या काळीं व्यापारामध्यें इंग्लंडचा प्रतिस्पर्धी हॉलंड हा देश होता. या देशाचा व्यापार सर्व जगभर होता व जलमार्गांवरील तर बहुतेक व्यापार या देशाच्या व्यापाऱ्यांच्या हातांत होता. हॉलंडचें हें व्यापारी व आरमारी वर्चस्व हाणून पाडण्याकरितां इंग्रजी इतिहासज्ञांस पूर्णपणें माहीत असलेले नौकानयनासंबंधींचे प्रसिद्ध कायदे क्रॉमवेलनें केले. या कायद्यांनीं इंग्रज व्यापाऱ्यांना हॉलंडच्या गलबतांतून मालाची नेआण करण्याची मनाई केली. इंग्लंडांतून बाहेर जाणारा माल किंवा आंत येणारा माल इंग्रजांनीं बांधलेल्या, इंग्रजांच्या मालकीच्या व इंग्रज खलाशांनीं चालविलेल्या गलबतांतच आला पाहिजे असा सक्त नियम क्रॉमवेलनें केला व या कायद्याचा इष्ट हेतु लवकरच साध्य झाला. या कायद्यानें हॉलंडच्या व्यापारी वर्चस्वास मोठाच धक्का बसला व इंग्लंडांतील गलबतें बांधण्याच्या व नावाड्याच्या धंद्यास फारच तेजी आली. व त्याच्या अनुषंगानें दुसऱ्याही धंद्यांचा वर पाय निघाला.

वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, या उदीमपंथाच्या मताची छाप युरोपांतील सर्व राष्ट्रांत बराच काळ टिकली. इंग्लंडमध्यें तर या मताच्या अनुरोधानें झालेले कायदे व जकातीची पद्धति एकोणिसाव्या शतकापर्यंत चालू होती. या मताचा अवशेष म्हणजे इंग्लंडांतील धान्याचे प्रसिद्ध कायदे होत. या कायद्यांविरुद्ध चळवळ कॉबडन व ब्राईट या उदारमतवादी मुत्सद्यांनीं १०।१२ वर्षे केली. तेव्हां एकदां हे कायदे १८४६ त नाहींसे झाले. व उदीमपंथाचा इंग्लंडमध्यें अगदीं बीमोड होऊन खुल्या व्यापाराच्या तत्वाचा पूर्णपणें जय झाला.

फ्रान्समध्यें उदीमपंथाचा अभिमानी व पुरस्कर्ता कोलबर्ट हा मुत्सद्दी होता हें वर सांगितलेंच आहे. त्यानें आपल्या कारकीर्दीमध्यें कारागिरीला पुष्कळ उत्तेजन दिलें व अशा विशेष प्रकारच्या उत्तेजनानें ते ते कारखाने फ्रान्समध्यें भरभराटीस आले हें खरें. तरी पण या सर्व उदीमपंथी धोरणाचा देशाच्या सांपत्तिक स्थितीवर व बहुजनसमाजावर इष्ट परिणाम न होतां उलटच परिणाम झाला. कारण हे जे नवे कारखाने उभारले गेले त्यांकरितां फ्रान्स-सरकारला पुष्कळच खर्च आला. व हा सर्व खर्च फ्रान्समधल्या शेतकरीवर्गावर पडला. वास्तविकपणें फ्रान्स हा देश शेतकीला फार चांगला; परंतु या ठिकाणीं युरोपांत-

लुप्तप्राय झालेली जहागिरीपद्धति बऱ्याच काळपर्यंत अस्तित्वांत होती. यामुळें आधींच शेतकीसारख्या मोठ्या धंद्याची दैना होती. त्यांतच कारखाने काढण्यास लागणारा पैसा या हलाख झालेल्या शेतकऱ्यांच्याच बोकांडीं बसला. कारण जहागिरीपद्धतीच्या जुन्या काळच्या नियमानुरूप फ्रान्समधील सरदार, मानकरी, धर्मोपदेशक वगैरे जमीनदार लोक हे करापासून विमुक्त होते. शिवाय फ्रान्समध्यें राजाची सत्ता अनियंत्रित होती. यामुळें राजाच्या दरबारचे लोक व राजाच्या मर्जीतले लोक हे राजाची मर्जी संपादून आपली निरनिराळ्या करांतून मुक्तता करून घेत. सारांश, जहागिरीपद्धतीच्या अवशिष्ट चालींनीं व राजाच्या अनियंत्रित सत्तेमुळें फ्रान्समधील बहुतेक सुखवस्तु व श्रीमंत वर्ग हे करापासून मुक्त झाले होते. व राजाच्या चैनीचा जबर खर्च, राज्यकारभाराचा खर्च व **कोलबर्टसारख्या** मुत्सद्यांच्या लोकहिताच्या एककली धोरणानें होणारा कलाकौशल्याच्या उत्तेजनाचा खर्च—हा सर्व अवाढव्य खर्च मुख्यतः शेतकऱ्यांवर व गरीब लोकांवर पडे. कारण, फ्रान्समध्यें त्या काळीं सरकारच्या उत्पन्नाच्या मुख्य चार बाबीच असत. पहिली बाब दरवर्षी शेतकऱ्यांच्या ऐपतीप्रमाणें आकारला जाणारा जमिनीवरील कर. हा कर फक्त शेतकरी व शेत कसणारे यांवरच पडे हें वर सांगितलेंच आहे. दुसरी बाब मिठावरील जबर कराची. हा करही गरीब लोकांच्यावरच जास्त पडे हें उघडच आहे. तिसरी बाब देशांतील आयातनिर्गत मालावरील जकाती व प्रांताप्रांतांमधील आयातनिर्गत मालावरील जकाती; व शेवटची बाब म्हणजे सार्वजनिक रस्त्यांवरील दस्तुऱ्या. अर्थात् या सर्व बाबींचा मुख्य बोजा गरीब रयतेवर व विशेषतः शेतकरीवर्गावरच पडे.

यामुळें फ्रान्समध्यें सामान्य लोकांची स्थिति फारच वाईट झाली. परंतु राजा व त्याच्या भोंवतालची मंडळी व वरच्या वर्गाचे लोक यांची सर्व प्रकारें चैन व आबादानी होती. या सर्व सामाजिक, राजकीय व औद्योगिक कारणांनीं फ्रान्समध्यें त्या काळीं सरकार व समाजव्यवस्था हीच अनिष्ट आहे व मनुष्याची स्वाभाविक व नैसर्गिक स्थिति हीच जास्त सुखकर आहे अशा प्रकारच्या कल्पना फैलावत चालल्या. त्यांतच इंग्लंडमधल्या लॉक वगैरे तत्वज्ञांच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनांची भर पडून फ्रान्सांत विचारक्रांति

होतें होतीं. या कारणींनीं व या क्रांतीपासून झालेल्या नव्या विचाराच्या खळबळीतच अर्थशास्त्रांतला निसर्गपंथ उदयास आला. या पंथाचीं राजकीय व सामाजिक मतें फ्रेंच तत्ववेत्त्यांच्यासारखींच होतीं. मनुष्य हा स्वभावतः स्वातंत्र्यप्रिय प्राणी आहे व त्याला पुष्कळ नैसर्गिक हक्क आहेत; अगदीं रानटी स्थितींत 'बळी तो कान पिळी' हा न्याय असल्यामुळें कोणत्याही व्यक्तीला आपले स्वाभाविक हक्क उपभोगितां येण्याची खात्री नसते. म्हणून मनुष्यें आपले बाकीचे हक्क राखण्याकरितां थोड्याशा स्वातंत्र्यावर पाणी सोडून तें स्वातंत्र्य सरकारच्या हातांत देतात; तेव्हां सरकार हें समाजाला अत्यावश्यक आहे; परंतु तें एक अपरिहार्य अनिष्ट आहे; परंतु सरकारला व्यक्तीचे कांहीं स्वाभाविक हक्क कधींच हिरावून घेतां येत नाहींत; मनुष्याला आपल्या श्रमाचें फळ उपभोगण्याचा हक्क आहे; तसेंच प्रत्येक मनुष्याला आपल्या श्रमाचा होईल तितका फायदा करून घेण्याचा हक्क आहे; प्रत्येक मनुष्याला आपलें हित कशांत आहे हें समजतें व त्याला आपल्या या हिताचा मार्ग पत्करण्याचा हक्क आहे; समाजाचें हित व व्यक्तीचें हित यांमध्यें विरोध नाहीं; फ्रेंच तत्वज्ञान्यांच्या व निसर्गपंथाच्या मतें हीं तत्वें स्वयंसिद्ध आहेत; व या तत्वांवरून त्यांनीं आपलीं अर्थशास्त्रविषयक कांहीं प्रमेयें व विशेषतः अप्रतिबंध व्यापाराचें तत्त्व सिद्ध केलें आहे. तीं प्रमेयें हीं होत. मनुष्याचे वरीलप्रमाणें हक्क असल्यामुळें त्याला उद्योगधंद्यास पूर्ण मुभा असली पाहिजे; त्याला वाटेल त्याप्रमाणें आपल्या श्रमाचा मोबदला मिळण्याची संधि पाहिजे; व्यापाराच्या कामांत पूर्ण चढाओढ व करार यांचा अंमल पाहिजे, सरकारला व्यापारांत ढवळाढवळ करण्याचा हक्क नाहीं, सरकारचें काम म्हणजे त्यांनीं मानवजीवित व मालमत्ता यांना सुरक्षितता देणें व त्यांचें संरक्षण करणें इतकेंच आहे; उद्योगधंदे व व्यापारउदीम यांसंबंधीं सरकारनें कायदेकानु करण्यापासून देशाचा फायदा नसून उलट नुकसान आहे; कारण, व्यक्तीचें व समाजाचें हित हीं परस्परविरुद्ध नसावींत व प्रत्येक व्यक्तीला आपलें हित कशांत आहे हें समजण्याचें सामर्थ्य असावें अशी मुळीं ईश्वरी योजनाच आहे. यामुळें व्यापारउदीमाच्या बाबतींत व्यक्तीस पूर्ण मुभा असण्यांत देशाचें हित आहे व व्यक्तिस्वातंत्र्यावरच देशाची सांपत्तिक भरभराट अवलंबून आहे.

या वरील विवेचनावरून निसर्गपंथाचा सर्व रोख उदीमपंथाविरुद्ध

कसा होता हें स्पष्ट होईल. उदीमपंथाचें धोरण संरक्षक होतें म्हणजे त्या पंथाचें मत व्यापारउदीम यांवर सरकारचा दाब पाहिजे, व सरकारनें संरक्षणाचें तत्व अंगीकारिलें पाहिजे, तरच देशाची सांपत्तिक स्थिति सुधारेल असें होतें. तर निसर्गपंथाचें मत ' जें जें होईल तें तें पहावें ' हेंच सरकारचें खरें धोरण व यानेंच देशाची सांपत्तिक स्थिति सुधारणार असें होतें.

निसर्गपंथी लोकांची संपत्तीच्या स्वरूपाची व तिच्या उपत्तीच्या कारणांची कल्पनाही उदीमपंथी लोकांच्यापेक्षां निराळी होती. त्यांचे मतें देशाची संपत्ति वाढविणारा धंदा शेतकीच होय. जमिनीचे मालक व शेतकरी एवढेच समाजांतले वर्ग धनोत्पादक आहेत. कारण शेतकीच्या उत्पन्नांतून श्रमाचा पूर्ण मोबदला मिळून व भांडवलाचें व्याज व फायदा निघून शिवाय पुष्कळ निव्वळ उत्पन्न शिल्लक राहतें. याचें कारण शेतकी व खाणींचें काम यांमध्यें मनुष्याच्या श्रमाला निसर्गाची मदत होते. व म्हणूनच खर्चापेक्षां उत्पन्न किती तरी पट जास्त होतें. कारखानदार, व्यापारी, बौद्धिक धंदेवाले व घरगुती चाकरनौकर हे समाजांतील वर्ग जरी उपयोगी आहेत तरी ते अनुत्पादक किंवा वांझ आहेत. त्यांच्या श्रमापासून देशांत जास्त संपत्ति उत्पन्न होत नाहीं. कारखानदार कच्च्या मालापेक्षां जास्त किंमतीचा पक्का माल तयार करून संपत्ति वाढवितो असें भासेल, परंतु तें खरें नाहीं. कारण कापसापासून विणकऱ्यानें विणलेलें कापड जास्त मोलवान् असतें खरें, पण कापसाच्या व कापडाच्या किंमतींतील ही तफावत म्हणजे विणकऱ्याच्या श्रमाचा निवळ मोबदला आहे. कारण जितकी जास्त किंमत त्यानें निर्माण केली तितकाच त्याला उपजीविकेचा वगैरे खर्च आला; अर्थात् त्याच्या मजुरीचे दिवस खर्चे झाले. तेव्हां कारखानदार हे धनाच्या एका रूपाला दुसरें रूप देतात एवढेंच. त्यांच्या श्रमानें देशाची संपत्ति वाढत नाहीं. हे सर्व अनुत्पादक वर्ग जमीनदार व शेतकरी यांच्यावर अवलंबून आहेत. कारण यांची उपजीविका उत्पादकवर्गाच्या निवळ शिलकेपासून होते. म्हणून प्रत्येक देशानें शेतकीच्या सुधारणेकडे लक्ष दिलें म्हणजे झालें. शेतकीची सुस्थिति व प्रगति असेल तर इतर उपयुक्त धंदे आपोआप निघतील. परंतु शेतकीची जर दुःस्थिति असेल तर इतर धंद्यांना कितीही उत्तेजन दिलें तरी त ऊर्जितावस्थेस येणार नाहींत.

याकरितां फ्रेंच राजांनीं कारखान्याच्या उत्तेजनाचा नाद सोडून शेतकीच्या सुधारणेस लागावें; प्रथमतः प्रांताप्रांतांमधील व देशादेशांमधील आयात व निर्गत मालावरील जबर जकाती काढून खुल्या व्यापाराचें धोरण स्वीकारावें; फ्रान्समध्यें चालू असलेली अन्यायाची, भानगडीची व गुंतागुंतीची कराची पद्धत मोडून सर्व जमीनदार व शेतकरी लोकांवर नेमस्त व वाजवी असा सरसकट एकच कर बसवावा; व त्यामध्यें वारंवार फेरबदल करूं नये; या सुधारणा तावडतोब घडवून आणल्यास फ्रान्समधल्या शेतकऱ्यांची स्थिति सुधारेल व फ्रान्सच्या तिजोरीची दैनाही नाहींशी होईल; व फ्रान्स सांपत्तिक भरभराटीच्या मार्गास लागेल. अशा प्रकारचें या पंथाचें औद्योगिक धोरण होतें. कित्येक इतिहासकारांचें असें म्हणणें आहे कीं, या निसर्गपंथी लोकांच्या म्हणण्याप्रमाणें फ्रान्समध्यें जर तावडतोब सुधारणा घडवून आणल्या असत्या तर फ्रान्समधली भयंकर राजक्रांति व तिचे दुष्परिणाम टळले असते. परंतु या लोकांच्या मतांचा परिणाम अधिकारी लोकांवर झाला नाहीं, व त्यांचीं मतें व ग्रंथें त्यांच्या पुस्तकांतच राहिलीं. मात्र त्यांच्या अप्रतिबंध व्यापाराच्या तत्वाचा कांहीं काळानें **ॲडाम स्मिथनें** फैलाव केला, व एक दोन शतकें तरी हें तत्व अबाधित राहिलें.

निसर्गपंथानंतरच्या अर्थशास्त्राच्या पंथाचा जनक ॲडाम स्मिथ हा होय. ॲडाम स्मिथच्यापूर्वीं इंग्लंडमध्यें सुद्धां उदीमपंथाच्या विरुद्ध मताचे पुष्कळ लेखक झाले. त्यांत ह्यूम या इतिहासकाराचे अर्थशास्त्रविषयक निबंध फार महत्वाचे आहेत; परंतु या सर्व ग्रंथकारांच्या ग्रंथांतील प्राह्यांश ॲडाम स्मिथच्या अभिमत ग्रंथांत आल्यामुळें ॲडाम स्मिथच्या उज्ज्वल कीर्तीमध्यें या ग्रंथकारांचीं नांवें मावळून गेल्यासारखीं झालीं आहेत. ज्याप्रमाणें **ॲरिस्टॉटलला** तर्कशास्त्राचा जनक समजतात त्याप्रमाणें **ॲडाम स्मिथला** अभिमत अर्थशास्त्राचा जनक समजतात. याचा अर्थ त्यानें सर्व शास्त्र अगदीं अथपासून इतिपर्यंत नवेंच केलें असा मात्र नव्हे. आतांपर्यंत आपण पाहिलेंच आहे कीं, अर्थशास्त्रासंबंधीं दोन पंथ **ॲडाम स्मिथच्या** पूर्वींच उदयास आले होते. परंतु **ॲडाम स्मिथ** यानें आपल्यापूर्वीं झालेल्या अर्थशास्त्रविषयक वाङ्मयापासून घेण्यासारख्या सर्व गोष्टी ग्रहण करून आपल्या बहुश्रुतपणानें, विचारानें

व अवलोकनानें मिळविलेल्या ज्ञानाची त्यांत भर घालून या शास्त्राला व्यवस्थित व संघटित असें स्वरूप दिलें. त्यानें या शास्त्राची मर्यादा ठरवून त्याची स्पष्ट अशी व्याख्या केली. या शास्त्रांतील निरनिराळे प्रश्न व विषय हे एकमेकांशीं कसे संलग्न आहेत व ते परस्परावलंबी असून कांहीं सर्वमान्य साधारण तत्वांपासून कसे सिद्ध होतात, हें आपल्या सुंदर विचारसरणीनें व विशेषतः विशद भाषाशैलीनें त्यानें लोकांच्यापुढें मांडिलें. यामुळें **ॲडाम स्मिथचा** ग्रंथ एकदम विद्वन्मान्य होऊन त्याच्या मतांचा प्रसार झपाट्यानें होऊं लागला व युरोपांतील इतर देशांतही त्याच्या पुस्तकाचीं भाषांतरें व रूपांतरें होऊं लागलीं. इंग्लंडमधील प्रसिद्ध मुत्सद्दी **पिट** हा **स्मिथ**च्या मताचा अभिमानी झाला.

**ॲडाम स्मिथचा** ग्रंथ पंचपुस्तकात्मक आहे. राष्ट्रीय संपत्ति ही राष्ट्रांतील वार्षिक श्रमाचें फळ आहे, या विधानापासून पहिल्या पुस्तकाला प्रारंभ केलेला आहे. या विधानानें ॲडाम स्मिथनें उद्दीमपंथ व निसर्गपंथ ह्या दोहोंपासून आपल्या मीमांसेचा फरक दर्शविला आहे. उदीमपंथानें पैसा व परकी व्यापार हीं संपत्तीचीं मुख्य साधनें आहेत, असें प्रतिपादन केलें होतें; तर निसर्गपंथानें शेतकीला सर्व संपत्तीची जननी केलें होतें. ह्या दोन्ही पंथांचा एकतर्फीपणा दाखविण्याकरितां व आपल्या मीमांसेचें संपूर्णत्व स्थापन करण्याकरितां संपत्तीचें तिसरें उपेक्षित कारण मानवी श्रम होत असें प्रतिपादन करून स्मिथनें अभिमत पंथांतील कारणत्रयीचा संप्रदाय पाडला.

राष्ट्रीय संपत्तीचीं भांडवल, जमीन व श्रम अशीं तीन कारणें आहेत, हें त्यानें प्रथमतः दाखविलें आहे व मग श्रमाच्या ज्या एका विशेष गुणावर संपत्तीची कमीअधिक वाढ अवलंबून आहे त्याचें विशेषतः वर्णन केलें आहे. श्रमाचा हा गुण म्हणजे श्रमविभागाचें तत्व होय. **ॲडाम स्मिथनें** अर्थशास्त्रामध्यें या तत्वाचा एक नवा शोधच लाविला असें म्हणण्यास हरकत नाहीं. समाजांत श्रमविभागाचें तत्त्व सुरू झालें म्हणजे प्रत्येक माणसाच्या बऱ्याच गरजा दुसऱ्याकडून भागविल्या जातात, म्हणून मालाच्या अदलाबदलीस सुरवात होते व ही अदलाबदल सुलभ रीतीनें होण्याकरितां विनिमयसामान्य म्हणून पैसा अस्तित्वांत येतो. तसेंच मालाची अदलाबदल मालाचें मोल ठरल्याखेरीज होत नाहीं. मालाच्या मोलाचें खरें प्रमाण म्हणजे तो माल उत्पन्न करण्यास लागणाऱ्या

श्रमाचें परिमाण होय. सारख्या परिमाणाच्या श्रमाची किंमत सर्व काळीं व सर्व ठिकाणीं सारखीच असते. सामान्यतः पदार्थांचें मोल पैशामध्यें मोजलें जातें व त्यालाच पदार्थांची किंमत म्हणतात. सोनें, रुपें याच धातु पैसा बनविण्यास उत्तम; कारण त्यांचें मोल सहसा बदलत नाहीं. समाजाच्या प्रथमावस्थेंत वस्तूची किंमत बहुतांशीं श्रमावरच अवलंबून असते. परंतु समाजाच्या परिणतावस्थेंत किंमतीमध्यें तीन घटकावयव असतात. खंड, मजुरी व नफा. जमीनदाराला खंड मिळतो; कामगारांला मजुरी मिळते व संपत्ति उत्पन्न करणाराला नफा मिळतो. समाजाची संपत्ति ज्याप्रमाणें वाढते, त्याप्रमाणें खंड व मजुरी वाढत जातात, परंतु देशाच्या सांपत्तिक वाढीबरोबर नफा मात्र कमी होतो. कारण जसजसें देशांत भांडवल जास्त वाढतें, तसतशी भांडवलवाल्यांत धंद्याबद्दल चढाओढ होऊन भांडवलवाल्यांचा नफा कमी होत जातो. तरी पण कांहीं विशिष्ट कारणांनीं निरनिराळ्या धंद्यांतील मजुरी व नफा यांमध्यें कायमचा फरक दिसून येतो.

दुसऱ्या पुस्तकामध्यें भांडवल, त्याची वाढ व त्याची सुस्थिति यासंबंधाचें विवेचन आहे. भांडवलाचे दोन प्रकार आहेत. एक स्थिर भांडवल व दुसरें चल भांडवल. यंत्रसामग्री, कारखान्याच्या इमारती वगैरे, शेताची कायमची सुधारणा व धंद्यांचें व कलांचें ज्ञान हें स्थिर भांडवल होय. चल भांडवल म्हणजे पैसा, कारखानदाराच्या ताब्यांतील अन्नसामग्री, कच्चा माल व कारखानदाराच्या हातांतला पक्का माल. देशाच्या पैशाची दरवर्षी होणारी मोडतोड व झीज हीं भरून काढणें बरेंच खर्चाचें काम असतें, म्हणून देशांत व्यापारी पत, विश्वास व सचोटी यांचा उदय झाल्यावर कागदी चलन सुरू होतें व त्याचे योगानें बराच खर्च वांचतो. या पुस्तकाच्या शेवटीं ॲडाम स्मिथनें स्वाभाविकपणें उद्योगधंद्याच्या पायऱ्या कशा लागतात व देशांत वाढणारें भांडवल स्वाभाविक तऱ्हेनें कशा क्रमानें निरनिराळ्या धंद्यांत गुंतविलें जातें हें सांगितलें आहे. ॲडाम स्मिथच्या मतानें भांडवल प्रथमतः शेतकींत जातें. कारण तेथें सृष्टि मानवी श्रमाला मदत करीत असते. म्हणून या उद्योगांत फारच फायदा असतो. नंतर कारखाना, नंतर देशी व्यापार, मग परदेशी व्यापार व शेवटीं परदेशी अप्रत्यक्ष व्यापार, हा धंद्याच्या वाढीचा नैसर्गिक क्रम आहे.

या दोन पुस्तकांत ॲडाम स्मिथनें अर्थशास्त्राचा तात्विकदृष्ट्या विचार केला आहे. व पुढील अर्थशास्त्रकारांनीं ॲडाम स्मिथच्या विवेचनांतील याच तात्विक भागांत कोठें भर घातली आहे तर कोठें त्याच्या मतांत फरक केला आहे.

ॲडाम स्मिथचें तिसरें व चौथें पुस्तक हीं ऐतिहासिक आहेत. तिसऱ्या पुस्तकामध्यें युरोपांत निरनिराळ्या धंद्यांची व एकंदर संपत्तीची वाढ कशी व कोणत्या कारणानें झाली याचा इतिहास दिला आहे. चौथ्यांत आपल्यापूर्वीं होऊन गेलेल्या पंथाची हकीकत देऊन त्यांच्यावर टीका केली आहे. यामध्यें विशेषतः उदीमपंथाच्या हेतूचें व त्यांच्या साधनाचें सविस्तर खंडण आहे. ॲडाम स्मिथचा निसर्गपंथी लेखकांशीं फारसा विरोध नव्हता; पुष्कळ बाबतींत त्यांचें व ॲडाम स्मिथचें मतैक्यच होतें. म्हणून या पंथावर ॲडाम स्मिथनें फारशी टीका केली नाहीं. ॲडाम-स्मिथच्या ग्रंथाच्या शेवटल्या पुस्तकांत सरकारचीं कर्तव्यकर्में व त्यांच्या सिद्ध्यर्थ लागणारा खर्च याचा प्रथम विचार करून, मग हा खर्च सरकार कोणकोणत्या उत्पन्नाच्या बाबीनें भागवितें हें सांगितलें आहे. सुधारलेल्या सर्व देशांत बहुधा सरकारचें बहुतेक उत्पन्न करांपासून उत्पन्न होतें असें ॲडाम स्मिथनें दाखविलें आहे; व पुढें कराचे चार नियम दिले आहेत, व करांचें वर्गीकरण देऊन प्रत्येक कर हा समाजांतील कोणकोणत्या वर्गावर अखेर पडतो व त्यांचा संपत्तीच्या वाढीवर काय परिणाम होतो हें सांगितलें आहे व शेवटीं राष्ट्रीय कर्जाची मीमांसा करून ग्रंथ समाप्त केला आहे.

ज्याप्रमाणें बेकन हा पाश्चात्य शास्त्रीय प्रगतीच्या आधीं उदयास आला, परंतु त्यानें शास्त्राची विलक्षण प्रगति होईल असें भविष्य केलें, त्याप्रमाणें **ॲडाम स्मिथ** हा युरोपांतील औद्योगिक क्रांतीच्या आधीं झाला; त्यांच्या काळीं यंत्रें व अर्वाचीन काळचीं वाफेवर चालणारीं एंजिनें झालीं नव्हतीं. तरी त्यानें आपल्या विलक्षण कल्पनाशक्तीनें भावी संपत्तीच्या वाढीच्या कारणांचा विचार करून संपत्तीची विलक्षण वाढ होणार असें भाकीत केलें होतें; व तें भाकीत सर्वतोपरी खरें ठरलें.

त्याचेनंतरचा अर्थशास्त्राला एका महत्वाच्या प्रश्नाची जोड करून देणारा ग्रंथकार म्हणजे **मालथस** होय. मालथसचें नांव लोकसंख्येची मीमांसा या प्रश्नाशीं अगदीं खिळलेलें आहे; परंतु त्याचें या प्रश्नाकडे एका आकस्मिक प्रसंगानें

लक्ष गेलें. **गाडविनू** ह्मणून त्या काळीं नांवाजलेला मोठा ग्रंथकार होऊन गेला. त्यानें सामाजिक प्रश्नासंबंधीं लोककल्याणाच्या हेतूनें व लोकांची स्थिति सुधारण्याकरितां पुष्कळ लेख व ग्रंथ लिहिले. त्यांतील एकामध्यें त्याचें असें ह्मणणें होतें कीं, जगांत किंवा एखाद्या देशांत संपत्ति कमी असते म्हणून लोक दारिद्र्यांत, दैन्यावस्थेंत व हालांत राहतात असें नाहीं. देशांत संपत्ति सर्व लोकांना पुरेशी असते व नेहमीं पुरेशी राहील. मात्र देशांतील सर्व वर्गांमध्यें संपत्तीची व श्रमाची सारखी वांटणी झाली पाहिजे. हल्लीं श्रीमंत लोक मुळीं श्रम न करतां अन्यायी कायद्याच्या मदतीनें संपत्तीचा मोठा वांटा पटकावितात. यामुळें गरीब लोकांस जीवापाड श्रम करूनही पोटापुरता संपत्तीचा वांटा मिळत नाहीं; व म्हणून त्यांना हालांत, दुःखांत व एकंदर दैन्यांत दिवस कंठावे लागतात. तेव्हां संपत्तीची वांटणी न्यायानें केल्यास व प्रत्येक मनुष्यानें आपल्या उपजीविकेकरितां श्रम करावयाचे असा निश्चय केल्यास सर्वत्र सुख व शांति नांदेल; व असें एकदां झालें म्हणजे सर्वांना आपलीं मनें सुसंस्कृत करण्यास वेळ मिळेल; देशांत सर्व लोक सुखी व ज्ञानवान् होतील; मग गुन्हे, दुःख, हाल वगैरे सर्व अनिष्ट प्रकार समाजांतून नाहींसे होऊन सर्वत्र सत्ययुगास सुरुवात होईल. अशा प्रकारच्या विचारसरणींतील एक ढोबळ चूक दाखविण्याकरितां **मालथस** यानें आपला निबंध लिहिला. मालथसच्या मतें ही घोडचूक ह्मणजे मानवी स्वभावांतल्या एका प्रवृत्तीची विस्मृति होय. **मालथसनें** असें दाखविलें कीं, असा समाज स्थापन झाला आहे अशी कल्पना केली तरी हें सत्ययुग शाश्वत टिकणारें नाहीं. पुनः कलियुगास प्रारंभ झालाच पाहिजे. कारण, सर्व मनुष्यांची सुस्थिति आहे असें मानलें ह्मणजे प्रत्येक मनुष्य लग्न करील; कां कीं, विवाहाची प्रवृत्ति मनुष्याला उपजत आहे. व प्रत्येक कुटुंबाची सुस्थिति आहे असें मानलें म्हणजे मानवी प्राण्याच्या प्रजोत्पादनशक्तीला अमर्यादित मुभा मिळेल; मनुष्याला लागणारें अन्न गणितश्रेढीनें वाढतें, तर मानवजातीची वाढ भूमितिश्रेढीनें होते. यामुळें मनुष्यें इतकीं वाढतील कीं, सर्वांना अन्न मिळण्याची पंचाईत पडून पुनः जीवनार्थ कलह सुरू होईल व सदर मनुष्यें आपल्याला जास्त संपत्ति मिळवितील व संपत्तीची विषमता व त्यापासून होणारें दुःख व हालअपेष्टा हीं जगांत अवतरतील. तेव्हां ज्या कारणानें या मनुष्यस्वभावांतील सत्ययुग नाहींसें होईल त्याच कारणानें असें

सत्ययुग अस्तित्वांतच येणार नाहीं. जेणेकरून लोकसंख्या मर्यादित राहण्यास दुष्काळ, सांथ, आजार, दुःखें वगैरे स्वाभाविक आपत्ति व अनीति, लढाया वगैरे कृत्रिम आपत्ति या पाहिजेत. लोकसंख्या मर्यादित करणारीं हीं साक्षात् कारणें म्हणजे सृष्टिक्रमांतील एक आवश्यक भागच आहे.

या पुस्तकाबद्दल **मालथसवर** धर्माभिमानी लोकांकडून अतोनात टीका झाली. कारण, त्याच्या विचारसरणीप्रमाणें दुष्काळादि कारणें ईश्वरानिर्मित जगांत सतत राहणार असें ठरत असल्यानें देवावर अन्यायीपणाचा दोष येतो. परंतु त्याचें पुस्तक श्रीमंत लोकांना मात्र आवडलें. कारण गरीब लोकांची दुःस्थिति त्यांनीं आपल्या अविचारानें आपणावर ओढून आणलेली आहे, असा त्याच्या प्रतिपादनाचा एकंदर रोख होता.

या निबंधाच्या दुसऱ्या आवृत्तींत **मालथसनें** पुष्कळच फरक केला. खरोखरी त्याचा ग्रंथ नवीन झाल्याप्रमाणें झाला. पहिल्या आवृत्तीइतकी एककल्ली विचारसरणी त्यामध्यें नव्हती. आपल्या म्हणण्यास त्यानें ऐतिहासिक पुरावा पुष्कळ जोडला. विशेषतः लोकसंख्या मर्यादित करणारें जाणखी एक कारण मुख्यत्वेंकरून त्यानें पुढें केलें. तें कारण म्हणजे दूरदर्शीपणा हें होय. जर मनुष्यांनीं लग्नाच्या बाबतींत दूरदर्शीपणा दाखविला व आपल्या बायकोचें व भावी मुलांचें चांगल्या रीतीनें संगोपन करतां येईल अशी सांपत्तिक स्थिति प्राप्त होईपर्यंत लग्नाचा विचार पुढें ढकलला तर लोकसंख्या कमी करणाऱ्या साक्षात् कारणांचा जोर कमी होईल. याप्रमाणें मालथसनें आपल्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तींत समाजसुधारणेची शक्यता कांहीं अंशानें कबूल केली; परंतु ही सुधारणा घडून येण्यास मनुष्यांमध्यें विवाहसंबंधीं दूरदर्शीपणा व आपल्या मुलांबाळांचें संगोपन आपणच केलें पाहिजे अशी स्वावलंबी भावना उत्पन्न झाली पाहिजे असें प्रतिपादन केलें.

याच्या पुढला अर्थशास्त्रकार म्हणजे **रिकार्डो**. यानें खंडाची नवीन मीमांसा काढली. तसेंच राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापाराच्या तत्त्वाचा ऊहापोह केला. रिकार्डोनें अर्थशास्त्र हें एक भूमितीसारखें तार्किक शास्त्र आहे असें प्रतिपादन केलें. या शास्त्राला अवलोकनाची गरज नाहीं. ज्याप्रमाणें संख्या व परिमाण यासंबंधींच्या कांहीं स्वयंसिद्ध तत्त्वांपासून गणितशास्त्र आपलीं सर्व तत्त्वें काढितें, त्याप्रमाणें

मानवी स्वभावाच्या कांहीं स्वयंसिद्ध तत्वांपासून तार्किक पद्धतीनें सर्व प्रमेयें व सिद्धान्त अर्थशास्त्र काढितें. या शास्त्राचीं विधानें गणिताप्रमाणें सर्व काळीं, सर्व ठिकाणीं व समाजाच्या कोणत्याही स्थितींत सारखींच लागू पडतात. अर्थशास्त्राला हें स्वरूप रिकार्डोनें दिलें ही गोष्ट फार अनिष्ट झाली. कारण या तार्किक पद्धतीनें काढलेल्या या शास्त्रांतील पुष्कळ सिद्धांतांचा सत्याशीं व वस्तुस्थितीशीं विरोध येऊं लागला व ह्मणून या शास्त्राच्या विफलतेबद्दल व खोटेपणाबद्दल ओरड होऊं लागली.

'अर्थशास्त्राचीं व कराचीं तत्वें' या नांवाच्या पुस्तकांत रिकार्डोचे बहुतेक सर्व विचार आलेले आहेत. रिकार्डोचा हा ग्रंथ म्हणजे या शास्त्रावरील साग्र व संपूर्ण असा ग्रंथ नाहीं; तर तो माल, किंमत, खंड, मजुरी, नफा, कर, पैसा, पेढ्या इत्यादि अर्थशास्त्रांतील विषयांवरील एक निबंधसंग्रह आहे. तरी पण रिकार्डोच्या या निरनिराळ्या निबंधांतील विचारसरणी सारखीच असून त्या सर्वांमध्यें कांहीं सामान्य तत्वें प्रतिबिंबित झालेलीं आहेत यांत शंका नाहीं. या ग्रंथांत संपत्तीच्या उत्पत्तीच्या विषयापेक्षां संपत्तीच्या वांटणीच्या विषयालाच ग्रंथकारानें जास्त महत्व दिलेलें आहे. देशांत संपत्ति उत्पन्न झालेली आहे असें गृहीत धरून त्या संपत्तीची समाजांतील निरनिराळ्या वर्गांमध्यें वांटणी कशी होते व विशेषतः समाजाच्या प्रगतीच्या निरनिराळ्या पायऱ्यांमध्यें या वांटणींत कसकसा फरक होत जातो या प्रश्नाचाच ऊहापोह **रिकार्डोनें** विशेष प्रकारें केला आहे.

**रिकार्डोच्या** सर्व मतांची गुरुकिल्ली ह्मणजे त्याची किंमतीची किंवा मोलाची मीमांसा होय. त्याच्या मतानें ज्या मालाचा पुरवठा आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तितका वाढवितां येतो, अशा मालाचें मोल चढाओढीच्या अमदानींत त्या मालाच्या उत्पत्तीला लागणाऱ्या श्रमावर अवलंबून असतें. व्यावहारिक भाषेंत बोलावयाचें ह्मणजे मालाची किंमत त्याच्या उत्पत्तीच्या खर्चावर अवलंबून असते. संपत्तीच्या उत्पत्तीला भांडवल लागतें खरें, परंतु भांडवल ह्मणजे सांठविलेले श्रम होत. तेव्हां मालाची किंमत ह्मणजे त्याला लागणाऱ्या श्रमाची किंमत होय. याप्रमाणें रिकार्डोनें संपत्तीच्या एकाच कारणाला वाजवीपेक्षां फाजील महत्व दिलें. रिकार्डोच्या एकट्या मतावरच सामाजिकपंथी ग्रंथकारांची मोठी

भिस्त आहे, हें पुढील एका पुस्तकांत सामाजिकपंथाचा इतिहास द्यावयाचा आहे त्या वेळीं जास्त खुलासेवार दिसून येईल.

या तत्त्वाच्या विवेचनानंतर रिकार्डोनें समाजांतील निरनिराळया वर्गांमध्यें संपत्तीची वांटणी कशी होते हें दाखविण्याचा उपक्रम केला आहे व प्रथमतः त्यानें आपल्या खंडाच्या प्रसिद्ध उपपत्तीचा ऊहापोह केला आहे. या उपपत्तीचा 'वांटणी' च्या एका भागांत सविस्तर विचार करावयाचा आहे. तेव्हां येथें त्याचें सामान्य स्वरूप दाखविलें ह्मणजे बस्स होईल. जरीं खंडाची उपपत्ति हल्लीं रिकार्डोच्या नांवाखालीं मोडते तरी त्याच्यापूर्वी **अंडरसन**, मुंबई हायकोर्टाच्या न्यायाधिशाच्या पदवीप्रत चढलेले **वेस्टसाहेब** व प्रसिद्ध अर्थशास्त्री **मालथस** या तिन्ही ग्रंथकारांच्या लेखांत ही उपपत्ती दृष्टोत्पत्तीस येते व ही गोष्ट **रिकार्डो** यानेंही कबूल केली आहे. थोडक्यांत या उपपत्तीचें स्वरूप असें आहे. जमिनीचा खंड ह्मणजे जमिनीच्या उत्पादक शक्तीबद्दल जमीन कसणारानें जमिनीच्या मालकास दिलेली किंमत होय; या किंमतीचें मान जमीन कसण्यास लागणारा खर्च व जमिनीच्या उत्पन्नाची येणारी किंमत यांच्या अंतराबरोबर असते व जसजशी देशाची लोकसंख्या वाढते तसतशी धान्याची किंमत वाढते. धान्याची किंमत वाढली ह्मणजे कमकस जमिनीची लागवड करणें शक्य होतें. परंतु या अगदीं निकृष्ट कसाच्या जमिनीचा खंड येत नाहीं व या जमिनीचें उत्पन्न व सुपीक जमिनीचें उत्पन्न यांच्या अंतराइतका जमिनीचा खंड येतो. धान्याच्या किंमतीचा खंड हा घटकावयव नसतो. तर धान्याच्या किंमती वाढल्यामुळें खंड वाढतो.

**रिकार्डोच्या** विचारसरणींत या खंडाच्या उपपत्तीला विशेष महत्व आलेलें आहे. याचें कारण असें आहे कीं, त्यानें या उपपत्तीवरून समाजाच्या एकंदर सांपत्तिक स्थितीबद्दल व त्या समाजांतील निरनिराळया वर्गांच्या सांपत्तिक स्थिताबद्दल कांहीं विशिष्ट अनुमानें काढलीं आहेत. त्याचें मत देशाची जसजशी भरभराट होते व लोकसंख्या वाढते तसतसे धान्याचे भाव चढत जातात. याचा परिणाम असा होतो कीं, जमीनदाराच्या खंडाचें उत्पन्न सारखें वाढत जातें. धान्याचे भाव वाढले ह्मणजे मजुरांच्या उपजीवनाचा खर्च वाढतो व यामुळें मजुरीचे दर वाढतात. परंतु या वाढत्या मजुरीच्या दरापासून मजुरांची सांपत्तिक स्थिति सुधारते असें मात्र नाहीं. कारण जीविताच्या आवश्यकालाच

किंमत जास्त पडूं लागते व मजुरी जास्त झाली कीं, व्यापाऱ्यांचा व कारखानदारांचा नफा कमी होतो. अशा प्रकारचीं अनुमानें रिकार्डोनें आपल्या उपपत्तीपासून काढिलीं आहेत. त्याच्या खरेखोटेपणाचा पुढल्या भागांत विचार करावयाचा आहे, तेव्हां सध्यां इतकी माहिती पुरे आहे.

**रिकार्डोच्या** मतांतील विशेष महत्त्वाचें दुसरें मत ह्मणजे परकी व्यापारासंबंधीं होय. परकी व्यापाराचा विशेष फायदा कोणता व कोणत्या परिस्थितींत तो व्यापार चालूं शकतो याचें **रिकार्डोनें** मोठया मार्मिक तऱ्हेनें विवेचन केलें आहे. त्याच्या ह्मणण्याप्रमाणें परदेशी व्यापाराचा खरा व एकच फायदा हा होय कीं, त्याचे योगानें देशांतील भांडवल व श्रम यांच्या मोबदला अधिक माल मिळूं शकतो, म्हणजे परकी व्यापाराच्या योगानें जणूं कांहीं देशाची संपत्ति वाढल्याप्रमाणें होते. याही विषयाचा पुढें आपल्यास विशेष तऱ्हेनें विचार करावयाचा आहे, तेव्हां सध्यां इतकें विवेचन बस्स आहे.

ज्याला अर्थशास्त्राचे इतिहासकार अभिमत अर्थशास्त्र ह्मणतात, तें मुख्यतः या तीन ग्रंथकारांनीं बनविलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. यापुढील या पंथाचा अभिमानी व पुरस्कर्ता ह्मणजे **जॉन स्टयूअर्ट मिल्ल** होय. ॲडाम स्मिथच्या अर्थशास्त्रावर पुष्कळ ग्रंथकर्त्यांनीं आक्षेप घेतले. यामुळें अर्थशास्त्रांतील पुष्कळ प्रश्न पुनः वादग्रस्त बनले; शिवाय रिकार्डोनंतर व कांहीं अंशीं त्याच्याच एककल्ली सिद्धांतांमुळें सामाजिक पंथ नांवाचा एक अर्थशास्त्रांत नवीन पंथ निर्माण झाला. या पंथाचा हेतु संपत्तीची वांटणी न्यायानें व समतेनें करण्याचा होता. या पंथाची हकीकत या ग्रंथाच्या तिसऱ्या 'पुस्तकांत द्यावयाची असल्यामुळें येथे त्याची पुनरुक्ति करीत नाहीं. परंतु या पंथानेंही अभिमत अर्थशास्त्राच्या कांहीं प्रमेयांच्या सत्यत्वाबद्दल लोकांच्या मनांत संशय उत्पन्न केला. तसेंच अर्थशास्त्रविषयक कांहीं नवीनच प्रश्न उपस्थित झाले. या सर्व नवीन सामुग्रीचा उपयोग करून मिल्लनें जुन्याच पायावर व जुन्याच पद्धतीनें परंतु सामाजिक पंथानें व उदयोन्मुख अशा ऐतिहासिक पंथानें आणलेल्या नव्या ज्ञानाचा उपयोग करून एक मोठा व्यापक ग्रंथ लिहिला. अर्थशास्त्रावरील त्याचा पहिला ग्रंथ "अर्थशास्त्रांतील कांहीं निकाल न लागलेल्या प्रश्नांसंबंधीं" होता. या ग्रंथांत केलेल्या विवेचनाचा पुढें मिल्लनें आपल्या प्रसिद्ध ग्रंथांत उपयोग केला. मिल्लची महत्वाकांक्षा "अर्वा-

चीन ॲडाम स्मिथ " बनण्याची होती, व ती पुष्कळ अंशीं सफलही झाली. सुमारें पन्नास वर्षें अर्थशास्त्रावरील मिल्लचें पुस्तक ह्मणजे एक मोठा आधारभूत ग्रंथ गणला जात असे. मिल्लच्या लेखांचा व ग्रंथाचा प्रसाद हा एक विशेष गुण आहे. तसेंच प्रतिपक्षाचीं मतें योग्य तऱ्हेनें मांडून मग त्यांचें यथार्थ खंडण करण्याची त्याची शैली वर्णनीय आहे. तसेंच कोणत्याही तत्त्वाला योग्य दाखला व उपमा देऊन तें विशद करण्याची हातोटी मिल्लला उत्तम साधली होती. यामुळें त्यांचें पुस्तक फार लोकप्रिय झालें, इतकेंच नव्हे तर अर्थशास्त्रांतील तत्वें व प्रमेयें हीं सामाजिक प्रश्नांना कशीं लागू करावयाचीं याचाही त्यानें ऊहापोह केला असल्यामुळें तें पुस्तक ॲडाम स्मिथच्या पुस्तकापेक्षांही जास्त उपयोगी आहे असें लोकांस वाटलें. मिल्लनें या शास्त्राच्या तार्किक पद्धतीचें समर्थन केलें आहे व बहुतेक ठिकाणीं रिकार्डोचीं मतेंच प्रतिपादन केलीं आहेत.

मिल्लच्या पहिल्या ग्रंथांत पांच विषयांवर पांच निबंध आहेत. पहिल्या निबंधाचा विषय ह्मणजे राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापाराचे नियम हा होय. यामध्यें मिल्लनें असें दाखविलें आहे कीं, दोन देशांचा दोन मालांमध्यें व्यापार सुरू झाला तर त्या देशांची मागणी अशी होते कीं, एका मालाची किंमत दुसऱ्या मालाबरोबर होते. ह्मणजे जरी राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापार पैशाच्या योगानें चालला तरी तो ऐनजिनसी अदलाबदलीसारखा असतो व कांहीं विशेष कृत्रिम कारणें अस्तित्वांत नसलीं ह्मणजे देशांतील आयात व निर्गत माल यांची अदलाबदल होऊन व्यापाराची तोंडमिळवणी होते. या निबंधांतील तत्वांचें मिल्लनें आपल्या प्रसिद्ध ग्रंथांत " राष्ट्राराष्ट्रांतील मागणीचें समीकरण " या नांवाखालीं विवेचन केलें आहे.

दुसऱ्या निबंधाचा विषय 'संपत्तीच्या व्ययाचा उत्पत्तीवर परिणाम ' हा होय. यामध्यें सुखवस्तु लोक आपलें खेडेगांवांतील उत्पन्न शहरांत राहून खर्च करितात याचा देशाच्या संपत्तीवर काय परिणाम होतो याचा मिल्लनें विचार केला आहे व जरी संपत्तीच्या उत्पत्तीचा कायमचा अतिरेक होणें शक्य नाहीं, तरी क्षणिक अतिरेक होणें शक्य आहे असें त्यानें सिद्ध केलें आहे. तिसऱ्या निबंधांत उत्पादक व अनुत्पादक या शब्दांच्या व्याख्या ठरविण्याचा मिल्लनें प्रयत्न केला आहे; व चवथ्यामध्यें व्याज व नफा यांचा विचार केला आहे व

त्यामध्यें नफा हा मजुरीवर कसा अवलंबून आहे, या रिकार्डोच्या तत्वाचें स्पष्टीकरण केलें आहे; व शेवटच्या निबंधांत अर्थशास्त्राची व्याख्या व त्याची शास्त्रीय पद्धति यांचा विचार केला आहे, व येथें मिल्लनें रिकार्डोच्या तार्किक पद्धतीचें समर्थन केलें आहे.

यानंतरचा मिल्लचा ग्रंथ ह्मणजे त्याचा प्रसिद्ध अर्थशास्त्रावरील ग्रंथ होय. वर सांगितलेंच आहे कीं, या ग्रंथाचा विशेष ह्मणजे त्याची विशद भाषाशैली व शास्त्रीय तत्वांचें उदाहरणांसह स्पष्टीकरण होय. मिल्लचीं अर्थशास्त्रविषयक मतें सरासरी जुन्या ह्मणजे अभिमत पंथाचींच आहेत. परंतु त्याचा काळ हा संक्रमणावस्थेचा काळ होता व मिल्लचें मन नव्या नव्या कल्पनांचें ग्रहण करण्यास योग्य असें होतें, यामुळें त्यानें पुष्कळ बाबतींत नवीन मतें ग्रहण केलीं आहेत. तो सामाजिक पंथाचा अभिमानी झाला होता व त्याच्या कांहीं कल्पनांचा स्वीकार त्यानें आपल्या पुस्तकांत केला आहे. उदाहरणार्थ, पुढील पुस्तकांमध्यें ज्या 'मजुरीफंड' नांवाच्या मजुरीच्या उपपत्तीचा ऊहापोह करावयाचा आहे, त्यावर प्रथमतः मिल्लचा भरंवसा होता, परंतु पुढें ही उपपत्ति वस्तुस्थितीला धरून नाहीं असें त्याच्या ध्यानांत आल्यापासून त्यानें ती उपपत्ति सोडून दिली. परंतु मिल्लच्या या नवीन कल्पनाग्रहणक्षमतेपासून त्याच्या ग्रंथांत नव्याजुन्या कल्पनांची खिचडी होऊन त्यामध्यें बरीच विसंगतता आली आहे; तरी पण मिल्लचें सामान्य धोरण **रिकार्डो**च्या व **माल्थस**च्या मतांचा अनुवाद करण्याचें असल्यामुळें मिल्ल हा अभिमतपंथी अर्थशास्त्रज्ञ होता असें म्हणणें भाग आहे.

यानंतरचे या पंथाचे अभिमानी ग्रंथकार केअर्नस्, फॉसेट, सिजविक्, निकॉलसन्, मार्शल व पेगू हे होत. पहिल्या दोघांनीं बहुतेक ठिकाणीं मिल्लचाच अनुवाद केला आहे. बाकीच्यांनीं मात्र ऐतिहासिक पद्धतीचा व अभिमत अर्थशास्त्राविरुद्ध असणाऱ्या दुसऱ्या लेखकांच्या ग्रंथांचा उपयोग करून या जुन्या अर्थशास्त्राचीं प्रमेयें थोड्याबहुत फेरबदलानें सध्यांसुद्धां वस्तुस्थितीशीं कशीं सुसंगत आहेत हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

✓ **रिकार्डो, मिल्ल व केअर्नस्** या ग्रंथकारांचे फ्रान्समधील अनुयायी **कझन व जे. बी. से** यांनींही तार्किक पद्धतीचा सर्वस्वीं अवलंब केला व या शास्त्राचीं प्रमेयें सर्व ठिकाणीं व सर्व काळीं सारखींच लागू असलीं पाहिजेत असें

प्रतिपादन केलें. परंतु अर्थशास्त्रांतील तत्त्वें भूमितिशास्त्राच्या तत्त्वांप्रमाणें त्रिकालाबाधित नसल्यामुळें, अभिमत अर्थशास्त्रांतील सिद्धांतांचा दुसऱ्या देशांतील वस्तुस्थितीशीं विरोध दिसून येऊं लागला. उदाहरणार्थ, अभिमत अर्थशास्त्राचीं तत्त्वें जर्मनीसारख्या औद्योगिक व राजकीय बाबतींत मागें असलेल्या देशाला लागू पडेनात. यामुळेंच जर्मनीमध्यें ऐतिहासिक पंथाचा उदय झाला. या ऐतिहासिक पंथाच्या थोडेंसे आधीं झालेले, परंतु ज्यांच्या श्रमानें ऐतिहासिक पंथ अप्रत्यक्षपणें उदयास आला अशा दोन लेखकांचा येथें उल्लेख करणें रास्त आहे. ते लेखक **ॲडम म्युल्लर व फ्रेडरिक लिस्ट** हे होत.

ॲडाम म्युल्लरनें मध्यकाळच्या औद्योगिक संस्था व चाली यांचें समर्थन केलें आहे, व त्याच्या काळच्या उदारमतपंथाचा निषेध केला आहे. त्याचे मतें ॲडाम स्मिथचें अर्थशास्त्र हें व्यक्तीच्या संपत्तीच्या वाढीचें शास्त्र आहे. तें राष्ट्रीय दृष्टीनें विचार करीत नाहीं, इतकेंच नव्हे, तर तें संपत्तीच्या पलीकडे कांहीं विशेष महत्त्वाच्या गोष्टी आहेत हेंही जाणत नाहीं. अर्थशास्त्रानें राष्ट्राच्या बौद्धिक, नैतिक व औद्योगिक अशा सर्व बाजूंचा विचार करून राष्ट्राच्या हिताच्या गोष्टी कोणत्या हें ठरविलें पाहिजे असें **म्युल्लरचें** म्हणणें होतें. श्रमविभाग हा भांडवलाच्या वाढीवर अवलंबून आहे, हें ॲडाम स्मिथच्या ध्यानांत नव्हतें; तसेंच श्रमविभागाच्या तत्वाचें पूरक तत्व श्रमसंघटना याचा ॲडाम स्मिथनें विचार केला नाहीं, वगैरे दोष म्युल्लरनें ॲडाम स्मिथच्या ग्रंथांत दाखविले आहेत. शेवटीं म्युल्लरचें म्हणणें असें आहे कीं, ॲडाम स्मिथचें अर्थशास्त्र समुद्रानें वेष्टित अशा इंग्लंडसारख्या पृथक् देशास मात्र लागू आहे; परंतु त्यांतील तत्त्वें युरोपांतील इतर देशांस जर लागू केलीं तर ती गोष्ट राष्ट्रीयदृष्ट्या हानिकारक होईल.

मुल्लरच्या लेखांत दिसून येणारा राष्ट्रीयपणा लिस्टनें जास्त जोरानें पुढें आणला, व त्यानें आपल्या ग्रंथास 'राष्ट्रीय अर्थशास्त्र' असें नांव दिलें. त्याचे मतें स्मिथचें अर्थशास्त्र हें विश्वव्यापी आहे म्हणजे त्यामध्यें सर्व जग एकाच राज्यपद्धतीखालीं आहे असें गृहीत धरलें आहे. निदान त्यांत जगांत सध्यां प्रचलित असलेल्या निरनिराळ्या व स्वतंत्र राज्यपद्धतींकडे कानाडोळा केला आहे, व सर्व जगाच्या सांपत्तिक कल्याणाचा मार्ग कोणता हें ठरविलें आहे. त्यानें अप्रतिबंध व्यापाराचें समर्थन केलें आहे तें या दृष्टीनें बरोबरही आहे. परंतु

लिस्ट याला या दोन्ही गोष्टी कबूल नव्हत्या. त्याचे मतें मनुष्याच्या स्वभावाकडे लक्ष देतां व सध्यांच्या जगाच्या व्यवस्थेकडे लक्ष देतां प्रत्येक राष्ट्रानें आपापल्या हिताकडे पहाणें एकंदरींत हितावह आहे, व खरी मानवी प्रगति या मार्गानेंच होईल. तेव्हां प्रत्येक राष्ट्रानें आपण पूर्णपणें स्वावलंबी व स्वयंपूर्ण होण्याची खटपट केली पाहिजे. देशाच्या सर्वांगीण वाढीस उद्योगवैचित्र्य अवश्य आहे. म्हणूनच प्रत्येक देशानें शेतकी, कारखाने, व्यापार या सर्व औद्योगिक अंगांची प्रगति केली पाहिजे, व ही प्रगति घडवून आणण्यास संरक्षक पद्धतीचा अंगीकार केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. लिस्टच्या मताप्रमाणें समाजाचे किंवा राष्ट्राचे बाल्यावस्थेंत अनियंत्रित व्यापार असावा. कारण, अशा व्यापारानें जास्त सुधारलेल्या देशांतून कलाकौशल्याचे जिन्नस देशांत येतात, त्यांचा लोकांत प्रसार होतो, व ह्यायोगानें लोकांची अभिरुचि परिणत होते व वासना व गरजा जास्त वाढतात. असें झाल्यानंतर संरक्षणपद्धतीचा अवलंब केला पाहिजे ह्मणजे देशांत लोकांच्या नवीन वाढलेल्या गरजा, वासना व अभिरुचि यांच्या तृप्तीसाठीं कारखाने निघूं लागतात, व असे बाल्यावस्थेंतील कारखाने पूर्ण वाढ झालेल्या कारखान्यांच्या मालाशीं बरोबरीच्या नात्यानें टक्कर देऊं शकत नाहींत. व ह्मणून या काळीं देशांत संरक्षणपद्धतीचा अंगीकार केला पाहिजे. सर्व धंद्यांची पूर्ण वाढ झाल्यावर व आपल्या देशांतील कारखाने दुसऱ्या देशांशीं टक्कर देण्यास समर्थ झाले ह्मणजे मग पुनः अप्रतिबंध व्यापारपद्धति सुरू केली पाहिजे. कारण, माल उत्तम होण्यास व त्याची किंमत कमी होण्यास चढाओढ अवश्यक आहे. अशी चढाओढ नसल्यास व आपलें गिऱ्हाईक कायम आहे अशी कारखानदारांस खात्री असल्यास सुधारणा करण्याची प्रवृत्ति कमी होण्याचा फार संभव असतो. लिस्टच्या मतें सर्व युरोपांत इंग्लंड मात्र या शेवटल्या स्थितीप्रत आल्यामुळें तेथें अप्रतिबंध व्यापाराचें तत्व फायद्याचें आहे; परंतु जर्मनीला संरक्षण अवश्यक आहे.

लिस्ट याला सर्व जर्मनीच्या संस्थानांचें एक राष्ट्र व्हावें अशी फार इच्छा होती. व त्याच्या संरक्षक पद्धतीचा एक हेतु राष्ट्रीय ऐक्य घडवून आणणें हा होता. कारण संस्थानासंस्थानांमधील जकाती काढून सर्व जर्मनीभर अप्रतिबंध व्यापार सुरू करावा व परराष्ट्रांशीं मात्र संरक्षणपद्धतीचा अवलंब करावा असें त्याचें ह्मणणें होतें, व त्याचे लेखांनीं जर्मनीच्या राष्ट्रीय घटनेस फारच मदत

झालेली आहे असें जर्मन इतिहासकार म्हणतात.

ऐतिहासिक पद्धतीचा व समाजशास्त्राचा जनक फ्रेंच तत्वज्ञानी कोम्ट् हा होता. याच्या ग्रंथांनींच ऐतिहासिक पद्धतीला प्रथमतः महत्त्व आलें व त्याच्या प्रोत्साहनानें अर्थशास्त्रांतला ऐतिहासिक पंथ अस्तित्वांत आला.

या पंथाचे प्रवर्तक **रोशर, हॅल्डीब्रांड व नाइस** हे होते. या पंथाचें मुख्य म्हणणें असें आहे कीं, अर्थशास्त्राचा तात्विकदृष्ट्या विचार कधींच करतां येत नाहीं. कारण समाजाचीं औद्योगिक व इतर अंगें यांचा अगदीं निकट संबंध आहे. तेव्हां प्रत्येक राष्ट्राची औद्योगिक स्थिति इतिहासदृष्ट्या ठरविली पाहिजे व या ऐतिहासिक निरीक्षणावरून काय ते सिद्धांत काढले पाहिजेत. तसेंच अर्थशास्त्रामध्यें सर्व काळीं, सर्व ठिकाणीं व सर्व स्थितींत सारखे लागू पडणारे असे नियम नाहींत. सारांश, अर्थशास्त्र हें तार्किक शास्त्र नाहीं व त्याची पद्धतिही तार्किक नाहीं, तर हें शास्त्र अनुभवप्रधान शास्त्र आहे व त्याची पद्धति ऐतिहासिक आहे.

ऐतिहासिक पंथानें या दृष्टीनें अर्थशास्त्राचा विचार केला आहे, व त्याच्या श्रमानें अर्थशास्त्राचा सविस्तर इतिहास, तसेंच प्रत्येक देशाचे औद्योगिक इतिहास निर्माण झाले आहेत. या नवीन माहितीवरून त्यांनीं अभिमत अर्थशास्त्रांतील बऱ्याच प्रमेयांचा व विधानांचा खोटेपणा सिद्ध केला आहे. जर्मनीमध्यें हा ऐतिहासिक पंथ व पूर्वी निर्दिष्ट केलेला सामाजिक पंथ यांचें फार प्राबल्य आहे. तर अभिमत अर्थशास्त्राचें इंग्लंडमध्यें फार प्राबल्य आहे. तरी पण तेथेंही जर्मनीच्या ऐतिहासिक पंथाची छाप अलीकडील ग्रंथकारांवर पडलेली दिसते.

खुद्द इंग्लंडमध्यें सुद्धां अभिमत अर्थशास्त्राच्या पुष्कळ तत्वांचें खंडण करणारे ग्रंथ प्रसिद्ध होतच आहेत. कांहींजणांनीं नीतिशास्त्रदृष्ट्या या शास्त्राच्या तत्वाचा विचार केला आहे. नीतिशास्त्रदृष्ट्या हें शास्त्र भयाण आहे, असें प्रतिपादन करणारे वाङ्मयविषयक ग्रंथकर्ते **कॉर्लाईल व रस्किन** यांनीं या शास्त्राची सरहा निंदा केली आहे.

कांहीं ग्रंथकारांनीं अभिमत अर्थशास्त्रकारांच्या कांहीं बाबतींतील चुका दुरुस्त करून पुष्कळ नवीं प्रमेयें, सिद्धांत व नियम काढण्याचा प्रयत्न केला आहे; व या तऱ्हेनें या शास्त्रांत पुष्कळ भर पडत आली आहे. अशा तऱ्हेनें पूर्वींच्या शास्त्रांत

भर घालणारे ग्रंथकार ह्मणजे जेव्हन्स, मार्शल, वॉकर, कॅरे वगैरे होत.

कांहीं ग्रंथकारांनीं अभिमत अर्थशास्त्र हें सर्वथा असत्यमय व खोटें शास्त्र असून कुचकामाचें आहे असें प्रतिपादन केलें आहे, आणि नवीन अर्थशास्त्राची अगदीं पायापासून–नव्हे पूर्वीचा पायासुद्धां पार खणून टाकून–सर्व इमारत नवी रचण्याचा आव घातला आहे. असे ग्रंथकार ह्मणजे **प्रो॰ बेन ड्यूक ऑफ आरगाईल व मिस्टर क्लिफअर** हे होत. बेन यांनीं 'संपत्तीच्या उत्पत्तीचें तत्व' या नांवानें एका तत्वावर नवीन शास्त्र बनविण्याचा प्रयत्न केला आहे; तर क्लिफअर यांनीं 'संपत्तिचक्र' या नांवाखालीं अर्थशास्त्राची अगदीं कोरी करकरीत व नवी इमारत बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

अर्थशास्त्राच्या वरील संक्षिप्त इतिहासावरून या शास्त्राची हळूहळू कशी वाढ होत गेली आहे हें ध्यानांत येईल. "थेंबें थेंबें तळें साचे" हाच न्याय शास्त्राच्या वाढीलाही लागू असतो. एका ग्रंथकारानें एक कल्पना नवी काढली, दुसऱ्यानें एक तत्व नवीन शोधिलें, तिसऱ्यानें त्याचें उदाहरण हुडकून काढलें तर चौथ्यानें एखाद्या वस्तुस्थितीची उपपत्ति बसविली; याप्रमाणें हळूहळू शास्त्रांत भर पडत गेली आहे. परंतु कित्येक वेळां नवीन कल्पना काढणारास मात्र आपण सर्व शास्त्रच बदलून टाकीत आहों असा भास होतो. कारण, त्याचें त्यानें काढलेल्या कल्पनेबद्दल विशेष प्रेम असतें; व ह्मणून ती त्याला अत्यंत महत्वाची दिसते. ज्याप्रमाणें प्रत्येक बापाला आपला मुलगा बृहस्पतीचा अवतार वाटतो; कारण अंधभक्तीनें सारासारविचार नाहींसा होतो; त्याचप्रमाणें कल्पनारूपी मानसपुत्राच्याबद्दल अंधप्रेम वाटतें; व या कारणांनींच पुष्कळ वेळां नवीन एखादी कल्पना काढणारा लेखक मागच्या सर्व ग्रंथकारांस कुचकामाचे ठरवून आपल्यास सर्व ज्ञानाचा मक्ता मिळाला आहे असें मोठ्या आढ्यतेनें सांगतो; परंतु ही गोष्ट अगदीं असंभवनीय आहे. कारण, एकाच ग्रंथकारानें सर्व शास्त्र अथपासून इतिपर्यंत एकदम निर्माण करावें हें उत्क्रांति–तत्वाला अगदीं विरुद्ध आहे. ज्याप्रमाणें प्राणिमात्रांत लहान लहान फरक पडत जाऊन कालांतरानें त्यांच्या भिन्न दोन जाती बनत जातात, त्याचप्रमाणें ज्ञानाच्या व शास्त्राच्याही वाढीची गोष्ट आहे व अर्थशास्त्राची वाढही अशीच हळूहळू व क्रमानें झाली आहे, हें मागील संक्षिप्त इतिहासावरून दिसून आलें असेल व पुढील विवेचनावरून तें जास्त दिसून येईल.

# भाग दुसरा.

## अर्थशास्त्राची व्याख्या व शास्त्रीय पद्धती.

एखादें स्थळ किंवा प्रदेश पहावयास निघालें असतां ज्याप्रमाणें त्या स्थळाचा किंवा प्रदेशाचा नकाशा जवळ असला ह्मणजे तें स्थळ किंवा तो प्रदेश पहाणें सुलभ जाऊन त्रास व वेळ वांचतो; व शिवाय आपल्याला मनोरंजन व ज्ञानप्राप्तीही जास्त करून घेतां येते, त्याप्रमाणेंच कोणत्याही विषयाच्या अगर शास्त्राच्या आरंभीं दिलेल्या त्या विषयाच्या अगर शास्त्राच्या व्याख्येची गोष्ट आहे. त्याचेयोगानें तो विषय किंवा शास्त्र समजण्यास व त्यापासून सत्यज्ञान-ज्ञानाचा आभास नव्हे-होण्यास फार मदत होते. यामुळें सर्व ग्रंथकारांची प्रथमारंभीं हातीं घेतलेल्या शास्त्राची व्याख्या देण्याची रीत आहे. त्या रीतीस अनुसरून येथेंही अर्थशास्त्राची शास्त्रीय व्याख्या देण्याचा विचार आहे.

अतज्ज्ञ अशा सामान्य माणसास अर्थशास्त्र ह्मणजे काय असा प्रश्न केल्यास तो ह्मणेल कीं, व्यापारउदीम व उद्योगधंद्यांची माहिती देणारा जो विषय तें अर्थशास्त्र होय. या व्यावहारिक कल्पनेला पारिभाषिक शब्दांचा पोषाख चढवून कांहीं ग्रंथकारांनीं हीच अर्थशास्त्राची शास्त्रीय व्याख्या ह्मणून मानली आहे. उदाहरणार्थ, **मॅकलावूडनें** आपल्या ग्रंथांत अदलाबदल अगर विनिमय यांची मीमांसा किंवा उपपत्ति करणारें शास्त्र तें अर्थशास्त्र होय, अशी अर्थशास्त्राची व्याख्या केली. या व्याख्येंत व सामान्य माणसाच्या कल्पनेंत पारिभाषिक शब्दांखेरीज दुसरा भेद नाहीं हें वाचकांच्या तेव्हांच ध्यानांत येईल. परंतु या व्याख्येनें अर्थशास्त्राचा यथार्थ बोध होत नाहीं. शिवाय या व्याख्येवर अव्याप्तीचा दोष येतो. अर्थात् ही व्याख्या फार संकुचित आहे. या व्याख्येंत अर्थशास्त्रांत वास्तविकपणें अंतर्भूत होणाऱ्या सर्व विषयांचा समावेश होत नाहीं. कारण, व्यापार किंवा विनिमय यांची मीमांसा हा अर्थशास्त्राचा एक भाग अगर अंग आहे. परंतु अर्थशास्त्राचीं दुसरीं अंगें आहेत, तीं या व्याख्येनें वगळलीं जातात; तेव्हां ही व्याख्या सदोष ह्मणूनच टाकाऊ आहे.

अर्थशास्त्राची दुसरी एक व्याख्या केली जाते. या व्याख्येप्रमाणें अर्थशास्त्र हें एक नीतिशास्त्राचा भाग गणिलें असून तें मानवी कल्याणाच्या आधिभौतिक साधनांच्या सिद्धीबद्दलच्या व्यक्तीच्या व समाजाच्या कृत्यांचा विचार करतें असें ह्मटलें आहे. परंतु ही व्याख्या इतकी व्यापक आहे कीं, तिच्यावर अति-व्याप्तीचा दोष येतो. ह्मणजे ही व्याख्या फारच विस्तृत आहे. कारण या व्याख्ये-च्या योगानें नीतिशास्त्र, आरोग्यशास्त्र वगैरे सर्व शास्त्रांचा या शास्त्रांत अंतर्भाव होऊं लागेल. वरील दोन्ही व्याख्यांतील दोष परस्परविरोधी परंतु अगदीं उघड व स्पष्ट आहेत. यामुळें या दोन व्याख्या एखाददुसऱ्याच ग्रंथकारानें ग्राह्य धरलेल्या दिसून येतात. सामान्यतः अर्थशास्त्रज्ञ किंवा इतर लोक यांना या दोन्ही व्याख्या पसंत नाहींत असें दिसतें. परंतु यापुढें विचार करावयाची व्याख्या मात्र पुष्कळ ग्रंथांत दिलेली आढळून येते. ती व्याख्या ही–" संपत्तीची उत्पत्ति, वांटणी व अदलाबदल यांचा ऊहापोह करणारें शास्त्र तें अर्थशास्त्र होय."

या व्याख्येमध्यें अर्थशास्त्राच्या तीन अंगांचा प्राधान्येंकरून उल्लेख आलेला आहे. परंतु अर्थशास्त्रावरील बहुतेक ग्रंथांत सरकारच्या कराचीं तत्वें दिलेलीं असतात. तेव्हां हेंही एक अर्थशास्त्राचें अंग आहे व या दृष्टीनें या अंगाचा व्याख्येंत अंतर्भाव झाला पाहिजे असें ह्मणावें लागतें; तसेंच कांहीं ग्रंथकार व्यय किंवा उपभोग ह्मणून अर्थशास्त्राचें आणखी एक अंग कल्पितात; तेव्हां त्याचाही उल्लेख व्याख्येंत आला पाहिजे. याप्रमाणें अर्थशास्त्रांतील विषयांच्या वाढीबरोबर अर्थशास्त्राच्या व्याख्येंत नवीन नवीन अंगांचा अन्तर्भाव करावा लागेल. परंतु वरच्या व्याख्येंत स्वीकारलेली व्याख्या करण्याची पद्धति योग्य नाहीं. कारण कोणत्याही पदार्थाची व्याख्या आपण त्यांत अंतर्भूत होणाऱ्या अंगांवरून किंवा अवयवांवरून करीत नाहीं. तर्कशास्त्रामध्यें ज्याला गुणागम ह्मणतात त्या-वरून वस्तूची व्याख्या किंवा लक्षण करणें हीच खरी शास्त्रीय पद्धति आहे. वस्तूच्या संख्यागमावरून किंवा त्यांतील अवयवावरून व्याख्या करणें गैर आहे. अर्थशास्त्राच्या वर दिलेल्या व्याख्येंत हा मोठा दोष आहे. अर्थशास्त्राचीं अमुक अमुक अंगें आहेत असें सांगणें ह्मणजे त्या शास्त्राची व्याख्या करणें नव्हे; तर तें शास्त्रविषयाचें वर्गीकरण करणें होय. खरी व्याख्या वस्तूमध्यें असलेल्या सर्व-साधारण महत्वाच्या गुणांवरून केली पाहिजे.

वर निर्दिष्ट केलेल्या व्याख्येमध्यें आणखी एक मोठा दोष आहे. तो हा कीं, या व्याख्येच्या योगानें अर्थशास्त्राचीं सांगितलेलीं निरनिराळीं अंगें हीं स्वतंत्र व एकमेकांपासून वेगळीं अंगें आहेत असा भास होतो. उदाहरणार्थ, संपत्तीची उत्पत्ति व वांटणी या परस्परावलंबी गोष्टी नाहींत असा या व्याख्येवरून एखाद्याचा समज होण्याचा संभव आहे. वास्तविक पहातां अर्थशास्त्राचीं सर्व अंगें परस्परावलंबी आहेत व तीं वेगवेगळीं कधींच करतां येणार नाहींत. विवेचनासाठीं त्यांचा निरनिराळा विचार करणें अवश्य असलें तरी संपत्तीचीं हीं अंगें अगदीं एकमेकांत निगडित झालीं आहेत, हें नेहमीं ध्यानांत ठेविलें पाहिजे. अर्थशास्त्राच्या वरील व्याख्येमधले दोष अर्थशास्त्राचा जनक जो ॲडम स्मिथ त्यानें आपल्या एका व्याख्येंत टाळले आहेत. त्यानें अर्थशास्त्राची व्याख्या गुणागमावरून केलेली आहे व ह्मणून ती तर्कशास्त्राच्या नियमानुरूप आहे. यामुळें पुष्कळ आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनीं ती मान्य केली आहे. अर्थशास्त्राच्या ॲडाम स्मिथनें दिलेल्या प्रमेयांपासून भिन्न अशीं दुसरीं कितीही प्रमेयें व तत्वें हल्लीं पुढें आलीं असलीं तरी ॲडाम स्मिथनें केलेलें या शास्त्राचें लक्षण अजूनही कायम आहे व जरी हें शास्त्र आणखी कितीही वाढलें तरी या व्याख्येमध्यें कांहीं फरक होण्याचें कारण नाहीं.

"राष्ट्राच्या संपत्तीचें खरें स्वरूप व तिच्या उत्पत्तीचीं कारणें यांचें विवेचन करणारें शास्त्र तें अर्थशास्त्र होय" ही व्याख्या गुणागमानुरूप आहे हें उघड दिसून येईल. ॲडाम स्मिथनें अर्थशास्त्राला व्यवस्थित स्वरूप देऊन त्याचें एक शास्त्र बनविलें असें ह्मणतात तें ह्या व्याख्येवरूनही सिद्ध होतें. ही व्याख्या सर्व शास्त्रांच्या सामान्य स्वरूपाला धरून अर्थशास्त्राचें विशेष स्वरूप विशद करणारी आहे. कला व शास्त्र यांमध्यें भेद दाखवितांना शास्त्राचें रहस्य सांगण्यांत येतें. कला ही कांहीं एका विषयाचें व्यावहारिक ज्ञान व त्या ज्ञानाच्या प्रत्यक्ष उपयोगाचे नियम यांनीं बनते. परंतु शास्त्र हें एखाद्या विषयाची उपपत्ति किंवा मीमांसा करतें. ह्मणजे त्या विषयाचें खरें स्वरूप व त्याचीं कारणें हीं शोधून काढतें. तेव्हां यथार्थ स्वरूप-ज्ञान व कारणमीमांसा हे शास्त्राचे विशेष गुण आहेत. तेव्हां, अर्थशास्त्र हें जर शास्त्र असेल तर त्यामध्येंही हे गुण असले पाहिजेत. व अर्थशास्त्र हें राष्ट्रीय संपत्तीचें शास्त्र आहे असें ॲडाम स्मिथनें त्याचें विशिष्ट स्वरूप सांगितलें आहे.

ज्याप्रमाणें वीज ही काय आहे व तिचीं कारणें काय आहेत हें शोधून काढणें विद्युत्शास्त्राचें काम आहे; उष्णतेचें खरें स्वरूप व तिचीं कारणें शोधून काढणें हें उष्णताशास्त्राचें काम आहे; किंवा जीवाचें यथार्थ स्वरूप व त्याचीं कारणें शोधून काढणें हें प्राणिशास्त्राचें काम आहे; त्याचप्रमाणें राष्ट्रीय संपत्तीचें यथार्थ स्वरूप व तिचीं कारणें शोधून काढणें हें अर्थशास्त्राचें काम आहे; या व्याख्येवरून अर्थशास्त्र हें सामाजिक शास्त्राचा एक पोटभेद आहे हें प्रथमत दृष्टोत्पत्तीस येतें. राष्ट्राची किंवा देशाची किंवा एखाद्या समाजाची संपत्ती—निव्वळ व्यक्तीची नव्हे—म्हणजे काय व ती देशांत किंवा राष्ट्रांत उत्पन्न कोणत्या कारणांनीं होते, याची मीमांसा करणें हें या शास्त्राचें काम आहे. ॲडाम स्मिथची ही व्याख्या व मागें दिलेली व्याख्या ह्यांमध्यें शेवटीं कांहीं फारसा फरक रहात नाहीं हें खरें. अर्थशास्त्राचीं उत्पत्ति, वाटणी व अदलाबदल किंवा विनिमय हीं जीं अंगें त्या सर्वांचा विचार ॲडाम स्मिथनें आपल्या पुस्तकांत केला आहे. परंतु संपत्तीच्या कारणांचें विवेचन करतांना संपत्तीची वांटणी व तिचा विनिमय हीं अर्थशास्त्राचीं अंगें ओघानेंच येतात हें ॲडामें स्मिथ यानें दाखविलें आहे. म्हणजे विवेचनाच्या सोयीकरितां अर्थशास्त्रग्रंथाचे उत्पत्ति, वांटणी व विनिमय असे जरी तीन भाग करणें इष्ट असलें व त्याप्रमाणें सर्व ग्रंथकारांनीं केलेले आहेत, तरी पण व्याख्येमध्यें त्यांचा अंतर्भाव करणें रास्त नाहीं. व्याख्येवरून शास्त्रविषय कसा एकरूप असून त्याचीं सर्व अंगें कशीं परस्परसंलग्न आहेत हें दिसून आलें पाहिजे.

वरील विवेचनावरून ॲडाम स्मिथनेंच दिलेली व्याख्या दोषरहित असून तिच्या योगानें अर्थशास्त्राचें स्वरूप चांगल्या तऱ्हेनें स्पष्ट होतें; म्हणून हीच व्याख्या सर्वमान्य होण्यास व या शास्त्राची कायमची व्याख्या होण्यास योग्य आहे असें वाचकांस दिसून आल्याखेरीज राहणार नाहीं.

आतां अर्थशास्त्रासंबंधीं आणखी एक वादग्रस्त प्रश्न राहिला. तो समजण्याकरितां आपल्याला थोडेसें तर्कशास्त्रामध्यें शिरलें पाहिजे. तर्कशास्त्रज्ञांनीं अनुमानें दोन प्रकारचीं आहेत असें सांगितलें आहे. एक अनुभवसिद्ध अनुमान व दुसरें तर्कसिद्ध अनुमान. पहिल्यामध्यें आपण जे प्रयोग करितों किंवा जे अनुभव घेतों त्यांवरून एक तत्त्व किंवा प्रमेय किंवा सत्र सिद्ध करा-

वयाचें असतें. उदाहरणार्थ, प्राणवायु व हैड्रोजनवायु हे एकास दोन या प्रमाणांत मिसळण्याचा प्रयोग करून व त्यापासून पाणी उत्पन्न होतें हें पाहून पाणी हा संयुक्त पदार्थ आहे हें प्रमेय आपण काढतों. याला अनुभवसिद्ध अनुमान ह्मणतात. ज्यामध्यें एक स्वयंसिद्ध तत्त्व किंवा अनुभवसिद्ध तत्त्व यापासून दुसरें सत्य तर्कपद्धतीनें काढलें जातें त्याला तर्कसिद्ध अनुमान ह्मणतात. या भेदावरूनच शास्त्रामध्येंही दोन मुख्य भेद मानतात. एक अनुभवप्रधान आनुभौतिक शास्त्रें व दुसरीं तर्कप्रधान अगर तार्किक शास्त्रें. ज्या शास्त्रांतील नवीं नवीं सत्यें किंवा विधानें निरनिराळ्या प्रयोगानें किंवा अनुभवानें सिद्ध करावीं लागतात, त्याला आनुभौतिक शास्त्रें ह्मणतात. ह्मणजे येथें प्रत्येक नवीन ज्ञान अनुभव किंवा प्रयोग यावरूनच काढावें लागतें; पूर्वींच अवगत असलेल्या तत्वापासून, नुसत्या विचारशक्तीनें दुसऱ्या विधानाची सिद्धता करतां येत नाहीं, परंतु कांहीं शास्त्रांमध्यें तर्कानुमान हेंच प्रधान असतें. ह्मणजे या शास्त्रांना प्रयोगाची व अनुभवाची गरज लागत नाहीं. यांमध्यें नवीन विधानें किंवा सत्यें पूर्वी अवगत असलेल्या तत्वांपासून निवळ तर्कपद्धतीनें काढतां येतात. या कोटींमधील प्रमुख शास्त्रें म्हणजे गणितशास्त्राच्या सर्व शाखा होत. यांतील सत्यें तर्कसिद्ध असतात. त्या शास्त्रांना प्रयोग किंवा अनुभव लागत नाहीं. भूमितीचे सर्व सिद्धान्त किंवा सत्यें त्या शास्त्रांतील व्याख्या, स्वयंसिद्ध तत्वें व गृहीत पदें या तीन जातींच्या मूळ तत्वांपासून तर्कानें काढतां येतात. असा प्रकार प्राणिशास्त्रांत किंवा रसायनशास्त्रांत शक्य नाहीं.

आतां अर्थशास्त्राबद्दल वादग्रस्त प्रश्न असा आहे कीं, या शास्त्राची नवीन सिद्धांत काढण्याची पद्धति कोणती? अर्थात् हें शास्त्र अनुभवप्रधान आहे कीं तर्कप्रधान आहे? उपोद्घातावरून हा वाद आतां शुष्कवाद आहे, असें दिसून येईल कारण प्रत्येक शास्त्रामध्यें निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या पद्धतीचा अवलंब केला जातो. उपोद्घातामध्यें जो अभिमत पंथ सांगितला आहे त्या पंथानें अर्थशास्त्र हें एक तर्कसिद्ध शास्त्र आहे असें एककल्ली मत दिलें. याचा स्वाभाविक परिणाम असा झाला कीं, ऐतिहासिक पंथ निघून त्यानें अर्थशास्त्र हें अगदीं अनुभवसिद्ध शास्त्र आहे असें ठरविण्याचा प्रयत्न केला. अर्थशास्त्र हें समाजशास्त्राचा पोटभेद आहे व समाजशास्त्र हें अनुभवसिद्धशास्त्र आहे. त्या अर्थीं अर्थशास्त्रही अनुभव-

सिद्धशास्त्र आहे हें उघड होतें. परंतु या शास्त्रामध्यें तर्कानें कोणती गोष्ट सिद्ध होत नाहीं किंवा करीत नाहीं असें मात्र नाहीं. या शास्त्राच्या कांहीं कांहीं भागांत तर्कपद्धतीचा अवलंब करणें सोयीचें असतें, तर कांहीं भागांत अनुभव किंवा प्रयोग या पद्धतीचा अवलंब करणें इष्ट असतें. अर्थशास्त्राचा जनक ॲडाम स्मिथ याचें आपल्या प्रख्यात ग्रंथांत दोन्हीही पद्धतींचा लागेल तसतसा उपयोग केला आहे; व हेंच करणें सयुक्तिक आहे. ॲडाम स्मिथ याच्या मागून जे ग्रंथकार झाले त्यांनीं मात्र अनुभवपद्धति पुष्कळ ठिकाणीं टाकून दिली व रिकार्डो यानें तर या शास्त्राला गणितशास्त्रासारखें तार्किक स्वरूप दिलें. रिकार्डोच्या या करण्यानें तर या शास्त्राबद्दल बराच गैरसमज उत्पन्न झाला. तेव्हां या वादांतलें तथ्य म्हणजे अर्थशास्त्र हें प्राधान्येंकरून अनुभवसिद्ध शास्त्र आहे, परंतु त्याच्या पुष्कळ भागांत तर्कपद्धतीचाही उपयोग होतो. म्हणून या शास्त्राच्या दोन्हीही पद्धति आहेत असें म्हटलें पाहिजे.

---

# भाग तिसरा.

## संपत्ति म्हणजे काय ?

अर्थ, धन, संपत्ति हे किंवा असेच दुसरे पुष्कळ शब्द सामान्य व्यवहारांत लोक समानार्थक म्हणून वापरतात. यांचा अर्थ काय असें विचारलें असतां घरेंदारें, जमीनजुमला, पैसाअडका, कपडालत्ता, धान्यधुन्य, मालमसाला, जिन्नसपान्नस, ही सर्व संपत्ति आहे; व हाच संपत्तीचा अर्थ, असें व्यावहारिक माणूस उत्तर देईल. परंतु साक्रेतीसानें एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें हीं सर्व संपत्तीची उदाहरणें झालीं. व संपत्ति हजारों वस्तूंची झालेली असल्यामुळें आणखीही हजारों वस्तूंचीं नांवें सांगून हा संपत्तीचा अर्थ असें कोणी म्हणेल; परंतु आपल्याला शास्त्रीयदृष्ट्या संपत्तीचा अर्थ ठरवावयाचा आहे. म्हणजे संपत्तीची व्याख्या करावयाची आहे, व शास्त्रीय व्याख्या ही गुणवाचक असली पाहिजे हें मागल्या भागांत स्पष्ट करून सांगितलें आहे. ज्या हजारों वस्तू संपत्ति या नांवाखालीं

मोडतात, त्या निरनिराळ्या वस्तूंमध्यें असे कोणते सामान्य गुण आहेत कीं, ज्यामुळें त्या सर्वांना संपत्ति हें सामान्य नांव मिळतें ?

ज्या ज्या वस्तूला संपत्ति म्हणतात, ती ती वस्तु मनुष्यापासून भिन्न व अलग राहणारी असली पाहिजे. मानवी प्राण्यापासून स्वतंत्र राहण्याची शक्ति हा एक गुण सर्व संपत्तीमध्यें असला पाहिजे. यावरून मनुष्य किंवा त्याचे गुण ही संपत्ति होऊं शकत नाहीं. ज्या ठिकाणीं गुलामगिरी कायदेशीर पद्धति आहे, तेथें एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याची संपत्ति होऊं शकेल. परंतु आपली स्वतःची संपत्ति होऊं शकणार नाहीं. तसेंच त्याचे गुणही संपत्तींत मोडणार नाहींत. मनुष्याचे गुण हे संपत्तीच्या उत्पत्तीचीं कारणें असूं शकतील. जसें एखादा मनुष्य आपल्या बौद्धिक गुणानें पुष्कळ संपत्ति मिळवील; किंवा एखादा आपल्या गाण्याच्या गुणावर श्रीमंत होईल. परंतु हा त्याचा गुण म्हणजे संपत्ति नव्हे. तो संपत्ति उत्पन्न करणारा झरा होय. वाङ्मयांत विद्याधन, सामर्थ्यधन, आरोग्यधन, असे शब्दप्रयोग येतात. परंतु हे प्रयोग अलंकारिक आहेत हें उघड आहे. येथें निरनिराळ्या गुणांवर रूपक केलेलें आहे.

संपत्ति या नांवाखालीं मोडणाऱ्या वस्तूंमधला दुसरा सामान्य गुण म्हणजे त्यांची मानवी वासनांची तृप्ति करण्याची शक्ति होय. याला वस्तूची उपयुक्तता म्हणतात. अर्थ या शब्दानें व्युत्पत्तिदृष्ट्या हा गुणच व्यक्त केला जातो. जें मनुष्याकडून प्रार्थिलें अगर इच्छिलें जातें तो अर्थ. म्हणजे धन, संपत्ति किंवा अर्थ यांमध्यें मनुष्याची इच्छा किंवा वासना भागविण्याची शक्ति असलीच पाहिजे हें उघड होतें. ज्या वस्तूमध्यें मनुष्याची कोणतीच वासना भागविण्याचें सामर्थ्य नाहीं ती वस्तू संपत्ति किंवा धन या पदाप्रत पावणारच नाहीं. मनुष्याच्या वासना नीतिवर्धक आहेत किंवा अनीतिप्रवर्तक आहेत; त्या स्वाभाविक आहेत किंवा कृत्रिम आहेत, या गोष्टीचा विचार अर्थशास्त्रामध्यें येत नाहीं. यामुळें ज्या ज्या वस्तूंना लोकांत मागणी आहे किंवा त्यांचा खप लोकांत होतो त्या त्या सर्व वस्तू संपत्तिपदाप्रत पावतात. म्हणूनच दारू, तंबाखू वगैरेंसारख्या वस्तूंचें सेवन अनीतिकारक असलें तरी अर्थशास्त्रदृष्ट्या त्या संपत्तींतच मोडतात.

संपत्तीच्या ठायीं वास करणारा तिसरा सामान्य गुण म्हणजे तिची दुर्मिळता किंवा कष्टसाध्यता होय. जे पदार्थ इतके विपुल आहेत कीं, ते मिळविण्याक-

रितां कांहीं एक काम करावें लागत नाहीं व तें कितीजणांनाही लागले तरी मुबलक असतात, अशा पदार्थांची कोणीही संपत्तीमध्यें गणना करणार नाहीं. या वस्तूंच्या ठिकाणीं मनुष्याची वासना तृप्त करण्याची उपयुक्तता असेल, व मनुष्यापासून विलगपणाही असेल, परंतु तेवढ्यानेंच त्या वस्तू संपत्ति होणार नाहींत. संपत्तीमध्यें दुर्मिळता किंवा कष्टसाध्यता हा गुण असला पाहिजे. ह्मणजे, हवा, पाणी, नवीन वसाहतीमध्यें जमीन व लांकूडफांटे या वस्तू संपत्ति ह्मणून समजल्या जात नाहींत. तर त्या सृष्टीनें मानवी प्राण्यास फुकट दिलेल्या देणग्याच समजल्या जातात. यांना कोणीही आपली संपत्ति अगर धन म्हणणार नाहीं. परंतु विशेष प्रसगीं या वस्तूही संपत्ति होतात. म्हणजे जेथें जेथें ह्या दुर्मिळ तेथें तेथें त्यांना धनाचें स्वरूप येतें. मारवाडच्या रुक्ष प्रदेशांत लोटाभर पाण्याला एक पैसा द्यावा लागतो. तेथें ज्याच्याजवळ मुबलक पाणी आहे तो मोठा श्रीमंत होतो. ज्याची स्वतःची विहीर आहे असा मनुष्य तेथें रहाटगाडग्यानें किंवा मोटेनें पाणी काढून विकतो व हा एक मोठा किफायतशीर धंदा होतो. तसेंच शहरांत पाण्याची दुर्मिळता असते, ह्मणून तेथें सुद्धां पाणी धन बनतें व त्याला किंमत द्यावी लागते.

संपत्तीमधला शेवटचा व अत्यंत महत्वाचा गुण म्हणजे संपत्ति असणारी वस्तू, कोणाच्या तरी खासगी मालकीची पाहिजे. ज्या वस्तू सर्वांना सामान्य आहेत व ज्यांवर एखाद्याचा अनन्यसामान्य ताबा नाहीं अशा वस्तू संपत्तिपदाप्रत पावणार नाहींत. उदाहरणार्थ हवा, पाणी, जमीन, जंगल वगैरे. ज्या वस्तू आपल्याला स्वतःच्या ताब्यांत घेऊन मालकीच्या करितां येत नाहींत अशा वस्तूंना आपण आपली संपत्ति असें कधींच समजत नाहीं. तेव्हां मालकी व तिचा खरा निदर्शक गुण अनन्यसामान्य ताबा व उपयोग करण्याचा हक्क हे गुण संपत्तीमध्यें आवश्यक असले पाहिजे. हा ताबा किंवा मालकी व्यक्तीचीच पाहिजे असा मात्र अर्थ नाहीं. ही मालकी एका व्यक्तीची असेल व व्यक्तीसमूहानें झालेल्या मंडळीची किंवा सभेची असेल किंवा देशांतल्या सरकारची असेल, परंतु कोणाच्या तरी ताब्यांत असण्याचा ह्मणजे आधीनतेचा गुण सर्व संपत्तीमध्यें अवश्यमेव असलाच पाहिजे.*

*या संपत्तीतल्या शेवटच्या गुणाचा निर्देश इंग्रज ग्रंथकर्त्यांनीं केलेला नाहीं हें

वरील विवेचनावरून संपत्ति, धन किंवा अर्थ म्हणून जेवढी जेवढी वस्तु आहे ती पृथकता, उपयुक्तता, दुर्मिळता व आधीनता या गुणचतुष्टयानें आन्वित असलीच पाहिजे. या गुणचतुष्टयापासूनच दुसरे गुण निष्पन्न होतात. असें संपत्ति ही मोलवान वस्तू असते किंवा ती विकतां अगर खरेदी देतां येते म्हण- जे तिला विनिमयमोल असतें. संपत्तीचा हा गुण प्राथमिक नाहीं. एखादा पदार्थ

---

खरें आहे तसेंच खासगी मालमत्तेची कल्पना ही कायदेशास्त्राची कल्पना आहे. तिचा संपत्तीच्या कल्पनेशीं कांहीं संबंध नाहीं, असें विधान प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ सेलिगमन यानें केलें आहे. तरी पण संपत्तीच्या कल्पनेंत खासगी मालकीची कल्पना अन्तर्भूत होतेच होते असें या लेखकाचें मत आहे. मालमत्तेची कल्प- ना कायदेशास्त्रांत प्रमुख आहे हें सेलिगमनचें म्हणणें कांहीं खोटें नाहीं. पण ही कल्पना कायदेशास्त्रांत प्रधान आहे म्हणून त्याचा संपत्तीच्या कल्पनेंत अन्तर्भाव होऊं शकत नाहीं असें मात्र नाहीं. अर्वाचीन अर्थशास्त्रज्ञ संपत्ति शब्दाची व्याख्या ठरविण्याचा प्रयत्न करीत असतांना नकळत ही मालकीची कल्पना संपत्तींत असते असें गृहीत धरतात असें, सहज वाचतांना दृष्टोत्पत्तीस आलेल्या, खालील उताऱ्यावरून दिसून येईल.

"In a thinly settled community where springs and streams are abundant, water is *free* to all. No question can arise as to its ownership or as to the mode in which the community should deal with it. No one can gain advantage by taking possession of part of it or devoting labour to procure it."

— Principles of Economies
by F. W. Taussig.

"There are a great many things in the world about us to which we are economically indifferent, although they are absolutely necessary for our existence we do not care to own or possess them exclusively, for the sole reason that they are so abundant that no one needs to give himself any concern about getting them."

The distribution of wealth
by T. N. Carver.

मनुष्याची वासना तृप्त करणारा असला, तो दुर्मिळ असला, तो मनुष्यापासून पृथक् असला व तो कोणाच्या तरी मालकीचा असला म्हणजे तो मिळविण्याकरितां मनुष्य कांहीं स्वतः श्रम तरी करील किंवा तो पदार्थ दुसऱ्यानें श्रमानें मिळविला असल्यास त्याच्या मोबदला कांहीं तरी देण्यास म्हणजे त्या पदार्थास विनिमयमोल देऊन घेण्यास तयार होईल.

तेव्हां संपत्ति किंवा धन याची खालीं दिलेली व्याख्या ठरते. मनुष्यापासून जो पृथक् असतो, जो थोड्या फार अंशानें दुर्मिळ असतो व जो एखाद्याच्या खासगी मालकीचा झालेला असतो असा मानवी वासना तृप्त करणारा पदार्थ म्हणजे संपत्ति होय.

आतां जरी संपत्तीची वरील गुणवाचक कल्पना एकच असली तरी समाजाच्या निरनिराळ्या परिस्थितीप्रमाणें संपत्ति या सदरांत मोडणाऱ्या वस्तू मात्र फार भिन्न भिन्न असतात. समाजाच्या बाल्यावस्थेंत मनुष्याच्या गरजा किंवा वासना फारच अल्प असतात व त्याच्या आयुष्यक्रमांत व उत्क्रांतितत्त्वाप्रमाणें त्याच्या खालच्या वर्गाचे जे पशु त्यांच्या आयुष्यक्रमांत फारसें अंतर नसतें. या समाजाच्या स्थितीला समाजशास्त्रकार मृगयावृत्ति म्हणतात. या स्थितीमध्यें मनुष्य शिकार करून आपली भूक भागवितो व झाडाच्या ढोलींत राहतो. या स्थितींत संपत्तीची वाढ शक्यच नसते. याच्या पुढची पायरी म्हणजे गोपालवृत्ति होय. यामध्यें लोकांची स्थायिक अशी कोठेंच वसति नसते. त्यांची गुरेंढोरें व शेळ्यामेंढ्या यांच्यावर उपजीविका चालते व जेथें जेथें नवीं नवीं कुरणें सांपडतात तेथें तेथें लोक आपली राहण्याची जागा बदलीत असतात. या स्थितीमध्यें गुरेंढोरें, शेळ्यामेंढ्या, त्यांचें दूधदुभतें व लोंकरकातडीं हेच संपत्तीचे जिन्नस असतात. ज्याच्याजवळ हीं पुष्कळ असतात तो श्रीमंत अगर सधन समजला जातो. या वृत्तीचा निदर्शक संस्कृतांतील दुहितृ हा शब्द आहे. दूध काढणें हें त्या काळीं मुलीचें काम असावें व म्हणूनच दुहिता–दूध काढणारी–या शब्दाचा पुढें मुलगी असा अर्थ झाला असावा. याच्या पुढील समाजाची पायरी म्हणजे कृषिवृत्ति होय: यामध्यें समाजांतील लोक एका प्रदेशांत स्थायिक होतात व तेथें शेतकीवर उपजीविका करून राहतात. या समाजाच्या पायरीमध्यें समाजाच्या पुष्कळ गरजा वाढलेल्या असतात; व त्या त्या गरजा भागविण्याकरितां पुष्कळ

पदार्थ तयार केले जातात. तरी पण या पायरीवर समाज असतांना समाजांत वासनांची वाढ फार झालेली नसते; परंतु याचे पुढील पायरी जी उद्योगवृत्ति तो समाजाच्या औद्योगिक पूर्ण वाढीचा काळ होय. यामध्यें समाजाच्या वासनांची पुष्कळ वाढ झालेली असते, व ती ती वासना तृप्त करण्याकरितां हजारों धंदे निर्माण झालेले असतात; व यामुळें नानातऱ्हेची संपत्ति देशांत निर्माण होऊं लागते.

याप्रमाणें मृगयावृत्ति, गोपालवृत्ति, कृषिवृत्ति व उद्योगवृत्ति अशा समाजाच्या चार अवस्था समाजशास्त्रज्ञ मानतात. समाजाची औद्योगिक प्रगति या क्रमानें झालेली दिसून येते व सुधारलेलीं युरोपांतील राष्ट्रें हीं हल्लीं शेवटच्या अवस्थेप्रत येऊन पोंचलेली असून त्यांची औद्योगिक बाबतींत सारखी प्रगति चाललेली आहे. युरोपांतील राष्ट्रें उद्योगवृत्तीच्या पूर्वींच्या सर्व वृत्तींमधून बाहेर आलेलीं आहेत.

हिंदुस्थानच्या पुराणप्रियतेमुळें म्हणा किंवा हिंदुस्थानांतील हिंदूंच्या जातिभेदानें म्हणा किंवा हिंदुस्थानच्या विस्तारामुळें म्हणा, परंतु हिंदुस्थानदेशाचा हा एक विशेष आहे कीं, वर निर्दिष्ट केलेल्या व युरोपांत एकामागून एक झालेल्या समाजाच्या निरनिराळ्या अवस्था या येथें एकसमयावच्छेदेंकरून प्रत्यक्षपणें पहावयास सांपडतात. हिंदुस्थानामध्यें अनादि कालापासून मृगयावृत्तीनें राहणाऱ्या जाती आहेत. अर्थात् या जाती समाजाच्या पहिल्या अवस्थेपुढें आजतागाईत गेलेल्या नाहींत. अशा जाती म्हणजे हिंदुस्थानच्या निरनिराळ्या डोंगराळ प्रदेशांत राहणाऱ्या कातवडी, भिल्ल वगैरेसारख्या, आर्यलोक येथें येण्यापूर्वींच्या मूळ रहिवाशांच्या जाती होत. या जातींचें अजूनही मुख्य उपजीविकेचें साधन म्हणजे शिकार व रानांत अनायासें सांपडणारीं फळेंमुळें होत. यांचीं शिकारीचीं हत्यारें म्हणजे तीरकमठा व गोफण हीं होत. या जाती काटक्याकुटक्यांच्या केलेल्या झोंपड्यांत राहतात. या लोकांना इंग्रजसरकारनें फुकट जमिनी देऊन शेतकी शिकविण्याचा प्रयत्न चालविला आहे व खानदेशासारख्या कांहीं ठिकाणीं तो थोडाफार यशस्वी होत चालला आहे; परंतु या जातीच्या स्वाभाविक आलस्यामुळें त्यांना औद्योगिक प्रगतीच्या वरच्या अवस्थेप्रत आणणें हें काम बरेंच कठीण असतें. वंशपरंपरेनें गोपालवृत्तींत राहणाऱ्या जातीही हिंदुस्थानांत पुष्कळ आहेत. युरोपामध्यें जीप्सी म्हणून जे गोपालवृत्तीनें राहणारे लोक होते तेही आशियांतीलच किंवा कदाचित् हिंदुस्थानांतून गेलेले असतील.

हिंदुस्थानांत वडारी, वैदू, धनगर वगैरे जाती अजून गोपालवृत्ति आहेत. या जातींना कायमचीं घरें करून राहणें आवडत नाहीं; गुरेंढोरें बाळगावीं, शेळ्यामेंढ्या पाळाव्या व आपआपल्या गुरांच्या सोईप्रमाणें व काम मिळेल त्याप्रमाणें प्रांतोप्रांतीं हिंडत राहावें हाच यांचा सतत क्रम. हिंदुस्थानांतील बहुजनसमाज अजून कृषिवृत्तींतच आहे. हिंदुस्थानांत शेंकडा ७५ लोक शेतकरी आहेत. या बाबतींत हिंदुस्थानाला ब्रिटिश अंमलाखालीं थोडेंथोडें औद्योगिक स्वरूप येत चाललें आहे खरें; तरी पण प्रमुखत्वेंकरून हिंदुस्थान अजूनही कृषिवृत्ति देश म्हणण्यास हरकत नाहीं. ब्रिटिश अंमलापासून व इंग्रजी शिक्षणानें लोकांच्या गरजा वाढत आहेत, अभिरुचि बदलत चालली आहे, संपत्तीचा उपभोग घेण्याची प्रवृत्ति होत आहे, तसेंच उद्योगधंद्यांचीं साधनें वाढत आहेत, यामुळें हिंदुस्थानांतील कांहीं शहरें उद्योगधंद्यांचीं आगरें बनूं लागलीं आहेत. अशा शहरांमधील एखाद्या लक्ष्मीपुत्राच्या राजवाड्यासारख्या सुंदर बंगल्यांत व कातवड्याच्या झोंपडींत जमीनअस्मानाचें अंतर दिसून येतें व यावरून मृगयावृत्ति व उद्योगवृत्ति या दोन अवस्थांमधल्या राहणींतील फरक दिसून येतो.

## भाग चवथा.

## अर्थशास्त्राचे विभाग.

आमच्या प्रास्ताविक पुस्तकाचा हा शेवटला भाग होय. यामध्यें या शास्त्राचे सामान्यतः कोणकोणते भाग पाडले जातात व आह्मीं कोणते पाडले आहेत, व कोणत्या क्रमानें आह्मी सर्व विषयांचें विवेचन करणार आहों, याचें थोडेंसें शब्दचित्र रेखाटून हें प्रास्ताविक पुस्तक संपविण्याचा विचार आहे.

पहिल्या प्रास्ताविक पुस्तकाचा हेतु व विषय हा आतांपर्यंतच्या विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत आला असेलच. ज्या शास्त्राचें विवेचन या ग्रंथांत करावयाचें योजिलें आहे, त्याची पूर्वपीठिका, त्याची व्याख्या व त्या शास्त्राचा विषय जी संपत्ति तिचें शास्त्रीय लक्षण व आतां त्या शास्त्रांतील विवेचनाच्या सोईकरतां केलेल्या पुस्तकांचें स्पष्टीकरण इतका भाग या प्रस्ताविक पुस्तकांत आणला आहे.

या ग्रंथाच्या दुसऱ्या पुस्तकांत संपत्तीच्या उत्पत्तीच्या कारणांचा विचार करावयाचा आहे. तिसऱ्या पुस्तकांत संपत्तीची वांटणी व तिचे सर्व नियम यांचा व तत्संबंधीं सर्व प्रश्नांचा ऊहापोह केला जाईल. चवथ्या पुस्तकांत संपत्तीची अदलाबदल अगर विनिमय यासंबंधीं विवेचन करावयाचें आहे व अदलाबदलीचें साधन जो पैसा त्याबद्दलच्या सर्व प्रश्नांचा विचार करावयाचा आहे. जरी विवेचनाच्या सोईकरतां उत्पत्ति, वांटणी व विनिमय असे अर्थशास्त्राचे तीन पृथक् भाग करण्याचा अर्थशास्त्रकारांचा संप्रदाय आहे, तरी पण हे भाग वस्तुतः पृथक् नसून ते एकमेकांशीं संलग्न झालेले आहेत. इतकेंच नव्हे तर ते परस्परावलंबी आहेत याचें मागें दिग्दर्शन केलेंच आहे. संपत्तीची उत्पत्ती कशी होते याचा विचार करतांना आपल्याला असें दाखवयाचें आहे कीं, राष्ट्रीय संपत्तीच्या उत्पादनांत समाजांतील निरनिराळ्या वर्गांचें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष साहाय्य लागतें व अप्रत्यक्षपणें किंवा प्रत्यक्षपणें त्यांचे श्रम कारणीभूत होतात. आतां या सर्व वर्गांच्या एकवटलेल्या श्रमानें उत्पन्न झालेल्या संपत्तीमधून प्रत्येकाच्या श्रमाच्या मोबदल्याबद्दल त्याला वांटा मिळाला पाहिजे. ह्मणजे राष्ट्रीय संपत्तीच्या उत्पादनाच्या प्रश्नापासून साहजिकपणें संपत्तीच्या वांटणीचा प्रश्नही निष्पन्न होतो. तसेंच कांहीं एक प्रकारची वांटणी होत असली ह्मणजे त्या पद्धतीचा परिणाम उत्पत्तीवर होतो. उदाहरणार्थ, आयर्लंडमधल्या शेतकीच्या उत्पन्नाच्या असमतेच्या वांटणीमुळें आयरिश शेतकऱ्यांना शेतामध्यें जास्त उत्पन्न करण्याची बुद्धि होणें अशक्य होतें; यामुळें आयरिश शेतीपासून फार कमी उत्पन्न येत असे. तेव्हां वांटणी व उत्पत्ति हे भाग परस्परावलंबी आहेत हें उघड झालें. तसेंच उत्पत्ति व विनिमय यांचा निकट संबंध आहे. संपत्तीची वाढ होण्याचें मोठें साधन ह्मणजे श्रमविभागाचें तत्त्व होय. परंतु श्रमविभागाचें तत्त्व जितक्या प्रमाणानें समाजांत अस्तित्वांत येईल तितक्या प्रमाणानें विनिमयही वाढलाच पाहिजे. कारण, जसजसा एक मनुष्य आपलें श्रमसर्वस्व एकाच धंद्यांत किंवा एका धंद्याच्या एका विशिष्ट क्रियेंत घालवितो तसतसें त्याच्या सर्व गरजा भागविण्याकरतां त्याला दुसऱ्याच्या श्रमाकडे पाहावें लागतें. ह्मणजे असा मनुष्य आपल्या श्रमाच्या फलाचा उपभोग दुसऱ्याच्या श्रमाच्या फलाच्या अदलाबदलीनें घेतो.

या ग्रंथाच्या पांचव्या पुस्तकांत सरकारी उत्पन्नाची मीमांसा व विशेषतः

करांच्या तत्त्वाचा विचार व तत्संबंधी प्रश्न यांचा विचार करावयाचा आहे. सकृ-दर्शनीं या भागाशीं अर्थशास्त्राचा फारसा संबंध नाहीं असें वाटण्याचा संभव आहे. विशेषतः अलीकडे राष्ट्रीय जमाखर्च या नांवाचें नवीनच शास्त्र बनूं लाग-ल्यापासून तर अर्थशास्त्रांत हा भाग आगंतुक आलेला आहे असें भासेल. परंतु अर्थशास्त्राच्या शास्त्रीय व्याख्येकडे थोडें लक्ष दिल्यास या शंकेचें निरसन होईल. राष्ट्रीय संपत्तीच्या स्वरूपाचा व तिच्या कारणांचा विचार करणारें शास्त्र तें अर्थ-शास्त्र, अशी आपण अर्थशास्त्राची व्याख्या केली आहे. परंतु राष्ट्राला दोन अंगें आहेत. एक राष्ट्रांतले सर्व लोक व दुसरें त्यांतलें सरकार. हीं दोन्ही अंगें अगदीं परस्परसंलग्न आहेत. राष्ट्रांतील लोकांखेरीज सरकारचें अस्तित्व संभवत नाहीं व कोणत्या तरी सरकाराखेरीज राष्ट्रत्वही संभवत नाहीं. तेव्हां राष्ट्रीय संपत्ती-चेही दोन भाग होतात. एक राष्ट्रांतील सर्व लोकांची संपत्ती व दुसरी राष्ट्रांतील सरकारची संपत्ती. केव्हां केव्हां सरकारची कांहीं संपत्ती किंवा उत्पन्न राष्ट्रांतील लोकांच्या संपत्तीपासून किंवा उत्पन्नापासून भिन्न असेल. उदाहरणार्थ, सरकारची जमीन असेल किंवा कारखाने असतील किंवा खाणी असतील. व केव्हां केव्हां सरकारचें उत्पन्न राष्ट्रांतील लोकांच्या उत्पन्नाचा एक वांटा असेल. कोणीकडूनही सरकारच्या उत्पन्नाचा विचार राष्ट्रीय संपत्तीची मीमांसा करणाऱ्या शास्त्राच्या मर्यादेबाहेरचा नाहीं हें उघड दिसून येईल. तेव्हां सर्व अर्थशास्त्रकारांची करांचीं तत्त्वें यांचें विवेचन करण्याची जी रूढी आहे, तिचें युक्तीनें समर्थन करतां येण्यासारखें आहे. म्हणून आम्हीं आमच्या ग्रंथाच्या पांचव्या पुस्तकांत सरकारचें उत्पन्न व करांचीं तत्त्वें यांचा ऊहापोह करणार आहों.

या ग्रंथाच्या सहाव्या पुस्तकांत अर्थशास्त्राचीं कोणतीं तत्त्वें सध्यां हिंदुस्था-नाला लागू करतां येण्यासारखीं आहेत हें ठरवावयाचें आहे. परंतु हें ठरविण्या-करतां हिंदुस्थानच्या पूर्वीच्या औद्योगिक स्थितीचें थोडेंसें पर्यालोचन केलें पाहिजे हें पुस्तक केवळ शास्त्रीय नाहीं, हें उघड आहे. परंतु यामध्यें शास्त्र व व्यवहार यांचा मिलाफ करण्याचा प्रयत्न केला आहे; व शास्त्रीय तत्त्वें फलद्रूप होण्यास असा मिलाफ अवश्यच असतो. वर दिलेली ही या ग्रंथाची निव्वळ बाह्य आकृति झाली. आतां ही आकृती पूर्णपणें भरून सदरहू विषयाचें हुबेहूब चित्र वाचकांच्या पुढें मांडण्याचें काम पुढील पुस्तकाचें आहे.

# अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें.

## पुस्तक दुसरें.

### भाग पहिला.

### सामान्य विचार.

प्रास्ताविक पुस्तकाच्या शेवटल्या भागांत सांगितल्याप्रमाणें या पुस्तकांत राष्ट्रीय संपत्तीच्या उत्पत्तीच्या सर्व प्रश्नांचा विचार करावयाचा आहे. यांतला प्रमुख व अत्यंत वादग्रस्त प्रश्न संपत्तीच्या उत्पत्तीच्या कारणांचा होय. कां कीं, समाजांत उत्पन्न होणारी संपत्ती ही कितीं तरी बहुविध असते. तेव्हां या अशा बहुविध पदार्थांना कांहीं एक सामान्य कारण-समुच्चय असेल हें सकृद्दर्शनीं खरेंच वाटत नाहीं. ज्याप्रमाणें संपत्ती या नांवाखालीं मोडणाऱ्या हजारों वस्तूं-मधील सामान्य गुण शोधून काढणें हें बरेंच कठीण काम आहे; त्याप्रमाणें संप-त्तीचीं कारणें शोधून काढणें हें तितकेंच किंबहुना जास्त कठीण काम आहे; व ज्याप्रमाणें संपत्तीचा अर्थ काय असें विचारल्याबरोबर सामान्य मनुष्य जमीन-जुमला, कपडालत्ता, पैसाअडका, ही संपत्ती असें चटकन् उत्तर देतो, त्याप्रमाणें संपत्तीचीं कारणें काय असें विचारल्याबरोबर सामान्य मनुष्य असें उत्तर देईल कीं, देशांतील निरनिराळे धंदे व कला हीं संपत्तीचीं कारणें आहेत. तेव्हां या सर्व कला व हे सर्व धंदे अर्थशास्त्रांतील संपत्तीच्या उत्पत्तीच्या कारणांमध्यें येतात किंवा काय? नाहीं. या कला व हे धंदे विशिष्ट स्वरूपाच्या संपत्तीचीं कारणें आहेत. कापड कसें उत्पन्न करावें हें विणकला सांगेल. परंतु अशा विशिष्ट कलांची माहिती देणें हें अर्थशास्त्राचें काम नाहीं, व असल्या प्रकारच्या विशिष्ट कारणांचा या पुस्तकांत आपल्याला विचार करावयाचा नाहीं, व असा विचार करणें शास्त्राला शक्यही नाहीं. अर्थशास्त्र संपत्तीच्या विशिष्ट स्वरूपाकडे लक्ष देत नाहीं. कापड

कसें होतें, धान्य कसें पिकतें, काचेचें सामान कसें करतात किंवा पितळेचीं भांडीं कशीं तयार होतात, इत्यादि प्रश्नांचें उत्तर अर्थशास्त्र देऊं शकणार नाहीं. विशिष्ट संपत्ती कोणत्याही स्वरूपाची असो, परंतु तिच्यांत कांहीं एक सामान्य गुण असतात. अशी सामान्य स्वरूपाची संपत्ती देशांतील कोणत्याही परिस्थितींत समाजाच्या कोणत्या संस्थांनीं व समाजाच्या कोणत्या स्वरूपामध्यें व कोणत्या सामाजिक उपायांनीं उत्पन्न होऊं शकते हें आपल्याला येथें पाहावयाचें आहे. अर्थात् संपत्तीच्या सामाजिक व सामान्य कारणांचा या पुस्तकांत आपल्याला विचार करावयाचा आहे. हीं सामाजिक व सामान्य कारणें किती व कोणतीं असतात, त्यांचें यथार्थ स्वरूप काय, त्या कारणांच्या कोणत्याही विशिष्ट गुणांवर व परिस्थितीवर संपत्तीची वाढ अवलंबून आहे; तसेंच संपत्ति वाढविणाऱ्या या कारणांची स्वतःची वाढ कोणत्या नियमानुसार होते, इत्यादि पुष्कळ प्रश्नांचा येथें सविस्तर ऊहापोह करावयाचा आहे.

वर सांगितलेंच आहे कीं, संपत्तीची कारणमीमांसा बरीच बिकट आहे. कारण ज्या मानानें एखादें कार्य हें संकीर्ण व बहुविध स्वरूपाचें असेल त्या मानानेंच त्यांचीं कारणें संकीर्ण व बहुविध असतात. जसजसें संपत्तीच्या संकीर्ण स्वरूपाचें यथार्थ ज्ञान लोकांस होऊं लागतें तसतशीं त्याचीं बहुविध कारणेंही लोकांच्या नजरेस येऊं लागतात. अभिमत पंथांत प्रतिपादन केलेल्या कारणसमुच्चयाचा शोध अशाच तऱ्हेनें लागला. उदीम पंथांचें लक्ष एका कारणाकडे गेलें व संपत्तीच्या कारणांचें सारसर्वस्व त्यांत आहे असें त्यांनीं प्रतिपादन केलें. पैसा हें संपत्तीचें स्वरूप व व्यापार हें संपत्तीच्या उत्पत्तीचें साधन हें त्यांच्या मतांचें सार. ह्मणजे उदीमपंथानें पैसा अगर भांडवल याचें संपत्तीच्या वाढीचे कामीं फार महत्व आहे असें शोधून काढलें. परंतु हें मत एकदेशी असल्यामुळें जरी त्यांत सत्याचा अंश होता तरी त्या मताच्या अतिशयोक्तीनें तें मत खोटें असें वाटूं लागलें, व यामुळें उदीमपंथाच्या प्रतिस्पर्धी पंथानें शेतकी अगर जमीन हें संपत्तीच्या कारणांचें सारसर्वस्व असें आपलें मत प्रस्थापित केलें. शेतकी हेंच संपत्तीच्या वाढीचें एकमेवाद्वितीय कारण आहे. व्यापार, भांडवल व कारखाने हे उपयोगी असले तरी अनुत्पादक आहेत. परंतु संपत्तीच्या उत्पत्तीची ही उपपत्ति उदीमपंथाच्या

उपपत्तीप्रमाणें एकदेशीयच होती. उदीमपंथ व निसर्गपंथ यांच्या उपपत्तीमध्यें सत्याचा अंश नव्हता असें नाहीं. परंतु प्रत्येक पंथानें आपली उपपत्तिच -सर्वस्वी खरी व दुसऱ्याची उपपत्ति सर्वस्वी खोटी अशा तऱ्हेचा एकदेशीय कोटिक्रम लढविल्यामुळें त्या उपपत्ति खोट्या व अतएव त्याज्य आहेत असें लोकांस वाटूं लागलें. परंतु अभिमत पंथाचा जनक ॲडाम स्मिथ यानें दोन्ही मतांतील सत्याचा अंश कबूल केला व शिवाय संपत्तीच्या उत्पत्तीचें एक उपेक्षित कारण शोधून काढलें. तें कारण मानवी श्रम व श्रमविभागाचें तत्त्व हें होय. तेव्हांपासूनच अभिमत पंथांत व इंग्रजांच्या अर्थशास्त्रांतील बहुतेक पुस्तकांमध्यें जमीन, श्रम व भांडवल अशीं तीन संपत्तीचीं कारणें म्हणून सांगण्याचा सांप्रदाय पडला. परंतु पुढें या तीन कारणांच्या स्वरूपाबद्दल पुष्कळ वादविवाद वाढला व जेव्हां अभिमत पंथाच्या पुष्कळ मतांवर आक्षेप येऊं लागले, तेव्हां या कारणसमुच्चयाच्या पूर्णतेबद्दलही शंका उत्पन्न होऊं लागल्या; व आणखी कांहीं उपेक्षित कारणें दुसऱ्या ग्रंथकारांनीं पुढें आणलीं. हीं कारणें पूर्वीच्या ग्रंथाकारांनीं प्रमुखत्त्वेंकरून निर्दिष्ट केलीं नसलीं तरी तीं कारणें त्यांनीं गृहीत धरली होतीं. परंतु त्यांचा स्पष्ट उच्चार न झाल्यामुळें व अतएव तीं सर्वदा डोळ्यापुढें न राहिल्यामुळें अभिमत अर्थशास्त्रकारांच्या विचारसरणींत कित्येक चुका झाल्या व या चुका दाखवितांना या कारणांचा प्रमुखत्वेंकरून निर्देश कांहीं अर्वाचीन ग्रंथकारांनीं केला. याप्रमाणें अभिमत पंथाच्या आक्षेपकांनीं संपत्तीच्या कारणांत भर घातली. परंतु प्रास्ताविक पुस्तकांत सांगितल्याप्रमाणें कांहीं ग्रंथकारांनीं आपण शोधून काढलेलीं कारणें म्हणजे संपत्तीच्या उत्पत्तीच्या मीमांसेचें खरें रहस्य व अभिमत पंथाची कारणमीमांसा ही खोटी व कुचकामाची अशा प्रकारची टीका केली. परंतु ही टीकाही कांहीं अंशीं एककल्लीच आहे असें खालील विवेचनावरून दिसेल.

या सर्व वादविवादाकडे जरा बारकाईनें पाहिलें तर असें दिसून येईल कीं, हा वादविवाद खरोखरी शुष्क आहे. आजपर्यंत संपत्तीच्या उत्पत्तीसंबंधीं ज्या ज्या उपपत्ति पुढें आल्या आहेत त्या वास्तविक एकमेकींना विरोधी नाहींत तर तर त्या एकमेकींच्या पूरक आहेत. म्हणजे प्रत्येक उपपत्तीमध्यें संपत्तीच्या एकेक कारणाचा निर्देश केलेला आहे.

तेव्हां या वादविवादांतील बराच घोटाळा व गोंधळ संपत्तीच्या कारणांचें वर्गीकरण केल्यापासून नाहींसा होणार आहे असें आह्मांस वाटतें, व ह्मणून आह्मीं संपत्तीच्या कारणांचे दोन पोटभेद खालील विवेचनांत केले आहेत.

अर्वाचीन शास्त्रीयदृष्ट्या एखाद्या कार्याच्या उपपत्तीला ज्या ज्या गोष्टी अवश्य असतील ह्मणजे ज्यांचेवांचून कार्योत्पत्ति होणार नाहीं, त्या सर्वांचा एकाच 'कारण' या संज्ञेमध्यें अंतर्भाव होतो हें खरें आहे; तरी पण कांहीं कांहीं शास्त्रांच्या सोयीकरितां कारणांचें वर्गीकरण करण्याची पद्धति आहे. उदाहरणार्थ, वैद्यकशास्त्रांत रोगाचीं प्रत्यक्ष कारणें व रोगाकडे कल असणारीं कारणें असा भेद करतात. तसेंच पुष्कळ ठिकाणीं अप्रत्यक्ष कारणें व प्रत्यक्ष कारणें असा भेद करतात; परंतु हा भेद शास्त्राला धरून नाहीं. कारण अप्रत्यक्ष कारणें ह्मणजे कारणांचीं कारणें होत. तरी पण एखाद्या विषयाच्या सोयीकरितां असा भेद करण्यास हरकत नाहीं. या न्यायानें येथें अर्थशास्त्राच्या विवेचनाच्या सोयीकरितां कारणांचे अमूर्त व मूर्त असे दोन वर्ग केले आहेत. मूर्त कारणें हीं चटकन् ध्यानांत येणारीं कारणें होत. कारण तीं जडस्वरूपी असल्यामुळें वरवर पहाणाराच्याही तेव्हांच लक्षांत येतात. अमूर्त कारणें हीं जडस्वरूपी नसल्यानें तितकीं चटदिशीं लक्षांत येत नाहींत. मूर्त कारणें हीं दृग्गोचर असतात, तर अमूर्त कारणें हीं दृग्गोचर नसतात. ज्याप्रमाणें वृक्षाचा वरचा भाग स्पष्ट दिसतो, परंतु मुळें जमिनींत खोल असल्यामुळें सहज दिसत नाहींत; त्याप्रमाणें अमूर्त व मूर्त कारणांचाही संबंध आहे. या भेदाचें स्पष्टीकरण एक दोन दाखल्यांवरून सहज होईल. वृक्षाच्या वाढीचीं मूर्त कारणें ह्मणजे पाणी, खत व माती हीं होत. हीं सहज दृश्य असून तेव्हांच ध्यानांत येतात. या वाढीचीं अमूर्त कारणें ह्मणजे हवा व उष्णता हीं होत. हीं पहिल्याइतकीं लौकर ध्यानांत येत नाहींत. ह्मणूनच या अमूर्त कारणांचा शोध मूर्त कारणांचे मागून लागला आहे. विस्तवाचें मूर्त कारण जळण होय तर अमूर्त कारण हवा होय, पाणी वर काढण्याच्या पंपाच्या यंत्रामध्यें पाणी वर येतें तें मनुष्याच्या शक्तीनें किंवा एंजिनच्या शक्तीनें येतें. या ठिकाणीं मानवी शक्ति व एंजिनाची शक्ति हें त्याचें मूर्त कारण, तर हवेचा दाब हें त्याचें अमूर्त कारण होय. आपण दगड हातांतून फेंकला ह्मणजे तो जमिनीवर आपटतो. याचें मूर्त कारण आपण त्यास दिलेली गति होय, पण

त्याचें अमूर्त कारण गुरुत्वाकर्षण होय. एखाद्या कार्याला अमूर्त कारणें मूर्त कारणांइतकींच अवश्यक असतात. अमूर्त व मूर्त यांमध्यें अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष कारणें असा परंपरेचा संबंध नसतो. दोन्ही कारणें त्या कार्याचीं प्रत्यक्ष कारणेंच असतात. परंतु अमूर्त कारणें त्याच कार्याला अनन्यसामान्य असतात असें मात्र नाहीं. त्या कारणांपासून आणखीही पुष्कळ कार्यें होत असतात. तेव्हां अमूर्त व मूर्त यांमध्यें सामान्य-विशेष असा संबंध असतो असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तेव्हां प्रथमतः संपत्तीच्या उत्पत्तीचीं अमूर्त कारणें कोणतीं याचा विचार पुढील भागांत करूं.

---

# भाग दुसरा.

## संपत्तीचीं अमूर्त कारणें.

देशांतील संपत्तीची उत्पत्ति व वाढ करणारें पहिलें अमूर्त कारण मालमत्तेचा व जीविताचा सुरक्षितपणा होय. संपत्तीची व्याख्या करतांना संपत्ति ही कोणाच्या तरी मालकीची असली पाहिजे, अर्थात् तिच्यामध्यें अधीनता हा गुण असला पाहिजे हें मागें सांगितलेंच आहे. आतां या संपत्तीच्या गुणाचा व संपत्तीच्या पहिल्या अमूर्त कारणाचा निकट संबंध आहे. कारण देशामध्यें खाजगी मालकीचा हक्क प्रस्थापित होऊन त्याला स्थैर्य आल्याखेरीज खाजगी मालकी हा गुण संपत्तींत येऊं शकणार नाहीं. अर्थात् मालमत्तेचा व जीविताचा सुरक्षितपणा हा मालकी–हक्क–प्रस्थापनेचा पायाच आहे. हा सुरक्षितपणा देशांत स्थापित करून तो सतत टिकविणें हें सुधारलेल्या राज्यपद्धतीचें पहिलें प्रमुख कर्तव्यकर्म समजलें जातें. ज्यामध्यें समाजव्यवस्था व सुयंत्रित राज्यव्यवस्था सुरू झालेली नसतें त्या अगदीं रानटी स्थितीमध्यें "बळी तो कान पिळी" हा न्याय असतो. अशा स्थितींत खाजगी मालकीहक्क मानला जात नाहीं, व यामुळें अशा स्थितींत संपत्तीची वाढ होऊं शकत नाहीं; कारण आपल्या श्रमाचें फळ आपल्याला उपभोगण्यास मिळेल अशी खात्री नसते.

आज आपण मोठे श्रम करून एखादी वस्तु तयार केली तर उद्यां एखादा शिरजोर माणूस येऊन ती वस्तु आपल्यापासून हिरावून नेईल अशी भीति सर्वांस असते. यामुळें संपत्ति उत्पन्न करण्याचे श्रम घेण्यास कोणीही धजत नाहीं. वरील विवेचनावरून या अमूर्त कारणाचें स्वरूप ध्यानांत येईल. मालमत्तेचा व जीविताचा सुरक्षितपणा हा संपत्तीच्या वाढीचा मूळ पाया आहे, व म्हणून प्रत्येक सुधारलेलें सरकार हा सुरक्षितपणा उत्पन्न करणें व तो नेहमीं राखणें हें आपलें आद्य कर्तव्यकर्म समजतें. देशांतील प्रचंड सैन्यें व आरमारें, देशांतील पोलिसखातें व न्यायखातें, देशांतलीं दळणवळणाचीं सुधारलेलीं साधनें वगैरे सर्व गोष्टींनीं हा सुरक्षितपणा स्थापन केला जातो व राखला जातो. कारण हा सुरक्षितपणा सार्वत्रिक होण्यास देशांत नेहमीं शांतता पाहिजे, तेथें लढाया होतां कामा नयेत; आपसांत मारामाऱ्या व दंगेधोपे होतां कामा नयेत; व्यक्तीच्या हक्काचें उत्तम तऱ्हेनें संरक्षण झालें पाहिजे; व्यक्तीव्यक्तीमध्यें न्याय उत्तम मिळाला पाहिजे व व्यक्तीव्यक्तींमधील करारांचें उत्तम तऱ्हेनें पालन झालें पाहिजे. सारांश, देशामध्यें **कायद्याचें साम्राज्य** पाहिजे. व्यक्तीचे हक्क स्पष्टपणें निर्दिष्ट होऊन त्याप्रमाणें राज्यव्यवस्था सारखी चालली पाहिजे. अशी जेव्हां सुधारलेली राज्यपद्धति देशांत प्रचलित असेल त्याच वेळीं मालमत्तेला व जीविताला उत्तम सुरक्षितपणा आला आहे, अशी मनुष्याच्या मनाची खात्री होते व मग मनुष्याला श्रम करण्यास स्फुरण येतें व त्यामुळें संपत्तीची झपाट्यानें वाढ होते. कारण या स्थितींतच आपण केलेल्या श्रमाचें चीज होऊन आपल्याला व आपल्या मुलाबाळांना आपल्या श्रमाचीं फळें उपभोगण्यास सांपडतील अशी खात्री समाजांतील व्यक्तीच्या मनांत उत्पन्न होते.

मालमत्तेचा व जीविताचा सुरक्षितपणा व संपत्तीची वाढ यांचा कार्यकारणसंबंध आहे हें जगांतील निरनिराळ्या देशांच्या इतिहासावरून सिद्ध करतां येतें व यायोगें या अमूर्त कारणाच्या सत्यतेबद्दल शंका राहात नाहीं. इतिहासांवरून आपल्याला असें दिसून येतें कीं, ज्या ज्या राज्यामध्यें हा सुरक्षितपणा उत्तम प्रकारानें प्रस्थापित झाला आहे, तेथें तेथें संपत्तीची वाढ व देशाची भरभराट झालेली आहे. जेथें जेथें हा सुरक्षितपणा प्रथमपासूनच स्थापित झाला

नाहीं, तेथें तेथें संपत्तीची वाढ होऊं शकली नाहीं. सुरक्षितपणा व संपत्तीची वाढ यांचा कार्यकारणभाव दाखविणारीं हीं अन्वयव्यतिरेकाचीं निरनिराळ्या देशांचीं उदाहरणें देतां येतात; इतकेंच नाहीं, तर आपल्याला एका देशाच्या निरनिराळ्या स्थित्यंतराचें उदाहरण देतां येतें; ह्मणजे जोंपर्यंत देशामध्यें मालमत्तेचा सुरक्षितपणा स्थापित होऊन तो टिकलेला असतो तोंपर्यंत देशाची सांपत्तिक भरभराट होत असते व ती टिकते. परंतु सुधारलेली राज्यपद्धति जाऊन हा सुरक्षितपणा नाहींसा झाल्याबरोबर सांपत्तिक भरभराटीलाही उतरती कळा लागून तो देश दारिद्र्याच्या खोल दरींत बुडतो. हा सिद्धांत प्रस्थापित करण्याकरितां आतां आपण थोडींशीं ऐतिहासिक उदाहरणें घेऊं व प्रथमतः जुन्या काळांतील मोठ्या प्रमाणावरील दोन दाखले घेऊं. पहिला रोमन पादशाहीचा व दुसरा पर्शियन पादशाहीचा.

जुन्या जगांत रोमन पादशाहीच्या इतकें चिरस्थायी असें दुसरें साम्राज्य झालें नाहीं. परंतु त्याच्या या चिरस्थायीपणाच्या मुळाशीं रोमन लोकांचा कायदा होता असें दिसून येतें. रोमन साम्राज हें कायद्याचें साम्राज होतें व या कायद्यानें व्यक्तीच्या हक्काचें उत्तम रक्षण केलें जात असे. यामुळें या साम्राज्यांत मालमत्तेला व जीविताला उत्तम तऱ्हेची सुरक्षितता आलेली असे. या व्यक्तीच्या हक्कांच्या पवित्रपणामुळें व मालमत्तेच्या सुरक्षितपणामुळेंच रोमन पादशाहीमध्यें लोक फार सुखी होते व त्या साम्राज्याची कित्येक शतकेंपर्यंत सांपत्तिक भरभराट होत होती. रोमन राज्यपद्धतीमध्यें मालमत्तेचा व जीविताचा सुरक्षितपणा किती होता व व्यक्तीच्या हक्कांचें रोमन कायदा किती उत्तम तऱ्हेनें रक्षण करीत असे हें दाखविणारी एक आख्यायिका रोमन इतिहासकार सांगत असतात. ही आख्यायिका रोमन राज्याचा जेव्हां फारसा विस्तार झालेला नव्हता तेव्हांची आहे. अशा त्या राज्याच्या बाल्यावस्थेमध्यें सुद्धां राज्यांतील व्यक्तींमध्यें रोमन कायद्याच्या अंमलानें व्यक्तीच्या हक्काबद्दल व करार पाळण्याबद्दल केवढा विश्वास उत्पन्न केला होता हें त्या आख्यायिकेवरून दिसून येतें. असा विश्वास जेव्हां सार्वत्रिक दिसून येतो तेव्हां मालमत्ता व जीवित यांचा सुरक्षितपणा पूर्णपणें स्थापन झालेला आहे, असें ह्मणतां येतें. अशा सार्वत्रिक विश्वासानें सांपत्तिकदृष्ट्या श्रम करण्याची व उद्योग करण्याची हुरूप लोकांमध्यें उत्पन्न होते. ही आख्यायिका

हानिबालच्या काळची आहे. हानिबालनें आपल्या मोठ्या सैन्यानिशीं इटालीच्या एका भागामध्यें तळ दिला होता. रोमन राज्यकर्ते त्याचा प्रतिकार करण्याच्या तयारींत होते; परंतु कोणत्या पक्षाचा जय होईल हें सांगणें कठीण होतें. अशा अनिश्चित व आणीबाणीच्या प्रसंगांत देशाचें सरकार असतांना दोन रोमन गृहस्थ ज्या जागेवर हानिबालच्या सैन्याचा तळ पडला होता त्या जागेसंबंधीं विक्रीच्या उद्योगांत गुंतलेले होते व एक गृहस्थ आपल्या मालकीची ती जमीन कांहीं किंमतीला दुसऱ्याला विकण्याचा करार करीत होता. या आख्यायिकेवरून रोमन कायद्यानें लोकांच्या खासगी व्यवहारावर केवढा परिणाम केलेला होता, हें फार चांगल्या तऱ्हेनें दिसून येतें. यामध्यें रोमन लोकांची आपल्या सरकारची सरशी होणार ही खात्री तर दिसून येते. पण याच्याहीपेक्षां जास्त महत्वाची गोष्ट ही कीं, या युद्धाचा परिणाम कांहींही झाला तरी आज जे आपण करार करीत आहोंत व आज जी आपण मालकीहक्काची अदलाबदल करीत आहोंत, त्यामध्यें रतिभरही, राज्यक्रांतीनें सुद्धां, बदल होणार नाहीं, कायदा आपले नवे संपादित हक्क पवित्र मानील अशी दृढ समजूत बहुजनसमाजामध्यें रोमन कायद्यानें उत्पन्न करून दिली होती, असें या आख्यायिकेवरून दिसून येतें.

या कायद्यांच्या अंमलामुळेंच व त्यानें उत्पन्न केलेल्या व्यक्तीच्या मालकीहक्काबद्दलच्या दृढविश्वासामुळेंच रोमन साम्राज इतकीं शतकें टिकलें व जरी कालांतरानें रानटी टयूटन लोकांच्या हल्ल्याखालीं रोमन पादशाहीचा हळू हळू ऱ्हास झाला व त्याचे जागीं नवीं राष्ट्रें निर्माण झालीं, तरी या नव्या राष्ट्रांमध्यें रोमन कायदा व त्याची न्यायपद्धति यांचा अंमल कायमच राहिला.

याच्या उलट उदाहरण म्हणजे पर्शियन साम्राज्याचें आहे. हें साम्राज्यही स्थापन झालें त्या वेळीं रोमन साम्राज्याप्रमाणें विस्तृत होतें व ज्या राजांनीं हें प्रथम स्थापन केलें त्यांचे काळीं त्या साम्राज्यांत सुयंत्रित राज्यव्यवस्था होती. म्हणूनच साम्राज्यांत सांपत्तिक भरभराटही झाली. या साम्राज्याखालीं असणारे प्रांतही फार सुपीक असून सृष्टिदेवीचे जणूं कांहीं आवडते होते. इतकी विपुल नैसर्गिक संपत्ति व सृष्टिशक्ति त्या प्रांतांत होती. परंतु अशा प्रकारच्या संपत्तीच्या वाढीस अनुकूल सर्व स्वाभाविक गोष्टी असतांना हे प्रांत हजारों वर्षें ओसाड

पडले व बहुतेक निर्जन बनले. या सांपत्तिक ऱ्हासाचें कारण पुढील राजांची अनियंत्रित सत्ता व त्याच्या योगानें लोकांना लागलेल्या वाईट संवयी होत. परंतु या सर्व गोष्टींचें पर्यवसान मालमत्तेची व जीविताची सुरक्षितता नाहींशी करण्यांत झालें. कारण या सर्व साम्राज्यांत सुयंत्रित राज्यव्यवस्था राहिली नाहीं. सरदारलोक व जमीनदार आपआपसांत तंटेबखेडे करीत; त्यांना आपल्या शेजारच्या लोकांना लुटून आपली तुमडी भरण्याची संवय लागली. या संवयीमुळें स्वतः श्रम करण्याची बुद्धि कमी झाली व इतर लोकांमध्यें मालत्तेची सुरक्षितता नाहींशी झाली. यामुळें संपत्तीचा सर्व झराच मुळीं आटून गेला व हे अत्यंत सुपीक प्रांत हालांत व दारिद्र्यांत राहणाऱ्या लोकांचे वस्तीचे प्रांत बनले. तेव्हां पर्शियन साम्राज्याच्या ताब्यांत असलेल्या प्रांताच्या सांपत्तिक अवनतीचें मूळ मालमत्तेच्या व जीविताच्या सुरक्षितपणाच्या अभावांत आहे व हा अभाव अंदाधुंदीचा व मोंगलाई राज्यपद्धतीचा परिणाम होय. कारण या हजारों वर्षें बहुतेक ओसाड बनलेल्या प्रांतांत जेथें जेथें सुयंत्रित राज्यपद्धति सुरू होऊन मालमत्तेला व जीविताला सुरक्षितता आलेली आहे तेथें तेथें पुन्हा हे भाग सांपत्तिक भरभराटीच्या मार्गाला लागलेले दृष्टोत्पत्तीस येतात.

या सिद्धांताचें समर्थक असें अर्वाचीन काळांतील उदाहरण म्हणजे आयर्लंड देशाचें आहे. त्या देशांत बहुत काळपर्यंत सुव्यवस्थित राज्यपद्धति सुरू झाली नाहीं व तेथील लोकांमध्यें लुटारूपणाची प्रवृत्ति फार काळ राहिली. हा देश रोमन लोकांच्या ताब्यांत कधींच न गेल्यामुळें तेथें रोमन कायद्याची पद्धति युरोपच्या इतर प्रांतांपेक्षां फार मागाहून सुरू झाली. खरोखरी आयर्लंडांत इंग्रजांनीं रोमन-कायदे नेले. आयरिश लोकांमध्यें आपआपसांत तंटे करण्याची प्रवृत्ति फार होती. तसेंच अंतःकलह व द्वेष हे फार होते. यामुळें मालमत्तेला व जीविताला विशेषसा सुरक्षितपणा आला नाहीं व म्हणून त्या देशाची सांपत्तिक स्थिति सुधारली नाहीं. कारण संपत्तीच्या वाढीचा झराच मुळीं फार कालपर्यंत दूषित राहिला.

हिंदुस्थानचा संगतवार असा इतिहास उपलब्ध नसल्यामुळें इकडील उदाहरणें फारशीं देतां यावयाचीं नाहींत. तरी पण मालमत्तेचा व जीविताचा सुरक्षितपणा व सांपत्तिक भरभराट यांचा कार्यकारणसंबंध सिद्ध करतां येण्यासारखीं पुष्कळ

उदाहरणें देतां येतील. अयोध्याप्रांताचें एक उदाहरण आहे. हा प्रांत फार सुपीक असून कांहीं कांहीं नबाबांच्या कारकीर्दीत तो फार भरभराटींत होता. परंतु पुढील नबाबांची कारकीर्द फार जुलमी व अंदाधुंदीची झाल्यामुळें राज्यांत सुनियंत्रित राज्यपद्धति नाहींशी झाली व त्यामुळेंच त्या प्रांताची भरभराट नाहींशी होऊन तो प्रांत कांहीं कालपर्यंत उजाड पडल्यासारखा झाला. अकबराच्या कारकीर्दीमध्यें राज्यव्यवस्था फार चोख असल्यामुळें व जिकडे तिकडे उत्तम शांतता नांदत असल्यामुळें त्या कारकीर्दीत लोक सुखी होते व एकंदर देशामध्यें सुबत्ता नांदत होती. परंतु अवरंगजेबाच्या कारकीर्दीपासून अंदाधुंदीस व अंतःकलहास सुरवात झाली व अकबराच्या काळीं प्रस्थापित झालेली शांतता व त्यायोगानें उत्पन्न होणारा सुरक्षितपणा कमी झाला व त्याचा परिणाम देशांतील सांपत्तिक स्थितीवर झाल्याखेरीज राहिला नाहीं असें इतिहासावरून दिसून येतें.

संपत्तीच्या उत्पत्तीचें व वाढीचें दुसरें अमूर्त कारण म्हणजे मानवी वासना व त्यांची वाढ हें होय. मनुष्याच्या सुखाचें खरें साधन वासनांची वाढ किंवा वासनांचा छेद, हा एक नीतिशास्त्रांतील मोठा वादग्रस्त प्रश्न आहे; व सर्व देशांत दोन्ही प्रकारचीं मतें मोठमोठ्या तत्त्ववेत्त्यांनीं प्रतिपादन केलेलीं आहेत. हिंदुस्थानांत आमच्या तत्त्वज्ञानाचा बहुधा कटाक्ष वासनाछेदाकडेच दिसून येतो. 'जहीहि धनागमतृष्णाम्' हें आमच्या तत्त्वज्ञान्यांच्या उपदेशाचें पालुपद आहे. परंतु या ठिकाणीं या वादाशीं आपल्याला कांहीं एक कर्तव्य नाहीं. आपल्याला फक्त येथें अर्थशास्त्रदृष्ट्या वासनांचा विचार करावयाचा आहे. या दृष्टीनें त्यांची वाढ ही संपत्तीस व समाजाच्या आधिभौतिक सुधारणेस अत्यंत आवश्यक आहे यांत कांहींएक संदेह नाहीं. मनुष्याच्या अगदीं रानटी स्थितींत मनुष्य व पशु यांच्या वासनांत फारसें अंतर नसतें. दोघांचीही राहण्याची तऱ्हा व उपजीविकेचे उद्योग यांमध्येंही साम्य असतें. तरी पण मनुष्यामध्यें विचारशक्ति व कल्पनाशक्ति हे दोन गुण विशेष आहेत. मनुष्यस्वभावांतील हे दोन गुण संस्कृतामधील दोन प्रसिद्ध सुभाषितांमध्यें मोठ्या मार्मिक रीतीनें सांगितले आहेत. मात्र विचारशक्तीऐवजीं पहिल्या सुभाषितांत धर्म हा मनुष्याचा विशेष म्हणून सांगितला आहे. परंतु खरा धर्म हा नेहमींच विचारशक्तीपासून निष्पन्न होतो. मनुष्याला विचारशक्ति आहे म्हणून तो या अनंत विश्वाच्या गूढाचा

विचार करूं लागतो व त्याचें जें उत्तर त्याला सयुक्तिक दिसतें त्यालाच तो आपला धर्म मानूं लागतो. ह्मणून अर्वाचीन कल्पनेला अनुसरून या सुभाषितांत थोडा फरक करून तीं खालीं देतों.

" आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् ।
मतिर्हि तेषामधिको विशेषो: मत्या विहीनाः पशुभिः समानाः ॥ "

" साहित्यसंगीतकलाविहीनः साक्षात्पशुः पुच्छविषाणहीनः ।
तृणं न खादन्नपि जीवमानः तद्भागधेयं परमं पशूनाम् ॥ "

या दोन गुणांपासून मनुष्याच्या पशुतुल्य वासनांचें किती तरी निरनिराळ्या प्रकारांत रूपांतर होतें; व शिवाय या दोन गुणांपासून आणखीही नव्या नव्या हजारों वासना उत्पन्न होतात. पशुपक्षी घरट्यांत किंवा ढोलींत राहतात. मनुष्यें प्रथमतः पशूप्रमाणेंच ढोलींत राहत असलीं तरी त्यांना झोंपडी बांधण्याची वासना होते. अगदीं रानटी झोंपडी व सर्वांगसुंदर अर्वाचीन राजवाडा यांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे. हें अंतर मनुष्याच्या विचारशक्तीचा व सौंदर्यकल्पनेचा प्रभाव होय. इतर प्राण्यांना थंडीवाऱ्यापासून संरक्षण करण्याकरितां केंस व लोकर हीं नैसर्गिक साधनें देवानें दिलीं आहेत. मनुष्याला आपलें संरक्षण करण्यास बाह्य साधनें लागतात व पशूंच्या कातड्यापासून व झाडांच्या सालींच्या वल्कलांपासून तों हल्लींच्या हजारों तऱ्हांच्या सुंदर कापडापर्यंत मानवी वासनांचें केवढें तरी रूपांतर झालें आहे. परंतु वासना निवळ विषयसुखाबद्दलच असतात असें नाहीं. मनुष्याच्या बुद्धीमुळें त्याच्यामध्यें किती तरी बौद्धिक वासना उत्पन्न झालेल्या आहेत त्यामुळें मनुष्यास ज्ञानाची लालसा उत्पन्न होते. त्याला पुस्तकाची व वाचनाची जरूरी लागते. सारांश, मनुष्याच्या वासनांची वाढ अक्षरशः अमर्याद आहे. आतां वासनांची वाढ समाजाच्या आधिभौतिक सुधारणेचें मूळ होय, हें खालील विवेचनावरून ध्यानांत येईल.

वासनाछेदाचें उद्दिष्ट जर मनुष्यानें आपल्यापुढें ठेविलें व त्याप्रमाणें जर बहुजनसमाजाचें खरोखरीच वर्तन होऊं लागलें, तर संपत्तीच्या आधिभौतिक सुधारणेची टोलेजंग इमारत ढांसळून पडलीच पाहिजे. समाजांतील सर्व व्यक्ती जर ग्रीक संन्यासी डायोजिनीसप्रमाणें एका द्रोणींत राहूं लागल्या व त्यांच्या उपजीविकेला जर सृष्टींतील नैसर्गिक फळेंमुळेंच पुरेशीं झालीं तर सर्व उद्योग-

धंदे व त्यांबरोबरोबरच समाजांतील आधिभौतिक सुधारणा रसातळास गेली पाहिजे. किंवा आमच्या इकडील खऱ्या निवृत्त साधूप्रमाणें सर्व लोक सर्वसंग-परित्याग करून रानांत राहून फळांमुळांवर उपजीविका करूं लागले तर सर्व शहरें व त्यांतील सर्व धंदे नाहींसे झाले पाहिजेत हें उघड आहे.

मानवी वासना किंवा अर्थशास्त्रांतील शब्द 'मागणी' व 'खप' यांवर संपत्तीची उत्पत्ति अवलंबून आहे, हें विधान कांहीं अंशीं विरोधाभासात्मक आहे. संपत्तीची उत्पत्ति तिच्या खपावर म्हणजे तिच्या उपभोगावर अगर नाशावर अवलंबून आहे असा अर्थ होतो. परंतु याच्या सत्यतेबद्दल सर्व मानवी सुधारणा साक्ष देईल. कारण सर्व मानवी सुधारणा म्हणजे मनुष्याच्या वासनांची व त्या तृप्त करण्याच्या विपुल साधनांची वाढ होय. व जसजसें मानवी गरजा व वासना यांचें स्वरूप मनुष्याच्या ज्ञानवृद्धीनें त्याच्या परिस्थितिभेदामुळें बदलत जातें तसतशी समाजांत उत्पन्न होणारी संपत्ति हिचें स्वरूपही बदलत जातें. उदाहरणार्थ, एका काळीं मनुष्याचें स्वसंरक्षणाचें साधन व लढाईचें व सैन्यांतील शिपायांचें हत्यार म्हणजे तिरकमटा होता व तिरकमटा, तीर व भाला करण्याचा धंदा म्हणजे एक संपत्ती उत्पादन करणारा धंदा होता. परंतु तो आतां कोठें गेला? हजारों प्रकारचीं शस्त्रास्त्रें कोठें गेलीं? पूर्वीच्या काळच्या चिलखतांचें काय झालें? एखाद्या पदार्थसंग्रहालयांतील शस्त्रागाराकडे दृष्टि फेंकली म्हणजे या बाबतींत केवढी क्रांति झाली आहे हें दिसून येईल. म्हणजे मनुष्यांनीं केलेल्या कल्याणच्या शोधांनीं मनुष्याच्या व राष्ट्राच्या संरक्षणाची गरज जरी कायम असली तरी त्याचे स्वरूपांत विलक्षण बदल झाला व यामुळें जसजशी मागणी बदलली तसतसे जुने धंदे नाहींसे होऊन त्यांचे ठिकाणीं नवे धंदे आले. हाच प्रकार सर्वत्र दिसून येतो. हिंदुस्थानच्या एका शतकाच्या पूर्वीच्या व हल्लींच्या काळाकडे पाहिलें तरीही हेंच दिसून येईल. ज्या ज्या गरजांचें रूपांतर झालें आहे त्यासंबंधींचे जुने धनोत्पादक धंदे जाऊन त्यांचे ठिकाणीं नव्या गरजा भागविणारे धंदे आले किंवा या गरजा परकी देशांतील मालानें भागवितां येऊं लागल्या.

सारांश, संपत्तीच्या मागणीवर संपत्तीची उत्पत्ति अवलंबून आहे हें वरील विवेचनावरून उघड दिसून येईल. निवळ गरजा वाढून उपयोग नाहीं हें खरें, तर त्या गरजा तृप्त करण्यास लागणारें सांपत्तिक सामर्थ्यही लोकांमध्यें आलें

पाहिजे हें निर्विवाद आहे. परंतु वासना उत्पन्न झाली ह्मणजे मनुष्य ती तृप्त करण्याच्या उद्योगाला लागतो व श्रम करून ती वासना तृप्त करण्याची साधनें ह्मणजे संपत्ति मिळवूं लागतो. आफ्रिकेंतील पुष्कळ नीग्रो जाती या श्रम करण्यास मुळींच तयार नसतात. कारण त्यांच्यामध्यें वासनाच उत्पन्न झालेल्या नसतात. परंतु निरनिराळे पदार्थ दाखवून व त्यांचा उपयोग शिकवून त्यांच्या वासनाशक्तीला एकदां चालन दिलें ह्मणजे अशा जाती श्रम करण्यास प्रवृत्त होतात, असा पुष्कळ मिशनरी लोकांनीं आपला अनुभव लिहून ठेविला आहे. ज्या समाजांतील व्यक्तींमध्यें वासना व गरजा यांच्या अल्पतेमुळें समाधानी वृत्ति असते तेथें संपत्तीच्या वाढीस वावच नसतो. ही समाधानवृत्ति नाहींशी होऊन वासनांच्या व गरजांच्या वाढीनें असमाधान किंवा असंतोष उत्पन्न होणें ही सांपत्तिक प्रगतीची पहिली पायरीच होय. 'असंतोषः श्रियो मूलम्' या संस्कृत ह्मणीचें रहस्य यांतच आहे.

मागणीचा संपत्तीच्या उत्पत्तीवर व वाढीवर कसा हितकारक परिणाम होतो याचें एक उदाहरण हिंदुस्थानांतील 'स्वदेशी'ची चळवळ होय. कांहीं राजकीय व औद्योगिक कारणांमुळें जी देशी मालाला मागणी उत्पन्न झाली तिच्या योगानें व दुसऱ्या कारणांनीं अलीकडे हिंदुस्थानांत किती तरी झपाट्यानें संपत्तीची वाढ झाली आहे हें सर्वश्रुतच आहे. या मागणीमुळें जे लोक आपआपले धंदे टाकून नवीन धंद्याला लागूं लागले होते ते लोक आपल्या पूर्वींच्या धंद्याला परत आले व आपला धंदा फायदेशीर रीतीनें करूं लागले. तसेंच कित्येक तरी नवे उत्पादक धंदे अस्तित्वांत येऊं लागले.

संपत्तीच्या उत्पत्तीचीं वर विवेचित केलेलीं अमूर्त कारणें यांकडे अभिमतपंथानें अगदीं कानाडोळा केला किंवा त्यांचें अस्तित्व व महत्त्व हें त्यांच्या ध्यानांत नव्हतें व ह्मणून त्यांनीं काढलेले पुष्कळ सिद्धांत खोटे व प्रत्यक्ष व्यवहाराला कुचकामाचे आहेत अशा प्रकारचे आक्षेप कांहीं आधुनिक ग्रंथकारांनीं काढलेले आहेत. रिकार्डोच्या उदाहरणानें या शास्त्राला जें तार्किक स्वरूप आलें त्याचा परिणाम अर्थशास्त्रांतील कांहीं सिद्धांतांवर झाला खरा; परंतु हा आरोप अभिमतपंथाच्या जनकावर लागू करतां येत नाहीं. सर्व संपत्तीचा अंतिम हेतु उपभोग किंवा व्यय आहे हें अॅडाम स्मिथनें पुष्कळ ठिकाणीं स्पष्टपणें सांगितलें

आहे, इतकेंच नव्हे तर संपत्तीची वाढ ही खपावर किंवा मागणीवर अवलंबून आहे हेंही ॲडाम स्मिथला ठाऊक होतें, हें त्याच्या एका विधानावरून सिद्ध करितां येतें. ॲडाम स्मिथनें आपल्या पुस्तकाच्या प्रथमारंभींच श्रमविभागाच्या तत्त्वाचा ऊहापोह केला आहे व या तत्त्वाचा संपत्तीच्या वाढीस केवढा मोठा उपयोग होतो हें सप्रमाण सिद्ध केलें आहे. परंतु श्रमविभागाचें तत्व अमलांत येणें हें बाजाराच्या विस्तारावर अवलंबून आहे, असें त्यानें याच विवेचनांत सांगितलें आहे. ह्मणजे कोणत्याही धंद्यांत श्रमविभागाचें तत्त्व अमलांत येणें न येणें हें खपावर किंवा मागणीवर अवलंबून आहे. आतां श्रमविभागावर संपत्तीची वाढ अवलंबून आहे. अर्थात् संपत्तीची वाढही खपावर किंवा मागणीवर अवलंबून आहे हें उघड झालें.

यावरून अभिमतपंथाच्या प्रवर्तकांस हीं अमूर्त कारणें अश्रुतपूर्व होतीं व ह्मणून त्यांची सर्व इमारत डळमळीत पायावर उभारलेली आहे, या आरोपास फारशी जागा नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, हीं अमूर्त कारणें या पंथानें सुव्यवस्थित व प्रगतीच्या मार्गांत असणाऱ्या समाजांत असतात असें गृहीत धरून आपलें विवेचन केलें आहे. हीं अमूर्त कारणें स्पष्टपणें सतत डोळ्यांपुढें न ठेवल्या कारणानें केव्हां केव्हां त्यांच्या विवेचनांत व विचारसरणींत चुक्या झाल्या आहेत, ही गोष्ट खरी; पण अशा चुक्या दाखविणें निराळें व त्यांचे सर्वच ग्रंथ केराच्या टोपलींत टाकण्याच्या योग्यतेचे आहेत असें ह्मणणें वेगळें. या दुसऱ्या ह्मणण्याला तज्ञ मनुष्य कांहींच मान देणार नाहीं. परंतु हीं अमूर्त कारणें ह्मणजे सर्व कारणसर्वस्व नव्हे. संपत्तीच्या वाढीस पुष्कळ मूर्त कारणेंही लागतात. त्यांशिवाय नुसत्या अमूर्त कारणांच्या अस्तित्वानेंच संपत्ति उत्पन्न होणार नाहीं हेंही निर्विवाद आहे. तेव्हां पुढील भागांत या मूर्त कारणांचा विचार करूं.

# भाग तिसरा.

## मूर्त कारणें–जमीन.

संपत्तीच्या उत्पत्तीचीं पहिलीं मूर्त कारणें दोनच आहेत व त्यांतूनच आणखी दोन कारणें निष्पन्न होतात. पहिलीं दोन कारणें ह्मणजे सृष्टि व तिच्या शक्ति आणि मनुष्य व त्याच्या शक्ति. या दोहोंच्या मिलाफानेंच सर्व संपत्ति उत्पन्न होते. मनुष्याला कोणतीही नवी गोष्ट जगांत उत्पन्न करतां येत नाहीं; त्याची शक्ति फक्त सृष्टींतील वस्तूंची घडामोड करून किंवा त्यांच्यांत इतर फेरफार करून त्यांना नवें स्वरूप व आकार देऊं शकतें, व यालाच आपण संपत्तीची उत्पत्ती ह्मणतों. समाजाच्या अगदीं बाल्यावस्थेंत संपत्तीच्या उत्पतीचीं हींच दोन कारणें अस्तित्वांत असतात. परंतु समाज सांपत्तिक बाबतींत वरच्या पायरीवर येऊं लागला कीं, दुसऱ्या दोन कारणांचा प्रादुर्भाव होतो व सुधारलेल्या काळांत एका दृष्टीनें याच कारणांना पहिल्या दोहोंपेक्षां जास्त महत्व येतें. हीं दोन कारणें ह्मणजे सृष्टिशक्ति व मानवी शक्ति यांचा मिलाफ घडवून आणणारीं प्रवर्तक कारणें होत. ज्याच्या योगानें हा मिलाफ घडून येतो तें भांडवल व जो हा मिलाफ घडवून आणतो तो योजक अगर कारखानदार. ज्या हत्यारांच्या योगानें, ज्या यंत्राच्या योगानें, ज्या उपकरणांच्या योगानें मनुष्याला सृष्टीच्या शक्तींचा आपल्या संपत्तीच्या उत्पादनाकडे उपयोग करून घेतां येतो, तें सर्व, भांडवल या संज्ञेंत मोडतें; व जो सृष्टीच्या योग्य शक्ती, मानवी योग्य शक्ति व योग्य उपकरणें या सर्वांची जुळवाजुळव करून व त्यांची एके ठिकाणीं योजना करून प्रत्यक्ष संपत्ति तयार करतो तो योजक किंवा कारखानदार होय. हीं चारी कारणें हल्लीच्या काळीं परस्परांपासून स्वतंत्र असतात. तेव्हां त्या प्रत्येकाचें स्वरूप काय व त्याच्या योगानें संपत्ति कशी उत्पन्न होते या गोष्टींचें आतां विवेचन करावयास पाहिजे.

सृष्टीच्या शक्तींचें समाजाच्या सर्व सांपत्तिक स्थितींत एक मुख्य अंग ह्मणजे देशांतील जमीन होय. आधिभौतिक शास्त्राच्या प्रगतीनें देशांतील दुसऱ्या नैस

र्गिक शक्तींना औद्योगिक महत्व आलें आहे खरें; तरी जमीन व शेतकी हे नैसर्गिक शक्तीचे सनातन भाग आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे. म्हणून जमीन हें एक संपत्तीचें कारण आहे असें सांगण्याचा अभिमतपंथाचा संप्रदाय आहे.

आतां जमीनीची संपत्ती उत्पादन करण्याची शक्ति ज्या तिच्या कित्येक गुणांवर अवलंबून आहे त्यांचा थोडक्यांत विचार करणें जरूर आहे.

प्रदेशाचें हवापाणी हें एक त्याचें मुख्य अंग आहे. कारण पृथ्वीच्या पाठीवर कांहीं भाग असे आहेत कीं, तेथें थंडीच्या तीव्रतेमुळें मनुष्यवस्तीच बहुधा शक्य नसते; व शक्य झालीच तर मनुष्याचें श्रमसर्वस्व निवळ जिवंत राहण्यांतच खर्चे हातें व अशा प्रांतांत शेतकीचा उदयच होणें शक्य नसतें. तसेंच कांहीं प्रांत निव्वळ वालुकामय असून तेथें पाणी मुळींच नसतें. यामुळेंही तेथें धनोत्पादक शेतकीचा प्रादुर्भाव होऊं शकत नाहीं. यामुळें आधिभौतिक सुधारणा बहुतेक समशीतोष्ण कटिबंधाच्या प्रदेशांत व प्रांतांत झालेली आहे, असें दृष्टोत्पत्तीस येतें. कारण तेथें ती होण्यास हवापाणी इत्यादि प्रकारची अनुकूल परिस्थिति असते.

जमिनीचा धनोत्पादक दुसरा गुण म्हणजे तिची भूगर्भसंबंधीं स्थिति होय. ज्या ठिकाणीं निरनिराळ्या धातूंच्या खाणी आहेत तेथें संपत्तीची वाढ झपाट्यानें होते. ज्या ज्या ठिकाणीं सोन्यारुप्याच्या खाणी सांपडल्या आहेत ते ते प्रदेश पूर्वी अगदीं ओसाड असतांना पांच पन्नास वर्षांत आधिभौतिक सुधारणेंत अग्रेसर झालेले आहेत. उदाहरणार्थ, आस्ट्रेलिया देशाची भरभराट पहा. इंग्लंडची सांपत्तिक उन्नति पुष्कळ अंशीं लोखंड व कोळसा यांच्या खाणींच्या शोधापासून झालेली आहे हें सर्वश्रुतच आहे.

जमिनीचा तिसरा गुण म्हणजे तिची सुपीकता. अमेरिकेंतील जमिनीच्या विलक्षण सुपीकतेमुळें त्या देशाची इतक्या लवकर सांपत्तिक भरभराट झाली. इंग्लंडच्या भरभराटीसही तेथल्या जमिनीच्या सुपीकतेची व विशेषतः तेथल्या थंड हवेची व सततच्या पावसाची फार मदत झालेली आहे.

देशांतील नद्या, समुद्रकिनारा, बंदरें, वायुप्रवाह व पर्वताच्या रांगा वगैरे पृष्ठभागाच्या स्थितीचाही देशाच्या सांपत्तिक स्थितीवर परिणाम होतो, हेंही पुष्कळ देशांच्या इतिहासावरून दिसून येतें.

या सर्व बाबतींत हिंदुस्थान देशाची स्थिती फार अनुकूल आहे. आधीं सर्व देश समशीतोष्ण कटिबंधांत असून त्याच्यामध्यें अत्यंत थंड हवेपासून तों अत्यंत उष्ण हवेपर्यंत हवेचें बहुविधत्व आहे. तसेंच सर्व देशांतील बराच मोठा भाग सुपीक असून त्याची सुपीकता अनेकविध कारणांवर अवलंबून आहे. इजिप्त देशाची सुपीकता नाईल नदीच्या पुरावर व तिच्या कालव्यांवर अवलंबून आहे. तशा प्रकारची स्थिति-हिंदुस्थानांत मोठमोठ्या नद्या असल्यामुळें-कांहीं प्रांतांत आहे. गंगा, यमुना, सिंधु, व कृष्णा या नद्यांच्या सभोंवतालचे प्रांत फार सुपीक आहेत; व त्यांची सुपीकता इजिप्तच्याप्रमाणें नदीच्या पुरावर अवलंबून आहे. तसेंच कांहीं भागांमध्यें ऋतुमानानें पाऊस मुबलक व निश्चितपणें पडल्यामुळें ते सुपीक झालेले आहेत. जें विशेषण सर्व वसुंधरेला लावतात तेंच विशेषण हिंदुस्थानासही अन्वर्थक आहे. कारण नैसर्गिक संपत्तीच्या दृष्टीनें हिंदुस्थान देश हा 'बहुरत्ना वसुंधरा' याप्रमाणेंच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

भूगर्भसंबंधींही हिंदुस्थानची स्थिति असमाधानकारक नाहीं. येथें मॅंगनीस आहे, रॉकेल आहे, सोनें आहे, तांबें आहे, लोखंड व कोळसा आहे; सारांश, भूपृष्ठविषयक बहुविधताही येथें आहे. तेव्हां धनोत्पादनाला जे गुण जमीनींत पाहिजेत तें सर्व येथें आहेत व ह्मणून पूर्वकाळीं हिंदुस्थान सांपत्तिक सुधारणेच्या बऱ्याच वरच्या पायरीला गेलेलें होतें व आतांही भांडवल व योजक या दोन कारणांची जोड झाल्यास हिंदुस्थान युरोपांतील इंग्लंड, जर्मनी व अमेरिका या देशांशीं बरोबरी करूं शकेल यांत तिळमात्र शंका नाहीं.

---

# भाग चवथा.

## श्रम.

अर्थशास्त्राच्या परिभाषेमध्यें हातीं घेतलेल्या व्यवसायांतील आनंदाखेरीज दुसऱ्या कोणत्याही तरी हेतूनें ह्मणजे मोबदल्याच्या हेतूनें केलेला मानसिक किंवा शारीरिक व्यवसाय ह्मणजे श्रम होय. या व्याख्येनें विरंगुळ्याकरितां, विश्रांतीकरितां

किंवा करमणुकीकरितां जो मानसिक अगर शारीरिक व्यवसाय केला जातो तो श्रमाखालीं येत नाहीं. तसेंच ज्या व्यवसायाचा हेतु दुसऱ्या कोणत्याही कामाला उपयोगीं पडण्याचा नाहीं तोही व्यवसाय श्रमाखालीं येणार नाहीं. उदाहरणार्थ, क्रिकेट, टेनिस, आट्यापाट्या, तालिम इत्यादि शारीरिक खेळ किंवा पत्ते, गंजिफा, सोंगट्या व बुद्धिबळें इत्यादि बैठे खेळ हे श्रम या संज्ञेखालीं येणार नाहींत. तसेंच मनुष्य फक्त स्वतःच्या करमणुकीकरितां व विरंगुळा ह्मणून सतारीवर, बागेवर, चित्रकलेवर किंवा ललितकलेवर जो परिश्रम करतो तोही श्रम या संज्ञेखालीं येणार नाहीं. या श्रमांमध्यें अगदीं साध्या हातकामापासून तों बुद्धिसर्वस्व लागणाऱ्या सर्व व्यवसायांचा अंतर्भाव होतो. जो जो माणुस मजूरी घेऊन श्रम करतो तो तो मजुरदार व त्याचा व्यवसाय ह्मणजे अर्थशास्त्रदृष्टया श्रम होय. आपल्या मेहेनतीबद्दल कांहींएक ठरींव मोबदला घेणारा तो मजूर; मग त्याची मेहनत मानसिक असो, किंवा शारीरिक असो. खरोखरी शारीरिक किंवा मानसिक व्यवसाय हें वर्गीकरणच बरोबर नाहीं, कारण साध्या हातकामांतसुद्धां थोडा तरी मानसिक श्रम असतो व अत्यंत बिकट अशा मानसिक श्रमांतही थोडी तरी शारीरिक मेहनत असते.

अभिमतपंथी अर्थशास्त्रकारांनीं श्रमाचे उत्पादक व अनुत्पादक असे दोन विभाग केलेले आहेत. या वर्गीकरणाच्या संकुचितपणामुळें अभिमतपंथ हा कांहीं आधुनिक ग्रंथकारांच्या कडक टीकेस पात्र झाला आहे. या वर्गीकरणाच्या इतिहासावरून संपत्ति व तिचीं कारणें यांबद्दलच्या कल्पनांत कसकशी उत्क्रांति होत आली आहे हें दिसून येईल. हा भेद प्रथमतः निसर्गपंथी अर्थशास्त्रकारांनीं ठरविला व तो त्यांनीं आपल्या एककल्ली संपत्तीच्या कल्पनेवरून ठरविला. त्यांचे मतें शेतकी किंवा जमीन हें काय तें एकटें संपत्तीची वाढ करणारें कारण. तेव्हां जमीनदार व शेतकरी हे दोन वर्गच काय ते उत्पादक वर्ग. कारखानदार, व्यापारी, नोकरचाकर हे सर्व अनुत्पादक. ह्मणजे जमीनदार व शेतकरी यांच्या शिल्लक संपत्तीवर या सर्व वर्गांची उपजीविका अवलंबून आहे. हे वर्ग नवीन संपत्ति उत्पन्न करीत नाहींत. येथें संपत्ति ह्मणजे धान्य इतकाच संकुचित अर्थ गृहीत धरल्यासारखा दिसतो व या दृष्टीनें जमीनदार व शेतकरी, हे समाजांतील इतर सर्व वर्गांना अन्न पुरवितात हें खरें आहे. परंतु यावरून हे दुसरे वर्ग दुसऱ्या

प्रकारची संपत्ति उत्पन्न करीत नाहींत असें मात्र नाहीं. या अत्यंत संकुचित कल्पनेवर बसविलेला भेद टाकून देऊन ॲडाम स्मिथनें त्याला थोडें विस्तृत स्वरूप दिलें. ॲडाम स्मिथनें ज्या श्रमाचा परिणाम अगर फल एखाद्या टिकाऊ मालामध्यें होतो तो उत्पादक श्रम, अशी उत्पादक श्रमाची व्याख्या केली आहे. या व्याख्येनें जमीनदार, शेतकरी, कारखानदार, मजूर वगैरे सर्व वर्गांच्या लोकांचे श्रम उत्पादक ठरतात; परंतु शिक्षक, शिपाई, नावाडी, वकील, डॉक्टर व शेवटीं घरगुती नोकर या सर्वांचे श्रम अनुत्पादक ठरतात. मिलनें उत्पादक हें पद आणखी जास्त व्यापक केलें. त्याचे मतें शिक्षक, शिपाई व वकील यांचे श्रम अनुत्पादक ह्मणतां येणार नाहींत कारण शिक्षणानें श्रमाची कर्तबगारी वाढते व कर्तबगार मजूर लोक जास्त संपत्ति उत्पन्न करितात. तसेंच शिपाई, वकील, न्यायाधीश हे मालमत्तेला सुरक्षितता आणून अप्रत्यक्ष रीतीनें धनाच्या उत्पत्तीस मदत करितात. ह्मणून मिलनें उत्पादक श्रमाची व्याख्या केली आहे ती ही कीं, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें संपत्ति उत्पन्न करण्यास मदत करणारा व्यवसाय म्हणजे उत्पादक श्रम होत. परंतु ही व्याख्या इतकी विस्तृत आहे कीं, या व्याख्येप्रमाणें सर्व व्यवसाय जे अर्थशास्त्राच्या श्रम या शब्दांत अंतर्भूत होतात ते सर्व उत्पादकच ठरतात. उत्पादक व अनुत्पादक हा भेद व्यर्थ होतो. कारण ज्या ज्या व्यवसायाबद्दल समाजांत मनुष्याला मोबदला मिळतो तो तो व्यवसाय उत्पादक श्रमांत येतो व अनुत्पादक श्रम हा शब्दप्रयोगच मुळीं असंबद्ध होतो.

वरील विवेचनावरून उत्पादक व अनुत्पादक ही शब्दांची जोडी किती निरनिराळ्या अर्थानें वापरली जाते हें दिसून येईल. शब्दांच्या अर्थामध्यें अशी व्यापकता व संदिग्धता उत्पन्न झाली ह्मणजे ते शब्द शास्त्रीय विवेचनाला निरुपयोगी होऊन जातात. तोच प्रकार या शब्दांचाही झाला आहे. मागील भागांत सांगितलेलीं संपत्तीच्या उत्पत्तीचीं अमूर्त कारणें व यापुढील भागांत सांगावयाचीं मूर्त कारणें यांपैकीं कोणत्याही कारणाला अस्तित्वांत आणून संपत्तीच्या उत्पादनाला मदत करणारे वर्ग ह्मणजे उत्पादक वर्ग होत व अशा वर्गांचे श्रम ते उत्पादक श्रम होत. अर्थात् उत्पादक व अनुत्पादक या भेदाचा उपयोग सामान्यतः आपल्या श्रमानें आपलें पोट भरणारे लोक व भिक्षेनें किंवा अन्य तऱ्हेनें

दुसऱ्याच्या जिवावर उपजीविका करणारे ऐदी लोक, असे समाजाचे दोन वर्ग दाखविण्याकडे चांगल्या तऱ्हेनें होईल.

आतां या श्रमाची कर्तबगारी किंवा कार्यक्षमता कोणत्या गोष्टीवर अवलंबून आहे हें पहावयाचें राहिलें.

पहिली गोष्ट आनुवंशिक गुण. या बाबतींत निरनिराळया देशांमधील मजुरदारांमध्यें किती तरी अंतर आहे. काम करण्याची शक्ति, राकटपणा, सामर्थ्य हे गुण निरनिराळया लोकांत निरनिराळया प्रमाणांत दिसून येतात. या भेदाचीं कारणें शोधून काढणें हें अर्थशास्त्राचें काम नाहीं; परंतु हा भेद आहे व त्यामुळें निरनिराळया देशांच्या मजुरांच्या श्रमांत विलक्षण अंतर पडतें ही गोष्ट अर्थशास्त्रानें नमूद करावयाची आहे. रशियन मजुरापेक्षां फ्रेंच मजूर तितक्याच वेळांत दीडपट काम करतो, तर इंग्रज मजूर फ्रेंच मजुरापेक्षांही जास्त काम करतो. या बाबतींत सर्व युरोपामध्यें इंग्रज मजुराचा नंबर वर लागतो. व अमेरिकन मजुराचा नंबर इंग्रज मजुराच्याही वर लागतो असें म्हणतात.

हिंदुस्थानांत तर हे आनुवंशिक गुण जातिभेदामुळें निरनिराळया जातींत अगदीं निरनिराळया प्रमाणानें दिसून येतात. उत्तरहिंदुस्थानांत परदेशी, पठाण वगैरे लोक शरीरबांध्यानें, सामर्थ्यानें व मजबुतीनें सर्व हिंदुस्थानांत वरिष्ठ आहेत. यामुळें हे लोक शिपाई उत्तम बनतात, व म्हणूनच या लोकांचा भरणा हिंदुस्थानच्या सैन्यांत पुष्कळच केला जातो. निव्वळ मुंबई इलाख्याकडे दृष्टि दिली तरी किती तरी फरक दिसून येतो. घाटावरील घाटवळ लोक हे शरीरसामर्थ्यानें सर्वांत वर आहेत. यामुळें सर्व मोठ्या मेहनतीचीं कामें याच लोकांचे हातांत आहेत. मुंबईतील हमालांचीं कामें, गोदींतील कामें, स्टेशनावरील मोठमोठे बोजे उचलण्याचीं कामें बहुधा या लोकांच्या हातीं आहेत. तोच कोंकणांतील मजूर जरी घाटीलोकांइतका शक्तिमान् व मजबूत नसतो, तरी पण चलाखपणांत, कंटकपणांत व हुशारींत त्याचा वर नंबर लागतो. यामुळें मुंबईत घरगुती कामांत, ऑफीसच्या कामांत व गिरणींतील कामांत याच लोकांचा जास्त भरणा आहे. तरी पण सुधारलेल्या देशांच्या मानानें हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणचा व सर्व वंशांचा मजूरवर्ग कमी प्रतीचा आहे हें कबूल करणें भाग आहे.

दुसरी गोष्ट मजुरांना मिळणारें खाणेंपिणें व अन्न यांवर त्यांची कार्यक्षमता अवलंबून असते. ज्या ज्या ठिकाणीं मजुरांना खाणेंपिणें भरपूर मिळून त्यांचें अन्न पौष्टिक असतें तेथें तेथें मजुरांची कार्यक्षमता जास्त असते. या बाबतींतही अमेरिकेंतील मजुरांचा नंबर सर्वांत वर लागतो. युरोपमध्यें आयर्लंडच्या मजुरांचें अन्न निःसत्त्व बटाट्यांचें असतें. यामुळें त्यांची कार्यक्षमता फार कमी आहे. मनुष्यप्राण्याची स्थिति कांहीं अंशीं एंजिनासारखी आहे. ज्या मानानें एंजिनांत कोळसा व पाणी घालावें त्या मानानें एंजिनापासून कमजास्त उष्णता व शक्ति उत्पन्न होऊं शकते; त्याचप्रमाणें मनुष्याला जास्त व पौष्टिक अन्न खायला घातलें तर त्याचे हातून काम जास्त होतें. परंतु हा क्रम कांहीं काळपर्यंत चालतो. एंजिनच्या आटोकाट शक्तीबाहेर जर कोळसा घातला तर एंजिन एकदम फुटून जाईल; तसेंच मनुष्याच्या आटोकाट पाचकशक्तीपेक्षां जर अन्न जास्त घातलें तर मनुष्याच्या जिवालाच अपाय होईल. परंतु या मर्यादेच्या आधीं "जितकें जास्त अन्न, तितकें जास्त काम" हा नियम खरा आहे.

हिंदुस्थानामध्यें एकंदर दारिद्र्य फार असल्यामुळें पुष्कळ लोकांना पोटभर व पुरेसें अन्न मिळतें किंवा नाहीं, याबद्दल शंका आहे. तेव्हां तें अन्न कमी पौष्टिक आहे किंवा जास्त पौष्टिक आहे याची तुलना फारशी शक्य नाहीं. यामुळें येथल्या एकंदर मजुरवर्गाची कार्यक्षमता कमी आहे; तरी अन्नाच्या पौष्टिकपणावर सामर्थ्य अवलंबून आहे हें येथेंही चांगल्या तऱ्हेनें दिसून येतें. उत्तरहिंदुस्थानांत गहूं हें सामान्य लोकांचें सुद्धां नेहमींचें अन्न आहे. यामुळें तेथील लोक जास्त धिप्पाड, मजबूत व सामर्थ्यवान् आहेत. त्यापेक्षां ज्वारी किंवा बाजरी खाणारे लोक कमी सामर्थ्यवान् आहेत व भात खाणारे तर अगदींच कमी मजबूत आहेत. मद्रास, बंगाल व मुंबई इलाख्याचा किनारा हे सर्व प्रांत भात किंवा त्यापेक्षांही कमी पौष्टिक अन्न खाणारे आहेत. यामुळें तेथला मजूरवर्ग शक्तींत पुष्कळ कमी आहे.

मजुरांच्या कार्यक्षमतेबद्दलची तिसरी गोष्ट म्हणजे आरोग्यकारक राहणी. जे जे लोक रोगकारक परिस्थितींत गलिच्छ तऱ्हेनें कोंदट हवेंत व लहान घरकुलांत पुष्कळजण अशा तऱ्हेनें राहतात त्या त्या लोकांमध्यें कार्यक्षमता कमी

155F2
180390

होते, हें शारीरशास्त्रानें व आरोग्यशास्त्रानें सिद्ध करून दाखविलें आहे. या बाबतींतही निरनिराळ्या देशांत निरनिराळी स्थिति आहे. हा एकंदर राहणीचा प्रश्न आहे व यामुळें येथें धार्मिक कल्पना, सामाजिक चालीरीती, समाजांतील लोकांच्या वेडगळ समजुती, त्यांचें एकंदर ज्ञान व त्यांची सांपत्तिक स्थिति या सर्वांवर ही गोष्ट अवलंबून आहे. परंतु या बाबतींत स्वाभाविकपणेंच नवीन वसाहतींची स्थिति बरी असते. जेथें दाट वस्ती आहे व जेथें शहरांत राहण्याची प्रवृत्ति आहे तेथें आरोग्यहारक गोष्टी फार असतात व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें यासंबंधीं बहुजनसमाजाची स्थिति सुधारण्याकरितां हजारों रुपये सार्वजनिक पैशांतून खर्च केले जातात. हिंदुस्थानांत या विषयाचें महत्त्व आतां कोठें थोडें-थोडें लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें आहे.

चवथी गोष्ट बुद्धिमत्ता व ज्ञानवत्ता. जितका जितका मजूरवर्ग हुषार तितकी तितकी त्याची कार्यक्षमता जास्त. कारण बुद्धिमान् कामकऱ्यास कोणतेंही काम शिकण्यास वेळ लागत नाहीं; यंत्राचा उपयोग त्याला लवकर करतां येतो; कच्च्या मालाची नासधूस त्याचे हातून कमी होते; व त्याच्या कामावर देखरेख कमी लागते. शिक्षणानें मजुरांची कार्यक्षमता वाढते हें सिद्ध झाल्यापासून सर्व सुधारलेल्या सरकारांनीं प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें केलें आहे. कारण, शिक्षण हें एक सांपत्तिक प्रगतीचें प्रमुख साधन आहे, असें अनुभवानें ठरलें आहे. ज्या ज्या देशांना आपली सांपत्तिक प्रगति व्हावी असें वाटत आहे त्यांना त्यांना आपल्या देशांत शिक्षणाचा व कलाकौशल्याचा सार्वत्रिक प्रसार केल्यावांचून गत्यंतर नाहीं. या बाबतींत इंग्लंडमध्यें फार मागाहून जागृति आलेली दिसते. शिक्षणाचा संपत्तीच्या वाढीशीं असलेला कार्यकारणभाव जर्मनी व अमेरिका यांनीं जाणून त्यांनीं आपआपल्या देशांत सामान्य शिक्षण व धंदे-शिक्षण यांचा विलक्षण प्रसार केला. म्हणून हीं दोन्ही राष्ट्रें अल्पकालांत सांपत्तिक वैभवाच्या व औद्योगिक प्रगतीच्या शिखरास पोहोंचलेल्या इंग्लंडाला मागें टाकूं लागलीं आहेत. पौर्वात्य जपाननें या बाबतींत जर्मनी व अमेरिका यांचाच कित्ता गिरविला आहे व यामुळें तेथें एकदोन पिढ्यांत शिक्षणाचा इतका प्रसार झाला आहे कीं, या बाबतींत जुन्या सुधारलेल्या राष्ट्रांना मान खालीं घालण्याची पाळी आलेली आहे. हिंदुस्थानांत याही बाबतींत सुधारलेलें ब्रिटिश

अम्मल सुरू असून आजपर्यंत विशेष जोराचे प्रयत्न होऊं नयेत ही दुःखाची गोष्ट आहे. तरी पण अलीकडे सरकारचें लक्ष या विषयाकडे लागत चाललें आहे, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. व जसजसें या प्रश्नावर जोराचें लोकमत तयार होईल, तसतसें सरकारासही जास्त जोरानें पाऊल टाकणें भाग पडेल यांत शंका नाहीं. हिंदुस्थान सरकार हल्लीं शेतीमध्यें सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु शेतकऱ्याचें सामान्य अज्ञान व अक्षरशत्रुपणा हीं या प्रगतीच्या आड नेहमीं येणार. तरी सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा मूळ पाया म्हणजे प्राथमिक शिक्षण आहे हें जाणून तें शिक्षण मोफत व हळूहळू सक्तीचें केल्याखेरीज हिंदुस्थानांतील श्रमाची कार्यक्षमता वाढणार नाहीं व कार्यक्षमता वाढल्याखेरीज सांपत्तिक वाढ होण्यास मोठा प्रतिरोध होईल.

या बाबतींत शेवटली गोष्ट म्हणजे मजुरांच्या नैतिक व सामाजिक संवयी आणि आकांक्षा.* देशांतील मजूरलोक आनंदानें व खुशीनें काम करणारे असले; तसेंच त्यांच्यामध्यें सचोटी, कर्तव्यदक्षता इत्यादि गुण असले म्हणजे या सर्व गुणसमुच्चयानें त्यांची कार्यक्षमता वाढते. गुलामांच्या या नैतिक गुणांच्या अभावामुळें गुलामांचा श्रम अगदीं कुचकामाचा ठरतो. कारण गुलामाला खुशीनें काम करण्याची संवय नसते; तो चाबकाच्या भीतीनें काम करतो. परंतु अशा नाखुशीनें केलेलें काम अर्थात् फारच कमी असतें. सचोटी व कर्तव्यदक्षता हे गुण नसले म्हणजे देखरेखीचा खर्च फार मोठा होतो; व त्यामुळें एकंदरींत कामाच्या दृष्टीनें खर्च फार वाढतो. हिंदुस्थानच्या मजुरदार लोकांमध्यें या गुणाचा पुष्कळ अंशांनीं अभाव आहे. येथल्या मजुरांमध्यें कुचरपणाचा व आळशीपणाचा अवगुण फार आहे. यामुळेंच हिंदुस्थानांतील मजुरी इतकी स्वस्त आहे. कारण मजूरलोक जितके तास काम करतात त्यामानानें त्यांचे हातून काम मुळींच उरकत नाहीं. कामांत अळंटळं करण्याची व काम करतांना इकडे तिकडे रमण्याची त्यांना मोठी खोड आहे. यामुळें देखरेखीचा खर्च हिंदुस्थानांतील कामांवर फार वाढतो व म्हणून एकंदरींत खर्च जास्त येतो. हिंदुस्थानाइतकी स्वस्त मजुरी जगामध्यें दुसऱ्या कोठेंही नसतांना हिंदुस्थानाइतका रेलवेला दरमैलीं खर्च कोठेंच येत नाहीं, यावरून ही गोष्ट सिद्ध होते.

---

# भाग पांचवा

## भांडवल

अर्थशास्त्रामध्यें भांडवलाच्या व्याख्येबद्दल व स्वरूपाबद्दल फार वाद माजून राहिलेला आहे. सामान्य व्यवहारांत व व्यापारांत हा शब्द नेहमीं वापरण्यांत येतो. भांडवल म्हणजे कोणत्याही धंद्याच्या सुरुवातीस लागणारा पैसा असा सामान्यतः अर्थ केला जातो; तसेंच ज्याच्या योगानें मनुष्याला वार्षिक उत्पन्न येतें तें त्या मनुष्याचें भांडवल असें गणलें जातें. हा सामान्य अर्थ अगदीं चूक आहे असें नाहीं. परंतु ज्याप्रमाणें संपत्ति म्हणजेच पैसा अशी सामान्य समजूत असते व ती कांहीं अंशीं खरी असते. परंतु पैशाखेरीज संपत्तीचीं दुसरींही पुष्कळ रूपें असतात; त्याप्रमाणेंच प्रस्तुतची गोष्ट आहे. औद्योगिक समाजांत पैशाच्या रूपानें भांडवल मापतात व पुष्कळ अंशीं पैसा हा एक भांडवलाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे खरा; तरी भांडवल पैशाखेरीज दुसऱ्याही स्वरूपाचें असतें व हीं सर्व स्वरूपें कोणतीं व त्या सर्वांमध्यें एखादा सामान्य गुण आहे किंवा नाहीं हें अर्थशास्त्रदृष्ट्या ठरवावयाचें आहे.

भांडवलाचा मूळचा अर्थ मुद्दल असा आहे. ह्मणजे सावकार जी रक्कम कर्जाऊ देतो ती त्याची मुद्दल रक्कम अगर भांडवल होय, व या मुदलापासून त्याला व्याजाच्या रूपानें वार्षिक उत्पन्न येतें; तेव्हां भांडवल ह्मणजे वार्षिक उत्पन्न देणारी संपत्ति होय. अॅडाम स्मिथनें भांडवलाचा हाच अर्थ धरला आहे; व हा अर्थ व्यवहारास धरून आहे. कारण पहिली भांडवलाची कल्पना हीच दिसते. या दृष्टीनें सर्व संपत्तीचे दोन भाग होतात; ते भांडवल व उत्पन्न हे होत, आणि या दोहोंमिळून सर्व संपत्ति होते. ज्या संपत्तीपासून वार्षिक उत्पन्न येतें तें भांडवल व जी संपत्ति मनुष्य तावडतोबच्या उपभोगास लावतो तें त्याचें उत्पन्न होय.

परंतु संपत्तीच्या कारणत्रयीपैकीं एक जें भांडवल त्याचा अर्थ वरच्यापेक्षां थोडा संकुचित आहे. अर्थशास्त्रकारांच्या परिभाषेप्रमाणें जी जी पूर्वी उत्पन्न

झालेली संपत्ति नवीन संपत्ति उत्पन्न करण्यास कारणीभूत होते ती ती सर्व संपत्ति भांडवल या नांवाखालीं मोडते. कारखान्याची इमारत, यंत्रसामुग्री, कच्चा माल व मजुरांस द्याव्या लागणाऱ्या मजुरीचे पैसे या सर्वांचा धनोत्पादक भांडवलांत समावेश होतो. अर्वाचीन काळीं पैसे असले म्हणजे या सर्व गोष्टी सहज विकत घेतां येतात; म्हणून साधारण व्यवहारांत भांडवल म्हणजे पैसा असें समजलें जातें. अर्वाचीन काळीं कोणचाही धंदा किंवा कारखाना उभारावयाचा म्हणजे प्रथमतः पैशाच्या रूपानें भांडवल जमवावें लागतें. कारण असें भांडवल सज्ज असल्याखेरीज हल्लींच्या काळीं कांहीं चालावयाचें नाहीं. या दृष्टीनेंच 'सर्वारम्भास्तण्डुलाः प्रस्थमूलाः' ही म्हण प्रचारांत पडली आहे. परंतु भांडवलाचा शास्त्रांतील अर्थ म्हणजे धनोत्पादक संपत्तिसमुदाय हाच करणें इष्ट आहे.

भांडवलाचे हे दोन प्रकार झाले. थोड्या बारकाईनें विचार केला म्हणजे आणखीही एक प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो. संपत्तीचे कांहीं प्रकार अगदीं क्षणभंगुर असतात; म्हणजे त्यांचा एकदां उपभोग घेतला असतां ते नाश पावतात. जसें– खाण्यापिण्याचे सर्व पदार्थ. परंतु कांहीं उपभोगाचे पदार्थ चिरकाल टिकणारे असतात, यांना चिरस्थायी उपभोगाचे पदार्थ असें म्हणतां येईल. या पदार्थांपासून पुष्कळ काळपर्यंत सतत उपभोग घेतां येतो. जसें घरदार, गाडीघोडा, टिकाऊ सामानसुमान, डागडागिने वगैरे. हें एक प्रकारचें भांडवल आहे. कारण यापासूनही वार्षिक उपभोग मिळतो. एखाद्या माणसानें ४००० रुपये व्यांकेंत ठेविले व त्याच्या व्याजांत तो भाड्याच्या घरांत राहिला काय, किंवा ४००० रुपयांचें स्वतःचें घर बांधलें काय, वास्तविक अर्थ एकच आहे. पहिल्या प्रकारांत त्याचें ४००० भांडवल असून त्याला व्याजाच्या रूपानें उत्पन्न मिळतें. परंतु दुसऱ्या प्रकारांत तें भांडवल रुपयांच्या रूपांत न राहतां घराच्या रूपांत आहे. परंतु त्याला घराचा उपभोग या रूपानें वार्षिक उत्पन्न येतच आहे. असे टिकाऊ संपत्तीचे प्रकार म्हणजे एक भांडवलच आहे. तेव्हां भांडवलाचे तीन प्रकार सिद्ध होतात. पहिलें उपभोगाचें भांडवल; दुसरें उत्पन्नाचें भांडवल; तिसरें धनोत्पादक भांडवल. धनोत्पादक भांडवल हें वार्षिक उत्पन्न देतें. म्हणून सर्व धनोत्पादक भांडवल उत्पन्नाच्या भांडवलांत अन्तर्भूत होतें. परंतु सर्व उत्पन्नाचें भांडवल मात्र धनोत्पादक भांडवल असतें असें नाहीं. उदाहरणार्थ.

अनें बला कर्जाऊ रुपये दिले व त्याच्याबद्दल त्याची लागवडीची जमीन गहाण लावून घेतली; तर आतां अला वार्षिक उत्पन्न येऊं कमलें खरें, परंतु बचें उत्पन्न आतां कमी झालें. कारण त्याच्या इस्टेटीतून या कर्जाचें व्याज जाऊं लागलें. येथें धनोत्पादक भांडवल होतें तितकेंच राहिलें. मात्र पूर्वी त्या भांडवलाचा ब हा एकटाच मालक होता, तेथें आतां अ आणि ब यांमध्यें मालकी विभागून गेली इतकाच फरक झाला.

वरील विवेचनावरून भांडवलाचे तीन प्रकार होतात. पहिल्यामध्यें वार्षिक उत्पन्न देण्याच्या गुणाला प्राधान्य असतें. दुसऱ्यांत नवीन धनोत्पादकता याला प्राधान्य असतें, तर तिसऱ्यांत उपभोगसातत्याला प्राधान्य असतें. आतां या तिन्ही प्रकारच्या भांडवलाच्या कल्पनेमध्यें कोणची मूळ कल्पना सामान्य आहे याचा विचार करतांना सर्वांस समान अशी एक मूळ कल्पना सांपडते व या मूळ कल्पनेप्रमाणें सर्व प्रकारच्या भांडवलाची खालील व्याख्या ठरते. "अप्रत्यक्ष रीतीनें किंवा प्रत्यक्ष रीतीनें भावी गरजा भागविण्याकरितां निराळी काढून ठेविलेली संपत्ति ह्मणजे भांडवल होय." मग या गरजा मनुष्य आपली संपत्ति दुसऱ्यास कर्जाऊ किंवा भाड्यानें देऊन येणाऱ्या उत्पन्नानें भागवो, अगर भावी धनोत्पादनांतून भागवो; अगर सतत आनंद देणाऱ्या स्थिर संपत्तीच्या मालकीनें भागवो.

भांडवलाच्या या तीन प्रकारांपैकीं धनोत्पत्तीशीं प्रत्यक्ष कार्यकारणसंबंध धनोत्पादक भांडवलाचाच आहे व अर्थशास्त्रकार ज्या वेळीं भांडवल या शब्दाचा उपयोग करतात त्या वेळीं हा धनोत्पादक प्रकारच त्यांच्या डोळ्यांपुढें असतो. याच प्रकाराचे दोन पोटभेद अर्थशास्त्रकार करितात.

धनोत्पादक भांडवल दोन तऱ्हेचें असतें. एक स्थिर व एक चल. ज्या भांडवलापासून एकसारखी पुष्कळ काळपर्यंत संपत्तीची परंपरा उत्पन्न होते तें स्थिर भांडवल होय. कारखान्याची इमारत, यंत्रें, हत्यारें व इतर स्थायिक उपकरणें ही या सदरांत येतात. हीं पुष्कळ काळपर्यंत टिकणारीं असतात व यांचेपासून एकसारखें धनोत्पादन होऊं शकतें. मात्र या स्थायिक भांडवलाची होणारी मोडतोड, नासधूस यांची नेहमीं दुरुस्ती करीत राहिलें पाहिजे हें उघड आहे. ज्यापासून एकदांच धनोत्पादन होतें तें चलभांडवल होय. कारखान्यांतला कच्चा माल,

मजुरांची मजुरी व उत्पन्न केलेला पक्का माल हीं सर्व 'चलभांडवल' या सदरांत येतात. एकदां एका कातड्याचा बूट, जोडा अगर पिशवी झाली म्हणजे तें भांडवल नाहींसें झालें. तसेंच मजुरांना एकदां मजुरी दिली म्हणजे तें भांडवल संपलें व एकदां कारखानदारानें आपला पक्का माल विकला म्हणजे त्याचें तें भांडवल संपलें.

भांडवलासंबंधीं आणखीही पुष्कळ वादग्रस्त प्रश्न आहेत. भांडवल हें नेहमीं श्रमाचेंच फळ असलें पाहिजे किंवा काय व भांडवल या सदरांत जमीन व सृष्टीच्या इतर फुकट देणग्या यांचा समावेश करावयाचा किंवा नाहीं, हे प्रश्न खरोखरी वादग्रस्त नाहींत. सामान्य व्यवहारामध्यें या सर्वांचा समावेश भांडवलांत करतात खरा; परंतु सृष्टीच्या फुकट देणग्या व विशेषतः जमीन यांचें धनोत्पादनाचें कार्य इतर भांडवलांपेक्षां इतक्या निराळ्या प्रकारचें असतें कीं, या दोहोंचा एकाच नांवामध्यें समावेश करण्यापासून कांहींएक फायदा न होतां उलट गोंधळ मात्र होण्याचा संभव आहे. शिवाय धनोत्पादनाचीं चार निरनिराळीं कारणें सांगितल्यावर भांडवल व जमीन हीं निरनिराळीं समजणेंच इष्ट आहे.

येथपर्यंत भांडवलाच्या व्याख्येचा व तत्संबंधीं एकदोन आक्षेपांचा विचार झाला. परंतु भांडवलाचें यथार्थ स्वरूप, त्याची उत्पत्ति व विशेषतः औद्योगिक प्रगतीमध्यें त्याचा कार्यभाग या गोष्टींचा जास्त स्पष्टपणें उलगडा होण्याकरितां मिल्लच्या भांडवलासंबंधींच्या प्रसिद्ध प्रमेयांचा ऊहापोह येथें करणें जरूर आहे. या प्रमेयांच्या सत्यत्वाबद्दल अर्थशास्त्रज्ञांत फारच वादविवाद माजलेला आहे व आपलीं प्रमेयें वादग्रस्त आहेत हें जाणूनच मिल्लनें आपल्या प्रमेयांचें समर्थन पुष्कळ अंगांनीं निरनिराळ्या विचारसरणानें, पुष्कळ दाखल्यांनीं व उदाहरणांनीं वाचकांस सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु या सर्व स्पष्टीकरणामध्यें सत्य आणि असत्य यांचें अशा अजब तऱ्हेनें मिश्रण झालेलें आहे व मिल्लची शब्दयोजनाही कित्येक ठिकाणीं इतक्या घोटाळ्याची व संदिग्ध आहे कीं, मिल्लच्या प्रमेयांतील सत्य व असत्य निवडून काढणें फार बिकट काम आहे. प्रथमतः उत्पत्तीचा प्रश्न सोडविण्याच्या मिषानें या प्रमेयांत मिल्लनें वांटणीचे प्रश्न हातीं घेतलेले आहेत. शिवाय या सर्व विवेचनांत भांडवल व श्रम यांचें 'पूर्ण परिवर्तन' व 'मजुरीफंड' या नांवांचीं दोन तत्त्वें गृहीत धरलीं आहेत

व या दोन तत्त्वांच्या सत्यत्वाबद्दल पुष्कळ अर्थशास्त्रकारांचा प्रतिकूल अभिप्राय पडलेला आहे. तरी पण या सर्व वादांत आतांच न पडतां मिल्लच्या प्रमेयांचा सरळ अर्थ काय आहे व त्याची सत्यता कोठपर्यंत आहे हें थोडक्यांत दाखविणें इष्ट आहे.

मिल्लचें पहिलें प्रमेय असें आहे. देशांतील उद्योगधंद्याच्या वाढीची मर्यादा देशामध्यें अस्तित्वांत असलेल्या भांडवलावर अवलंबून आहे. ह्मणजे देशांत जितकें भांडवल आहे त्याच्या सीमेपर्यंतच उद्योगधंदे देशांत वाढूं शकतील. हें प्रमेय भांडवलाच्या एका सत्यापासून तर्कानेंच निष्पन्न होतें. भांडवल हें जर संपत्तीचें एक अवश्यक कारण आहे, तर उद्योगधंद्याची व संपत्तीची वाढ, त्याचें कारण जें भांडवल त्याच्या वाढीखेरीज होणार नाहीं हें उघड आहे. खरोखरी एक विधान दुसऱ्या विधानाच्या अर्थांतून निघतें. अर्थात् हीं दोन विधानें एकाच अर्थाचीं पर्यायविधानें आहेत. परंतु हें प्रमेय प्रतिपादन करतांना मिल्लच्या मनापुढें खुला व्यापार व संरक्षण या वादग्रस्त प्रश्नांचें मनोमय चित्र सारखें उभें होतें असें दिसतें; व संरक्षणमताचें खंडण करण्याकरितां व त्या मतांतील हेत्वाभास दाखविण्याकरितां मिल्लनें हें अगदीं स्पष्ट प्रमेय नव्या शोधाप्रमाणें मोठ्या जोरानें पुढें आणिलें. उदीमपंथानें समाजामध्यें एक सामान्य समज पसरून ठेविलेला होता. तो हा कीं, उद्योगधंद्याची वाढ करण्याचा सुलभ मार्ग ह्मणजे आयात मालावर जबर जकात बसविणें हा होय. अर्थात् निवळ कायद्याच्या व नियमांच्या घटनेनें उद्योगधंदे वाढवितां येतात असा सामान्य समज झालेला होता. या समजांतील हेत्वाभास दाखविण्याकरितां मिल्लनें आपलें प्रमेय सांगितलें आहे हें उघड दिसतें. तें हें कीं, उद्योगधंद्याची वाढ देशांत अस्तित्वांत असलेल्या भांडवलावर अवलंबून आहे व जोंपर्यंत निवळ कायद्यानें नवीन भांडवल उत्पन्न करण्याची शक्ति येत नाहीं तोंपर्यंत नुसत्या जकातीच्या कायद्याच्या हातचलाखीनें एका धंद्याच्या ऐवजीं दुसरा धंदा देशांत वाढवितां येईल खरा; परंतु एकंदर धंद्यांमध्यें वाढ करतां येणार नाहीं. ह्मणजे मिल्लच्या लिहिण्याचा रोख असा होता कीं, कायद्यानें उद्योगधंद्यांस कधींच उत्तेजन देतां येणार नाहीं. परंतु अर्वाचीन अर्थशास्त्रज्ञांना हें विधान सर्वांशी कबूल नाहीं. कारण कांहीं कांहीं बाबतींत कायद्यानें सुद्धां धंद्यांची वाढ करतां येईल

असें त्यांचें म्हणणें आहे. प्रजेच्या चैनीच्या खर्चावर कर बसवून त्यांतून उत्पादक धंदेही सरकारास काढतां येतील. सारांश, या एका प्रमेयावरून अप्रतिबंध व्यापार व संरक्षण ह्या वादग्रस्त प्रश्नांचा निकाल लागणार नाहीं इतकें मात्र खास. बाकी सामान्यतः मिल्लचें प्रमेय खरें आहे. कारण अर्वाचीन काळीं भांडवलाखेरीज कोणत्याच बाबतींत सुधारणा करतां येणार नाहीं. भांडवलावांचून शेतकी सुधारतां येणार नाहीं; भांडवलावांचून नवे धंदे निघणार नाहींत; भांडवलावांचून खाणीही चालूं शकणार नाहींत व भांडवलावांचून कारखाने उभारले जाणार नाहींत. या दृष्टीनें मिल्लचें प्रमेय सत्य आहे.

मिल्लचें दुसरें प्रमेय भांडवलाच्या उत्पत्तीबद्दल अगर वाढीबद्दल आहे. 'भांडवल हें काटकसरीनें सांचलेल्या शिलकेचें फळ आहे.' या प्रमेयाचा अर्थ उघड आहे. ज्याप्रमाणें एका व्यक्तीच्या संपत्तीची वाढ, आदा व खर्च यांतील सालोसालच्या वजाबाकीवर अवलंबून आहे, त्याप्रमाणेंच राष्ट्रीय भांडवलही काटकसरीचें फळ आहे, हा या प्रमेयाचा सरळ अर्थ आहे. ज्याप्रमाणें पहिलें प्रमेय हें संरक्षणवाद्यांच्या मताचें खंडण करण्याच्या हेतूनें मिल्लनें प्रतिपादन केलें, त्याचप्रमाणें हें प्रमेय व पुढें सांगावयाचें चवथें प्रमेय हींही एका सामान्य मताच्या खंडणार्थ मिल्लनें प्रतिपादिलीं आहेत. हें सामान्य मत म्हणजे उधळेपणा हा उद्योगधंद्यांस व कामगारांच्या मजुरीस उत्तेजक आहे व चिक्कूपणा हा उद्योगधंद्यांच्या आड येणारा आहे. या समजांतील हेत्वाभास दाखविण्याकरितां मिल्लनें भांडवलाची वाढ कशी होते हें या प्रमेयांत सांगितलें आहे. परंतु या प्रमेयांतील काटकसर हा शब्द भ्रामक व संदिग्ध असल्यामुळें मिल्लच्या या प्रमेयाबद्दल फारच शुष्कवाद वाढला आहे. जर प्रत्येक मनुष्य आपल्या उत्पन्नांत काटकसर करून खर्च कमी करूं लागला तर संपत्तीच वाढणार नाहीं. कारण संपत्तीच्या वाढीचें मूळ बीज मानवी वासनांच्या वाढींत आहे. अर्थात् मनुष्याचा जितका खर्च जास्त तितकी मालास मागणी अधिक व त्याच मानानें संपत्तीच्या वाढीस उत्तेजन येईल. परंतु काटकसर याचा मिल्लनें संकुचित अर्थ केला नाहीं, व त्याच्या या प्रमेयांत असा संकुचित अर्थ घेतला नाहीं म्हणजे हें प्रमेय सत्यरूप आहे. काटकसर याचा अर्थ आयाच्या बाहेर खर्च न करणें इतकाच आहे. भांडवल हें काटकसरीचें फळ आहे; म्हणजे जे भांडवल जमवितात ते आपल्या गरजा

मारतात व मोठया हालअपेक्षा सोसतात असा अर्थ नाहीं. तर देशांतील संपत्तीची उत्पत्ति व संपत्तीचा व्यय यांमधील अंतरावरच भांडवलाची वाढ अवलंबून आहे. अर्थात् संपत्तीची वाढही पुष्कळ झाली पाहिजे व खर्चही पुष्कळ झाला पाहिजे. परंतु भांडवलाची वाढ या दोहोंच्या शिल्लक बाकींतून होते हें कांहीं खोटें नाहीं. देशामध्यें पेढयांसारख्या संस्था विपुल झाल्या म्हणजे सुद्धां भांडवल प्रत्यक्ष शिलकेशिवाय पेढयांच्या कृतीनें वाढतें हें खरें आहे. परंतु सामान्यतः मिलचें प्रमेय सत्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

मिलचें तिसरें प्रमेय भांडवलाच्या कार्यभागासंबंधीं आहे. ' भांडवल हें जरी काटकसरीचें फळ आहे तरी त्याचा संपत्ति उत्पन्न करण्याचा कार्यभाग त्या भांडवलाच्या व्ययानेंच होतो.' या प्रमेयामध्यें मिलनें ' शिल्लक किंवा काटकसरीचें फल ' यामधील व निवळ निक्कूपणाचा सांठा यामधील फरक दाखविला आहे. जी संपत्ति निवळ पेटींत, जमिनींत अगर भुयारांत सांठविली जाते ती खरोखरी भांडवल नव्हे. तें अनुद्भूत भांडवल आहे, किंवा फार तर तें उपभोगाचें भांडवल असेल. परंतु तें धनोत्पादक भांडवल नव्हे. तें धनोत्पादक भांडवल बनण्यास त्याचा योग्य प्रकारें विनियोग अगर व्ययच झाला पाहिजे. उदाहरणार्थ, धान्य जमिनींत पेरलें गेलें पाहिजे. म्हणजे धान्यस्वरूपांत त्याचा व्यय किंवा नाश झाला पाहिजे. तरच त्यापासून पुष्कळ धान्य उत्पन्न होईल. तसेंच मजुरींत देण्याचें भांडवलही मजुरांच्या खाण्यापिण्यांत खर्च झालें पाहिजे, तर मजुरांच्या मेहनतीच्या रूपानें संपत्तीच्या उत्पत्तीस त्याचा उपयोग होणार. कापूस किंवा कातडें हीं त्या स्वरूपांत नाहींशीं झालींच पाहिजेत. तर त्याचें कापड अगर बूट बनणार. सारांश, भांडवलाला सतत्वें आस्तित्व नसतें. तें आपल्या पुनरुत्पत्तीच्या रूपानें राहूं शकतें. फार वर्षे त्याच स्वरूपामध्यें राहणारें भांडवल अगर संपत्ति कोणत्याही देशांत फारच थोडी असते. जमीन व फार झालें तर घरेंदारें आणि इमारती या टिकाऊ आहेत; परंतु त्यांनासुद्धां नेहमीं दुरुस्त ठेवाव्या लागतात. तरच त्यांच्या हातून भांडवलाचा कार्यभाग होऊं शकतो.

मिलचें चवथें प्रमेय नुसतें वादग्रस्त आहे, एवढेंच नव्हे, तर सकृद्दर्शनीं तर तें विरोधाभासात्मक आहे. " मालाला मागणी म्हणजे श्रमाला मागणी नव्हे. "

हें विधान वस्तुस्थितीला, व्यवहाराला व नेहमींच्या अनुभवाला प्रथमदर्शनीं अगदीं विरुद्ध आहे. कारण मागणी अगर खप हा तर व्यापाराचा व उद्योगधंद्याचा आत्मा होय असें व्यवहारज्ञ समजतो. मागणी अधिक ह्मणजे धंद्याची तेजी व मागणी कमी ह्मणजे धंद्याची मंदी, अशी व्यवहारांत ह्मणच आहे. या ग्रंथाच्या विवेचनांतही वासनांची वाढ अगर मागणी हें एक संपत्तीच्या वाढीचें गूढ व अदृष्ट कारण आहे असें दाखविलें आहे. तेव्हां या सर्व वस्तुस्थितीच्या उलट असें प्रमेय मिलनें कां व कसें प्रतिपादन केलें हें समजण्याकरितां मिलच्या विचारसरणींत किती गोष्टी गृहित धरल्या आहेत हें ध्यानांत आणलें पाहिजे. पहिली गोष्ट उद्योगधंद्यांस उपयोगी पडणारें देशांतील भांडवल मर्यादित असतें; दुसरी ही कीं, उद्योगधंद्यांची वाढ भांडवलावर अवलंबून असते; तिसरी श्रमाचा सर्व मोबदला अगर मजुरदारांची सर्व मजुरी संपत्ति उत्पन्न होण्याच्या आधीं दिली जाते व दिली गेली पाहिजे; चवथी गोष्ट माल मागणारा मालाच्या किंमतीचे पैसे आगाऊ देत नाहीं अथवा आपल्या संपत्तीला भांडवलाचें रूप देत नाहीं. पांचवी गोष्ट देशांतील भांडवल व श्रम यांचा नाश न होतां, पाहिजे त्या उद्योगधंद्यांत तीं पुनः योजितां येतात. इतक्या सर्व गोष्टी अक्षरशः खऱ्या व वस्तुस्थितीला धरून आहेत, असें समजलें ह्मणजे मिलच्या प्रमेयाचें प्रतिपादन करतां येतें. मिलच्या प्रमेयाचा अर्थ असा आहे कीं, " कोणीही मनुष्य एखाद्या मालाला मागणी करण्याच्या योगानें श्रमाला मागणी करीत नाहीं. म्हणजे या त्याच्या कृत्यानें अधिक मजुरदारांना मजुरी मिळते असें नाहीं, किंवा पूर्वी असलेल्या मजुरांना जास्त मजुरी मिळते असेंही नाहीं. तेव्हां मजुरांच्या हिताच्या दृष्टीनें प्रत्यक्ष मजुरींत पैसे खर्च करणें ह्मणजेच त्यांच्या हिताची गोष्ट आहे. मागणीचा परिणाम फक्त देशांतील पूर्वी अस्तित्वांत असलेलें भांडवल व श्रम कोणत्या धंद्यांत योजिले जावे हें ठरविण्याकडे होतो. त्याच्या योगानें श्रमाला किंवा मजुर लोकांना उत्तेजन दिलें असें होत नाहीं. उदाहरणार्थ, एखाद्या माणसानें शंभर रुपये मखमाल खरेदी करण्यांत घालविले किंवा आपल्या घराभोंवतीं बाग करण्यांत घालविले. तर या पैशाच्या दोन प्रकारच्या विनियोगांत फरक काय ? सामान्य समजुत अशी आहे कीं, दोहोंमध्यें फरक नाहीं. पहिल्या विनियोगांत मखमालीच्या कारखान्यांतील मजुरांस मजुरी जास्त मिळाली तर

दुसऱ्यांत बागवानास व कामकऱ्यांस मजुरी जास्त मिळाली. परंतु मिलच्या मतें या दोन विनियोगांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. १०० रुपयांची मखमाल घेतल्यानें मजुरांना जास्त मजुरी मिळत नाहीं. कारण मजुरांची मजुरी कारखानदारांकडून आधींच त्यांना मिळालेली असते. परंतु १०० रुपये बागेंत खर्च करण्याच्या योगानें मजूरदार लोकांच्या श्रमाला ही नवी मागणी उत्पन्न झाली, व म्हणून त्यांना उत्तेजन मिळालें. परंतु अशी शंका घेण्यांत येईल कीं, जर त्या माणसानें १०० रुपयांची मखमाल घेतली नाहीं तर कारखानदारांचें तितकेंच नुकसान होईल, व त्या योगानें मखमालीच्या कारखान्यांतील मजुरांना मजुरी कमी मिळेल. तेव्हां मखमालींत खर्च न करण्यानें त्या गृहस्थानें मजुरांना जास्त उत्तेजन दिलें असें होत नाहीं. परंतु याला मिलचें उत्तर असें आहे कीं, मखमालवाल्याचें नुकसान ती मखमाल मुळींच न खपली तर होईल. परंतु त्याचा माल एका मनुष्यानें घेण्याचें नाकारलें म्हणून पडून राहील अशांतला भाग नाहीं. मखमालवाल्याला मखमालीची मागणी हळूहळू कमी होत आहे असें दिसून आल्यास तो आपलें भांडवल दुसऱ्या एखाद्या धंद्यांत घालील. एवंच, मालाच्या मागणीच्या फरकानें देशाचें भांडवल कमी होत नाहीं. कारण तितका माल तयार करणारें भांडवल देशांत आहेच; व एक प्रकारच्या मालाला मागणी कमी झाली तर दुसरा मागणी असलेला माल उत्पन्न करतां येईल. तेव्हां मागणीच्या कमीअधिकपणानें देशाचें नुकसान होत नाहीं. फक्त देशांतील भांडवलाची इकडून तिकडे हलवाहलव होते इतकेंच.

या विचारसरणींत एका धंद्यामधून दुसऱ्या धंद्यांत भांडवल व श्रम कांहीं एक नुकसान न होतां घालतां येतात असें गृहीत धरलें आहे, हें स्पष्टपणें दिसेलच. परंतु ही गोष्ट वस्तुस्थितीस धरून नाहीं. एका धंद्यांतून दुसऱ्या धंद्यांत भांडवल घालतांना बहुतेक भांडवल नाहींसें होतें. कारण प्रत्येक धंद्याची यंत्रसामुग्री अगदीं वेगवेगळी असते. तेव्हां एका धंद्याचीं यंत्रें दुसऱ्या धंद्यास कशीं उपयोगी पडणार! तेव्हां कोणत्याही धंद्याचे मालाला मागणी कमी झाल्यास त्या धंद्याला उतरती कळा लागते. तसेंच मालाला मागणी वाढली म्हणजे संपत्ति जास्त करतां येते. कारण देशांतील पुष्कळ भांडवल निकामी पडलेलें असतें. परंतु मागणी अगर खप याचा संपत्तीच्या वाढीस कसा उपयोग आहे हें मार्गें

एका भागांत दाखविलेंच आहे, त्याची येथें पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं.
वरील प्रमेयें प्रतिपादन करण्यांत भांडवलाबद्दल दोन गोष्टींचें महत्त्व वाचकांस सांगण्याचा मिळचा हेतु होता. त्या दोन गोष्टी ह्याः—पहिली भांडवल, हें संपत्तीच्या उत्पत्तीस अपरिहार्य आहे व दुसरी—भांडवलाची वाढ ही तात्कालिक उपभोगाच्या विलंबावर अवलंबून आहे.

---

# भाग सहावा.

## योजक अगर कारखानदार.

या भागांत संपत्तीच्या उत्पत्तीच्या शेवटच्या कारणाचा विचार करावयाचा आहे. समाजाच्या व उद्योगधंद्याच्या उत्क्रांतीमध्यें हें कारण शेवटीं प्रादुर्भूत होतें. परंतु जरी तें मागाहून अस्तित्वांत येतें तरी त्याचें महत्त्व मात्र कमी नाहीं. उलट जसजसा समाज आधिभौतिक मार्गांत पुढें पाऊल टाकतो तसतसें या शेवटच्या कारणाचें महत्त्व अधिक वाढतें. समाजाच्या बाल्यावस्थेंत संपत्तीची उत्पत्ति बहुधा नसतेच म्हटलें तरी चालेल; व त्या वेळीं मनुष्याला आपल्या गरजा सृष्टीच्या फुकट देणग्यांनीं भागवितां येतात. म्हणजे या काळीं संपत्तीचें पहिलें कारणच प्रधानभूत असतें. पुढें त्याला मनुष्याच्या श्रमाची जोड लागते, व त्या श्रमाला थोडेंसें प्राधान्य येतें. समाजामध्यें ज्ञानवृद्धि व संपत्तीची वृद्धि होऊन भांडवल उत्पन्न झालें म्हणजे श्रमापेक्षां भांडवलाचें पारडें वर जातें व अत्यंत सुधारलेल्या देशांत तर शेवटच्याचें म्हणजे योजकाचें अगर कारखानदाराचें महत्त्व जास्त वाढतें. कारण समाजामध्यें सृष्टीच्या शक्ति असतील; समाजांत श्रम करणारे लोकही विपुल असतील व समाजांत इतस्ततः पडून राहिलेलें भांडवलही पुष्कळ असेल; परंतु या तीन कारणांपासून संपत्ति उत्पन्न करण्यास या सर्वांचा मिलाफ करणारा योजक पाहिजे. " योजकस्तत्र दुर्लभः " या न्यायानें योजकाची फार वाण असते. कारण अर्वाचीन काळीं आधिभौतिक

शास्त्रांचें ज्ञान पुष्कळ वाढल्यामुळें व त्या ज्ञानाचा प्रत्यक्ष धंद्यांत व व्यवहारांत पुष्कळ उपयोग होऊं लागल्यामुळें प्रत्येक धंद्याला उपयोगी अशीं हजारों यंत्रें व नैसर्गिक शक्तींचीं उपकरणें प्रचारांत आलीं आहेत. यामुळें हल्लीं उद्योगधंदे घरगुती तऱ्हेचे राहिले नाहींत, तर त्यांना प्रचंड कारखान्याचें रूप आलें आहे. व हे प्रचंड कारखाने चालविणें हें एक स्वतंत्र व महत्वाचें उत्पादनाचें अंग झालें आहे. कारण हल्लींच्या काळच्या प्रचंड कारखान्यांत हजारों मजूर असतात; या सर्वांच्या कामांचें एकीकरण करणें; प्रत्येकाकडून आपआपलें नेमून दिलेलें काम वेळच्या-वेळीं करून घेणें; इतक्या मोठ्या मजूरवर्गाला शिस्तींत राखणें; एकंदर कारखान्यावर देखरेख करणें व सर्वांना लागेल ती विशेष माहिती देणें; इतकेंच हल्लींच्या कारखानदाराचें काम नाहीं; तर त्याचें कर्तव्य यापेक्षांही जबाबदारीचें आहे; त्याला सर्व संपत्तीच्या उत्पादनाची जबाबदारी अंगावर घ्यावी लागते; कोणचा माल कारखान्यांत काढावा; तो कोणच्या नमुन्याचा काढावा; तो किती प्रमाणांत काढावा; व कोणत्या वेळीं काढावा; तसेंच तो कोणास व कोणत्या दरानें विकावा; पैसे वसूल कसे करावे; कच्चा माल खरेदी कोठें, कसा व केव्हां करावा; मालाला गिऱ्हाइकी कशी मिळवावी; या सर्व गोष्टी कारखानदारालाच कराव्या लागतात व ही सर्व कामें उत्तम तऱ्हेनें पार पडण्यास मनुष्यामधल्या सर्वोत्तम मानसिक शक्ति लागतात. पूर्वीच्या काळच्या सैन्यांत सेनापतीला इतकें महत्त्व नव्हतें; प्रत्येक शिपायाच्या शौर्यावर लढाईचा जयापजय अवलंबून असे; परंतु अर्वाचीन काळीं सैन्यांतील व्यक्तींचें महत्त्व कमी झालें आहे. जयापजय हे सेनापतीच्या हुशारीवर व सर्व सैन्याच्या हालचाली धोरणानें करविण्यावर आहे; कारण शिकलेलें सैन्य म्हणजे कळसूत्री बाहुल्याप्रमाणें आहे; सूत्रधार जिकडे नेईल तिकडे तें जाणार. हीच स्थिति हल्लींच्या उद्योगधंद्याची आहे. ज्याप्रमाणें हल्लींच्या काळीं सेनापति व सेनानायक यांच्याखेरीज सैन्याचें क्षणभरसुद्धां चालावयाचें नाहीं, त्याप्रमाणेंच हल्लींच्या काळीं उद्योगधंद्यांतही नायक व धंद्याचा सेनापती यांखेरीज चालावयाचें नाहीं व असे नायक म्हणजे कारखानदार अगर योजक होत. संपत्तीच्या उत्पत्तीची सर्व जबाबदारी यांच्यावरच असते. धंद्यांत नफा होणें व यश येणें हें त्यांच्याच कर्तबगारीवर अवलंबून असतें. हल्लींच्या काळीं अशीं पुष्कळ उदाहरणें दृष्टीस

पडतात कीं, एखादा कर्तृत्ववान् माणूस एखाद्या गांवच्या धंद्याला ऊर्जितावस्था आणतो. परंतु त्याच्या पश्चात् भांडवल, मजुरी व इतर सर्व साहित्य तयार असतांना धंदा बुडतो. कारण त्याच्या मुलाच्या अंगांत योजकाचे गुण असतातच असा नेम नाहीं, व अयोग्य माणसाच्या हातांत धंदा गेल्यामुळें त्या धंद्याचें मातेरें होतें.

हिंदुस्थानाकडे पाहिलें तर या शेवटच्या वर्गाची हिंदुस्थानांत बरीच उणीव आहे असें दिसून येईल. हिंदुस्थान हा देश सुपीक आहे; सृष्टीच्या नैसर्गिकशक्ति येथें मुबलक आहेत. मजूर वर्ग तर हवा तेवढा आहे. भांडवल मात्र पुष्कळ कमी आहे. परंतु योजक अगर कारखानदार त्यापेक्षांही दुर्मिळ आहेत. म्हणूनच हिंदुस्थान देश उद्योगधंद्यांत सुधारलेल्या राष्ट्रांच्या इतका मागें आहे. हल्लींच्या काळीं संपत्तीच्या वाढीस योजकांचें केवढें साहाय्य होतें याचें हिंदुस्थानांतील उदाहरण म्हणजे कै० टाटासाहेबांचा मध्यप्रांतांतील प्रचंड लोखंडाचा कारखाना होय. या कारखान्यामुळें गेल्या लढाईच्या काळांत सर्व रेलवेची लोखंडाची मागणी; तसेंच लढाईखात्याची मागणी देशांतील लोखंडानें भागवितां आली. यावरून त्याचें अवाढव्यत्व लक्षांत येईल. परंतु एवढा मोठा कारखाना कै० टाटा यांच्यासारखा योजक मिळाला म्हणूनच अस्तित्वांत आला; नाहीं तर जमिनींत लोखंड होतें; मजुर कामाखेरीज देशांत मरत होते व भांडवलही नव्हतें असें नाहीं. परंतु या सर्व सामग्रीला एकत्र आणणें, कारखान्याची जुळवाजुळव करणें, कारखाना यशस्वी होईल अशा भरंवशावर प्रथमतः लाखो रुपये खर्च करून प्रयोग करून माहिती मिळविणें व प्रथमपासून कारखान्याची जबाबदारी अंगावर घेणें इतक्या गोष्टी करणारा दुर्लभ योजक मिळाला म्हणून इतक्या मोठ्या प्रमाणावर संपत्ति उत्पन्न करणारा एक कारखाना निघाला. कै० टाटाशेटजींच्या कल्पकतेचें व योजकतेचें दुसरें उदाहरण म्हणजे वीज उत्पन्न करणाऱ्या कारखान्याची कल्पना. या कल्पनेच्या सिद्ध्यर्थ प्रथमतः लाखो रुपये खर्च करावे लागले व एक योजना यशस्वी झाल्यापासून टाटाकंपनीनें असल्या कित्येक तरी योजना हातांत घेऊन लाखो हॉर्सपावरची वीज मुंबईच्या कारखान्याकरितां निर्माण केली आहे व नवीन योजना चालू आहेत.

यासंबंधीं आणखीही एका कारखान्याचें उदाहरण घेण्यासारखें आहे; तें म्हणजे

अलेंबिक केमीकल वर्क्स हें होय. हा कारखाना कै० ठाकोरशेटजींच्या वर निर्दिष्ट केलेल्या कारखान्याइतका प्रचंड नसल्यामुळें तो तितका चमत्कृतिजनक नाहीं. तरी पण या कारखान्यामध्ये सुद्धां योजकाचें महत्त्व दिसून येतें. पश्चिम हिंदुस्थानांत तरी असला कारखाना अगदीं नवीन आहे यांत शंका नाहीं. या कारखान्यांत हरत-हेच्या वनस्पतींचे अर्क व सुगंधी फुलांचीं अत्तरें अर्वाचीन रासायनिक पद्धतीनें काढण्यांत येतात. येथेंही कच्चा माल, मजूरवर्ग वगैरे इतर साधनें असतांना असा कारखाना गेल्या पन्नास वर्षांत निघूं शकला नाहीं. कारण शास्त्रीय ज्ञान असलेल्या योजकाची वाण. परंतु या कारखान्यास कै० गज्जर, कै० कोटीभास्कर यांसारखे उत्तम रसायन-पदवीधर लाभले व त्यांच्या परिश्रमानें हा कारखाना ऊर्जितावस्थेप्रत पावला. परंतु देशाच्या दुर्दैवानें रा. कोटीभास्कर यांस काळानें अकालीं या जगांतून ओढून नेलें व पुन्हां असा योजक मिळून कारखाना उत्तम तऱ्हेनें चालतो किंवा नाहीं, अशी लोकांना व मालकांना भीति उत्पन्न केली.

परंतु हें काम कितीही अवघड असलें व त्याला केवढ्याही मोठ्या मानसिक शक्ति लागत असल्या तरी योजक अगर कारखानदार यांचा संपत्तीच्या उत्पत्तीमधला कार्यभाग 'श्रम' या कारणांत येतोच; कारण, श्रमाची जी व्याख्या दिली आहे ती इतकी व्यापक आहे कीं, त्यामध्यें सर्व प्रकारच्या श्रमांचा अंतर्भाव होतो. निवळ बांधकाम्या रोजमजुराच्या मेहनतीपासून तों श्रेष्ठ मानसिक गुणांनीं युक्त अशा कामगाराच्या श्रमापर्यंत सर्व अर्थशास्त्रदृष्ट्या 'श्रम' च होत; तर मग योजक व कारखानदार यांना संपत्तीच्या उत्पत्तीचें स्वतंत्र व निराळें कारण मानण्याचें काय कारण, असा एक आक्षेप वरील विवेचनावर येईल. त्याला उत्तर असें आहे कीं, मजुरांची अगदीं खालपासून वरच्या दर्जापर्यंत एक चढती माला झाली, तरी या सर्व चढत्या मालेमध्यें व कारखानदारामध्यें जातीचा किंवा प्रकाराचा भेद आहे. सर्व मजूर कांहीं एक ठरीव मुशाहिरा घेऊन कांहीं एक ठरीव काम करतात. म्हणजे त्यांच्या श्रमाचा मोबदला करारानें अगर रूढीनें ठरलेला असतो. हे लोक संपत्तीच्या उत्पादनाला मदत करतात; परंतु हे संपत्त्युत्पादकांच्या दासवर्गांमध्यें येतात; हे संपत्तीच्या उत्पादनाची जबाबदारी अंगावर घेत नाहींत. आतां कारखान-

दाराचा हा विशेष आहे कीं, तो कोणत्या तरी तऱ्हेची संपत्ति उत्पन्न करण्याची सर्व जबाबदारी आपल्या अंगावर घेतो व जबाबदारीबरोबर धोकाही येतोच. कारण अर्वाचीन काळीं संपत्त्युत्पादन हें मनुष्य स्वतःच्या गरजा भागविण्याकरितां कधींच करीत नाहीं. कारण तो जी संपत्ति उत्पन्न करतो ती इतक्या मोठ्या प्रमाणावर करतो कीं, त्याची स्वतःची गरज किंवा मागणी म्हणजे 'दर्यामें खस-खस' या मासल्याची असते. अर्थात् ही सर्व संपत्ति विकून किंवा तिला गिऱ्हाईक शोधून काढून ती संपत्ति योग्य किंमतीला विकून झाल्यावर व बाकीच्या संपत्तीच्या उत्पादक वर्गांच्या मोबदल्याची भरपाई झाल्यावर जें कांहीं राहील तो त्याचा नफा असतो. म्हणजे मजुराप्रमाणें कारखानदाराचा मोबदला ठरलेला नसतो; त्या मोबदल्यामध्यें धोक्याचा अंश सदोदित अस्तित्वांत असतो. त्यामुळेंच कारखानदाराचें काम इतकें कठिण असतें. सर्व कारखाना सुयंत्रित चालवून होतां होईल तितकी काटकसर करून जर तो कारखाना चालवील तर त्याला नफा अगर फायदा मिळेल, नाहीं तर त्याचा कारखाना आंतबट्ट्याचा होईल. म्हणून कारखानदाराचें इतकें महत्त्व आहे. कमी कर्तृत्ववान् मनुष्याच्या हातीं जर कारखाना जाईल तर तो संपत्ति वाढविण्यास साधनीभूत न होतां संपत्ति-नाशाचें मात्र कारण होईल. समाजाच्या बाल्यावस्थेंत व उद्योगधंदे घरगुती स्थितींत असतांना प्रत्येक उद्योगी मनुष्य कारखानदारच असतो. या स्थितींत मजूर व कारखानदार यांचें पृथक्करण झालेलें नसतें. परंतु जसजशी समाजाची आधिभौतिक प्रगति होते तसतसा मजुरापासून कारखानदाराचा वर्ग भिन्न व स्वतंत्र होतो.

येथें संपत्तीच्या मूर्त कारणांचा विचार पुरा झाला. या कारणांपैकीं पहिलीं तीन कारणें साधनासारखीं आहेत, तर शेवटचें साधकासारखें आहे. म्हणजे पहिलीं तीन साधनें एकत्र आणून त्यांचेपासून प्रत्यक्ष संपत्ति उत्पन्न करणें हें साधकाचें काम आहे. परंतु हीं साधनें एकत्र आणण्याच्या निरनिराळ्या तऱ्हा अगर पद्धति आहेत व त्यांवर संपत्तीच्या वाढीचा कमीअधिकपणा अवलंबून आहे. तेव्हां आतां त्या पद्धतींचें विवेचन करणें ओघानेंच प्राप्त होतें. तरी त्या विवेचनास पुढील भागांत प्रारंभ करूं.

# भाग सातवा.

## श्रमविभाग.

**अॅडाम स्मिथनें** आपल्या अर्थशास्त्रावरील पुस्तकाचा प्रारंभ श्रमविभागाच्या तत्वाच्या विवेचनापासून केला आहे. कारण संपत्तीच्या उत्पत्तीच्या कारणांचा विचार करतांना हें तत्व त्याचे ध्यानांत प्रथम आलें व त्याचा हा एक मोठा शोधच होता. शिवाय अर्थशास्त्रांतील आपल्या पूर्वी झालेल्या पंथापासून आपल्या पंथाचा निराळेपणा पुढें मांडण्याकरितां श्रम व श्रमविभागाचें तत्व यांनाच **अॅडाम स्मिथनें** प्राधान्य दिलें. त्याच्या वेळच्या दुसऱ्या ग्रंथकारांनीं व त्याच्यामागून झालेल्या ग्रंथकारांनीं या तत्वाला दुसरा पारिभाषिक शब्द योजण्याचा प्रयत्न केला. परंतु या तत्त्वाला **अॅडाम स्मिथनें** दिलेलें 'श्रमविभाग' हेंच नांव सर्वसंमत होऊन प्रचारांत आलें.

'श्रमविभाग' या पदाचा **अॅडाम स्मिथनें** संकुचितार्थानें उपयोग केलेला नाहीं, तर त्यानें तें पद फार व्यापक अर्थानें योजलेलें आहे. पुढील ग्रंथकारांनीं ज्याला श्रमसंयोग म्हटलें आहे त्याचाही अन्तर्भाव श्रमविभाग या व्यापक पदांत त्यानें केलेला आहे.

'श्रमविभाग' या तत्त्वाचीं दोन अंगें आहेत, एक श्रमविभाग (संकुचित अर्थानें) व दुसरें श्रमसंयोग. हीं दोन अंगें परस्परावलंबी व परस्परपूरक अशीच आहेत. एकाचा जितका प्रसार अगर विकास होतो तितकाच दुसऱ्याचाही होतो हें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

संकुचित अर्थाच्या श्रमविभागाचे तीन पोटभाग होतात; एक सामाजिक श्रमविभाग, दुसरा औद्योगिक श्रमविभाग व तिसरा स्थानिक श्रमविभाग.

सामाजिक श्रमविभागाचें तत्त्व समाजाच्या प्रारंभापासून अमलांत येतें. मनुष्याच्या अगदीं रानटी स्थितींत प्रत्येक मनुष्य आपल्या गरजा आपण भागवीत असतो. शिकार आपण करावयाची; बाण व तिरकमठा आपणच तयार करावयाचा, मासे आपले आपणच धरावयाचे व जाळेंही आपणच करा-

वयाचें; झोपडीही आपणच बांधावयाची व थंडी निवारण करण्याकरितां कातडी-ही आपणच तयार करावयाची व आपण मिळवून आणलेल्या संपत्तीचें संरक्षण आपणच करावयाचें; अशा बहुविध प्रकारचा प्राथमिक स्थितींतील माणसाचा व्यवसाय असतो. परंतु या स्थितींतही बायका व पुरुष यांच्या कामांमध्यें पृथक्करण झालेलें असतेंच. घरांतलीं कामें बायकांचीं व बाहेरचीं कामें पुरुषांचीं, हा पहिला श्रमविभाग होय. मनुष्य गुरेंढोरें बाळगून आपली उपजीविका करून राहूं लागल्यावर तर हा श्रमविभाग जास्त दृढ होतो. दुहितृ हा संस्कृत शब्द या काळाचा द्योतक आहे. त्या काळीं मुलीचें काम दूध काढण्याचें होतें असें दिसतें. म्हणून या कामावरून 'दुहिता' —दूध काढणारी— म्हणजे मुलगी असा पुढें अर्थ झाला. परंतु पुढें मनुष्याच्या असें अनुभवास आलें कीं, एका माणसानें एकाच कामांत आपला सर्व वेळ व सर्व सामर्थ्य खर्च करणें हें त्याच्या व समाजाच्या दृष्टीनेंही फायद्याचें आहे. कारण या योगानें हीं कामें चांगलीं होऊन सगळ्यांच्या गरजा जास्त सुलभ रितीनें भागविल्या जातात. अर्थात धंद्याचा हा श्रमविभाग समाजाच्या वाढीस व सुखास अत्यंत अवश्य आहे असें दिसून येतें. प्लेटोनें हेंच श्रमविभागाचें तत्त्व समाजाच्या उत्पत्तीचें कारण म्हणून दिलें आहे. धंद्याचें पृथक्करण हें तत्त्वही आर्यलोकांच्या जातिभेदाच्या मुळाशीं आहे. समाजाचे चार वर्ण हें मुख्य धंद्याचें पृथक्करण आहे. एका वर्गानें समाजाच्या संरक्षणाचें काम हातीं घ्यावें; एकानें समाजाचा धार्मिक व ज्ञानविषयक कार्यभाग हातीं घ्यावा; एकानें संपत्तिविषयक कार्यभाग हातीं घ्यावा; तर राहिलेल्यांनीं वरील तिन्ही वर्गांची सेवाचाकरी करून त्यांना आपआपल्या धंद्यांत पूर्ण लक्ष घालण्यास फुरसत द्यावी. हे चार मुख्य धंदे मनुष्यांनें आपआपल्या गुणाप्रमाणें करावे. ही वर्णव्यवस्थेची कल्पना व उपपत्ति म्हणजे श्रमविभागाचेंच तत्त्व होय. या व्यवस्थेचें पुढें औद्योगिक स्वरूप गौण होऊन त्याच्या धार्मिक व सामाजिक स्वरूपाला प्राधान्य आलें ही गोष्ट निराळी. तेव्हां जसजशा समाजाच्या गरजा वाढतात तसतसे निरनिराळे धंदे वाढतात, व हे स्वतंत्र धंदे करणाऱ्या लोकांचे तितके निरनिराळे वर्ग होतात. हें श्रमविभागाचें तत्त्व समाजाला व्यवस्थित स्वरूप देतें, इतकेंच नव्हे तर प्रत्येक मनुष्य आपआपल्या गुणानुरूप एक काम सदोदित करूं लागला म्हणजे त्याचें कौशल्य वाढतें. त्याला पुष्कळ लोकांच्या गरजा चांगल्या

तऱ्हेनें भागवितां येतात. व समाजांत कलाकौशल्य व हस्तकौशल्य यांची फार वाढ होते व त्यायोगें संपत्तीही पुष्कळ वाढते.

ज्याच्या योगानें संपत्तीची वरच्यापेक्षांही जास्त विलक्षण वाढ होते तो श्रमविभाग म्हणजे औद्योगिक श्रमविभाग होय. यामध्यें एका धंद्यांतील निरनिराळ्या कृतींचें पृथक्करण केलें जातें. याचें इतिहासप्रसिद्ध उदाहरण म्हणजे अॅडाम स्मिथनें दिलेलें टांचण्यांच्या कारखान्याचें उदाहरण होय. एक लोहार जर दिवसाचे दहा बारा तास काम करून टांचण्या करूं लागला तर त्याला एका दिवसांत २०।२५ टांचण्या होणें मुष्किलीचें होईल. परंतु येथें श्रमविभागाचें तत्त्व अमलांत आणलें म्हणजे १० कामगार एका दिवसांत हजारों टांचण्या करूं शकतील. कारण टांचणी करण्याच्या सर्व व्यापारांपैकीं एकच कृति एक मनुष्य करतो. व यामुळें काम जलद व सुबक होतें. एक मनुष्य तार कापतो; एक ती ओढतो; एक बेडें तयार करतो; एक नेढें बसवितो; व एक त्याला पाणी देतो; व शेवटीं एक टांचण्या कागदांत हारीनें लावतो. याप्रमाणें तार तुटण्यापासून तों टांचण्यांचीं बिंडोळीं बनेतोंपर्यंत सारखा क्रम चालतो. हिंदुस्थानांत टांचण्यांचा कारखाना पाहण्यांत येण्याचा संभव नाहीं. म्हणून आपल्या इकडील बहुतेकांच्या व्यवहारांतील एका पदार्थाचें उदाहरणही येथें उपयोगी पडेल. आपण जेवण्याला पितळी वाट्या घेतों. या हल्लीं कारखान्यांत यंत्राच्या साहाय्यानें करतात. त्या किती जलद होतात हें कारखाना प्रत्यक्ष पाहिल्यावांचून ध्यानांत येणार नाहीं. तेथें सर्व काम यंत्रानेंच होतें. प्रथमतः एक मनुष्य, वाट्या जेवढ्या पाहिजे असतील तितक्या रुंदीचे पितळेच्या पत्र्याचे तुकडे यंत्रानें पाडतो; हे तुकडे घेऊन दुसऱ्या यंत्रानें दुसरा मजूर त्याचे चौकोनी तुकडे करतो. तिसरा मजूर तुकडे सारखे जुळवून चवथ्या मजुराजवळ देतो. तो तिसऱ्या यंत्रानें चौकोनी तुकड्यांचे वर्तुळ तुकडे बनवितो पुढें हे वर्तुळ तुकडे चवथ्या यंत्रामध्यें घालून दाबानें त्याला वाटीचा आकार एक मजुर आणतो. येथें ओबडधोबड वाटी तयार होते. पुढें ही वाटी एका यंत्राला लावून तिची कडा साफ व गुळगुळीत केली जाते. वाटी दाबतांना पत्र्याला जो खडबडीतपणा आलेला असतो तो एका यंत्रानें साफ केला जातो व शेवटीं ही वाटी चरकावर चढून तिला पॉलिश आणिलें जातें. पत्र्यापासून याप्रमाणें वाटी तयार

होण्यास फक्त आठ कृति लागतात व त्या सर्व यंत्रानें होत असल्यामुळें अत्यंत जलद होतात. यामुळें हीं आठ माणसें एका दिवसांत हजारों वाट्या तयार करूं शकतात. एकएकटा तांबट या वाट्या करावयास बसला तर त्याच्यानें पांच पंचवीस वाट्या सबंध दिवसांत होण्याची मारामार पडेल. परंतु आठ तांबट जर साध्या हातानें काम करूं लागले तरी त्यांच्या श्रमविभागानें पूर्वीपेक्षां किती तरी पट काम होईल. दुसरें, आपल्या इकडील श्रमविभागाचें नेहमींचें उदाहरण म्हणजे गवताच्या गंजी रचण्याचें होय. येथेंही प्रत्येक कामकरी जर एकटा काम करूं लागला तर त्याचे हातून फारच थोडें काम होईल. परंतु गंजी रचतांना मजूर हाताहाताच्या अंतरावर शिड्यांवर हारीनें बसतात व गवताची पेंढी एकाच्या हातून दुसऱ्याच्या हातीं याप्रमाणें काम चालतें. हें काम इतकें जलद चालतें कीं, दहा वीस मजूर डोंगराएवढाल्या गंजी हां हां ह्मणतां घालूं शकतात. या उदाहरणांत श्रमविभाग व श्रमसंयोग हीं दोन्हींही तत्त्वें दिसून येतात. गंज रचली जाण्यांत सर्व मजुरांचे श्रमाचा संयोग व्हावा लागतो. परंतु श्रमविभागाच्या रूपानें संयोग झाला ह्मणजे काम फार जलद होतें व तें चांगलेंही होतें.

संपत्तीच्या उत्पादनाच्या बाबतींत या तत्त्वाचे फायदे खालीलप्रमाणें होत.

पहिला फायदा—कामदाराच्या कौशल्याची वाढ हा होय. मनुष्य तेंच तेंच काम बारमहा करीत असला ह्मणजे त्याची हातचलाखी विलक्षण वाढते. ' संवयीनें पूर्णता येते, ' या ह्मणीचा हाच अर्थ आहे. रेलवेवरील टेलिग्राफ सिग्नलरच्या कामाकडे पाहिलें म्हणजे संवयीनें किती जलद काम करतां येतें याचा उत्तम प्रत्यय येतो. सिग्नलर लोक आपण जितक्या जलद बोलतों तितक्या जलद बहुतेक तारा देऊं शकतात. तसेंच संवयीनें बाजाच्या पेटीवाल्याला किती विलक्षण हस्तचापल्य येतें हें पाहून आश्चर्य वाटतें. तसेंच नेहमीं सराफाचा धंदा करणाराला रुपये किती जलद मोजतां येतात हें पाहून नवशिक्या माणसाला विलक्षण नवल वाटतें. सारांश, सरावानें मनुष्याला काम चांगलें करतां येऊन तें लवकरही करतां येतें. ह्मणजे संपत्तीच्या गुणांत व प्रमाणांत अशी दुहेरी वाढ होते.

दुसरा फायदा—एका कृत्यापासुन दुसऱ्या कृत्याला जातांना फुकट जाणारा वेळ वांचतो. जेव्हां एक कामदार एखाद्या वस्तूच्या उत्पादनांतील सर्व क्रिया एकटाच करतो, त्या वेळीं इकडून तिकडे जाण्यांत, हीं हत्यारें टाकून दुसरीं घेण्यांत

किती तरी वेळ जातो. शिवाय येथें मानसिक शास्त्रांतलें एक तत्त्व लागू पडतें. एका कामापासून दुसऱ्या कामांत मन गुंतविण्यास थोडा काळ जातो. यामुळें या नव्या कामांत प्रथमतः मन लागत नाहीं व मन लागल्याखेरीज काम चांगलें व जलद् उठत नाहीं हें उघड आहे. परंतु मनुष्य एकच काम करीत असला ह्मणजे त्याचें एकाग्र चित्त लागतें व काम जलद् उठतें.

श्रमविभागाचा तिसरा फायदा ह्मणजे त्याच्या योगानें श्रम वांचविणाऱ्या यंत्रांचा शोध लागतो. मनुष्य एक काम एकसारखें करीत असला ह्मणजे त्या कामांतील सर्व खुब्या त्याच्या ध्यानांत येतात; यामुळें हत्याराच्या व यंत्राच्यामधील दोष लक्षांत येऊन नवीन शोध लागण्याचा संभव असतो व असलेल्या यंत्राची सुधारणा होते. अर्वाचीन काळीं मोठमोठे शोध आधिभौतिक-शास्त्रज्ञांनीं किंवा शास्त्रांचीं तत्त्वें माहीत असणारांनीं केले आहेत हें खरें, तरी पण त्या शोधांमध्यें कामकऱ्यांनीं वारंवार सुधारणा घडवून आणून त्या शोधांची उपयुक्तता वाढविली आहे यांत शंका नाहीं. **ॲडाम स्मिथनें** श्रमविभागाचे हे तीन प्रमुख फायदे सांगितले आहेत. दुसऱ्या फायद्याबद्दल मिल्ल वगैरेंनीं प्रतिकूल टीका केली आहे. त्यांचें ह्मणणें, एकसारखें एकच काम केलें ह्मणजे तिकडे मन उत्तम लागतें हें सर्वस्वी खरें नाहीं. कामाच्या अशा एकतानतेनें मन उलट त्या गोष्टीकडे लागत नाहीं व क्षणोक्षणीं नवें नवें काम करणारा मनुष्य केव्हां केव्हां चलाख व ताज्या मनाचा राहूं शकतो, हें खाणावळींतील किंवा दुकानांतील नोकरांच्या उदाहरणांवरून दिसून येईल. परंतु **ॲडाम स्मिथचें** ह्मणणें सामान्यतः खरें आहे; श्रमविभागानें वेळाचा पुष्कळ फायदा होऊन काम जलद होऊं लागतें हें कांहीं खोटें नाहीं. आतां मानसिक विकासाच्या दृष्टीनें एका मनुष्यानें सतत एकच काम करीत राहणें चांगलें किंवा वाईट हा वादग्रस्त प्रश्न असेल, परंतु त्याचा येथें विचार करण्याची जरूरी नाहीं.

पुढील ग्रंथकर्त्यांनीं श्रमविभागाचे आणखीही दोनतीन फायदे दाखविले आहेत. श्रमविभागाच्या योगानें काम शिकण्याचा वेळ पुष्कळ कमी होतो. एखादा पूर्ण धंदा शिकावयाचा असल्यास किंवा पुष्कळ धंदे शिकावयाचे असल्यास किती तरी वर्षें शिक्षणांत व उमेदवारींत घालवावीं लागतात. परंतु जेथें एखाद्या धंद्यांतील एखादी कृतीच शिकावयाची असते तेथें फार दिवस शिक्षण व फार दिव-

त्यांची उमेदवारी लागत नाहीं.

श्रमविभागाच्या योगानें कामदारांचें वर्गीकरण करतां येऊन प्रत्येकाला आपआपल्या शक्तीप्रमाणें, कौशल्याप्रमाणें व इतर गुणांप्रमाणें काम करतां येऊन त्या त्याप्रमाणें कमीअधिक मोबदला मिळवितां येतो. जेव्हां एकाच मनुष्याला एखादा सबंध माल तयार करावा लागतो, त्या वेळीं त्यांतल्या कांहीं कृति सोप्या व कांहीं कमी श्रमाच्या असल्यामुळें व कांहीं जास्त कुशलतेच्या असल्यामुळें असा माल तयार करण्यास सर्वांत कुशल कामदार नेमावा लागतो; व याच कामगाराला कमी कुशलतेच्या कृति कराव्या लागतात व त्याची मजुरी मात्र जास्त कुशलतेच्या कामाप्रमाणें द्यावी लागते. यामुळें सर्व मालाला खर्च जास्त येतो. परंतु श्रमविभागाचें तत्त्व अमलांत आल्यानें कुशल कामगाराला त्याच्या गुणाप्रमाणें मजुरी मिळून शिवाय माल स्वस्तच पडतो. श्रमविभागाच्या तत्त्वामुळें अर्वाचीन काळीं बायकांच्या व मुलांच्या कामाला विशेष मागणी उत्पन्न झालेली आहे. जीं कामें फार मेहनतीचीं नाहींत अशा कामाला पुरुष कामगार लावण्याची गरज नाहीं. श्रमविभागाच्या तत्त्वानें थोडेंसें शारीरिक व्यंग असलेला माणूसही काम करूं शकतो व त्याच्या श्रमाला किंमत येते व जास्त कौशल्याच्या माणसाला आपला सर्व वेळ जास्त कौशल्याच्या कामांत खर्च करतां येऊन मजुरी जास्त मिळवितां येते.

शेवटचा फायदा ह्मणजे श्रमविभागाच्या योगानें धंद्यामध्यें यंत्राचें साहाय्य हवें तितकें घेतां येतें. खरोखरी यंत्रांची वाढ व श्रमविभाग या परस्परावलंबी गोष्टी आहेत. एखादा नवा शोध लागला ह्मणजे तितकें काम यंत्रांनीं होऊं लागतें व तें यंत्र चालविण्यास एक मनुष्य लागूं लागतो व श्रमविभाग जास्त करतां येतो. श्रमविभाग जास्त झाला ह्मणजे यंत्रांची वाढ अगर सुधारणा होते

हा श्रमविभाग जसाजसा वाढत जातो त्या मानानेंच श्रमसंयोगही वाढत जातो. हीं दोन तत्त्वें परस्परावलंबी आहेत, अगर एकाच वस्तूच्या त्या दोन बाजू आहेत असें ह्मटलें तरी चालेल. हा संयोगही दोन तऱ्हेचा आहे. एक साधा व दुसरा संमिश्र. एक काम करण्याकरितां जेव्हां एकाच जातीचा पुष्कळ श्रम एकत्र आणावा लागतो, तेव्हां त्याला साधा श्रमसंयोग ह्मणतात. ज्याप्रमाणें एखादें मोठें जड ओझें उचलण्यास दहावीस मजुरांचे श्रम एकसमयावच्छेदेंकरून

एकट्याने कापतात, पण बांधण्यास पुष्कळ गवंडी, पुष्कळ सुतार, पुष्कळ मजूर लागतात. संमिश्र श्रमसंयोगामध्यें एक काम करण्यास निरनिराळ्या जातींच्या पुष्कळ श्रमांचा संयोग असतो. ही श्रमविभागाचीच दुसरी बाजू आहे. एक टांचणी किंवा वाटी करण्यास दहाबारा निरनिराळ्या कारागिरांचे निरनिराळ्या प्रकारचे श्रम असतात. हें श्रमसंयोगाचें तत्व सर्व समाजभर पसरलेलें आहे व जसजसा समाज सुधारत जातो तसतसा हा संमिश्र श्रमसंयोग वाढतच जातो. कित्येक क्रमिक पुस्तकांतून दिलेल्या "आश्चर्यकारक लाडू" च्या गोष्टींत हेंच तत्त्व गोंवलेलें आहे. या उदाहरणावरून साधा श्रमसंयोग व संमिश्र श्रमसंयोग यांमधला भेदही चांगला व्यक्त होतो. एका गृहस्थानें आपल्या लहान मुलांना सांगितलें कीं, उद्यांच्या दिवशीं मी तुम्हांला हजार लोकांनीं केलेला लाडू नजर देणार आहें. 'हजार लोकांनीं केलेला लाडू' हे शब्द ऐकतांच मुलांना वाटलें कीं, हा लाडू म्हणजे डोंगराएवढा किंवा निदान टेंकडीएवढा तरी मोठा असला पाहिजे! म्हणून मुलें या लाडूची मार्गप्रतीक्षा मोठ्या उत्कंठेनें करीत बसलीं. उद्यांच्या दिवशीं त्या गृहस्थानें नेहमींच्या आकाराचे व दिसण्यांत नेहमींसारखेच असे लाडू मुलांना नजर केले. मुलें ते लाडू घेऊन आश्चर्यचकित झालीं. तेव्हां त्या गृहस्थानें मुलांस पाटीपेन्सिल घेण्यास सांगून ते लाडू बनविण्यांत किती लोकांचे श्रम कारणीभूत झालेले आहेत हें टिपण्यास सांगितलें व मोजतां मोजतां ही संख्या हजाराच्याही वर गेली! तेव्हां त्या गृहस्थानें हे लाडू हजार लोकांच्या श्रमानें कसे झालेले आहेत हें मुलांना समजावून दिलें. यावरून ज्या ज्या मानानें समाजामध्यें सामाजिक व औद्योगिक श्रमविभाग वाढेल त्या त्या मानानें संमिश्र श्रमसंयोगही वाढलाच पाहिजे. अर्वाचीन काळीं तर औद्योगिक बाबतींत सर्व जगामध्यें एक प्रकारचा श्रमविभाग चालू असतो, म्हणून सर्व जग हें संयुक्त झाल्यासारखें झालें आहे. यामुळें एके ठिकाणीं कांहीं फरक झाला कीं, त्याचा परिणाम दुसरीकडे दिसून आल्याखेरीज राहत नाहीं.

श्रमविभागाचा तिसरा पोटभाग म्हणजे स्थानिक श्रमविभाग होय. हेंही एकप्रकारें सर्वव्यापी तत्त्व आहे. उष्ण प्रदेशांत कांहीं विशिष्ट माल तयार होतो, तर शीतकटिबंधांत कांहीं एक माल तयार होतो. तसेंच कांहीं प्रदेश किंवा प्रांत यांमध्यें कांहीं कांहीं धंद्यांस नैसर्गिक सोयी जास्त असतात; व तेथें तेथें ते धंदे

उद्यास येतात. या स्थानिक श्रमविभागाचें सर्वत्र दिसून येणारें उदाहरण म्हणजे शहर व खेडेगांव यांमधला श्रमविभाग होय. शहर हें उद्योगधंदे व कारखाने यांचें मुख्यस्थान असतें. तर खेडें हें शेतकीचें मुख्यस्थान असतें. व शहरांतील लोकसंख्येस लागणारीं आवश्यकें खेडीं पुरवितात तर खेड्यांस लागणाऱ्या सोयी व चैनी हीं शहरें पुरवितात. असा हा शहर व खेडें यांतला श्रमविभाग आहे. ज्याप्रमाणें हा स्थानिक श्रमविभाग देशाच्या एकंदर फायद्याचा असतो, त्याचप्रमाणें देशादेशांमधील स्थानिक श्रमविभागही देशाच्या व जगाच्या फायद्याचाच असला पाहिजे. अप्रतिबंधव्यापाराचें तत्त्व म्हणजे एक श्रमविभागाचेंच तत्व होय, असें पुष्कळांचें म्हणणें आहे. ज्या देशाला जो माल जास्त सुलभ रीतीनें व मुबलक तयार करतां येईल तोच माल तयार करण्यांत त्या देशाचा फायदा आहे. अशा देशाच्या इतर गरजा दुसऱ्या देशांनीं पुरवाव्या, असें खुल्या व्यापाराचें तत्व आहे. उदाहरणार्थ, एका देशानें शेतकीकडेच आपला सर्व भर घालावा तर दुसऱ्या देशानें कांहीं विशेष कारखान्यांकडेच आपलें सर्व लक्ष लावावें. यामध्यें त्या देशाचें कांहीं एक नुकसान न होतां एकंदर जगामध्यें संपत्तीची उत्पत्ति जास्तच झाली पाहिजे, असें पुष्कळ अर्थशास्त्रकारांचें मत आहे. परंतु अप्रतिबंधव्यापार विरुद्ध संरक्षण हा बराच वादग्रस्त प्रश्न आहे व त्याचा सविस्तर विचार या ग्रंथाच्या चवथ्या पुस्तकांत करावयाचा आहे, तेव्हां या मुद्याचाही विचार त्या वादाच्या प्रसंगीं करतां येईल.

श्रमविभागाच्या तत्वापासून समाजांतील आधिभौतिक प्रगतीस पुष्कळच मदत झालेली आहे, हें वरील विवेचनावरून दिसून येईल. परंतु त्या तत्वानें समाजांत कांहीं अनिष्टेंही घडून आलेलीं आहेत. अर्थात श्रमविभागाचे कांहीं तोटेही आहेत हें विसरतां कामा नये. त्याचाही येथें थोडक्यांत विचार करणें जरूर आहे. हे तोटे शारीरिक, मानसिक, नैतिक व सामाजिक आहेत. श्रमविभागाच्या योगानें मजुरांना विशेष प्रकारचे रोग जडतात. प्रचंड कारखान्याच्या पद्धतीपासून मनुष्यजाताची वाढ खुंटली जाते व त्यांना हजारों तऱ्हेच्या व्याधी जडलेल्या आहेत असें म्हणण्यास पुष्कळ आधार आहे. अर्वाचीन कारखान्यांच्या पद्धतींतील हे दोष नाहींसे करण्याकरितांच सर्व सुधारलेल्या देशांत

कारखान्यांचे कायदे झालेले आहेत.

मानसिक तोटा म्हणजे कामाची एकतानता. अर्वाचीन काळच्या यंत्रांतला माणूस म्हणजे वर्षानुवर्षे दररोज आठ दहा तास तीच ती एक क्रिया करणारें यंत्र होय. यंत्रसाहाय्यानें संपत्तीची वाढ होते व यंत्र हें मनुष्याचे श्रम वांचवितें हें खरें. तरी पण यंत्र हें "आपणासारिखे करिती तात्काळ" या कोटींपैकीं आहे. यंत्र चालविण्यास जेवढी मनुष्याच्या कृतीची जरूरी असते तेवढें कृत्य मनुष्यास सदोदित करावयास लावून मनुष्याला अर्वाचीन सुधारणा ही यंत्र बनविते. रसकिन, कारलाईल, वगैरे ग्रंथकारांच्या मतें हल्लींच्या सांपत्तिक युगानें मनुष्याचें सबंध मनुष्यत्व नाहींसें करून त्याचे लहान लहान तुकडे बनविले आहेत. हा तोटा आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु या पृथ्वीवरील सर्व गोष्टींप्रमाणें यालाही दुसरी एक बाजू आहे. मनुष्याला तेंच तें काम करावें लागल्यानें तो मनुष्य यंत्रासारखा जड बनतो अशी समजूत आहे खरी, तरी पण यंत्राच्या योगानें मनुष्याला श्रम व काम कमी पडतें व फुरसत जास्त सांपडते हेंही खरें आहे; व या फुरसतीमध्यें त्याला ज्ञानानें आपल्या मानसिक शक्तीही वाढवितां येण्यास सवड होते हें विसरतां कामा नये. लँकॅस्टर किंवा मँचेस्टर येथील मजुरांमध्यें वाचनाभिरुचि किती वाढली आहे हें पाहिलें म्हणजे हा तोटा अगदींच केवळ अनिष्टमय आहे असें नाहीं असें दिसून येईल. शहरांत राहणारे मजूर व कामगार हे खेडेगांवांतील लोकांपेक्षां बुद्धीनें व चलाखीनें जास्त असतात असा सार्वत्रिक अनुभव आहे. वरील विवेचनावरून या एकतानतेच्या प्रमाणांत फारसा तथ्यांश नाहीं असें दिसून येईल.

तिसरा तोटा सामाजिक आहे. श्रमविभागाच्या योगानें लोकसंख्या शहरांत येऊन भरते व शहरांमध्यें स्वाभाविकच खेड्यासारखी आरोग्यकारक परिस्थिति नसल्यामुळें मजुरांना निरोगी राहतां येत नाहीं व त्यांचे हाल वाढतात. तसेंच एखाद्या नव्या यंत्राच्या शोधानें हजारों लोकांना एकदम काम नाहींसें होतें.

परंतु या तोट्यालाही प्रतिकार आहेत हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. हल्लीं सुधारलेल्या सर्व राष्ट्रांत शहरसुधारणेचे प्रयत्न जोरानें चालले आहेत. त्यामुळें

शहरांत राहण्यापासून होणारे तोटे बरेच कमी झालेले आहेत. या शहरांच्या आरोग्यसुधारणेच्या कामांत सुधारलेलीं सरकारें व म्युनिसिपालिट्या कोटी रुपये खर्च करीत आहेत. शहराला उत्तम शास्त्रीय पद्धतीचीं गटारें करणें; शहराला उत्तम व स्वच्छ पाण्याचा पुरवठा करणें; सर्व शहरांत हवा उत्तम तऱ्हेनें खेळेल अशी शहराची रचना करणें; शहरांत उद्यानभूमिका राखून ठेवणें; चांगला निर्दोष माल शहरवासीयांस मिळेल अशी तजवीज करणें; अशा प्रकारच्या किती तरी गोष्टी अर्वाचीन काळीं होत आहेत. याचा सुपरिणामही दिसून येत आहे. सर्व सुधारलेल्या देशांत शहरांतील दर हजारीं मृत्युसंख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. यावरून या आक्षेपांतही फारसा तथ्यांश नाहीं हें उघड आहे.

# भाग आठवा

## मोठ्या प्रमाणावर व अल्प प्रमाणावर उत्पत्ति.

श्रमविभागाच्या तत्त्वानें संपत्तीच्या उत्पत्तीच्या वाढींत विलक्षण फरक कां व कसा होतो, याचें विवेचन मागील भागांत केलें. परंतु कोणत्याही धंद्यांत हा श्रमविभाग अमलांत येणें हें मालाच्या खपावर अवलंबून आहे. कारण धंद्याच्या क्रियेचे विभाग करून एकएक क्रिया एकएक माणूस करूं लागला म्हणजे माल अतोनात तयार होणार. हा माल जर ताबडतोब खपला गेला नाहीं तर हा श्रमविभाग होणें शक्य नाहीं. या भागांत विचार करावयाच्या या विषयाचाही श्रमविभागाशीं निकट संबंध आहे; नव्हे, तो श्रमविभागाचा एक प्रकारचा परिणाम आहे. समाजाची वाढ होत चालली म्हणजे त्या समाजांत सामाजिक श्रमविभाग अथवा धंद्याचें पृथक्करण होऊं लागतें. अर्थात् एक मनुष्य व त्याच्या कुटुंबांतील माणसें मिळून एक धंदा करून एक प्रकारचा माल काढूं लागतात. अशाच तऱ्हेनें समाजांत शेतकरी, सुतार, गवंडी, लोहार, सोनार, परीट वगैरे किती तरी धंदेवाले उत्पन्न होतात.

या सांपत्तिक स्थितीला घरगुती कारागिरीचा काळ म्हणतात. या सामाजिक श्रमविभागानें प्रत्येक धंद्याच्या माणसांचें कौशल्य वगैरे वाढतें व त्यायोगें संपत्तींत बरीच भर पडते. परंतु औद्योगिक श्रमविभागास सुरवात झाली म्हणजे तर संपत्तीच्या वाढीस ऊतच येतो. कारण मागें सांगितल्याप्रमाणें एका धंद्यामधल्या निरनिराळ्या क्रिया निरनिराळ्या माणसांकडून होऊं लागल्या व विशेषतः ही प्रत्येक क्रिया जलदीनें घडवून आणणारीं यंत्रें निघालीं म्हणजे संपत्तीच्या वाढीस अधिकच जोर येतो; व त्यांत आणखी वाफेच्या व इतर नैसर्गिक शक्तीनें यंत्रें चालविण्याचा शोध लागला म्हणजे घरगुती कारखान्यांचें स्वरूप जाऊन त्या कारखान्यांना प्रचंड विराटरूपी फॅक्टरी व गिरण्या यांचें स्वरूप येतें. युरोपांतील उद्योगधंद्यांची याप्रमाणेंच वाढ होत आली आहे. हिंदुस्थानांत पूर्वकाळीं सामाजिक श्रमविभागाच्या योगानें घरगुती धंदे उत्तम स्थितींत आले, परंतु यापुढें मात्र त्यांची वाढ झाली नाहीं.

इंग्लंडमध्यें वाफेच्या शक्तीच्या शोधानंतर व एंजिनच्या शोधापासून मोठमोठे विराटस्वरूपी कारखाने प्रथमतः कापसापासून कापड काढण्याचे झाले, व पुढें प्रत्येक धंद्यांत असेच कारखाने, फॅक्टरी व गिरण्या होऊं लागल्या व हल्लींच्या काळीं विराटस्वरूपी कारखाना हा सामान्य सिद्धांत आहे. अजूनही पुष्कळ धंदे घरगुती स्वरूपाचे आहेत, परंतु ते अपवादादाखल आहेत. हिंदुस्थानांत व नुकत्याच औद्योगिक प्रगतीच्या मार्गाला लागलेल्या जपानांत अजून कारखान्यांचें अल्प स्वरूप नाहींसें झालें नाहीं. अल्प प्रमाणावरील कारखाने हेच येथें सामान्य नियमासारखे आहेत व प्रचंड कारखाने हे अजून अपवादादाखल आहेत.

मोठ्या प्रमाणावरील कारखान्यांचे फायदे अगदीं उघड व तावडतोब दिसणारे आहेत. मोठ्या कारखान्यांत नैसर्गिक शक्ति व यंत्रसामग्री यांचा शक्य तितका फायदा घेण्यास सांपडतो व म्हणून श्रमविभागही पाहिजे तितका अंमलांत आणावयास सांपडतो. यामुळें मालाची पैदास अतोनात वाढते.

मोठ्या कारखान्यांत देखरेखीचा खर्च लहान कारखान्यांपेक्षां कमी होतो. तुमचें एंजिन ५ हॉर्सपावरचें असो किंवा १० हॉर्सपावरचें असो; एक एंजिनियर, एक एंजिन चालविणारा, एक मॅनेजर, एक कॅशियर पाहिजे. परंतु मोठें एंजिन असल्यानें काम जास्त होतें व म्हणून मालावर देखरेखीचा खर्च कमी होतो. तसेंच

कापसाच्या गिरण्या ५।५ लाखांच्या दोन करण्यापेक्षां दहा लाखाची एक करणें हें किती तरी कमी खर्चाचें होतें. आधीं जागेचा खर्च कमी होतो व म्हणूनच लहान प्रमाणावरील कारखान्याचा टिकाव मोठ्या प्रमाणावरील कारखान्यापुढें लागत नाहीं. कारण लहान कारखान्यामध्यें मालाच्या उत्पत्तीचा खर्च मोठ्या प्रमाणावरील कारखान्यापेक्षां जास्त होतो; व म्हणूनच अशा अल्प कारखानदारांना आपला माल विराटस्वरूपी कारखानदारांच्या मालाइतका स्वस्त देण्यास परवडत नाहीं. यामुळेंच मोठे कारखाने व घरगुती किंवा लहान कारखाने यांच्या चढाओढींत दुसऱ्या प्रकारच्या कारखान्यांचा पाडाव होतो. हिंदुस्थानांतील सर्व घरगुती धंदे याच कारणांनीं नामशेष झाले. इंग्लंडमध्यें वाफेच्या शक्तीचा शोध लागल्यानंतर वाफेच्या मागांशीं हातमागांचा टिकाव लागेना व म्हणूनच हिंदुस्थानांतील हातमागांचा धंदा हळूहळू बुडत गेला. तीच स्थिति साखरेच्या धंद्याची झाली व तीच स्थिति तेल गाळण्याच्या धंद्याची होत आहे.

परंतु असे विराटस्वरूपी कारखाने सुरू होण्यास प्रारंभीं भांडवल फार मोठेंच लागतें. असें भांडवल देशांतील एक एका व्यक्तीजवळ फारसें नसतें. यामुळें संयुक्त भांडवलाचें तत्व प्रचंड कारखान्याच्या पद्धतीबरोबर सर्व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें जारीनें अमलांत येऊं लागतें.

अमेरिका खंडाच्या शोधानंतर युरोपमध्यें उद्योगधंद्यास व व्यापारास जी जोराची उसळी मिळाली, त्या वेळेपासून या संयुक्त भांडवलाच्या तत्वाचा अंमल सुरू झाला व त्याचा उपयुक्तपणा सर्वसंमत होऊन त्याचा सार्वत्रिक प्रसार झालेला आहे. परदेशांशीं व्यापार करण्याकरितां त्या काळीं ज्या संस्था इंग्लंडमध्यें निर्माण झाल्या त्यांना व्यापारी कंपन्या म्हणत असत. या व्यापारी कंपन्यांना इंग्लंडचे राजे व्यापाराच्या मक्त्याच्या सनदा करून देत. या कंपन्या दोन प्रकारच्या असत; एक नियमबद्ध कंपनी व दुसरी संयुक्त-भांडवली कंपनी. पहिल्या प्रकारच्या कंपनीला एखाद्या देशाशीं व्यापार करण्याचा सर्व मक्ता मिळालेला असे; परंतु यामध्यें कंपनीचा सभासद आपआपल्या भांडवलावर स्वतंत्र व्यापार करी. कंपनीचें असें स्वतंत्र भांडवल नसे. प्रत्येक सभासदाला कांहीं प्रवेश फी द्यावी लागे व कंपनीच्या खर्चाकरितां वार्षिक वर्गणीही द्यावी लागे व कंपनी जे जे नियम करील ते ते नियम प्रत्येक सभासदाला पाळावे लागत. परंतु अशा

कंपनीला परदेशामध्यें किल्ले, बंदरें किंवा दुसऱ्या मोठ्या खर्चाची स्वसंरक्षणाचीं कामें करणें कठीण पडे. यामुळें अशा कंपन्यांचा तादृश उपयोग होत नसे.

संयुक्तभांडवली कंपनीचे भागीदार असतात. या भागीदारांच्या भागांनीं एकत्र झालेलें भांडवल म्हणजे कंपनीचें भांडवल होय. या कंपनींत भागीदार स्वतः कंपनीचें काम पहात नाहींत, तर भागीदार लोक आपल्यांतील, कांहींजणांना डायरेक्टर म्हणून नेमून देतात व हें डायरेक्टरांचें मंडळ कंपनीचा सर्व व्यापार किंवा धंदा पाहतें. संयुक्तभांडवली कंपनी व खाजगी पातीचा धंदा यांमध्यें मुख्य भेद असा आहे कीं, संयुक्तभांडवली कंपनींत भागीदारांस आपलें भांडवल वाटेल तेव्हां कंपनींतून काढून घेतां येत नाहीं. त्यांना आपला भाग दुसऱ्यांस विकून आपलें भांडवल मोकळें करतां येतें व या विक्रीस दुसऱ्या भागीदारांच्या संमतीची जरूरी नसते. खाजगी पातीमध्यें इतरांच्या संमतीशिवाय नवा पातीदार घेतां येत नाहीं.

इंग्लंडमध्यें परदेशांशीं व्यापार करणाऱ्या कांहीं कंपन्या संयुक्तभांडवली होत्या. जिनें एका शंभर वर्षांमध्यें सर्व हिंदुस्थान देश काबीज केला, ती ईस्ट इंडिया कंपनीही संयुक्तभांडवली कंपनीच होती. परंतु त्या काळीं हें संयुक्त भांडवलाचें तत्त्व बाल्यावस्थेंत होतें व म्हणून अशा कंपन्यांचा व्यापारधंदा चांगला चालत नसे. **ॲडाम स्मिथ** याचें मत त्याच्या काळच्या अनुभवावरून या तत्त्वाच्या विरुद्ध झालें होतें.

**ॲडाम स्मिथला** संयुक्तभांडवली कंपनीच्या कारभारांत दोन दोष अपरिहार्य वाटत. संयुक्तभांडवली कंपनीच्या मॅनेजरास आपलेपणा वाटणें शक्य नाहीं. यामुळें खाजगी धंदेवाला जितकी काळजी घेईल, जितकी काटकसर करील, व जितक्या दक्षतेनें देखरेख ठेवील तितकी मॅनेजराकडून ठेविली जाणें शक्य नाहीं. यामुळें संयुक्तभांडवली कंपनीच्या कारभारांत जास्त पैसा खर्च होतो, व म्हणून असे धंदे फायदेशीर होत नाहींत; दुसरें, कंपनीचा कारभार मोठ्या प्रमाणावर असल्यामुळें तेथें सरकारी तऱ्हेनें बादशाही थाटावर सर्व व्यवस्था व सर्व खर्च चालतो.

६ या दोन दोषांमुळें पुष्कळ धंद्यांत व व्यापारांत संयुक्त भांडवलाचें तत्त्व फायदेशीर नाहीं, असें **ॲडाम स्मिथचें** मत झालें होतें. जे धंदे व व्यापार अगदीं

नियमबद्ध करून कांहीं एक ठरीव रूढीप्रमाणेंच चालावयाचे असतात, अशा धंद्यांत संयुक्त भांडवलाचें तत्व उपयोगी आहे; व या तत्वावर काढलेले धंदे यशस्वी होतात. हे धंदे ह्मणजे पेढी, सार्वजनिक दळणवळणाच्या सोयी वगैरे होत. बाकी ठिकाणीं खासगी मालकीचेच धंदे यशस्वी होतात व ह्मणूनच असे धंदे चांगले असें **अॅडाम स्मिथचें** मत होतें.

हें **अॅडाम स्मिथचें** मत त्याच्या काळच्या संयुक्त-भांडवली कंपनीच्या अपयशावरून झालेलें होतें; परंतु अर्वाचीन काळीं हें तत्व सर्वसंमत झालेलें आहे. हल्लींच्या काळीं व्यापारधंद्यासंबंधीं जर कोणचीं दोन महत्वाचीं तत्वें असतील तर तीं संयुक्त भांडवलाचें तत्व व परस्परसाहाय्यकारित्वाचें तत्व हींच होत. यांपैकीं दुसऱ्याचा विचार आपल्याला पुढल्या पुस्तकांत करावयाचा आहे, तेव्हां येथें फक्त पहिल्याचेंच विवेचन पुरें आहे.

संयुक्त भांडवलाचें तत्व हल्लीं सर्वगामी झालेलें आहे व ज्या ज्या देशांना औद्योगिक बाबतींत प्रगति करून घ्यावयाची आहे त्या त्या देशांना या तत्वाचा अवलंब केल्यावांचून गत्यंतर नाहीं. कारण या तत्वापासून खालील फायदे होतात-

कांहीं कामें इतकीं प्रचंड व अवाढव्य असतात कीं, तीं खासगी व्यक्तीच्या सांपत्तिक सामर्थ्याबाहेरचीं असतात. अशा कामाला सरकार किंवा संयुक्त भांडवल याखेरीज गत्यंतर नसतें. उदाहरणार्थ, रेल्वे, पाटबंधारे, गोदी, बंदराचे धक्के किंवा अशांसारखीं दुसरीं व्यापाराच्या सोईचीं कामें सरकारनें तरी हातीं घेतलीं पाहिजेत किंवा संयुक्त भांडवलाच्या कंपन्यांनीं तरी हातीं घेतलीं पाहिजेत. आतां सरकारी व्यवस्था ही नेहमीं फार खर्चाची असते, असा सार्वत्रिक अनुभव असल्यामुळें अशीं कामें संयुक्तिक भांडवलाच्या तत्वावर उभारणें देशाच्या हिताचें असतें. संयुक्त भांडवलाच्या तत्वावर उभारलेले धंदे जास्त चिरस्थायी व अपघातापासून मुक्त असतात. खाजगी धंद्यांत कर्ता पुरुष नाहींसा झाला तर धंदा तेव्हांच बुडतो. कारण मुलगा त्या कामांत चांगला निपुणच असा नेम नाहीं. परंतु संयुक्त भांडवली कंपनीला एक मॅनेजर नाहींसा झाला तर दुसरा नेमतां येतो. यामुळें अशा धंद्यास एक प्रकारचा स्थायिकपणा येतो.

खासगी धंदेवाल्यास नफ्याची फार हांव असते व पुष्कळ नफा असल्याखेरीज ते आपलें भांडवल एखाद्या धंद्यांत घालीत नाहींत. परंतु संयुक्त-भांडवली कंप-

नीचे भागीदार हे स्वतः धंदे करणारे नसल्यामुळें त्यांना नफ्याची एवढी मातबरी नसते. देशांत जो सामान्यतः व्याजाचा दर असतो त्यापेक्षां थोडा जास्त नफा मिळाला म्हणजे त्यांचें समाधान असतें. यामुळें नवीन धंदा संयुक्त भांडवलाच्या तत्वावर काढणें सोईचें असतें.

संयुक्त भांडवली कंपनीचे जमाखर्च नेहमीं प्रसिद्ध होत असल्यामुळेंही दोन फायदे होतात. प्रथमतः कारभारांत लबाडी होत असेल तर ती लवकर उघडकीस येण्याचा संभव असतो व प्रसिद्ध झालेल्या जमाखर्चावरून देशांतील धंद्याची स्थिति कळण्यासही सुलभ मार्ग होतो.

संयुक्त-भांडवली धंद्याचा आणखीही एक फायदा आहे, तो हाच कीं, या धंद्याचें भांडवल थोड्या थोडया प्रमाणानें पुष्कळ व्यक्तींजवळून घेतलेलें असतें. शिवाय या कंपन्यांच्या भांडवलाचा कांहीं भाग न मागितलेला असा असतो. यामुळें धंद्यास एक प्रकारची सुरक्षितता असते व खासगी धंद्यापेक्षां या संयुक्त-भांडवली धंद्यास व्यापारांतील अडचणींतून सहज रीतीनें पार पडतां येतें. यदाकदाचित् नुकसान झालें तर तें नुकसानही थोडया व्यक्तींवर न पडतां पुष्कळ-जणांवर थोडया प्रमाणानें वांटून जातें. यामुळें हें नुकसान फारसें भासत नाहीं.

परंतु संयुक्त भांडवलाच्या तत्वाचा सर्वांत महत्वाचा फायदा देशांतील भांडवलाची वाढ होय. या तत्वानें जे पैसे व जी संपत्ति खासगी व्यक्तींजवळ निरुपयोगी पडून राहिलेली असते ती एकत्र होऊन त्याचें शक्तिमान् असें भांडवल बनतें. ज्याप्रमाणें पाण्याच्या वेगवेगळया थेंबांमध्यें शक्ति नसते, परंतु हेच थेंब एकत्र जमून त्यांचा प्रवाह वहूं लागला म्हणजे त्यामध्यें मोठी शक्ति उत्पन्न होते, त्याप्रमाणेंच जी संपत्ति व पैसा देशांतील व्यक्तींजवळ अल्प प्रमाणानें असतांना त्यांत शक्ति नसते, तीच संयुक्त भांडवलाच्या तत्वानें एकत्र झाल्यानें त्याचें अवाढव्य भांडवल तयार होतें, व मग विराटस्वरूपी कारखाने देशांत निर्माण होऊं शकतात. या फायद्यामुळें हें तत्व जगांत इतकें पसरलें आहे.

हिंदुस्थानची या तत्वासंबंधींची सध्यांची स्थिति इंग्लंडांतल्या ॲडाम-स्मिथच्या काळच्यासारखी आहे. हें तत्व अजून येथें बाल्यावस्थेंतच आहे म्हणावयाचें. कारण संयुक्त भांडवलाचे पुष्कळ कारखाने अजून इकडे बुडालेले आहेत किंवा किफायतशीर झालेले नाहींत. हिंदुस्थानांत ज्या जाती पिढीजाद

व्यापारी पेशाच्या आहेत त्यांनीं हें तत्व आपलेंसें करून तें फायदेशीरही करून दाखविलें आहे. पार्शी, भाटे, गुजराथी व मारवाडी या लोकांचे संयुक्त भांडवलाचे कारखाने चांगल्या तऱ्हेनें चालतात; परंतु ब्राह्मण व इतर जातींनीं काढलेले संयुक्त भांडवलाचे कारखाने चांगले चालत नाहींत. याला दोन कारणें आहेत. पहिलें कारण या जातींमध्यें अजून व्यापाराचा आत्मा जी सचोटी ती पूर्ण मुरली नाहीं. यामुळें संयुक्त भांडवलाच्या कंपन्यांचे मॅनेजर व व्यवस्थापक हेच स्वतः पैशाची अफरातफर करतात व कंपनीच्या कारभारास धोका आणतात; केव्हां केव्हां धंद्याचें व कारभाराचें ज्ञान बरोबर नसल्यामुळेंही नुकसान होतें. दुसरें कारण आपल्या लोकांमधील सामाजिक कर्तव्याची अंधुक कल्पना होय. संयुक्त-भांडवलाच्या कंपन्या डायरेक्टर मंडळींच्या देखरेखीखालीं चालतात; परंतु डायरेक्टर लोकांना आपल्या कर्तव्याची ह्मणण्यासारखी जाणीव नसते व यामुळें भागीदारांच्या होणाऱ्या नुकसानाकडे त्यांचा कानाडोळा होतो किंवा डायरेक्टर लोक कंपनीच्या कारभारापासून आपला खासगी फायदा करून घेण्याचा स्वार्थी विचार करतात. परंतु योग्य विचार केल्यास असें दिसून येईल कीं, कंपनीचा कारभार चोख रीतीनें व दक्षतेनें चालविल्यास त्यांत स्वार्थ व परमार्थ हे दोन्हीही साधतात. कारण डायरेक्टर लोकांचे बऱ्याच किंमतीचे भाग कंपनींत असतातच. तेव्हां कंपनी यशस्वी झाली तर त्यांत सर्व भागीदारांप्रमाणें त्यांचा स्वतःचाही फायदा होतो. शिवाय संयुक्त भांडवलाचे कारखाने व धंदे यशस्वी होत गेले ह्मणजे तितक्याच भागीदारांचा फायदा होतो असें नाहीं, तर यापासून सामाजिक हितही होतें. तें हें कीं, अशा संयुक्त भांडवलाच्या धंद्यांत लहानसहान शिलकी घालण्यास बहुजनसमाजाची प्रवृत्ति होते व या योगानें देशामध्यें भांडवलाचा पुरवठा पुष्कळ वाढतो आणि कोणत्याही नव्या उद्योगधंद्यास भांडवलाचा तुटवडा पडत नाहीं.

देशामध्यें उद्योगधंदे जर वाढवयाचे असतील तर या संयुक्त भांडवलाच्या तत्त्वाच्या प्रसाराखेरीज गत्यंतर नाहीं, व या तत्वाचा प्रसार होण्यास बहुजनसमाजाचा या तत्वाच्या यशस्वीपणाबद्दल विश्वास बसला पाहिजे. हा विश्वास बसण्यास संयुक्त भांडवली कारखाने किफायतशीर झाले पाहिजेत व हे धंदे किफायतशीर होण्यास व्यवस्थापक, मॅनेजर व डायरेक्टर लोक यांना आप-

त्या धंद्याची उत्तम माहिती असून शिवाय सचोटी व कर्तव्यदक्षता हे दोन नैतिक गुणही त्यांच्यामध्यें वास करीत असले पाहिजेत. तेव्हां ज्यांना आपल्या देशाची औद्योगिक प्रगति व्हावी असें मनापासून वाटत आहे, त्यांनीं या दोन गोष्टी आपल्या समाजांत वाढतील अशाबद्दल खटपट केली पाहिजे.

येथपर्यंत उद्योगधंद्यांत विराटस्वरूपी कारखाने संपत्तीच्या वाढीस कसे व कां अनुकूल असतात याचा विचार झाला. या विवेचनावरून जसजसा श्रमविभागाच्या तत्वाचा फैलाव होतो तसतसा विराटस्वरूपी कारखान्यांकडे देशांतील उद्योगधंद्याचा कल असतो हें दिसून येईल. अल्पस्वरूपी धंदे विराटस्वरूपी धंद्यांच्या बरोबर अस्तित्वांत असतात खरे, तरी एकंदरींत अल्पस्वरूपी धंद्यांचा विराटस्वरूपी धंद्यांपुढें टिकाव लागणें कठीण, असा सर्व देशांतील अनुभव आहे.

आतां संपत्तीचा उत्पादक दुसरा मोठा धंदा शेतकी. यासंबंधी विराटस्वरूप चांगलें किंवा अल्पस्वरूप चांगलें याचा विचार केला पाहिजे. हा प्रश्न पहिल्यापेक्षां जास्त वादग्रस्त आहे व मोठमोठ्या अर्थशास्त्रकारांचीं मतें परस्परविरोधी आहेत.

प्रथमतः शेतकीमध्यें इतर उद्योगधंद्यांप्रमाणें श्रमविभागाच्या तत्वाच्या प्रसारास फारसा अवकाश नसतो. या धंद्यांत प्रत्येक शेतकऱ्याला शेतकीचीं बहुतेक कामें यावीं लागतात व करणेंही भाग पडतें. सतत बारा महिने बाराकाळ एकच काम करण्यास येथें सवड नसते. तरी पण विस्तीर्ण शेती चांगली किंवा अल्प शेती चांगली हा वादाचा मुख्य प्रश्न आहे.

विस्तीर्ण शेतींत शेतकरी हा एक प्रकारचा कारखानदार असतो. तो हजारों एकर जमीन–मालकीची अगर भाड्यानें घेऊन–तिची लागवड करतो. ही लागवड करण्यास लागणारें सर्व भांडवल हा शेतकरी-कारखानदार पुरवितो; व शेतीस लागणारे सर्व श्रम मजुरांना मजुरी देऊन तो मिळवितो. अल्प शेतीमध्यें पांच-दहा एकर जमीनच एक शेतकरी आपल्या स्वतःच्या व कुटुंबाच्या श्रमानें लागवडीस आणतो. या दोन लागवडीच्या पद्धतींत अधिक किफायतशीर कोणती हें ठरवावयाचें आहे.

विस्तीर्ण शेतीच्या बाजूनें बहुशः खालील फायदे पुढें आणले जातात. या

लागवडीच्या पद्धतीमध्यें शेतकीच्या शक्तिमान् यंत्रांचा उपयोग करतां येतो. वाफेचा नांगर, धान्य कापण्याचें यंत्र, धान्य मळण्याचें यंत्र वगैरे खर्चाच्या यंत्रांचा उपयोग करतां येतो व यंत्रानें मजुरांच्या श्रमापेक्षां पुष्कळ फायदा होतो हें उघड आहे. परंतु या यंत्रांना भरपूर काम मिळेल एवढी मोठी शेतकी एकट्या मालकाची पाहिजे, तर हीं यंत्रें काटकसरशीर होतात.

दुसरें, विस्तीर्ण शेतींत कुंपणें, रस्ते, बांधबंधारे वगैरेसारख्या बाबतींत जमीन कमी फुकट जाते. तींच लहान लहान शेतें असलीं म्हणजे या बाबतींत खर्चही जास्त होतो व पुष्कळ जागा वाया जाते.

विराटस्वरूपी कारखान्याला सामान्य असे फायदे व काटकसर या विस्तीर्ण शेतांत होतात. देखरेखीचा खर्च कमी होतो. उदाहरणार्थ, मेंढ्यांचा कळप १०० चा असला काय किंवा ४०० चा असला काय, त्याला गोपाल एकच लागतो; माल थोडा काय किंवा फार काय, परंतु नेण्याआणण्याकरितां गाडी वगैरेसारखा खर्च सारखाच येतो.

तिसरें, विस्तीर्ण शेतींत पिकाची योग्य परंपरा ठेवण्यास सुलभ पडतें. म्हणजे पहिल्या वर्षी एका जमीनीच्या तुकड्यांत एक पीक; दुसऱ्या वर्षी दुसरें योग्य पीक; तिसऱ्या वर्षी जमीन ओसाड टाकणें; वगैरे गोष्टी जमिनीचा कस व मगदूर कायम राहण्यास कराव्या लागतात व त्या विस्तीर्ण शेतींत करणें सोईचें असतें; परंतु अल्प शेतींत हें करणें शक्य नसतें.

विस्तीर्ण शेतीच्या पद्धतीचे हे फायदे निर्विवाद आहेत. परंतु अल्प शेतीच्या समर्थकांचें म्हणणें असें आहे कीं, हे फायदे जरी त्या पद्धतींत असले तरी त्यांत एक जबरदस्त दोष आहे. तो हा कीं, शेतकीवर श्रम करणारे मजूर हे निवळ सांगकामे असतात. त्यांची आपल्या कामावर आसक्ति नसते. कारण काम काळजीनें करण्यापासून त्यांचा फायदा नसतो. ठरलेल्या मजुरीपलीकडे त्यांना जास्त फायद्याची आशा नसते. त्यामुळें विस्तीर्ण शेतींत पुष्कळ श्रम वाया जातात. परंतु अल्प शेतींत शेतकऱ्याला मालकीची जाणीव असते व या मालकीच्या जाणिवेनें तो आपल्या शेतीची अतोनात काळजी घेतो; तो काटकसर करतो; लहानसहान गोष्टींकडेसुद्धां दुर्लक्ष करीत नाहीं; आपल्या शेतीची आपण जितकी मशागत करूं तितका आपलाच फायदा आहे अशी त्याची खात्री असत;

यामुळें अल्प शेतीमध्यें शेतीची संपत्ति जास्त उत्पन्न होते असें अल्प शेतीच्या समर्थकांचें ह्मणणें आहे; परंतु या विषयाचा विचार या ग्रंथाच्या तिसऱ्या पुस्तकांत करावयाचा आहे, तेव्हां सध्यांचें विवेचन येथेंच थांबविलें बरें.

## भाग नववा.

### उतरत्या व चढत्या पैदाशीचा सिद्धांत.

संपत्तीच्या उत्पत्तीचीं कारणें व त्या कारणांचा संयोग ज्या तत्त्वांनीं होतो त्यांचा येथपर्यंत विचार झाला. आतां प्रत्येक कारणाची वृद्धि कशी होते हें पहावयाचें राहिलें. तें या पुस्तकाच्या राहिलेल्या चार भागांत उरकावयाचा विचार आहे.

संपत्तीच्या उत्पत्तीचें पहिलें कारण ह्मणजे देशांतील जमीन व सृष्टिशक्ति हें होय. आतां देशांतील जमीन कांहीं प्रत्यक्ष आकारानें वाढूं शकत नाहीं हें खरें, तरी पण जमिनीपासून कमी अधिक उत्पन्न काढतां येतें. या बाबतींतच मथळ्यांत निर्दिष्ट केलेल्या सिद्धांताचा शोध लागला व याच सिद्धांतावर अर्थशास्त्रांतील व विशेषतः वांटणी या भागांतील कित्येक प्रमेयें व विधानें अवलंबून आहेत. तेव्हां या सिद्धांताचा येथें विचार करणें प्राप्त आहे. चढत्या व उतरत्या पैदाशीचा नियम प्रथमतः शेतकी व इतर उद्योगधंदे यांचा भेद दाखविण्याकरितां प्रतिपादन केला जात असे. अभिमत अर्थशास्त्रकारांचें असें ह्मणणें आहे कीं, उतरत्या पैदाशीचा नियम शेतीस लागू आहे व इतर धंद्यांस चढत्या पैदाशीचा नियम लागू आहे. या नियमांचा अर्थ व त्यांतील भेद खालील एका उदाहरणावरून स्पष्ट होईल.

समजा, एका शेतकऱ्यानें १० एकर जमिनीच्या तुकड्याची मशागत १०० रुपये भांडवल व २५ मजुरांचे श्रम लावून केली व त्यांत धान्य पेरलें. तर त्याला कांहीं एक धान्याची पैदास होईल. आतां जर त्यानें त्याच जमिनीच्या तुकड्यांतून जास्त पैदास करण्याकरितां आणखी १०० रु. भांडवल व २५ मजुरांचे

श्रम त्या जमिनीला लावले तर त्याला उत्पन्नाची पैदास पहिल्यापेक्षां जास्त होईल; परंतु ती पहिल्याच्या दुप्पट होणार नाहीं. समजा, त्या शेतकऱ्यानें तिसऱ्या वर्षी भांडवल व श्रम हे पहिल्यापेक्षां आणखी १०० रुपयांनीं व २५ मजुरांच्या श्रमानें वाढविले ह्मणजे या वर्षी ३०० रु. व ७५ मजुरांचे श्रम इतके त्या जमिनीला लावले तर त्याच्या उत्पन्नाची पैदास दुसऱ्या वर्षांपेक्षां जास्त होईल; परंतु कमी प्रमाणानें जास्त होईल. ह्मणजे पहिल्या १०० रुपयांच्या भांडवलापासून व २५ मजुरांच्या श्रमापासून जितकी पैदास जास्त झाली त्यापेक्षां दुसऱ्यापासून कमी होईल व दुसऱ्यापासून जितकी पैदास झाली त्यापेक्षांही कमी तिसऱ्यापासून होईल. भांडवल व श्रम हे कांहीं प्रमाणाच्या पलीकडे गेल्यास निरुपयोगी होतील; इतकेंच नव्हे, तर फाजील खतानें सर्व शेताचा नाश होईल व सर्व उत्पन्न बुडून जाईल. याळाच उतरत्या पैदाशीचा नियम ह्मणतात. ही झाली एकाच जमिनीच्या तुकड्याची मशागत करण्याची स्थिति. हाच नियम देशांतील सर्व विस्तीर्ण जमिनींस लागू आहे. देशांतील सर्व जमिनी सारख्या सुपीक नसतात; कांहीं जास्त सुपीक व कांहीं कमी सुपीक व कांहीं तर अगदीं नापीक असतात. यामुळें येथेंही उतरत्या पैदाशीचा नियम लागू पडतो. ह्मणजे सुपीक जमिनीवर भांडवल व श्रम यांचें कांहीं एक प्रमाण किंवा माप खर्च केलें तर जी उत्पन्नाची पैदास होते त्यापेक्षां कमी पैदास तितकेंच माप कमी सुपीक जमिनीवर खर्च केल्यापासून होते व नापीक जमिनीवर तेंच माप खर्च केल्यानें खर्चाइतकीही पैदास होण्यास पंचाईत पडते. या उतरत्या पैदाशीच्या नियमामुळें सर्व देशांत शेतीच्या मालाच्या किंमती नेहमीं वाढत जातात. कारण जसजशी जास्त जमीन लागवडीस येते–व ही जमीन अर्थात् पहिल्यापेक्षां कमी सुपीक असते—तसतसें उत्पत्तीच्या खर्चाचें प्रमाण वाढतें व पैदाशीचें प्रमाण कमी होतें व ह्मणून त्या उत्पन्नाची किंमत वाढत जाते. त्याचप्रमाणें जमिनीची जसजशी जास्त मशागत होत जाते तसतसा उत्पत्तीचा खर्च वाढतो व पैदाशीचें प्रमाण कमी होतें. व ह्मणूनच या अधिक खर्चानें तयार झालेल्या मालाची किंमत वाढत जाते. यावरून असें अनुमान निघतें कीं, देशाच्या आधिभौतिक भरभराटीबरोबर खाण्याचे पदार्थ महाग होत जातात व मनुष्याला निवळ जीवनास जास्त जास्त खर्च लागूं लागतो.

परंतु उद्योगधंद्याची याच्या उलट स्थिति आहे. त्याला चढत्या पैदाशीचा

नियम लागू आहे. समजा, एका कारखानदारानें १० हजार रुपयांवर एक धंदा काढला आहे. त्यानें जर आपलें भांडवल २० हजार करून एक जास्त मोठें यंत्र आणलें व धंद्यामध्यें श्रमविभाग जास्त अंमलांत आणला तर त्या धंद्यांतील मालाची पैदास दुपटीपेक्षां जास्त होईल. आणखी कांहीं काळानें त्या कारखानदारानें आणखी १० हजारांनीं आपलें भांडवल वाढविलें व श्रमाची काटकसर करणारें आणखी एक दुसरें यंत्र आणविलें तर मालाची पैदास जास्त पटीनें वाढेल. सारांश, जसजसा धंदा विराटस्वरूपाचा करावा तसतशी मालाची पैदास जास्तच वाढत जाते, हा नियम ह्मणजे श्रमविभागाच्या तत्वाचें व विराटस्वरूपी कारखान्याच्या तत्वाचें उलट बाजूनें विवरण करण्यासारखें आहे. या नियमाचा इत्यर्थ हा कीं, भांडवलाच्या वाढीच्या प्रत्येक मापाबरोबर पैदाशीचें प्रमाण त्याहून जास्तच वाढत जातें. यालाच चढत्या पैदाशीचा नियम ह्मणतात. याचा परिणाम असा होतो कीं, देशामध्यें जसजशी मालाला मागणी वाढते व जसजसें धंद्यांत जास्त जास्त भांडवल घातलें जातें, तसतसें पैदाशीचें प्रमाण वाढत जातें व ह्मणूनच माल उत्पन्न करण्याचा खर्च कमी कमी होत जातो व माल स्वस्त होऊं लागतो. म्हणजे संपत्तीचे जे सामान्यतः तीन वर्ग करण्यांत येतात, त्यांच्या किंमतीची वाढ व्यस्त प्रमाणानें होते. अवश्यक, सोई व चैनी अशा तीन प्रकारच्या संपत्ति आहेत. तेव्हां चढत्या व उतरत्या पैदाशीच्या नियमानुरूप देशाची लोकसंख्या वाढत चालली व त्याची आधिभौतिक सुधारणा होत चालली ह्मणजे संसाराच्या अवश्यक गोष्टी जास्त जास्त महाग होत जातात व सोईच्या व चैनीच्या गोष्टी या मात्र स्वस्त होत जातात. परंतु बहुजनसमाजाच्या नेहमींच्या राहणीमध्यें खर्चाचा मुख्य भाग अवश्यक गोष्टींचा असल्यामुळें सुधारणेबरोबरच बहुजनसमाजाची राहणी महागाईची झाल्यामुळें जास्त कष्टमयच होत जाते. या प्रकारच्या अभिमतपंथी अर्थशास्त्रकारांनीं या नियमावरून पुष्कळ उपसिद्धांत काढले आहेत. याचा आणखी जास्त ऊहापोह या ग्रंथाच्या 'वांटणी' या भागांत व्हावयाचा आहे; तेव्हां त्याचा येथें विस्तार करण्याची जरूरी नाहीं.

परंतु अभिमतपंथी अर्थशास्त्रकारांचें वरील विवरण चुकीचें आहे, निदान त्यामध्यें कांहीं दोष आहेत असें ऐतिहासिकपंथाच्या लेखकांनीं दाखविलें आहे.

आधीं शेतकी व इतर उद्योगधंदे यांमध्यें जो विरोध अभिमतपंथी अर्थशास्त्र-कारांनीं दाखविला आहे, तो बरोबर नाहीं; उतरत्या व चढत्या पैदाशीचे असे दोन्ही नियम शेतकीस व उद्योगधंद्यास सारखेच लागू आहेत, हें ऐतिहासिकपंथी अर्थशास्त्रकारांनीं दाखविलें आहे. एक अगदीं सुपीक परंतु कधींही लागवड न केलेली जमीन घेतली तर कांहीं कालपर्यंत त्या जमिनीला चढत्या पैदाशीचा नियम लागू पडतो. ह्मणजे कांहीं एक भांडवल व श्रम त्या जमिनीस लावले व व कांहींएक धान्याची पैदास झाली व पुढें त्या जमिनींवरील भांडवलाची व श्रमाची दुप्पट केली तर पैदास चौपट होते. असा क्रम कांहीं मर्यादेपर्यंत चालतो व मग मात्र उतरत्या पैदाशीचा नियम लागू पडूं लागतो. ह्मणजे प्रत्येक जमिनीची एक ठराविक पराकाष्ठेची सुपीकता असते. ती पराकाष्ठेची सुपीकता येई-पर्यंत त्या जमिनीला चढत्या पैदाशीचा नियम लागू होतो. व पुढें उतरत्या पैदा-शींचा नियम लागू पडूं लागतो. यामुळें नव्या वसाहतींत जसजशी लोकसंख्या वाढते व लोकांमध्यें भांडवल वाढतें व जसजशी जमिनीची मशागत जास्त खर्चाची होत जाते, तसतसें धान्याच्या पैदाशीचें प्रमाण जास्त वाढतें. अर्थात् धान्याच्या उत्पत्तीचा खर्च कमी होतो व धान्य लोकसंख्येच्या वाढीबरोबर स्वस्त स्वस्त होत जातें. अमेरिकेंतील वसाहतीचा अनुभव असाच आहे व ह्मणून अमेरिकेंत धान्याचे भाव सारखे उतरत आहेत, असें कॅरे या अर्थशास्त्रकारानें आंकड्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे परंतु ज्या देशांमध्यें सर्व सुपीक जमीन लागवडीस येऊन तिच्या सुपीकतेची पराकाष्ठा ओलांडून गेलेली आहे, व जेथें वस्ती फार दिवसांची व फार दाट आहे अशा देशांना अभिमतपंथी अर्थशास्त्र-ज्ञांचे सिद्धांत लागू आहेत. तेथें धान्याच्या किंमती—नव्या वसाहतींच्या परदेशां-तून धान्य न आल्यास—दिवसेंदिवस वाढत जातील हें ह्मणणें खरें आहे, यांत शंका नाहीं. अभिमतपंथी अर्थशास्त्रज्ञांनीं हे नियम प्रतिपादन केले त्या वेळीं त्यांच्या डोळ्यांपुढें इंग्लंडची स्थिति उभी होती ही गोष्ट निर्विवाद आहे.

त्याचप्रमाणें उद्योगधंद्यांनाही दोन्ही नियम लागू आहेत. कांहीं मर्यादेपर्यंत भांडवलाच्या वाढीच्या प्रमाणापेक्षां पैदाशीच्या वाढीचें प्रमाण जास्त असतें. दोन लाखाच्या कारखान्याऐवजीं चार लाखांचा एक कारखाना काढणें जास्त किफायतीचें आहे हें खरें; परंतु या कारखान्याच्या वाढीलाही मर्यादा आहेच.

त्या मर्यादेबाहेर कारखाना गेल्यास देखरेख बरोबर होणार नाहीं, मालाचा नाश होईल व कारखान्याची पैदास खर्चाच्या मानानें कमी होईल. याप्रमाणें अभिमतपंथी सिद्धांतामध्यें पुढील ग्रंथकारांनीं दुरुस्ती केली आहे. अभिमतपंथाचें या सिद्धांताचें प्रतिपादन एककल्लीपणाचें होतें. तो एककल्लीपणा काढून टाकून त्याचें यथार्थ रूप पुढील ग्रंथकारांच्या टीकेनें स्पष्ट केलें हें खरें. तरी पण शेतकी व इतर धंदे यांमधील विरोध विसरतां कामा नये. तो विरोध असा आहे कीं, शेतीची चढत्या पैदाशीची मर्यादा लवकर येते; इतर धंद्यांची ही मर्यादा येण्यास जास्त काळ लागतो हा पहिला विरोध. दुसरा विरोध हा कीं, शेतीला लागणारी जमीन हिची मर्यादा ठरलेली असते; कांहीं केलें तरी देशांतील जमीन कांहीं वाढवितां येत नाहीं. यामुळें देशामध्यें जसजशी लोकसंख्या वाढेल तसतसा धान्याचा तुटवडा केव्हांना केव्हां तरी भासूं लागलाच पाहिजे. कारण, जमिनीचा विस्तार कांहीं केल्या वाढवितां येत नाहीं. इतर धंद्यांची स्थिति याहून निराळी आहे. मालाला खप असेल व तितक्या वेळाचा अवधि मिळेल तर नवीन कारखाने काढतां येतील. याच गोष्टीचें एका उदाहरणानें स्पष्टीकरण करतां येईल. जमिनीच्या परिमिततेमुळें व उतरत्या पैदाशीच्या नियमानें थोड्या जमिनीपासून सर्व जगाला धान्य पुरविणें कालत्रयींही शक्य नाहीं; परंतु एकाद्या ठिकाणाहून सर्व जगाला एखादा माल पुरविणें शक्य आहे. दुसऱ्या देशाची चढाओढ बंद झाली व गिरण्या बांधण्यास पुरेसा अवकाश मिळाला म्हणजे एकटें मँचेस्टर शहर सर्व जगाला कापड पुरवूं शकेल! तेव्हां शेती व इतर धंदे यांमधील परिमित वाढ व अपरिमित वाढ हा भेद दृष्टीआड करून चालावयाचें नाहीं. अभिमतपंथी अर्थशास्त्रकारांच्या सिद्धान्ताचें व अनुमानाचें हेंच खरें पर्यवसान होय.

# भाग दहावा.

## लोकसंख्येची वाढ.

संपत्तीचें दुसरें कारण श्रम. या श्रमांची जसजशी वाढ होईल तसतशी संपत्तीमध्यें भर पडत जाईल हें उघड आहे. परंतु मानवी श्रम वाढण्याचा एक स्वाभाविक मार्ग म्हणजे देशांतील लोकसंख्येची वाढ होय. तेव्हां लोकसंख्येच्या वाढीची मीमांसा काय व त्या वाढीचा देशाच्या सांपत्तिक स्थितीशीं काय संबंध आहे याचें या भागांत विवेचन करावयाचें आहे. अर्थशास्त्रामध्यें या प्रश्नाची भर प्रथमतः **मॅलथस** या ग्रंथकारानें केली हें या ग्रंथाच्या प्रास्ताविक पुस्तकांतील पहिल्या भागांत सांगितलें आहे. तेथेंच **मॅलथस**च्या मीमांसेचा इतिहास दिला आहे. या भागांत या प्रश्नाचा आतां तात्त्विक दृष्ट्या विचार करावयाचा आहे.

**मॅलथसच्या** विवेचनामध्यें त्यानें दोन गोष्टी स्वयंसिद्ध म्हणून धरल्या आहेत व या दोन सिद्धान्तांपासून त्याचा उपपत्ति ओघानेंच प्राप्त होते असें त्यानें दाखविलें आहे. पहिली गोष्ट ही कीं, मानवी जीवनास अन्न अवश्य आहे. मनुष्याचें ज्ञान कितीही वाढलें; त्याची केवढीही सुधारणा झाली; त्यानें योगसाधनानें आपल्या मानसिक शक्ति कितीही वाढविल्या तरी मानवी आयुष्यास व मानवी कर्तबगारीस अन्नाची अवश्यकता आहे हें निर्विवाद होय. दुसरी गोष्ट–लग्न करण्याची प्रवृत्ति ही मनुष्यमात्रांत सनातन आहे.

'आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम्'

या प्रसिद्ध सुभाषितांत या दोन्ही प्रवृत्तींचा उल्लेख आलेला आहे व या दोन्ही प्रवृत्ति, किंवा वासना किंवा गरजा सर्व प्राणिमात्रांमध्यें दिसून येतात; इतकेंच नाहीं तर मनुष्याच्या अगदीं रानटी स्थितीपासून तों सुधारलेल्या स्थितीपर्यंत सर्व अवस्थांमध्यें ही प्रवृत्ति सारखीच दृष्टोत्पत्तीस येते. मनुष्याची जेथपासून आपल्याला माहिती झाली आहे त्या जुन्या काळापासून आजपर्यंतच्या हजारों वर्षांच्या अवधींत या प्रवृत्तीमध्यें म्हणण्यासारखा फरक झालेला नाहीं. लग्नाची वासना नसलेल्या कांहीं व्यक्ति सर्व काळीं व सर्व ठिकाणीं दृष्टीस पडतात;

परंतु अशा व्यक्ति अपवादादाखल होत. त्यावरून, मनुष्यजातीच्या सामान्य प्रवृत्तीला बाध येत नाहीं. या दोन गोष्टी निर्विवाद आहेत हें कबूल झालें म्हणजे **मॅलथसच्या** लोकसंख्येच्या मीमांसेविषयीं फार वाद राहात नाहीं. या मीमांसेचें सर्व रहस्य खालील तीन विधानांत गोवलेलें आहे. ( १ ) देशांतील लोकसंख्या ही उपजीविकेच्या साधनांनीं अवश्यमेव मर्यादित झालेली असते. म्हणजे उपजीविकेच्या साधनांच्या पलीकडे लोकसंख्येची वाढ होणें शक्य नाहीं. उपजीविकेच्या साधनांत फक्त अन्न व उदक इतकेंच येतें असें नाहीं. ज्या गोष्टी समाजांत प्रत्येक माणसाला अत्यंत अवश्यक गणल्या जातात त्या सर्वांचा समावेश उपजीविकेच्या साधनांत केला पाहिजे. आतां या ज्या उपजीविकेला अत्यंत अवश्यक गोष्टी त्यांच्या प्रमाणापलीकडे लोकसंख्या वाढूं शकणार नाहीं हें उघड आहे. या गोष्टींपैकीं धान्य हें प्रधान अंग होय हेंही स्पष्टच आहे. परंतु पुष्कळ दिवस वसाहत केलेल्या देशांत व जेथें जमिनीच्या सुपीकतेची पराकाष्ठा होऊन गेला आहे अशा देशांत उतरत्या पैदाशीचा नियम लागूं असतो व म्हणूनच धान्याची पैदास वाढण्यास श्रम व भांडवल हे जास्त जास्त लागूं लागतात. या गोष्टी मनांत धरूनच **मॅलथसनें** मनुष्याची वाढ भूमितिश्रेढीनें होते असें म्हटलें आहे. वास्तविक सर्व सजीव वस्तूंना भूमितिश्रेढीचें प्रमाण लागूं आहे. सर्व वनस्पति व प्राणिमात्र यांमध्यें सृष्टीनें उत्पादनशक्ति इतकी जबर ठेविली आहे कीं, या वाढीस अनुकूल परिस्थिति असल्यास एका वनस्पतीच्या बीजापासून थोड्या काळांत सर्व पृथ्वी भरून टाकतां येईल. नवीन वसाहतीमध्यें जीं जनावरें पूर्वीं नव्हतीं—उदाहरणार्थ, आस्ट्रेलियांत बकरीं घ्या—त्यांच्या थोड्याशा बाहेरून नेलेल्या जोडप्यांपासून त्या वसाहतभर त्यांचा आतां प्रसार झाला आहे. म्हणजे भूमितिश्रेढीनें वाढण्याचें प्रमाण सर्व प्राण्यांत व वनस्पतींत आहे खरें; परंतु मनुष्यप्राण्याच्या वाढींत व त्याच्या वनस्पतीरूप अन्नाच्या वाढींत खालील प्रकारचा विरोध उत्पन्न होतो. जोंपर्यंत लागवड व केलेली जमीन पुष्कळ आहे तोंपर्यंत अन्न पुष्कळ वाढूं शकतें व म्हणूनच नवीन वसाहत झालेल्या अमेरिकेमध्यें लोकसंख्या झपाट्यानें वाढली. कारण त्या ठिकाणीं लोकसंख्येच्या वाढीस निग्रह नाहींत; सुपीक जमीन मुबलक, लोकांची राहणी साधी, लोक ज्यास्त शुद्ध व पवित्र, यामुळें तेथें स्त्रीपुरुष वयांत आल्याबरोबर त्यांचीं लग्नें होत. कारण संततीच्या जोपासनेची व उपजीविकेची अडचण

नव्हती. यामुळें अमेरिकेंत दर पंचवीस वर्षांमध्यें लोकसंख्येची दुप्पट होत असे. कांहीं ठिकाणीं तर दर वीस वर्षांनीं किंवा पंधरा वर्षांनींसुद्धां दुप्पट झाल्याचीं उदाहरणें आहेत. यामध्यें मॅलथसनें परदेशांतून येणाऱ्या लोकसंख्येची वजावाट करून तेथील लोकसंख्या वाढत्या प्रमाणानें होत गेली आहे असें अमेरिकेच्या दीडशें वर्षांच्या अनुभवावरून दाखविलें आहे. तेव्हां लोकसंख्येचा निग्रह करणाऱ्या कोणत्याही गोष्टी नसल्या म्हणजे सामान्यतः दर पंचवीस वर्षांनीं लोकसंख्येची दुप्पट होते असा सिद्धांत निघतो. उदाहरणार्थ, एखाद्या देशांत १ लाख लोक आहेत असें धरलें तर २५ वर्षांनीं ते २ लाख होतील; ५० वर्षांनीं ४ लाख होतील; ७५ वर्षांनीं ८ लाख होतील व १ शतकानें १६ लाख होतील. परंतु इतक्या झपाट्यानें अन्न मात्र वाढणार नाहीं. कारण एक तर सुपीक जमीन सर्व पृथ्वीवर मर्यादित आहे व एकंदर जमीनही मर्यादित आहे. ही जमीन वाढविणें शक्य नाहीं. तेव्हां धान्य वाढविण्याचा उपाय म्हणजे लागवडीस असलेल्या जमिनीचीच जास्त मशागत करून त्यांत खतमूत घालून जास्त धान्य उत्पन्न करणें हें होय. आतां या साधनांनीं धान्याची पैदास जास्त होते खरी, तरीपण ती उतरत्या प्रमाणांत होते. यामुळें वाढत्या लोकसंख्येला अन्नाचा तुटवडा हा पडलाच पाहिजे. म्हणजे या अन्नाच्या पैदाशीच्या बाहेर लोकसंख्या जाणें शक्य नाहीं. देशांत जर लोकसंख्येस पुरेसें धान्य व जीविताचीं इतर साधनें नसलीं तर मानवी संतति निरोगी व पूर्ण वाढीची होणार नाहीं हें उघड आहे. म्हणजे लोकसंख्येच्या आधीं अन्नाची वाढ झाली पाहिजे.

(२) मॅलथसच्या मीमांसेतील दुसरें विधान असें आहे. 'सबळ व स्पष्ट अशा निग्रहाच्या अभावीं उपजीविकेच्या साधनांच्या वाढीबरोबर नियतपणें लोकसंख्येची वाढ होतेच होते.' या विधानास मॅलथस यानें एक महत्वाचा उपाधि जोडला आहे. तो हा कीं, उपजीविकेच्या साधनांची वाढ अगर अन्नाची वाढ सामान्य लोकांपर्यंत पोंचली तरच लोकसंख्या वाढेल. वाढलेलें अन्न कायद्याच्या योगानें किंवा दुसऱ्या कांहीं कारणांनीं श्रीमंत लोकांच्याच हातीं राहून त्याचा दुसरीकडे विनियोग झाला तर या अन्नवाढीचा परिणाम लोकसंख्येवर होणार नाहीं. अन्नाच्या वाढीचा परिणाम होण्यास तें अन्न बहुजनसमाजाच्या वांट्याला मजुरीच्या वाढीच्या रूपानें आलें पाहिजे किंवा दुसऱ्या रूपानें बहुजनसमाजाच्या

हातीं पडलें पाहिजे; तरच लोकसंख्येच्या वाढीस सुरवात होईल.

मॅल्थसचें हें विधान पुष्कळ वेळां विसरलें गेलें आहे; किंवा त्याचा भलताच अर्थ केला गेला आहे. लोकसंख्या वाढल्यामुळें उपजीविकेचीं साधनें दुर्मिळ होतात व लोकसंख्येचा मारा त्यावर पडतो असें नव्हे. तर अन्नाची वाढ झाल्याबरोबर जर सबळ असे लोकसंख्येचे निग्रह अस्तित्वांत आले नाहींत तर लोकसंख्या अवश्यमेव वाढते. तेव्हां लोकसंख्येची वाढ ही लोकसंख्येच्या वाढीस अनुकूल कारणें व प्रतिबंधक कारणें या दोहोंचा एकवटलेला परिणाम होय.

( ३ ) तिसरें विधान असें आहे, "लोकसंख्येला उपजीविकेच्या साधनांच्या मर्यादेत ठेवणारे सबळ निग्रह म्हणजे ब्रह्मचर्य, व्यसन व विपत्ति हे होत. या निग्रहाचे साक्षात् व प्रतिबंधक निग्रह असे दोन वर्ग करतां येतात. ज्या निग्रहांच्या योगानें लोकांतील मरणाची संख्या वाढून लोकसंख्या कमी होते ते साक्षात् निग्रह होत व ज्या निग्रहाच्या योगानें लोकांतील जननाचें प्रमाण कमी होऊन लोकसंख्या कमी होते ते प्रतिबंधक निग्रह होत. प्रतिबंधक निग्रहांमध्यें ब्रह्मचर्य व व्यसन यांचा समावेश होतो."

ब्रह्मचर्य म्हणजे बाहेरख्यालीपणा न करितां लग्नाखेरीज व्रतस्थ राहणें होय. आपल्या कुटुंबाचें व भावी मुलाबाळांचें संगोपन करण्याचें सामर्थ्य येईपर्यंत शुद्ध राहून लग्न लांबणीवर टाकणें याला मॅल्थसनें ब्रह्मचर्य म्हटलें आहे. आजन्म ब्रह्मचर्य असा त्याचा अर्थ नव्हे. प्रजोत्पत्ति बंद करणारीं व्यसनें इतकाच व्यसन याचा संकुचित अर्थ मॅल्थसनें केला आहे. स्त्रीपुरुषांमध्यें अनियंत्रित, अस्वाभाविक व्यवहार व बाहेरख्याली वगैरेसारख्या व्यसनांचा यामध्यें अन्तर्भाव होतो. ही व्यसनें केव्हां केव्हां अगदी रानटी समाजांत तर केव्हां केव्हां अगदीं सुधारलेल्या समाजांतही दिसून येतात.

साक्षात् निग्रह हे ह्व्या तितक्या कारणांनीं उत्पन्न होतात; यांपैकीं कांहीं स्वाभाविक किंवा सृष्टिनिर्मित होत. जसें—दुष्काळ, सांथ, भूकंप, जलप्रलय वगैरे व कांहीं मनुष्यकृत असतात. जसें—लढाया, दंगेधोपे, रोगराई, दुखणींबाणें व उपासमार. या साक्षात निग्रहांचा समावेश विपत्ति या एकाच सदरांत होतो. म्हणजे एकंदर पूर्वोक्त तीन निग्रहच शेवटीं कायम ठरतात. पैकीं व्यसन व ब्रह्मचर्य हे प्रतिबंधक निग्रह होत व विपत्ति हा साक्षात् निग्रह होय.

साक्षात् निग्रह व प्रतिबंधक निग्रह यांच्यामध्यें व्यस्त प्रमाण असतें. परंतु त्यांचे परिणाम जी जननमरणसंख्या ती समप्रमाणांत असते. म्हणजे जेथें जनन जास्त तेथें मरण जास्त होतें आणि जेथें जनन कमी तेथें मरण कमी होतें. जेथें साक्षात् निग्रह जास्त प्रमाणांत असतात तेथें प्रतिबंधक निग्रह कमी प्रमाणांत असतात व जेथें साक्षात् निग्रह कमी प्रमाणांत असतात तेथें प्रतिबंधक निग्रह जास्त प्रमाणांत असतात. उदाहरणार्थ, ज्या समाजांत दुष्काळ, उपासमार, सांथ व रोग इत्यादि विपत्तीमुळें लोकसंख्येचा नाश फार होत असतो त्या समाजांत व्यसन किंवा ब्रह्मचर्य कमी असतें; म्हणजे तेथें लग्नें फार लवकर होतात. अर्थात् अशा समाजांत जननसंख्याही फार मोठी असते, व मरणसंख्याही जबर असते. परंतु ज्या ज्या समाजांत ब्रह्मचर्य पाळल्यामुळें जननप्रमाण फार बेतांत असतें त्या त्या समाजांत मरणसंख्याही पुष्कळ कमी असते.

**मॅलथस**ची लोकसंख्यामीमांसा वर वर्णिलेल्या या तीन विधानांत आहे. यांपैकीं पहिलें विधान अगदीं उघड निर्विवाद आहे. दुसऱ्या दोन विधानांचें समर्थन **मॅलथस**नें निरनिराळ्या देशांच्या व समाजांच्या इतिहासांवरून केलें आहे व हा प्रत्यक्ष पुरावा व तो गोळा करण्याची खटपट हाच **मॅलथस**च्या ग्रंथाचा विशेष आहे. अगदीं रानटी स्थितींतील समाजापासून तों युरोपांतल्या अगदीं सुधारलेल्या समाजाचें **मॅलथस**नें सिंहावलोकन केलें आहे व या प्रत्येक समाजामध्यें अन्न व लोकसंख्या यांच्यामध्यें कोणत्या निग्रहानें समीकरण घडून आलेलें आहे हें त्यानें दाखविलें आहे. त्याच्या या सिंहावलोकनाचें पर्यवसान असें आहे कीं, जसजसा समाज सुधारत जातो तसतसा त्या समाजामध्यें साक्षात् निग्रहापेक्षां प्रतिबंधक निग्रहाचा प्रभाव जास्त जास्त होत जातो व असें होणें समाजांतील लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीनें इष्ट आहे.

रानटी स्थितींतील समाजांतील लोकसंख्या व अन्न यांमधील समीकरण निरनिराळ्या तऱ्हेच्या विपत्तींनीं व व्यसनें, दुर्गुण व आपत्ति यांनीं घडून येतें. **अंदमान**सारख्या किंवा **टेराडेलफुगो**सारख्या नापीक जमिनींत लोकांचें उद्योगसर्वस्व म्हणजे जमिनींत व समुद्रांत मिळणारें स्वाभाविक अन्न मिळविणें हा होय. येथें त्यांच्या नेहमींच्या उपासमारीनें व सततच्या दुष्काळानें लोकसंख्या

कमी होते, तर कोठें स्त्रीपुरुषांच्या व्यसनी संवयी व दुष्ट चालीरीति या विपत्तींनीं लोकसंख्या कमी होते; तर कोठें आपापसांतील भयंकर लढाया व आजन्म हाडवैर यांनीं लोकसंख्या कमी होते. सारांश, रानटी स्थितींतील समाजांत लग्नासंबंधीं दूरदर्शीपणाचा किंवा ब्रह्मचर्य या निग्रहाचा जोर नसतो. तर विपत्ति, व्यसन, गुन्हे वगैरे निग्रहाचा पगडा जास्त असतो. परंतु समाज जसजसा ज्ञानवान् व सुधारलेला होत जातो तसतसा ब्रह्मचर्य हा नैतिक निग्रह प्रधान होत जातो व असें होण्यांतच समाजाचें हित आहे.

**मॅलथस**च्या या मीमांसात्मक निबंधानें त्या काळच्या विद्वान् लोकांत अगदीं गडबड उडवून दिली. पाद्री, धर्मोपदेशक व इतर धार्मिक लोकांनीं **मॅलथस**वर शिव्यांचा वर्षाव उडवून दिला; तर श्रीमंत व इनामदार लोकांनीं **मॅलथस**च्या मताचा तेव्हांच स्वीकार केला. कारण **मॅलथस**च्या मताप्रमाणें गरीब लोकांच्या विपत्तीबद्दल आपल्यावर जबाबदारी नाहीं; ही विपत्ति गरीब लोकांनीं लग्नासंबंधीच्या आपल्याच अविचारी वर्तनानें आपल्यावर ओढून घेतली आहे असें त्यांना समर्थन करतां येऊं लागलें. **मॅलथस**च्या मतें अन्नाच्या प्रमाणांत लोकसंख्या आणण्याकरितां विपत्ति, गुन्हे व दुर्व्यसनें हीं स्वाभाविक साधनें आहेत व मनुष्याच्या लग्न करण्यानेंही त्याच्यावर विपत्ति ओढवते असें झालें. हीं दोन्हीं विधानें ख्रिश्चन धर्माला व ईश्वरी व्यवस्थेला काळिमा आणणारीं आहेत. म्हणून या मुद्यावर **मॅलथस**वर धर्मनिष्ठ लोक रागावले.

परंतु **मॅलथस**चा हा निबंध लिहिण्यांत दारिद्र्यावस्थेचें एक कारण समाजापुढें मांडण्याचा हेतु होता. त्याच्या मीमांसेचा मथितार्थ इतकाच कीं, मानवी प्राण्यामध्यें ही जी स्वाभाविक लग्नाची इच्छा व तिचा स्वाभाविक परिणाम लोकसंख्यावृद्धि यांवर दाब राहिला नाहीं तर लोकसंख्या झपाट्यानें वाढून समाजांत विपत्ति, दुःख, व्यसनें व गुन्हे उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहींत. तरी समाजांतील हे अनर्थ नाहींसे करावयाचे असतील तर ब्रह्मचर्याची कल्पना समाजांत व विशेषतः खालच्या वर्गांत प्रचलित झाली पाहिजे. आपल्या कुटुंबाचें व भावी संततीचें पालनपोषण योग्य तऱ्हेनें करतां येईल अशा प्रकारची आपली सांपत्तिक स्थिति असल्याखेरीज लग्न करावयाचें नाहीं, अशा प्रकारची भावना व तदनुरूप प्रवृत्ति सुधारलेल्या समाजांतील सुशिक्षितांमध्यें व उच्च वर्गामध्यें आधींच उत्पन्न

झालेली असते; हीच प्रवृत्ति कामगार व मजूरलोकांमध्यें वाढली पाहिजे. हें होण्यास सर्व लोकांस शिक्षण फुकट मिळालें पाहिजे व त्यांना चांगलें राहण्याची वासना उत्पन्न झाली पाहिजे; समाजांतील लोकांना सुखी होण्याचा हा खरा मार्ग आहे. संपत्तीची सारखी वांटणी करणें किंवा सरकारी खात्याकडून गरिबांस दान देवविणें हे त्यांना सुधारण्याचे खरे मार्ग नव्हेत; एवढेंच मॅलथसचें म्हणणें होतें. लोकांच्या सुखाकरितां देशांतील लोकसंख्या कमीच झाली पाहिजे व माणसानें लग्न करणें व प्रजोत्पादन करणें हें पाप आहे अशा प्रकारचें प्रतिपादन मॅलथसनें कोठेंच केलेलें नाहीं. उलट उपजीविकेचीं साधनें वाढतील त्या मानानें लोकसंख्या वाढावी अशी त्याची इच्छा होती. मात्र ही वाढ जन्मास येतील तेवढीं मुलें जगून तीं सुदृढ, निरोगी निपजून व लोकांमध्यें मृत्यूचें प्रमाण कमी होऊन व्हावी, एवढीच त्याची इच्छा होती.

मॅलथसची मीमांसा ही अर्थशास्त्रांतील एक प्रमुख भाग होऊन बसली आहे. ज्याप्रमाणें ॲडाम स्मिथनें समाजांतील संपत्तीच्या वाढीचीं कारणें शोधून काढून लोकांचें लक्ष तिकडे वेधलें, त्याचप्रमाणें मॅलथसनें दारिद्र्याचें एक कारण शोधून काढून त्याकडे लोकांचें लक्ष वेधविलें व त्यापासून आपला बचाव करण्याचा उत्तम मार्ग कोणता हें दाखविलें. तो मार्ग म्हणजे लोकांच्या स्वाभाविक वासनांची सुधारणा व जास्त उन्नत अशा सामाजिक कल्पनेचा प्रसार होय.

मॅलथसनें आपल्या मीमांसेमध्यें ज्या दोन गोष्टी गृहीत धरल्या आहेत म्हणून वर सांगितलें आहे, त्यांपैकीं एका गोष्टीबद्दल कांहीं उत्क्रान्तिवाद्यांनीं आक्षेप घेतला आहे. विवाहवासना ही त्याच्या उन्नतीबरोबर कमी होते व त्याची प्रजोत्पादनशक्तिही कमी होते असें त्याचें म्हणणें आहे. हर्बर्ट स्पेन्सरनें असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे कीं, जसजसा समाज उत्क्रान्तीच्या व भरभराटीच्या वरच्या पायरीवर जाऊं लागतो तसतशी प्रजोत्पादनशक्तीही कमी होते. सुशिक्षित माणसांची व बौद्धिक धंदे करणारांची प्रजोत्पादनशक्ति कमी होत आहे असें दिसून येतें. परंतु ही गोष्ट स्वाभाविकपणें होते किंवा ब्रह्मचर्याच्या प्रवृत्तीनें होते याचा निर्णय झालेला नाहीं व या विषयासंबंधीं उत्क्रान्तिवाद्यांमध्यें कोणतेंही ठाम मत झालेलें नाहीं. तेव्हां सामान्यतः मॅलथसचें म्हणणें सर्वसाधारण समाजास अजूनही लागू आहे यांत शंका नाहीं.

लग्नाची वासना व प्रजोत्पादनाची शक्ति यांचा समाजाच्या सांपत्तिक स्थिती-शीं व मनुष्याची भरभराट किंवा विपत्ति यांच्याशीं संबंध आहे, हें आमच्या हिंदुसमाजाला अश्रुतपूर्वच आहे. आमच्यांतील यासंबंधाच्या चाली व कल्पना यांचा धर्माशीं निकट संबंध असल्यामुळें या चाली व कल्पना परिस्थिति कितीही बदलली तरी बदलल्या नाहींत. हिंदुसमाजांत अशी एक कल्पना प्रचलित आहे कीं, प्रत्येक मुलीचें लग्न झालेंच पाहिजे. तसेंच प्रत्येक पुरुषानें गृहस्थाश्रम स्वीकारला पाहिजे. या धार्मिक कल्पनेमुळें मुलांमुलींचीं लग्नें करून देणें हें आईबापांचें आद्यकर्तव्य आहे असें समजलें जातें. यामुळें आमचीं लग्नें ह्मणजे अर्थशास्त्रकार ज्याला बालविवाह ह्मणतात त्या काळाच्याही आधींच होतात. स्त्रीपुरुष उपवर झाल्याबरोबर विवाह होणें ह्मणजे मुलीचा चवदापंधराव्या वर्षी व मुलाचा सतराआठराव्या वर्षी होणारा विवाह याला ते बालविवाह ह्मणतात. आमचे इकडील विवाह यापूर्वीच घडून आलेले असतात. यामुळें लोकसंख्येचा ब्रह्मचर्य अगर आत्मसंयमन ह्मणून जो निग्रह मॅलथसनें सांगितला आहे त्याला येथें अवकाश रहात नाहीं. आमच्या सर्व जातींमध्यें मुलांमुलींचा विवाह करून देणें हें आईबापांचें पहिलें कर्तव्यकर्म समजलें जातें. आपल्या मुलाबाळांचें शिक्षण कसें होईल व ते आपल्या पायांवर उभे राहण्यास कसे तयार होतील याची इतकी काळजी आईबापांना नसते. परंतु मुलाचे दोहोंचे चार हात कधीं होतील ही मोठी काळजी आईबापांना असते व मुलाचें लग्न झाल्यावर नातवाचें तोंड कधीं पाहीन असें त्यांना होऊन जातें. आमच्या समाजांत मुलाच्या शिक्षणाला पैशाची अडचण असतांना त्याकडे कानाडोळा करून मुलाचें आधीं लग्न करून देण्यास तयार असणारे बाप पुष्कळ असतात. अलीकडे हुंड्याचें मान वाढल्यामुळें मुलाचें लग्न करणें हा एक किफायतशीर धंदा होऊं पहात आहे. मुलाची जास्त किंमत येण्याच्या आशेनें कांहीं आईबाप आपल्या मुलांचीं लग्नें लांबणीवर टाकतात. सारांश, युरोपमध्यें विवाहाचा प्रश्न हा प्रौढ पुरुषांनीं किंवा स्त्रियांनीं आपआपल्याबद्दल सोडविण्याचा प्रश्न आहे, तर येथें विवाह जमविणें न जमविणें हा आईबापांच्या इच्छेचा व नफ्यातोट्याचा प्रश्न झालेला आहे. तेव्हां लोकसंख्येचे आमच्या समाजांत साक्षात् निग्रहच अस्तित्वांत आहेत. प्रतिबंधक निग्रहाला येथें जागाच नाहीं. सुधारलेल्या देशांत वरच्या वर्गामध्यें या निग्रहाचें प्राबल्य

असतें. मात्र कनिष्ठ वर्गांमध्यें ही भावना वाढवावयाची हें तिकडील समाजसुधारकांचें काम आहे. परंतु आमचेइकडे लग्न करणें हें स्त्रीपुरुषांचें प्रौढ वयांत आल्यावर आपल्या इच्छेप्रमाणें करण्याचें कर्तव्यकर्म होय; येथें आईबापांचें कांहीं काम नाहीं; आईबापांनीं मुलांमुलींना शिक्षण देऊन त्यांना आपल्या पायावर उभें राहण्यास शिकविलें ह्मणजे झालें, ही भावना प्रथम उत्पन्न करावयाची आहे. आपल्या बायकोचें व मुलांचें पालनपोषण करण्याचें सामर्थ्य आल्याखेरीज लग्न करणें ही गोष्ट फार अनिष्ट आहे व प्रत्येक मनुष्यानें आपल्या पायावर उभें राहण्यास शिकलें पाहिजे ही भावना सर्व वर्गांच्या लोकांमध्यें उत्पन्न करावयाची आहे. अशा प्रकारची भावना उत्पन्न झाल्यानेंच आमच्या समाजांतील पुष्कळ विपत्ति व दुःखें कमी होणार आहेत. हल्लींच्या आमच्या समाजांत रानटी समाजांतील स्थिति दृष्टोत्पत्तीस येते. ह्मणजे आमच्या समाजांत अन्न व लोकसंख्या यांचें समीकरण साक्षात् निग्रहांनीं घडून येत आहे. ह्मणूनच मागें सांगितल्याप्रमाणें आमच्या समाजांत जननाचें प्रमाण फार आहे. कारण, बालविवाहाचा व प्रत्येक स्त्रीनें लग्न करण्याचा प्रघात जारीनें चालू आहे. मात्र विधवांना पुनर्विवाहाची परवानगी नसल्यामुळें लग्न झालेल्या पुष्कळ बायकांना वैधव्यावस्थेंत राहून जुलुमानें आत्मसंयमन अवश्यमेव करावें लागतें. अशा स्थितीमुळें हिंदुस्थानांत लोकसंख्या साक्षात निग्रहानें कमी होते ह्मणजे येथें मृत्यूचें प्रमाणही फार जबर आहे.

वर दिलेल्या विवेचनावरून असें दिसून येईल कीं, जरी हिंदुसमाजाची सामाजिक स्थिति व चालीरीति युरोपपेक्षां अगदीं निराळ्या आहेत, तरी अन्न व लोकसंख्या यांचें समीकरण मॅलथसच्या तत्त्वाप्रमाणेंच घडून येत आहे. परंतु समाजांतील निरनिराळ्या जातींतील लोकांची सुधारणा करावयाची असल्यास त्यांच्यामध्यें जास्त उन्नत अशा राहणीची आवड उत्पन्न केली पाहिजे; याकरितां शिक्षण सार्वजनिक झालें पाहिजे व प्रौढपणीं लग्न करण्याची व आपली स्थिति सुधारण्याकरितां लग्नाच्या बाबतींत कांहीं काळ आत्मसंयमन करण्याची भावना लोकांमध्यें उत्पन्न केली पाहिजे. याची पहिली पायरी ह्मणजे प्रौढविवाहाचा प्रचार सुरू झाला पाहिजे, व हें होण्यास मुलीच्या लग्नाची पराकाष्ठेची मर्यादा ह्मणजे ऋतुप्राप्ति ही जी धार्मिक कल्पना आहे ती नाहींशी झाली पाहिजे. ही सुधारणा

आणि हा कल्पनाविच्छेद सुशिक्षित लोकांनी आपल्या उक्तींनीं व कृतींनीं घडवून आणला पाहिजे.

# भाग अकरावा.

## भांडवलाची वाढ.

संपत्तीच्या उत्पत्तीच्या मूर्त कारणांचा विचार करतांना असें दाखविलें आहे कीं, समाजाच्या प्रथमावस्थेंत सृष्टिशक्ति व मानवी श्रम या दोहोंच्या साहाय्यानेंच संपत्ति उत्पन्न होते व भांडवल हें या दोहोंचा परिणाम आहे. तरी पण समाजाच्या परिणतावस्थेंत या मागाहून आलेल्या कारणालाच प्राधान्य येतें. आतां या भांडवलाची देशांत वाढ कशी होत जाते हें पहावयाचें आहे. भांडवल हें संपत्तीचेंच एक विशेष स्वरूप असल्यामुळें भांडवलाच्या वाढीचा प्रश्न ह्मणजे पर्यायानें संपत्तीच्या वाढीचाच प्रश्न आहे व ह्मणूनच या बिकट प्रश्नाबद्दल अजूनही अर्थशास्त्रज्ञांमध्यें बराच मतभेद आहे. परंतु सुधारलेल्या समाजांतील उद्योगधंद्याच्या स्वरूपाचें थोडया बारकाईनें पृथक्करण केलें ह्मणजे याही प्रश्नाचा समाधानकारक रीतीनें निकाल लावितां येतो.

अभिमतपंथाच्या मताप्रमाणें भांडवलाच्या वाढीची उपपत्ति अगदीं सोपी आहे. याच उपपत्तीवर मिलुचा भांडवलाविषयींचा एक सिद्धान्त बसविलेला आहे. तो सिद्धान्त असा—

भांडवल हें काटकसरीचें अगर शिल्लक टाकण्याच्या प्रवृत्तीचें फळ होय. 'भांडवल' या भागांत याचा थोडक्यांत विचार केला होता. त्याचाच येथें साकल्येंकरून विचार करावयाचा आहे. अभिमतपंथाच्या व विशेषतः मिलुच्या या सिद्धान्तावर आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनीं फार कडक टीका केली आहे. ही टीका कांहीं अंशीं अज्ञानमूलक आहे खरी; तरी पण या सिद्धान्तापासून अभिमतपंथी अर्थशास्त्रकारांनीं कांहीं चुकीचीं अनुमानें काढलीं आहेत, हें खोटें नाहीं. तेव्हां या सिद्धान्ताचा अर्थ काय हें आधीं ठरविलें पाहिजे. हा सिद्धान्त समाजाच्या प्राथमिक अवस्थेंतील अनुभवावरून व व्यवहारांतील व्यक्तीच्या

अनुभवावरून काढलेला आहे हें उघड आहे. अगदीं रानटी स्थितीतील मनुष्याची वृत्ति पशूसारखीच असते. अर्थात् भूक लागली म्हणजे भक्ष्य शोधावें व जें मिळेल त्यावर सपाटून ताव मारावा व मग पुन्हां भूक लागे तोंपर्यंत स्वस्थ पडून रहावें. इतक्या रानटी स्थितींत असलेल्या मनुष्यांच्या टोळ्या अजूनही कोठें कोठें पहावयास सांपडतात. परंतु मनुष्यप्राण्याला ईश्वरानें उपजतच दूरदृष्टि दिली असल्यामुळें तो भावी वासनांच्या तृप्तीची तजवीज आधींपासून करूं लागतो. त्यानें जी संपत्ति शिकार करून मिळविली असेल ती एकदम न संपवितां तींपैकीं थोडकीवर आपली भूक भागवून बाकीची तो संग्रहीं टाकतो. ह्याच भांडवलाचा उगम होय. भांडवलाच्या मूळस्वरूपाचें विवेचन करतांना भांडवलाची मूलभूत कल्पना ह्मणजे भावी वासनांच्या तृप्तीकरितां एकीकडे काढून ठेविलेली संपत्ति होय असेंच दाखविलें आहे. ह्मणजे भांडवल हें उत्पन्न व खर्च यांतील अंतरापासून निष्पन्न होतें व यालाच व्यवहारांत काटकसर ह्मणतात. तेव्हां भांडवल जास्त वाढविण्याकरितां उत्पन्न जास्त करून खर्च होतां होईल तितका कमी केला पाहिजे, असें दुसरें अनुमान त्यावरून काढलें जातें. समाजामध्यें व्यक्ति अशा काटकसरीनें व कमी खर्च करण्यानें श्रीमंत होतात असें आपण पाहतों. या सर्व उदाहरणांवरून व दाखल्यांवरून भांडवल हें काटकसरीचें फळ होय असा अभिमतपंथानें सिद्धान्त काढला. परंतु व्यक्तींच्या अनुभवावरून व समाजाच्या प्राथमिक स्थितींतील अनुभवावरून काढलेला सिद्धान्त राष्ट्रीय भांडवलाच्या वाढीला व विशेषतः औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या राष्ट्राला लागू पडत नाहीं, इतकेंच नव्हे तर तो सिद्धान्त संपत्तीच्या वाढीच्या एका अमूर्त कारणाच्या विरुद्ध असल्यामुळें खरा नाहीं असें आक्षेपकांचें ह्मणणें आहे. जोंपर्यंत प्रत्येक मनुष्य आपल्या सर्व गरजा आपल्याच श्रमानें भागवीत असे तोंपर्यंत त्याची संपत्ति अगर भांडवल त्याच्या स्वतःच्याच काटकसरीनें अथवा उत्पन्न व खर्च यांतील अंतरानें वाढणार हें उघड आहे. परंतु ही स्थिति समाजांतील बाल्यावस्थेतील झाली. अर्वाचीन काळीं संपत्तीचे उत्पादक कारखानदार हे स्वतःच्या गरजा भागविण्याकरितां संपत्ति उत्पन्न करीत नाहींत; तर दुसऱ्याच्या उपभोगाकरितां संपत्ति उत्पन्न करतात. हल्लींच्या काळच्या कापडाच्या गिरणीच्या मालकाला स्वतःच्या गरजेकरितां आपल्या कापडांपैकीं एकदशांश भागसुद्धां

लागत नाहीं. बाकी सर्व माल तो विक्रीकरितां उत्पन्न करतो. अर्थात् हा एवढा मोठा माल जेव्हां विकत घेतला जाईल ह्मणजे त्या मालाचा व्यय अगर खर्च होऊन जाईल तेव्हांच त्याचें भांडवल वाढेल. जर का माल त्याच्या अंगावर पडला तर त्याचें भांडवल वाढण्याच्या ऐवजीं तें अजीबात नाहींसें मात्र होईल. व्यापाराला जेव्हां जेव्हां मंदी येते तेव्हां तेव्हां भांडवलाची वाढ खुंटते, व व्यापाराची मंदी ह्मणजे प्रत्येक मनुष्याची काटकसर होय. उदाहरणार्थ, एकाद्या ठिकाणीं दुष्काळाचीं चिन्हें दिसूं लागलीं कीं, प्रत्येक मनुष्य आपल्या सर्व खर्चांत काटकसर करूं लागतो. अर्थात् आपल्या वासनांची तृप्ति होतां होईल तितकी पुढें ढकलतो. कारण त्याला असें दिसून येतें कीं, आपल्या अवश्यकालाच आपलें सर्व उत्पन्न लागणार. यामुळें तो कापडचोपड घेत नाहीं व दुसरे चैनीचे पदार्थ कमी करतो; अतएव धान्याखेरीज सर्व जिनसांच्या व्यापारास मंदी येते. ह्मणजे हे सर्व व्यापार आंतबट्टयाचे होऊं लागतात. गिरण्यांचीं यंत्रें खराब होऊं नयेत ह्मणून गिरणीवाले आपल्या गिरण्या थोडे फार तास चालवितात; परंतु या काळीं ते आपलें नुकसान करून गिरण्या चालवितात. तेव्हां काटकसरीनें भांडवल उत्पन्न होतें याचा सामान्य व सहज मनांत येणारा अर्थ धरून चालावयाचें नाहीं. कारण, जर प्रत्येक मनुष्य आपली वासना कमी करूं लागला तर संपत्ति उत्पन्नच होऊं शकत नाहीं. कारण, संपत्तीच्या उत्पत्तीचें एक अमूर्त कारण नाहींसें होतें व संपत्तीची उत्पत्तीच बंद झाली ह्मणजे भांडवल वाढत नाहीं, इतकेंच नव्हे तर देशांत असलेलें भांडवल नाहींसें होतें.

तेव्हां भांडवल वाढण्याचें खरें कारण ह्मणजे संपत्तीची पुष्कळ उत्पत्ति व पुष्कळ व्यय होय. अर्थात् संपत्तीचा जोरानें व्यय होऊं लागला कीं उत्पत्तीला उत्तेजन मिळतें व उत्पत्ति व व्यय या दोहोंची वाढ म्हणजे लोकांच्या नफ्याची वाढ व नफ्याची वाढ ह्मणजे भांडवलाची वाढ होय. याला हिंदुस्थानच्या गेल्या दोन चार वर्षांचें उदाहरण उत्तम आहे. मुंबईस गिरण्यांचा व्यापार आज पुष्कळ वर्षे चालू आहे, परंतु गेल्या वीस किंवा पंचवीस वर्षांत भांडवलाची वाढ झाली नसेल इतकी वाढ गेल्या ३ । ४ वर्षांत झाली. ही वाढ कशी झाली? या गिरणीवाल्यांनीं आपला खर्च अगदीं कमी करून सर्व उत्पन्न मागें टाकलें काय? नाहीं. या भांडवलाच्या वाढीशीं त्यांच्या खासगी उत्पन्नाचा किंवा खर्चाचा संबंध

नाहीं. ही भांडवलाची वाढ व्यापाराच्या विलक्षण तेजीनें झाली व ही व्यापाराची तेजी ह्मणजे तरी काय ? हिंदुस्थानामध्यें जी एक स्वदेशीची लाट उसळली त्या लाटेमुळें मुंबईच्या मालाला मागणी फार वाढली. यामुळें गिरणीवाल्यांनीं आपल्या मालाची पैदास आपल्या गिरण्यांच्या पराकाष्ठेच्या शक्तीपर्यंत वाढविली व त्यांचा माल उत्पन्न झाल्याबरोबर किंवा आधींच विकला जाऊं लागला. या संपत्तीच्या उत्पत्ति व व्यय यांच्या भराभर परिवर्तनानें भांडवलाची वाढ झाली. गेल्या २।३ वर्षांत पांचपंचवीस नवीन गिरण्या निघून मुंबईच्या कारखानदारांनीं २।३ कोटींच्या ठ्यांका काढल्या व टाटाच्या लोखंडाच्या कारखान्यास दोन कोटी भांडवल पुरविलें. इतका हा भांडवलाचा पूर कशानें झाला ! काटकसरीनें साफ नव्हे, तर कारखानदारांस नफा फार झाला त्याच्यायोगानें होय.

वरील विवेचनावरून मिल्लच्या सिद्धान्तामधील खऱ्याखोट्याचा भाग तेव्हांच ध्यानांत येईल. ज्या वेळीं प्रत्येक मनुष्य आपल्या गरजा स्वतःच्या श्रमानें भागवितो त्या वेळीं काटकसरीनें शिल्लक पडते व त्याच्यायोगानें भांडवल तयार होतें हें म्हणणें खरें आहे. परंतु ज्या काळीं उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर चाल- तात त्या वेळीं संपत्तीची उत्पत्ति व व्यय यांच्या अंतरानें भांडवल शिल्लक पडत जात नाहीं; तर कारखानदाराचा माल भराभर खपला पाहिजे, ह्मणजे दुसऱ्या लोकांनीं त्याचा उपभोग घेतला पाहिजे. अशा तऱ्हेनें व्यापाराला तेजी असली ह्मणजे कारखानदारास नफा होतो व या नफ्यापैकीं त्यानें कमी खर्च केला व शिल्लक ठेविली म्हणजे भांडवल वाढतें. तेव्हां सुधारलेल्या औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या समाजांत नफ्याच्या शिल्लकेतून भांडवल वाढतें; निवळ संपत्तीच्या शिल्लकेतून भांडवल वाढत नाहीं. समाजाच्या बाल्यावस्थेमध्यें प्रत्यक्ष संपत्ति शिल्लक टाकल्यानें भांडवल वाढतें. परंतु पुढें हा साधा प्रकार राहात नाहीं, तर त्याला मोठें गुंतागुंतीचें स्वरूप येतें.

तेव्हां काटकसर याचा मर्यादित अर्थ घेतला पाहिजे. व काटकसर याचा चटकन् ध्यानांत येणारा अर्थ–खर्च कमी करणें–हा अर्थशास्त्रांतील खरा अर्थ नव्हे, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. अर्थशास्त्रदृष्ट्या काटकसर ह्मणजे प्रत्येक मनु- ष्यानें पुष्कळ खर्च करणें; व आपलें उत्पन्न खर्चापेक्षांही जास्त करणें होय; असा अर्थ धरला ह्मणजे नव्या जुन्या अर्थशास्त्रकारांच्या मतांची संगति लागते.

आतां या मर्यादित अर्थी शिल्लक टाकण्यास कोणत्या गोष्टी अनुकूल आहेत याचा विचार करणें इष्ट होईल.

शिल्लक टाकण्याला पहिली अनुकूल गोष्ट ह्मणजे मनुष्याची दूरदृष्टि ही होय. अगदीं रानटी स्थितींत या बाबतींत पशु व मनुष्य यांमध्यें फारसें अंतर नसतें. परंतु जसजसें मनुष्याचें ज्ञान वाढतें तसतशी ही दूरदृष्टि वाढत जाते. भावी वासना किंवा भविष्यत्कालीं उत्पन्न होणाऱ्या गरजा यांची आधीं तरतूद करण्याची प्रवृत्ति जसजशी वाढलेली असते त्या त्या मानानें मनुष्यसमाजाची सुधारणा झालेली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्मणजे ही दूरदृष्टि हें मानवी सुधारणा मोजण्याचें एकप्रकारचें माप आहे असें ह्मटलें तरी चालेल. कांहीं रानटी जातींची सुधारणा कधींच होत नाहीं. कारण, त्यांच्यामध्यें हा गुण उद्भूतच झालेला नसतो. कारण भावी वासना आपल्या मनापुढें मूर्तिमंत उभी करणारी कल्पनाशक्ति हिचा या लोकांमध्यें अभाव असतो. रानटी मनुष्य आतांची वासना तृप्त करण्याकरितां—उदाहरणार्थ, फळ काढण्याकरितां—झाड तोडण्यास कमी करणार नाहीं. ही अदूरदृष्टि किंवा अविचार मुळें, रानटी लोक, गरीब लोक व उडाणटप्पू लोक या सर्वांमध्यें दृष्टीस पडते. दूरदर्शीपणाची वाढ ही भांडवलाच्या वाढीस अनुकूल आहे हें मागें दिलेल्या भांडवलाच्या मूळ कल्पनेवरूनही दिसून येईल. अप्रत्यक्षपणें किंवा प्रत्यक्षपणें भावी वासनांची तृप्ति करण्याकरितां राखून ठेविलेली संपत्ति अशी भांडवलाची मूळ कल्पना आहे; परंतु अशी तरतूद करण्याची नेहमींची संवय ह्मणजेच दूरदृष्टि होय.

शिल्लक टाकण्यास दुसरी अनुकूल गोष्ट ह्मणजे टिकाऊ संपत्तीचें अस्तित्व होय. मृगयावृत्ति माणसाला दूरदृष्टि असली तरी शिकार फार दिवस राहणें शक्य नसतें. यामुळें त्याला शिल्लक टाकण्याची बुद्धि होत नाहीं, व बुद्धि झाली तरी तिचा तादृश उपयोग नसतो. कारण, शिकारीचें फळ थोड्या काळांत नासून जाणारें असतें. त्या काळीं कातडीं वगैरे टिकाऊ असतात खरीं, परंतु कातडीं कमावण्याची कला मृगयावृत्ति माणसाला ठाऊक नसते. मनुष्याच्या गरजा या काळीं फार कमी असतात. व लोकवस्ती फार कमी असल्यामुळें मृगया न मिळण्याची केव्हांही धास्ती नसते. यामुळें भावी वासनांची तरतूद करण्याची त्या काळीं मनुष्यास जरूरी नसते व तितकी त्याची कल्पनाशक्तीही वाढलेली नसते.

ह्मणून त्या वृत्तीमध्यें समाजांत संपत्ति व भांडवल हीं दोन्हीही उत्पन्न होऊं शकत नाहींत. गोपालवृत्ति समाजांतील संपत्ति गुराढोरांची व शेळ्यामेंढ्यांची असते व या संपत्तीची वाढ आपोआप नैसर्गिक क्रमानेंच होते. येथें सर्व संपत्ति ही भांडवलही असते, व मनुष्याच्या श्रमाखेरीज पशुरूपी संपत्ति आत्मसदृश संपत्तीला प्रसवते. यामुळें या समाजाच्या स्थितींत जरी दूरदृष्टीची फार वाढ झाली नाहीं, तरी नैसर्गिक कारणांनींच प्रत्येक मनुष्याची संपत्ति वाढत जाते. कृषिवृत्ति समाजांत मात्र संपत्तीची वाढ ज्याप्रमाणें झपाट्यानें होते त्याचप्रमाणें भांडवलाचीही वाढ झपाट्यानें होऊं लागते. कारण या स्थितींत पुष्कळ टिकाऊ संपत्तीचे प्रकार अस्तित्वांत आलेले असतात व मनुष्याच्या अवश्यकांपैकीं मुख्य जें धान्य तेंही पुष्कळ काळपर्यंत टिकूं शकतें. ह्मणून दुष्काळासारख्या आपत्तींत उपयोगी पडण्याकरितां धान्य पुरून ठेवण्याची पद्धतसुद्धां अमलांत येते. तरी पण धान्य हें थोड्या फार कालानें नासणारेंच आहे. शिल्लक टाकण्याच्या प्रवृत्तीला सोन्यारुप्याच्या नाण्यांच्या प्रसारापासून जास्त उत्तेजन मिळतें. कारण, सोनें रुपें व त्यांचीं नाणीं हीं अत्यंत टिकाऊ संपत्ति आहे. तशीच ठेवल्यानें किंवा पुरून ठेवल्यानें ती नासत नाहीं, गंजत नाहीं किंवा कमी होत नाहीं. शिवाय नाणीं किंवा पैसा हा सर्व संपत्तीचा विनिमयसामान्य असल्यामुळें केव्हांही त्याच्या मोबदला आपल्याला पाहिजे तो माल मिळतो. तसेंच नाण्याचें मोलही स्थिर असल्यामुळें पैसे शिल्लक टाकल्यानें आपलें नुकसान केव्हांही होण्याचा संभव नसतो. आपण खर्च केलेलें मोल केव्हांही आपल्याला परत मिळतें. परंतु उद्योगवृत्ति समाजांत पैशापेक्षां आणखीही एक शिल्लक टाकण्याचें नवीन साधन तयार होतें. तें साधन ह्मणजे सरकारी प्रॉमिसरी नोटा, निरनिराळ्या खासगी व सार्वजनिक संस्थांचे शेअर्स व डिबेंचर्स होत. या रूपानें शिल्लक टाकण्यापासून व्यक्तीचा व समाजाचा असा दुहेरी फायदा होतो. प्रत्येक व्यक्तीला आपल्या शिलकेपासून वार्षिक उत्पन्न मिळूं लागतें व देशांतील शिल्लक पैसा नाण्याच्या रूपानें अनुपयुक्त न राहतां उत्पादक भांडवलाच्या रूपानें देशांतील उद्योगधंद्यांची वाढ करतो.

भांडवल वाढण्यास शेवटली अनुकूल गोष्ट ह्मणजे शिल्लक टाकण्यास उत्तेजन देणाऱ्या संस्था होत. पेढ्या, सहकारी पतपेढ्या, मजूरसंघ, परस्पर सहकारी मंडळ्या, आयुष्याचा विमा उतरणाऱ्या मंडळ्या वगैरे प्रकारच्या संस्था या

प्रत्यक्षपणें व अप्रत्यक्षपणें मनुष्याला संपत्ति शिल्लक टाकण्यास व काटकसर करण्यास उत्तेजन देणाऱ्या संस्था आहेत. देशामध्यें अशा संस्थांचा जितका जितका जास्त प्रसार होईल तितकें तितकें भांडवलाच्या वाढीस उत्तेजन मिळतें असा सार्वत्रिक अनुभव आहे. अशा संस्था निघणें हा लोकांच्या काटकसरीच्या प्रवृत्तीचा परिणाम आहे. अर्थात् या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत. म्हणजे पहिल्याचा परिणाम दुसऱ्यावर होतो व दुसऱ्याचा परत पहिल्यावर होतो. ज्याप्रमाणें मालाचा पुरवठा व खप या परस्परावलंबी गोष्टी आहेत तसाच येथें प्रकार आहे. देशांत जसजशा असल्या संस्था वाढतात, तसतसें देशांत भांडवलाच्या वाढीस उत्तेजन मिळतें व देशांत जसजसें भांडवल वाढूं लागतें तसतशा अशा संस्था वाढूं लागतात. या संस्थांपैकीं बऱ्याच संस्थांचें पुढील पुस्तकांमध्यें योग्य प्रसंगीं वर्णन यावयाचें आहे. तेव्हां संस्थांच्या नामनिर्देशापलीकडे व त्यांच्या सामान्य हितकारक परिणामापलीकडे येथें जास्त विचार करण्याची जरूरी नाहीं. या संस्थांचें स्वरूप व त्यापासून बहुजनसमाजावर होणारा सांपत्तिक परिणाम यांचें सविस्तर विवेचन पुढें होईलच. परंतु अशा संस्थांपैकीं अलीकडे सर्व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें अगदीं सार्वत्रिक झालेली संस्था म्हणजे पोस्टल सेव्हिंग बँक ही होय. हल्लींच्या काळीं ज्या ज्या ठिकाणीं पोष्टाचें ऑफिस असेल त्या त्या ठिकाणीं गरीब लोकांच्या शिल्लकांची ठेव घेण्याची सेव्हिंग बँकेची शाखा असतेच असते. या बँकेंत ४ आण्यांपासूनसुद्धां रकमा ठेवीदाखल घेतल्या जातात व अशा ठ्यांका पोष्टांत असल्यामुळें खेडेगांवांतील लोकांसुद्धां त्याचा उपयोग करून घेतां येतो. या ठेवींवर लोकांना थोडेंबहुत व्याज मिळतें. ज्याप्रमाणें सहकारी पतीचें तत्त्व किंवा परस्पर साहाय्यकारित्वाचें तत्व यांनीं अलीकडे सामाजिक क्रांति घडवून आणली आहे त्याचप्रमाणें ही पोस्टल ब्यांकांची कल्पना हा एक सामाजिक शोधच असून त्यानें जगांत मोठी क्रांति घडवून आणली आहे. गरीब लोकांची स्थिति सुधारण्यास, त्यांच्यामध्यें दूरदर्शीपणा व काटकसर हे गुण वाढविण्यास व अतएव देशांत भांडवल वाढवून देशाचा व व्यक्तीचा असा दुहेरी फायदा करण्यास ही संस्था एक उत्तम साधन झालेलें आहे. वर सांगितलेंच आहे कीं, या संस्थांमध्यें अगदीं लहान लहान रकमाही ठेवी ह्मणून घेतल्या जातात व असे पैसे मनुष्याच्या हातांत नसल्यामुळें खर्च होण्याचा संभव कमी

असतो. आपल्याच घरांत पैसे आपल्या पेटींत ठेवणें किंवा पुरून ठेवणें व पैसे ब्यांकेंत ठेवणें यांमध्यें जो मोठा फरक आहे तो या गोष्टीमध्यें आहे. घरांत ठेवलेला पैसा आपल्याच हातीं असतो व ब्यांकेंतील पैसा दुसऱ्याच्या हातांत असतो. दुसराही एक महत्वाचा फरक या दोन शिल्लक टाकण्याच्या पद्धतींत आहे; तो हा कीं, पहिल्या पद्धतींत आपल्या शिलकेपासून कांहीं एक उत्पन्न होत नाहीं, परंतु दुसऱ्या पद्धतींत ठेव ठेवणाराला आपल्या शिलकेवर व्याजाच्या रूपानें वार्षिक उत्पन्न येऊं लागतें. या संस्थांनीं जगांत किती नवें भांडवल उत्पन्न केलें आहे हें दर वर्षी प्रसिद्ध होणाऱ्या स्टेट्समन व इतर बुकांमधील पोस्टल बँकेंतील दर देशाच्या ठेवींच्या आंकड्यांवरून सहज दिसून येईल.

हिंदुस्थानांत संपत्तीची वाढ होत चालली आहे किंवा नाहीं हा मोठा वादग्रस्त प्रश्न आहे व ज्यापेक्षां त्या प्रश्नाचा विचार सविस्तरपणें या ग्रंथाच्या सहाव्या पुस्तकांत करावयाचा आहे त्यापेक्षां येथें त्याचा विचार करण्याची जरूरी नाहीं. भांडवलाच्या वाढीला अनुकूल म्हणून ज्या गोष्टी वर सांगण्यांत आल्या आहेत त्यासंबंधानें हिंदुस्थानच्या लोकांची काय स्थिति आहे याचा थोडक्यांत विचार करून हा भाग संपवावयाचा आहे.

दूरदृष्टि व काटकसर या बाबतींत आमच्या सर्व जातींतील सर्व लोकांची पुष्कळच उन्नति झालेली आहे. आपलें उत्पन्न कितीहि थोडें असो त्यांतूनच शिल्लक टाकण्याची प्रवृत्ति अगदीं सार्वत्रिक आहे. आमच्या लोकांची एकंदर राहणीच अगदीं साधी असल्यामुळें व प्रत्येक जातीची राहणी व चालीरीति अगदीं आंखून टाकल्याप्रमाणें असल्यामुळें मनुष्याच्या कमीजास्त प्राप्तीप्रमाणें आमच्या लोकांत कमीजास्त खर्च होत नाहीं. म्हणून उत्पन्न जास्त झाल्यास त्या मानानें खर्च वाढत नाहीं व शिल्लक आपोआप वाढत जाते. इंग्रजी शिक्षणानें, शहरांतील राहणीनें व परकी लोकांच्या सहवासानें नव्या नव्या सोयींच्या व चैनीच्या वस्तूंच्या पुरवठ्यानें ही प्रवृत्ति जात चालली आहे हें खरें आहे. परंतु भांडवलाच्या वाढीला अनुकूल असलेली पहिली गोष्ट आमच्यामध्यें आहे यांत शंका नाहीं; व जे कांहीं थोडेंबहुत भांडवल वाढत आहे तें या प्रवृत्तीचेंच फळ आहे, यांत शंका नाहीं. मात्र ही दूरदृष्टि व काटकसरीची प्रवृत्ति धार्मिक कल्पनांमुळें दोन बाबतींत विफल होते. त्या बाबती म्हणजे लग्नकार्यादि धार्मिक कृत्यें व मरणानंतरची

मेलेल्या माणसाची दिवसादिक धर्मकृत्यें होत. लग्नकार्यामध्यें आमच्या लोकांचा अतोनात खर्च होतो व या वेळीं काटकसरीपेक्षां उधळेपणाकडे व कर्ज काढून सण करण्याकडे आमच्या लोकांची प्रवृत्ति आहे. ही प्रवृत्ति पांढरपेशा व इतर सर्व जातींच्यामध्यें सर्वसाधारण आहे. मर्तिकाकरितां विलक्षण खर्च करण्याची प्रवृत्ति खालच्या जातींत विशेष आहे. या दोन उधळपट्टीच्या खालच्या वर्गांच्या प्रवृत्तीवरून आमच्या समाजाची पूर्ण माहिती नसणारे युरोपियन लोक, आमचा शेतकरीवर्ग अत्यंत उधळा आहे, त्याच्या कर्जबाजारीपणाचें कारण त्याचा उधळेपणा होय; आणि ह्मणून या कर्जबाजारीपणाचा संबंध जबर सरकारी साऱ्याशीं किंवा सारा वसूल करण्याच्या पद्धतीशीं किंवा इंग्रजी अमलानें आणलेल्या दुसऱ्या कोणत्याही गोष्टींशीं नाहीं असें बेधडक विधान करतात. या विषयाचा विचार आपल्याला पुढें करावयाचा आहे. तेव्हां सध्यां येथें इतकेंच विवेचन बस्स आहे; परंतु आमचा शेतकरीवर्ग सरसहा उधळा आहे हें मात्र खरें नाहीं. काटकसर हा गुण आमच्या सर्व जातींतील लोकांच्या हाडींमांशीं खिळलेला आहे. परंतु देशाच्या भांडवलाच्या वाढीला या प्रवृत्तीचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं. याचें कारण दुसऱ्या व तिसऱ्या अनुकूल गोष्टींचा अभाव होय.

हिंदुस्थानांत बहुजनसमाजाचें उत्पन्नच इतकें कमी आहे कीं, मनुष्याच्या अवश्यकांना तें धडपणीं पुरत नाहीं व अशा स्थितींत काटकसर झाल्यानें संपत्तीच्या उत्पत्तीच्या एका कारणाला कमतरता येत जाते. तोच प्रकार येथें चालू आहे. देशांतील मजुरवर्ग कमी शक्तिमान् व कमी कर्तृत्ववान् होत जात आहे व यामुळें संपत्तीचा मूळ झराच खराब होत चालला आहे.

तिसऱ्या अनुकूल गोष्टींसंबंधानें मात्र हिंदुस्थानांत ब्रिटिश अमलांत पुष्कळच सुधारणा घडून येत चालली आहे. व या संस्थांचा जसजसा प्रसार होईल तसतसा भांडवलाचा पुरवठा वाढत जाईल. कारण या तिसऱ्या अनुकूल गोष्टींमुळेंच देशांत तरतें भांडवल वाढतें व अशा भांडवलाचा संपत्तीच्या उत्पत्तीस फार उपयोग असतो.

पूर्वकाळीं देशामध्यें शांतता नव्हती; जिकडे तिकडे दंगेधोपे असत. यामुळें मालमत्तेला सुरक्षितता नव्हती. ह्मणून लोकांची प्रवृत्ति आपली शिल्लक डागडागिन्यांच्या रूपानें व पैशाच्या रूपानें पुरून ठेवण्याची फार होती. अशा रूपांत

ठेवलेल्या संपत्तीचा देशाला, व्यापाराला किंवा संपत्त्युत्पादनाला मुळींच उपयोग होत नाहीं. यामुळेंच हिंदुस्थानांत सोनें, रुपें गडप होत असे व युरोपियन लोकांना हा देश फार सधन आहे असें वाटत असे. आमच्या पुराणप्रियतेमुळें ही प्रवृत्ति अजून पुष्कळ अंशांनीं आहे तशीच आहे. खानदेशासारख्या भिल्लादि लुटारू लोकांनीं भरलेल्या प्रांतांत अजूनही लाखों रुपये पुरलेले आहेत असें ह्मणतात व असें पुरलेलें व ह्मणून व्यापारवृद्धीस निरुपयोगी झालेलें फार मोठें भांडवल हिंदुस्थानांत आहे असा पुष्कळ माहीतगार युरोपियनांनीं अंदाज केलेला आहे. या ह्मणण्यांत बरेंच तथ्य आहे यांत शंका नाहीं. तेव्हां हल्लींच्या सुधारलेल्या व सुरक्षिततेच्या काळांत आमच्या लोकांनीं डागडागिन्यांत वाजवीपेक्षां फाजील पैसे घालण्याची प्रवृत्ति, तसेंच पैसे जमिनींत पुरून ठेवण्याची प्रवृत्ति हीं सोडून दिली पाहिजे व आपले पैसे पेढ्यांमध्यें ठेवण्याची पद्धति सुरू केली पाहिजे. तसेंच नवीन निघणाऱ्या कारखान्यांत—विशेषतः अशा कारखान्यांस सरकारनें ग्यारंटी दिली असतां—पैसे घालण्यास तर त्यांनीं एका पायावर तयार झालें पाहिजे. देशी भांडवलास उत्तेजन देण्याकरितां सरकारनें देशी रेल्वे कंपन्यांना ग्यारंटीच्या व दुसऱ्या विशेष सवलती देऊं केल्या आहेत व त्यांचा फायदा घेण्यासाठीं आमच्या लोकांनीं आपले पुरलेले किंवा दागिन्यांत अद्वातद्वा खर्च केलेले पैसे बाहेर काढून अशा धंद्यांत घालण्याचें धाडस केलें पाहिजे. यानें स्वार्थ व परमार्थ किंवा देशकल्याण असे दोन्ही अर्थ साधत आहेत. परंतु असें होण्यास मागें सांगितल्याप्रमाणें कारखाने काढणाऱ्यांमध्यें धंद्याचें पूर्ण ज्ञान, सचोटी व कर्तव्यपरायणता हे गुणही पाहिजेत. ह्मणजे धंदे किफायतशीर होऊन लोकांना धंद्यांत भांडवल घालण्यास उत्तेजन येईल.

# भाग बारावा.

## सामान्य व औद्योगिक शिक्षण.

अर्वाचीन काळीं संपत्तीच्या उत्पत्तीस सृष्टीची शक्ति, भांडवल व श्रम या सर्व कारणांचा बरोबर मिलाफ घडवून आणून संपत्तीच्या उत्पत्तीची,

व तिच्या विक्रीची वगैरे सर्व धोक्याची जबाबदारी घेणारा योजक अगर कारखानदार हा एक संपत्तीच्या उत्पादक घटकांपैकीं एक महत्त्वाचा घटकच आहे हें मागें दाखविलें आहे. आतां समाजांतील या वर्गाची वाढ कशी होते हें या पुस्तकाच्या या शेवटल्या भागांत पहावयाचें राहिलें. या वाढीचें कारण शिक्षण व अनुभव हे होत.

शिक्षण दोन प्रकारचें आहे–सामान्य शिक्षण व औद्योगिक अगर धंदेशिक्षण. यांतही प्राथमिक व उच्च असे दोन भेद होतात. ह्मणजे प्राथमिक सामान्य शिक्षण व प्राथमिक धंदेशिक्षण. दुसरें उच्च सामान्य शिक्षण व उच्च धंदेशिक्षण. यांपैकीं पहिलें सर्व सुधारलेल्या देशांत मोफत व सक्तीचें केलेलें आहे. कारण प्राथमिक सामान्य शिक्षणांत लिहिणें, वाचणें, साधारण अंकगणित इतक्या गोष्टी येतात. त्याच्या योगानें मानवी बुद्धीस थोडेसें चालन मिळतें व मानवी दृष्टि थोडी तरी फांकते. प्राथमिक धंदेशिक्षणांत साधारण उपकरणें व हत्यारें यांच्या उपयोगाची माहिती व साधारण हस्तकौशल्य इतक्यांचा अंतर्भाव होतो. हें दुहेरी शिक्षण पुढील सर्व धंद्यांना पायारूप आहे. अशा द्विविध शिक्षणानें सामान्य मजुरांची कर्तबगारी पुष्कळ वाढते, असा सर्व सुधारलेल्या देशांत अनुभव आलेला आहे. व मजुरांच्या कर्तबगारीवर संपत्तीच्या उत्पत्तीचें प्रमाण पुष्कळ अंशानें अवलंबून आहे हें मागें दाखविलेंच आहे.

उच्च सामान्य शिक्षण व उच्च धंदेशिक्षण हें कारखानदार किंवा व्यापारी किंवा स्वतंत्र विराटस्वरूपी धंदा करणारे यांना आवश्यक आहे. कारण सामान्य शिक्षणानें निरनिराळ्या मानस-शक्तींचा विकास होतो; व निरनिराळे बौद्धिक गुण व इतर मानसिक गुण मोठ्या प्रमाणावरील कारखानदारांस कसे आवश्यक आहेत हें मागल्या भागांत दाखविलेंच आहे. अर्वाचीन काळच्या प्रचंड कारखान्यांचे कारखानदार ह्मणजे सेनापतीसारखे आहेत. ज्याप्रमाणें सेनापति जितका बुद्धिमान् व जितका कल्पक, जितका विचारी व जितका शिकलेला असेल तितका उत्तमच; त्याचप्रमाणें कारखानदारांची गोष्ट आहे. उच्च धंदेशिक्षणांत त्यांच्या विशिष्ट धंद्याच्या सर्व ज्ञानाचा समावेश होतो. अशा द्विविध शिक्षणानें तयार झालेला कारखानदार कारखाना यशस्वी केल्याखेरीज राहणार नाहीं. या दोन्ही प्रकारच्या शिक्षणांचे महत्त्व औद्योगिक प्रगतीला किती आहे

हें अमेरिका व जर्मनी या दोन देशांच्या उदाहरणांवरून चांगलें दृष्टीस पडतें. आणखी अलीकडील व विशेषतः पूर्वेकडील उदाहरण पाहिजे असल्यास जपानचें आहे. अमेरिका व जर्मनी हे दोन्ही देश औद्योगिक व व्यापारी बाबतींत इंग्लंडच्या किती तरी मागें होते. अमेरिका ब्रिटिश अमलाखालीं होती तोंपर्यंत तिची औद्योगिक वाढ इंग्लंडच्या व्यापारी वर्गाच्या हेव्यानें झाली नाहीं. अमेरिका स्वतंत्र झाल्यानंतर थोडीबहुत प्रगति होऊं लागली. परंतु गुलामांचा प्रघात कांहीं ठिकाणीं तरी उद्योगवृद्धीला प्रतिबंधक झाला यांत शंका नाहीं. पुढें या गुलामगिरीच्या कारणांवरून उत्तरेकडील संस्थानें व दक्षिणेकडील संस्थानें यांमध्यें तुमुल युद्ध झालें व त्यांत उत्तरेकडील म्हणजे गुलामगिरीच्या विरुद्ध असलेल्या संस्थानांचा विजय होऊन अमेरिकेचे विभाग होण्याचा प्रसंग टळला. याप्रमाणें संयुक्त संस्थानें सर्व तऱ्हेनें व सर्व बाबतींत संयुक्त झालीं; व नंतर त्यांनीं उद्योगधंद्याच्या वाढीकडे आपलें सर्व लक्ष घातलें, व सर्व उद्योगधंद्यांच्या मुळाशीं लोकशिक्षण आहे हें जाणून सामान्य शिक्षणाचा व धंदेशिक्षणाचा देशांत झपाट्यानें प्रसार केला. या झपाट्याच्या प्रसारामुळें अमेरिका देशानें इतक्या थोड्या अवकाशांत औद्योगिक बाबतींत इंग्लंडच्या पुढें आघाडी मारली. जर्मनीच्या राजकीय फाटाफुटीनें व धार्मिक लढायांनीं जर्मनी युरोपांतील इतर देशांच्या फार मागें पडला होता. परंतु जर्मनीची प्रशियाच्या राजाच्या छत्राखालीं एकी झाल्यापासून देशांतील सरकारनें औद्योगिक वाढीकडे लक्ष घातलें. सरकारला व लोकांना असें दिसून आलें कीं, इंग्लंड देश औद्योगिक बाबतींत फार पुढें आहे. व हें त्याचें व्यापारी वर्चस्व बहुत काळाचा परिणाम आहे. परंतु आपल्याला जर हीच प्रगति थोडक्या अवधींत घडवून आणावयाची असेल तर सामान्य शिक्षण व धंदेशिक्षण या दोहोंचा लोकांमध्यें एकसमयावच्छेदेंकरून प्रसार केला पाहिजे. या विचारानें सरकारनें या दुहेरी शिक्षणाकरितां मागेंपुढें न पहातां पाण्यासारखा पैसा खर्च केला, व त्याचीं गोड फळें लवकरच दिसून येऊं लागलीं. देशांत शास्त्रीय ज्ञान व धंद्यांचें ज्ञान मुरत चाललें. शिकलेल्या कारखानदारांचा वर्ग वाढत चालला व त्याबरोबरच देशांत निरनिराळे कारखाने निघूं लागले. परंतु बाल्यावस्थेंत असलेले कारखाने पूर्णावस्थेस पोहोंचलेल्या ब्रिटिश कारखान्यांच्या चढाओढीनें चिरडले जाऊं

नयेत, म्हणून अमेरिका व जर्मनी या दोन्ही देशांनीं शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच अप्रतिबंध व्यापाराचें तत्त्व सोडून संरक्षणाच्या तत्वाचा स्वीकार केला. याप्रमाणें विद्या व कायदा या दोन अस्त्रांनीं अमेरिका व जर्मनी यांनीं आपली औद्योगिक प्रगति करून घेतली व इंग्लंडच्या पुढें पाऊल टाकण्याच्या तयारीस हीं दोन्ही राष्ट्रें लागलीं.

यामुळेंच इंग्लंडांतील लोक जागे झाले व आपण या दोन देशांच्या मागें पडत चाललों कीं काय, अशी त्यांना शंका येऊं लागली. ही शंका येतांच या दोन राष्ट्रांच्या पहिल्या अस्त्राचा इंग्लंडनें ताबडतोब अंगीकार केला, व प्राथमिक शिक्षण सक्तीचें करून धंदेशिक्षणाकरितां स्वतंत्र विश्वविद्यालयें काढलीं व जुन्या विश्वविद्यालयांना व्यापारी व धंदेशिक्षणाच्या शाखा जोडल्या. दुसरें अस्त्र संरक्षणाचें. याचा अवलंब करावा किंवा नाहीं याबद्दल अजून इंग्लंडमध्यें एकमत झालें नाहीं. परंतु संरक्षणाचा स्वीकार इंग्लंडनें आतां करण्याची वेळ आली आहे अशी हाकाटी इंग्लंडच्या युनियनिस्ट पक्षानें चालविली आहे. व कांहीं कालपर्यंत इंग्लंडांतील लिबरल व युनियनिस्ट या दोन मोठ्या पक्षांमध्यें अप्रतिबंध व्यापाराविरुद्ध सवलतीच्या जकाती अगर संरक्षण हा मोठ्या कडाक्याच्या वादाचा प्रश्न राहणार यांत शंका नाहीं.

इंग्लंड देशाची बरोबरी करण्याच्या बुद्धीनें अमेरिकेनें औद्योगिक शिक्षणाकडे लक्ष घातलें, त्याचप्रमाणें अमेरिकेचा अत्यंत मोठा धंदा जो शेतकी त्यामध्येंही त्या देशानें सुधारणा घडवून आणली व शेतकीच्या धंद्याला शास्त्रीय स्वरूप दिलें. ज्याप्रमाणें औद्योगिक कारखान्यांतील यंत्रांच्या शोधांचा मान इंग्लंडला विशेष प्रकारें मिळालेला आहे, त्याप्रमाणें शेतकींतील पुष्कळ नवीन यंत्रें शोधण्याचा मान अमेरिकेला मिळालेला आहे. व या शोधांना तेथील परिस्थिति अनुकूलही होती. तो देश अत्यंत सुपीक असून कधींही लागवडीस न आलेल्या अशा हजारों एकरांच्या मोठमोठ्या जमिनी तेथें आहेत. यामुळें स्वाभाविकच तेथें प्रचंड शेतीचा फैलाव जास्त झाला. परंतु अमेरिकेची लोकसंख्या फारच कमी असल्यामुळें तेथल्या शेतीला मोठी अडचण म्हणजे मनुष्याच्या श्रमाची होय. म्हणून तेथें होतां होईल तितकें काम वाफेच्या यंत्रांच्या व इतर नैसर्गिक शक्तींच्या साहाय्यानें करून घेणें अवश्यक असे; व अशीं यंत्रें शोधून काढण्याकडे

लोकांना विशेष मन घालावें लागे. 'गरज ही शोधाची जननी आहे' या म्हणी-प्रमाणें अमेरिकेमध्येंच शेतकीच्या पुष्कळ यांत्रिक उपकरणांचा शोध लागला आहे. तसेंच अमेरिकेमध्यें पुष्कळ शास्त्रीय नवीन खतांचा शोध लागलेला आहे, व औद्योगिक शिक्षणाचें एक प्रमुख अंग म्हणजे शास्त्रीय शेतकीचें शिक्षण होय असें लोकमत बनलेलें आहे. तिकडे स्वतंत्र शेतकीचीं किती तरी कॉलेजें व शाळा आहेत.


इंग्लंडमधील व्यापारी व औद्योगिक प्रगति फार प्राचीन काळापासून झाल्याकारणानें लोक लवकर श्रीमंत होऊन स्वावलंबी झालेले होते व धंद्यां-तील व औद्योगिक सुधारणा त्यांनीं आपआपल्या प्रयत्नांनीं घडवून आणल्यामुळें त्याला सरकारची प्रत्यक्ष मदत लागली नाहीं. तसेंच इंग्लंडमध्यें जमीनदारी पद्धतीचा सार्वत्रिक प्रघात असल्यामुळें व हे जमीनदार सुशिक्षित व सुखवस्तु असल्यामुळें आणि त्यांना भांडवलाचीं वगैरे साधनें अनुकूल असल्यामुळें शेत-कीची सुधारणाही त्यांनीं आपआपल्या एकट्याच्या प्रयत्नांनीं किंवा संघटित प्रयत्नांनीं घडवून आणली. येथेंसुद्धां सरकारच्या प्रत्यक्ष प्रयत्नाची किंवा मदतीची गरज लागली नाहीं. इंग्लंडची बाल्यावस्थेंतील औद्योगिक प्रगति कायद्याच्या मदतीनें झाली हें निर्विवाद आहे. परंतु एकदां झाड जोमांत व आपल्या भरांत आल्यावर ज्याप्रमाणें त्याला माळ्याच्या काळजीची व देखरे-खीची गरज न पडतां तें झाड नैसर्गिक रीतीनेंच फोंफावत जातें; व मग रोपाच्या संरक्षणाकरितां माळ्यानें रोप्याभोंवतालीं घातलेलें कुंपणच त्या झाडाच्या वाढीला प्रतिबंध करूं लागतें व असें कुंपण काढून टाकावें लागतें, त्याप्रमाणेंच इंग्लंडच्या औद्योगिक वाढीची गोष्ट आहे. त्याच्या बाल्यावस्थेंत इंग्लंडच्या राजांनीं व मुत्सद्यांनीं या औद्योगिक प्रगतीची काळजी घेतली व त्याच्या संर-क्षणाकरितां जकातीचें भलें थोरलें कुंपणही त्या उद्योगधंद्यासभोंवतीं केलें. परंतु हे उद्योगधंदे एकदां जोमांत आल्यावर त्यांना या काळजीची व या कुंपणाची जरूरी नाहींशी झाली व जकातीरूपी कुंपण काढून टाकून अप्रतिबंध व्यापाराच्या स्वीकारापासून इंग्लंडचा उद्योगवृक्ष फारच फोंफावत जाऊन त्याचा प्रचंड विस्तार झाला. या इंग्लंडच्या विशेष परिस्थितीमुळें इंग्लंडमध्यें व्यापार किंवा इतर उद्योगधंद्यांची वाढ देशांत आपोआप होते असा दृढ समज झाला व या सार्व-

मिळ लोकमताचा परिणाम इंग्लंडशीं अगदीं विसदृश अशी परिस्थिति असणाऱ्या हिंदुस्थानावर अगदीं विपरित झाला. ह्मणजे येथें सुधारलेला ब्रिटिश अंमल सुरू झाला तरी उद्योगधंद्यांच्या वाढीचा प्रश्न सरकारनें पुष्कळ काळपर्यंत हातीं घेतला नाहीं. कारण हें काम सरकारच्या कर्तव्यमर्यादेमध्यें येत नाहीं, असा इंग्लंडमधील अनुभवावरून ब्रिटिश मुत्सद्यांचा समज झालेला होता.

या कारणांमुळें व इतर कारणांमुळें हिंदुस्थानांत हिंदुस्थान-सरकारचें लक्ष या गोष्टीकडे फारा दिवसांनीं लागलें. परंतु ' अकरणान्मंदकरणं श्रेयः ' या न्यायानें उशीरानें कां होईना परंतु हिंदुस्थानसरकारचें लक्ष उद्योगधंद्यांच्या वाढीकडे अलीकडे लागलें आहे, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. हिंदुस्थानचा अमेरिकेप्रमाणें अत्यंत मोठा धंदा शेतकी असल्यामुळें शेतकीच्या शिक्षणाची सोय या गेल्या सातआठ वर्षांत विशेष तऱ्हेनें होऊं लागली आहे. पुसा येथें एक सर्व हिंदुस्थानाकरितां प्रयोगशाळा व फार मोठें कॉलेज सरकारनें काढलें आहे. त्याचे खालोखाल पुण्याचें शेतकी कॉलेज होत आहे. तसेंच पुष्कळ ठिकाणीं लहानलहान प्रयोगक्षेत्रें निर्माण झालीं आहेत. त्यांमध्यें हिंदुस्थानांतील गहूं, कापूस, तंबाखू, चहा वगैरे विशेष प्रकारच्या मालाची सुधारणा करण्याचे प्रयोग चालू आहेत. तसेंच शेतकऱ्यांमध्यें शेतकीचें हें नवें ज्ञान त्यांच्याच भाषेंत त्यांना देण्याची तजवीजही सरकार करीत आहे. यास लोकनायकांचीही सहकारिता पाहिजे व अशी सहकारिता ठिकठिकाणीं मिळतही आहे. इतर धंद्यांच्याही औद्योगिक शिक्षणाची सोय थोडीबहुत होऊं लागली आहे. या बाबतींत कै. टाटाशेटजींची शोधशाळा ही एक हिंदुस्थानांत अपूर्व संस्था निर्माण होत आहे यांत शंका नाहीं. ही संस्था उत्तम तऱ्हेनें चालून त्यांतून शिकलेले पदवीधर बाहेर पडूं लागले ह्मणजे त्यांचा देशांतील उद्योगधंद्यांवर सुपरिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं. याप्रमाणें हिंदुस्थानांत आतां या प्रश्नाबद्दल थोडीशी जागृति झाली आहे ही शुभसूचक गोष्ट आहे. इतर सुधारलेल्या देशांच्या मानानें हिंदुस्थान अगदींच मागें आहे हें मात्र विसरतां कामा नये.

परंतु या सर्व शिक्षणाचा देशांत प्रसार होण्यास प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत केलें पाहिजे हें निर्विवाद आहे. सरकार परकी असल्यामुळें लोकांवर सक्ति करण्यास त्यास भय वाटतें. तेव्हां या बाबतींत लोकनायकांनीं पुढाकार घेऊन

सरकारचे हात दृढ केले पाहिजेत व हा लोकशिक्षणाचा प्रश्न सरकारच्या डोळ्यापुढें बारंवार आणून शिक्षणाचा प्रसार हल्लीं मंदगतीनें चालला आहे त्यापेक्षां पुष्कळ वेगानें होईल अशा तऱ्हेची खटपट करणें व सरकारकडून हें करवून घेणें हें सुशिक्षितांचें काम आहे.



# अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें.

## पुस्तक तिसरें.

## भाग पहिला.

### वांटणी.

दुसऱ्या पुस्तकांत संपत्तीची उत्पत्ति व तिचें स्वरूप आणि नियम यांचा विचार झाला. आतां अर्थशास्त्रांतील "संपत्तीची वांटणी" या विषयाचा या भागांत ऊहापोह करावयाचा आहे. संपत्तीची उत्पत्ति, संपत्तीची वांटणी, व संपत्तीचा विनिमय असे अर्थशास्त्राचे तीन भाग करण्याचा जो सांप्रदाय आहे तो विवेचनाच्या सोईसाठीं पडलेला आहे. वास्तविक हे भाग अगदीं परस्परसंलग्न आहेत; इतकेंच नाहीं तर परस्परावलंबीही आहेत, हें या ग्रंथाच्या प्रास्ताविक पुस्तकांत दाखविलेंच आहे. हे भाग सोईसाठींच केलेले असल्यामुळें पुष्कळ अर्थशास्त्रज्ञांच्या विवेचनपद्धतींत फरक दिसून येतो. कांहीं अर्थशास्त्रकार विनिमयाचा विषय आधीं विवेचनास घेऊन मग वांटणीचा घेतात; कांहींजण तर वांटणीचा अन्तर्भाव विनिमयांतच करतात. कारण ते असें ह्मणतात कीं, हल्लीं सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें संपत्तीची वांटणी विनिमयानेंच फक्त होते. मजूरदार आपल्या श्रमाबद्दल कांहीं तरी मोबदला घेऊन तो ते दुसऱ्यास विकत देतो. जमीनदार आपली जमीन खंड घेऊन कसणारास विकत देतो. सारांश, ज्याच्याजवळ संपत्ति किंवा संपत्तीस लागणारें एखादें साधन आहे तो ती संपत्ति किंवा साधन अदलाबदलीनें दुसऱ्यास देऊन आपल्यास लागणारी संपत्ती अगर साधन पैदा करतो. एखाद्या देशांत जें धान्य किंवा दुसरी एखादी संपत्ती उत्पन्न होते तिची देशांतील लोकांमध्यें वांटणी अदलाबदलीनेंच होते. यावरून वांटणीचे स्वतंत्र

असे नियम नाहींत व ह्मणून वांटणीचा विचार संपत्तीच्या अदलाबदलीच्या प्रकरणांतच करणें योग्य आहे. जे ग्रंथकार वांटणीला स्वतंत्र स्वरूप देत नाहींत त्यांची विचारसरणी वरील प्रकारची असते. परंतु खालील विवेचनावरून वांटणीचें निराळें स्वरूप आहे व त्याचे नियमही विचार करण्यासारखे आहेत आणि त्या नियमांचें महत्त्वही उत्पत्तीच्या नियमांप्रमाणेंच असून समाजांत संपत्तीची वांटणी होण्याचे नियम समाजांतील संपत्तीच्या उत्पत्तीच्या पद्धतीवर पुष्कळ अंशीं अवलंबून आहेत असें दिसून येईल. प्रथमतः वांटणी ह्मणजे काय व या प्रश्नाच्या मुळाशीं कोणत्या सामाजिक संस्था व कल्पना आहेत याचा विचार करणें अवश्य आहे. ह्मणजे वांटणीच्या सामान्य सिद्धांतांचें व नियमांचें स्वरूप व महत्त्व हें चांगल्या तऱ्हेनें दृग्गोचर होईल.

ज्या वेळीं मनुष्य अगदीं रानटी स्थितींत असून आपल्या गरजा आपल्या एकट्याच्याच श्रमानें भागवीत असतो त्या वेळीं संपत्ति ह्मणण्यासारखी तयार असते व तिच्या वांटणीचा प्रश्नच उद्भवूं शकत नाहीं. संपत्तीचा उत्पादक एकटाच असतो व तिचा तो एकटाच उपभोक्ताही असतो. ह्मणजे या काळांत प्रत्येक मनुष्य हा एका दृष्टीनें पशुप्रमाणें स्वयंसिद्ध व स्वयंपूर्ण प्राणी असतो. परंतु जेव्हां श्रमविभागाचें तत्त्व अमलांत येऊन एक मनुष्य एकाच जातीच्या वस्तु करण्यांत आपलें श्रमसर्वस्व खर्च करतो व आपल्या इतर गरजा दुसऱ्याच्या श्रमाच्या फलापासून भागविण्याची अपेक्षा करतो; तसेंच जेव्हां एक वस्तु करण्यास पुष्कळ साधनें व पुष्कळांचे श्रम लागूं लागतात, तेव्हां संपत्तीच्या वांटणीचा प्रश्न उद्भवतो. कारण प्रत्येकाच्या श्रमाच्या मानानें किंवा संपत्तीचीं साधनें पुरविण्याच्या मानानें त्याला त्या संपत्तीचा वांटा मिळाला पाहिजे हें उघड आहे. शेतांत जें उत्पन्न पिकतें तें जमिनीचा मालक, शेतीच्या औताचा व इतर साधनांचा मालक ह्मणजे कसणारें कूळ व शेतांवर हंगामी काम करणारे मजूर या तिघांच्या श्रमाचें फळ होय. तेव्हां शेतांतील उत्पन्नाचे तीन वांटे झाले पाहिजेत हें उघड आहे. हे वांटे कोणत्या प्रमाणानें व्हावयाचे याबद्दल निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळी पद्धति अमलांत असेल, परंतु येथें वांटणीचा प्रश्न उद्भवतो हें निर्विवाद आहे. तेव्हां देशांत होणाऱ्या संपत्तीची वांटणी समाजांतील निरनिराळ्या वर्गांमध्यें कशी व कोणत्या नियमांनीं होते याचा या पुस्तकांत निर्णय करावयाचा आहे. परंतु, या

चांटणीच्या प्रश्नाशीं खासगी मालकी अगर स्वत्व या कल्पनेचा अत्यंत निकट संबंध आहे हें सहज ध्यानांत येईल. कारण प्रत्येक मनुष्य आपआपल्या गरजा आपल्या एकट्याच्या श्रमानें पुरवीत असतांना ज्याप्रमाणें वांटणीचा प्रश्न निघत नाहीं, त्याप्रमाणें जेथें खाजगी स्वामित्वाची कल्पना नाहीं, तेथेंही वांटणी अगर वांटणीचे नियम हा प्रश्न उद्भवत नाहीं. एखाद्या कुटुंबाप्रमाणें पुष्कळजण मिळवते असले तरी ते आपली सर्व मिळकत एकत्र करतात व सर्व कुटुंबाच्या माणसांच्या गरजा भागविण्याकरितां तिचा व्यय करतात. अशा संयुक्त कुटुंबांत अमक्याची वांटणी अमुक असा प्रश्न कोणी काढीत नाहींत. कारण कुटुंबामध्यें प्रत्येक व्यक्तीचें खाजगी स्वामित्व नसतें. सर्व मिळकत संयुक्त कुटुंबाची समजली जाते. परंतु तेच निरनिराळे गृहस्थ जेव्हां एकत्र भांडवलावर एखादा धंदा करतात तेव्हां नफ्यामध्यें वांटणीचा प्रश्न येतो व प्रत्येकाच्या भांडवलाच्या हिस्सेरशीनें प्रत्येकास नफ्याचा वांटा मिळतो. यावरून जेथें श्रमविभागाचें तत्व अंमलांत आलेलें नसेल किंवा जेथें समाईक स्वामित्वाचीच कल्पना रूढ असेल अशा ठिकाणीं वांटणीचा प्रश्न निघत नाहीं खरा. तरी पण प्रत्येक समाजांत थोड्याबहुत प्रमाणावर श्रमविभागाचें तत्व अंमलांत असतेंच व खाजगी स्वामित्वाची कल्पनाही थोड्या फार प्रमाणानें अस्तित्वांत आलेली असते; यामुळेंच प्रत्येक समाजांत संपत्तीच्या वांटणीचा प्रश्न उद्भवतो. तेव्हां समाजांतील निरनिराळ्या वर्गांमध्यें संपत्तीची वांटणी कशी होते व त्या वांटणीचे सामान्य नियम काय, हें आपल्याला या पुस्तकांत ठरवावयाचें आहे.

✓परंतु संपत्तीच्या उत्पत्तीचे नियम व संपत्तीच्या वांटणीचे नियम यांमध्यें फार मोठा भेद आहे. असें मिलनें आपल्या ग्रंथाच्या या भागांत प्रतिपादन केलें आहे. या फरकाचें त्याला किती महत्व वाटत असे याची साक्ष त्याच्या आत्मचरित्रावरून येते. या चरित्रांत या नियमांमधील फरकाचा बोध हा एक आपला मोठा सामाजिक शोध होता असें त्यानें म्हटलें आहे. तेव्हां प्रथमतः या मताचा विचार करणें जरूर आहे.

मिलच्या मतें संपत्तीच्या उत्पत्तीचे नियम हे नैसर्गिक सृष्टिनियमाच्या जातीचे आहेत. म्हणजे त्यांमध्यें मानवी कृतीनें म्हणण्यासारखा फरक करतां येण्याजोगा नाहीं. जमिनीच्या उतरत्या पैदाशीचा नियम, संपत्तीच्या उत्पत्तीचीं नैसर्गिक

साधनें, शास्त्रीय ज्ञान व शोध वगैरे गोष्टी मनुष्याच्या हातच्या नाहींत. यामुळें मनुष्याला आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तेव्हां संपत्तीची वाढ हवी तशी करतां येणें अशक्य आहे. ह्मणजे उत्पत्तीचे नियम हे मानवी शक्तीबाहेरील सृष्टिनियमासारख आहेत. परंतु संपत्तीच्या वांटणीचे नियम हे मनुष्यकृत व समाजकृत आहेत. एकदां संपत्ति उत्पन्न झाली ह्मणजे तिची वांटणी अगर हिस्सेरशी रूढीनें व सरकारी कायद्यानें हवी तशी करतां येईल. अर्थात् संपत्तीच्या वांटणीचे नियम त्रिकालाबाधित सृष्टिनियमाच्या जातीचे नाहींत; त्यांमध्यें समाजाला व सरकारला पाहिजे तसा फरक करतां येण्यासारखा आहे. तेव्हां संपत्तीच्या वांटणीचे नियम सर्व समाजास सर्व काळीं सारखेच लागू असतात असें नाहीं. तर ते पुष्कळ अंशीं रूढीवर व समाजाच्या कायद्यावर अवलंबून असतात. यामुळें या नियमांत जर कोठें असमता किंवा अन्याय असेल तर तो नाहींसा करण्याचा अधिकार समाजास व सरकारास आहे, असें मिलचें ह्मणणें आहे.

तेव्हां संपत्तीच्या उत्पत्तीचे नियम नैसर्गिक असल्यामुळें संपत्तीच्या उत्पत्तीच्या बाबतींत सरकारनें ढवळाढवळ करून संपत्ति वाढविणें शक्य नाहीं; ह्मणून उद्योगधंद्यांच्या बाबतींत समाजानें तटस्थ राहावें ह्यांत समाजाचें हित आहे; परंतु संपत्तीच्या वांटणीचे नियम हे मुळीं मनुष्यकृतच असल्यामुळें समाजानें त्यांत हात घालून ढवळाढवळ केली तरी हरकत नाहीं; असें उत्पत्ति व वांटणी यांमधील भेदावर जोर देऊन, दाखविण्याचा मिल्चा हेतु होता. या त्याच्या मतामुळें मिलनें सामाजिक पंथाच्या पुष्कळ सुधारणांचें समर्थन केलेलें आहे. संपत्तीच्या वांटणीचे नियम हवे तसे फिरविले तरी संपत्तीच्या उत्पत्तींत फरक पडणार नाहीं, ही गोष्ट मिलनें या वादांत गृहीत धरली आहे ह्या पुस्तकांत प्रास्ताविक भागांत वांटणी व उत्पत्ति या परस्परावलंबी गोष्टी आहेत, असें दाखविलें आहे. त्यावरून मिलचें ह्मणणें सर्वांशीं खरें नाहीं असें दिसून येईल. शिवाय मिलच्या या मतानें सरकारला हवा तो कायदा करून तो अंमलांत आणण्याचें पूर्ण सामर्थ्य आहे असें गृहीत धरलें आहे; परंतु हीही गोष्ट सर्वांशीं खरी नाहीं. ज्या कायद्याला थोडेंसें तरी लोकमत अनुकूल नाहीं असा कायदा जरी सरकारनें केला तरी तो मृत कायद्याप्रमाणेंच राहतो, असा सर्व देशांचा अनुभव आहे. तेव्हां सरकारचें सामर्थ्यही या बाबतींत मर्यादित आहे हें विस-

रतां कामा नये. परंतु संपत्तीच्या उत्पत्तीच्या नियमांपेक्षां संपत्तीच्या वांटणीच्या नियमांमध्यें थोडाफार फरक करतां येण्यासारखा असतो, ही गोष्ट निर्विवाद आहे. यामुळें संपत्तीच्या वांटणीसंबंधानें निरनिराळ्या समाजांत भिन्न भिन्न स्थिति दिसून येते. हा फरक विशेषतः शेतकीच्या उत्पन्नाच्या बाबतींत विशेष तऱ्हेनें दृष्टोत्पत्तीस येतो. म्हणून या पुस्तकांत आपल्याला शेतकींतील निरनिराळ्या वांटणीच्या पद्धतींचें वर्णन करावें लागणार आहे. प्रथमतः औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या देशांमध्यें संपत्तीची वांटणी कोणत्या नियमांनुसार होते हें पहावयाचें आहे. हें पहाण्याकरितां वांटणीच्या मुळाशीं कोणतीं तत्त्वें गृहीत धरलीं आहेत, याचें थोडक्यांत विवेचन केलें पाहिजे. सर्व सुधारलेल्या देशांत ही संपत्तीची वांटणी विशिष्ट रूढी अगर कायदे यांनीं होत नसून ती एक-प्रकारें अगदीं स्वाभाविक तऱ्हेनें होते व ती स्वाभाविक तऱ्हा म्हणजे संपत्तीच्या उत्पत्तीला कारणीभूत होणारे जे जे समाजांतील वर्ग त्या त्या वर्गांमध्यें प्रथमतः वांटणी होणें ही होय. हे वर्ग चार आहेत, असें मागल्या पुस्तकांत सांगितलें आहे. १ ला जमीन व इतर नैसर्गिक साधनें यांच्या मालकांचा वर्ग; २ रा मजुरांचा वर्ग; ३ रा भांडवलवाल्यांचा व शेवटचा ४ था कारखानदारांचा वर्ग. प्रत्येक प्रकारच्या संपत्तीच्या उत्पत्तीला या चार वर्गांच्या मालकीच्या साधनांचें एकीकरण व्हावें लागतें व संपत्तीच्या उत्पत्तीस केलेल्या मदतीबद्दल त्यांना योग्य मोबदला द्यावा लागतो. या मोबदल्याला या वर्गांचें उत्पन्न म्हणतात. मालकवर्गाला खंडाच्या रूपानें उत्पन्न मिळतें, मजुरांना मजुरीच्या रूपानें उत्पन्न मिळतें, भांडवलवाल्यांना व्याजाच्या रूपानें मिळतें व शेवटी कारखानदारांना नफ्याच्या रूपानें उत्पन्न मिळतें. तेव्हां खंड, मजुरी, व्याज व नफा हे समाजांतील उत्पन्नाचे चार मुख्य प्रकार झाले, किंवा संपत्तीचे हे चार वांटे झाले. या प्रत्येकाचें स्वरूप काय व त्याचे नियम काय यांचें या पुस्तकांत प्रथमतः निरूपण करावयाचें आहे. नंतर शेतीचें उत्पन्न ही एक महत्त्वाची उत्पन्नाची बाब असल्यामुळें जमीनधाऱ्याच्या निरनिराळ्या पद्धतींचें विवेचन करणें इष्ट आहे. त्याच ठिकाणीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जमीनधाऱ्याच्या पद्धतींचें निरूपण करण्याचा विचार आहे. पुढें, वर निर्दिष्ट केलेल्या संपत्तीच्या वांटणीच्या स्वरूपांत कशी असमता उत्पन्न होते व त्यामुळें संपत्तीच्या वाढीबरो-

वर समाजांतील बहुजनसमाजाची सांपत्तिक स्थिति त्या मानानें कां सुधारत नाहीं व ती सुधारण्यास कोणकोणते उपाय योजण्यांत अगर सुचविण्यांत आलेले आहेत त्यांचा विचार करणें इष्ट होईल. हे उपाय दोन प्रकारचे आहेत, एक स्वावलंबनपर व दुसरे सामाजिक पंथानें सुचविलेले. सामाजिक पंथानें सुचविलेल्या उपायांचा विचार करण्यापूर्वी या पंथाचा साग्र इतिहास एका भागांत देण्याचा विचार केला आहे व शेवटीं या दोन्ही उपायांच्या शक्याशक्यतेबद्दल विवरण करून हें पुस्तक संपवावयाचें आहे.

# भाग दुसरा.

## वांटणीच्या मुळाशीं असलेल्या कल्पना व संस्था.

संपत्तीच्या वांटणीच्या मुळाशीं असलेली पहिली कल्पना म्हणजे खासगी स्वामित्वाची कल्पना होय, हें पहिल्या भागांत सांगितलेंच आहे. खासगी स्वामित्व म्हणजे काय, हें स्वामित्व समाजांत केव्हां व कसें उत्पन्न झालें, त्यामध्यें कोणकोणत्या हक्कांचा समावेश होतो, वगैरे यासंबंधाचे बरेच प्रश्न आहेत. परंतु या कल्पनेचा साकल्येंकरून विचार करणें हें खरोखरी कायदेशास्त्राचें काम आहे. येथें आपल्याला या प्रश्नाचा फक्त अर्थशास्त्रदृष्ट्या विचार करावयाचा आहे.

कोणत्याही वस्तूवर एखाद्याचें स्वामित्व आहे म्हणजे काय? तर त्या वस्तूचा कोणताही उपयोग करण्याचा, ती उपभोगण्याचा, ती विकण्याचा अगर देण्याचा व आपल्या पश्चात् तिची विल्हेवाट लावण्याचा हक्क त्या माणसास आहे. म्हणजे उपयोग, उपभोग, हयातींत व मरणानंतर विल्हेवाट इतक्या गोष्टींचे हक्क स्वामित्व या कल्पनेंत अन्तर्भूत झालेले आहेत. हा झाला स्वामित्व किंवा मालकी या कल्पनेंतील अर्थ. परंतु ही कल्पना अर्थशास्त्रांतील कांहीं तत्त्वांवर बसविलेली आहे, व त्या तत्त्वांचा थोडक्यांत येथें विचार केला पाहिजे.

या कल्पनेंतील पहिलें तत्त्व हें कीं, प्रत्येक मनुष्याला आपल्या निढळाच्या घामानें मिळविलेल्या वस्तूंचा उपभोग घेण्याचा हक्क आहे. आपल्या श्रमाचें जें

फळ हें आपलें आहे, त्यावर आपला अनन्यसामान्य हक्क आहे, हें पहिलें अर्थशास्त्रांतील तत्त्व होय. हें तत्त्व पूर्णपणें अर्वाचीन काळांतच सर्वमान्य झालें आहे. गुलामगिरीच्या काळांत गुलामांना आपल्या श्रमाच्या फळावर आपला हक्क सांगतां येत नसे. गुलामाच्या श्रमापासून उत्पन्न झालेल्या वस्तूंवर गुलामाच्या मालकांचा सर्वस्वी हक्क असे. अगदीं रानटी स्थितींत 'बळी तो कान पिळी' हाच न्याय होता. अशा स्थितींत आपण मिळविलेल्या वस्तूंचा आपण उपभोग घेऊं अशी मनुष्यास खात्री नसे. ही गोष्ट सर्वांनाच अनिष्ट आहे अशी जाणीव उत्पन्न होऊन नैसर्गिक स्थितींतील मनुष्यांनीं समाज व सरकार हीं अस्तित्वांत आणिलीं व प्रत्येक मनुष्यानें आपल्या श्रमानें उत्पन्न केलेलें फळ त्याला उपभोगितां यावें अशी तजवीज व्हावी, अशा बुद्धीनें या दोन संस्था मनुष्यांनीं निर्माण केल्या. तेव्हां आपल्या श्रमाचें फळ आपणांस उपभोगतां यावें या हक्काच्या तत्त्वाचा सांभाळ करणें याचकरितां सरकार अस्तित्वांत आलें व या मानवी हक्काला सुरक्षितपणा आणणें हें सरकारचें एक आद्य कर्तव्य आहे, असें सर्व सुधारलेलीं राष्ट्रें समजतात. कारण अशी खात्री असल्याशिवाय मनुष्याचे हातून श्रम होणारच नाहींत. याच दृष्टीनें खासगी स्वामित्वाला व कल्पनेला पुष्कळ अर्थशास्त्रकारांनीं 'रानाचें उपवन बनविणारी जादूची कांडी' म्हटलें आहे. कोणत्याही मनुष्याला आपल्या श्रमानें मिळविलेल्या वस्तू आपल्याला मिळतील अशी खात्री असली म्हणजे तो आपलें अवसरवेळेस संपत्ति मिळविण्यांत खर्च करतो. व या योगानें देशांत संपत्तीची वाढ जारीनें होते स्वामित्वाच्या कल्पनेचें अर्थशास्त्रदृष्ट्या जें इतकें महत्त्व आहे तें या मानवी स्वभावामुळेंच होय.

खासगी स्वामित्वाच्या कल्पनेंत असलेलें दुसरें तत्त्व असें आहे—दुसऱ्याशीं करार करून मिळविलेल्या वस्तूंवर आपला हक्क आहे. ज्याप्रमाणें स्वकष्टार्जित वस्तूंवर आपला स्वामित्वाचा हक्क चालतो, त्याप्रमाणें ज्या वस्तु आपण आपल्या स्वतःच्या श्रमानें उत्पन्न केल्या नाहींत परंतु ज्या आपल्याला दुसऱ्याशीं करार करून मिळालेल्या आहेत त्यांवरही आपला सारखाच हक्क आहे. म्हणजे करार करणें हाही एक श्रमाचाच प्रकार आहे. प्रत्येक सरकारानें कराराच्या शर्ती व्यक्तीस पाळावयास लावल्या पाहिजेत. ज्याप्रमाणें जीवित व मालमत्ता यांचें संरक्षण करणें हें सरकारचें काम आहे, त्याचप्रमाणें व्यक्तींकडून करारपालन करून घेणें

हेंही एक सरकारचें काम आहे, ही कल्पनाही हळूहळू वाढत आलेली आहे. कोणत्या प्रकारचे करार कायदेशीर समजले जातात व कोणते अनीतिवर्धक किंवा समाजविघातक म्हणून बेकायदेशीर गणले जातात, वगैरे गोष्टींचा सविस्तर विचार कायदेशास्त्रांत केला जातो. त्याचा येथें विस्तार करण्याचें प्रयोजन नाहीं.

स्वामित्वाच्या कल्पनेंतील तिसरें तत्व म्हणजे प्रत्येक मनुष्याला आपल्या शिलकेचा फायदा घेण्याचा हक्क आहे. आपण मिळविलेली संपत्ति शिल्लक टाकणें हें एक श्रमाचें फळच आहे, व या फळाचा पूर्ण फायदा घेणें हा एक मनुष्याचा हक्क आहे. हें तत्व म्हणजे पहिल्या तत्वाचाच एक भाग होय. तेव्हां त्याचें विशेष विवेचन करण्याची जरूरी नाहीं.

स्वामित्वाच्या कल्पनेंतील चवथें तत्वं ह्मणजे ज्या वस्तूवर आपला अव्याहत ताबा आहे तिचें स्वामित्व आपल्याकडे येतें हें होय. हें तत्व खरोखरी अर्थशास्त्रीय नाहीं, तर तें एक कायद्याचें तत्व आहे; व ह्मणून त्याचा येथें ऊहापोह करण्याची जरूरी नाहीं.

अर्थशास्त्रदृष्टया श्रम, करार व शिल्लक हीं तीन स्वामित्वाचीं अंगें होत व खासगी स्वामित्व किंवा खासगी मालकी या गोष्टीचें महत्व या तीन अंगांवरच अवलंबून आहे. स्वामित्वाचीं हीं अंगें जर नाहींशीं झालीं तर मनुष्याच्या हातून संपत्ति उत्पन्न होण्याचेंच बंद पडेल. कारण मानवी श्रमाचा एक मोठा आधारस्तंभ नाहींसा होईल. परंतु आपल्या पश्चात् आपल्या मिळकतीची विल्हेवाट करण्याचा हक्कही स्वामित्वाच्या कल्पनेंत येतो यांत शंका नाहीं. पूर्वकाळीं हा हक्क व्यक्तीस नव्हता. कारण त्या काळीं मिळकत ही कुटुंबाची समजली जात असे व एक मनुष्य मेला ह्मणजे ती मिळकत कुटुंबांतील दुसऱ्या कर्त्या पुरुषाच्या ताब्यांत येई. हिंदुस्थानांत संयुक्त कुटुंबाच्या कल्पनेंत याच गोष्टीचा समावेश झालेला आहे. संयुक्त कुटुंबांतील पुरुषास आपल्या पश्चात् आपल्या मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा हक्क नाहीं. स्वकष्टार्जित मिळकतीवर आपलें पूर्ण स्वामित्व आहे व या स्वामित्वामध्यें मिळकतीची हवी ती विल्हेवाट करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो, ही कल्पना आपल्या इकडे अगदीं नवीन आहे. परंतु आपल्या पश्चात् आपल्या इस्टेटीची मृत्युपत्रानें विल्हेवाट करण्याचा हक्क सर्व सुधारलेल्या समाजांत मानला जातो. व मनुष्य मृत्युपत्र न करतां वारल्यास त्याचा हक्क

त्याच्या जवळच्या नातेवाईकांस जातो. हा जो वडिलोपार्जित मिळकतीवर हक्क आहे तो मर्यादित केला तरी स्वामित्वाच्या कल्पनेला बाध येत नाहीं, तेव्हां हा हक्क मर्यादित करणें किंवा वडिलोपार्जित मिळकतीवर मोठा कर बसविणें ही सरकारला एक मोठी उत्पन्नाची बाब आहे व तिचा जास्त जास्त प्रमाणावर उपयोग करण्यास हरकत नाहीं; ही गोष्ट अर्थशास्त्रदृष्टया वावगी नाहीं असें पुष्कळ अर्थशास्त्रकारांनीं आपलें मत दिलेलें आहे व हल्लींच्या सुधारलेल्या पुष्कळ राष्ट्रांमध्यें हा हक्क मर्यादित करण्याकडे प्रवृत्ति दिसून येते. सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें वांटणीच्या नियमांच्या मुळाशीं असलेल्या स्वामित्वाच्या संस्थेचा येथपर्यंत विचार झाला.

आतां अर्वाचीन काळच्या वांटणीच्या नियमांच्या मुळाशीं असलेलें दुसरें तत्व ह्मणजे चढाओढीचें होय. हें तत्व सर्व देशांत व सर्व ठिकाणीं आणि सर्वदां लागू होतें असें नाहीं; उलट हें अगदीं अर्वाचीन तत्व आहे. अजूनही पुष्कळ गोष्टींमध्यें संपत्तीची वांटणी ही रूढीनें ठरलेली किंवा कायद्यानें ठरलेली असते. उदाहरणार्थ, जमिनीचा खंड किंवा शेतकीच्या उत्पन्नाची वांटणी ही अजून पुष्कळ देशांत रूढीनेंच ठरलेली आहे; जमिनीच्या मालकानें उत्पन्नाचा कितवा हिस्सा घ्यावा व जमीन करणारानें कितवा घ्यावा ही गोष्ट पुष्कळ ठिकाणीं देशाचारावर अवलंबून आहे असें दिसून येतें; व या पुस्तकाच्या पुढील एका भागांत निरनिराळ्या देशांत व हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या जमीनधाऱ्याच्या निरनिराळ्या पद्धतींचें वर्णन करावयाचें आहे. तेव्हां या रूढीची विविधता दिसून येईल. परंतु औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या देशांत रूढीचें प्राबल्य कमी होऊन चढाओढीच्या तत्वाला महत्त्व आलेलें आहे व संपत्तीची वांटणी समाजाच्या निरनिराळ्या वर्गांत सुधारलेल्या देशांत चढाओढीच्या तत्वावर होऊं लागली आहे. हल्लींच्या काळीं निव्वळ रूढीकडे पाहून कोणीच चालत नाहीं. प्रत्येक मनुष्य आपल्याला जितका जास्त वांटा मिळेल तितका मिळविण्याचा प्रयत्न करतो. सारांश, हल्लींच्या काळीं समाजाच्या निरनिराळ्या वर्गांमध्यें राष्ट्रीय संपत्तीचा वांटा मिळविण्याकरितां सारखी धडपड चालू आहे व या परस्पर चढाओढीनें प्रत्येक वर्गाच्या वांटणीचा अंश ठरला जात आहे.

ही चढाओढ म्हणजे प्राणिशास्त्रांतील जीवनार्थ-कलहाचें तत्त्व होय. व्यापारधंद्यांमध्यें प्रत्येक कारखानदारामध्यें चढाओढ असते. आपला माल होतां होईल तितका स्वस्त करून आपल्याकडे गिऱ्हाइकी ओढण्याचा कारखानदारांचा प्रयत्न चालू असतो. वांटणीच्या बाबतींतही समाजांतील निरनिराळ्या धनोत्पादक वर्गांमध्यें चढाओढ सारखी चालू असते. जमीनदार लोकांची जितका जास्त खंड कुळांकडून मिळेल तितका काढण्याबद्दल कुळांशीं चढाओढ चाललेली असते. कारखानदार मजूर जितक्या कमी मजुरीनें मिळेल तितक्या कमी मजुरीवर ठेवावयास पहात असतो. यामुळें सुधारलेल्या देशांत व्यक्तीव्यक्तींची चढाओढ जाऊन तेथें समाईक चढाओढ सुरू झाली आहे. मजुरी कमी करण्याकरितां व आपला नफा वाढविण्याकरितां कारखानदार आपले संघ करूं लागले तर उलट आपली मजुरी कमी न होऊं देण्याकरितां व ती वाढवून घेण्याकरितां मजुरांचे संघ होऊं लागले आहेत. या संघांचा मजुरीवर काय परिणाम झालेला आहे याचा आपल्याला पुढें विचार करावयाचा आहे.

तेव्हां ज्या ठिकाणीं खाजगी मालकीची संस्था पूर्ण अमलांत आलेली आहे व जेथें सर्व व्यवहार रूढीच्या किंवा कायद्याच्या तत्वावर न चालतां पूर्ण चढाओढीच्या तत्वावर चालतात अशा सुधारलेल्या देशांत संपत्तीची वांटणी कोणत्या नियमांनीं होते हें प्रथमतः पाहिलें पाहिजे. येथें आपल्याला समाजांतील व्यक्तींचा व्यक्तिशः विचार करावयाचा नाहीं. ज्याप्रमाणें संपत्तीच्या ' उत्पत्ति ' या पुस्तकांत आपण संपत्तीच्या विशिष्ट कारणांचा विचार न करतां सामान्य सामाजिक कारणांचा विचार केला आहे, त्याचप्रमाणें वांटणीचाही सामाजिक दृष्ट्या विचार करावयाचा आहे; व वांटणीचे प्रश्न उत्पत्तीच्या प्रश्नांशीं अत्यंत संलग्न आहेत असें जें वर म्हटलें आहे त्याचें कारणही उघड आहे. संपत्तीच्या उत्पत्तीला जितकीं साधनें लागलीं आहेत तितक्या साधनांमध्यें किंवा त्या साधनांच्या मालकांमध्यें त्या संपत्तीची वांटणी व्हावी हें उघड आहे. आतां देशांतील संपत्तीला प्रत्यक्ष कारणें चार आहेत. तीं जमीन, श्रम, भांडवल व योजना; व या चार कारणांची मालकी असणारे समाजांत चार वर्ग असतात; ते मजूर, जमीनदार, भांडवलवाला व कारखानदार हे होत. या चार प्रमुख वर्गांमध्यें

संपत्तीची मुख्यतः वांटणी होते, व याच वर्गांपासून समाजांतील इतर वर्गांना संपत्तीचा वांटा मिळतो. संपत्तीच्या वाढीस कारणीभूत होणारी राज्यव्यवस्था, हिलाही संपत्तीचा एक वांटा मिळतो, परंतु सुधारलेल्या देशांत तो कराच्या रूपानें मिळतो, व या करांच्या तत्वांचा व सरकारच्या जमाखर्चाचा विचार या ग्रंथाच्या पांचव्या पुस्तकांत स्वतंत्रपणें करावयाचा आहे. तेव्हां या ठिकाणीं आपल्याला संपत्तीच्या चार हिश्शांचाच मुख्यतः विचार करावयाचा राहिला. ते हिस्से अगर वांटे म्हणजे खंड, मजुरी, व्याज व नफा हे होत. आतां प्रत्येक वांट्याच्या स्वरूपाचें व त्याच्या नियमांचें क्रमशः विवेचन पुढील चार भागांत करावयाचें आहे.

# भाग तिसरा.

## खंड.

सामान्य व्यवहारांत भाडें हा शब्द फार व्यापक अर्थानें वापरला जातो. कोणत्याही स्थावर व जंगम वस्तूची मालकी असलेला मनुष्य जेव्हां त्या वस्तूचा नियतकालिक उपयोग दुसऱ्यास करण्यास देतो, तेव्हां तो त्या वस्तूबद्दल भाडें घेतो. उदाहरणार्थ-घरवाला आपल्या घराबद्दल बिऱ्हाडकरूपासून भाडें घेतो. टांगा किंवा गाडी यांच्या मालकास त्याच्या टांग्यांतून व गाडींतून प्रवास करण्याबद्दल प्रवासी जे देतो त्यालाही भाडेंच म्हणतात. तसेंच जंगम वस्तु-भांडीं-कुंडीं, चटया, सतरंज्या, गालिचे, टेबलें, खुर्च्या वगैरे हजारों जिन्नस—भाड्यानें बाजारांत मिळतात. तेव्हां भाडें हें मालकीच्या वस्तूंबद्दल नियतकालिक उपयोगाकरितां दिलेला मोबदला होय व ज्याप्रमाणें सर्व व्यवहारांत विक्री व खरेदी व त्याच्या किंमती ही गोष्ट अत्यंत व्यापक आहे, त्याचप्रमाणें भाड्याची गोष्टही फार व्यापक आहे. परंतु अर्थशास्त्रांत भाडें हा शब्द इतक्या व्यापक अर्थानें वापरीत नाहींत तर तो फार संकुचित अर्थानें वापरतात. जमीनदारास जमिनीच्या स्वाभाविक व अनश्वर सुपीकतेबद्दल जो पैशाच्या रूपानें मोबदला मिळतो

-तें भाडें; इतक्याच अर्थानें हा शब्द येथें वापरला आहे. यालाच खंड किंवा मक्ता म्हणतात. असा संकुचित अर्थ घेतला म्हणजे एका संलग्न अशा विषयाचा अन्तर्भाव या शब्दांत होतो. प्रत्येक देशामध्यें जमीनदारांचा एक वर्ग असतो व सुधारलेल्या देशांत जमीनदार अगर जमिनीचे मालक हे जमीन कसणारे शेतकरी नसतात. म्हणजे श्रमविभागाचें तत्त्व अमलांत येऊन जमिनीचे मालक व शेतकीचा धंदा करणारे असे दोन निरनिराळे वर्ग होतात, व धंदेकरी शेतकरी आपल्या सोईच्या जमिनी मालकापासून खंडानें घेतात व त्यांची लागवड करतात. तेव्हां जमीनदार असा एक स्वतंत्र वर्ग सुधारलेल्या समाजांत अस्तित्वांत येतो व या वर्गाचें उत्पन्न म्हणजे त्याला मिळणारा खंड होय. तेव्हां खंड हा राष्ट्रीय संपत्तीचा एक निराळा हिस्सा अगर वांटा पडतो. जमिनीचे मालक व जमीन कसणारे हे जरी एकच असले तरीसुद्धां त्यांना जमिनीपासून जें उत्पन्न मिळतें त्याचे स्वाभाविक दोन हिस्से पडतात. एक ते जमिनीचे मालक म्हणून मिळणारा हिस्सा, व एक जमीन कसणारे म्हणून मिळणारा हिस्सा. हा दुसरा हिस्सा म्हणजे त्यांच्या श्रमाची मजुरीच होय. तेव्हां प्रत्येक देशांत खंड म्हणून संपत्तीचा एक हिस्सा झालाच पाहिजे. आतां या भागांत या खंडाचें स्वरूप कोणत्या प्रमाणानें ठरलें जातें, व तें निर्माण होण्याचीं कारणें काय व या खंडाच्या नियमांवरून कोणते उपसिद्धांत निष्पन्न होतात वगैरे विषयांचें विवेचन करावयाचें आहे.

हा विषय अर्थशास्त्रांतील एक अत्यंत वादग्रस्त विषय आहे. खंडाची उपपत्ति ही प्रथमतः **रिकार्डो** या अर्थशास्त्रज्ञानें शोधून काढिली हें या ग्रंथाच्या प्रास्ताविक पुस्तकांत सांगितलेंच आहे, व त्या काळीं इंग्लंडची सांपत्तिक स्थिति कशी होती, व कोणत्या परिस्थितींत ही उपपत्ति उदयास आली हेंही त्या ठिकाणीं दाखविलें आहे. तेव्हां येथें या ऐतिहासिक अंगाकडे न वळतां प्रथमतः **रिकार्डो**-च्या उपपत्तीकडे वळूं.

"ज्या देशांत सुपीक व उंची जमीन मुबलक आहे अशा कोणत्याही नव्या वसाहतीच्या देशांत तेथील लोकांच्या उपजीविकेकरितां सर्व जमिनीची लागवड करण्याची जरूरी नसते व लोकांच्या जवळ तितकें भांडवलही नसतें. अशा स्थितींत जमीन कसणारे लोक सर्वांत सुपीक अशीच जमीन लागवडीस आण-

तील व या काळीं जमिनीबद्दलचा खंड याचा प्रादुर्भावच होणार नाहीं. कारण जोंपर्यंत देशांत फुकट पडलेली मुबलक जमीन आहे व ज्याला वाटेल त्यानें जमीन घेऊन कसावी अशी स्थिति आहे, तोंपर्यंत जमिनीच्या उपयोगाकरितां कोणीही खंड देणार नाहीं. 'मागणी व पुरवठा' या सामान्य तत्वानुरूप ज्याप्रमाणें अमर्याद प्रमाणांत सांपडणाऱ्या हवा, पाणी किंवा सृष्टीच्या इतर देणग्या यांना खंड मिळणार नाहीं, त्याप्रमाणेंच या काळीं जमिनीचे उपयोगाबद्दल खंड मिळणार नाहीं. जर देशांतील सर्व जमीन सारखीच सुपीक असती, जर बाजारापासून सर्व जमीन सारख्याच अंतरावर असती, जर ती संख्येनें अमर्याद असती व गुणांमध्यें सारखीच असती तर तिच्या उपयोगाकरितां कोणताही आकार मागतां आला नसता. ह्मणून ज्या अर्थी जमीन ही परिमाणांत अमर्याद नाहीं व गुणांतही समान नाहीं व देशाच्या वस्तीच्या वाढीबरोबर व भरभराटीबरोबर हलकी जमीन लागवडीस आणावी लागते, त्या अर्थी जमिनीबद्दल खंड देण्याचें कारण पडतें. समाजाच्या प्रगतीमध्यें दुसऱ्या दर्ज्याची जमीन लागवडीस आल्याबरोबर पहिल्या दर्ज्याच्या जमिनीवर खंड सुरू होतो व त्या खंडाची रक्कमही त्या दोन जमिनीच्या मगदुरांच्या फरकावर अवलंबून असते."

या उपपत्तीचा मथितार्थ हा आहे कीं, देशामध्यें निरनिराळ्या मगदुरांची जमीन असते व ती बाजारापासून कमीअधिक अंतरावर असते. या दोहों मिळून जमिनीची सुपीकता ठरते. तेव्हां देशामध्यें कमीअधिक सुपीक जमीन असली ह्मणजे जमिनीचा खंड या कमीअधिक सुपीकतेवर अवलंबून असतो. या खंडाची रक्कम लागवडींत असलेली अगदीं वाईट जमीन–जिचा खंड येऊं शकत नाहीं, अशी बिनखंडाची जमीन–व सुपीक जमीन यांमधील फरकावर अवलंबून आहे. समजा, एखाद्या प्रांतांत चार मगदुराच्या जमिनी आहेत. जोंपर्यंत तेथील लोकसंख्येची गरज पहिल्या मगदुराच्या जमिनीवर भागत आहे तोंपर्यंत खंडाचा उदयच होणार नाहीं. परंतु त्या प्रांताची लोकसंख्या वाढली व तिला जास्त धान्य लागूं लागलें असतां हें जास्त धान्य दुसऱ्या मगदुराच्या जमिनीच्या लागवडीवांचून मिळणार नाहीं. आतां पहिल्या मगदुराची जमीन दर एकरीं खंडीभर भात पिकविते व दुसऱ्या मगदुराची जमीन १५ मण पिकविते, असें समजा. लोकसंख्येच्या गरजेमुळें १५ मणांची जमीन तर लागवडीस आलीच पाहिजे.

तेव्हां पहिल्या जमिनीला आतां ५ मण खंड येऊं लागेल व दुसऱ्या मगदुराची जमीन ही बिनखंडी जमीन होईल. परंतु समजा कीं, प्रांताची लोकसंख्या आणखीही पुष्कळ वाढली. तिच्या उपजीविकेकरितां आणखी धान्य आवश्यक झालें आहे. हें धान्य तिसऱ्या मगदुराच्या जमिनीपासून काढणें अवश्य आहे. परंतु ही जमीन दर एकरीं १० मणच धान्य पिकविते. तेव्हां आतां पहिल्या मगदुराच्या जमिनीचा खंड १० होईल. दुसऱ्या मगदुराची जमीन जी आतांपर्यंत बिनखंडी होती तिला आतां ५ मण खंड येईल. याप्रमाणें लोकसंख्येच्या गरजेवर जमिनीच्या लागवडीचें मान अवलंबून आहे. म्हणजे जसजशी देशांतील लोकसंख्या वाढते तसतशी कमी मगदुराची जमीन लागवडीस आणणें आवश्यक होतें. परंतु उत्तम मगदुराची जमीन असो अथवा अगदीं कमी मगदुराची असो, त्या जमिनीचें उत्पन्न एकाच तऱ्हेचें असलें म्हणजे त्याला बाजारांत सारखीच किंमत येते. मात्र कमी दर्जाच्या जमिनीच्या मशागतीस खर्च अधिक येतो व बाजारांतील किंमत निदान शेतकऱ्यांस लागणारा खर्च व त्याची मजुरी बाहेर पडण्या इतकी तरी पाहिजेच; नाहीं तर शेतकरी ती जमीन लागवडीसच आणणार नाहीं. म्हणून बाजारांत जें धान्य येतें त्यापैकीं सर्वांत वाईट जमिनीच्या धान्याला जो खर्च झाला असेल त्या खर्चावरून धान्याची किंमत ठरते. म्हणजे धान्याची किंमत बिनखंडाच्या जमिनीच्या लागवडीच्या खर्चाइतकी तरी असली पाहिजे; तर ती जमीन लागवडीस येईल. या जमिनीस लागवडीच्या धारेवरील जमीन म्हणतात. लागवडीच्या धारेवरील जमीन म्हणजे अर्थात् धान्याच्या किंमतीच्या मानानें ज्या जमिनीला लागवडीचा खर्च तितका येतो व ज्या जमिनीबद्दल खंड देतां येत नाहीं अशी जमीन होय. व देशांतील बाकीच्या सर्व जमिनीचा खंड या बिनखंडी जमिनीवरील उत्पन्न व त्या त्या जमिनीचें उत्पन्न यांमधील वजावाकीनें ठरतो.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, खंडाच्या या उपपत्तीपासून तीन प्रमेयें निष्पन्न होतात. एक देशांतील जमीन ही उत्तम मगदुरापासून कनिष्ठ मगदुराच्या क्रमानेंच लागवडीस येते व कमी मगदुराच्या जमिनीची लागवड होण्याचें कारण लोकसंख्येची वाढ हें होय; व या संख्येच्या गरजेनुरूप धान्याच्या किंमतीची वाढ हें होय. तेव्हां देशाची लोकसंख्या प्रथम वाढते. या वाढत्या लोकसंख्येच्या मागणीनें धान्याची किंमत वाढते व ही धान्याच्या किंमतींतील

वाढ कायम राहिली म्हणजे शेतकऱ्यास कमी मगदुराची जमीन लागवडीस आणणें परवडतें. परंतु धान्याची किंमत कमी झाल्यास लागलीच लागवडीच्या धारेवरील जमीन शेतकऱ्यास परवडत नाहींशी होते व ती जमीन तो टाकून देतो. यामुळे बाकीच्या जमिनीचे खंडही कमी होतात. परंतु जथपर्यंत लोकसंख्या वाढत जात आहे—व सर्व सुव्यवस्थित देशांत लोकसंख्या वाढत जातेच—तेथपर्यंत धान्याच्या किंमती वाढत जातात व धान्याच्या किंमती वाढत चालल्या म्हणजे लागवडीची धार खालीं उतरत येते व मग जमीनदारांचे खंड वाढत जातात.

या खंडाच्या उपपत्तीपासून, रिकार्डोनें देशांतील लोकांच्या सांपत्तिक स्थितीबद्दल जीं अनुमानें काढली आहेत, त्यांवरून या उपपत्तीचें त्याला इतकें महत्त्व कां वाटत असे, हें दिसून येईल. कोणत्याही देशाची जसजशी भरभराट होत जाते, तसतशी त्याची लोकसंख्या वाढत जाते; व जसजशी लोकसंख्या वाढत जाते तसतशा धान्याच्या किंमतीही वाढत जातात. धान्याच्या किंमतीमध्यें कायमची वाढ झाली म्हणजे देशांतील बहुजनसमाजाची राहाणी जास्त खर्चाची होते. कारण त्यांच्या गरजांपैकीं अत्यंत आवश्यक गरज जो धान्य ती मिळविण्याकरितां त्याला उत्पन्नाचा बराच भाग खर्चावा लागतो. देशांतील बराच मोठा वर्ग केवळ मजुरीवर राहणारा असतो. धान्याच्या किंमतीच्या कायमच्या वाढीनें त्याचे हाल जास्त वाढतात. मात्र या देशाच्या भरभराटीबरोबर जमीनदार लोकांचा खंड सारखा वाढत जातो व त्यांची स्थिति सुधारते; कारण श्रम न करतां त्यांचें खंडाचें उत्पन्न देशाच्या सुस्थितीबरोबर आपोआप वाढत जातें. निवळ लोकसंख्येच्या वाढीनें जी जमीनदारांची खंडाच्या उत्पन्नाची वाढ होते तिला मिल्लनें अनुपार्जित वाढ असें म्हटलें आहे व ज्या अर्थी जमीनदारांना ही वाढ त्यांच्या श्रमाशिवाय मिळते, त्या अर्थी तिचा बराचसा वांटा सरकारला मिळणें रास्त आहे. कारण लोकसंख्येची वाढ ही सुव्यवस्थित राज्यपद्धतीमुळेंच होते. तेव्हां जमीनदारांच्या या अनुपार्जित वाढीवर जर कोणाचा हक्क असेल तर तो सरकारचा आहे. म्हणून जमिनीवर कर बसवून ही वाढ सरकारनें आपल्या उत्पन्नाची एक बाब करावी, म्हणजे प्रत्येक सरकारच्या वाढत्या खर्चाला एक आपोआप वाढणारी उत्पन्नाची बाब तयार होऊन सामान्य लोकांवरील कराचें ओझें कमी होईल, अशी मिल्लची विचारसरणी आहे.

वरील विवेचनावरून रिकार्डोच्या खंडाच्या उपपत्तीची बरीचशी कल्पना वाचकांस होईल असें वाटतें. ही उपपत्ति 'उत्पत्ती' च्या पुस्तकांत उतरत्या पैदाशीचा जो एक सिद्धांत सांगितला आहे त्यावर बसविलेली आहे हें उघड आहे. प्रत्येक देशामध्यें उत्तम सुपीक जमीन थोडीच असते व त्या सुपीकतेच्या पराकाष्ठेची मर्यादा संपल्यानंतर उतरत्या पैदाशीच्या नियमास सुरुवात होते, असें मागल्या एका भागांत दाखविलें आहे. परंतु रिकार्डोनें उतरत्या पैदाशीचा नियम जमिनीस सदासर्वदाच लागू आहे असें गृहीत धरून त्यावर बसविलेली खंडाची उपपत्ति ही सर्व काळीं व सर्व ठिकाणीं सारखीच लागू आहे असें ठाम मत ठोकून दिलें. वास्तविकपणें रिकार्डोची उपपत्ति इंग्लंडच्या त्या काळच्या परिस्थितीवरून काढली होती व इंग्लंडपुरती ती सर्वथा खरीही होती यांत शंका नाहीं. कारण इंग्लंडमध्यें मोठमोठे जमीनदार आहेत. ते जमीनदार स्वतः न कसतां खंडानें आपल्या जमिनी शेतकऱ्यांस देतात. हे शेतकरी म्हणजे चांगले भांडवलवाले लोक असून ते शेतकीमध्यें इतर धंद्यांप्रमाणें फायदा मिळविण्याकरितां आपलें भांडवल शेतकींत घालतात. त्यांच्यामध्यें जमिनीच्या खंडाबद्दल चढाओढ असून सर्व जमिनीचा खंड याप्रमाणें चढाओढीनें ठरत असतो व तो खंड बहुतेक रिकार्डोच्या उपपत्तीशीं जुळतो हें खरें आहे. परंतु वर निर्दिष्ट केलेल्या सर्व गोष्टी जेथें अस्तित्वांत नाहींत तेथें रिकार्डोची उपपत्ति खोटी ठरते. ही उपपत्ति व इतर देशांतील वस्तुस्थिति यांचा विरोध येऊं लागल्यामुळें रिकार्डोच्या उपपत्तीबद्दल पुष्कळ आक्षेप येऊं लागले.

पहिला आक्षेप नवीन वसाहतींतील कॅरे या अमेरिकन ग्रंथकारानें काढला आहे. यानें असें सिद्ध केलें कीं, रिकार्डोची उपपत्ति आधीं नवीन वसाहतींना मुळींच लागू पडत नाहीं. कारण, रिकार्डोच्या उपपत्तीचें एक प्रधान कलम असें आहे कीं, लोकवस्तीच्या वाढीवर कमी मगदुराची जमीन लागवडीस येते. म्हणजे लागवडीची यार खालीं जाते व धान्याचे भाव वाढतात व जमिनीचा खंड वाढतो. परंतु नव्या वसाहतीमध्यें प्रथमतः जी जमीन लागवडीस येते ती किनाऱ्याजवळची हलकी रेताळ जमीन असते किंवा जिच्या लागवडीला फारसें भांडवल लागत नाहीं अशी जमीन प्रायः लागवडीस येते. म्हणजे वस्तुतः कमी मगदुराची जमीन प्रथमतः लागवडीस येते. जसजशी लोकसंख्या वाढते व

चोटांजवळ जास्त जास्त मांडवल जमतें तसतशी आंतील सपाट प्रदेशांतील उंची सुपीक जमीन लागवडीस येते. व याचे योगानें धान्याच्या किंमती लोकसंख्येच्या वाढीबरोबर न वाढतां उलट उतरतात. तेव्हां 'जास्त मगदुराकडून कमी मगदुराकडे' असा जो लागवडीचा क्रम रिकार्डोनें दिला आहे तो मुळीं वस्तुस्थितीस धरून नाहीं, असा कॅरेचा पहिला आक्षेप होता. रिकार्डोच्या कैवाऱ्यांनीं लागवडीच्या क्रमाचा मुद्दा इतका महत्त्वाचा नाहीं व तो जरी खरा नसला तरी त्यानें रिकार्डोची उपपत्ति खोटी ठरत नाहीं, असा कोटिक्रम लढविला आहे; परंतु रिकार्डोच्या ग्रंथांतील जो उतारा आम्हीं वर दिला आहे त्यावरून हा कोटिक्रम वृथा आहे असें म्हणणें प्राप्त आहे. खरोखर पाहतां जमिनीलासुद्धां चढत्या पैदाशीचा नियम कांहीं काळपर्यंत लागू असतो हें तत्व रिकार्डोला ठाऊक नव्हतें; त्याची समजूत अशी होती कीं, जमिनीला प्रथमपासूनच उतरत्या पैदाशीचा नियम लागू आहे. यामुळें कोणत्याही देशामध्यें सर्वकाळीं देशाच्या भरभराटीबरोबर धान्याचे भाव वाढून मजूरदारांची स्थिति वाईट होत गेलीच पाहिजे, असा सार्वत्रिक सिद्धांत त्यानें काढला. परंतु नवीन वसाहतीला हा नियम लागू नाहीं. उलट लोकवस्तीच्या वाढीनें धान्याचे भाव कमी होऊन मजूरदारांची सांपत्तिक स्थिति सुधारत जाते असें वसाहतीचा इतिहास शिकवितो हें कॅरेनें सप्रमाण सिद्ध केलें आहे असें कबूल केलें पाहिजे.

कॅरेचा दुसरा आक्षेप म्हणजे रिकार्डोच्या सर्व उपपत्तीचें मूळच नाहींसें करण्यासारखा आहे. रिकार्डोच्या उपपत्तीचें रहस्य म्हणजे हें कीं, जमिनीचा खंड हा जमिनीच्या स्वाभाविक व अविनाशी अशा शक्तींचा मोबदला होय. भांडवल किंवा श्रम यानें जी जमिनीची शक्ति वाढली असेल व त्याबद्दल जो खंडाचा भाग जमीनदारांस मिळतो तो व्याज व नफा या जातीचाच आहे. परंतु जमिनीच्या ज्या मूळच्या शक्ति आहेत, त्यांबद्दलचा मोबदला म्हणजेच अर्थशास्त्रांतील खंड होय व असा खंड देशाच्या सांपत्तिक प्रगतीबरोबर आपोआप वाढत जातो, आणि नफा व व्याज हीं तर देशाच्या भरभराटीबरोबर कमी कमी होत जातात. म्हणजे खंडाचें स्वरूप व व्याज आणि नफा यांचें स्वरूप हीं अगदीं एकमेकांच्या विरुद्ध आहेत असा रिकार्डोच्या प्रतिपादनाचा अर्थ आहे. कॅरेनें अगदीं याच्या उलट प्रतिपादन केलेलें आहे. त्याचें म्हणणें हें कीं,

जमिनीची सुपीकता ही मुळीं भांडवल व श्रम यांच्याच सर्वस्वी परिणाम होय. लागवड न केलेली जमीन जरी मूळची सुपीक असली तरी ती रानानें व झाडा-झुडपांनीं अगदीं भरून गेलेली असते व अशी जमीन लागवडीस आणण्यास जितकें भांडवल व जितके श्रम लागतात त्यांचें व्याज जर आकारलें तर असें दिसून येईल कीं, जमिनीचा सर्व खंड हा मूळचें भांडवल व श्रम आणि लागवडीस लागणारें भांडवल व श्रम या दोहोंच्या व्याजापेक्षां जास्त न येतां कमीच येतो. परंतु कॅरेच्या या आक्षेपांत फारसा तथ्यांश नाहीं असें विचारांतीं दिसून येईल. कारण कॅरेनें केलेली मोजदाद ही अगदीं भ्रामक आहे. जमिनीची सुपीकता मूळची कशीही उत्पन्न झालेली असो; परंतु सुपीक जमीन व कमी मगदुराची जमीन यांच्या खंडांत पुष्कळ अंतर पडतें व हा खंड देशाच्या वाढी-बरोबर नफ्याप्रमाणें किंवा व्याजाप्रमाणें कमी न होतां वाढत जातो, हा अनुभव सार्वत्रिक आहे. तेव्हां तितक्यापुरती रिकार्डोची उपपत्ति सत्यास धरून आहे यांत शंका नाहीं.

रिकार्डोच्या उपपत्तीविरुद्ध आणखी दुसरेही पुष्कळ आक्षेप आहेत, त्यांचाही येथें थोडक्यांत विचार करणें अवश्य आहे. रिकार्डोच्या उपपत्तीमध्यें बिनखंडी जमीन देशांत असलीच पाहिजे असा एक मुद्दा आहे. कारण खंड हा बिनखंडी जमीन व दुसरी जमीन यांच्या उत्पन्नांमधील फरकावरच अवलंबून आहे असें उपपत्तींत म्हटलें आहे. यावर आक्षेप असा आहे कीं, कोणत्याही देशांत बिनखंडी जमीन कधींही नसते. प्रत्येक मालकीच्या जमिनीला कांहींना कांहीं खंड मिळालाच पाहिजे. म्हणून रिकार्डोची उपपत्ति ही खंड या सांपत्तिक गोष्टीची कारणमीमांसा नव्हे; असाही त्याच्यापुढील आक्षेप आहे. या ग्रंथकर्त्याच्या म्हणण्याप्रमाणें खंड हा उत्पन्न कां होतो, तर जमीन ही खासगत मालकीची गोष्ट आहे व ती मर्यादित आहे, या दोन कारणांनीं खंड उत्पन्न होतो. तेव्हां खंड किंवा भाडें हें खासगत मालकीच्या गोष्टीचा परिणाम आहे. जेव्हां एकाच्या मालकीच्या वस्तूचा उपयोग दुसऱ्यास देण्यांत येतो तेव्हांच भाडें घेण्यांत येतें. तेव्हां खासगत मालकी हें भाड्याचें खरें कारण आहे व म्हणून देशामध्यें जरी एकाच मगदुराची व समान-सुपीकतेची जमीन असली—परंतु ती जर खासगी मालकीची असली—तरीसुद्धां भाडें किंवा खंड उदयास येईल.

परंतु रिकार्डोच्या उपपत्तीप्रमाणें अशा स्थितींत भाडें हा सांपत्तिक प्रकार उद्‍भवूं शकत नये.

या आक्षेपास रिकार्डोच्या विधानावरून बराच आधार मिळतो असें कबूल करणें भाग आहे. खंड हा जो एक प्रकार आहे, तो कमीअधिक सुपीकतेमुळें होतो असें रिकार्डोच्या विधानावरून वाटतें खरें, तरी पण खंडाची रक्कम ही जमिनीच्या मगदुरावरून ठरते, असें म्हणण्याचा त्याचा रोख आहे. शिवाय देशाच्या नवीन वसाहतीच्या स्थितीचें वर्णन करतांना रिकार्डोनें ही मालकीची कल्पना अप्रत्यक्षपणें आणिली आहे. देशाच्या प्राथमिक स्थितींत भाडें निर्माण होणारच नाहीं. कारण जोंपर्यंत देशामध्यें बिनमालकीची मुबलक जमीन पडलेली आहे, तोंपर्यंत मालकीच्या उपभोगाबद्दल कोण भाडें देईल, असा रिकार्डोनें प्रश्न विचारला आहे. यावरून खंड किंवा भाडें हा प्रकार मुळीं मालकीपासून निर्माण होतो असें रिकार्डोचें म्हणणें होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र या खंडाची रक्कम ठरण्यास व ती कमीअधिक होण्यास लागवडीची धार कारण होते, असें त्याचें म्हणणें आहे.

पहिल्या आक्षेपांत जास्त सत्यांश आहे. ज्या ज्या देशांत खासगी मालकीची संस्था आहे, त्या त्या ठिकाणीं बिनखंडी जमीन असणें शक्य नाहीं, हें खरें आहे; कारण वर प्रतिपादन केल्याप्रमाणें भाडें हें स्वामित्वाबद्दलच मिळतें. तेव्हां एका मनुष्याची जमीन दुसऱ्यास उपयोगास पाहिजे असल्यास त्याला कांहीं तरी स्वामित्वाबद्दल दिलें पाहिजे, हें उघड आहे. रिकार्डोनें देशांतील सर्व जमीन एकाच धान्याला द्यावयाची अशी कल्पना केली आहे. व अशा कल्पनेप्रमाणें कांहीं जमीन इतकी निकस असेल कीं, तीमध्यें गहूं पेरून गहूं उत्पन्न काढण्याला इतका खर्च लागेल कीं, शेतकऱ्याला अशी जमीन भाड्यानें घेणें परवडणारच नाहीं. परंतु जरी ती जमीन गव्हाला निरुपयोगी असली व गव्हाच्या पिकाकरितां ती कोणी खंडानें घेतली नाहीं, तरी ती गवताकरितां पुष्कळ सुपीक असेल व गवत वाढविण्याकरितां व तें विकण्याकरितां जमिनीच्या मालकापासून एखादा शेतकरी ती जमीन खंडानें घेईल. मात्र या जमिनीचा खंड गव्हाच्या जमिनीइतका येणार नाहीं. तेव्हां देशांतील जमीन उंची मगदुरापासून अगदीं खालच्या मगदुरापर्यंत असली तरी निरनिराळ्या प्रकारच्या पिकांकरितां तिचा उपयोग होतो व अगदीं

प्रत्यक्ष खडक किंवा दलदल अशा जमिनीखेरीज देशांतील सर्व जमिनीवर थोडा-बहुत खंड येतो यामध्यें शंका नाहीं. ह्मणून रिकार्डोच्या उपपत्तीविरुद्ध हा एक आक्षेप सत्यरूप आहे, असें कबूल करणें भाग आहे.

येथपर्यंत रिकार्डोच्या उपपत्तीवरील आक्षेपांचा विचार झाला. परंतु, त्या उपपत्तीवरून काढलेले सिद्धांतही त्रिकालाबाधित नाहींत, हें आतां दाखवावयाचें आहे. उदाहरणार्थ, रिकार्डोच्या उपपत्तीचा एक मोठा सिद्धांत ह्मणजे जमिनींचा खंड हा नेहमीं वाढतच जातो हा आहे. परंतु हेंही सर्वस्वी खरें नाहीं. ही वाढ कांहीं प्रसंगीं न होण्याचीं कारणें दोन आहेत. एक नवीन सुपीक जमिनीचा शोध लागून त्या लागवडीचें स्वस्त धान्य देशांत येऊं लागलें ह्मणजे त्या देशांतील लागवडीची धार वर जाते व ह्मणून जमिनीचे खंड कमी होतात. अमेरिकेमध्यें शेतकीची वाढ झाल्यानंतर इंग्लंडमध्यें तेथून धान्य येऊं लागल्यापासून इंग्लंडांतील खंड कमी होत गेलेले आहेत. दुसरें कारण—लागवडीच्या कलेंत सुधारणा. याचे योगानेंसुद्धां धान्य स्वस्त होतें व तें स्वस्त झालें ह्मणजे लागवडीची धार वर जाऊन जमिनीचे खंड कमी होतात. यावरून देशांतील खंड सतत वाढतच गेले पाहिजेत असें नाहीं. या क्रमाला बाधक अशीं कारणें उद्भवूं शकतात व अशीं बाधक कारणें अस्तित्वांत असतां खंडाचा क्रम उलटही होऊं शकतो.

रिकार्डोच्या या उपपत्तीला अनुकूल व प्रतिकूल असें इतकें वाङ्मय इंग्रजी भाषेंत आहे कीं, त्या सर्वांचा सविस्तर-विचार करण्यास आपल्याजवळ पुरेशी जागा नाहीं. परंतु वर दिलेल्या अल्प विवेचनावरून या उपपत्तींतील ग्राह्यांश व त्याज्यांश वाचकांच्या ध्यानांत येईल असें वाटतें.

समाजांतील संपत्तीचे निरनिराळ्या वर्गांमध्यें जे हिस्से पडतात, त्यांपैकीं जमिनीचा खंड हा एक आहे. सुधारलेल्या देशांत इतर हिश्शांप्रमाणें हा हिस्साही चढाओढीनें ठरला जातो. जरी पूर्वकाळीं हा पुष्कळ ठिकाणीं रूढीनें ठरून गेलेला असला व अजूनही पुष्कळ ठिकाणीं तो रूढीनेंच ठरतो, तरी पण रूढीच्याऐवजीं चढाओढ येण्याचा जिकडे तिकडे कल दिसून येतो. हा खंड चढाओढीनें ठरण्याचा परिणाम असा होतो कीं, खंडानें जमीन करणारा शेतकरी सुपीक जमीन कसो कीं कमी मगदुराची जमीन कसो, त्याला दोन्ही लागवडी-

पासून सारखाच फायदा मिळतो; व या दोन्ही लागवडींतील अंतर खंडाच्या रूपानें जमीनदारास जातें. हेंच रिकार्डोच्या उपपत्तींतील मूळ बीज आहे. दुसरें हें कीं, बाधक कारणें अस्तित्वांत आलीं नाहींत तर हा खंड सारखा वाढत जातो. कारण देशामध्यें लोकवस्ती वाढून एकंदर सर्व जमीन लागवडीस आल्यावर उतरत्या पैदाशीचा नियम लागू होतो व असा नियम लागू झाला ह्मणजे मग धान्यांचे भाव वाढतच जाण्याचा कल उत्पन्न होतो व त्याबरोबरच खंडही वाढत जातो. इतका रिकार्डोच्या उपपत्तींतील भाग त्रिकालाबाधित राहतो यांत शंका नाहीं. बाकी लागवडीचा दिलेला क्रम, खंड हा प्रकार मुळीं जमिनीच्या कमीअधिक मगदुरानें उत्पन्न होतो व देशामध्यें बिनखंडी लागवडीची जमीन असते वगैरे या उपपत्तींतील भाग त्याज्य आहेत असें ह्मणणें प्राप्त आहे.

---

# भाग चवथा.

## मजुरी व तिचे सिद्धांत.

देशांतील संपत्तीचा दुसरा मोठा वांटा ह्मणजे मजुरी होय. मजुरी हा श्रमाचा मोबदला आहे. संपत्ति उत्पन्न करण्यास जे मानवी श्रम लागतात त्या सर्वांचा अन्तर्भाव येथें होतो; मग ते श्रम शारीरिक असोत, मानसिक असोत; त्या श्रमाला शिक्षणरूपी पूर्वतयारी लागो न लागो; ते श्रम अगदीं सांगकाम्या दिसणाऱ्या मजुरापासून तों एंजिनीयरम्यानेजरापर्यंत असोत. जे जे लोक कांहीं ठराविक काम करून त्या मानानें मजुरी घेतात, किंवा दिसमजुरी करतात किंवा महिनेमाल मजुरी मिळवितात त्या त्या सर्वांचा अन्तर्भाव मजूर या वर्गामध्यें होतो हें या ग्रंथाच्या पहिल्या पुस्तकांत स्पष्ट करून दाखविलेंच आहे. आतां या भागांत या मजुरवर्गाच्या वांट्याला येणारी मजुरी हिचा सविस्तर विचार करावयाचा आहे. निरनिराळ्या धंद्यांत निरनिराळे मजुरीचे दर असतात हें उघड आहे. आतां हे निरनिराळे दर कां होतात हा एक या भागांतला महत्त्वाचा प्रश्न आहे.

तसेंच या सर्व धंद्यांतील मजुरींच्या दरांची सरासरी काढली म्हणजे एक मजुरीचा सामान्य दर निघतो. तेव्हां हा मजुरीचा सामान्य दर कसा ठरतो हाही एक या भागांतला महत्त्वाचा प्रश्न आहे. या बाबतींत निरनिराळ्या देशांकडे पाहिलें म्हणजे विलक्षण फरक दिसून येतो. इंग्लंड-अमेरिकेसारख्या औद्योगिक बाबतींत शिखरास पोंचलेल्या देशांत मजुरीचा सामान्य दर किती तरी मोठा असतो, तोच हिंदुस्थानांत सामान्य दर अगदींच कमी असतो. तेव्हां हें कां होतें हें प्रथमतः पाहिलें पाहिजे. परंतु या विचारास लागण्यापूर्वी 'मजुरी' या पदामधील एक संदिग्धता लक्षांत आणिली पाहिजे.

देशामध्यें पैसा वापरण्याची प्रवृत्ति झाली म्हणजे मजुरी ही नेहमीं पैशांतच दिली जाते. परंतु पैशाच्या रूपानें दिलेली मजुरी ही नांवाची होय या मजुरीवरून मजुरांच्या सांपत्तिक स्थितीचा खरा अंदाज करतां येणार नाहीं. उदाहरणार्थ, शहरांत एखाद्या मनुष्याला दरमहा पंचवीस रुपये मिळत असले व खेड्यामध्यें एखाद्यास पंधरा रुपये मिळत असले, तर पगारी मजुरींत दोहोंमध्यें जवळजवळ दुपटीचा फरक आहे, तरी खेडेगांवांतल्या माणसाचीच खरी मजुरी शहरांतल्या माणसापेक्षां जास्त असूं शकेल. शहरांतल्या मनुष्यास २५ रुपये मिळत असतील. परंतु त्याला जागेकरितां ३ किंवा ४ रुपये भाडें द्यावें लागेल. तेंच खेडेगांवांत तितकीच जागा १ रुपया भाड्यानें मिळेल; तसेंच शहरांत लांकूडफाटा महाग असेल तर खेडेगांवांत तें फारच स्वस्त असेल. शहरांत ज्या वस्तूबद्दल पैसे द्यावे लागतात त्या वस्तु खेड्यांत मोफत मिळत असतील. सारांश, पगारी मजुरीवरून खऱ्या मजुरीचा अंदाज करणें बरोबर नाहीं. शिवाय मजुरांस मजुरीचा कांहीं भाग पैशाच्या रूपानें मिळत असेल तर कांहीं भाग प्रत्यक्ष गरजा भागविणाऱ्या पदार्थांच्या रूपानें मिळत असेल. तेव्हां अशा मजुरांच्या मजुरीच्या दराचा विचार करतांना या दोन्ही गोष्टी एकत्र केल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, घरगुती मजुरांना जेवणखाण मालकाच्या घरीं मिळतें. याशिवाय वर पगार मिळतो; कांहीं नोकरांस नुसता कोरडा पगार मिळतो. कोंकणांत मजुरांना अडसरी नांवानें धान्याच्या रूपानें मजुरी देण्याचा प्रघात आहे. शिवाय वर्षास एक घोंगडी, एक पायतण व दोनचार लंगोटें हे मिळतात व वर्षाचे दहावीस रुपये रोख मिळतात. म्हणजे त्यांची संपूर्ण मजुरी या तीन गोष्टींची बेरीज मि-

चून होते. तेव्हां पगारी मजुरी व खरी मजुरी यांमधील फरक चांगला ध्यानांत ठेविला पाहिजे. पगारी मजुरीचा दर पुष्कळ असला ह्मणजे मजुरांची सांपत्तिक स्थिति चांगलीच असली पाहिजे असें मात्र नाहीं. या ह्मणण्याची सत्यता आमच्याकडील 'लंकेंत सोन्याच्या विटा' या ह्मणीवरून चांगली दिसून येते. ह्मणजे जरी लंकेंत मजुरास रोजची एक सोन्याची वीट मजुरीदाखल मिळाली तरी त्याला पोटापुरतें अन्न मिळण्यास सोन्याच्या विटाच द्याव्या लागतात. सारांश, जेथें पैसा अत्यंत विपुल असतो तेथें मजुरीचा दर पुष्कळ असतो खरा; तरी पण सर्वच पदार्थांची इतकी महागाई असते कीं, जास्त मजुरी अवश्यक वस्तूंच्या खरेदींतच खर्च होते व मजुरांला आयुष्यांतील सोई किंवा चैनी उपभोगण्यास सांपडत नाहींतच. असो.

एखाद्या देशांतील मजुरीचा सरासरीचा दर कोणत्या गोष्टींवर अवलंबून असतो हें प्रथमतः ठरवावयाचें आहे. या बाबतींत निरनिराळ्या देशांत मजुरीच्या दरांत विलक्षण फरक असतो हें वर सांगितलेंच आहे. आतां असा फरक कां होतो हें पहावयाचें आहे.

यासंबंधींच 'मजुरीफंडा'ची कल्पना अभिमत अर्थशास्त्रकारांनीं काढलेली आहे. याचा मथितार्थ असा आहे कीं, देशांतील मजुरीचा दर हा देशांतील भांडवल व लोकसंख्या या दोहोंच्या भागाकाराइतका असतो. $\text{मजुरीचा दर} = \frac{\text{भांडवल}}{\text{लोकसंख्या}}$. ह्मणजे लोकसंख्या तितकीच राहून जर मजुरांना देण्याचें भांडवल वाढलें तर मजुरीचा दर वाढेल; किंवा भांडवल तितकेंच राहून जर लोकसंख्या वाढली तर मजुरीचा दर कमी होईल. मजुरीफंडाच्या वादाच्या मुळाशीं तीन विधानें आहेत. पहिलें, प्रत्येक देशांत चल भांडवलाची अशी एक ठराविक रक्कम असते कीं, ती मजुरींत खर्च झालीच पाहिजे. ही रक्कम कालेंकरून कमी होईल किंवा जास्त होईल. परंतु एका विशिष्ट वेळीं ही रक्कम कायमची ठरलेली असते. ती कोणत्याही कारणांनीं कमी होणार नाहीं किंवा जास्त होणार नाहीं.

दुसरें, देशामध्यें अशी एक लोकसंख्या असते कीं, तिला मजुरीचा दर कांहींही असो, परंतु मजुरी करूनच पोट भरलें पाहिजे, त्याशिवाय गत्यंतर नसतें. तेव्हां ही संख्या एका विशिष्ट वेळीं ठरलेलीच असते.

तिसरें, मजुरीचा दर हा भांडवलवाले व मजूर यांचा आपआपसांतील चढा-ओढीनेंच ठरला जातो. म्हणजे भांडवलवाल्यांची मजूर मिळविण्याकरितां चढा-ओढ चालू असते व मजूरदारांची भांडवलवाल्यांकडे श्रम करून मजुरी मिळ-विण्याची चढाओढ चालू असते. सर्व मजुरीचे दर अशा दुहेरी चढाओढीनें ठरले जातात. या तीन विधानांच्या एकीकरणानें मजुरीफंडाची कल्पना बनलेली आहे ती कल्पना ही कीं, मजुरीचा दर हा भांडवल व लोकसंख्या यांच्या भागाकारावर अवलंबून असतो.

'मजुरीफंडा'च्या या कल्पनेमध्यें मजुरीच्या दराच्या कमीअधिकपणाचीं दिलेलीं दोन कारणें खरीं आहेत यांत शंका नाहीं. कांहीं एका आगंतुक कारणानें देशांतील लोकसंख्या जर एकदम कमी झाली व उद्योगधंदे तेच राहिले म्हणजे देशांतलें भांडवल कायम राहिलें, तर मजुरीचा सरसकट दर वाढला पाहिजे हें उघड आहे. कारण मजुरांना मागणी आहे तितकीच राहिली, मात्र पुरवठा कमी झाला, यामुळें मजुरीचे दर वाढलेच पाहिजेत. या विधानाची सत्यता स्थापन करणारीं इतिहासांतलीं पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतात. इंग्लंडमध्यें जेव्हां प्लेगची सांथ आलेली होती तेव्हां ८।१० वर्षांत इंग्लंडांतील सुमारें अर्धी लोकवस्ती कमी झाली. परंतु त्यायोगानें एकंदर मजुरीच्या दरामध्यें विलक्षण वाढ झाली. यामुळें मजूरलोकांची सांपत्तिक स्थिति सुधारली व एकदां वाढलेल्या मजुरीचा दर कायमचाच झाला. कारण मजुरांची राहणी जास्त खर्चाची झाली. हल्लीं हाच प्रकार हिंदुस्थानांतही घडत आहे. गेल्या दहा बारा वर्षांतील प्लेग, दुष्काळ व महायुद्ध यांनीं लोकसंख्या पुष्कळ कमी झालेली आहे. विशेषतः शहरांत मजूर फारच कमी झाले आहेत व यामुळें मजुरीचे दर भराभर वाढत चालले आहेत. उलटपक्षीं देशांतील भांडवलांत कांहीं आगंतुक कारणांनीं जर एकदम भर पडली व लोकसंख्या तितकीच राहिली तरीसुद्धां मजुरीचा दर वाढलाच पाहिजे. सारांश, मजुरीच्या दराच्या कमीअधिकपणाला वरील दोन कारणें लागू आहेत यांत संशय नाहीं. तरी पण मजुरीच्या वाढीचीं एवढींच दोन कारणें आहेत असें मात्र नाहीं. शिवाय, मजुरीफंडाच्या कल्पनेमध्यें एक प्रकारचा विरोध आहे तोही वस्तुस्थितीस धरून नाहीं. म्हणजे लोकसंख्या वाढली कीं, मजुरी कमी झालीच पाहिजे. तसेंच, भांडवल वाढलें

म्हणजे मजुरीचे दर वाढलेच पाहिजेत असा कांहीं सार्वत्रिक नियम नाहीं. मजुरी-फंडाच्या पुरस्कर्त्यांनीं या कल्पनेला जें एक सार्वत्रिक स्वरूप दिलें ती त्यांची चुकी होती. व म्हणून या कल्पनेवर पुष्कळ आक्षेप येऊं लागले. हल्लीं तर ही कल्पना अर्थशास्त्रांत बहुतेक त्याज्य ठरली गेली आहे.

या कल्पनेपासून प्रसिद्ध तत्त्ववेत्ता मिल्ल यानें बरींच अनुमानें काढिलीं आहेत. मिल्लची ही कल्पना व मिल्लचीं भांडवलासंबंधीं प्रमुख तत्वें हीं एकाच तऱ्हेचीं आहेत. ज्याप्रमाणें त्या प्रमुख तत्वांचा संरक्षणाविरुद्ध रोंख होता त्या-प्रमाणेंच या कल्पनेचाही एक विशेष रोंख होता. तो हा कीं, मजुरांची सुस्थिति अगर दैना ही त्यांच्याच हातीं आहे. ती कायद्यानें, संपानें किंवा दुसऱ्या कृत्रिम उपायांनीं नाहींशी होणारी नाहीं. कारण, एका काळीं मजुरांस द्यावयाचें भांडवल हें औद्योगिक नियमांनीं ठरलेलें असतें, तें कमीजास्त होणें शक्य नाहीं. तेव्हां मजुरांची संख्या वाढली तर त्यांचे मजुरीचे दर अवश्यमेव कमी झाले पाहिजेत. तेव्हां मजूर लोकांनीं लग्नाच्या बाबतींत आत्मसंयमन करून लोकसंख्येवर हितकर दाब ठेविल्याखेरीज त्यांची स्थिति सुधारण्यास दुसरा मार्गच नाहीं. परंतु, या बाबतींत मजूरलोक अगदीं बेफिकीर असतात. भराभर लग्नें करून लोकसंख्या वाढवितात व आपल्याच मजुरीच्या चढाओढींत आपल्या हातानें भर घालतात. हें कृत्य आपल्या हातानें आपल्या पायावर धोंडा ओढून घेण्यासारखें आत्म-घातकी आहे. तेव्हां मजुरांची दैन्यावस्था ही स्वयंकृत आहे. कारण ते अवि-चारानें लग्नें करून लोकसंख्येंत भर घालतात; असें मिल्लनें मोठ्या जोरानें प्रतिपादन केलें आहे. तेव्हां मजुरांची स्थिति सुधारण्यास त्यांच्यामध्यें वरिष्ठ-वर्गांतल्याप्रमाणें अशी भावना उत्पन्न झाली पाहिजे कीं, आपल्या मुलांबाळांचें संगोपन करण्याचें सामर्थ्य येण्यापूर्वीं लग्न करणें हें मोठें सामाजिक पाप आहे.

या कल्पनेपासून अभिमत अर्थशास्त्रज्ञ दुसरें एक अनुमान काढतात; तें अनु-मान संपाच्या फोलपणाबद्दल होय. त्यांचें म्हणणें हें कीं, मजुरीफंडाच्या कल्पने-वरून संपाचा फोलपणा उघड होतो. संपाचा उद्देश पुष्कळ वेळां मजुरी वाढ-विण्याचा असतो; परंतु जोंपर्यंत देशांतील भांडवल व लोकसंख्या यांमध्यें फरक झालेला नाहीं, तोंपर्यंत मजुरीच्या सरासरीच्या सामान्य दरांत फरक होणें शक्यच नाहीं. कारण, संपानें जर एका धंद्यांतील लोकांची मजुरी वाढली तर

दुसऱ्या धंद्यांतील मजुरी कमी झालीच पाहिजे. ह्मणजे एकंदरीत संप मजूरवर्गाच्या हिताचे विघातक असतात. परंतु या विषयाचा पुढें एका भागांत स्वतंत्र विचार करावयाचा आहे. तेव्हां सध्यां इतकें विवेचन बस्स आहे.

✓ या वादाचें सार तीन विधानांत आहे असें वर दाखविलेंच आहे. या प्रत्येक विधानावर या उपपत्तीच्या विरोधकांनीं आक्षेप आणलेले आहेत. पहिलें विधान ह्मणजे मजुरी देण्याकरितां भांडवलाचा कांहीं एक भाग प्रत्येक देशांत अलग राखलेला असतो व तो बिनअट खर्च होतोच; हें होय. परंतु हें म्हणणें खरें नाहीं. कारखानदाराजवळ भांडवल असलें म्हणजे त्यानें तें मजुरींत खर्च केलेंच पाहिजे असें नाहीं. संपत्तीच्या उत्पादनानें आपल्यास फायदा होईल अशी अटकळ असली तरच कारखानदार मजुरींत आपलें भांडवल खर्च करील. फायदा होणें हें मालाच्या किंमतीवर व गिऱ्हाइकांच्या संख्येवर अवलंबून असतें. कारखानदारांना गिऱ्हाईक कमी होणार असें दिसलें कीं, ते आपल्या कारखान्याचें काम कमी करतात व लागलीच कांहीं मजूर कमी करतात किंवा कारखानें कांहीं दिवस बंद ठेवूं लागतात. तसेंच एखाद्या मालाचा खप जास्त होण्याचा रंग दिसला कीं, लागलीच कारखानदार मजूरलोक वाढवितात किंवा त्यांना मजुरी जास्त देऊन त्यांजकडून काम जास्त करून घेतात. तेव्हां मजुरांना द्यावयाचें चल भांडवल ही कांहीं एक ठरीव वस्तु नाहीं, तर व्यापाराच्या तेजीमंदीप्रमाणें ती कमीजास्त होणारी आहे. म्हणूनच मालाचे भाव वाढते असले म्हणजे मजुरीचे दरही वाढते असतात. परंतु मिल्लला हें ह्मणणें कबूल नव्हतें. कारण त्याच्या उपपत्तीप्रमाणें मजुरीचे दर वाढण्यास आधीं भांडवल वाढलें पाहिजे. परंतु मालाचे भाव चांगले असले, व कारखानदारांना नफा चांगला होऊं लागला ह्मणजे त्याचा परिणाम भांडवल वाढण्यांत होतो हें मिल्लला कबूल आहे. तेव्हां या कल्पनेच्या पुरस्कर्त्याप्रमाणें सुद्धां मालाच्या खपावर मजुरी अवलंबून आहे असें सिद्ध होतें. परंतु मजुरी ही मालाच्या खपावर प्रत्यक्षपणें अवलंबून नाहीं, तर ती खपावर अप्रत्यक्षपणें अवलंबून आहे एवढेंच या मजुरीफंडाच्या कैवाऱ्यांचें ह्मणणें आहे.

या उपपत्तींतील दुसरें विधान ह्मणजे देशांतील मजुरांचा वर्ग हाही अगदीं ठराविक असतो व मजुरी कांहीही असो, त्या सर्वांना मजुरी केलीच पाहिजे, हेंही

बिलकुल सर्वथा खरें नाहीं. कांहीं लोक केव्हां केव्हां मजुरी करतात, केव्हां केव्हां करीत नाहींत. शिवाय भांडवल व मजूर हे देशाबाहेर जाऊं शकतात. परंतु पहिल्या विधानापेक्षां दुसरें विधान पुष्कळ अंशानें खरें आहे असें कबूल केलें पाहिजे. तिसरें, मजुरी ही सदोदित पूर्ण चढाओढीनें ठरली जाते; हें विधानही सर्वस्वी खरें नाहीं. सुधारलेल्या देशांत दिवसेंदिवस कारखानदारांचे संघ होत आहेत त्याचप्रमाणें मजुरांचेही संघ बनत आहेत. तेव्हां हल्लींच्या काळीं व्यक्ती-व्यक्तीमधील चढाओढ कमी झाली आहे व तिचे ऐवजीं दोन वर्गांमध्यें चढाओढ सुरू झालेली आहे.

जीं तीन विधानें मिळून मजुरीफंडाची कल्पना बनलेली आहे तीं तिन्हीही विधानें सर्वांशीं खरीं नाहींत इतकाच या कल्पनेवर आक्षेप आहे असें नाहीं, तर मजुरीच्या सरासरी दराची मीमांसा या दृष्टीनेंही या कल्पनेंत पुष्कळ वैगुण्य आहे असें आक्षेपकांचें ह्मणणें आहे. तें वैगुण्य हें कीं, मजुरीचा सरासरी दर लोकसंख्या व भांडवल या दोन कारणांवरच अवलंबून आहे असें नाहीं, तर तो मजुरांच्या कर्तबगारीवरही अवलंबून आहे. इंग्लंडमध्यें रशियापेक्षां मजुरीचा सरासरीचा दर पुष्कळच जास्त आहे. याचें कारण इंग्लंडमध्यें भांडवल जास्त व लोकसंख्या त्या मानानें कमी एवढेंच नव्हे; तर इंग्लंडचे मजूर कर्तबगारींत रशियन किंवा आशियांतील मजुरांपेक्षां जास्त आहेत. यामुळें त्यांच्या श्रमानें मालाची पैदासच पुष्कळ होते व ह्मणूनच मजुरांच्या वाट्यास अधिक मजुरी येते.

तसेंच शेतकीमध्यें चढत्या पैदाशीच्या अवस्थेंत मजुरांच्या वाढीबरोबर शेतकीच्या उत्पन्नाची किती तरी वाढ होते; यामुळें मजुरांची मजुरी वाढते. कारण संपत्तीची दर माणशीं वाढ जास्त होते व ह्मणूनच श्रमाचा मोबदलाही दर माणशीं वाढतो; अर्थात् मजुरीचा दर वाढतो.

तसेंच वर दाखविलें आहे कीं, मालाचा खप वाढला ह्मणजे मजुरीचा दर वाढतो. आतां वर निर्दिष्ट केलेल्या सर्व कारणांचा विचार केला ह्मणजे लोकसंख्या व भांडवल यांपेक्षां मालाची पैदास हें मजुरीच्या दराचें विशेष महत्त्वाचें कारण भासूं लागतें व यामुळेंच कांहीं अर्थशास्त्रकारांनीं मजुरीफंडाची कल्पना, मजुरीच्या दराची मीमांसा या नात्यानें अजीबात टाकाऊ आहे असें ठरवून मजुरीचे दर हे मालाच्या पैदाशीवरच अवलंबून आहेत, अशा प्रकारची मीमांसा केली

आहे. म्हणजे मजुरीचा दर हा सामान्यतः मजुरांच्या श्रमाच्या फलावर अवलंबून आहे. ज्यांच्या श्रमापासून जास्त उत्पन्न होतें त्यांस जास्त मजुरी मिळते, ज्यांच्या श्रमापासून कमी उत्पन्न होतें त्यांस मजुरी कमी मिळते. या मीमांसेचा परिणाम ही मजुरांची सांपत्तिक स्थिति सर्वांशीं त्यांच्याच हातीं आहे असें म्हणण्यांत आहे. जर एखाद्या देशांत मजुरीचे दर फारच कमी असले तर तो दोष मजुरांचाच आहे. कारण त्यांची कर्तबगारी कमी असल्यामुळें त्यांच्या श्रमापासून मालाची उत्पत्तीच कमी होते व म्हणून त्यांच्या वांट्यास संपत्ति कमी येते.

हीही कल्पना मजुरीफंडाच्या कल्पनेप्रमाणें एककल्लीच आहे. म्हणजे या कल्पनेंत दिलेलें कारण खरें आहे, परंतु मजुरीचें हें एवढेंच मात्र कारण नव्हे. खरोखर मजुरीफंडाची कल्पना व पैदाशीची कल्पना या परस्परविरोधी नाहींत तर परस्परपूरक आहेत. म्हणजे मजुरीचा दर भांडवल, लोकसंख्या, मजुरांची कर्तबगारी, मालाची पैदास व मालाचा खप या सर्व कारणसमुच्चयावर अवलंबून आहे; या कारणांपैकीं एखादें कारण एकदम कमी झालें तर त्याचा मजुरीच्या दरावर परिणाम झालाच पाहिजे.

येथपर्यंत मजुरीच्या सरासरीच्या दराचा व त्याच्या कारणांचा विचार झाला. आतां प्रत्येक देशांत निरनिराळ्या धंद्यांत निरनिराळे मजुरीचे दर कां असतात व देशामध्यें सर्व मजुरांमध्यें सारखी चढाओढ असतांनासुद्धां ते दर एकरूप न होतां कायमचे कमीअधिक कां राहतात याचा विचार करावयाचा राहिला.

मजुरीच्या सामान्य दरासंबंधीं **ॲडाम स्मिथच्या** ग्रंथांत फारसा ऊहापोह केलेला दिसत नाहीं. परंतु अभिमतपंथामध्यें वादभूत झालेल्या मजुरीफंडाची कल्पना आणि पैदाशीची कल्पना या दोहोंचा उल्लेख **ॲडाम स्मिथच्या** पुस्तकांत आलेला आहे. मात्र मजुरीच्या दरांत फरक कां होतो याच्या कारणांचा **ॲडाम स्मिथनें** विस्तारतः विचार केलेला आहे व या बाबतींतील त्याची कारणमीमांसा सर्वसम्मत झालेली आहे. पुढील अर्थशास्त्रज्ञांनीं ती बहुतेक जशीच्या तशीच उतरून घेतलेली आहे, व आपल्यालाही तोच मार्ग अवलंबणें श्रेयस्कर होईल. या कारणमीमांसेमध्यें मजुरी व नफा या दोन्हींचाही **ॲडाम स्मिथनें** एकत्र समावेश केलेला आहे हें येथें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

धंद्याच्या मजुरीच्या दरांत किंवा नफ्यामध्यें चढाओढीच्या अमदानींतही काय-

असे फरक कां राहतात याचीं कारणें ॲडाम स्मिथनें खालील दिलीं आहेत.

पहिलें-धंद्याचें प्रियत्व अगर अप्रियत्व. जो धंदा स्वाभाविकपणें मनास आनंद देणारा आहे, त्या धंद्यांतील श्रमाचा मोबदला इतर धंद्यांपेक्षां कमी असतो. कारण श्रमाचा कांहींसा मोबदला त्या धंद्याच्या मनोरंजकतेनें मिळतो. परंतु जो धंदा कंटाळवाणा, त्रासदायक व मनाला दुःख देणारा असतो, त्या धंद्याची मजुरी जास्त असते. उदाहरणार्थ, फांशीं देण्याच्या कामाला पगार जास्त द्यावा लागतो. तसेंच घाणेरडीं कामें करणारांना मजुरी जास्त द्यावी लागते. उदाहरणार्थ-भंगी, मोऱ्या व गटारें साफ करणारे लोक. तसेंच जो धंदा समाजामध्यें हलका समजला जातो त्याची मजुरी जास्त असते. उदाहरणार्थ, आमच्या समाजांत मास्तरांपेक्षां आचाऱ्याची मजुरी जास्त आहे.

दुसरें-धंद्याचा निश्चितपणा किंवा अनिश्चितपणा. ज्या धंद्याचें काम नेहमीं बारा महिन्यांचें व निश्चित असतें त्याची मजुरी, याच्या उलट प्रकार असणाऱ्या धंद्यापेक्षां कमी असते. शेतकामी मजुराला कांहीं हंगामांतच काम असतें. म्हणून त्या हंगामांत त्याची मजुरी जास्त असते. गवंडी, पाथरवट वगैरे कामदारांचें काम भर पावसांत चालूं शकत नाहीं. यामुळें त्यांना कांहीं दिवस रिकामें बसावें लागतें व म्हणून त्यांना जेव्हां काम मिळतें तेव्हां त्यांची मजुरी जास्त असते. तसेंच हंगामी लागणारे एंजिनीयर वगैरे जिन्स व प्रेस यांमधले लोक यांना आठ महिने पगार जास्त द्यावा लागतो. सारांश, ज्या धंद्याचें काम सारखें वर्षभर चालू असून काम मिळण्याची शाश्वती असते त्या धंद्यांत इतर हंगामी व अनिश्चित कामाच्या धंद्यांपेक्षां मजुरी कमी असते.

तिसरें-धंद्यांतील मजुरी, धंदा शिकण्यास लागणारा खर्च व धंद्याचा कठीणपणा यांवर अवलंबून असते. अडाणी मजूर व हुशार मजूर यांच्या मजुरीमधील फरक या तत्त्वानेंच उत्पन्न होतो. अडाणी मजुरास धंदा शिकण्यास खर्चेही लागत नाहीं किंवा त्रासही पडत नाहीं. त्याचें काम म्हणजे सांगकाम असतें. परंतु हुशारीचीं कामें करण्यास कठीण असून तीं शिकण्यास खर्चेही पुष्कळ होतो; म्हणून अशा मजुरांना जास्त मजुरी द्यावी लागते. कांहीं धंद्यांची कला अवगत करून घेण्यास तपेंचीं तपें लागतात. म्हणून त्या धंद्यांतील मजुरी फारच मोठी असते. परंतु खर्च व त्रास या मानानें ती जास्त नसते. ज्यांना बौद्धिक

धंदे म्हणतात, उदाहरणार्थ–वकिली, एंजिनीअरी, शिक्षकी आणि डॉक्टरी–या धंद्यांत प्रावीण्य मिळविण्यास फार श्रम, खर्च व त्रास सोसावा लागतो. यामुळें या धंद्यांतील मजुरी ही बरीच मोठी असावी लागते.

चवथें–धंदेवाल्यावर ठेवावा लागणारा विश्वास. पेढीवाले, सोनार व इतर मोल्यवान् पदार्थांचीं कामें करणारांची मजुरी जास्त असावी लागते. कारण, सर्वांवर विश्वास टाकणें शक्य नसतें. व म्हणून जे विश्वासानें वागतात अशांना मजुरी जास्त द्यावी लागते. वकील व डॉक्टर यांचेवरही विश्वासाचीं कामें टाकावयाचीं असतात. डाक्तरचे हातांत तर मनुष्याचें जीवित असतें व वकिलाचे हातांत मालमत्ता असते. यामुळेंही या धंद्यांतील मजुरी जास्त असावी लागते.

पांचवें–धंद्यांतील यशस्वीपणाचा संभव. कांहीं धंद्यांत फायदा होणें न होणें हें निवळ तवकलीचें काम असतें. म्हणून अशा धंद्यांची मजुरी जास्त असते. उदाहरणार्थ, सोन्याच्या खाणीचा धंदा, मासेमाऱ्याचा धंदा, चिताऱ्याचा धंदा, नटाचा धंदा, वक्त्याचा धंदा व नाटकें लिहिणाराचा धंदा. या धंद्यांमध्यें यश येणें न येणें हें आधीं सांगतां येत नाहीं. दहा माणसांतील एक मनुष्य उत्तम चितारी बनतो किंवा नट बनतो किंवा उत्तम वक्ता बनतो. यामुळें जो विजयी होतो त्याला अकल्पित पैसे मिळतात. ही जी एका व्यक्तीला मिळकत होते ती खरोखरी दहा बारा लोकांचे श्रम वायां जातात त्यांपासून होते. म्हणून या ठिकाणींसुद्धां ह्या धंद्यांतील एकंदर श्रम, त्रास व व्यासंग यांत्रा खर्च पाहिला म्हणजे मजुरी जास्त होते असें नाहीं. तरी पण ज्याचें नशीब उदयास येतें त्याच्यावर लक्ष्मीचा वरदहस्त फिरतो व त्याची मजुरी मग सामान्य मजुरीच्या प्रमाणाबाहेर जाते.

वरील सर्व कारणांचा संकलित परिणाम असा होतो कीं, निरनिराळ्या धंद्यांतील मजुरी व नफे हे सदोदित निरनिराळे राहतात. चढाओढीच्या पूर्ण श्रमदानांत सर्व मजुरीचा दर व सर्व नफा सारखा होण्याचा कल असतो खरा. तरी पण वर निर्दिष्ट केलेल्या कारणांनीं चढाओढीचा प्रभाव कमी होतो व मजुरीचे दर व नफा यांना कांहीं अंशीं रूढीच्यासारखें रूप येतें. तरी पण एकंदरींत खऱ्या मजुरीकडे पाहिलें म्हणजे मजुरीच्या सामान्य उपपत्तीला या कारणांनीं बाध येत नाहीं, हें निर्विवाद आहे.

# भाग पांचवा.

## व्याज.

—:०:—

देशांतील संपत्तीचा तिसरा मोठा वांटा ह्मणजे व्याज होय. अभिमत अर्थशास्त्रकारांचा संपत्तीचीं जमीन, श्रम व भांडवल अशीं तीनच कारणें सांगण्याचा सांप्रदाय असल्यामुळें देशांतील संपत्तीचे या कारणपरत्वें वांटेही तीन होतात असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे; व त्या वांट्याला त्यांनीं नफा हें नांव दिलें आहे व या नफ्याचीं तीन अंगें असतात असें त्यांनीं सांगितलें आहे. कारण भांडवल हें काटकसरीनें उत्पन्न होतें; व या काटकसरीचा मोबदला भांडवलवाल्यास मिळाला पाहिजे. तसेंच भांडवलवाला कारखाना चालवून स्वतः मेहनत करतो, त्याबद्दलही त्याला मोबदला मिळाला पाहिजे. शिवाय प्रत्येक धंद्यांत भांडवल बुडण्याचा कमीअधिक संभव असतो; तेव्हां या धोक्याबद्दलही त्या भांडवलवाल्याला कांहीं तरी किफायत पाहिजे असते. या तीन गोष्टी मिळून नफा बनतो.

याप्रमाणें अभिमत अर्थशास्त्रकारांनीं नफा हा शब्द व्यापक अर्थानें उपयोगांत आणिला आहे. परंतु या ग्रंथाच्या दुसऱ्या पुस्तकांत संपत्तीचीं चार कारणें मानणें कसें आवश्यक आहे हें दाखविलेंच आहे. प्रत्येक सुधारलेल्या देशांत भांडवलवाला व कारखानदार हे एक नसतात व जरी ह्या व्यक्ति एक असल्या तरी भांडवल व संपत्तीच्या सर्व कारणांचें एकीकरण करून संपत्ती उत्पन्न करणें या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत व म्हणून त्याचे वांटे निरनिराळे समजणें इष्ट आहे. ज्याप्रमाणें लहान प्रमाणावर शेती करणारा शेतकरी हा जमीनदार असतो व मजूरही असतो; व त्याला शेताचें जें उत्पन्न येतें त्याचे प्रत्यक्ष जरी दोन वांटे केले नाहींत तरी शेतकऱ्याला जें उत्पन्न येतें तें दोन नात्यांनीं येतें; एक जमिनीचा मालक म्हणून व एक जमीन कसणारा म्हणून. अशा शेतकऱ्यानें आपली जमीन जर दुसऱ्यास खंडानें दिली तर त्याला पूर्वीच्या उत्पन्नाइतका खंड येणार नाहीं. कारण आतां त्या उत्पन्नांतून श्रमाची मजुरी कमी होईल व

त्याला जमीनदार म्हणून काय तो खंड मिळेल. हीच स्थिति नफ्यासंबंधीं आहे. भांडवल व त्याची योजना हीं एका व्यक्तीचीं असलीं तरी वस्तुतः भांडवलाचा मोबदला निराळा असतो; त्याला व्याज म्हणतात. व योजनेचा मोबदला निराळा असतो, त्याला नफा म्हणतात. तेव्हां व्याज व नफा हे संपत्तीचे दोन निराळे वांटे आहेत असें समजणें शास्त्रीयदृष्ट्या रास्त आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत व व्यापाऱ्यांच्या जमाखर्चांतही हा भेद नेहमीं ठेवलेला असतो. जरी कारखानदाराचें स्वतःचें भांडवल असलें तरी कारखान्याचा नफातोटा पाहतांना कारखानदार भांडवलाचें व्याज हें कारखान्याच्या खर्चांपैकीं एक बाब धरतो व माल विकून खर्चवेंच जाऊन मग राहील ती शिल्लक नफा म्हणून समजतो. तेव्हां या भागांत आपल्यास व्याजाच्या स्वरूपाचा व त्याच्या दराचा विचार करावयाचा आहे.

अर्थात् व्याज म्हणजे भांडवलाच्या उपयोगाकरितां दिलेली किंमत होय. भांडवलाच्या स्वरूपाचा विचार करतांना भांडवलाचे तीन वर्ग होतात असें सांगितलें आहे. उपत्नी भांडवल, उत्पादक भांडवल व उपभोग्य भांडवल. या भांडवलाच्या तिन्ही प्रकारांमध्यें भावी वासनांच्या तृप्तीकरितां सद्यःकालीन उपभोग लांबणीवर टाकणें ही सामान्य कल्पना आहे, असें दाखविलें आहे. म्हणजे भांडवलामध्यें आत्मसंयमन हा गुण दृग्गोचर होतो. व्याज हें या आत्मसंयमनाचा एक प्रकारचा मोबदला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोणत्याही माणसानें उत्पन्न केलेल्या संपत्तीचा तात्कालिक उपभोग न घेतां ती शिल्लक टाकली म्हणजे त्यानें भांडवल उत्पन्न केलें असें आपण समजतों; तेव्हां भांडवल हें एक प्रकारें श्रमाचेंच फल आहे. उत्पन्न केलेली वस्तु आपण प्रत्यक्ष शिल्लक टाकतों असें मात्र नव्हे. कारण या वस्तु नश्वर असतील किंवा फार वेळ टिकणाऱ्या नसतील. तेव्हां आपण जी शिल्लक टाकतों ती पैशाच्या रूपानें टाकतों. व भांडवल याचा समान्यतः आपण पैसा असाच अर्थ करतो. हें भांडवल आपल्या मालकीचें असतांना जेव्हां त्याचा उपयोग करण्याकरितां आपण दुसऱ्यास देतों तेव्हां या आपल्या मालकीच्या वस्तूच्या उपयोगाचा मोबदला म्हणून आपण व्याज घेतों. यावरून व्याज हें खंडाप्रमाणेच स्वरूपाचें आहे. ज्याप्रमाणें जमिनीच्या उपयोगाचा मोबदला म्हणजे खंड होय, त्याप्रमाणें भांडवल व सामान्यतः त्याचें

स्वरूप जो पैसा त्याच्या उपयोगाचा मोबदला ह्मणजे व्याज होय. खंड व व्याज यांच्या स्वरूपांमध्यें याप्रमाणें साम्य असलें तरी त्यांच्या नियमांमध्यें व समाजांतील त्यांच्या वाढीच्या नियमांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर पडतें हें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

उसन्या दिलेल्या भांडवलावर अगर पैशावर व्याज घेणें हें पापाचें कृत्य आहे असा बराच काळपर्यंत युरोपमध्यें समज होता. कारण ही गोष्ट धर्माची एक बाब होती. " नफा मिळविण्याच्या बुद्धीनें उसनवार पैसा देऊं नको " या अर्थाचीं कांहीं वाक्यें बायबलांत सांपडतात. यावरून व्याजबट्टा करणें हें ख्रिश्चनधर्माच्या मनुष्यास अयोग्य आहे असा समज उत्पन्न झाला. यामुळें ख्रिश्चनधर्मी बहुतेक देशांत व्याज घेणें किंवा व्याजबट्टा करणें हें गैरकायदा कृत्य मानलें जातें असे. हा धंदा बहुधा ज्यू लोक करीत. या कारणामुळें प्रायः ख्रिश्चन लोक ज्यू लोकांना फार तुच्छ मानीत, व त्यांचा द्वेष व तिटकारा करीत. बायबलांतील अशा निषेधपर विधानांशिवाय आणखीही कांहीं प्रमाणांवरून व्याज घेणें अयोग्य आहे असें त्या काळीं पाद्री लोकांनीं ठरविलें होतें. उदाहरणार्थ, पैसा हा वांझ आहे; पैसा पैशाला कांहीं वीत नाहीं; ह्मणून उसन्या दिलेल्या पैशाबद्दल व्याज घेणें ह्मणजे जेथें पेरलें नाहीं तेथून उत्पन्न काढण्यासारखें आहे. हें आरिस्टाटलचें मत व्याजाविरुद्ध युक्तीचें प्रमाण म्हणून ख्रिश्चन पाद्री पुढें करीत असत. याला उत्तर असें देतात कीं, खरोखरी पैसा उसना दिला जातो असें नाहीं, तर उत्पादक भांडवल उसनें दिलें जातें. भांडवलापासून अधिक संपत्ति उत्पन्न होते हें सिद्ध आहे व त्यापैकीं एक हिस्सा भांडवल उसनें देणारास देणें रास्तच आहे.

दुसरा मुद्दा हा कीं, आपल्याजवळ शिल्लक असलेला पैसा उसना देण्यांत मनुष्याचा कोणताही तोटा होत नाहीं, म्हणून त्याबद्दल व्याज मागणें गैर आहे. याला उत्तर असें आहे कीं, पैसा शिल्लक टाकण्यास मनुष्यास कांहीं तरी उपभोग कमी करावे लागतात व या त्याच्या मेहनतीबद्दल त्याला कांहीं तरी मोबदला मिळणें रास्त आहे.

व्याजाचें सातत्य गैर आहे. कारण मनुष्यानें सतत व्याज दिलें तरी मुद्दल कायमच राहतें, हा अन्याय आहे. याला उत्तर असें आहे कीं, मालकी हक्क विकणें व निवळ उपयोग विकणें, या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. ज्याप्रमाणें

जमीन खंडानें दिली ह्मणजे खंड सतत येतो व शेवटीं आपली जमीन परत मिळते; त्याचप्रमाणें भांडवलाचेंही आहे. व्याज भांडवलाच्या उपयोगाचा मोबदला आहे व ह्मणून अखेर उसनें घेतलेलें भांडवल परत करणें अवश्य आहे.

शेवटीं उसनें देणाराला उसनें घेणाऱ्याला मिळालेल्या वस्तूपेक्षां जास्त संपत्ति मिळते व ह्मणून व्याज घेणें गैर आहे. याला उत्तर असें आहे कीं, खरोखरी उसनें देणाराला जास्त फायदा होतो असें नाहीं. समजा, आज अनें बपासून १०० रुपये घेऊन ते पांच वर्षांनीं परत द्यावयाचें कबूल केलें. आज हातीं असलेल्या १०० रुपयांची किंमत ५ वर्षांनीं हातीं येणाऱ्या रुपयांच्यापेक्षां जास्त आहे हें उघड आहे. कारण सद्यःकालीन वस्तु भावी वस्तूपेक्षां जास्त किंमतीची आहे हें स्पष्टच आहे. ह्मणून जेव्हां अ आपल्या हातांत असलेली प्रत्यक्ष वस्तू बला देतो तेव्हां तो बला जास्त किंमतीची वस्तू देतो व ह्मणून पांच वर्षांनीं बनें नुसते शंभर रुपये देणें रास्त नाहीं, तर रुपयांच्या प्रत्यक्षपणाच्या जास्त किंमतीचा मोबदला अला दिला पाहिजे. तो मोबदला अला व्याजाच्या रूपानें मिळतो.

येथपर्यंत व्याजाचें सामान्य स्वरूप व त्याविरुद्ध असलेल्या आक्षेपांचा विचार झाला. आतां व्याजाच्या दराबद्दल विचार केला पाहिजे. प्रत्येक देशांत व्याजाचे दर पुष्कळ असतात व हे पुष्कळ दर असण्याचें कारण भांडवल परत मिळण्याच्या हमीचा कमीअधिकपणा हें होय. जो मनुष्य अगदीं भुकेबंगाल आहे, ज्याला उसने दिलेले पैसे परत करण्याची शक्ति नाहीं अशा माणसाला कर्जाऊ पैसे मिळत नाहींत. मिळालेच तर जबर व्याजानें मिळतात. कारण धनकोला आपलें भांडवल अजीबात बुडण्याची भीति असते. यामुळें जबर व्याजाच्या आशेनें फक्त तो पैसे कर्जाऊ देण्यास तयार होतो. ह्मणजे ज्या माणसाची पत कमी त्याला कर्जाऊ रकमेवर व्याज जास्त द्यावें लागतें. परंतु जेथें कर्ज परत मिळण्याची पूर्ण खात्री असते तेथें व्याजाचा दर एकच असतो, व तोच त्या काळच्या सामान्य व्याजाचा दर असें समजलें जातें; सर्व औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या देशांमध्यें सरकार व म्युनिसिपालिटीसारख्या सार्वजनिक संस्था या नेहमीं कर्ज काढतात व यांना सर्वांत कमी व्याजानें पैसे मिळतात. अशा कर्जेरोख्यांचें जें व्याज तें उत्तम हमीवरील कर्जरोख्याचें व्याज समजलें जातें. त्याचे खालोखाल ह्मणजे उत्तम पतीच्या व्यापारी लोकांना ज्या दरानें कर्ज मिळतें तो दर होय.

उदाहरणार्थ, हिंदुस्थानांत सरकार हल्लीं ३॥ शेंकडा व्याजानें कर्ज काढतें. परंतु वास्तविक हिंदुस्थानांत उत्तम हमीचा दर ३॥ नाहीं. कारण सरकारी प्रॉमिसरी नोटा यांवर नेहमीं कसर मिळते. म्हणजे १०० ची नोट बाजारांत ९५।९६ रुपयांस मिळते, तेव्हां उत्तम हमीच्या कर्जाचा दर हल्लीं हिंदुस्थानांत दर शेंकडा ४ आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं व सामान्य व्यापारी दर शेंकडा ६ आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा व्याजाचा दर कायम व जास्त काळ टिकणाऱ्या कर्जाचा होय. हा दर देशांतील एकंदर भांडवलाच्या कमीअधिकपणावर व देशामधील मालमत्तेच्या व जीविताच्या सुरक्षितपणावर कांहीं अंशीं अवलंबून असतो. हा दर देशांत खेळणाऱ्या नाण्यांवर अवलंबून नसतो. ज्या देशांत दंगेधोपे होतात, जेथें न्यायपद्धति चांगली नाहीं, जेथें करार पाळण्यास लावण्याबद्दल व कर्ज वगैरे परत मिळण्याबद्दल चांगलीशी व्यवस्था नसेत, तेथें व्याजाचे दर जबर असतात व सुव्यवस्थित राज्यपद्धतीच्या स्थापनेपासून व्याजाचे दर सैलावत जातात. सुव्यवस्थित राज्यपद्धतीच्या योगानें देशांत जसजसें भांडवल जमत जातें त्या त्या मानानें व्याजाचा दर कमी कमी होत जातो. हॉलंडमध्यें एके काळीं देशांत भांडवल व संपत्ति इतकी वाढली होती कीं, व्याजाचा दर शेंकडा २ व दोहोंच्याही खालीं गेलेला होता. भांडवलाची वाढ कशी होते हें दाखवितांना या गोष्टीचा विचार आधींच झालेला आहे. पुन्हां आतां याचा निर्देश करण्याची जरूरी नाहीं.

अर्थात् व्याजासंबंधींचें वरील विधान महायुद्धापूर्वींचें आहे. युद्धानंतरची स्थिति अगदीं निराळी झाली आहे. पण त्यावरून व्याजाच्या दराच्या मीमांसेचें समर्थनच होतें. अर्धतपाच्या महायुद्धांत अब्जावधी रुपयांचें भांडवल युद्धापायीं खर्च झालें. युद्धामध्यें गुंतलेल्या देशांत संपत्तीची उत्पत्ति बहुतकाळ थांबली. युद्धामध्यें सामील झालेल्या प्रत्येक देशाला कोट्यावधी रुपयांचें कर्ज काढावें लागलें. म्हणजे देशांतलें भांडवल कमी झालें; नेहमीं उत्पन्न होणारी संपत्ति त्या काळांत उत्पन्न झाली नाहीं; उलट जुन्या संपत्तीचा नाश झाला; सरकारची पतही कमी झाली. या सर्व कारणसमुच्चयाचा परिणाम असा झाला कीं, सरकारनें काढावयाच्या कर्जाचा दर वाढत गेला. सध्यां हिंदुस्थानसरकारला दरसाल दरशेंकडा सहा सात रुपये दरानें कर्ज काढावें लागतें व हें कर्ज काढतांना-

सुद्धां थोडीशी कसर द्यावी लागते. ह्मणजे हल्लीं उत्तम हमीवरील कर्जरोख्याचें व्याज सात व आठ रुपये यांचे दरम्यान आहे असें ह्मटलें तरी चालेल. अर्थात् सामान्य व्यापारी व्याजाचा दर नऊ दहा रुपयांचा झाला आहे. आतां हा दर एकदम उतरणार नाहीं. जसजशी संपत्तीची वाढ होईल, भांडवल वाढेल, सरकार कर्ज परत देऊं शकेल, तेव्हांच पुनः व्याजाचा दर उतरूं लागेल.

व्याजाचा दर व कसरीचा दर यांमध्यें भेद आहे. वर दर्शविल्याप्रमाणें व्याजाचा दर हा देशांतील भांडवलाच्या प्रमाणावर असतो. तें जसजसें वाढेल किंवा कमी होईल तसतसा व्याजाचा दर कमी होईल किंवा जास्त होईल. परंतु बँकेच्या कसरीचा दर मात्र वेळोवेळीं बदलत असतो. तो नाण्यांच्या विपुलतेवर किंवा दुर्मिळतेवर अवलंबून असतो. बँकेमध्यें रोख शिल्लक कमी होत चालली कीं, त्यांका हुंडीवरील कसरीचा दर वाढवितात; ह्मणजे तीन महिन्यांनीं भरपाई करावयाच्या हुंडीवर तीन महिन्यांचें व्याज कापून त्याबद्दल आजची जी रोख रक्कम देतात ती या कसरीच्या दरावर अवलंबून असते. कसरीचा दर नाण्यांच्या विपुलतेवर अवलंबून असतो.

युरोपमध्यें फार काळपर्यंत व्याजबट्टा करणें ह्मणजे अधर्म समजला जात असे. हा धंदा ज्यू लोक करीत असत, यामुळें ख्रिश्चन मनुष्याच्या मनांत ज्यू लोकांबद्दल विलक्षण तिट्कारा व वीट भरलेला असे हें वर सांगितलेंच आहे. व या धंद्याबद्दल समाजामध्यें तिरस्कारबुद्धि असल्यामुळें **ॲडाम स्मिथनें** सांगितलेल्या मजुरीच्या व नफ्याच्या बाबतींतील विशिष्ट कारणानुरूप ज्यू लोक व्याजही जबर घेत. हें जबर व्याज म्हणजे कांहीं अंशीं तिरस्कृत धंद्याबद्दलचा मोबदला असे. उद्योगधंद्यांची वाढ झाली नाहीं अशा समाजाच्या बाल्यावस्थेंत संपत्ति उसनी किंवा कर्जाऊ घेण्याचे प्रसंग फक्त मनुष्याला अवश्य असणाऱ्या गरजा भागविण्याकरितां येणार. अर्थात् या काळीं संपत्तीच्या उत्पत्तीला भांडवलाची फारशी जरूरी नसे. तर संपत्ति तात्कालिक उपयोगाकरितां हवी असे. कोणाला खायला नाहीं म्हणून दुसऱ्यापासून उसनें घेण्याचें कारण पडे, किंवा दुसऱ्या अशाच अकल्पित प्रसंगीं दुसऱ्याची मदत् लागे. अशा वेळीं कर्जाबद्दल किंवा उसन्या वस्तूबद्दल व्याज मागणें ह्मणजे प्रसंगांत असलेल्या माणसापासून नाडून फायदा करून घेतल्यासारखें व 'शेजाऱ्यास मदत करीत जा' या धर्मवचनास धाब्यावर

बसविल्यासारखें असे. अर्थात् समाजाच्या बाल्यावस्थेंत संपत्ति उसनी किंवा कर्जाऊ देणें ह्मणजे आपल्यास नको असलेल्या वस्तूचा दुसऱ्यास उपयोग करून देणें होय व हा एक मनुष्याच्या नैतिक कर्तव्याचाच भाग समजला जात असे. या समजामुळें व्याज मागणें हें क्रूरपणाचें व अन्यायाचें भासे. परंतु जसजशी समाजाची प्रगति होत जाते तसतशी संपत्त्युत्पादनाकरितां भांडवलाची जास्त आवश्यकता लागूं लागते. कर्ज काढण्याचा मुख्य हेतु अधिक संपत्ति उत्पन्न करणें हा असतो. जर दुसऱ्याच्या भांडवलाचा उपयोग करून एकानें आपल्याला नफा करून घेतला तर त्या नफ्याचा कांहीं अंश भांडवलाच्या मूळ मालकास देणें हें अगदीं रास्त आहे असें दिसून येतें. म्हणूनच पूर्वकाळींसुद्धां कर्ज उसनें देणारानें व्यापारांतील धोक्याचा वांटेकरी होण्याचें कबूल केल्यावर मग व्याज घेण्याबद्दल समाज आड येत नसे. कारण अशा स्थितींत उसनें देणारा हा एक व्यापारांतला भागीदारच होई व जरी व्याजाबद्दल लोकमत प्रतिकूल होतें तरी पण नफ्याबद्दल तें कधींही प्रतिकूल नव्हतें.

हिंदुस्थानांत व्याजाबद्दल कांहीं एक धर्मबंधन नव्हतें. यामुळें व्याज घेण्याची पद्धति व व्याजबट्टा करण्याचा धंदा फार काळापासून येथें प्रचारांत आहे. मात्र हा धंदा समाजांतील वरिष्ठ जात जी ब्राह्मण तिनें करूं नये असा सक्त नियम असे. ब्राह्मणानें कसीद ह्मणजे व्याजबट्टा करणें हें मोठें पाप आहे अशा प्रकारचीं स्मृतिवचनें सांपडतात. परंतु वैश्य जातीस हा धंदा करण्याची पूर्ण मुभा होती. हिंदुस्थानांत अन्तःस्वास्थ्य किंवा जीविताची व मालमत्तेची सुरक्षितता फारशी नसल्यामुळें, तसेंच अंदाधुंदीच्या काळांत न्यायाची पद्धतही चांगलीशी अमलांत नसल्यामुळें शिल्लक पैसा पुरून ठेवण्याचा परिपाठ फार होता. यामुळें भांडवलाची फार दुर्मिळता असे व ह्मणूनच व्याजाचा दरही फार असे. पेशवाईंतील रोजनिशा—ज्या हल्लीं प्रसिद्ध होत आहेत—त्यांवरून पेशव्यांनासुद्धां शेंकडा १२ पासून २५ पर्यंत व्याज द्यावें लागे असें दिसतें. परंतु या पेशवाईंतील माहितीवरूनही व्याजाच्या उपरिनिर्दिष्ट तत्त्वाचेंच समर्थन होतें. जसजसें देशांतील सरकार बद्धमूल होतें व त्यावर लोकांचा विश्वास बसतो, तसतसें सरकारला व्याज कमी कमी द्यावें लागतें. पहिल्या बाजीरावास दरमहा दरशेंकडा २ रुपयांनीं कर्ज काढावें लागलें; तेंच पुढें नानासाहेबांच्या कारकीर्दींत १॥ रुप-

यानें कर्ज मिळूं लागलें व सवाई माधवरावांच्या कारकीर्दीमध्यें दरमहा दरशेकडा १ रुपया व्याजाचा दर झाला होता. यावरून व्याजाचा दर सावकाशपणें पण कमी कमी होत चालला होता असें दिसतें.

सरकारची जर ही स्थिति तर खासगी व्यक्तींना किती तरी व्याज द्यावें लागत असलें पाहिजे हें उघड आहे. परंतु इंग्रजी अमलापासून पैसे पुरून ठेवण्याची पद्धति जात चालली आहे. अजूनही आमच्या पुराणप्रियतेमुळें आम्ही ती आजिबात सोडून दिली नाहीं हें मागें एके ठिकाणीं सांगितलें आहे. यामुळें व्याजाचा दर कमी कमी होत चालेला आहे. तरी पण अजून गरीब शेतकऱ्यांना जबर व्याज द्यावें लागतें. अशा गरीब लोकांची पत वाढविण्याकरितां सहकारी पेढ्या काढण्याचा उपक्रम हल्लीं चालू झाला आहे. त्याची हकीकत दुसऱ्या एका भागांत द्यावयाची आहे, ह्मणून त्याचा येथें विस्तार करण्याची जरूरी नाहीं.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, व्याज या उत्पन्नाच्या वांट्याचें स्वरूप जमिनीच्या खंडाच्या स्वरूपापासून अगदीं भिन्न आहे. देशाच्या भरभराटीबरोबर जमिनीचा खंड वाढत जातो तर व्याजाचा दर कमी होत जातो, व व्याजाचा हलका दर हें एक देशाच्या सुस्थितीचेंच लक्षण आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

---

# भाग सहावा.

## नफा.

आतां संपत्तीच्या वांटणीच्या शेवटच्या एका वांट्याचा विचार करावयाचा राहिला. तो वांटा ह्मणजे नफा होय. संपत्तीच्या वांटणीमध्यें या वांट्याचें महत्त्व फार आहे. विशेषतः समाजाची जसजशी उन्नति होत जाते तसतसा हा वांटा फार मोठा होत जातो. संपत्तीच्या उत्पत्तीचें चवथें व शेवटचें कारण म्हणजे योजक किंवा कारखानदार होय. कच्चा माल, श्रम व भांडवल या कारणत्रयीला एकसूतांत आणून कारखाना उभारून प्रत्यक्ष संपत्ति उत्पन्न करणें हें काम योज-

काचें किंवा कारखानदाराचें आहे. संपत्ति उत्पन्न झाल्यावर ती गिऱ्हाइकाच्या हातीं पाडणें हाही व्यवसाय संपत्तीच्या उत्पत्तीचाच एक भाग आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण ज्याप्रमाणें रानांत पडून राहिलेल्या जिनसा म्हणजे अजून प्रत्यक्ष संपत्ति नव्हे; तर ती अनुद्भूत संपत्ति होय. परंतु तीच शहरांत आणली म्हणजे ती संपत्तिस्वरूपाप्रत पावते; त्याचप्रमाणें उत्पन्न केलेली संपत्तीसुद्धां गिऱ्हाइकाच्या दारीं आल्याखेरीज उत्पत्तीचें कार्य पूर्ण झालें असें म्हणतां येत नाहीं. गिऱ्हाइकाच्या दारीं संपत्ति पोंचविण्याचें काम घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी व फिरते व्यापारी या सर्वांमिळून होतें. तसेंच तें मालाची नेआण करणाऱ्या निरनिराळ्या साधनांच्या मालकांकडून होतें; व म्हणूनच या सर्वांचा संपत्तीच्या उत्पादकांत समावेश होतो. म्हणूनच कारखानदार व व्यापारी या दोघांच्या वांट्याला नफा हें एकच नांव व्यवहारांत देतात व त्याचें शास्त्रीयदृष्ट्याही समर्थन करतां येतें.

कांहीं अर्थशास्त्रकारांचें म्हणणें असें आहे कीं, नफा हा संपत्तीचा एक स्वतंत्र वांटा आहे असें मानण्याचें कारण नाहीं. कां कीं, नफा म्हणजे वास्तविक कारखानदार किंवा व्यापारी यांच्या श्रमाचा मोबदला होय; व श्रमाचा मोबदला म्हणजे मजुरी होय. तेव्हां इतर मजूरदार व कारखानदार किंवा व्यापारी यांचेमध्यें फरक मानण्याचें कांहींएक कारण नाहीं. म्हणूनच मजुरी व नफा असे संपत्तीचे दोन स्वतंत्र वांटे मानण्याचेंही कारण नाहीं.

परंतु कारखानदारामध्यें कोणकोणते विशेष गुण लागतात व कारखानदार म्हणून एक संपत्तीचें कारण मानणें कसें इष्ट आहे हें मागें दुसऱ्या पुस्तकांत दाखविलेंच आहे. मजूर व कारखानदार किंवा व्यापारी हे दोन्ही वर्ग जरी श्रम करीत असले तरी त्यांच्या श्रमांमध्यें फार मोठा फरक आहे. मजूर कोणत्याही दर्जाचा असो—अगदीं सांगकाम्या दिस-मजुरापासून एखाद्या मोठ्या कारखानदाराच्या पगारी मॅनेजरापर्यंत—परंतु या वर्गांतले सर्व लोक कांहीं अटींवर ठरलेल्या मोबदल्याप्रमाणें काम किंवा श्रम करतात. मग ही मजुरी दिवसाची ठरलेली असो, दर आठवड्याची ठरलेली असो, दर महिन्याची ठरलेली असो किंवा दर वर्षाची ठरलेली असो. म्हणजे मजुरी ही संपत्ति उत्पन्न होण्याच्या आधीं ठरलेली रकम असते. संपत्त्युत्पादनाचेसंबंधीं कांहींएक विशिष्ट ठराविक

कृति त्यानें केली किंवा कांहीं एका ठराविक वेळांत त्यानें कांहीं वस्तु तयार करून दिल्या म्हणजे मजुरावरची जबाबदारी संपते, व त्याला कराराप्रमाणें पगार किंवा मजुरी मागण्याचा हक्क येतो. सारांश, मजूर व कारखानदार यांमध्यें चाकर व मालक या तऱ्हेचा भेद असतो. चाकरही श्रम करतो व मालकही श्रम करतो; म्हणून ते जसे कधींही एक समजले जाणार नाहींत, त्याचप्रमाणें मजूर व कारखानदार हे जरी श्रम करीत असले तरी ते एक मानले जाणार नाहींत. कारण नोकर किंवा चाकर यांचेवर करार पुरा करण्यापुरतीच मर्यादित जबाबदारी असते. परंतु मालकाची जबाबदारी अमर्याद असते. तोच प्रकार मजूर व कारखानदार यांमध्येंही असतो. मजुरावर संपत्त्युत्पादनाबद्दल मर्यादित अशी जबाबदारी असते. परंतु कारखानदाराची जबाबदारी अमर्याद असते. त्याला संपत्ति उत्पन्न करण्याची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घ्यावी लागते; त्याला संपत्तीचीं निरनिराळीं कारणें एकत्र करण्याची काळजी असते; त्याला उत्पन्न केलेली संपत्ति विकण्याकरितां गिऱ्हाईक शोधून काढावयाचें असतें. त्याच्या उत्पन्नामध्यें मजुरीप्रमाणें निश्चितपणा मुळींच नसतो. वरील विवेचनावरून कारखानदार व व्यापारी यांना संपत्तीचा मिळणारा वांटा कसा स्वतंत्र आहे हें दिसून येईल. आतां या नफ्याच्या स्वरूपाचा विचार केला पाहिजे.

नफा म्हणजे कारखानदार किंवा व्यापारी यांना आपला कारखाना किंवा व्यापार चालविण्याच्या खटाटोपीचा मोबदला होय.

हा नफा पुष्कळ घटकावयवांनीं झालेला असतो. प्रथमतः कारखानदाराच्या देखरेखीच्या श्रमाचा मोबदला हा एक त्यांतला घटकावयव होय. दुसरें, प्रत्येक व्यापारांत कांहीं एक धोका किंवा सट्टा याचा अंश असतो व त्याबद्दलही कांहीं मोबदला कारखानदारास मिळाला पाहिजे. शिवाय, कारखानदारामध्यें कारखाना चालविण्याची कांहीं एक योजकता व घटनाशक्ति असावी लागते. त्याबद्दलच्या मोबदल्याचाही अंश नफ्यांत असतो. मनुष्यामध्यें योजकता व घटनाशक्ति हे दोन गुण फार विरळा दृष्टीस पडतात. ते सर्व कारखादारांमध्यें सारख्या प्रमाणानें असतात असाही नेम नाहीं. ते कमीअधिक प्रमाणानें असतात. ज्याप्रमाणें देशांतील जमीन कमाअधिक सुपीक असते व त्यामुळें जमिनीच्या खंडांत कमीजास्तपणा असतो, त्याचप्रमाणें नफ्याचीही गोष्ट आहे. नफ्यामध्येंही कारखान-

दाराच्या योजकतेप्रमाणें व घटनाशक्तीप्रमाणें कमीअधिक नफा होतो. दोघां माणसांनीं एका तऱ्हेचे दोन कारखाने काढले; भांडवल, श्रम, कच्चा माल, यंत्रसामग्री वगैरे सर्व बाबतींत त्यांचें अगदीं साम्य असून एका मनुष्याचा कारखाना किफायतशीर होतो तर एकाचा आंतबट्ट्याचा होतो. आतां हा फरक कारखानदाराच्या योजकता व इतर विशेष गुणांवर अवलंबून असतो व प्रत्येक धंद्यांत कारखानदार अगदीं नादानापासून तों अत्यंत हुशारापर्यंत असतात. नादान कारखानदारांना नफा मुळींच मिळत नाहीं. चांगल्या कारखानदारांच्या योजकतेच्या मानानें तो कमीअधिक मिळतो. यावरून नफा हा खंडासारखा निरनिराळा असतो. त्याचा एकच दर कधींही असत नाहीं. म्हणजे नफ्याचें स्वरूप मजुरीसारखें नसतें. देशामध्यें सामान्य मजुरीचा दर एकच असतो. परंतु नफ्याचा सामान्य असा एक दर नसतो. जमिनीच्या खंडाप्रमाणें शून्यापासून हवा तितका वाढता असतो. नफ्याच्या स्वरूपाचें अशा प्रकारचें विवेचन अर्वाचीन अर्थशास्त्रकारांनीं केलेलें आहे. अभिमत अर्थशास्त्रकारांनीं नफ्याचें स्वरूप एकच असतें व नफ्याचा सामान्य दर एकच असतो असें प्रतिपादन केलेलें आहे. त्यांचे मतानें देशाची संपत्ति जसजशी वाढते त्या मानानें नफ्याचे दर कमी होत जातात. या बाबतींत स्वाभाविकपणें पडणाऱ्या संपत्तीच्या चार वांट्यांमधील साम्य व विरोध यांचा विचार करण्यासारखा आहे. नफा व व्याज यांमध्यें अत्यंत साम्य आहे. कांहीं अंशीं ते एकच आहेत असें अभिमत अर्थशास्त्रकारांचें ह्मणणें आहे. ज्याप्रमाणें समाजाच्या औद्योगिक प्रगतीबरोबर व्याजाचा दर कमी कमी होत जातो तोच प्रकार नफ्याचाही होतो. ह्मणजे समाजाच्या औद्योगिक प्रगतीबरोबर देशांतील धंद्यांतील नफ्याचा सामान्य दर कमी कमी होतो. कारण नफा हा उत्पन्न केलेल्या संपत्तीला येणारी किंमत व उत्पन्न करण्यास लागलेला खर्च यांच्या वजावाकीपासून येतो व एखाद्या धंद्यांत मालाला मागणी जास्त झाली ह्मणजे त्याची किंमत वाढते. अशी किंमत वाढली ह्मणजे नफा जास्त होतो. एका धंद्यांत याप्रमाणें नेहमींपेक्षां नफा जास्त होऊं लागला ह्मणजे त्या धंद्यांत लोकांची गर्दी होते व नवीन नवीन कारखाने निघून मालाचा पुरवठा वाढतो व यामुळें मालाचा दर पुनः पूर्वीच्या सरासरीवर येऊन पोंचतो. तेव्हां देशामध्यें नेहमीं जी चढाओढ चालू असते तीमुळें देशांतील नफ्याचे दर त्या-

जाच्या दरांप्रमाणें नेहमीं कमी होतात.

परंतु जमिनीचा खंड व मजुरी यांचा क्रम याच्या उलट असतो. देशाच्या प्रगतीबरोबर हीं दोन्ही वाढत जातात. कारण जसजशी वाईट जमीन लागवडीस येते तसतशी लागवडीची धार खालीं खालीं येते व म्हणून जमिनीचा खंड वाढतो व जीवितांच्या आवश्यकांची किंमत वाढल्यामुळें मजुरीचे दरही वाढत जातात. अभिमत अर्थशास्त्रकारांनीं याप्रमाणें जमिनीचा खंड व मजुरी आणि व्याज व नफा यांमध्यें विरोध आहे असें दाखविलें आहे. विशेषतः मजुरी व नफा यांमध्यें विशेष प्रकारचा विरोध आहे असें त्यांचें ह्मणणें आहे. कारण वर दर्शविल्याप्रमाणें नफा हा मालाला येणारी किंमत व मालाला लागणारा खर्च यांच्या वजावाकीइतका असतो व मालाला लागणाऱ्या खर्चाचा मुख्य भाग मजुरीमध्येंच खर्च होतो. तेव्हां कांहीं कारणांनीं मजुरी वाढल्यास नफा कमी झालाच पाहिजे व मजुरी कमी झाल्यास नफा वाढलाच पाहिजे. म्हणजे मजूर व कारखानदार यांचें हित परस्परावलंबी नसून परस्परविरोधी आहे. जी गोष्ट मजुराच्या हिताची तीच कारखानदाराच्या अहिताची व उलटपक्षीं जी गोष्ट कारखानदाराच्या हिताची तीच गोष्ट मजुराच्या अहिताची. मजूर व कारखानदार यांमधील हा विरोधी भाव **रिकार्डोनें** आपल्या ग्रंथांत मोठ्या प्रामुख्यानें पुढें आणला आहे व सामाजिक पंथ म्हणून जो स्वतंत्र पंथ अर्थशास्त्रामध्यें निघाला आहे तो **रिकार्डो**च्या एककल्ली मताचाच परिणाम होय हें पुढें सामाजिक पंथाचा इतिहास देतांना सांगावयाचें आहे.

परंतु **रिकार्डोचें** हें ह्मणणें सर्वस्वी खरें नाहीं. कारण जर मालाला मागणी वाढली व पदार्थांच्या किंमती वाढल्या तर मजुरी व नफा हे दोन्हीही वांटे एकदम वाढूं शकतात. ह्मणजे मजूर व कारखानदार यांच्या हितांत नेहमीं विरोध असतो किंवा विरोध असलाच पाहिजे असा कांहीं नियम नाहीं. वास्तविक पाहतां मजूर व कारखानदार या दोघांचेंही हित परस्परावलंबी असून तें व्यापाराच्या व धंद्याच्या तेजीवर अवलंबून आहे. कोणत्याही कारणानें मालाला मागणी कमी झाली तर दोघांचेंही नुकसान होतें.

अभिमत अर्थशास्त्रकारांचा नफ्याबद्दल आणखी एक वादग्रस्त सिद्धांत आहे, तो हा कीं, सर्व धंद्यांतील नफा समाजाच्या प्रगतीबरोबर कमी कमी

होत जातो. इतकेंच नव्हे तर सर्व धंद्यांवरील व सर्व व्यापारांतील नफ्याचा दर एकच होत जातो. निदान नफ्याच्या दराचा एकीभावाकडे कल तरी असतो. हा सिद्धान्तही अभिमत अर्थशास्त्रकार चढाओढीच्या तत्त्वानेंच प्रतिपादितात. एका धंद्यामध्यें दुसऱ्या धंद्यापेक्षां नफ्याचें प्रमाण जर जास्त असेल तर देशांतील भांडवलाचा ओघ त्या धंद्याकडे जास्त वळेल व जोंपर्यंत या धंद्यांतील नफ्याचें प्रमाण इतर धंद्यांतील नफ्याच्या प्रमाणापेक्षां जास्त राहील तोंपर्यंत हा क्रम अव्याहत चालू राहील. ज्याप्रमाणें दोन निरनिराळ्या पातळींत असलेल्या तळ्यांतील पाणी एका पातळीला येईपर्यंत एकांतून दुसऱ्यामध्यें पाण्याचा सारखा ओघ चालेल, त्याप्रमाणेंच धंद्यांची गोष्ट आहे. तेव्हां सर्व धंद्यांचा नफा सारखाच असणें हीच धंद्यांची स्थिर स्थिति होय. तोंपर्यंत चढाओढीचें कार्य सारखें सुरू राहिलेंच पाहिजे. आतां ॲडाम स्मिथनें मजुरी व नफ्याच्या दरामध्यें भेद करणारीं जीं विशिष्ट कारणें सांगितलीं आहेत, त्यांमुळें जो काय नफ्यांत फरक राहील तेवढा मात्र कायम स्वरूपाचा असेल. उदाहरणार्थ, एखादा धंदा अगर व्यापार फार किळसवाणा अगर घाणेरडा अगर तिरस्कृत असेल तर त्या धंद्याचा नफा इतर सुलभ व कमी मेहनतीच्या किंवा मानाच्या धंद्यांपेक्षां नेहमींच जास्त राहिला पाहिजे, हें उघड आहे; परंतु या विशिष्ट कारणाखेरीज बाकी सर्व नफ्यांच्या दराचा कल एकरूप होण्याकडे असला पाहिजे असा अभिमत अर्थशास्त्रकारांचा एक सिद्धांत आहे.

परंतु या सिद्धांताचा खोटेपणा दाखवितांनाच नफा हा जमिनीच्या खंडासारखा आहे; म्हणजे त्याचा एकरूप होण्याकडे कल असण्याऐवजीं विविधतेकडे कल आहे, असें अर्वाचीन अर्थशास्त्रज्ञांनीं दाखविलें आहे; व हें अर्वाचीन अर्थशास्त्रकारांचें म्हणणें पुष्कळ अंशीं खरें आहे. कारण नफा हा कारखानदारांच्या योजकतेचा, कल्पकतेचा व घटनाशक्तीचा परिणाम होय. कारण आपण असें पाहतों कीं, सारख्याच स्थितींतील दोन कारखाने किफायतशीर आणि आंतबट्ट्याचे होतात व याचें कारण कारखानदारांच्या कल्पकतेंतील फरक होय. तेव्हां सर्व धंद्यांतील व धंद्याच्या प्रत्येक प्रकारांतील नफ्याचा दर एकरूप होत जातो हें म्हणणें वस्तुस्थितीस धरून नाहीं. उलट नफ्यामध्यें जमिनीच्या खंडाप्रमाणें एकप्रकारची विविधता येत असते. याचा प्रत्यक्ष अनुभव संयुक्त भांड-

बलानें काढलेल्या कंपन्यांच्या नफ्यातोट्याच्या हिशेबावरून खास येतो. या हिशेबांत आंतबट्ट्याचा व्यापार करणाऱ्या कंपन्यांपासून तों थेट शेंकडा वीस, पंचवीस किंवा तीस नफा मिळविणाऱ्या कंपन्या दृष्टीस पडतात. यावरून नफ्याच्या दराचा विविधतेकडेच कल आहे असें ह्मणणें भाग आहे.

गेल्या महायुद्धाचे काळांत व्यापाऱ्यांनीं कल्पनातीत नफा मिळविला व त्यामुळें सर्वच धंद्यांत हल्लीं नफ्याचे दर वाढले आहेत. युद्धापूर्वी शेंकडा पांच दहा रुपये नफा राहिला ह्मणजे कारखानदारांचें व व्यापाऱ्यांचें समाधान होई. पण मधल्या युद्धकाळांतल्या नफ्यानें या वर्गाचे डोळे फिरून गेले आहेत. आतां त्यांना पंचवीस टक्क्याच्या वर नफा मिळाल्याखेरीज धंद्यांत नफा झाला असें वाटतच नाहीं.

नफ्याचा एकीभावापेक्षां विविधतेकडे कल आहे याला दुसरेंही एक प्रमाण आहे. तें हें कीं, संपत्तीच्या इतर सर्व वांट्यांपेक्षां नफ्याचें स्वरूप निराळें आहे. जमिनीचा खंड, मजुरी किंवा व्याज या सर्व वांट्यांमध्यें एक प्रकारचा निश्चितपणा आहे. कारण यांतील पहिले दोन भाग करारावरच बहुशः अवलंबून असतात व तिसराही देशांतील भांडवलाची विपुलता अगर दुर्मिळता यांवर अवलंबून असतो. परंतु हे सर्व वांटे कारखानदाराला माल तयार होण्याच्या आधींच किंवा त्या समयींच द्यावे लागतात व प्रत्येक वेळीं त्याची रक्कम ठरलेलीच असते. परंतु नफा हा कधींही करारानें ठरलेला वांटा नसतो. तो कारखानदाराला संपत्तीची विल्हेवाट लावल्यावर मिळावयाचा असतो व त्यांत एक प्रकारचा सट्टयाचा अंश असतो. माल तयार करतांना पुष्कळ वेळ जातो व या अवधींत मालाच्या किंमतींत फरक होण्याचा संभव असतो. जर कारखानदाराच्या सुदैवानें त्यानें अटकळ केलेल्या किंमतीपेक्षां मालाची किंमत वाढली तर त्याला अनपेक्षित नफा होईल. परंतु दुर्दैवानें किंमत कमी झाल्यास नफ्याच्या ऐवजीं व्यापारांत व धंद्यांत त्याला ठोकर लागण्याचाही संभव असतो. याप्रमाणें नफ्यामध्यें एक प्रकारचा अनिश्चितपणा हा स्वभावसिद्ध असतो व ह्मणून सर्वांना सर्व वेळीं व सर्व ठिकाणीं सारखा नफा मिळणें अशक्य असतें. उलट नफ्याची बाब ही सट्टयासारखी असते. कांहीं व्यापार तर निवळ जुगारीच्या खेळासारखे असतात. हल्लींच्या काळीं सर्व जग ह्मणजे एकच व्यापारी पेठ झाल्यासारखी झाली आहे व

मुळें या व्यापारी पेठेचे जे विषय—उदाहरणार्थ कापूस, गहूं, कोळसा, रॉकेल, सोनें, रुपें वगैरे—यांचा घाऊक व्यापार ह्मणजे एक प्रकारचा जुगारच झाला आहे. यामुळें जुगाराप्रमाणेंच याही व्यापारांत क्षणांत मनुष्य लक्षापति किंवा भिक्षापति होऊं शकतो. यावरून नफ्याचा विविधतेकडेच कल आहे असें ह्मणणें प्राप्त आहे.

येथपर्यंत औद्योगिक बाबतींत प्रगतीस गेलेल्या समाजांमध्यें संपत्तीचे मुख्य वांटे कसे व कोणते होतात हें दाखविलें. संपत्ति मुख्यतः चार वर्गांच्या संगनमतानें उत्पन्न होते. तेव्हां उत्पन्न झालेल्या संपत्तीचे जे चार मुख्य वांटेकरी आहेत ते जमीनदार, मजूर, भांडवलवाले कारखानदार व व्यापारी हे होत. समाजांतील इतर सर्व वर्गांचें उत्पन्न या चार मुख्य वांट्यांच्या पोटांतून होतें. सर्व व्यवहार चढाओढीनें चालले आहेत, समाजांतील सर्व वर्ग सारखे शिकलेले असून प्रत्येक मनुष्याला आपलें हित कळत आहे, तसेंच समाजामध्यें संपत्तीची वांटणीही रूढीनें न ठरतां फक्त करारानेंच ठरते, वगैरे गोष्टी गृहीत धरून समाजामध्यें संपत्तीचे वांटे कसे व कोणते पडतात, हें आपण आतांपर्यंत पाहिलें. परंतु या गृहीत गोष्टी सर्व ठिकाणीं व सर्व धंद्यांस लागू असतात असें नाहीं. कमीअधिक प्रमाणानें सर्व ठिकाणीं रूढीचा अंमल चालूच असतो. शिवाय शेतकीच्या बाबतींत लागवडीच्या निरनिराळ्या पद्धती निरनिराळ्या ठिकाणीं अस्तित्वांत असतात. या निरनिराळ्या पद्धतींनें समाजामधील वर्गांत संपत्तीची वांटणीही निरनिराळ्या तऱ्हेनें होते. शिवाय शेतकी हा संपत्तीच्या उत्पत्तीचा एक बराच महत्वाचा धंदा असल्यामुळें शेतकीच्या निरनिराळ्या पद्धतींचा अर्थशास्त्रदृष्ट्या विचार करणें अवश्य आहे. म्हणून पुढील भागांत प्रथमतः युरोपांतील जमीनधाऱ्याच्या निरनिराळ्या प्रकारांचें वर्णन देऊन धनोत्पादनाच्या व लोकहिताच्या दृष्टीनें कोणती पद्धत चांगली, या गोष्टीचा विचार करावयाचा बेत आहे; नंतर हिंदुस्थानांतील निरनिराळ्या पद्धतींचा याच दृष्टीनें विचार करून मग वांटणीच्या अवशिष्ट प्रश्नाकडे वळण्याचा मानस आहे.

# भाग सातवा.

## जमीनधाऱ्याच्या पद्धति.

सर्व जगांत सर्व काळीं जमीन ही संपत्तीची मुख्य जनयित्री असल्यामुळें, जमीनधाऱ्याच्या पद्धति फार महत्त्वाच्या गणल्या जात असत. युरोपांत ग्रीक व रोमन लोकांमध्यें जमिनी ह्या खाजगी मालकीच्या असत. नागरिक हे जमिनीचे पूर्ण मालक असत. परंतु या काळीं गुलामगिरीचा प्रघात असल्यामुळें ज्याप्रमाणें इतर धंदे गुलामच करीत, त्याप्रमाणें शेताची लागवडही गुलामच करीत. नागरिक देखरेख मात्र करीत. पहिल्यापहिल्यांदा शेताचे आकार साधारण बेताचेच असत; परंतु पुढेंपुढें शेताचे आकार मोठे मोठे होऊं लागले व नागरिकांना राजकीय कामांमुळें शेताची प्रत्यक्ष देखरेख करतां येणेंसुद्धां अशक्य झालें. यामुळें शेताची देखरेखही नागरिकांनीं नेमलेल्या नोकरांकडे किंवा गुलामांपैकींच जास्त विश्वासाच्या गुलामाकडे दिली जाई. याचा परिणाम पहिल्यापेक्षां अनिष्ट झाला हें उघड आहे. रोमन राज्याच्या बाल्यावस्थेंत रोमन लोक स्वतः शेतें लागवडीस आणीत; स्वतः शेतें कसणें हें मानाचें समजलें जात असे; परंतु पुढें तेथेंही सर्व लागवड गुलामांमार्फतच होऊं लागली. नागरिकांच्या मालकीची पुष्कळ एकर जमीन असे व मालकांच्या सामान्य देखरेखीखालीं जमिनींची लागवड होत असे. या शेतकीच्या लागवडीच्या पद्धतीला 'दासकृषि' ह्मणतां येईल. या पद्धतीमध्यें गुलाम हे प्रत्यक्ष जमीन कसतात, गुलामांचे मालक गुलामांना खावयाला घालतात, व हा खर्च जाऊन जी शिल्लक राहील तें या पद्धतींत सर्व मालकाचें उत्पन्न समजलें जातें; त्यांत कोणीही वांटेकरी नसतो. गुलाम मालकांच्या सत्तेचे असल्यामुळें त्यांना त्यांच्या श्रमांबद्दल मजुरी द्यावी लागत नाहीं. परंतु ही पद्धति अर्थशास्त्रदृष्ट्या फारच कनिष्ठ दर्जाची आहे. कारण गुलामांना शेतकीची लागवड चांगली हुरूपानें करण्याची बुद्धि होणें शक्य नसतें. कारण शेतीचें उत्पन्न वाढलें तरी त्यांचें त्यापासून हित मुळींच नसतें. गुलाम हे स्वाभाविक कामचुकार असतात. धन्याच्या चाबकाच्या भीतीनेंच फक्त ते काम

करतात. यामुळें अशा जुलमाचें काम अगदीं कनिष्ठ दर्जाचें असतें हें सांगण्याची जरूरी नाहीं. या पद्धतीपासून शेतीचें उत्पन्न फार कमी येतें, इतकेंच नव्हे तर शेताची मशागत व निगा नीट न राहिल्यामुळें लागवडीची जमीन दिवसेंदिवस क्रमकस होत जाऊन शेवटीं ती जमीन अगदीं नापीक होते. अमेरिकेमध्यें गुलामांच्या श्रमानें जी शेतकीची लागवड होत असे, तीमध्येंही असाच अनुभव आलेला आहे. ग्रीक व रोमन लोकांमध्यें गुलामांची स्थिति अमेरिकेंतील गुलामां इतकी वाईट नव्हती. त्यांना घरांतल्या चाकरमाणसांप्रमाणें वागविलें जात असे. ग्रीक गुलाम व मालक यांच्यामध्यें तीव्र वर्णभेदही नव्हता, यामुळें गुलामांबद्दल अमेरिकेमध्यें दिसून येणारी तुच्छताबुद्धि नव्हती. शिवाय ग्रीक गुलामांना मालकाच्या परवानगीनें आपली दास्यांतून मुक्तता करून घेतां येत असे; यामुळें धन्याला खूष करून पुढेंमागें आपली सुटका करून घेतां येईल अशी आशा ग्रीक गुलामांना असे. ह्मणून ग्रीक व रोमन लोकांच्या काळीं दासकृषीचे, अमेरिकन दासकृषीइतके वाईट परिणाम दिसले नाहींत इतकेंच. परंतु दासकृषि ही सर्वांत कनिष्ठ दर्जाची कृषिपद्धति होय, ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. या पद्धतीमध्यें शेतीची जमीन फार झपाट्यानें निकस होत जाते व या शेतलागवडीच्या पद्धतीनें धनोत्पादनही फारच कमी प्रमाणावर होतें. या कारणानें ही पद्धति अर्थशास्त्रदृष्ट्या अगदीं त्याज्य ठरते. शिवाय मानवी जातीबद्दल आदरभाव उत्पन्न झाल्यापासून गुलामगिरी अमानुष वाटूं लागली; यामुळें ही पद्धति नीतिदृष्ट्याही गर्हणीय वाटूं लागली. म्हणून ख्रिश्चन धर्माच्या प्रसारानें युरोपांतील गुलामगिरी बहुतेक नाहींशी झाली व गुलामगिरीच्या रूढीच्या नाशाबरोबर दासकृषीची पद्धतीही नाहींशी झाली. शिवाय रोमन पातशाहीचा नाश ज्या उत्तर युरोपांतील रानटी जर्मन लोकांनीं केला, त्यांच्यामध्यें गुलामगिरीचा प्रघात नव्हता. यामुळें सर्व रोमन साम्राज्यावर जेव्हां हे लोक पसरले व त्यांनीं निरनिराळीं राष्ट्रें युरोपांत निर्माण केलीं, त्या वेळीं रोमन लोकांच्या काळीं प्रचलित असलेली दासकृषिपद्धति स्वाभाविकपणें नाहींशी झाली; व या उत्तरेकडील लोकांमध्यें प्रचलित असलेल्या दासकल्पकृषि व जहागिरीपद्धति प्रचारांत येऊं लागल्या. ही दासकल्पकृषिपद्धति गुलामगिरीसारखीच असल्यामुळें तिचा प्रसार फार जलद व सर्व युरोपभर झाला. त्यांतल्या त्यांत पूर्वयुरोपमध्यें तिचा फैलाव विशेष झाला व तेथें ही पद्धति फार

काळपर्यंतही टिकली. पश्चिम युरोपांत जहागिरीपद्धतीचा विशेष फैलाव झाला व त्यामुळें तेथें दासकल्पकृषीनें फारसें मूळ धरलें नाहीं. तेव्हां आतां प्रथमतः दासकल्पकृषीचा विचार करूं.

या पद्धतींतील जमीन कसणारे दासकल्प असत. ते मालकाचे गुलाम नसले तरी मालकाच्या शेतींचे गुलाम असत; म्हणजे त्यांना मालकाचें शेत सोडून जातां येत नसे. ज्या शेताचे ते शेती समजले जात असत, त्यावर त्यांनीं काम केलेंच पाहिजे असा निर्बंध असे. तसेंच जरी त्यांना खासगी मिळकतीचा अधिकार असे तरी ते पुष्कळ बाबतींत आपल्या मालकाचे ताबेदार असत. आपले तंटेबखेडे मालकाकडूनच त्यांना तोडवून घ्यावे लागत; तसेंच मुलांमुलींचीं लग्नें करणें याला मालकाची परवानगी लागे व त्या प्रसंगीं मालकाला कांहीं नजराणा द्यावा लागे. या पद्धतीचा विशेष म्हणजे हा कीं, मालकाची जमीन हे दासकल्प शेतकरी स्वतःच्या मेहनतीनें कशीत व आपल्या मजुरीबद्दल त्यांना जो जमिनीचा तुकडा दिलेला असे, त्याची लागवड करून ते आपलें पोट भरीत. आठवड्यांतून तीन दिवस धन्याच्या शेतावर काम करावयाचें व बाकीचे दिवस आपल्या शेतावर काम करावयाचें असा सामान्य नियम असे. परंतु या नियमांत केव्हां केव्हां फेरबदल होत असे. तसेंच कांहीं विशेष प्रसंगीं मालक बोलावील त्या वेळीं त्यांना मालकाच्या कामाकरितां जावें लागे. आणखीही किरकोळ पुष्कळ हक्क मालकाला असत.

याही कृषिपद्धतीचा मुख्य दोष म्हणजे शेतीच्या लागवडीची हयगय होय. दासकल्प शेतकऱ्यांना मालकाच्या शेतावर अंग मोडून मोठ्या कळकळीनें किंवा मोठ्या हुरूपानें काम करण्याची बुद्धि होणें मानवी स्वभावाप्रमाणें अशक्यच होतें. कारण अधिक काळजीनें काम केल्यास किंवा कमी काळजीनें काम केल्यास त्यांना सारखेंच होतें. अगदीं गुलामाप्रमाणें यांची स्थिति नव्हती हें खरें आहे. आपल्या जमिनीच्या तुकड्याची चांगली मशागत केल्यास त्यांचें त्यांत कल्याण होण्यासारखें होतें. परंतु ऐनकामाच्या वेळीं धन्याच्या शेतावर कामावर जावें लागल्यामुळें आपल्या शेताकडे विशेष लक्ष देण्यास त्यांना सवड सांपडत नसे. यामुळें दासकल्प शेतकऱ्यांकडून दोन्ही शेतांची हयगय होई. एक दुसऱ्याचें शेत म्हणून, व आपल्या शेतावर काम करण्यास पुरेसा वेळ नाहीं

म्हणून; शिवाय या पद्धतीत धन्याकडूनही देखरेख चांगली होण्याची आशा नसते. कारण त्यांना शेती करणें हें कमीपणाचें वाटत असे. यामुळें बहुतेक दासकृषीप्रमाणेंच या पद्धतीचे दोष असत; मात्र दगडापेक्षां वीट मऊ, एवढाच काय तो फरक.

परंतु दासकल्पकृषीचा देशांतील एकंदर मजूरवर्गावर फारच अनिष्ट परिणाम होतो. दासकल्प शेतकरी हे धन्याच्या शेतावर रडतराऊप्रमाणें कामाला आल्यामुळें तें काम ते रेंगाळत, थबकत व अत्यंत हलगर्जीपणानें करीत. व यांच्या उदाहरणानें दुसरे मजूर यांनाही तीच संवय लागे. म्हणून जेथें जेथें दासकल्पकृषि प्रचलित आहे तेथें तेथें एकंदर मजुरांची कर्तबगारी व कार्यक्षमता फारच कमी असते असा अनुभव आहे. कारण अशा ठिकाणच्या मजुरांमध्यें कर्तव्यदक्षता, चलाखी, हुरूप वगैरे गुणांचा अभाव दिसून येतो. अर्थात् याचा उद्योगधंद्यावर अनिष्ट परिणाम होतो; कारण अशा मजुरांनीं केलेलें काम वाईट होतें, इतकेंच नाहीं, तर त्यावर खर्चही अनिवार होतो. दासकल्पकृषीमध्यें शेताचें उत्पन्न फार कमी होतें व या पद्धतीत शेतकीची सुधारणा होण्याचा संभव फारच कमी असतो. दासकल्प शेतकऱ्यांना मालकाच्या शेतावर ऐनवेळीं कामास जाणें मोठ्या जिवावर येतें व या जाचांतून आपण सुटूं तर बरें असें त्यांस होतें. कारण मग त्यांना आपल्या शेताकडे लक्ष देण्यास सांपडतें.

धन्याच्या कामावर दासकल्प शेतकऱ्यांना बोलाविण्याच्या युरोपांतील पद्धतीचें व आमच्या हिंदुस्थानामधील वेठीच्या पद्धतीचें बरेंच साम्य आहे. खोतांना किंवा इनामदारांना आपल्या गांवांतून कुळांना वेठीनें आपल्या कामास घेण्याचा हक्क असे व अझून कोठें कोठें तो चालू आहे. उदाहरणार्थ, अजूनही कोंकणांत ही वेठीची पद्धत थोडीबहुत चालू आहे; परंतु वेठीचें काम म्हणजे अगदीं टाकाऊ असा तेथेंही अनुभव आहे. व वेठीची जेथें पद्धत असेल तेथें इतर दिसमजुरीचे गडीही तसेच कामचुकार असतात, असा आपल्या इकडेही अनुभव आहे.

रोमन पादशाही ज्या उत्तरेकडील जर्मन लोकांनीं पादाक्रांत केली त्यांनीं जमिनीच्या बाबतींत एक अगदीं नवी पद्धति युरोपांत सुरू केली; तिला जहागिरीपद्धति म्हणतात. जरी ही पद्धति राजकीय व लष्करी होती, तरी या पद्धतीचे

जमीनधाऱ्याच्या पद्धतीवरही पुष्कळ परिणाम झालेले आहेत. म्हणून त्याचा थोडासा इतिहास येथें देणें अप्रासंगिक होणार नाहीं. असें केल्यानें युरोपांत हल्लीं प्रचारांत असलेल्या जमीनधाऱ्याच्या पद्धतीचें स्पष्टीकरण लवकर होईल. कारण या सर्व पद्धति या जहागिरीपद्धतीपासूनच पर्यायानें निष्पन्न झालेल्या आहेत.

ग्रीक किंवा रोमन लोकांमध्यें प्रजासत्ताक राज्यपद्धति विशेष प्रचलित होती व पुढें रोमन पादशाही झाली तरी देशांतील जमीन राजाची ही कल्पना त्या काळीं नव्हती. देशांतील सर्व जमिनी खाजगी लोकांच्या मालकीच्या असत. सरकारच्या कांहीं जमिनी असल्या तरी सर्व जमिनींची मालकी सरकारची ही कल्पना नव्हती. परंतु जर्मन लोकांमध्यें एकसत्तात्मक राज्यपद्धति विशेष प्रचलित असे. प्रत्येक टोळीचा एक नायक असे व तोच राजा समजला जात असे. तो टोळींतील पोक्त लोकांच्या सभेच्या सल्लामसलतीनें राज्यकारभार करीत असे, तरी पण मुख्य सत्ता त्याच्या हातीं असे. जेव्हां सर्व रोमन पादशाही या लोकांनीं पादाक्रांत केली तेव्हां सर्व प्रांतांवर अशी एकसत्तात्मक राज्यपद्धति सुरू झाली व काबीज केलेला प्रांत सर्व राजाच्या मालकीचा ही कल्पना या जर्मन लोकांमध्यें प्रचलित झाली. काबीज केलेली ही सर्व जमीन राजा आपल्या लष्करी अनुयायांना अगर सरदारांना वांटून देई व कांहीं भाग आपल्या स्वतःकरितां राखून ठेवी. ही जी जमीन सरदारांना मिळे, तीबद्दल त्या सरदारानें राजा हुकूम फरमावील तेव्हां ठरलेल्या शिपायांसकट राजाला मदत करण्यास आलें पाहिजे असा करार असे. तसेंच प्रत्येक सरदारास, राजनिष्ठ राहीन अशाबद्दल शपथ घ्यावी लागे. राजानें सरदारांना दिलेल्या जमिनींबद्दल राजास लष्करी मदत करणें हा मोबदला समजला जात असे. हे सरदार आपल्या जमिनी विभागून त्या आपल्या मानकऱ्यांना याच लष्करी मदतीच्या अटीवर देत असत व या मानकऱ्यांकडून स्वामिभक्तीची शपथ घेववीत. हे मानकरी आपल्या वांट्याच्या जमिनी कुळांना देत. जहागिरीपद्धतीचें सामान्यतः अशा प्रकारचें स्वरूप होतें. अर्थात् या पद्धतीचा विशेष हा कीं, देशांतील सर्व जमिनींचा मालक म्हणजे फक्त देशाचा राजा, देशांतील जमीन धारण करणारे हे सर्व त्याचीं कुळें व राजाच्या स्वामित्वाबद्दल त्याला लष्करी पेशाची मदत करणें हा जमिनीबद्दलचा खंड अशी समजूत असे. या कल्पनेमुळें राजापासून

त्या थेट शेत कसणाऱ्या गरीब शेतकऱ्यापर्यंत समाजांतील वर्गांची एकाखालीं एक अशी मालिका बने. प्रत्येक खालच्या वर्गाच्या माणसानें प्रत्येक वरच्या वर्गाच्या माणसाच्या आज्ञेंत राहिलें पाहिजे; व युद्धकाळीं त्याला जातीनें मदत केली पाहिजे असा निर्बंध असे. या पद्धतींत राजकीयदृष्ट्या सरदारांच्या हातांत राजापेक्षांही जास्त सत्ता असे. कारण राजाचें सैन्य म्हणजे सरदारांचें सैन्य होय. यामुळें राजा हा नेहमीं सरदारांवर अवलंबून राही. सरदार जर राजाच्या विरुद्ध उठले तर राजाला त्यांचे विरुद्ध जाण्यास शक्ति नसे. ही पद्धति देशांमध्यें दंगेधोपे होत अशा काळीं चांगली होती. परंतु जातीनें हजर राहणें हें लोकांना बरेंच संकटाचें वाटूं लागलें आणि औद्योगिक वाढीबरोबर व देशांतील शांततेच्या वाढीबरोबर ही लष्करी मोबदल्याची पद्धत नाहींशी होऊन हळूहळू पैशाच्या खंडाची पद्धत येत चालली. म्हणजे राजाला सरदारांच्याकडून शिपाई मागविण्यापेक्षां जमिनींबद्दल पैशाच्या रूपानें खंड घेऊन त्यांतून पगारी सैन्य ठेवणें हें आपल्या सामर्थ्यास व देशाच्या शांततेस जास्त सोईस्कर वाटूं लागलें. सरदारांनाही जातीनें सैन्यांत जाणें व लोक जमवून सैन्याचें पथक तयार करणें यापेक्षां पैशाच्या रूपानें राजाला खंड देणें जास्त सुखावह वाटूं लागलें. राजाला पैसे देण्याकरितां त्यांनीं आपल्या कुळांकडून जमिनीच्या स्वामित्वाबद्दल पैशाच्या रूपानें खंड घेण्याची सुरुवात केली. प्रत्यक्ष शेत कसणारे लोक आपल्या धन्यास पैशाच्या रूपानें किंवा ऐनजिनसी खंड देऊं लागले. सारांश, या जहागिरीपद्धतींतील लष्करी भाग कालेंकरून नाहींसा होऊन त्याला जमीनदार व कूळ असें औद्योगिक स्वरूप प्राप्त झालें व युरोपांत सध्यां प्रचलित असलेल्या पद्धति या जहागिरीपद्धतीच्या ऱ्हासानंतर त्यांतूनच निष्पन्न झालेल्या आहेत. त्यांचें वर्णन पुढील दोन भागांत करूं.

दासकृषि किंवा दासकल्पकृषीप्रमाणेंच ही जहागिरीपद्धति अर्थशास्त्रदृष्ट्या कमी दर्ज्याचीच आहे. कारण सरदार लोक किंवा त्यांचे हाताखालील मानकरी लोक यांना आपला लष्करी पेशा आहे असें वाटे. यामुळें त्यांना शेताच्या सुधारणेकडे लक्ष घालणें कमीपणाचें वाटे. प्रत्यक्ष शेत कसणाऱ्यांना सरदार व मानकरी हे बोलावतील तेव्हां त्यांच्या चाकरीस जावें लागे. यामुळें त्यांच्याकडूनही शेताची मशागत चांगली होत नसे. परंतु पहिल्या दोन पद्धतींपेक्षां ही पद्धत किंचित्

बरी होती. त्यांतल्या त्यांत जातीनें चाकरी करण्याच्या ऐवजी पैशाच्या रूपानें स्वामित्वाच्या हक्काबद्दल मोबदला देण्याची पद्धति सुरू झाल्यापासून शेत कसणाऱ्या लोकांना शेतकींत सुधारणा करण्यास सवड झाली. विशेषतः उपोद्घातांत सांगितल्याप्रमाणें धर्मयुद्धाच्या निमित्तानें सरदारांच्या जमिनी व्यापाऱ्यांच्या व मध्यम स्थितींतील लोकांच्या हातांत येऊं लागल्यापासून तर शेतीची सुधारणा जास्त जोरानें होऊं लागली.

युरोपांतील निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या परिस्थितींमुळें व निरनिराळ्या कारणांनीं जहागिरी पद्धत कालेंकरून नाहींशी झाली. ती कां व कशी हें येथें सांगण्याची जरूरी नाहीं. परंतु त्या पद्धतीच्या नाशाचे परिणाम काय झाले हें पाहिलें पाहिजे.

प्रथमतः सर्व जमिनीचा मालक राजा ही कल्पना जाऊन जमीनी खासगी व्यक्तीच्या मालकीच्या ही कल्पना फैलावली. राजा पूर्वी जो खंड घेत असे त्याला जमीनसाऱ्याचें स्वरूप येऊन तो कायमचाच ठरून गेला. कांहीं देशांत सरदारांच्या ताब्यांत त्या जमिनी राहिल्या किंवा मोठमोठ्या जमीनदारांच्या ताब्यांत जाऊन जमीनदार व त्यांचेपासून खंडानें शेतें करणारे मोठमोठे शेतकरी असा प्रकार सुरू झाला. यालाच प्रचंड शेतकी म्हणतात. कांहीं देशांत हा सरदारांचा वर्ग नाहींसा झाला व जमिनी कुळांच्या मालकीच्या झाल्या आणि अल्प शेतकीची पद्धत सुरू झाली. कांहीं ठिकाणीं जमीनदार व कुळें असा संबंध राहिला; परंतु कुळें ऐनजिनसी खंड देऊं लागलीं. आतां या निरनिराळ्या पद्धतींचा अर्थशास्त्रदृष्ट्या विचार करावयाचा आहे तो पुढील भागावर टाकणें इष्ट आहे.

---

# भाग आठवा.

## अर्धेलीची कृषिपद्धति.

अर्थशास्त्रांतील बराच वादग्रस्त प्रश्न म्हणजे प्रचंड शेती चांगली किंवा छोटी शेती चांगली, हा होय. परंतु या प्रश्नाच्या आधीं एका लहानशा भागांत

युरोपांतील कांहीं प्रदेशांत प्रचलित असलेल्या दोन पद्धतींचें वर्णन देणें इष्ट होईल. यांतील पहिली पद्धति ह्मणजे अर्धेल-तिर्धेल पद्धति होय.

ही पद्धति इटाली देशांत विशेष प्रचारांत आहे. तसेंच ती फ्रान्स, स्वित्झर्लंडाचा कांहीं भाग, व हॉलंड वगैरे देशांतही ती चालू आहे. प्रवास केलेल्या पुष्कळ लोकांच्या मतानें ही पद्धति पुष्कळच वरच्या दर्जाची आहे यांत शंका नाहीं; व इटालीमध्यें शेतकीची सुधारणा या पद्धतीच्या योगानें झालेली आहे. तसेंच या पद्धतीमध्यें शेतकरीवर्गही चांगला सुखी व संपन्न असा दृष्टोत्पत्तीस येतो. या दृष्टीनें ही पद्धति अर्थशास्त्रदृष्ट्याही प्रशंसनीय आहे हें कबूल केलें पाहिजे.

या पद्धतीचा विशेष हा आहे कीं, यामध्यें जमीनदार व कुळें यांचा निकट संबंध राहून एकमेकांचे हितसंबंध विरोधी नसून परस्परावलंबी असतात. या पद्धतींत जमीनदार हा शेतावरील इमारती व शेतलागवडीस लागणारें भांडवल कुळास आपण पुरवितो व कुळ आपले श्रम देतो. शेतांत जें उत्पन्न होईल त्याची वांटणी रूढीनें ठरलेल्या प्रमाणानें होते. कांहीं प्रांतांत व कांहीं भागांत उत्पन्नाचा अर्धा वांटा मालकास जातो व अर्धा कुळास राहतो; कोठें कोठें मालकास तिसरा हिस्सा व कुळास दोन हिस्से जातात. आणखीही निराळ्या प्रमाणानें वांटणी होते. परंतु उत्पन्नाची ही वांटणी चढाओढीनें ठरत नाहीं, तर ती देशाचारानें व रूढीनें ठरलेली असते व ती वारंवार बदलत नाहीं. या पद्धतीमध्यें कुळास शेताची मशागत चांगली करण्यास हुरूप असतो. कारण शेताचें उत्पन्न वाढल्यास त्याचा अर्धा वांटा त्याला मिळावयाचा असतो. परंतु या पद्धतीमध्यें जी शेतीची सुधारणा होते ती अंगमेहनतीनें काय होईल ती होईल. शास्त्रीय ज्ञान व भांडवल यांनीं घडून येणारी सुधारणा या पद्धतींत फारशी शक्य नसते. कारण जमिनीचा मालक शेतीकडे स्वतः देखरेख करीत नसल्यामुळें जमिनींत जास्त भांडवल घालण्यास कचरतो. शिवाय या पद्धतीमध्यें पुढील भागांत वर्णन करावयाच्या मिराशी पद्धतीइतका आपलेपणा जमिनीबद्दल कुळास वाटत नाहीं हें कबूल केलें पाहिजे व मिरासदार शेतकऱ्याइतकी मेहनत या अर्धेली कुळाकडून होणें शक्य नाहीं हेंही कबूल करणें भाग पडेल.

परंतु ज्या ज्या देशांत ही अर्धेल-तिर्धेल पद्धति सुरू आहे त्या त्या ठिका-

णची शेती चांगल्या स्थितींत आहे, इतकेंच नाहीं तर तेथला शेतकरीवर्गसुद्धां सुखवस्तु आहे. कोणताही प्रवासी इटालीभर फिरला तर त्याला त्या देशांतील व्यवस्थित टापटिपीच्या सुंदर शेतीच्या लागवडीचें कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं. तेथलीं शेतें म्हणजे सतत माळ्याचा डोळा व हात ज्यांवर फिरत आहे. अशा सुंदर बगीच्याप्रमाणें दिसतात असें प्रवासी सांगतात. हा सर्व प्रभाव कुळांना आपल्या जमिनीबद्दल स्थाईकपणा वाटतो यांचा होय. हीं अर्धेली कुळें उपरी कुळें नसतात. शिवाय खंड हा रूढीनें ठरल्यामुळें चढाओढीनें वारंवार बदलण्याचा संभव नसतो. यामुळें शेतकऱ्यास आपल्या शेताची मशागत करण्यास हुरूप व हौस असते. याप्रमाणें ही जमीनधाऱ्याची पद्धति एकंदरींत बऱ्याच वरच्या पायरीची आहे यांत शंका नाहीं. मिराशी पद्धति मात्र यापेक्षां ही चांगली इतकेंच; कारण त्या पद्धतींत शेतकरी हा शेताचा सर्वस्वी मालक असल्यामुळें शेताचें सर्वच उत्पन्न त्याला मिळावयाचें असतें. तेथें उत्पन्नाचे हिस्से पडावयाचे नसतात. यामुळें शेतकऱ्यास आपल्या शेताच्या मशागतींत व सुधारणेंत आपलें श्रमसर्वस्व घालण्यास बुद्धि होते.

दुसरी पद्धति आयर्लंडांतील आहे. तिला उपरी कुळाची पद्धति म्हणतां येईल. गेल्या कांहीं वर्षांपासून इंग्रज सरकारनें या पद्धतीचे वाईट परिणाम पाहून ही पद्धति नाहींशी करण्याचे प्रयत्न चालविले आहेत व १९०३ सालीं जो कायदा झाला त्यानें तर कालेंकरून ही पद्धति जाऊन मिराशी पद्धति सर्व आयर्लंडभर पसरेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. या पद्धतीचा विशेष असा आहे कीं, हीमध्यें जमीनदार आपल्या जमिनी अत्यंत दरिद्री व उपजीविकेचें दुसरें साधन नसलेल्या आणि जवळ भांडवल नसलेल्या अशा कुळांना चढाओढीच्या तत्त्वावर खंडानें देतात. जमिनी थोड्या लोकांच्या मालकीच्या व चढाओढ करणारीं कुळें अनन्यगतिक व असंख्य, या स्थितीमुळें या पद्धतींत जमिनीचा खंड जबर असतो. केव्हां केव्हां जमिनींमध्यें प्रत्यक्ष पैदास होणाऱ्या उत्पन्नापेक्षां ठरलेला खंड जास्त असतो अशींही उदाहरणें दिसून येतात. कारण कांहीं तरी शेताचा तुकडा लागवडीस मिळण्याच्या आशेनें पाहिजे तो जबर खंड कबूल करून कुळांना जमिनी खंडानें घ्याव्या लागतात. परंतु इतका खंड देणें त्यांना अर्थातच अशक्य असतें. यामुळें या पद्धतींत शेतकरी किंवा कुळें हीं जमीनदारांचीं नेहमीं ऋणी

असतात. कारण खंडाची बाकी फिटण्याची कधींच आशा नसते. यामुळें आयरिश शेतकरी अत्यंत हलगर्जी व बेपर्वा झाले आहेत. शेतांत जास्त पिकलें काय किंवा कमी पिकलें काय त्यांना सारखेंच. कारण आयुष्याला अत्यंत जरूर इतक्या उत्पन्नापलीकडे त्यांना शेतांतून मिळणें शक्यच नसतें. कारण त्यावरचें सर्व उत्पन्न जमीनदार अगर त्याचा गुमास्ता घेऊन जातो. यामुळें आयर्लंडांतील शेतकऱ्यांची अत्यंत दैन्यावस्था असते. कारण या कृषिपद्धतीनें त्यांची स्थिति सुधारणेंच अशक्य होतें व ज्या लोकांना 'चांगल्या राहणीची कल्पना नसते, त्यांचेमध्यें लग्नासंबंधीं दूरदर्शीपणा असत नाहीं. यामुळें त्यांची स्थिति नेहमीं अत्यंत हीनदीन अशी राहते. तेव्हां ही उपरी कुळाची पद्धति बहुतेक दासकृषि व दासकल्पकृषीइतकीच वाईट आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण कर्जबाजारी कुळें जमीनदाराचीं बहुतेक गुलामच बनतात. त्यांना शेतींत सुधारणा करण्याची इच्छा होत नाहीं. ते स्वतः अगदीं कंगाल राहतात व आपली स्थिति सुधारण्याची आशा नसल्यामुळें पिढ्यानुपिढ्या अशी कंगाल प्रजा निर्माण होतें रहाते. या पद्धतीचे दोष काढून टाकणें म्हणजे शेतकऱ्यांचें जमीनदारांवरील परावलंबन नाहींसें करून त्यांना स्वतःच्या मालकीच्या जमिनी करून देणें होय. हाच उपाय सध्यां इंग्रज सरकार योजीत आहे व जमीनदारांकडून सरकारी पैशानें जमिनी विकत घेऊन त्या कुळाला मिरासदार म्हणून देत आहे व या कुळांकडून ४०-५० वर्षांच्या अवकाशांत शेताची किंमत हप्त्याहप्त्यानें वसूल करून घेणार आहे. ही नवी पद्धति सर्वत्र सुरू झाली म्हणजे आयरिश शेतकऱ्यांची दैन्यावस्था नाहींशी होईल यांत शंका नाहीं.

# भाग नववा.

## प्रचंड शेती आणि छोटी शेती.

प्रचंड शेतीची पद्धति चांगली कीं छोट्या शेतीची पद्धति चांगली, हा एक अर्थशास्त्रांतील मोठा वादग्रस्त प्रश्न आहे. प्रचंड शेतींत १००।२००।४००।५००

अशा एकरांचें एकएक शेत असून तें जमीनदारापासून करारानें घेऊन त्याची लागवड मजुरांच्या श्रमानें शेतकरी करितात. ही पद्धत इंग्लंडांत प्रचलित आहे. छोट्या शेतीची पद्धत युरोपांतील इतर देशांत फार प्रचलित आहे. यामध्यें शेताचा मालक व शेत कसणारा हे एकच असतात व शेतेंही फार लहान ह्मणजे दोन चार एकरांपासून फार झालें तर ५० एकरपर्यंत असतात. यामध्यें शेतकरी आपल्या कुटुंबांतील माणसांच्या व आपल्या स्वतःच्या श्रमानें व आपल्या स्वतःच्या भांडवलानें शेताची लागवड करतो. याला कोणाला खंड द्यावा लागत नाही. कारण तो शेताचा मालक असतो. यालाच हिंदुस्थानांत मिरासदार ह्मणतात.

प्रचंड शेतीचे फायदे ह्मणजे मोठ्या प्रमाणावर काढलेल्या कारखान्याचे फायदे होत हें नव्यानें सांगण्याचें कारण नाहीं. लहान प्रमाणावरील कारखान्यापेक्षां मोठ्या प्रमाणावरील कारखान्यांत जीं फायद्याचीं कलमें असतात, तीं प्रचंड शेतीमध्येंही असतात. प्रथमतः प्रचंड शेतींत यंत्राचें साहाय्य घेण्यास सांपडतें. लहानशा शेताला वाफेचा नांगर किंवा धान्य कापण्याचें यंत्र किंवा खुरपण्याचें यंत्र यांचा उपयोग होत नाहीं. परंतु मोठ्या शेतींत या गोष्टी फायदेशीर होतात. तसेंच यंत्रानें चालणारे पाणी काढण्याचे पंप वगैरेसारख्या सोयी प्रचंड शेतीलाच फक्त शक्य असतात. शिवाय प्रचंड शेतीमध्यें देखरेखीचा खर्च उत्पन्नाच्या मानानें अर्थात् कमी बसतो. १०० एकरांचे शेताला जितका देखरेखीचा खर्च येतो तितकाच बहुतेक २०० एकरांच्या शेताला खर्च येतो. मेंढ्यांचा कळप १०० चा असला काय किंवा २०० चा असला काय, मेंढपाळ एकटाच पुरतो. शिवाय प्रचंड शेतीमध्यें कुंपणें, रस्ते वगैरेंमध्यें जमीन कमी जाते व यायोगानेंही शेताचें उत्पन्न वाढतें. शेवटीं प्रचंड शेतींत शास्त्रीय व खर्चाचीं खतें यांचा उपयोग करण्यास सांपडतो. छोट्या शेतीमध्यें यांपैकीं एकाही गोष्टीचा फायदा घेतां येत नाहीं. यामुळें अर्थशास्त्रदृष्ट्या प्रचंड शेती ही छोट्या शेतीपेक्षां जास्त फायद्याची आहे, अशा तऱ्हेचें मत पुष्कळ अर्थशास्त्रकारांनीं दिलेलें आहे. वरील कारणें सयुक्तिक असल्यामुळें हें मत खरें आहे असें वाटतें. परंतु कांहीं अर्थशास्त्रकार व विशेषतः मिल्ल हे या मताच्या विरुद्ध आहेत. त्यांचे मतें छोटी शेती हीच प्रचंड शेतीपेक्षां सर्व दृष्टींनीं जास्त श्रेयस्कर आहे.

कारण जरी प्रचंड शेतीमध्यें वर नमूद केलेले फायदे असतात तरी त्यांमधला

एक दोष फार मोठा आहे. प्रथमतः या पद्धतींत शेताचा मालक, शेतीच्या लागवडीची जबाबदारी घेणारा शेतकरी व शेत कसणारे प्रत्यक्ष मजूर हे तिन्ही वर्ग निराळे असतात. यापासून बरेच अनिष्ट परिणाम शेतीवर घडतात. शेताचा मालक कांहीं वर्षांच्या करारानें व ठरलेल्या खंडानें आपली जमीन शेतकरी–कारखानदारास देतो. या शेतकऱ्याचा हेतु आपल्या कराराच्या मुदतींत आपला जितका फायदा करून घेतां येईल तितका करून घेण्याचा असतो. यामुळें त्याचें जमिनीच्या भावी स्थितीकडे लक्ष नसतें. जमीन आपल्या उपयोगानंतर बिनकस होवो किंवा बिघडो त्याला त्याची पर्वा नसते. आपण आणलेल्या भांडवलावर आपल्याला चांगलें व्याज मिळून ठरलेल्या मुदतींत आपलें भांडवलही परत मिळावें एवढाच त्याचा मतलब असतो. शिवाय हा शेतकरी स्वतः शेत कसणारा नसतो. तर तो शेताची लागवड मजुरांकडून करून घेतो. हे मजूर तर बोलून चालून भाडोत्री आणलेले. त्यांना जमिनीची काळजी असणें शक्यच नाहीं. त्यांचें पाहणें इतकेंच कीं, साधारण मजूर काम करतात तितकें काम करून आपली मजुरी मिळवावयाची. ही मजुरी मिळाली कीं त्यांचें काम संपलें. मग त्या शेताचें किंवा पिकाचें कांहीं का होईना; त्याबद्दल त्यांना मुळींच फिकीर नसते. शिवाय हे भाडोत्री मजूर आज या शेतावर काम करणार, तर उद्यां त्या शेतावर काम करणार; तेव्हां शेताबद्दल त्यांना कांहीं आपलेपणा वाटण्याचें कारण नसतें. शेताशीं संबंध असलेल्या या तीन वर्गांचा अशा प्रकारचा भाव असल्यामुळें शेतीचें काम जितक्या काळजीनें, जितक्या मेहनतीनें व जितक्या कळकळीनें व्हावयाला पाहिजे तितक्या काळजीनें, तितक्या मेहनतीनें व तितक्या कळकळीनें तें होत नाहीं. यामुळें शेतीमध्यें जरी यंत्रादि सामग्रीपासून व वर निर्दिष्ट केलेल्या दुसऱ्या गोष्टींपासून यांचा फायदा होतो तरी या जिव्हाळ्याच्या अभावापासून बरेंच नुकसान होतें व म्हणूनच शेवटीं छोट्या शेतीपेक्षां त्यांचें उत्पन्न सरासरीनें कमीच पडतें.

परंतु छोट्या शेतींत मालक, शेतकरी व कसणारा या सर्व व्यक्ति एकवटलेल्या असतात; व जमीन आपली आहे, तिची सुधारणा केल्यास, तिची मशागत केल्यास, त्याचा फायदा आपल्यास मिळावयाचा आहे, इतकेंच नव्हे तर ही जमीन आपल्या मुलाबाळांना पुढें जावयाची आहे अशी जाणीव छोट्या शेतींत

शेतकऱ्यांच्या मनांत नित्य वागत असते. आतां अशी मालकीची कल्पना ही एक अजब चीज आहे. आर्थर यंग ह्मणून एक प्रवासी शेतकरी होऊन गेला. त्यानें असें ह्मटलें आहे कीं, " Magic of property will turn sand into gold " "-मालकीची भावना ही एक जादुगाराची कांडी आहे. कारण त्या कांडीनें रेतीचें सोनें होतें." ह्मणजे आपण श्रम केले तर त्या श्रमाचें फळ आपल्याला व आपल्या मुलाबाळांना मिळेल अशी खात्री असली ह्मणजे मनुष्य फार काळजीनें व फार कळकळीनें जीवापाड श्रम करतो. अशा मिरासदार शेतकऱ्यांच्या श्रमांत व भाडोत्री मजुरांच्या श्रमांत जमीनअस्मानांचें अंतर पडतें. म्हणूनच यंत्रादि सामग्रीचा जरी या शेतकऱ्यांना फायदा घेतां येत नाहीं, तरीसुद्धां त्यांच्या जिवापाड मेहनतीनें त्यांचा सर्व वचपा निघून येतो व हे मिरासदार शेतकरी आपल्या शेतांतून आपल्याला जास्त उत्पन्न काढतात; इतकेंच नाहीं तर जमिनीची कायमची सुपीकता वाढवितात. हे या मिरासी पद्धतीचे सुपरिणाम फ्रान्स, इटाली वगैरे देशांत दिसून येतात. तेथील शेतांची उत्तम मशागत केलेली आहे असें त्या प्रांतीं जाणाराच्या तेव्हांच ध्यानांत येतें. प्रेमानें वाढविलेल्या सुंदर बागेप्रमाणें तेथील सर्व शेतें दिसतात. जी जमीन अगदीं ओसाड, रेताड व कुचकामाची आहे असें वाटतें, अशी जमीनसुद्धां मिराशी शेतकरी दहावीस वर्षांत उत्तम दशेप्रत आणतात. ज्या देशांत ही मिराशी पद्धति चालू आहे तेथें खालीलसारखीं उदाहरणें पुष्कळ वेळां दृष्टीस पडतात. एक अगदीं ओसाड-रेताड जागा किती दिवस तरी पडलेली असावी. पुढें तेथें एक लहानशी झोंपडी होऊन एक दोन गुरें घेऊन एक शेतकरी राहूं लागतो. पहिल्या प्रथम तो या जमिनींत होणारे क्लव्हर नांवाचें गवत त्या ठिकाणीं लावतो. त्यानें गुरांस चारा होऊन या गवताच्या मुळांनीं रेताड जमिनीला थोडासा घट्टपणा येतो. गुरांचें शेणमूत यांचें खत करून तो त्या जमिनींत घालीत राहतो. चांगली माती पाटीपाटीनें आणून तो जमिनींत मिसळतो. याप्रमाणें थोडीशी जमीन सुधारली ह्मणजे धान्याचें एखादें हलकें पीक करतो. जमीन आणखी सुधारत चालली म्हणजे थोडींशीं फळझाडें लावूं लागतो. त्याचीं गुरेंही वाढत जातात. यामुळें जमिनींत खत जास्त जास्त पडत जातें व जमीन जास्त जास्त सकस बनत जाते. मग तो गहूं पेरूं लागतो व

द्राक्षांचें पीक करूं लागतो. सारांश, सुमारें दहा वर्षांनीं, जर ती जागा पाहिली तर त्यांतील महदंतर पाहून मनुष्य थक्क होऊन जाईल. ज्या ठिकाणीं रेती व खडक यांखेरीज कांहीं एक नव्हतें, जेथें स्वाभाविक रीतीनें गवतसुद्धां उगवत नव्हतें, अशा ठिकाणीं एका दहाबारा वर्षांच्या अवधींत सुंदर बाग व मळा झालेला दृष्टीस पडतो. परंतु हा सर्व प्रभाव मिरासदारीचा होय. आपण मेहनत केली तर आपल्यालाच त्याचा सर्वस्वी फायदा मिळेल ही खात्री खासगी मालमत्तेच्या भावनेनें उत्पन्न होते. यामुळें असा शेतकरी मनापासून व जिवापाड मेहनत करितो व त्याचें फळ त्याला मिळतें. अशा मिराशी शेतकऱ्याची सांपत्तिक स्थिति पुष्कळच चांगली असते. कांहीं अर्थशास्त्रकार प्रचंड शेतीची तरफदारी करतांना इंग्लंडांतील शेतकरी व फ्रान्समधील शेतकरी ( मिराशी ) यांची तुलना करतात; परंतु ही तुलना बरोबर नाहीं. इंग्लंडांतील शेतकरी हे भांडवलवाले मोठे शेतीचे कारखानदारच होत. हे लोक पुष्कळच श्रीमंत असतात. त्यांच्या तोडीचे फ्रान्समधले मिराशी शेतकरी नसतात हें उघड आहे. परंतु वास्तविक तुलना हे मिराशी शेतकरी व इंग्लंडमधील शेतीकडले भाडोत्री मजूर यांच्यामध्यें केली पाहिजे. कारण या दोन वर्गांचें काम व सामाजिक दर्जा एकच असतो व अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे फ्रान्समधले मिराशी शेतकरी इंग्लंडांतील शेतकरी मजुरांपेक्षां जास्त सुखी व संपन्न असतात, यांत काडीभरसुद्धां शंका नाहीं.

ही छोटी मिराशी शेतकीपद्धति प्रचंड शेतीपेक्षां जास्त किफाईतशीर नाहीं, हें दाखविण्याकरितां एक प्रमाण कांहीं अर्थशास्त्रकार पुढें करीत असतात. तें हें कीं, मिराशी शेतकरी दर एकरीं जितकें भांडवल व विशेषतः जितके श्रम यांचा खर्च करतात तितकें भांडवल व तितके श्रम दर एकरीं प्रचंड शेतींत खर्ची पडत नाहींत व ते जर तितके खर्ची पडतील तर छोट्या शेतीपेक्षां प्रचंड शेतीपासूनच उत्पन्न जास्त होईल. तेव्हां अर्थशास्त्रदृष्ट्या छोटी शेती प्रचंड शेतीपेक्षां जास्त किफायतशीर नाहीं. परंतु या कोटिक्रमांत एक चूक अशी आहे कीं, प्रचंड शेतामध्यें इतके श्रम खर्ची पडणें अशक्य असतें. कारण त्या शेतींत कोणाचाच निकट संबंध नसल्यामुळें असे जिवापाड श्रम व भांडवलाची योग्य योजना होऊं शकत नाहीं. श्रम व भांडवल यांची ही योजना मिराशी पद्धतीनें जणूं

कांहीं उत्पन्न केलीं जाते, व म्हणून जास्त झालेलें उत्पन्न या पद्धतीचें फळ होय, असें मानण्यास हरकत नाहीं. ही पद्धत नसती तर जें शेतीचें उत्पन्न अस्तित्वांत येऊं शकलें नसतें तें उत्पन्न या पद्धतीचाच परिणाम होय यांत शंका नाहीं.

शेवटीं या पद्धतीचा जो एक सामाजिक परिणाम आहे, तो लक्षांत घेतला असतां ही पद्धतीच एकंदरींत श्रेयस्कर आहे असें ह्मणणें भाग आहे.

प्रचंड शेतीमध्यें देशामधला बराच मोठा वर्ग भाडोत्री शेती-मजुरांचा असतो. हा वर्ग कारखानदार-शेतकऱ्यांवर सर्वस्वी अवलंबून असतो. या वर्गाला स्वतःच्या जबाबदारीवर काम करण्याची संवय नसते. हा वर्ग निव्वळ भाडोत्री व सांगकाम्या बनतो. यामुळें या वर्गाच्या दानतीवर परावलंबनाचा छाप बसतो; व स्वाभाविकच यांचा सामाजिक दर्जा कमी होतो. परंतु छोट्या शेतीमध्यें प्रत्येक मिराशी शेती हा स्वतःचा मालक असतो. तो कोणाचा ताबेदार नसतो. त्याला सर्व व्यवहार आपल्या जबाबदारीवर करावे लागतात. यामुळें त्याच्यामध्यें कित्येक नैतिक गुण उत्पन्न होतात; हिंमत, स्वावलंबन, जबाबदारीची भावना वगैरे गुण फार हितावह आहेत व या पद्धतींत हे गुण उद्भवण्यास व त्यांची वाढ होण्यास फार वाव असतो. यामुळेंच मिराशी शेतकऱ्याचा सामाजिक दर्जा भाडोत्री सांगकाम्या मजुराच्या वरचा होतो. अशा मिराशी शेतकऱ्यांमध्यें देश आपला अशी भावना दृढतर होते व देशाचा कारभार उत्तम तऱ्हेनें चालला पाहिजे, तरच त्यांत आपलें कल्याण आहे, असा हितकर समज उत्पन्न होतो.

वरील कारणांकरितां मिराशी छोट्या शेतीची पद्धति ही एकंदर देशांतील लोकांना जास्त हितकर आहे असें ह्मणणें प्राप्त आहे. इंग्लंडमध्यें प्रचंड शेतीची पद्धत चालू असल्यामुळें बहुतेक अर्थशास्त्रकारांचा कल त्या पद्धतीकडे झुकता आहे.

परंतु प्रथमतः युरोपांतील मिराशी पद्धतीची चांगली माहिती मिळवून ती पद्धति प्रचंड शेतीपेक्षां कशी जास्त श्रेयस्कर आहे, हें मिलनें आपल्या प्रसिद्ध ग्रंथांत दाखविलें. तेव्हांपासून पुष्कळ लोकांचें व लेखकांचें लक्ष या पद्धतीच्या चांगुलपणाकडे वेधलें. इंग्लंडमध्यें ही पद्धति सुरू करणें इष्ट आहे अशी चळवळ सुरू झाली. परंतु इंग्लंडांतील जमिनीचे कायदे व देवघेवीचे कायदे शेताचे लहान लहान तुकडे पाडण्याला मोठ्या अडथळ्याप्रमाणें असल्यामुळें ह्मणण्या-

सारखा या पद्धतीचा प्रसार होऊं शकला नाहीं. १८९० सालीं छोट्या शेतीचा प्रसार करण्यास कोठें कोठें सवड आहे वगैरे प्रश्नांचा विचार करण्याकरितां एक कमिशन नेमलें गेलें व त्या कमिशनच्या शिफारशीप्रमाणें १८९३ मध्यें कौंटि-कौन्सिलला मोठीं शेतें विकत घेऊन त्यांचे लहान लहान शेताचे तुकडे करून ते लोकांना देण्याचा अधिकार दिला. परंतु सक्तीच्या कायद्यानें शेतें संपादन करण्याचा अधिकार या कौन्सिलास न दिल्यामुळें व कौन्सिलांतील सभासद या पद्धतीला फारसे अनुकूल नसल्यामुळें हा १८९२ चा कायदा निबळ दसरीं पडल्यापैकींच झाला. या काळांत छोट्या पद्धतीचा जो थोडाबहुत फैलाव इंग्लंडमध्यें झालेला आहे, तो खाजगी प्रयत्नांचा परिणाम होय. परोपकारी लोकांनीं खाजगी संस्था स्थापन करून त्यांचेमार्फत मोठमोठीं शेतें खरेदी करून तीं शेतें गरीब शेतकऱ्यांमध्यें वांटून देण्याचें काम केलें व अशा प्रयत्नांचा कांहीं कांहीं परगण्यांत फार चांगला परिणाम दिसून येऊं लागला आहे. या पद्धतीनें मोठमोठ्या जमीनदारांचा खंड वाढून शिवाय शेतकरी–मजुरांची स्थितीही पुष्कळ सुधारलेली आहे असें दिसून येतें. या छोट्या शेतीपासून शेतकरी–मजुरांना किती फायदा होऊं लागला आहे हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

यावरून इंग्लंडमध्येंही ही पद्धति फायदेशीर आहे यांत शंका नाहीं, व सरकारनें जर हीं सुधारणा घडवून आणण्याचें मनावर घेतलें तर त्यांत यश येण्याचा जास्त संभव आहे असा पुष्कळांचा समज आहे.

परंतु छोट्या शेतीपासून असा फायदा होण्याची मुख्य अट अशी आहे कीं, शेतकऱ्यास स्वामित्वाची व मालकीची जाणीव पाहिजे. म्हणजे तो शेतकरी शेताचा मिराशी असून जमिनीवरील कर किंवा सारा हा कायमच्या स्वरूपाचा पाहिजे. तर त्याला आपल्या जमिनीची इतक्या काळजीनें मशागत करण्याची बुद्धि होईल. आपण केलेल्या जमिनीच्या सुधारणेवर दुसऱ्याचा हक्क उत्पन्न होणार अशी धास्ती शेतकऱ्यास असली म्हणजे त्याच्याकडून शेताची मशागत होणें शक्य नाहीं; व कायमचा सारा नसला म्हणजे अशी धास्ती शेतकऱ्याच्या मनांत राहणारच. मग असा शेतकरी उपरी कुळासारखाच होतो व त्याला जमिनीबद्दल आपलेपणा वाटत नाहींसा होतो.

चार एकरांच्या छोट्या शेतीच्या जमाखर्चाचा खर्डा.

ज्याच्या जमाखर्चाचा खर्डा खालीं दिला आहे तो शेतकरी मजुरी करून संध्याकाळीं, इतर फावल्या वेळीं व सणाचे दिवशीं काम करून या चार एकरी शेताची लागवण करितो व त्याचा त्याला इतका फायदा पडतो.

**उत्पन्नाची जमा.**

| पौं. शि. पे | |
|---|---|
| १५-१८-३ | ६ टन व ७॥ हंड्रडवेट बटाटे ५० शि० दराप्र. |
| १८-०-० | ६ टन बटाटे ६० शि० दरांप्रमाणें. |
| १-४-० | ४ पोतीं घरीं खाल्लेले. दर पोत्यास ६ शि० प्र. |
| ५-०-० | ४ पोतीं बियाण्याकरितां विकले. |
| २-१०-० | ४ पोतीं बियाण्याकरितां ठेविलेले. |
| १-०-० | ४ पोतीं बटाट्याचीं कोंवळीं रोपें डुकरांनीं खाल्लीं तीं. |
| ६-०-० | बार्ली धान्य विकलें. |
| ६-०-० | बार्ली घरखर्चास. |
| १-१०-० | कॅरट भाजी घरखर्चास |
| २-०-० | मॅनगोल्ड भाजी घरख. |
| ५९-२-३ | एकंदर उत्पन्न अगर ८८६ रुपये १३ आणे. |

**खर्च.**

| पौं. शि. पे | |
|---|---|
| ९-०-० | कर पट्टी व भाडें. |
| २-१३-३ | भाड्यानें आणलेल्या घोड्यांचा खर्च. |
| १-३-० | नांगरणावळीकरितां |
| ०-३-९ | पेरणावळीकारितां |
| ०-३-० | कुळवाकारितां. |
| ०-५-० | बटाट्याच्या रांगा करण्याकारितां. |
| ०-१०-० | खताच्या नेआणीकरितां |
| ०-८-६ | बार्ली धान्य नेण्याकरितां. |
| २-१३-३ | |
| २-०-० | कृत्रिम खत. |
| १-१७-६ | बटाट्यांचे बियाण्याक० |
| ०-१२-० | बार्लीच्या बियाण्याक० |
| ०-२-० | कॅरट व मॅनगोल्ड या भाजांच्या बियाण्याकरितां. |
| १६-४-९ | ( रुपयांत २४३-९ ) |

शिल्लक नफा पौंड ४२-१७-६ अगर रु. ६४३—३ आणे.

# भाग दहावा.

## हिंदुस्थानांतील जमीनधाऱ्याच्या पद्धति.

मागील तीन भागांत युरोपमध्यें पूर्वकाळीं आस्तित्वांत असलेल्या व प्रचलित असलेल्या जमीनधाऱ्याच्या पद्धतींचें वर्णन देऊन अर्थशास्त्रदृष्ट्या व सामाजिक दृष्ट्या सर्वांत चांगली जमीनधाऱ्याची पद्धति कोणती या प्रश्नाचा विचार केला. आतां या भागांत हिंदुस्थानामध्यें प्रचलित असलेल्या जमीनधाऱ्याच्या पद्धतींचा विचार करावयाचा आहे. परंतु युरोपांतील व हिंदुस्थानांतील जमीनधाऱ्याच्या पद्धतींमध्यें एक मोठा भेद आहे; तो हा कीं, युरोपमध्यें जमीन ही खासगी व्यक्तीच्या मालकीची समजली जाते, तर हिंदुस्थानांत सर्व जमीन सरकारची आहे असें समजलें जातें. युरोपमध्यें ज्यावेळीं जहागिरीपद्धति सुरू होती, त्यावेळीं राजा किंवा देशांतील सरकार हे जमिनीचे मालक अशी समजूत होती खरी, तरी कालेंकरून जहागिरीपद्धति नष्ट झाली व त्याबरोबरच सरकारच्या जमिनीवरील स्वामित्वाची कल्पना नष्ट झाली व सर्वत्र खासगी व्यक्तीच्या मालकीची कल्पना प्रचलित झाली. अर्वाचीन काळीं सरकार जमिनीवर एक कर घेतें हें खरें आहे. परंतु सर्व ठिकाणीं हा कर कायमच्या स्वरूपाचा आहे व तो जमिनीच्या उत्पन्नाच्या मानानें फारच माफक आहे. जमिनीच्या साऱ्याच्या माफकपणामुळें युरोपमध्यें जमिनधाऱ्याच्या पद्धतींचें वर्गीकरण जमिनीच्या साऱ्याच्या तत्त्वावर मुळींच केलें जात नाहीं, तर तें लागवडीच्या प्रकारावरून केलें जातें, हें मागील विवेचनावरून दिसून आलेंच असेल. सध्यां प्रचलित असलेल्या जमीनधाऱ्याच्या पद्धति म्हणजे प्रचंड शेती व छोटी अगर मिराशी शेती होय. अर्थशास्त्रदृष्ट्या कोणती पद्धति जास्त फायदेशीर हा तिकडील वादग्रस्त प्रश्न आहे व एकंदरींत विचार करितां मिराशी शेतीच जास्त चांगली असें समजण्याकडे अर्थशास्त्रकारांचा जास्त कल आहे असें मागल्या भागांत दाखविलें आहे.

परंतु हिंदुस्थानांत लागवडीच्या प्रकाराच्या तत्त्वावर जमीनधाऱ्याच्या पद्धतींचें वर्गीकरण केलें जात नाहीं. कारण लागवडीच्या पद्धतींत म्हणण्यासारखा

फरक नाहीं. जरी किरकोळ बाबतींत फरक असले तरी सामान्यतः येथें छोट्या शेतीचाच प्रघात सर्वत्र चालू आहे. येथें वर्गीकरणाचें तत्त्व ह्मणजे सरकारी सारा घेण्याच्या तऱ्हा होत. कारण हिंदुस्थानांत सर्व जमीन सरकारच्या मालकीची अशी इंग्रज सरकारनें तरी आपली कल्पना करून घेतली आहे व या कल्पनेवर हिंदुस्थानांतील जमिनीचें धोरण ठरविलेलें आहे. परंतु वास्तविकपणें पाहतां जमीनीवर मालकी कोणाची हा येथें एक मोठा वादग्रस्त प्रश्न आहे व त्याचा विचार या ग्रंथाच्या पांचव्या पुस्तकांत 'हिंदुस्थानचा जमीनसारा हा कर आहे कीं खंड आहे' या प्रश्नाचा विचार करतांना करावयाचा आहे. तेव्हां या ठिकाणीं सरकारची ही मालकीची कल्पना गृहीत धरून चालणें सोईचें आहे. कारण वादग्रस्त प्रश्नाचा तात्विक निकाल कांहींही असला तरी सरकारचें जमिनीबाबतचें धोरण व त्यानें पाडलेला प्रघात सरकारी मालकी हक्काच्या कल्पनेवर बसविलेला असल्यामुळें या भागांतील जमीनधाऱ्याच्या वर्गीकरणाच्या विषयांत या वादाचा किंवा त्याच्या निकालाचा कांहीं एक उपयोग नाहीं. म्हणून वर म्हटल्याप्रमाणें या भागांत सरकारी मालकीची कल्पना गृहीत धरूनच चाललें पाहिजे. १९१९ च्या कायद्यान्वयें केलेल्या नियमाप्रमाणें जमीनीचा सारा खंडाप्रमाणें वाढविण्याचा हक्क अंमलदारांना ठेवला नाहीं; तर सारा कराप्रमाणें वाढविण्यास प्रांतिक कौन्सिलची मंजुरी लागते. पण याचें विवेचन पुढें सविस्तर केलें आहे.

वरील विवेचनावरून हिंदुस्थानांत जमीनधाऱ्याच्या पद्धतीचें वर्गीकरण जमिनीवर घेतल्या जाणाऱ्या साऱ्याच्या स्वरूपावरून करण्याचा कां प्रघात पडला हें ध्यानांत येईल. कारण येथें लागवडीची पद्धत एकच असल्यामुळें तिला महत्त्व नाहीं. परंतु जमीनसाऱ्याची बाब मोठी असल्यामुळें त्याच्या स्वरूपाला व वसूल करण्याच्या पद्धतीला फार महत्त्व आहे.

जमिनीच्या साऱ्याच्या स्वरूपाप्रमाणें जमीनधाऱ्याच्या पद्धतीचे दोन वर्ग होतात. एक कायम धाऱ्याची पद्धति व दुसरी मुदतीच्या धाऱ्याची पद्धति. पहिलीमध्यें सरकारनें जमिनीचा सारा एकदम कायमचाच ठरविलेला असतो. म्हणजे जरी सरकार आपल्याला जमिनीचें मालक समजतें व म्हणून सरकारी अंमलदार जमिनीच्या साऱ्याला कर न म्हणतां खंड म्हणतात, तरी कायम-

धाऱ्याच्या पद्धतींत जमिनीचा सारा सरकारनें एकदम कायमचा ठरवून टाकला आहे; व खंडाप्रमाणें कमीजास्त करण्याचा आपला हक्क सोडला आहे. दुसऱ्या वर्गामध्यें जमिनीचा सारा हा कांहीं मुदतीपर्यंत सरकार ठरवितें, परंतु त्या मुदतीनंतर जमिनीची फेरपहाणी करून सारा वाढविण्याचा हक्क सरकारनें आपल्या ताब्यांत ठेविला आहे. ह्मणजे पहिल्या वर्गास "आम्ही मालकी हक्काची अंमलबजावणी करणार नाहीं," असें सरकारनें लेखी आश्वासन देऊन त्याप्रमाणें आपल्याला कायद्यानें बांधून घेतलें आहे, व दुसऱ्या वर्गास "आम्हीं सध्यां ठरविलेला सारा अमुक मुदतीपर्यंतच ठरविला आहे. पुढें वाटल्यास आम्ही हा सारा वाढवूं." अशी इशारत लोकांना दिलेली आहे, व कायद्यानें अशी सारा वाढविण्याची मुभा आपल्याला ठेविली आहे.

सारा वसूल करण्याच्या तऱ्हांवरून जमीनधाऱ्याच्या पद्धतीचे तीन वर्ग होतात. पहिला जमीनदारी; दुसरा पटेदारी व तिसरा रयतवारी. पहिल्यामध्यें सरकार जमीनदारांपासून जमीनसारा वसूल करतें. हे जमीनदार स्वतः शेत कसणारे शेतकरी नसतात. यांच्या हाताखालीं मोठमोठ्या जमिनी किंवा सबंदच्या सबंद खेडीं असतात. या पद्धतींत सरकारी अंमलदारांचा प्रत्यक्ष शेतकऱ्यांशीं व कुळांशीं मुळींच संबंध येत नाहीं. प्रत्यक्ष शेतकरी किंवा कुळें हीं जमीनदाराचीं अशी कल्पना असते. त्यानें जमिनीचा वसूल हव्या त्या रीतीनें करून घ्यावा. सरकारच्या साऱ्याला फक्त जमीनदार हाच जबाबदार धरला जातो. अर्थात् या पद्धतीमध्यें जमीनदार हे प्रत्यक्ष व्यवहारांत जमिनीचे मालकच धरले जातात असें म्हटलें तरी चालेल. जमीनसारावसुलीचा दुसरा प्रकार ह्मणजे जमीनसारा हा गांवगन्ना ठरविला जातो. या पद्धतीमध्यें गांवांतील गांवकऱ्यांच्या संघावर जमीनधाऱ्याची जबाबदारी असते. येथें एक मोठा जमीनदारही नसतो किंवा सरकार प्रत्येक शेतकऱ्याशीं जमीनसाऱ्याबद्दल करार करीत नाहीं. ह्मणजे ही पद्धति जमीनदारी व रयतवारी यांच्या दरम्यान येते. येथें जमीनसाऱ्याची जबाबदारी एकएका व्यक्तीवर न पडतां ती समाज अगर ग्रामसंस्था या नात्यानें गांवकऱ्यांवर पडते. या पद्धतीप्रमाणें गांवकऱ्यांनीं आपल्या ग्रामसंस्थेच्या अंमलदाराकडून जमीनसारा वसूल करून तो सरकारला द्यावयाचा असा निर्बंध असतो. "तुमच्या गांवावर सरकारनें अमुक सारा आकारला आहे, तो तुम्ही वसूल करून सरकार-

तिजोरींत भरला पाहिजे." असें सरकार गांवकामगारांस सांगतें. या गांवगन्ना ठरलेल्या साऱ्याची वांटणी गांवांतील शेतकऱ्यांवर कसकशी करावयाची हें साधारणतः रूढीनें ठरलेलें असतें किंवा गांवकरी ठरवितात. जमीनदारीप्रमाणेंच या पद्धतींत सरकारी अंमलदारांचा प्रत्यक्ष शेतकऱ्यांशीं संबंध येत नाहीं, व प्रत्येक व्यक्तीशीं सरकार निरनिराळा सारा ठरवीत नाहीं. मात्र जमीनदारींत एका खेड्याच्या साऱ्याबद्दल किंवा पुष्कळ खेड्यांच्या साऱ्याबद्दल एकच व्यक्ति जबाबदार असते व तिला त्या खेड्यावर मालकीवजा हक्क असतो; तर पटेदारी पद्धतींत जमीनसाऱ्याची जबाबदारी एका व्यक्तीवर न पडतां ती व्यक्तिसमूहावर पडते. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत या दोन पद्धतींत फारसा फरक नाहीं. कारण जमीनदारीमध्यें सरकार जमीनदारापासून सारा वसूल करतें तर पटेदारी पद्धतींत गांवपाटलापासून वसूल करतें. म्हणजे सरकार गांवांतील एका व्यक्तीशींच प्रत्यक्ष व्यवहार करतें. परंतु पटेदारी पद्धतींत त्या व्यक्तीला प्रातिनिधिक स्वरूप असतें, व जमीनदारींत त्या व्यक्तीला मालकाचें स्वरूप असतें इतकेंच.

जमीनधाऱ्याच्या पद्धतींचा तिसरा वर्ग रयतवारीचा होय. या पद्धतीमध्यें सरकार निरनिराळ्या व्यक्तींच्या शेतांची पाहणी करून प्रत्येक शेतकऱ्याशीं निरनिराळा करार करून त्याचा शेत-सारा ठरवितें. या पद्धतींत लहान शेतांची लागवड करणारे शेतकरी व सरकारी अंमलदार यांचा प्रत्यक्ष संबंध येतो. जमीनदार किंवा पाटील किंवा पटवारी असा मध्यस्त मनुष्य सरकार व शेत कसणारे यांमध्यें येत नाहीं. या पद्धतीमध्यें ग्रामसंस्था किंवा संघ हें सरकार ओळखीत नाहीं, तर शेत कसणाऱ्या व्यक्ति फक्त सरकार ओळखतें.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, वर्गीकरणाचीं हीं दोन्ही तत्त्वें एकत्र केलीं म्हणजे जमीनधाऱ्याच्या पद्धतीचे एकंदर सहा वर्ग पडतात. ते खालील कोष्टकावरून चटदिशीं ध्यानांत येतील.

जमीनधाऱ्याच्या पद्धति.

- कायम साऱ्याच्या
  - जमीनदारी,
  - पटेदारी,
  - रयतवारी.
- मुदतीच्या साऱ्याच्या
  - जमीनदारी,
  - पटेदारी
  - रयतवारी

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत प्रचलित असलेल्या जमीनधाऱ्याच्या पद्धतींचें शास्त्रीय दृष्टीनें पर्यालोचन करून वरील वर्गीकरणाचें तात्विक कोष्टक बनविलें आहे. परंतु हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांत प्रायः या सर्व पद्धति अस्तित्वांत आहेत असें मात्र नाहीं. एक पद्धति प्रमुखत्वेंकरून एका प्रांतांत प्रचलित आहे, तर दुसरी पद्धति दुसऱ्या एका प्रांतांत प्रमुखत्वेंकरून प्रचलित आहे. शिवाय, या निरनिराळ्या पद्धतींना निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळीं नांवें आहेत. तेव्हां आतां या तात्विक कोष्टकांत दिलेल्या तात्विक वर्गांना ऐतिहासिक दाखले देऊन हा भाग संपविण्याचा विचार आहे.

कायमसाऱ्याच्या जमीनदारीचें बंगाल हें माहेरघर आहे. पूर्वकाळींही तेथें सामान्यतः हीच पद्धति प्रचलित होती व इंग्रज सरकारनें बंगाल प्रांत आपले ताब्यांत आल्यावर तीच पद्धति सुरू ठेविली. लॉर्ड कॉर्नवॉलीस यानें १७९३ मध्यें हल्लीं जिला जमीनदारी म्हणतात ती कायद्यानें चालू केली. देशामध्यें मध्यम स्थितींतील सुखवस्तु वर्ग असणें अवश्य आहे व त्यानेंच देशाची सुधारणा होत जाईल; व असा वर्ग कायम-साऱ्याच्या पद्धतीनें उत्पन्न होईल. तसेंच कायम साऱ्याच्या पद्धतीपासून लोकांना सरकाराबद्दल विशेष आपलेपणा वाटतो व असे लोक सुव्यवस्थित राज्यव्यवस्थेचे व राज्याच्या स्थैर्याचे कैवारी होतात, हें जाणून लॉर्ड कॉर्नवॉलीसनें कायम साऱ्याची पद्धति सुरू केली व त्यानंतर पांच वर्षांनीं इंग्लंडमध्येंही कायम साऱ्याची पद्धति चालू करण्यांत आली. कायम साऱ्याची पद्धति चांगली किंवा मुदतीच्या साऱ्याची पद्धति चांगली हा हिंदुस्थानांत एक सध्यां वादग्रस्त प्रश्न आहे. सरकारपक्षाचें म्हणणें असें आहे कीं, कायम साऱ्याच्या पद्धतीपासून बहुजनसमाजाचा तोटा आहे. कारण जमिनीचा वाढता खंड हा एकाच वर्गाला मिळतो. तेव्हां मुदतीच्या साऱ्याची पद्धतीच चांगली आहे. हें सरकारच्या उत्पन्नाच्या दृष्टीनें ठीक आहे. परंतु लोकपक्षाचें म्हणणें असें आहे कीं, कायम साऱ्याच्या पद्धतीनें लोकांना जमिनीबद्दल आपलेपणा वाटतो व त्यामुळें जमिनीची मशागत उत्तम होऊन देशाच्या शेतीची भरभराट होऊन लोक सुखी होतात. या प्रश्नाचें उत्तर छोटया शेतीच्या भागांतच खरोखरी आलेलें आहे. कारण त्या शेतीचा विशेष म्हणजे स्वामित्वाची जाणीव हा होय. जमीन आपली आहे ही पूर्ण भावना असली म्हणजे मनुष्य लागवड

काळजीनें करतो. पण आपण शेतीची सुधारणा केली असतां तिचा फायदा दुसऱ्यालाच मिळणार अशी स्थिति असली कीं, मनुष्याचें मन आपली जमीन सुधारण्याकडे लागणार नाहीं. कांहीं अंशीं हा प्रकार युरोपांतील अर्धेलतिर्धेल पद्धतीमध्येंही दिसून येतो. तेव्हां छोटया शेतीचा विशेष तिच्या मिराशीपणांत आहे, छोटेपणांत केवळ नाहीं हें ध्यानांत ठेविलें ह्मणजे कायम साऱ्याची पद्धति व मुदतीच्या साऱ्याची पद्धति यांपैकीं चांगली पद्धति कोणती याचा तेव्हांच निर्णय होतो. कायम साऱ्याची पद्धति हिंदुस्थानाला लागू करावी असा येथल्या अधिकाऱ्यांचा मनोदयही होता. एल्फिन्स्टन, मनरो, कॉर्नवॉलिस, बेंटिंग्स, कॅनिंग, वगैरे पहिल्या पिढीचे हिंदुस्थानांतील युरोपियन मुत्सद्दी यांची या कायम साऱ्याच्या पद्धतीला अनुकूलता होती व त्याअन्वयें नवीन मिळालेल्या अलाहाबाद व अयोध्या या संयुक्त प्रांतांना कायम साऱ्याची पद्धति लागू करण्याचा जाहीरनामासुद्धां १८०३ सालीं निघाला होता. तसेंच मद्रासेसही रयतवारी पद्धतीमध्यें कायम साऱ्याची पद्धति सुरू ठेवण्याचा विचार होता. परंतु बंगालच्या कायम साऱ्याच्या पद्धतीनंतर लवकरच इंग्लंडांतील मतामध्यें फरक होत चालला व रिकार्डोच्या खंडाच्या उत्पत्तीमधील अनुपार्जित वाढीची कल्पना प्रचलित झाली. कांहीं अंशीं या कल्पनेच्या प्रसारामुळें व कांहीं अंशीं कंपनी सरकारच्या डायरेक्टरांच्या स्वार्थी दृष्टीमुळें सरकारनें आपोआप वाढतें उत्पन्न घालविणें बरोबर नाहीं असें मत होऊन कायम साऱ्याची पद्धति पुढल्या कोणत्याही प्रांतास सररहा लाविली गेली नाहीं. यामुळें कायम साऱ्याच्या पहिल्या प्रकाराचें उदाहरण फक्त बंगाल प्रांताचेंच आहे. मद्रासेस 'पाळेगारी' या नांवानें ही पद्धति थोडीशी चालू आहे. तसेंच मुंबई इलाख्यांत कांहीं मोठमोठे इनामदार आहेत त्यांनाही कायम साऱ्याच्या सनदा दिलेल्या आहेत. सारांश, बंगालखेरीज इतर सर्व प्रांतांत जमीनदार पद्धति म्हणण्याइतकी मोठ्या प्रमाणावर कोठेंच प्रचलित नाहीं. कांहीं विशेष कारणाकरितां सरकारनें कांहीं व्यक्तींना कायम साऱ्याच्या सनदा दिल्या आहेत खऱ्या व म्हणून तुरळक तुरळक जमीनदारी सर्वत्र आहे असें म्हणतां येईल. परंतु ही गोष्ट अपवादादाखल आहे. पटेदारी पद्धति मध्यप्रांतांत कांहीं ठिकाणीं व संयुक्त प्रांतांत कांहीं ठिकाणीं आहे; परंतु तीमध्यें कायम साऱ्याची पद्धति फारच क्वचित् आहे. तसेंच कायम

साऱ्याची रयतवारी हीही फार थोड्या प्रमाणावर कोठें कोठें आहे. येथेंही विशेष कारणाकरितां कांहीं व्यक्तींना सरकारनें कायम साऱ्याच्या सनदा दिल्या आहेत. आमच्या प्रांतांत अशा जमिनींना इनामी जमिनी म्हणतात. या जमिनीवर सरकार अगदीं माफक असा कायमचा सारा घेतें. त्याला कोठें अष्टमांश पटी अगर इनामी पटी असें म्हणतात. परंतु या पद्धतीचीं उदाहरणेंही तुरळकच आहेत. तेव्हां कायम साऱ्याच्या पद्धतीच्या तीन पोटभेदांपैकीं एक पोटभेदच फार मोठा व फार महत्त्वाचा आहे. बाकीचे पोटभेद यांचीं उदाहरणें तुरळक आहेत. परंतु शास्त्रीय वर्गीकरणाच्या पूर्णतेकरितां तीन पोटभेद पाडणें आवश्यक होतें, ह्मणून असे तीन भेद केले आहेत.

हिंदुस्थानांतील सध्यां प्रचलित असलेल्या जमीनसाऱ्याच्या बहुतेक पद्धति मुदतीच्या साऱ्याच्या वर्गाच्या तीन पोटभेदांमध्यें येतात.

संयुक्त प्रांतांतील तालुकदारी पद्धति, मध्यप्रांतांतील मालगुजारी पद्धति व कोंकणांतील खोतीपद्धति या सर्व मुदतीच्या साऱ्याच्या पहिल्या पोटभागांत येतात. म्हणजे या पद्धतींमध्यें व बंगालच्या जमीनदारीमध्यें कायम सारा व मुदतीचा सारा इतकाच भेद आहे. बाकी सर्व बाबतींत या सर्व पद्धतींमध्यें साम्य आहे. या पद्धतींत सरकार मोठमोठ्या जमीनदारांशीं साऱ्याचा करार करतें. त्यामध्यें सरकारचा कुळाशीं व प्रत्यक्ष शेतकऱ्याशीं मुळींच संबंध येत नाहीं. मात्र येथें या जमीनदारांचे सारे ठरलेल्या मुदतीनंतर वाढविण्याचा हक्क सरकारास असतो.

मुदतीच्या साऱ्याचा दुसरा पोटभेद पटेदारीपद्धति हा होय. हा प्रकार संयुक्त-प्रांतांत विशेष आहे. तसेंच पंजाबांतही सार्वत्रिक आहे, मध्यप्रांतांतही थोडा फार आहे. याचें वर्णन मागें आलेंच आहे.

यांपैकीं शेवटचा पोटभेद रयतवारी हा होय. सर्व जमीनधाऱ्याच्या पद्धतींत हाच पोटभेद फार मोठ्या प्रमाणावर आहे. बहुतेक सर्व मद्रास इलाखा रयतवारी आहे. पूर्वी येथें जहागिरी, पटेदारी व रयतवारी अशा पद्धति सुरू होत्या. त्यांपैकीं जहागिरी पद्धति अपवादादाखल थोड्या ठिकाणीं सुरू आहे, परंतु पटेदारी पद्धति अजीबात मोडून टाकली गेली. ही मोडून टाकण्याचा सर टॉमस मन्रो याचा फार आग्रह होता, व त्याच्या आग्रहानें त्या इलाख्यांत सर्वत्र रयतवारी पद्धति सुरू झाली. परंतु मन्रोची रयतवारीची कल्पना यूरोपांतील छोटेखानी मि-

राशी पद्धतीप्रमाणें होती. म्हणजे त्याला कायमच्या साऱ्याची पद्धति पाहिजे होती. परंतु त्याचे म्हणण्याप्रमाणें रयतवारीपद्धति मात्र आली. परंतु तिचा जो चांगुलपणाचा विशेष तो मात्र नाहींसा झाला. यामुळेंच मद्रास इलाख्यांतील शेतकऱ्यांची फारच दैना झाली व सरकारला प्रत्येक मुदतीनंतर सरकारसारा कमी करण्याचीच पाळी आली. मुंबई इलाख्यांतही प्रायः रयतवारीपद्धतिच चालू आहे. तसेंच वऱ्हाड प्रांतांत बहुधा हीच पद्धति चालू आहे. मात्र मद्रास व मुंबई या इलाख्यांत सारे तीस वर्षांच्या मुदतीनें ठरलेले आहेत. तेच मध्यप्रांतांत वीस वर्षांपर्यंतच ठरलेले आहेत. पंजाबच्या पटेदारी पद्धतीमध्यें सारे पंधरा वर्षांचेच ठरलेले आहेत. मुंबईकडे आतां यापुढें सरकार सारे वाढविणार नाहीं अशा प्रकारचीं अस्पष्ट वचनें तरी मिळूं लागलीं आहेत. एकंदर जमीनसाऱ्याची आतां कमाल येऊन पोंचली आहे; म्हणून आतां या मार्गानें हिंदुस्थानसरकारचें उत्पन्न वाढण्याची फारशी आशा नाहीं; तेव्हां आतां नवीन उत्पन्नाची गरज लागल्यास ती अप्रत्यक्ष करांच्या रूपानें काढली पाहिजे असें हिंदुस्थानसरकारास वाटूं लागल्याचीं चिन्हें भासत आहेत. यामुळें निरनिराळ्या जमीनधाऱ्याच्या पद्धतीला एक प्रकारचें कायम साऱ्याच्या पद्धतीचें स्वरूप येऊं पहात आहे, ही शुभसूचक गोष्ट आहे. कारण हिंदुस्थानामध्यें शेतीच्या लागवडींत पुष्कळ अडचणींबरोबर सरकारच्या साऱ्याच्या वाढीची भीति ही एक अडचण आहे हें कबूल केलें पाहिजे. ही अडचण कालेंकरून नाहींशी होणार अशी लोकमताची खात्री झाली म्हणजे शेतकीचें पाऊल खात्रीनें पुढें पडल्याखेरीज राहणार नाहीं.

# भाग अकरावा.

## चढाओढीनें ठरलेल्या वांटणीची असमता व ती नष्ट करण्याचे उपाय.

' वांटणी ' या पुस्तकाचा पूर्वार्ध पहिल्या दहा भागांत समाप्त झाला. औद्योगिक सुधारणेच्या शिखरास पोंचलेल्या देशांमध्यें संपत्तीच्या वांटणीचे मुख्य हिस्से

अपर वांटे कोणते, व ते कोणत्या तत्वानें निश्चित होतात याचा आपण येथपर्यंत विचार केला. संपत्तीच्या प्रत्यक्ष उत्पत्तीस ज्या ज्या वर्गांचें प्रत्यक्ष साहाय्य होतें त्या त्या वर्गामध्यें संपत्तीची प्रथम वांटणी होते. असे वर्ग म्हणजे जमीनदार, मजूर, भांडवलवाले व कारखानदार हे होत. या वर्गांच्या वांट्यास येणाऱ्या संपत्तीला त्या त्या वर्गांचें वार्षिक उत्पन्न म्हणतात. तेव्हां हे उत्पन्नाचे प्रकार म्हणजे खंड, मजुरी, व्याज व नफा हे होत,* हें आतांपर्यंतच्या विवेचनावरून ध्यानांत आलेंच असेल. समाजाच्या बाल्यावस्थेमध्यें हे वांटे फारसे निरनिराळे झालेले नसतात व झाले असले तरी ते बहुधा रूढीनें ठरलेले असतात. परंतु समाजाच्या प्रगल्भावस्थेमध्यें हे वांटे चढाओढीनेंच ठरतात. म्हणजे या चार वर्गांतील प्रत्येक व्यक्तीचा हेतु आपल्याला मिळेल तितकें जास्त उत्पन्न मिळविण्याचा असतो. परंतु या चढाओढींत मजुरांचा वर्ग हा एका दृष्टीनें फार मोठा असला तरी शक्तीनें तो फार निर्बल असतो व यामुळें चढाओढींत ' गरीबांचा काळ ' या न्यायानें त्यांच्या वांट्यास जितकी संपत्ति यावयास पाहिजे तितकी येत नाहीं. या गोष्टीच्या स्वाभाविक कारणांचा येथें थोडासा विचार करणें अयोग्य होणार नाहीं.

सर्व देशांत जमीनदारांची स्थिति मोठी स्पृहणीय असते. कारण जमीन ही संपत्तीची फार मोठी जनयित्री असते. ही जमीन ज्या लोकांच्या हातीं लागते व ज्यांना तिचा मालकी हक्क मिळतो, त्या लोकांच्या हातीं एक संपत्तीची गुरुकिल्ली आल्याप्रमाणें होतें व मागाहून समाजांत जन्मास येणाऱ्या लोकांना जमिनखेरीज तर गत्यंतर नसतें. म्हणजे समाजांतील सर्व लोक गरजू व जमीनदारांच्या ताब्यांत जमिनीचा सर्व पुरवठा या परिस्थितीमुळें श्रम एवढेंच संपत्तीचें साधन हातीं असणाऱ्या व त्या साधनाचा शेतींत उपयोग करूं इच्छिणाऱ्यास जमीनदार लोक मागतील तितका खंड देणें भाग पडतें. सारांश, वाढत्या देशांत जमीनदारांचें उत्पन्न वाढत जातें व त्यांची सुस्थितीच होत जाते. मात्र त्या देशांत जमिनीची मालकी खाजगी लोकांची पाहिजे. सर्व जमिनीचें मालक जर सरकार असेल तर मात्र लोकांची स्थिति चांगली असेलच असें नाहीं. कारण अशा देशांत जमीनदारांचें उत्पन्न सरकारच घेतें. जर सरकारनें बुद्धिपुरस्सर जमिनी सवलतीच्या दरानें लोकांना दिल्या नाहींत तर सरकारपासून जबर

खंडानें सुद्धां लोकांना जमिनी घ्याव्या लागतात; व अशा देशांत सरकार अत्यंत श्रीमंत व संपन्न असलेलें व लोक मात्र फार दरिद्री व विपन्नावस्थेमध्यें असलेले असा प्रकार होणें शक्य असतें. परंतु ज्या ठिकाणीं जमिनींची मालकी खाजगी लोकांकडे आहे तेथें देशाच्या भरभराटीबरोबर जमीनदार वर्गाचें उत्पन्न वाढतें व त्याची आपोआप सुस्थिति होत जाते, हें रिकार्डोच्या खंडाच्या मीमांसेचा विचार करतांना मागें सांगितलेंच आहे.

देशामध्यें संपत्ति वाढूं लागली म्हणजे दरवर्षी बरीच संपत्ति शिल्लक पडत जाते. अर्थात् भांडवलवाल्यांचा वर्गही वाढत जातो, व शास्त्रीय शोधांमुळें यंत्र-सामग्रीचा विस्तार झाला म्हणजे संपत्तीच्या उत्पादनास भांडवल व यंत्रसामग्री यांची विशेष गरज लागूं लागते व त्या मानानें मानवी श्रमाची योग्यता व महत्त्व कमी होतें. कारण यंत्राच्या साहाय्यानें सृष्टीच्या प्रचंड शक्तीचा उपयोग करून घेतां येऊं लागतो. यंत्रें चालविण्यास मानवी श्रम लागतात खरे, परंतु अशा श्रमांला विशेष कौशल्याची जरूरी लागत नाहीं. याप्रमाणें उद्योगधंद्यांच्या उलाढालीबरोबर मानवी श्रमाची योग्यता कमी होते आणि जमीन, भांडवल व शास्त्रीय ज्ञान आणि हीं कारणें एकत्र आणणारी घटनाशक्ति व योजना यांना महत्त्व ज्यास्त येतें. यामुळें या कारणांच्या मालकांना मिळणारा उत्पन्नाचा मोबदला मोठमोठा होत जातो व मानवी श्रमाचा मोबदला कमी किंमतीचा बनत जातो. म्हणूनच मजुरांची स्थिति जितकी चांगली व्हावी तितकी चांगली होत नाहीं. युरोपमध्यें ही स्थिति जेव्हां घडून आली त्या काळालाच औद्योगिक क्रांतीचा काळ म्हणतात. त्या क्रांतीचें थोडेंसें सिंहावलोकन करणें येथें इष्ट आहे; म्हणजे आपला पुढील मार्ग ज्यास्त सुलभ होईल.

युरोपमध्यें पूर्वकाळीं बहुतेक सर्व धंदे घरगुती स्थितींत होते. जमीनदारां-पासून लहान लहान शेतें खंडानें घेऊन शेतकरी आपल्या व आपल्या कुटुंबांतील माणसांच्या श्रमानें त्या शेताची लागवड करीत. प्रत्येक कामगार आपल्या घरींच आपलें काम करी व जी संपत्ति तो उत्पन्न करी ती शेजारच्या लोकांच्या उपभोगाकरितां करी व जसजशा पदार्थांच्या मागण्या येत त्या त्या मानानें तो माल तयार करी. या काळीं दुसऱ्यावर अवलंबून राहणारा व निवळ भाडोत्री असा मजुर वर्ग फारच कमी असे. प्रत्येक मनुष्यावर संपत्तीच्या उत्पत्तीची

जबाबदारी असे; व या घरगुती धंद्यांच्या पद्धतींमध्यें संपत्तीची उत्पत्ति बेताबाताची असे व ही संपत्ति बहुधा समतेनें वांटलेली असे; ह्मणजे श्रीमंत व गरीब यांमध्यें फारसें अंतर नसे; सर्वांची राहणी साधारणपणें सारखी व सर्वांचें उत्पन्नही सामान्यतः सारखेंच; थोडाबहुत फरक असावयाचा. परंतु तो लक्षांत घेण्यासारखा नव्हता. त्या काळच्या संपत्तीच्या उत्पादनाचा विशेष हा असे कीं, त्याला मनुष्याच्या कौशल्याची व श्रमाची विशेष जरूर असे. संपत्तीच्या उत्पादनास लागणारीं हत्यारें बेताबाताचीं असत. परंतु सतराव्या शतकापासून युरोपांत आधिभौतिक शास्त्रांचा उदय झाला. अश्रुतपूर्व अशा सृष्टीच्या शक्तींचा शोध लागत चालला व या सृष्टिशक्तींचा यंत्रांच्या साहाय्यानें मानवी धंद्यांत उपयोग करून घेण्याचा प्रयत्न होऊं लागला व युरोपच्या सुदैवानें किती तरी नवीं नवीं यंत्रें निर्माण होऊं लागलीं. वॅटनें वाफेच्या शक्तीचा शोध लावला व त्या शक्तीनें चालणारीं एंजिनें निर्माण केलीं. या शोधापासून उद्योगधंद्यांत एक प्रचंड क्रांति घडून आली व त्याचे योगानें पूर्वीच्या उद्योगधंद्यांचें स्वरूप पार पालटून गेलें. आतां धंदे घरगुती स्वरूपाचे राहिले नाहींत. त्यांना कारखान्यांचें किंवा गिरण्यांचें विराट् स्वरूप प्राप्त होत चाललें. कारण, या वाफेच्या एंजिनांच्या योगानें व दुसऱ्या यंत्रांच्या योगानें श्रमविभागाचें तत्त्व अंमलांत येऊं लागलें, व त्यामुळें संपत्तीच्या वाढीला विलक्षण वेग येत चालला. हातमागावर कापडाला तयार होण्यास चार किंवा पांच दिवस लागत, तें कापड एका अर्ध्या तासांत अगर पंधरा मिनिटांत होऊं लागलें. ही जी संपत्तीची विलक्षण वाढ होऊं लागली, तिच्यामुळें कारखानदारांचें निवळ घरगुती गिऱ्हाइकांवर भागेना; त्यांच्या कारखान्यांच्या प्रचंड पैदाशीस परदेशी गिऱ्हाईक पहावें लागूं लागलें. परंतु विराट्स्वरूपी गिरण्या व कारखाने सुरू करण्याकरितां हजारों रुपयांचें भांडवल लागूं लागलें. हे प्रचंड कारखाने चालविणारे स्वतंत्र कारखानदार निर्माण झाले. पूर्वीच्या घरगुती काळांतील बहुतेक सर्व कामगार यांचे स्वतंत्र धंदे जाऊन त्यांना या प्रचंड कारखानदारांकडे सांगकामी मजुरी करण्याचें भाग पडूं लागलें. पूर्वीच्या काळचा कोष्टी, पूर्वीच्या काळचा कातारी, पूर्वीच्या काळचा रंगारी वगैरे सर्व कामगारलोकांचा घरगुती धंदा नाहींसा झाला व त्यांना कापडाच्या गिरणींत, लोखंडाच्या कारखान्यांत किंवा धातूच्या गिरणींत किंवा रंगाच्या गिरणींत मजुर-

दार बनल्याखेरीज गत्यंतर नाहींसें झालें. युरोपांतील उद्योगधंद्यांच्या या काळाला औद्योगिक क्रांतीचा काळ म्हणतात, हें आतां वर सांगितलेंच आहे; व या काळांत पूर्वींच्या काळच्या हजारों कामकरी वर्गाचें कौशल्य नवीन यंत्रांनीं कुचकामाचें करून टाकलें व त्यांचा सामाजिक दर्जा कमी झाला. ज्यांच्याजवळ पुष्कळ पैसा त्यांना महत्त्व आलें. कारण पैशानें यंत्रें घेऊन कारखाने काढणें शक्य झालें. निदान कारखाने काढण्याचें ज्ञान असणाऱ्या माणसांची पैशाकरितां मागणी वाढली, व ज्यांच्याजवळ पैसा आहे, त्यांचें उत्पन्न वाढलें. पण ज्यांच्याजवळ नुसतें हस्तकौशल्य आहे त्यांना कांहींच महत्त्व राहिलें नाहीं. कारण पैशाचें यंत्र करणें सोपें होतें; परंतु कौशल्याचें रूपांतर होणें दुरापास्त होतें. शिवाय पैसेवाले व कारखाना काढण्यास लागणारे गुण असणारे लोक देशांत थोडे असल्यामुळें ते करतील ती पूर्वदिशा असा प्रकार झाला. या कारखान्यांना मजूर माणसें कोणतींही चालत. देशांतील कामगारलोकांना तर आतां धंदा नाहींसा झाला. यामुळें या लोकांची गर्दी गिरण्यांच्या व कारखान्यांच्या दारांत होऊं लागली. अशा परिस्थितींत कारखानदारांनीं मजुरांना होतां होईल तितकी मजुरी कमी द्यावी व आपला होतां होईल तितका फायदा करून घ्यावा, हें मानवी स्वभावास अनुसरूनच होतें. यामुळें मजुरीचे दर सरसकट एकवटत चालले व कारखानदारांचा नफा व भांडवलवाल्यांचें व्याज मात्र वाढत चाललें. म्हणजे नफ्याचा किंवा व्याजाचा दर वाढला असें नाहीं, तर कारखान्याचा परीघ व व्याप वाढल्यामुळें जरी प्रत्येक देवघेवींत नफा किंवा व्याज कमी असलें तरी या देवघेवीचें प्रमाण व देवघेवीचा वारंवारपणा इतका वाढला कीं, भांडवलवाल्यांचें व कारखानदारांचें उत्पन्न विलक्षण वाढलें व त्यामुळें त्यांची दरवर्षी शिल्लक जास्त पडत चालली. मजुरांची स्थिति याच्या उलट झाली. त्यांचें उत्पन्न किंवा मजुरी त्यांना जेमतेम संसारास पुरेशी असल्यामुळें त्यांच्या स्थितींत फरक पडणें अशक्य झालें. यामुळें समाजामध्यें संपत्तीची विषमता अत्यंत तीव्र झाली. एकीकडे लक्ष्मीपति व दुसरीकडे भिक्षापति दिसूं लागले. श्रीमंत व गरीब यांमध्यें पूर्वी जें कमी अंतर असे तें आतां जमीनअस्मानाचें अंतर पडलें. देशाच्या भरभराटीमुळें देशांतील लोकसंख्या वाढली; त्यामुळें धान्याच्या किंमती वाढत चालल्या. जरी मजुरांची मजुरी वाढली तरी तीपासून त्यांचा म्हणण्यासारखा फायदा झाला नाहीं. कारण,

वाढलेली मजुरी धान्याच्या वाढत्या किंमतींत मुरून गेली. यामुळें मजुरांची दिवसेंदिवस हलाखीची स्थिति होत चालली. याप्रमाणें घरगुती धंद्यांची पद्धति नामशेष होऊन प्रचंड कारखान्यांची पद्धति सुरू झाल्यानें मानवी श्रमाची महती कमी झाली; इतकेंच नाहीं तर दुसरेही पुष्कळ परिणाम घडून आले व त्यांचे योगानेंही मजूरवर्गावर अनिष्टच परिणाम झाला.

प्रचंड कारखान्यांच्या पद्धतीबरोबर शहरांची झपाट्यानें वाढ होत चालली व खेड्यांतील वस्ती शहरांत येऊन भरूं लागली. अशा दाट वस्तीच्या शहरीं राहणें मजुरांस भाग पडूं लागल्यामुळें त्यांच्या आरोग्यावर व शक्तीवर अनिष्ट परिणाम झाला. कारण झपाट्यानें वाढणाऱ्या शहरांत घाण वाढणें अनिवार्य होतें. दाट वस्तीनें घरेंही मोकळ्या हवेचीं राहणें शक्य नव्हतें. मजुरांना प्रचंड कारखान्यांच्या इमारतींत दिवसाचा पुष्कळ भाग राहावें लागे व या इमारती अत्यंत काटकसरीनें बांधल्या गेल्यामुळें मजुरांच्या आरोग्याच्या दृष्टीनें त्या वाईट असत. यामुळें मजूरलोकांमध्यें निरनिराळ्या रोगांचा प्रादुर्भाव होऊं लागला. शिवाय सृष्टिशक्तीच्या योगानें पुरुषांच्या श्रमाचें महत्त्व कमी झालें खरें, पण त्यामुळें बायकामुलांच्या श्रमाला किंमत आली. घरगुती धंद्यांच्या पद्धतींत विशेष श्रमाचीं कामें धट्टयाकट्ट्या पुरुषांखेरीज होत नसत. परंतु कारखान्यांतील निरनिराळ्या यंत्रांशीं काम करणें याला शक्तीपेक्षां लक्षच जास्त लागत असल्यामुळें हीं कामें बायकांकडून व मुलांकडून सहज होण्याजोगीं असल्यामुळें कारखानदार बायकामुलांचे श्रम जास्त पसंत करीत. कारण त्यांना मजुरी कमी द्यावी लागे. परंतु या बाबतींत कोणतेच नियम नसल्यामुळें अगदीं कोंवळ्या मुलांनाही कामावर नेमीत. तसेंच बायकांना व मुलांना किती तास काम द्यावयाचें किंवा कारखाने किती वेळ चालवयाचे यासंबंधीं निर्बंध नव्हते.

सारांश, या औद्योगिक क्रांतीच्या काळांत पूर्वीची ठरीव पद्धति जाऊन नवीन पद्धति उत्पन्न होत होती. परंतु या संक्रमणावस्थेमध्यें सर्वथा सामाजिक बेबंदशाही झाली. पूर्वीचे ठरलेले नियम व चाली या निरुपयोगी झाल्या. नवीन चालीरीति किंवा नियम ठरले नव्हते. यामुळें कारखानदारांच्या स्वार्थीपणास पूर्ण मुभा मिळाली. कारण मजुरांचा वर्ग गरजू होता. नव्या मनूंत त्यांना परावलंबन प्राप्त झालें होतें व कारखानदारांना पैशाच्या ढबीमुळें फाजील स्वातंत्र्य व सत्ता आले.

-ली होती. या दोहोंचा परिणाम मजूरवर्गाच्या दैन्यावस्थेमध्यें व्हावा हें अगदीं स्वाभाविक होतें; व एकीकडे देशाची भरभराट होत जावी तर एकीकडे समाजांतील मोठा वर्ग याची स्थिति खालावत जावी अशी विरोधी स्थिति येऊन ठेपली. हा विरोध परोपकारी लोकांच्या ध्यानांत आल्यावांचून राहिला नाहीं व औद्योगिक क्रांतीच्या या अनिष्ट परिणामाकडे पुष्कळ लोकांचें लक्ष गेलें व हे अनिष्ट प्रकार सरकारनें काढून टाकले पाहिजेत अशाबद्दल चळवळ सुरू झाली. समाजांत ही विषमता कां उत्पन्न होते याच्या कारणांकडे कांहीं लेखकांचें लक्ष गेलें व भांडवलाच्या उत्पत्तीच्या पद्धतीमुळें ही विषमता उत्पन्न होते; तेव्हां ही संपत्तीची उत्पत्तिपद्धतीच बदलली पाहिजे अशा प्रकारचे विचारही कांहीं लोकांच्या मनांत येऊं लागले. औद्योगिक क्रांतीमुळें समाजांत ही जी नवीन जागृती उत्पन्न झाली तिनें सामाजिक पंथ या नांवाचा एक निराळाच अर्थशास्त्रांतला पंथ निर्माण झाला. या पंथानें मजुरांची स्थिति सुधारण्याकरितां पुष्कळ उपाय सुचविले. या पंथानें अर्थशास्त्राचीं नवीं तत्वें निर्माण करून त्याअन्वयें समाजांतील लोकांच्या सांपत्तिक कल्पनांमध्यें सुधारणा घडवून आणून तद्द्वारा मजुरांची स्थिति सुधारण्याच्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे अशी हांकाटी सुरू केली. कांहींजणांनीं कायद्याच्या आश्रयानें मजुरांची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न केला व तो लवकरच यशस्वी झाला, हें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

तसेंच, शिक्षणाच्या प्रसारानें मजूरवर्गामध्यें औद्योगिक क्रांतीनें घडून आलेल्या आपल्या दुःस्थितीबद्दल जाणीव उत्पन्न झाली व त्यांनीं स्वप्रयत्नांनीं आपल्या सुधारणेचे पुष्कळ स्वावलंबनाचे मार्ग शोधून काढले. सामाजिक पंथाचा इतिहास व त्यानें सुचविलेले मार्ग यांचा विचार पुस्तकांतले शेवटच्या दोन भागांत करावयाचा आहे. स्वावलंबनाचे प्रकार म्हणजे मजुरांचे संघ, त्यांचे संप व सहकारित्व होय. या तीन उपायांचा तीन निरनिराळ्या भागांत विचार करावयाचा आहे. तिसरा मार्ग म्हणजे कायद्याच्या योगानें ताबडतोब मजुरांची स्थिति सुधारण्याचे प्रयत्न करणें हा होय. हा विषय फारसा कठिण नसल्यामुळें त्याचा या भागांतच विचार करूं.

वर सांगितलेंच आहे कीं, औद्योगिक क्रांतीच्या काळचे दुष्परिणाम लोकांच्या नजरेस येऊं लागल्यापासून ते नाहींसे करण्याचे प्रयत्न परोपकारी लोकांनीं सुरू

केले. ते यशस्वी होण्यास एकच अडचण होती; ती ही कीं, त्या काळीं ॲडाम स्मिथचें खुल्या व्यापाराचें तत्व सर्वमान्य होत चाललें होतें. ॲडाम स्मिथचें पुस्तक प्रसिद्ध झालें त्या काळीं प्रचंड कारखान्यांच्या पद्धतीला कोठें सुरवात होऊं लागली होती. त्याचे काळीं बहुतेक धंदे घरगुती स्थितींतच होते. यामुळें त्याला प्रचंड कारखान्यांची वाईट बाजू दिसणें शक्य नव्हतें. प्रत्येक मनुष्याला आपलें हित कळतें व उद्योगधंद्यांत सरकारनें मुळींच हात घालूं नये हें ॲडाम स्मिथचें म्हणणें लोकांना वेदतुल्य वाटूं लागलें होतें; यामुळें कायद्यानें सुधारणा घडवून आणण्यांत लोकमताचाच मोठा अडथळा होता. परंतु हा अडथळा लवकर नाहींसा होऊन कारखान्याबद्दलचे कायदे इंग्लंडमध्यें एकामागून एक पसार होत गेले. या कायद्यांचा उद्देश अप्रत्यक्ष रीतीनें मजुरांची स्थिति सुधारण्याचा होता. म्हणजे जुन्या घरगुती स्थितींतील धंद्यांत जे सामान्य नियम धंद्यांतील लोकांनीं किंवा समाजानें केलेले असत, तशा तऱ्हेची कांहीं तरी नियमबद्धता कायद्यानें उत्पन्न केली.

कारखान्यांतील कामाचे तास कायद्यानें ठरविले; तसेंच कोणत्या वयाच्या आंत कारखान्यांत मुलें घेऊं नयेत त्याबद्दल निर्बंध केले गेले. बायकांनीं किती तास काम द्यावें याबद्दल कायदे झाले. कारखानदारानें मजुरांना वर्षांतून कांहीं नियमित सुट्या दिल्या पाहिजेत; आठवड्यांतून एक दीड दिवस सुट्टी दिली पाहिजे, वगैरे प्रकारचे कायदे सर्वत्र करण्यांत आले. तसेंच कारखानदारानें आपल्या इमारती आरोग्याच्या नियमांकडे लक्ष देऊन बांधल्या पाहिजेत; हवा व उजेड चांगला येईल अशा तऱ्हेच्या गिरण्या व कारखाने पाहिजेत; कारखानदारानें मजुरांकरितां चांगलीं हवाशीर घरें बांधून दिलीं पाहिजेत; अशा प्रकारचेही निर्बंध कांहीं ठिकाणीं केले गेले. तसेंच गिरणींत काम करणाऱ्या मुलांच्या शिक्षणाची सोय कारखानदारानें केली पाहिजे, असाही निर्बंध कोठें कोठें केला गेला. सारांश, मजुरांच्या आरोग्याकडे लक्ष देणें हें सरकारचें काम आहे व इतकी तजवीज सरकारनें कारखानदारांस करावयास लावण्यास हरकत नाहीं असें हल्लीं सर्व सुधारलेल्या सरकारांचें मत आहे. ज्याप्रमाणें जनावरांना क्रूरपणानें वागविणें हें वाईट असून तें कायद्यानें बंद करणें हें सुधारलेल्या सरकारचें कर्तव्यकर्म समजलें जातें, ज्याप्रमाणें लोकांच्या नीतीचें रक्षण करणें हें हल्लीं सरकारचें कर्तव्यकर्म

समजलें जातें, त्याचप्रमाणें लोकांच्या आरोग्याकडे लक्ष देणें सरकारचें कर्तव्य-कर्म आहे असें लोकमत झालेलें आहे. या तत्वावरच सर्व कारखान्यांचे कायदे करण्यांत आलेले आहेत व या कायद्यांचा पुष्कळ इष्ट परिणामही झालेला आहे.

परंतु मजूरवर्गाची स्थिति सुधारण्याचा एक मोठा जबरदस्त उपाय सरकारनें हातीं घेतला, तो सक्तीच्या व फुकट शिक्षणाचा होय. प्रचंड कारखान्याची पद्धति इंग्लंडांत प्रथमतः सुरू झाली. यामुळें त्याचे दुष्परिणाम तेथेंच प्रथमतः दृष्टोत्पत्तीस येऊं लागले. ते निवारण्याचे कायद्याचे उपाय इंग्लंडांतच पहिल्या प्रथम अंमलांत आले व त्याचें अनुकरण दुसऱ्या देशांनीं केलें. या सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या बाबतींत मात्र फ्रान्स व जर्मनी यांनीं आघाडी मारली. देशांतील उद्योगधंद्यांची वृद्धि होण्यास व एकंदर बहुजनसमाजाची स्थिति सुधारण्यास शिक्षण—प्राथमिक व औद्योगिक—हें अत्यंत अवश्य आहे हें तत्त्व या सरकारांनीं प्रथम स्वीकारलें व इंग्लंडमध्यें त्याचें अनुकरण झालें. शिक्षणाच्या प्रसारामुळें मजूरवर्गामध्यें आपल्या स्थितीची जाणीव जास्त स्पष्टपणें उत्पन्न झाली व त्याच्यायोगानेंच स्वावलंबनाचे मार्ग मजूरवर्ग स्वीकारूं लागला. आतां या स्वावलंबनाच्या निरनिराळ्या मार्गांचा विचार पुढील तीन चार भागांत करावयाचा आहे.

वरील मजकूर महायुद्धाचे पूर्वी लिहिलेला आहे. महायुद्ध चालू असतांना व त्यानंतर सर्व देशांत मजूरवर्गाचें वजन सरकारांत जास्त वाढलें. सर्व प्रातिनिधिक संस्थांत मजुरांचे पुढारी जास्त प्रमाणांत येऊं लागले व त्यामुळें मजुरवर्गाच्या हिताचे कायदे जास्त जास्त प्रमाणांत होऊं लागले. तसेंच दुय्यम शिक्षणसुद्धां मोफत व सक्तीचें केलें पाहिजे असें मत तयार होऊन त्या मताप्रमाणें अंमलबजावणीही सुरू झाली आहे. सारांश, महायुद्धानंतरच्या चालू काळांत मजुरवर्गाच्या उन्नतीचे कायदे सर्व सुधारलेलीं सरकारें करूं लागलीं आहेत.

---

# भाग बारावा.

## संप व त्याचे सांपत्तिक परिणाम.

प्राणिशास्त्रांत असें एक तत्व सांगण्यांत येतें कीं, प्राण्याला नवीन काम कर-ण्याचें भाग पडलें ह्मणजे त्या कामाला अनुरूप अशा इंद्रियाचा प्रादुर्भाव त्या प्राण्याच्या शरीरांत होऊं लागतो. परंतु हें तत्त्व समाजशास्त्रांतही दिसून येतें. या भागांतील संप व पुढल्या भागांत विचार करावयाचे मजूरसंघ व या समाजां-तील संस्था अशाच उदयास आलेल्या आहेत. घरगुती धंद्यांच्या काळांत या संस्थांना अवसरच नव्हता. त्या काळीं प्रत्येक कामगार हा स्वतंत्र धंदेवाला असे. तो आपल्या घरगुती धंद्यामध्यें दोन चार उमेदवार घेई व ते उमेदवार आपल्या कामांत चांगले निष्णात झाले ह्मणजे स्वतंत्र धंदा करूं लागत. धंद्याच्या या अवस्थेंत कारखानदार व मजुर असें समाजांतील लोकांचें वर्गीकरण झालेलें नसतें. प्रत्येक मनुष्य हा छोटेखानी कारखानदारच असतो. शिवाय या काळांत मालाचे दर, धंदेवाल्याची मजुरी व नफा हीं रूढीनें किंवा कायद्यानें ठरलेलीं असत. त्यांत चढाओढीचा किंवा कराराचा किंवा घासाघिसीचा संबंध नव्हता. परंतु शास्त्रीय शोधांनीं व यंत्रांच्या प्रगतीनें जेव्हां धंद्याचें घरगुती वामनमूर्ति-स्वरूप जाऊन त्याला कारखान्याचें विराट स्वरूप आलें, तेव्हां पूर्वीची सर्व परि-स्थिति बदलली. रूढि जाऊन तेथें चढाओढ आली; कायदा जाऊन करार आला; ठरीव रूळी जाऊन बाजारांतील घासाघीस आली; स्वतंत्र छोटेखानी कामगार जाऊन त्यांऐवजीं कारखानदार व मजूर असे दोन विरोधी वर्ग आले. शेवटीं सरकारी देखरेखीऐवजीं सरकारची तटस्थ वृत्ति आली. याप्रमाणें पूर्वीचा सर्व मनू बदलला व या परिस्थितीच्या बदलानें कारखानदार व मजूर यांचेमध्यें एक प्रकारचें औद्योगिक युद्ध सुरू झालें. पहिल्या प्रथम या युद्धांत कारखानदारांची बाजू स्वाभाविक जास्त बलवान झाली. कारण आधीं संपत्ती-च्या उत्पत्तीचें मुख्य साधन भांडवल व यंत्रसामुग्री, तीं त्यांचे हातीं आलीं. शि-वाय कारखानदारांचा वर्ग स्वाभाविकच लहान असल्यामुळें त्यांचा एकोपा व

एकमत चटकर होई. यामुळें मजुरांना मजुरी ठरविण्याच्या चढाओढींत मजुरांचा पक्ष दुर्बळ होई. कारखानदार व मजूर यांच्या सहकारितेखेरीज संपत्ति उत्पन्न होणें शक्य नव्हतें हें खरें; तरी पण ही सहकारिता राक्षस व वामनमूर्ति यांच्या सहकारितेसारखी होती. त्यांमध्यें ज्याप्रमाणें शेवटीं वामनमूर्तीलाच दुःखें व हालअपेष्टा सोसाव्या लागल्या, तोच प्रकार मजुरांचा झाला. व म्हणूनच सरकारला कारखान्यांचे कायदे करावे लागले. यांचें मागल्या भागांत स्पष्टीकरण केलेंच आहे. या भागांत मजूरांनीं स्वावलंबनानें स्वीकारलेल्या उपायांचा विचार करावयाचा आहे. त्यांतला पहिला उपाय म्हणजे संपाचा होय. ज्याप्रमाणें मनुष्य मोठ्या संटकांत असलें म्हणजे त्याची विचारशक्ति व दूरदृष्टि यांचा त्याला विसर पडतो व तो प्रथमतः तात्कालिक उपायांची योजना करतो, तोच प्रकार मजूरांचा झाला. त्यांना सुचलेल्या उपायांपैकीं सर्वांत कमी उपयोगाचा उपाय म्हणजे संपाचा होय. त्याच्या वरची पायरी मजूरसंघाला दिली पाहिजे व सर्वांत उच्च पायरी परस्परसाहाय्यकारी तत्वाला दिली पाहिजे. येथें या उपायांचा व या त्यांच्या चढत्या उपयुक्ततेच्या क्रमानेंच विचार करावयाचा आहे.

संप म्हणजे एकमतानें एकसमयावच्छेदेंकरून किंवा आपला करार संपेल त्या त्या वेळीं एका धंद्यांतील, एका कारखान्यांतील किंवा एका मालकाच्या येथें नोकरी करणाऱ्या मजुरांनीं काम बंद पाडणें होय. अशा तऱ्हेनें एकदम काम बंद पाडण्याचा हेतु हा कीं, कारखानदाराला आपल्या अटी कबूल करावयास लावावयाचें. तेव्हां संपाच्या मूळाशीं कारखानदार व मजूर यांच्यामधला बेबनाव अगर तंटा असतो हें उघड आहे. धंदा किंवा व्यापार मोठ्या भरभराटींत असला म्हणजे कारखानदारांना नफा पुष्कळ होत असतो. त्या वेळीं मजूरीहि वाढण्याचा संभव असतो. परंतु कारखानदारांच्या अल्प संख्येमुळें त्यांचें संगनमत ताबडतोब होतें व ते मजूरीचा दर तोच ठेवतात किंवा अल्पप्रमाणानें वाढवितात. परंतु मजुरांना ही वाढ पसंत नसते. आतां मजुरांचें गाऱ्हाणें कारखानदारानें सामोपचारानें ऐकिलें नाहीं म्हणजे मजूर संपाचा निश्चय करतात; परंतु संप पुष्कळ वेळां मजुरी कमी होऊं नये अशाकरितां केले जातात. एखाद्या धंद्याला मंदी आली असतां कारखानदार मजूरीचे दर कमी करण्याचा विचार करतो किंवा आठवड्यांतून कांहीं दिवस कारखाना बंद ठेवण्याचा ठराव करतो.

परंतु ही गोष्ट मजुरांना मानवत नाहीं व ते आपल्या बाजूनें संपाचा कट करतात. केव्हां केव्हां कोणत्या कोणत्या सुटया असाव्या, किती तास दररोज काम घ्यावें, वगैरेवरून तंटा उपस्थित होतो. सारांश, कारखानदार व मजूर यांमध्यें मजुरीचे दर, कामाचे तास, काम करण्याच्या वेळा, सुटयांचे दिवस व इतर पुष्कळ बाबतींमध्यें मतभेद होण्याचा संभव असतो व अशा तऱ्हेनें मतभेद होऊन वादाला गोष्ट आली म्हणजे संपाचा प्रसंग येतो. म्हणजे संप हा एक कारखानदार व मजूर या विरोधी पक्षांतील औद्योगिक युद्धाचा प्रकार आहे; व ज्याप्रमाणें तडजोडीनें, सामानें किंवा दुसऱ्या शांततेच्या उपायानें तंटयाचें मूळ मिटत नाहींसें झालें म्हणजे निरनिराळीं राष्ट्रें आपला तंटा लढाईनें मिटवूं पाहतात, किंवा पूर्वकाळीं दोन मनुष्यांचा तंटा एकमेकांशीं युद्ध खेळून निकालांत काढून घेण्याचा प्रघात असे, तोच प्रकार औद्योगिक व व्यापाराच्या कामांत संपाचा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां संपाचा मूळ हेतु कारखानदाराचें काम एकदम बंद पाडून त्याला अडचणींत आणून किंवा लोकांना गैरसोय करून आपल्या अटी व आपलें म्हणणें दुसऱ्या पक्षास कबूल करण्यास लावण्याचा असतो, हें उघड आहे.

अशा प्रकारचे संप औद्योगिक क्रांतीनंतर सर्व सुधारलेल्या देशांत झालेले आहेत. आज काय खाणींतील मजुरांनीं संप केला, तर उद्यां काय गोदींतील कामदारांनीं केला; आज कापडाच्या गिरण्यांतील गिरणीकामगारांनीं गिरण्या बंद पाडल्या, तर उद्यां काय रेल्वेनोकरांनीं आगगाडयांची नेआण बंद केली; या प्रकारच्या हकीगती वर्तमानपत्र वाचणारांच्या कानीं नेहमीं येतात. हिंदुस्थानांतसुद्धां गेल्या पांचपंचवीस वर्षांत किती तरी संप झालेले आमच्या वाचकांच्या स्मरणांत असतील. मुंबईतील म्युनिसिपालिटींतलि भंग्यांचा संप, रेल्वेवरील युरोपियन व युरेजिअन गाडया हाकणारे व गाडया चालविणारे यांचा संप, गिरण्यांतील मजुरांचा संप, रेल्वे तारमास्तर व स्टेशनमास्तर यांचा संप, मुंबईतील पोस्टमनांचा संप, भाडोत्री गाडी हांकणारांचा संप अशा प्रकारचे किती तरी संप आपल्या कानावरून गेलेले असतील.

वरील उदाहरणांवरून प्रचंड कारखान्याची पद्धति व संप यांचा कार्यकारणभावसंबंध आहे हें तेव्हांच ध्यानांत येईल. ज्या ज्या देशांत प्रचंड कारखान्या-

चा पद्धति प्रचलित होते त्या त्या देशांत संपाची पद्धतिही मागोमाग येतेच. घरगुती धंद्याच्या पद्धतींत या संपाला अवसर नसतो. म्हणजे ज्या वेळीं कारखानदार व मजूर असे मोठमोठे दोन वर्ग देशांत उत्पन्न होतात तेव्हां त्यांच्यामध्यें तंटेभांडणास कारणें जास्त उद्भवतात व हीं भांडणें दुसऱ्या रीतीनें सुटली नाहींत म्हणजे संप या आणीबाणीच्या उपायाचा अवलंब मजूरांकडून होतो. कारखानदारांनीं मजुरांना नोटीस देऊन कारखान्यांत येण्याचा अटकाव केला तर त्याला बंदी म्हणतात. अशा तऱ्हेनें संप व बंदी असा भेद कांहीं लोक करतात; परंतु कारखानदारांकडून असें होण्याचे प्रसंग फारच थोडे असतात, म्हणून संप व बंदी असा भेद करण्याचें फारसें प्रयोजन नाहीं, असें पुष्कळ ग्रंथकर्त्यांचें म्हणणें आहे व तें पुष्कळ सयुक्तिक दिसतें. म्हणून या भागांत संप व बंदी असा भेद मानला नाहीं. पाहिल्यांदां नोटीस कोणीहि देवो, परंतु कारखानदार व मजूर यांच्यामध्यें बेबनाव होऊन कारखान्याचें काम बंद पडलें म्हणजे संप झाला असें म्हणण्यास कांहीं एक हरकत नाहीं.

आतां अशा संपाचा देशाच्या सांपत्तिक स्थितीवर काय परिणाम होतो व देशांतील कारखानदार व मजूर या दोन वर्गांवर काय काय परिणाम होतो हें पहावयाचें राहिलें. आपली स्थिति सुधारण्याच्या हेतूनें, निदान आपल्या मजुरीचे दर कमी न व्हावे अशा बुद्धीनें हे संप होतात हें उघड आहे. मजूरवर्ग आपलें काम सोडून हट्ट धरून बसतो व आपल्या शिलकेवर कांहीं दिवस किंवा कांहीं आठवडे गुजराणा करतो. किंवा लोकांच्या सहानुभूतीचा फायदा घेऊन त्यावर आपला गुजारा करतो. म्हणजे मजूरवर्ग फार मोठा स्वार्थत्याग करतो व मोठ्या कष्टानें दिवस काढतो. हें सर्व करण्याचा हेतु काय, तर कारखानदारांचें नुकसान करून त्यांना आपल्या अटी कबूल करण्यास भाग पाडणें हा होय. आतां समजा, एका मोठ्या धंद्यांतील मजुरांच्या मोठ्या वर्गानें संप केला तर त्याचा परिणाम कारखानदारांच्या गिरण्या बंद पाडण्यांत होतो हें उघड आहे. परंतु यांत कारखानदारांचें खरें नुकसान होतें काय? कारखानदारांचा नफा त्यांच्या कारखान्यापासून होतो खरा; परंतु हा नफा मालाच्या किंमतींतून यावयाचा असतो व प्रचंड कारखान्याच्या पद्धतींत हजारों रुपयांचा माल तयार होऊन नेहमीं पडलेलाच असतो. कारखाने बंद झाल्यामुळें नवा माल उत्पन्न होण्याचें बंद होतें. या

मुळें मालाचा पुरवठा कमी होतो व शिल्लक मालाला मागणी जास्त झाल्यामुळें त्याची किंमत वाढते. यामुळें कारखानदारांचा नफा वाढतो. शिवाय कांहीं दिवस कारखान्याला व सर्व यंत्रांना विश्रांति दिल्यासारखें होतें. सारांश, थोड्या दिवसांच्या संपापासून कारखानदारांचें म्हणण्यासारखें नुकसान होत नाहीं. झाला तर फायदाच होतो. मात्र मजुरांच्याकडे पाहिलें म्हणजे त्यांचें फार नुकसान होतें. संपाचे दिवस त्यांना बिनमजुरीशिवाय काढावे लागतात. म्हणजे त्यांना आपली पूर्वीची असेल नसेल ती शिल्लक; खर्च करावी लागते किंवा कर्ज काढावें लागतें व अर्धपोटीं राहून मुलाबाळांची आबाळ करावी लागते. बरें, इतकें करून संप सिद्धीस न गेला तर त्यांची जास्तच दैन्यावस्था होते व मग कारखानदार सांगतील त्या अटीवर कामावर जावें लागतें किंवा तो धंदा किंवा गांव सोडून दुसऱ्या धंद्यांत किंवा गांवांत जावें लागतें. बरें, संप सिद्धीस गेला अशी कल्पना केली तरी पण एकंदर मजुरांचें झालेलें नुकसान त्यानें भरून येत नाहीं. समजा, संप चार आठवडे चालला, तर या चार आठवड्यांच्या सबंध मजुरीचें नुकसान भरून येण्यास वाढलेले मजुरीचे दर वर्षभर रहावे लागतात. परंतु धंद्याची भरभराट राहिली तर असे दर आपोआपच वाढले असते. परंतु धंद्याची मंदी होत चालली असली तर पुनः दर कमी होणारच.

संप अगदीं विकोपास जाऊन कारखानदारांचें सर्व भांडवल नाहींसें झालें व त्यांची यंत्रसामग्रीही खराब झाली तर तो धंदाच देशांतून नाहींसा होईल व मग मजुरांना मजुरी मिळण्याचें एक साधनच कमी होईल. सारांश, संपाचे सांपत्तिक परिणाम नेहमीं देशाला व मजूरवर्गाला अनिष्टच होतात, असें पुष्कळ अर्थशास्त्रकारांनीं दाखविलें आहे व त्यांत बराच तथ्यांश आहे हें वाचकांच्या तेव्हांच ध्यानांत येईल.

कांहीं अर्थशास्त्रकारांनीं संपाचें वैयर्थ्य तात्विकदृष्ट्या दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, संपाचा उद्देश मजुरीचा दर वाढविण्याचा असतो. आतां मजुरीचा सामान्य दर लोकसंख्या व भांडवल यांवर अवलंबून असतो. व संपाच्या योगानें या दोहोंपैकीं कोणत्याच बाबतींत फरक होत नाहीं. उलट कांहीं लोक रिकामे बसतात व बाकीच्यांना मजुरी जास्त मिळण्याचा संभव असतो. परंतु समजा, संपाच्या योगानें एका धंद्यांतील मजुरांच्या मजुरीचे दर

वाढले, तर या धंद्यांत देशांतील भांडवल जास्त जाईल. म्हणजे त्या मानानें देशांतील भांडवल इतर धंद्यांना कमी होणार, म्हणजे इतर धंद्यांतील मजुरीचे दर उतरले तरी पाहिजेत. म्हणजे मजुरीचा सामान्य दर कायमच राहिला. मात्र एका धंद्यांतील मजुरांनीं आपल्या वर्गाच्या दुसऱ्या मजुरांच्या हातचा घास काढून घेतला. म्हणजे त्यांनीं कारखानदारांचें कांहीं एक नुकसान केलें नाहीं किंवा त्यांच्या नफ्यांत कांहींएक कमीपणा आला नाहीं. म्हणून मजुरांच्या संपाचा प्रयत्न हा सर्वथा आत्मघातकीपणाचा प्रयत्न आहे व त्याच्या योगानें मजुरीचा सामान्य दर वाढविणें अशक्य आहे. ज्याप्रमाणें आपल्या मानवी प्रयत्नानें सृष्टिशक्तीमध्यें भर घालतां येणें अशक्य आहे, त्याप्रमाणेंच अर्थशास्त्राच्या नियमांतही फरक करतां येणें अशक्य आहे.

वरील कोटिक्रमांत मजुरीफंड ही वादग्रस्त बाब गृहीत धरली आहे हें वाचकांच्या तेव्हांच ध्यानांत येईल, व त्यावरून या कोटिक्रमांतील हेत्वाभासही सहज ध्यानांत येईल. कोणत्याही देशांत कांहीं एक ठराविक भांडवल मजुरींमध्यें खर्च झालेंच पाहिजे असा कांहीं नियम नाहीं. तसेंच धंद्याची भरभराट असली म्हणजे कारखानदारांना नफा पुष्कळ मिळत असतो व जर मजुरांनीं संप करून तो यशस्वी होऊन त्यांची मजुरी वाढली तर ती नफ्याच्या भागांतून वाढेल. त्याचेयोगानें दुसऱ्या धंद्यांतील मजुरी कमी झालीच पाहिजे असें होत नाहीं.

वरील विवेचनावरून संपापासून सामान्यतः नुकसानच जास्त होतें असें म्हणणें प्राप्त आहे. संप हा मुळीं संपत्तीच्या नाशाचाच एक मार्ग आहे, हें उघड आहे. कारण संपामध्यें संपत्तीच्या उत्पत्तीच्या कारणांची विसकटा विसकट होते. ज्याप्रमाणें इंजिनचीं चाकें एकमेकांपासून विलग झालीं म्हणजे इंजिन बंद पडलेंच पाहिजे, त्याप्रमाणें श्रम व भांडवलांच्या बेबनावामुळें संपत्तीच्या उत्पादनाचें प्रचंड यंत्र बंद पडलें पाहिजे. व याचा परिणाम देशांतील सांपत्तिक स्थितीवर अनिष्ट झालाच पाहिजे हें उघड आहे. परंतु एखादें विष प्राणघातक असलें तरी त्याचा अल्पप्रमाणांत व शरीराच्या रोगग्रस्त स्थितींत योग्य तऱ्हेनें उपयोग केल्यास तें विषही उपकारकच होतें, तीच स्थिति संपाची आहे. देशांतले कारखानदार फारच स्वार्थी झालेले असले, देशांतील कायदे मजुरांना प्रतिकूल व कारखानदारांना अनुकूल असले व एकंदर समाजांतील लोकमत उद्योगधंद्यांत

तटस्थवृत्तीचें असलें ह्मणजे मजूरवर्गाच्या साहजिक विस्कळतेमुळें व कारखानदारांच्या साहजिक एकोप्यामुळें मजुरीचे दर वाजवीपेक्षां कमी राहूं शकतात. म्हणजे अशा स्थितींत चढाओढीचे परिणाम दुर्बलांवर अनिष्ट होतात. अशा वेळीं संपाखेरीज गत्यंतर नसतें; ह्मणजे आणीबाणीच्या व एका दृष्टीनें संपत्तीला हानिकर अशा उपायांची योजना करण्याची आवश्यकता असते व या जालीम उपायांचा अशा वेळीं उपयोगही होतो. तोच उपयोग संपाचा होतो असें ह्मणणें भाग आहे. अनिष्टापासून इष्ट निष्पन्न होतें अशी जी इंग्रजींत ह्मण आहे तिचें प्रत्यंतर या ठिकाणीं येतें.

औद्योगिक क्रांतीच्या अव्वल अमदानींत कारखानदारांना ताळ्यावर आणण्यास या संपाचा अप्रत्यक्ष उपयोग झालेला आहे. ह्मणजे जो संप होई तो यशस्वी होईच, किंवा मजुरांच्या मागण्या त्यांत कबूल केल्या जातच, असांतला भाग नाहीं. प्रत्येक संपाचे सांपत्तिक परिणाम अनिष्टच होतात. परंतु एका संपाचा परिमाम कारखानदाराच्या व मजुरांच्या भावी संबंधांत चांगल्या तऱ्हेनें दिसून येतो. ज्याप्रमाणें गुन्ह्याला शिक्षा दिली असतां घडलेल्या गुन्ह्यापासून व्यक्तीचें अगर समाजाचें झालेलें नुकसान भरून येत नाहीं, पण या शिक्षेचा असल्या गुन्ह्यांच्या प्रतिबंधाला उपयोग होतो, त्याचप्रमाणें संपाचा कारखानदारांच्या भावी वर्तनावर सुपरिणाम होतो. आपण मजुरांच्या वाजवी मागण्या व गाऱ्हाणीं यांचा योग्य विचार केला नाहीं तर संप होईल, ही भीति कारखानदारांना असते व या संपाच्या भीतीनें कारखानदार मजुरांच्या वाजवी मागण्यांचा योग्य विचार करून तंट्याचें मूळ वेळींच काढून टाकतात, ह्मणजे संपाचा प्रसंगच येत नाहीं. तेव्हां संपापासून जो कांहीं हितकर परिणाम होत असतो तो प्रत्यक्ष संपापासून न होतां त्याच्या भीतीपासून होतो असें म्हणणें प्राप्त आहे.

सांपत्तिकदृष्ट्या हानिकारक अशा संपांचा दुसरा सुपरिणाम मजुरांवर होतो. तो सुपरिणाम म्हणजे त्यांना सहकारित्वाच्या तत्वाचें व एकजुटीनें कामें करण्याच्या तत्वाचें महत्व व फायदा कळूं लागतो हा होय. औद्योगिक क्रांतीच्या अव्वल अमदानींत पुष्कळ संप झाले व त्यांपैकीं पुष्कळ निष्फळ झाले. हे निष्फळ होण्याचें कारण जुटीचा व सहकारितेचा अभाव होय. असें मजुरांच्या ध्यानांत येऊं लागलें व जुटीची व सहकारितेची आवश्यकता त्यांना भासूं लागली

व या जाणिवेचाच परिणाम पुढील दोन भागांत वर्णावयाच्या स्वावलंबी उपायांत झाला. तेव्हां संघापेक्षां जास्त हितकर अशा उपायांचा विचार पुढील दोन-तीन भागांत करूं.

---

# भाग तेरावा.

## मजुरांचे संघ व त्यांची उपयुक्तता.

"कलौ संघे शक्तिः" या संस्कृत म्हणीची सत्यता अर्वाचीन काळच्या औद्योगिक बाबतींत उत्तम रीतीनें दिसून येते. कारण अर्वाचीन काळीं उद्योगाच्या कामीं रुढीचें, कायद्याचें किंवा चालीचें प्राबल्य नाहींसें झालें आहे व सर्व ठिकाणीं चढाओढीच्या तत्वाचा अंमल सुरू झाला आहे. या चढाओढींत व हल्लींच्या काळच्या तीव्र जीवनार्थकलहांत एकएकट्या व्यक्तीचा निभाव लागणें दुरापास्त झालें आहे. म्हणून सर्व वर्गांमध्यें व धंदेवाल्यांमध्यें संघाची प्रवृत्ति दिसून येत आहे.

मजुरांच्या संघाची संस्था ही इंग्लंडमध्यें प्रथमतः प्रादुर्भूत झालेली आहे. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, प्रचंड कारखान्यांच्या पद्धतीनें इंग्लंडांत मजुरांचा मोठा समुदाय अस्तित्वांत आला व कारखानदार व मजूरदार यांच्यामध्यें औद्योगिक कलह उत्पन्न होऊं लागले. त्यामुळेंच संपाचे प्रसंग वारंवार येऊं लागले. पुष्कळ वेळां एकोप्याच्या व जुटीच्या अभावामुळें संप सिद्धीस जात नाहीं हें मजुरांच्या ध्यानांत येऊं लागल्यासून इंग्लंडांतील मजूर आपली स्थिति सुधारण्याकरितां जास्त व्यवस्थित तऱ्हेचे प्रयत्न करूं लागले. मजुरांच्या संघाची संस्था हें या प्रयत्नांचें दृश्य फळ होय.

आपल्या धंद्यांतील हिताच्या संरक्षणाकरितां व कारखानदारांशीं असलेला आपला संबंध नियत करण्याकरितां स्थापन झालेल्या मजुरांच्या मंडळ्यांना मजुरांचे संघ म्हणतात. अशा प्रकारचे संघ इंग्लंडांत पूर्वीं कायदेशीर नव्हते; परंतु १८२४।२५ मध्यें संघांचे प्रतिबंधक कायदे रद्द करण्यांत आले, तेव्हांपासून हे मजुरांचे संघ अस्तित्वांत येऊं लागले व त्यांची फारच वाढ झाली. तेव्हां

१८६७।६८ मध्यें या संस्थांची स्थिति पाहण्याकरितां एक कमिशन नेमलें गेलें व त्या कमिशनांतील अल्पसंख्याकांच्या रिपोर्टाप्रमाणें पुढें १८७१।७२ मध्यें मजुरांच्या संघाचे कायदे झाले. तेव्हांपासून या संस्थांना कायदेशीर स्वरूप येऊन त्यांना बंधुसमाजाच्या कायद्यांचा फायदा मिळूं लागला. या पुढील काळांत तर संघांची संख्या अतोनात वाढली. बहुतेक प्रत्येक धंद्यांतील मजुरांचे संघ बनले व मोठमोठ्या कारखान्यांतील नोकरांचे संघ होऊं लागले. निवळ सांगकाम करणाऱ्या व रोजमजुरी करणाऱ्या मजुरांनीं सुद्धां आपले संघ केले. सारांश, देशांतील सर्व मजूरवर्गामध्यें आपली स्थिति सुधारण्याची जाणीव उत्पन्न होऊन जो तो मजुरवर्ग त्यासंबंधीं संघटित प्रयत्न करूं लागला. हल्लीं या मजुरांच्या संघाचें महत्व व प्रस्थ इंग्लंडांत फारच आहे. या संघांनीं आपल्या बाजूचे प्रतिनिधि पार्लमेंटांत पाठविण्याची सुरुवात केली आहे. गेल्या दोन पार्लमेंटांपासून मजुरांचा एक स्वतंत्र पक्ष इंग्लंडांत झाला आहे व त्याचें वजन दिवसेंदिवस वाढत आहे हें इंग्लंडाच्या अर्वाचीन इतिहासाची माहिती असणारांस नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं.

या मजुरांच्या संघाचा दुहेरी हेतु असतो. पहिला हेतु आपल्या हिताचें रक्षण करणें हा. यांत मुख्यतः दोन गोष्टींचा समावेश होतो. कारखानदारांकडून वाटाघाटीनें आपली मजुरी वाढवून घेणें, निदान ती कमी होऊं न देणें. दुसरी किमानपक्ष मजुरी ठरविणें व कामाचे तास कमी करून घेणें. हा या संघाचा मुख्य हेतु झाला. परंतु या हेतुबरोबरच दुसराही एक गौण हेतु सर्व संघांच्या कार्यक्रमांत येतो. तो हेतु म्हणजे या संघापासून बंधुसमाजासारखे फायदे करून घेणें. उदाहरणार्थ, और्ध्वदेहिकासंबंधींच्या खर्चास मदत देणें, आजारांत किंवा अपघातांत मदत देणें, काम न लागतां आळसांत रहावें लागल्यास त्या वेळीं मदत देणें, वयातीतपणामुळें काम होईनासें झालें म्हणजे मदत देणें, वगैरे प्रकारचे पुष्कळ लाभ या संघांच्या हेतूमध्यें नमूद केलेले असतात. व या संस्था या प्रत्येक हेतूच्या निध्यर्थ सभासदांकडून निरनिराळी वर्गणी घेतात व या सर्व प्रसंगीं सभासदांना मदत करितात.

या संघांची रचना व व्यवस्था प्रतिनिधींच्या संस्थांच्या नेहमींच्या रचनेप्रमाणें व व्यवस्थेप्रमाणें असते. म्हणजे सर्व सभासदांचा मिळून एक संघ अगर

सभा होते. त्यांतून चिटणीस, अध्यक्ष, उपाध्यक्ष, ट्रेझरर निवडतात व शिवाय संघाची एक व्यवस्थापक कमिटीही असते. संघाच्या कामगारांना पगार देतात किंवा ते मोफत काम करतात. संघाचा सर्व व्यवहार हे कामगार पहातात. कारखानदारांशीं मध्यस्थी करण्याचें काम कमिटीचें व त्यांतील कामगारांचें असतें. कारखानदारांच्या व मजुरांच्या मनांत अंतर पडून तंट्याचें बीज सलोख्यानें मिटलें नाहीं तर मग संप करण्याचा ठराव करणें हें काम कमिटीकडे असतें व बऱ्याच संघांत हें काम संघाच्या सर्व सभासदांच्या बहुमतावर अवलंबून असतें. परंतु संप बंद करण्याचा अधिकार कमिटीस असतो. संघाचें काम चालविण्याकरितां व संघाच्या निरनिराळया हेतूंच्या सिध्यर्थ संघाचें भांडवल जमवावें लागतें. हा पैसा प्रवेशफी व वर्गण्या यांपासून उत्पन्न करतात. या बाबतींत निरनिराळया संघांच्या नियमांत पुष्कळ फेरफार दिसून येतो. प्रवेशफी कोठें पुष्कळ असते तर कोठें फार कमी असते. सहा पेन्सांपासून तों दोन शिलिंगांपर्यंत व केव्हां केव्हां एक पौंडापर्यंतही प्रवेशफी असते. वर्गण्या दर आठवड्याच्या, पंधरवड्याच्या, महिन्याच्या किंवा तिमाही असतात. या बाबतींत संघासंघांमध्यें पुष्कळ वैचित्र्य असतें. आठवड्याची वर्गणी एक पेन्सापासून दोन अडीच शिलिंगांपर्यंत असते. वर्गणी व प्रवेशफी गोळा करणें, ती पेढ्यांतून किंवा इतर ठिकाणीं सुरक्षितपणें ठेवणें, तिचा कमिटीच्या ठरावाप्रमाणें विनियोग करणें व त्यांतून सभासदांना मदत करणें हीं सर्व कामें कामदारांचीं असतात. शिवाय संघाचे फायदे मजूरवर्गास समजावून देणें, या तत्वाचा प्रसार करणें व संघाला नवीन नवीन वर्गणीदार व सभासद मिळवून देणें इत्यादि कामें संघाच्या कामदारांना करावीं लागतात व म्हणून असे कामदार बहुधा ( सभासदांपैकींच ) भरपगारी लोक नेमलेले असतात.

या संस्था इंग्लंडमध्यें आतां अगदीं बद्धमूल झालेल्या आहेत. त्यांचा प्रसार सर्व लहानमोठ्या धंद्यांत आणि कारखान्यांत व सरकारच्या व म्युनिसिपालिट्यांच्या निरनिराळ्या खात्यांच्या नोकरांत झालेला आहे; इतकेंच नव्हे तर या सर्व संघांची वार्षिक परिषदही भरविण्याचा प्रघात पडलेला आहे. अशी पहिली परिषद् १८६८ सालीं भरली होती व ती फार यशस्वी झाल्यापासून सालोसाल सर्व संघांच्या प्रतिनिधींची एक परिषद इंग्लंडांतील एखाद्या शहरीं दर वर्षास भरते.

या परिषदेचा उद्देश सर्व संघांच्या सामान्य हिताकडे लक्ष देणें व पार्लमेंटाकडून आपल्याला अनुकूल असे कायदे करवून घेणें किंवा अस्तित्वांत असलेल्या कायद्यांत सुधारणा घडवून आणणें हा होय. या कामाकरितां परिषद दर वर्षास एक पार्लमेंटरी कमिटी नेमिते व पार्लमेंटांतील सभासदांना भेटून व इतर प्रकारची चळवळ करून मजुरांच्या गाऱ्हाण्यांचा प्रश्न पार्लमेंटापुढें आणणें हें या कमिटीचें काम असतें. या परिषदेला प्रत्येक संघ आपल्या सभासदांच्या संख्येच्या मानानें कांहीं ठरीव प्रमाणावर आपले प्रतिनिधि पाठवितो. या परिषदेमध्यें अलीकडे सामाजिक पंथाच्या मताची पुष्कळ छाप दिसून येऊं लागली आहे व संघाच्या कांहीं प्रतिनिधींनीं पुष्कळ सामाजिक पंथी कल्पनांचा स्वीकार केला आहे. परंतु एकंदरींत या संघामध्यें स्वावलंबनवादी लोक जास्त आहेत व ह्मणून इतर देशांप्रमाणें इंग्लंडांत समाजपंथी लोकांचें फारसें बंड नाहीं.

येथपर्यंत मजूरसंघाच्या स्वरूपाचें व त्यांच्या कामाचें विवेचन केलें. आतां या संस्थांपासून मजुरवर्गावर काय काय परिणाम झाले आहेत व ही संघाची संस्था कितपत फायदेशीर आहे याचा विचार करावयाचा राहिला.

वर सांगितलेंच आहे कीं, इंग्लंडच्या जुन्या कायद्याप्रमाणें या संस्था बेकायदा होत्या. ते जुने कायदे रद्द झाल्यापासून हे संघ अस्तित्वांत येऊं लागले. प्रथमतः या संघांबद्दल लोकांत बराच गैरसमज उत्पन्न झाला व या संघांवर पुष्कळ प्रकारचे आक्षेप आले. या संघांनीं मजूर व कारखानदार यांच्यामधील प्रेम व सलोखा नाहींसा होईल; यांनीं संपाला जास्त उत्तेजन मिळेल; याच्यायोगानें मजूरवर्ग बेपर्वा, बेमुर्वतखोर व शिस्तीला न जुमानणारा असा होईल; अशा तऱ्हेनें कारखानदार व मजूर यांच्यांतील संबंधांत बिघाड झाल्यामुळें धंद्याचें नुकसान होऊन देशाची सांपत्तिक स्थिति खालावेल; व शेवटीं ज्या उद्देशानें हे संघ निघाले आहेत तो उद्देश ह्मणजे मजुरीची वाढ व कामाच्या तासांचा संक्षेप हा कधींही सिद्धीस जाणार नाहीं; हे व अशाच तऱ्हेचे आक्षेप या संघांविरुद्ध निघूं लागले. ह्मणूनच या संघांच्या औद्योगिक व सामाजिक परिणामांचें खरें स्वरूप काय आहे हें ठरविण्याकरितां १८९८ चें कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशनच्या रिपोर्टांत या बाबतींत निश्चित असें विधानें सांपडत नाहींत. कारण साक्षीदारांनीं परस्परविरोधी असा पुरावा दिला आहे. परंतु एकंदरींत या संघापासून

पुष्कळ हित झालें आहे असा सामान्य अभिप्राय त्या कमिशननें दिला व त्यामुळें या संस्थेला तेव्हांपासून जोर आला. आतां आपण वर निर्दिष्ट केलेल्या आक्षेपांचा थोडक्यांत विचार करूं.

प्रथमतः संप व संघ यांचा संबंध काय आहे हें पाहिलें पाहिजे. संघाच्या संस्थांनीं संप वाढले किंवा कमी झाले, ही गोष्ट निवळ आंकड्यांनीं शाबीद करणें कठिण आहे. परंतु आंकड्यांवरून जर कांहीं शाबीद होत असेल तर तें हें कीं, संघाच्या योगानें संपांची संख्या कमी झाली आहे. आपले संप जुटीच्या अभावानें न मोडावे व ते यशस्वी करतां यावे अशा उद्देशानें हे संघ निघाले हें खोटें नाहीं. तेव्हां संघाचा उद्देशच जर संप करण्याचा आहे तर संघांनीं ते संप वाढलेच पाहिजेत असा कोटिक्रम कोणी पुढें आणील; परंतु तो वस्तुस्थितीस धरून नाहीं असें दिसून येईल. सामादि सर्व मार्ग खुंटले म्हणजे संप करावयाचा असा संघांचा नियम आहे. परंतु संघाच्या योगानें असे प्रसंगच कमी येतात. कारण ज्यांच्यामध्यें व्यवस्थित रचना नाहीं अशा बाजारबुणग्यांसारख्या मजुरांशीं कारखानदारांना वाटाघाट करतां येणें कठिण असतें व अशा स्थितींत मजुरांचें समाधान होत नाहीं. परंतु संघासारखी संघटित व्यवस्था असली म्हणजे कारखानदारांना संघाच्या कामदारांशीं शांतपणें वाटाघाट करण्यास सुलभ जातें. शिवाय संघाचे प्रतिनिधि जे कामदार ते मजुरांपेक्षां जास्त विचारी व शहाणे असल्यामुळें आपल्या मागण्या कितपत वाजवी आहेत हें त्यांच्या ध्यानांत लवकर येतें. सारांश, या संघांनीं कारखानदार व मजूर यांमधील संबंधाचा बिघाड झाला नाहीं, इतकेंच नव्हे तर तो संबंध जास्त व्यवस्थेचा व जास्त हितकारक झाला आहे असेंच म्हटलें पाहिजे. कारण कारखानदार व मजूर यांमधील दळणवळण वाढण्यास व गैरसमज कमी होण्यास एक नवीन मार्ग निघाला व तो मार्ग संघाची कमिटी होय. यामुळें हल्लींच्या काळीं पुष्कळ तंटयांचा व तक्रारींचा निकाल सामोपचारानें व सलोख्यानेंच होतो. यावरून संघाची संस्था ही संपाची उत्तेजक नसून प्रतिबंधकच आहे यांत शंका नाहीं.

आतां दुसरा प्रश्न असा आहे कीं, संघाच्या संस्थांनीं मजुरांची मजूरी वाढली काय? व या संस्थांचा परिणाम मजुरीच्या वाढींत झालाच पाहिजे काय? आंकडयांवरून संघाच्या संस्थेपासून इंग्लंडांत मजुरी वाढली आहे असें दिसतें;

परंतु संघाच्या विरोधकांचें असें ह्मणणें आहे कीं, या काळांत इंग्लंडमध्यें धंद्यांची भरभराट झाल्यामुळें मजुरी वाढली आहे; ती संघाच्या परिश्रमानेंच वाढली आहे असें म्हणण्यास सबळ आधार नाहीं. परंतु याला प्रत्युत्तर असें आहे कीं, ज्या धंद्यांत संघांचा प्रसार पुष्कळ झाला आहे त्याच धंद्यांत मजुरी वाढली आहे व ज्या धंद्यांत संघांचा प्रसार नाहीं तेथें मजुरी वाढली नाहीं. या प्रत्यक्ष अनुभवावरून असें ह्मणणें प्राप्त आहे कीं, संघांच्या परिश्रमानें मजुरींत थोडी तरी वाढ झाली असली पाहिजे. तात्विकदृष्ट्या विचार करतां संघानें मजुरींत थोडी तरी वाढ झालीच पाहिजे. कारण मजुरांच्या संघामुळें कारखानदार लोकांवर एक प्रकारचा दाब राहतो. नवशिक्या माणसाला धंद्यांत घेतला जात नाहीं. तसेंच कामासंबंधीं पुष्कळ नियम हे संघ करतात व आपल्या सभासदांना पाळावयास लावतात; यामुळेंही मजुरांची कर्तबगारी वाढते व संपत्ति जास्त उत्पन्न झाल्यानें मजुरांना तिचा थोडासा वांटा मिळतो. शिवाय संघादि कृत्रिम उपायांनीं व प्रयत्नांनीं मजुरी वाढणें शक्य नाहीं हें विधान मजुरीफंडाच्या कल्पनेवरून काढलेलें आहे व मागें आपण या कल्पनेंतील खोटेपणा दाखविला आहे; त्यावरून मजुरांच्या परिश्रमानें नफ्याचा कांहीं भाग मजुरांस मिळणें शक्य आहे. कारण एकएकटा मजूर चढाओढींत चिरडला जातो व कारखानदार फार नफा मारतात. परंतु संघाच्या योगानें त्यांना चढाओढींत जास्त शक्ति येते व ह्मणून मजुरांना किफाइतशीर करार करून घेतां येतात. तेव्हां संघापासून मजुरीच्या वाढीच्या बाबतींत मजुरांचा कांहीं तरी फायदा होतो असें म्हणणें भाग आहे.

मजुरी कायम ठेवण्याच्या अगर वाढविण्याच्या हेतूइतकाच महत्वाचा उद्देश कामाचे तास कमी करून घेण्याचा आहे व याही बाबतींत मजुरांचे संघ आपला हेतु प्रथमतः सामोपचारानें, विनंतीनें व सलोख्यानें घडवून आणण्याचा प्रयत्न करतात व हे सर्व प्रयत्न निष्फळ झाले तर संपाचा विचार करतात. याही बाबतींत असें दाखविण्यास पुष्कळ पुरावा आहे कीं, गेल्या तीस चाळीस वर्षांत इंग्लंडमध्यें कामाचे तास सारखे कमी होत आहेत व ही गोष्ट मजूरसंघाच्या श्रमानें घडून आली आहे असें मजूरपक्षाचें ह्मणणें आहे. या प्रश्नाबद्दल वाढतें लोकमत व कारखान्याचे कायदे यांनींही मदत केली आहे यांत शंका नाहीं. परंतु

मजूरसंघाच्या प्रयत्नांनीं कांहीं अंशीं ही इष्ट गोष्ट घडून आली आहे. याचें उत्तम प्रत्यंतर असें आहे कीं, ज्या धंद्यांत अजून मजूरसंघ चांगल्या तऱ्हेनें प्रस्थापित झालेले नाहींत त्या धंद्यांत कामाचे तास कमी झाले नाहींत. तेव्हां मजूरसंघाच्या ऱ्या यशस्वी कृतीनें मजुरांची स्थिति सुधारली आहे यांत शंका नाहीं. व धंद्यास अपाय न होतां आणखी कामाचे तास कमी करतां आले तर तें इष्ट आहे असें सर्वसाधारण मत आहे. ठरलेल्या वेळाच्या पुढें कोणत्याही मजुरानें काम करतां कामा नये, या नियमाबद्दल मात्र पुष्कळ मतभेद आहे. या नियमानें हुशारी व मेहनती मजुरांची जास्त मजुरी मिळविण्याची संधि नाहींशी होते. परंतु यावर उत्तर असें आहे कीं, हा नियम हितकर आहे. कारण याच्यायोगानें साधारण मनुष्यांचा तोटा न होतां मेहनती मजुरांनाही जास्त मजुरी मिळविण्याच्या बुद्धीनें आपल्या शक्तीबाहेर श्रम करण्याचा जो मोह उत्पन्न होण्याचा संभव असतो त्यापासून त्यांची मुक्तता होते.

मजूरसंघाच्या दुसऱ्या कार्यक्रमाच्या उपयुक्ततेबद्दल तर वादच नाहीं. मजुरांच्या हिताकरितां जे निरनिराळे फंड मजूर-संघ बनवितात, त्यांनीं मजुरांची सांपात्तिक स्थिति किती तरी सुधारली आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. कुटुंबांतील मनुष्य मेल्यास त्याच्या और्ध्वदेहिकास पैशाची मदत करणें, मजुराला अपघात झाल्यास अगर तो आजारी पडल्यास त्याला दर आठवडयाच्या आठवड्यास पैशाच्या रूपानें मदत करणें, काम न मिळाल्यास अशी मदत करणें, तसेंच ज्या ठिकाणीं मजुरीचे दर चांगले आहेत अशा ठिकाणीं जाण्यास उत्तेजन देणें व शेवटीं मजुरांना वयातीतपणाबद्दल पेन्शन अगर देणगीवजा एकदम कांहीं रक्कम देणें या गोष्टी मजुरांची स्थिति सुधारतात व त्यांना अडचणींतून सोडवितात हें उघड आहे. व या सर्व गोष्टी मजूर खरोखरी आपल्याच पैशानें करतो. ज्याप्रमाणें आयुष्याचा विमा उतरल्यापासून लोकांचें फार कल्याण होतें, त्याचप्रमाणें अशा प्रकारच्या तरतुदीनेंही होतें. यावरून मजूरसंघाच्यायोगानें मजुरांमध्यें काटकसर, दूरदर्शीपणा व स्वावलंबन या गुणांचा किती प्रसार झाला आहे हें दिसून येईल.

तसेंच कारखान्यांबद्दलच्या कायद्यांची अंमलबजावणी होत आहे किंवा नाहीं यावर देखरेख करण्याचें काम व या कायद्यांचें कोठें उल्लंघन होत असल्यास ती

गोष्ट सरकारी अधिकाऱ्यांच्या नजरेस आणण्याचें कामही या संघाच्या संस्थेच्या हातून चांगल्या प्रकारें होतें व ही गोष्टही मजुरांच्या फार फायद्याची आहे.

येथपर्यंत मजूरसंघाचे औद्योगिक व सांपत्तिक फायदे सांगितले व मजूरसंघाच्या योगानें मजुरामध्यें काटकसर इत्यादि गुण कसे वाढतात हें दाखविलें. परंतु मजूरसंघानें मजुरांची एकंदर दानत कशी सुधारते व त्यांचे बौद्धिक गुण कसे वाढतात तें आतां पहावयाचें आहे.

कांहीं संघ आपल्या सभासदांकरितां शिक्षणविषयक सोयी करितात. उदाहरणार्थ, सभासदांकरितां व्याख्यानें करणें, पुस्तकसंग्रह जमविणें वगैरे प्रत्यक्ष शिक्षणाचीं कामें कांहीं संघांनीं हातीं घेतलीं आहेत. परंतु या संघाचा अप्रत्यक्ष फायदा फार मोठा आहे. आधीं या संघाचा सभासद झाल्यानें ठरलेले नियम व व शिस्त पाळणें, आपल्या पुढाऱ्यांना मान देऊन त्यांवर निष्ठा ठेवणें, सभासदांमधील एकमेकांवर विश्वास ठेवण्यास शिकणें वगैरे गुणांचा मजुरांत विकास होतो व मोठमोठ्या संघाचें काम यशस्वी तऱ्हेनें चालविल्यानें मजुरांतील पुढाऱ्यांत कार्यकुशलता उत्पन्न होते व यायोगानें म्युनिसिपालिटी, कौन्टीकौन्सिल व त्यापेक्षांही जबाबदारीचीं कामें करण्याची शक्ति मजूरवर्गांतील लोकांस येते. याचें प्रत्यंतर इंग्लंडच्या हल्लींच्या पार्लमेंटावरून दिसून येतें. त्यामध्यें मजूरवर्गांतील लोक प्रधानाच्या पदवीप्रत पोंचल्याचीं उदाहरणें आहेत.

सारांश, मजूरसंघ हें मजुरांचें एक स्थानिक स्वराज्यच आहे व या राजकीय शाळेंत त्यांना राजकीय शिक्षणाचे, व्यापारी शिक्षणाचे व कार्यकुशलतेचे पहिले धडे शिकतां येतात व त्यापासून मजूरसुद्धां प्रजासत्ताक राज्यांतील जबाबदारीचीं कामें अंगावर घेण्यास पात्र होतात.

याप्रमाणें मजूरसंघापासून मजूरवर्गाची सांपत्तिक, राजकीय, नैतिक व सामाजिक अशी सर्वांगांनीं उन्नति झाली आहे व आणखीही होत राहील, यांत शंका घेण्याचें कारण नाहीं.

मजूरसंघाच्या कांहीं कांहीं नियमांनीं उद्योगधंद्यांच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होण्याची भीति आहे. व अशा रीतीनें उद्योगधंद्यास धक्का पोंचला असतां त्यानें मजुरांच्या सांपत्तिक स्थितीलाही धोका पोंचला पाहिजे हें उघड आहे. परंतु यांतील पुष्कळ नियम हे अज्ञानाचे परिणाम आहेत. मजुरांचें यथार्थ ज्ञान

वाढलें ह्मणजे हे नियम काढून टाकण्याची त्यांना बुद्धीही होईल. उदाहरणार्थ, एखाद्या धंद्यांत किती मजूर उमेदवार ह्मणून घ्यावे यासंबंधीं कडक नियम कांहीं मजूरसंघांनीं केलेले आहेत. अशा तऱ्हेच्या धोरणानें केव्हां केव्हां धंद्याच्या वाढीस अडथळा होईल हें खरें आहे. तसेंच नवीन यंत्राची कारखान्यांत योजना करण्यासंबंधींही कांहीं कांहीं संघ फार विरोध करितात हीही गोष्ट एकंदर धंद्याच्या प्रगतीस अडथळा करणारीच आहे. परंतु अशा प्रकारच्या गोष्टी थोड्या आहेत व मजुरांमध्यें धंद्यासंबंधीं व अर्थशास्त्राच्या नियमासंबंधीं खरें ज्ञान जसजसें वाढेल तसतसे असले अज्ञानमूलक उपाय हे संघ स्वीकारणार नाहींत यांत शंका नाहीं.

# भाग १४ वा.

## सहकारिता.

संघाच्या कल्पनेप्रमाणें सहकारितेची कल्पनाहि प्रथमतः इंग्लंडांतच निघाली. ज्या तत्त्वानें सर्व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें मोठी सुधारणा घडवून आणिली व ज्याची छाप पुष्कळ औद्योगिक चळवळींत दिसून येते, त्या तत्वाचा उगम एका लहानशा शहरांत झाला व तो अगदीं आकस्मिक कारणांनीं झाला, हें पाहिलें ह्मणजे त्याबद्दल मोठें आश्चर्य वाटतें. १८४० च्या सुमारास रॉचडेल हें शहर एक साधारण प्रतीचें गांव होतें व तेथल्या फलाणीच्या कारखान्यांतील विणकरांची व्यापाराच्या मंदीनें फार हलाकी झाली होती. त्यांची मजुरी त्यांना जेमतेम पुरत असे. अशा संकटसमयीं कांहीं विणकरांच्या मनांत अशी कल्पना आली कीं, किराणा जिनसाचे व्यापारी आपल्यापासून फार किंमत घेऊन मालही वाईट व घाणेरडा देतात, त्या अर्थी आपला एक किराणा जिनसाचा डेपो काढावा ह्मणजे आपल्याला माल चांगला मिळून किंमत बेतानें पडेल. हा विचार पसंत झाला, व २८ विणकरांनीं २८ पौंड भांडवल जमविलें. हें भांडवल एकदम त्यांना उभारतां आलें नाहीं. परंतु प्रत्येक माणसाचा १ पौंडाचा भाग असें ठरलें व या माण-

त्यांनीं आपला रॉचडेल पायोनिअर्स म्हणून एक सहकारी डेपो काढला, व प्रथमतः घाऊक व्यापाऱ्यांकडून चहा व साखर हीं रोखीनें खरेदी करून आणलीं व आपल्या सभासदांना नेहमींच्या बाजारभावानें विकत दिलीं. या डेपोचें मुख्य तत्व म्हणजे रोखीचा व्यवहार करणें हें होय. या योगानें त्यांना माल उत्तम मिळून तो पूर्वीच्या दरानें मिळूं लागला. वर्षाच्या शेवटीं या डेपोला फारच फायदा झाला. तेव्हां विणकऱ्यांना लागणारा दुसरा मालही डेपोंत ठेवण्यांत येऊं लागला. याप्रमाणें या लहान संस्थेपासून मजुरांना फार फायदा होऊं लागला. ही बातमी जिकडे तिकडे पसरली, व ही २८ विणकऱ्यांनीं काढलेली लहानशी सहकारी तत्वावरील संस्था कालेंकरून एका स्वतंत्र संस्थानाप्रमाणें अवाढव्य व प्रचंड संस्था झाली व तिच्या शाखा पुष्कळ ठिकाणीं निघूं लागल्या. या संस्थेमधील नफा गिऱ्हाइकांना त्यांच्या विक्रीच्या मानानें दिला जात असे. बहुधा गिऱ्हाइकें आपला नफा घेऊन जात नसत; तर तो डेपोमध्यें भांडवल म्हणून घालीत. यामुळें सहकारी संस्थांचें भांडवल भराभर वाढूं लागलें. तेव्हां या डेपोच्या उत्पादकांनीं घाऊक विक्रीचें दुकान सहकारी तत्त्वावर काढलें. हीं दोन दुकानें चालवून आणखी भांडवल शिल्लक राहूं लागलें; तेव्हां त्यांनीं उत्पादक धंद्यांकडे आपलें लक्ष घातलें; मग प्रथमतः पिठाच्या गिरण्या काढून मग रोटी करण्याचे कारखाने काढले. याप्रमाणें त्यांचा प्रपंच सारखा वाढत चालला. पुढें निरनिराळ्या ठिकाणीं शाखा सुरू केल्या गेल्या. कापडाच्या गिरण्या सुरू केल्या; मालाची नेआण करण्याकरितां आपल्या मालकीच्या आगबोटी ठेविल्या. सारांश, डोंगराच्या पायथ्याशीं कोंसळणाऱ्या झुळझुळ वाहणाऱ्या लहानशा झऱ्याची पुढें मोठी वाढ चालल्यासारखी प्रचंड नदी होते, त्याचप्रमाणें या संस्थेच्या क्षुल्लक उगमापासून तिची प्रचंड वाढ होत गेली. परंतु या संस्थेच्या आश्चर्यकारक यशाचें मूळ बीज तिच्या रोखीच्या तत्वांत आहे असें दिसून आल्यावांचून राहणार नाहीं. असें, रोखीच्या व्यवहारांत बूड व कर्ज नसल्यामुळें व्यापारांत खोट येण्याचा संभवच नाहीं. दुसरें, रोखीच्या पद्धतीनें थोड्या भांडवलावर फारच मोठा व्यापार करतां येतो. असा अनुभव आहे कीं, सहकारी दुकानांत भांडवलाचें, दर वर्षांत दहा वेळ परिवर्तन होतें. म्हणजे इतर व्यापारापेक्षां यांत दसपट फायदा होतो. तिसरें, रोखीचा व्यवहार असला म्हणजे उसनवार माल विकत घ्यावा लागत नाहीं; या-

मुळें माल स्वस्त पडतो. इतकेंच नाहीं, तर बाजारांतला उत्तम मालही घेतां येतो; मजुरांची सांपत्तिक स्थिति बिघडविणारी उधारीइतकी दुसरी वाईट गोष्ट नाहीं. कारण उधारीच्या पद्धतीनें मजुरांमध्यें उधळेपणा शिरतो व मजूर व्यापाऱ्याच्या अगदीं कह्यांत सांपडतो. यामुळें त्याला एकाच व्यापाऱ्याशीं व्यवहार करावा लागतो व त्याला माल महाग पडून वाईट मालसुद्धां पत्करावा लागतो. तेव्हां सहकारी दुकानांना रोखीचें तत्व फारच फायदेशीर आहे व त्यानें मजूरवर्गाला काटकसरीचा गुण शिकविला जातो असें म्हणण्यास हरकत नाहीं.

रॉचडेल पायोनियर्सच्या आश्चर्यकारक सिद्धीनें सहकारी दुकानाचें तत्व सर्व इंग्लंडभर पसरलें. अशा तत्वावरील दुकानें सर्व शहरांतच झालीं, इतकेंच नाहीं तर लहान लहान खेड्यांतही तीं दिसूं लागलीं. इतका त्यांचा झपाटयानें प्रसार झाला. कांहीं सहकारी दुकानांत नफा तिमाहीनें न वाटितां मालाच्या कमी किंमतीच्या रूपानें दिला जात असे. परंतु ही पद्धति काटकसरीला उत्तेजक नाहीं. या संबंधांत रॉचडेलपद्धतिच जास्त हितकारक आहे यांत शंका नाहीं.

आतांपर्यंत वर्णन केलेलें सहकारी तत्त्व ह्मणजे संपत्तीच्या वांटणीसंबंधींचें झालें. परंतु हें सहकारी तत्त्व संपत्तीच्या उत्पत्तीसंबंधींही अंमलांत आणण्याचा प्रयत्न झालेला आहे. तेव्हां त्याचाही येथें थोडा विचार करणें जरूर आहे.

अर्वाचीन संपत्तीच्या उत्पादनपद्धतींत कारखानदार, भांडवलवाले व मजूर असे निरनिराळे वर्ग झालेले आहेत व समाजाच्या औद्योगिक उन्नतीबरोबर असा परिणाम होणें अपरिहार्य आहे हें मागें दाखविलें आहे. परंतु या पद्धतीमध्यें मजुरांच्या श्रमाला योग्य मोबदला मिळत नाहीं व भांडवलाला मात्र वाजवीपेक्षां जास्त मोबदला मिळतो. आतां अर्वाचीन काळीं भांडवल व श्रम यांमध्यें जो विभक्तपणा झालेला आहे तो काढून टाकण्याच्या हेतूनें उत्पादक सहकारी तत्त्व पुढें आलेलें आहे. सहकारी तत्त्वावरील कारखान्यांत मजूर, भांडवलवाले व कारखानदार असे भिन्न भिन्न वर्ग नसतात. तर मजूर आपल्याच भांडवलावर आपल्याच मार्फत कारखाने चालवितात. सारांश, ज्या कारखान्यांतील मजूर व मालक एक आहेत, ह्मणजे मजुरांना मजुरीखेरीज कारखान्याच्या नफ्यापैकींही हिस्सा मिळतो, असे कारखाने सहकारी तत्त्वावर काढलेले कारखाने होत. परंतु उत्पत्तीच्या वेळीं हल्लींच्या काळीं कारखानदारांमध्यें किती मानसिक,

नैतिक वगैरे गुण पाहिजे असतात हें मागें दाखविलें आहे, त्यावरून कारखान्यांतून भांडवलवाले काढून टाकतां येतील; परंतु कारखानदार काढतां येणार नाहींत. कारण, त्यांच्या देखरेखीशिवाय प्रचंड कारखान्याचें यंत्र बंद पडेल. मजुरांनीं सहकारी तत्त्वावर काढलेले कांहीं उत्पादक कारखाने चांगल्या तऱ्हेनें चालले आहेत हें खरें, तरी पण ही गोष्ट अपवादादाखल आहे. तरी पण एकंदरींत सहकारित्वाच्या या तत्त्वाला या उत्पादनाच्या बाबतींत म्हणण्यासारखें यश आलेलें नाहीं व यश येणें शक्यही नाहीं, हें मागील विवेचनावरून दिसून येईल. संपत्तीच्या वांटणीमध्यें मात्र हें तत्त्व फार फायदेशीर आहे व त्यापासून हितकर परिणाम झालेले आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे.

हल्लींच्या कारखान्यांच्या पद्धतीमध्यें मजुरांना कारखान्यांत मनापासून व हुरूपानें काम करण्यास विशेष हेतु नसतो. कारण त्यांची मजुरी करारानें ठरलेली असते. शिवाय कारखाने आपले असें मजूरवर्गास वाटत नाहीं. हल्लींच्या प्रचंड कारखान्यांच्या पद्धतींतील हे दोष नफ्याच्या वांटणीच्या पद्धतीनें नाहींसे केलेले आहेत. तेव्हां या नफ्याच्या वांटणीच्या पद्धतीचें थोडक्यांत याच भागांत विवेचन करणें ठीक होईल.

ज्याप्रमाणें सहकारितेची कल्पना काढण्याचा मान इंग्लंडास येतो, त्याप्रमाणें नफ्याच्या वांटणीच्या पद्धतीच्या शोधाचा मान फ्रेंच लोकांकडे जातो. फ्रान्समध्यें लेक्लेअर या नांवाचा घरें रंगविणारा होता. त्याचा धंदा पॅरिस शहरीं होता. तो आपल्या धंद्यांत ३०० मजूर लावीत असे. त्यानें असें पाहिलें कीं, मजूर हे निष्काळजी व बेपर्वा असतात. हें काम जर ते काळजीनें, कळकळीनें, हुरूपानें करतील, तर त्यांच्या या जास्त कर्तबगारीनें दररोज ६ पेन्सांचा नफा होईल व हत्यारें व रंगादिक माल यांची नासधूस व व्यर्थ खर्च न केला तर २॥ पेन्स दररोज वांचतील, असें त्यानें आंकड्यांवरून अनुमान काढलें व सर्व जादा फायदा मजुरांस देण्याचें ठरविलें. असा विचार करून त्यानें १८४२ मध्यें आपला बेत मजुरांस सांगितला. काळजीनें व हुरूपानें काम करून जो जादा नफा—दररोज ८॥ पेन्सांप्रमाणें म्हणजे दर वर्षास ११ पौंडांचा—होतो तो सर्व तुम्हांस मिळेल. मात्र तुम्हीं तो स्वतःच्या मेहनतीनें व श्रमानें मिळविला पाहिजे व मजुरांना खात्री पटण्याकरितां जागच्या जागेवर त्यानें ४४ मजुरांना—ज्यांचें काम फार काळ-

जीपूर्वक, कळकळीनें व काटकसरीनें झालें होतें त्यांना–गेल्या सालाबद्दल त्यांनीं कमावलेला जादा नफा वांटून दिला. या लेक्लेअरच्या परोपकारी कृतीनें सर्व मजुरांचा त्यावर विश्वास बसला व त्यांना रंगविण्याचा कारखाना आपला असा वाटूं लागला व तेव्हांपासून लेक्लेअरच्या कारखान्याची विलक्षण भरभराट झाली. या पद्धतीनें फक्त मजुरांचा फायदा झाला असें नाहीं–तर रंगाच्या कारखान्याचा मालक जो लेक्लेअर त्याचाही फार फायदा झाला. त्याच्या कारखान्यामध्यें देखरेखीचा खर्च फार कमी येऊं लागला. शिवाय त्याचें घरें रंगविण्याचें काम इतर धंदेवाल्यांपेक्षां पुष्कळच सुबक व टिकाऊ होऊं लागलें. यामुळें त्याचेकडे गिऱ्हाइकांची अतोनात गर्दी होऊं लागली. लेक्लेअरनें मात्र नफ्याच्या वांटणीचा हा क्रम अव्याहत चालविला. पुढें लेक्लेअरच्या कारखान्यांतील मजुरांनीं एक परस्परसाहाय्यकारी मंडळी स्थापन केली व त्यांतून काम करण्यास वयामुळें नालायक झालेल्यांस पेन्शन देण्याची व्यवस्था केली. तसेंच एखादा मजूर आजारी पडला तर त्याला कांहीं वेतन देण्याची व्यवस्था झाली. लेक्लेअरच्या उत्तेजनानें मजुरांच्या सुधारणेच्या आणखी पुष्कळ बाबी या संस्थेनें हातीं घेतल्या. पुढें या संस्थेच्या इतर शहरांतून शाखा निघाल्या. सारांश, ज्याप्रमाणें रॉचडेल पायोनिअर्स विणकरांची संस्था लहान प्रमाणावर सुरू होऊन पुढें मोठी अवाढव्य संस्था बनली, तसेंच लेक्लेअरच्या साध्या रंगांच्या धंद्याचेंही झालें व एवढ्या प्रचंड धंद्याचें काम इतक्या सुबक तऱ्हेनें व व्यवस्थित तऱ्हेनें चालें कीं, लेक्लेअरच्या पश्चात्‌ही या रंगाच्या कारखान्याचा लौकिक सारखा कायम राहिला व त्याच्या भरभराटींत रतिभरही कमीपणा आला नाहीं.

हें नफ्याच्या वांटणीचें तत्वही पुष्कळ धंद्यांत पसरलें. या तत्वानें भांडवल व श्रम यांमध्यें सलोखा राहून श्रम करणाऱ्या माणसांना हौसेनें व हुरूपानें काम करण्याची बुद्धि होते. प्रचंड कारखान्याच्या पद्धतीचा हा एक मोठा दोष आहे कीं, त्यामध्यें मजुरवर्गानें कारखान्यांत मन लागण्यास व त्याला काळजीपूर्वक काम करण्याची बुद्धि होण्यास सबळ कारण नसतें. कां कीं, त्यांच्यावर कोणतीच जबाबदारी नसते. कराराप्रमाणें ठरलेले तास कसेंबसें काम केलें कीं झालें. त्याला ठरलेली मजुरी मिळावयाचीच. बरें, जो जास्त काळजीनें काम करील त्याला अधिक फायदा काय आहे? कांहीं नाहीं. त्यालाही इतरांप्रमाणेंच

मजुरी मिळणार. ज्याप्रमाणें शेतीचा मालक या नात्यानें शेत कसणारा व मजूर म्हणून शेत कसणारा यांच्या श्रमांत फार तफावत पडते—कारण एकाला आपल्या श्रमाचें सर्व फळ आपल्यालाच मिळणार ही खात्री असते; दुसऱ्याचा शेताच्या उत्पन्नाशीं कांहीं एक संबंध नसतो—त्याचप्रमाणें भाडोत्री मजूर व मालकीची भावना असणारा मनुष्य यांच्या श्रमांमध्यें तफावत असते व या नफ्याच्या वांटणीच्या तत्वानें कांहीं अंशीं तरी मजुरांचा भाडोत्रीपणा कमी होऊन त्यांना कारखान्याबद्दल एक प्रकारचा आपलेपणा वाटूं लागतो व यामुळें कारखान्याच्या यशस्वीपणाबद्दल काळजी वाटूं लागते. व म्हणून अशा मजुरांचे हातून काम मोठ्या हौसेनें, हुरूपानें, कळकळीनें व काळजीनें होतें. अर्थात् श्रमाची कर्तबगारी वाढून मालाची वाढ पुष्कळ होते व त्या मानानें. नफाही पुष्कळ वाढतो.

सहकारी तत्त्वाइतका या तत्त्वाचा प्रसार झाला नाहीं. परंतु ज्या ज्या धंद्यांत नफ्याच्या वांटणीचें तत्त्व स्वीकारलें गेलें आहे तेथें तेथें कारखानदार व मजूर या दोघांच्याही उत्पन्नांत भर पडली आहे यांत शंका नाहीं. परंतु या तत्त्वासंबंधींचा पुढाकार कारखानदारांना घ्यावा लागतो व त्यांना स्वतःच्या हिताच्या दृष्टीनें त्याची इतकी जरूरी नसते. यामुळें सहकारी तत्त्वाइतका या दुसऱ्या तत्वाचा प्रसार झालेला नाहीं व होणेंही शक्य नाहीं.

नफ्याच्या वांटणीच्या तत्वाचा पुढाकार मजुरांस घेतां येत नाहीं हें वर सांगितलेंच आहे. त्यामुळें हें तत्व वास्तविक स्वावलंबनाच्या उपायांमध्यें अन्तर्भूत होत नाहीं. तरीपण उत्पादक सहकारितेच्या पद्धतीशीं त्याचें थोडेंसें साम्य आहे म्हणून त्याचा या भागांत विचार केला आहे.

मनुष्यामध्यें शिक्षणाच्या योगानें एकदां स्वतःच्या दुःस्थितीची जाणीव व ती स्थिति सुधारण्याची इच्छा उत्पन्न झाली म्हणजे मनुष्य सर्व दिशांनीं प्रयत्न करूं लागतो. इंग्लंडांतील व युरोपांतील इतर देशांतील मजुरांची अशीच स्थिति झाली आहे व त्यामुळें स्वावलंबनाचे किती तरी मार्ग त्यांनीं शोधून काढले आहेत.

मागच्या व या भागांत मिळून आतांपर्यंत ज्या दोन प्रयत्नांचें वर्णन केलें ते प्रयत्न म्हणजे मजुरांचे संघ व सहकारी संस्था या होत. या दोन्ही संस्थांचें

पर्यवसान मजुरांच्या उत्पन्नांत वाढ करण्यांत होतें हें उघड आहे. परंतु याशिवाय दुसऱ्या दोन प्रकारच्या संस्था युरोपांत व इंग्लंडांत पसरल्या आहेत; त्यांचा उद्देश मजुरांच्या उत्पन्नाची वाढ करण्याऐवजीं त्यांच्या उत्पन्नांतून काटकसरीनें शिल्लक ठेवून मजुरांची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा असतो. यांपैकीं पहिल्या प्रकारच्या संस्था ह्मणजे घर. बांधण्याला मदत करणाऱ्या संस्था होत. या मंडळया मजुरांना घरें बांधण्याकरितां हलक्या व्याजानें कर्जाऊ पैसे देतात व हे पैसे हळू हळू हप्त्याहप्त्यानें फेडून घेतात. या मंडळयांच्या योगानें मजुरांमध्यें काटकसर या गुणाला उत्तेजन मिळून पुष्कळ मजुरांना स्वतःच्या सोयीचीं हवाशीर घरें मिळालीं आहेत. या पद्धतीचाही प्रसार इंग्लंडमध्यें पुष्कळच झाला आहे.

अशा प्रकारच्या शेवटच्या संस्था म्हणजे विमा उतरणाऱ्या संस्था, मजुरांना अडचणीच्या प्रसंगीं पैशाची मदत करणाऱ्या संस्था, त्यांची शिल्लक ठेवीनें ठेवणाऱ्या संस्था व एकंदरींत परस्परांना हरएक प्रकारची मदत करणाऱ्या 'बंधुसमाज' नांवाच्या संस्था होत. यांच्यायोगानेंही मजूरवर्गाचें पुष्कळ हित झालेलें आहे. परंतु आतांपर्यंतच्या संस्थांच्या सविस्तर वर्णनानंतर या संस्थांचें आणखी विशेष वर्णन करण्याची जरूरी नाहीं. कारण तें चर्वितचर्वणाच्या जातीचें होईल, तेव्हां हा भाग येथेंच संपविणें बरें.

या दोन्ही भागांत वर्णन केलेल्या संस्था हिंदुस्थानांत अझून नाहींतच, असें म्हटलें तरी चालेल. या अभावाचीं दोन कारणें आहेत. प्रथमतः ज्या औद्योगिक परिस्थितींत अशा संस्था निघतात अशी परिस्थिति अद्याप हिंदुस्थानांत उत्पन्न झाली नाहीं. मागें एकदां सांगितलेंच आहे कीं, हिंदुस्थान हा अद्यापपावेतों प्रायः कृषिवृत्ति देश आहे. तो उद्योगवृत्ति होऊं लागला आहे हें खरें, परंतु अझून सगळे धंदे प्रायः घरगुती स्थितींतच आहेत. प्रचंड कारखान्यांची पद्धति येथें अद्याप अपवादादाखल आहे. ह्मणून गिरण्यांतील किंवा कारखान्यांतील मोठा मजुरवर्ग निर्माण झालेला नाहीं. कांहीं कांहीं शहरांत असा स्वतंत्र वर्ग होऊं पहात आहे. दुसरें कारण, या मजूरवर्गामध्यें शिक्षणाचा प्रसार झालेला नाहीं, यामुळें स्वतःच्या प्रयत्नांनीं आपली स्थिति सुधारण्याची कल्पना या वर्गांत शिरली नाहीं. त्यांतल्यात्यांत मुंबईतील गिरण्यांमधील मजूर व कामदार हे बरेच पुढें आलेले आहेत. त्यांच्यामध्यें थोडीशी जागृति होऊं लागली आहे.

व म्हणून मुंबईंत मजुरांच्या संघाचा नुकताच उगम झालेला आहे. व मजूर-संघाच्या वतीनें एक सुशिक्षित गृहस्थ युरोपांतील व अमेरिकेंतील मजूर लोकांची स्थिति अवलोकन करण्यास व तेथील मजुरांच्या संस्थांची व्यवस्था ' चक्षुर्वै सत्यं ' या न्यायानें पाहण्याकरितां गेले आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. परंतु अशा संस्थांची वाढ मजुरांमध्यें शिक्षणाचा प्रसार अधिक झाल्यावांचून होणार नाहीं व हा प्रसार होण्यास प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें झालें पाहिजे. म्हणजे पुढल्या पिढींतील मजूरवर्ग प्राथमिक शिक्षणाचा तरी लाभ मिळालेला असेल व मग त्यांना अशा संस्थांची आवश्यकता भासूं लागेल.

# भाग पंधरावा.

## सहकारी पतपेढ्या.

मागील दोन भागांत ज्या संस्थांची माहिती दिली त्या संस्था व तीं तत्त्वें औद्योगिक बाबतींत फार पुढें गेलेल्या इंग्लंड देशामध्यें प्रायः प्रादुर्भूत झालेलीं आहेत. कारण इंग्लंडमध्यें शेतकींत काय किंवा उद्योगधंद्यांत काय प्रचंड प्रमाणावरील पद्धति पूर्णपणें अंमलांत आलेली आहे. या पद्धतींत भांडवलाची आवश्यकताच फार असते. इंग्लंड देशाला युरोपांतील इतर देशांच्या आधीं औद्योगिक वर्चस्व आल्यामुळें तेथें संपत्तीची खूप वाढ होऊन भांडवलास जसा कांहीं पूर आला होता. इंग्लंड जगांतील बहुतेक देशांना भांडवल पुरवूं लागलें होतें. प्रचंड प्रमाणावरील पद्धतींत कारखानदार व मजूर यांचेमध्यें फार मोठा भेद उत्पन्न होऊन मजुरांची स्थिति कारखानदारांइतकी चांगली नसते, व समाजांत जी विषमतेनें संपत्तीची वांटणी होते, तिचा प्रतिकार करण्याकरितां मागील दोन भागांत वर्णिलेल्या संस्था व तत्त्वें हीं इंग्लंडमध्यें प्रथमतः उद्भवलीं हें सर्व योग्यच झालें.

या भागांत वर्णन करावयाची संस्था ही मात्र इंग्लंडांत प्रथम अस्तित्वांत आलेली नाहीं. या पद्धतीच्या शोधाचा मान जर्मनीकडे जातो. सहकारी पतपेढ्यांचें

तत्व उदयास आल्याला कोठें बासष्ट वर्षें झालीं आहेत. परंतु या अवघ्या दोन पिढ्यांच्या काळांत त्यानें जगांत मोठी क्रांति करून सोडली आहे. जगांत ही एक गरीब लोकांचें दुःख नाहींसें करणारी, त्यांची पत वाढविणारी व नवीन संपत्ति उत्पन्न करणारी प्रचंड शक्ति अवतरली आहे. हें तत्व ज्या सालीं उदयास आलें त्याच सालीं कालिफोर्नियांतील सोन्याच्या खाणीचा शोध लागला. परंतु या जड सोन्याच्या खाणीनें जगांत भांडणें, तंटे व कलह मात्र उत्पन्न केले. परंतु य तत्वानें जगाचें कल्याण करून त्यांत शांतता, समाधान व सुख उत्पन्न केलें; इतका एका वेळीं शोध लागलेल्या या दोन गोष्टींमध्यें विरोध आहे.

सहकारी पतपेढ्यांच्या तत्वाचा शोध प्रथमतः जर्मनींत लागला हें वर सांगितलेंच आहे. जर्मनीची परिस्थिति या तत्वाच्या शोधास अनुकूल अशी होती. जर्मनीमध्यें इंग्लंडची प्रचंड शेतकीची पद्धति नव्हती. तर तेथें शेतकरी आपल्या लहान लहान शेतांवर शेतकी करून आपलें पोट भरीत. हा वर्ग फार दरिद्री होता, इतकेंच नव्हे तर जबर व्याजाच्या कर्जापायीं बुडतही होता. या वर्गाजवळ आपली शेती सुधारण्यास भांडवल नव्हतें. व त्यानें भांडवल कर्जाऊ घ्यावें तर त्याची पत नव्हती. हीच बहुतेक स्थिति घरगुती स्थितींतील कामगार व धंदेवाले लोक यांची होती. तेव्हां या लोकांची सांपत्तिक स्थिति कशी सुधारावयाची हा मोठा बिकट प्रश्न होता. इंग्लंडांतील प्रश्नापेक्षां हा प्रश्न अगदीं वेगळा होता हें उघड आहे. इंग्लंडमध्यें मजूरवर्गाला मजूरी कमी मिळे, तेव्हां मजूरी कारखानदारांकडून जास्त मिळविण्याकरितां त्यांनीं मजूरसंघ काढले. परंतु या लोकांची स्थिति निराळीच होती. हे स्वतंत्र धंदेवाले होते खरे; परंतु यांना संपत्ति उत्पन्न करून आपली सुधारणा करण्याची सोय नव्हती. कारण त्यांचेजवळ भांडवलही नव्हतें, व कर्जाऊ भांडवल घ्यावें तर पतही नव्हती. तेव्हां अशा लोकांनीं आपला धंदा सुधारण्याकरितां भांडवल कोठून आणावयाचें हा जर्मनीमध्यें मोठा प्रश्न होता. तो प्रश्न या सहकारी पतपेढ्यांनीं सोडविला. तेव्हां आतां या पेढ्यांचें मूळ तत्व काय हें प्रथमतः पाहूं.

या पेढ्यांची पद्धति शोधून काढण्याचा मान ज्या दोघा जर्मन गृहस्थांना दिला पाहिजे त्यांचीं नांवें **रफेसिन** व **स्कार्ट्स डेलीच** हीं होत. दोघेही कांहीं काळपर्यंत जर्मन सरकारचे नोकर होते. दोघांनाही शेतकऱ्यांची व काम-

दारांची दैन्यावस्था प्रत्यक्ष अवलोकनानें कळलेली होती. दोघांनाही या गरीब लोकांबद्दल अत्यंत दया येत असे व दोघांनींही शेतकऱ्यांची व कामकऱ्यांची ही दैन्यावस्था घालविण्याकरितां सर्व आयुष्यभर श्रम केले. त्यांच्या श्रमाचें फळ म्हणजे सहकारी पतपेढया होत. या पेढयांचे दोन वर्ग आहेत. हे दोन वर्ग या दोघां गृहस्थांनीं निरनिराळे शोधून काढले व अस्तित्वांत आणले असें म्हटलें तरी चालेल. दोन्ही प्रकारच्या पेढयांची एकंदर सामान्य व्यवस्था सारखीच असे. मात्र एकामध्यें सभासदांवर पेढयांची अमर्यादित जबाबदारी असते; परंतु भांडवलाचे भाग नसतात. दुसऱ्यांत भांडवलाचे भाग असतात, परंतु त्यांच्यावरील जबाबदारी मर्यादित असते.

जर्मनीमध्यें १८४८ च्या सुमारास महर्घता झाली होती. त्यामुळें तर शेतकऱ्यांची दैन्यावस्था फारच झाली. तेव्हां रफेसिननें आपली सरकारी नोकरी सोडून १८४९ मध्यें पहिली पेढी काढली व तेव्हांपासून मरेपर्यंत म्हणजे सुमारें चाळीस वर्षें त्यानें आपलें सर्व सामर्थ्य सहकारी पतपेढया काढण्यांत, त्यांच्या तत्वाचा लोकांमध्यें प्रसार करण्यांत व त्यांचे फायदे लोकांच्या मनांत भरविण्यांत खर्च केलें. स्काट्स डेलीचनेंही तोच क्रम आरंभिला. एकानें खेडेगांवांतील शेतकऱ्यांकडे विशेष लक्ष दिलें, तर दुसऱ्यानें शहरांतील कामकऱ्यांच्या स्थितीकडे लक्ष देऊन त्यांच्यामध्यें अशा पेढया काढण्याचा उपक्रम केला. म्हणून लौकिकदृष्टया खेड्यांतील व शहरांतील पेढया असे दोन वर्ग करतात. परंतु खरोखर यांमधील सामान्य तत्त्व एकच असल्यामुळें आपण येथें त्या दोहोंचें एकत्रच परंतु विस्तारतः विवेचन करूं.

सहकारी पतपेढ्यांमधील कोणतें तत्व नवीन आहे व त्याचा इतका फायदा काय आहे हें पहाण्याकरितां यांतील प्रत्येक पदाचा थोडासा विचार केला पाहिजे. पेढ्यांचें स्वरूप, त्यांची कामगिरी व त्यांचा औद्योगिक परिणाम पुढील पुस्तकांत वर्णन करावयाचा आहे. परंतु सध्यां आपण या संस्थांची व्यावहारिक माहिती गृहीत धरून चालूं. या पेढया फार मोठ्या प्रमाणावर पैशाचा व्यापार करतात. या, व्यापाऱ्यांस पैसे कर्जाऊ देतात. या, लोकांच्या ठेवी घेतात. परंतु या मोठमोठ्या व प्रचंड प्रमाणावर चाललेल्या पेढ्यांचा खेड्यांत रहाणाऱ्या अत्यंत गरीब लोकांना फायदा करून घेतां येत नाहीं. कारण या पेढया मोठ्या श्रीमंत

व पतवाल्या लोकांना गहाणावर वगैरे पैसे देतात, परंतु गरीब माणसाला पतच नसते. कारण पत म्हणजे आपल्याजवळ असलेली स्थिर अथवा स्थावर मिळकत व भांडवल यांच्या जोरावर रोख कर्ज मिळण्याचें व ठरल्या वेळीं तें कर्ज परत करण्याचें सामर्थ्य होय. आतां अत्यंत गरीब लोकांजवळ अशी स्थावर मिळकत किंवा स्थिर भांडवल थोडेंच असतें. यामुळें त्यांना अशा लोकांकडून कर्जाऊ पैसे मिळणें शक्यच नसतें. कारण पेढीवाल्यांना पटणारी अशी पत या लोकांची नसते. तेव्हां अशा गरीब शेतकऱ्यांना व गरीब कामगारांना जर कर्जाऊ पैसे काढण्याचा प्रसंग आला तर त्यांना जबर व्याजानें पैसे काढावे लागतात. कारण आपले पैसे परत येतील किंवा नाहीं अशी सावकारास खात्री नसते. ज्याप्रमाणें धोक्याच्या किंवा सट्टयाच्या व्यापारांत मनुष्य जास्त नफ्याच्या आशेनेंच फक्त पडतो, त्याप्रमाणें अशा लोकांना जास्त व्याजाच्या लालुचीनेंच सावकार कर्ज देण्यास तयार होतात. परंतु अशा जबर व्याजाच्या कर्जाच्या पायीं हे गरीब लोक अगदीं चिरडून जातात. त्यांची दिवसेंदिवस जास्तच वाईट स्थिति होत जाते. तेव्हां यांची सुधारणा होण्यास त्यांना फार हलक्या व्याजानें उत्पादक कामाकरितां पैसे मिळाले पाहिजेत; म्हणजे ते व्याजापायीं बुडणार नाहींत व त्यांच्या शेताचें किंवा धंद्याचें उत्पन्न वाढून त्यांना सवलतीनें कर्ज व व्याज परत करून देतां येईल. असें झालें म्हणजे त्यांची स्थिति दिवसेंदिवस सुधारत जाईल. परंतु त्यांना हलक्या व्याजानें पैसे मिळण्यास त्यांची पत वाढली पाहिजे. तेव्हां प्रत्यक्ष मालमत्ता जास्त वाढलेली नसतांना त्यांची पत वाढवावयाची कशी हा प्रश्न बिकट कोड्यासारखाच प्रथमतः भासतो. परंतु सहकारी पतपेढयांच्या तत्त्वानें हा बिकट प्रश्न सोडविला व म्हणून या तत्वाला इतकें विलक्षण महत्व आलेलें आहे.

सहकारी पतपेढयांचें रहस्यसुद्धां संघशक्तींत आहे. जरी एकएकट्या शेतकऱ्याला किंवा कामदाराला पत नसली तरी असे पुष्कळसे शेतकरी व कामदार एकत्र झाले व सर्वांच्या कर्जाची सर्वांनीं अमर्यादित जबाबदारी घेतली म्हणजे या संकलित संघाची पत पुष्कळच वाढते. व मग अशा संघाला हलक्या व्याजानें कर्जाऊ पैसे मिळतात. यामुळेंच या पेढयांमध्यें—निदान एका प्रकारच्या पेढयांत तरी अमर्यादित जबाबदारीला फार महत्व दिलें जातें. ज्याप्रमाणें सहकारी दुकानाच्या यशाचें खरें रहस्य रोखीच्या पद्धतींत आहे, त्याचप्रमाणें

असल्या लहान पेढयांच्या यशाचें रहस्य अमर्यादित जबाबदारींत आहे. म्हणून रुकाट्स डेलीच याचा या अमर्याद जबाबदारीवर फार रोख आहे. हल्लींच्या काळीं या तत्वावरील पुष्कळ पेढया मर्यादित जबाबदारीच्या असतात हें खरें, व रफेसिन यानें काढलेल्या पेढयांत पहिल्यापासूनच अमर्यादित जबाबदारीवर भर न ठेवतां त्या मर्यादित जबाबदारीवर काढल्या जात असत. तरी पण सहकारी पतपेढयांच्या यशाचें एक मुख्य कारण अमर्यादित जबाबदारी होय, हें निर्विवाद आहे. यशस्वीपणाचें दुसरें कारण सभासदांची योग्य निवडणूक हें होय. आतां आपण अशा एखाद्या सहकारी पतपेढीचें सामान्य वर्णन देऊं म्हणजे तिचें स्वरूप ध्यानांत येईल.

समजा, तुम्हांला एका खेडेगांवांत अशी एक पेढी स्थापन करावयाची आहे. तर अशा खेड्यांत जाऊन शेतकऱ्यांची एक सभा भरवून त्यांना या पेढ्यांचें महत्व वर्णन करून त्यांचें मन अशी पेढी काढण्यास तुम्हीं वळविलें म्हणजे पांच-पंचवीस लोक मिळून अशा पेढीची संस्था स्थापन करतात. या संस्था पूर्णपणें प्रातिनिधिक तत्त्वावर चालवावयाच्या असतात; व ही गोष्ट फार इष्टही आहे. सभासद आपल्यामधून एक सेक्रेटरी, एक अध्यक्ष व एक कमिटी नेमतात. पेढीचें भांडवल सभासदांकडून अगदीं लहान लहान भागांनीं जमवितात. म्हणजे दर महिन्यास चार आण्यांचाही हप्ता असतो व प्रत्येक भाग १ रुपयाचा असतो. प्रत्येक माणसानें कांहीं एका ठराविक संख्येपेक्षां जास्त भाग घेतां कामा नये असा नियम असतो. याचा उद्देश पेढी एका श्रीमंत माणसाच्या ताब्यांत जाऊं नये असा असतो. वर सांगितलेंच आहे कीं, जेथें भागानें भांडवल जमवितात, तेथें बहुधा प्रत्येकाच्या भागाच्या किंमतीइतकी किंवा त्याच्या कांहीं एका ठराविक पटीइतकीच तोट्याची जबाबदारी सभासदावर असते. जेथें भाग नसतात किंवा ते फारच लहान असतात, तेथें बहुधा अमर्यादित जबाबदारी असते. अशा तऱ्हेनें पेढी स्थापन झाली म्हणजे सुखवस्तु लोकांकडून व सभासदांकडून पेढींत ठेवी घेण्याची तजवीज केली जाते व पेढी चांगल्या सचोटीच्या लोकांच्या हातांत असली म्हणजे ती विश्वासास पात्र होऊन लोक त्यांत ठेवी ठेवूं लागतात, व देशांतील गरीब लोकांना अप्रत्यक्ष रीतीनें मदत करण्याची ही एक नवी सोय सुखवस्तु व श्रीमंत लोकांना होते. कारण यांत स्वार्थ व परमार्थ असे दोन्हीहि

साधतात. आपल्या ठेवीवर थोडेंसें व्याज मिळून त्याच्या योगानें या पेढ्यांना जरूर तो भांडवलाचा पुरवठा होतो. या पेढ्यांचा भांडवल जमविण्याचा दुसरा मार्ग ह्मणजे पेढीच्या संयुक्त पतीवर–व वर सांगितलेल्या कारणानें ही पत संघशक्तीनें, अमर्यादित जबाबदारीच्या तत्त्वानें व सभासदांच्या योग्य निवडीनें फार वाढते– कर्ज काढणें हा होय. शिवाय प्रत्येक पेढी आपल्या नफ्यांतून रिझर्वफंड मागें टाकीत असते. कालेंकरून हें भांडवलही मोठें होऊन त्याचा पेढीला मोठा उपयोग होऊं लागतो. याप्रमाणें ठेवी आपल्याकडे ओढून घेणें, आपल्या संयुक्त पतीवर कर्ज काढणें व शेवटीं आपल्या नफ्यांतील शिल्लक मागें टाकून रकम जमविणें, हे भांडवल जमविण्याचे तीन मार्ग झाले. आतां कर्ज देण्याची पद्धति पहा. अशा पेढ्यांचा पहिला नियम हा असतो कीं, नवीन सभासद करितांना त्याच्या दानतीबद्दल, त्याच्या सचोटीबद्दल व त्याच्या हेतूबद्दल चांगली चवकशी करून मग त्याला सभासद करावयाचा व जें कर्ज द्यावयाचें तें सभासदांखेरीज दुसऱ्यांना द्यावयाचें नाहीं. कर्ज देतांना कर्ज कशाकरितां पाहिजे, याची पेढीच्या व्यवस्थापक मंडळीला चौकशी करण्याचा अधिकार असतो. बैल घेण्याकरितां, बियाण्याकरितां, जुनें जबर व्याजाचें कर्ज फेडण्याकरितां, विहीर खणण्याकरितां किंवा एखादें शेतीचें आऊत घेण्याकरितां किंवा दुसऱ्या एखाद्या उत्पादक कामाकरितां कर्ज दिलें जातें. हें कर्ज हातावरच दिलें जातें. याला तारण जमीन वगैरे लावून घेत नाहींत. फक्त शेतकऱ्याकडून एक चिठ्ठी करून घेतात. व्यवस्थापक मंडळीला शेतकऱ्याच्या उद्देशाबद्दल चौकशी करण्याचा पूर्ण अधिकार असल्यामुळें कर्ज बुडण्याचा संभव फार कमी असतो. व्याजाचा दर फार हलका असतो. ज्या व्याजानें पेढीला दुसऱ्याकडून कर्ज मिळतें किंवा जें व्याज त्यांना ठेवीबद्दल द्यावें लागतें, त्यामध्यें पेढीच्या व्यवस्थेला लागणाऱ्या खर्चाच्या मानानें थोडीशी वाढ करून व आकारणी करून शेतकऱ्याकडून व्याज घेण्यांत येतें. कारण या पेढ्यांचा इतर पेढ्यांप्रमाणें मोठा नफा मिळविण्याचा हेतु नसतो. तर होतां होई तों हलक्या व्याजानें सभासदांना भांडवल मिळवून देणें हा त्यांचा मुख्य हेतु असतो.

या सामान्य वर्णनावरून रफेसिनच्या सहकारी पतपेढ्यांची बरीच स्पष्ट कल्पना वाचकांस होईल, अशी आशा आहे. वर सांगितलेंच आहे कीं, अशा तऱ्हेची पहिली पेढी रफेसिननें १८४९ मध्यें स्थापिली. दुसरी १८५४ मध्यें

स्थापिली व तिसरी १८६१ मध्यें स्थापिली. याच्यापुढें मात्र त्या पेढ्यांची वाढ फारच झपाट्यानें झाली व या सर्व पेढ्यांची विलक्षण भरभराट झाली. ती इतकी कीं, आपल्याजवळ जमलेल्या भांडवलाचें आतां काय करावें याची त्यांना पंचाईत पडूं लागली. या पेढ्यांच्या भरभराटीनें एकंदर देशांतील व्याजाचा दर कमी झाला व सर्वच शेतकरी वर्गाचें कल्याण झालें.

**स्काट्स डेलीच** यानें कामगारांच्या पेढ्यांकडे लक्ष घातलें. या पेढीत सभासद होण्यास कांहीं एक प्रवेशफी द्यावी लागे व प्रत्येक सभासदाला पेढीचे कांहीं भाग घ्यावे लागत. बाकी नियम दोन्ही तऱ्हेच्या पेढ्यांचे सामान्यतः एकच असत. **स्काट्स डेलीच**च्या पेढ्यांत कर्ज फार वेळेच्या मुदतीनें दिलें जात नसे. प्रत्येक वेळीं तीन महिन्यांची मुदत असे, व विशेष कारणाकरितां ती वाढविली जात असे; परंतु सामान्यतः शेतकऱ्यांच्या पेढ्यांपेक्षां या पेढ्यांतील कर्जाची मुदत पुष्कळ कमी असे.

दोन्ही प्रकारच्या पेढ्यांना सरकार पुष्कळ सवलती देत असे. यांना उत्पन्नावरील कर माफ असे. तसेंच स्टँपाची सूट असे व कर्ज वसूल करण्यास विशेष सवलती असत, व केव्हां केव्हां सरकार फारच हलक्या व्याजानें अशा पेढ्यांना कर्ज देत असे.

या पेढ्यांच्या प्रसारापासून जर्मनीमध्यें दोन पिढ्यांच्या अवकाशांत गरीब शेतकरी व कामगार यांच्या सांपत्तिक स्थितींत विलक्षण फरक होऊन गेला आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. जेथें पूर्वी पडकीं घरकुलें होतीं तेथें नीटनेटकीं घरें दिसूं लागलीं. ज्या कुटुंबांत सदा उपासमार असे व मुलबाळांचे हाल असत, तेथें हंसतमुख अशा मुलाबाळांनीं भरलेलीं व सुखी कुटुंबें दिसूं लागलीं. जेथें पूर्वी कुटुंबें कर्जांत बुडून सावकाराच्या अगदीं कह्यांत जाऊन दासकल्प बनलीं होतीं तेथें आतां स्वतंत्रपणानें व सुखानें चांगली उत्पन्नाची शेतकी करणारीं स्वावलंबी कुटुंबें दिसूं लागलीं. सारांश, जीं ठिकाणें पूर्वीं दुःख, दैन्यावस्था, हालअपेष्टा व रोग यांचीं माहेरघरें होतीं, तींच ठिकाणें आतां लक्ष्मीचीं माहेरघरें बनलेलीं आहेत. जादुगाराच्या कांडीप्रमाणें या सहकारी पतपेढ्यांच्या पद्धतीनें जर्मनींत व इतरत्र जेथें जेथें या पद्धतीचा चांगला प्रसार झालेला आहे तेथें तेथें बहुजनसमाजाची सांपत्तिक स्थिति सुधारलेली आहे यांत तिळप्राय शंका नाहीं.

# भाग सोळावा.

## हिंदुस्थानांतील सहकारी पतपेढ्यांचा इतिहास.

हिंदुस्थानांतील सहकारी पतपेढ्यांचा इतिहास अगदीं अलीकडचा आहे. हिंदुस्थानसरकारनें १९०४ सालीं सहकारी पतपेढ्यांचा कायदा केला व तेव्हां-पासून पतपेढ्यांना सुरुवात झाली. त्याला अद्याप वीस वर्षेही झालीं नाहींत. हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशाच्या मानानें पतपेढ्यांचा हा प्रसार फार झाला आहे असें म्हणतां येत नाहीं. सहकारी पतपेढ्यांच्या तत्त्वाचा शोध युरोपांत १८४८ च्या सुमारास झाला असून त्याची माहिती व त्याचा प्रसार हिंदुस्था-नांत होण्यास पन्नासांच्या वर वर्षे लागावीं हें प्रथमदर्शनीं चमत्कारिक दिसतें. पण या कोड्याचा उलगडा हिंदुस्थानच्या विलक्षण परिस्थितीनें होतो.

हिंदुस्थानचें राज्य १८५७ च्या पूर्वी ईस्ट इंडिया कंपनीकडेच होतें. त्या काळीं कंपनीचें लक्ष हिंदुलोकांच्या अन्तःस्थितीकडे जाण्याचा फारसा संभव नव्हता. १८५८ सालीं कंपनी-सरकारच्या हातचा कारभार निघून हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें—बाह्यतः राणीसरकारकडे पण वस्तुतः—ब्रिटिश पार्लमेंटाकडे आलीं, व हिंदुस्थानच्या कारभारावर ब्रिटिश पार्लमेंटाच्या तर्फे सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया हे प्रधान देखरेख ठेवूं लागले. हिंदुस्थानांत तेव्हांपासूनच आगगाड्या, तारायंत्रें, पोस्टऑफीसें व पाश्चात्य सुधारणेच्या इतर संस्था यांचा प्रसार झाला, व पाश्चात्य विद्या हिंदवासीयांमध्यें फैलावूं लागली. याप्रमाणें बाह्यतः या काळांत हिंदुस्थानची सर्व प्रकारानें भरभराट होत आहे असें भासलें. पण हळुहळु सुशि-क्षित लोकांना हिंदुस्थानांतील बहुजनसमाजांत व विशेषतः शेतकरी व कारागीर या वर्गांत दारिद्र्य व कर्जबाजारीपणा वाढत आहे असें दिसून येऊं लागलें. पण या ओरडीकडे प्रथमतः सरकारचें लक्षच गेलें नाहीं. पण पुढें शेतकऱ्यांच्या कर्ज-बाजारीपणाबद्दल सरकारची खातरी झाली. पण या गोष्टीला उपाय काय करावे हें इंग्रज अंमलदारांस समजेना. कारण इंग्लंडमध्यें जहागिरदारी-पद्धति सुरू असल्यामुळें शेतकऱ्यांची दैन्यावस्था व कर्जबाजारीपणा हा प्रश्नच नव्हता. जर्मनी-

देशांत सुरू झालेल्या सहकारी पतपेढ्यांची इंग्लंडांत फारशी माहिती नव्हती; इंग्लंडांतील प्रचंड कारखान्यांतील कामदारांची व मजुरांची सुस्थिति नव्हती खरी; पण ती नाहींशी करण्याचे उपाय कांहीं कायद्यानें व कांहीं स्वावलंबनाच्या तत्वावर योजण्यांत आले होते. हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याकरितां इंग्रज अंमलदारांना परिचित अशा कायद्याच्या उपायांचा त्यांनीं अवलंब केला. व म्हणून उपरीकुळांचा कायदा, शेतकऱ्यांच्या ऋणमुक्ततेचा कायदा, तगाईचा कायदा वगैरे कायदे सरकारनें केले. पण कायद्यानें गरीब व निष्कांचन शेतकऱ्यांची पत कशी वाढणार? पत नाहीं म्हणून त्यांना जबर व्याजानें कर्ज काढावें लागे! कायद्यानें जबर व्याज बंद केलें, तरी जोंपर्यंत त्यांची पत वाढली नाहीं तोंपर्यंत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें जबर व्याज पडेच. म्हणून हे सर्व कायदे निष्फळ झाले व शेतकऱ्यांची दैन्यावस्था वाढतच चालली. कारण ही कायद्याची उपाययोजना चुकीची होती. जर्मनींत प्रसार पावलेल्या सहकारी पतपेढयांच्या तत्वाचा येथेंही अंगीकार केल्याखेरीज शेतकऱ्यांचा आणि कामकऱ्यांचा कर्जबाजारीपणा नाहींसा होणार नाहीं, म्हणून अशा पतपेढ्या काढण्याची तजवीज होणें जरूर आहे, असा सल्ला वेडरबर्नसारख्या दयाळु इंग्रज अंमलदारांनीं व रावसाहेब रानडे यांसारख्या अर्थशास्त्रज्ञ हिंदी सुशिक्षितांनीं सरकारला दिला. पण त्या वेळीं स्टेटसेक्रेटरी या योजनेला आडवे आले. सरकारचें या उपायांकडे कर्झनशाहींत लक्ष लागलें व जर्मनींतील सहकारी पतपेढयांची माहिती मिळवून त्या धर्तीवर हिंदुस्थानांत सहकारी पतपेढयांचा प्रसार करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें एकदाचा १९०४ मध्यें पतपेढयांचा कायदा पसार केला. व सहकारी पतपेढयांची स्थापना करण्याकरितां प्रत्येक प्रान्ताला एकएक सहकारी पतपेढयांच्या रजिष्ट्रारची नेमणूक केली. १९०४ च्या या कायद्याचीं मुख्य कलमें अशीं आहेतः—

१ सभासदांमध्यें काटकसर व स्वावलंबन उत्पन्न करण्याकरितां एकाच खेडेगांवांत किंवा शहरांत राहणाऱ्या अथवा एकाच जातीच्या अगर धंद्याच्या कोणत्याही दहा किंवा दहांपेक्षां जास्त माणसांना आपली सहकारी पतपेढी करून ती या कायद्याअन्वयें रजिष्टर करितां येईल.

२ या पतपेढीचें मुख्य काम म्हणजे पैसा जमा करून तो सभासदांना किंवा

रजिस्ट्रारच्या विशेष परवानगीनें दुसऱ्या सहकारी पतपेढयांना कर्जाऊ देणें हें होय. सभासदांकडून ठेवी घेऊन तसेंच बिनसभासदांकडून, सरकारकडून किंवा दुसऱ्या सहकारी पतपेढयांकडून कर्जाऊ रकमा घेऊन पतपेढीनें पैसा जमवावा.

३ पतपेढयांच्या प्रसाराकरितां व देखरेखीकरितां प्रत्येक प्रांतांत एकएक सहकारी पतपेढयांचा रजिस्ट्रार नेमला जावा.

४ प्रत्येक पतपेढीचे हिशेब रजिस्ट्रारनें स्वतः तपासावे किंवा आपल्या हाता-खालील लोकांकडून मोफत तपासावे.

५ पेढी बुडाल्यास पेढीच्या सर्व कर्जाबद्दल खेड्यांतील पतपेढीच्या सभा-सदांची अमर्यादित जबाबदारी असावी.

६ खेड्यांतील पोटपेढयांच्या व्यवहारांत झालेल्या नफ्याची सभासदांमध्यें वांटणी करावयाची नाहीं; तर तो सर्व नफा वर्षाकाठीं निराळा राखून ठेवावयाचा. मात्र हा राखून ठेवलेला फंड नियमानुरूप ठरलेल्या मर्यादेबाहेर गेल्यावर सभा-सदांना नफ्यांतून बक्षीसवजा कांहीं अंश वांटण्यास हरकत नाहीं.

७ शहरांतील पतपेढयांच्या बाबतींत वार्षिक नफ्याच्या चवथाई रकम राखून ठेवलेल्या फंडांत भरल्याखेरीज सभासदांना नफा वाटावयाचा नाहीं.

या कायद्याअन्वयें रजिस्ट्रार नेमून पतपेढया काढण्याच्या कामास सुरवात झाली. पण पतपेढयांचा प्रसार फारच सावकाश होत गेला. पण पांचसात वर्षां-च्या अनुभवानें या कायद्यांत जे दोष दिसून आले ते काढून टाकण्याकरितां दुरु-स्तीचा मसुदा सरकारनें कौन्सीलपुढें आणिला व त्यांत कांहीं फेरफार होऊन पूर्वीच्या कायद्याऐवजीं पतपेढयांचा नवा कायदा १९१२ सालीं पास करून घेतला. हाच कायदा सध्यां चालू आहे. या नव्या कायद्यांतील विशेष खालील प्रकारचे आहेत.

१ या कायद्यानें कर्जापेक्षां निरनिराळ्या उद्देशांकरितां ( उदाहरणार्थ, माला-च्या खरेदीविक्रीसाठीं, धान्य जमविण्यासाठीं, शेतकीचीं आऊतें विकत घेऊन तीं सभासदांना देण्यासाठीं, सभासदांना घरें बांधण्यासाठीं, गुरांचा विमा उतरण्या-साठीं, ) सहकारी पतपेढयांची स्थापना करण्याचा अधिकार देण्यांत आला. सारांश, या कायद्यानें सहकारी तत्वाचा पूर्वीच्या कायद्यापेक्षां पुष्कळच जास्त बाबतींत उपयोग करतां येऊं लागला.

२ या कायद्यानें खेड्यांतील पतपेढ्या व शहरांतील पतपेढ्या हें वर्गीकरण काढून टाकलें. या योगें सर्व पेढ्यांना नफ्याचा थोडाफार अंश सभासदांना देण्याची सवलत मिळाली.

३ या कायद्यानें सहकारी मध्यवर्ती पेढ्या निघण्याची सोय झाली. कारण, ज्यांचे सभासद पतपेढ्या आहेत अशा पेढ्या या कायद्यानें रजिष्टर करण्याचा अधिकार मिळाला.

४ या कायद्यानें राखून ठेवलेल्या नफ्यानंतर राहील त्या निव्वळ फायद्यांतून शेंकडा दहा इतकी रकम रजिष्ट्रारच्या परवानगीनें लोकोपयोगी कामांत खर्च करण्याचा अधिकार मिळाला. यायोगें गांवांतील इतर सार्वजनिक चळवळींशीं पतपेढ्यांचा संबंध जडण्यास सवड झाली व पतपेढ्यांना शिक्षणासारख्या आवश्यक गोष्टीला मदत करतां येऊं लागली.

५ 'सहकारी' हा शब्द बिनरजिष्टारी कोणत्याही संस्थेला लावतां येऊं नये असा निर्बंध घालण्यांत आला.

शेतकरी वर्गाच्या दारिद्र्याची स्थिति सुधारण्याकरितां आजपर्यंत करण्यांत आलेले कायदे व सहकारी पतपेढ्यांचा कायदा यांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर होतें. पूर्वीच्या कायद्यांचा उद्देश शेतकऱ्याला प्रत्यक्ष पैशाची मदत करून व व्याजाचा दर कायद्यानें कमी करून आणि दुसऱ्या इतर सवलती शेतकऱ्यांना देऊन सावकाराच्या कचाट्यांतून त्यांना सोडविण्याचा होता. पण जोंपर्यंत शेतकऱ्यांची पत वाढली नाहीं, जोंपर्यंत त्यांच्या शेताचें उत्पन्न वाढलें नाहीं, तोंपर्यंत जबरीच्या कायद्यानें त्यांची स्थिति सुधारणें अशक्य होतें. कारण सावकाराच्या कचाट्यांतून त्यांना सुटणें अशक्य होतें. कारण कायद्याच्या निर्बंधांतून पळवाटा काढून सावकारांना जबर व्याज शेतकऱ्यांकडून काढतां येत असे. किंबहुना आतां सावकार शेतकऱ्यानें शेताचें विक्रीखत करून दिल्याखेरीज कर्ज देतनासे झाले. किंवा दुप्पट रकमेचा कर्जरोखा घेऊन अर्धीच रकम फक्त कायद्यानें ठरलेल्या व्याजानें देऊं लागले. म्हणजे कायद्यानें ठरलेल्या व्याजाच्या दुप्पट दर सावकार मिळवूं लागले व शिवाय जमीनीही सावकारांच्या मालकीच्या होऊं लागल्या. सारांश, शेतकऱ्यांची स्थिति या कायद्यामुळें जास्तच वाईट झाली. सहकारी पतपेढ्यांचा कायदा मात्र अगदीं निराळ्या तत्वावर होता. त्यायोगें शेतकरी स्वावलंबी, निय-

मित, मेहनती व उत्पादक बनावे व त्यांची खरी पत वाढून त्यांना फार हलक्या व्याजानें कर्ज मिळावें अशी तजवीज केलेली होती.

प्रथमतः या कायद्यानें शेतकऱ्यांना संघ करतां येऊन 'कलौ संघे शक्तिः' या म्हणीचा फायदा घेतां येऊं लागला. यामुळें पूर्वीच्या सावकारी कर्जापेक्षां पतपेढीचें कर्ज सवलतीच्या व्याजानें मिळूं लागलें. इतकेंच नाहीं, तर सावकारी कर्जापेक्षां हें कर्ज जास्त उपकारक होऊं लागलें. एका बिनकर्जी शेतकऱ्यानें सावकाराकडून कर्ज काढलें व दुसऱ्यानें पतपेढीकडून कर्ज काढलें, तर त्याचे परिणाम कसे होतील पहा. सावकाराचा डोळा शेतकऱ्याच्या जमीनिवर असतो. म्हणून शेतकऱ्याच्या जमिनीच्या किंमतइतकें कर्ज फुगेपर्यंत सावकार बेफिकीर असतो. तो शेतकऱ्याला व्याज देण्याचा तगादा करीत नाहीं. मुद्दलांतील हप्ते मागत नाहीं. कर्ज कशाकरितां खर्च केलें जात आहे याची चवकशी करीत नाहीं. शेतकऱ्यास लागल्यास अधिक कर्ज देतो; सारांश, सावकाराची दृष्टि स्वार्थी असते. त्याला शेतकऱ्याचें कांहीं कां होईना, आपलें कर्ज तरतें असलें म्हणजे झालें. सावकारी कर्जाच्या अशा स्वरूपामुळें शेतकरी एकदां कर्जांत शिरला म्हणजे त्याचा पाय बाहेर निघत नाहीं. उलट तो पाय जास्तजास्त खोलांत जातो व शेवटीं तो आपल्या शेताला मुकतो. पण पतपेढी ही स्वार्थी पेढी नसते. तिच्यापासून कोणालाही नफा मिळावयाचा नसतो. सावकाराप्रमाणें पतपेढीला शेतकऱ्याच्या जमीनीचा अभिलाष नसतो; यामुळें पेढीचे सभासद शेतकरी, शेतकऱ्याला कर्ज देतांना कर्ज कशाकरितां पाहिजे, त्याचा योग्य विनियोग होणार आहे किंवा नाहीं याकडे लक्ष पुरवतात; व्याज वेळच्या वेळीं घेण्याची पेढी तजवीज करते. तसेंच मुद्दल हप्त्याहप्त्यांनीं फेडण्याची सवड असते. यायोगें शेतकऱ्याला नियमितपणाची सवय लागते; त्याला कर्ज घेतांना ठरलेल्या कामाला म्हणजे अर्थात् शेतसुधारण्याच्या कामालाच तें लावावें लागतें; त्यायोगें शेताचें उत्पन्न वाढतें; व हळूहळू कर्ज व व्याज हप्त्याहप्त्यानें फिटलें जाऊन शेतकरी कर्जमुक्त होऊन शिवाय त्याच्या शेतांत जास्त उत्पन्न येऊं लागतें. सारांश, पतपेढीचें कर्ज म्हणजे आपल्यावर देखरेख करणाऱ्या मित्रमंडळीकडून घेतलेल्या उसनवारी कर्जाप्रमाणें असतें, तर सावकारी कर्ज-आपल्याबद्दल बेपर्वा असलेल्या प्रतिपक्षाकडून घेतलेल्या जबर व्याजी कर्जाप्रमाणें असतें.

आतांपर्यंत सहकारी पतपेढयांचा प्रसार येथें किती झाला आहे हें पुढील तीन कोष्टकांवरून दिसून येईल.

### १ हिंदुस्थानांतील सहकारी पतपेढया.

| | १९०६-०७ | १९०९-१० | १९१२-१३ | १९१५-१६ | १९१६-१७ |
|---|---|---|---|---|---|
| मध्यवर्ती व प्रांतिक पेढया व संघ | १४ | ३२ | २५१ | ६०५ | ७५७ |
| शेतकी व गुरांच्या विमा उतरणाऱ्या संस्था ... | ७४० | ३१४५ | ११३८२ | १८०५१ | २१०७० |
| नगरवर्ती ... ... | ८९ | ३२१ | ६९१ | १०१९ | १२०९ |
| एकंदर... | ८४३ | ३४९८ | १२३२४ | १९६७५ | २३०३६ |

### २ सभासदांच्या संख्येची नोंद.

| | १९०६-०७ | १९०९-१० | १९१२-१३ | १९१५-१६ | १९१६-१७ |
|---|---|---|---|---|---|
| मध्यवर्ती व प्रान्तिक पेढ्या व संघ यामधील | २७७४ | ३७४० | २९७८० | ५३०७८ | ८४१४१ |
| शेतकी व गुरांच्या विमा उतरणाऱ्या संस्थांतील. ... ... | ५४४६९ | १६५५६० | ४६७३७८ | ७१७१६३ | ७८४५७६ |
| नगरवर्ती. | ३३६०१ | ६१३९८ | ७६३७८ | १४८१९५ | १७६७०८ |
| एकंदर... | ९०८४४ | २३०६९८ | ५७३५३६ | ९१८४३६ | १०४५४२५ |

याप्रमाणें पतपेढीच्या कायद्यानें शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिति सुधारावी इतकाच त्याचा उद्देश नव्हता, तर त्यायोगें शेतकऱ्यांची नैतिक उन्नति व्हावी असाही त्याचा उद्देश होता. पण हा कायदा पूर्वीच्या कायद्याप्रमाणें निरुपयोगीच नव्हे, तर शेतकऱ्यांना जास्त जाचक असा कायदा आहे, असा सुशिक्षितांचा सुद्धां समज होता. यामुळें या कायद्यान्वयें पतपेढया काढण्याचें काम फार सावकाश होत होतें. पण पुढें कांहीं सुशिक्षित लोक या कायद्याचे व सहकारी तत्वाचे भक्त बनले. त्यांनीं शेतकरी लोकांमध्यें जागृत करण्याचें काम सुरू केलें. अशा तऱ्हेनें पतपेढया काढण्यास मदत करणारे सुशिक्षित स्वयंसेवक मिळूं लागल्यापासून पत-

### ३ चालू भांडवल.

| | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| भागांचे भांडवलापैकीं दिलेले | ५५५८०५ | २३०८३४२ | ८६१९७९३ | १७७६९८७९ | २१२२३३२५ |
| घेतलेलें कर्ज व ठेवी. | | | | | |
| सभासदांकडून ... ... | ५७६०२५ | २५३३३१७ | ९३५४६४५ | ६७३७५७९ | ७९००५८५ |
| बिनसभासदांकडून ... | ६५६०९२ | ३४८२६९१ | १३३६२७८८ | ३३५३३५६१ | ३८८३७१८६ |
| संस्थांकडून ... ... | २४०४२५ | ३०१६१०६ | १९१६१३४५ | २६१९९२५ | ३२२९५९७ |
| प्रांतिक व मध्यवर्ती पेढ्यांकडून | ... | ... | ... | ३३१२७८७४ | ४०१७२५५० |
| सरकारकडून ... ... | २८४७३८ | ७२१७७५ | ११२७५४७ | १५९६७०५ | १७२४८५९ |
| राखून ठेवलेला फंड. ... | ५८५९८ | ३३६४५१ | १६०८१४३ | ७८७९६२६ | ९२०४१३८ |
| एकंदर... | २३७१६८३ | १२३९७६८२ | ५३४३४२६१ | १०३२६९१४९ | १२२२९२१८० |

पेढयांचा प्रसार झपाट्यानें होऊं लागला. निघालेल्या पतपेढयांचें काम उत्तम तऱ्हेनें चालून त्यायोगें शेतकऱ्यांची सांपत्तिक व नैतिक सुधारणा झाली आहे, असें जसजसें प्रत्यक्षपणें दिसून येऊं लागलें, तसतसा पतपेढयांचा प्रसार झपाटयानें होऊं लागला. प्रथमतः पतपेढया कर्जाकरितां काढण्यांत आल्या, पण पुढें पुढें दुसऱ्या उद्देशानेंही पेढ्या निघूं लागल्या. खेड्यांतील व शहरांतील लहान लहान पेढयांना पैशाचा पुरवठा करण्याकरितां प्रांतिक व मध्यवर्ती पेढया श्रीमान व्यापाऱ्यांनीं काढल्या. सारांश वरपासून खालपर्यंत पतपेढयांचें जाळें पसरूं लागलें. हिंदुस्थानच्या प्रचंडतेच्या मानानें व हिंदुस्थानच्या लोकसंख्येच्या मानानें अद्यून पुष्कळ जास्त काम व्हावयास पाहिजे आहे तरी पण आतां पतपेढयांचें तत्व या देशांत बद्धमूल झालें आहे

आणि शेतकरी व कामगार लोकांत या शिक्षणाचा प्रसार जसजसा जास्त होईल तसतसा या सहकारी तत्वाचाही प्रसार जास्त जास्त होईल यांत शंका नाही.

# भाग सतरावा.

## सामाजिक पंथाचा इतिहास.

अर्वाचीन काळच्या संपत्तीच्या उत्पत्तीचा विशेष म्हणजे प्रचंड कारखान्यांची पद्धति हा होय हें मागें सांगितलेंच आहे. याच्या पूर्वीची पद्धति घरगुती धंद्याची होती. या घरगुती धंद्याच्या पद्धतींत समाजांतील बहुतेक वर्गाची सांपत्तिक स्थिति सामान्यतः सारखीच असते. या पद्धतींत अत्यंत श्रीमंत व अत्यंत गरीब असा भेद फारसा होत नाहीं. परंतु प्रचंड कारखान्यांच्या पद्धतींत श्रीमंत व गरीब यांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर पडतें. जे लोक श्रीमंत होतात ते अतोनात श्रीमंत होतात व जे गरीब असतात त्यांना खावयाला पुरेसें मिळण्याची पंचाईत पडते. म्हणजे प्रचंड कारखान्यांचा व अर्वाचीन औद्योगिक क्रांतीचा एक परिणाम समाजांतील संपत्तीच्या वांटणींत फार मोठी विषमता उत्पन्न करण्यांत होतो व अशा परिस्थितींत सामाजिक पंथाचा उदय होतो. असाच प्रकार युरोपांतही झालेला आहे.

या ग्रंथाच्या प्रास्ताविक भागांत अर्थशास्त्रांतील निरनिराळ्या पंथांचें वर्णन केलें; त्या ठिकाणीं सामाजिक पंथाचें वर्णन मुद्दाम गाळलें होतें. कारण त्या पंथाचें वर्णन व त्या पंथानें सुचविलेले संपत्तीच्या समतेच्या वांटणीचे उपाय यांचा विचार एकत्र करणें फार सोयीचें होतें. म्हणून तो विषय हातीं घेण्यास आतांचेंच योग्य स्थळ आहे. तेव्हां सामाजिक पंथ व त्यानें सुचविलेल्या उपायांचा या पुस्तकाच्या शेवटल्या दोन भागांत विचार करून या संपत्तीच्या वांटणीच्या पुस्तकाची समाप्ति करण्याचा बेत आहे.


सामाजिक पंथ हा अभिमतपंथांतूनच निघालेला एक स्वतंत्र पंथ आहे. अर्वाचीन काळीं या पंथाच्या संबंधींचें वाङ्मय फार विस्तृत आहे. व तें अर्थशा-

स्याची एक स्वतंत्र शाखाच झालेली आहे. सामाजिक पंथ हें पद फार अर्वाचीन कालीं उपयोगांत आणलेलें आहे. १८३५ मध्यें इंग्लंडांतील प्रसिद्ध समाजसुधारक ओवेन यानें जी एक सर्व मजुरांची परिषद् भरविलेली होती, त्या संबंधांत प्रथमतः हा शब्द वापरण्यांत आला व तो तावडतोब एक पारिभाषिक शब्द बनला. कारण अर्थशास्त्राच्या वाढीबरोबर कांहींएक विशिष्ट प्रकारच्या कल्पना— संपत्तीच्या उत्पत्तीबद्दलच्या व संपत्तीच्या वांटणीबद्दलच्या—व तत्संबंधीं प्रयत्न सुरू झाले होते. या कल्पना व हे प्रयत्न यांमध्यें बरेंच साम्य होतें. तेव्हां अशा या सारख्या तऱ्हेच्या कल्पनांना व प्रयत्नांना एका सामान्य नांवाची जरूरी होती. यामुळें ' सामाजिक पंथ ' हें नांव प्रथमतः निघाल्याबरोबर भाषेंत भासणारी एक उणीव नाहींशी होऊन हा शब्द सर्वत्र एकदम प्रचारांत आला व यासंबंधींच्या वाङ्मयाच्या योगें ' सामाजिक पंथ ' या नांवाची अर्थशास्त्राची एक स्वतंत्र शाखा बनली.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें सामाजिक पंथ हा शब्द प्रचारांत येऊन तो जरी सर्वतोमुखीं झाला, तरी पण या शब्दाच्या व्याख्येसंबंधीं मात्र एकमत झालें नाहीं. कारण, अर्थशास्त्रामध्यें जे विशेष विचार निघाले होते व ज्या खटपटी चालल्या होत्या त्या एक प्रकारच्या भासत खऱ्या व म्हणूनच त्या सर्वांचा समावेश करण्याकरितां एका शब्दाची जरूरी होती खरी; तरी पण शब्दप्रयोग ठरल्यावर त्याचा अर्थ काय: हा बिकट प्रश्न राहिलाच. व या शब्दाच्या निरनिराळ्या व्याख्या निरनिराळ्या लोकांनीं दिल्या. कारण ज्या लेखकाला जी पद्धति श्रेयस्कर वाटली ती पद्धति जीमध्यें अन्तर्भूत होईल अशा प्रकारची व्याख्या ती सामाजिक पंथाची व्याख्या म्हणून त्यानें दिली. यायोगानें सामाजिक पंथाचे निरनिराळे प्रकार बनले. तेव्हां सामाजिक पंथाच्या कल्पनांची माहिती होण्याकरितां या पंथाच्या निरनिराळ्या शाखांचें व्यवस्थित वर्गीकरण करणें इष्ट आहे. कारण मग त्यांचें क्रमानें वर्णन करतां येईल. व अशा वर्गीकरणाकरितां सामाजिक पंथाची सर्वांत व्यापक व्याख्या घेणें इष्ट होईल.

औद्योगिक क्रांतीचा परिणाम समाजांत सांपत्तिक विषमता उत्पन्न करण्यांत झाला व ही तीव्र विषमता लोकांस अन्यायाची वाटूं लागली. तेव्हां समाजांतील संपत्तीची वांटणी समतेच्या तत्वावर घडवून आणण्याच्या बुद्धीनें-निदान समा-

जांतील विलक्षण विषमता कमी करण्याच्या बुद्धानें–समाजाच्या चालीरीतींमध्यें व औद्योगिक व्यवस्थेमध्यें जे फेरफार सुचविण्यांत आले व तत्संबंधीं जे प्रयत्न झाले त्यासंबंधींची मीमांसा करून त्यांचें समर्थन करणारा पक्ष म्हणजे सामाजिक पंथ होय; मग हे फेरफार घडवून आणण्याचे मार्ग कोणतेही असोत. ते खासगी व्यक्तींच्या परोपकार बुद्धीचे व आपखुषीचें असोत; किंवा सरकारी कायद्याचे असोत; किंवा संपत्तीच्या उत्पत्तीच्या पद्धतींत बदल करण्याचे असोत; किंवा क्रांतिकारक तऱ्हेचे असोत. अशा व्यापक अर्थानें सामाजिक पंथ व सामाजिकपंथी चळवळी या शब्दांचा प्रयोग केला म्हणजे त्याचे प्रथमतः दोन वर्ग होतात. पहिला वर्ग–शांतिमूलक सामाजिक पंथी चळवळींचा व दुसरा वर्ग–क्रांतिमूलक सामाजिक पंथी चळवळींचा. पहिल्या वर्गांतील सर्व चळवळींना समाजांतील संपत्तीच्या वांटणींतील असमता काढून टाकावयाची असते खरी; पण ती शांततेच्या व कायदेशीर मार्गांनीं काढून टाकावयाची असते. या पहिल्या वर्गाचे चार पोटभेद होतात; त्यांचीं नांवें अशीं:–१ वैयक्तिक सामाजिक पंथ, २ राष्ट्रीय सामाजिक पंथ, ३ समाईक सामाजिक पंथ व ४ संयुक्त सामाजिक पंथ. क्रांतिकारक सामाजिक पंथाचे १ अराजक पंथ व २ विध्वंसक पंथ असे दोन पोटभेद होतात. हें वर्गीकरण खालील कोष्टकावरून चटकन् ध्यानांत येईल.




या सहा पोटभेदांपैकीं शेवटचे दोन पोटभेद सामाजिक पंथाचे पोटभेद मानावे किंवा नाहीं याबद्दल मतभेद होण्याचा संभव आहे. कारण अराजक पंथ व विध्वंसक पंथ या दोघांच्या मतें एकंदर समाजव्यवस्थाच मुळीं मनुष्याच्या हिताच्या विरुद्ध आहे. समाज व त्यांतील सरकार हेंच मुळें सर्व दुःखांचें मूळ आहे. हें मूळ नाहींसें होऊन सर्व मनुष्यांना स्वाभाविक स्वातंत्र्य मिळालें म्हणजे मनुष्य-

जातीस सुखप्राप्ति होईल; अर्थात् समाज ही एक कृत्रिम गोष्ट आहे व ती मनुष्याच्या दास्यत्वाला व त्याच्या दुःखाला कारणीभूत होते; ही कृत्रिम अवस्था जाऊन जर सर्व मनुष्यांना त्यांची स्वाभाविक स्थिति प्राप्त झाली तरच मनुष्याचें दास्यत्व जाऊन त्याची सुखवृद्धि होईल असें या पंथाचें म्हणणें आहे. अराजक पंथ व विध्वंसक पंथ हे एका दृष्टीनें मानवी त्राग्यानें उत्पन्न केलेले पंथ आहेत. समाजांतील कांहीं वाईट गोष्टींचा मनावर विलक्षण परिणाम होऊन एकंदर समाजच वाईट व देशांतील एकंदर सरकारही वाईट व या दोन्ही संस्था नाहींशा करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे व तें पार पाडण्याकरितां गुप्त मंडळ्या स्थापणें व इतर क्रांतिकारक मार्ग यांचा अवलंब करणें अवश्यक आहे असें या पंथाचें मत आहे. परंतु हे पंथ सामाजिक पंथामध्यें कसे अन्तर्भूत होतात हें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

वरील कोष्टकावरून शांतिमूलक सामाजिक पंथाचे चार पोटभेद आहेत असें दिसून येईल. यांपैकीं १ ला पोटभेद म्हणजे 'वैयक्तिक सामाजिक पंथ' होय. औद्योगिक क्रांतीपासून मजूरवर्गाची सांपत्तिक स्थिति फार वाईट झाली आहे, व त्यामुळें समाजामध्यें संपत्तीच्या वांटणींत फारच असमता उत्पन्न झाली आहे हें पाहून ही असमता काढून टाकण्यासंबंधींच्या कल्पना व योजना कांहीं परोपकारी व्यक्तींनीं काढल्या. या योजनांनाच 'वैय्यक्तिक सामाजिक पंथ' असें नांव पडलें. या योजना अमलांत आणण्याची खटपट या व्यक्तींनीं आपल्याच हिंमतीवर केली. मजूरवर्गांतील लोकांचीं मनें वळवून आपल्या योजनेप्रमाणें संस्था काढण्याचा उपक्रम या लोकांनीं केला. यावरून या पंथाचा असमता नाहींशी करण्याचा मार्ग आपखुषीचा व खाजगी परोपकाराचा होता. या पंथाचीं उदाहरणें पुढें द्यावयाचीं आहेत, त्यांवरून या पंथाच्या स्वरूपाचें जास्त स्पष्टीकरण होईल.

शांतिमूलक सामाजिक पंथाचा २ रा पोटभेद 'राष्ट्रीय सामाजिक पंथ' या नांवानें प्रसिद्ध आहे. अर्वाचीन औद्योगिक पद्धतीमुळें समाजामध्यें संपत्तीच्या विषम वांटणीस सुरुवात झाली; परंतु संपत्तीच्या उत्पादनाच्या पद्धतीचा हा अनिवार्य परिणाम आहे व ज्या अर्थी संपत्तीची वाढ होणें इष्ट आहे, त्या अर्थी या संपत्तीच्या पद्धतींत फरक घडवून आणणें शक्य नाहीं; तरी पण कायद्याच्या मदतीनें बहुजनसमाजांतील गरीब लोकांची स्थिति पुष्कळ बाबतींत सुधारण्या-

सारखी आहे. तेव्हां समाजांतील औद्योगिक पद्धतीनें उत्पन्न झालेल्या असमतेची जितकी तीव्रता कमी करणें शक्य आहे तितकी तीव्रता कमी करणें हा राष्ट्रीय सामाजिक पंथाचा कार्यभाग आहे. वैय्यक्तिक सामाजिक पंथ व्यक्तींच्या आपखुषीनें व इतर खासगी खटपटीनें या बाबतींत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करतो; तर राष्ट्रीय सामाजिक पंथाचा भरंवसा देशाचें सरकार व कायदा या दोहोंवर फार आहे. व्यक्तीच्या जीविताचें व मालमत्तेचें संरक्षण करणें इतकेंच सरकारचें कर्तव्यकर्म आहे असें नाहीं; तर बहुजनसमाजाला सुख देणें व त्याला सुस्थितीप्रत आणणें हेंही सरकारचें कर्तव्यकर्म आहे, असें या पंथाला वाटतें व हें घडवून आणण्यास कायद्यासारखें दुसरें अमोघ शस्त्र नाहीं, म्हणून या शस्त्राचा सरकारनें खुल्या दिलानें व सढळ हातानें उपयोग केला पाहिजे, असें या पंथाचें म्हणणें आहे.

शांततामूलक सामाजिक पंथाच्या ३ ऱ्या पोटभेदाचें नांव 'समाईक सामाजिक पंथ' हें होय. राष्ट्रीय पंथाप्रमाणेंच या पंथाला असें वाटतें कीं, समाजांतील संपत्तीच्या वांटणीची विषमता विराट्स्वरूपी कारखान्यांच्या पद्धतीनें निर्माण होते. व विराट्स्वरूपी कारखाने देशांतील भांडवल व जमीन-संपत्तीच्या उत्पत्तीचीं दोन साधनें-हीं थोड्याशा लोकांच्या हातीं गेल्यामुळें होतात. याप्रमाणें भांडवल व जमीन हीं देशांतील लहानशा वर्गाच्या हातीं सर्वस्वीं गेल्यामुळें व या भांडवलाखेरीज व जमिनीखेरीज मजुरांना आपल्या श्रमाचा उपयोग करतां येत नसल्यामुळें मजुरांच्या श्रमाचें फळ त्यांचेपासून या भांडवलवाल्या व जमीनदार वर्गाला बुचाडून घेतां येतें. तेव्हां सर्व भांडवल व देशांतील सर्व जमीन ही खाजगी व्यक्तीच्या हातांत असतां कामा नये. तर सर्व प्रकारचें भांडवल व जमीन यांवर राष्ट्रीय मालकीच पाहिजे. म्हणजे या पंथाच्या मतें सर्व कारखाने व धंदे हे राष्ट्रीय किंवा सरकारच्या मालकीचे झाले पाहिजेत. अर्थात् सर्व उद्योगधंदे हे सरकारची निरनिराळीं खातीं झालीं पाहिजेत. असें झालें असतांना प्रत्येक मनुष्याला आपआपल्या गुणाप्रमाणें व कर्तबगारीप्रमाणें संपत्तीचा वांटा मिळेल. या पद्धतींत सर्व कारखाने सरकारी बनून प्रत्येक मनुष्य सरकारी नोकर बनावयाचा. म्हणजे कोणालाही काम केल्याखेरीज उत्पन्न मिळणार नाहीं व संपत्तीची वांटणी समतेवर होईल. उपभोग्य वस्तु व जंगम मिळकती यासंबंधींच

फक्त खाजगी मालमत्तेची संस्था असावी. परंतु उत्पत्तीचीं साधनें खाजगी व्यक्तीच्या मालकीचीं नसावीं असें या पंथाचें म्हणणें आहे.

चवथा पंथ म्हणजे ' संयुक्त सामाजिक पंथ ' होय. या पंथाला खासगी मालकीची संस्था हीच मुळीं सर्व अनर्थाचें मूळ भासते. कारण या खासगी मालकीच्या संस्थेपासूनच समाजांत सर्व विषमता उत्पन्न झाली आहे, असें हा पंथ म्हणतो. तेव्हां या पंथाला सर्व संपत्ति सर्व लोकांची संयुक्त व्हावी अशी इच्छा आहे. ज्याप्रमाणें कुटुंबामध्यें सर्व गोष्टी संयुक्त मालकीच्या असतात; कुटुंबांतील निरनिराळया व्यक्तींची खासगी मालमत्ता नसते; कुटुंबांतील सर्व व्यक्ति आपआपलें उत्पन्न एकत्र करतात व त्याचा उपभोग सर्व सारख्याच तऱ्हेनें घेतात; सारांश, कुटुंबांत ज्याप्रमाणें सर्व व्यक्ति अगदीं एकरूप असतात व तेथें विषमता किंवा संपत्तीची वांटणी यांचा प्रश्नच उद्भवत नाहीं; त्याप्रमाणें सर्व समाजाची संपत्ति संयुक्त असली म्हणजे हल्लींचे सर्व अनर्थ व विषमता नाहींशी होईल. तेव्हां अशी संयुक्त संपत्तीची स्थिति समाजांत घडवून आणण्याचा उद्देश या पंथानें आपल्या डोळयांपुढें ठेविला आहे.

या सर्व पंथांचा एकत्र विचार केला असतां सामाजिक पंथांची एकापुढें एक अशी मालिकाच बनते. वैयक्तिक सामाजिक पंथ हा समाजांतील मजूरवर्गाची दैन्यावस्था आपखुषीच्या मार्गानें व व्यक्तीच्या खटपटीनें सुधारण्याचा प्रयत्न करतो. या अर्थानें मागील दोन भागांत वर्णिलेल्या मजुरांचे संघ, सहकारी संस्था, सहकारी पतपेढया वगैरेंसारख्या मजूरवर्गाची स्थिति सुधारणाऱ्या सर्व प्रकारांचा अन्तर्भाव वैयक्तिक सामाजिक पंथांत होऊं शकेल. परंतु स्वावलंबनावर उभारलेल्या या संस्थांचा बहुधा सामाजिक पंथाच्या उपायांत अन्तर्भाव केला जात नाहीं. राष्ट्रीय सामाजिक पंथ एक पाऊल पुढें जातो. समाजांतील गरीब लोकांची स्थिति सुधारण्याचे सरकारी कायद्यानें घडवून आणिलेले सर्व प्रयत्न या सदरांत येतात. या दृष्टीनें कारखान्यांचे कायदे, सक्तीचें शिक्षण इत्यादि उपाय सामाजिक पंथीच होतात. हल्लींच्या काळीं या पंथाची छाप सुधारलेल्या सरकारावर आहे, यांत शंका नाहीं. या दृष्टीनें व्यक्तिस्वातंत्र्याचें माहेरघर जें इंग्लंड तेथेंही सामाजिक पंथाचें वजन पडलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सामाजिक पंथाच्या सर्व पंथांत हाच खरोखर सुसाध्य पंथ आहे हें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

सामाजिक पंथाचा तिसरा प्रकार समाईक पंथ. याची मजल राष्ट्रीय सामाजिक पंथाच्याही पुढें आहे. सर्व उत्पत्तीचीं साधनें सरकारी मालकीचीं होऊन सर्व लोकांच्या संपत्तीची वांटणी कायद्यानें समतेच्या तत्वावर ठरलेली असावी असें या पंथाला वाटतें. या पंथाचा अभिप्राय, सरकारनें धंद्याचा सर्व पुढाकार आपल्या हातीं घ्यावा व सर्व व्यवस्था सरकारनेंच करावी असा आहे. लोकांची स्थिति सुधारण्याचा या पंथाचा एक मुख्य उपाय म्हणजे देशांतील जमीन सरकारी मालकीची करणें हा होय. या उपायाच्या युक्तायुक्ततेचा पुढील भागांत विचार करावयाचा आहे. तेव्हां सध्यां त्याचा नामनिर्देशच पुरे.

संयुक्त सामाजिक पंथाला मात्र हल्लींची समाज-रचनाच पसंत नाहीं. हल्लींची समाजरचना खासगी मालमत्तेच्या कल्पनेवर बसविलेली आहे. या पंथाला ही संस्थाच मुळीं सर्व अनर्थांचें मूळ भासते. तेव्हां 'मूले कुठारः' या न्यायानें त्याचा हेतु ही संस्था नाहींशी करून सर्व संपत्ति संयुक्त मालकीची करण्याचा आहे.

या मालिकेकडे पाहिलें म्हणजे १ अराजक व २ विध्वंसक हे दोन्ही पंथ या पुढील पायरीप्रमाणेंच दिसतात यांत शंका नाहीं. कारण संयुक्त सामाजिक पंथाला खासगी मालमत्ता अनर्थाचें मूळ दिसते, तर अराजक पंथाला समाज व सरकार याच संस्था मनुष्याच्या अनर्थाचें व आपत्तींचें मूळ दिसतात. कारण, समाज व त्यांतील सरकार यांनींच खासगी मालमत्तेच्या संस्थेचा उदय होतो व मालमत्तेची सुरक्षितता ठेवणें हें सरकारचें आद्य कर्तव्यकर्म समजलें जातें. तेव्हां समाजरचना व सरकार यांनीं सर्वत्र असमता उत्पन्न होते. तेव्हां या अगदीं मुख्य मूळांवरच घाला घालणें रास्त आहे असें या पंथांना वाटतें.

वरील विवेचनावरून संयुक्त सामाजिक पंथ व अराजक पंथ यांमध्यें बरेंच साम्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या उपायांत व साधनांत फरक असेल; परंतु सर्व जगांत दिसून येणाऱ्या संस्थाच अनर्थमूलक आहेत अशी या पंथांच्या लोकांची समजूत असते. या पंथांना मनुष्यस्वभावाची पारख नाहीं व म्हणून अशा प्रकारची कल्पना त्यांच्या डोक्यांत येते, असें म्हणणें प्राप्त आहे. संयुक्त सामाजिक पंथाला ॲरिस्टाटल या ग्रीक तत्ववेत्त्यानें आपल्या राजनीति या ग्रंथांत उत्तम तऱ्हेचें उत्तर दिलें आहे. मनुष्यस्वभावच असा आहे कीं, त्याला आपलेपणा वाटल्याखेरीज त्याचे हातून हौसेनें व कळकळीनें श्रम होणार नाहींत.

सर्वांचें काम तें कोणाचेंच काम नाहीं असा नेहमींचा अनुभव आहे; म्हणून **ऑरिस्टाटलनें** खाजगी मिळकतीची कल्पना हीच मनुष्याची सुधारणा घडवून आणणारी संस्था होय असें म्हटलें आहे. यावरून समाजाची जी हल्लीं बरी स्थिति आहे ती खाजगी मिळकतीमुळेंच आहे व खाजगी मिळकतीचें संरक्षण करणाऱ्या समाज व सरकार या संस्थांच्या योगानेंच सर्व मानवी सुधारणा झाली आहे असें म्हणणें ओघानें प्राप्त होतें. तेव्हां सामाजिक पंथांपैकीं हे पंथ आत्मघातकीपणाचे आहेत व ते समंजस लोकांना रुचण्यासारखे नाहींत हें उघड आहे. आतां या सामाजिक पंथाच्या इतिहासाकडे वळूं.

सामाजिक पंथ हा शब्द जरी अर्वाचीन असला तरी या पंथाच्या मुळाशीं असलेली कल्पना सर्व ठिकाणीं दिसून येत असल्यामुळें असे पंथ पुष्कळ ठिकाणीं पूर्वकाळींही निघालेले आहेत. समाजामध्यें कांहीं अनर्थ दिसून आले, विशेषतः कांहीं लोक श्रीमंत व कांहीं अत्यंत हालअपेष्टांमध्यें असलेले दिसले, म्हणजे या गोष्टीच्या कारणाकडे मनुष्याचें लक्ष जातें व ही स्थिति कशी सुधारतां येईल अशाबद्दल मनुष्य विचार करूं लागतो. मग पुष्कळ वेळां त्याला चालू असलेल्या स्थितीपेक्षां भिन्न प्रकारचे उपाय सुचतात. ग्रीक लोकांमध्यें **प्लेटोनें** जी एक समाजसुधारणेची कल्पना आपल्या 'प्रजासत्ताक' नांवाच्या ग्रंथांत दिलेली आहे ती पुष्कळ अंशीं संयुक्त सामाजिक पंथाप्रमाणें आहे. या कल्पनेवर टीका करतांनाच **ऑरिस्टाटलनें** वर निर्दिष्ट केलेले विचार प्रदर्शित केले आहेत. तसेंच खाजगी मालमत्ता हें अनर्थाचें मूळ आहे, तेव्हां तें काढून टाकण्याचे प्रत्यक्ष प्रयत्न झालेले आहेत. उदाहरणार्थ, ज्यू लोकांमध्यें अशा मालमत्तेच्या संस्था संयुक्त होत्या. क्रिश्चन धर्मामध्येंही खासगी मिळकतीवर मोठा कटाक्ष होता. मानवी समाजाच्या बाल्यावस्थेंत ग्रामसंस्थेसारख्या संस्था होत्या. व त्यामुळें जमीन ही बहुधा संयुक्त म्हणजे सर्व ग्रामस्थांच्या मालकीची असे. परंतु या प्रत्यक्ष प्रयत्नाचा इतिहास येथें देणें शक्य नाहीं. अर्वाचीन काळीं अर्थशास्त्रांत जे सामाजिक पंथ निघाले आहेत त्यांचा संक्षिप्त इतिहास येथें देणें शक्य आहे व त्यायोगानें प्रास्ताविक पुस्तकांतील उपोद्घात व हा भाग मिळून अर्थशास्त्राचा सर्व इतिहास दिल्यासारखें होईल.

वर सांगितलेंच आहे कीं, सामाजिक पंथ हा शब्दप्रयोग प्रथमतः **ओवेन** या इंग्रज समाजसुधारकाच्या प्रयत्नासंबंधीं लावण्यांत आला. तेव्हां आपल्या

इतिहासाला तेव्हांपासूनच प्रारंभ करणें बरें.

**रॉबर्ट ओवेन** हा मोठा सुधारक होता. त्याचे स्वतःचे कारखाने होते. त्यांत त्यानें पोरक्या मुलांना कामाला लावून त्यांच्या आरोग्याकडे व शिक्षणाकडे लक्ष घातलें. गिरणींतील मजुरांना शिक्षण देण्याकरितां रात्रीच्या शाळा काढण्याची कल्पना त्याची होय. त्यानें कारखान्याचे कायदे घडवून आणण्यांत पुष्कळ खटपट केली व आपली सर्व संपत्ति मजूरलोकांची स्थिति सुधारण्यांत व त्याच्या कल्पनेप्रमाणें एक सामाजिक पंथी संस्था स्थापण्यांत घालविली. त्याची सामाजिक पंथी कल्पना कांहींशी ग्रामसंस्थेसारखी होती. त्याचें म्हणणें असें होतें कीं, सुमारें १२०० लोकांनीं सुमारें १२०० किंवा १८०० एकर जमीन घ्यावी व आपला एक समाज करावा. या समाजानें एकाच इमारतींत रहावें व सर्व जमिनीची लागवड समाईक श्रमानें करावी. आपल्या श्रमाचे उत्पन्नाचाही त्यांनीं एकत्रच उपभोग घ्यावा. **फोरीअर व सेंट सायमन** यांच्या योजना याच तऱ्हेच्या होत्या. फोरिअरच्या मतामध्यें सर्व समाजाच्या लहान टोळ्या बनवावयाच्या, व प्रत्येक टोळीनें एकाच मोठ्या इमारतींत रहावयाचें. या टोळीचा मुख्य धंदा शेतकीचा, परंतु तिनें आवडीप्रमाणें दुसरेही धंदे करण्यास हरकत नाहीं. या टोळींत खाजगी मिळकत व कुटुंबव्यवस्था असावयाची, परंतु श्रीमंत व गरीब यांनीं एकत्र रहावयाचें. म्हणजे श्रीमंत व गरीब यांमधील हल्लींचा भेदभाव राहणार नाहीं. सर्वांच्या श्रमानें उत्पन्न झालेल्या संपत्तीचा एक ठरीव हिस्सा प्रत्येक मनुष्याला मिळावयाचाच व बाकीच्या उत्पन्नापैकीं पांचबारांश श्रमाबद्दल मोबदला श्रम करणारांस द्यावयाचा, चारबारांश मोबदला भांडवलाबद्दल भांडवलवाल्यांस द्यावयाचा व तीनबारांश बुद्धिमत्ता व कल्पकता हे गुण दाखविणाऱ्या लोकांना द्यावयाचा. या योजनेप्रमाणें खासगी रीतीनें समाज स्थापन करण्याच्या खटपटी झाल्या. परंतु त्यांना म्हणण्यासारखें यश आलें नाहीं.

**फरडिनंड लॅसेली** हा जर्मन सामाजिक पंथाचा मोठा पुरस्कर्ता होता. **लैप्झिक** येथें भरलेल्या गरीब लोकांच्या परिषदेच्या अध्यक्षाचा मान त्यास मिळाला होता. अभिमतपंथानें प्रस्थापित केलेल्या मजुरीच्या नियमापासून आपली सुटका करून घेण्याच्या मार्गांतील पहिली पायरी म्हणजे सार्वत्रिक मताधिकार ही होय, ही मागणी मजुरांच्या तर्फेनें त्यानें प्रथमतः याच परिषदेंत केली.

कारण मजुरांना असा मताधिकार मिळाला ह्मणजे भांडवलवाल्यांच्या जुलमापासून आपली सुटका करून घेण्यासाठीं मजूरवर्गाला भांडवल सरकारी तिजोरींतून देण्याला सरकारला भाग पाडतां येईल असें त्याचें म्हणणें होतें. लॅझेलीनें १८६३ मध्यें मजुरांची एक प्रचंड संस्था निर्माण केली. त्याच्या परिश्रमानें जर्मनीमध्यें सामाजिक पंथाला फार जोर आला. त्यानें या विषयावर पुष्कळ लिहिलें आहे त्यांतून त्याच्या मताचा खालीं दिलेला मथितार्थ निघतो.

लॅझेलीच्या मताप्रमाणें अर्वाचीन युरोपच्या इतिहासाचे तीन भाग पडतात. पहिलें युग जहागिरीयुग होय. त्याचा काळ १७८९ पर्यंतचा आहे. या काळांत सर्व सार्वजनिक सत्ता समाजांतील जमीनदार वर्गाच्या हातीं होती व तिचा उपयोग हा वर्ग आपल्या स्वतःच्याच हिताकरितां करीत असे. हा काळ त्या वर्गाच्या हक्काचा व सवलतीचा काळ होता. इतर सर्व प्रकारच्या श्रमाबद्दल व धंद्याबद्दल तुच्छताबुद्धि होती. कामकरी लोकही जमीनदारांचे बहुतेक गुलामच होते. सारांश, या काळांत सर्व सत्ता, सर्व मान, सर्व कांहीं जमीनदारांना होतें; कामकऱ्यांना मात्र यांपैकीं कांहीं एक नव्हतें.

१७८९ पासून १८४८ च्या दुसऱ्या काळाला नागरिक-काळ ह्मणतां येईल. या काळांत जंगम मालमत्तेला स्थावर मिळकतीच्या इतका मान मिळूं लागला. परन्तु अजूनही अधिकार व सत्ता हीं मनुष्याच्या अंगच्या गुणाऐवजीं त्याच्या मालमत्तेवरून ठरलीं जात असत. या काळीं नागरिक वर्गाच्या हिताकरितां कायदे केले जात असत.

जो जन्माला येण्याची व कायदेशीर होण्याची धडपड करीत आहे, असा कामदारांचा काल १८४८ पासून सुरू झाला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

या काळांत श्रमाला आपले सर्व हक्क परत मिळतील व ते समाजाकडून कबूलही केले जातील. कामकरी लोक हे समाजांतील एकंदर लोकसंख्येच्या शेंकडा ९६ प्रमाणांत असतात तेव्हां त्यांचेंच खरोखरी राष्ट्र होतें. ते राष्ट्रांतील एक वर्ग नव्हेत. ह्मणून जेव्हां राजकीय सत्ता कामदारांच्या हातांत येईल, तेव्हां ती सर्व राष्ट्राच्या हातांत गेल्याप्रमाणें होईल.

पहिल्या दोन काळांत अप्रत्यक्ष कराची पद्धति होती. आपल्या बरोबरीनें कामदारांच्या डोक्यावर कराचा बोजा बसवावयाकरितां श्रीमंत वर्गाची ही युक्ति

होती. परंतु आगामी कामदारांच्या काळांत प्रत्येक वर्गाच्या ऐपतीप्रमाणेंच कर ठरविण्यांत येतील.

वर वर्णिलेल्या प्रत्येक काळांत राष्ट्राच्या उद्देशाची कल्पना भिन्न भिन्न आहे. पूर्वकाळीं अशी कल्पना होती कीं, सरकारचें कर्तव्यकर्म ह्मणजे मानवी स्वातंत्र्य व मालमत्ता यांचें संरक्षण करणें एवढेंच होय. दुसऱ्याच्या व्यवसायीपणाला प्रतिबंध न होतां प्रत्येक व्यक्तीला जितका स्वतंत्रपणें व्यवसाय करतां येईल, तितका करण्यास मुभा देणें इतकेंच सरकारचें कर्तव्यकर्म अशी दुसऱ्या काळची कल्पना होती. या कल्पनेप्रमाणें दुर्बल हे प्रबलांच्या तावडींत जातात. कामकरी-काळांतील सरकारच्या कर्तव्यकर्माची कल्पना अगदीं भिन्न आहे. प्रत्येक व्यक्तीला अज्ञान, विपत्ति, दारिद्र्य व दुर्बलता या सर्वांवर विजय मिळवितां यावा अशी योजना करणें हें सरकारचें खरें कर्तव्यकर्म आहे. अशी या कामगिरी काळाची कल्पना आहे. सारांश, अर्वाचीन काळच्या प्रयत्नाची गुरुकिल्ली ह्मणजेच प्रगतीची कल्पना होय. प्रत्येक युगाची एक प्रधान कल्पना असते. हल्लींच्या काळची प्रधान कल्पना ह्मणजे मानवजातीची नैतिक उन्नति ही होय. पहिल्या काळाच्या शेवटीं गुलामगिरी म्हणजे एका मनुष्यप्राण्याचा दुसऱ्या मनुष्यप्राण्यावरील स्वस्वाचा हक्क नाहींसा झाला. ह्मणजे या काळांत मानवी स्वातंत्र्य हा एक नैसर्गिक हक्क आहे असें सिद्ध झालें. नागरिक काळांत मनुष्याचा ज्ञान मिळविण्याचा हक्क प्रस्थापित झाला. ह्मणजे लोकशिक्षण हें सरकारचें कर्तव्य समजलें गेलें. आतां कामकरी-काळांत मजुरांचा मालमत्तेवरील हक्क प्रस्थापित व्हावयाचा आहे. मनुष्याला वाटेल तें करण्याचा हक्क असल्याशिवाय, त्याला ज्ञान मिळविण्याचा हक्क असल्याशिवाय व शेवटीं मालमत्ता मिळविण्याचा हक्क असल्याशिवाय मनुष्याला खरें स्वातंत्र्य मिळालें असें ह्मणतां येणार नाहीं. सारांश, कामदारांच्या चळवळीचा हेतु व्यक्तीला खरें स्वातंत्र्य मिळवून देण्याचा आहे. समता हा कांहीं त्याचा प्रधान हेतु नाहीं, तर स्वातंत्र्य हा त्याचा हेतु आहे. सध्यां मनुष्य हा अर्धवट स्वतंत्र आहे. पहिल्या काळांत त्याला मुळींच स्वातंत्र्य नव्हतें. त्या काळीं एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याला आपल्या मालकीचा करूं शके. हा शरीरावरील मालकी हक्क नाहींसा झाला आहे. दुसऱ्या काळांत मनुष्यें जरी स्वतंत्र होतीं तरी त्यांच्या श्रमावर जमीनदारांचें स्वामित्व होतें. तेंही आतां नाहींसें झालें आहे. आपला श्रम पाहिजे

त्या माणसास विकण्याचा हक्क त्याला हल्लीं आहे; परंतु त्याचें स्वातंत्र्य अजून पूर्ण झालें नाहीं. कारण, निवळ श्रम संपत्ति उत्पन्न करण्यास असमर्थ आहे. त्या श्रमाला साधनें व उपकरणें यांची जोड पाहिजे. परन्तु हीं साधनें व उपकरणें भांडवलवाल्यांच्या ताब्यांत असतात व म्हणूनच कामकरी हे भांडवलवाल्यांच्या तावडींत सांपडतात व त्यांना भांडवलवाले देतील ती मजुरी पतकरणें भाग पडतें. सामाजिक पंथाचें असें म्हणणें आहे कीं, उत्पत्तीचीं हीं साधनें व उपकरणें खाजगी व्यक्तींच्या मालकीचीं नसावींत, तर तीं समाजाचीं असावींत. अर्वाचीन काळीं संपत्तीची उत्पत्ति ही सामाजिक झालेली आहे. भांडवल व श्रम परस्परावलंबी आहेत. परंतु संपत्तीची वांटणी मात्र वैय्यक्तिक पद्धतीची आहे. हल्लींची समाजांतील संपत्तीची वांटणी ही अन्यायाची आहे हें लॅझेलीनें रिकार्डोच्या खालील दोन तत्वांवरून सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

रिकार्डोच्या मतें पदार्थाचें मोल हें शेवटीं श्रमावर अवलंबून आहे. अमुक तासाचा अमुक श्रम म्हणजे पदार्थाचें मोल होय. समाजाला अवश्य श्रम म्हणजेच मोल होय. म्हणून शारीरिक व मानसिक श्रमालाच संपत्तीच्या उत्पत्तीबद्दल सर्व मोबदला मिळाला पाहिजे. परंतु हल्लींच्या औद्योगिक पद्धतींत श्रमाचा मोबदला ठरलेला असतो. निवळ उपजीविकेला जितका खर्च लागतो त्यापेक्षां जास्त मजुरीचा दर वाढणें अशक्य आहे. कारण जर मजुरी वाढली तर लग्नें जास्त होतील. मग त्यानें लोकसंख्या वाढेल व शेवटीं मजुरीचा दर पूर्वपदाला येईल.

अभिमतपंथानें सांगितलेला हा जो मजुरीचा निर्घृण कायदा त्यापासून सुटका करून घेण्याची कामकऱ्यांची इच्छा आहे. यांतून सुटण्याचा मार्ग म्हणजे सर्व भांडवल सरकारचें करणें हा होय. या हेतुसिद्धीच्या मार्गांतील पहिली पायरी म्हणजे सरकारच्या पतीच्या साहाय्यानें कामकरी लोकांचे धनोत्पादक संघ बनविणें ही होय. हीच लॅझेलीची सामाजिक पंथी योजना होती.

लॅझेलीच्या मताप्रमाणें प्रत्येक राष्ट्रांतील मजूरदारांनीं आपआपली स्थिति सुधारण्याचे मार्ग काढावे, म्हणून त्याची चळवळ राष्ट्रीय होती. परंतु त्याच्या पश्चात् हा निर्बंध टिकला नाहीं. लॅझेलीच्या अनुयायांनीं ही चळवळ सार्वराष्ट्रीय केली.

मार्क्स या ग्रंथकाराचा ' भांडवल ' हा ग्रंथ म्हणजे अर्वाचीन सामाजिक पंथाचा प्रमाण-ग्रंथ होय. या पुस्तकामध्यें त्याचीं सर्व प्रमाणें गोविलेलीं आहेत.

हा ग्रंथ मोठ्या कुशलतेनें लिहिला आहे यांत शंका नाहीं. त्यावरून ग्रंथकर्त्याची विचारशक्ति, त्याचें अर्थशास्त्राच्या वाङ्मयाचें ज्ञान, त्याची शोधकबुद्धि व तार्किक पृथक्करण-बुद्धि चांगली व्यक्त होते. परंतु ग्रंथामध्यें कांहीं दोषही आहेत. आधीं भाषा चांगली नाहीं. शिवाय साध्या व स्पष्ट गोष्टींवर पाल्हाळ केला आहे व वादग्रस्त मुद्दे गृहीत धरले आहेत.

' भांडवलाचा उदय व त्याचे सामाजिक परिणाम ' हा या ग्रंथाचा विषय आहे. मार्क्सनें ' भांडवल ' याचा अगदीं निराळाच अर्थ घेतला आहे. भावी उत्पत्तीकरितां शिल्लक टाकलेली संपत्ति म्हणजे भांडवल होय, असा सामान्यतः अर्थशास्त्री त्याचा अर्थ करतात. या अर्थानें शेतकऱ्यांजवळ असलेलीं साधनें व उपकरणें यांचा भांडवलांत अन्तर्भाव होतो. पूर्वी मजुरांच्या हातींच भांडवल असे. शेतकरी आपल्या उपभोगावयाच्या संपत्तीमधून बियाणें व इतर साधनें मागें टाकी. शेतकरी आपल्या स्वतःच्या उपभोगाकरितां संपत्ति उत्पन्न करी; व भांडवल श्रमाच्या हवालीं होतें. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर व व्यापाराच्या वाढीनंतर स्वतः संपत्तीच्या उत्पादक धंद्यांत न पडणाऱ्या परंतु आपलें भांडवल कारखानदारांना कर्जाऊ देणाऱ्या लोकांच्या हातांत गेलें व कारखानदार मजुरांना कामावर घेऊं लागले. मार्क्सच्या मताप्रमाणें भांडवल म्हणजे निव्वळ पैसा होय. संपत्तीच्या वाढीकडे उपयोग केलेली संपत्ति म्हणजे पैसा होय. भांडवलवाले आपल्या स्वतःच्या उपयोगाकरितां संपत्ति उत्पन्न करीत नाहींत, तर दुसऱ्याच्या उपयोगाकरितां ती उत्पन्न करितात. अर्थात् आपली संपत्ति वाढविण्याकरितां ती दुसऱ्यास विकतात. संपत्तीची वाढ कशी होते व ती कोठून होते हें शोधून काढणें हा मार्क्सच्या पुस्तकाचा मुख्य प्रश्न आहे.

विनिमयानें पदार्थांचें मोल वाढत नाहीं. कारण समान मोलाच्या वस्तूंची अदलाबदल म्हणजे विनिमय होय. विनिमयानें पदार्थांची उपयुक्तता वाढेल. कारण विनिमयांत आपल्याला नको असलेल्या वस्तूची आपल्याला पाहिजे असणाऱ्या वस्तूशीं आपण अदलाबदल करतों; परंतु ही समसमानांची अदलाबदल असते. तसेंच मोलाची वाढ भांडवलादि जड साधनांपासून होत नाहीं, तर ती मानवी श्रमापासून होते. खरोखरी पाहतां पदार्थांच्या मोलाची वाढ म्हणजे मजुरांच्या आवश्यक उपजीविकेच्या साधनाचें मोल व मजुरांच्या श्रमानें उत्पन्न

केलेल्या पदार्थाचें मोल यांमधील वजाबाकीनें होते व ही सर्व मोलाची वाढ हल्लींच्या उद्योगपद्धतींत भांडवलवाले काटतात. मार्क्सनें आपल्या ग्रंथाच्या पुढील भागांत त्यांच्या श्रमाचीं फळें मजूरवर्गापासून कोणकोणत्या मार्गांनीं हिरावून नेलीं जातात याचें विवेचन केलें आहे. मार्क्सचें विवेचन अर्थशास्त्रांतील दोन प्रमेयांवर बसविलेलें आहे. तीं प्रमेयें हीं:–१ श्रमापासून मोलाची उत्पत्ति होते. अर्थात् उत्पत्तीच्या खर्चावर मालाची स्वाभाविक किंमत अवलंबून असते. व २ श्रम उत्पन्न करण्याच्या खर्चावर मजुरांची स्वाभाविक मजुरी अवलंबून असते. म्हणजे मजुरांच्या उपजीविकेला जितका खर्च अत्यंत अवश्यक आहे त्या मानानें त्यांची मजुरी असते.

मार्क्सनें आपलीं मतें खालीं दिलेल्या सदरांत प्रतिपादन केलीं आहेत.

**मोल**—विनिमय-मोल व उपयुक्तता-मोल असे मोलाचे दोन भेद करतात. परंतु वस्तूचें खरें मोल या दोहोंपेक्षांही भिन्न आहे. कारण उपयुक्तामोल ह्मणजे केवळ उपयुक्तता होय. व दुसरें आपल्याला लागणाऱ्या वस्तु जेथें मनुष्य स्वतः तयार करतो अशा समाजाच्या बाल्यावस्थेंत किंवा जेथें सर्व वस्तु समाईक गणल्या जातात तेथें विनिमयमोल याला अस्तित्वच नसतें. परंतु हें खरें कीं, अर्वाचीन समाजांत मोल हें विनिमयमोलाच्या रूपानेंच दृग्गोचर होतें. तेव्हां विनिमयमोल ह्मणजे काय? एका उपयुक्त पदार्थाची दुसऱ्या उपयुक्त पदार्थाशीं ज्या परिमाणानें अदलाबदल होते त्यावर विनिमयमोल अवलंबून आहे. व हें परिमाण पदार्थाच्या उपयुक्ततेवर मुळींच अवलंबून नाहीं. कारण उपयुक्तता हा गुण आहे, तर परिमाण ही संख्या आहे. दुसरें–उपयुक्ततेच्या दोन प्रकारांची तुलना करतां येणें अशक्य आहे. कारण त्या अतुल आहेत. शिवाय पुष्कळ उपयुक्त पदार्थांना विनिमयमोल नाहीं; उदाहरणार्थ हवा, पाणी, नवी जमीन. तेव्हां ज्या पदार्थांना विनिमयमोल आहे त्या सर्वांमध्यें असणारा सामान्य गुण म्हणजे त्याची कष्टसाध्यता किंवा श्रमसाध्यता होय. आतां श्रम ही मोजण्यासारखी गोष्ट आहे, आणि पदार्थाचें मोल तो उत्पन्न करण्यास लागलेल्या श्रमाच्या परिमाणावर अवलंबून आहे. व श्रमाचें परिमाण ह्मणजे श्रमाचा काळ होय. यावरून खरें मोल श्रमाचा काळ व पदार्थाची उत्पत्ति यांच्या संबंधावरून निष्पन्न होतें. मजुराला प्रत्यक्ष लागलेल्या वेळावरून वस्तूचें मोल ठरवावयाचें

नाहीं हें उघड आहे. कारण एक मजूर दुसऱ्यापेक्षां जास्त आळशी असेल. परंतु त्या काळीं उपलब्ध असलेल्या साधनांचा उपयोग करून सरासरीनें जितके श्रम पदार्थाच्या उत्पत्तीस लागतील त्यावर मोल अवलंबून आहे. ही सरासरी एका धंद्यांतील मजुरांची संख्या व त्यांनीं उत्पन्न केलेल्या सर्व मालाची संख्या यांच्यावरून काढावयाची. याप्रमाणें मार्क्सच्या विवेचनाचा सिद्धांत हा कीं, पदार्थाचें मोल म्हणजे मालामध्यें सांठवून ठेवलेले श्रमाचें परिमाण होय.

या मोलाच्या मीमांसेवर दोन आक्षेप येतात. पहिला हा कीं, या उपपत्तीप्रमाणें ज्या वस्तूला श्रम पडलेले नाहींत तिला मोल असतां कामा नये; व दुसरा हा कीं, ज्या ज्या वस्तूला श्रम लागले आहेत तिला मोल असलें पाहिजे. पहिल्या आक्षेपाला मार्क्सनें मोल व किंमत यांच्या भेदाच्या साहाय्यानें उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. नग्न जमिनीला श्रम लागलेले नाहींत. व म्हणून तिला मोल नाहीं, परंतु तिला किंमत आहे. दुसऱ्या आक्षेपाला मार्क्सचें असें उत्तर आहे कीं, जें श्रमाचें फळ श्रम करणाराला किंवा दुसऱ्याला निरुपयोगी आहे त्याला मोल नाहीं.

**मजुरी**—अर्वाचीन काळच्या औद्योगिक पद्धतींत मजुराच्या श्रमाचें मोल त्यानें उत्पन्न केलेल्या मालावरून ठरत नाहीं; तर मजुराच्या श्रमाच्या उत्पत्तीच्या खर्चावरून ठरतें; म्हणजे मजूर व त्याचें कुटुंब यांच्या उपजीविकेस जितका खर्च अवश्यक असतो त्यावरून त्याच्या श्रमाचें मोल ठरतें. या उपजीविकेला काय काय गोष्टी अवश्यक आहेत हें देशरिवाजाप्रमाणें व हवामानाप्रमाणें ठरलें जातें.

मजुराच्या श्रमाचे दोन भाग करतां येतील. आपल्या उपजीविकेकरितां लागणाऱ्या वस्तु उत्पन्न करण्यास लागणारा श्रमाचा काळ हा आवश्यक काळ पैकीं होय. श्रमाचा बाकीचा काळ हा श्रमाचा जादा काळ होय. हा जादा काळ किंवा हें जादा मोल कामाचे तास वाढवून किंवा मजुराची मजुरी कमी देऊन वाढवितां येईल. परंतु हें करणें कांहीं मर्यादेपलीकडे भांडवलवाल्यास फारसें शक्य नाहीं. तरी पण या दोन मर्यादांमध्यें बराच अवकाश आहे. आतां मजुरीच्या पद्धतीनें अशी स्थिति होते कीं, भांडवलवाले आपण मजुरीच्या सर्व वेळाचा मोबदला देतों असें समजतात. परंतु वास्तविकपणें ते या काळाच्या एका भागाचाच मजुरांना मोबदला देतात. गुलामगिरीपद्धतीच्या काळीं मजूर आपल्या धन्याकरितां

आठवड्यांतून एक दिवस देत असे. परंतु बाकीचा आठवडा तो अगदीं मोकळा असे. आतां मजुरीपद्धतीमध्यें कामदारांना निव्वळ जीव जगेल इतक्या मजुरीवर सर्व काळ भांडवलवाल्यांकरितां राबावें लागतें. मजूर हे स्वतंत्र आहेत असें मानतात. परंतु वस्तुतः ते स्वतंत्र नाहींत. खरोखरी पहातां मजुरांच्या श्रमाच्या एका भागाबद्दल त्यांस मोबदला देऊन त्यांपासून त्यांच्या श्रमाचें सर्व फळ भांडवलवाले उपटतात.

श्रमाचा सामान्य दिवस म्हणजे कामाचा दिवस १८ पासून ८ तासांपर्यंत भिन्न भिन्न असतो. **मार्क्स**च्या मताप्रमाणें सरकारानें या बाबतींत हात घालून सरसहा ८ तासांचा दिवस केला पाहिजे. नंतर त्यानें इंग्लंडांतील कारखान्याच्या कायद्याचा इतिहास देऊन हे कायदे चांगले आहेत असें आपलें मत दिलें आहे. यंत्रें व तत्संबंधीं शोध यांनीं आधींच श्रीमंत असणाऱ्या भांडवलवाल्यांना जास्तच श्रीमंत केलें आहे. या सुधारणा व शोध हे भांडवलानें घडविलेले नाहींत, तर ते शास्त्रज्ञानाच्या योगानें झालेले आहेत. परंतु या शोधांचा सर्व फायदा मात्र भांडवलवाल्यांना मिळतो. औद्योगिक सुधारणेचा स्वाभाविक परिणाम म्हणजे मजुरांची मजुरी कमी होणें, त्यांच्या कामाचे तास वाढणें, मजुरांच्या अर्ध्या वर्गाला फाजील श्रम पडणें, बाकीचे निकामी राहणें व शेवटीं सर्व जास्त मोलाचा सांठा थोड्याशा भांडवलवाल्यांच्या हातीं जाणें हा होय.

औद्योगिक सुधारणेचा परिणाम श्रमाची मजुरी कमी करण्यांत होतो. कारण या सुधारणेनें बौद्धिक, नैतिक, व शारीरिक गुणांची फारकत होते. यांनीं विशेष मेहनतीचीं कामें कमी होतात व म्हणून कारखान्यांत बायका व मुलें यांचे श्रम पसंत केले जातात. कारण तितक्याच मजुरींत सर्व कुटुंबाचे श्रम मिळतात. दुसरें, औद्योगिक सुधारणा कामाचा दिवस वाढविते. कारण यंत्रें हीं रात्रंदिवस चालूं शकतात, व भांडवलवाल्यांनीं मजुरांच्या श्रमाचा काळ ५ मिनिटांनीं वाढविला तरी त्यांचा किती तरी फायदा वाढतो. मोजकामाची पद्धति मजुरांना फार घातक आहे. कारण मजुरांना जास्त काम करण्याचा मोह होतो व भांडवलवाल्याला अमुक वेळांत अमुक काम होतें याचा अंदाज कळतो, व मग तो तितकेंच काम दिसमजुरांकडून करून घ्यावें अशी इच्छा करतो; व तसें झालें नाहीं म्हणजे त्यांना घालवून तरी लावतो, नाहीं तर मजुरी तरी कमी देतो. याप्रमाणें

मोजकाम हें थोड्याशा मजुरांना फायदेशीर असलें तरी मजुरांच्या सर्व समूहास फार घातक आहे.

लोकसंख्येच्या वाढीची सापेक्षता—**मार्क्स** हा **मॅलथस**चा अनुयायी नाहीं. त्याचें म्हणणें असें आहे कीं, प्रत्येक देशाचा लोकसंख्येचा नियम वेगवेगळा आहे. एकंदर लोकसंख्येच्या वाढीची भीति निराधार आहे. हल्लींची दृश्य लोकसंख्येची फाजील वाढ ही सापेक्ष वाढ आहे. म्हणजे प्रचंड भांडवलाच्या पद्धतीचा तो परिणाम आहे. कारण या पद्धतीनें समाजांतील अर्ध्या लोकांना सगळ्या लोकांचें काम करावें लागतें. जर कामांची योग्य वांटणी केली तर सर्वांना भरपूर काम मिळेल. परंतु यंत्रांचा प्रचार, व्यापारी संकटें व लोकांच्या अभिरुचीमधील फरक या कारणांनीं पुष्कळ कामकरी निकामी होतात व म्हणून मजुरांमध्यें मजुरीकरितां चढाओढ सुरू होते व त्याच्या योगानें मजुरीचे दर कमी होतात. प्रत्येक देशांत मजुरांचे दोन वर्ग असतात; एक निकामी मजुरांचा व एक कामकरी मजुरांचा. हा निकामी मजुरांचा वर्ग चांगल्या मजुरीच्या दराच्या काळांत अविचारानें झालेल्या लग्नामुळें होतो असें अभिमतपंथी अर्थशास्त्र्यांचें मत आहे. परंतु या उपपत्तीमध्यें एक गोष्ट विसरली जाते, ती ही कीं, नवी मजुरांची लोकसंख्या होण्यास १८ वर्षें लागतात. व या मोठ्या अवधींत मजुरीच्या दरांत किती तरी वेळां कमी-अधिकपणा होऊन गेलेला असतो. यावरून जास्त मजुरीच्या योगानें लोकसंख्या वाढते हें म्हणणें खरें नाहीं. व्यापाराच्या मंदीतेजीप्रमाणें धंद्यांत भांडवल कमीअधिक जातें, यामुळें लोकसंख्या फाजील झाली आहे, असा केव्हां केव्हां भास होतो.

**कार्ल मार्क्स**च्या पुस्तकाचा थोड्या विस्तारानें हा सारांश दिला आहे. कारण सामाजिक पंथाच्या बऱ्याच शाखांवर **मार्क्स**च्या मताची छाप आहे. समाईक सामाजिक पंथ, संयुक्त सामाजिक पंथ हीं **मार्क्स**च्या मताचींच निरनिराळीं प्रतिबिंबें होत. अभिमतपंथाच्या कांहीं प्रमेयांपासून व विशेषतः **रिकार्डो**च्या मोलाच्या एकहाती उपपत्तीपासून **मार्क्स**च्या मताचा उगम झालेला आहे हें वाचकांच्या सहज ध्यानांत आलें असेल. सर्व संपत्ति श्रमानें उत्पन्न होते. भांडवलवाले हे मधल्यामध्येंच सर्व नफा उपटतात. श्रमाचा योग्य मोबदला मजुरांस देत नाहींत. हा खाजगी मालकीच्या संस्थेचा परिणाम होय. तेव्हां जमिनी-

वरील खासगी मालकी नाहींशी करून सर्व जमीन राष्ट्रीय मालकीची करणें, तसेंच सर्व भांडवल व कारखानें सरकारी करणें वगैरे प्रकारचे उपाय मजुरांची स्थिति सुधारण्याकरितां सामाजिक पंथाचे लोकांनीं पुढें आणलेले आहेत.

मार्क्सच्या नंतर परंतु कांहीं अंशीं त्याच्याच शिकवणीनें सामाजिक पंथ क्रांतिमूलक होत चालला. कारण त्यानें सुचविलेले उपाय त्या काळचीं सरकारें अंमलांत आणण्यास तयार नव्हतीं. तेव्हां हीं सरकारें नाहींशीं करून त्यांचे जागीं नवी राज्यव्यवस्था निर्माण करण्याचा उपक्रम कांहीं समाजपंथी लोकांनीं केला, व याच्याच पुढली पायरी ह्मणजे अराजक पंथ होय.

**बकुनिन व प्रुढों** हे या पंथाचे जनक होत. यांचे मतानें खासगी मालमत्ता ही निव्वळ चोरी आहे व ही संरक्षण करण्याचें काम सरकार करतें. तेव्हां जर खासगी मिळकतीची कल्पनाच मुळीं समाजांत असमता उत्पन्न करते, तर या संस्थेचें संरक्षक जें सरकार तेंही अनिष्टच झालें. तेव्हां जर बहुजनसमाजाला समता व सुख हीं पाहिजे असतील तर तीं मिळविण्याचा खरा उपाय ह्मणजे सरकार ही संस्था नाहींशीं करणें हा होय. ज्या अर्थीं या संस्थेच्या हातीं सर्व सत्ता आलेली आहे त्या अर्थीं ही संस्था सामोपचारानें किंवा कायद्याच्या पद्धतीनें कधींच नाहींशी होणार नाहीं. कारण या पद्धतींत त्या संस्थेची सत्ताच कबूल करणें हें पहिलें कलम असतें व ह्मणून मनुष्याची दास्यशृंखला अशा प्रयत्नांनीं जास्त घट्टच होत जाते. तेव्हां ही प्रचंड संस्था नाहींशी करण्याचा उत्तम उपाय ह्मणजे क्रांतिकारक मार्गाचा अवलंब करणें हा होय. ह्मणून या पंथाच्या लोकांनीं डायनामाइट, बॉंब, गुप्त कट, खून वगैरेंसारख्या मार्गांचा अवलंब केलेला आहे. प्रत्येक सुधारलेल्या देशांत या पंथाला समाजाचे शत्रु व मोठे गुन्हेगार समजले जातात. खुद्द या पंथाचे लोकही आपण सर्व प्रकारच्या सत्तेचे शत्रू आहोंत असें स्पष्टपणें कबूल करतात. या पंथाच्या १८८२ मध्यें झालेल्या जीनीव्हा येथील परिषदेच्या वेळीं वाचलेल्या जाहीरनाम्यांतील खालील उताऱ्यावरून या पंथाचीं मतें चांगलीं व्यक्त होतात, म्हणून आम्ही त्यांतील एका कलमाचा तर्जुमा देतों.

" आमचा राजा हा आमचा शत्रु आहे. आम्ही अराजकपंथी लोक कोणत्याही प्रकारची सत्ता धारण करणारे अगर धारण करूं इच्छिणारे या सर्वांशीं विरोध करणार. जो जो जमिनीचा मालक आहे व जो जो आपल्या नफ्याकरितां शेत-

ज्याला काबाडकष्ट करावयास लावतो तो तो जमीनदार आमचा शत्रु होय. जो जो कारखानदार कारखान्याचा मालक असतो व जो जो दासप्राय मजुरांनीं आपला कारखाना भरून काढतो तो तोही आमचा शत्रु आहे. सरकार–मग तें एकसत्ताक असो, अल्पसत्ताक असो, बहुसत्ताक असो किंवा कामगारसत्ताक असो, त्यांचे अंमलदार, त्यांचीं निरनिराळीं खातीं, न्यायाधीश व पोलीस या सर्वां मिळून झालेलें सरकार–आमचें शत्रु आहे. जिच्या नांवाखालीं पाद्र्यांनीं इतक्या वर्षे चांगल्या लोकांना आपल्या ताब्यांत ठेविलें ती सैतान किंवा ईश्वर या नांवानें ओळली जाणारी तात्विक सत्ताही आमची शत्रु आहे. गुन्ह्याला पवित्रता देणारा, त्यांचें समर्थन करणारा, निर्बलांचा छळ करणारा व बलिष्ठांनीं केलेला कायदा हाही आमचा शत्रु आहे."

वरील उताऱ्यावरून अराजकपंथाचें उद्दिष्ट स्पष्टपणें दिसून येतें. त्यांना हल्लींच्या समाजांतील सर्व संस्था व सत्ताप्रकार हे जुलुमाचे व अन्यायाचे वाटतात व ते नाहींसे झाल्याखेरीज मनुष्यांना खरें सुख व खरें स्वातंत्र्य मिळणार नाहीं असें त्यांना वाटतें. व हें साधण्याकरितां ते सर्व प्रकारच्या क्रांतिकारक उपायांचा अवलंब करण्यास मागें पुढें पहात नाहींत.

रशियामध्यें विध्वंसक म्हणून जो पंथ निर्माण झाला आहे त्याचीं व अराजक पंथाचीं तत्वें सामान्यतः सारखींच आहेत; त्यांचे मार्गही बहुधा सारखेच आहेत. परन्तु विध्वंसक पंथ अराजक पंथापेक्षां जास्त जोरदार असून पाहिजे त्या क्रांतिकारक मार्गांचा स्वीकार करण्यास तयार असतो इतकेंच; अराजक पंथाचा प्रवर्तक बुकनिन याचें या विध्वंसकपंथी लोकांवरही फार वजन असे. अराजक पंथाचा उद्देश हल्लींच्या समाजसंस्था नाहींशा करून त्यांचे जागीं मनुष्याची सुस्थिति आणण्याचा आहे, तर विध्वंसक पंथाचा उद्देश निवळ सद्यःस्थिति नाहींशी करण्याचा आहे.

रशियाच्या विशेष परिस्थितीमुळें हा पंथ तेथें फार जोरावला व त्यामुळें त्याला एक स्वतंत्र नांव मिळालें. परंतु तात्विकदृष्ट्या अराजक व विध्वंसक पंथांत फारसा फरक नाहीं. तेव्हां या पंथाचें आणखी विवेचन करण्याचें प्रयोजन नाहीं.

क्रांतिकारक मार्गाचा अवलंब करणारे सामाजिक पंथ, तसेंच समाईक पंथ व संयुक्त सामाजिक पंथ या सर्वांचे उद्देश समाजाची पुनर्घटना करण्याचे आहेत.

या सर्वांना समाजाच्या मुख्य संस्थाच मुळीं अनिष्टकारक वाटतात. परंतु त्यांच्या समाजाच्या पुनर्घटनेच्या कल्पना शक्य कोटींतील नसल्यामुळें या पंथाच्या हातून प्रत्यक्ष कल्याणकारक गोष्टी झाल्या नाहींत व समंजस माणसांचा पाठिंबा या पंथांना मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल.

परन्तु जो सामाजिक पंथ बराच शक्य कोटींतील आहे व ज्या पंथाची छाप दिवसेंदिवस थोड्या फार अंशानें सर्व सुधारलेल्या सरकारावर पडत आहे, तो पंथ म्हणजे राष्ट्रीय सामाजिक पंथ होय. या पंथाचा उदय जर्मनीमध्यें झाला. त्या देशांत क्रांतिकारक सामाजिक पंथाचा प्रसार फार होऊं लागला. त्यावर मारक म्हणून जर्मनींतील सरकार व त्याचा प्रसिद्ध मुत्सद्दी प्रिन्स **बिस्मार्क** यांनीं राष्ट्रीय सामाजिक पंथाचा अंगीकार करून तदनुरूप कायद्यानें सुधारणा घडवून आणण्याचा उपक्रम केला.

प्रिन्स **बिस्मार्क**चा या बाबतींतील सल्लागार व राष्ट्रीय सामाजिक पंथाचा अधिकारी लेखक म्हणजे **वागनर** हा होय. या पंथाचें स्वरूप व कार्य आणि या पंथाप्रमाणें घडवून आणावयाच्या सुधारणा यांबद्दलची स्पष्ट व मुद्देसूद माहिती याच्याच ग्रंथावरून मिळते.

**वागनर** याच्या मताप्रमाणें समाजांतील निरनिराळ्या वर्गांमध्यें ऐकमत्य व प्रेमसंबंध उत्पन्न करणें, अन्यायाचा प्रतिकार करणें, होतां होईल तितकी संपत्तीची वांटणी समतेच्या व न्यायाच्या तत्त्वावर करणें, व कनिष्ठ व मध्यम वर्गांतील लोकांची नैतिक व सांपत्तिक स्थिति सुधारून एकंदर समाज प्रगतीच्या मार्गाला लागेल अशा तऱ्हेची व्यवस्था कायद्यानें घडवून आणणें हा राष्ट्रीय सामाजिक पंथाचा कार्यभाग आहे. या पंथाचें म्हणणें असें आहे कीं, पूर्वींची सरकारच्या कर्तव्यकर्माची संकुचित कल्पना सोडून दिली पाहिजे. कनिष्ठ वर्गाची स्थिति सुधारण्याकरितां औद्योगिक कामांत सरकारनें हात घालण्यास हरकत नाहीं. स्वावलंबन, सहकारिता, मजूरसंघ वगैरे तत्त्वें चांगलीं आहेत व त्यांना होतां होईल तों उत्तेजनही दिलें पाहिजे. परंतु यानें सर्व कार्यभाग होईल असें मात्र नाहीं. तर कायद्यानें मजुरांची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न सरकारनें केला पाहिजे. उदाहरणार्थ, कामाचे तास ठरविणें, सुट्या ठरविणें, गिरण्यांबद्दलचे कायदे, कारखानदारांनीं हवाशीर व आरोग्यकर कारखाने ठेवण्याची आवश्यकता

वगैरे प्रकारचे इंग्लंडांत पास झालेले कायदे हे राष्ट्रीय सामाजिक पंथाच्या तत्वानुरूपच आहेत; परंतु सरकारनें मजुरांना पेन्शनें मिळण्याची सोय करणें; त्यांच्या आयुष्याचा विमा उतरण्याची व्यवस्था करणें; त्यांच्या आजारीपणांत किंवा त्यांना अपघात झाला असतांना त्यांच्या पोटापाण्याची तजवीज करणें; हीं सर्व कामें सरकारनें हातीं घेतलीं पाहिजेत, असें या पंथाचें मत आहे. तसेंच, ज्या ठिकाणीं किंवा ज्या धंद्यांत एकाच व्यक्तीच्या किंवा संघाच्या ताब्यांत सर्व संपत्तीची उत्पत्ति गेल्यामुळें मजूर लोकांवर जुलूम होण्याचा संभव आहे असे धंदे सरकारनें हातीं घेणें हेंही सरकारचें काम आहे. शिवाय समाजामध्यें असमता उत्पन्न होण्याचें एक मुख्य कारण म्हणजे स्थावर मिळकतीची खाजगी मालकी व त्यांतून येणारें अनुपार्जित उत्पन्न ही होय. तेव्हां अशा ठिकाणीं सरकारकडे मालकी असणें अवश्य आहे असें राष्ट्रीय सामाजिक पंथी ग्रंथकारांचें मत आहे. या बाबतींत वागनरनें खालील रचना आपल्या ग्रंथांत नमूद केली आहे.

१ सरकार किंवा सार्वजनिक संस्था यांच्याकडे देशांतील सर्व जंगलाची मालकी असावी. कारण या स्थावर उत्पन्नांत अनुपार्जित वाढ पुष्कळ असते. ही वाढ सरकारला मिळाल्यानें लोकांवरील एकंदर कराचा बोजा कमी होतो.

२ लागवडीच्या जमिनीसंबंधानें मोठमोठ्या इस्टेटी थोडया लोकांच्या हातांत गेल्यामुळेंच जमिनीचा सार्वजनिक उपयोग कमी होतो. तेव्हां देशांत मिरासदार अल्पशेती करणारे असावे व त्यांना जमिनीचें पूर्ण स्वातंत्र्य द्यावें.

३ शहरांतील जमिनीवर मात्र खाजगी व्यक्तीची मालकी कधींच असूं नये. अशा मालकीनें जमिनीच्या किंमती कल्पनातीत वाढतात व शहरांत राहणाऱ्या गरीब लोकांना घरें मिळणें फार मुष्किलीचें होतें.

४ दळणवळणाचीं साधनें म्हणजे रस्ते, रेल्वे, कालवे हे सर्व सरकारच्या मालकीचे असावे. रेल्वेचा उद्देश उत्पन्न मिळविण्याचा नसावा, तर लोकांना स्वस्त प्रवासाचीं साधनें मिळवून देण्याचा असावा. राष्ट्रीय रेल्वे केल्यानें रेल्वेकंपन्यांना रयतेला बुचाडण्यास सांपडणार नाहीं व जी कांहीं उत्पन्नाची अनुपार्जित वाढ होईल तिचा फायदा सर्व समाजास मिळेल.

५ रॉकेल, मीठ, कोळसा वगैरेसारख्या सामान्य उपयोगाच्या वस्तूंच्या खाणी सरकारच्या ताब्यांत असाव्या.

वागनर हा प्रिन्स बिस्मार्कचा प्रमुख सल्लागार होता हें वर सांगितलेंच आहे व यामुळें वागनरच्या पुष्कळ कल्पनांपैकीं बराच भाग जर्मन सरकारनें आधींच हातीं घेतलेला आहे.

वरील विवेचनावरून सामाजिक पंथाच्या सहाही पोटभेदांपैकीं राष्ट्रीय सामाजिक पंथाचा सुधारलेल्या सर्व सरकारांवर बराच पगडा आहे, असें दिसून येईल, व त्या पंथाच्या कल्पनांपैकीं बऱ्याच कल्पना सुसाध्य आहेत हें पुढल्या भागांतील हकीकतीवरून दिसून येईल.

---

# भाग अठरावा.

## सामाजिक पंथी योजनांचा विचार.

मागील भागांत सामाजिक पंथाचा इतिहास व त्याचीं निरनिराळीं स्वरूपें याची माहिती दिली. आतां या पंथानें सुचविलेल्या योजनांचा विचार या पुस्तकांतल्या शेवटल्या भागांत करावयाचा राहिला. क्रांतिमूलक पंथांनीं सुचविलेले उपाय हे उपाय नसून अपायच आहेत; कारण या पंथाच्या मताप्रमाणें म्हणजे मानवी सुधारणेचें मूळ जी समाजव्यवस्था तीच नाहींशीं करणें हाच सर्वोत्तम उपाय होय. या पंथाच्या योजनेंत विधायक असें कांहींच नाहीं. त्यांच्या मतें आहे ही स्थिति मोडून टाका म्हणजे झालें. मग आपोआप चांगली स्थिति उत्पन्न होईल. हे पंथ त्रागयाचे आहेत; एके दृष्टीनें ते निवळ दैववादी आहेत. तेव्हां त्यांच्या योजनेंत विचाराच्या भागापेक्षां निव्वळ विकाराचा व त्रागयाचा भाग जास्त असावा हें स्वाभाविक आहे. अशा पंथांचीं मतें व त्यांचे उपाय कोणत्याही समंजस व विचारी माणसास संमत होणार नाहींत हें उघड आहे. तेव्हां या पंथाच्या उपायांचा विचार सुद्धां करण्याची जरूरी नाहीं.

संयुक्त सामाजिक पंथानें सुचविलेल्या उपायांचीही बहुतेक वरच्यासारखीच स्थिति आहे. या पंथाला खाजगी मालमत्तेची संस्थाच मुळीं नको आहे. या पंथाला सर्व समाजाची संयुक्त मालमत्ता पाहिजे आहे. ' माझें आणि तुझें ' या

कल्पना समाजांतून पार नाहींशा व्हाव्या असें या पंथाचें म्हणणें आहे. पूर्वकाळीं धार्मिक कल्पनांमुळें अशा लहान लहान संस्था सर्वत्र अस्तित्वांत असत. उदाहरणार्थ, जेसूईट हा रोमन कॅथॉलिक धर्मांतील एक पंथ आहे. या पंथांत शिरणाऱ्या मनुष्याला कुटुंब व खाजगी मालमत्ता या दोन्ही गोष्टींना मुकावें लागतें. तसेंच, दुसऱ्याही परोपकारी संस्थांमध्यें सार्वजनिक मालमत्तेचा परिपाठ कोठें कोठें दिसून येतो. शिवाय समाजाच्या बाल्यावस्थेमध्यें जमिनीसारखीं संपत्तीच्या उत्पादनाचीं साधनें संयुक्त मालकीचीं होतीं असें दिसतें. या दाखल्यावरून संयुक्त सामाजिक पंथाला असें वाटतें कीं, सर्व समाजाची रचना संयुक्त मालमत्तेच्या तत्त्वावर केली म्हणजे सर्व समाज सुखी होऊन त्या समाजांतील दुःख, हालअपेष्टा व दैन्यावस्था नाहींशी होईल. हा मार्ग वरवर दिसावयाला चांगला दिसतो, हें खोटें नाहीं. यामुळें प्लेटोसारख्या तत्ववेत्त्यानें आपल्या उत्तम समाजाच्या चित्रपटामध्यें खाजगी मालमत्तेची संस्था नाहींशी करून त्याचे जागीं संयुक्त मालमत्तेच्या कल्पनेची योजना केलेली आहे. परंतु अशा प्रकारच्या योजनेमध्यें मनुष्यस्वभावाचें अज्ञान दिसून येतें. ज्याप्रमाणें कांहीं कांहीं अविवाहित राहिलेलीं माणसें सुखी असतात, नीतिमान् राहतात व लोकोपयोगाचीं कामेंही करतात; यामुळें ब्रह्मचर्य ही संस्था उत्तम भासते व विवाह ही संस्था गौण व दुःखाची जनयित्री भासते. परंतु वास्तविक मनुष्यस्वभावाकडे पहातां ब्रह्मचर्य ही स्वाभाविक स्थिति नाहीं. तें जोंपर्यंत अपवादादाखल आहे तोंपर्यंत तें प्रशंसनीय भासतें. परंतु तें सार्वत्रिक झालें म्हणजे त्यापासून अनर्थ व अनीति हीं उत्पन्न झाल्याखेरीज राहात नाहींत, असा सर्वकाळीं अनुभव आलेला आहे. तेव्हां सारासार विचार करतां विवाह हीच संस्था मनुष्यस्वभावाला उन्नत दशेला नेणारी व म्हणूनच ब्रह्मचर्यापेक्षां जास्त चांगली संस्था असें म्हणणें प्राप्त आहे. त्याचप्रमाणें खाजगी मालमत्ता व संयुक्त मालमत्ता या संस्थांचें आहे. जोंपर्यंत संयुक्त मालमत्ता ही समाजांत अपवादादाखल आहे, तोंपर्यंत ती चांगली भासते, व त्याचे सुपरिणाम दिसतात; परंतु ती सार्वत्रिक झाल्यास अनर्थावह होऊन ती समाजाची सर्व सुधारणा नष्ट करील; तेव्हां खाजगी मालकीची संस्था हीच एकंदर समाजाची उन्नति करणारी आहे असें म्हणणें प्राप्त आहे. वरील विवेचनावरून अराजक व विध्वंसक पंथांच्याप्रमाणें संयुक्त सामाजिक पंथाची समाजाची

सुस्थिति घडवून आणणारी उपाययोजना आत्मघातकीपणाची आहे. व ती वरपांगी सुबक दिसली तरी तिच्या फैलावानें समाजाची उन्नति न होतां व मनुष्याची सुखवृद्धि न होतां उलट समाज रानटी स्थितीप्रत पोंचेल व पुनः ' बळी तो कान पिळी ' हाच न्याय सुरू होईल. तेव्हां या पंथाची उपाययोजनाही समंजस व विचारी माणसांस पसंत होणार नाहीं हें उघड आहे.

समाईक सामाजिक पंथाला खाजगी मालकी संस्था फक्त जंगम मालापुरतीच पाहिजे आहे. परंतु संपत्तीच्या उत्पत्तीचीं सर्व साधनें सरकारच्या मालकीचीं पाहिजे आहेत. म्हणजे प्रत्येक मनुष्यानें सरकारी नोकर व्हावें व प्रत्येक धंदा म्हणजे एक सरकारी खातें बनावें ही त्याची इच्छा. अशा स्थितींत सर्व लोकांमध्यें संपत्तीची वांटणी प्रत्येकाच्या गुणानुरूप होईल व समाजांत श्रीमंत परंतु आळशी असा वर्गच दृष्टीस पडणार नाहीं. कारण कोणत्याही माणसाला काम केल्याखेरीज पगारच मिळणार नाहीं. या पंथाच्या योजनेचा परिणाम समाजांतील स्वावलंबन व समाजांतील व्यक्तिविशेषत्व नाहींसें करण्यामध्यें होणार हें उघड आहे. असा समाज म्हणजे कायद्यानें जखडलेला व रूढिबद्ध असा समाज होईल व समाजांतील प्रगतीचें मूळ जें व्यक्तींतील विशेष गुण त्यांची वाढ अगदीं खुंटेल. शिवाय, या पंथाच्या कल्पनेमध्यें सरकार व प्रजा यांमध्यें विलक्षण फरक असतो, असें गृहीत धरलें आहे. समाजांतील सरकार हें सर्वज्ञानी, सर्वस्वीं शहाणें, मूर्तिमंत न्यायदेवता आहे असें समजलें पाहिजे. व म्हणून सरकारच्या करणीमध्यें असमता किंवा इतर दोष राहणार नाहींत. परंतु ही कल्पना वस्तुस्थितीस धरून नाहीं. याला अपवादादाखल प्रकार म्हणजे अत्यंत रानटी व पशुवृत्ति लोकांवर अत्यंत सुधारलेल्या चिमुटभर परोपकारी लोकांचा अंमल असणें हा होय. अशा ठिकाणीं सर्व गोष्टी सरकारनें हातीं घ्याव्या लागतील हें खरें आहे. व समाजाच्या हिताच्याही दृष्टीनें तीच गोष्ट श्रेयस्कर आहे. परंतु ही स्थिति अपवादादाखल आहे. सामान्यतः राजा व प्रजा हीं एकाच दर्जाचीं असलीं पाहिजेत; व औद्योगिक व्यवसाय सरकारच्या हातीं दिल्यानें समाजाची औद्योगिक प्रगति होऊन सर्व लोक सारखे सुखी होतील असें मानण्यास जागा नाहीं. मात्र हल्लींच्या संपत्तीच्या उत्पादनांत व्यक्तीकडे जबाबदारी असल्यामुळें व त्यावरच व्यक्तीचा नफा अवलंबून असल्यामुळें जी कळकळ, जो हुरूप व जी

अंगमेहनत औद्योगिक बाबतींत दाखविली जाते, ती कळकळ, तो हुरूप आणि ती अंगमेहनत समाईक उद्योगपद्धतींत दाखविली जाणार नाहीं. औद्योगिक बाबतींत त्या समाजाचें पाऊल मागें पडेल व हल्लीं समाजांतील कांहीं वर्ग तरी सुसंपन्न आहेत ते नाहींसे होऊन सर्व समाजांत सरसहा दैन्यावस्था व दारिद्र्यांतील समता पसरेल. तेव्हां या पंथाच्याही योजना युक्तीस जुळणाऱ्या नाहींत.

व्यक्तिक सामाजिक पंथाच्या योजनाही समाजाला बाल्यावस्थेप्रत नेणाऱ्या आहेत. कारण अशा ग्रामसंस्थांच्या स्थितींतून हल्लींची समाजस्थिति उत्क्रांत झाली आहे. व ज्याप्रमाणें पाण्याचा ओघ उलटत नाहीं, त्याप्रमाणेंच उत्क्रांतीचा ओघही उलटत नाहीं. तेव्हां या व्यक्तिक योजनाही म्हणण्यासारख्या विचाराई नाहींत.

सामाजिक पंथाच्या पोटभेदांपैकीं राहतां राहिला राष्ट्रीय सामाजिक पंथ. मागें सांगितलेंच आहे कीं, या पंथाच्या मतांचो थोडीबहुत छाप सर्व सुधारलेल्या सरकारांवर पडलेली आहे. कारण सामाजिक पंथाच्या सर्व पोटभेदांत हाच पोटभेद जास्त व्यवहार्य आहे. कारण सध्यां प्रचलित असलेल्या औद्योगिक पद्धतींत फारसा हात न घालतां तो पंथ आपला हेतु कायद्यानें साध्य करण्याचा प्रयत्न करतो. बाकीच्या सर्व सामाजिक पंथाच्या योजना हल्लींची औद्योगिक पद्धति बदलण्याचा प्रयत्न करतात, पण त्याचा परिणाम संपत्तीचा झराच आटविण्यांत होतो. यामुळें समाजांत संपत्तिरूपी पाण्याचें दुर्भिक्ष होण्याची भीति असते. मग हें दुर्भिक्ष सर्वांना सारखें भासलें म्हणून या समतेंत फारसें समाधान मानण्यांत अर्थ नाहीं. राष्ट्रीय सामाजिक पंथ संपत्तीच्या झऱ्याला मुळींच हात लावीत नाहीं. तो पंथ पाण्याचा झरा जसाचा तसा कायम ठेवतो किंवा वाढविण्याचा प्रयत्न करतो. मात्र या झऱ्यांतून जें गढूळ पाणी येतें व जें एका दिशेला फार पाणी जातें तें पाणी कायद्यारूपी फिल्टरानें स्वच्छ व निर्मळ करण्याचा प्रयत्न करतो व असें निर्मळ पाणी सर्व जमिनीला यथाप्रमाण मिळेल अशी तजवीज निरनिराळे पाण्याचे पाट तयार करून करतो. या वर्णनांतील रूपक सोडून असें म्हणतां येईल कीं, राष्ट्रीय सामाजिक पंथ अर्वाचीन औद्योगिक पद्धतीमधील संपत्तीच्या वांटणीची विषमता कबूल करतो. परंतु ही विषमता काढून टाकण्याचा मार्ग म्हणजे ही औद्योगिक पद्धति नाहींशी करणें नव्हे; कारण अशानें संपत्तीची उत्पत्तिच बंद पडेल हें हा

पंथ जाणतो. तेव्हां कायद्याच्या साहाय्यानें संपत्तीच्या वांटणीची विषमता कमी करावयाची हें या पंथाच्या योजनांचें धोरण आहे. यामुळेंच हा पंथ सर्वांत व्यवहार्य ठरला आहे व त्याचा पगडा दिवसेंदिवस वाढत आहे. या पंथाची छाप वाढण्याचें दुसरेंही एक कारण आहे. तें हें कीं, अर्वाचीन काळीं सरकारच्या कर्तव्यकर्माबद्दलची जुनी मर्यादित कल्पना जाऊन त्या ठिकाणीं सरकारच्या कर्तव्यकर्माबद्दल उदार व विस्तृत अशी कल्पना आलेली आहे. यामुळें समाजांत जर कोठें दुःख व असमता उत्पन्न होत असेल तर त्यांचा होतां होईल तितका प्रतिकार करणें या गोष्टीचा सरकारच्या कर्तव्यमर्यादेंत अन्तर्भाव होतो असें अर्वाचीन मत आहे. ह्मणून अशा प्रकारचे कायदे सुधारलेलें सरकार बेधडक करूं लागलें आहे. यामुळें सामाजिक योजना जोरानें पुढें आल्या आहेत व त्यांपैकीं पुष्कळांचा सरकारास स्वीकारही करावा लागत आहे.

येथपर्यंत सामाजिक पंथाच्या निरनिराळ्या पोटभेदांच्या सामान्य धोरणांचा व त्यांच्या सामान्य परिणामांचा विचार केला. आतां सामाजिक पंथांनीं सुचविलेल्या कांहीं विशिष्ट योजनांचा व उपायांचा विचार करावयाचा राहिला. तेवढा झाला ह्मणजे या पुस्तकाचा कार्यभाग आटोपला.

या सर्व विशिष्ट योजनांपैकीं पुष्कळ सामाजिक पंथीलोकांची आवडती योजना ह्मणजे देशांतील सर्व जमीन सरकारी मालकीची करण्याची योजना होय. ही योजना **रिकार्डो**च्या जमिनीसंबंधींच्या भाड्याच्या उपपत्तीचा साक्षात् परिणाम होय. यासंबंधीं इंग्लंडमध्यें मिस्तर **वॉलेस** व **हेन्री जॉर्ज** या दोन लेखकांच्या पुस्तकांनीं बरीच चळवळ उडवून दिली होती. **मिल** यालाही या योजनेंतील मुख्य तत्व कबूल होतें व या तत्वानुरूप इंग्लंडमध्यें जमिनीच्या बाबतींत सुधारणा घडवून आणण्याची चळवळ करण्याकरितां इंग्लंडमध्यें एक सभा स्थापन झाली होती व तिचें अध्यक्षस्थान **मिल**कडेच होतें. देशांतील सर्व जमीन सरकारी मालकीची करणें हा या सर्व खटपटीचा हेतु होता व सामाजिक पंथाला ही बाब फारच महत्वाची वाटत असे. कारण त्याच्या मतें समाजांत संपत्तीच्या वांटणीच्या विषमतेचें, पर्यायानें बहुजनसमाजाच्या अत्यंत दारिद्र्याचें एक कारण ह्मणजे जमिनीवरील खासगी मालकी ही होय. कारण **रिकार्डो**च्या उपपत्तीप्रमाणें देशाच्या लोकसंख्येच्या वाढीबरोबर व तिच्या भरभराटीबरोबर

जमिनीचा खंड वाढत जातो व खासगी मालकीच्या संस्थेमध्यें हा वाढता खंड म्हणजे जमीनदारांचें वाढतें उत्पन्न होय. हें उत्पन्न मिळविण्यास किंवा वाढविण्यास जमीनदारांना कांहीं एक श्रम करावे लागत नाहींत व कांहीं एक श्रम न करतां जमीनदारांना देशांतील संपत्तीचा वाढता वांटा मिळत जातो. हें सामाजिक-पंथी लोकांना मोठें वैषम्य वाटतें. मजूरलोक रात्रंदिवस श्रम करतात व जीवापाड खपतात तरी त्यांच्या श्रमाची खरी किंमत देशाच्या भरभराटीबरोबर कमी होत जाते, तर उलटपक्षीं जमीनदारांना जास्त जास्त उत्पन्न होत जातें. तेव्हां देशांतील सर्व जमीन जर सरकारच्या मालकीची होईल तर हें विषमतेचें कारण अजीबात नाहींसें होईल व खासगी जमीनदारांना मिळणारा हा सर्व फायदा देशाला मिळेल. सरकारच्या हातांत एकदां जमीन आली म्हणजे सरकार ती सवलतीच्या दरानें मजूरदारांना देईल व अशा तऱ्हेनें बहुजनसमाजाला जमिनीच्या उत्पन्नाचा फायदा मिळून समाजांतील विषमतेचें एक मोठें कारण नाहींसें होईल. सामाजिक पंथी लोक जमिनीच्या सरकारी मालकीकडे एका दृष्टीनें पहात होते. सरकारची मालकी झाली म्हणजे देशांतील एका लहानशा वर्गाला जें बिनश्रम उत्पन्न मिळत असे तें मिळणार नाहीं व सर्व वर्गांना उत्पन्नाकरितां श्रम करावे लागतील. अशा तऱ्हेनें संपत्तीच्या वांटणीमधील एक ढोबळ अन्याय नाहींसा होईल. मिलसारखे अर्थशास्त्रज्ञ या योजनेकडे दुसऱ्याच दृष्टीनें पाहत होते. सर्व सुधारणेच्या मार्गाला लागलेल्या देशांमध्यें जमिनीच्या उत्पन्नांत अनुपार्जित वाढ होत असते. या वाढीवर वास्तविक खाजगी व्यक्तीचा मुळींच हक्क नसतो. कारण ही वाढ सुधारलेल्या व व्यवस्थित राज्यपद्धतीचा परिणाम असतो. तेव्हां या वाढीवर जर कोणाचा हक्क असेल तर तो सरकारचाच आहे. म्हणून जमिनीवरील खासगी मालकी हक्क काढून सर्व जमीन सरकारी मालकीची करावी. म्हणजे सरकारला जमिनीवर वाढता कर अगर सारा बसवितां येईल व तो वेळोवेळीं वाढवितां येईल. अशा रीतीनें सरकारास एक कोणावरही जिचा बोजा पडत नाहीं अशी व सतत वाढत जाणारी उत्पन्नाची बाब पैदा होईल. म्हणजे मिलच्या सुधारणेचा हेतु फक्त कायम धाऱ्याची पद्धति मोडून तेथें मुदतीच्या धाऱ्याची पद्धति सुरू करण्याचा होता. जमीनधाऱ्याच्या किंवा प्रचंड शेतीच्या पद्धतींत फरक करण्याचा त्याचा मुळींच इरादा नव्हता. हेन्री

जॉर्जसारख्या लेखकांना प्रचंड शेतीची पद्धति जाऊन तेथें छोटी शेती पाहिजे होती. व ही छोटी शेती प्रचारांत आणण्याकरितां प्रथमतः जमिनीवरील सरकारी मालकी स्थापित झाली पाहिजे असें त्यांचें म्हणणें होतें. अर्थात् सामाजिकपंथी लोकांना जमिनीवरील सरकारी मालकी हें फक्त साधन वाटत होतें. परंतु मिलच्या योजनेंत सरकारी मालकी स्थापित करणें हेंच योजनेचें ध्येय होतें. तसेंच सामाजिक-पंथी योजनेंत जमिनीवरील सरकारी मालकी मिळविण्याचे दोन मार्ग सुचविलेले होते. एक हल्लींच्या जमिनींच्या खासगी मालकांना त्यांच्या स्वामित्वाबद्दल पूर्ण किंमत देऊन जमिनी सरकारनें विकत घेणें हा होय. दुसरा मार्ग सामाजिक-पंथी ग्रंथकारांनीं सुचविलेला असा आहे-त्यांचें म्हणणें असें कीं, सर्व समाजांत पूर्वकाळीं जमिनीची मालकी समाजाची होती असें दिसतें. म्हणजे जमिनीची लागवड शेतकरी करीत; परन्तु जमीन ही सर्व गांवाची समाईक समजली जात असे. तेव्हां मूळची जमीन ही समाजाच्या मालकी-हक्काची होती. व जेव्हां सरकार ही संस्था उत्पन्न होऊन तिला व्यवस्थित स्वरूप आलें त्या वेळीं समाजाचे प्रतिनिधि या नात्यानें हा मालकी-हक्क सरकारकडे आला. युरोपमध्यें बहुतेक ठिकाणीं हा मालकी-हक्क खाजगी व्यक्तीकडे देण्यांत आला. परंतु सरकारला असें करण्याचा हक्क मुळींच पोंचत नाहीं. अर्थात् सरकारचें हें करणें गैरकायदा होतें व म्हणून हल्लीं खाजगी व्यक्तींना जमिनीवरील हक्क गैरकायदा मिळालेला आहे. तेव्हां सरकारला हा खाजगी मालकीचा हक्क कायद्यानें परत घेतां येईल. त्याला खाजगी व्यक्तींना विक्रीची किंमत देण्याचें कारण नाहीं.

वरील कोटिक्रम भ्रामक आहे असें तेव्हांच ध्यानांत येईल. हल्लीं ज्या व्यक्तीकडे जमिनीची मालकी आहे त्यांनीं ती पूर्ण किंमत अगर मोबदला देऊन मिळविली आहे. पूर्वकाळीं कांहींही स्थिति असली तरी पिढ्यानुपिढ्या लोकांनीं जर खासगी मालकी-हक्कानें जमिनीचा उपभोग घेतला आहे, तर बहुत काळाच्या उपभोगानें त्यांना आतां मालकीच आलेली आहे असें म्हणणें प्राप्त आहे; व जर सरकारला त्यांची जमीन घ्यावयाची असेल तर सरकारनें त्या जमिनीची बाजार-भावाची किंमत दिली पाहिजे हें उघड आहे. नाहीं तर खासगी मिळकतीचा सरकारनें अपहार केल्यासारखें होईल व कायद्यानें जर अशा गोष्टी सरकार करूं

लागलें तर मालमत्तेच्या सुरक्षिततेची कल्पना कमी होईल व यासारखा संपत्तीच्या वाढीला दुसरा धक्काच नाहीं. कारण ही सुरक्षितता हें एक संपत्तीच्या उत्पत्तीचें मूर्त कारण आहे. या कारणाला धक्का पोंचल्यास त्याचा देशाच्या औद्योगिक स्थितीवर अनिष्ट परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं.

तेव्हां जमीन सरकारच्या मालकीची करण्याच्या योजनेंतील हा विशेष भाग त्याज्य ठरतोच. आतां खासगी व्यक्तीकडून जमीन बाजारभावानें विकत घेण्याचा प्रश्न राहिला. मागें सांगितलेंच आहे कीं, मिल्ल वगैरे कांहीं अर्थशास्त्रकारांचा हेतु सरकारला खंडरूपानें सतत वाढणारी उत्पन्नाची बाब मिळावी असा होता. परंतु इंग्लंडसारख्या देशांतील जमीन बाजारभावानें विकत घ्यावयाची म्हटली म्हणजे गिफिन याच्या अंदाजाप्रमाणें दोन अब्ज पौंड कमींत कमी लागतील. म्हणजे इंग्लंडच्या हल्लींच्या राष्ट्रीय कर्जाच्या तिपटीपेक्षांही जास्त कर्ज इंग्लंडला काढलें पाहिजे. या अवाढव्य कर्जाच्या व्याजाचा बोजा इतका मोठा होईल कीं, त्यापुढें जमिनीच्या अनुपार्जित वाढीची बाब कमीच पडेल. कारण इंग्लंडसारख्या देशामध्यें जमिनीचे खंड शिकस्तीचे चढलेले आहेत. आतां यापुढें फारशी अनुपार्जित वाढ होण्याचा संभव नाहीं. शिवाय अनुपार्जित वाढीची कल्पना मुळीं रिकार्डोच्या उपपत्तीवर बसविलेली आहे. ती सर्वस्वी खरी नाहीं; व खंड नेहमींच वाढत गेला पाहिजे असा कांहीं नियत नियमही नाहीं, असें अनुभवानें सिद्ध झालें आहे. केव्हां केव्हां खंड कमीही होतील. व जर सरकार लोकांच्या अनुपार्जित वाढीवर कर बसवून त्याचा फायदा घेणार, तर सरकारनें जमीनदारांच्या अनुपार्जित तोट्याबद्दल त्यांना मोबदला दिला पाहिजे असें होतें. शिवाय, अनुपार्जित वाढ ही फक्त जमिनीच्या खंडासंबंधींच आहे असें नाहीं, तर इतर धंद्यांतही अनुपार्जित अथवा आकस्मिक फायदा होतो. मग त्यावरही सरकारचा हक्क कां असूं नये? सारांश, ज्या रिकार्डोच्या मूळ उपपत्तीवर व ज्या मिल्लच्या अनुपार्जित वाढीच्या कल्पनेवर ही सरकारी जमिनीच्या मालकीची योजना बसविली आहे त्या दोन्ही कल्पनांमध्यें ज्या अर्थी पुष्कळच असत्याचा अंश आहे, त्या अर्थी ही योजनाही देशाच्या फार उपयोगाची नाहीं असें म्हणणें प्राप्त आहे. परंतु या कल्पनेचा हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत मात्र फार परिणाम झालेला आहे. यामुळें हिंदुस्थानांत सर्वत्र मुदतीच्या धाऱ्याची पद्धति इंग्रज मुत्सद्यांनी

स्वीकारली आहे. परंतु त्यापासून रयतेचा फायदा झाला आहे असें ह्मणतां येत नाहीं. कारण खासगी मालकीच्या पद्धतींत जमीनदार कुळांपासून जबर खंड घेतात, तर सरकारच येथें जबर सारा घेतें अशी ओरड आहे. परंतु याचा विचार पुढील एका पुस्तकांत करावयाचा आहे, तेव्हां सध्या येथें त्याबद्दल कांहींच ठरवितां येत नाहीं.

परंतु या योजनेवर लोकांच्या दृष्टीनें आणखीही एक आक्षेप आहे. ही योजना गरीब लोकांची स्थिति सुधारण्याकरितां सामाजिक पंथानें काढली आहे. परंतु सरकारची मालकी झाली तरी जर सरकारनें चढाओढीनें जमिनी लागवडीस द्यावयाचें ठरविलें तर कसणाऱ्या कुळांना खासगी जमीनदारांना भाडें द्यावें लागतें तितकें भाडें सरकारास द्यावें लागेल; मग आयर्लंडमधील कुळांची जशी दैन्यावस्था तशी या कुळांची होईल. कारण, सर्व जमीन सरकारची असल्यामुळें सरकार ठरवील तितकें भाडें लोकांना द्यावें लागेल. बरें, चढाओढीनें जमिनी न देत कमी खंडानें व सवलतीनें लोकांना जमिनी द्यावयाच्या असें म्हटलें तर ह्यापासून दोन अनर्थ उत्पन्न होतील. एक सरकारला जमिनी मालकीच्या करण्याकरितां जितकें कर्ज काढावें लागलें त्याचें व्याज खंडामधून निघणार नाहीं व असें झालें म्हणजे होणारा तोटा सामान्य करांमधून भरावा लागेल; अर्थात् लोकांवरील कराचा बोजा वाढेल. दुसरें, या सवलती कोणाला द्यावयाच्या त्याबद्दल वशिले लागूं लागतील व राज्यव्यवस्थेंत वशिला व लांचलुचपत हे अनीतिवर्धक प्रकार सुरू होतील. सारांश, जमिनी सरकारी मालकीच्या करण्याच्या योजनेंत फार दोष आहेत व त्यापासून बहुजनसमाजाचें खरोखरी कल्याण होणार नाहीं. सामाजिकपंथी लोकांनीं ही कल्पना पुढें आणिली त्या वेळीं इंग्लंड, आयर्लंड वगैरे देशांमध्यें प्रचलित असलेल्या जमीनधाऱ्याच्या पद्धतीचे वाईट परिणाम त्यांच्या डोळ्यांसमोर होते. या खासगी मालकीच्या पद्धतीनें संपत्तीच्या वांटणीची विषमता उत्पन्न होते; तेव्हां खासगी मालकी नाहींशी झाली म्हणजे विषमता नाहींशी होईल अशी त्यांची समजूत झाली. परंतु वास्तविक ही विषमता प्रचंड शेतकीच्या पद्धतीचा परिणाम होता. तो खासगी मालकीचा परिणाम नव्हता. तेव्हां बहुजनसमाजाच्या दृष्टीनें प्रचंड शेती विषमतावर्धक आहे. तरी त्याचे ऐवजीं छोटी शेतकीची लागवडपद्धति सुरू करणें ही सुधारणा आहे. परंतु छोट्या शेतीचे

सुपरिणाम व्हावयास ती मिराशी-शेती-पद्धति पाहिजे. अर्थात् जमिनीवर खासगी मालकीच पाहिजे. परंतु ती देशांतील थोड्याशा जमीनदारांची किंवा सरकारची नसतांना तीं शेतें कसणाऱ्या प्रत्यक्ष शेतकऱ्याची पाहिजे व जमिनीच्या बाबतींत सामाजिकपंथी सुधारणा करणें म्हणजे छोटी मिराशी शेतीची पद्धति देशांत सुरू करणें ही होय.

याच दृष्टीनें पहातां १९०३ सालीं झालेल्या कायद्याच्या योगानें आयर्लंडांत घडून येत असलेली सुधारणा सामाजिक-पंथाच्या तत्त्वानुरूप आहे असें दिसून येईल. या सुधारणेमुळें कालेंकरून आयर्लंडांत मिराशी शेतकरीवर्ग तयार होईल व त्याची स्थिति सुधारेल. ही सुधारणा घडवून आणण्यांत सरकारनें आपल्या पतीचा उपयोग केला आहे. अर्थात् आपल्या पतीवर कर्ज काढून तें गरीब शेतकऱ्यांस देऊन जमिनदारांकडून जमिनी विकत घेऊन त्या शेतकऱ्यांस दिल्या आहेत व विक्रीची किंमत ४०।५० वर्षांच्या मुदतींत शेतकऱ्यांकडून हप्तयाहप्तयानें वसूल करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. या सुधारणेंत व योजनेंत दोषार्ह असें कांहीं नाहीं, हें तिच्या अंमलबजावणीवरून दिसून येत आहे.

वरील विवेचनावरून सामाजिक पंथाच्या जमिनीसंबंधाच्या योजनेंतील व्यवहार्य व शक्य भाग कोणता व कोणत्या भागानें गरीब लोकांची स्थिति खरोखरी सुधारेल हें स्पष्टपणें दिसून येईल. आतां या पंथानें सुचविलेल्या दुसऱ्या उपायांकडे वळूं.

देशांतील निरनिराळ्या वर्गांमध्यें संपत्तीची विषमता होण्याचें दुसरें कारण भांडवलाची वाढ, यंत्रांची वाढ व विराटस्वरूपी कारखान्यांची पद्धति हें होय. तेव्हां हे सर्व कारखाने व भांडवल सरकारी मालकीचें करावें, अशी एक सामाजिकपंथी योजना आहे. परंतु ही योजना अव्यवहार्य आहे. तिच्या योगानें संपत्तीची वाढच बंद पडेल. कारण, अलीकडे संपत्तीची जी विलक्षण वाढ झालेली आहे, तीच मुळीं सृष्टिशक्ति व यंत्रशक्ति यांच्या शोधांपासून व त्यामुळेंच शक्य झालेल्या श्रमविभागापासून झालेली आहे. तेव्हां प्रचंड कारखान्याची पद्धति नाहींशी करणें म्हणजे संपत्तीची वाढ खुंटविणें होय. शिवाय, विराटस्वरूपी कारखाने सरकारच्या हातीं देण्यापासून कांहीं एक फायदा नाहीं. कारण, सरकारी कामाला खाजगी कामापेक्षां जास्त खर्च लागतो, असा सार्वत्रिक अनु-

भव आहे. खेरीज " सर्वांचें काम तें कोणाचेंच काम नाहीं " या न्यायानें अशा कारखान्यांत फायदा होणें फारच कमी संभवाचें असतें. या कारणाकरितां देशांतील कारखाने व धंदे सरकारी मालकीचे करण्याची सूचना अर्थशास्त्रदृष्ट्या त्याज्य आहे असें दिसून येईल. मात्र, ज्यांना सरकारी व्यापारी कामें म्हणतात अशीं कामें सरकारनें करणें एकंदरींत इष्ट आहे व सर्व सुधारलेल्या देशांमध्यें हीं कामें सरकारनें हातीं घेण्याची प्रवृत्ति दृष्टोत्पत्तीस येत आहे. उदाहरणार्थ, पोस्ट व टेलिग्राफ हीं कामें सरकारचीं याबद्दल आतां कोठें मतभेद नाहीं. हीं व्यापाराच्या उपयोगाचीं कामें आहेत. व त्यांमध्यें सरकारनें फायद्याकडे न पाहतां लोकांना जितक्या स्वस्तपणें या गोष्टींचा फायदा देतां येईल तितका दिला पाहिजे, ही सर्वसंमत गोष्ट आहे. परंतु, सामाजिक पंथाच्या मताप्रमाणें पोस्ट व टेलिग्राफ एवढींच सरकारी कामें आहेत असें नाहीं; तर यापेक्षांही महत्वाचीं व्यापारी कामें वास्तविक सरकारचींच आहेत. तीं कामें म्हणजे अर्वाचीन काळचीं सुधारलेलीं दळणवळणाचीं साधनें व शेतकीच्या उपयोगी पडणारीं पाटबंधाऱ्याचीं कामें हीं सर्व कामें, पोस्ट व टेलिग्राफप्रमाणेंच सर्व सरकारी मालकीचीं असावीं अशा सामाजिकपंथाची व्यापक योजना आहे. ही योजना एकंदरींत श्रेयस्कर आहे व ती शक्य कोटींतील आहे यांत शंका नाहीं. कारण, हीं साधनें जर खाजगी लोकांच्या हातांत असलीं तर त्यांना या अवश्यक गोष्टींचा अनन्यसाधारण ताबा मिळतो व यामुळें त्यांना गरीब लोकांकडून हवी तितकी किंमत घेतां येते. तेव्हां दळणवळणाचीं साधनें हीं सर्व सरकारच्या मालकीचीं असावीं. त्यापासून सरकारनें उत्पन्न काढण्याचा हेतु धरूं नये, तर होतां होईल तों हीं साधनें गरीब लोकांना फार स्वस्तपणें उपयोगास आणतां यावीं अशी तजवीज करणें हें सरकारचें कर्तव्यकर्म आहे. पोस्ट, टेलिग्राफ, रेल्वे, पाटबंधारे, कालवे वगैरे कारखाने विराटस्वरूपी आहेत खरे, तरी पण या सर्व कारखान्यांत सर्व व्यवस्था कांहीं एका ठरीव नियमांप्रमाणें व ठरीव रूढीप्रमाणें करावयाची असल्यामुळें हीं कामें खाजगी मालकांच्याच हातीं पाहिजेत अशांतला भाग नाहीं. हीं कामें सार्वजनिक व्यवस्थेनेंही चांगल्या तऱ्हेनें होण्यास हरकत नाहीं. यामुळें या बाबतींतही सर्व सुधारलेल्या सरकारची प्रवृत्ति व कृति सामाजिक पंथाच्या अनुरोधानेंच होत आहे. यावरून या बाबतींत या पंथाची योजना युक्तीस धरूनच आहे हें

कबूल केलें पाहिजे.

देशांतील निरनिराळ्या वर्गांमध्यें असमतेची वांटणी होण्याचें तिसरें कारण दायभागासंबंधीं कायदे होत. खासगी मिळकतीचा स्वाभाविक परिणाम समाजांतील असमता वंशपरंपरेची करण्यांत होतो. विशेषतः बापाची मिळकत ज्येष्ठ मुलाला वंशपरंपरेनें जाण्याची जी पद्धति आहे तीमुळें ही विषमता वंशपरंपरेनें चालते. एका मनुष्यानें पुष्कळ संपत्ति मिळविली कीं, ती पिढ्यानुपिढ्या एकाच घराण्यांत राहते व या मालमत्तेवर ऐदी लोक पोसले जातात. तेव्हां या पद्धतींत फरक घडवून आणणें जरूर आहे, अशी एक सामाजिकपंथी सूचना आहे. त्यांपैकीं एक अगदीं सुलभ उपाय म्हणजे दायभागावर कर ठेवणें ही होय. या योगानें बहुजनसमाजावरील कराचें ओझें न वाढवितां सरकारला एक उत्पन्नाची बाब होते व हा कर, ज्या माणसाला बिनश्रमानें एकदम पुष्कळ संपत्ति मिळते त्यावरच पडतो. तेव्हां तो कोणत्याही तऱ्हेनें अन्यायाचा न वाटतां समाजांतील विषमता अल्पांशानें तरी कमी करण्यास कारणीभूत होतो. ' दायभागांवरील कर ' ही एक चांगली व न्यायाची उत्पन्नाची बाब आहे, असें सर्व सुधारलेल्या सरकारांचें मत आहे असें त्यांच्या कृतीवरून दिसतें. कारण हा कर वाढविण्याची सर्वत्र प्रवृत्ति दिसत आहे. गेल्या सालीं ज्याच्याबद्दल इंग्लंडमध्यें रणें पडलीं होतीं त्या इंग्लंडच्या प्रसिद्ध बजेटांतही हा कर बराच वाढविण्यांत आला आहे हा एक वादाचा प्रश्न होता. हिंदुस्थानांत प्रोबेट मिळविण्याकरितां जो स्टांप भरावा लागतो त्याचें तत्वही हेंच आहे. तेव्हां ही सामाजिकपंथी सूचना सर्व सुधारलेल्या सरकारांनीं घेतली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

देशामध्यें संपत्तीची असम वांटणी होण्याचें चवथें कारण शिक्षणाचा खर्च हें होय. देशाच्या आधिभौतिक सुधारणेबरोबर शिक्षणाला महत्त्व आलें आहे. देशांत संपत्तीची उत्पत्ति वाढविण्याचें एक प्रत्यक्ष कारण शिक्षण होय, हें दुसऱ्या पुस्तकांत सांगितलेंच आहे. परंतु देशाच्या सुधारणेबरोबर शिक्षणाचा खर्च व धंदा शिकण्याचा खर्च वाढत जातो. यामुळें या शिक्षणाचा फायदा गरीब लोकांना घेतां येत नाहीं. म्हणून जरी त्यांचेमध्यें उत्तम गुण असले तरी त्यांचा उपयोग करण्याचा त्यांना अवसर मिळत नाहीं. या शिक्षणाच्या फाजील खर्चाचा परिणाम श्रीमंताला श्रीमंत करण्यांत व गरिबांना जास्त गरीब करण्यांत होतो. म्हणजे

संपत्तीच्या वांटणीची असमता तीव्रतर होत जाते. कारण हल्लींच्या काळीं श्रम करून आपली सांपत्तिक स्थिति सुधारण्यास शिक्षणाची गरज असते. परंतु गरिबांना हें शिक्षण मिळवितां येत नाहीं. त्यामुळें त्यांना आपली स्थिति सुधारण्याचा मार्ग बंद झाल्यासारखा होतो व त्यांचा पाय दारिद्र्यपंकांत जास्त जास्तच बुडत जातो. तेव्हां संपत्तीची वांटणी समतेची होण्याचा एक उपाय गरिबांना शिक्षणाच्या जास्त सवलती देणें हा होय. ह्मणजे होतां होईल तों शिक्षणसंस्था राष्ट्रीय करून त्या सरकारच्या खर्चातून चालविणें व शिक्षण जितकें स्वस्त करतां येईल तितकें स्वस्त करणें ही एक सामाजिक पंथी योजना आहे. मागें शिक्षणावर जो एक भाग लिहिला आहे त्यामध्यें त्याची सयुक्तिकता दाखविलीच आहे, तेव्हां येथें पुनः त्याची द्विरुक्ति करण्याचें प्रयोजन नाहीं. प्राथमिक शिक्षण—सामान्य व औद्योगिक—हें मोफत व सक्तीचें केलें पाहिजे अशी बहुतेक सुधारलेल्या सरकारांची समजूत झालेली आहे. परंतु सर्व प्रकारचें शिक्षण होतां होईल तितकें स्वस्त अगर अगदीं मोफत करणें हें सरकारचें कर्तव्यकर्म आहे ही जाणीव सरकारच्या मनांत अजून उत्पन्न झाली नाहीं. परंतु अशी जाणीव उत्पन्न झाली ह्मणजे ही सामाजिकपंथी योजनाही पसंत झाल्यासारखें होईल.

राहतां राहिली एक राष्ट्रीय सामाजिक-पंथी योजना. या योजनेला मूर्त स्वरूप प्रथमतः जर्मनीमध्यें मिळालें व त्याच्या पुरस्कर्तृत्वाचा मान प्रसिद्ध जर्मन मुत्सद्दी प्रिन्स **बिस्मार्क** याला आहे, हें मागल्या भागांत सांगितलेंच आहे. आतां या योजनेचें विशेष स्वरूप, तिची अम्मलबजावणी व तीवर आणले जाणारे आक्षेप यांचा विचार करावयाचा आहे.

घरगुती उद्योगपद्धति व विराटस्वरूपी उद्योगपद्धति यांचा एक परिणाम असा होतो कीं, देशांतील बहुजनसमाज हा निवळ दिसमजुरी मिळविणारा मजूर बनतो. त्याच्याजवळ कोणत्याही प्रकारचें भांडवल नसतें व त्याच्या आजारीपणांत किंवा अपघातांत किंवा वार्धक्यामध्यें त्याचें उत्पन्न अजीबात बंद होतें. कारण, मजुराला गिरणींत किंवा कारखान्यांत जातां आलें नाहीं म्हणजे मजुरी बंद, व मजुरी बंद म्हणजे त्याचें उत्पन्न बंद. घरगुती उद्योगपद्धतींत त्याचें भांडवल थोडें तरी असतें व त्यावर त्या कामदाराचीं घरचीं माणसें काम करूं शकतात किंवा शेजाऱ्यापाजाऱ्याच्या मदतीनें घरगुती उद्योगाचें काम चालू ठेवतां

येतें. त्यामुळें त्या कामदाराचें उत्पन्न अजीबात बंद होत नाहीं. परंतु विराटस्वरूपी उद्योगपद्धतींत मजुरी बंद म्हणजे सर्व उत्पन्न बंद. तेव्हां या पद्धतींत मजुरानें जर कांहीं शिल्लक टाकली असेल तरच त्याचे वार्धक्यामध्यें किंवा आजारीपणांत व अपघातांत बऱ्या तऱ्हेनें दिवस जाणार; परंतु मजुरांची मजुरी साधारण बेताचीच असल्यामुळें व देशाच्या भरभराटीबरोबर आयुष्याच्या आवश्यकांना जास्त खर्च लागूं लागल्यामुळें मजुरांची फारशी शिल्लक राहण्याचा संभव नाहीं. या कारणामुळेंच विराटस्वरूपी कारखान्याच्या पद्धतींत मजूरवर्गाची दैन्यावस्था होते. तेव्हां ही दैन्यावस्था काढून टाकणें अवश्य आहे व हें काम सरकारचेंच आहे अशी सल्ला वागनरनें प्रिन्स बिस्मार्क यास दिली व त्या अनुरोधानेंच जर्मनीमध्यें विम्यासंबंधींच्या कायद्याची प्रसिद्ध त्रयी पास झाली.

पहिला विम्याचा कायदा आजारीपणाबद्दल होता व तो प्रथमतः १८८३ मध्यें पास झाला. या कायद्यान्वयें आजारीपणाबद्दल प्रत्येक कामदाराचा विमा उतरलाच पाहिजे असा सक्त नियम झाला. विमा उतरण्यास लागणाऱ्या रकमेपैकीं दोन तृतीयांश कारखानदारानें दिले पाहिजेत व एकतृतीयांश मजुरानें दिले पाहिजेत असें कायद्याचें कलम होतें. आजारीपणाच्या तिसऱ्या दिवसापासून या विम्यांतून मजुरीच्या अर्धे पैसे मिळावयाचे व हा क्रम तेरा आठवडे चालावयाचा. त्याच्यापुढें मजुराचा आजार राहिल्यास अनाथालय-फंडामधून पुढें त्याची तजवीज करावयाची.

अपघाताबद्दलच्या विम्यासंबंधींचा कायदा १८८४ मध्यें पास झाला. या कायद्यान्वयें गिरणींतील किंवा कारखान्यांतील अपघातांची सर्व जबाबदारी कारखानदारांवर टाकलेली आहे. अर्थात् ज्याप्रमाणें आपला कारखाना आरोग्यकर स्थितींत ठेवणें हें कारखानदारांचें काम आहे, त्याचप्रमाणें अपघातापासून मजुरांचा बचाव करणें हेंही कारखानदारांचेंच काम आहे; ह्मणून या विम्याची सर्व रकम कारखानदारांकडून घ्यावयाची असा या कायद्यानें निर्बंध केला.

परंतु, या कायद्याच्या त्रयीपैकीं सर्वांत महत्त्वाचा कायदा ह्मणजे वार्धक्याबद्दलच्या विम्याचा कायदा होय. हा कायदा १८८९ मध्यें पास झाला. या कायद्याप्रमाणें मजुराला ७० वर्षें पुरीं झालीं म्हणजे त्याला पेन्शन मिळावयाचें. मात्र त्याच्याकरितां सुमारें ९५ वर्षें तरी विम्याची रकम भरलेली असावी. कोणत्या

मजुरोला किती पेन्शन द्यावयाचें हें ठरविण्याकरितां मजुरांचे त्यांच्या मजुरीप्रमाणें निरनिराळे पांच वर्ग केले आहेत. विम्याच्या रकमेपैकीं अर्धी रकम कारखानदारानें द्यावयाची व अर्धी मजुरानें द्यावयाची व प्रत्येक पेन्शनला सरकारनें ५० शिलिंग द्यावयाचे; अशीं या कायद्याचीं कलमें आहेत. पेन्शन व त्याबद्दल द्यावयाची रकम वगैरे माहिती खालील कोष्टकावरून होईल.

| वर्ग | पहिला | दुसरा | तिसरा | चवथा | पांचवा |
|---|---|---|---|---|---|
| वार्षिक मजुरी. | ३५० शिलिंगांपर्यंत. | ३५० ते ५५० शि. | ५५० ते ८५० शि. | ८५० ते ११५० शि. | ११५० ते २००० शि. |
| दर आठवड्याची वर्गणी. | १ ३/४ पे. | २ १/३ पे. | २ ५/६ पे. | ३ १/२ पे. | ४ १/४ पे. |
| वार्षिक पेन्शन. | ११० शि. | १४० शि. | १७० शि. | २०० शि. | २३० शि. |

या वार्षिक पेन्शनामध्यें सरकारचे ५० शिलिंग मिळविले म्हणजे प्रत्येक कामदाराच्या पेन्शनाचा आंकडा ठरतो.

आजारीपणाच्या विम्याच्या कायद्यान्वयें १९०६ सालीं जर्मनीमध्यें १,३३,१७,३७४ पौंड खर्च झाले; अपघाताच्या कायद्यान्वयें ७१,५८,०६३ पौंड व वार्धक्याबद्दलच्या पेन्शनांकरितां ८३,०१,९५७ पौंड खर्च झाले व या कायद्याचा फायदा मिळालेल्या कामदारांची १९०६ सालीं १,१६,८९,३८८ इतकी संख्या होती.

वरील हकीकतीवरून या कायद्याचा फायदा केवढ्या मोठ्या वर्गाला होत आहे याची सहज कल्पना येईल.

इंग्रज अर्थशास्त्रकारांचे या योजनांवर व प्रत्यक्ष घडवून आणलेल्या सुधारणांवर मुख्य आक्षेप असे आहेत कीं, याच्यायोगानें मजुरांच्या स्वावलंबनपर खटपटीस अडथळा होईल व त्यांची स्वावलंबनपर वृत्ति कालेंकरून नाहींशी होईल. मग सर्व बाबतींत लोक सरकारवर अवलंबून राहण्यास शिकतील. दुसरा, या विम्याचा खर्च शेवटीं कामदारांवरच पडेल व यामुळें त्यांची दैन्यावस्था

आहे तशीच राहील; हा खर्च जर कारखानदारांवर पडूं लागला तर ते मालाच्या किंमती वाढवितील किंवा आपला धंदा आंखडता घेतील; दोन्ही रीतींनीं देशांतील उद्योगधंद्यांची पीछेहाट होईल व शेवटीं त्यायोगें मजूरवर्गाचें नुकसान होईल.

परंतु हा आक्षेप 'मजुरी-फंडाच्या' कल्पनेवर बसविलेला आहे. व ज्या अर्थी ह्या कल्पनेमध्यें फारसा तथ्यांश नाहीं, त्या अर्थी या आक्षेपांतही फारसा अर्थ नाहीं असें ह्मणणें प्राप्त आहे. दुसरें, स्वावलंबनावर खटपटीच्या आड न येतां सरकारला हें काम करतां येईल; शिवाय स्वावलंबन हें फारच थोडया लोकांना लागू आहे. तेव्हां सरकारनें बहुजनसमाजाच्या कल्याणाकडे पाहिलेंच पाहिजे. असें या योजनांच्या समर्थकांचें ह्मणणें आहे. या दोन्ही ह्मणण्यांत पुष्कळ तथ्यांश आहे, असें कबूल करणें भाग आहे.

जर्मनीमध्यें या कायद्यापासून गरीब लोकांची स्थिति सुधारली आहे हें पाहून फ्रान्स देशानें जर्मनीचें अनुकरण केलें. तिनें १९०५ सालीं वयातीत, गरीब, आजारी व कामाला कायमचे निरुपयोगी अशा कामदारवर्गाच्या मदतीकरितां एक कायदा केला. या कायद्याच्या योजनेप्रमाणें तिचा सर्व खर्च स्थानिक सरकार व राष्ट्रीय सरकार यांनीं करावा असें ठरलें. १९०५ सालीं मदतीला योग्य ह्मणून निवडलेल्या कामगारांची संख्या ५०८१६७ होती व निवळ राष्ट्रीय सरकारला १९०५ मध्यें या योजनेप्रीत्यर्थ ४ कोटी ३० लक्ष फ्रँक्स ह्मणजे ८६ लक्ष रुपये खर्च आला. १९१० मध्यें जास्त व्यापक असा वार्धक्याबद्दल पेन्शनचा कायदा पास झाला. या कायद्यान्वयें सर्व मजुरांस पेन्शन मिळविण्याचा हक्क मिळाला. या विम्याला कारखानदार व मजूर यांनीं सारखी वर्गणी द्यावयाची असें एक कलम कायद्यांत आहे व सरकारनें प्रत्येक पेन्शनला ६० फ्रँक्स ह्मणजे ३६ रुपये दिले पाहिजेत असें दुसरें कलम आहे. ६५ वर्षांपासून पेन्शन मिळण्यास हक्क प्राप्त होतो. प्रत्येक मजुराच्या वर्गणीप्रमाणें त्याला पेन्शन बसतें. सर्वांत कमी वार्षिक पेन्शन १०० फ्रँक्स ह्मणजे ६० रुपयांपेक्षां कमी असणार नाहीं अशी कायद्यानें हमी दिली आहे. या कायद्याची पूर्ण अंमलबजावणी होऊन त्याचा फायदा सर्व योग्य मजुरांना मिळूं लागला, ह्मणजे हा कायदा सुमारें २० लक्ष मजुरांना मदत करील व त्याकरितां फ्रान्स सरकारास १२ कोटी फ्रँक्स म्हणजे ७ कोटी २० लक्ष रुपये खर्च येईल असा अंदाज केलेला आहे.

व्यक्तिस्वातंत्र्याचें माहेरघर जें इंग्लंड तेथें राष्ट्रीय सामाजिक पंथाच्या इतर योजनांप्रमाणें या योजनेला प्रथमतः विरोध झाला. परंतु इंग्लंडमध्यें मजूरपक्षाला जसजसें महत्त्व येत चाललें तसतसा सामाजिक-पंथी योजनेबद्दलचा तिटकारा कमी होऊन त्याचा सहानुभूतिपूर्वक विचार होऊं लागला. विशेषतः वार्धक्यांत मजुरांना पेन्शन मिळण्याच्या योजनेबद्दल लोकमत इतकें जोरदार होत चाललें होतें कीं, चेंबरलेनसारख्या मुत्सद्द्याला आपल्या सवलतीच्या जकातीच्या योजनेला बहुजनसमाजाची अनुकूलता संपादन करून घेण्याकरितां, या योजनेनें वार्धक्यांत पेन्शनें देण्यास सरकारला पुरेसें उत्पन्न होईल व त्यांतून पेन्शनें दिलीं जातील असें आमिष दाखवावें लागलें. परंतु कॉन्सर्व्हेटिव्ह सरकारकडून अशी योजना प्रत्यक्ष अंमलांत येण्याची आशा नव्हती. परंतु लिबरल पक्ष अधिकारारूढ झाल्यानंतर लवकरच त्या पक्षानें हा प्रश्न हातीं घेऊन वार्धक्यांत पेन्शन देण्याचा कायदा १९०८ मध्यें पास करून घेतला. जो मनुष्य ब्रिटिश प्रजाजन असून वीस वर्षें इंग्लंडांत राहात आहे, ज्याचें वार्षिक उत्पन्न ३१ पौंड १० शिलिंग याच्यावर नाहीं व ज्याचें वय ७० वर्षांच्या वर आहे अशा प्रत्येक मनुष्याला या कायद्यान्वयें पेन्शन मिळण्याचा हक्क आहे; मात्र जानेवारी १९०८ पासून त्याला अनाथालयांतून मदत मिळालेली असतां कामा नये; आपलें व आपल्यावर अवलंबून असणाऱ्याचें पोषण कायमच्या आळसामुळें झालें नाहीं असें असतां कामा नये; तो वेड्याच्या इस्पितळांत गेलेला नसावा; व तो पूर्वीच्या दहा वर्षांत गुन्हेगारीबद्दल तुरुंगांत गेलेला नसावा. या कामाकरितां पेन्शनकमिट्या व पेन्शन ऑफिसर्स नेमिले आहेत. पेन्शनाकरितां करावयाचे अर्ज पोस्टऑफिसच्या मार्फत घेण्याची तजवीज केलेली आहे व त्यानें पेन्शन देण्याबद्दल शिफारस करून ती कमिटीकडे पाठवावयाची अशी पद्धति आहे. ज्याचें वार्षिक उत्पन्न ११ पौंड ४ शिलिंगांच्यावर नाहीं, त्याला दर आठवड्यास ५ शिलिंग पेन्शन मिळतें. उत्पन्नाच्या प्रत्येक २ पौंड १२ शिलिंग ६ पेन्स या रकमेच्या वाढीला १ शिलिंगानें पेन्शन कमी व्हावयाचें असा नियम आहे. १९०९ मध्यें ६४७४९४ लोकांना पेन्शन मिळालें.

वरील विवेचनावरून सामाजिक पंथाच्या पोटभेदांपैकीं राष्ट्रीय सामाजिक पंथ हाच व्यवहार्य पंथ आहे व त्याच्या योजना दिवसेंदिवस सुधारलेल्या सरकारला

पसंत पडत चालल्या आहेत असें दिसतें. कारण हा पंथ म्हणजे एक व्यावहारिक तडजोड आहे. खासगी मालमत्तेची संस्था ही समाजाच्या आधिभौतिक सुधारणेची गुरुकिल्ली आहे हें या पंथाला दिसून येतें; तसेंच मानवी ज्ञानाच्यामुळें सृष्टिशक्ति व यंत्रशक्ति यांचा संपत्तीच्या उत्पत्तीमध्यें उपयोग होऊं लागल्यामुळें विराटस्वरूपी कारखान्यांची पद्धतीही अर्वाचीन काळीं अनिवार्य आहे हेंही या पंथाला दिसतें. परंतु या गोष्टी सर्वथा इष्ट आहेत व त्यांमध्यें अनिष्टाचें मिश्रण मुळींच नाहीं व म्हणूनच सरकारनें औद्योगिक बाबतींत "उगीच रहावें" हेंच तत्त्व स्वीकारलें पाहिजे असें मात्र या पंथाला अभिमत अर्थशास्त्रकारांप्रमाणें वाटत नाहीं. उलट खासगी मिळकतीच्या संस्थेपासून कांहीं अनर्थ उद्भवतात; विराटस्वरूपी कारखान्याच्या पद्धतींत मजुरांचा चुराडा होतो हें व याचा परिणाम समाजामध्यें संपत्तीची अत्यंत विषम वांटणी होते हें या पंथाला स्पष्टपणें दिसून येतें, व म्हणूनच या पंथाला सरकारनें कायदारूपी अस्त्रानें ही विषमता काढून टाकली पाहिजे असें वाटतें. व म्हणून या पंथानें मजुरांची स्थिति सुधारण्याकरितां पुष्कळ खर्चाच्या योजना अमलांत आणिल्या आहेत. या खर्चाच्या योजना अंमलांत आणण्यास लागणारा पैसा उत्पन्न करण्याची कराची पद्धतीही न्यायास धरूनच आहे असें या पंथास वाटतें. वर सांगितलेंच आहे कीं, सरकार या संस्थेनें खासगी मालकीचें संरक्षण होतें व या खासगी मालकीच्या संरक्षणामुळें श्रीमंतांचा फारच फायदा होतो. तेव्हां या फायद्याचा थोडा जास्त वांटा सरकारनें या लोकांपासून घेऊन सरकारचा ज्या लोकांना कमी फायदा होतो त्यांची स्थिति सुधारण्यास त्या पैशाचा उपयोग करावा हें अगदीं रास्त आहे, असें या पंथाचें म्हणणें आहे व तें युक्तीस धरून आहे, असें कबूल करणें भाग आहे.

युरोपामध्यें १८ व्या शतकांत व्यक्तिक तत्वाचा फार फैलाव झालेला होता. म्हणून राष्ट्रीय सामाजिक पंथाला आपल्या योजना अंमलांत आणण्यास फारच त्रास व अडचण पडली. परंतु हिंदुस्थानांत अनियंत्रित राज्यसत्ता असल्यामुळें व मूळचें सरकार मायबापवजा लोकांना वाटत असल्यामुळें सरकारनें लोकांच्या कल्याणाची गोष्ट हातीं घ्यावी किंवा नाहीं हा प्रश्नच उद्भवला नाहीं. शिवाय, येथें सरकार सुधारलेलें व लोक मागासलेले असा प्रकार असल्यामुळें महत्त्वाचीं

औद्योगिक कामें सरकारनें सुरू केलीं व तीं सरकारच्या मालकीचींच आहेत.

येथें बहुतेक सर्व जमीन सरकारच्याच मालकीची आहे, असें सरकार समजतें. सर्व दळणवळणाचीं साधनें, पोस्ट, टेलिग्राफ, रेल्वे, रस्ते वगैरे सर्व सरकारच्या मालकीचींच आहेत. शिवाय, कालवे व पाटबंधारे हेही सरकारच्याच मालकीचे आहेत. जंगलें, खाणी व मिठाचे कारखाने हे सर्व सरकारच्याच मालकीचे आहेत. तेव्हां येथें बहुतेक सामाजिकपंथी योजनांचा प्रत्यक्ष अंमल चालू आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु, हिंदुस्थानच्या विशेष परिस्थितीमुळें या योजनांचा बहुजनसमाजास व्हावा तितका फायदा झाला आहे किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. या सर्व बिकट प्रश्नांचा आपल्याला सहाव्या पुस्तकांत विचार करावयाचा आहे. तेव्हां हा लांबलेला भाग आतां येथेंच थांबविणें बरें.

# अर्थशास्त्राचीं मूलतत्वें.

## पुस्तक चवथें.

## विनिमय.

### भाग पहिला.

### सामान्य विचार.

प्रास्ताविक पुस्तकांत निर्दिष्ट केलेल्या विषयक्रमानुरूप आतां विनिमय अगर अदलाबदल व तत्संबंधीं सर्व प्रश्न यांचा या पुस्तकांत सविस्तर विचार करावयाचा आहे. आतांपर्यंत विवेचन केलेल्या अर्थशास्त्राच्या अंगांपेक्षां या अंगाचें महत्व फार आहे. कारण, सामान्य मनुष्यास व मॅकलाऊड या अर्थशास्त्रज्ञास या विषयाचें इतकें महत्व वाटतें कीं, त्यांनीं अर्थशास्त्र म्हणजे ' विनिमयमीमांसाशास्त्र ' असें अर्थशास्त्राचें लक्षण केलें आहे. हें लक्षण एककली व एकतर्फी आहे हें मागें दाखविलेंच आहे. परंतु या गोष्टीवरून विनिमय हा विषय इतर विषयांपेक्षां जास्त महत्वाचा आहे एवढें तरी सिद्ध होतें हें निर्विवाद आहे. हा विषय महत्वाचा वाटण्याचें दुसरेंही एक कारण आहे. तें हें कीं, पुष्कळ अर्थशास्त्रकारांनीं विनिमयक्षमता अथवा खरेदीविक्री होण्याची पात्रता हा संपत्तीचा मुळीं लक्षणीभूत गुण मानला आहे. परंतु संपत्तीचा हा गुण प्राथमिक नसल्यामुळें तो मागील विवेचनांत लक्षणांमध्यें घेतला नाहीं. तरी सामान्य व्यवहारांत या गुणाचें फार महत्व आहे हें खरें आहे. शिवाय, समाजाच्या बाल्यावस्थेंत विनिमयाला फारसें महत्व नसतें खरें; कारण त्या काळीं प्रत्येक मनुष्य आपल्या गरजा आपल्याच श्रमानें भागवीत असतो; यामुळें त्याला संपत्तीची अदलाबदल

करण्याचा प्रसंग फारच थोड्या वेळीं येतो. परंतु अर्वाचीन काळीं प्रचंड कारखान्यांच्या सार्वत्रिक पद्धतीमुळें स्वतःच्या गरजा भागविण्याकरितां धंदा करणारा माणूस विरळा. सुधारलेल्या देशांत सर्व लोक आपल्या श्रमाचीं फळें दुसऱ्यास मोबदल्यानें देण्याच्या अगर विनिमयाच्या उद्देशानें तयार करतात. ह्मणून औद्योगिक प्रगतीबरोबर विनिमयाचें महत्त्व वाढतच जातें. तसेंच अर्वाचीनकाळीं संपत्तीची वांटणीही बहुतेक अंशीं विनिमयानेंच होते. कारण मजूर आपल्या श्रमाची मजुरी घेऊन विनिमय करतो. जमिनीचा मालक आपल्या जमिनीचा उपयोग विनिमयानेंच दुसऱ्यास देतो. सारांश, भाडें, मजुरी, व्याज व नफा हे संपत्तीच्या वांटणीचे मुख्य चार भाग हल्लींच्या काळीं रूढीनें किंवा कायद्यानें न ठरतां करारानें ठरले जातात. व ते त्या त्या वर्गाला विनिमयानें मिळतात. यामुळेंच किस्येक अर्थशास्त्रकार वांटणीचा अन्तर्भाव 'विनिमय' या विषयांत करतात. यावरूनही विनिमयाचें महत्त्व दिसून येतें. शेवटीं 'विनिमय' या विषयाचें इतकें महत्त्व असण्याचें कारण असें आहे कीं, 'विनिमय' हा अर्वाचीनकाळीं संपत्तीच्या उत्पत्तीचाच एक घटकावयव बनला आहे. कारण संपत्तीच्या उत्पत्तीची परिपूर्णता, माल गिऱ्हाइकाच्या हातीं पडल्याखेरीज होत नाहीं. अर्वाचीनकाळीं कारखानदार प्रचंड प्रमाणावर माल उत्पन्न करतात; मग तो माल घाऊक व्यापारी त्यांचेपासून विकत घेतात; घाऊक व्यापारी किरकोळ व्यापाऱ्यांना विकतात व शेवटीं किरकोळ व्यापारी प्रत्यक्ष उपभोग घेणाऱ्या गिऱ्हाइकांना विकतात. तेव्हां माल गिऱ्हाइकाच्या हातीं येण्यापूर्वी त्याची तीनदां अदलाबदल अगर विनिमय व्हावा लागतो.

वरील विवेचनावरून विनिमयाचें महत्त्व सहज ध्यानांत येईल व शिवाय त्यावरूनच अर्थशास्त्राची उत्पत्ति, वांटणी व विनिमय, हीं अंगें कशीं परस्परावलंबी आहेत हेंही दिसून येईल. जरी विवेचनाच्या सोईकरितां अर्थशास्त्राचे असे तीन भाग पाडले तरी प्रत्यक्ष व्यवहारांत हे तिन्हीं भाग अगदीं परस्परनिगडित आहेत हेंही मागें दाखविलेंच आहे. तेव्हां त्याची आतां पुनरावृत्ति करण्याचें प्रयोजन नाहीं.

परंतु हा विषय जितका महत्त्वाचा आहे तितकाच तो भानगडीचा व घोटाळ्याचा आहे. कारण यांतील प्रश्न अगदीं व्यावहारिक स्वरूपाचे आहेत. तसेंच

यांतील पारिभाषिक शब्द हे सामान्य माणसाच्या परिचयाचे आहेत. परंतु यामुळेंच या शब्दांची योग्य शास्त्रीय व्याख्या ठरविण्याचें काम फारच कठिण आहे. खेरीज, या विषयांत युक्तिवादाचा भाग जास्त आहे. वांटणीच्या विषयांत जितका वर्णनात्मक भाग आहे त्यापेक्षां या विषयांत वर्णनात्मक भाग फार कमी आहे. यामुळें येथें तर्कपद्धतीला अवसर जास्त आहे; व रिकार्डो यानें एकंदर अर्थशास्त्राची पद्धति तार्किक आहे असें जें प्रतिपादन केलें तें अर्थशास्त्राच्या या विषयाला जास्त लागू आहे. रिकार्डो हा स्वतः मोठा पेढीवाला होता. त्याला पेढीच्या व्यापाराची व परराष्ट्राच्या व्यापाराची प्रत्यक्ष माहिती होती व या विषयांत ज्या पद्धतीचा विशेष अवलंब करण्याचा प्रसंग येतो तीच पद्धति त्यानें अर्थशास्त्राच्या इतर विषयांसही लागू केली. ह्मणून त्याच्या पुष्कळ उपपत्ति एकतर्फी झाल्या, हें मागें दाखविलें आहे; परंतु या विषयांत युक्तिवाद व तार्किक पद्धतीचा विशेष उपयोग झालेला असल्यामुळें यामध्यें वादग्रस्त प्रश्नही फार आहेत, व ह्मणून त्याला भानगडीचें व कठिणपणाचें स्वरूप आलेलें आहे यांत शंका नाहीं.

मात्र, या पुस्तकांतील विषय आतांपर्यंत प्रतिपादन केलेल्या विषयांपेक्षां सहज जिज्ञासा उत्पन्न करणारे असल्यामुळें ते जरी कठिण व भानगडीचे असले तरी कमी मनोरंजक नाहींत हें खास आहे. ज्यानें तहानभूक भागत नाहीं, जो शीतोष्णादि विकारांपासून मनुष्याचें संरक्षण करूं शकत नाहीं; ज्यापासून स्पर्शघ्राणेंद्रियादि इंद्रियसुखें मिळत नाहींत; सारांश, ज्याच्यायोगानें मनुष्याची कोणतीच वासना तृप्त होत नाहीं, व म्हणून रानटी मनुष्यास जो अगदीं निरुपयोगी पदार्थ वाटतो तो पैसा—सोन्यारुप्याचे तुकडे हे—उद्योगयुगांत संपत्तिसर्वस्व बनतो व त्याकरितां मनुष्यें आटोकाट प्रयत्न करूं लागतात. इसापनीतींतील 'कोंबडा आणि रत्न' या गोष्टीप्रमाणें रानटी मनुष्याला सोनेंरुपें हें निरुपयोगी व कमी किंमतीचें वाटतें. याचें प्रत्यक्ष प्रत्यंतर आपल्याला अमेरिकेंतील रेड-इंडियन लोकांच्या हकीकतींवरून कळतें. हे लोक त्यांच्या देशांत सांपडणारे सोन्यारुप्याचे तुकडे युरोपियन प्रवाशांपासून क्षुल्लक खेळणीं घेऊन त्यांच्या बदला देत असत. परंतु सुधारलेल्या देशांत या पैशांकरितां मनुष्यें किती तरी धडपड करतात.

आहेत हें उघड होईल. परंतु पैशाची परिणतावस्था यापेक्षांही जिज्ञासावर्धक व म्हणून मनोरंजक आहे. प्रत्यक्षपणें कोणतीच वासना तृप्त न करणारा पैसा समाजांत सर्वत्र पसरून तो सर्व औद्योगिक प्रयत्नांचा विशेष होतो. इतकेंच नव्हे तर औद्योगिक प्रगतींत पुढारलेल्या समाजांत कागदी चलनांचा सर्वत्र प्रसार होतो. आतां कागदी चलन हें पैशापेक्षांही जास्त विलक्षण दिसतें. एखाद्या कागदी चिटोऱ्याची हजारों रुपये किंमत असावी हें रानटी माणसाला 'बोलणाऱ्या ढलप्या' इतकेंच आश्चर्यकारक वाटावें हें साहजिक आहे. तेव्हां हा कागदी चलनाचा प्रश्न, हें चलन समाजांत कसें व कां प्रचलित होतें व सोन्यारुप्याच्या पैशापेक्षांही लोकांची मागणी त्याला जास्त कां होते हा प्रश्नही पहिल्याइतकाच जिज्ञासावर्धक असून मनोरंजक आहे. असो. पुढें पेढ्यांची संस्था; त्यानें होणारे पैशाशिवाय हजारों रुपयांचे व्यवहार वगैरे प्रश्नही कठीण पण मनोरंजकच आहेत. आणखी परदेशांतील व देशांतील प्रचंड व्यापाराच्या घडामोडी कशा होतात; बिनपैशानें या घडामोडींची व्यवस्था कशी होते, व्यापाऱ्याच्या हातचीं साख-पत्रेंही पैशासारखीं वापरलीं कां व कशीं जातात; सोन्यारुप्याच्या वाढीचा देशाच्या पैशावर कसा परिणाम होतो; राष्ट्राराष्ट्रांमधील पैशाच्या स्वरूपाचे व्यवहार कसे होतात वगैरे किती तरी प्रश्नांचा या पुस्तकांत समावेश होतो व हे सर्व प्रश्न कठीण पण मनोरंजक आहेत यांत शंका नाहीं. आतां या पुस्तकांतील विषयाचे सामान्यतः कोणकोणते पोटभाग पडतात तें पाहूं; म्हणजे क्रमानें त्यांचा विचार करण्यास ठीक पडेल. पहिल्या विभागांत विनिमयाचें सामान्य स्वरूप, पदार्थांचें मोल व किंमत यांतील फरक व पदार्थांच्या किंमतीची मीमांसा इतक्या गोष्टी येतात. दुसऱ्यांत पैसा, त्याचें स्वरूप, त्याचें कार्य व तत्संबंधीं प्रश्न येतात; शिवाय, त्यांतच पेढ्या व त्यांचें स्वरूप व कार्य आणि कागदी चलन व त्यांची मीमांसा इत्यादि प्रश्नांचा समावेश होतो. तिसऱ्यांत परराष्ट्रीय व्यापार व त्याचीं तत्त्वें व तो घडवून आणण्याचीं साधनें या विषयांचा अन्तर्भाव होतो. याच ठिकाणीं 'संरक्षण विरुद्ध अप्रतिबंध व्यापार' या वादग्रस्त विषयाचा ऊहापोह करणें इष्ट असतें. पुढें सोन्यारुप्याच्या खाणींचा शोध व त्यांचा देशांतील व्यापारावर व संपत्तीवर घडलेला परिणाम या प्रश्नाचा विचार करणें हें क्रमप्राप्त आहे व शेवटीं हिंदुस्थानांतील नाण्यांची पद्धति, त्यांचा इतिहास, त्यांचे औद्यो-

गिक स्थितीवर झालेले परिणाम वगैरे व्यावहारिक प्रश्नांचा व सध्यां ज्यांच्याबद्दल समाजांत चर्चा चालू आहे अशा प्रश्नांचा ऊहापोह करणें इष्ट होईल.

वरील विवेचनावरून या पुस्तकांतील प्रतिपाद्य विषयांचें महत्त्व, त्यांचें काठिण्य व त्यांचें जिज्ञासावर्धकत्व व म्हणून एका दृष्टीनें त्यांचें मनोरंजकत्व हें वाचकांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं असें वाटतें. तेव्हां या विषयाचें विवेचन वर दिलेल्या क्रमानें या पुस्तकाच्या पुढील भागांत करावयाचें आहे तिकडे आतां आपण वळूं.

# भाग दुसरा.

## मोल व किंमत.

अदलाबदलीच्या किंवा विनिमयाच्या मुळाशीं असलेली कल्पना म्हणजे मोलाची होय. साधारण व्यवहारांत मोल व किंमत हे शब्द समानार्थानें वापरले जातात. या वस्तूची किंमत काय किंवा तिचें मोल किती, असा आपण प्रश्न करतों. 'मोलें घातलें रडाया, नाहीं असूं आणि माया' या कवितेंतही पैसे देऊन किंवा मजुरी देऊन रडावयास सांगण्याच्या रीतीचा उल्लेख आहे. ती वस्तु कवडीमोल आहे, या वाक्यांतही मोल हा शब्द किंमत या अर्थीच योजलेला आहे. कवड्या हा आपल्या कित्येक प्रांतांत नाण्याचा प्रकार आहे हें नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. ज्या वस्तूची किंमत कवडीइतकीही नाहीं तिला आपण कवडीमोल वस्तु म्हणतों. त्याचप्रमाणें तो जिन्नस बहुमोल आहे असें म्हटलें म्हणजे त्या वस्तूला पुष्कळ किंमत पडते असें आपण समजतों. सारांश, सामान्य व्यवहारांत मोल व किंमत या शब्दांमध्यें फरक धरला जात नाहीं. परंतु कोणत्याही शास्त्रविषयाचें हें पहिलें काम आहे कीं, सामान्य व्यवहारांतील शब्दांच्या व्याख्या व त्यांमधील सूक्ष्म फरक हे निश्चित करावयाचे. तदनुरूप या भागांत मोल व किंमत या शब्दांमधील सूक्ष्म भेद प्रथमतः ठरविला पाहिजे व या कल्पनांच्या कारणांकडे वळलें पाहिजे. अर्थशास्त्राच्या परिभाषेप्रमाणें मोल व किंमत

यांमध्यें सामान्यविशेषत्वाचा भाव आहे व या दोन्ही कल्पनांच्या व्याख्या ठर-वितांना विशेषाकडून सामान्याकडे जाणें सोईस्कर आहे. कारण मोल व किंमत या दोन शब्दार्थांमधील दुसरा अर्थ जास्त सुलभ व स्पष्ट आहे.

कोणत्याही वस्तूची किंमत म्हणजे त्या वस्तूबद्दल द्यावे लागणारे पैसे असें आपण समजतों. घड्याळाची किंमत १५ पासून ७५ रुपयांपर्यंत आहे. म्हणजे एका मनुष्यास [illegible] बाजारांत साधारण बऱ्यापैकीं घड्याळ विकत घ्यावयाचें अ-सेल तर त्याला देशामध्यें सर्वसंमत असलेला जो पैसा–हिंदुस्थानांत रुपये अगर पौंड–या रूपानें १५ पासून ७५ रुपयांपर्यंत घड्याळाच्या गुणाप्रमाणें किंमत द्यावी लागेल. अर्थात् किंमत म्हणजे कोणतीही विक्रीची वस्तु व देशांतील नाणें यांच्या अदलाबदलीचा संबंध होय. म्हणजे वस्तु विकत घेण्याकरितां देशांतील पैशाचें द्यावें लागणारें प्रमाण ही त्या वस्तूची किंमत होय. आतां मोलाची कल्पना ही यापेक्षां व्यापक आहे. कोणत्याही वस्तूचें मोल म्हणजे एका वस्तूचें दुसऱ्या वस्तूशीं अदलाबदलीचें प्रमाण होय. देशामध्यें पैसा किंवा नाणें याचा प्रादुर्भाव होण्यापूर्वी वस्तूंची अदलाबदल ऐनजिनशींच असे, असें इतिहासावरून दिसतें. हिंदुस्थानांतही अजून सुद्धां अगदीं खेडेगांवांत ऐनजिनशी अदलाबदल चालते. शेतकरी आपल्याजवळ असलेलें धान्य वाण्याच्या दुकानीं आणतो व तो तें धान्य वाण्यास देऊन आपल्याला लागणाऱ्या इतर वस्तू विकत घेतो. येथें निर-निराळ्या वस्तूंचें मोल धान्यांत मोजलें जातें. तसेंच रानांतील कातवडी वगैरे अगदीं रानटी जाती रानांतील फळमूलादि खाद्य पदार्थ गोळा करून शहरांत आणतात व त्याच्या बदला धान्य, मीठ, मिरची, कापड वगैरे लागणारे पदार्थ घेऊन जातात. येथेंही अदलाबदल ऐनजिनसींच होते. तेव्हां मोल या शब्दाचा अर्थ सापेक्ष आहे असें होतें. वस्तूचें मोल म्हणजे अदलाबदलीमध्यें किंवा विनिमयामध्यें एका वस्तूकरितां द्यावी लागणारी दुसरी वस्तू होय. यावरून एका वस्तूचें मोल दुसरे जितके पदार्थ आहेत तितक्या निरनिराळ्या रूपांनीं सांगतां येईल. एका कोटाचें मोल अमुक बूट म्हणतां येईल किंवा अमुक शेर गहूं म्हणतां येईल किंवा अमुक शेर भाजी असेंही म्हणतां येईल. सारांश, एका वस्तूचें मोल हजारों रूपांत आहे. परंतु वस्तूची किंमत म्हणजे मात्र एका सर्वसंमत विवक्षित अशा रूपांतील मोल होय. ती विवक्षित वस्तु म्हणजे समाजामध्यें रूढ झालेला

पैसा अगर नाणें होय. तेव्हां वस्तूचें नाण्यांमधील मोल म्हणजे त्या वस्तूची किंमत होय व इतर सर्व पदार्थांच्या रूपांतील किंमत म्हणजे वस्तूचें मोल होय. तेव्हां वर उल्लेख केल्याप्रमाणें मोल व किंमत यांमध्यें सामान्यविशेषभाव आहे हें उघड आहे.

सामान्य व्यवहारांत किंमत या कल्पनेचा प्रचार जास्त आहे व अदलाबदलींत याच कल्पनेला प्राधान्य आहे. कारण वस्तूंची योग्य अदलाबदल, अगर विनिमय, होण्यास त्याच्या परस्पर किंमती समजल्या पाहिजेत हें सहज दिसून येईल. परंतु कांहीं कांहीं विषयांमध्यें मोल व किंमत हा फरक अवश्य ध्यानांत ठेवावा लागतो हें पुढील भागामधल्या विवेचनावरून दिसून येईल.

मोल व किंमत या शब्दांमधील भेदावरून अर्थशास्त्रांतील एक प्रमेय निष्पन्न होतें त्याकडे आतां लक्ष दिलें पाहिजे. पदार्थांच्या किंमती या देशांतील पैशाशीं तुलना करून काढल्या जातात हें वरील विवेचनावरून ध्यानांत आलें असेलच. आतां देशाचा पैसा हा कायम आहे असें आपण समजतों व सर्व वस्तूंच्या किंमती या पैशाच्या कसोटीनें मोजतों. यामुळें सर्व वस्तूंच्या सररहा किंमती वाढणें शक्य आहे. कारण पूर्वीपेक्षां जर एका नाण्याच्या बदला सर्व वस्तू कमी मिळूं लागल्या तर सर्व पदार्थांच्या किंमती वाढल्या आहेत असें आपण म्हणतों. उदाहरणार्थ, अमेरिकेच्या शोधानंतर व विशेषतः सोन्यारुप्याच्या खाणींच्या शोधानंतर युरोपामध्यें पदार्थांच्या किंमतीमध्यें विलक्षण क्रांति घडून आली. अर्थात् सर्व पदार्थांच्या किंमती पूर्वीपेक्षां कितीतरी पटींनीं वाढल्या. यावरून पैशाचें मोल कमी झालें असा त्याचा अर्थ होतो. परंतु पैसा हा कसोटीसारखा समजल्यामुळें त्याचें मोल स्थिर व अचल आहे असें आपण धरून चालतों व त्याच्या मानानें सर्व वस्तूंच्या किंमती वाढल्या अगर सररहा सर्व वस्तू महाग झाल्या असें आपण म्हणतों.

परंतु सर्व वस्तूंचें सररहा मात्र मोल वाढणें शक्य नाहीं. कारण, मोल ही संज्ञाच जर सापेक्ष आहे तर सर्व वस्तूंचें मोल एकदम सररहा वाढणें हें अशक्य आहे. कारण एका वस्तूचें मोल वाढलें तर तिच्याशीं तुलना केलेल्या दुसऱ्या वस्तूचें मोल कमी झालेंच पाहिजे. उदाहरणार्थ, दहा शेर गव्हाला पूर्वी दोन मण लांकडें मिळत असत, तीं आतां एक मणच मिळूं लागलीं असें समजा. म्हणजे

लांकडांचें मोल वाढलें असें होईल. कारण, पूर्वी एका मणाला पांच शेर गहूं पडत तेच आतां एका मणाला दहा शेर गहूं पडूं लागले. अर्थात् लांकडाच्या दृष्टीनें मोल वाढलें. परंतु तेंच गव्हाच्या दृष्टीनें पाहिलें असतां गव्हाचें मोल कमी झालें आहे असें म्हटलें पाहिजे. कारण पूर्वी दहा शेर गव्हाला दोन मण लांकडें मिळत. तींच आतां तेवढ्याच गव्हाला एक मणच मिळतात, म्हणजे गव्हाचें मोल निम्में कमी झालें असें होतें. यावरून सर्व पदार्थांचें मोल सरसहा वाढणें हें अगदीं अशक्य आहे हें सहज ध्यानांत येईल. कांहीं वस्तूंचें मोल वाढलें याचाच अर्थ दुसऱ्या कांहीं वस्तूंचें मोल कमी झालें असा आहे. कारण मोलाची कल्पना सापेक्ष आहे व ती निरनिराळ्या वस्तूंच्या संबंधावर अगर तुलनेवर अवलंबून आहे.

येथपर्यंत मोल व किंमत या कल्पनांमधील फरक व त्यावरून निघणारा एक सिद्धांत यांचें विवेचन केलें. आतां मोलासंबंधींच्या एका वादग्रस्त प्रश्नाकडे वळलें पाहिजे. या वादाचें विवेचन करतांनाच अर्वाचीन अर्थशास्त्रकारांनीं काढलेली आवशेषिक मोलाची कल्पना व धारेवरील मोलाची कल्पना यांचें स्पष्टीकरण केलें जाईल.

मोल या शब्दाची व्याख्या करतांना **ॲडाम स्मिथनें** या शब्दामध्यें एक संदिग्धता आहे तिचा उल्लेख केला आहे. त्याचे मतें मोल दोन प्रकारचें आहे. एक वस्तूचें उपयुक्तता-मोल व दुसरें विनिमय-मोल; किंवा केवल-मोल व सापेक्ष मोल. अमकी वस्तु मोलवान् आहे असें म्हटलें म्हणजे ती वस्तु उपयोगी आहे इतकाच त्याचा अर्थ केव्हां केव्हां केला जातो. हें वस्तूचें केवल-मोल अगर उपयुक्तता-मोल होय. अर्थशास्त्रांत उपयुक्तता-मोलाचा विचार केला जात नाहीं. अर्थशास्त्रांत विनिमय-मोलाचाच फक्त विचार केला जातो. म्हणजे एक वस्तु विकत घेण्याकरितां त्याच्या मोबदला द्यावी लागणारी वस्तु ही त्या पहिल्या वस्तूचें विनिमय-मोल होय. अर्थशास्त्रांत हाच अर्थ महत्त्वाचा आहे. **ॲडाम स्मिथनें** याप्रमाणें मोल या शब्दांतील संदिग्धता दाखवून मोल शब्दाचा दुसराच अर्थ ग्राह्य धरला आहे. परंतु **ॲडाम स्मिथच्या** मोल या शब्दार्थाच्या पृथक्करणानें जास्त घोटाळा उत्पन्न झाला आहे. कारण उपयुक्तता-मोल हा शब्दप्रयोगच मुळीं घोटाळ्याचा आहे. याचा सरळ अर्थ म्हणजे उपयुक्तता एवढाच होतो. वास्तविक पाहतां मोल हें उपयुक्ततेचें कार्य आहे. **ॲडाम**

स्मिथच्या उपयुक्तता–मोल या शब्दामध्यें कार्यकारणांचें एकीकरण झालें आहे. यामुळेंच ॲडाम स्मिथच्या विवेचनानें मोलाची कल्पना स्पष्ट होण्याऐवजीं जास्तच घोंटाळयाची होऊन गेली आहे. म्हणून वर मोलाची व्याख्या करतांना ॲडाम स्मिथच्या या भेदाचा उल्लेख केला नव्हता. असो.

परंतु 'वस्तूला मोल कां येतें?' हा प्रश्न जास्त महत्त्वाचा आहे व याच्या उत्तरामध्येंच वादाचें मूळ आहे. कारण या प्रश्नाला परस्परविरोधी अशीं दोन उत्तरें अर्थशास्त्रकारांनीं दिलेलीं आहेत. त्या उत्तरांवरून यासंबंधांत दोन वाद अगर दोन कल्पना उत्पन्न झाल्या आहेत.

मालाला मोल कां येते? या प्रश्नाचें उत्तर कांहींनीं खालील कारणमीमांसेनें दिलें आहे. संपत्ति, माल, किंवा पदार्थ या मानवी वासना तृप्त करितात. म्हणजे त्या मनुष्याला उपयोगी आहेत व त्या उपयोगी आहेत म्हणून त्या मोलवान् आहेत अगर त्यांना मोल येतें. अर्थात् वस्तूच्यामध्यें उपयुक्तता आहे म्हणूनच मनुष्य त्या वस्तूच्या प्राप्तीकरितां कांहींतरी मोबदला देण्यास तयार होतो; म्हणजे त्या वस्तूला मोल येतें अगर ती मोलवान् ठरते. तेव्हां वस्तूचें मोल तिच्या उपयुक्ततेवर अवलंबून आहे, असें होतें. अर्थात् मोल व उपयुक्तता यांमध्यें कार्यकारणभाव आहे असें ठरतें. यालाच मोलाबद्दलचा उपयुक्ततावाद म्हणतात. या मताप्रमाणें जितकी जितकी वस्तूची उपयुक्तता जास्त तितकें तितकें तिचें मोल जास्त असलें पाहिजे असा सिद्धांत निघतो. परन्तु हा सिद्धांत वस्तुस्थितीला धरून नाहीं असें दिसून येतें. हवा, पाणी हीं मनुष्याला अत्यंत उपयोगी आहेत. कारण त्यांवांचून मनुष्य प्राण धारण करूं शकणार नाहीं. परंतु जीविताच्या या अत्यंत उपयोगी–नव्हे अत्यंत आवश्यक–वस्तू बहुमोलाच्या आहेत असें समजलें जातें नाहीं. उलट सोनें, रुपें, हिरे, मोतीं वगैरे वस्तू हवा, पाणी, अन्न इत्यादि वस्तूंइतक्या उपयोगी नाहींत. त्या जवळ असल्या तरी त्यांनीं मनुष्याची तहानभूक हरावयाची नाहीं व या हजारों रुपयांच्या वस्तू जवळ असतांना इतर आवश्यक वस्तूंच्या अभावीं मनुष्याला मरणाची पाळी येईल. ज्याप्रमाणें मिडस राजाला एका वनदेवतेकडून 'हात लावला कीं सोनें' असा वर मिळून श्रीमंती आल्यामुळें मरणाची पाळी येऊन ठेपली व मिडस राजाला 'ही श्रीमंती नको' असें काकुळतीनें म्हणून वनदेवतेला वर मागें घेण्याबद्दल विनंती करण्याची पाळी

आली, त्याप्रमाणें या सोनेंमोत्यादि संपत्तीचा प्रकार आहे. म्हणजे त्या वस्तु मनुष्याला कमी उपयोगी आहेत. तेव्हां या वादाप्रमाणें या वस्तूंचें मोल कमी असावें. परंतु व्यवहारांत त्याच्या अगदीं उलट स्थिति आहे. या वस्तू अत्यंत मोलवान समजल्या जातात. वरील अपवादावरून मोलासंबंधी उपयुक्ततेची मीमांसा खरी नाहीं असें ठरूं लागलें. या आक्षेपाच्या अनुसंधानानें मोलाची दुसरी मीमांसा कांहीं ग्रंथकारांनीं केली. तिला व्ययमीमांसा म्हणतात. या मीमांसेप्रमाणें वस्तूला मोल असण्याचें कारण ती वस्तु निर्माण करण्यास खर्च लागतो हें होय. म्हणजे वस्तूचें मोल हें वस्तूच्या उत्पत्तीच्या खर्चावर अवलंबून आहे असें होतें. अर्थात् वस्तू उत्पन्न करण्यास जितका जितका खर्च जास्त तितकी तितकी वस्तूची किंमत जास्त असा या मीमांसेपासून सिद्धांत निघतो. परंतु, हा सिद्धांतही पहिल्याप्रमाणें वस्तुस्थितीला धरून नाहीं असें दृष्टोत्पत्तीस येतें. उदाहरणार्थ, एखाद्या विक्षिप्त माणसानें हजारों रुपये खर्च करून एखाद्या निर्जन रानांत मोठा बंगला बांधला, तर त्या खर्चामुळें तो मोलवान् होणार नाहीं. त्या बंगल्याची कोणालाही गरज नसल्यामुळें तो कुचकामाचा होईल व त्याला मोल कांहींएक येणार नाहीं. तेव्हां निव्वळ एखाद्या वस्तूवर पुष्कळ खर्च झाला आहे म्हणून तिचें मोल वाढेल असें नाहीं.

मोलाच्या कारणाच्या वर निर्दिष्ट केलेल्या दोन मीमांसा व त्यांचे कैवारी यांतील विरोध ढालीच्या रंगाबद्दल भांडणाऱ्या शिलेदारांच्या विरोधाप्रमाणें आहे. ढाल पांढरी आहे किंवा काळी आहे याबद्दल दोघां शिलेदारांमध्यें वाद चालला होता. एक म्हणे ती पांढरी आहे; तर दुसरा म्हणे तुझें म्हणणें अगदीं खोटें आहे, ती काळी आहे. वास्तविकपणें ती ढाल एका बाजूला पांढरीही होती, व दुसऱ्या बाजूला काळीही होती. तोच प्रकार या मोलाच्या मीमांसेचा आहे. वस्तूचें मोल कशानें उत्पन्न होतें? एक पक्ष म्हणतो, उपयुक्तता हेंच मोलाचें कारण अगर बीज आहे. तर दुसरा पक्ष म्हणतो, वस्तु तयार करण्यास लागणारा खर्च अगर व्यय हेंच मोलाचें कारण अगर बीज आहे. वास्तविक प्रकार असा आहे कीं, निव्वळ उपयुक्ततेनें मोल ठरत नाहीं किंवा निव्वळ उत्पादनव्ययानेंही मोल ठरत नाहीं. तर मोल हें उपयुक्तता व उत्पादनव्यय या दोहोंच्या संमेलनानें उत्पन्न होतें. म्हणजे मोलवान् वस्तूमध्यें उपयुक्तता व उत्पादनव्यय असे दोन्हीही गुण

असावे लागतात. हे दोन गुण संपत्तीच्या व्याख्येंत मानवी वासना तृप्त करण्याची शक्ति व श्रमसाध्यता या नांवानें निर्दिष्ट केले होते. शिवाय पृथक्‌पणा व अधीनता हे दोन्ही गुणही संपत्तींत पाहिजेत असें मागें दाखविलें आहे. या गुणचतुष्टयाचा संकलित परिणाम म्हणजे वस्तूचें मोल होय. हे चारी गुण थोड्याफार अंशानें प्रत्येक वस्तूमध्यें पाहिजेत. एखाद्या मोलवान् वस्तूमध्यें उपयुक्ततेचें प्रमाण बाकीच्या गुणांपेक्षां जास्त असेल तर दुसऱ्या मोलवान् वस्तूमध्यें उत्पादनव्ययाचें प्रमाण बाकीच्या गुणांपेक्षां जास्त असेल. परंतु प्रत्येक मोलवान् वस्तूमध्यें थोड्याफार अंशानें हे चारही गुण असले पाहिजेत तर त्या वस्तूमध्यें मौल्यवत्ता हा गुण उद्भूत होईल.

आतां जेव्हन्स यानें व दुसऱ्या अर्थशास्त्रकारांनीं काढलेल्या एक दोन नवीन कल्पनांचा विचार केला पाहिजे. वर सांगितलेंच आहे कीं, मोल या शब्दाची व्याख्या ठरवितांना ॲडाम स्मिथनें मोल यामध्यें केवल-मोल व विनिमय-मोल असा अर्थभेद दाखविला आहे. केवल मोल म्हणजे उपयुक्तता होय. वस्तूची उपयुक्तता ही मनुष्याच्या गरजा व वासना यांवर अवलंबून आहे. एकाला जी वस्तू अत्यंत उपयोगी असेल ती दुसऱ्याला अगदीं निरुपयोगी असेल. याचें एक उदाहरण म्हणजे अंधळ्या मनुष्याला चष्मा अगदीं निरुपयोगी असेल तर तो अधू डोळ्याच्या माणसाला अत्यंत उपयोगी असेल. परंतु बाजारांत येणारे वस्तूचें विनिमयमोल किंवा किंमत व ही उपयुक्तता यांमध्यें फारसा संबंध नाहीं. अर्थशास्त्रांत या दुसऱ्या अर्थाशीं आपल्याला कांहीं एक कर्तव्य नाहीं असें ॲडाम स्मिथनें प्रतिपादन केलें आहे. आतां जेव्हन्सनें या दोन कल्पनांमध्यें संबंध आहे असें आपल्या आवशेषिक अगर धारेवरील मोलाच्या कल्पनेनें ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या मतें वस्तूची किंमत व तिची उपयुक्तता यांमध्यें निकट संबंध आहे असें दाखवितां येईल. मात्र, उपयुक्तता हा एक ठराविक व सतत एकरूप असणारा असा गुण नाहीं, तर त्यामध्यें कमीअधिक तीव्रता असते हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. ही कमीअधिक तीव्रता मनुष्याजवळ असलेल्या त्या वस्तूच्या पूर्व पुरवठ्यावर अवलंबून आहे. ज्या मनुष्याचे प्राण तहानेनें किंवा भुकेनें व्याकुळ होत आहेत, त्याला पहिला पाण्याचा घोट अगर पहिला अन्नाचा घांस याचा उपयोग अनंत आहे असें

म्हटलें तरी चालेल; व त्याकरितां मनुष्य हवी तितकी किंमत देण्यास तयार होईल. परंतु जसजशी त्याची तहान किंवा भूक हरेल त्या मानानें जास्त पाण्याची व अन्नाची त्या माणसाला उपयुक्तता कमी भासेल व त्याच मानानें तो त्याबद्दल कमी कमी किंमत देऊं लागेल. म्हणजे वस्तूची किंमत मनुष्याला असलेल्या सामान्य उपयुक्ततेनें ठरत नाहीं. तर ती आवशेषिक उपयुक्ततेनें ठरते. मनुष्य भुकेनें व्याकुळ झाला असतांना जी किंमत धान्याला द्यावयाला तयार होईल ती किंमत तो बाजारांत धान्य घेतांना देणार नाहीं. कारण जरी धान्याची सामान्य उपयुक्तता पुष्कळ असली तरी त्याचे घरांत धान्य शिल्लक असल्यामुळें त्याला अवशेषिक अगर् धारेवरील उपयुक्तता कमी आहे व त्या मानानेंच तो त्या वस्तूला किंमत देण्यास तयार होईल.

अर्थात् उपयुक्तता हा गुण मनुष्यजवळ असलेल्या वस्तूच्या संग्रहावर अवलंबून आहे. जसजसा हा संग्रह वाढेल त्या त्या मानानें जास्त मालाची त्याला मातब्बरी कमी वाटेल; इतकेंच नव्हे तर कांहीं मर्यादेनंतर ती वस्तु त्याला निरुपयोगी होऊन त्याला अडगळशी वाटेल. उदाहरणार्थ, शेतकऱ्यास पहिल्या कुदळीचा फारच उपयोग आहे. ती नसली तर त्याचें काम अडेल. याकरितां तो वेळीं जास्त किंमत देईल. दुसऱ्या कुदळीची उपयुक्तता पहिलीइतकी नाहीं; तिसरीची आहेनाहीं अशी आहे, तर चवथी निवळ अडगळ होईल. यावरून वस्तूची उपयुक्तता मनुष्याजवळ असलेल्या पूर्वींच्या सांठ्यावर अवलंबून आहे हें ध्यानांत येईल.

आतां मनुष्याच्या कांहीं वासनांमध्यें कमीअधिकपणा होण्याचा गुण जास्त असतो तर कांहींमध्ये तो फार कमी असतो. उदाहरणार्थ, मनुष्याला लागणारें अन्न यामध्यें फारसा कमीअधिकपणा होत नाहीं. अन्न शरीररक्षणाला सारखेंच लागतें व तें मनुष्याला विकत घेतलेंच पाहिजे. परंतु यापलीकडे त्याचा मुळींच उपयोग नाहीं. यामुळें अशा वस्तु गरजेपलीकडे कोणीही जमविणार नाहीं. परंतु कपडेलत्ते, खुर्च्याटेबलें, इत्यादि सामान्य वस्तु, चित्रसंग्रह, पुस्तकसंग्रह, वगैरेसारख्या सुधारलेल्या समाजांतील गरजांना कांहींएक निश्चतपणा नसतो. या वस्तू कितीही असल्या तरी मनुष्याला त्याची थोडीबहुत तरी गरज ( अनुद्भूत ) असते व असा माल स्वस्त मिळाला तर मनुष्य विकत घेतो. म्हणजे तेथें त्याला

या अधिक वस्तूंची उपयुक्तता पुष्कळ कमी असते व ह्मणून तो त्या वस्तूला किंमत कमी देतो.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, पदार्थाला जें मोल अगर जी किंमत आपण बाजारांत देतों ती आपल्याला सर्वांत कमी उपयोगी जो पदार्थांचा अवशेष असेल त्यावरून ठरविती व ती त्या सर्व पदार्थांची किंमत अगर मोल होय. यालाच जेव्हन्स यानें आवशेषिक उपयुक्तता म्हटलें आहे.

या उपपत्तीचा उद्देश उपयुक्तता या कल्पनेला किंमतीप्रमाणें विशिष्ट परिमाणाचें स्वरूप आणण्याचा होता. असें उपयुक्ततेला विशिष्ट परिमाणाचें स्वरूप आलें ह्मणजे उपयुक्तता ही एक गणनाई कल्पना होईल व असें झालें ह्मणजे अर्थशास्त्राच्या नियमांना गणितशास्त्राच्या प्रमेयासारखें निश्चित स्वरूप देतां येईल अशी जेव्हन्सची कल्पना होती. या कल्पनेनुरूप जेव्हन्सनें अर्थशास्त्रामध्यें गणितांतल्यासारखीं परिमाणरूप सूत्रें काढण्याचा प्रयत्न केला आहे खरा. आतां किंमत ही कल्पना विशिष्ट स्वरूपाची आहे खरी; व बाजारांत वस्तूंचे भाव ठरतात ते कांहीं नियमित कारणांनीं ठरतात हेंही खरें; परंतु मानवी वासना ही चंचल मानसिक गोष्ट असल्यामुळें तिला नियत परिमाणरूप देण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. ती मनुष्यामनुष्यामध्यें बदलत राहणार. तिची मोजदाद झालीच तर ती फक्त ढोबळ रीतीनेंच होणार हें विसरतां कामा नये. कांहीं कांहीं अर्थशास्त्रकारांनीं सर्व अर्थशास्त्राला गणितासारखें विशिष्ट परिमाणांचें रूप देण्याचा प्रयत्न केलेला आहे. निसर्ग पंथाच्या कालींही असा प्रयत्न झालेला होता. कुर्नो या फ्रेंच ग्रंथकारानें अर्थशास्त्रावर जो ग्रंथ लिहिला आहे, त्यामध्यें गणितांतील पुष्कळ समीकरणें आणिलीं आहेत. परंतु अर्थशास्त्राचा विषय इतका संकीर्ण व संमिश्र आहे कीं, त्यामध्यें गणितांतील प्रमेयांइतका नियतपणा येणें शक्य नाहीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. गणितांतील प्रमेयें दाखल्याकरितां अर्थशास्त्रांत उपयोगीं पडतील. परंतु अर्थशास्त्राच्या सिद्धांतांना गणितशास्त्रांतील सिद्धांतांइतकें नियत स्वरूप येणार नाहीं हें खास. ह्मणूनच जेव्हन्स वगैरेसारख्या अर्थशास्त्रज्ञांनीं आवशेषिक उपयुक्तता, सकल उपयुक्तता वगैरे जे सूक्ष्म भेद काढले आहेत त्याचा ह्मणण्यासारखा उपयोग आहे असें वाटत नाहीं. अर्थशास्त्रांत महत्त्वाची कल्पना व गोष्ट ह्मणजे पदार्थांच्या किंमती कशा ठरतात हें पाहणें ही

होय. हा अर्थशास्त्रांतील महत्त्वाचा भाग आहे यांत शंका नाहीं. तेव्हां पुढील विवेचनास आरंभ करण्यापूर्वी किंमतीमधील दोन पोटभेद लक्षांत ठेविले पाहिजेत; ते भेद हे–१ वस्तूची बाजारकिंमत अगर बाजारभाव व २ मूळ किंमत. वस्तूचा बाजारभाव हा क्षणोक्षणीं बदलणारा असतो. एखाद्या वस्तूला सकाळीं जो भाव असेल तो संध्याकाळीं असणार नाहीं, त्यांत थोडा फार फरक होईल. वस्तूची मूळ किंमत ह्मणजे ती वस्तु उत्पन्न करण्यास लागलेला सर्व खर्च. वस्तूची मूळ किंमत ही त्याची स्थिर किंमत आहे. माल उत्पन्न करण्याच्या पद्धतींत फरक झाल्याखेरीज त्यामध्यें फारसा फरक होत नाहीं. तेव्हां बाजारभावाच्या मानानें ती जास्त स्थिर असते. ज्या किंमतीजवळ बाजारभाव हेलकावे खात राहतात, ती मूळ किंमत होय. अर्थात् पदार्थांच्या या दोन किंमती परस्परांपासून भिन्न आहेत अशांतला भाग नाहीं. बारकाईनें पाहतां बाजारभाव मूळ किंमतीवर अवलंबून आहे. ह्मणजे बाजारभाव कायमचा मूळ किंमतीच्या खालीं जाणारच नाहीं. तो तात्पुरता मूळ किंमतीच्या हवा तितका वर चढेल. पदार्थांच्या या दोन किंमती दोन प्रकारच्या कारणांवर अवलंबून आहेत. बाजारभाव हे क्षणिक व तात्कालिक कारणांवर अवलंबून असतात, तर मूळ किंमत ही कायमच्या कारणांवर अवलंबून असते. तेव्हां प्रथमतः बाजारभाव कोणत्या कारणांवर अवलंबून असतात हें पाहिलें पाहिजे. हीं कारणें ह्मणजे मागणी व पुरवठा होत. तेव्हां या कल्पनांचे शास्त्रीय अर्थ ठरवून त्यांचे नियम काय हें ठरविलें पाहिजे. तें पुढील भागांत केल्यानंतर मग पदार्थांच्या मूळ किंमतीच्या कारणांकडे वळण्यास सोईचें होईल.

# भाग तिसरा.

## बाजार व त्याची उत्क्रांति.

ज्याप्रमाणें विनिमय, अदलाबदल अगर देवघेव हे शब्द उच्चारतांच मोलाची अगर किंमतीची कल्पना मनांत येते, त्याचप्रमाणें बाजाराची कल्पनाही मनांत आल्याखेरीज रहात नाहीं. कारण विनिमय अगर देवघेव ही बाजारांत चालते.

तेव्हां अर्थशास्त्रदृष्ट्या बाजार म्हणजे काय व त्यांत कोणत्या विशेष गुणांचा अंतर्भाव होतो, तसेंच या बाजाराची वाढ औद्योगिक वाढीबरोबर कशी झाली आहे हें या लहानशा भागांत पहावयाचें आहे.

बाजार म्हणजे देवारी–घेवारी, दुकानदार–गिऱ्हाईक अथवा माल विकत घेणारे व माल विकत देणारे यांना एकत्र येण्यास सोईवार ठिकाण होय हें उघड आहे. अगदीं रानटी स्थितीमध्यें ज्या वेळीं मनुष्य असतो, त्या वेळीं देशांत मुळीं संपत्तीच उत्पन्न होत नाहीं. जी कांहीं थोडीबहुत संपत्ति मनुष्य उत्पन्न करतो, ती स्वतःकरितां व स्वतःच्या कुटुंबाकरितां करतो. अशा स्थितींत अदलाबदलीस अवसरच नसतो. म्हणून बाजार ही संस्था उत्पन्न होऊं शकत नाहीं. परंतु समाजामध्यें श्रमविभाग उत्पन्न होऊन संपत्ति वाढूं लागली म्हणजे अदलाबदलीची अवश्यकता उत्पन्न होते व मग बाजाराचीही अवश्यकता भासूं लागते. पूर्वकाळीं बाजाराची जागा व दिवस हीं दोन्ही फिरतीं असत. म्हणजे गांवाच्या एका विवक्षित ठिकाणीं व आठवड्यांतील एखाद्या विवक्षित दिवशीं बाजार भरत असत. फार प्राचीन काळीं दोन खेडेगांवांना सोईच्या अशा ठिकाणीं बहुधा बाजार भरत असावा व तेथें दोन्ही खेड्यांतील लोक आपआपला माल आणीत असावे. विकत घेणारेही ठरलेल्या वेळीं जमत असावे व तेथें संपत्तीची अदलाबदल चालत असावी अशा प्रकारची माहिती निरनिराळ्या देशांतील अगदीं जुन्या काळच्या ग्रामसंस्थांच्या इतिहासकारांनीं नमूद केलेली आहे. परन्तु जसजशी समाजांत संपत्तीची वाढ होत गेली तसतसें या बाजाराचें महत्त्व वाढत गेलें व प्रत्येक गांवांत बाजारपेठ म्हणून एक प्रमुख भाग झाला व त्याला कायमचें स्वरूप आलें.

आतां बाजार या शब्दामध्यें ज्या गोष्टींचा किंवा ज्या विशेष गुणांचा अन्तर्भाव होतो त्यांचा विचार केला पाहिजे. या संज्ञेमधील पहिला गुण म्हणजे त्यांतील व्यवहाराचा खुलेपणा अगर प्रसिद्धपणा होय. बाजारांत देवारी-घेवारी एकत्र जमतात व मालाची अदलाबदल किंमतीवरून उघड रीतीनें चवाठ्यावर होते. येथें छपवाछपवीच्या व्यवहारास अवसर नसतो. या बाजारावर देखरेख करणें हें सरकारचें कर्तव्यकर्म समजलें जात असे व या बाजारांत ठकबाजी न व्हावी, कोणीं कोणास फसवूं नये, सर्व व्यवहार खुल्या तऱ्हेनें व उघड्या तऱ्हेनें व्हावा

अशाबद्दल जास्त काळजी घेतली जात असे.

बाजाराच्या कल्पनेंत अन्तर्भूत होणारा दुसरा गुण ह्मणजे चढाओढीनें ठरलेल्या किंमती होत. येथें निरनिराळ्या ठिकाणांहून दुकानदार व गिऱ्हाईक जमतात. आतां अशा ठिकाणीं दोन्ही वर्गांमध्यें चढाओढ सुरू असते. दुकानदारांना आपला सर्व माल संपून जावा व आपल्याला चांगला फायदा मिळावा अशी इच्छा असते. यामुळें त्यांची आपआपसांत गिऱ्हाईक मिळण्याची चढाओढ चालू असते. तसेंच गिऱ्हाइकांची आपल्याला चांगला माल स्वस्तांत मिळावा म्हणून खटपट चालू असते. यामुळें चढाओढ हा बाजाराचा आत्माच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्मणजे येथें मालाच्या किंमती चढाओढीनें ठरल्या जातात. आज बाजारांत जर मालाला एक दर असला तर पुढल्या बाजाराला तोच राहील असा नियम नाहीं. कारण हे भाव घेणारे व देणारे यांच्या चढाओढीनें ठरतात.

बाजाराचा तिसरा विशेष हा वरच्या गुणाचाच परिणाम होय. बाजारांत अशा प्रकारची चढाओढ असल्यामुळें येथें व्यवहाराची पूर्ण मुभा अगर मोकळीक असते. बाजारांत माल आला ह्मणजे त्याला नेहमींचे नियम किंवा प्रतिबंध लागू नसतात. येथें सर्व व्यवहार खुल्या तत्वावर चालतो. निरनिराळ्या धंद्यांमध्यें पूर्वी युरोपांत वणिक्श्रेणी असत. त्या श्रेणींचे सभासद असल्याखेरीज कोणालाही एखाद्या गांवांत एखादा धंदा करतां येत नसे. मालाच्या किंमती वगैरे ठरविण्याचा अधिकार या श्रेणींना असे. परंतु अशा तऱ्हेचे प्रतिबंध बाजारांत मानले जात नसत. मात्र पूर्वकाळीं बाजारामध्यें एक नियम पाळला जात असे. तो हा कीं, बाजारांत सट्टा करण्याची परवानगी नसे. अर्थात् एकाच बाजारांत माल खरेदी करून तो पुन्हा त्याच बाजारांत जास्त दरानें विकण्याची मनाई असे. गिऱ्हाइकांच्या हिताच्या दृष्टीनें हा नियम केलेला असे हें उघड आहे. कारण अशा मनाईच्या अभावीं हुषार व्यापारी सर्व माल खरेदी करून मग हव्या त्या भावानें गिऱ्हाइकांस विकूं लागण्याचा संभव असतो. याकरितां अशी मनाई ठेवणें अवश्य असे व तिची अंमलबजावणी सरकार करीत असे.

बाजाराच्या संबंधाचा शेवटचा विशेष म्हणजे काळ व ठिकाण यांचा मर्यादितपणा. पूर्वकाळीं बाजार हे विवक्षित स्थळीं व विवक्षित दिवशीं करण्याची वहि-

चाट असे. अमक्या वारीं अमुक ठिकाणीं बाजार भरावयाचा; दुसऱ्या वारीं दुसऱ्या ठिकाणीं भरावयाचा; असे बाजाराचे दिवस व ठिकाणें ठरलेलीं असत. परंतु अर्वाचीन काळीं या बाजाराच्या कल्पनेंत पुष्कळच बदल झाला आहे. वर सांगितलेंच आहे कीं, देशाच्या औद्योगिक वाढीबरोबर बाजाराचा काळ व ठिकाणाच्या मर्यादा प्रथम नाहींशा झाल्या. कारण देवघेवच फार वाढल्यामुळें संपत्ति उत्पन्न करणें हा जसा सतत चालणारा उद्योग झाला तसाच विनिमय हाही एक सतत चालणारा उद्योग झाला. यामुळें सर्व वारीं व सर्व दिवशीं बाजार भरूं लागले. अर्थात् बाजार हा समाजांत एक कायमची संस्था झाली व बाजार फिरते न राहतां प्रत्येक गांवामध्यें बाजारपेठ म्हणून स्वतंत्र भाग झाला. या ठिकाणीं रोजच्या रोज देवघेवी चालूं लागल्या; व घाऊक बाजार व किर-कोळ बाजार असा भेद होऊं लागला. घाऊक बाजार हें संपत्तीचे कारखानदार व घाऊक व्यापारी यांच्या देवघेवीचें ठिकाण झालें व किरकोळ बाजार हें संपत्तीचे उपभोक्ते गिऱ्हाईक व किरकोळ व्यापारी यांच्या देवघेवीचें ठिकाण झालें. घाऊक बाजारामध्यें आतां सर्व लोक व्यवहारज्ञ व श्रीमंत असल्यामुळें सट्टयाच्या मनाईचा नियम नाहींसा झाला व अर्वाचीन काळीं पुष्कळ व्यापारांना सट्टयाचें स्वरूप आलें आहे. उदाहरणार्थ, हल्लींच्या काळीं कापूस, गहूं, वगैरे सर्वसाधारण मागणीच्या जिनसांचा व्यापार जुगारासारखाच कांहीं अंशीं झाला आहे. शेवटीं अर्वाचीन काळच्या सुधारलेल्या दळणवळणाच्या साधनांनीं व तारायंत्रें, पोस्ट ऑफिसें वगैरे लवकर बातमी नेणाऱ्या साधनांनीं देशांतील सर्व व्यापाराचें एकीकरण झालें आहे. इतकेंच नाहीं तर हल्लींच्या काळीं सर्व मनुष्यवस्तीचें जग अथवा सर्व सुधारलेले देश या सर्वांचा एक घाऊक बाजारच बनला आहे. यालाच अर्वाचीन अर्थशास्त्रांत जगाचा बाजार म्हणतात. व या बाजाराचे जिन्नस म्हणजे सर्व देशांत मागणी असणारे सर्वसाधारण पदार्थ; जसें गहूं, कापूस, रॉकेल, कोळसा, कोखंड, रेशीम, ताग, गळिताचीं धान्यें, कातडीं वगैरे. हल्लींच्या साधनांनीं सर्व जग एकरूप झाल्यामुळें पदार्थांच्या किंमती—विशेषतः वर दिलेल्या पदार्थांच्या किंमती—एकरूप होण्याचा कल असतो. अमेरिकेंत कापूस कमी पिकणार अशीं चिन्हें दिसूं लागल्याबरोबर हिंदुस्थानांत कापूस कितीही पिकलेला असो; परन्तु लागलीच या कापसाच्या किंमती भराभर वाढ

तात. गेल्या सालीं हिंदुस्थानांत दर वर्षापेक्षां कापसाचें पीक उत्तम असतांना कापसाला नेहमींपेक्षां जास्त भाव आला. कारण, अमेरिकेमध्यें कापसाचें पीक फार कमी आलें होतें. याप्रमाणेंच इतर पदार्थांचीही स्थिति आहे. जगाच्या कोणत्याही भागामध्यें संपत्तीच्या उपयुक्ततेमध्यें चलबिचल झाली कीं, त्याचा परिणाम जगांतील इतर देशांतील भावावर झाल्याखेरीज रहात नाहीं. कॅनडा-मध्यें किंवा रशियामध्यें धान्य कमी पिकलें तर त्याचा परिणाम हिंदुस्थानावर होतो व येथील धान्याचे भाव वाढूं लागतात. सारांश, व्यापाराच्या बाबतींत हल्लीं सर्व जग एक झालें आहे. निरनिराळ्या देशांचें या बाबतींतील पृथक्त्व नाहींसें झालें आहे. याचा परिणाम पदार्थांच्या किंमतींवर कसा काय होतो, हें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

# भाग चवथा.

## मागणी व पुरवठा यांचे नियम.

मागील भागांत ‘ बाजार ’ या शब्दाचा शास्त्रीय अर्थ व त्यामध्यें अन्तर्भूत होणाऱ्या कल्पना यांचा विचार केला. आतां बाजारभाव अगर पदार्थांच्या बाजारांतील किंमती कोणत्या तत्त्वावर ठरल्या जातात हें पहावयाचें आहे. सामान्य व्यवहारांत बाजारभाव अगर किंमती या मागणी व पुरवठा यांवर अवलंबून आहेत असें ह्मणण्याचा परिपाठ आहे व अभिमत अर्थशास्त्रकारांनीं याच सामान्य समजाला थोडेंसें शास्त्रीय स्वरूप देऊन मागणी व पुरवठा हीं किंमतीचीं तत्त्वें आहेत अगर किंमत हें मागणी व पुरवठा या दोन कारणांचें कार्य आहे असें प्रतिपादन केलें आहे; परंतु, पुढील ग्रंथकारांनीं या तत्त्वाचा जेव्हां जास्त बारकाईनें विचार केला, तेव्हां या प्रतिपादनांतील एकतर्फीपणा त्यांच्या ध्यानांत येऊन त्यांनीं मागणी, पुरवठा व किंमत या तीन गोष्टींचा परस्पर संबंध जास्त साकल्येंकरून सांगितला आहे. तेव्हां पुरवठा व मागणी यांचें यथार्थ स्वरूप व त्यांचे नियम प्रथमतः ठरविले पाहिजेत. सकृद्दर्शनीं मागणी व पुरवठा हे शब्द

विजातीय आहेत व यामुळें त्यांचें प्रमाण मांडणें अशक्य आहे असें वाटतें. कारण पुरवठा हा शब्द मालाला लावितात तर मागणी हा शब्द गरजू माणसाच्या मानसिक प्रवृत्तीला लावितात. शिवाय मागणी या शब्दांतही संदिग्धपणा आहे. मागणी म्हणजे नुसती वासना नव्हे. कारण अशी वासना हव्या त्या माणसास असेल. परंतु किंमतीशीं ज्या मागणीचा संबंध आहे अशी मागणी म्हणजे निवळ वासना नव्हे. खिशांत एक पैही नाहीं असा माणूस बाजारांत गेला व त्याला पुष्कळ वस्तू विकत घेण्याची इच्छा अगर वासना झाली; पण ही निवळ इच्छा म्हणजे पदार्थांची मागणी नव्हे. वासना ही मागणी या संज्ञेप्रत पावण्यास ती वासना परिणामकारक पाहिजे, म्हणजे वासनेबरहुकूम वस्तु विकत घेण्याचें पैशाचें सामर्थ्य मनुष्यांत पाहिजे, तर ती मागणी म्हणतां येईल; व अशा परिणामकारी मागणीचा किंमतीवर परिणाम होईल.

अर्वाचीन अर्थशास्त्रज्ञ पुरवठा व मागणी हे शब्द खालील विशेष अर्थानें वापरतात. एका विवक्षित किंमतीला मागितलेल्या मालाचें परिमाण म्हणजे मागणी होय व एका विवक्षित किंमतीला विकावयास आलेल्या मालाचें परिमाण म्हणजे पुरवठा होय. देशांतील सर्व माल म्हणजे पुरवठा नव्हे; तर एका विवक्षित किंमतीला विकावयास काढलेला माल म्हणजे पुरवठा होय. तसेंच देशांतील सर्व खर्चिक लोक यांची वासना म्हणजे मागणी नव्हे; तर एका विवक्षित किंमतीला ज्याचा खप होईल असा माल म्हणजे मागणी होय. आतां मागणी व पुरवठा यांचा खालील नियम ठरतो.

" जसजशी मालाची किंमत कमी होते ( दुसऱ्या गोष्टी तशाच आहेत असें गृहीत धरून ) तसतसें मागितलेल्या मालाचें परिमाण वाढतें. उलटपक्षीं जसजशी मालाची किंमत वाढते तसतसें मागितलेल्या मालाचें परिमाण कमी होतें; अर्थात् किंमतीच्या कमीअधिक प्रमाणावर मागणीचा जास्तकमीपणा अवलंबून आहे. म्हणजे किंमत व मागणी हीं व्यस्त प्रमाणांत आहेत."

या नियमाचीं उदाहरणें हवीं तितकीं आहेत. एखाद्या मालावर सरकारनें जास्त कर बसविला म्हणजे त्या मालाचा खप कमी होतो. कारण कराच्या योगानें त्या मालाची किंमत वाढते व वरील नियमाप्रमाणें किंमत वाढली कीं; मागणी कमी होते. उलटपक्षीं मालावरील कर कमी केल्यानें मालाची किंमत

कमी झाली कीं, मालाचा खप वाढतो. यामुळें कधींकधीं एखाद्या मालावरील कर कमी केल्यास सरकारचें कराचें उत्पन्न कमी न होतां तें वाढतच जातें. याचें हिंदुस्थानांतील ताजें उदाहरण म्हणजे मिठावरील कर होय. पूर्वी हा कर २॥ रुपये मण इतका होता, तोच आतां १ रुपया मण इतका आहे. यामुळें मिठाचा खप पुष्कळ पटींनीं वाढला आहे व सरकारचें उत्पन्नही शेवटीं वाढेल यांत शंका नाहीं.

पदार्थांच्या किंमती वाढल्या म्हणजे त्यांची मागणी कमी होते; तसेंच मालाच्या किंमती कमी झाल्या म्हणजे मागणी वाढते, ही गोष्ट नेहमींच्या व्यवहारांत दृष्टोत्पत्तीस येते. बाजारांत लिलांवानें मालाच्या किंमती ठरविण्याची जी रीत प्रचलित आहे त्यावरून वरच्या विधानाची सत्यता तेव्हांच ध्यानांत येईल. लिलांवदारानें एखाद्या वस्तूचा लिलांव पुकारला म्हणजे तो वस्तूच्या अगदीं कमी किंमतीपासून प्रारंभ करतो. त्या किंमतीला किती तरी घेवारी ती वस्तु विकत घेण्यास तयार असतात. तेव्हां दुसरा मनुष्य किंमत चढवितो. ही किंमत चढविली म्हणजे पहिल्यापैकीं कांहीं लोक गळतात व राहिलेल्या लोकांत चढाओढ सुरू होते. मग त्यांमधील मनुष्य त्या वस्तूची आणखी किंमत वाढवितो. म्हणजे घेवाऱ्यांपैकीं लोक आणखी कमी होतात. असा क्रम एका वस्तुला एक घेवारी राहीतोंपर्यंत चालतो. या उदाहरणावरून किंमत जसजशी जास्त होते तसतशी मागणी कमी होते हें स्पष्टपणें दिसून येतें, व असें होण्याचें कारणही उघड आहे. एखादी वस्तु महाग झाली म्हणजे मनुष्याला पैसे जास्त द्यावे लागतात; परंतु मनुष्याजवळ पैसे नियमित असले म्हणजे त्याला कोठें तरी काटकसर करावी लागते. म्हणजे तो महाग माल घेण्याचें पुढें ढकलतो.

किंमतींच्या वाढीबरोबर मालाच्या खपांत चलबिचल होण्याची प्रवृत्ति निरनिराळ्या मालाच्या प्रकारावर अवलंबून आहे. मनुष्याच्या आवश्यकाच्या खपामध्यें फारशी चलबिचल होऊं शकत नाहीं. धान्य, महाग असो किंवा स्वस्त असो, तें शरीरपोषणास अवश्यक आहे तितकें मनुष्य घेतोच. धान्य महाग झालें तर तो चैनीच्या कांहीं पदार्थांना फांटा देईल. यापेक्षांही धान्य महाग होत गेलें तर तो सोईच्या गोष्टींस फांटा देईल. यावरून चैनीच्या मालाच्या खपांत किंमतीच्या फरकानें फारच लवकर चलबिचल होते; सोईच्या मालाच्या खपांत त्यापेक्षां

कमी प्रमाणांत होते व अवश्यक मालांत तर खपाची चलबिचल फारच कमी प्रमाणांत होते.

आतां पुरवठ्याच्या नियमाकडे वळूं. हा नियम असा आहे—

"असजसी मालाची किंमत वाढते ( दुसऱ्या गोष्टी तशाच आहेत असें धरून ), तसतसा मालाचा विक्रीस काढलेला पुरवठा वाढतो; उलटपक्षीं जसजशी किंमत कमी होते तसतसा मालाचा विक्रीस काढलेला पुरवठा कमी होतो."

या नियमामध्यें मालाच्या किंमतीच्या वाढीचा मालाच्या उत्पत्तीवर काय परिणाम होतो याचा विचार केलेला नाहीं. तो विचार पुढील भागांत करूं.

या नियमाचीं उदाहरणेंही हवीं तितकीं आहेत. कांहीं कारणांनीं मालाच्या किंमती कमी झाल्या म्हणजे व्यापारी माल विकीतनासे होतात. म्हणजे विक्रीस पुढें आलेला पुरवठा कमी होतो. पुढें किंमत वाढेल या आशेनें किंवा दुसऱ्या एखाद्या बाजारांत पाठविण्याच्या आशेनें व्यापारी माल मागें घेतात. तसेंच मालाची किंमत वाढली म्हणजे पुष्कळ देवारी माल विकण्यास तयार होतात, कारण त्यांना प्रत्यक्ष जास्त फायदा मिळतो.

आतां मागणी व पुरवठा यांचे वेगवेगळे नियम एकत्र केले म्हणजे मागणी व पुरवठ्याचें खालील समीकरण ठरतें. "कोणत्याही बाजारांत मालाची किंमत अशी ठरते कीं, त्या किंमतीला मागितलेल्या मालाचें परिमाण त्या किंमतीला विकावयास काढलेल्या मालाच्या परिमाणाबरोबर होईल. व हें समीकरण घडवून आणणारी शक्ति म्हणजे चढाओढ होय." म्हणजे बाजारांत देवारी व घेवारी यांच्यामध्यें चढाओढ चालते. ही चढाओढ एका किंमतीला मागितलेला माल व विकावयास काढलेला माल यांची बरोबरी होईपर्यंत चालते. मागणी व पुरवठा यांचें हें समीकरण मागणी व पुरवठा यांच्या पृथक् नियमांवरून झालेलें आहे. या सर्वांमध्यें एक सामान्य तत्त्व गृहीत धरलें आहे, तें हें कीं, किंमतीच्या प्रत्येक चलबिचलीबरोबर मागणी व पुरवठा यांत फरक होत जातो.

येथपर्यंत मागणी व पुरवठा यांचा किंमतीशीं कसा संबंध आहे हें दाखविलें. त्यावरून मागणी व पुरवठा हीं किंमतीवर अवलंबून आहेत असें दिसून येईल. या विवेचनांत मागणी व पुरवठा हीं किंमतीचीं कार्यें आहेत असें दिसतें. परंतु मागणी व पुरवठा आणि किंमती यांमध्यें एकेरी कार्यकारणसंबंध नाहीं. तर

हा संबंध दुहेरी आहे. सामान्य लोकांच्या कल्पनेप्रमाणें तर मागणी व पुरवठा हीं किंमतीचीं कारणें आहेत व किंमत हें वरील कारणांचें कार्य आहे. परंतु वास्तविक प्रकार दुहेरी आहे. म्हणजे मागणी व पुरवठा यांवर किंमत अवलंबून आहे. व किंमतीवर मागणी व पुरवठा हीं अवलंबून आहेत. यांपैकीं दुसऱ्याचे नियम येथपर्यंत सांगितले. परंतु वरच्याप्रमाणेंच पहिल्याचे नियम ठरतात. म्हणजे मागणीची वाढ झाली म्हणजे किंमतीची वाढ होते. मागणीची वाढ म्हणजे त्याच किंमतीला मागितलेल्या मालाच्या परिमाणांतील वाढ; पुरवठ्याची वाढ म्हणजे ही त्याच किंमतीला विकावयास काढलेल्या परिमाणांतील वाढ होय. यासंबंधींचे नियम खालीलप्रमाणें सांगतां येतील.

१ जसजशी मालाची मागणी वाढते ( पुरवठा तितकाच आहे असें धरून ) तसतशी मालाची किंमत वाढते; उलटपक्षीं जसजशी मालाची मागणी कमी होते तसतशी मालाची किंमत उतरते.

२ जसजसा मालाचा पुरवठा वाढतो ( मागणी तितकीच आहे असें धरून ) तसतशी किंमत कमी होते; उलटपक्षीं जसजसा पुरवठा कमी होतो तसतशी मालाची किंमत वाढते.

किंमतीच्या वाढीचीं कारणें जर एकसमयावच्छेदेंकरून वाढलीं तर किंमतीची वाढ फारच झपाट्यानें व दुहेरी होईल हें उघड आहे. अर्थात् मालाची मागणी वाढत असतांना जर मालाचा पुरवठा कमी झाला तर मालाच्या किंमती दुप्पट वाढतील. एक मागणी वाढली म्हणून किंमत वाढेल, दुसरें पुरवठा कमी झाला म्हणून किंमत वाढेल; अशा तऱ्हेनें किंमतींत दुहेरी वाढ होईल.

आतां मागणीच्या वाढीचीं कारणें अनेक असणार व त्यांचा प्रत्यक्ष संबंध मनुष्याच्या राहणीशीं व त्याच्या वासनांच्या वाढीशीं आहे. शिक्षणानें वासनावाढ झाली असेल व म्हणून खर्च करण्याची प्रवृत्ति देशामध्यें वाढत असेल. एखाद्या वर्गाचें उत्पन्न वाढलें असेल व त्यामुळें खर्च करण्याची प्रवृत्ति वाढली असेल; किंवा देशामधील लोकांमध्यें नवीन फॅशन शिरली असेल; किंवा पूर्वीच्या चालीरीति बदलून नव्या येत असतील. किंवा उलटपक्षीं लोकांचें उत्पन्न कमी झालें असेल व त्यामुळें मागणी कमी होत असेल. जो देश शेतकीवर सर्वस्वी अवलंबून आहे त्या देशामध्यें या कारणांनीं मागणीमध्यें चलविचल फार होते. याशें

उत्कृष्ट उदाहरण हिंदुस्थानचेंच आहे. हिंदुस्थानांत बहुजनसमाजाचें उत्पन्न शेतापासून येतें. यामुळें या सर्व वर्गांची मागणी या उत्पन्नावर अवलंबून असते. ह्मणून पावसानें दगा दिला कीं, शेतकऱ्यांना पुरेसें अन्न मिळावयाचीच पंचाईत होते. तेव्हां कापडचोपडादि आयुष्याच्या सोई ते काय घेणार? यामुळें कापडाच्या मागणींत एकदम कमीपणा होतो व मालाच्या किंमती फार उतरूं नयेत ह्मणून कारखानदार पुरवठा कमी करूं लागतात; ह्मणजे आपले कारखाने कांहीं काळपर्यंत अजीबाद बंद करतात किंवा काम कमी तास करूं लागतात.

पुरवठ्याची वाढ होण्याचीं कारणें ह्मणजे संपत्तीच्या उत्पत्तीच्या कारणांतील वाढ होय व त्याचा विचार मागील एका भागांत केलाच आहे. तेव्हां त्याची येथें पुनरावृत्ति करण्याचें प्रयोजन नाहीं.

येथपर्यंत मालाचे बाजारभाव कोणत्या सामान्य तत्वावर ठरविले जातात याचा विचार झाला. हे बाजारभाव वारंवार बदलणारे असतात. अर्थात् ते चंचल असतात व ते मागणी व पुरवठा यांच्या चलबिचलीवर अवलंबून असतात. परंतु किंमतींतील ही चलबिचल कांहीं एका विशिष्ट किंमतीसभोंवतीं फिरत असते. त्याला मालाची मूळ किंमत ह्मणतात. केव्हां केव्हां बाजारभाव या मूळ किंमतीच्या जरा खालीं जातील तर केव्हां केव्हां या मूळ किंमतीच्या वर जातील. परंतु बाजारभाव मूळ किंमतीच्या ठिकाणीं फारच क्वचित् असूं शकतो. बाजारभाव व मूळ किंमत यांना समुद्राच्या पाण्याच्या सपाटीचें व लाटांचें साम्य चांगलें शोभतें. वाऱ्यानें समुद्रावर सारख्या लाटा उसळत असतात. यामुळें पाण्याच्या सपाटीच्या खालीं एक लाट जाते तर एक लाट वर जाते. ह्मणजे समुद्राचा पृष्ठभाग नेहमीं वर खालीं होत असतो. परंतु हें वर खालीं होणें हें लाटा व त्यांचें कारण वारा यांवर अवलंबून आहे; तर समुद्राची सपाटी ही पाण्याचा सामान्य गुण जो स्थितिस्थापकता त्यावर अवलंबून आहे, त्याचप्रमाणें मालाचे बाजारभाव मागणी व पुरवठा यांवर अवलंबून आहेत. परंतु मूळ किंमत ही जास्त कायमच्या कारणांवर म्हणजे माल उत्पन्न करण्यास लागणाऱ्या खर्चावर अवलंबून आहे. तेव्हां आतां पदार्थांच्या मूळ किंमती कशावर अवलंबून आहेत हें पाहिलें पाहिजे. त्याचा विचार पुढील भागावर टाकणें भाग आहे.

---

# भाग पांचवा.

## मूळकिंमतीची मीमांसा.

मागील भागांत बाजारकिंमत व मूळकिंमत यांमधला फरक सांगितला. ज्या किंमतीसभोंवतीं बाजारभाव अगर बाजारकिंमत यांचें आंदोलन चालतें ती मूळकिंमत होय. बाजारकिंमत ही रोज रोज—नव्हे घटकोघटकीं—बदलणारी किंमत होय, तर मूळकिंमत ही त्या मानानें स्थिर असलेली किंमत होय. बाजारकिंमत ही तात्पुरत्या व चलविचल होणाऱ्या कारणांवर अवलंबून असते. तीं कारणें ह्मणजे मागणी व पुरवठा हीं होत. त्याचा मागल्या भागांत विचार केला आहे. या भागांत मूळकिंमतीच्या कारणांचा विचार करावयाचा आहे. परंतु, मूळकिंमत ही कशावर अवलंबून आहे हें शोधून काढण्याकरितां संपत्तिरूप सर्व मालाचें त्रिविध वर्गीकरण करणें अवश्यक आहे. कारण या तीन वर्गांच्या मूळकिंमतीसंबंधीं स्थिति भिन्न भिन्न आहे.

ज्याला अर्थशास्त्रांत संपत्ति म्हणतात अशा वस्तूंचे, मालाचे अगर पदार्थांचे तीन वर्ग पडतात. निरानिराळ्या कारणांनीं ज्या वस्तूंची संख्या मर्यादित आहे, इतकेंच नाहीं, परंतु ही संख्या मानवी श्रमांनीं वाढविणें अशक्य आहे अशा वस्तूंचा पहिला वर्ग होय. उदाहरणार्थ, एखाद्या मयत चित्रकाराच्या हातचीं चित्रें किंवा मयत मूर्तिकाराच्या हातच्या मूर्ति; प्रसिद्ध पुरुषांच्या हातचीं पत्रें, कवीच्या हातांनीं लिहिलेल्या कवितेची मूळ प्रत, जुन्या काळचीं नाणीं, ताम्रपट, सनदा वगैरे; सारांश, पुराणवस्तुसंग्रहांतील बहुतेक वस्तू याच सदराखालीं येतात. कारण या वस्तू नवीन निर्माण करतां येणें मुळीं अशक्य आहे; अशोकराजाचे ताम्रपट अगर लेख आतां नवीन होणें शक्य नाहीं; आतांपर्यंत सांपडले नाहींत असे लेख अगर ताम्रपट आणखी सांपडूं शकतील हें खरें; तरी पण एखाद्या राजाचे सर्व शिलालेख व ताम्रपट सांपडले ह्मणजे झालें. मग त्यापुढें त्यांची संख्या वाढणें शक्य नाहीं; तोच प्रकार प्रसिद्ध पुरुषांच्या स्मारक वस्तूंचाही आहे. त्यासुद्धां मर्यादित असणार. ज्या देशांत या वस्तूंना मागणी आहे, जेथें पुराणाभिमान असून लोकांमध्यें अभिरुचि उत्पन्न झाली आहे, जेथें पुराण-

संग्रह करण्याची प्रवृत्ति उत्पन्न झालेली आहे व जेथें लोकांची सांपत्तिक स्थिति सुधारत आहे, अशा देशांत अशा पुराणवस्तूंना मागणी पुष्कळ असते व या वस्तूंकरितां लोक पुष्कळ पैसे खर्च करण्यास तयार असतात. तेथें या वस्तू संपत्ति-पदाप्रत पावतात व त्यांची बाजारांत देवघेव होते. तेव्हां अशा प्रकारचो मर्यादित पदार्थांचा एक स्वतंत्र वर्ग बनतो. एकंदर संपत्तीच्या मानानें हा वर्ग अगदीं लहान आहे हें उघड आहे.

संपत्तिरूप वस्तूंचा दुसरा वर्ग म्हणजे कृषिज व खनिज पदार्थ होत. फार वर्षें वसाहत होऊन ज्या देशांमध्यें औद्योगिक प्रगति झालेली आहे अशा देशांतील कृषिज म्हणजे धान्यादि पदार्थ व खनिज पदार्थ म्हणजे धातु, कोळसा, मीठ वगैरे पदार्थ यांचा पुरवठा वाढवितां आला तरी या ठिकाणीं उतरत्या पैदाशीचा नियम लागू झालेला असतो. अर्थात् या पदार्थांचा अधिक पुरवठा करण्यास पूर्वीच्या प्रमाणापेक्षां जास्त जास्त खर्च येत असतो. म्हणजे पदार्थांच्या पहिल्या एका १०० संख्येला जितका खर्च लागला त्यापेक्षां जास्त खर्च तितका आणखी पदार्थ काढण्यास लागतो. वाढत्या पुरवठ्याकरितां ज्या पदार्थांना वाढत्या प्रमाणांत खर्च येतो अशा प्रकारचे सर्व पदार्थ या वर्गांत येतात.

संपत्तिरूप वस्तूंचा तिसरा वर्ग कारखान्यांतल्या पदार्थांचा होय. संपत्तिरूप वस्तूंमध्यें हाच सर्वांत मोठा वर्ग आहे. यामध्यें मालाचा पुरवठा हवा तितका वाढवितां येतो. हा वाढता पुरवठा करण्यास पूर्वीइतकाच खर्च होतो, किंवा उलट खर्च कमी कमी येत जातो. या वर्गामध्यें अर्वाचीन काळच्या हजारों वस्तूंचा समावेश होतो. तेव्हां संपत्तिरूप वस्तूंचे असे हे तीन वर्ग झाले—

१ ज्यांचा पुरवठा नियतपणें मर्यादित आहे, अशा वस्तूंचा वर्ग. यांना अवर्धनीय पदार्थ असें म्हणतां येईल.

२ ज्यांचा पुरवठा वाढणें शक्य आहे, परंतु तो वाढण्यास ज्यांचा खर्च भूमितिश्रेढीनें वाढत जातो, अशा वस्तु. यांना दुर्वर्धनीय पदार्थ म्हणतां येईल.

३ ज्यांचा पुरवठा तितक्याच खर्चानें किंवा कमी खर्चानें हवा तितका वाढवितां येतो अशा वस्तु. यांना सुवर्धनीय पदार्थ म्हणतां येईल.

हे तीन वर्ग करण्याचें कारण, या तीन वर्गांमधल्या वस्तूंच्या मूळ किंमतीची मीमांसा भिन्नभिन्न आहे हें होय.

वस्तूची मूळकिंमत ती वस्तु उत्पन्न करावयास लागलेल्या खर्चावर अवलंबून आहे हें उघड आहे. परंतु पहिल्या वर्गांतील वस्तूंमध्यें हा प्रश्न उद्भवत नाहीं. कारण या वर्गांतील वस्तु उत्पन्न झाल्या त्या वेळीं त्या संपत्तीच्या बुद्धीनें उत्पन्न झालेल्याच नाहींत. कांहीं ठिकाणीं असा उद्देश असेल; परंतु ही गोष्ट अपवादादाखलच आहे. प्रसिद्ध ग्रंथकारांच्या हातचे लेख किंवा पत्रें यांची मूळ किंमत काय आहे? ज्या काळीं तीं पत्रें लिहिलीं गेलीं त्या काळीं तो पुरा ग्रंथकारही झाली नसेल. परंतु त्यानें नांव मिळविल्यावर त्याच्या स्मारक गोष्टीला किंवा वस्तूला पुढें किंमत आली. नेपोलियन किंवा शेक्स्पिअर यांच्यासंबंधाच्या एखाद्या क्षुल्लक वस्तूला किंवा स्मारकाला युरोपमध्यें हल्लीं विलक्षण किंमत येते; याचें कारण या दोन पुरुषांची निरनिराळ्या बाबतींतील विलक्षण कीर्ति होय. तेव्हां या वर्गांतील वस्तूंसंबंधानें मूळकिंमत व बाजारकिंमत हा फारसा भेद रहात नाहीं. कारण या पदार्थांची मूळकिंमत कांहींच नसते. त्याला आगंतुक कारणांनीं किंमत येते; व तें कारण म्हणजे लोकांची अभिरुचि व वासना. समाजाच्या रानटी स्थितींत ज्या वस्तु बिनमोल असतील तर अभिरुचि उत्पन्न झालेल्या व संपन्न समाजांत या वस्तूंना हजारों रुपयांची किंमत पडत असेल. या वस्तु कोठें केराकोपऱ्याच्या ठिकाणीं निरुपयोगी वस्तु म्हणून पडल्या असतील, तर कोठें या वस्तूंच्या शोधार्थ एजंट फिरत असतील. तेव्हां या वस्तूंच्या किंमती बाजारभावाप्रमाणें; मागणी व पुरवठा यांवरच सर्वस्वी अवलंबून असतात. मात्र येथें पुरवठा, कोणत्याही कारणांनीं वाढविणें शक्य नसतें. तेव्हां पुरवठ्याची संख्या येथें ठराविक असते व किंमत मागणी करणारांच्या संख्येवर असते. ज्याप्रमाणें लिलांवांतील मालाच्या किंमती मागणारांच्या चढाओढीनें ठरतात त्याप्रमाणेंच या मर्यादित वस्तूंच्या किंमती ठरतात. अर्थात मागणारे वस्तूंच्या संख्येइतके होईपर्यंत त्यांच्यामध्यें चढाओढ चालते. बरोबरी ज्या किंमतीनें होईल ती किंमत त्या पदार्थांची होते. समजा, रविवर्म्याच्या प्रसिद्ध चित्रांपैकीं शकुंतलेच्या जन्माची मूळ तसबीर–रविवर्म्याच्या हातची–बाजारांत विकावयास आली आहे. ही तसबीर कोणास नको आहे? तिची किंमत थोडी आहे असें कळल्यास तेथें पुष्कळ लोक जमतील. परंतु तसबीर एकच आहे, त्या अर्थी ती कोणाला तरी एकालाच मिळणार व असें होण्याकरितां या घेणाऱ्यांमध्यें चढाओढ सुरू

होईल व किंमतीचे लिलांव सुरू होतील. एक मनुष्य किंमत जास्त करील. परंतु मागील भागांत सांगितल्याप्रमाणें किंमत वाढली म्हणजे थोडी मागणी कमी होते. असें होतां होतां दोन मागणीदार राहतील तरी सुद्धां या दोघांमध्यें चढाओढ सुरू होईल व शेवटीं **पुरुषोत्तम मावजी**सारखा पुराणवस्तुसंग्रहेच्छु गृहस्थ त्याची आणखीही किंमत वाढवील व दुसऱ्या माणसाला इतकी किंमत वाढविणें शक्य नसेल किंवा त्याला त्या चित्राची इतकी अभिरुचि नसेल, म्हणून तो यापुढें किंमतच वाढविणार नाहीं. म्हणून अशी तसबीर **पुरुषोत्तम मावजी**सारख्या लक्ष्मीपुत्राच्या हातीं पडेल. आतां अशा वस्तूंबद्दल देशांत मागणी उत्पन्न होणें हें हजारों गोष्टींवर अवलंबून आहे. या वर्गांतील संपत्तीच्या वस्तूंनीं भागविली जाणारी वासना ही अगदीं कृत्रिम वासना आहे व ती देशांतील सुधारणेचा परिणाम होय.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, संपत्तीच्या या पहिल्या वर्गांमध्यें मूळकिंमत व बाजारकिंमत यांमध्यें भेद नाहीं. परंतु पुढील संपत्तीच्या दोन वर्गांमध्यें मूळकिंमत व बाजारकिंमत यांमध्यें मोठा भेद आहे व ही मूळकिंमत कशावर अवलंबून आहे हें आतां पहावयाचें आहे.

मालाची मूळकिंमत ही माल उत्पादन करण्यास लागणाऱ्या खर्चावर अवलंबून असते. तेव्हां या खर्चामध्यें कशाकशाचा अंतर्भाव होतो हें प्रथमतः पाहिलें पाहिजे. संपत्तीच्या उत्पादनास चार कारणें लागतात असें या ग्रंथाच्या दुसऱ्या पुस्तकांत दाखविलें आहे. तेव्हां संपत्ति-उत्पादनाच्या या साधनांचा मोबदला संपत्तीच्या किंमतीमधून आला पाहिजे हें उघड आहे. संपत्ति उत्पन्न करण्यास समाजाच्या बाल्यावस्थेंत श्रमच मुख्यतः कारणीभूत होतात व जें थोडें भांडवल लागतें तो श्रमाचाच परिणाम होय. तेव्हां भांडवल म्हणजे सांठवलेले श्रम होत. सृष्टिशक्ति तर मोफतच मिळते. तेव्हां अशा स्थितींत पदार्थांची मूळकिंमत श्रमाच्या परिमाणावर अवलंबून असते. श्रमाबद्दल मोबदला म्हणजे मजुरी होय. तेव्हां पदार्थांची मूळकिंमत ही मुख्यतः मजुरीवर अवलंबून आहे. कारण उत्पादनाचा मुख्य खर्च म्हणजे मजुरीखर्च होय. वरील प्रकारचें विवेचन **रिकार्डो**नें प्रथमतः केलें. त्याच्या मताप्रमाणें पदार्थांच्या मूळकिंमती या मजुरीखर्चावर अवलंबून आहेत. देशांतील मजुरांची मजुरी कमी झाली तर मूळकिंमत कमी होईल.

देशांतील मजुरांची मजुरी वाढली तर, मूळकिंमत वाढेल. रिकार्डोच्या या विवेचनापासून सामाजिक पंथ उद्भवला व त्यानें सर्व संपत्ति मजूरवर्गाची आहे, भांडवलवाले श्रम न करतां मजुरांच्या श्रमाचा फायदा मात्र लाटतात असें मत प्रतिपादन केलें. परंतु संपत्तीच्या उत्पादनाची ही कल्पना संकुचित आहे. ती समाजाच्या अत्यंत बाल्यावस्थेवरून काढलेली असल्यामुळें अर्वाचीन काळच्या संपत्तीच्या उत्पादनाला बरोबर लागू पडत नाहीं. अर्वाचीन काळीं संपत्तीच्या चारी कारणांचा कार्यभाग महत्त्वाचा आहे; विशेषतः भांडवलवाला व कारखानदार यांचा संपत्तीच्या उत्पादनांतील कार्यभाग पहिल्या दोहोंपेक्षां जास्त महत्त्वाचा आहे. म्हणून संपत्तीच्या उत्पादनाच्या खर्चात या चारी कारणांचा विचार झाला पाहिजे. अर्थात् संपत्तीच्या उत्पादनखर्चाचे चार घटकावयव होतात. कोणतीही संपत्ति उत्पन्न करावयाची असल्यास प्रथमतः कचा माल लागतो. अर्वाचीन काळीं असा माल बाजारांत विकत घ्यावा लागतो. तेव्हां कच्चा मालाचा खर्च हा उत्पादनाच्या खर्चातला पहिला घटकावयव होय. दुसरा घटकावयव मजुरास द्याव्या लागणाऱ्या मजुरीचा होय; तिसरा घटकावयव भांडवलाच्या व्याजाचा होय व चवथा कारखानदारांच्या नफ्याचा होय. तेव्हां कोणत्याही पदार्थाच्या उत्पादनाच्या खर्चात हे चारी घटकावयव असले पाहिजेत हें उघड आहे. कारण या चारी कारणांचें एकीकरण झालें नाहीं तर संपत्ति उत्पन्न होणार नाहीं व प्रत्येक कारणाला मोबदला मिळाल्याखेरीज त्यांचें एकीकरण होणार नाहीं. देशांतील एकंदर संपत्तीचे चार भाग होतात असें तिसऱ्या पुस्तकांत दाखविलें. कारण, संपत्तीचीं चारच कारणें आहेत व त्या कारणांइतकेच संपत्तीचे वांटे झाले पाहिजेत हें उघड आहे. तीच गोष्ट प्रत्येक वस्तूलाही लागू आहे. म्हणजे त्या वस्तूंच्या मूळकिंमतींतही हे चारी भाग असले पाहिजेत. आतां प्रत्येक देशांत एक सामान्य मजुरीचा दर असतो. तसेंच व्याजाचा व नफ्याचाही एक सामान्य दर असतो. यामुळें सामान्य दराप्रमाणें संपत्ति उत्पन्न करणारांना मोबदला मिळाल्याखेरीज ते संपत्ति उत्पन्नच करणार नाहींत. म्हणजे संपत्तीची मूळकिंमत ही वस्तूची स्वाभाविक किंमत झाली. इतकी किंमत वस्तूला पडलीच पाहिजे. कारण वस्तूची किंमत याखालीं गेल्यास वस्तू निर्माण होण्याचेंच बंद होईल. आतां या किंमतीसंबंधानें वर निर्दिष्ट केले-

त्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांमध्यें जो मोठा फरक आहे तो कसा पडतो हें पाहूं.

संपत्तीचा दुसरा वर्ग कृषिज व खनिज संपत्तीचा होय, हें वर सांगितलेंच आहे. आतां या वर्गांतील पदार्थांना समाजाच्या सुधारलेल्या अवस्थेंत उतरत्या पैदाशी-चा नियम लागू असतो, असें दुसऱ्या पुस्तकांत दाखविलें आहे. म्हणजे जमिनी-पासून किंवा खाणींतून संपत्ति उत्पन्न करण्यास जास्त जास्त खर्च लागत जातो. अर्थात् देशांत जमीन निरनिराळ्या सुपीकतेची असते. यामुळें एक माल उत्पन्न करण्यास निरनिराळा खर्च पडतो. हा उत्पन्नाचा खर्च जरी निरनिराळा असला तरी एकाच गुणाच्या मालाची किंमत बाजारांत सारखी असते; यामुळें जास्त सुपीक जमिनीच्या मालावर साधारण सुपीक जमिनीच्या मालापेक्षां जास्त फायदा असतो. हा फायदा अगर सुपीक व कमीसुपीक जमिनीच्या उत्पन्नांतील अंतर म्हणजे भाडें होय, हें मागें दाखविलेंच आहे. आतां कोणत्या सुपीकतेची जमीन लागवडीस आणावयाची हें धान्याच्या मागणीवर अवलंबून असतें. देशांत लोक-संख्या जास्त झाली म्हणजे त्या लोकसंख्येला जास्त धान्य पाहिजे असतें. हें धान्य उत्पन्न करण्यास कमी सुपीकतेची जमीन लागवडीस आणली पाहिजे. या जमिनीवरील उत्पन्नाचा खर्च जास्त आहे व त्या खर्चाइतकी किंमत आल्याखे-रीज शेतकऱ्याला जमीन लागवडीस आणणें पतकरणार नाहीं. म्हणजे कृषिज व खनिज मालाच्या बाबतींत मूळकिंमत ही ज्या जमिनीला सर्वांत जास्त खर्च लागतो त्या जमिनीच्या उत्पन्नाच्या खर्चावर अवलंबून असते; देशाच्या वाढीबरोबर लागवडीची धार खालीं खालीं जाते व धान्याची मूळ किंमत वाढत जाते; व त्या मानानें बाजारकिंमतही वाढत जाते, हें उघड आहे. परंतु ही मूळ किंमत वाढत्या लोकसंख्येबरोबर वाढूं नये याला दोन उपाय आहेत. एक शेत-कीच्या पद्धतींतील सुधारणा व दुसरा परदेशांहून धान्याची आयात होणें. या कारणांनीं मूळकिंमत वाढण्याच्या कलाला थोडासा प्रतिरोध होतो. परंतु कृषिज व खनिज संपत्तीचा विशेष हा कीं, त्याच्या उत्पत्तीचा खर्च कायमचाच निर-निराळ्या पायऱ्यांवर राहतो. अर्थात् सर्वांत उंची जमिनीवरील उत्पन्नाचा खर्च सर्वांत कमी असतो. मध्यम जमिनीवरील उत्पन्नाचा खर्च पहिल्यापेक्षां पुष्कळ जास्त असतो; व कनिष्ठ जमिनीवरील उत्पन्नाचा तर सर्वांत जास्त असतो. याला अर्थशास्त्राच्या भाषेंत लागवडीच्या धारेवरील जमीन म्हणतात व या

लागवडीच्या खर्चावर देशांतील एकंदर धान्याची किंमत अवलंबून असते. या कनिष्ठ जमिनीला म्हणण्यासारखें भाडें मिळत नाहीं. वरील विवेचनावरून संपत्तीच्या दुसऱ्या वर्गांतील वस्तूंच्या मूळ किंमतीची मीमांसा सहज ध्यानांत येईल. ही मूळ किंमत सर्वांत जास्त खर्चाच्या जमिनींवरील लागवडीच्या खर्चावरून ठरते. खर्चाच्या पायऱ्या निरनिराळ्या राहतात व प्रतिरोधक कारणें अस्तित्वांत नसलीं म्हणजे ही मूळ किंमत वाढत जाण्याचा कल असतो.

संपत्तीच्या तिसऱ्या वर्गाची स्थिति यापेक्षां अगदीं भिन्न असते. या वर्गसंबंधानें चढत्या पैदाशीचा नियम लागू असतो;- निदान अधिक पुरवठा पूर्वीच्याच खर्चाच्या मानाच्या प्रमाणानें करतां येतो. या वर्गामध्यें बहुतेक सर्व कारखान्यांतल्या मालाचा समावेश होतो, असें वर सांगितलेंच आहे. या कारखान्यांत अर्वाचीन काळीं मोठी क्रांति घडून आली आहे. पूर्वीचे घरगुती कारखाने जाऊन तेथें विराटस्वरूपी कारखाने होऊं लागले आहेत. ही स्थिति शास्त्रीय शोधांनीं व यंत्रसामग्रीच्या वाढीनें घडून आली आहे, हें नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं; या क्रांतीचा परिणाम श्रमविभागास जास्त अवसर देण्यांत होतो व त्यामुळें संपत्तीची विलक्षण वाढ होते, हेंही मागें दाखविलें आहे. या सर्वांचा परिणाम या वर्गांतील संपत्तीच्या उत्पत्तीचा खर्च कमी कमी होण्यांत होतो; व मूळ किंमत या खर्चावर अवलंबून असते. तेव्हां ही मूळ-किंमतही कमी कमी होण्याचा कल उद्भूत होतो. म्हणजे या वर्गांतील संपत्तीची मूळकिंमत, सर्वांत स्वस्त तऱ्हेनें उत्पन्न करण्याचा जो खर्च, त्यावर अवलंबून आहे. उदाहरणार्थ, हातमागाचें कापड व गिरणीचें कापड घ्या. गिरणींतल्या कापडाच्या उत्पत्तीचा खर्च हातमागाच्या कापडापेक्षां कमी असतो व म्हणून गिरणींतील कापडाची मूळ किंमत कमी असते व बाजारभाव या किंमतीबरोबर असतो. हातमागांच्या विणकऱ्यांना त्याच किंमतीनें आपला माल विकावा लागतो. म्हणून त्यांचा आंतबट्ट्याचा व्यापार होतो व कालेंकरून हा धंदा नाहींसा होत जातो. हिंदुस्थानांतील कापडाचा धंदा नाहींसा होण्याचें कारण इंग्लंडांतील गिरणींतील कापड होय, हें सर्वश्रुतच आहे. गिरणींतील कापडाची मूळ किंमत हातमागाच्या कापडापेक्षां कमी असे; कारण गिरणींतील कापडाच्या उत्पत्तीचा खर्च हातमागांच्या कापडाच्या उत्पत्तीच्या खर्चापेक्षां कमी असे व बाजारभाव स्वस्त मूळकिंमतीबरोबर होता.

तेव्हां या तिसऱ्या वर्गांमधल्या संपत्तीच्या मूळ किंमतीची मीमांसा अगदीं सोपी आहे. सर्वांत स्वस्तपणें माल तयार करण्याच्या पद्धतीवर मूळ किंमत अवलंबून असते. जो कारखानदार प्रथमतः अशी स्वस्त तऱ्हा शोधून काढतो त्याला पुष्कळ फायदा होतो. परंतु कालेंकरून भांडवलाच्या चढाओढीनें सर्व कारखाने नवीन पद्धतीचे होतात व पुन्हां धंद्यांतील मालाच्या उत्पत्तीचा खर्च एकाच पायरीवर येऊन ठेपतो. अर्थात् कृषिज व खनिज मालाप्रमाणें खर्चाच्या निरनिराळ्या पायऱ्या कायमच्या राहात नाहींत. तर सर्वांत स्वस्त तऱ्हेनें माल उत्पन्न करण्याची तऱ्हा सार्वत्रिक होते. यावरून मूळ-किंमत ठरते व त्याबरोबर बाजारकिंमत असते. ह्मणजे या वर्गांमधील मालावर मागणीचा दुसऱ्या वर्गांतील मालाच्या मागणीपेक्षां निराळा परिणाम होतो. दुसऱ्या वर्गांत मालाची मागणी वाढली ह्मणजे लागवडीची धार खालीं जाते. अर्थात् मालाच्या उत्पत्तीचा खर्च वाढतो; त्या मानानें मूळ किंमत वाढते व मूळ किंमतीवर बाजारकिंमत अवलंबून असते, ह्मणून बाजारकिंमतही कायमची वाढते. परंतु कारखान्यांतल्या मालावर उलट परिणाम होतो ह्मणजे जसजशी यंत्रांमध्यें सुधारणा होत जाते त्यां त्या मानानें उत्पादनखर्च कमी होतो व मूळ किंमत कमी होते.

वरील विवेचनावरून वस्तूच्या बाजार-किंमती व मूळ किंमती या कशावर अवलंबून आहेत हें दिसून येईल. बाजार-किंमती अगर मूळ-किंमती या प्रत्यक्ष व्यवहारांत निरनिराळ्या असतात अशी मात्र गोष्ट नाहीं. मूळ किंमतीची कल्पना खरोखरी निवळ तात्विक आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत तिला अस्तित्व नसतें. ज्या किंमतीसभोंवतीं बाजारकिंमतीचें आंदोलन होत असतें ती मूळ-किंमत होय. मूळ किंमत ही बाजारभावाची शेवटली मर्यादा होय. म्हणजे या किंमतीखालीं बाजारकिंमत कायमची कधींच जाणार नाहीं. कारण, तसें झालें तर ती वस्तु उत्पन्न होणारच नाहीं. असो.

मूळ किंमतीसंबंधानेंही दोन प्रकारच्या संपत्तींमधील फरक ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. ज्यांना आपण दुर्वर्धनीय संपत्ति असें म्हटलें आहे, त्यांच्या किंमती देशाच्या आधिभौतिक उन्नतीबरोबर वाढण्याचा कल असतो; तर ज्यांना सुवर्धनीय असें ह्मटलें आहे त्यांच्या किंमती कमी होण्याचा कल असतो. म्हणजे आधिभौतिक सुधारणेचा परिणाम आयुष्याच्या सुखसोई स्वस्त करण्यांत होतो.

पूर्वी ज्या गोष्टी मोठमोठया राजांनाही उपभोगण्यास सांपडत नसत, त्या गोष्टी आतां सामान्य माणसांनासुद्धां उपभोगण्यास सांपडतात. तेव्हां आधिभौतिक सुधारणेचा परिणाम सुखसोईच्या वस्तु उपभोगणाऱ्या लोकांची संख्या जास्त जास्त करण्यांत होतो यांत शंका नाहीं.

येथें या पुस्तकाचा पहिला पोटभेद संपला. आतां पैसा व तत्संबंधीचे सर्व प्रश्न यांच्या विचारास पुढल्या भागांत सुरुवात करावयाची आहे.

---

# भाग सहावा.

## पैसा.

मृगयावृत्ति समाजांत प्रत्येक मनुष्य आपल्या गरजा आपल्याच श्रमानें भागवितो. अशा समाजांत संपत्तीची फारशी वाढ झालेली नसते. शिकार व कातडीं या रूपानें जी कांहीं थोडीबहुत संपत्ती असेल तिची अदलाबदल करण्याचे फारसे प्रसंग येत नाहींत व जरी आले तरी या काळीं अदलाबदल ऐनजिनसी असते. समाजाच्या बाल्यावस्थेमध्यें ऐनजिनसी अदलाबदलीची पद्धति सर्वत्र दृष्टीस पडते. परंतु पैशानें अदलाबदल सुरू झाली म्हणजे समाजाची औद्योगिक बाबतींत पुष्कळ प्रगति झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण ऐनजिनसी अदलाबदलींत पुष्कळच अडचणी व गैरसोई असतात; व पैशानें अदलाबदली होऊं लागल्या म्हणजे त्या नाहींशा होतात. खरोखरी या अडचणी नाहींशा करण्यास पैसा अस्तित्वांत येतो. तेव्हां विनिमयामध्यें पैशाचा कार्यभाग समजण्याकरितां ऐनजिनसी व्यवहारांतील अडचणी काय आहेत हें प्रथमतः पाहिलें पाहिजे.

ऐनजिनसी व्यवहारांतील पहिली अडचण सवदा जुळण्याची आहे. एका मनुष्याजवळ त्याच्या गरजेपेक्षां जास्त धान्य आहे व त्याला कपडा घ्यावयाचा आहे. आतां या मनुष्याला असा दुसरा मनुष्य सांपडला पाहिजे कीं, ज्याच्याजवळ कपडा फाजील आहे परंतु ज्याला धान्य पाहिजे आहे. परंतु ज्याच्याज-

वळ कपडा जास्त आहे त्याचेजवळ धान्य असल्यामुळें त्याला धान्याची गरज नसेल, तर त्याला जोड्याची गरज असेल. तेव्हां पहिल्या मनुष्याला या मनुष्याशीं अदलाबदल करतां येणार नाहीं. त्याला बरोबर असाच मनुष्य शोधून काढला पाहिजे कीं, ज्याच्याजवळ त्याला हवी असणारी वस्तु फाजील आहे व ज्याला पहिल्या मनुष्याच्याजवळ फाजील असलेल्या वस्तूची गरज आहे. म्हणजे ऐनजिनसी व्यवहारामध्यें माणसांच्या वासनांमध्यें एक प्रकारचा संवाद लागलें व तो या पद्धतींत सांपडणें कठिण असतें.

ऐनजिनसी व्यवहारांतील दुसरी अडचण म्हणजे मोल ठरविण्याची अडचण. वरील उदाहरणांत त्या मनुष्याला आपल्याला पाहिजे असा मनुष्य सांपडला अशी कल्पना केली, तरी एका कपड्याबद्दल त्यानें त्याला किती धान्य द्यावयाचें हें ठरविणें कठिण आहे.

ऐनजिनसी व्यवहारांतील तिसरी अडचण म्हणजे विभाग करण्याच्या साधनांची अडचण होय. धान्य, सोनें, वगैरे पदार्थ विभागतां येतील; परंतु शिंप्यानें तयार केलेला कोट कांहीं फाडतां येणार नाहीं. जर त्या शिंप्याला कोट देऊन जोडा घ्यावयाचा असला तर तेथें ऐनजिनसी व्यवहार होण्यास पंचाईत पडेल.

ऐनजिनसी व्यवहारांतील या अडचणी दूर करण्याकरितां पैशाची जरूरी असते. असा पैसा औद्योगिक प्रगतीच्या मार्गाला लागलेल्या समाजांत अवश्यमेव अस्तित्वांत येतो. पैशानें अदलाबदल होऊं लागली म्हणजे तिला निष्कव्यवहार-पद्धति असें म्हणतात.

तेव्हां आतां पैसा म्हणजे काय, हा प्रश्न पुढें उभा राहतो. या प्रश्नाचें उत्तर देणें फार कठिण आहे, कारण निरनिराळ्या देशांत व समाजाच्या निरनिराळ्या अवस्थांमध्यें अगदीं भिन्नभिन्न वस्तु पैसा म्हणून वापरण्यांत येतात. कोठें कातड्याचे तुकडे तर कोठें चहाचे तिकोनी तुकडे; कोठें गुरेंढोरें तर कोठें गुलाम; कोठें शिंपा तर कोठें कवड्या; कोठें हस्तिदंत तर कोठें घडीव दगड; कोठें धान्य तर कोठें तेल; कोठें बदाम तर कोठें कोकोचें फळ; कोठें तंबाखू तर कोठें सुंठ; कोठें तांबडीं पिसें तर कोठें हातऱ्या; सारांश, कल्पनातीत अशा भिन्न भिन्न पदार्थांचा पैशासारखा उपयोग केलेला दृष्टीस पडतो. परंतु हे सर्व पैशाचे प्रकार साधारणतः समाजाच्या बाल्यावस्थेंतीलच आहेत हें कबूल करणें भाग आहे;

देशाची औद्योगिक बाबतींत वाढ होऊं लागली म्हणजे धातूचा पैशाकडे उपयोग होऊं लागतो. लोखंड, तांबें वगैरे धातूचे पैसे पुष्कळ देशांत दिसून येतात. परंतु जगांत आजपर्यंत जितके जितके पदार्थ पैसा म्हणून वापरले आहेत त्यांमध्यें सोनें, रुपें यांचा सर्वांत वर नंबर आहे. औद्योगिक प्रगतीबरोबर इतर सर्व पदार्थ मागें पडून सोनें–रुपें या धातूच पैशाची जागा पटकावतात असा सार्वत्रिक नियम दिसून येतो. असें कां होतें याचा उल्लेख लवकरच करावयाचा आहे. असो.

तेव्हां अशा भिन्न भिन्न पदार्थांमध्यें सामान्य गुण सांपडणें दुरापास्त आहे, म्हणून पैशाची पैसाभूत पदार्थांमधील सामान्य गुणावरून व्याख्या करणें जवळजवळ अशक्य आहे. म्हणूनच कांहीं अर्थशास्त्रकारांनीं पैशाची व्याख्या करण्याची एक निराळीच तोड काढिली आहे. ती अशीः—पैसा अदलाबदलींत जीं कामें करतो अगर पैशाच्या विनिमयामध्यें जो कार्यभाग आहे त्यावरून पैशाची व्याख्या करावयाची. या तऱ्हेनें 'पैशाचा कार्यभाग जो पदार्थ करतो तो पैसा,' अशी पैशाची मोघम व्याख्या ठरते. परंतु आतां पैशाचा कार्यभाग कोणता हा प्रश्न उत्पन्न होतो. मागें ऐनजिनसी व्यवहाराच्या ज्या अडचणी सांगितल्या त्यांवरून पैशाचा कार्यभाग ठरविणें सोपें आहे. एका दृष्टीनें ऐनजिनसी व्यवहाराच्य अडचणी नाहींशा करणें हा पैशाचा खरा कार्यभाग आहे.

या दृष्टीनें पैशाचे मुख्य दोन कार्यभाग होतात. पहिला कार्यभाग म्हणजे विनिमयसामान्य हा होय, व दुसरा, मोलाचें सर्वसाधारण परिमाण हा होय. यापासूनच आणखी दोन कार्यभाग उद्भवतात. म्हणजे एकंदरींत समाजांत पैसा हा चार कार्यभाग उरकतो.

विनिमयसामान्य—पैशाचें हें कार्य फार महत्त्वाचें आहे. ऐनजिनसी व्यवहारामध्यें सवदा ठरण्यास फार अडचण पडते असें सांगितलें आहे; परंतु पैशासारखा सर्वांनीं कबूल केलेला असा पदार्थ अस्तित्वांत आला म्हणजे या पैशाच्या द्वारें अदलाबदल होणें फारच सुलभ होतें. कारण ज्याच्याजवळ धान्य आहे तो बाजारांत जाऊन आपलें धान्य हा सर्वमान्य पैसा घेऊन ज्याला धान्याची गरज आहे त्याला विकतो व मग आपल्याला हवी असणारी वस्तु या पैशानें पुन्हां विकत घेतो. वर वर पाहतां ऐनजिनसी व्यवहारापेक्षां निष्कव्यवहार मानग-

ढांचा दिसतो खरा; तरी पण तो फार सोईचा होतो. कारण एखादा पदार्थ एकदां पैसा या दृष्टीनें सर्वमान्य झाला म्हणजे त्याची सर्वांना नेहमीं गरजच असते. कारण हा पैसा आपल्याजवळ असला म्हणजे पाहिजे ती वस्तू आपल्याला त्याच्या बदली मिळवितां येईल अशी खात्री असते. यामुळें ज्याला जी वस्तु पाहिजे असेल ती पैशानें मिळण्यास अडचण पडत नाहीं. तसेंच, ज्याला आपल्या वस्तू दुसऱ्यास द्यावयाच्या आहेत त्याला त्या पैसा घेऊन देतां येतात.

मालाचें सर्वसाधारण परिमाण—पैशाचें हें कार्यही पहिल्याइतकेंच महत्त्वाचें आहे. ऐनजिनसी व्यवहारांत वस्तूचें मोल ठरविणें कठीण असतें असें मागें सांगितलेंच आहे. मोल ही कल्पनाच मुळीं सापेक्ष आहे. म्हणजे एका वस्तूचें मोल तिच्याशीं तुलना करावयाच्या इतक्या निरनिराळ्या वस्तूंच्या रूपांत सांगतां येईल. परंतु मोलाची तुलना करण्याकरितां एका पदार्थाचा संकेत एकदां केला म्हणजे वस्तूचें मोल सांगणें फार सोपें होतें. असा संकेतित पदार्थ म्हणजेच पैसा होय. या संकेतित पदार्थांमधलें मोल म्हणजेच पदार्थाची किंमत असें आपण सामान्य व्यवहारांत म्हणतों. एकदां निरनिराळ्या पदार्थांच्या किंमती ठरल्या म्हणजे पदार्थांची अदलाबदल करणें अत्यंत सोपें जातें. एका कोटाबद्दल किती जोडे दिले पाहिजेत हें काढणें पैशाच्या किंमतीच्या साहाय्यानें फारच सुलभ होतें. समजा, कोटाची किंमत १० रुपये आहे व जोड्याची किंमत २॥ रुपये आहे, म्हणजे एका कोटाबरोबर ४ जोड्यांचे जोड आहेत हें अगदीं उघड झालें.

समाजामध्यें एखादा पदार्थ संकेतानें पैसा म्हणून ठरला म्हणजे समाजांतील सर्व देवघेव व अदलाबदल पैशानेंच होऊं लागते व पुढें व्यवहार ताबडतोबीचे न राहतां कर्ज व उसनवारी सुरू होते. उदाहरणार्थ, अ हा बपासून कांहीं जिन्नस उसनवार किंवा कर्जाऊ घेतो. समाजाच्या बाल्यावस्थेंत ही उसनवार पद्धतीही ऐनजिनसीच असते. शेतकऱ्यास धान्याची गरज असली किंवा खताची गरज असली तर तो ज्याच्याजवळ धान्य अगर खत शिल्लक असेल त्याजवळून ती उसनवार घेतो. कारण, शेतकऱ्याजवळ सध्यां तें विकत घेण्यास पैसा नसतो. म्हणून तो या जिनसा दुसऱ्यापासून कर्जाऊ अगर उसनवार घेतो व कांहीं काळानंतर त्या जिनसा परत देण्याचा करार करतो. आतां या अवधीमध्यें त्या वस्तूचें

मोल बदललेलें असेल व ह्मणून तीच वस्तु परत करण्यामध्यें खरोखरी एकाचा फायदा व दुसऱ्याचें नुकसान होईल. उदाहरणार्थ, दुष्काळाच्या सालीं शेतकऱ्या-नें जमीनदाराकडून धान्य उसनवार घेतलें व तें पुन्हां चार महिन्यांनीं सुगीच्या वेळीं परत केलें तर खरोखरी शेतकऱ्यानें घेतलेल्या किंमतीचा माल परत केला असें होत नाहीं. कारण, दुष्काळाच्या सालीं धान्याची किंमत जास्त होती, परंतु पीक चांगलें आल्यावर दुसऱ्या वर्षी त्याच धान्याची किंमत किती तरी कमी होते. परंतु देशांत वापरला जाणारा पैसा याचें मोल स्थिर असतें. निदान त्यांत वारंवार चलबिचल होत नाहीं. झालीच तर फार सावकाशपणें होते. म्हणून अशा पुष्कळ काळानें पुऱ्या होणाऱ्या देवघेवी पैशानें व्हाव्या हेंच रास्त आहे. तेव्हां पैसा हा अशा कालावधीनें पुऱ्या होणाऱ्या देवघेवीचें परिमाण होतें. सुधारलेल्या सर्व देशांत कर्जवाम हा पैशांतच होतो; पुष्कळ काळपर्यंतचे करारमदार पैशांतच ठरतात. अर्थात् कालावधीनें पुऱ्या होणाऱ्या देवघेवीचें साधन हें पैशाचें तिसरें कार्य होय.

पैशाचें चवथें कार्य वरील तीन कार्यांपासून निष्पन्न होतें. हें चवथें कार्य म्हणजे सर्व देशांमध्यें पैसा हा मोलाचा सांठा समजला जातो. कारण, पैशाची किंमत सहसा बदलत नाहीं. तो संकेतानें सर्वमान्य झालेला असतो. तेव्हां ज्या ज्या माणसाला आपल्या उत्पन्नापैकीं संपत्ति शिल्लक टाकण्याची इच्छा असते, तो तो मनुष्य पैशाच्या रूपानें ती शिल्लक टाकतो. अर्थात् आपण उत्पन्न केलेले पदार्थ तो दुसऱ्यास विकतो व त्या विक्रीचे आलेले पैसे पुन्हां दुसऱ्या वस्तु खरेदी कर-ण्यांत खर्च न करितां मागें टाकीत असतो. अशानें आपण संपत्तीचा सांठा करीत आहों, असें त्या मनुष्याला वाटतें व तें बरोबरही आहे. कारण, या पैशानें पुढें आपल्याला पाहिजे ती वस्तु घेतां येईल अशी त्याला खात्री असते. शिवाय, इतर वस्तूंप्रमाणें पैसे शिल्लक टाकण्यानें वाईट होत नाहींत, नासत नाहींत, कमी होत नाहींत, गंजत नाहींत. तेव्हां असा पैसा आपल्या संग्रहीं ठेवण्याची प्रवृत्ति कृषिवृत्ति व उद्योगवृत्ति समाजांत सर्वत्र दृष्टीस पडावी हें स्वाभाविक आहे.

पैशाचीं हीं वरील कार्यें होत. हीं कार्यें किंवा हे कार्यभाग ज्या पदार्थांकडून समाजांत करून घेतले जातात तो पैसा होय. आतां हा कार्यभाग चांगल्या प्रकारें संपादण्याकरितां वस्तूमध्यें कोणकोणते गुण पाहिजेत हें पाहिलें पाहिजे. अर्थशास्त्र-

कारांनीं पैसा होण्यास योग्य असणाऱ्या पदार्थांमध्यें सात गुण असले पाहिजेत असें सांगितलें आहे. ते गुण हेः—

( १ ) पहिला गुण उपयुक्तता व मोल हा होय. पैसा होणाऱ्या वस्तूमध्यें हा गुण अवश्य पाहिजे. कारण, ज्या वस्तूनें हजारों वस्तूंचें मोल माजावयाचें आहे व जिनें हजारों वस्तूंची अदलाबदल व्हावयाची आहे, अशा वस्तूला स्वतः-ची उपयुक्तता व तदंगभूत मोल हें पाहिजे हें उघड आहे. मागें ज्या अनेक वस्तू पैशासारख्या उपयोजिल्या गेल्या म्हणून सांगितलें आहे, त्या सर्वांमध्यें समाजाच्या त्या त्या अवस्थेला अनुरूप अशी उपयुक्तता आहे असें दिसून येईल. मृगयावृत्ति समाजांत कातड्याचा पैसा असतो. परन्तु त्या काळीं कातडें फार उपयोगाचें असतें. कारण, तें थंडीवाऱ्यापासून बचाव करण्याचें तात्काळचें एक साधन असतें. गोपालवृत्ति समाजांत गुरेंढोरें हीं उपयोगी असतात. सारांश, ज्या ज्या वस्तू पैसा म्हणून वापरल्या जातात त्यांमध्यें थोड्याफार अंशानें उपयुक्तता व मोल हा गुण असतोच.

( २ ) पैशाच्या द्रव्यांतील दुसरा गुण सुवाह्यता हा होय. पैसा आपल्यास सहज इकडेतिकडे नेतां आला पाहिजे. म्हणजे त्याला थोड्या वजनांत व थोड्या आकारांत पुष्कळ मोल असलें पाहिजे. याच दृष्टीनें तांबें किंवा लोखंड हीं सोन्या-रुप्यांपेक्षां नेण्याआणण्यास फार गैरसोईचीं आहेत. म्हणूनच सुधारणेच्या प्रगती-बरोबर तांबें किंवा लोखंड हीं पैशाचीं द्रव्यें राहिलीं नाहींत. समाजाच्या बाल्या-वस्थेंतील पैशाच्या पुष्कळ प्रकारांत ही सुवाह्यता नसे. म्हणून तीं द्रव्यें मागें पडलीं. औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या देशांत सोन्यारुप्याचीं नाणींसुद्धां नेण्या-आणण्यास गैरसोईचीं वाटूं लागतात. म्हणूनच कागदी चलनें व व्यापाऱ्यांचीं साक-पत्रें यांचा पैशासारखा उपयोग होऊं लागतो. कारण, एका लहान काग-दाची किंमत हजारों रुपये होऊं शकते. हल्लींच्या काळीं एखादा मनुष्य एक लाख रुपये एका खिशांत ठेवून सहज प्रवास करूं शकेल. मात्र हे रुपये कागदी चलनाचे पाहिजेत म्हणजे झालें.

( ३ ) पैशाच्या द्रव्यांतील तिसरा गुण अविनाशिता हा होय. पैसा हा टिकाऊ पाहिजे. कारण मनुष्य तो आपल्याजवळ पुष्कळ दिवस ठेवीत असतो. शिवाय आपली शिल्लक ठेवण्याचेंही तेंच साधन असतें. तसेंच कालांतरानें पुन्हा होणा-

ऱ्या व्यवहाराचें परिमाणही तेंच असतें. तेव्हां पैशाचें द्रव्य नश्वर वर्गांपैकीं असतां कामा नये. या दोषामुळेंच पूर्वकाळच्या समाजांतील पुष्कळ पैशाचीं द्रव्यें मार्गे पडलीं. या बाबतींत धातुधातूंमध्येंसुद्धां फरक आहे. उदाहरणार्थ, लोखंड ही धातु पैशाच्या द्रव्याला योग्य नाहीं. कारण ती गंजून खराब होते.

(४) पैशाच्या द्रव्याचा चवथा गुण सजातीयता होय. ज्याचा पैसा करावयाचा तें द्रव्य सर्व सजातीय असलें पाहिजे. अर्थात् त्या द्रव्याचा कोणताही भाग घेतला तरी तो अगदीं सारखा असावा. म्हणजे सारख्या वजनाच्या द्रव्याची किंमत नेहमीं एकच असावी. गुरेंढोरें, गुलाम, धान्य, वगैरे पैशाच्या प्रकारांत या गुणाचा अभाव असतो. म्हणून हे पैशाचे प्रकार मागें पडतात.

(५) पैशाच्या द्रव्यांतील पांचवा गुण सुविभाज्यता हा होय. पैशाच्या द्रव्याचे हवे तितके लहान लहान तुकडे व विभाग करितां यावे. म्हणजे पदार्थांचें मोल ठरविण्यास सुलभ होतें व पैशाचीं निरनिराळ्या वजनाचीं व आकाराचीं कमी जास्त मोलाचीं नाणीं करतां येतात. त्यामुळें पदार्थांची अदलाबदल होण्यास फार सोईचें होतें.

(६) पैशाच्या द्रव्यांतील सहावा गुण मोलाची स्थिरता हा होय. पैसा हा इतर सर्व पदार्थांचें मोल मोजण्याचें परिमाण अगर कसोटी होय; त्या अर्थी त्याची किंमत स्थिर पाहिजे. ज्याप्रमाणें लांबी मोजण्याचा फूट हा नेहमीं एकच असला पाहिजे त्याप्रमाणें ज्यानें किंमती मोजावयाच्या तो पैसाही होतां होईल तों स्थिर मोलाचा पाहिजे हें उघड आहे.

(७) पैशाच्या द्रव्यांतील शेवटला गुण म्हणजे त्याची अभिज्ञेयता होय. पैसा हा सर्व व्यवहारांत नेहमीं येणारा पदार्थ आहे. तेव्हां तो खरा आहे कीं खोटा आहे हें ताबडतोब ओळखतां यावें. म्हणजे त्यामध्यें, दृष्टीस पडल्याबरोबर ओळख पटेल अशा तऱ्हेचे गुण असावे. तर त्या द्रव्याकडून पैशाचीं कार्यें उत्तम तऱ्हेनें पार पडतील.

हे सर्व गुण कमीअधिक प्रमाणानें पैशाच्या द्रव्यामध्यें पाहिजेत. हे सर्व गुण धातूमध्यें जितक्या प्रमाणानें सांपडतात तितक्या प्रमाणानें दुसऱ्या कोणत्याही द्रव्यांत सांपडत नाहींत. म्हणूनच धातुमय पैशाच्या द्रव्यांनीं इतर सर्व द्रव्यांना मागें टाकिलें आहे. थोडयाफार उन्नतीच्या मार्गाला लागलेल्या राष्ट्रां

मध्यें धातूचाच पैसा दिसून येतो.

आतां जितक्या जितक्या धातू पृथ्वीवर आजपर्यंत सांपडलेल्या आहेत त्या सर्वांचा केव्हांना केव्हां तरी व कोणत्याना कोणत्या तरी देशानें पैशाचें द्रव्य म्हणून उपयोग केला आहे. लोखंड, शिसें, कथलि, तांबें, रुपें, सोनें, प्लाटिनम व निकेल इतक्या निरनिराळ्या धातूंचीं किंवा त्यांच्या मिश्रणाचीं नाणीं निरनिराळ्या देशांत पाडलेलीं आहेत. परंतु या सर्व धातुंमध्यें सोन्या–रुप्याचाच सर्वांत वर नंबर लागलेला आहे. कारण, वर निर्दिष्ट केलेले साती गुण सोन्या–रुप्यांत जितक्या प्रमाणानें वास करीत आहेत तितक्या प्रमाणानें दुसऱ्या कोणत्याही धातूंत ते दृष्टीस पडत नाहींत. यामुळें सोन्या–रुप्यांच्या धातू याच पैशाच्या द्रव्याला सर्वांत उत्तम धातू होत असें सर्व देशांच्या प्रचारावरून दिसून येतें.

आतां, या पैशाचीं व्यवहारांत रूपें कोणतीं असतात व धात्वात्मक पैशाच्या निरनिराळ्या पद्धती कोणत्या व त्या पद्धतींपैकीं सर्वांत उत्तम पद्धति कोणती हें ठरवावयाचें आहे. परंतु या विषयाचा एका स्वतंत्र भागांत विचार करणें चांगलें.

# भाग सातवा.

## नाणीं व धात्वात्मक पैशाचे प्रकार.

मागील भागांत पैशाचें सामान्य स्वरूप व पैशाच्या द्रव्याचे गुणधर्म यांचा विचार केला. त्यावरून सोनें, रुपें या दोन धातूच पैशाच्या द्रव्याला फार योग्य आहेत असें दिसून येईल. औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या सर्व देशांमध्यें सोन्या-रुप्याचाच पैशासाठीं उपयोग केला आहे असें इतिहास सांगतो. तेव्हां आतां या पैशाचें विशेष स्वरूप काय व निरनिराळ्या देशांत कोणत्या पैशाच्या पद्धति चालू आहेत यांचा या भागांत विचार करावयाचा आहे.

सोन्या-रुप्याचा पैशाच्या कामीं उपयोग व्हावयास लागला म्हणजे तो प्रथमतः सोन्यारुप्याचे तुकडे, कांबी, वडी अशा सारख्या रूपानें होऊं लागतो. हे

सोन्यारुप्याचे तुकडे वजन करून घेतात. परंतु ही पद्धति फार गैरसोईची असल्यामुळें पुढें नाण्यांची पद्धति सुरू होते.

युरोपामध्यें होमरच्या काळीं नाणीं ठाऊक होतीं असें दिसत नाहीं. स्पार्टन कायदेकार लायकरगस याचे काळीं तीं ठाऊक होतीं हें स्पष्ट आहे. यावरून युरोपामध्यें नाणीं पाडण्याची पद्धति इसवी सनापूर्वीच्या ३७० वर्षांच्या अलीकडील आहे यांत शंका नाहीं. हिंदुस्थानविषयक पैशासंबंधाचा व नाण्यांसंबंधाचा विचार एका निराळ्याच भागांत करावयाचा आहे. तेव्हां येथें त्याच्या उल्लेखाची जरूरी नाहीं. प्रथमतः इतर वस्तूंप्रमाणें सोन्यारुप्याचीं नाणीं खासगी लोक पाडीत; परंतु सर्व अदलाबदलीचें साधन, मालाचें मोल मोजण्याचें परिमाण, कालांतरानें पुऱ्या होणाऱ्या देवघेवीचें उपकरण व संपत्ति शिल्लक टाकण्याचा उपाय या नात्यानें पैशाला महत्त्व फार येतें. इतक्या महत्त्वाची गोष्ट खासगी व्यक्तींच्या किंवा संस्थांच्या ताब्यांत ठेविल्यानें लबाडी होण्यास जागा फार राहते. यामुळें नाण्याच्या रूपानें पैसा पाडण्याचें काम नेहमीं राजाचें असें समजलें जातें. अनियंत्रित राजसत्तेमुळें कांहीं राजांनीं या नाणें पाडण्याच्या अधिकाराचा दुरुपयोग करून नाणीं हलकीं करून त्यापासून फायदा करून घेतला आहे. एके काळीं पैशाची ही हिणकशी युरोपांतल्या बहुतेक देशांमध्यें घडून आलेली होती. यामुळेंच हर्बर्ट स्पेन्सरसारखे व्यक्तिक तत्वाचे पूर्ण समर्थक यांनीं नाणीं पाडण्याचा हक्क इतर गोष्टींप्रमाणें खासगी व्यक्तींस व संस्थांस असावा असें प्रतिपादन केलें आहे. तरी पण सुधारलेल्या सर्व देशांत आतां टांकसाळीचा अधिकार सरकारचा असला पाहिजे ही गोष्ट सर्वसंमत आहे. व या प्रकारचाच सर्व राष्ट्रांचा प्रघातही आहे.

धातूच्या पृष्ठभागावर उठविलेल्या ठशाच्या शाबूतपणावरून ज्याचा कस व वजन हीं ओळखतां येतात असे सोन्यारुप्याचे तुकडे म्हणजे नाणीं होत, अशी जेव्हन्सनें नाण्याची व्याख्या दिली आहे, व ती सर्वमान्यच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

नाण्यांचे आकार मात्र किती तरी प्रकारचे दृष्टीस पडतात. एखाद्या पुराणवस्तुसंग्रहांतील या भागाकडे लक्ष दिलें असतां नाण्यांच्या आकाराच्या विविधत्वाची सहज कल्पना होईल. परंतु नाण्याचा आकार, त्याचें रूप व त्यावर ठसे

उठविण्याची पद्धति सामर्थ्यें सर्वांत चांगलें कोणतें हें ठरवितांना चार गोष्टी ध्यानांत ठेवाव्या लागतात.

१ बनावट नाणीं पाडतां येऊं नयेत.

२ नाण्यांतील धातु लबाडीनें काढतां येऊं नये.

३ नाण्याच्या वापरानें होणाऱ्या स्वाभाविक झिजेपासून फार तोटा होऊं नये.

४ नाणें पाडणाऱ्या राजाचें व तें वापरणाऱ्या लोकांचें तें नाणें ऐतिहासिक व कलाकौशल्याचें स्मारक बनावें.

या चार हेतूंच्या सिद्ध्यर्थ हल्लींची वर्तुळाकार व धारेवर रवे रवे असलेल्या नाण्यांची पद्धति सर्वत्र प्रचारांत आलेली आहे. टांकसाळीमध्यें हें सर्व काम नाजूक व भानगडीच्या यंत्रसाहाय्यानें केलें जातें. यामुळें बनावट नाणीं करणें फारच कठिण जातें.

परंतु हजारों प्रकारचे व्यवहार सुलभ रीतीनें करतां यावे म्हणून अर्वाचीनकाळीं बहुतेक सर्व देशांत पुष्कळ प्रकारचीं नाणीं पाडतात. लहान लहान किंमतीच्या व किरकोळ अदलाबदलीकरितां कांहीं सांकेतिक नाणीं पाडतात त्याला उपपैसा म्हणतात. हीं नाणीं कांहीं मर्यादेपर्यंत चालतात. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्यें शिलिंग हें रुप्याचें नाणें आहे. परंतु तें उपपैशाच्या जातीचें आहे. तें फक्त ४० शिलिंग किंवा दोन पौंडांपर्यंतच कायदेशीर चलन आहे. म्हणजे ४० शिलिंगांपेक्षां देवघेवींत कोणी जास्त शिलिंग देऊं लागला तर कायदेशीर रीतीनें ते नाकारतां येतील. परंतु देशांतील मुख्य पैशासंबंधीं तसें चालावयाचें नाहीं. या पैशालाच कायदेशीर फेडीचें चलन म्हणतात. हीं नाणीं हव्या तितक्या मर्यादेपर्यंत देवघेवींत घेतलींच पाहिजेत असा निर्बंध असतो.

आतां आजपर्यंत झालेल्या व सध्यां प्रचलित असलेल्या चलनपद्धतींचा विचार केला पाहिजे. याचे स्वाभाविक पांच प्रकार होतात ते असेः— १ तुलनात्मक चलनपद्धति—ही सर्वांत जुनी व सर्वांत सोपी अशी पद्धति आहे, यांत शंका नाहीं. सोन्यारुप्याचा पैशाकडे उपयोग होऊं लागला म्हणजे प्रथमतः लोक त्याचा इतर जिनसांप्रमाणेंच व्यवहार करतात. म्हणजे ऐनजिनसी व्यवहारामध्यें ज्याप्रमाणें दोन्ही वस्तूंची अदलाबदल तोलून किंवा मापानें होते, त्याप्रमाणें विकत घ्यावयाच्या पदार्थाची किंमत एक सोन्याचा तुकडा वजन करून दिली

जाते. सर्व देशांत अशीच पूर्वी पद्धति होती असें इतिहासावरून दिसतें. ज्याप्रमाणें तुलनात्मक चलन-पद्धति ही धातूचा उपयोग होऊं लागल्याबरोबरची स्वाभाविक पद्धति आहे, त्याप्रमाणेंच कांहीं विशिष्ट परिस्थितींत तिचें पुनरुज्जीवन होतें. उदाहरणार्थ, जेव्हां एखाद्या देशांतील प्रचलित नाणीं हीं मुद्दाम हिणकस केलीं जातात किंवा लोकांचा त्यांवरील विश्वास उडून जातो, त्या वेळीं लोक नाणीं मोजून न घेतां कस पाहून तोलून घेऊं लागतात. तसेंच राष्ट्राराष्ट्रांमध्यें सांकेतिक असा पैसा किंवा विनिमयसामान्य नसल्यामुळें या राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापारांतही तुलनात्मक चलन-पद्धतीच प्रचलित असते. हिंदुस्थानांतील रुपये हे चीनमध्यें चालत नाहींत. तर तेथें ते तोलून त्यांतील चांदीच्या वजनाच्या भावानें स्वीकारले जातात. अर्थात् अशा ठिकाणीं नाणें व निवळ रुपें यांमध्यें खरोखरी फरक नसतो.

२ एकात्मक चलनपद्धति—या पद्धतीमध्यें एकच धातु कायदेशीर फेडीचें चलन असतें व यामध्यें त्या धातूचें एकच नाणें पाडलें जातें. इंग्लंडमध्यें पूर्वी अशी पद्धति होती. तिसऱ्या एडवर्ड राजाच्या कारकीर्दीपर्यंत इंग्लंडमध्यें एकाच धातूचीं नाणीं पाडीत असत व नाणेंही एकच होतें. तो रुप्याच्या पेनी होय. हा पेनी इंग्लंडांतील हल्लींच्या तीन पेनींच्या नाण्याच्या आकाराचा होता. या पद्धतीचा दोष तर उघड आहे. रुप्याचें नाणें किरकोळ देवघेवीला फारच मोलवान् होतें, तर घाऊक व मोठमोठ्या विक्रीला तें फार लहान असल्यामुळें गैरसोईचें होतें. तेव्हां लहान किंमतीचीं नाणीं पाडण्याबद्दल सरकारांत अर्ज झाले व ही अडचण दूर करण्याकरितां उपपैशाऐवजीं नाणीं पाडण्यांत आलीं. प्रथमतः तीं चामड्याच्या तुकड्याचीं होतीं. परंतु पुढें ब्रांझ धातूचे फार्दिंग पाडण्यांत आले. व मोठ्या किंमतीच्या नाण्यांकरितां सोन्याचीं नाणीं पाडण्यांत आलीं. या इतिहासावरून पहिल्या पद्धतीप्रमाणेंच ही पद्धति जरी पूर्वकाळीं प्रचलित असली तरी या दोन्ही पद्धतींच्या गैरसोईमुळें त्या पद्धती मागें पडतात व जास्त सोईच्या नाण्यांच्या पद्धती अस्तित्वांत येतात.

३ द्विचलनपद्धति—या पद्धतीमध्यें दोन धातु कायदेशीर फेडीचीं चलनें मानलीं जातात. यांमध्यें दोन प्रकार आहेत. पहिल्यामध्यें दोन धातूंमधील प्रमाण कायद्यानें ठरलेलें नसतें; तर दुसऱ्यांत तें कायद्यानें ठरलेलें असतें. या पद्धती-

मध्यें सरकार सोन्याचीं व रुप्याचीं अशीं दोन्ही प्रकारचीं नाणीं टांकसाळींत पाड-तात. दोन्ही धातूंचीं नाणीं अमर्यादित प्रमाणांत चालतात व दोन्हींही कायद्यानें सारखींच फेडीचीं चलनें मानलीं जातात. अर्थात् मनुष्याला वाटेल त्या नाण्यांत आपल्या कर्जाची फेड करण्याचा अधिकार असतो. कोणत्याही मनुष्याला सोन्या-रुप्यांपैकीं कोणतेंही नाणें कायदेशीर रीतीनें नाकारतां येत नाहीं. या नाण्यांची अदलाबदल कोणत्या प्रमाणांत व्हावी हें कायद्यानें ठरविलें नसलें म्हणजे तें सोन्या-रुप्याच्या बाजारभावानें ठरत असतें. परंतु, केव्हां केव्हां सोन्याच्या एका नाण्याला रुप्याचीं अमुक नाणीं द्यावीं असा कायद्यानें निर्बंध केलेला असतो. परंतु जसजशी बाजारभावांत चलबिचल होते त्या मानानें कायद्यानें ठरविलेल्या भावांत फरक होऊं लागतो.

४ संमिश्र चलनपद्धति—या पद्धतीप्रमाणें एका धातूचें नाणें हें कायदेशीर फेडीचें चलन असतें. परंतु याचेबरोबरच दुसऱ्या धातूचें उपपैशाचें चलन असतें. मुख्य पैसा हाच अमर्यादित प्रमाणांत देवघेवीमध्यें चालतो. उपपैसा हा ठराविक प्रमाणांतच देवघेवींत चालतो. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्यें सोन्याचा पौंड एवढेंच कायदेशीर फेडीचें चलन आहे. पौंड हे सर्व देवघेवींत अमर्याद चालतात. परंतु रुप्याचीं व ब्रांझ धातूचींही नाणीं तेथें पाडतात. पण त्यांची चलनमर्यादा ठरलेली असते. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्यें रुप्याचे शिलिंग दोन पौंडांपर्यंत चालतात. ब्रांझचे पेन्स, हाफ्पेन्स व फार्दिंग्ज हे एक शिलिंगापर्यंतच चालतात. म्हणजे फेडींत मनुष्याला ४० शिलिंगांपेक्षां जास्त शिलिंग व बारा पेन्सांपेक्षां जास्त पेन्स देतां येणार नाहींत. बहुतेक सर्व देशांत हीच पद्धति प्रचलित आहे. शुद्ध एकचलनपद्धति किंवा शुद्ध द्विचलनपद्धति हल्लीं फारच थोड्या ठिकाणीं चालू आहे.

५ लंगडी द्विचलनपद्धति—ही पद्धति शुद्ध द्विचलनपद्धतींतून किंवा एकचलन-पद्धतींतून अलीकडे अस्तित्वांत आली आहे. या पद्धतीमध्यें प्रत्यक्ष व्यवहारांत दोन धातूंचीं नाणीं अमर्याद प्रमाणांत चालतात. तेव्हां द्विचलनपद्धतीचा एक गुण यामध्यें असतो खरा, तरी पण या पद्धतींत द्विचलनपद्धतीचा दुसरा गुण नसतो. म्हणजे यामध्यें दोन्ही धातूंचीं नाणीं टांकसाळींत पाडून मिळत नाहींत; तर फक्त एकाच धातूचीं नाणीं लोकांना पाडून मिळतात. परन्तु दोन्ही धातूंचीं नाणीं सरकारला पाडतां येतात. ही पद्धति १८७१ नंतर अस्तित्वांत आलेली

आहे. व १८९३ ते १८९८ पासून हिंदुस्थानांतील पद्धतीही याच प्रकारची झाली आहे. तिचा पुढील एका भागांत सविस्तर विचार करावयाचा आहे.

आतां, या पद्धतींपैकीं सर्वांत चांगली पद्धति कोणती हें ठरवावयाचें आहे. या पांचांपैकीं पहिल्या दोन पद्धति सदोष आहेत. सुधारलेल्या देशांतून त्या आतां नाहींशा झाल्या आहेत. शेवटची पद्धति ही कांहीं विशेष परिस्थितींत उत्पन्न झालेली आहे. हल्लींच्या काळीं उपपैशाची पद्धति सर्वत्र सुरू असते. तेव्हां वादग्रस्त प्रश्न मुख्य पैशासंबंधीं राहिला. तेव्हां एकचलन-पद्धति चांगली कीं, द्विचलनपद्धति चांगली याचा निर्णय पुढील एका स्वतंत्र भागांत करणें इष्ट आहे.

या पांच चलनपद्धतींपैकीं सध्यां बहुतेक सुधारलेल्या देशांमध्यें चवथी किंवा पांचवी यांपैकीं कोणती तरी पद्धति चालू आहे. चवथ्या पद्धतीचें उत्तम उदाहरण इंग्लंडच्या चलनपद्धतीचें आहे. ज्या अर्थीं इंग्लंडची चलनपद्धति हीच तात्विकदृष्ट्या हिंदुस्थानची चलन-पद्धति आहे, त्या अर्थीं या पद्धतीचें थोड्या विस्तारानें वर्णन करून हा भाग संपविण्याचा विचार आहे.

इंग्लंडची चलनपद्धति संमिश्र परन्तु एकचलनपद्धतीच्याच जातीची आहे. येथें तीन धातूंचीं नाणीं पाडतात. परंतु कायदेशीर फेडीचें मुख्य चलन एकच आहे. तें सोन्याचें पौंड हें नाणें होय. बाकीचीं नाणीं किरकोळ व्यवहाराकरितां उपपैसा म्हणून पाडलीं जातात. इंग्लंडांतील टांकसाळीच्या कायद्याप्रमाणें एक पौंडाचें वजन १२३·२७४४७ ग्रेन अथवा १०·९५७६ आणे भार पाहिजे. यापैकीं ११ भाग शुद्ध सोनें व १ भाग हिणकस धातु, मुख्यतः तांबें असतें. म्हणजे कायद्यानें पौंडामध्यें ११३·००१६० ग्रेन अगर १०·०४५८ आणे भार शुद्ध सोनें असलेंच पाहिजे. अर्थात् एका पौंडाचें वजन जवळजवळ ११ आणे भार असतें व त्यांतील शुद्ध सोन्याचें वजन १० आण्यांपेक्षां किंचित् जास्त असतें. आतां एक पौंड वितळून त्यांतील सोनें काढलें तर तोळ्यास २४ रुपये या भावानें त्या सोन्याची किंमत बरोबर १५ रुपये होईल. यावरून असें दिसून येईल कीं, इंग्लंडच्या चलनपद्धतींत सोन्याचीं नाणीं करणें हें काम सरकारचें आहे असें समजलें जातें. ह्मणून टांकसाळीचा सर्व खर्च सरकारी तिजोरींतून केला जातो. अर्थात् जितक्या वजनाचें सोनें टांकसाळींत द्यावें तितक्याच वजनाचें नाणें पाडून मिळतें. टांकसाळींत जर १ औंस सोनें दिलें तर मनुष्याला टांकसाळींतून ३ पौंड १०

शिलिंग व १०॥ पेन्स इतकें नाणें मिळालें पाहिजे. परन्तु प्रत्यक्ष व्यवहारांत नाणें पाडून घेण्याकरितां थोडीशी कसर द्यावी लागते. कारण, सोनें टांकसाळींत दिल्यापासून नाणीं पाडून मिळण्यास थोडा वेळ लागतो, तितक्या दिवसाचें व्याज बुडतें. म्हणूनच प्रत्यक्ष व्यवहारांत इंग्लंडची बँक एका औंसाबद्दल ३ पौंड १७ शि. १०॥ पेन्स इतकीं नाणीं न देतां ३ पौंड १७ शिलिंग ९ पेन्सच देते. म्हणजे प्रत्येक औंसापाठीमागें बँक १॥ पेन्साची कसर कापून घेते.

जरी कायद्याप्रमाणें कायदेशीर पौंडाचें नक्की वजन १२३·२७४ ग्रेन असलें पाहिजे असें आहे. पण टांकसाळीचीं यंत्रें कितीही नाजूक केलीं तरी सर्व पौंड सारखे पाडणें अशक्य आहे. म्हणून टांकसाळीकरितां कायदेशीर नाण्यांच्या वजनाच्या मर्यादा ठरविलेल्या आहेत. याप्रमाणें इंग्लिश टांकसाळीला १२३·०७४ ग्रेनच्या खालील वजनाचा किंवा १२३·४७४ ग्रेनपेक्षां जास्त वजनाचा पौंड टांकसाळीबाहेर पाठवितां येत नाहीं. टांकसाळींतून बरोबर वजनाचे पौंड आले तरी वापरामुळें त्यांची झीज होत असते. अशा झिजेची कायदेशीर मर्यादा १२२·५० ग्रेनपर्यंत आहे. ह्मणजे इतक्या वजनापेक्षां कमी भरणारा पौंड कायदेशीर चलन गणला जाणार नाहीं. असें नाणें टांकसाळींत पाठविलें पाहिजे व त्याचा तोटा ज्याच्याजवळ हें नाणें सांपडेल त्यानें भरला पाहिजे.

इंग्लंडची चलनपद्धति मुक्तद्वारपद्धतीची आहे. सर्व शास्त्रीय पद्धतीचा हा एक गुण असतो. म्हणजे कोणत्याही मनुष्यानें टांकसाळींत कायद्याबरहुकूम सोनें आणून दिलें ह्मणजे त्याला कायद्यांत सांगितलेल्या दराप्रमाणें नाणीं मिळालींच पाहिजेत असा निर्बंध आहे. या पद्धतीप्रमाणें पौंडाचें मोल व त्यांतील सोन्याचें मोल हीं एकच असतात; म्हणजे पौंड जरी वितळून बाजारांत सोनें विकावयास नेलें तरी त्यामध्यें मनुष्याचें नुकसान होणार नाहीं. मुख्य पैसा व उपपैसा यांमध्यें हाच मोठा भेद असतो हें मागें सांगितलेंच आहे.

येथपर्यंत इंग्लंडच्या मुख्य चलनाचें स्वरूपनिवेदन झालें. हें सविस्तर करण्याचें कारण, हल्लीं हिंदुस्थानचें तात्विकदृष्ट्या तेंच मुख्य चलन आहे. तेव्हां या चलनाच्या स्वरूपाची वाचकांस माहिती असणें जरूर आहे.

इंग्लंडांतील दुसरें सोन्याचें नाणें म्हणजे अर्ध्या पौंडाचें होय. याचें वजन, इतर मर्यादा वगैरे पौंडाच्या नियमाप्रमाणेंच आहेत. मात्र सर्व प्रमाणें अर्ध्यानें

ठरविलेलीं आहेत हें उघड आहे.

बाकीचीं नाणीं उपपैसा म्हणून वापरतात. हीं नाणीं खासगी व्यक्तींना पाडून घेण्याचा हक्क नाहीं. हीं नाणीं व्यापाराच्या गरजेप्रमाणें सरकार पाडतें. याची किंमत सांकेतिक आहे. म्हणजे यांतील धातूची किंमत सांकेतिक किंमतीपेक्षां पुष्कळ कमी असते. हीं नाणीं परदेशीं पाठविलीं किंवा वितळलीं तर मालकाचें शेंकडा १० पासून ३० पर्यंत नुकसान होईल. उपपैसा नेहमीं असा सांकेतिक किंमतीचाच करतात. म्हणजे मग असें नाणें नेहमीं वापरांत राहतें व देशांतून बाहेर जाण्याची किंवा वितळलें जाण्याची भीति नसते.

इंग्लंडांतील हा उपपैसा दोन धातूंचा केलेला आहे. शिलिंग हें रुप्याचें नाणें आहे. ८७.२७ ग्रेन अगर ७॥ आणे भार इतकें एका शिलिंगाचें वजन असलें पाहिजे. त्यांत ८०.७२७ ग्रेन अगर ७१/२ आणे भार शुद्ध चांदी असली पाहिजे. शिलिंग हें ४० शिलिंगपर्यंत एका फेडींत कायदेशीर चलन आहे.

पेन्स, हाफपेन्स व फार्दिंग हीं नाणीं ब्रांझ धातूचीं आहेत. ब्रांझ ही मिश्र धातु आहे. ती ९५ भाग तांबें, ४ भाग कथील व एक भाग जस्त मिळून करतात. यांपैकीं पेन्स व हाफपेन्स एका शिलिंगापर्यंत कायदेशीर चलन आहे. फार्दिंग तर ६ पेन्सांपर्यंतच कायदेशीर चलन आहे.

अशा प्रकारची इंग्लंडांतील संमिश्र चलनपद्धति आहे.

अर्वाचीन काळीं टांकसाळी खासगी लोकांच्या हातांत नसतात; तसेंच सरकारची सचोटीही हल्लीं वाढलेली आहे. यामुळें टांकसाळींचें काम अगदीं कायद्याबरहुकूम चालतें व नाणीं पाडण्याच्या बाबतींत पूर्वीसारखी लबाडी होत नाहीं. मागें सांगितलेंच आहे कीं, पूर्वकाळीं अनियंत्रित सत्ताधारी राजे आपल्याला पैशाची अडचण आली म्हणजे नाणें पाडण्याच्या आपल्या हक्काचा दुरुपयोग करून नाणीं जास्त हिणकस करीत. यामुळें देशामध्यें एकाच काळीं कायदेशीर वजनाचीं व कसाचीं नाणीं व कमी वजनाचीं हिणकस नाणीं केव्हां केव्हां एकसमयावच्छेदेंकरून चालत असत. तसेंच पूर्वकाळीं परदेशांतलीं नाणींसुद्धां स्वदेशांतल्या नाण्यांबरोबर चालत असत. नाण्यांच्या अशा घोंटाळ्यामुळें पूर्वकाळीं नाणीं पारखण्याचें काम महत्त्वाचें असे. तें काम पेढीवाले व सराफ करीत. अर्वाचीन काळीं या बाबतींत पुष्कळ सुधारणा झालेली आहे. बहुतेक सर्व देशांतील

चलनपद्धतीला बरेंच व्यवस्थित स्वरूप आलेलें आहे. तरी पण पैशाची स्वाभाविक झीज राहणारच व म्हणून प्रत्येक औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या देशामध्ये पूर्ण वजनाचीं नाणीं व हलकीं नाणीं नेहमीं दृष्टीस पडतात. परंतु पूर्ण वजनाचीं व हलकीं नाणीं देशांत एकदम चालू असलीं म्हणजे त्यासंबंधीं एक नियम दिसून येतो. तो नियम प्रथमतः ग्रेशॅम या गृहस्थाच्या ध्यानांत आला. म्हणून तो अर्थशास्त्रामध्यें 'ग्रेशॅमचा नियम' या नांवानें प्रसिद्ध आहे. ग्रेशॅमचा सिद्धांत एका वाक्यांत सांगतां येण्यासारखा आहे. "खोटा पैसा खऱ्या पैशास बाहेर घालवितो." वर सांगितलेंच आहे कीं, प्रत्येक देशामध्यें झिजलेलीं व पूर्ण वजनाचीं नाणीं प्रचलित असतात. आतां या दोन प्रकारच्या नाण्यांमधील भेद जरी सामान्य लोकांस समजत नाहीं तरी तो पेढीवाले किंवा सराफ यांना कळतोच. म्हणूनच जेव्हां त्यांना परदेशी पैसे पाठवावयाचे असतात त्या वेळीं पूर्ण वजनाच्याच नाण्यांचा ते उपयोग करतील हें उघड आहे. कारण झिजलेलीं किंवा हलकीं नाणीं या कामीं उपयोगी आणणें ही नुकसानीची बाब आहे. परंतु देशामध्यें पूर्ण वजनाचीं किंवा हलकीं नाणीं सारख्याच किंमतीचीं गणलीं जातात. यामुळेंच, नेहमीं हलकीं नाणीं प्रचारांत रहावयाचीं असा ग्रेशॅमच्या सिद्धांताचा इत्यर्थ आहे. यामुळें देशांतील नाणीं सुधारण्याचे अर्धवट प्रयत्न निष्फळ होतात. देशांतील सरकारनें कांहीं नवीन नाणीं पूर्ण वजनाचीं पाडून तीं प्रचारांत आणलीं असें समजा. परंतु देशांत कमी वजनाचीं नाणीं जर बरींच प्रचारांत असलीं तर हीं नवीन नाणीं वापरांतून नाहींशीं होतील. म्हणून नाणीं सुधारण्याचा प्रयत्न सररहा व मोठ्या प्रमाणावर एकदम केला पाहिजे, तर तो सफल होईल. म्हणजे सरकारनें नवीन नाणीं मुबलक पाडून जुनीं नाणीं लोकांकडून टांकसाळींत मागवून सर्व नाण्यांची थोड्या अवधींत सुधारणा केली पाहिजे. तर ही सुधारणा यशस्वी होईल.

ग्रेशॅमचा सिद्धांत सत्यपूर्ण आहे खरा. तरी पण त्यालाही कांहीं मर्यादा आहे. प्रथमतः मनुष्य हा संवयीचा प्राणी आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. एकदां नाणीं प्रचारांत आलीं म्हणजे लोकांना तीं घेण्याची सवय होते व मग पूर्ण वजनाचीं किंवा हलकीं यांकडे कोणी पहात नाहीं. जोंपर्यंत बाजारांत तीं घेतलीं जात आहेत तोंपर्यंत ग्रेशॅमच्या सिद्धांताचा परिणाम होत नाहीं. परंतु एकदां हलकीं

नाणीं लोक घेत नाहींत असें दिसलें म्हणजे लोक साशंक होतात व मग तुलनात्मक पद्धति सुरू होते. दुसरी गोष्ट—व्यापार म्हटला म्हणजे त्याला कांहीं नाणीं पाहिजेतच व ज्या मानानें देवघेव फार मोठ्या प्रमाणावर असेल त्या मानानें देशांत पैसाही पाहिजे. तेव्हां देशांत पैसा जर कमीच असेल तर जड व हलकीं नाणीं सारखींच प्रचारांत राहतील. परंतु हे दोन अपवाद खेरीजकरून ग्रेशॅमचा सिद्धांत खरा आहे. या सिद्धांतावरून पैसा व इतर पदार्थ यांमधील कार्यभागाचा भेद चांगला दिसून येतो. इतर सर्व मालासंबंधीं असें आहे कीं, चांगला माल लवकर खपतो; म्हणजे चांगला माल वाईट मालाला बाजाराबाहेर घालवितो. कारण माल हा लोकांना उपभोगावयाचा असतो. यामुळें वाईट वस्तु कोणीच घेणार नाहीं; परंतु पैशाचा प्रत्यक्ष उपभोग घ्यावयाचा नसतो. त्याचा उपयोग फक्त अदलाबदलीपुरताच असतो. यामुळें लोक तो स्वीकारतात किंवा नाहीं हाच पैशाच्या संबंधीं महत्त्वाचा प्रश्न असतो. मग तो पैसा हलका असो कीं जड असो. म्हणून होतां होईल तों हलका पैसा हा व्यवहारांत राहतो व जेव्हां पैशाचा उपभोगार्थ उपयोग करावयाचा असेल तेव्हां त्यांतील धातुगत किंमतीकडे लोकांचें लक्ष लागतें. यावरूनही पैसा पाडणें ही गोष्ट खाजगी लोकांच्या हातीं ठेवणें किती नुकसानीचें आहे हें दिसून येईल. कारण इतर भागांत चांगला माल तयार करण्यांत कारखानदाराचें हित असतें. परंतु पैशाच्यासंबंधांत याच्या उलट स्थिति आहे.

# भाग आठवा.

## द्विचलनपद्धति.

मागील भागांत धात्वात्मक पैशाच्या चलनपद्धतीचें वर्गीकरण करून त्याचें थोडक्यांत विवेचन केलें. पांच चलनपद्धतींपैकीं संमिश्र चलनपद्धती व लंगडी द्विचलनपद्धति याच प्रमुखत्वेंकरून अस्तित्वांत आहेत, असें मागील भागांत सांगितलें. परंतु कांहीं वर्षांपूर्वी द्विचलनपद्धतीचा प्रसार फार ठिकाणीं होता,

असें इतिहासावरून दिसतें. तेव्हां या पद्धतीचा विशेष तऱ्हेनें विचार करणें जरूर आहे. कारण द्विचलनपद्धति सर्व जगांत स्वीकारली जाण्यास योग्य आहे, म्हणून अशा पद्धतीचा अंगीकार जगांतल्या प्रमुख राष्ट्रांनीं करावा, अशाबद्दल कांहीं अर्थशास्त्रकारांनीं व कांहीं देशांतील मुत्सद्यांनीं सूचना केल्या होत्या. ही योजना सर्वांत जास्त फायद्याची आहे असें त्यांनीं प्रतिपादन केलें होतें. अर्वाचीन काळीं जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं एकचलनात्मक पद्धतीचाच अंगीकार केला आहे व इतर राष्ट्रें त्याच पद्धतीचा अवलंब करण्याच्या विचारांत आहेत. यामुळें द्विचलनाच्या योजनेला आतां व्यावहारिक महत्त्व राहिलें नाहीं हें खरें आहे. तरी सुद्धां या योजनेच्या व द्विचलनपद्धतीच्या स्वरूपाचें तात्त्विकदृष्ट्या महत्त्व कमी होत नाहीं. या वादावरून पैशाच्या स्वरूपाचें व त्याच्या कार्यभागाचें स्पष्टीकरण होत असल्यामुळें त्याचा विचार करणें इष्ट आहे. तेव्हां द्विचलनाचें खरें स्वरूप काय व त्या पद्धतीचे अंगीं सर्व जगांतील चलनपद्धति बनण्यासारखे कोणते गुण आहेत हें प्रथमतः पाहिलें पाहिजे. मग अशा पद्धतीचा सार्वत्रिक स्वीकार होण्यास काय अडचणी होत्या तसेंच जगांतील चलनपद्धतीला कोणतें वळण लागलें व तें कां लागलें या गोष्टीचा विचार करण्यास ठीक पडेल.

द्विचलनपद्धतीचें सारसर्वस्व ह्मणजे पैशाच्या कामाकरितां सोनें व रुपें यांना प्रत्येक बाबतींत सारख्या दर्ज्यावर आणून ठेवणें हें होय. यापासून खालील गोष्टी निष्पन्न होतात.

पहिली—खासगी व्यक्तींनीं कोणतीही धातू टांकसाळीमध्यें आणून दिली असतां त्या धातूचीं अमर्याद परिमाणांत नाणीं पाडून मिळालीं पाहिजेत. याचा अर्थ सोनें देऊन रुप्याचीं नाणीं मिळालीं पाहिजेत किंवा रुपें देऊन सोन्याचीं नाणीं मिळालीं पाहिजेत असा मात्र नाहीं. तसेंच, नाणीं पाडण्याबद्दल कमिशन घेतलें जाणार नाहीं असाही त्याचा अर्थ नाहीं. अमर्याद परिमाणाचा अर्थ हा कीं, दोन्ही धातूंचीं नाणीं मुख्य नाणीं समजलीं जातात. एक मुख्य व दुसरें गौण असा त्यांत भेद नसतो.

दुसरी—दोन्ही धातु कायदेशीर फेडीचीं चलनें पाहिजेत; व कर्जदाराच्या खुशीप्रमाणें वाटेल त्या धातूचीं वाटतील तितकीं नाणीं देण्याचा अधिकार त्यास पाहिजे. अर्थात् दोन्ही नाणीं मुख्य पैसा झालीं. या पद्धतींतही उपपैसे असण्यास

हरकत नाहीं. परन्तु येथें दोन धातु या मोलाच्या परिमाणभूत मानल्या जातात. प्रत्येक माणसाला बँकेला किंवा सरकारला वाटेल त्या धातूच्या नाण्यांत पैशाची भरपाई करण्याची मुभा असते.

तिसरी—द्विचलनपद्धतींत सरकार दोन धातूंमधील विनिमयाचें प्रमाण कायद्यानें ठरवितें. ही गोष्ट कायदेशीर चलन या कल्पनेपासून आपोआप निष्पन्न होते. जर कर्जदाराला कोणत्याही धातूच्या नाण्यांत कर्ज फेडण्याची मुभा आहे, तर एका नाण्याशीं दुसऱ्या नाण्याचें प्रमाण कायद्यानेंच ठरविलें पाहिजे हें उघड आहे. या पद्धतींत एक पौंड म्हणजे सोळा आणे कसाचें अमुक वजनाचें सोनें अथवा सोळा आणे कसाचें अमुक वजनाचें रुपें असा होईल.

एका देशांतील द्विचलनपद्धति—आतां असें समजा कीं, औद्योगिक जगावर अवलंबून न राहतां स्वतंत्रपणें मागील पॅरिग्राफांत सांगितलेली द्विचलनपद्धति एखाद्या देशानें स्वीकारली. तर आतां प्रश्न असा आहे कीं, ही पद्धति कोणत्या अटीवर चालू शकेल व अंमलांत राहील? ही पद्धति पूर्णपणें अंमलांत राहणें यामध्यें दोन्हीं धातूंना खुल्या टांकसाळी असणें, कर्जदारांच्या खुषीप्रमाणें वाटेल तितक्या रकमेपर्यंत दोन्ही धातू कायदेशीर फेडीचें चलन असणें, व कायद्यानें ठरविलेल्या प्रमाणाची स्थिरता असणें इतक्या गोष्टींचा समावेश होतो हें उघड आहे. आतां ही स्थिति राहण्यास एक अवश्यक व पुरेशी अट म्हणजे कायद्यानें ठरविलेलें दोन्ही धातूंमधील विनिमयप्रमाण व बाजारांतील प्रमाण हीं एकच असणें ही होय. (हल्लींच्या इंग्रजी चलनपद्धतीमध्यें ज्याप्रमाणें पौंड किंवा तितक्या पौंडांच्या चलनी नोटा पैशाचे करार पुरे करण्यास उपयोजितां येतात त्याप्रमाणेंच.) जोंपर्यंत हें प्रमाणैक्य कायम आहे, तोंपर्यंत कर्जदाराला किंवा सावकाराला कोणत्याही धातूच्या नाण्यामध्यें फेड करण्यास किंवा फेड घेण्यास हरकत नाहीं. परंतु कायदेशीर विनिमयप्रमाणांत व बाजाराच्या विनिमयप्रमाणांत अंतर पडल्याबरोबर ग्रेशॅमच्या सिद्धांताची अंमलबजावणी होऊं लागेल. समजा कीं, कांहीं वजनाच्या सोन्याच्या धातूच्या बदली कायदेशीर प्रमाणापेक्षां जास्त रुप्याचीं नाणीं बाजारांत मिळूं लागलीं. आतां हें उघड आहे कीं, अशा स्थितींत सोन्याच्या नाण्याचा मालक तीं नाणीं सोनें म्हणून बाजारांत विकील व त्यां नाण्यांनीं आपल्या कर्जाची फेड करील. अशा व्यवहारांत त्याला कांहीं तरी

फायदा राहील. तसेंच, या स्थितींत कोणीही मनुष्य सोनें टांकसाळींत नेणार नाहीं. कारण त्या सोन्याबद्दल बाजारांत टांकसाळीपेक्षां जास्त रुप्याचीं नाणीं मिळतात. कोणी असें म्हणतील कीं, एकदां दोन्ही धातूंचीं नाणीं प्रचलित झालीं म्हणजे संवयीच्या प्रभावानें तीं कायदेशीर भावानें प्रचारांत राहातील. परंतु मागें सांगितलेंच आहे कीं, हीणकस नाण्यांची संख्या मर्यादित असेल तर तीं प्रचारांत राहातील. हें खरें आहे कीं, प्रथमतः सामान्य लोकांना एका धातूचा झालेला अपकर्ष ध्यानांत येणार नाहीं. परंतु सराफ व पेढीवाले यांच्या तो तेव्हांच ध्यानांत येईल. व पेढीच्या पूर्ण वाढीच्या पद्धतींत ग्रेशॅमच्या सिद्धांताचें कार्य कमी होण्याऐवजीं जोरानें व जलद होऊं लागेल. दोन धातूंच्या नाण्यांमध्यें किंमतीचा अगदीं थोडा फरक असला तरी महाग धातूचीं नाणीं प्रचारांतून तेव्हांच नाहींशीं होतील. उदाहरणार्थ, न्यूटननें सोन्यारुप्याचा विनिमयभाव ठरवितांना सोन्याचा किंचित् उत्कर्ष केल्यामुळें इंग्लंडांत रुप्याचीं नाणीं प्रायः प्रचारांतून नाहींशीं होऊन बहुतेक चलन सोन्याचें बनलें. याच्या उलट उदाहरण राजक्रांतींतील कायदेकारांनीं रुप्याचा किंचित् उत्कर्ष केल्यामुळें फ्रान्सचें चलन बहुतक रुप्याचें बनलें.

१ द्विचलनपद्धतींतील महाग झालेली धातु बहुधा देशाबाहेर जाऊन कमी होते. समजा कीं, द्विचलनी देशामध्यें रुपें अपकृष्ट झालें. म्हणजे त्या रुप्याची परकी देशांतील सोन्यांतील किंमत देशांतील टांकसाळींतील किंमतीपेक्षां कमी झाली आहे. आतां सोनें निर्गत करणाऱ्या माणसाला परदेशांतील रुपें स्वस्त मिळेल व त्याच रुप्याची देशांतील टांकसाळींत किंमत जास्त येईल. म्हणजे या कृत्यांत त्याला फायदा पडेल. असा फायदा पडत आहे तोंपर्यंत देशांतून सोनें बाहेर जाईल व रुपें देशांत येत राहील.

तेव्हां ज्या अर्थी कायदेशीर भावांत व बाजारभावांत थोडा जरी फरक पडला असें धरलें तरी द्विचलनपद्धति ढळमळते, त्या अर्थी प्रत्यक्ष व्यवहारांत असा भावांत फरक पडण्याचा किती संभव आहे हें पाहिलें पाहिजे. एका बाजूचें असें म्हणणें आहे कीं, दोन धातूंच्या उत्पत्तींत स्वाभाविक फरक पडण्यासारखा आहे. त्यामुळें दोन धातूंच्या पुरवठ्यांत फरक पडलाच पाहिजे; त्याचप्रमाणें निरनिराळ्या कारणांनीं या धातूंच्या मागणींतही फरक पडणें स्वाभाविक आहे. तेव्हां दोन

धातूंच्या बाजारभावांत फरक पडण्याचा संभव दृढतर होतो व असें मानलें कीं, द्विचलनपद्धति डळमळते. या गोष्टीच्या समर्थनार्थ द्विचलनपद्धतीचे विरोधक असें दाखवितात कीं, द्विचलन-पद्धतींत सरकारला वारंवार भाव बदलावा लागतो, दुसऱ्या बाजूनें असें सांगण्यांत येतें कीं, द्विचलनी देशामध्यें दोन्ही धातूंचा एकंदर समूह पुष्कळ असला म्हणजे धातूंच्या समतावह क्रियेनें बाजारभाव कायदेशीर भावाबाहेर जाऊं शकत नाहीं. याच्या समर्थनार्थ या पद्धतीचे समर्थक युरोपांतील १८७३ पर्यंतच्या इतिहासाचा दाखला देतात. तर्‍हां आतां या महत्त्वाच्या मुद्याचा विचार केला पाहिजे.

द्विचलनपद्धतीच्या स्थिरतेविरुद्ध जें प्रमाण पुढें केलें जातें तें हें कीं, कोणत्याही धातूच्या पुरवठ्यांत किंवा मागणींत थोडासा जरी फरक झाला, तरी त्यायोगानें त्या धातूचा बाजारभाव कायदेशीर भावापासून भिन्न होईल. परंतु, समतावह क्रियेचे समर्थक हेंच प्रमाण उलट लावून दाखवितात. कारण समजा कीं, द्विचलनी देशाच्या बाहेरील ठिकाणीं चांदीच्या थोड्याशा वाढीनें, त्याचा बाजारभाव द्विचलन देशांतील कायद्यानें ठरलेल्या भावाच्याखालीं उतरला. पूर्वी सांगितल्याप्रमाणें अशा स्थितींत द्विचलनी देशांतील सोनें बाहेरील स्वस्त रुपें घेण्याकरितां बाहेर पाठविलें जाईल. परंतु या ठिकाणीं चांदीला मागणी जास्त झाल्यानें त्याची किंमत वाढूं लागेल. व सोन्याच्या जास्त पुरवठ्यानें त्याची किंमत कमी होऊं लागेल. या दोन धातूंच्या समतावहक्रियेनें बाजारभाव कायदेशीर भावाबरोबर होईल. मात्र असें होण्यास दोन्ही धातु पुष्कळ प्रमाणांत अस्तित्वांत असल्या पाहिजेत.

परंतु आंतरराष्ट्रीय द्विचलनाच्या योजनेंत ही गोष्ट घडून आलीच पाहिजे हें उघड आहे. एखाद्या देशानें एकाकी व स्वतंत्रपणें द्विचलपद्धति स्वीकारली तर ती ढांसळली पाहिजे, असें द्विचलनवादी अर्थशास्त्रकार कबूल करतात. परंतु त्यांचें म्हणणें असें आहे कीं, जगांतील प्रमुख व औद्योगिक देशांनीं संगनमतानें जर द्विचलनपद्धति स्वीकारली तर ती चांगल्या तऱ्हेनें चालूं शकेल. ज्याप्रमाणें एका पायावर स्टूल उभें राहणार नाहीं, परंतु तें तीन किंवा चार पायांवर राहील, या दोन म्हणण्यांत कांहीं एक विसंगतता नाहीं, त्याचप्रमाणें वरील दोन विधानांत विसंगतता नाहीं. एक दाखला घेऊन अन्तर्राष्ट्रीय द्विचलनपद्धतीमध्यें

समतावह क्रिया कशी घडेल हें दाखविणें इष्ट आहे.

समजा कीं, १८७३ सालीं फ्रेंच व इतर टांकसाळी चांदीला बंद करण्याचे ऐवजी सर्व मोठमोठया औद्योगिक देशांनीं १५॥ ते १ या भावानें अन्तर्राष्ट्रीय द्विचलनपद्धति स्वीकारली असती. आतां प्रश्न असा आहे कीं, द्विचलनाच्या अटी पाळल्या असतां हा ठरलेला भाव स्थिर राहील किंवा नाहीं? समतावह क्रियेचा परिणाम पाहण्याकरितां कांहीं आंकडे घेऊन विवेचन केलें असतां हा मुद्दा स्पष्ट होईल. उत्तर द्यावयाचा आक्षेप असा आहे कीं, अन्तर्राष्ट्रीय द्विचलनाच्या स्वीकारानंतर या वीस वर्षांत सोन्याच्या मानानें चांदीचा भाव उतरलाच असता व त्यायोगें सोनें प्रचारांतून नाहींसें झालें असतें. आतां कल्पना करा कीं, नाणें व धातु मिळून पैशाकरितां ५० कोटी पौंड सोनें प्रचारांत आहे व चांदीही ५० कोटी रुपये आहे. ( हा आंकडा नेहमींच्या अंदाजापेक्षां कमी धरला आहे. ) आणखी अशीही कल्पना करा कीं, सोन्याची सरासरीनें वार्षिक पैदास २ कोटींची आहे व चांदीची पैदास ६ कोटींची आहे. ( येथेंही सोन्याची पैदास थोडी कमी धरली आहे व चांदीची थोडी जास्त धरली आहे. ) तसेंच या जगांतील सोन्यारुप्याच्या पैदाशीपैकीं १ कोटी ५० लक्ष सोनें कलाकौशल्याच्या कामास व पूर्वेकडील देशांत पाठविण्यास लागतें. म्हणजे ५० लक्ष पौंड सोनें पैशाकरितां राहिलें; आणि ६ कोटी चांदीपैकीं २ कोटी चांदी कलाकौशल्याच्या कामास व बाहेर देशीं पाठविण्यास लागते. तेव्हां पैशाच्या कामांकरितां ती चार कोटी राहिली असें समजा. या गोष्टी गृहीत धरल्या म्हणजे ४ कोटी पौंड चांदी व ५० लक्ष पौंड सोनें हें नाण्याकरितां राहिलें. ( ही कल्पना सोन्याच्या भावाची चढ व चांदीच्या भावाचा उतार होण्यास अनुकूल अशी आहे. )

मागणी व पुरवठा यांची वर गृहीत धरलेली स्थिति ध्यानांत ठेवून आतां अशी कल्पना करा कीं, बाजारभाव कायदेशीर साडेपंधरास एक याऐवजीं विसास एक या प्रमाणांत झाला. म्हणजे सोन्याच्या एका औंसाला साडेपंधरा औंसऐवजीं वीस औंस चांदी मिळूं लागली. कायद्याप्रमाणें सोन्याच्या नाण्यास रुप्याचीं नाणीं जितकीं मिळतात त्यापेक्षां सोन्याला धातू या नात्यानें जास्त चांदी मिळेल. म्हणून कोणीही मनुष्य सोनें टांकसाळींत नेणार नाहीं. उलट सोन्याचीं नाणीं वितळवून सोनें बाजारांत विकलें जाईल, व चांदीचीं नाणीं पाडलीं जातील.

जोंपर्यंत बाजारभाव व कायदेशीर भाव यांत अंतर आहे, तोंपर्यंत सोन्याची नवी मागणी न पडतां, आहेत तीं वितळण्याचा क्रम चालेल. कायदेशीर भाव व बाजारभाव यांतील फरकाचा आतां काय परिणाम होतो तो पहा. हें सर्व सोनें रुप्याच्या नाण्याचे बदला विकलें गेलें पाहिजे. आतां प्रश्न असा उद्भवतो कीं, ही सर्व चांदी कोठून यावयाची? चांदीचे नाण्याकरितां उपयोगी पडणाऱ्या चांदीची पैदास फक्त ४ कोटी पौंडांची आहे. यांपैकीं ५० लक्षांची चांदी नव्या सोन्याच्या ऐवजीं खपेल व म्हणून ३ कोटी ५० लक्ष चांदी शिल्लक राहील. आतां एवढ्या चांदीनें ५० कोटी प्रचारांत असलेलें सोनें नाहींसें व्हावयाचें आहे. वरच्या आंकड्याप्रमाणें असें होण्यास पंधरा वर्षे तरी लागतील; प्रतिबंधक कारणें अस्तित्वांत नसलीं तर या काळापूर्वी द्विचलनपद्धति ढांसळून जाईल.

पण येथपर्यंत एका बाजूनेंच विचार झाला आहे. परंतु प्रचारांतून नाहींसें झाल्यानंतर एवढें सोनें जाणार कोठें हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. हें उघडच आहे कीं, हें सर्व सोनें बाजारांत विकावयास आलें पाहिजे. म्हणजे पूर्वीच्या १ कोटी ५० लक्षांच्या पुरवठ्यांत चांदीनें मोकळें केलेल्या ४ कोटी पौंड सोन्याची भर पडली; त्यांतच पूर्वी नाण्यांत खर्च होत असलेलें सोनेंही मोकळें झालें. अर्थात् पूर्वीच्या वार्षिक पैदाशीच्या तिप्पट सोनें एकदम बाजारांत आलें. इतक्या मोठ्या वाढीचा परिणाम सोन्याच्या मोलावर झाला पाहिजे, हें उघड आहे. तेव्हां एका वर्षाचा फाजील पुरवठा दागदागिन्यांत खपून जाण्यापूर्वीच सोन्या-रुप्याचा भाव जुन्या कायदेशीर पदावर येईल यांत शंका नाहीं. आतां चांदीकडे पाहिलें तर हें विवेचन दृढतर होतें. कारण अशा स्थितींत चांदीला मागणी फार होऊन तिची किंमत वाढेल. तसेंच प्रथमारंभीं जोंपर्यंत चांदी ही अपकृष्ट धातु आहे तोंपर्यंत चांदीच्या उत्पत्तीपेक्षां सोन्याच्या उत्पत्तीला उत्तेजन जास्त मिळेल.

वरील गृहीत दाखल्यावरून असें दिसून येईल कीं, समतावह क्रियेनें द्विचलनपद्धति—अन्तर्राष्ट्रीय—असल्यास मुळींच ढांसळणार नाहीं. आणि याला इतिहासाचें प्रमाणही दाखवितां येतें. सन १५०० पासून सन १८७३ पर्यंत म्हणजे सुमारें चार शतकांच्या यूरोपच्या इतिहासाकडे पाहिलें असतां सोन्या-रुप्याच्या भावांमध्यें एकदम चलबिचल फारशी झाली नाहीं, असें पुढें [ ३५९

पानांत ] दिलेल्या कोष्टकावरून दिसून येईल. याचें कारण या सर्व काळांत यूरोपच्या बहुतेक सर्व देशांत द्विचलनपद्धति सुरू होती. यामुळें थोड्याशा फरकानें सोन्यारुप्याचा भाव बराच स्थिर होता. त्यामध्यें फरक झाला तरी तो हळूहळू झाला. त्यानें व्यापाराला एकदम धक्का बसला नाहीं. १८७३ च्या पूर्वीच्या सत्तर वर्षांतली भावाची स्थिरता तर विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. १८०१ पासून १८१० पर्यंत किंमतीनें चांदीची उत्पत्ति सोन्याच्या तिप्पट होती, तर १८५६ ते ६० या सालांत सोनें रुप्याच्या तिप्पट निघूं लागलें. तरीसुद्धां सोन्यारुप्याचा भाव स्थिर राहिला. नेपोलियनच्या काळच्या लढाया व अमेरिकेंतील अन्तर्युद्ध, इतक्या जगास खळबळून टाकणाऱ्या घडामोडींतही सोन्यारुप्याचा भाव स्थिर राहिला. परंतु १८७३ पासून मात्र या भावांत क्रांतिकारक फरक पडत चालला; तो कां याचें विवेचन पुढें येईल. आतां अन्तर्राष्ट्रीय द्विचलनपद्धतीच्या योजनेचे फायदे दाखवून हा तात्विक वाद संपविणें बरें.

अन्तर्राष्ट्रीय द्विचलनाचे फायदे अगदीं उघड आहेत. सोन्यापेक्षां रुप्याची किंमत एकंदरींत जास्त स्थिर असे असें पूर्वेतिहास सांगतो. तेव्हां जर कायम भावानें सोन्यारुप्याची सांगड घालून दिली तर दोन्ही धातू जास्त स्थिरपदाप्रत पावतील. सर्व जगामध्यें लोकवस्ती वाढत आहे व उद्योगवृद्धि होत आहे. अशा वाढत्या लोकवस्तीला व वाढत्या व्यापारधंद्याला वाढत्या पैशाचा पुरवठा पाहिजे. द्विचलनानें असा पुरवठा जास्त वाढवितां येईल. शिवाय संपत्तीच्या वाढीबरोबर सोन्यारुप्याचा कलाकौशल्याच्या कामाला जास्त उपयोग होतो. यामुळें त्या कामाला सोनेंरुपें जास्त लागतें. मोठ्या प्रमाणावरील व्यापारानें नाण्याची झीजही जास्त वाढते. ही झीज भरून काढण्याकरितां दर वर्षास बरें-च सोनेंरुपें लागतें. परन्तु यापेक्षां मोठा फायदा म्हणजे सर्व जगाची चलनपद्धति एक होईल आणि सोनें वापरणारे देश व चांदी वापरणारे देश यांच्या व्यापारा-मधील अनिश्चितता नाहींशी होईल. या योगानें सर्व जगाचा व्यापार वाढेल. ज्या ठिकाणीं भांडवल कमी आहे त्या ठिकाणीं तें सहज जाईल. औद्योगिक बा-बतींत मागासलेल्या देशाची भरभराट जलदीनें होईल. सारांश, चलनाच्या बाब-तींत सर्व ठिकाणीं एक पद्धति असणें हें ज्याप्रमाणें सर्वस्वी फायद्याचें आहे;

ज्याप्रमाणें पोस्टाच्या कामांत सुधारलेल्या जगांत संगनमत झालेलें आहे; ज्याप्रमाणें रेल्वेच्या बाबतींतही निरनिराळ्या देशांतील पद्धतीमध्यें एकसूत्रीपणा आणलेला आहे; त्याप्रमाणेंच पैशाच्या बाबतींत सर्व जगाचा जर एकोपा होईल तर ती गोष्ट इष्ट आहे यांत शंका नाहीं. शिवाय वरील दाखल्यांत सांगितल्याप्रमाणें प्रत्येक देशाचें स्वातंत्र्य यांत कमी होत नाहीं, किंवा त्याची व्यवस्था नाहींशी होत नाहीं, किंवा देखरेख कमी होत नाहीं. तसेंच कोणत्याही देशाच्या प्रत्यक्ष व्यवहारांतील चलनांत फरक होण्याचें कारण नाहीं. इंग्लंडचे पौंड राहतील; जर्मनीचा मार्क राहील; फ्रान्सचा फ्रँक राहील; अमेरिकेचा डॉलर राहील. देशाच्या अन्तर्व्यवस्थेंत कांहीं एक फरक करण्याचें कारण नाहीं; टांकसाळीचा अधिकार ज्या त्या देशाचाच राहील. द्विचलनाच्या अन्तर्राष्ट्रीय प्रचारास फक्त दोन गोष्टी पाहिजेत. एक, सर्व राष्ट्रांनीं मिळून सोन्या-रुप्यामधील भाव संगनमतानें ठरवावयाचा व दुसरी, टांकसाळी दोन्ही धातूंच्या नाण्यांना खुल्या ठेवून दोन्ही धातूंचीं नाणीं अमर्याद कायदेशीर फेडीचीं चलनें बनवावयाचीं. यामुळें इंग्लंडमध्यें शिलिंगाऐवजीं ठरलेल्या भावाच्या प्रमाणानें पूर्ण वजनाचीं शिलिंगाचीं नाणीं पाडून तीं पूर्ण कायदेशीर फेडीचें चलन करावीं लागतील. म्हणजे त्याचें उपपैशाचें रूप काढून त्याला पैशाचें रूप द्यावें लागेल. बाकीच्या देशांमध्यें कोणताच विशेष फरक करण्याचें कारण नाहीं. वर दिलेल्या गोष्टी संगनमतानें एकसमयावच्छेदेंकरून १८७३ मध्यें किंवा त्या सुमारास सर्व राष्ट्रांनीं जर केल्या असत्या तर सर्व जगांत अंतर्राष्ट्रीय चलनपद्धति सहज अंमलांत आली असती व द्विचलनवाद हा तात्विक वाद राहिला नसता.

परन्तु आतां द्विचलनपद्धति निव्वळ अर्थशास्त्राच्या ग्रंथांतच राहणार यांत शंका नाहीं. कारण जगाच्या प्रत्यक्ष व्यवहारांत ती आतां शक्य कोटीच्या पलीकडे गेलेली आहे. ज्याप्रमाणें निरनिराळे ग्रह एकत्र येण्याचा योग फार क्वचित् येतो व तो एकदां निघून गेला म्हणजे परत येत नाहीं, त्याप्रमाणें एका काळीं द्विचलनपद्धतीचा योग होता; परन्तु आतां तो नाहींसा झाला आहे व पुनः तो येण्याचा संभव दिसत नाहीं.

आतां असा प्रश्न निघतो कीं, जर शास्त्रीय दृष्टीनें द्विचलनपद्धति ही दोषरहित पद्धति आहे व ती सर्वस्वीं फायदेशीर आहे, तर मग हल्लींच्या सुधा-

रलेल्या सर्व राष्ट्रांचा एकचलनाकडे कल कां दिसून येतो? व बहुतेक सर्व देशां-नीं भराभर कोणत्याना कोणत्या रूपानें एकचलनपद्धति कां स्वीकारली? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, जगांत आकस्मिक कारणा म्हणून एक असतो. केव्हां केव्हां दोन गोष्टींपैकीं कमी फायद्याची गोष्ट प्रथमतः अस्तित्वांत येते; ती आक-स्मिकपणें घडलेली असली तरी तिचें अस्तित्व अनुकूल परिस्थितीमुळें कायमचें होतें व मग दुसऱ्या गोष्टीला जागा रहात नाहीं. ज्याप्रमाणें जड सृष्टीला गुरुत्वाकर्ष-णाचा नियम लागू आहे त्याचप्रमाणें तो मानसिक व व्यावहारिक सृष्टीलाही लागू आहे. एकदां आकस्मिक कारणानें कां होईना, परन्तु बरेचसे परमाणु एके जागीं आले कीं, गुरुत्वाकर्षणानें बाकीचे परमाणु त्या ठिकाणीं गोळा होतात व पूर्वी जेथें कांहीं नव्हतें तेथें एक जड पदार्थ तयार होतो व त्याला कायमपणा येतो. तीच स्थिति व्यवहारिक गोष्टींत होते. सुधारलेल्या जगांत एकचलनाकडे प्रवृत्ति कां व कशी झाली, हें खालील युरोपच्या पैशाच्या संक्षिप्त इतिहासावरून दिसून येईल.

युरोपमध्यें मध्ययुगाच्या प्रथमपादांत तांबें व चांदी यांचींच बहुशः नाणीं होतीं. अमेरिकेच्या शोधानंतर युरोपमध्यें सोन्याचीं नाणीं प्रचारांत येऊं लागलीं. १४ व १५ व्या शतकांत सोन्यारुप्याची फारशी पैदास झाली नाहीं. व्यापा-राच्या वाढीमुळें पैशाची किंमत वाढली व पदार्थांच्या किंमती कमी झाल्या. या काळांत चांदीची फारशी पैदास झाली नाहीं. यामुळें सोन्यारुप्याच्या भावांत फरक झाला. १२ ते १ पासून ९ ते १ वर भाव आला. परंतु दोन तीन शतकें सामान्यतः १० ते १ च्या सुमारास हा भाव आंदोलत होता. या सर्व काळांत व पुढेंही १८१६ पर्यंत प्रत्यक्ष व्यवहारांत युरोपच्या सर्व देशांत द्विचलनपद्धतीच चालू होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु ती आपोआप व न कळत उत्पन्न झालेली होती. ती सर्वांच्या संगनमताची, व्यवस्थित स्वरूपाची व मुद्दाम घड-वून आणलेली नव्हती. म्हणून त्यापासून कांहीं कांहीं तोटे होत. प्रत्येक देश सोन्यारुप्याचा भाव आपापल्याच मतानें ठरवी. यामुळें फ्रान्समध्यें एक भाव तर इंग्लंडमध्यें दुसराच भाव, असा प्रकार होई. या अव्यवस्थितपणामुळें दोन धातूंच्या नाण्यांमध्यें फरक पडे. कारण ग्रेशॅमच्या सिद्धांताची अम्मलबजावणी सुरू होई. परंतु १६ व्या शतकांत अमेरिकेंतील चांदीच्या खाणी सांपडल्या व त्यानें युरोपांत किंमतींत विलक्षण क्रांति होऊं लागली. ही क्रांति १६६० मध्यें

पुरी झाली. तेव्हां सोन्यारुप्याचा भाव १. ते १५ या प्रमाणावर आला. तेव्हांपासून बहुतेक १९ व्या शतकापर्यंत साधारणतः हा भाव बराच स्थिर राहिला. या काळांत सोन्यारुप्याच्या पैदाशींत किती वेळां तरी कमीजास्तपणा झाला, तरी सोन्यारुप्याच्या भावाच्या प्रमाणांत म्हणण्यासारखा फरक झाला नाहीं. याचें श्रेय द्विचलनपद्धतीला आहे. परंतु आकस्मिक कारणांनीं युरोपांतील इतर देशांतील कायद्यानें ठरलेला भाव हा चांदीला अनुकूल होता तर तो इंग्लंडमध्यें सोन्याला अनुकूल होता. यामुळें इंग्लंडमध्यें सोन्याचें नाणें विशेष प्रचारांत आलें तर फ्रान्समध्यें चांदीचीं नाणीं विशेष प्रचारांत आलीं. सर्व युरोपमध्यें इंग्लंडची औद्योगिक व व्यापारी बाबतींत सर्वांत जास्त भरभराट होती. नेपोलियनच्या काळामध्यें सर्व युरोपांत लढाया चालू होत्या, यामुळें युरोपांतील उद्योगधंदे मागें पडल्यासारखे झाले. परंतु इंग्लंडमध्यें पूर्ण शांतता होती; व जरी इंग्लंडनें नेपोलियनविरुद्ध पुढाकार घेतला व जरी इंग्लंडनेंच युरोपांतल्या सर्व देशांना नेपोलियनविरुद्ध लढण्यास पैसा पुरविला, तरी या घडामोडींनीं इंग्लंडच्या व्यापारावर अनिष्ट परिणाम न होतां उलट इंग्लंडचें व्यापारी वर्चस्व जास्तच दृढतर झालें. १८१५ मध्यें नेपोलियनचा पराजय होऊन इंग्लंड या भयंकर युद्धामधून विजयश्रीनें मंडित असें बाहेर पडलें व या युद्धाच्या समाप्तीनंतर तर इंग्लंडमध्यें व्यापारास जास्तच जोर आला. या वेळीं चांदीचा भाव उतरत जाणार अशी धास्ती इंग्लंडांतील मुत्सद्यांना पडली होती व यामुळें सोनें ही धातु पैशाच्या द्रव्याला जास्त स्थिर व सोईची आहे असा समज झाला होता. शिवाय इंग्लंडला उद्योगधंद्याच्या व व्यापाराच्या भरभराटीनें संपन्नता आली होती. यामुळें जास्त किंमतीचीं सोन्याचीं नाणींच एकंदरींत चांगलीं, असा समज होऊन १८१६ मध्यें इंग्लंडनें सोन्याची एकचलनपद्धति स्वीकारली. या काळीं इंग्लंडच संपन्नतेंत, व्यापारांत व एकंदर राज्यविस्तारांत प्रमुख पदाप्रत पावलेलें असल्यामुळें इंग्लंडच्या संमतीखेरीज कोणतीच गोष्ट होणें अशक्य झालें; व इंग्लंडनें आपली चलनपद्धति न बदलण्याचा निश्चय चालविल्यामुळें इतर सर्व राष्ट्रांना–इंग्लंडचें अनुकरण करण्याच्या बुद्धीनें ह्मणा किंवा नाइलाज ह्मणून ह्मणा–एकामागून एक एकचलनपद्धतीचा स्वीकार करावा लागला. याप्रमाणें येथें गुरुत्वाकर्षणाचें तत्व लागू झालें. नेपोलियनच्या लढाईंत पोर्तुगालला इंग्लंडनें मदत केली होती.

यामुळें या दोन देशांमध्यें सलोखा जास्त होऊन व्यापारी करारमदारही एकमेकांना सवलती देण्याच्या तत्वावर झाले. यामुळें पोर्तुगालनेंही १८५४ मध्यें सोन्याचें एकचलनी नाणें सुरू केलें. याप्रमाणें चांदीची मागणी दोन देशांत अगदींच कमी झाली. त्याचा परिणाम बाजारभावाची चलबिचल होण्यांत होऊं लागला. फ्रान्समध्यें तर द्विचलनपद्धति सुरू होती; परंतु एकट्या देशाला अशी पद्धति चालू ठेवणें जड जाऊं लागलें. यामुळें १८६५ मध्यें फ्रान्सनें बेल्जम, इटली, व स्विटझर्लंड या चार देशांमिळून लॅटिन युनियन म्हणून नाण्यासंबंधीं संगनमतानें द्विचलनपद्धति व्यवस्थित स्वरूपावर सुरू केली. या युनियनमध्यें ग्रीस देश १८६४ मध्यें सामील झाला व पुढें वेळोवेळीं स्पेन, रोमानिया, सर्व्हिया व बल्गेरिया या देशांनीं आपली नाण्यांची पद्धति लॅटिन युनियनच्या पद्धतीशीं जुळती केली. ते देश या युनियनचे सभासद झाल्याप्रमाणेंच झाले. याप्रमाणें एकीकडे द्विचलनपद्धतीला जास्त व्यवस्थित स्वरूप येत चाललें, तोंच दुसरीकडे एकचलनपद्धतीला जोर येत चालला. १८७० मध्यें फ्रान्स व जर्मनी या दोन देशांमध्यें भयंकर युद्ध झालें व त्यांत फ्रान्सचा पूर्ण पराभव होऊन फ्रान्सला ४ अब्ज रुपये खंडणी जर्मनीला द्यावी लागली. आपल्या देशांत येणाऱ्या या मोठ्या रकमेचा फायदा घेऊन जर्मनीनें सोन्याची एकचलनपद्धति सुरू करण्याचा निश्चय केला. इंग्लंडची भरभराट होण्याचें एक कारण त्याची सोन्याची एकचलनपद्धति होय, अशी समजूत जर्मनींतील मुत्सद्यांची झाली होती; म्हणून १८७३ सालीं जर्मनीनें सोन्याचें एकचलनी नाणें सुरू करून देशांतील सर्व चांदीचें नाणें वितळून विकावयास काढलें. सर्व जर्मनीचें आतां एक राष्ट्र बनलें होतें. एवढ्या मोठ्या देशाची चांदीची वार्षिक मागणी कमी होऊन चांदीचा बाजारांतील पुरवठा वाढला. या दुहेरी कारणानें चांदीचे भाव भराभर उतरत चालले. गाडी उताराला लागावी तशी चांदीची स्थिति झाली. ही सर्व स्वस्त चांदी फ्रान्सच्या लॅटिन युनियनच्या टांकसाळींत येऊं लागली व आतां फ्रान्सची द्विचलनपद्धति म्हणजे आपल्या शत्रूला दुहेरी फायदा करून देणारी संस्था भासूं लागली. म्हणून आपल्या देशांत जर्मनीच्या स्वस्त चांदीचा पूर लोटूं नये म्हणून लॅटिन युनियननें चांदीचीं नाणीं टांकसाळींत न पाडण्याचा कायदा करून या पुराच्या

आंत येण्याला प्रतिरोध केला. या काळीं फ्रान्स व लॅटिन युनियनचे इतर समासद व युनायटेड स्टेट्स यांनीं सर्व प्रमुख राष्ट्रांच्या संमतीनें सर्व देशांत द्विचलनपद्धति सुरू करण्याबद्दल पुष्कळ खटपटी केल्या. यासंबंधानें चार कॉन्फरन्सेस झाल्या. परंतु त्यांचा निकाल पूर्वी ठरल्यासारखाच होता. द्विचलनपद्धतीनें इंग्लंडांतील लोकांचें नुकसान होणार होतें. कारण, इंग्लंडनें सर्व जगाला कर्ज पुरविलें होतें. उतरत्या पैदाशीच्या स्थितींत ज्याप्रमाणें जमिनीचा खंड आपोआप वाढत जातो, त्याप्रमाणें इंग्लंडचें कर्ज महाग होत जाणाऱ्या सोन्याच्या नाण्यांत असल्यामुळें इंग्लंडचें व्याजाचें उत्पन्न आपोआप वाढत चाललें होतें. जर्मनी तर आपल्या नव्या एकीच्या, नव्या सामर्थ्याच्या व नुकत्याच मिळालेल्या विजयश्रीच्या कुर्यांत होता. तेव्हां जर्मनीही आपली नवी पद्धति बदलण्यास तयार होईना. शिवाय बरींच शतकें कायम असलेला सोन्यारुप्यांतील भाव नाहींसा होऊन तो दिवसेंदिवस खालीं खालीं जात चालला. यामुळें सर्व राष्ट्रांचें हल्लीं कोणता भाव ठरवावा, या संबंधांत एकमत होईना. कारण, प्रत्यक्ष बाजारभाव कायम करावा तर फ्रान्स व लॅटिन युनियन यांचें फार नुकसान होणार व लॅटिन युनियनचा कायद्याचा भाव ठरवावा तर त्यामध्यें व बाजारभावांत आतां फार अंतर पडलें होतें. तेव्हां चांदीचा भाव कायद्यानें वाढविला तरी तो खरोखरी वाढेल किंवा नाहीं हें अनिश्चित होतें. यामुळें हे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. अमेरिकेमध्यें चांदीच्या खाणी पुष्कळ असल्यामुळें चांदी सर्व जगानें पैशाचें द्रव्य ह्मणून स्वीकारावें अशी अमेरिकेची फार इच्छा होती. द्विचलनपद्धतीचा प्रसार सुलभ व्हावा ह्मणून अमेरिकन सरकारनें अमुक चांदी दर वर्षास खरेदी केलीच पाहिजे असे कायदेही केले. याच उद्देशानें ब्लँड कायदा १८७८ मध्यें केला गेला. शरमॅन कायदा १८९० मध्यें केला गेला. यानें अमेरिकेमध्यें चांदीचें नाणें विपुल झालें व सोनें देशांतून पार नाहींसें झालें. युरोपच्याबाहेर रुप्याच्या उतरत्या भावानें हिंदुस्थानच्या तिजोरीवर वाईट परिणाम होऊं लागला. हिंदुस्थानांतून इंग्लंडला होमचार्जेस या नांवानें पैसे पाठवावे लागत. त्या पैशाची रुपयांत रक्कम फुगत चालली व हिंदुस्थान सरकारला आपल्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याची पंचाईत पडूं लागली. कारण या सर्व घडामोडींनें चांदीच्या भावाला जी एकदां उतरती गति मिळाली ती सारखी चालू राहिली. १८७३

-या सालीं संपणाऱ्या १०० वर्षांमध्यें सोन्यारुप्याचा भाव १ ते १५-१५॥ होता. ह्मणजे सोन्यारुप्याच्या पैदाशींत कमीजास्तपणाचा कितीही फरक झाला तरी जो भाव एक शतकपर्यंत स्थिर राहिला, तोच भाव १८७३ पासून १८९३ पर्यंतच्या अवघ्या वीस वर्षांत १ ते २६ वर आला. ह्मणजे सुमारें दीडपटीच्याही वर गेला. यामुळें हिंदुस्थानसरकारचें धाबें दणाणलें, व आपल्या तिजोरीचें दिवाळें निघणार, तेव्हां नाण्यासंबंधीं कायदा केला पाहिजे म्हणून त्यांनीं कांहीं सूचना स्टेट सेक्रेटरीकडे पाठविल्या. त्यांचा विचार करण्याकरितां हर्शेल या गृहस्थाच्या अध्यक्षतेखालीं हर्शेल कमिटी नेमण्यांत आली. तिच्या सूचनेप्रमाणें १८९३ च्या अखेर हिंदुस्थानसरकारनें आपल्या टांकसाळी बंद केल्या व रुपयांची संख्या कमी करून रुपयांची कृत्रिम रीतीनें किंमत वाढवून आपल्या हुंडणावळीच्या अडचणींतून पार पाडण्याचा मार्ग काढला. या कायद्यानें रुप्याची भली मोठी मागणी कमी झाली; व चांदीचा भाव आणखी उतरत चालला. हिंदुस्थानांत याप्रमाणें चांदीचें खुलें नाणें बंद झाल्याबरोबर अमेरिकेनें आपला शारमॅन कायदा रद्द केला. याप्रमाणें अमेरिकेला द्विचलनपद्धतीच्या प्रसाराचा मार्ग सुलभ करण्याचा प्रयत्न सोडून द्यावा लागला. हिंदुस्थानच्या व अमेरिकेच्या या दोन कायद्यांनीं रुप्याचा भाव फारच कमी झाला. १८९० मध्यें जो भाव १९$\frac{3}{4}$ ते १ या प्रमाणांत होता तो अवघ्या चार वर्षांत म्हणजे १८९४ मध्यें ३२$\frac{1}{2}$ ते १ या प्रमाणांत गेला. अमेरिकेनें आणखी कांहीं वर्षें चांदीच्या प्रसाराकरितां खटपट केली. परन्तु ती खटपट अरण्यरुदनवत् होती. देशामागून देशानें इंग्लंड व जर्मनी यांचें अनुकरण केलें व सोन्याची एकचलनपद्धति सुरू केली. उदाहरणार्थ, १८९२ मध्यें ऑस्ट्रिया देशानें सोन्याचें एकचलन कायदेशीर केलें; चिली देशानें १८९५ मध्यें तोच मार्ग स्वीकारला; शेवटीं रशिया आणि जपान या दोन राष्ट्रांनीं १८९७ मध्यें सोन्याच्या नाण्याचा स्वीकार केला. हिंदुस्थानांत १८९३ मध्यें जें धोरण स्वीकारलें गेलें त्यानें हुंडणावळीवर इष्ट तो परिणाम होत चालला. सुरू केलेल्या धोरणाची परिपूर्णता करण्याचें हिंदुस्थानसरकारनें १८९९ मध्यें ठरविलें. हिंदुस्थानांत सोन्याचा पौंड हा कायदेशीर फेडीचें चलन केला. मात्र रुपया जरी आतां उपपैसा झाला, तरी तो अमर्याद प्रमाणांत चालवयाचें ठरलें. १९०० मध्यें अमेरिकेनें शेवटीं सोन्याचीच

एकचलनपद्धति स्वीकारली.

याप्रमाणें जगांतील प्रमुख राष्ट्रांच्या चलनपद्धतीचा इतिहास आहे. सर्व जगांत एकचलनपद्धतीचा भराभर अंगीकार कसा झाला, हें त्यावरून दिसून येईल. एकचलनपद्धति व द्विचलनपद्धति यांमध्यें पुष्कळ काळपर्यंत सारखें युद्ध चालू होतें व कांहीं काळपर्यंत कोणत्या पद्धतीचा जय होईल हें सांगणें कठीण होतें. तात्विकदृष्ट्या द्विचलनपद्धतीचा विजय व्हावयास पाहिजे होता; परन्तु जगांत तात्विक दृष्टीनें सर्व गोष्टी घडतात असा नेम नाहीं. त्यांमध्यें आकस्मिकपणा म्हणून एक भाग असतो. त्याचप्रमाणें येथें प्रकार झाला. आकस्मिक कारणांनीं इंग्लंडांतील नाणें सोन्याचेंच बहुशः झालें होतें. इंग्लंडाच्या वाढत्या व्यापाराच्या योगानें इंग्लंड संपन्न होत चाललें होतें; चांदीचा भाव उतरत जाणार कीं काय अशी शंका त्या वेळेच्या मुत्सद्यांना वाटली. यामुळें १८१६ मध्यें इंग्लंडनें सोन्याची एकचलनपद्धति स्वीकारली. सारख्या सामर्थ्याच्या टग ऑफ वॉरच्या खेळामधील खेळाडूंच्या दोन पक्षांत विजयश्री कोणत्या पक्षाला माळ घालील हें सांगणें ज्याप्रमाणें कठीण असतें, त्याप्रमाणें १८१६ पासून १८७३ पर्यंत एकचलन व द्विचलन यांमध्यें कोणीकडे विजयश्री जाईल हें सांगणें कठीण होतें. परन्तु १८७३ मध्यें जर्मनीनें इंग्लंडचा मार्ग स्वीकारला. मग ज्याप्रमाणें टग–ऑफ–वॉरमध्यें कांहीं काळपर्यंत दोन्ही बाजू सारख्या जोराच्या राहून दोरी मधल्यामध्यें राहावी, परंतु एकदां कां एकीकडे जोर झाला म्हणजे मग मात्र दुसऱ्या बाजूचे गडी फरफटत ओढीत नेले जावे, त्याप्रमाणें इंग्लंड व जर्मनी या दोन बलाढ्य राष्ट्रांची शक्ति एकवटल्यामुळें एकचलनपद्धतीच्या बाजूचा जोर जास्त झाला. व जरी लॅटिन युनियन व अमेरिका यांनीं द्विचलनाच्या बाजूला बरीच ओढ धरली तरी या चलनयुद्धाचा शेवट ठरल्यासारखाच झाला, व मागें लिहिल्याप्रमाणें हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशानें चांदीला निर्निष्कत्व दिल्याबरोबर एकचलन व द्विचलन यांमधील युद्ध संपून सर्व देश एकचलनपद्धतीकडे फरफटत नेले गेले.

# भाग नववा.

## हिंदुस्थानांतील नाणीं व त्यांची चलनपद्धति.

हिंदुस्थानच्या सुधारणेच्या अत्यंत पुराणत्वामुळें व हिंदुस्थानच्या पूर्वकाळच्या इतिहासाच्या अभावामुळें हिंदुस्थानांतील नाणीं हा विषय अर्थशास्त्राचा न राहतां तो हल्लीं पुराणवस्तुसंशोधनशास्त्रापैकीं एक महत्त्वाचा भाग आहे; परंतु आपल्याला या दृष्टीनें येथें मुळींच विचार करावयाचा नाहीं. एवढें खरें कीं, नाण्याची कल्पना हिंदुस्थानांत बऱ्याच जुन्या काळापासून ठाऊक आहे, यांत शंका नाहीं. संस्कृतांतील आद्यग्रंथ जो ऋग्वेद त्यामध्यें नाण्याची कल्पना दिसत नाहीं. ऋग्वेदकाळच्या ऋषींना सोनें व लोखंड या धातू माहिती होत्या ही गोष्ट निर्विवाद आहे. आतां त्यांचा पैशासारखा उपयोग होई किंवा नाहीं, हें सांगतां येणें कठीण आहे. परंतु इतर देशांत ज्याप्रमाणें पैशाची उत्क्रांति होत गेली तशी येथेंही झाली असली पाहिजे हें उघड आहे. गोपालवृत्ति समाजांत गुरें हीं पैशासारखीं उपयोजिलीं जातात. असें समाजशास्त्र सांगतें; व संस्कृत भाषेंतील कांहीं कांहीं वाक्यांवरून त्या स्थितींतून आर्यलोक गेले असले पाहिजेत असें उघड उघड दिसतें. 'इतर वस्तूंचें मोल अमुक गाई होतें' किंवा 'अमुक गाई पारितोषिक मिळालें' अशा प्रकारचे शब्दप्रयोग जुन्या काळच्या संस्कृत–वाङ्मयांत सांपडतात. यावरून आर्य लोक गोपालवृत्तीमधून गेले असले पाहिजेत व त्या काळीं गुरांचा पैशासारखा उपयोग होत असला पाहिजे, इतकें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. परंतु सोन्याच्या धातूची माहिती झाल्यापासून लवकरच सोनें पैशासारखें उपयोगांत येऊं लागलें असलें पाहिजे. अशोक राजाच्या कारकीर्दीमध्यें नाण्याचा प्रसार चांगलाच झाला होता. कारण त्याच्या काळचीं पुष्कळ नाणीं सांपडलेलीं आहेत. तेव्हां सुमारें इसवी सनाच्या पूर्वी तीनशें वर्षांपासून हिंदुस्थानांत सोन्यारुप्याच्या नाण्यांचा प्रचार दिसून येतो यांत शंका नाहीं.

परंतु हिंदुस्थानची या बाबतींत इतिहासाच्या अभावामुळें संगतवार माहिती मिळणें शक्य नाहीं. शिवाय, हिंदुस्थानामध्यें पूर्वकाळीं हजारों स्वतंत्र राज्यें

होतीं. अर्थात् हिंदुस्थान हें एका खंडासारखें होतें; व ज्याप्रमाणें युरोपांतील चलनपद्धति या शब्दप्रयोगाला अर्थ नाहीं, तसाच प्रकार हिंदुस्थानांत होता. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या तऱ्हेचीं नाणीं चालू असत. परंतु सामान्यतः हिंदुस्थानांत बरींच शतकेंपर्यंत स्वाभाविक द्विचलनपद्धति सुरू होती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्मणजे येथेंही युरोपसारखीच स्थिति होती. हिंदुस्थानचा बराच मोठा भाग अकबराच्या कारकीर्दींतच एकछत्राखालीं आला व त्या राज्यांतील सर्व सुधारणेबरोबर नाण्यांच्या पद्धतीलाही व्यवस्थित स्वरूप दिलें गेलें, असें ऐने अकबरीवरून दिसतें. या ग्रंथांत यासंबंधीं बरीच माहिती दिलेली आहे. पूर्वी नाण्यांच्या टांकसाळी पुष्कळ ठिकाणीं असत व त्या खाजगी होत्या; परंतु अकबरानें हा सर्व घोटाळा मोडून टांकसाळीचे मुख्य व गौण असे भेद करून त्यांची एकंदर संख्या कमी केली. सर्व प्रकारच्या नाण्यांच्या चारच मुख्य टांकसाळी ठरविल्या. एक आग्र्यास, एक बंगाल्यांत, एक अमदाबादेस गुजराथेंत व एक काबुलांत. रुपें व तांबें यांचीं फक्त नाणीं पाडण्याकरितां आणखी दहा ठिकाणीं परवानगी दिली होती व तांब्याचे पैसे पाडण्याकरितां विस्तीर्ण देशभर आणखी २४ ठिकाणें ठरविलीं होतीं.

ऐनेअकबरींत अकबराचे काळीं चालू असलेल्या नाण्यांची माहिती दिलेली आहे. त्यांचा आकार कसा होता, त्यांचें वजन किती होतें, दुसऱ्या नाण्यांशीं कोणत्या प्रमाणांत त्यांचा विनिमय होई, त्यांवर काय अक्षरें व वाक्यें खोदलेलीं होतीं, वगैरे हकीकत ऐनेअकबरीवरून मिळते. यावरून अकबराचे काळीं सोनें, रुपें व तांबें अशा तीन धातूंचीं नाणीं पाडीत असत असें दिसतें. सोन्याचीं नाणीं पुष्कळच जातीचीं होतीं. रुप्याचें नाणें रुपये हें होतें व तांब्याचें नाणें दाम हें होतें. सर्व मुसलमानी रियासतींत बहुतेक सर्व हिंदुस्थानांत स्वाभाविक द्विचलनपद्धतीच चालू होती. होन, मोहोर, दिनार हीं सोन्याचीं नाणीं सामान्यतः असत. विशेष प्रचारांतील सोन्याचें नाणें म्हणजे मोहोर हेंच होय. हा शब्द पर्शियन भाषेंतील असून त्याचा अर्थ 'शिक्का' असा आहे. तेव्हां सोन्याच्या तुकड्यावर राजाचा शिक्का उठवून नाणीं पाडण्याची रीत त्या वेळीं होती असें शब्दाच्या व्युत्पत्तीवरून दिसतें.

शिवाजीच्या काळीं दक्षिणेंत होन जास्त प्रचारांत असत असें वाटतें. कारण,

शिवाजीच्या अष्टप्रधानांचे पगार होनांत ठरलेले होते असें बखरींवरून दिसतें. शिवाजीला राज्य मिळाल्यावर त्यानें आपल्या नांवाचे पैसे अगर शिवराई पाडले. शिवाजीनें आपल्या नांवाचा रुपयाही पाडला होता; परंतु या दोन नाण्यांपैकीं रुपया फार रूढ झाला नाहीं. परंतु पैसा मात्र सर्व दक्षिण-महाराष्ट्रांत व कर्नाटकांत, इतकेंच नव्हे तर जिकडे जिकडे मराठी राज्याचा विस्तार झाला त्या सर्व प्रांतांत, शिवराई म्हणून पसरला व पूर्णपणें रूढ झाला. मराठेशाहीमध्यें टांकसाळीचें काम सरकारनें हातीं घेतलें नाहीं. टांकसाळी खासगी लोकांच्याच असत. तरी पण टांकसाळी काढण्यास सरकारी परवानगी लागे. महाराष्ट्रांतही त्या काळीं पुष्कळ शिक्कयांचीं रुप्याचीं व सोन्याचीं नाणीं चालत असत; परंतु रुपयाचा प्रचार जास्त दिसतो.

एथपर्यंत हिंदुस्थानांतील चलनपद्धतींचा संक्षिप्त इतिहास दिला. या सर्व काळांत हिंदुस्थानची चलनपद्धति हा शब्दप्रयोग फारसा अन्वर्थक नव्हता. सर्व देशांत सोन्यारुप्याचीं नाणीं चालत एवढें खरें; परंतु निरनिराळया प्रांतांत निरनिराळीं नाणी असत व त्यांचीं वजनें, आकार वगैरेमध्येंही हवे तितके भेद असत. तसेंच निरनिराळया प्रांतांच्या नाण्यांत हिणकसपणाही कमजास्त असे. यामुळें त्या काळीं चलनपद्धतीला व्यवस्थेचें व ठराविक स्वरूप येणें शक्य नव्हतें. नाणीं याप्रमाणें विविध असल्यामुळें तीं तोलून व पारखून घेण्याची पद्धति सुरू होती. परंतु ब्रिटिश अंमलांत हिंदुस्थानांत आजपर्यंत घडून न आलेली गोष्ट घडून आली. म्हणजे काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व द्वारकेपासून पुरीपर्यंत हा सर्व अवाढव्य देश एकाच राजकीय छत्राखालीं आला, व तेव्हांपासून हिंदुस्थानची व्यवस्थित चलनपद्धति सुरू होणें शक्य झालें. पहिल्यापासूनच कंपनी रुपये पाडी. हे कंपनीचे रुपये योग्य वजनाचे व योग्य कसाचे असल्यामुळें पहिल्यापासूनच ते लोकप्रिय असत. सर्व लोक कंपनीचे रुपये तोलल्याखेरीज निव्वळ मोजून घेण्यास तयार असत. कारण, त्यांत लबाडी असावयाची नाहीं अशी लोकांची खात्री होती. पुढें कंपनीच्या हातीं सर्व हिंदुस्थानचीच राज्यसूत्रें आलीं व त्यांच्या राज्याचा वृक्ष सर्व हिंदुस्थानभर पसरला. तेव्हां अर्धवट व अव्यवस्थित द्विचलनपद्धति असमाधानकारक वाटूं लागली. शिवाय १८१६ मध्यें इंग्लंडांत सोन्याचें एकचलन कायमचें स्थापित झालें. तेव्हां हिंदुस्थान हा देश गरीब

आहे, हिंदू लोकांना सोन्यापेक्षां रुपें जास्त आवडतें वगैरे प्रकारच्या इंग्रजी अंमलदारांच्या समजामुळें जरी हिंदुस्थानांत द्विचलनपद्धति होती तरी ती टाकून रुप्याची एकचलनपद्धति १८३५ मध्यें सुरू केली गेली. सर्व हिंदुस्थानच्या एक-चलनपद्धतीस याच वेळीं प्रारंभ झाला असें म्हटलें तरी चालेल. १८० ग्रेनचा रुपया हेंच एकटें कायदेशीर फेडीचें चलन ठरविलें गेलें. त्यांत १०० भारांत ९१ याप्रमाणें शुद्ध चांदी असते. चांदीला १८९३ पर्यंत टांकसाळी खुल्या होत्या. सारांश, हिंदुस्थानची १८९३ पर्यंत इंग्लंडप्रमाणेंच एकचलनपद्धति होती. मात्र सोन्याच्या ऐवजीं येथें चांदी ही कायदेशीर फेडीचें चलन ठरलें गेलें. १८३५ चा कायदा झाला तरी १८५२ पर्यंत सरकार सोन्याचीं नाणीं तिजोरींत स्वीकारीत असे. १८५४-५५ मध्यें ४१२००० पौंडांचें नाणें हिंदुस्थानांतून सरकारनें विलायतेस पाठविलें होतें. तसेंच, हिंदुस्थानांत सोन्याचा ओघही कमी नसे. १८६२ पासून १८७० पर्यंतच्या आठ वर्षांत हिंदुस्थानांत ५ कोटी पौंडांचें सोनें आलें असें दिसतें. १८६४ मध्यें सर चार्लस ट्रॅव्हेलिननें हिंदुस्थानांत ब्रिटिश पौंड हें सोन्याचें नाणें सुरू करावें अशा तऱ्हेची एक सूचनाही केली होती.

परंतु १८३५ मध्यें सुरू केलेली एकचलनपद्धति चांगल्या तऱ्हेनें चालत असल्यामुळें त्यांत फरक करण्याचें सरकारचे मनांत आलें नाहीं. परंतु मागील भागांत सविस्तरपणें वर्णन केलेल्या युरोपांतील घडामोडींनीं व चांदीच्या वाढत्या पैदाशीनें चांदीचा भाव १७८३ नंतर उतरणीस लागला. १८५८ मध्यें हिंदुस्थानचें राज्य प्रत्यक्ष राणीसरकारच्या हातीं गेल्यापासून हिंदुस्थानचा विलायतेंतील खर्च झपाट्यानें वाढत चालला होता. तसेंच, १८५७ सालच्या बंडाच्या शमनार्थ लागलेला खर्च व त्याच सुमारास हिंदुस्थानांत सुरू झालेल्या रेल्वेंचा खर्च यांनीं हिंदुस्थानचें कर्ज वाढत चाललें. होमचार्जेसचा खर्च भराभर वाढत चालला व हुंडणावळीचा भाव जसजसा उतरत चालला तसतसे हिंदुस्थानांतून दरवर्षी विलायतेस जास्त जास्त रुपये पाठविणें भाग पडूं लागलें. त्यामुळें अर्थातच हिंदुस्थानच्या तिजोरीची तारांबळ उडूं लागली; आणि हिंदुस्थानाला आपल्या चलनपद्धतींत फरक करण्याची अवश्यकता विशेषतः भासूं लागली. हुंडणावळीचा भाव वाढविण्याचा साधा उपाय म्हणजे रुपयांचा भाव कृत्रिम तऱ्हेनें वाढविणें हा होता. हिंदुस्थानसरकारला द्विचलनासंबंधी कोणतीहि सूचना

विलायतसरकारास करतां येईना. तेव्हां त्यांनीं आपला आपल्यापुरता विचार करून एक धोरण स्वीकारण्याचें मनांत आणलें व त्याच्या सिद्ध्यर्थ व्यवस्थित प्रयत्न सुरू केले. या सर्व प्रयत्नांत विलायतेंतील मुत्सद्यांची "तीन धूर्तांच्या गोष्टींतल्या" ब्राह्मणांसारखी स्थिति झाली. प्रथमतः १८७८ मध्यें कृत्रिम तऱ्हेनें रुपयाची किंमत वाढवून व चांदीचें नाणें पाडण्याचें बंद करून आपली अडचण भागविण्याची परवानगी हिंदुस्थानसरकारनें मागितली. परन्तु त्या वेळीं इंग्लंडांतील मुत्सद्यांनीं "कृत्रिम तऱ्हेनें पैशाची किंमत वाढविणें ठीक नाहीं; देशांतील चलनपद्धति सहज आपोआप चालणारी असावी; हेंच शास्त्रीय तत्व आहे. तेव्हां हिंदुस्थानसरकारनें चलनपद्धतींत ढवळाढवळ करणें चांगलें नाहीं." असा स्पष्ट अभिप्राय निःशंकपणें दिला. यामुळें ती गोष्ट तशीच राहिली. इकडे रुप्याचा भाव उतरत चालला व हिंदुस्थानसरकारच्या अडचणी दुणावत चालल्या. म्हणून हिंदुस्थानसरकारनें पुनः एकदां विलायतसरकारला लिहिलें. या दुसऱ्या खेपेला पहिल्याइतकें स्पष्ट, निःसंशय व जोरदार उत्तर विलायतसरकारकडून आलें नाहीं. हिंदुस्थानच्या म्हणण्याप्रमाणें करणें अवश्यक आहे कीं काय, अशी शंका विलायतसरकारास आली. तरी सूचना प्रत्यक्ष पास केली गेली नाहीं. परंतु १८९२ मध्यें ब्रुसेल्स शहरीं पैशाच्यासंबंधीं एकमतानें कांहीं तरी धोरण ठरविण्याच्या उद्देशानें भरविलेल्या कॉन्फरन्सची पूर्वीच्याच कॉन्फरन्सप्रमाणें अवस्था झाली. एकमतानें कांहींएक न ठरवितां कान्फरन्स उठलें. याच वर्षी रुपयाचा भाव १ शिलिंग १ पेन्सावर आला. "आतां मात्र आमचा तरणोपाय नाहीं. आम्हांला होमचार्जेसचा खर्च भागविणें अशक्य होणार." असा हिंदुस्थानसरकारनें विलायतसरकारला टेलिग्राम केला व पुनः आपल्या रुपयांची कृत्रिम रीतीनें किंमत वाढविण्याच्या सूचना विलायतसरकारकडे पाठविल्या. विलायत सरकारनें हर्शेलच्या अध्यक्षत्वाखालीं भरलेल्या कमिटीकडे या सूचना पाठविल्या. या कमिटीनें हिंदुस्थानच्या सूचनांचा साधकबाधक तऱ्हेनें विचार करून हिंदुस्थानसरकारच्या सूचनांस आपली मान्यता या खेपेस दिली; व या कमिटीच्या रिपोर्टानुरूप हिंदुस्थानसरकारनें १८९३ मध्यें टांकसाळी बंद केल्या.

हिंदुस्थानच्या औद्योगिक स्थितीवर या धोरणाचा सुपरिणाम होईल किंवा दुष्परिणाम होईल व अर्थशास्त्रदृष्ट्या स्वीकारलेलें हें धोरण बरोबर आहे किंवा

नाहीं, याबद्दल त्या वेळीं मोठमोठ्या मुत्सद्यांमध्यें तीव्र मतभेद होता. परंतु त्या वादांत येथें शिरण्याचें प्रयोजन नाहीं. जगांतील सोन्यारुप्याच्या भावांतील चलबिचलीनें उद्भवलेल्या अडचणी दूर करण्याचा खरा मार्ग म्हणजे प्रमुख राष्ट्रांनीं द्विचलनपद्धति संगनमतानें स्वीकारणें होय, हें मागच्या भागांत सविस्तरपणें दाखविलें आहे. परंतु ब्रिटिशसरकारच्या, आपली चलनपद्धति न बदलण्याच्या निश्चयामुळें हा मार्ग खुला नव्हता. तेव्हां हिंदुस्थानसरकारला दुसरा आपल्या हातचा शक्य तो मार्ग स्वीकारावा लागला व वर सांगितल्याप्रमाणें १८९३ मध्यें हिंदुस्थानसरकारनें चांदीला टांकसाळी बंद केल्या, व नवीन रुपये न पाडून त्यांची संख्या कमी करून रुपयाची किंमत कृत्रिम तऱ्हेनें वाढवून हिंदुस्थानसरकारनें आपल्या अडचणींतून पार पाडण्याची योजना अंमलांत आणिली. या कायद्यानें हिंदुस्थानच्या चलनपद्धतींत अजून फरक घडवून आणला नाहीं. चलनपद्धति एकचलनपद्धतीच राहिली. मात्र लोकांना चांदी देऊन रुपये पाडण्याचा हक्क राहिला नाहीं. या कायद्याचा इष्ट तो परिणाम होऊं लागला व हुंडणावळीचा भाव वाढत चालला. या कायद्यानें ठरविलेल्या भावावर—अर्थात् १ शिलिंग ४ पेन्सांवर—हुंडणावळीचा भाव येऊन ठेपला. पुढें हिंदुस्थानसरकारच्या धोरणाच्या परिणामाचा विचार करण्याकरितां १८९८ मध्यें फाउलर कमिटी नेमण्यांत आली. त्या कमिटीनें हिंदुस्थानांत सोन्याचें पौंड हें नाणें—१ शिलिंग ४ पेन्सांस एक रुपया या भावानें—कायदेशीर फेडीचें चलन करावें, असा अभिप्राय दिला. तदनुरूप १८९९ मध्यें हिंदुस्थानसरकारनें सोन्याच्या नाण्याची पद्धत स्वीकारली. यायोगें हिंदुस्थानांतील पद्धति लॅटिन युनियनच्या पद्धतीशीं समरूप झाली. या पद्धतीलाच अर्थशास्त्रकारांनीं 'लंगडी द्विचलनपद्धति' असें म्हटलें आहे. या पद्धतींत द्विचलनपद्धतीच्या तीन अंगांतील एक अंग कमी असतें. म्हणजे येथें दोन्ही धातूंचीं नाणीं अमर्याद प्रमाणांत चालतात; दोन्ही धातूंमधील भावाचें प्रमाण कायद्यानें ठरविलें जातें; मात्र दोन्ही धातू टांकसाळींत स्वीकारल्या जात नाहींत. तर एकचलनपद्धतीप्रमाणें एकच धातु—व ती सोनें ही—टांकसाळींत स्वीकारली जाते. हिंदुस्थानची हल्लीं अशीच चलनपद्धति आहे. येथें पौंड व रुपये हीं कायदेशीर फेडीचीं सारख्या दर्जाचींच चलनें आहेत. म्हणून हिंदुस्थानची चलनपद्धति सध्यां द्विचलनपद्धतीच्या जाती-

ची आहे. १५ ते १ हें प्रमाणही कायद्यानेंच ठरविलें आहे. टांकसाळींत सोनें घेऊन रुपये पाहून मिळतात. मात्र अजून येथल्या टांकसाळींत पौंड पाडूं लागले नाहींत. ते पाडण्याची तजवीज झाली म्हणजे मग लॅटिन युनियनच्या पद्धतीशीं हिंदुस्थानची पद्धति तंतोतंत जुळेल. हल्लींची हिंदुस्थानांत चालू असलेली किंमतीची घडामोड व विलक्षण क्रांति स्थिर करण्यास सरकारनें या मार्गाचें अवलंबन केलें पाहिजे असें पुष्कळ अर्थशास्त्रज्ञांचें मत आहे. म्हणजे हिंदुस्थानच्या चलनपद्धतीची संक्रमणावस्था जाऊन तिला शास्त्रीयदृष्ट्या एक ठाम असें स्वरूप येईल. तेव्हां पौंड व रुपया हीं हिंदुस्थानांतील सध्यां प्रमुख फेडीचीं चलनें होत. या मुख्य चलनांखेरीज उपपैसा म्हणून किरकोळ व्यवहाराकरितां हिंदुस्थानसरकार लहान लहान नाणीं पाडतें. त्यांची विशेष माहिती देण्याचें प्रयोजन नाहीं. १९०७ मध्यें हिंदुस्थानसरकारनें उपपैशांत आणखी एक भर घातली. ती चांगल्या स्वरूपाची आहे यांत शंका नाहीं. निकेल धातूचें एक आणा किंमतीचें एक नवें नाणें उपपैसा म्हणून सुरू केलेलें आहे. जरी कायद्याच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील हल्लींचा रुपाया हें मुख्य चलनांपैकीं आहे, तरी त्याला कृत्रिम किंमत दिली असल्यामुळे मागें या नाण्यानें रुपयांची किंमत त्यांतील धातुगत किंमतीपेक्षां जास्त आहे. म्हणजे रुपयाला हल्लीं सांकेतिक किंमत आहे व म्हणून रुपाया हा या दृष्टीनें उपपैशाच्या जातीचा आहे. मात्र त्याच्या फेडीच्या चलनाच्या कार्यभागाला उपपैशाप्रमाणें मर्यादा नाहीं इतकेंच कायदेशीर फेडीचें चलन, नाणकमत व धातुगत किंमतीचें ऐक्य व टांकसाळींतील मुक्तद्वार हे तीन गुण देशांतील प्रमुख पैशांत पाहिजेत. या दृष्टीनें हल्लीं हिंदुस्थानचें पौंड हेंच खरें नाणें आहे. कारण पौंडांत हे तिन्ही गुण आहेत असें मागें दाखविलें आहे.

येथें धात्वात्मक पैशाच्या निरनिराळ्या पद्धतींचा विचार व वर्णन पुरें झालें. परंतु मागें सांगितलेंच आहे कीं, देशाच्या आधिभौतिक प्रगतीबरोबर धातूचें नाणेंसुद्धां गैरसोईचें वाटूं लागतें व कागदी चलनी नोटांसारख्या अत्यंत हलक्या, पोस्टानें हव्या तिकडे पाठवितां येणाऱ्या, सहसा चोरलें न जाणाऱ्या व झीज व नाश न होणाऱ्या अशा कागदी चलनाची अवश्यकता भासूं लागते. सरकार व इतर संस्था देशांत कागदी चलन सुरू करतात. तेव्हां आतां या कागदी

चलनाचीं तत्त्वें काय, त्याचे प्रकार कोणते, त्याचें स्वरूप काय, वगैरे प्रश्नांचा विचार एका निराळ्या भागांत करणें इष्ट आहे. परंतु या विवेचनास लागण्यापूर्वी पैशासंबंधीच्या आणखी एका महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करावयाचा राहिला आहे. त्याचेंही विवेचन एका स्वतंत्र भागांतच करणें सोईचें होईल.

# भाग दहावा.

## धात्वात्मक पैशाच्या मोलाची मीमांसा.

पैशाच्या द्रव्यामधील गुणसप्तकाचा विचार करतांना असें सांगितलें होतें कीं, पैशाच्या द्रव्यांत उपयुक्तता—मोल व मोलाची स्थिरता हे गुण पाहिजेत. कारण ज्याच्यायोगानें सर्व पदार्थांचें मोल मोजलें जाणार, जो सर्व पदार्थांचा विनिमयसामान्य होणार, जो कालान्तरानें पुऱ्या होणाऱ्या देवघेवीचें परिमाण होणार व शेवटीं जो संपत्ति शिल्लक टाकण्याचें एक साधन बनणार, असा पैसा मोलवान् पाहिजे, इतकेंच नाहीं तर त्याचें मोल स्थिरही पाहिजे हें उघड आहे. परंतु मानवी गोष्टींत आत्यंतिक स्थिरता कोठेंच नसते. ती फक्त सापेक्षच आहे. म्हणजे इतर पदार्थांच्या मोलांत जितका जलद फरक होतो तितका जलद फरक पैशाच्या मोलांत होऊं नये अशा प्रकारचें पैशाचें द्रव्य असावें असा अर्थ घ्यावयाचा. तेव्हां पैशाचें मोल ह्मणजे काय व तें मोल कशावर अवलंबून आहे या प्रश्नाचें विवेचन आतां क्रमप्राप्त आहे.

इतर सर्व पदार्थांच्यासंबंधानें किंमत व मोल अशा दोन भिन्नभिन्न कल्पना होतात. पदार्थाचें मोल म्हणजे एका पदार्थाचें इतर पदार्थांशीं विनिमयपरिमाण व पदार्थाची किंमत म्हणजे त्याचें पैशाशीं विनिमयपरिमाण होय. आतां पैशाला या दोन कल्पना लागू पडत नाहींत. तरी पण केव्हां केव्हां पैशासंबंधींही या दोन कल्पनांचा उपयोग करतात. पैशाची किंमत म्हणजे कोणत्याही देशांतील कायद्यानें ठरलेलें पैशाच्या धातूचें वजन होय. या दृष्टीनें पौंडाची किंमत म्हणजे एक पौंड मिळण्यास टांकसाळींत भरावें लागणारें सोनें होय. ही किंमत अर्थात्

कायदा बदलला नाहीं तोंपर्यंत कायमच राहणार. इंग्लंडमध्यें एकचलनपद्धति कायमची १८१६ मध्यें ठरली. त्या चलनी नाण्याच्या कायद्यांत नमूद केलेलें पौंडाच्या धातूचें वजन या कायद्यांत फरक होईपर्यंत कायम राहणार हें उघड आहे. तेव्हां पैशाच्या किंमतीबद्दल कांहीं एक वाद किंवा भानगड असण्याचा संभव नाहीं. ही गोष्ट प्रत्येक देशांतील कायद्यानें मुकर केलेली आहे.

आतां पैशाचें मोल म्हणजे काय व तें कशावर अवलंबून आहे हें पाहिलें पाहिजे. पैशाचें मोल म्हणजे त्याची इतर सर्व पदार्थ विकत घेण्याची शक्ति होय. ही शक्ति पदार्थांच्या किंमतीच्या सरसकट मानावर अवलंबून आहे. पैशाचें मोल एखाद्या देशांत वाढत आहे कीं कमी होत आहे, हें पहावयाचें असल्यास त्या देशांतील निरनिराळ्या काळच्या पदार्थांच्या किंमतीच्या सरसकट मानाशीं तुलना केली पाहिजे. उदाहरणार्थ, अमेरिकेचा शोध लागण्यापूर्वी युरोपच्या मध्ययुगांत एकंदर सर्व पदार्थांच्या किंमतीचें सरसकट मान पुष्कळ कमी होतें. अर्थात् सर्व पदार्थ अत्यंत स्वस्त होते. परन्तु अमेरिकेंतील सोन्यारुप्याच्या खाणींच्या शोधानंतर युरोपांत सोन्यारुप्याचा ओघ सुरू झाला व देशांत पैसा विपुल झाला व एकंदर सर्व पदार्थांच्या किंमतीचें मान चढलें. म्हणजे मध्ययुगांत पैशाचें मोल पुष्कळ होतें तें पुढें कमी कमी होत गेलें. हिंदुस्थानांतही असाच प्रकार झालेला दिसून येतो. ऐनेअकबरींत दिलेल्या निरनिराळ्या पदार्थांच्या किंमतीचें मान व आतांच्या त्याच पदार्थांच्या किंमतीचें मान यांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे असें दिसून येतें. अर्थात् त्या काळीं पैसा दुर्मिळ होता व म्हणून त्याचें मोल फार होतें. परन्तु अर्वाचीनकाळीं पैसा विपुल झाल्यानें पैशाचें मोल कमी झालें आहे. तेव्हां पैशाचें मोल पैशाच्या दुर्मिळतेवर अगर विपुलतेवर असतें, असें होतें. याला अभिमतअर्थशास्त्रज्ञ 'पैशाची संख्यात्मक मीमांसा' म्हणून म्हणतात. तेव्हां या मीमांसेचा अर्थ काय व तींत सत्यांश किती आहे हें प्रथमतः पाहिलें पाहिजे.

देशामध्यें पैशाची संख्या वाढली म्हणजे पदार्थांच्या किंमती वाढतात व पैशाचें मोल कमी होतें. उलटपक्षीं देशांत पैशाची संख्या कमी झाली म्हणजे पदार्थांच्या किंमती उतरतात व पैशाचें मोल वाढतें. अर्थात् पैशाचें मोल हें पैशाच्या संख्येवर व त्याच्या चलनवेगावर अवलंबून आहे, असा अभिमतशास्त्रज्ञांचा सिद्धांत आहे. त्याचें स्पष्टीकरण एका काल्पनिक दाखल्यावरून करतां येईल. परन्तु

या सिद्धांतामध्यें कोणत्या गोष्टी गृहीत धरल्या आहेत हें प्रथमतः ध्यानांत ठेविलें पाहिजे. त्या गोष्टी अशा—

पहिली गोष्ट—पदार्थांची अदलाबदल फक्त पैशानेंच होते, म्हणजे पतीचे व्यवहार किंवा ऐनजिनसी व्यवहार होत नाहींत.

दुसरी गोष्ट—पैशाचा उपयोग विनिमयसामान्य एवढाच होतो. त्याचा कलाकौशल्याकडे किंवा शिल्लक टाकण्याकडे उपयोग केला जात नाहीं.

तिसरी गोष्ट—सर्व पैसा चलनव्यवहारांत आणला पाहिजे आणि सर्व माल विकावयास काढला पाहिजे.

आतां अशी कल्पना करा कीं, दहा व्यापारी आहेत. त्या प्रत्येकाजवळ एक एक माल आहे व अकराव्या माणसाजवळ १०० रुपये आहेत, व सर्व मालाचें मोल सारखें आहे. अशा स्थितींत विनिमय सुरू होऊन सर्व माल विकावयास काढला व त्या माणसानें सर्व रुपयेही काढले, तर प्रत्येक मालाची किंमत १० रुपये होईल. यावरून मालाची किंमत पैशाच्या संख्येवर व मालाच्या संख्येवर अवलंबून आहे हें उघड दिसतें. माल तितकाच राहून पैसे वाढले तर मालाच्या किंमती वाढतील व पैसे तितकेच राहून मालाची संख्या वाढली तर त्याच मानानें किंमती कमी होतील.

पहिल्या उदाहरणांत आतां अशी कल्पना करा कीं, पैसा जवळ असलेल्या माणसाला एकाच वस्तूची जरूरी आहे. आतां तो १०० रुपये एका मालाला देईल. तसेंच पहिल्या व्यापाऱ्यास दुसऱ्या व्यापाऱ्याजवळची एक वस्तु पाहिजे आहे असें धरलें म्हणजे तोही त्या मालाबद्दल १०० रुपये देईल. शेवटीं शेवटच्या व्यापाऱ्याच्या हातांत १०० रुपये पडतील व विनिमय पूर्ण होईल. परन्तु येथें प्रत्येक पदार्थाची किंमत १०० रुपये झाली. पूर्वीच्या व्यवहारांत मालाची किंमत १० रुपयेच होती; तेव्हां हा फरक कसा झाला? तर त्याचें उत्तर असें कीं, पहिल्या व्यवहारांत पैशाच्या शंभर नाण्यांचा एकदांच उपयोग झाला; परंतु दुसऱ्या व्यवहारांत एकेका नाण्याचा दहा दहा वेळां उपयोग झाला होता. याला अर्थशास्त्रांत पैशाचा चलनवेग म्हणतात. वरील उदाहरणावरून पदार्थांच्या किंमतीसंबंधानें खालील तत्त्व सिद्ध होतें.

"कांहीं एक व्यवहार करण्यांत पैशाच्या एका नाण्याचा दहा वेळां उपयोग

करणें काय किंवा दहा नाण्यांचा एकदां उपयोग करणें काय—या दोहोंचा परिणाम पदार्थांच्या किंमतीवर सारखाच होतो."

वरील विवेचनावरून पैशाची संख्या व त्याचा चलनवेग या दोन कारणांवर पदार्थांच्या किंमतीचें सरसकट मान अवलंबून असतें असें दिसून येईल. याचें प्रत्यंतर इतिहासावरून हवें तितकें मिळतें. युरोपमध्यें मध्ययुग व अर्वाचीन युग यांच्या संक्रमणावस्थेमध्यें पदार्थांच्या किंमतीच्या सरसकट मानांत जी क्रांति झाली ती पैशाच्या संख्येच्या वाढीमुळें होय यांत शंका नाहीं. तसेंच, हिंदुस्थानांत ब्रिटिश अंमलापूर्वींच्या काळच्या किंमतींच्या सरसकट मानांत व ब्रिटिश अंमलाच्या पूर्ण स्थापनेनंतरच्या काळाच्या किंमतीच्या मानांत जमीन-अस्मानाचें अंतर पडलें आहे, तेंही पैशाच्या संख्येच्या वाढीचा परिणाम आहे हें निर्विवाद आहे. गेल्या पांचचार वर्षांत पदार्थांच्या किंमतीच्या मानांत जी वरकमान होत आहे त्याचें कारणही या गेल्या पांच वर्षांत पाडलेल्या नाण्यांच्या संख्येच्या विलक्षण वाढींत आहे यांत शंका नाहीं.

तेव्हां पैशाच्या मोलाच्या संख्यात्मक मीमांसेंत सत्यांश आहे यांत शंका नाहीं. परंतु अभिमत-अर्थशास्त्रज्ञांच्या या मीमांसेंत त्यांच्या 'मजुरीफंडा'च्या मीमांसेंतल्यासारखाच दोष पडलेला आहे. ज्याप्रमाणें देशांतील चल भांडवल व लोकसंख्या यांवर मजुरी अवलंबून असते हें खोटें नाहीं; परंतु मजुरीच्या दराचीं एवढीं दोनच कारणें नाहींत, तर आणखी कारणें आहेत; त्याचप्रमाणें पदार्थांच्या सरसकट किंमतीचें मान किंवा पैशाचें मोल हें पैशाची संख्या व चलनवेग या दोन कारणांवर अवलंबून आहे हें खोटें नाहीं. तरी पण एवढींच या मोलाचीं कारणें आहेत असें मात्र नाहीं. तेव्हां आतां हीं उपाधिभूत कारणें कोणतीं तें पाहिलें पाहिजे. या कारणांचा उल्लेख या मीमांसेचा उपक्रम करतांना सांगितलेल्या गृहीत गोष्टींत आला आहे.

जितक्या मानानें ऐनजिनसी व्यवहार चडतात किंवा पतीनें व्यवहार चडतात, तितक्या मानानें पैशाचे व्यवहार कमी होतात व या थोड्या व्यवहारांनीं पैशाची पूर्वीची संख्या जास्त होते. अर्थात् ऐनजिनसी अदलाबदलीनें किंवा पतीच्या व्यवहारानें पदार्थांच्या किंमतींचें मान वर चढतें. तसेंच पैशाचा अथवा त्याच्या द्रव्याचा कलाकौशल्याकडे उपयोग होतो; या मागणीचा परिणाम पैशाकडे

उपयोग होण्याच्या द्रव्याच्या संख्येवर होतो. म्हणजे यानें देशांतील पैशाच्या संख्येचा कमी होण्याकडे कल असतो. तेव्हां या कारणाचा परिणाम वर निर्दिष्ट केलेल्या कारणापेक्षां उलट होतो. शिवाय पैशाचें द्रव्य सोनें-रुपें हें उत्पन्न करण्यास कमीजास्त खर्च लागतो, तेव्हां पैशाचें मोल हें सोन्यारुप्याच्या उत्पादनव्ययावरही अवलंबून आहे हें उघड झालें. परंतु सोनेंरुपें हीं खनिज द्रव्यें आहेत व त्यांच्या किंमतीचा विचार मागें एके ठिकाणीं केला आहे. तेव्हां त्याची येथें पुनरावृत्ति करण्याचें कारण नाहीं.

यावरून पैशाच्या मोलाच्या मीमांसेंतील सत्यासत्याचा भाग कोणता हें सहज ध्यानांत येईल. पैशाच्या मोलाची संख्यात्मक मीमांसा हें एक मागें स्पष्टीकरण केलेल्या मागणी व पुरवठा या तत्वांचेंच विशेष स्वरूप होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. पैशाचा पुरवठा म्हणजे पैशाच्या द्रव्याचा पुरवठा होय. हा पुरवठा कमीजास्त होणें ही आकस्मिक गोष्ट आहे. शास्त्रीय शोधांवर व खाणींच्या शोधांवर ती अवलंबून आहे. तरी पण अमेरिकेच्या शोधापासून आजपर्यंतच्या सोन्यारुप्याच्या उत्पत्तीकडे नजर फेंकली तर हा पुरवठा सारखा वाढत आहे असें दिसून येईल. [ पान ३५९ पहा. ] परंतु त्याबरोबर व्यापारी व्यवहारांचीही अतोनात वाढ होत आहे. म्हणजे पैशाला मागणीही जास्त जास्त होत आहे. पुढें ३५९ पानांत दिलेल्या कोष्टकावरून सोन्यारुप्याच्या भावांतही कसकसा फरक होत गेला आहे हें दिसून येईल. परंतु सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें पैशाचीं कार्यें उरकणारें आणखी एक साधन अस्तित्वांत आलें आहे व त्याचा फैलावही झपाट्यानें होत आहे. यामुळेंच सर्व जगांत एकंदर पैशाचें मोल कमी होत आहे. अर्थात् पदार्थांच्या किंमती वाढण्याकडे कल आहे. समुद्राच्या लाटांप्रमाणें या किंमती कांहीं वर्षें पुढें जास्त आहेत तर कांहीं वर्षें पाठीमागें जात आहेत असें दिसेल. तरी एकंदर शतकोंशतकांच्या काळाकडे नजर दिली असतां पदार्थांच्या किंमतींचें सरसकट मान सारखें पुढेंपुढेंच जात आहे, असें दिसून येईल. याचें कारण देशांच्या आधिभौतिक सुधारणेबरोबर धात्वात्मक पैशाखेरीज अधात्वात्मक पैशाचे पुष्कळ प्रकार उद्भूत होतात हें होय. हे प्रकार कोणते व त्यांचें स्वरूप काय यांचा विचार पुढील भागांत करावयाचा आहे. तेव्हां हा विषय येथेंच थांबविणें बरें.

[ दुसऱ्या व तिसऱ्या कॉलमांत ००० स्थानें गाळलीं आहेत. ]

| वर्षांचें पर्व. | सोन्याची औंसांत पैदास. | चांदीची औंसांत पैदास. | सोन्याचांदीच्या भावांची तुलना. | सोन्याचांदीच्या वार्षिक पैदा: तु. |
|---|---|---|---|---|
| १४९३-१५२० | ५२२१ | ४२३०९ | ... ... | ८·१ |
| १५२१-१५४० | ५५२५ | ६९५९८ | ... ... | १२·५ |
| १५४१-१५६० | ४३७८ | १६०२८७ | ... ... | ३६·६ |
| १५६१-१५८० | ४३९८ | १९२५७८ | ... ... | ४३·७ |
| १५८१-१६०० | ४७४५ | २६९३५३ | ... ... | ५६·७ |
| १६०१-१६२० | ५४७८ | २७१९२५ | ... ... | ४९·६ |
| १६२१-१६४० | ५३३७ | २५३०८५ | ... ... | ४७·४ |
| १६४१-१६६० | ५६३९ | २३५५३१ | ... ... | ४१·७ |
| १६६१-१६८० | ५९५४ | २१६६९१ | ... ... | ३६·३ |
| १६८१-१७०० | ६९२२ | २१९८४२ | १४·८१ | ३१·७ |
| १७०१-१७२० | ८२४३ | २२८६५१ | १५·०४ | २७·७ |
| १७२१-१७४० | १२२६८ | २७८२६२ | १४·९४ | २२·६ |
| १७४१-१७६० | १५८२४ | ३४२८१२ | १४·१४ | २१·६ |
| १७६१-१७८० | १३३१३ | ४१९७१२ | १४·७२ | ३१·५ |
| १७८१-१८०० | ११४३९ | ५६५२३६ | १५·६८ | ४९·४ |
| १८०१-१८१० | ५७१६ | २८७४६९ | १५·७७ | ५०·२ |
| १८११-१८२० | ३६८० | १७३८५७ | १५·६२ | ४७·२ |
| १८२१-१८३० | ४५७० | १४८०७० | १५·८२ | ३२·४ |
| १८३१-१८४० | ६५२३ | १९१७५९ | १५·६२ | २९·३ |
| १८४१-१८५० | १७६०५ | २५०९०३ | १५·७० | १४·२ |
| १८५१-१८५५ | ३२०५१ | १४२४४३ | १५·३८ | ४·४ |
| १८५६-१८६० | ३२४३१ | १४५४७७ | १५·३९ | ४·४ |
| १८६१-१८६५ | २९७४८ | १७७०१० | १५·४४ | ५·६ |
| १८६६-१८७० | ३१३५० | २१५२५८ | १५·५७ | ६·८ |
| १८७१-१८७५ | २७९५५ | ३१६५८५ | १५·६४ | ११·३ |
| १८७६-१८८० | २७७१५ | ३९३८७८ | १८·०५ | १४·२ |
| १८८१-१८८५ | २३९७४ | ४६००२० | १९·४१ | १९·१ |
| १८८६-१८९० | २७३०६ | ५४४५५७ | १९·७१ | १९·९ |
| १८९१-१८९५ | ३९४१३ | ७८७९०७ | २१·६० | १९·९ |
| १८९६-१९०० | ६२२३५ | ८२८४६७ | ३३·३३ | १३·३ |
| १९००-१९०५ | ७७८९० | ८२५१४० | ३३·८७ | १०·५ |

| सन | सोन्याची पैदास औंस लाख औंस. | रुप्याची पैदास औंस लाख औंस. | | |
|---|---|---|---|---|
| १९१३ | २२३०० | २३१७०० | | |
| १९१४ | २१६०० | १७६००० | | |
| १९१५ | २२८०० | १८५७०० | | |
| १९१६ | २२००० | १७५४०० | | |
| १९१७ | २०५०० | १७५००० | | |
| १९१८ | १८६०० | १९७३०० | | |
| १९१९ | १७८०० | | | |
| १९२० | १६५०० | | | |

# भाग अकरावा.

## अधात्वात्मक पैसा व त्याचे प्रकार.

येथपर्यंत धात्वात्मक पैशाचा विचार झाला; परन्तु औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या देशांत यापुढेंही मजल जाते. ज्याप्रमाणें ऐनजिनसी व्यवहाराच्या पुढची पायरी निष्कव्यवहाराची आहे, त्याचप्रमाणें निष्कव्यवहारापुढची पायरी पतीच्या व्यवहाराची अगर विश्वासव्यवहाराची होय. वरवर पाहतांना विश्वासव्यवहार हा ऐनजिनसी व्यवहारासारखा दिसतो. अर्वाचीन काळच्या व्यापाराच्या प्रचंड घडामोडी धातूच्या पैशाखेरीज होतात. यामुळें त्या ऐनजिनसी व्यवहाराप्रमाणें दिसतात खऱ्या; परंतु वास्तविक त्यांमध्यें कागदी पैसा हा विनिमयसामान्य बनतो. तेव्हां आतां कागदी पैसा, त्याचे प्रकार व त्याच्या चलनपद्धतीचीं तत्वें यांचा या भागांत विचार करावयाचा आहे.

ज्या कारणांनीं समाजांतील बाल्यावस्थेंतील पैशाचीं द्रव्यें मागें पडून सोन्यारुप्याचा सर्वत्र प्रसार होतो, त्याच कारणांनीं कागदी चलनाचाही प्रसार होतो. देवघेवीचे व्यवहार विराट्स्वरूपी झाले म्हणजे सोन्या-रुप्याच्या पैशाची नेआण करण्याची फार अडचण वाटूं लागते. अर्थात् इतर पदार्थांच्या मानानें

सोन्यारुप्यांमध्यें सुवाह्यता आहे खरी; तरी दहा हजार रुपये किंवा एक लाख रुपये बरोबर नेणें किंवा दुसऱ्या गांवास पाठविणें हें गैरसोईचें होतें. तसेंच अर्वाचीन काळीं सर्व जग हें एकच बाजार झाल्यामुळें हल्लीं व्यापार जगाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत चालतो. अशा ठिकाणींही सोन्यारुप्याच्या पैशानें व्यवहार करावयाचा असता तर फार अडचण झाली असती; परंतु हीही अडचण कागदी चलनानें नाहींशी कशी होते हें पुढें एका भागांत पहावयाचें आहे. सोन्यारुप्याच्या पैशाच्या या गैरसोईमुळें लोकांमध्यें नेआण करण्यास अत्यंत सुलभ अशा कागदी चलनाची वाण भासूं लागते. ह्मणूनच अर्वाचीन सुधारलेलें सरकार चलनी नोटा या नांवानें कायदेशीर फेडीचें चलन याचा प्रसार करतें. तेव्हां आतां या कागदी चलनाचा विचार करावयाचा आहे. मागील भागांत वर्णन केलेला धातुरूप पैसा, या भागांत वर्णन करावयाचा कागदी पैसा व पुढल्या एका भागांत वर्णन करावयाचें कागदी चलन या सर्वांचें स्पष्टीकरण खालील कोष्टकावरून सहज ध्यानांत येईल. या कोष्टकांतील पहिलें पद पैसा आहे व तें मागें दिलेल्या व्याख्येनुरूप व्यापक अर्थानें उपयोजिलेलें आहे. जो जो पदार्थ–मग तो कसाही असो–पैशाचीं कार्यें करतो तो तो पदार्थ पैसा या संज्ञेप्रत पावतो. या दृष्टीनें, मागें वर्णिलेले व पुढें वर्णावयाचे अशा सर्व पैशाचें खालील वर्गीकरण होतें.

पैसा.

- धात्वात्मक
  - मुख्य पैसा
  - उपपैसा
- अधात्वात्मक अगर कागदी
  - कायदेशीर
    - परिवर्तनीय
    - अपरिवर्तनीय
  - व्यावहारिक
    - चेक
    - हुंडी
    - विनिमयपत्र.

वरील कोष्टकांत निर्दिष्ट केलेल्या पैशांपैकीं धात्वात्मक पैशाचें वर्णन पूर्वींच आलेलें आहे. अधात्वात्मक पैशाचे कायदेशीर व व्यावहारिक असे दोन भेद होतात. या दोन भेदांच्या मुळाशीं पत, साख अगर विश्वास हा असतो. ही पत सरकारची असली व तिचा उपयोग सरकारनें कायदा करून केला ह्मणजे कायदेशीर कागदी पैसा देशांत प्रचलित होतो. ही पत खाजगी व्यक्तीची असून

कायद्याच्या साहाय्याशिवाय त्याच्या हातच्या वचनांच्या कागदाचा विनिमयांत उपयोग होऊं लागला ह्मणजे व्यावहारिक कागदी पैसा देशांत प्रचलित होतो. या पैशाचे तीन प्रकार आहेत. त्यांपैकीं चेक व हुंड्या यांचें वर्णन 'पेढी' या नांवाच्या पुढील भागांत येईल व विनिमयपत्राचें वर्णन परदेशच्या व्यापाराच्या मीमांसेनंतर येईल. या भागांत फक्त कायदेशीर कागदी चलनाचाच विचार करावयाचा आहे; परन्तु या दोन्ही प्रकारच्या कागदी चलनांच्या मुळाशीं असलेल्या पतीच्या स्वरूपाचा आधीं थोडक्यांत विचार केला पाहिजे.

अर्थशास्त्रांत पतीच्या स्वरूपाबद्दल फार वाद आहे; परन्तु या वादामध्यें ह्मणण्यासारखा तथ्यांश नाहीं. पतीचें स्वरूप थोड्या विचारअंतीं सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. व्यापाराची पत ह्मणजे त्याच्या संपत्तीमुळें प्राप्त झालेली देवघेवीची शक्ति होय. एखादा बाहेरगांवचा ठासर व्यापारी मुंबईस जाऊन जवळ एक पैसासुद्धां नसतांना हजारों रुपयांचा माल प्रत्यक्ष खरेदी करून येऊं शकतो. ही खरेदी करण्याची शक्ति म्हणजे त्याची पत होय. त्या व्यापाऱ्याचा मोठा धंदा आहे; त्याची हजारों रुपयांची मालमत्ता आहे; त्याचीं बाहेरगांवीं पुष्कळ ठिकाणीं दुकानें आहेत, हें मुंबईच्या व्यापाऱ्यांना ठाऊक असतें. शिवाय तो सच्चा माणूस आहे हेंही ठाऊक असतें. यामुळें त्याच्या पुढें फेड करण्याच्या वचनावर लोकांचा विश्वास बसतो. म्हणून व्यापारी लोक अशा माणसाला माल विकतात व त्याच्यावर विनिमयपत्रें काढतात. हीं विनिमयपत्रें ह्मणजे कांहीं काळानंतर पैसे देण्याचें वचन होय. तेव्हां पतीच्या बुडाशीं संपत्तिमत्ता व एकमेकांवरील विश्वास या दोन गोष्टी असतात, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्याच्याजवळ कांहीं एक संपत्ति नाहीं व त्यामुळें जो आपलें वचन पाळूं शकेल अशी खातरी नसते, अशा माणसाला पत मुळींच नसते. तेव्हां पत ही पूर्वींच्या संपत्तीच्या जोरावर कर्ज मिळविण्याची शक्ति अथवा खरेदीची शक्ति होय. आतां या शक्तीचा उपयोग थेट पैशासारखा होतो. कारण शहाजोग व्यापाऱ्याचें विनिमयपत्र बाजारांत पैशाप्रमाणें लोक मानण्यास तयार असतात. विनिमयसामान्य हें जें पैशाचें कार्य तें या पतीनें होतें, ह्मणून पत ही पैशासारखीच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अर्वाचीन काळीं कोणत्याही धंद्यास भांडवल लागतें व भांडवलाचें अत्यंत ग्राह्यरूप म्हणजे पैसा होय. कारण, त्याच्यायोगानें हवा तो जिन्नस आपल्याला विकत घेतां येतो. या-

मुळें पैशाचा भांडवलासारखा उपयोग होतो व पतीचा पैशासारखा होतो. तेव्हां पतीचाही भांडवलासारखा उपयोग होतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पत ही प्रत्यक्ष भांडवल नसेल किंवा धातुरूप पैसा नसेल; परन्तु तिचा उपयोग जर वरील दोन गोष्टींसारखा होतो तर त्या गोष्टींप्रमाणेंच पतीचाही देशाच्या उद्योग-वृद्धीच्या वाढीकडे उपयोग होतो असें म्हणणें भाग आहे. परन्तु वर सांगितल्या-प्रमाणें पत ही संपत्तिमूलक आहे हें विसरतां कामा नये. पतीला स्वतंत्र व स्वयंभू असें अस्तित्व नाहीं. जर संपत्ति किंवा धातुरूप पैसा यांचा आधार प्रथमतः नसेल तर पत ही उत्पन्न होणार नाहीं. ज्याप्रमाणें लहान लहान खांबांवर अवलंबून असलेल्या कमानींवर मोठी इमारत राहूं शकते; परंतु कमान बांधतांना प्रथमतः सर्व भिंत बांधावी लागते व एकदां कमान एकजीव झाली म्हणजे खांबांखेरीज बाकी सर्व भिंतीचा भाग काढून घेतला तरी चालतो; तीच स्थिति पतीची आहे. प्रथमतः पत होण्यास मनुष्याजवळ धातुमय पैसे व प्रत्यक्ष संपत्ति पाहिजे; परन्तु एकदां बाजारांत पत बसली म्हणजे मग खांबवजा थोड्याशा संपत्तीवर व थोड्याशा धातूंच्या पैशावर अति मोठी पत टिकूं शकते. या पतीवर मग व्यापाराच्या प्रचंड घडामोडी होऊं शकतात. हें कसें होतें याचा उलगडा पुढील भागामध्यें येणार आहे. तेव्हां हा विषय येथेंच सध्यां थांबवूं.

कायदेशीर कागदी चलन परिवर्तनीय व अपरिवर्तनीय या दोन तऱ्हेचें असतें, असें वरील कोष्टकावरून दिसेल. मागें सांगितलेंच आहे कीं, देशाच्या औद्योगिक वाढीबरोबर नेआण करण्यासारखा व परगांवीं पोस्टानें पाठविण्यासारखा पैसा लोकांना पाहिजे असतो. अशा सुधारलेल्या समाजांत सरकारची पत असते व त्यांना कायद्याचाही अधिकार असतो. यामुळें कागदी चलन प्रचलित करणें हें नाण्याच्या प्रसाराप्रमाणें सरकारचेंच काम समजलें जातें. म्हणून सुधारलेल्या सर्व देशांत सरकार परिवर्तनीय कागदी चलन चालू करतें. याला सरकारी चलनी नोटा म्हणतात. या नोटा म्हणजे सरकारचीं मागितल्याबरोबर धातुरूप पैसे देण्याचीं लेखी वचनें होत. सरकारवर लोकांचा विश्वास असल्यामुळें अशीं लेखी वचनें प्रत्यक्ष धातुरूप पैशाप्रमाणें चालतात. परिवर्तनीय कागदी चलनाचा हा विशेष आहे कीं, या कागदी चलनाबद्दल लोक मागतील तेव्हां धातुरूप पैसा दिला जाईल अशी सरकार हमी घेतें. अर्थात् या कागदी चलनाचें

प्रत्यक्ष धातूच्या पैशामध्यें परिवर्तन करतां येतें. म्हणून या चलनी नोटांना प्रतिनिधिभूत पैसा म्हणतात. हजारांची नोट काढली असतां तिच्याबद्दल हजार रुपयांची चांदी अगर हजार रुपये सरकार आपल्या तिजोरींत ठेवितें; त्याच-प्रमाणें जितक्या किंमतीच्या कागदी नोटा आहेत तितक्या किंमतीची चांदी अगर रुपये या रूपानें सरकारी तिजोरींत प्रत्यक्ष ऐवज ठेवला जातो. म्हणजे केव्हांही देशांतील कितीही माणसें नोटांबद्दल प्रत्यक्ष रुपये मागण्यास आलीं तरी हरकत पडत नाहीं. अर्थात् कागदी चलनाच्या परिवर्तन या गुणाला केव्हांही बाध येतां कामा नये, तरच या कागदी चलनावर लोकांचा पूर्ण विश्वास बसून त्याकडून प्रत्यक्ष पैशाचीं सर्व कार्यें होतील. परन्तु जर कां तिजोरींत मागित-ल्याबरोबर रोख पैसे मिळत नाहींत असें एकदां लोकांना वाटूं लागलें, म्हणजे ग्रेशॅमच्या नियमाप्रमाणें रोख पैशाचा उत्कर्ष होऊन कागदी पैशाचा अपकर्ष होऊं लागेल व देशांतून धातुरूप पैसा नाहींसा होईल. तेव्हां देशांत कागदी ना-णें चालू ठेवावयाचें असेल तर त्याच्या परिवर्तनाला, अर्थात् त्याच्या बदला प्रत्यक्ष नाणें मिळण्याच्या गुणाला केव्हांच धक्का बसतां कामा नये; तर तो कागदी पैसा शास्त्रोक्त पैसा होय, असें सर्व अर्थशास्त्रकारांचें मत आहे. परंतु कागदी पैशाचें हें परिवर्तन कायम ठेवण्यासंबंधीं मात्र फार वाद आहे. त्या बाबतींत निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांनीं निरनिराळे नियम सांगितलेले आहेत. कागदी चलनाचें पूर्ण परिवर्तन शाबूद ठेवण्याच्या कामीं निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब केलेला आहे. तेव्हां ह्या तत्वांचा व पद्धतींचाही येथें थोडक्यांत ऊहापोह केला पाहिजे.

कागदी चलनाचें पूर्ण परिवर्तन राखण्याकरितां पेढीचें तत्व बस्स आहे, असें एका पक्षाचें म्हणणें आहे; दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें कीं, खाजगी पेढ्यांना जरी हें तत्व पुरेसें असलें तरी सरकारी चलनी नोटांना व कागदी पैशाला हें तत्व पुरेसें नाहीं; तर सरकारनें चलनतत्वाचा अवलंब केला पाहिजे.

पुढील भागांत आल्याला पेढीच्या स्वरूपाचें व तिच्या कार्याचें वर्णन करावयाचें आहे, तेव्हां तेथें याचा विशेष खुलासा होईल. परंतु पेढीच्या तत्वाचें रहस्य इतकेंच कीं, रोजच्या व्यवहाराला जितक्या रोख रकमेची गरज लागते, तितकीच रक्कम पेढीवाला आपल्या तिजोरींत ठेवतो; बाकीचें भांडवल तो

व्यापाऱ्यांस कर्जाऊ देतो. अशा कारणानें त्याचें भांडवल विनव्याजी पडत नाहीं व त्या योगें देशाच्या उद्योगधंद्याकडे जास्त भांडवल मिळतें. कारण, पेढीवाल्याच्या तिजोरींत प्रत्यक्ष पडून राहिलेले पैसे हे भांडवलाच्या दृष्टीनें निरुपयोगी असतात. तेव्हां असे पैसे जितके कमी राहतील तितकें चांगलें. म्हणून पेढीवाला आपल्या अनुभवानें, लोकांनीं ठेवी ठेवलेल्या रकमेच्या सरासरी तृतीयांश रक्कम आपल्या तिजोरींत ठेवतो व तेवढ्यानें सर्व ठेवीवाल्यांची मागणी त्याला भागवितां येते. कारण, सर्व ठेवीवाले एकसमयावच्छेदेंकरून आपल्या सर्व ठेवी एकदम परत मागत नाहींत. कांहींजण पैसे परत मागतात तर कांहींजण पैसे पेढीवर ठेवण्यास येतात; सारांश, हा जसा पेढीच्या व्यापाराचा अनुभव आहे, त्याचप्रमाणें सरकारी चलनी नोटांचीही स्थिति आहे. म्हणजे सर्व चलनी पैसा जवळ असलेल्या लोकांना एकसमयावच्छेदेंकरून रोख पैसा लागेल असें संभवत नाहीं. तेव्हां ज्याप्रमाणें पेढीवाले ठेवींच्या रकमेच्या कांहीं प्रमाणानें रोख रुपये तिजोरींत ठेवतात, त्याचप्रमाणें सरकारनेंही परिवर्तनीय कागदी चलनासंबंधीं केलें म्हणजे बस्स आहे. जितक्या रकमेचें कागदी चलन आहे तितक्या रकमेचे धातुरूप पैसे ठेवणें म्हणजे देशाचें उगीच नुकसान करणें होय. कारण इतक्या पैशाची कागदी चलनाच्या पूर्ण परिवर्तनास मुळींच जरूर नाहीं. तेव्हां पेढीच्या तत्वाच्या समर्थकांचें म्हणणें असें आहे कीं, ज्या अर्थी कागदी चलन हें पैशासारखें उपयोजितां येतें त्याअर्थीं प्रत्यक्ष पैशाचा देशाच्या उद्योगधंद्याच्या कामीं जितका उपयोग करतां येईल तितका करून घेतला पाहिजे. म्हणूनच कागदी चलनाइतके पैसे ठेवणें हें निव्वळ देशाचें नुकसान करणें होय. कागदी चलनाचा जो मूळ हेतु कीं, विशेषप्रसंगीं जास्त पैसा पाहिजे असतांना तो मिळावा, तो या पद्धतीनें साधत नाहीं. परंतु कांहीं अर्थशास्त्रज्ञांचें म्हणणें असें आहे कीं, सरकारी कागदी चलनांत खाजगी पेढ्यांचें तत्व आणणें हें फार धोक्याचें आहे. कारण त्यानें केव्हांना केव्हां तरी कागदी चलनाचे परिवर्तनाला धक्का बसेल व अपरिवर्तनीय कागदी चलनाचे अनिष्ट परिणाम देशाला भोगावयास लागतील. म्हणून या बाबतींत चलनतत्वाचाच अवलंब केला पाहिजे. तेव्हां आतां चलनतत्व म्हणजे काय हें पाहूं.

चलनतत्ववाद्यांचें म्हणणें असें आहे कीं, चलनी नोटांचें पूर्ण परिवर्तन राख-

त्याकरितां नोटांइतकें सोनें-रुपें तिजोरींत ठेवलें पाहिजे. तरच आणीबाणीच्या प्रसंगींसुद्धां लोकांना नोटांबद्दल केव्हांही रोख पैसे मिळतील व नोटांचें परिवर्तन पूर्ण राहील. अशा प्रकारचें कायद्याचें निर्बंधन नसलें तर चलनी नोटांचा अतिरेक होऊन त्या नोटा अपरिवर्तनीय होतील व असें होणें देशाच्या नुकसानीचें होय. चलनी नोटा या इकडे तिकडे पाठविण्यास सोइस्कर, नेआण करण्यास हलक्या, म्हणून त्या उपयोगांत येतात. परंतु त्या, देशांतील कायदेशीर फेडीचें चलन असल्यामुळें त्यांची किंमत रोख नाण्याइतकी राहिली पाहिजे; तशी ती राहण्यास त्या नोटा पूर्णपणें परिवर्तनीय पाहिजेत व असें होण्यास नोटांच्या इतकें प्रत्यक्ष सोनेंनाणें तिजोरींत ठेवलें पाहिजे. म्हणजेच चलनी नोटा या खऱ्या प्रतिनिधिभूत पैसा राहतील.

वरील तऱ्हेचें चलनतत्ववाद्यांचें म्हणणें आहे. त्यावर पेढीच्या तत्वाच्या समर्थकांचें असें उत्तर आहे कीं, अशा कडक निर्बंधनानें देशाला पतीचा फायदा मिळत नाहीं. ज्या वेळीं कांहीं कारणांनीं देशांतील सोनेंनाणें कमी होतें त्या वेळीं व्यापाराला पैशाची अडचण पडूं नये व सर्व उद्योगधंदे पैशाच्या अभावीं थांबूं नयेत म्हणून चलनी नोटांची खरोखरी जरूरी असते. सरकारची किंवा सरकारी आश्रयाखालीं निघालेल्या पेढ्यांची पत देशांत सर्वांमध्यें जास्त असते. म्हणून त्यांनीं काढलेल्या चलनी नोटा लोकांमध्यें सहज प्रचलित होतात. तेव्हां या कडक चलनतत्वानें या फायद्याला देश मुकतो. ज्या वेळीं चलनाची जरूरी जास्त त्याच वेळीं व्यापाऱ्यांना चलन मिळत नाहीं. यावर चलनतत्ववाद्यांचें प्रत्युत्तर असें आहे कीं, जर कडक निर्बंधन नसेल तर अशा प्रसंगीं चलनी नोटांचा अतिरेक होईल. कारण व्यापाऱ्यांना नोटांची गरज असली म्हणजे ते व्याजाचा दर जास्त देण्यास तयार होतात. या जबर व्याजाच्या मोहानें पेढ्या चलनी नोटांचा अतिरेक करतील व त्यायोगानें पदार्थांच्या किंमती वाढतील; व्यापाराला सट्ट्याचें स्वरूप येईल व शेवटीं नोटा अपरिवर्तनीय होऊन लोकांचा नोटांवरील विश्वास उडेल व एकंदर देशांतील पतीलाच धक्का बसेल. अशा चलनी नोटांच्या अतिरेकानें व्यापारांत मोठमोठ्या दिवाळ्यांचा काळ येऊन व्यापाऱ्यांची तारांबळ उडते. अशा प्रकारचे व्यापारी आणीबाणीचे प्रसंग इंग्लंडांत वारंवार येत. याचें कारण नोटांचा अतिरेक होय अशी पुष्कळ पुरस्कर्त्यांची

समजूत झालेली होती. इंग्लंडांतील हल्लीं चालू असलेला १८४४ मधला बँक-चार्टर कायदा या समजुतीवर झालेला आहे. हा कायदा सर रॉबर्ट पील या प्रधानाचे कारकीर्दीत पास झाला. या कायद्यान्वयें ज्या ज्या बँकांना तो कायदा होईपर्यंत चलनी नोटा काढण्याचा अधिकार होता, त्या त्या बँकांचाच फक्त अधिकार कायम करण्यांत आला. म्हणजे नव्या कोणत्याही बँकेला हा अधिकार द्यावयाचा नाहीं असें ठरलें. त्याचप्रमाणें कायदा होण्यापूर्वीच्या बारा महिन्यांत जितक्या चलनी नोटा सरासरीनें चालू असतील तितक्या नोटा आपल्या मालमत्तेवर व पतीच्या जोरावर काढण्याची परवानगी मिळाली. याप्रमाणें बँक ऑफ इंग्लंडला १ कोटी ४० लक्ष रुपयांच्या चलनी नोटा काढण्याची परवानगी मिळाली व खाजगी आणि संयुक्त भांडवली पेढयांना सर्व मिळून ७४६०००० पौंडांची परवानगी मिळाली. तसेंच, १८४५ च्या कायद्यानें स्कॉटलंडमधील बँकांना २७५०००० पौंडांची परवानगी मिळाली व आयरिश बँकांना ६३५०००० पौंडांची परवानगी मिळाली. म्हणजे एकंदर युनायटेड-किंगडममध्यें सुमारें ३ कोटी पौंडांच्या चलनी नोटा पेढयांच्या मालमत्तेच्या तारणावर काढण्याची परवानगी मिळाली. यापेक्षां काढाव्या लागणाऱ्या प्रत्येक नोटेइतकें सोनें-नाणें पेढयांनीं आपल्या तिजोरींत ठेविलेंच पाहिजे असें या कायद्यांनीं ठरविलें. देशांतील खासगी व संयुक्त भांडवली पेढयांनीं जर आपला नोटा काढण्याचा अधिकार सोडून दिला तर त्यांच्या अधिकारांतील नोटांच्या रकमेच्या दोनतृतीयांश इतक्या रकमेनें बँक ऑफ इंग्लंडचा अधिकार वाढवावयाचा अशीही एक शर्त कायद्यांत होती. याप्रमाणें बँक ऑफ इंग्लंडला सध्यां १ कोटी ८४ लक्ष पौंडांपर्यंत आपल्या निव्वळ तारणावर नोटा काढण्याचा अधिकार आलेला आहे. इतर बँकांना ठरलेल्या मर्यादेबाहेर केव्हांही अधिक नोटा काढण्याचा अधिकार नव्हता. मात्र १८४५ च्या कायद्यानें अशी सवलत स्कॉटलंडांतील पेढयांना दिलेली होती. म्हणजे बँक ऑफ इंग्लंडप्रमाणें स्कॉटलंडांतील पेढयांना ठरलेल्या मर्यादेच्या बाहेर प्रत्यक्ष सोनेंनाण्याच्या रकमेइतक्या नोटा काढण्याचा अधिकार आहे. बँक ऑफ इंग्लंडच्या किती नोटा प्रचारांत आहेत व त्याबद्दल किती सोनें-नाणें बँक आपल्या तिजोरींत ठेवते, याची कल्पना १९०९ च्या आंकड्यांवरून होईल. १९०९ सालीं बँक ऑफ इंग्लंडनें ५ कोटी

पौंडांच्या नोटा काढल्या होत्या व तिच्या तिजोरींत सुमारें ३ कोटी १८ लक्ष इतकें प्रत्यक्ष सोनें होतें.

या कायद्याच्या धोरणाबद्दल अजूनही फार मतभेद आहे. चलनी नोटांचें पूर्ण परिवर्तन राखणें हा या कायद्याचा उद्देश आहे. परन्तु याविरुद्ध असणाऱ्या लोकांचें म्हणणें असें आहे कीं, हा कायदा त्या कामीं निरुपयोगी आहे. अर्थात् बँक आपण होऊनच अवश्य तितकें सोनें-नाणें आपल्या तिजोरींत ठेवील व नोटांचा अतिरेक होणें शक्य नाहीं. कारण, बँकेनें जर व्यापाराच्या आवश्यकतेपेक्षां जास्त नोटा काढल्या तर अशा नोटा व्यापारांत फार वेळ टिकणारच नाहींत. त्या रोख पैशाकरितां बँकेकडे परत येतील व बँकेनें जर रोख पैसे दिले नाहींत म्हणजे नोटा जर परिवर्तनीय राहिल्या नाहींत, तर बँकेचें दिवाळें निघेल. परन्तु व्यापाराच्या आणीबाणीच्या प्रसंगीं या कायद्यानें जास्त अडचण मात्र होईल व आणीबाणींतून पार पडणें जवळ जवळ अशक्य होईल. म्हणजे ज्या वेळीं चलनी नोटांची खरोखरी अवश्यकता असते, त्या वेळीं त्या मिळणार नाहींत. उदाहरणार्थ, लढाईकरितां वगैरे सरकारला रोख पैशाची जरूरी लागली व हे पैसे बँकेनें सरकारला कर्जाऊ दिले तर देशांतील सोनेंनाणें कमी होईल. अशा वेळीं देशांतील व्यापाराचा घोंटाळा होऊं नये म्हणून चलनी नोटांची गरज लागेल; परन्तु याच वेळीं १८४४ च्या कायद्याच्या कडक निर्बंधनानें बँकेला नोटा देणें अशक्य होईल. म्हणून हा कायदा नेहमीं निरुपयोगी तर प्रसंगीं अडथळा करणारा आहे व तो कायदा कांहीं काळपर्यंत तरी तहकूब करावा लागतो, हें या कायद्याच्या विरोधकांचें म्हणणें प्रत्यक्ष पुराव्यानें सिद्ध झालेलें आहे. हा कायदा पास झाल्यापासून अवघ्या बावीस वर्षांत तीन वेळां तो तहकूब करावा लागला. १८४४, १८५७ व १८६६ या वर्षी हा कायदा तहकूब करणें अवश्य झालें होतें. अशी तहकुबी मिळणार अशी लोकांची खात्री झाली म्हणजे आणीबाणीचा प्रसंग नाहींसा होतो.

१८४४ चा कायदा वाजवीपेक्षां फाजील कडक आहे. त्या कायद्याबरहुकूम तिजोरीमध्यें ठेवावें लागणारें सोनें-नाणें उगीच जास्त ठेवावें लागतें हें खरें आहे, तरी पण एवढ्या मोठ्या व्यापारी देशाची चलनपद्धति अगदीं बिनघोर असावी व चलनी नोटांच्या परिवर्तनाबद्दल कोणासही शंका राहूं नये याकरितां घात-

केल्या शर्ती कडक असल्या तरी त्या चांगल्याकडे झुकल्या चुका आहेत हें खरें.

युरोपांतील इतर देशांमध्यें सरासरी इंग्लंडच्या धर्तीवरच चलनी नोटांचें परिवर्तन राखण्याकरितां तजविजी केल्या आहेत. मात्र त्यांमध्यें इंग्लंडच्या कायद्याचा फाजील कडकपणा टाळला आहे. फ्रान्सची पद्धति सर्वांत जास्त स्वातंत्र्याची आहे. बँक ऑफ फ्रान्सला नोटा काढण्याचा अमर्याद अधिकार होता. परंतु १८८४ पासून तिच्या अधिकाराला मर्यादा घातलेली आहे. ती मर्यादा ३॥ अब्ज फ्रँकची अगर १४ कोटी पौंडांची आहे. अमुकच रोख सोनेंनाणें ठेविलें पाहिजे असा सक्त निर्बंध नाहीं. तरी पण पेढी आपण होऊन फार मोठी तरती रकम तिजोरींत ठेविते.

जर्मनीमध्यें १८७५ पासून इंग्लंडच्या १८४४ च्या कायद्याच्या धर्तीवरच कायदा केला आहे. त्या वेळीं ज्या पेढ्यांना नोटा काढण्याचा अधिकार होता तितक्यांना व नव्या इंपीरियल बँकेलाच फक्त नोटा काढण्याचा अधिकार दिला गेला आहे. ३८ कोटी ५० लक्ष मार्क अगर सुमारें २ कोटी पौंडांपर्यंत निव्वळ तारणावर नोटा काढण्याची परवानगी आहे. याचेवरील प्रत्येक नोटेच्या रकमेइतकें रोख सोनेंनाणें ठेविलेंच पाहिजे असा निर्बंध आहे. परंतु इंग्लंडमध्यें आणीबाणीच्या प्रसंगीं बँकेचा कायदा तहकूब करण्याचा प्रसंग येतो हें पाहून जर्मन कायद्यांत थोडी सुधारणा केली आहे. रोख रकमेखेरीज जितक्या रकमेच्या नोटा काढण्याचा पेढ्यांना अधिकार आहे, त्यापेक्षां जास्त रकमेच्या नोटा रोख रकमेखेरीज काढण्याची जरूरी वाटल्यास पेढ्यांना तसें करण्याची सवलत ठेविली आहे. मात्र त्यांनीं या सवलतीबद्दल अशा रकमेवर दरसाल दरशेंकडा ५ टक्के कर दिला पाहिजे. तसेंच चलनी नोटांच्या पूर्ण परिवर्तनाकरितां आणखी अशीही एक शर्त आहे कीं, कोणत्याही पेढीच्या चलनी नोटांच्या एकंदर रकमेच्या निदान एक तृतीयांशापेक्षां कमी सोनें-नाणें पेढीच्या तिजोरींत होतां कामा नये.

येथपर्यंत कायदेशीर परिवर्तनीय चलनी नोटांच्या स्वरूपाचा व त्यांच्या परिवर्तनाच्या तत्वाचा विचार झाला. आतां कायदेशीर कागदी चलनाच्या एकच प्रकाराचा विचार करण्याचें राहिलें. तो प्रकार अपरिवर्तनीय कागदी चलनाचा होय. केव्हां केव्हां असें कागदी चलन हें परिवर्तनीय चलनी नोटांपासून उद्भूत होतें. देशांतील चलनी नोटा परिवर्तनीय म्हणून काढलेल्या असतात. त्यांच्या

पूर्ण परिवर्तनास लागणारें सोनेंनाणें देशांत शिल्लक असतें. परंतु देशाला लढाई करावी लागल्यामुळें किंवा एकाएकीं परकी देशांत सोनेंनाणें फार पाठवावें लागल्यामुळें या शिलकेचा त्या कामाला कर्ज म्हणून उपयोग केला जातो. परंतु मग चलनी नोटांचें परिवर्तन बंद पडतें. अशा प्रसंगीं सरकार किंवा पेढी यांनीं नोटांबद्दल रोख पैसे दिले पाहिजेत अशी कायद्यांतील शर्त तहकूब करावी लागते. इंग्लंडचें फ्रान्सबरोबर भयंकर युद्ध चाललें असतांना १७९७ मध्यें इंग्लंडमध्यें असा तहकुबीचा कायदा करावा लागला होता. हा तहकुबीचा कायदा १८१९ पर्यंत चालला होता. अर्थात् या सर्व काळांत इंग्लंडांतील चलनी नोटा या अपरिवर्तनीय होत्या. म्हणजे नोटांबद्दल रोख पैसे मिळत नसत.

फ्रान्समध्यें जॉन लॉच्या शिफारशीवरून प्रथमतः परिवर्तनीय चलनी नोटा काढल्या होत्या. परंतु पुढें त्या अपरिवर्तनीय केल्या गेल्या. फ्रान्सच्या राज्यक्रांतीनंतरही एकदां असायनेटस् म्हणून अशा अपरिवर्तनीय नोटा काढण्यांत आल्या होत्या; अमेरिकेंतील निरनिराळ्या संस्थानांनीं अशा प्रकारचे पुष्कळ प्रयोग करून पाहिले होते. अमेरिकेच्या अन्तर्युद्धांतही ग्रीनबॅक्स नांवाच्या चलनी नोटा काढण्यांत आलेल्या होत्या. याप्रमाणें अडचणीच्या प्रसंगीं निरनिराळ्या देशांनीं अपरिवर्तनीय चलनी नोटा काढल्याचे दाखले आहेत खरे; तरी पण नेहमींच्या व्यवहारांत अशी नाण्यांची पद्धति ही देशाच्या व्यापाराला फार हानिकर आहे असें सर्व अर्थशास्त्रकारांचें मत आहे. कारण या पद्धतीमध्यें अतिरेक व तज्जन्य अविश्वास हा उत्पन्न होतो. रोख पैसे देण्याची जबाबदारी नाहींशी झाली म्हणजे या नोटांचा अतिरेक करण्याचा मोह झाल्याखेरीज रहात नाहीं. कारण या नोटा काढण्यास खर्च मुळींच लागत नाहीं व त्यानें सरकारची तात्पुरती अडचण भागल्यासारखी होते. परंतु अशा नोटांचा अतिरेक झाला कीं, त्यांची किंमत कमी होऊं लागते. कारण नोटांचें परिवर्तन बंद झालें कीं लोकांचा सरकारवरील विश्वास उडून जातो. यामुळें सरकारी चलनी नोटा लोक घ्यावयास नाखुष असतात. यामुळें त्यांची किंमत कमी होते. असा लोकांचा नोटांवरील विश्वास उडाला म्हणजे या नोटा किती अपकृष्ट होतील याचा नियम नाहीं. नोटांच्या या अतिरेकानें देशांत पैसा फार वाढतो व पैशाच्या संख्यात्मक तत्त्वानुरूप पदार्थांच्या किंमती विलक्षण वाढतात. या किंमतीच्या वाढीनें व्यापारावर

अनिष्ट परिणाम घडतात. फ्रान्सच्या क्रांतीच्या काळीं फ्रेंच असायनेटच्या हजारों फ्रँकांची असायनेट कांहीं पेन्सांच्या किंमतीपर्यंत अपकृष्ट झालेली होती. इंग्लंडमध्यें १७९७ पासून १८१९ पर्यंत जेव्हां अपरिवर्तनीय नोटांचा प्रसार झाला होता तेव्हां ती देशाची आणीबाणीची वेळ होती. युद्ध हें सर्व लोकांच्या संमतानें चाललें होतें. लोकांचा सरकारवरील विश्वास कमी झाला नव्हता. लढाई बंद झाली म्हणजे सरकार रोख पैशाचें चलन पुनः सुरू करील अशी लोकांना खात्री होती. तसेंच इंग्लंडचें व्यापारी वर्चस्व कायम होतें. तरीसुद्धां बँक ऑफ इंग्लंडच्या चलनी नोटा शेंकडा ५० नीं अपकृष्ट झाल्या होत्या. म्हणजे त्यांची किंमत बाजारांत निम्यानें कमी झाली होती.

वरील विवेचनावरून अपरिवर्तनीय चलनी नोटांची पद्धति स्वीकारणें एखाद्या देशाला एखाद्या आणीबाणीच्या व अडचणीच्या प्रसंगीं भाग पडलें तरी सामान्यतः ही चलनपद्धति अर्थशास्त्रदृष्ट्या अगदीं कनिष्ठ दर्ज्याची आहे. अशा पद्धतीनें देशाच्या व्यापारधंद्यांस उत्तेजन मिळण्याऐवजीं देशाचा उद्योगधंद्याच्या बाबतींत या पद्धतीनें पीछेहाटच होते. म्हणून कोणत्याही सुधारलेल्या देशांत अशी पद्धति नेहमींची पद्धति म्हणून स्वीकारलेली नाहीं. देशांतील धात्वात्मक नाण्याची पद्धति काय किंवा कागदी चलनपद्धति काय दोन्हीही स्वाभाविक व अकृत्रिम तऱ्हेच्या पाहिजेत. म्हणजे देशाच्या व्यापाराच्या गरजेप्रमाणें पैसा आपोआप कमी जास्त होण्याची तजवीज त्या पद्धतीमध्यें पाहिजे. परंतु टांकसाळी खुल्या केल्याखेरीज व चलनी नोटा परिवर्तनीय असल्याखेरीज पैशाच्या पद्धतींत हा लवचीकपणा रहात नाहीं. दोन्ही नाण्यांच्या किंमती व संख्या फक्त सरकारच्या कायद्यावर अवलंबून राहिल्या म्हणजे चलनपद्धति कृत्रिम होते व अशी कृत्रिम पद्धति देशाच्या व्यापारास अपायकारक होण्याची फारच धास्ती असते. म्हणूनच अर्थशास्त्रदृष्ट्या धात्वात्मक चलनपद्धति काय किंवा कागदी चलनपद्धति काय दोन्ही स्वाभाविक असल्या पाहिजेत, असा अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे. या दृष्टीनेंच देशाच्या वाढत्या भरभराटीबरोबर व्यापारांत व्यावहारिक चलनपद्धति सुरू होते. या पद्धतीच्या प्रवर्तक संस्था म्हणजे पेढ्या होत. तेव्हां पुढल्या भागांत या संस्थांचा इतिहास व स्वरूप यांचा विचार करू. मग या संस्थांकडून व्यावहारिक कागदी चलन कसें प्रचारांत येतें हें पाहतां येईल.

# भाग बारावा.

## पेढीची उत्पत्ती.

समाज उत्क्रांतीच्या खालच्या पायरीवर असतो त्या वेळीं पेढीच्या व्यापाराची उत्पत्ति होणें शक्य नसतें. कारण अशा रानटी स्थितींत नाणें व पैसा यांचा मुळीं व्यवहारांत उपयोगच सुरू झालेला नसतो. समाज मृगयावृत्तींत असतांना किंवा धनगरांप्रमाणें जनावरांचे कळप घेऊन रानोमाळ हिंडणाऱ्या गोपालवृत्तींत असतांना, किंवा कृषिवृत्तींत असतांनासुद्धां पेढया उत्पन्न होत नाहींत; परन्तु त्याच्या पुढल्या स्थितींत समाज आला म्हणजे पैशानें नेहमीं व्यवहार सुरू होत असतो; कलाकौशल्याचे पदार्थ उत्पन्न होऊं लागतात व निरनिराळ्या देशांचा व्यापार सुरू होतो. या व्यापाराच्या वाढीबरोबर नाण्यांची गरज जास्त लागते व निरनिराळ्या देशांत त्या त्या देशाच्या राजसत्तेच्या निदर्शक चिन्हांनीं युक्त अशीं सोन्यारुप्याचीं व तांब्याखंडाचीं निरनिराळीं नाणीं व्यापारांत चालू होतात; मग सराफाचा धंदा अवश्य होतो. त्यापासूनच पुढें मोठमोठया पेढया उत्पन्न होतात. या पेढीच्या व्यापाराचें पूर्ण स्वरूप आपणांस हल्लीं युरोपांत पहाण्यास सांपडतें. परन्तु हें स्वरूप त्यास एकदम आलें नाहीं. तें हळू हळू येत गेलें; तें कसें हें प्रथमतः आपणांस पहावयाचें आहे.

युरोपांतील कलियुग संपून नवीन युगास तेराव्या शतकांत आरंभ झाला असें म्हणतात. या काळांत युरोपमध्यें व्यापारधंद्यांत, कलाकौशल्यांत व इतर सर्व बाबतींत इटली देशांतील संस्थानें पुढें होतीं. युरोपांतील बाकीचे देश या काळीं सुधारणेच्या व व्यापाराच्या कामांत बरेच मागे होते. इटली देशांतील व्हेनिस, जिनोआ, फ्लॉरेन्स वगैरे शहरें त्या काळीं अत्यंत श्रीमान् होतीं. कारण युरोप व आशिया यांचेमधील व्यापाराचीं तीं नाकीं होतीं. त्या काळीं हिंदुस्थान, इराण, चीन वगैरे आशिया खंडांतील देश पुष्कळ भरभराटींत होते व कलाकौशल्याचे कामांत बरेच प्रवीण होते. या देशांतील माल इटलींतील वर निर्दिष्ट केलेलीं शहरें युरोपांत नेऊन विकीत. या व्यापारांत त्यांस अत्यंत फायदा होई. हा

फायदेशीर व्यापार आपल्या हातांत यावा याच हेतूनें पोर्तुगाल व स्पेन या देशांतील दर्यावर्दी लोक हिंदुस्थानचा नवा रस्ता काढण्यास झटत होते. गलबतांवर गलबतें घेऊन हे लोक आफ्रिकेच्या किनाऱ्यानें खालीं खालीं जाण्याचा प्रयत्न करीत. वास्कोडिगामा यानें हा प्रयत्न सफल करून शेवटीं एकदांचा हिंदुस्थानचा किनारा गांठला. हा हिंदुस्थानचा मार्ग काढण्याच्या नादांत कोलंबसास अमेरिका सांपडली व या दोन मोठ्या गोष्टींनीं युरोपांतील देशांच्या भरभराटींत फरक झाले. पूर्वी इटलीदेश फार गबर होता व त्यांतील शहरांचें सर्व युरोपांत प्राबल्य असून त्यांचा वैभवरवि उच्चीवर होता; परन्तु अमेरिकेच्या शोधानें व हिंदुस्थानच्या नव्या मार्गानें त्यांचा हा वैभवसूर्य मावळला व स्पेन, पोर्तुगाल, बेल्जम व इंग्लंड या देशांस महत्त्व आलें. या परिस्थितिभेदामुळें पेढीच्या व्यापाराचेंही स्थानांतर झालें. इटली देशांतील शहरांचा हजारों देशांशीं संबंध येई. यामुळें त्या देशाच्या व्यापाऱ्यांजवळ निरनिराळ्या देशांतील नाणीं जमत. या नाण्यांची योग्य किंमत ठरवून अदलाबदल करणें, तसेंच व्यापाऱ्यांस निरनिराळ्या ठिकाणीं पैसे पोंचविणें, वगैरे कामें या देशांतील पेढ्या करीत. शिवाय, या शहरांत सर्व युरोपाच्या पेढींचा व्यापार संकलित होण्याचें आणखी एक मोठें कारण होतें. युरोपांत त्या वेळीं रोमन कॅथॉलिक धर्म सर्वत्र पसरलेला होता व या धर्माचा मुख्य धर्माध्यक्ष पोप हा रोम येथे राहत असे. युरोपांतील निरनिराळ्या देशांतून धर्माची बाब म्हणून जो एक कर असे त्यावर पोपसाहेबांचाच ताबा असे. हें करवसुलीचें कामही इटलींतील पेढीवाले करीत. हे पेढीवाले सावकारीचा धंदा करीत. कित्येक राजांस ते कर्ज देत असत, व कर्जाच्या व त्यावरील व्याजाच्या फेडीकरितां निरनिराळ्या करांच्या वसुलीचें काम यांचेकडे येई. अशा प्रकारचें या शहरांतील पेढीवाल्यांचें वैभव होतें. पूर्वी या पेढ्या खाजगी गृहस्थांच्या असत, परंतु पुढें सरकारी पेढ्या निघूं लागल्या. तसेंच सरकारास कर्ज देण्याकरितां संयुक्त भांडवलाच्या तत्त्वावरही कांहीं पेढ्या निघत. निरनिराळ्या देशांतील पेढ्या निरनिराळ्या कारणांनीं अस्तित्वांत आलेल्या आहेत.

पोर्तुगाल व स्पेन देशानंतर वसाहतीच्या कामांत हॉलंड फार पुढें गेलें; आशियांत व अमेरिकेंत त्या देशाच्या पुष्कळ वसाहती झाल्या व इंग्लंडचें वर्चस्व वाढण्यापूर्वी नेण्याआणण्याचा सर्व व्यापार त्यांचेच हातांत होता. यामुळें हॉलंड

देशांत पुष्कळ देशांतील नाणीं येत. हॉलंड देश मूळचा लहान असल्यामुळें त्या देशाचें स्वतःचें नाणें फार थोडें होतें. दुसऱ्या देशांतील नाणीं पुष्कळ झिजलेलीं व कमी किंमतीचीं वगैरे असत. नाण्यांच्या या गोंधळामुळें हॉलंडचा व्यापारांत तोटा होऊं लागला. झिजलेल्या नाण्यांवर कसर द्यावी लागल्यामुळें हॉलंड देशाचें नुकसान होऊं लागलें. हॉलंड देशानें नवें चांगलें नाणें पाडण्यांतही अर्थ नव्हता. कारण, तें नाणें ग्रेशॅमच्या नियमानुरूप लगेच बाहेर देशीं जाई. ही अडचण दूर करण्याकरितां आमस्टर्डाम येथें एक मोठी पेढी निघाली. ही सरकारच्या आश्रयाखालीं निघाली. ही पेढी सर्व प्रकारचीं नाणीं त्यांच्या खऱ्या किंमतीस घेत असे व नाणीं आणणाऱ्या माणसांस पेढीच्या नोटा मिळत. कांहीं एका रकमेनंतर करावयाच्या भरण्यास या पेढीच्या नोटा व पेढीचें नाणें दिलें पाहिजे, असा सरकारी ठराव असल्यामुळें प्रत्येक व्यापाऱ्यास या पेढीशीं आपला व्यवहार ठेवणें भाग असे. या व्यवस्थेपासून या बँकेच्या नोटांची देशांत व बाहेर इतकी पत वाढली कीं, या पेढीच्या नोटांकरितां थोडी कसर द्यावी लागे. या बँकेपासून हॉलंडमधला नाण्यांचा सर्व गोंधळ नाहींसा झाला व नाण्यांच्या गोंधळामुळें हॉलंड देशाच्या व्यापारास जो धक्का बसत असे तो नाहींसा होऊन हॉलंडची व्यापारांत फार भरभराट झाली. देशांतील सर्व शिल्लक पैसा या पेढीवर येऊं लागला. यामुळें देशांतील व्यापाऱ्यांस भांडवलाची कधींच पंचाईत पडत नसे. अशा तऱ्हेनें या पेढीनें हॉलंडांत व्यापारवृद्धि केली. पुढें सरकारनें या पेढीपासून अतोनात कर्ज घेतलें व शिल्लक रकम लढाईकरितां घेतली. यामुळें या बँकेस वाईट स्थिति आली.

इंग्लंडमध्यें पेढ्यांची उत्पत्ति निरनिराळ्या कारणांनीं झाली. पूर्वी इंग्लंडांत मुख्य व्यापारी परकीय असत; परन्तु पुढें देशी व्यापारी पुढें येऊं लागले. पूर्वीच्या काळीं लोक आपला पैसाअडका व सोन्यारुप्याची शिल्लक सुरक्षितपणाकरितां लंडन येथील सरकारी तिजोरींत ठेवीत; परन्तु १६४० मध्यें चार्लस राजानें लोकांचे पैसे बळजबरीनें तिजोरींतून काढून आपल्या कामास लावले. यामुळें प्रजेचा राजावरील विश्वास उडाला व तेव्हांपासून लोक आपले पैसे व शिल्लक लंडनमधल्या कोटांत न ठेवतां खाजगी सोनाराजवळ ठेवूं लागले. हे सोनार सराफीचा व्यापार करीत. यामुळें संरक्षणाकरितां त्यांच्याजवळ शिल्लक ठेवणें

लोकांस जास्त सुरक्षित वाटूं लागलें. पहिल्याप्रथम या ठेवी ठेवण्याबद्दल या सराफांस कांहीं तरी शेंकडावळ द्यावी लागे. परन्तु या सराफांस असें दिसून आलें कीं, सर्व लोक एकदम आपली शिल्लक कधींही परत मागत नाहींत. साधारण एकंदर ठेवीच्या एकतृतीयांश रोख पैसा जवळ ठेवल्यास नेहमीं होणाऱ्या देवघेवी पार पडतात. तेव्हां बाकीचा राहिलेला पैसा ते व्याजानें व्यापाऱ्यांस देऊं लागले. या तऱ्हेनें व्यापाऱ्यांस भांडवल सहज मिळूं लागलें व व्यापारास तेजी आली. सराफांस हा व्यापार फारच फायदेशीर होता. तेव्हां ठेवीवाल्यांना उत्तेजन देण्याकरितां ते ठेवीबद्दल कांहीं एक शेंकडावळ न मागतां उलट ठेवीवर थोडें थोडें व्याज देऊं लागले. या पद्धतीनें तर त्यांचेजवळ फारच ठेवी येऊं लागल्या. लोकांसही शिल्लक टाकण्याची व घरांत पैसा न ठेवण्याची बुद्धि होऊं लागली. कारण, पूर्वी ठेवी सुरक्षित ठेवण्याकरितां उलट पैसा द्यावा लागे, त्याचे ऐवजीं ठेव ठेवणें ही एक लहानशी उत्पन्नाची बाबच झाली. शिवाय प्रसंग पडल्यास आपणांस सर्व ठेव परत घेण्याचा अधिकार असेच. यामुळें ही शिल्लक टाकण्याची व ठेवी ठेवण्याची पद्धति अगदीं सार्वत्रिक होऊन लोकांच्या अंगवळणीं पडूं लागली. या योगानें देशांत भांडवल झपाट्यानें वाढूं लागलें; कारण, जें भांडवल पूर्वी निरुपयोगी असे व ज्याचा उत्पादक धंद्यांस उपयोग नसे, असें भांडवल उत्पादक धंद्यांकडे जाऊं लागलें. या सराफांच्या पेढ्या देशांतील भांडवल एकत्र करणाऱ्या संस्था बनल्या. त्यामुळें देशांतील व्यापारास फारच उत्तेजन येऊन इंग्लंडची सर्व तऱ्हेनें भरभराट होऊं लागली.

आतांपर्यंत समाजाच्या कोणत्या स्थितींत पेढीच्या व्यापाराची अवश्यकता उत्पन्न होते, व युरोपमध्यें कोणकोणत्या देशांत कोणकोणत्या कारणांनीं प्रथमतः पेढ्या स्थापन झाल्या, याचें थोडक्यांत वर्णन केलें. तसेंच खुद्द इंग्लंडांत पहिल्या चार्लस राजाच्या विश्वासघाताच्या वर्तनापासून लोकांचा राजावरील विश्वास उडून लोक आपले पैसे व शिल्लक सोनार व सराफ या धंद्यांच्या लोकांजवळ ठेवूं लागले व या धंद्यांचे लोक हळूहळू पेढीचा व्यापार करूं लागून मोठे पेढीवाले बनले, याचेंही दिग्दर्शन केलें. आतां इंग्लंडांतील फार मोठी जी बँक ऑफ इंग्लंड तिच्या स्थापनेची थोडी हकीकत देऊन पेढीच्या निरनिराळ्या प्रकारांकडे व पेढीच्या व्यापाराच्या अन्तःस्वरूपाकडे वळण्याचा विचार आहे.

इंग्लंडचा तिसरा विल्यम राजा हा हॉलंडमधील रहिवाशी होता. त्या काळीं डच लोक व्यापारांत फार पुढें होते. त्यांस पेढीच्या व्यापाराचें महत्त्व व पेढ्यांचा व्यापारावर सुपरिणाम यांचें चांगलें ज्ञान होतें. अशा लोकांपैकीं विल्यम होता. शिवाय तो मोठा धूर्त मुत्सद्दी होता. त्यास फ्रान्स देशाशीं लढाई करून फ्रान्सच्या चवदाव्या लुई राजाचा नक्षा उतरावयाचा होता. यामुळें त्याचें सर्व आयुष्य लढायांत गेलें. या युरोपांतील लढायांकरितां त्यास कर्ज पाहिजे होतें. १६९४ साला त्यास १२ लक्ष पौंड कर्जाची गरज होती. हें कर्ज देणाऱ्या लोकांस बँक ऑफ इंग्लंड ह्मणून एक पेढी काढून कांहीं विशेष सवलती देण्याचें विल्यम राजानें कबूल केलें. सरकारास पाहिजे होतें तितकें कर्ज एक दोन आठवड्यांत मिळून या पेढीची स्थापना झाली. या पेढीच्या स्थापनेचा कायदा पसार करतांना पार्लमेंटांत बराच कडाक्याचा वाद झाला. कांहीं लोक या कल्पनेच्या विरुद्ध होते. त्यांच्या मतें या पेढीमुळें सरकार वाटेल तितके पैसे कर्ज काढूं शकेल. आणि मग तें पार्लमेंटास भाव्यावर बसवून जुलमी व अनियंत्रित सरकार बनेल. तसेंच, या पेढीमुळें खाजगी व्यापारास धक्का बसेल, व सराफ व पैशाची देवघेव करणारे यांचेपासून खाजगी लोकांस फार त्रास होईल. अशा प्रकारच्या हजारों कुशंका त्या वेळीं निघाल्या. परंतु विल्यमच्या शहाण्या व धूर्त मंत्र्यांनीं भावी फायद्याकडे लक्ष देऊन आपलें ह्मणणें तडीस नेलें व पेढीच्या स्थापनचा कायदा पास करून घेतला. बँकेच्या रकमेवर सरकारानें शेंकडा आठ टक्केप्रमाणें व्याज देण्याचें ठरविलें. तसेंच सरकारचे कर वगैरे येतील तसतसे जमा करून सरकारास लागतील तसतसे पैसे देऊन सरकारचा जमाखर्च ठेवण्याचें काम या बँकेकडेच दिलें व या कामगिरीबद्दल ह्मणून आणखी चार हजार पौंड सालाना बँकेस देण्याचा ठराव झाला. ह्मणून एकंदर दरवर्षी सरकाराकडून बँकेस एक लक्ष पौंडांचें कायमचें उत्पन्न झालें. शिवाय या बँकेस चलनी नोटा काढण्याचा अधिकार दिला. यामुळें पेढीस फार फायदा होऊं लागला. या पेढीचा व सरकारचा फार निकट संबंध असे. वेळोवेळीं पेढीची सनद फिरून दुरुस्त होऊन मिळत असे. या बँकेमुळें सरकारास वेळोवेळीं लागणारें कर्ज फार हलक्या व्याजानें मिळे. बँकेचें मूळचें भांडवल बारा लक्षांचें होतें. त्यांत वारंवार भर घालून तें पुढें १ कोटी पौंडांपर्यंत गेलें. ही पेढी इतर खाजगी पेढ्यांप्रमाणें सर्व

व्यवहार करी. या व्यवहारांपासूनही तिला चांगला फायदा होत असे. याप्रमाणें या बँकेची सारखी भरभराट होत गेली. पुढें चलनी नोटा काढण्याचा कारभार या बँकेच्या एका स्वतंत्र शाखेकडे दिला व नेहमींचें देवघेवीचें काम दुसऱ्या शाखेकडे दिलें. या बँकेचे सर्व हिशेब आठवड्याच्या आठवड्यास प्रसिद्ध होत. बँकेचें घेणें किती, देणें किती व बँकेच्या तिजोरींत शिल्लक किती याचा आढावा दर आठवड्यास काढीत असल्यामुळें लबाडी होण्याचा मुळींच संभव नसे. शिवाय, या बँकेचा सरकारशीं निकट संबंध असल्यामुळें सर्व प्रजाजनांमध्यें या बँकेची साख फार मोठी असे. म्हणून या बँकेच्या नोटा लोक खुशाल चलनी नाण्यांप्रमाणें बिनदिक्कत वापरीत. बँकेच्या या पतीमुळेंच सरकारास मोठमोठ्या खर्चाच्या लढाया चालवितां आल्या. कारण, परकी देशांत लढायांकरितां पैसे रोख लागत. हे रोख पैसे तें बँकेजवळून घेई. या बँकेंत सर्व देशांतील लोकांच्या ठेवी असल्यामुळें वेळप्रसंगीं वाटेल तितका पैसा या बँकेजवळ असे व त्याचा सरकारास उपयोग होई. बाहेर देशांत नाण्यांचा व रोख पैशाचा प्रवाह गेल्यामुळें देशांत पैशाची तूट पडण्याचा संभव असतो. पैशाची तूट आल्यास व्यापारास एकदम धक्का बसतो; परंतु या अनर्थापासून इंग्लंडदेश या बँकेमुळें कित्येक वेळां वांचला आहे. कारण अशा आणीबाणीच्या प्रसंगीं ही बँक वाटेल तितक्या चलनी नोटा काढीत असे व चलनी नोटांबद्दल मागेल तेव्हां रोख पैसा देऊं असा जो करार असतो त्या कराराची अंमलबजावणी कांहीं विवक्षित कालपर्यंत रद्द करण्याचा कायदा सरकार करून देत असे. अशा तऱ्हेनें या बँकेमुळें इंग्रज सरकारास, इंग्लंडच्या व्यापारास व देशांतील एकंदर लोकांस अनेक फायदे झाले आहेत.

प्रथमतः ही पेढी स्थापन झाली, त्या वेळीं तिच्याबद्दल बराच गैरसमज व पुष्कळशा कुशंका निघाल्या होत्या असें वर सांगितलें आहे. याशिवाय लंडनमधील खाजगी पेढीवाले या अर्धवट सरकारी पेढीचा हेवा करीत व या पेढीचें दिवाळें वाजविण्याकरितां ते पुष्कळ युक्त्या करीत. या बँकेच्या पुष्कळ चलनी नोटा जमवून त्या बँकेकडे एकदम नेऊन बँकेची फजिती करण्याचा या खासगी पेढीवाल्यांनीं पुष्कळ प्रयत्न केला, परन्तु तो सिद्धीस गेला नाहीं.

संयुक्त भांडवलाच्या तत्वावर निघालेली ही पहिलीच पेढी असल्यामुळें त्याबद्दलही पुष्कळ गैरसमज होता. संयुक्त भांडवलाचें तत्व आतां सर्व व्यापारांत

रूढ झालें आहे व या तत्वामुळें व्यापारास पुष्कळ उत्तेजन मिळालें आहे. यामुळें-च इंग्लंडमध्यें भांडवलाची कधींच वाण पडत नाहीं. परंतु हा प्रकार त्या काळीं नवीन होता. त्या वेळीं पुष्कळ कंपन्या बुडालेल्या होत्या. यामुळें या तत्वाबद्दल कांहीं दिवस लोक साशंक असत. **ॲडाम स्मिथ**सारखा प्रसिद्ध अर्थशास्त्रवेत्ता-सुद्धां या संयुक्त भांडवलाच्या तत्वास अनुकूल नव्हता. तेव्हां १६९४ सालां या संयुक्त तत्वावर निघालेल्या बँक ऑफ इंग्लंडबद्दल गैरसमज व्हावा हें अगदीं साहजिक आहे; परन्तु या बँकेच्या उत्तम व्यवहारानें गैरसमज नाहींसा झाला. इत-केंच नाहीं, तर संयुक्त तत्वापासून होणारे फायदे लोकांच्या ध्यानांत येऊं लागले. **ॲडाम स्मिथ** जरी या तत्वाविरुद्ध होता तरी जर कोणताही व्यापार संयुक्त भांडवलाच्या तत्वावर फायदेशीर रीतीनें करतां येईल तर तो पेढीचाच व्यापार आहे असें तो म्हणत असे.

खासगी पेढ्यांपेक्षां संयुक्त भांडवलाच्या तत्त्वावर चाललेल्या पेढ्यांची पत व साक स्वाभाविकपणें जास्त असते. कारण यांत पुष्कळ लोकांचें भांडवल असतें व ज्याचा ज्याचा बँकेंत भाग असतो तो तो मनुष्य आपल्या इष्टमित्रांजवळ आपल्या बँकेच्या साकेबद्दल उद्गार काढतो. खासगी बँकांस हा फायदा मिळत नाहीं. शिवाय खासगी बँकेची व्यवस्था वाईट माणसांच्या हातांत जाण्याचा संभव असतो. पेढीचा मालक वाईट मनुष्य निघाल्यावर त्यास दूर करतां येत नाहीं. परंतु संयुक्त भांडवलाच्या तत्त्वावर चाललेल्या पेढीच्या व्यवस्थापकावर सर्व भांडवलवाल्यांचा अधिकार असतो. एखादा डायरेक्टर वाईट निघाल्यास त्यास ताबडतोब दूर करतां येतें. यामुळें स्वाभाविकच अशा पेढ्यांची व्यवस्था चांगलीच असते. पेढीच्या व्यापाराची भरभराट तिच्या पतीवर फार अवलंबून असते. कारण पेढीवाल्यास पत म्हणजे पैसा होय. संयुक्त भांडवलाच्या तत्त्वावर निघालेल्या पेढीच्या उत्तम पतीमुळें तिच्या चलनी नोटा नाण्यासारख्या सभोंव-तालच्या प्रांतांत चालतात. खासगी पेढ्याही असा व्यापार करतात खरा; परंतु खासगी पेढ्यांच्या साखेबद्दल लोकांत शंका उत्पन्न झाल्यास त्यांवर एकदम ठेवी परत करण्याबद्दल व नोटांबद्दल रोख पैसा देण्याबद्दल फार मागण्या होतात. अशी एकदम मागणी आली असतां पेढीजवळ पुरेसे पैसे नसतात व यामुळें पेढीचें दिवाळें निघतें. अशा स्थितींत पेढीस मिळतील तिकडून, पडेल त्या

व्याजानें पैसे कर्जाऊ आणणें भाग पडतें. यामुळें पेढीचें फार नुकसान होतें किंवा पेढी अजीबात बुडते; परंतु संयुक्त भांडवलाच्या तत्त्वावर चाललेल्या पेढीवर असा प्रसंग फार थोडया वेळां येतो. कारण, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें तिच्यावर लोकांचा भरंवसा असल्यामुळें अशी एकदम मागणी होत नाहीं व यदाकदाचित् झाली तरी पुष्कळ भागीदारांजवळून कर्जाऊ पैसे घेण्यास सांपडतें. शेवटीं संयुक्त भांडवलाच्या तत्त्वावर चाललेल्या पेढीचे सर्व जमाखर्च वेळोवेळीं प्रसिद्ध होत असल्यामुळें या पेढीच्या व्यवहारांत लबाडया होण्याचा संभव फारच कमी असतो. या सर्व कारणांमुळें संयुक्त भांडवलाच्या पेढया पिढयानुपिढया टिकल्याचीं उदाहरणें आहेत. बँक ऑफ इंग्लंडचें उदाहरण तर अद्वितीय आहे. तिच्या स्थापनेपासून तिची सारखी भरभराट होत गेली आहे, इतकेंच नव्हे, तर ती सर्व बँकांत प्रमुख स्थान पावली आहे. सर्व देशांतील व्याजाचा दर व कसरी किंवा कटामितीचा दर या बँकेच्या दरावर अवलंबून असतो, इतकें या बँकेचें व्यापारांत वजन आहे. असो.

---

# भाग तेरावा.

## पेढीचें स्वरूप व उपयोग.

पेढीवाला म्हणजे कोण, असा प्रश्न केला व त्याचा जरा बारकाईनें विचार केला तर आपणांस असें उत्तर मिळेल कीं पेढीवाला ह्मणजे पैशाचा किंवा भांडवलाचा व्यापारी. पैशाची देवघेव करणारा सराफ ह्मणजे पेढीवाला. पेढया तीन प्रकारच्या असतात. १ खासगी, २ संयुक्त भांडवलाच्या व ३ सरकारी. १ खासगी पेढयांत असलेच तर फार थोडे भागीदार असतात व या भागीदारांच्या हातांत सर्व व्यवस्था असते. २ संयुक्त भांडवलाच्या पेढीचे पुष्कळ भागीदार असतात. ते स्वतः पेढीची व्यवस्था पाहात नाहींत; तर आपल्यांतील थोडयाजणांस पेढीचे डायरेक्टर नेमतात व डायरेक्टरांच्या हातीं सर्व व्यवस्था असते. ३ शेतकऱ्यांच्या फायद्यासाठीं सरकार स्वतः पेढया काढतें किंवा लोकांच्या उपयोगाकरितां सर-

-कारी पोस्टखात्यामार्फत सरकार पेढीचें काम करतें. अशा प्रकारच्या पेढ्या सरकारी पेढ्या होत.

अर्वाचीनकाळीं पेढी ही मुख्यतः चार प्रकारचीं कामें करते. पेढीचें १ लें कर्तव्य म्हणजे लोकांच्या ठेवी ठेवणें, पेढीचें २ रें काम म्हणजे व्याजानें गिऱ्हाइकांस पैसे देणें, ३ रें काम चलनी नोटा काढणें व ४ थें, लोकांचे पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेऊन पोंचते करणें; यासच हुंडीचा व्यापार म्हणतात. आपल्याकडे पेढीचें शेवटलें कर्तव्यकर्म मुख्य समजलें जातें व 'पेढी' हा शब्द उच्चारल्याबरोबर 'हुंडीचा व्यापार करणारी संस्था' हाच अर्थ प्रथमतः मनांत येतो. पेढीच्या या कर्तव्याचें स्वरूप अगदीं उघड आहे. पुष्कळ माणसांना केव्हांना केव्हां तरी दुसऱ्या ठिकाणीं व हल्लीं सुधारलेल्या काळांत परदेशास पैसा पाठविण्याची गरज पडते. हे पैसे स्वतः पाठविण्याचें मनांत आणलें तर आधीं विश्वासू मनुष्य मिळाला पाहिजे व तो जरी मिळाला तरी ही पद्धति फार त्रासाची व खर्चाची आहे. तसेंच, आपण प्रवासास निघालों आहों व आपणांस एका गांवीं गेल्यावर पैशाची जरूरी आहे. अशा वेळीं आपणांस हे पैसे सतत जवळ बाळगण्याचें जोखीम पतकरावें लागेल. तेव्हां हे पैसे नेण्याआणण्याचें काम दुसरे कोणीं केल्यास मनुष्य या कामागिरीबद्दल कांहीं तरी कमिशन देण्यास तयार होईल. समजा, तुम्हांस काशीस येथून पैसे पाठवावयाचे आहेत; तर हे पैसे पेढीमार्फत पाठवितां येतात. या कामांत मनुष्याची फार सोय होते. तुम्ही येथें पैसे भरले म्हणजे पेढीवाला तुम्हांस एक तितक्या रुपयांची दर्शनी हुंडी देतो. मग ती हुंडी तुम्ही काशीस ज्या पेढीवर दिली असेल त्या पेढीकडे तुमच्या माणसानें नेऊन दिली म्हणजे त्या मनुष्यास हुंडींत लिहिलेले पैसे रोख मिळतात. यालाच हुंडी पटणें म्हणतात. पेढीवाला या कामागिरीबद्दल थोडीशी हुंडणावळ घेतो. परंतु हा हुंडणावळीचा दर प्रत्यक्ष पैसे अगर नोटा पोस्टानें किंवा माणसाबरोबर पाठविण्याच्या खर्चापेक्षां कमी असला पाहिजे, हें उघड आहे. तरच लोक पेढीवाल्याच्या मार्फत पैसे पाठवितील. इतर तऱ्हेनें पैसे पाठविण्यास लागणाऱ्या खर्चापेक्षां जर जास्ती दर पेढीवाला मागूं लागला तर त्या पेढीवाल्यास कोणी गिऱ्हाईकच मिळणार नाहीं. पेढीवाल्याचे निरनिराळ्या मुख्य ठिकाणीं आडते असतात, त्यांचेमार्फत हा पैशाचा नेण्याआणण्याचा व्यवहार चा-

लतो, व तो दोन्ही पक्षांस फायदेशीर असतो. या हुंडीच्या पद्धतीनें देशांतील पैशा-ची देवघेव किती तरी सुलभ होते. या पद्धतीनें प्रत्यक्ष रोख पैसे इकडून तिकडे पाठविण्याचा खटाटोप, खर्च व त्रास वांचतो. कारण एका ठिकाणच्या पेढीवाल्या-जवळ दुसऱ्या गांवीं पाठविण्याकरितां पैसे आलेले असतात व त्याच्या दुसऱ्या गां-वच्या अडत्याकडे या पहिल्या गांवीं पाठविण्याकरितां पैसे जमलेले असतात. तेव्हां एकमेकांनीं एकमेकांच्या हुंड्या स्वीकारल्या म्हणजे रोख पैसे न पाठवितां पैशाची देवघेव नुसत्या कागदपत्रानें होते. फक्त वर्षअखेर एकमेकांकडे कमीजास्त बाकी राहिली असेल तेवढी रकम मात्र रोख पाठविली म्हणजे झालें. या पद्धतीनें हुंड्यांची देवघेव एक लाखाची झाली असतां रोख पैशाची मेभाण हजार, पांच-शेंवर जाण्याचें कारण नाहीं.

पेढीचें दुसरें महत्त्वाचें कर्तव्यकर्म म्हणजे कर्जाऊ पैसे देण्याचें होय. पेढी-वाले हे लोकांस सोनेनाणें अगर डागडागिने गहाण घेऊन व्याजानें पैसे कर्जाऊ देतात, किंवा स्थावर मिळकतीच्या तारणावर पैसे देतात, किंवा नुसत्या पतीवर कर्जाऊ पैसे देतात. तसेंच, ज्या माणसांची पेढीजवळ नेहमीं ठेव असते अशा माणसांना केव्हां केव्हां ठेवीच्या रकमेपेक्षां जास्त पैसे देतात, किंवा प्रॉमिसरी नोटा लिहून घेऊन पैसे देतात. या सर्व व्यवहारांत दिलेल्या पैशांवर व्याज चालू असतें; परन्तु पेढीवाल्यास दुसऱ्या एका प्रकारानें दुसऱ्यास कर्ज देतां येतें. तें कर्ज म्हणजे मुदतीची हुंडी पटविणें होय. एका मनुष्यास दुसऱ्याकडून दोन महिन्यांनीं पैसे यावयाचे असतात. पहिल्या माणसाजवळ दुसऱ्या माणसाची मुदताची हुंडी असते किंवा प्रॉमिसरी नोट असते. हा दुसरा माणूस साहा-जोग असल्यास पेढीवाले पहिल्या मनुष्यास ही हुंडी किंवा प्रॉमिसरी नोट घेऊन रोख पैसे देतात. दोन महिन्यांनीं मिळणाऱ्या पैशांबद्दल आज रोख पैसे द्याव-याचे म्हणजे पेढीवाले कांहीं ठरीव शेंकड्याप्रमाणें कसर कापून घेतात. ही कसर म्हणजे एक प्रकारचें व्याजच होय. खरोखरी मुदतीच्या हुंडीवर किंवा दुसऱ्याच्या मुदतीच्या प्रॉमिसरी नोटांवर आज रोख पैसे घेणें म्हणजे गहाणावर पैसे कर्जाऊ घेण्यासारखेंच आहे. मात्र गहाण ठेवलेली वस्तु कर्ज नेणारा मनुष्य कर्जाऊ पैसे फेडून परत घेऊन जातो. येथें तसा प्रकार होत नाहीं. मुदतीची हुंडी किंवा प्रॉमिसरी नोट यांच्या स्वामित्वाचा हक्क पूर्णपणें पेढीकडे येतो.

पेढीचें तिसरें कर्तव्यकर्म ठेवी ठेवण्याचें आहे. या ठेवींवर पेढी कधीं व्याज देते अगर देत नाहीं. ठेवी कांहीं विवक्षित मुदतीच्या असतात, अगर चालू खात्यावर असतात. मुदतीच्या ठेवींवर पेढी बहुधा व्याज देते. चालू खात्यावर मात्र पेढीच्या गरजेप्रमाणें व्याज दिलें जातें किंवा दिलें जात नाहीं. या कामावरूनच पेढीस पैशाची देवघेव करणारी संस्था म्हणतात. पेढी ज्या लोकांच्या जवळ शिल्लक पैसे असतात त्यांचे जवळून पैसे कर्जाऊ अगर उसने घेते व ज्या लोकांस पैशाची जरूरी आहे त्या लोकांस पैसे कर्जाऊ देते. ज्या व्याजाच्या दरानें पेढीनें कर्जाऊ पैसे घेतले असतील त्याच व्याजानें जर पेढीनें पैसे दिले तर पेढीस फायदा न होतां तोटाच होईल. म्हणून कर्जाऊ घेण्याच्या अगर ठेवीच्या व्याजाचा दर कर्जाऊ देण्याच्या व्याजाच्या दरापेक्षां नेहमीं कमी असला पाहिजे. असें नसलें तर पेढीचा व्यापार आंतबट्ट्याचा होऊन पेढी बुडेल. पेढ्या या शेतकीस पाणी पुरविणाऱ्या तलावाप्रमाणें व्यापारास भांडवल पुरविणाऱ्या संस्था होत. ज्याप्रमाणें लहान लहान ओढ्याचें पाणी, जें निरर्थक वाहून जात असतें तें, तलावांत एकत्र करून मग त्याचे पाट विवक्षित स्थळीं नेले जातात, त्याचप्रमाणें खाजगी माणसांच्या घरीं निरर्थक पडून राहिलेले पैसे ठेवीच्या रूपानें जमवून पेढी व्यापारी लोकांस भांडवल पुरविते. तेव्हां व्यापाराच्या दृष्टीनें हेंही पेढीचें काम फार महत्त्वाचें आहे हें उघड आहे.

पेढीचें चवथें काम म्हणजे चलनी नोटा काढणें. युरोपांतील सुधारलेल्या सर्व राष्ट्रांतील पेढ्यांस हा नोटा काढण्याचा अधिकार दिलेला असतो. हा अधिकार फार महत्त्वाचा असल्यामुळें त्यावर सरकारची देखरेख असते. व पेढ्यांनीं कोणत्या अटीवर कितीपर्यंत नोटा काढाव्या याबद्दल सक्त नियम केलेले असतात. त्या नियमांबरहुकूमच पेढ्यांस चलनी नोटा काढतां येतात. हिंदुस्थान देशांत हा सर्व अधिकार सरकारानें आपल्या हातांत ठेवला आहे. सरकारचें चलनी नोटांबद्दलचें एक स्वतंत्र खातें आहे. त्या खात्याच्यामार्फत हा सर्व कारभार चालतो; परंतु दुसऱ्या देशांत चलनी नोटा काढणें हें पेढीचें एक महत्त्वाच्या कर्तव्यांपैकीं असतें. या अधिकारामुळेंही पेढ्यांस देशांतील व्यापारधंद्यांस वाटेल तितकें भांडवल पुरविण्याचें सामर्थ्य येतें. या अधिकारामुळें देशांत नवीन भांडवल उत्पन्न होतें. कारण या चलनी नोटा पेढीची साख उत्तम असली म्हणजे

अगदीं रोख पैशासारख्या चालतात. पत ह्मणजे पैसा, या ह्मणीची सत्यता या चलनी नोटांवरून दिसून येते. या चलनी नोटा ह्मणजे पेढीच्या वतीनें मागाल तेव्हां रोख पैसा देऊं अशीं वचनें होत. अशीं वचनें काढतांना तितकेच रोख पैसे पेढीनें आपल्या खजिन्यांत ठेविले तर पेढीस यापासून कांहींच फायदा नाहीं. लोकांस मात्र फार सोईचें नाणें मिळालें. परंतु सर्व वचनांइतका रोख पैसा ठेवण्याची गरज नसते; एक लाखाच्या चलनी नोटा काढलेल्या असल्या तर सरासरी त्या रकमेच्या एकतृतीयांशाच्या इतकी रोख रकम पेढीच्या खाजिन्यांत ठेविली ह्मणजे बस्स होतें. कारण, चलनी नोटा असलेले एकूण एक गृहस्थ पेढीकडे रोख पैसे मागण्यास एकदम कधींच येत नाहींत. यामुळें या पेढीनें सत्तर हजारांचें अगदीं नवें भांडवल देशांत उत्पन्न केल्यासारखें होतें. कारण, जरी चलनी नोटा नुसत्या कागदाच्या असतात तरी जोंपर्यंत त्या लोकांपाशीं असतात तोंपर्यंत त्या पैशाचेंच कार्य करीत असतात.

पेढ्यांचें वर्गीकरण निरनिराळ्या तत्वांवर केलेलें आढळतें. पेढीच्या स्वरूपाचें निरूपण करतांना पेढीचीं कामें सांगितलीं होतीं. आतां या निरनिराळ्या कामांच्या धोरणानें युरोपांत निरनिराळे प्रकार झाले आहेत. वर्गीकरणाचें दुसरें तत्व ह्मणजे स्वामित्वावरून वर्गीकरण ठरविणें हें होय. बहुतेक सर्व देशांत या तत्वानुरूप तीन प्रकारच्या पेढ्या दिसतात. एक खासगी पेढ्या, दुसऱ्या संयुक्त तत्वावरील पेढ्या व तिसऱ्या सरकारी पेढ्या. यांपैकीं पहिल्या आपल्या देशांत पुष्कळ दिवसांपासून चालू आहेत. पेढीवाला हा फार जुना शब्द आहे. या पेढ्यांचा उल्लेख पेशवाईपासूनच्या कागदोपत्रांत व जमाखर्चांत दिसून येतो. परन्तु हे सर्व पेढीवाले खाजगी लोक असत. यांत केव्हां केव्हां भागीदार असत, परंतु हे फार थोडे असत. सर्व भागीदार प्रत्येक पेढीवर काम करीत व पेढीचा कारभार चालवीत. संयुक्त भांडवलाचें तत्व आपल्या लोकांस अगदीं परिचित नाहींसें दिसतें. सामान्य लोकांकडून थोड्या रकमांचें मोठें भांडवल जमा करून त्या भांडवलावर मोठमोठे कारखाने, व्यापारउदीम चालविण्याची आपल्याला मुळींच माहिती नाहीं; ह्मणूनच अशा तत्वावर निघालेल्या संस्था आमच्याकडे बुडालेल्या आहेत. यामुळें लोक अशा संस्थांत पैसे घालण्यास धजत नाहींत. पहिल्याप्रथम युरोपमध्येंही असाच प्रकार झाला. या तत्वामुळें गरीब लोकांजवळ पडून राहि-

लेली संपत्ति उत्पादक भांडवल बनतें. दुसरें, अशा संस्थेचे हिशेब प्रसिद्ध होत असल्यामुळें लबाडी करण्यास कमी जागा असते. देशांतील निरनिराळ्या धंद्यांची स्थिति कशी आहे हें प्रसिद्ध झालेल्या जमाखर्चांवरून ताडतां येतें. तसेंच, संयुक्त भांडवलाच्या तत्वावरील उद्योगांत खासगी उद्योगापेक्षां कायमपणा असतो. खासगी कामांत कर्ता मनुष्य मेला म्हणजे त्याचा मुलगा कर्ता असेलच असा नेम नाहीं. म्हणून तो उद्योग बुडण्याचा जास्त संभव असतो. परंतु संयुक्त भांडवलाच्या उद्योगाचें तसें नसतें. एक मॅनेजर मेला तर दुसरा चांगला मॅनेजर नेमतां येतो. व अशा तऱ्हेनें उद्योगाच्या कायमपणास धक्का येत नाहीं. असे संयुक्त तत्त्वापासून अनेक फायदे आहेत; व त्यांचा तिसऱ्या पुस्तकांतील एका भागांत विचार केला आहे, तेव्हां येथें त्याची पुनरावृत्ति करण्याची जरूरी नाहीं. परंतु फायदे होण्यास लोकांनीं सचोटी हा अमोलिक गुण आपल्या अंगीं आणला पाहिजे. त्याखेरीज या तत्त्वापासून होणाऱ्या फायद्यापेक्षां नुकसानच जास्त होईल. परंतु सर्व धंद्यांमध्यें पेढीचा धंदा संयुक्त भांडवलाच्या तत्त्वावर चालविणें जास्त सोईस्कर आहे. ॲडाम स्मिथनें आपल्या ग्रंथांत म्हटलें आहे कीं, जर कोणता धंदा संयुक्त भांडवलाच्या तत्वावर फायदेशीर रीतीनें व चांगल्या तऱ्हेनें चालवितां येईल तर तो पेढीचा धंदा होय. कारण, पेढीचा धंदा असा आहे कीं, त्यामध्यें सर्व व्यवहार नियमबद्ध करतां येतो. व पेढीच्या म्यानेजराच्या नुसत्या खुषीवर कांहीं ठेविलें नाहीं तरी चालतें. यामुळें भागीदारांनीं एकदां शिस्त व नियम पाळले जात आहेत किंवा नाहींत हें दरवर्षी पहात गेलें म्हणजे लबाड्या फार होण्याचें कारण नाहीं. आणि लबाड्या फार झाल्या नाहींत व नियमानुरूप पेढीचें काम चाललें म्हणजे पेढीच्या व्यापारांत फायदा हा ठरकून ठेविलेला. कारण या धंद्यांतील फायदा इतर धंद्यांप्रमाणें अनिश्चित नाहीं. यासाठीं आमच्या लोकांनीं संयुक्त भांडवलाच्या तत्त्वावर पेढ्या काढण्याचा धंदा आधीं हातांत घ्यावा.

हल्लीं सरकारनें 'शेतकरी पेढ्या' म्हणून काढण्याकरितां जी खटपट चालविली आहे त्या शेतकरी पेढ्या या संयुक्त भांडवलाच्या तत्वाच्या पेढ्यांचाच एक प्रकार आहे. परन्तु त्या पेढ्यांच्या स्वरूपाचें वर्णन मागेंच येऊन गेलें असल्यामुळें आतां पुन्हां विचार करण्याची जरूरी नाहीं. असो.

आमच्या इकडे सरकारी पेढ्या म्हणजे फक्त पोस्टल सेव्हिंग बँकेच्या पेढ्या होत. इतर देशांत शेतकऱ्यांकरितां व दुसऱ्याही कामाकरितां सरकारनें स्वतः पेढ्या काढल्या आहेत. या खिलकी पेढयांचें तत्वही जुनेंच निघालेलें आहे. प्रथमतः १८६१ मध्यें सरकारनें या पोस्टल सेव्हिंग बँकेची पद्धति सुरू केली. याचे इंग्लंडांत सुमारें ५० वर्षे खासगी प्रयत्न झाले. हें तत्त्व गरीब लोकांच्या फार उपयोगी आहे. कारण, या बँकेंत अगदीं चार आण्यांपासूनसुद्धां ठेवी घेतल्या जातात. या बँकांमुळें लोकांना काटकसरीची व संचयाची संवय लागते, व लोकांना या संचयाचा आणीबाणीच्या प्रसंगीं फार उपयोग होतो. पोस्टल बँकेंतील संचयावरून लोकांच्या सुस्थितीचा व नीतिमत्तेचा अंदाज चांगल्या तऱ्हेनें काढतां येतो. या बाबतींत सर्व युरोपामध्यें फ्रान्सचा पहिला नंबर लागतो. फ्रान्समध्यें गरीब लोक फार काटकसरी व संचयी असल्याबद्दल ख्याति आहे. यामुळें इतर सर्व देशांपेक्षां फ्रान्समधल्या गरीब रयतेची बरीच चांगली स्थिति आहे. आमच्या हिंदुस्थानांतील गरीब लोक काटकसरी व संचयी आहेत. सरकारी अंमलदार शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचें कारण आमच्या लोकांच्या उधळपट्टीवर लादतात. परन्तु एकदोन गोष्टी खेरीज करून आमचा शेतकरीवर्ग फार काटकसरी आहे असें बारकाईनें पाहणारास दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं. परन्तु आमच्या शेतकऱ्यांची व इतर गरीब रयतेची इतकी दैन्यावस्था झाली आहे कीं, त्यांना पुरेसें खावयालाच मिळत नाहीं; मग संचय करण्याची गोष्ट त्यांना काय होय! तरी पण आमच्या इकडेही पोस्टल बँकेची पद्धत निघाल्यापासून गरीब लोकांची पुष्कळ सोय झालेली आहे. त्यामुळें थोडी तरी मनुष्याची संचयी प्रवृत्ति वाढलेली आहे असें दिसतें. परन्तु सुधारलेल्या देशाच्या मानानें आपल्या देशांत द्रव्यसंचय किती थोड्या प्रमाणानें होत आहे हें खालील कोष्टकावरून दिसून येईल. सन १९१८-१९ मध्यें पोस्ट ऑफिसांत ठेव ठेवणाऱ्यांची संख्या खालील प्रमाणांत होती.

| देशाचें नांव | लोकवस्ती | ठेवी ठेवणारांची संख्या | ठेव रुपयांत | दरमाणशी ठेव रुपये |
|---|---|---|---|---|
| फ्रान्स | ३,९६,०१,००० | ६६,९४,००० | ९५,००,०२००० | २४ |
| हिंदुस्थान | ३१,५१,५६,३९६ | १६.७७,००० | १८ ८२.४४००० | ०·६ |

आतां कामाच्या विभक्तीकरणावरून युरोपांत पेढ्यांचे निरनिराळे प्रकार झालेले आहेत. कांहीं पेढया फक्त ठेवी घेतात. पोस्टल बँका या प्रकारामध्यें येतात. कांहीं फक्त व्याजबट्टयाचें काम करतात. कांहीं फक्त पैसे इकडून तिकडे पाठविण्याचें काम करतात. यांना हुंडी पेढया ह्मणतात. कांहीं निरनिराळ्या नाण्यांची नुसती देवघेव करितात; यांना सराफी पेढ्या ह्मणतात. कांहीं फक्त मुदतीच्या हुंड्यांचा व्यापार करितात. अशा प्रकारानें तिकडे पेढीच्या व्यापारांत श्रमविभागाचें तत्व शिरलें आहे. याचें कारण, तिकडे व्यापार व उद्योगधंदे फार वाढले आहेत; व त्यामुळें पेढीचीं कामेंही फार वाढलीं आहेत. इतकीं कीं, तीं सर्व एका पेढीनें करूं म्हणणें शक्य नाहीं. यामुळें तिकडे पेढयांचे वर नमूद केलेले प्रकार बनले आहेत. आपल्या इकडे अजून फारसा व्यापार वाढला नसल्यामुळें इतक्या श्रमविभागाचें कारण पडलें नाहीं. प्रत्येक पेढी, ह्या सर्व प्रकारच्या पेढयांचीं बहुतेक कामें करते. आणखी एक प्रकारच्या पेढया युरोपांत आहेत. त्या म्हणजे चलनी नोटा काढण्याचा अधिकार पुष्कळ पेढयांत तिकडे सरकारनें दिलेला आहे. कांहीं पेढया हें काम स्वतंत्रपणें करितात, किंवा निदान पेढीच्या दोन शाखा असतात--एक चलनी नोटा काढणारी व दुसरी बाकीचीं कामें करणारी. परन्तु हिंदुस्थानांत हा सर्व अधिकार सरकारनें आपल्या हातांत ठेविला आहे. सरकारी नोटा काढण्याचा कायदा १८६१ सालीं प्रथमतः पास झाला व तेव्हांपासून सरकारनें नोटा काढण्याचें एक नवें खातें स्थापत करून त्याच्याकडे या कामाची सर्व व्यवस्था दिली. ५ रुपयांपासून १०,००० रुपयांपर्यंत निरनिराळ्या रकमेच्या नोटा सरकार काढतें. कोणीही रोख रुपये दिले म्हणजे त्याला तितक्या नोटा मिळतात. तसेंच कोणी नोटा करन्सी ऑफिसमध्यें घेऊन गेल्यास त्याला रोख पैसे मिळतात. या नोटा बनावट करतां येऊं नयेत, म्हणून फार काळजी घेतली जाते. त्याची एक पद्धत अशी आहे कीं, सरकारी तिजोरींत नोट गेली म्हणजे ती नोट नाहींशी करतात. व दुसऱ्या नव्या नंबराची नोट काढतात. अर्थात् या नोटांच्या कामांत सरकार विश्वकर्म्याचें काम करीत असतें. रोज ज्याप्रमाणें हजारों प्राणी मरतात व जन्मतात, त्याप्रमाणें व रोज हजारों नोटांचा जन्म होतो व हजारोंना मरण येतें. या नोटा दर्शनी हुंडया असल्यामुळें सरकारास कांहीं प्रमाणानें रोख पैसा नेहमीं जवळ ठेवावा लागतो. या सर्व पैशाचा

निराळाच हिशेब असतो. त्याचा व नाणें पाडणाऱ्या खात्याचा निकट संबंध असतो. हिंदुस्थानांत नोटा पाडण्याचीं एकंदर ८ ऑफिसें आहेत. ज्या सर्कलची जी नोट असेल ती त्याच सर्कलमध्यें चालते; परंतु नुकत्याच सरकारनें पांच रुपयांच्या नोटा सर्वगामी केल्या आहेत. त्या आतां सर्व हिंदुस्थानामध्यें चालतात. लवकरच दहा आणि पन्नास रुपयांच्या नोटा सर्वगामी व्हावयाच्या आहेत. सन १९०५ सालअखेर सुमारें साडेपंचेचाळीस कोटींच्या नोटा हिंदुस्थानांत चालू होत्या.

# भाग चवदावा.

## बहिर्व्यापार व त्याची मीमांसा.

येथपर्यंत आक्रमण केलेल्या मार्गाचें सिंहावलोकन केल्यास असें दिसून येईल कीं, विनिमयाचे बहुतेक प्रश्न आतां संपले आहेत. मथळ्यांत लिहिलेला एक प्रश्न मात्र राहिला आहे व त्याचा एका स्वतंत्र भागांत विचार करणें योग्य आहे. कारण हा प्रश्न ऐतिहासिक व शास्त्रीय अशा दोन्ही दृष्टींनीं महत्त्वाचा आहे. मनुष्य मृगयावृत्तींत असतांना आपआपल्या गरजा स्वतःच्या श्रमानें भागवितो. त्यामुळें या काळांत विनिमय अगर अदलाबदल (याच शास्त्रीय पारिभाषिक शब्दाबद्दल सामान्य व्यवहारांत व्यापार हा शब्द वापरला जातो) अस्तित्वांतच येत नाहीं. परंतु समाजांत श्रमविभाग सुरू होऊन एक मनुष्य एकच माल तयार करूं लागला म्हणजे अदलाबदलीची अवश्यकता उत्पन्न होते. प्रथमतः ही अदलाबदल ऐनजिनसी असते. परन्तु या विनिमयामध्यें पुष्कळ अडचणी व गैरसोई असल्यामुळें 'पैसा' म्हणून विनिमयसामान्य अगर विनिमयाचें साधन उत्पन्न होतें. यालाच निष्कव्यवहार म्हणतात. याच्या पुढची पायरी म्हणजे पतीच्या व्यवहाराची. याप्रमाणें अदलाबदलीच्या साधनाच्या तीन पायऱ्या होतात:—१ ऐनजिनसी व्यवहार, २ निष्कव्यवहार व ३ विश्वासव्यवहार. या तीन

पायऱ्यांनुरूप अदलाबदलीचीं तीन रूपें अगर पायऱ्या होतात. प्रथमतः विनिमय अगर अदलाबदल अगर व्यापार हा खेड्यांमधील व्यक्तींमध्यें सुरू होतो. अर्थात् त्याचें क्षेत्र संकुचित असतें व या व्यापाराचें साधन ऐनजिनशी व्यवहार हें असतें. परंतु समाजाची संपत्ति वाढली व देशांत उद्योगधंदे सुरू झाले म्हणजे व्यापाराचें क्षेत्र वाढतें. अशा विस्तीर्ण व्यापाराला निष्कव्यवहाराची अवश्यकता उत्पन्न होते. समाजाचे किंवा राष्ट्राचे दोन प्रमुख भेद होतात, शहरें व खेडेगांवें. शहरें हीं उद्योगधंद्याचीं आगरें असतात, तर खेडेगांवें हीं शेतकीचीं आगरें असतात; या दोहोंमध्यें मोठ्या प्रमाणावर व्यापार चालतो व तो पैशाच्या योगानें चालतो. व्यापाराचीं हीं दोन्ही रूपें अन्तर्व्यापाराचीं होत. परंतु व्यापाराची यापुढली पायरी म्हणजे बहिर्व्यापाराची होय म्हणजे आतां एका देशाचा दुसऱ्या परकी देशाशीं व्यापार सुरू होतो, व यालाच बहिर्व्यापार अगर अन्तर्राष्ट्रीय व्यापार म्हणतात. या व्यापाराच्या वाढीबरोबरच पतीच्या व्यवहाराची विशेष अवश्यकता उत्पन्न होते. हे विराटस्वरूपी व्यापार, विश्वासव्यवहारानें चालू लागतात. तेव्हां बहिर्व्यापाराचें स्वरूप व त्याची मीमांसा याच्या विचारास आतां लागलें पाहिजे. व्यापाराच्या उत्क्रांतीमध्यें बहिर्व्यापार हें एकंदर व्यापाराचें परिणत स्वरूप असल्यामुळें त्याचा स्वतंत्र विचार करणें शास्त्रीयदृष्ट्या इष्ट आहे. शिवाय ऐतिहासिकदृष्ट्याही या विषयाचें फार महत्त्व आहे. कारण युरोपमध्यें अर्थशास्त्राला व्यवस्थित स्वरूप आल्यापासून या बहिर्व्यापाराला फार महत्त्व दिलें गेलें आहे. कारण या व्यापाराच्या योगानेंच देशामध्यें संपत्ति वाढते. अर्थात् बहिर्व्यापार हा संपत्तीचा मुख्य झरा आहे, अशी कल्पना होती. युरोपांतल्या बहुतेक राष्ट्रांची धडपड हा बहिर्व्यापार आपल्या ताब्यांत येण्याकरितां होती. अमेरिका व हिंदुस्थानचा जलमार्ग हे उद्योगदृष्टीनें क्रांतिकारक शोध याच धडपडीचीं फळें होत. या शोधांपूर्वी आशिया, हिंदुस्थान व युरोप यांमध्यें व्यापार खुष्कीच्या मार्गानें चाले. तो व्यापार इटाली देशांतील व्हेनीस, जिनोआ वगैरे मेडिटरेनियन समुद्राच्या कांठच्या शहरांच्या ताब्यांत होता. या व्यापाराच्या योगानें तीं शहरें संपत्तीचीं आगरें बनलीं होतीं. तेव्हां हा किफायतशीर व्यापार आपल्या ताब्यांत यावा याकरितां त्या काळीं पुढारलेल्या स्पेन व पोर्तुगाल या देशांतील लोकांची सारखी खटपट चालू होती. पोर्तुगालच्या हेन्री या

नांवाच्या युवराजाला तर या गोष्टीचा निजध्यास लागलेला होता. यामुळें तो आफ्रिकेच्या किनाऱ्याच्या बाजूनें गलबतावर गलबतें दरवर्षी पाठवीत असे. आफ्रिकेच्या किनाऱ्याच्या प्रदेशाच्या शोधाचें सर्व श्रेय या खटाटोपीस आहे. शेवटीं वास्कोदिगामा याच पोर्तुगीज गृहस्थाला हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढण्याचें श्रेय मिळालें, तसेंच स्पेन देशाच्या कोलंबसास अमेरिकेच्या शोधाचें श्रेय मिळालें, हें सर्वश्रुतच आहे. इंग्लंड, हॉलंड, फ्रान्स वगैरे देशांनी माग हून या शोधापासून आपला विलक्षण फायदा करून घेतला ही गोष्ट निराळी. 'या शोधांपासून 'युरोपच्या संपत्तीची वाढ झाल्यामुळें, सर्व युरोपमध्यें एका काळीं अन्तर्व्यापारापेक्षां बहिर्व्यापाराला फार महत्त्व दिलें जात असे तें कां, याचा खुलासा होईल. शिवाय, अर्थशास्त्राला व्यवस्थित स्वरूप येऊन त्यामध्यें जो उदीम-पंथ उदयास आला त्या पंथानें पैशाला फार महत्त्व दिलें व ज्या देशामध्यें सोन्या-रुप्याच्या खाणी नाहींत त्या देशांत सोनें-रुपें आणण्याचें साधन म्हणजे बहिर्व्यापार होय अशी समजूत असल्यामुळें या बहिर्व्यापारापासून देशामध्यें जास्त पैसा येईल असें धोरण ठेवणें हें सरकारचें काम आहे असा समज झाला. 'यामुळें या व्यापाराचा सरकारशीं निकट संबंध पहिल्यापासून आलेला आहे. असो.

अन्तर्व्यापार व बहिर्व्यापार यांमधला भेद सहज ध्यानांत येण्यासारखा आहे. एका राजकीय अंमलाखालील देशांमधला अन्तर्गत व्यापार तो अन्तर्व्यापार होय.. व एका देशाचा दुसऱ्या देशाशीं व्यापार हा बहिर्व्यापार अगर अन्तर्राष्ट्रीय व्यापार होय. परंतु राजकीय अंमलाचा भेद हा अर्थशास्त्रविषयक भेद नाहीं, म्हणून अर्थशास्त्रदृष्ट्या या दोन व्यापारांत काय भेद आहे असा प्रश्न निघतो. परंतु असा अर्थशास्त्रदृष्ट्याही फरक दाखविलेला आहे. तो हा:-अन्तर्व्यापारामध्यें पूर्ण चढाओढीचें प्राबल्य असतें. देशामध्यें भांडवल व श्रम या दोहोंमध्यें चलनक्षमता फार असते. म्हणजे देशांत ज्या धंद्यांत किफाईत जास्त आहे, तिकडे भांडवल जातें; तसेंच जेथें मजुरी जास्त मिळते तेथेंच मजूर जातो. यामुळें देशामध्यें नफा व मजुरी यांचे सामान्य दर एकच होण्याकडे कल असतो व मालाचें मोल हें यामुळेंच उत्पादनव्ययाच्या मर्यादेच्या वर फारसें जाऊं शकत नाहीं. परंतु बहिर्व्यापाराला या गोष्टी फारशा लागू नसतात. एका देशांतून दुसऱ्या देशांत मजूर किंवा भांडवल फारसें जाऊं शकत नाहीं; कारण या जाण्यास प्रथमतः

दळणवळणाच्या साधनांची अडचण; देशरिवाजाचा फरक, भाषाभेद, पैशाचा भेद वगैरे अडचणी आड येतात. यामुळें परदेशाच्या व्यापारांत देशांतील व्यापाराइतकी चढाओढ शक्य नसते. यामुळें बहिर्व्यापारांतील मालाचें मोल अन्तर्व्यापाराच्या मोलाच्या तत्वांनीं ठरत नाहीं. ह्मणूनें बहिर्व्यापाराची व त्याच्या मोलाची मीमांसा स्वतंत्र तन्हेची होते. ह्मणूनच या विषयाचा स्वतंत्रपणें विचार करणें जरूर आहे असा समज होऊन अर्थशास्त्रांत तसा परिपाठ पडला.

अर्वाचीनकाळीं सुधारलेल्या दळणवळणाच्या साधनांनीं देशांदेशांतील अंतर पुष्कळच कमी झालें आहे. तसेंच, हल्लीं भांडवल हें इकडे तिकडे सहज पाठवितां येतें. या सर्व साधनांच्या वाढीमुळें व प्रसारामुळें सर्व जग म्हणजे एक मोठा बाजारच बनलेला आहे. यामुळें अर्वाचीनकाळीं अन्तर्व्यापार व बहिर्व्यापार यांमध्यें विशेष फरक राहिला नाहीं. निदान पूर्वीच्याइतका तीव्र फरक आतां राहिला नाहीं हें कबूल केलें पाहिजे. तरीपण सामान्यतः दोहोंमध्यें फरक आहे व तो कायम राहणार यांतही शंका नाहीं.

जरी उदीम पंथाच्या मताप्रमाणें बहिर्व्यापाराला महत्त्व होतें, तरी कांहीं एक विशेष प्रकारचाच बहिर्व्यापार हा देशाला फायदेशीर आहे, अशी समजूत होती; यामुळें या बहिर्व्यापारावर फार कडक नजर असे व परदेशी व्यापाऱ्यांना देशांत राहण्यासंबंधानें फार जाचाचे नियम पाळावे लागत. कांहीं देशांत तर परकी व्यापारी किंवा मनुष्य हा शत्रूच समजला जात असे. यामुळें देशांत असे व्यापारी किंवा मनुष्य येण्याचीच मनाई असे. उदाहरणार्थ, अगदीं अर्वाचीन काळपर्यंत चीन देशांत परकी लोकांना व व्यापाऱ्यांना अगदीं मज्जाव होता. तेव्हां देशांतील बहिर्व्यापारापासून सामान्यतः देशाला कोणते फायदे होतात हें प्रथमतः पाहिलें पाहिजे. मग बहिर्व्यापाराच्या सुरवातीपासून देशांतील मालाच्या किंमतीवर, देशाच्या उद्योगधंद्यावर व देशांतील एकंदर लोकांवर काय परिणाम होतात हें पाहिलें पाहिजे.

एकंदर विनिमयाचे जे फायदे आहेत ते बहिर्व्यापाराचे आहेत हें उघड आहे. कारण, बहिर्व्यापार हें विनिमयाचें एक परिणत अंगच आहे. ज्याप्रमाणें परस्परांच्या गरजा परस्परांनीं उत्पन्न केलेल्या मालानें भागविणें हें विनिमयाचें कार्य आहे, त्याचप्रमाणें देशादेशांमधील गरजा भागविणें हें बहिर्व्यापाराचें कार्य आहे.

प्रथमतः बहिर्व्यापारानें ज्या वस्तू देशांत होत नाहींत किंवा होणें शक्य नाहींत अशा वस्तू त्या देशाला उपलब्ध होतात. उदाहरणार्थ, फक्त उष्णकटिबंधांतच होणारे मसालादि पदार्थ शीतकटिबंधांतील देशांना या व्यापारानें मिळूं लागले. दुसरें, जो माल तयार करण्यास देशाला विशेष योजना किंवा सोय नाहीं असा माल बहिर्व्यापारानें देशाला सुलभ रीतीनें मिळूं शकतो. पहिला फायदा व दुसरा फायदा यांमध्यें केव्हां केव्हां अल्प फरक असतो. ॲडाम स्मिथनें यासंबंधाचा एक सयुक्तिक दाखला दिला आहे. तो ह्मणतोः " कांचेच्या तावदानाच्या साहाय्यानें व कृत्रिम उष्णतेनें स्कॉटलंडमध्येंसुद्धां द्राक्षें पिकवितां येतील व त्यापासून इतर ठिकाणांपेक्षां तीस पटींच्या खर्चानें उत्तम मद्यही तयार करतां येईल. परन्तु असें करणें देशाच्या नुकसानीचें होईल. तेव्हां अशा वस्तू बहिर्व्यापारानें मिळविणें इष्ट आहे. तिसरें, बहिर्व्यापाराच्या योगानें देशांतील मालाला मागणी जास्त होते व त्यायोगें श्रमविभागाचें तत्त्व जास्त प्रमाणांत अंमलांत आणण्यास सांपडतें. ह्मणून संपत्तीची उत्पत्ति वाढते व एकंदरींत बहिर्व्यापाराच्या योगानें देशाला आपली औद्योगिक कार्यक्षमता वाढवितां येते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हे झाले प्रत्यक्ष फायदे. याखेरीज बौद्धिक, सामाजिक व नैतिक फायदे होतात ते निराळेच. बहिर्व्यापारानें दोन देशांमध्यें दळणवळण सुरू होतें. त्यायोगानें देशांतील लोकांच्या ज्ञानवृद्धींत भर पडते. प्रवासानें देशांतील संकुचित दृष्टि नाहींशी होते. त्यायोगानें देशांतील लोकांचें कूपमंडुकत्व नाहींसें होतें. सारांश, बहिर्व्यापार हा एकंदर देशाच्या सुधारणेच्या मार्गक्रमणाला कारणीभूत होतो असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

येथपर्यंत या विषयाचा सामान्यतः विचार झाला. आतां त्याचा विशेष बारकाईनें विचार केला पाहिजे. परन्तु हा विचार करतांना खालील गोष्टी गृहीत धरल्या पाहिजेत म्हणजे या भानगडीच्या प्रश्नाचा उलगडा सुलभ होईल. प्रथमतः बहिर्व्यापार ज्या अर्थी पैशाच्या देवघेवीनें—निदान पैशाच्या हिशेबानेंच—होतो, त्या अर्थी पैशाच्या भाषेंतच या व्यापाराची मीमांसा करणें इष्ट आहे व दोन्ही देशांची चलनपद्धति एकच आहे असें धरून चालणें सोयीचें आहे. दुसरी गृहीत गोष्ट ह्मणजे दोन देशांमध्यें फक्त मालाची अदलाबदल होते. मालाचीं उत्पादक कारणें जीं भांडवल व श्रम तीं एका देशांतून दुसऱ्या देशांत जाऊं शकत नाहींत. तसेंच,

नेआणीचा खर्चेही मुळींच येत नाहीं असें समजावयाचें. दोन देशांमध्यें व्यापार चालू होण्यापूर्वी दोन्ही देश दोन दोन वस्तू तयार करीत आहेत व या दोन देशांमध्यें पैशाची क्रमणशक्ति वेगवेगळाली आहे, हें गृहीत धरून प्रथमतः आपण एक काल्पनिक उदाहरण घेऊं.

अशी कल्पना करा कीं, अ आणि ब, हे दोन देश आहेत. त्यांची चलनपद्धति इंग्रजी चलनपद्धति आहे. बहिर्व्यापार सुरू होण्यापूर्वी दोन्ही देशांतील मजुरीचा सामान्य दर एकच आहे. व तो दररोज ४ शिलिंग या मानाचा आहे. दोन्ही देश गहूं व कापड उत्पन्न करतात अशी कल्पना करा व अ देशामध्यें जमिनीच्या सुपीकतेमुळें व श्रमाच्या कार्यक्षमतेमुळें एका दिवसाच्या श्रमानें १ वार कापड अगर एक बुशेल गहूं होतो व ब देशांत एक वार कापडाला दोन दिवसांचे श्रम लागतात व एक बुशेल गहूं करण्यास दीड दिवसाचे श्रम लागतात. या स्थितीमध्यें बहिर्व्यापार सुरू होण्यापूर्वी अ देशामध्यें एक वारास ४ शिलिंग ही कापडाची किंमत असली पाहिजे व एका बुशेलास ४ शिलिंग अशी गव्हाची किंमत असली पाहिजे. व ब देशांत कापडाची किंमत दर वारास ८ शिलिंग व गव्हाची किंमत दर बुशेलास ६ शिलिंग असली पाहिजे; ह्मणजे त्या त्या देशांतील किंमती त्या त्या देशांतील उत्पादनव्ययाच्या मर्यादेनें ठरलेल्या असल्या पाहिजेत. आतां या दोन देशांमध्यें अन्तर्राष्ट्रीय व्यापार सुरू झाला तर काय परिणाम होईल? अ व ब या देशांच्या आकाराप्रमाणें या परिणामाचे निरनिराळे तीन प्रकार होतील.

पहिला प्रकार—समजा कीं, अ हा देश ब पेक्षां फारच विस्तीर्ण आहे व या दोन देशांमध्यें व्यापार सुरू झाला. आतां एकाच बाजारांत एका गुणाच्या मालाच्या किंमती एकच असावयाच्या, या नियमानुसार किंमती एकच झाल्या पाहिजेत. परंतु त्यायोगें ब देशांतील किंमती अ देशाच्या किंमतीजवळजवळ आल्या पाहिजेत. कारण अ हा देश फार मोठा असल्यामुळें त्याचें वजन बाजारावर जास्त पडणार. आतां ब देशामध्यें कापडाची किंमत निम्मी झाल्यामुळें मजुरांची मजुरीही निम्मी झाली पाहिजे. व गव्हाची किंमतही अ देशाइतकीच होईल. परंतु त्यांतील मजुरी कापडांतील धंद्याइतकी उतरणार नाहीं. ह्मणून ब देशांत कापड व्हावयाचें अगदीं बंद होऊन सर्व मजूर गहूं तयार करूं लागतील

व ही गव्हाची जास्त पैदास अ देशांत जाईल. परंतु गव्हाच्या या पैदाशीनें गव्हाची किंमत कमी होऊं लागेल. म्हणून अ देशांतील मजूर शेतकी धंदा सोडून कापडाचा करूं लागतील. परंतु अ हा देश मोठा असल्यामुळें त्याला अजून गहूं उत्पन्न करणें प्राप्त आहे. तेव्हां आतां या व्यापाराचे सामान्य परिणाम कसे झाले ते पहा. अ देशांतील किंमतीमध्यें फारसा फरक झाला नाहीं, व तेथील मजुरींतही फरक झाला नाहीं; पण ब देशामध्यें मजुरी कमी झाली व तो देश कापड मुळींच उत्पन्न न करतां सर्व गहूं उत्पन्न करूं लागला. कारण, त्यामध्यें त्या देशाची सापेक्ष सोय जास्त आहे. अ देश अजून दोन्ही पदार्थ उत्पन्न करतो. आतां किंमती व मजुरी यांची तुलना केली असतां देशांतील बहुजनसमाजावर या व्यापाराचा काय परिणाम झाला तो पहा. या व्यापारापासून अ देशांतील लोकांचा कांहीं फायदा किंवा तोटा झाला नाहीं. ब देशामध्यें ४ शिलिंगांऐवजीं मजुरी २ शिलिंग ८ पेन्स झाली. व कापड ८ शिलिंगांवरून ४ शिलिंगांवर आलें व गहूं ६ शिलिंगांपासून ४ शिलिंगांवर आले.

दुसरा प्रकार—आतां ब हा देश विस्तीर्ण आहे व अ लहान आहे अशी कल्पना करा. या स्थितींत बहिर्व्यापाराच्या योगानें अ देशांतील किंमती ब देशांतील किंमतींबरोबर होतील. म्हणजे कापड ४ शिलिंगांपासून ८ शिलिंगांवर जाईल व गहूं ४ पासून ६ शिलिंगांवर जाईल. यामुळें अ देशांमध्यें मजुरी वाढेल व अ देश फक्त कापडच तयार करूं लागेल. आणि ब देश कापड व गहूं असे दोन्ही पदार्थ तयार करील. या प्रकारांत ब देशांतील लोकांची स्थिति आहे तशीच राहील. आणि अ देशांतील मजुरी वाढेल व मालाच्या किंमतीही वाढतील. परंतु मजुरीची वाढ मालाच्या किंमतीच्या वाढीपेक्षां जास्त होईल.

तिसरा प्रकार—आतां दोन्ही देश बहुतेक सारख्याच आकाराचे आहेत अशी कल्पना करा. या स्थितींत मालाच्या किंमती दोन्ही किंमतीच्या सरासरीबरोबर होतील. म्हणजे कापडाची किंमत दोन्ही देशांत दर वारास ६ शिलिंग होईल व गव्हाची दर बुशिलास ५ शिलिंग किंमत होईल. यामुळें अ देशास कापड करणेंच जास्त किफाईतशीर होईल व तेथें ४ शिलिंगांच्या ऐवजीं ६ शिलिंग मजुरी होईल. ब देशांत कापडाचा धंदा फारच आंतबट्टयाचा होईल. म्हणून तेथें गहूं उत्पन्न करणें किफाईतशीर होईल. म्हणजे आतां अ देशांत फक्त कापड होईल व

तेथें मजुरीचा दर ६ शिलिंग होईल. ब देशांत फक्त गहूं होईल व तेथें मजुरीचा दर ३ शिलिंग ४ पेन्स होईल; अर्थात् मजुरीच्या मानानें पाहतां अ देशाला गहूं पहिल्यापेक्षां स्वस्त मिळाला व ब देशाला कापड स्वस्त मिळालें.

वरील काल्पनिक दाखल्यावरून बहिर्व्यापाराचा फायदा कसा होतो व सामान्यतः तो दोन्ही देशांत कसा वांटला जातो हें दिसून येईल. बहिर्व्यापारापासून दोन देशांस फायदा होण्यास एकच अट असते, ती ही कीं, त्या दोन देशांमध्यें पदार्थांच्या उत्पत्तिव्ययामध्यें सापेक्ष तरी भेद असावा. एका देशामध्यें दुसऱ्या देशापेक्षां दोन्ही पदार्थ उत्पन्न करण्याची जास्त सोय असली तरी पण दुसऱ्या देशांत जो पदार्थ उत्पन्न करणें जास्त अडचणीचें आहे तो माल पहिल्यानेंच उत्पन्न करून दुसऱ्या देशाला पुरविणें हें दोन्ही देशांच्या फायद्याचें असतें. तसेंच, दुसऱ्या देशानें, जो माल उत्पन्न करण्यांत आपल्याला—सापेक्ष का होईना —परन्तु कमी अडचण आहे तो मालच तयार करण्यांत, व बाकीचा माल दुसऱ्या देशाकडून विकत घेण्यांत, त्या देशाचा फायदा आहे. अशा व्यापारानें दोन्ही देशांतील उत्पादक साधनांची शक्य तितकी कार्यक्षमता वाढते व या कार्यक्षमतेच्या वाढीनें दोन्ही देशांतील बहुजनसमाजाची उपभोगक्षमताही वाढते.

आतां या काल्पनिक उदाहरणाला प्रत्यक्ष कोटीमध्यें आणून सोडावयाचें ह्मणजे या काल्पनिक दाखल्याच्या गृहीत मर्यादा काढून टाकणें होय अर्थात् प्रत्यक्ष व्यापारांत दोनच वस्तू नसतात, तर प्रत्येक देश पुष्कळ माल तयार करतो व यापैकीं बऱ्याच मालाची बहिर्व्यापारांत अदलाबदल होते; तसेंच, व्यापार दोनच देशांमध्यें न चालतां एकसमयावच्छेदेंकरून पुष्कळ देशांशीं व अर्वाचीन काळीं सर्व जगाशीं चालतो; तसेंच निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या चलनपद्धति असतात; शिवाय मालाची नेआण करणें कमीअधिक खर्चाचें काम असतें व एका देशांतून दुसऱ्या देशांत भांडवल व मजूर हे अगदींच जात नाहींत असें नाहीं. या सर्व गोष्टींचा एकसमयावच्छेदेंकरून अंतर्भाव केला ह्मणजे बहिर्व्यापाराच्या प्रश्नाचा गहनपणा ध्यानांत येतो. परन्तु काल्पनिक दाखल्यांत समाविष्ट झालेल्या तत्वांत फरक होत नाहीं. प्रश्न मात्र बराच भानगडीचा होतो इतकेंच. शेवटीं बहिर्व्यापाराचें तत्व ह्मणजे सापेक्ष सोयीचेंच राहतें. बहिर्व्यापाराचा फायदा ह्मणजे ज्या देशांत जो माल तयार करण्यांत विशेष सोयी आहेत त्या देशांतून

इतर देशांनीं माल घेणें होय व त्या देशानें तोच माल तयार करणें हा होय. या गोष्टीचा प्रत्यक्ष दाखला म्हणजे औद्योगिक क्रांतीपासून कापड करणें हें इंग्लंडला फार सोईचें होतें. यामुळें इंग्लंडमध्यें कापड करण्याचा धंदाच विशेष जोरांत येऊन अमेरिका व जर्मनी हीं राष्ट्रें औद्योगिक बाबतींत पुढें येण्यापूर्वीं बहुतेक सर्व जगाला एकटें इंग्लंडच सर्व कापड पुरवीत असे. इंग्लंड व हिंदुस्थान या देशांमध्यें व्यापार सुरू झाल्यानंतर प्रथमतः हिंदुस्थानचें कापड युरोपांत जाई. कारण त्या काळीं हिंदुस्थानला कापड करण्याची जास्त सोय होती. परन्तु वाफेच्या शक्तीच्या शोधानंतर हिंदुस्थानची ही सापेक्ष सोय नाहींशी होऊन हातमागापेक्षां वाफेच्या मागाचें कापड स्वस्त होऊं लागलें. यामुळें हिंदुस्थानांतील कापडाचा व्यापार हळू हळू कमी होत जाऊन तो अगदीं संपुष्टांत आला. हिंदुस्थानाला शेतकीची विशेष सोय असल्यामुळें शेतकीवर जास्त भार येत चालला.

वरील काल्पनिक व प्रत्यक्ष दाखल्यावरून बहिर्व्यापाराचे खालील फायदे दृष्टोत्पत्तीस येतील. जो माल एका देशांत मुळींच होत नाहीं, असा माल बहिर्व्यापारानें त्या देशाला मिळूं लागेल. तसेंच बहिर्व्यापारानें आयात मालाची किंमत कमी होईल व त्या गिऱ्हाइकांना अर्थात् देशांतील लोकांना माल स्वस्त मिळून त्यांचा फायदा होईल. मात्र यामध्यें असें गृहीत धरलें आहे कीं, परदेशचा स्वस्त माल येऊं लागल्यानें त्या देशांतील तो धंदा करणारे लोक व त्यांतील मजूर यांना आपलें भांडवल व श्रम दुसऱ्या धंद्यांत घालतां येतील. कारण आयात मालाची किंमत देशांतील कांहीं माल बाहेर पाठवून शेवटीं दिली जाते. यामुळें अशा निर्यात मालाची मागणी वाढून त्या धंद्यांत हें भांडवल व श्रम जातील. परंतु बहिर्व्यापारापासून देशाचें कधींही नुकसान होणारच नाहीं असें मात्र नाहीं. तरी या नुकसानीच्या बाबींचाही विचार केला पाहिजे.

बहिर्व्यापारानें एखाद्या मर्यादित व कालेंकरून नाहींसा होणाऱ्या मालाचा खप फारच वाढून देशाला तो माल पुढें सततचाच महाग होण्याचा संभव आहे. देशांतील कच्चा माल बहिर्व्यापारानें जर फार बाहेर जाऊं लागला तर तें देशाच्या जमिनीच्या नुकसानीचें होईल. कारण या कच्च्या मालाच्या व्यर्थ जाणाऱ्या द्रव्याचें जमिनीला खत होत असतें. याच दृष्टीनें कॅरे या अमेरिकन अर्थशास्त्रकारानें देशांतील कचा माल बाहेर देशीं पाठविणें म्हणजे देशांतील जमीनच

बाहेरदेशीं पाठविण्यासारखी आहे असें म्हटलें आहे.

• परदेशी स्वस्त माल शेवटीं स्वस्त असेल असें कांहीं खात्रीनें सांगतां येणार नाहीं. देशांतील माल खरोखरी शेवटीं जास्त टिकाऊ व म्हणून खरोखरी स्वस्त असेल. परंतु अशा स्वस्त मालाच्या आयातीनें देशी मालाचा धंदा नाहींसा होईल व म्हणून देशांतील लोकांचें शेवटीं नुकसानच होईल.

, प्रत्येक देशामध्यें शहरें व खेडेगांवें यांमध्यें व्यापार चालत असतो. त्यामुळें दोघांची भरभराट होत असते. कारण खेडयांतील शेतकीच्या मालाला शहरें हीं गिऱ्हाइकें असतात व शहरांतील कारखान्यांच्या मालाला खेडेगांवें हीं गिऱ्हाइकें असतात. आतां बहिर्व्यापारानें शहरांना शेतकीचा माल बाहेरून स्वस्त मिळूं लागला व त्याच्या मोबदला कारखान्यांतला माल ते बाहेर पाठवूं लागले, तर हा व्यापार कारखानदारांना किफाईतशीर होईल. परंतु त्यायोगानें खेडयांतील शेतकऱ्यांचें नुकसान होईल. खेडीं ओसाड पडूं लागतील व शहरांमध्यें लोकवस्ती वाढेल खरी; तरी पण शहराच्या आकस्मिक व जलद वाढीनें शहरांतील राहणी आरोग्याला हानिकारक होईल व यामुळें एकंदर मजूर वर्गाची कार्यक्षमता कमी होऊन देशाचें नुकसान होईल.

तसेंच, एखाद्या देशांत कारखान्यांची व शहरांची वाढ हळूहळू चालू आहे अशा वेळीं जर देशांत बहिर्व्यापार सुरू होऊन कारखान्यांचा माल स्वस्त मिळूं लागला तर शहरांची व कारखान्यांची वाढ खुंटेल व शहरांची दैन्यावस्था झा- ल्यामुळें खेडेगांवांची अर्थात् शेतकीची थोडीबहुत हलाखी होईल.

हल्लींच्या काळीं सर्व जगाचा एक बाजार झालेला आहे व दळणवळणाच्या साधनांच्या वाढीनें बहिर्व्यापाराला अन्तर्व्यापाराचें स्वरूप येत आहे. अन्तर्व्यापारामध्यें चढाओढीनें ज्याप्रमाणें एका ठिकाणचा व्यापार दुसऱ्या ठिकाणीं जातो, (कारण, त्या ठिकाणीं जास्त सोय असते) परन्तु या स्थलांतरानें देशाचें नुकसान होत नाहीं. तरी पण बहिर्व्यापारानें एका देशांतील व्यापार दुसऱ्या देशांत जाईल. ही गोष्ट जगाच्या दृष्टीनें फायद्याची असली तरी त्या देशाच्या दृष्टीनें ती अत्यंत अनिष्ट आहे हें उघड आहे.

या नफ्यातोट्याचा जास्त खोल विचार करणें म्हणजेच 'अप्रतिबंध व्यापार विरुद्ध संरक्षण' या अर्थशास्त्रांतील वादग्रस्त प्रश्नाचा विचार करणें होय. तरी

तो या पुस्तकाच्या शेवटल्या भागांत करूं.

आतां हा बहिर्व्यापार कोणत्या विनिमयसामान्यानें होतो हें पहावयाचें आहे. तें पुढील एका लहानशा भागांत पाहून मग वर निर्दिष्ट केलेल्या वादग्रस्त प्रश्नाकडे आपण वळूं.

---

# भाग पंधरावा.

## विनिमयपत्रें.

आतां बहिर्व्यापाराच्या विनिमयसामान्याचा म्हणजे ज्याला मागें विनिमयपत्रें म्हटलें आहे त्यांचा विचार करावयाचा आहे. तसेंच या भागांत चेक व हुंड्या यांचाही विचार करणें इष्ट आहे. कारण, या विवेचनानें व्यावहारिक कागदी चलनांची माहिती एकत्र ग्रथित होईल. या योगानें मागें जो अशास्त्रात्मक चलनावर एक भाग लिहिला आहे त्याचीही आतां पूर्तता होईल.

वरील तिन्ही प्रकारचीं कागदीं चलनें कायदेशीर चलनें असतात. तसेंच तीं फक्त व्यापाराच्या व पेढ्यांच्या वाढीबरोबर आपोआप व व्यावहारिक तऱ्हेनें प्रचारांत येतात हें मागें सांगितलेंच आहे. पेढीच्या विस्तृत मीमांसेनंतर पहिल्या दोन तऱ्हेच्या व्यावहारिक कागदी चलनांचें स्वरूप ध्यानांत येण्यास अगदींच सुलभ आहे.

एकदां देशांत पेढ्यांचा प्रसार झाला व लोक आपली शिल्लक पेढ्यांजवळ ठेवूं लागले म्हणजे चेक हें कागदी चलन स्वाभाविकपणें सुरु होतें. कारण, चेक म्हणजे ठेवी ठेवणाराचा, पेढीवर अमुक रकम अमक्या माणसास द्यावी, असा हुकूम होय. जो मनुष्य नेहमीं पेढीशीं व्यवहार ठेवतो, तो कितीही श्रीमंत असला तरी किरकोळ, अगदीं लहानसान व्यवहारांस लागणाऱ्या पैशाच्या रकमेपेक्षां जास्त पैसा आपल्या घरांत ठेवीत नाहीं. त्याच्याजवळ पेढीचें चेकबुक असतें. जसजसे त्याला दुसऱ्याला पैसे द्यावे लागतात तसतसे तो बुकांतील चेकांनीं ते देतो; व जसजसे रोख पैसे त्याचेकडे येतील तसतसे ते पेढीवर भरीत असतो. मनुष्य

शहाजोग असला व ज्या पेढीवर चेक काढला असेल ती पेढीही शहाजोग असली, तर त्या माणसाचा चेक कोणीही मनुष्य पैशाप्रमाणें बिनहरकत घेतो व तो मनुष्य दुसऱ्यास हा चेक आपल्या देण्यांत देतो. याप्रमाणें चेक निघाल्यापासून तो पेढीवर पटेपर्यंत हव्या तितक्या लोकांच्या हातून जाऊं शकतो व या सर्व व्यवहारांत व अदलाबदलींत या चेकाचा अगदीं कागदी चलनासारखा उपयोग होतो.

ज्याप्रमाणें पेढीवर आपला पैशाचा व्यवहार ठेवणाऱ्यांनीं काढलेल्या पैशाच्या मागणीचा हुकूम म्हणजे चेक होय, त्याप्रमाणें एका पेढीनें दुसऱ्या पेढीवर काढलेला पैशाच्या मागणीचा हुकूम म्हणजे हुंडी होय. देशांतील निरनिराळ्या पेढ्यांचा एकमेकांशीं व्यवहार चालू असतो आणि या पेढ्या लोकांना वाटेल त्या ठिकाणीं पैसे पोंचविण्याचा धंदा करितात, हें मागें सांगितलेंच आहे. हा धंदा या पेढ्या प्रत्यक्ष रोख पैसे पाठवून करीत नाहींत. कारण यामध्यें फारच त्रास असतो. तर या पेढ्या अशी पैशाची देवघेव हुंड्यांच्या द्वारें करितात. एखाद्यास कोठें परगांवीं पैसे पाठवावयाचे आहेत अशी कल्पना करा. आतां असा मनुष्य गांवांतील पेढीकडे जाऊन रोख पैसे भरतो. पेढीवाला ज्या गांवीं पैसे पाठवावयाचे आहेत त्या गांवच्या पेढीवर हुंडी करतो, व ती हुंडी या माणसास देतो. दोन्ही पेढ्यांची पत उत्तम असली म्हणजे या हुंड्याही या माणसाच्या हातून त्या माणसाच्या हातांत याप्रमाणें देवघेवींत चालतात व शेवटीं पेढीच्या हातीं येईपर्यंत त्यांचा उपयोग थेट पैशासारखा होतो.

ज्याप्रमाणें खासगी व्यक्तींच्या पेढीशीं असलेल्या व्यवहारानें चेक अस्तित्वांत येतात, व ज्याप्रमाणें पेढ्यापेढ्यांच्या व्यवहारानें हुंड्या अस्तित्वांत येतात, त्याप्रमाणें व्यापाऱ्याव्यापाऱ्यांच्या व्यवहारानें–विशेषतः बहिर्व्यापाराच्या व्यवहारानें–विनिमयपत्रें अस्तित्वांत येतात. तेव्हां या विनिमयपत्रांचें स्वरूप काय व त्यांची घडामोड कशी चालते हें पाहिलें पाहिजे.

अन्तर्व्यापाराप्रमाणें बहिर्व्यापारही हल्लींच्या काळीं पैशाच्या साधनानें चालतो. प्रथमतः दोन देशांची चलनपद्धति एकच आहे अशी कल्पना करा. उदाहरणार्थ, इंग्लंड व ऑस्ट्रेलिया. समजा कीं, इंग्लंडांतील अ व्यापाऱ्यानें ऑस्ट्रेलियांतील ब व्यापाऱ्यास लोंकरी व सुती कापड पाठविलें आहे आणि ऑस्ट्रेलियांतील क व्यापाऱ्यानें इंग्लंडच्या ड व्यापाऱ्याकडे लोंकर पाठविली आहे. आतां हें

उघड आहे कीं, अ व्यापाऱ्यास इंग्लंडमध्यें पैसे मिळावयाचे आहेत. व क व्यापाऱ्यास ऑस्ट्रेलियांत पैसे मिळावयाचे आहेत. इंग्लंडांतून ऑस्ट्रेलियांत पौंड जाणें व त्याच वेळीं ऑस्ट्रेलियांतून इंग्लंडांतून पौंड जाणें हें उघडच द्राविडी प्राणायामासारखें नुकसानीचें आहे. कारण या एकंदर चार व्यापाऱ्यांमधील देवघेव इंग्लंडांत डनें अला पैसे दिल्यानें व ऑस्ट्रेलियांत ब व्यापाऱ्यानें क व्यापाऱ्यास रोख पैसे दिल्यानें सहज सुलभ रीतीनें व प्रत्यक्ष पैशाची नेआण करण्यावांचून होणार आहे हें उघड आहे. अशा स्थितींतच विनिमयपत्रें अस्तित्वांत येतात. हीं विनिमयपत्रें बहुधा देशांतील निर्यात व्यापारी परदेशांतील आयात व्यापाऱ्यांवर काढतात. म्हणजे निर्यातव्यापारी, विनिमयपत्रांत लिहिलेल्या माणसाला पैसे देण्याबद्दल आयात व्यापाऱ्यास हुकूम करतो. वरील काल्पनिक उदाहरणांत इंग्लंडांतील अ व्यापारी ऑस्ट्रेलियांतील ब व्यापाऱ्यावर आपल्याला द्यावयाच्या पैशाबद्दल विनिमयपत्र काढतो. आता इंग्लंडांतील ड व्यापाऱ्याला ऑस्ट्रेलियांत पैसे पाठवावयाचे आहेत. तेव्हां रोख पैसे पाठवावयाच्या त्रासापेक्षां अनें बवर काढलेलें विनिमयपत्र विकत घेणें डला सोयीचें आहे. म्हणजे अनें काढलेलें विनिमयपत्र ड व्यापारी अला पैसे देऊन विकत घेतो व तें तो ऑस्ट्रेलियांतील क व्यापाऱ्याला पाठवितो. मग क व्यापारी तें पत्र ब व्यापाऱ्याकडे पाठवून पैसे घेतो. तेव्हां या विनिमयपत्रानें एक पैसाही या देशांतून त्या देशांत न पाठवितां चार व्यापाऱ्यांची देवघेव पुरी होते. अर्थात् इंग्लंडांतील आयात-व्यापारी निर्यात व्यापाऱ्यास रोख पैसे देतो व ऑस्ट्रेलियांतील आयात व्यापारी ऑस्ट्रेलियांतील निर्यात व्यापाऱ्यास रोख पैसे देतो. इतक्या देवघेवी एका विनिमयपत्रानें होतात. यावरून विनिमयपत्रें हीं अर्वाचीनकाळीं पैशाचें केवढें मोठें कार्य करतात हें सहज दिसून येईल. म्हणून हा व्यावहारिक कागदी चलनाचा प्रकार सर्वांत फार महत्त्वाचा आहे असेंही दिसून येईल.

आतां दोन देशांमध्यें पुष्कळ मालामध्यें बहिर्व्यापार चालतो. अर्थात् पुष्कळ माल देशांत आयात होत असतो व पुष्कळ तऱ्हेचा माल निर्यात होत असतो. यामुळें देशांत आयात व्यापारीही पुष्कळ असतात व निर्यात व्यापारीही पुष्कळ असतात. आयात व्यापाऱ्यांस देशाबाहेर आयात केलेल्या मालाबद्दल पैसे पाठवावयाचे असतात, तर निर्यात व्यापाऱ्यांना दुसऱ्या देशाहून पैसे घ्यावयाचे अस-

तात. हे निर्यात व्यापारी सामान्यतः विनिमयपत्रें काढतात व तीं विनिमयपत्रें ते बाजारांत विकावयास नेतात. मग तीं विनिमयपत्रें आयात व्यापारी विकत घेतात. तेव्हां आयात व्यापारी हे विनिमयपत्राचे घेणारी असतात तर निर्यात व्यापारी हे विनिमयपत्राचे देणारी असतात. देशांतील आयात व निर्यात व्यापार सारख्याच किंमतीचा असला म्हणजे जितके पैसे देशाबाहेर पाठवावयाचे असतात तितकेच देशांत यावयाचे असतात. अशा स्थितींत एका देशांतून दुसऱ्या देशांत रोख पैसा मुळींच पाठविण्याची गरज पडणार नाहीं. सर्व व्यवहार विनिमयपत्रांनींच पुरा होईल. कारण जितक्या रकमेचीं विनिमयपत्रें निघालेलीं आहेत तितकेच पैसे देशाबाहेर पाठवावयाचे आहेत. म्हणजे विनिमयपत्रांचा पुरवठा व मागणी सारखी आहे. अशा स्थितींत विनिमयपत्रांतील रकमेइतके रोख रुपये त्या विनिमयपत्राबद्दल मिळतील. यालाच विनिमयपत्राचा समतोलाचा भाव म्हणतात. परन्तु कल्पना करा कीं, देशांत आयात माल निर्यात मालापेक्षां जास्त आला आहे. म्हणजे देशाबाहेर जास्त पैसे पाठवावयाचे आहेत. अशा स्थितींत आयात व्यापाऱ्यांना कांहीं तरी रोख पैसे पाठवावे लागतील. परन्तु परदेशीं रोख पैसे पाठविणें हें बऱ्याच खर्चाचें, त्रासाचें व धोक्याचें काम असतें. होतां होईल तों तें टाळण्यांत या व्यापाऱ्यांचा फायदा असतो. यामुळें या आयातव्यापाऱ्यांमध्यें विनिमयपत्रें विकत घेण्यांत चढाओढ सुरू होते व याप्रमाणें विनिमयपत्रांना मागणी जास्त झाल्यामुळें त्यांचे भाव वाढूं लागतात. म्हणजे विनिमयपत्रांतील रकमेपेक्षां जास्त पैसे त्या पत्राबद्दल मिळतात. अशा भावालाच विनिमयपत्राचा वर्तावळ्याचा भाव म्हणतात. अशा स्थितींत निर्यात व्यापाऱ्यांना त्यांच्या विनिमयपत्रावर वर्तावळा मिळतो. परन्तु या वर्तावळ्यालाही मर्यादा आहे. आयात व्यापारी विनिमयपत्रें विकत घेतो याचें कारण या पद्धतीनें त्याला परदेशीं पैसे पाठविणें कमी खर्चाचें असतें. परन्तु आयात व्यापाऱ्यांच्या पुष्कळ मागणीनें विनिमयपत्रावर वर्तावळा द्यावा लागतो व जोंपर्यंत हा वर्तावळा रोख पैसे पाठविण्याच्या खर्चापेक्षां कमी आहे तोंपर्यंत आयात व्यापारी वर्तावळा देतील. परंतु विनिमयपत्राचा वर्तावळा जर या पैसे पाठविण्याच्या खर्चाच्या वर जाऊं लागला तर ते व्यापारी परकी देशांत रोख पैसे पाठवितील. तेव्हां विनिमयपत्राच्या वर्तावळ्याची शिकस्त मर्यादा रोख पैसे पाठविण्याच्या खर्चाइतकी असते.

म्हणतात. आतां अशी कल्पना करा कीं, एका देशांतील माल दुसऱ्या देशांत पुष्कळ गेला. म्हणजे आतां देशांत पैसे यावयाचे आहेत. अशा वेळीं निर्यात व्यापाऱ्यांच्या विनिमयपत्रांचा पुरवठा मागणीपेक्षां जास्त होईल. म्हणजे निर्यात व्यापाऱ्यांमध्यें विनिमयपत्रें विकण्याकरितां चढाओढ सुरू होईल व यामुळें विनिमयपत्राची किंमत कमी होईल. म्हणजे या पत्रांवर निर्यात व्यापाऱ्यांना कसर खावी लागेल. अर्थात् विनिमयपत्रांतील रकमेपेक्षां कमी रोख पैसे घ्यावे लागतील. मागें सांगितल्याप्रमाणें या कसरीचा भावही निष्कधातुमर्यादेच्या खालीं जाणें शक्य नाहीं. कारण रोख पैसे आणविण्याच्या खर्चापेक्षां विनिमयपत्राबद्दल जास्त कसर खावी लागली तर निर्यात व्यापारी परकी देशांतून पैसे रोख आणविण्याची तजवीज करतील.

येथपर्यंत ज्या देशांची चलनपद्धति एकच आहे अशा देशांचा बहिर्व्यापार विनिमयपत्रांनीं कसा चालतो व त्यायोगें व्यापाराची सोय कशी होते हें पाहिलें. परंतु प्रत्येक देशाची चलनपद्धति स्वतंत्र असते. शिवाय सोन्याचेंच कायदेशीर चलन असणारे व रुप्याचेंच कायदेशीर चलन असणारे असे जगांतील देशांचे दोन भेद आहेत; हल्लीं खरी द्विचलनपद्धति कोठेंच नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां ज्यांचें चलन सोन्याचें आहे, परंतु ज्यांचें नाणें निरनिराळें आहे अशा देशांमध्यें देवघेव विनिमयपत्रांनीं कशी चालते हें आतां पाहिलें पाहिजे. या देवघेवींतच हुंडणावळीचा प्रश्न येतो. इंग्लंडचें कायदेशीर चलन पौंड हें आहे तर फ्रान्सचें कायदेशीर चलन फ्रँक हें आहे. या कायदेशीर चलनांमध्यें शुद्ध सोनें किती असावयाचें हें त्या त्या देशाच्या टांकसाळीच्या कायद्यानें ठरलेलें आहे. इंग्रजी पौंडांत टांकसाळीच्या कायद्याप्रमाणें ११३ ग्रेन अगर ७·३२ ग्राम शुद्ध सोनें असतें व तितकेंच शुद्ध सोनें फ्रान्सच्या कायद्याप्रमाणें २५·२२ फ्रँकमध्यें असतें. यामुळें कायद्यानें एका पौंडाची किंमत २५·२२ फ्रँकांबरोबर झाली. यालाच कायदेशीर अगर टांकसाळी हुंडणावळीचा भाव म्हणतात. हा अगदीं कायमचा व ठरीव आहे. जोंपर्यंत इंग्लंड व फ्रान्स या देशांतील टांकसाळीचे कायदे कायम आहेत तोंपर्यंत हा भाव कायम राहणार. प्रत्यक्ष व्यापारांतील हुंडणावळीची तुलना या स्थिर भावाबरोबर केली जाते. याप्रमाणें सोनें ही कायदेशीर चलनाची धातु असणाऱ्या देशांमध्यें कायमचा व ठरीव असा

एक हुंडणावळीचा भाव असतो. परंतु कायदेशीर फेडीच्या निरनिराळ्या धातू असलेल्या देशांमध्यें असा हुंडणावळीचा भाव शक्यच नाहीं. उदाहरणार्थ, इंग्लंड व चीन या देशांमध्यें कायमचा असा हुंडणावळीचा भाव शक्यच नाहीं. कारण एका देशांत सोनें ही चलनाची धातु आहे तर दुसऱ्यांत रुपें ही चलनाची धातु आहे. परंतु या दोन धातूंचा परस्पर भाव इतर मालांप्रमाणें नेहमीं कमी-जास्त होतो व या दोन देशांतील हुंडणावळ या बाजारभावावर अवलंबून असते. १८९३ पूर्वी हिंदुस्थान व इंग्लंड यांमधील व्यापाराची हीच स्थिति होती. ह्मणजे या ठिकाणीं कायदेशीर असा हुंडणावळीचा भाव नव्हता. परंतु आतां यांच्या चलनी नाण्यांमध्यें कायदेशीर व ठरीव असा हुंडणावळीचा भाव आहे. तो भाव म्हणजे कायद्यानें ठरविलेलें पौंड व रुपये यांचें प्रमाण होय. तेव्हां हा कायदा अमलांत आहे तोंपर्यंत १५ रुपयांस एक पौंड हा कायदेशीर हुंडणावळीचा भाव होय.

हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यामधील हुंडणावळीचा (एक्सचेंजचा) प्रश्न अत्यंत बिकट आहे, थोडया जागेंत त्याचा उलगडा करणें शक्य नाहीं. या हुंडणावळीच्या तऱ्हेस ' गोल्ड एक्सचेंज स्टँडर्ड ' असें नांव दिलें आहे. हिंदुस्थानांत जरी रुप्याचेंच नाणें चलनी असलें तरी बहिर्व्यापाराच्या सोईकरतां १५ रु. स १ पौंड असें प्रमाण कायद्यानें ठरविलें होतें व सरकारी तिजोरींत जर सोनें भरलें तर तितक्या किंमतीचे रुपये हक्कानें मिळत असत. उलटपक्षीं रुपये भरून परत सोनें मात्र हक्कानें मिळत नसे. पण हिंदुस्थानचा निर्यात व्यापार हा आयात व्यापारापेक्षां नेहमींच जास्त असल्याकारणानें परदेशांत सोनें पाठविण्याची अवश्यकता हिंदुस्थानास सहसा भासत नसे. आणि हिंदुस्थानसरकारला विलायतेस सालिना सरासरी ३० कोट रुपये " होम चार्जेस " म्हणून पाठवावे लागत असल्यामुळें, व या रकमेची विल्हेवाट सेक्रेटरी ऑफ स्टेट हा करीत असल्यामुळें हिंदुस्थान व इंग्लंड यांमधील हुंडणावळीचा भाव तोच ठरवूं लागला. जोंपर्यंत सोन्याचांदीची पैदास व सापेक्ष किंमत, व इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामधील व्यापार पूर्वीप्रमाणें होता, तोंपर्यंत सेक्रेटरी ऑफ स्टेटला १५ रु. स १ पौंड हा भाव कायम ठेवितां आला. पण लढाई सुरू झाल्यावर जेव्हां हिंदुस्थानांतील माल बाहेर जाऊं शकला नाहीं, जेव्हां रुप्याची पैदास फारच कमी

होऊं लागली, उलटपक्षीं एकंदर महर्घतेमुळें युद्धोपयोगी कच्च्या मालाला विशेष मागणी आल्यामुळें रुप्याच्या नाण्यांची चणचण भासूं लागली व हिंदुस्थानसरकारास नवे रुपये पाडण्याकरितां चांदी खरेदी करणें भाग पडलें, व चांदीच्या खरेदींत जेव्हां विलक्षण तोटा होऊं लागला व जेव्हां सर्व जगामध्यें चांदी व सोनें यांची स्थिर असलेली सापेक्ष किंमत क्षणोक्षणीं बदलूं लागली, तेव्हां हुंडणावळीचा जुना भाव कायम ठेवणें अशक्य दिसूं लागलें. नवा भाव कोणता असावा हें ठरविण्याकरतां १९१९ मध्यें एक कमिटी नेमण्यांत आली. बेबिंगटन स्मिथ् हे या कमिटीचे अध्यक्ष होते. या कमिटीच्या शिफारसीवरून १ पौंड = १० रुपये असा नवीन भाव ठरविण्यांत आला व त्याला कायदेशीर रूप देण्यांत आलें. त्याला अनुसरून कोट्यावधि रुपये हिंदुस्थानांतून विलायतेस नेण्यांत आले. परंतु पुढें असें दिसून आलें कीं, १ पौंड = १० रु. हा भाव कायमचा टिकणारा नाहीं. कारण हिंदुस्थानसरकारनें जंगजंग पछाडले तरी हुंडणावळीचा भाव वाढूं लागला व हल्लीं तो पूर्वीप्रमाणें १५ रु. = १ पौंड इतका आहे. तेव्हां हुंडणावळीचा भाव कायद्यानें ठरविण्याचा दुराग्रह आतां सरकारनें सोडून दिला आहे व तो सध्यां बहिर्व्यापाराच्या तेजीमंदीवर अवलंबून आहे. पण हा एक स्वतंत्र विषयच असल्यामुळें याचा येथें जास्त ऊहापोह न करणेंच योग्य दिसतें.

आतां या हुंडणावळीच्या भावांत कमीजास्तपणा कसा होतो तें पाहूं. समजा कीं, फ्रान्समधून इंग्लंडमध्यें नेहमींपेक्षां जास्त आयात माल आला आहे. म्हणजे इंग्लंडला पुष्कळ पैसे फ्रान्सला पाठवायाचे आहेत. आतां इंग्लंडांतील निर्यात व्यापाऱ्याच्या विनिमयपत्रांना जास्त मागणी होईल. यामुळें त्याचा भाव वाढेल. म्हणजे लंडनमध्यें एका पौंडाला कायदेशीर भावापेक्षां कमी फ्रँक्स मिळतील. अर्थात् हुंडणावळीचा भाव उतरेल. त्याप्रमाणेंच जर इंग्लंडहून जास्त माल निर्यात झालेला असेल तर विनिमयपत्रांचा पुरवठा मागणीपेक्षां जास्त होईल. यामुळें त्यांची किंमत उतरेल. म्हणजे एका पौंडाला कायदेशीर भावापेक्षां जास्त फ्रँक्स मिळूं लागतील. देशाच्या नाण्याच्या कायद्यानें ठरलेल्या भावापेक्षां परदेशचें जास्त नाणें हुंडणावळीनें मिळूं लागलें म्हणजे त्या हुंडणावळीच्या दराला 'अनुकूल हुंडणावळीचा दर' असें म्हणतात. व देशाच्या नाण्याच्या ठराविक दरापेक्षां परकी नाणें कमी मिळूं लागलें म्हणजे त्याला 'प्रतिकूल हुंडणावळीचा दर' म्हणतात. वर

सांगितलेंच आहे कीं, देशाच्या निर्यात व्यापारापेक्षां आयात व्यापार जास्त असला म्हणजे निर्यात व्यापाऱ्यांच्या विनिमयपत्रांना मागणी जास्त झाल्यानें हुंडणावळींचा भाव प्रतिकूल होतो व देशाचा निर्यात व्यापार आयात व्यापारापेक्षां जास्त असला म्हणजे हुंडणावळींचा भाव अनुकूल होतो. परन्तु यावरून देशांत आयात जास्त असणें वाईट, व निर्यात जास्त असणें चांगलें असें मात्र नाहीं. इंग्लंडचा आयात व्यापार निर्यात व्यापारापेक्षां नेहमींच मोठा असतो. तरी इंग्लंड हा देश जगांत जास्त श्रीमंत व जास्त भरभराटींत आहे; हिंदुस्थानाचा निर्यात व्यापार आयात व्यापारापेक्षां जास्त असतो. परन्तु हिंदुस्थानाइतका दरिद्री देश सुधारलेल्या राष्ट्रांत क्वचितच सांपडेल. सारांश, देशांतील निव्वळ आयातनिर्यात मालाच्या समतोलनावरून देशाच्या भरभराटीचें निदान करणें बरोबर नाहीं. मागें एका भागांत सांगितलेंच आहे कीं, आयात व्यापारापेक्षां निर्यात व्यापार जास्त असला म्हणजे, व्यापाराचें समतोलन अनुकूल आहे असें उद्दीमपंथी लोक समजत असत. परन्तु देशाची औद्योगिक स्थिति यावरून मुळींच कळत नाहीं. देशाच्या भरभराटीचें खरें निदर्शक म्हणजे संपत्तीची उत्पत्ति व संपत्तीचा व्यय हीं दोन्हींही वाढत जाणें व संपत्तीची उत्पत्ति व्ययापेक्षां केव्हांही खालीं न जाणें हें होय. याचें विवेचन मागील एका भागांत आलें आहे. असो.

आतां देशाच्या हुंडणावळींचा भाव ठरतांना व विनिमयपत्रांचा व्यवहार ठरतांना फक्त आयात माल व निर्यात माल एवढयाच बाबी विचारांत घ्यावयाच्या असतात असें मात्र नाहीं. केव्हांही आयातनिर्यात व्यापार ही बाब सर्वांत महत्त्वाची असते हें खोटें नाहीं. तरी पण, दुसऱ्याही बाबी असतात. उदाहरणार्थ, एका देशांतून दुसऱ्या देशांत कर्ज दिलें जात असेल किंवा पूर्वीच्या कर्जाचें व्याज त्या देशाला द्यावें लागत असेल. तसेंच एक देश दुसऱ्या देशावर अवलंबून असल्यामुळें त्या परतंत्र देशाला स्वतंत्र देशाला खंडणी द्यावी लागत असेल, किंवा राज्यकारभार चालविण्याचा खर्च द्यावा लागत असेल, शिवाय, एका देशांतील व्यापाऱ्यांच्या हातीं दुसऱ्या देशांतील सर्व व्यापार असेल व त्याचा नफा त्या देशाला द्यावयाचा असेल. शेवटीं व्यापार हा दोन देशांशीं परस्पर असतो असें नाहीं; तर एका देशाचा व्यापार दुसऱ्या पुष्कळ देशांशीं असेल व ज्या देशाचा व्यापार सर्व जगाशीं मोठ्या प्रमाणावर असेल त्या देशामध्यें सर्व देशां-

तील विनिमयपत्रें जमत असतील व त्यामुळें त्या देशाच्या विनिमयपत्रांच्या द्वारें निरनिराळ्या देशांतील देवघेवी होत असतील. जगांतील सर्व देशांशीं इंग्लंडचा व्यापार असल्यामुळें व जगांतील बहुतेक सर्व देशांना इंग्लंडनें कर्ज दिलेलें असल्यामुळें लंडन हें सर्व विनिमयपत्रांची विल्हेवाट लावणारें व सर्व जगांतील देवघेवींची फेड करणाऱ्या पेढयांचें केंद्रस्थान बनलें आहे.

वरील सर्व कारणांमुळें निरनिराळ्या देशाच्या आयात-निर्यात व्यापाराची स्थिति भिन्न असते. उदाहरणार्थ, इंग्लंडांत आयात माल निर्यात मालापेक्षां सदा जास्त असतो. याचें कारण इंग्लंडनें सर्व जगाला कर्ज पुरविलें आहे. त्या कर्जांचें व्याज इंग्लंड आपल्याला पाहिजे असलेल्या मालाच्या रूपानें घेतें. तसेंच जगांतील पुष्कळ नेआणीचा व्यापार इंग्रजी गलबतांमधून होतो. यामुळें याबद्दलचा नफा आयात मालाच्या रूपानेंच येतो. तसेंच इंग्रजी साम्राज्यांतील पुष्कळ भागांची राज्यव्यवस्था इंग्रज लोकांच्या हातांत असल्यामुळें या लोकांच्या पगाराची तसेंच बाहेरदेशीं व्यापार करणाऱ्या इंग्रजांच्या नफ्याची शिल्लक ही आयात मालाच्या रूपानें इंग्लंडांत पोंचविली जाते. वरील सर्व कारणांवरून इंग्लंडांत आयात मालाचा निर्यात मालापेक्षां सदोदित अतिरेक कां असतो याचें स्पष्टीकरण होतें. याच्या उलट उदाहरण हिंदुस्थानचें आहे. हिंदुस्थानच्या निर्यात व्यापाराची रक्कम आयात मालपेक्षां नेहमींच जास्त असते. परंतु इतके पैसे देशांत येतात असा मात्र त्याचा अर्थ नाहीं. हिंदुस्थानानें इंग्लंडांतून कर्ज घेतलेलें आहे. त्याचें व्याज दर वर्षास विलायतेस पाठवावें लागतें. तसेंच हिंदुस्थानांतील घाऊक व्यापार व नेआणीचा व्यापार इंग्रजी व्यापाऱ्यांच्या ताब्यांत आहे. या सर्व व्यापारावरील नफा हिंदुस्थानांतून जावयाचा असतो. शिवाय हिंदुस्थानच्या कारभारांत पुष्कळ इंग्रज लोक असतात, त्यांच्या शिलकी तिकडे जावयाच्या असतात. तसेंच हिंदुस्थानचा कारभार चालविण्यास इंडिया-कौन्सिल आहे, त्याचा खर्च हिंदुस्थानांतून जावयाचा असतो. हिंदुस्थानांत जें युरोपीयन सैन्य नेहमीं असतें त्याच्या पूर्व शिकवणीचा खर्च हिंदुस्थानास द्यावा लागतो, व शेवटीं दिवाणी व लष्करी खात्यांतील युरोपियन नोकरांचीं पेन्शनें हिंदुस्थानांतून जावयाचीं असतात. आतां हा जो इतका पैसा हिंदुस्थानांतून इंग्लंडमध्यें जावयाचा असतो तो कांहीं प्रत्यक्ष पैशाच्या रूपानें जात नाहीं, तर तो मालाच्या रूपानें

जातो. म्हणून हिंदुस्थानच्या निर्यात मालाची रक्कम सदोदित मोठी असते. व व्यापाराच्या देवघेवी पुऱ्या होण्यास स्टेट सेक्रेटरीच्या कौन्सिलबिलाचा उपयोग होतो. स्टेट सेक्रेटरीला हिंदुस्थानसरकारकडून वर निर्दिष्ट केलेल्या कारणाकरितां जे पैसे घ्यावयाचे असतात त्या पैशांइतकीं रुपयांमध्यें स्टेट सेक्रेटरी कौन्सिल-बिलें काढतो. हीं कौन्सिल-बिलें म्हणजे स्टेट सेक्रेटरीच्या हिंदुस्थानच्या तिजोरी-वरील हुंड्याच होत. हीं बिलें बाजारांत विकलीं जातात. तसेंच, इंग्लंडांतील निर्यात व्यापारी आपण हिंदुस्थानांत पाठविलेल्या मालाबद्दल विनिमयपत्रें काढीत असतात. हीं विनिमयपत्रें व कौन्सिल-बिलें हीं हिंदुस्थानावर काढलेल्या हुंड्यां-प्रमाणें होत. आतां या दोहोंला मागणी हिंदुस्थानांतून ज्यांनीं विलायतेंत माल मागविला आहे अशा विलायतेंतील आयात व्यापाऱ्यांची होय. कारण त्यांना हिंदुस्थानांत पैसे पाठवावयाचे असतात. याप्रमाणें हिंदुस्थानांतील हुंडणावळीचा भाव ठरतो. हिंदुस्थानसरकारावर ज्या हुंड्या आल्या असतील त्या तें आपल्या तिजोरीमधून पटावितें. परंतु हिंदुस्थानच्या तिजोरींत पैसे करापासून येतात. हिंदुस्थानांत शेतसारा ही कराची मुख्य बाब असल्यामुळें कर देण्याकरितां शेत-कऱ्यांना आपला कच्चा माल बाहेर देशीं पाठवावा लागतो व त्याच्या येणाऱ्या पैशांतून कराची भर करावी लागते. याप्रमाणें विनिमयपत्राच्या योगानें बहिर्व्यापा-राच्या विराटस्वरूपी घडामोडी होतात. या घडामोडींमध्यें प्रत्यक्ष सोन्यारुप्याच्या नेआणीची फारशी गरज पडत नाहीं. परंतु देशादेशांमधील देवघेवीच्या सर्व बाबींची वजावाट होऊन शेवटीं जो देवघेवीचा अवशेष राहील तो सोन्यारुप्याच्या योगानेंच फेडला गेला पाहिजे. म्हणून थोड्याबहुत प्रमाणावर ही सोन्यारुप्याची आयात-निर्यात प्रत्येक देशांत होत असते, असें आपल्याला आयात-निर्यातीच्या विशिष्ट कोष्टकावरून दिसून येतें.

आतां या भागांतील एकच वादग्रस्त प्रश्न राहिला, तो 'संरक्षण विरुद्ध अ-प्रतिबंध व्यापार' हा होय. त्याचा एका स्वतंत्र भागांत विचार करून या विनि-मयाच्या पुस्तकाची समाप्ति करण्याचा विचार आहे.

# भाग सोळावा.

## अप्रतिबंध व्यापार, विरुद्ध संरक्षण.

'अप्रतिबंध व्यापार, विरुद्ध संरक्षण' हा अर्थशास्त्रांतील निरंतरचा वादग्रस्त प्रश्न आहे. या प्रश्नासंबंधीं इंग्रजीमध्यें वाङ्मयही पुष्कळ आहे. त्या सगळयाचा सविस्तर विचार एका लहानशा भागांत करणें शक्य नाहीं. या वादांतील मूलभूत प्रमाणांचा सामान्य विचार करून त्यांतील रहस्य काय आहे एवढेंच येथें सांगण्याचा विचार आहे. हिंदुस्थानाला कोणतें तत्व लागू करावयाचें या प्रश्नाचा ऊहापोह या ग्रंथाच्या शेवटल्या पुस्तकांत करावयाचा आहे. तेव्हां येथें फक्त या प्रश्नाचा तात्विकदृष्टया विचार केला म्हणजे पुरे आहे.

या ग्रंथांतील प्रास्ताविक पुस्तकाच्या पहिल्या भागाकडे दृष्टि फेंकली असतां हा वाद अर्थशास्त्राच्या उदयापासूनचा आहे असें दिसून येईल. उदीमपंथ व निसर्गपंथ यांच्यामध्यें हा एक वादाचा मुद्दा होता. उदीमपंथी लोकांचें असें ह्मणणें होतें कीं, देशाची सांपत्तिक वाढ बहिर्व्यापारावर विशेषतः कारखानी मालाच्या वाढीवर अवलंबून आहे व म्हणून देशांतील सरकारनें परदेशी मालावर जबर जकाती बसवून देशांतील कारखान्यांची वाढ घडवून आणिली पाहिजे. ह्मणजे देशाच्या सांपत्तिक वाढीस संरक्षणतत्वाचा अवलंब करणें अवश्य आहे, असें उदीमपंथाचें म्हणणें होतें. निसर्गपंथाच्या मताप्रमाणें व्यापाराच्या कामांत सरकारला हात घालण्याचें कारण नाहीं; कारण सरकारची ढवळाढवळ ही नेहमींच नुकसानीची असणार. मानवी स्वभावाकडे नजर देतां खुला व्यापार हें तत्व देशाच्या सांपत्तिक वाढीस श्रेयस्कर आहे. ॲडाम स्मिथच्या पुस्तकाचा सर्व रोख उदीमपंथी संरक्षणाच्या धोरणाचा फोलपणा—नव्हे घातकीपणा—दाखविण्याकडे व अप्रतिबंध व्यापारी तत्वाची श्रेयस्करता दाखविण्याकडे होता.

उदीमपंथाची इंग्लंडवर पुष्कळ वर्षेंपर्यंत विलक्षण छाप होती. या उदीमपंथी धोरणाच्या योजनेनें इंग्लंडनें आपल्याला सर्व जगांत औद्योगिक बाबतींत अग्रस्थान मिळविलें. जेव्हां इंग्लंडला इतर देशांच्या चढाओढीची मुळींच भीति

राहिली नाहीं, तेव्हांच संरक्षणाचें धोरण हें व्यापाराच्या वाढीस प्रतिबंधक भासूं लागलें; मग या धोरणाविरुद्ध इंग्लंडमध्यें चळवळ सुरू झाली. या चळवळीचा शेवट १८४६ मध्यें झाला व इंग्लंडमध्यें खुल्या व्यापाराच्या तत्त्वाचा पूर्णपणें विजय झाला, व लोकमतावर खुल्या व्यापाराची पूर्णपणें छाप बसली. अर्थशास्त्रांतील अभिमतपंथ अप्रतिबंधव्यापारवादी होता. इंग्लंडांतील सर्व अर्थशास्त्री याच मताचे अनुयायी होते. यामुळें कित्येक दिवसपर्यंत इंग्लंडला खुल्या व्यापारतत्त्वाचें माहेरघर समजत असत. प्रथमतः युरोपांतील कांहीं राष्ट्रांनीं इंग्लंडचें अनुकरण करण्याचा उपक्रम केला. परंतु राष्ट्रीय कल्पनेच्या वाढीबरोबर युरोपांतील सर्व राष्ट्रांमध्यें संरक्षणतत्त्वाला जोर आला व गेल्या दहावीस वर्षांपासून खुल्या व्यापाराच्या खुद्द माहेरघरींच घरभेदीपणा शिरला. खुल्या व्यापाराच्या विरुद्ध मोहीम तेथें सुरू झाली आहे व अजून या प्रश्नाचा निकाल लागला नाहीं. लढाईच्या अनुभवामुळें हा प्रश्न जास्तच बिकट झाला आहे. कित्येकांच्या मतें महायुद्धाचें मूळकारण इंग्लंड व जर्मनी यांच्यामधील व्यापारविषयक चढाओढीमध्यें होतें. इंग्लंडच्या खुल्या व्यापारी तत्त्वामुळें कित्येक युद्धोपयोगी यंत्रें व इतर सामग्री तें परदेशांतून आणवूं लागलें. जर्मनी मात्र, महायुद्ध सुरू झालें असतां कित्येक वर्षेपर्यंत इतर राष्ट्रांवर अवलंबून राहाण्याची वेळ येऊं नये म्हणून सर्व सामग्री देशांतल्या देशांत तयार करण्याचे प्रयत्न करीत होता. व त्याला पुष्कळ यश आलें. युद्धामुळें जागृत झालेल्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेमुळें प्रत्येक पाश्चिमात्य व जपानसारख्या पौरस्त्य स्वतंत्र राष्ट्रानें संरक्षणाचा अवलंब केलेला आहे. इंग्लंडमध्येंसुद्धां या प्रश्नानें उचल खाल्ली आहे. परंतु इंग्लंडच्या लहान क्षेत्रफळामुळें त्याला स्वयंपूर्तता केव्हांही येणार नाहीं. तेव्हां जरी सर्व जगाशीं खुला व्यापार आतां अशक्य झाला असला, तरी निदान ब्रिटिश साम्राज्यामध्यें तो चालू असावा, अशी ब्रिटिश मुत्सद्यांची साहजिकच इच्छा असते. साम्राज्यान्तर्गत संरक्षण 'Imperial Preference' नांवाचा एक नवीनच व्यापारी पंथ हल्लीं पुढें सरसावलेला आहे. हिंदुस्थानच्या दृष्टीनें कोणता मार्ग श्रेयस्कर आहे, हें तपासण्याकरितां व महायुद्धाचा अनुभव लक्षांत घेऊन त्याचें व्यापारी धोरण ठरविण्याकरितां नुकतेंच एक कमिशन सरकारनें नेमिलें आहे. त्याचे अध्यक्ष ऑ. सर इब्राहिम रहिमतुल्ला हे आहेत. या कमिशनच्या शिफा-

रशीकडे सर्वांचें लक्ष्य वेधून लागावें यांत आश्चर्य नाहीं.

तेव्हां खुल्या व्यापाराचें तत्त्व व संरक्षणाचें तत्त्व यांची आंदोलनासारखी स्थिति झालेली आहे. एके काळीं संरक्षणाचा विशेष जारीचा प्रसार होता. पुढें इंग्लंडनें खुल्या व्यापाराचा अंगीकार केल्यापासून खुल्या व्यापाराकडे कल झुकतो कीं काय, असें वाटत होतें. परंतु आंदोलनाची गति पुनः आतां संरक्षणाकडे फिरल्यासारखी वाटत आहे. तेव्हां या प्रश्नाच्या मुळाशीं कोणतीं तत्त्वें आहेत, व हा प्रश्न असा हेलकावे खात कां राहतो, याचा विचार केला पाहिजे.

खुल्या व्यापाराचें स्वरूप सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. खुल्या व्यापाराचें तत्त्व बहिर्व्यापार व अन्तर्व्यापार यांत कांहीं एक भेद मानीत नाहीं. खुल्या व्यापाराचें रहस्य म्हणजे घरगुती वसाहती किंवा देशी मालामध्यें कोणताही भेदभाव न मानणें हें होय. हें तत्त्व या सर्व मालाला सारखें लेखतें. अमक्याला उत्तेजन द्यावयाचें व अमक्याला द्यावयाचें नाहीं असें हें तत्त्व समजत नाहीं. मालावर कर बसविलेच तर ते फक्त उत्पन्नाच्या बाबी म्हणून बसविले जातात. त्यांचा हेतु कांहीं मालाला उत्तेजन व कांहीं मालाची पीछेहाट हा नसतो. अप्रतिबंध व्यापारवाद्यांच्या मताप्रमाणें वरील तत्त्व देशाच्या औद्योगिक प्रगतीस सदोदित श्रेयस्कर आहे आणि त्यांनीं पुढें आणिलेलीं प्रमाणें अगदीं सुलभ व उघड उघड आहेत.

बहिर्व्यापार हा अंतर्व्यापाराप्रमाणें आहे. ज्याप्रमाणें अन्तर्व्यापारांत जितके अडथळे कमी तितकें चांगलें, त्याचप्रमाणें बहिर्व्यापाराची अवस्था आहे. ज्याप्रमाणें अदलाबदलींत एकाचा फायदा व एकाचें नुकसान असें सहसा होत नाहीं तोच प्रकार राष्ट्राचा आहे. जर मालाच्या आयातीला प्रतिबंध केला तर मालाच्या निर्यातीलाही आपोआप प्रतिबंध झाला पाहिजे. याकरितां खुला व्यापार हाच देशाच्या भरभराटीला अवश्यक आहे. खुल्या व्यापारानें प्रत्येकाला आपला माल सर्वांत महाग बाजारांत विकतां येईल व सर्वांत स्वस्त बाजारांत विकत घेतां येईल. यायोगें प्रत्येकाच्या नफ्यांत वाढ झालीच पाहिजे. शेवटीं खुल्या व्यापारानें प्रत्येक देशाला आपल्या उत्पादक घटकांची कार्यक्षमता वाढवितां येते. ज्या ज्या वस्तु करण्यांत एका देशाला विशेष सोयी आहेत त्या त्या वस्तूंच्या उत्पत्तीकडे सर्व लक्ष व आपलें सर्व सामर्थ्य लावितां येईल. या-

योगें सर्व जगाची संपत्ति वाढेल. अर्थात् ज्याप्रमाणें श्रमविभागाच्या तत्त्वानें संपत्तीच्या पैदाशीचा वेग विलक्षण वाढतो, त्याप्रमाणेंच खुल्या व्यापाराच्या योगानें जगांतील संपत्तीच्या वाढींत भर पडते. कारण खुल्या व्यापाराचें तत्त्व ह्मणजे श्रमविभागाचें एक अंग होय. ज्याप्रमाणें धंद्याधंद्यांमधील श्रमविभाग असतो, त्याप्रमाणें खुल्या व्यापारानें जगांतील निरनिराळ्या भागांमध्यें श्रमविभाग होतो. ज्या देशाला जें चांगल्या तऱ्हेनें करितां येतें तें त्याला करून देण्यांत जगाचा फायदा आहे. तेव्हां खुला व्यापार म्हणजे स्थानिक श्रमविभागच होय. खुल्या व्यापाराच्या तत्त्वाच्या समर्थनाचें सर्व रहस्य वरील विधानांत गोंविलेलें आहे. बारकाईनें हीं विधानें पाहिलीं म्हणजे यांमध्यें खालील गोष्टी गृहीत धरल्या आहेत असें दिसून येईल.

पहिली गोष्ट—भांडवल व श्रम यांची परिवर्तनसुलभता. देशांतील श्रम व भांडवल हीं कांहीं एक तोटा किंवा त्रास न होतां एका धंद्यांतून दुसऱ्या धंद्यांत घालतां येतात. तेव्हां परदेशच्या मालाच्या चढाओढींत देशांतील एखादा धंदा डबघाईस आला तर लागलेंच त्या लोकांना दुसऱ्या धंद्यांत जातां येईल; परन्तु हल्लींच्या काळीं भांडवल व श्रम यांमध्यें इतकें विभक्तीकरण झालेलें असतें कीं, एका धंद्यांतून दुसऱ्या धंद्यांत मजुरानें किंवा कारखानदारानें काय जाणें बरेंच दुरापास्त आहे, असें या गोष्टीवर संरक्षणवाद्यांचें उत्तर आहे.

दुसरी गोष्ट—भांडवल व श्रम यांचें स्थानस्थैर्य. देशांतील श्रम व भांडवल देशांतच राहतात, या तत्त्वावर बहिर्व्यापाराची मीमांसा बसविलेली आहे. सामान्यतः हें तत्व खरें आहे. परन्तु इतिहासांत श्रम व भांडवल यांच्या देशांतरगमनाचीं पुष्कळ उदाहरणें आहेत, असें संरक्षणवाद्यांचें याला उत्तर आहे.

तिसरी गोष्ट-आयातनिर्यातसमतोलन. आयात मालाची किंमत निर्यात मालानें दिली जाते. ह्मणून आयातीचा प्रतिबंध करणें म्हणजे पर्यायानें निर्यातीचा प्रतिबंध करण्यासारखें आहे. परंतु परकी देशांनीं आपल्या देशांत कारखाने वाढविले व ते स्वयंपूर्ण झाले म्हणजे खुल्या व्यापाराच्या देशाचा धंदा नाहींसा होईल, असें संरक्षणवाद्यांचें यास उत्तर आहे.

चवथी गोष्ट—जोंपर्यंत श्रम व भांडवल यांच्या योजनेपासून नफा होत आहे तोंपर्यंत हे श्रम व भांडवल अमुकच धंद्यांत घातले पाहिजेत ही गोष्ट

देशाला महत्त्वाची नाहीं. परन्तु हें विधान खुल्या व्यापाराचा जनक **अॅडाम स्मिथ** यालासुद्धां कबूल नव्हतें, असें यावर उत्तर आहे. देशामध्यें नफा हा संपत्तीचा एक भाग आहे. नफा फाजील झाला तर उत्पन्नाचे दुसरे वांटे-भाडें व मजुरी-हे कमी होतात, याकारितांच वसाहतींचा व्यापार विशेष वर्गाच्या अगर संस्थेच्या हातीं देणें बरोबर नाहीं असें **अॅडाम स्मिथचें** म्हणणें होतें. भांडवलाच्या योजनेचा चांगुलपणा **अॅडाम स्मिथच्या** मतानें त्यावर मिळणाऱ्या नफ्यावरूनच फक्त ठरवावयाचा नाहीं, तर त्यावर पोसल्या जाणाऱ्या मजुरांच्या संख्येवरून व देशांत खर्च होत असलेल्या भांडवलाच्या रकमेवरून ठरवावयाचा असतो. या तत्वाप्रमाणें **अॅडाम स्मिथनें** शेतकी, कारखाने, अन्तर्व्यापार, बहिर्व्यापार व नेआणीचा व्यापार अशी धंद्याच्या चांगुलपणाची परंपरा ठरविली आहे. या **अॅडाम स्मिथच्या** ह्मणण्यांत बराच तथ्यांश आहे.

शेवटची गोष्ट-खुल्या व्यापाराच्या तत्वांतील संगतता.

खुला व्यापार हें तत्व अन्तर्व्यापार व बहिर्व्यापार या दोन्हीलाही सारखेंच श्रेयस्कर आहे, असें या व्यापाराच्या समर्थकांचें ह्मणणें आहे. संरक्षणतत्वामध्यें मात्र विरोध आहे. ह्मणजे त्या तत्वाप्रमाणें देशामध्यें खुला व्यापार पाहिजे. बाहेर मात्र संरक्षण पाहिजे, असें ते ह्मणतात. या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत. यावर संरक्षणवाद्यांचें उत्तर अगदीं सरळ आहे. देशादेशांमध्यें श्रम व भांडवल यांचें कितीही स्थानांतर झालें तरी सर्व संपत्ति देशामध्यें राहते; परंतु खुल्या व्यापारानें जर श्रम व भांडवल देशाबाहेर गेलें तर राष्ट्रीयदृष्ट्या तोटा झाला व असा तोटा न व्हावा अशाकरितां संरक्षणच पाहिजे.

आतां संरक्षणाच्या बाजूनें सामान्यतः जीं प्रमाणें पुढें आणलीं जातात त्यांचा थोडक्यांत विचार केला पाहिजे.

पहिलें प्रमाण-व्यापाराचें समतोलन. उदीमपंथाचा या प्रमाणावर फार भर असे. त्याचे मतानें देशाचा निर्यातव्यापार आयातव्यापारापेक्षां नेहमीं जास्त असला पाहिजे ह्मणजे व्यापाराचें समतोलन देशाला अनुकूल पाहिजे. तरच देशांत संपत्तीची वृद्धि होत जाईल व देश भरभराटत जाईल. निर्यातव्यापाराला उत्तेजन येण्याकरितां बक्षीस, जकातीच्या सवलती वगैरे उपाय योजिले पाहिजेत. व आयातव्यापार कमी होण्याकरितां त्यावर जबर जकाती बसविल्या पाहिजेत.

अशा प्रकारचे उपाय योजणें म्हणजेच संरक्षणपद्धतीचा अंगीकार करणें होय. परंतु अर्वाचीन काळीं या प्रमाणाचा फोलपणा उघड झालेला आहे. कारण बहिर्व्यापाराच्या मीमांसेंत असें दाखविलें आहे कीं, आयात व निर्यात या परस्परावलंबी गोष्टी आहेत. आयात व निर्यात माल यांची परस्पर अदलाबदल होते. यामुळें दुसरीं कारणें अस्तित्वांत नसलीं तर हे दोन्ही व्यापार सारखेच होण्याचा कल असतो. शिवाय व्यापाराचें समतोलन ही देशाच्या संपत्तीची किंवा भरभराटीची मुळीं कसोटीच नाहीं. इंग्लंड हा देश सांपत्तिक भरभराटींत आहे तरी पण त्या देशाच्या विशेष परिस्थितीमुळें त्या देशाचा आयात व्यापार निर्यात व्यापारापेक्षां नेहमींच जास्त असतो. युनायटेड स्टेट्स् सांपत्तिक भरभराटींत असतांना त्या देशाचा निर्यातव्यापार आयातव्यापारापेक्षां मोठा आहे. हिंदुस्थानच्या विशेष परिस्थितीमुळें हिंदुस्थानचा निर्यातव्यापार आयातव्यापारापेक्षां सदोदित जास्त असतो. परंतु यावरून हिंदुस्थानची भरभराट होत आहे असें सिद्ध होत नाहीं. कारण हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति सुधारत आहे कीं खालावत आहे हा एक मोठा वादग्रस्त प्रश्न आहे. त्याचा विचार या ग्रंथाच्या सहाव्या पुस्तकांत करावयाचा आहे. सारांश, व्यापाराच्या समतोलनाचे प्रमाणाला हल्लीं मुळींच महत्त्व दिलें जात नाहीं.

दुसरें प्रमाण—उद्योगवृद्धि. संरक्षणानें देशांतील कारखाने व शेतकी या दोहोंनाही उत्तेजन येतें. कारण देशांत कारखाने निघाले म्हणजे मोठमोठीं शहरें निर्माण होतात व या शहरांना अन्न व कच्चा माल पुरविण्याचें काम शेतीचें असल्यामुळें यायोगें शेतीला उत्तेजन येतें. शिवाय एका देशांत होणाऱ्या विशेष वस्तू बाहेर पाठविणें व विशेषतः कच्चा माल बाहेर पाठविणें म्हणजे देशाची सुपीकता कमी करणें होय. कारण अशा पदार्थांतील सतांश देशाची जमीन मुकते. कॅरे—अमेरिकन अर्थशास्त्री—यानें या मुद्यावर संरक्षणाचें समर्थन केलें आहे. शिवाय देशांतच उद्योगवृद्धि केल्यानें नेआणीचा मोठा खर्च व त्रास वांचतो. म्हणून संरक्षणपद्धतीनें असे उद्योगधंदे वाढविणें इष्ट आहे. या प्रमाणाचेंही हल्लींच्या काळीं फार महत्त्व राहिलें नाहीं. कारण, दळणवळणाच्या साधनांत अलीकडे अमदीं क्रांति होऊन गेली आहे. सर्व जग एक बाजार झाल्याप्रमाणें झालें आहे; शिवाय देशाची उत्पादक शक्ति इतकी वाढली आहे कीं, हल्लीं महत्त्वाचा

प्रश्न बहिर्व्यापाराला संधि व अवसर शोधून काढण्याचा आहे.

तिसरें प्रमाण—मजुरीवरील परिणाम. बहिर्व्यापाराच्या मीमांसेमध्यें असें दाखविलें आहे कीं, दोन देशांमध्यें व्यापार सुरू झाला म्हणजे पदार्थांच्या किंमती एक होतात व ज्या देशांतील मजुरीचा दर फाजील आहे तेथला दर कमी होऊं लागतो. म्हणजे इतर देशांत मजुरीचा दर कमी असल्यास त्याचा परिणाम दुसऱ्या देशांवर झाल्याखेरीज रहात नाहीं. परंतु हा परिणाम मजुरांना अनिष्ट आहे. तो टाळण्याकरितांच संरक्षणाची जरूरी आहे, असें संरक्षणवाद्यांचें म्हणणें आहे. या मुद्यावर अमेरिकेंत संरक्षणाचें मंडन केलें जातें. अमेरिकेंत मजुरीचा दर जास्त आहे व खुला व्यापार सुरू केल्यास हा मजुरीचा दर खालावेल म्हणून अमेरिकन लोकांना संरक्षण पाहिजे आहे. परंतु खुल्या व्यापाराच्या समर्थकांचें यावर उत्तर असें आहे कीं, हें प्रमाण परस्परविरोधी आहे. अमेरिकेला संरक्षण पाहिजे; कां? तर अमेरिकेंत मजुरी जास्त आहे, तिचें संरक्षण केलें पाहिजे. परन्तु याच्या अगदीं उलट कारणाकरितां रशियांत संरक्षणतत्वाचें समर्थन केलें जातें. रशियांत मजुरीचा दर फार कमी आहे. व इंग्लंडच्या महागड्या मजुरांनीं रशियांतील गरीब मजुरांना चिरडून टाकूं नये म्हणून रशियांत संरक्षण पाहिजे असें संरक्षणवादी म्हणतात. याप्रमाणें संरक्षणवाद्यांचें हें प्रमाण परस्परविरोधी व म्हणूनच असंबद्ध आहे असें खुले व्यापारी म्हणतात.

चवथें प्रमाणः—उद्योगबाल्यता. हेंच प्रमाण फार महत्त्वाचें आहे. खुल्या व्यापाराचा प्रसिद्ध समर्थक जो मिल त्यानें या प्रमाणाचें सयुक्तिकत्व कबूल केल्यापासून त्याचें महत्त्व विशेष वाढलेलें आहे. जोंपर्यंत एका देशांतील धंदे बाल्यावस्थेंत आहेत तोंपर्यंत त्यांचा प्रौढावस्थेंतील परदेशाच्या धंद्यांशीं टिकाव लागणें अशक्य आहे. म्हणून अशा स्थितींत संरक्षणपद्धतीचा अवलंब करणें अवश्य आहे. ज्याप्रमाणें मुलाच्या बालपणीं त्याला आईबापांच्या जोपासनेची जरूरी असते त्याप्रमाणेंच बालधंद्यांना सरकारच्या जोपासनेची जरूरी असते. अशा स्थितींत जर खुला व्यापार सुरू केला किंवा चालू राहिला तर या कोंवळ्या उद्योगाचा प्रौढ उद्योगाच्या चढाओढींत चुराडा होईल. याकरितां अशा स्थितींत देशानें संरक्षणपद्धतीचा अवश्य अवलंब केला पाहिजे. यावर खुल्या व्यापाराच्या समर्थकांचें म्हणणें असें आहे कीं, एकदां संरक्षणपद्धतीचा अवलंब केला म्हणजे

उद्योगधंदे परावलंबी व पंगू होतात व त्यांची स्वयंकृत वाढ खुंटते. शिवाय ज्या ज्या धंद्यांना एकदां संरक्षण मिळतें त्या त्या लोकांचें तें संरक्षण कायम करण्यामध्यें हितच असतें व यामुळें खुल्या व्यापाराचें तत्व पुढें पुनः अमलांत येणें कठिण होतें.

पांचवें प्रमाण—उद्योगविविधता. प्रत्येक देशामध्यें उद्योगाची विविधता पाहिजे व प्रत्येक देशानें होतां होईल तों स्वयंपूर्ण व स्वावलंबी असलें पाहिजे. याकरितां संरक्षणाच्या साहाय्यानें पुष्कळ तऱ्हेचे धंदे देशांत निर्माण केले पाहिजेत. देशामध्यें धंद्यांची विविधता असली म्हणजेच देश सर्व बाबतींत सुधारत जातो व त्याची वाढ एकदेशीय रहात नाहीं. देश जर आपलें सर्व लक्ष शेतकींत घालील, तर तो देश नेहमीं परावलंबी राहील, व त्या देशाची बौद्धिक, नैतिक वगैरे सर्वांगीण सुधारणा होणार नाहीं. प्रसिद्ध जर्मन अर्थशास्त्री लिस्ट यानें या शेवटच्या दोन प्रमाणांवर विशेष जोर दिलेला आहे. त्याचे मतानें ज्या ज्या देशांना उद्योगविविधता येण्याची शक्यता आहे—समशीतोष्ण कटिबंधांतील बहुतेक सर्व देशांना अशी शक्यता आहे—त्या देशांनीं अशी विविधता उत्पन्न केली पाहिजे. असें होण्याकरितां देशाच्या प्रथमावस्थेंत खुला व्यापार पाहिजे. त्या योगानें लोकांच्या गरजा वाढतात, त्यांची अभिरुचि वाढते, त्यांना संपत्तीच्या पुष्कळ प्रकारांचें ज्ञान होतें व या ज्ञानानें ती मिळविण्याची इच्छा व वासना वाढते. अशी स्थिति उत्पन्न झाल्यावर मग संरक्षण-पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. म्हणजे तो माल देशांत निघूं लागतो व देशांतील कारखाने अगदीं प्रौढ-दशेप्रत पावले म्हणजे मग पुनः खुल्या व्यापाराचा अंगीकार केला पाहिजे. कारण नेहमींच संरक्षणपद्धति सुरू ठेविली तर देशांतील कारखान्यांना कोणाचीहि चढाओढ रहात नाहीं. व चढाओढीच्या अभावीं कारखान्यांची प्रगमनशीलता नाहींशी होते. कां कीं, सर्व प्रगति चढाओढीच्या व जीवनार्थ कलहाच्या काळांतच शक्य आहे.

येथपर्यंत खुला व्यापार व संरक्षण या दोन्ही पक्षांकडील प्रमाणें निःपक्षपातानें पुढें मांडिलीं आहेत. दोन्ही पक्षांतील कांहीं कांहीं प्रमाणें लंगडीं आहेत असें तेव्हांच ध्यानांत येईल. परंतु खुल्या व्यापाराच्या बाजूनें श्रमविभागाचें प्रमाण सयुक्तिक आहे. तसेंच चढाओढ ही सर्व सुधारणेचें मूळ आहे यांत शंका

नाहीं. या दृष्टीनें होतां होईल तों व्यापार खुला असणें इष्ट आहे. तसेंच संरक्षणाच्या बाजूकडील चवथें व पांचवें प्रमाण या दोन्हींमध्यें पुष्कळ तथ्यांश आहे असें कबूल केलें पाहिजे. तसेंच खुल्या व्यापाराचें ध्येय विश्वबंधुत्व आहे. खुला व्यापार एकएका देशाचा फक्त विचार न करितां एकंदर जगांतील संपत्ति कोणत्या उपायानें वाढेल याकडे नजर फेंकतो. संरक्षणतत्त्वाचें ध्येय राष्ट्रीयत्व आहे. एका देशाची संपत्ति कोणत्या उपायानें वाढेल इकडे संरक्षणतत्त्व विशेष लक्ष देतें. जोंपर्यंत सर्व जग एकछत्री झालें नाहीं व होण्याचा रंगही दिसत नाहीं, तसेंच जोंपर्यंत देशादेशांमधील व राष्ट्राराष्ट्रांमधील हेवा, द्वेष, चढाओढ व स्पर्धा हीं कायम आहेत, तोंपर्यंत प्रत्येक देशानें आपल्या हिताकडे पाहणें अवश्य आहे. ह्मणूनच आपल्या देशाची सांपत्तिक भरभराट होण्यास संरक्षणपद्धतीचा अवलंब करणें अवश्य आहे असें दिसून आल्यास तसें करण्याचा त्या देशाला अधिकार आहे. सारांश, खुल्या व्यापाराचें तत्व चांगलें किंवा संरक्षणतत्व चांगलें या प्रश्नाला तात्विक उत्तर देतां येणार नाहीं. हा प्रश्न गणितशास्त्रासारखा तात्विक व सर्वत्र लागू पडणारा असा नाहीं.

# अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें.

## पुस्तक ५ वें.

## राष्ट्रीय जमाखर्च.

## भाग पहिला.

### सामान्य विचार.

तात्त्विक अर्थशास्त्राचें हें शेवटलें पुस्तक आहे. प्रास्ताविक पुस्तकांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें या पुस्तकांत देशांतील सरकारच्या जमाखर्चाचा विचार करावयाचा आहे. म्हणजे सुधारलेल्या राष्ट्रांतील सरकारच्या खर्चाच्या मुख्य बाबी कोणत्या असतात व राष्ट्रीय खर्च भागविण्याकरितां सरकारला कोणकोणत्या बाबींतून उत्पन्न काढावें लागतें; त्याच्या उत्पन्नाचे प्रकार कोणते, करांचीं तत्वें काय, या करांचा बोजा देशांतील निरनिराळ्या वर्गांवर कसा पडतो; व त्याचा देशाच्या सांपत्तिक स्थितीवर काय परिणाम होतो; तसेंच राष्ट्रीय कर्ज म्हणजे काय व तें कशाकरितां काढावें लागतें व त्याचाही देशांतील सांपत्तिक स्थितीवर काय परिणाम होतो वगैरे विषयांची या पुस्तकांत चर्चा करावयाची आहे.

या पुस्तकाच्या विषयाचा अर्थशास्त्रामध्यें अन्तर्भाव करावा किंवा नाहीं याबद्दल अर्थशास्त्रकारांमध्यें अलीकडे मतभेद होत चालला आहे. कांहीं अर्थशास्त्रकार सरकारचीं कर्तव्यकर्में व सरकारी खर्चाच्या बाबी यांचा ऊहापोह करीत नाहींत; कारण, त्यांचे मतानें हा राजनीतिशास्त्रांतला विषय आहे. ते फक्त करांचीं प्रसिद्ध तत्वें व करांचा संपत्तीच्या वांटणीवर परिणाम एवढ्याच एका प्रश्नाचा विचार अर्थशास्त्रांत करतात. कांहीं अर्थशास्त्रकार तर या पुस्तकांतील सर्वच विषय अर्थशास्त्रां-

तून काढून टाकतात. कारण, यांचे मतें राष्ट्रीय जमाखर्च हें एक स्वतंत्र शास्त्र झालेलें आहे. जरी या शास्त्राचा व अर्थशास्त्राचा निकट संबंध असला तरी राष्ट्रीय जमाखर्चाचा प्रश्न वास्तविक अर्थशास्त्राच्या व्याख्येंत येऊं शकत नाहीं. तेव्हां राष्ट्रीय जमाखर्चाचा प्रश्न अर्थशास्त्रांत घेण्याचें कारण नाहीं. अर्थशास्त्राचा जनक जो **ॲडाम स्मिथ** त्याच्या ग्रंथाकडे पाहिलें तर त्यानें आपल्या ग्रंथाचें एक संबंध पुस्तक-इतर सर्व पुस्तकांपेक्षां मोठें अशा-या विषयाला वाहिलें आहे. तेव्हां या निरनिराळया प्रकारांतील कोणता प्रकार योग्य आहे व या ग्रंथांत कोणत्या प्रकाराचा अंगीकार केला आहे हें सांगणें इष्ट आहे.

याचा निर्देश प्रास्ताविक पुस्तकाच्या शेवटल्या भागांत केलाच आहे. अर्थशास्त्राच्या व्याख्येकडे जर नजर दिली, तर या पुस्तकांतील विषय अर्थशास्त्रामध्यें येतो असें म्हणणें प्राप्त आहे. कारण, अर्थशास्त्राचा विषय म्हणजे राष्ट्रीय संपत्तीचें स्वरूप व तिच्या कारणांचा विचार हा होय. परंतु राष्ट्राचे अर्थात् दोन भाग होतात; राष्ट्रांतील सरकार व लोक; तेव्हां या दोघांच्या संपत्तीचा विचार करणें अर्थशास्त्राचें काम आहे. परन्तु यावर असा आक्षेप येईल कीं, सरकारची संपत्ति ही लोकांच्या संपत्तीचाच एक वांटा आहे. कारण, सरकार हें निरनिराळ्या करांच्या रूपानें लोकांच्या संपत्तीचाच एक हिस्सा आपल्या खर्चाकरितां घेतें; तेव्हां सरकारची संपत्ति व लोकांची संपत्ति हें वर्गीकरणच मूळ चुकीचें आहे. यांत एकच संपत्ति दोनदां मोजली जाते. एकंदर संपत्तीच्या ऊहापोहांत सरकारच्या संपत्तीचा समावेश होतो. म्हणून अर्थशास्त्रामध्यें याचा निराळ्या भागांत विचार करण्याची जरूरी नाहीं. या आक्षेपाला दुहेरी उत्तर आहे. पहिलें-सर्व ठिकाणीं, सर्व काळीं सरकारची संपत्ति लोकांच्या संपत्तीपासून कधींही निराळी नसते, हें खरें नाहीं. सरकारच्या मालकीची स्वतंत्र जमीन असते; बहुतेक ठिकाणीं देशांतील जंगल सरकारच्या मालकीचें समजतात; देशांतील खाणी केव्हां केव्हां सरकारच्या मालकीच्या असतात; केव्हां केव्हां सरकार कित्येक धनोत्पादक धंदे करतें आणि त्यापासून तें देशांत नवीनच संपत्ति उत्पन्न करतें. तेव्हां राष्ट्रीय संपत्तीमध्यें या देशांतील सरकारच्या संपत्तीच्या स्वरूपाचा व त्याच्या कारणांचा विचार होणें रास्त आहे. दुसरें, जरी सरकारची संपत्ति देशांतील लोकांच्या संपत्तीपैकींच एक हिस्सा आहे असें मा-

नव्हे, तरी त्याचा निराळा व स्वतंत्र विचार अर्थशास्त्रांत करणें प्रशस्त आहे. या दृष्टीनें या पुस्तकांतील विषय हा संपत्तीच्या वांटणीचा एक पोटभाग होतो एवढेंच. देशांतील संपत्तीचे तिच्या मूर्त कारणांच्या अनुरोधानें चार मुख्य हिस्से होतात असें मागें सांगितलें आहे. ते हिस्से म्हणजे भाडें, मजुरी, व्याज व नफा हे होत. या प्रत्येकाचें स्वरूप व त्याचे नियम व तत्वें यांचा आपण 'वांटणी' या पुस्तकांत विचार केला आहे. सुव्यवस्थित राज्यपद्धति हेंही एक संपत्तीच्या उत्पत्तीचें अमूर्त कारण आहे, असें मागें सांगितलें आहे. तेव्हां संपत्तीच्या उत्पत्तींतून संपत्तीच्या याही कारणाचा हिस्सा निराळा पडतो. सरकारचे कर हा एक देशांतील संपत्तीच्या मुख्य वांट्यांपैकीं पांचवा वांटा आहे, असें म्हटलें पाहिजे. यावरून कराच्या स्वरूपाबद्दल व त्याच्या नियमाबद्दल विवेचन अर्थशास्त्रांत कोठें तरी आलें पाहिजे हें उघड आहे.

सरकारी जमाखर्चाची चर्चा अर्थशास्त्रांत घालण्याविरुद्ध आणखी एक आक्षेप पुढें येण्याचा संभव आहे. तो हा कीं, जरी तात्विकदृष्ट्या हा विचार अर्थशास्त्रांत येऊं शकेल असें क्षणभर म्हटलें, तरी ज्या अर्थी राष्ट्रीय जमाखर्चाचें आतां स्वतंत्र शास्त्र झालें आहे व त्यावर स्वतंत्र ग्रंथ निर्माण झाले आहेत व या संबंधाचें निराळें वाङ्मय तयार होत आहे, त्या अर्थी हल्लींच्या काळीं तरी अर्थशास्त्रांत या विषयाचा ऊहापोह करण्याची जरूरी नाहीं. या आक्षेपाचें उत्तर अगदीं उघड आहे. ज्ञानाच्या प्रसाराबरोबर इतर धंद्यांप्रमाणें याही बाबतींत श्रमविभागाचें तत्व लागू होतें. जसजसें शास्त्रांतील ज्ञान वाढत जातें तसतसें त्याच्या पोटशाखांचा स्वतंत्र तऱ्हेनें अभ्यास होऊं लागतो. व त्या शाखांवर मोठमोठे ग्रंथही होऊं लागतात. परंतु या शाखांना स्वतंत्रपणा येऊं शकत नाहीं. त्या मूळ वृक्षाच्या शाखाच राहतात. याचे एकदोन दाखले घेऊं. मानसशास्त्र हें एक निराळें शास्त्र आहे. मनुष्याच्या मनाचे व्यापारांचा ऊहापोह करणारें शास्त्र म्हणजे मानसशास्त्र होय. या शास्त्राची हल्लीं इतकी प्रगति झालेली आहे कीं, त्याच्या निरनिराळ्या अंगांवर स्वतंत्र ग्रंथ व मोठें वाङ्मय तयार होत आहे. म्हणून या अंगांचा मानसशास्त्रांत विचार होत नाहीं असें मात्र नाहीं. ज्या मनुष्याला एकंदर मानसशास्त्राची सामान्य माहिती पाहिजे आहे त्याला या सर्व स्वतंत्र होऊं पाहणाऱ्या अंगांचा अन्तर्भाव मानसशास्त्र या एकाच शास्त्रांत करावा लागतो, व

शास्त्राची एकरूपता दाखविण्याकारितां असें करणें इष्ट आहे. मात्र तो या अंगाचा फार विस्तृत तऱ्हेनें विचार करणार नाहीं. उदाहरणार्थ, शारीरमानसशास्त्र म्हणून एक मानसशास्त्राची स्वतंत्र शाखा होत आहे. हीमध्यें मानसिक व्यापाराला अवश्य असणारा शारीरिक व्यापार व विशेषतः मेंदू व त्यांतील फेरफार यांचा विशेष तऱ्हेनें ऊहापोह केला जातो. परंतु मन व मेंदू यांचा परस्पर संबंध व मानसिक व्यापाराच्या शारीरिक कारणांचा विचार हा मानसशास्त्राचाच एक प्रश्न आहे यांत शंका नाहीं. दुसरा दाखला अर्थशास्त्रांतील घेतां येईल. अर्थशास्त्रांतील सामाजिक पंथ याची हकीकत तिसऱ्या पुस्तकांत दिली आहे. सामाजिक पंथ हें एक स्वतंत्र शास्त्र बनत चाललें आहे. याचें वाङ्मयही फार असून तें सारखें वाढत आहे. परंतु सामाजिक पंथाचा अन्तर्भाव अर्थशास्त्रांतच होतो व त्याची माहिती–थोडीबहुत–प्रत्येक अर्थशास्त्रावरील ग्रंथांत आलीच पाहिजे हें उघड आहे. तसेंच सहकारितेच्या तत्त्वासंबंधीं व त्या तत्त्वावर उभारलेल्या संस्थांचेंसुद्धां स्वतंत्र वाङ्मय बनत आहे. परंतु यावरून तें एक स्वतंत्र शास्त्र झालें असा त्याचा अर्थ नाहीं. अशा तऱ्हेनें एखाद्या शास्त्रांतील निरनिराळ्या प्रश्नांसंबंधीं स्वतंत्र वाङ्मय तयार होणें इष्ट आहे. त्याच्यायोगानें त्या विषयाचें ज्ञान वाढत जाऊन त्याचा समाजांत प्रसार होण्यास रुवड जास्त होते.

या दृष्टीनें राष्ट्रीय जमाखर्चाची एक स्वतंत्र शाखा बनत आहे हें कांहीं वाईट नाहीं; व या विषयावर अगदीं सविस्तर अशीं पुस्तकें निर्माण होत आहेत, हेंही वाईट नाहीं. परंतु जरी राष्ट्रीय जमाखर्चावर स्वतंत्र पुस्तकें झालीं तरी हा विषय अर्थशास्त्रांतील एक पोटभाग आहे हें विसरतां कामा नये.

वरील विवेचनावरून **ॲडाम स्मिथनें** घातलेल्या प्रघाताचें शास्त्रीय दृष्टीनें कसें समर्थन करतां येतें हें दिसून येईल. म्हणूनच या ग्रंथांत सरकारी जमाखर्चाचा विचार **ॲडाम स्मिथच्या** संप्रदायाप्रमाणेंच करण्याचा विचार केला आहे. **ॲडाम स्मिथचें** विवेचन अजूनही वाचनीय असल्यामुळें पुढल्या भागांत त्याच्या विवेचनाचा सारांश देण्याचा विचार आहे. तेव्हां प्रथमतः सरकारची कर्तव्यकर्में कोणतीं व तीं भागविण्यांकारितां सरकारला खर्च कसा लागतो हें ठरवावयाचें आहे. या बाबतींत **ॲडाम स्मिथच्या** काळच्या व हल्लींच्या काळच्या कल्पनांत कसा फरक झाला आहे, हें दाखवावयाचें आहे. नंतर सा-

रच्या उत्पन्नाचें वर्गीकरण करून त्या प्रत्येक वर्गांचें थोडें थोडें विवेचन करावयाचें आहे सुधारलेल्या देशांत सरकारची उत्पन्नाची मुख्य बाब कर हीच होय. तेव्हां करांचें स्वरूप व त्याचीं तत्त्वें यांचें सविस्तर विवेचन करावयाचें आहे. पुढें या कराचा बोजा समाजांतील निरनिराळ्या वर्गांवर कसकसा वांटला जातो व त्याचे सांपत्तिक स्थितीवर कसकसे परिणाम होतात हें पहावयाचें आहे. त्यानंतर हिंदुस्थानच्या जमाखर्चाचें सामान्य स्वरूप, तेथील करांचे प्रकार व हिंदुस्थानचा मुख्य कर जो जमीनसारा त्यासंबंधाचा वादग्रस्त प्रश्न यांचा ऊहापोह येथें करण्याचा विचार आहे. नंतर राष्ट्रीय कर्जाचें स्वरूप, त्याची वाढ वगैरे प्रश्नांचा विचार करून शेवटीं हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कर्जाचा इतिहास देऊन हें पुस्तक संपविण्याचा विचार आहे.

---

# भाग दुसरा.

## अॅडाम स्मिथच्या मताप्रमाणें सरकारचीं कर्तव्यकर्में.

**अॅडाम स्मिथचीं** राजकीय मतें फ्रान्समधील तत्ववेत्ते व निसर्गपंथी लोक यांच्या मताप्रमाणेंच होतीं, याचा उल्लेख मागें एकदोन वेळां आलाच आहे. त्याचें प्रत्यक्ष प्रत्यंतर **अॅडाम स्मिथच्या** या विषयावरील विवेचनावरून उत्तम पटतें. राजनीतिशास्त्रांत ज्याला व्यक्तिक तत्व म्हणतात, त्याचा **अॅडाम स्मिथ** हा पुरस्कर्ता होता. म्हणजे समाजांत सरकारचें कर्तव्यकर्म जितकें कमी करतां येईल तितकें इष्ट आहे, व होतां होईल तोंपर्यंत समाजांतील व्यक्तींना सर्व बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य द्यावयाचें हें त्या तत्वाचें रहस्य होय. मात्र सर्वांना सारखें स्वातंत्र्य मिळण्याकरितां जितका प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर दाब ठेवणें जरूर आहे तितका दाब सरकारनें ठेवावा. सरकार ही संस्थाच मुळीं व्यक्तीचें स्वातंत्र्य व इतर स्वाभाविक हक्क यांचें रक्षण करण्याकरितां आहे. या रक्षणाला जितक्या अधिकारांची जरूरी आहे तितकेच अधिकार सरकारला असावे व तीच त्याची पराकाष्ठेची अधिकारमर्यादा असावी. सारांश, व्यक्तिक तत्वानें सरकार-

च्या कर्तव्याची कल्पना फार मर्यादित व संकुचित केलेली आहे. हीच कल्पना **ॲडाम स्मिथ**लाही ग्राह्य होती. परन्तु प्रत्यक्ष व्यवहारांत या फ्रान्समधील तत्वज्ञानाच्या अगदीं संकुचित कर्तव्यकल्पनेपेक्षां **ॲडाम स्मिथ**ची कल्पना जास्त विस्तृत आहे असें खालील विवेचनावरून दिसून येईल.

**ॲडाम स्मिथ**च्या मताप्रमाणें देशांतील सरकारचीं कर्तव्यकर्मे तीन प्रकारचीं आहेत. पहिलें व सर्वांत महत्त्वाचें कर्तव्यकर्म देशाचें परचक्रापासून संरक्षण करणें व देशांत शांतता राखून आंतील दंगेधोपे यांचा बंदोबस्त करणें हें होय. हें अगदीं पहिलें कर्तव्यकर्म. दुसरें कर्तव्यकर्म ह्मणजे व्यक्तीव्यक्तींमधील न्याय निवडणें व करारांची वगैरे अम्मलबजावणी होण्यास मदत करणें. हीं दोन कर्तव्यकर्मे सरकारनें उत्तम तऱ्हेनें बजाविलीं म्हणजेच देशांत जीविताला व मालमत्तेला पूर्ण सुरक्षितता येते. अशी सुरक्षितता ही एक संपत्तीच्या वाढीचें अमूर्त कारण आहे, व याचें दुसऱ्या पुस्तकांत विवेचन केलें आहेच. यावरून सरकारच्या या दोन कर्तव्यांचें अर्थशास्त्रदृष्ट्या फार महत्त्व आहे हें सहज दिसून येईल. सरकारचें तिसरें कर्तव्यकर्म ह्मणजे ज्या सार्वजनिक संस्था व जीं सार्वजनिक कामें सर्व समाजाच्या उपयोगाचीं असलीं तरी जीं खाजगी व्यक्तींकडून नफ्याच्या हेतूनें होण्यासारखीं नाहींत अशा संस्था व अशीं कामें सरकारनेंच आपल्या अंगावर घेतलीं पाहिजेत हें होय. हीं तीन कर्तव्यकर्मे चांगल्या तऱ्हेनें पार पाडण्यास सरकारास उत्पन्नाची जरूरी असते. सरकारच्या खर्चाचे तीन कर्तव्यानुरूप तीन वर्ग होतात; परंतु सरकारच्या खर्चाची आणखी एक मोठी बाब असते. ती ही कीं, सरकारचा प्रतिनिधि जो वंशपरंपरागत राजा किंवा नेमलेला अधिकारी त्याचा खर्च राष्ट्राच्या इभ्रतीला व वैभवाला शोभण्यासारखा पाहिजे. तेव्हां सरकारच्या खर्चाचे चार भाग होतात. पहिला संरक्षणखात्याचा खर्च, दुसरा न्यायखात्याचा खर्च, तिसरा सार्वजनिक संस्था व कामें यांबद्दलचा खर्च व चवथा राजाचा खर्च. या खर्चाच्या बाबींही समाजाच्या निरनिराळ्या अवस्थांमध्यें कमीअधिक प्रमाणांवर असतात. तेव्हां आतां प्रत्येक कर्तव्याचा वेगवेगळा विचार करणें इष्ट आहे.

वर सांगितलें आहे कीं, सरकारचें कर्तव्यकर्म ह्मणजे परचक्रापासून आपल्या प्रजेचें संरक्षण करणें हें होय. हें करण्याकरितां सरकारला सैन्य व आरमार

ठेवावें लागतें. समाजाच्या सुधारणेच्या पायरीप्रमाणें हें काम केव्हां विनखर्चाचें, तर केव्हां फार खर्चाचें असतें.

मृगयावृत्ति व गोपालवृत्ति समाजामध्यें प्रत्येक माणूस हा शिपाईच असतो. व लढाईच्या वेळीं तो आपल्या नेहमींच्या नायकाबरोबर लढाईवर जातो. मृगयावृत्ति समाज हे नेहमीं अगदीं लहान लहान टोळ्यांसारखे असतात. यामुळें या अवस्थेंत फार लोक एकत्र जमूं शकत नाहींत. परंतु गोपालवृत्ति समाज फार मोठा असूं शकतो व यामुळें या स्थितीमध्यें हजारों लोकांचें सैन्य एका सेनापतीच्या हुकमतींत जमूं शकतें. कारण या स्थितींत सर्व समाज नेहमीं फिरतच असतो. तेव्हां लढाईवर जाणें काय किंवा निवळ शांततेच्या हेतूनें दुसऱ्या कुरणाकडे जाणें काय त्यांना एकच असतें. हेतूंत मात्र फरक, इतकेंच. यामुळें अशा स्थितींत सर्व समाजच्या समाज लढाईवर जाऊं शकतो. टार्टर व आरब हीं गोपालवृत्ति राष्ट्रें होतीं. या लोकांमध्यें प्रचंड सैन्यें एकएकट्या नायकाच्या हाताखालीं जमल्याचें इतिहासावरून दिसून येतें. समाजाच्या या दोन्ही स्थितींत सरकारला शिपायांस पगार देण्याचें प्रयोजन नसतें; कारण या युगांत युद्धावस्थेमुळें नागरिकांच्या नेहमींच्या व्यवसायांत व्यत्यय येण्याचें कारणच नसतें.

कृषिवृत्ति समाजांत लोकांची वस्ती स्थिरावलेली असते. पूर्वीच्या तंबूंऐवजीं लोक घरांत राहतात. अशा स्थितींत लढाईवर जावयाचें झालें म्हणजे सर्व समाज घेऊन जाण्याची गरज नसते. म्हातारेकोतारे, बायकामुलें हीं घरची मालमत्ता संभाळण्याकरितां मागें राहतात. कृषिवृत्ति समाजांतील लोक नेहमीं उघड्या हवेंत काम करणारे असतात. शिवाय फुरसतीच्या वेळीं दांडपट्टा खेळणें, नेम मारणें, कसरत करणें वगैरे मर्दानी खेळ खेळणें हें दोन्हीं वृत्तींतील लोकांना सहज असतें. यामुळें कृषिवृत्ति समाजांतही शिपायाला विशेष शिक्षण लागत नाहीं. प्रत्येक शेतकरी हा स्वाभाविकच शिपाई असतो. या समाजाच्या अवस्थेमध्येंसुद्धां सरकारला सैन्याबद्दल खर्च पडत नाहीं किंवा शिपायांना पगार द्यावा लागत नाहीं. मात्र लढाई किंवा स्वारी हीं पिकाच्या हंगामानंतर सुरू होऊन पेरे करण्याच्या वेळेच्या सुमारास संपली म्हणजे झालें. कारण वर्षाच्या या वेळांत शेतकीचें काम फार मेहनतीचें किंवा जोखमीचें नसतें. तें बायकामुलें सहज करूं शकतात. यामुळें लढाईवर जाणाऱ्या लोकांनासुद्धां आपल्या शेतकीच्या उत्पन्ना-

वर निर्वाह करतां येतो. परंतु लढाई किंवा स्वाऱ्या या काळाच्या पलीकडे चालू राहिल्या तर मात्र शिपायांना सरकाराकडून पगार मिळणें अवश्य होतें. कारण स्वारीवर गुंतलेल्या लोकांना आपल्या शेतीची लागवड करणें शक्य नसतें. ह्मणून शेतीच्या लागवडीचें काम पगारी मजुरांकडून करून घ्यावें लागतें. या ह्मणण्याचें प्रत्यंतर इतिहासावरून मिळतें. पूर्वकाळीं ग्रीक लोकांमध्यें स्वाऱ्यांचा काळ ह्मणजे पिकाच्या हंगामापासून तों पेऱ्याच्या हंगामापर्यंतच असे. त्या वेळीं शिपायांना पगारही मिळत नसे. परंतु पुढें जशा लढाया व स्वाऱ्या या स्वाभाविक हंगामापलीकडे जाऊं लागल्या तशी पगार देण्याची पद्धति सुरू झाली. आपल्या महाराष्ट्रांतील इतिहासावरून हीच गोष्ट दिसते. यामुळेंच दसऱ्याच्या सणाचें येथें इतकें माहात्म्य आहे. दसरा झाला ह्मणजे पावसाळा संपतो व शेतीचें कामही संपतें. यामुळें दसऱ्यानंतर स्वाऱ्या करण्यास निघण्याचा मराठ्यांच त्या वेळचा संप्रदाय असे.

परंतु समाज सुधारणेच्या पुढील पायरीवर चढला ह्मणजे संरक्षणाचा खर्च फार वाढतो. याचीं दोन कारणें आहेत. पहिलें कारखान्यांची व धंद्यांची वाढ व दुसरें, लढाईच्या कलेची प्रगति होय. देशामध्यें कारखान्यांचा उदय होऊन पुष्कळ लोक शिल्पकलेवर आपली उपजीविका करूं लागले ह्मणजे शिपायांना पगार देण्याची अवश्यकता उत्पन्न होते. कारण कामदारांची उपजीविका त्यांच्या रोजच्या श्रमावर व मजुरीवर होते व सरकारनें त्यांना लढाईवर पाठविलें कीं, त्यांचें पोट त्यांना भरतां येत नाहीं. यामुळें त्यांच्या स्वतःच्या पोटापुरता व कुटुंबाच्या पोषणास अवश्यक इतका पगार त्यांना द्यावा लागतो.

दुसरें, या समाजाच्या स्थितींत लष्करी शिक्षणाची अवश्यकता उत्पन्न होते व त्याचाही खर्च वाढतो हें मागें सांगितलेंच आहे. समाजाच्या पहिल्या तिन्ही अवस्थांमध्यें हा प्रश्न उद्भवत नाहीं. मृगयावृत्ति-मनुष्याचा नेहमींचा व्यवसाय म्हणजे लष्करी शिक्षण असतें. गोपालवृत्ति व कृषिवृत्ति समाजांत लोकांना फार फुरसत असते व तीमध्यें घोड्यावर बसणें, कुस्ती खेळणें, नेम मारणें वगैरे मर्दानी व शक्ति व हिंमत वाढविणारे खेळ ते लोक खेळतात. यामुळें या स्थितींत निराळें लष्करी शिक्षण देण्याचें प्रयोजन नसतें. अगदीं अलीकडसुद्धां या ह्मणण्याचें प्रत्यंतर दिसून येतें. गेल्या बोअर युद्धांत बोअर लोकांनीं इतका विलक्षण

पराक्रम गाजविण्याचें कारण त्यांचें विशेष लष्करी शिक्षण हें नव्हे. बोअर लोक हे बहुतेक शेतकरी होते व उत्तम नेम मारणें हें त्यांचा हातखंडा काम होतें. यामुळें प्रत्येक बोअर हा इंग्रजांच्या कसलेल्या शिपायापेक्षां जास्त चांगला शिपाई बनला व कित्येक दिवसपर्यंत बोअर शेतकऱ्यांनीं इंग्रजांच्या कसलेल्या सैन्याला दाद दिली नाहीं. परंतु उद्योगप्रवृत्ति समाजांत लोकांना फुरसत नसते. त्यांचा सर्व वेळ शांततामय अशा उद्योगांत जातो. ह्मणून या अवस्थेंत समाजाच्या संरक्षणाचें काम कठिणही होतें व खर्चाचेंही होतें. कारण आतां संरक्षणासाठीं स्वतंत्र सैन्य ठेवावें लागतें. या सैन्याचे प्रकार दोन आहेत. एक नागरिक सैन्य व दुसरें भाडोत्री सैन्य. सरकार कायद्यानें आपल्या स्वतःच्या धंद्याखेरीज जेव्हां सर्व नागरिकांना किंवा नागरिकांच्या कांहीं संख्येला शिपायाचा धंदा पतकरण्यास व लष्करी शिक्षण घेण्यास भाग पाडतें, तेव्हां ती नागरिक-सैन्यपद्धति होय. तिलाच हल्लीं सक्तीची लष्करी शिक्षणपद्धति ह्मणतात. ही पद्धति फ्रान्स, जर्मनी वगैरे युरोपियन देशांत आहे. इंग्लंडमध्यें ठेविलेल्या सैन्याखेरीज व्हॉलंटीअरची पद्धति आहे. ठेविलेल्या सैन्यपद्धतींत सरकारला शांततेमध्यें व लढाईच्या वेळीं सैन्यांतील शिपायांना पगार द्यावा लागतो. सारांश, या पद्धतींत शिपायाचा धंदा इतर धंद्यांहून भिन्न असा एक स्वतंत्र धंदा होतो. नागरिक पद्धतींत सरकारला शांततेच्या वेळीं नागरिकांना पैसे द्यावे लागत नाहींत. ते आपआपले नेहमींचे धंदे करतात व आठवड्यांतून एकदोन दिवस लष्करी शिक्षणाला देतात. जेव्हां सैन्य प्रत्यक्ष लढाईवर जातें तेव्हांच अशा शिपायांना पगार देतात. परंतु भाडोत्री सैन्यपद्धतींत शिपाई नेहमीं कवाईत करीत असतात. यामुळें त्यांना नेहमींच पगार द्यावा लागतो. म्हणून असें सैन्य ठेवणें हें फार खर्चाचें काम असतें. नागरिक पद्धतींत लोक आपले लष्करी व्यायाम मोठ्या कंपूंत करतात किंवा लहान कंपूंत करतात. म्हणजे नागरिकांच्या, सैन्यांतील टोळ्यांप्रमाणें टोळ्या केलेल्या असतात व ते नेमलेल्या कामदारांच्या देखरेखीखालीं लष्करी-कवाईत करतात किंवा आपण स्वतःच कवाईत करतात. ग्रीक लोकांमध्यें पहिली पद्धति सुरू होती. त्या काळीं अथीनियन नागरिकांचें लष्करी शिक्षण हें त्यांच्या इतर शिक्षणाचाच एक भाग समजला जात असे. महाराष्ट्रांत पूर्व काळीं लोक आपआपले लष्करी खेळ खेळत व मर्दानी खेळ खेळत.

दुसऱ्या पद्धतींतील शिपाई हे नेहमीं शिस्तीनें राहण्यास शिकलेले असतात. यामुळें आज्ञा-पालन, व्यवस्थितपणा व नियमितपणा हीं त्यांच्या अगदीं अंगवळणीं पडलेलीं असतात. म्हणून असें सैन्य नागरिक-सैन्यापेक्षां जास्त चांगलें असतें. पूर्वीच्या युद्धपद्धतींत शिपायांच्या अंगचें व्यक्तिक शौर्य व त्यांचें कौशल्य हे गुण महत्त्वाचे होते; परंतु दारूच्या व बंदुकादिकांच्या शोधांपासून या व्यक्तिक गुणांचें महत्त्व कमी झालें आहे. अर्वाचीन काळच्या युद्धपद्धतींत व्यवस्था, नियमितपणा व आज्ञापालन या गुणांना महत्त्व आलेलें आहे. हे गुण ठेविलेल्या सैन्यांत जास्त प्रमाणानें असतात हें वर सांगितलेंच आहे. यामुळें अर्वाचीन काळीं अशा सैन्याला फार महत्त्व आलेलें आहे. नागरिक सैन्यापेक्षां ठेविलेलें सैन्य हें बहुधा जास्त चांगलें असतें हें सर्व इतिहासावरून सिद्ध होतें. फिलीप व शिकंदर बादशहा यांचे विजय हे या सैन्याचाच प्रभाव होत. कार्थेज व रोममधील लढाईत हेंच दिसून येतें. कार्थेजचें सैन्य ठेविलेलें होतें व रोमचें सैन्य नागरिक होतें. परंतु लढाई पुष्कळ काळपर्यंत चालू राहिली म्हणजे सरावानें नागरिक सैन्यही भाडोत्री सैन्याच्या बरोबरीचें बनतें. लोकसत्तात्मक राज्यांना सैन्य कायम ठेवण्याची भीति वाटते; कारण त्यायोगें आपलें स्वातंत्र्य नष्ट होईल अशी त्यांना धास्ती वाटते. परंतु जर शिपायांना शांतता राखण्यांत फायदा असला तर प्रजेच्या स्वातंत्र्यरक्षणास यासारखा दुसरा उत्तम उपाय नाहीं. कारण कायमचें सैन्य असलें म्हणजे सरकारला लोकांच्या थोड्या फार असंतोषाकडे दुर्लक्ष केलें तरी चालतें. कारण हा असंतोष भाषणद्वारां व लेखनद्वारां विरून जातो. परंतु असें सैन्य नसल्यास सरकारला असंतोषाच्या बारीक प्रदर्शनाकडे लक्ष देऊन लोकांना कडक शिक्षा करावी लागते.

या कायम सैन्याच्या पद्धतीनें एखाद्या राष्ट्राला तावडतोब सुधारणेच्या वरच्या पायरीवर आणतां येतें. **पीटर धी ग्रेट** यानें थोड्या काळांत रशियामध्यें जी सुधारणा घडवून आणली ती या सैन्याच्या योगानें होय. कारण, त्याला देशांत शांतता ठेवितां आली, व त्यायोगें आपल्या शहाणपणाच्या कायद्यांची अम्मलबजावणी करतां आली.

बंदुकादि अस्त्रांच्या शोधानें युद्धकलेंत मोठी क्रांति केली आहे व सैन्य ठेवणें हें फार खर्चाचें काम झालें आहे. पूर्वीच्या युद्धपद्धतींत जास्त सुधारलेल्या

राष्ट्रांतील लोकांचा रानटी स्थितींतील लोकांच्या हल्ल्यापुढें टिकाव लागणें कठिण असे. कारण, कंटकपणा, शौर्य इत्यादि गुण रानटी लोकांतच जास्त असतात. परन्तु अर्वाचीन काळीं सैन्य ठेवण्याचा खर्च रानटी व गरीब राष्ट्रांना करतां येत नाहीं. यामुळें अशा राष्ट्रांचाच सुधारलेल्या राष्ट्रांपुढें टिकाव निघत नाहीं.

सरकारचें दुसरें कर्तव्यकर्म म्हणजे समाजांतील व्यक्तींना न्याय देणें हें होय. खासगी व्यक्तीच्या जुलुमापासून व अन्यायापासून जीवित व मालमत्ता यांचें रक्षण करणें हें कर्तव्यकर्महो समाजाच्या निरनिराळ्या अवस्थांमध्यें कमी अधिक खर्चाचें होत असतें.

मृगयावृत्ति समाजांत थोड्या दिवसांच्या सामग्रीपलीकडे फारशा मालमत्तेचा संचय मनुष्याजवळ नसतो. या काळीं एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याची कागाळी त्याच्या शरीरावर हल्ला करून किंवा त्याच्या मनाला लागेल असें बोलूनच करूं शकतो. या कागाळीपासून मत्सर किंवा द्वेष या दोन मनोविकारांच्या तृप्ती-खेरीज त्याला दुसरा कांहीं एक दृश्य फायदा होत नाहीं. परन्तु हे मनोविकार कधीं काळींच उद्भूत होण्याचा संभव असतो; व ज्याचा तो प्रतिकार करण्यास समर्थ असतो, झणून या काळीं न्यायाधीशाची जरूरीच पडत नाहीं. परंतु मालमत्तेच्या वाढीबरोबर व संचयाबरोबर महत्त्वाकांक्षा, लोभ, सुखाची आवड, श्रमाचा कंटाळा वगैरे मनोविकार प्रबळ होऊन दुसऱ्याची मालमत्ता अन्यायानें घेण्याची प्रवृत्ति होते. अशी स्थिति उत्पन्न झाली म्हणजे न्यायाधीश व न्याय-खातें यांची आवश्यकता उत्पन्न होते. परंतु न्यायव्यवस्था सुरू होण्यास व मनुष्यांना ती प्रिय होण्यास मनुष्यांमध्यें एक प्रकारची दुसऱ्याच्या ताबेदारींत राहण्याची संवय लागते व खालील चार कारणांनीं मालमत्तेच्या वाढीबरोबर मनुष्यामध्यें अधिकार व ताबेदारी हे गुण प्रादुर्भूत होऊं लागतात.

सामर्थ्य, सौंदर्य, चपलता, शहाणपण, दूरदर्शीपणा, न्यायीपणा इत्यादि शारीरिक व मानसिक गुण यांबद्दल सर्व काळीं आदरबुद्धि उत्पन्न होते. ज्या माणसामध्यें असे गुण असतात त्या माणसाचें वजन व छाप समाजावर बसल्या-खेरीज रहात नाहीं. दुसऱ्या सर्व गोष्टी समान असतांना वय आदर व अधिकार उत्पन्न करतें. संपत्ति ही ताबेदारी उत्पन्न करणारी मोठी शक्ति आहे. गोपाल-वृत्तीमध्यें ज्या मनुष्याजवळ गुराढोरांचा मोठा कळप असतो त्या मनुष्याला आ-

पल्या उत्पन्नाचा खर्च करण्याचा मार्ग म्हणजे पुष्कळसे आश्रित पदरीं बाळगणें हाच होय. हे आश्रित स्वाभाविकच आपल्या यजमानाचा अधिकार मानतात. यामुळें अशा समाजांत श्रीमंत मनुष्य हा स्वाभाविकपणें पुष्कळांचा नायक व न्यायाधीशही होतो. जर आश्रितांमध्यें कांहीं तंटाभांडण झालें तर तें भांडण हा नायक मिटवितो. ताबेदारीचें चवथें कारण जन्म होय. परन्तु या वेळीं नागरिकांमध्यें आधींच असमता उत्पन्न झाली आहे असें तेथें गृहीत धरलें जातें. ज्या ठिकाणीं मालमत्ता नाहीं तेथें वंशतत्वाला मुळींच महत्त्व नसतें. मृगयावृत्ति समाजांत वंशाला कांहींच किंमत नसते. परन्तु एकदां एखादें घराणें श्रीमंत व मोठें झालें म्हणजे त्यांतील वंशजांना मान मिळतो. कारण, त्या घराण्याला मान द्यावयाची लोकांना संवय झालेली असते. परन्तु लोक एखाद्या उपटसुंभ मोठ्या माणसाची आज्ञा पाळावयास तयार नसतात; परंतु उच्च कुळांत जन्मलेल्याची आज्ञा ते आनंदानें पाळतात. तेव्हां वंश व संपत्ति हीं लोकांवर छाप व अधिकार बसविणारीं महत्त्वाचीं कारणें होत. व यामुळें एका घराण्यांत नायकत्व राहूं लागतें. असा नायक हा त्या टोळीचा स्वाभाविक न्यायाधीश होतो.

परन्तु त्या काळीं न्याय करणें हें काम राजाला खर्चाचें नसतें, तर उलट ती एक उत्पन्नाची बाब असते. जो मनुष्य राजाकडे तंटा घेऊन येतो त्याला तंट्याचा निकाल करण्याच्या त्रासाबद्दल राजाला नजराणा द्यावा लागतो. पुढें पुढें राजाच या त्रासाबद्दल हक्कानें नजराणा मागतो. याप्रमाणें न्याय करणें ही राजाला एक उत्पन्नाची बाब होते. परंतु या पद्धतीपासून अनिष्ट परिणाम होतो. कारण, ज्याच्याकडून जास्त मोठा नजराणा मिळेल, त्याच्या बाजूचा निकाल मिळण्याचा संभव असतो. पुढें राजा हा आपला अधिकार बहुधा एका प्रतिनिधीच्या मार्फत चालवितो. हा न्यायाधीश आपण नजराणा घेऊन निकाल देऊं लागला म्हणजे पुढें राजाकडे दाद मागतां येते. परन्तु येथेंही नजराण्याच्या पद्धतीनें फार भ्रष्टाकार होतो. कृषिवृत्तिसमाजांत राजा आपल्या खासगी मालमत्तेच्या उत्पन्नावर राहतो. व दिवाणी खटल्यांतील नजराणा ही त्याची एक उत्पन्नाची बाब होते. परन्तु पुढल्या स्थितींत संरक्षणाचा खर्च वाढतो व मग राजाला कर बसवावे लागतात. तेव्हांपासून न्यायाधीशांना स्वतंत्र पगार मिळूं लागतो व मग खासगी व्यक्तींना न्याय पुष्कळ कमी खर्चात मिळतो. मात्र वकील, कोर्टांतील कारकून

यांचा खर्च पक्षकारांना करावा लागतो. परन्तु न्यायखात्याचा सगळा खर्च पक्षकारांकडून घेतल्या जाणाऱ्या स्टँपांतून भागवितां येतो. यामुळें बहुतेक समाजांत न्याय देण्याचें कर्तव्यकर्म हें म्हणण्यासारखें खर्चाचें काम नसतें.

ज्या सार्वजनिक संस्था व कामें खाजगी व्यक्ति किंवा व्यक्तिसमूह यांच्या शक्तीबाहेर असून त्यांत नफा होण्यासारखा नसल्यामुळें त्यांच्याकडून हातीं घेतलीं जाण्याचा संभव नाहीं, अशा संस्था व कामें हातीं घेणें हें सरकारचें तिसरें कर्तव्यकर्म आहे. हीं कामें तीन प्रकारचीं आहेत.

१ समाजाच्या व्यापारास उत्तेजन देणाऱ्या संस्था व कामें.

२ तरुणांच्या शिक्षणाकरितां संस्था.

३ सर्व वयाच्या लोकांच्या शिक्षणाकरितां संस्था.

पहिल्याचे दोन भाग आहेत. एक साधारण व्यापारांना उपयोगी पडणाऱ्या संस्था व कामें. दुसरा, विशेष धंद्यांना व व्यापारांना उपयोगी पडणारीं कामें. सामान्यतः सर्व व्यापाराच्या उपयोगी पडणारीं कामें म्हणजे रस्ते, पूल, कालवे, बंदरें वगैरे होत. या कामांचा उपयोग देशांतील व्यापाराच्या विस्तारावर अवलंबून आहे. जितका जितका व्यापार मोठा, तितका तितका या कामाची दुरुस्ती ठेवण्याचा खर्च जास्त. हीं कामें करण्याचा व तीं दुरुस्त ठेवण्याचा उत्तम मार्ग म्हणजे या कामावरील जकातीचें उत्पन्न होय. सरकारच्या सामान्य उत्पन्नांतून हीं कामें करण्याची गरज नाहीं. या जकातीं एका बोर्डाच्या हवालीं कराव्या. दुरुस्तीला लागणाऱ्या खर्चास पुरे इतक्याच त्या असाव्या. दुरुस्तीला लागणाऱ्या खर्चापलीकडे उत्पन्नाची बाब म्हणून त्यांचा उपयोग करूं नये. या योजनेनें व्यापाराच्या मानानें असल्या कामावर किती खर्च करावा हें सहज समजतें. माल नेणाऱ्याआणणाऱ्यांकडून ही जकात प्रथमदर्शनीं घेतली जाईल. परंतु वस्तुतः ती मालाच्या उपभोक्त्यांकडून मिळेल. मालाच्या उपभोक्त्यांवर या जकातीचा फाजील बोजा होणार नाहीं. कारण दळणवळणाच्या साधनांनीं माल स्वस्त होतो व माल स्वस्त झाल्यानें जो पैसा उपभोक्त्यांचा वांचतो, त्यांतलाच एक अंश ते जकातीच्या रूपानें देतात. चैनीच्या सुंदर गाड्या, जलद चालणाऱ्या टपालाच्या गाड्या यांवर जकात थोडी जास्त असावी, म्हणजे सामान्य लोकांपेक्षां श्रीमंत लोकांकडून सरकारला जास्त मदत होते. हीं साधनें चालू ठेवण्यास

जकातींच्या रूपाची पद्धत न्यायाची आहे.

इंग्लंडमध्यें कांहीं कालवे खाजगी व्यक्तींच्या मालकीचे असत व ते कालवे दुरुस्त ठेवणें हें त्यांच्या हिताचेंच असे. नाहीं तर कालव्यापासून येणारें उत्पन्न कमी होई. अशा कामाची व्यवस्था खाजगी लोकांकडे असणेंच इष्ट आहे. परंतु रस्त्यावरील जकाती मात्र खाजगी व्यक्तींच्या हातीं नसाव्या. कारण या खासगी व्यक्ती रस्ते दुरुस्त ठेवणार नाहींत व तरीसुद्धां जकातीच्या उत्पन्नांत फारसा फेर राहणार नाहीं.

फ्रान्समध्यें रस्त्यांची व्यवस्था सरकारी अंमलदारांच्या हातीं असे व त्याचा खर्च सरकारी तिजोरींतून होत असे. यामुळें ज्या रस्त्यांवरून राजा व सरदार-मंडळी जाण्याचा संभव असे, तेवढे रस्ते उत्तम तऱ्हेनें ठेविलेले असत. परंतु बाकीच्यांची अगदीं हयगय होत असे.

कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, जकातीची पद्धति ही एक सरकारचीं उत्पन्नाची बाब करतां येईल. परंतु खालीं निर्दिष्ट केलेल्या कारणांकरितां तसें करणें इष्ट नाहीं.

१ जर जकाती ही उत्पन्नाची बाब केली तर राजाला या जकाती वाढविण्याचा केव्हांही मोह उत्पन्न होण्याचा संभव आहे. कारण या उपायानें वसुलाकरितां एक पैचाही खर्च न वाढवितां सरकारचें उत्पन्न वाढवितां येईल. परंतु या जकातीच्या वाढीचा अवश्यक परिणाम असा होईल कीं, मालाच्या किंमती वाढतील व त्यामुळें देशांतील व्यापाराचें नुकसान होईल.

२ रस्त्यावरून वाहून नेलेल्या मालाच्या वजनाच्या प्रमाणानुरूप जकाती रस्त्याच्या दुरुस्तीच्या खर्चासंबंधीं न्याय्य व रास्त होतील; तरी पण कराच्या बाबी या नात्यानें जकाती या फार अन्यायाच्या होतील. त्यांच्या योगानें गरिबांवर कराचें फाजील ओझें पडेल. कारण जाडाभरडा व वजनांत भारी असलेला माल गरीब लोक वापरतात. अर्थात् यामुळें श्रीमंत लोक आपल्या शक्तीप्रमाणें कर देणार नाहींत.

राजा किंवा सरकार जकात घेऊनसुद्धां या उत्पन्नाचा दुसरीकडे उपयोग करण्याच्या बुद्धीनें रस्ते व कालवे दुरुस्त ठेवणार नाहींत व लोकांना दाद मागण्यास कांहीं एक मार्ग राहणार नाहीं.

तेव्हां जकात ही सरकारची उत्पन्नाची बाब करणें अगदीं अनिष्ट आहे. शिवाय रस्त्याचें वगैरे काम बोर्डासारख्या सार्वजनिक परंतु सरकारी नव्हे अशा संस्थेकडे देणें चांगलें, म्हणजे या कामाची हयगय झाल्यास लोकांना दाद मागण्याचा एक मार्ग खुला राहतो.

दुसरें, व्यापाराच्या विशेष शाखांच्या उत्तेजनार्थ सरकारला कांहीं कामें व संस्था चालवाव्या लागतात. उदाहरणार्थ, रानटी व सुधारलेल्या राष्ट्रांशीं व्यापार करतांना व्यापाऱ्यांचें विशेष तऱ्हेनें संरक्षण करावें लागतें. आफ्रिकेंतील व्यापार करणाऱ्या कंपन्यांना आपल्या ठिकाणांना किल्ल्याचें रूप द्यावें लागत असे; त्याच मुद्यावर ईस्ट इंडिया कंपनीला प्रथम किल्ले बांधण्याची व सैन्य ठेवण्याची परवानगी मिळाली होती. व्यापाऱ्यांच्या संरक्षणाकरितांच परदेशीं कायमचा वकील ठेवण्याची पद्धति सुरू झाली. व परदेशाशीं व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या संरक्षणाकरितां आरमारें ठेवण्याचें व समुद्रावरील चांचेपणा बंद करण्याचें काम सरकार करूं लागलें. त्याचकरितां आयात मालावर जकाती घेण्याची सुरवात झाली. तेव्हां व्यापाराच्या विशेष शाखेच्या उपयोगाकरितां कराव्या लागणाऱ्या कामांबद्दलचा खर्च त्या शाखेच्या व्यापाऱ्यांवर फी ठेवून भागवितां येईल किंवा त्या शाखेच्या व्यापारी मालावर जकात बसवूनही भागवितां येईल. सारांश, ज्या ज्या विशेष वर्गांना त्या संस्थांचा फायदा होतो, त्या त्या वर्गांकडून त्यांचा खर्च घेणें हें सामान्य तत्व येथेंही लागू पडतें; म्हणून सरकारचें हें कर्तव्यकर्म चालविण्याकरितां सर्व लोकांवर सरसहा कर ठेवण्याचें कारण नाहीं.

**ॲडाम स्मिथनें** यापुढें निरनिराळ्या देशांशीं व्यापार करणाऱ्या कंपन्यांचे प्रकार व त्यांच्या जयापजयाचीं कारणें व इतिहास यांचा सविस्तर विचार केला आहे. परन्तु त्यापैकीं तात्विक व कायमच्या उपयोगाच्या गोष्टींचा उल्लेख मागील एका पुस्तकांत केला आहे. तेव्हां येथें त्याची पुनरावृत्ति करण्याचें प्रयोजन नाहीं.

सरकारच्या तिसऱ्या कर्तव्यापैकीं बाकी राहिलेल्या भागांत शिक्षणसंस्थांचा व धार्मिक संस्थांचा खर्च येतो. तरुणांना शिक्षण देणाऱ्या संस्था म्हणजे शाळा, कॉलेजें व युनिव्हर्सिट्या होत. या संस्था खासगी व्यक्तींकडून चालणें शक्य नसल्यामुळें त्या सरकारनें हातीं घेतल्या पाहिजेत, असें **ॲडाम स्मिथचें** म्हणणें आहे. मात्र या संस्थांचा चालू खर्च या संस्थांचा फायदा घेणाऱ्या व्यक्तींकडून

फीच्या रूपानें घेणें इष्ट आहे, असें **ॲडाम स्मिथचें** मत आहे. यांपैकीं पुष्कळ संस्था खासगी व्यक्तींच्या मोठमोठ्या देणग्यांच्या व्याजांतून व उत्पन्नांतून चाललेल्या आहेत. तेव्हां या बाबतींत सरकारला फारसा पैसा खर्च करण्याचें कारण नाहीं, हें **ॲडाम स्मिथचें** मत इंग्लंडच्या अनुभवावरून झालेलें होतें. परंतु हल्लींच्या काळीं यासंबंधीं सुधारलेल्या देशांच्या मतांत फार अंतर पडलेलें आहे. सर्व प्रकारच्या शिक्षणाला सरकारनें आपल्या सामान्य उत्पन्नांतून पुष्कळच मदत केली पाहिजे व फीचें उत्पन्न हा एक या खर्चापैकीं गौण भाग समजला पाहिजे, म्हणजे शिक्षण होतां होईल तितकें स्वस्त केलें पाहिजे व प्राथमिक शिक्षण तर मोफतच केलें पाहिजे, असें सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें लोकमत आहे. **ॲडाम स्मिथचें** या बाबतींतील मत आतां अग्राह्य ठरलेलें आहे. याच भागांत त्यानें आपल्या वेळच्या उच्च शिक्षणाचा उदय व वाढ कशी झाली वगैरेबद्दलचा सुंदर इतिहास दिला आहे. परन्तु त्याचें येथें सविस्तर विवेचन करण्याचें प्रयोजन नाहीं. तरी पण सामान्य लोकांना सामान्य शिक्षण देण्याची व्यवस्था करणें हें अत्यंत अवश्य आहे; कारण या मुलांच्या आईबापांना सुखवस्तु लोकांप्रमाणें शिक्षणाची किंमत कळत नाहीं. हें मत **ॲडाम स्मिथनें** स्पष्टपणें सांगितलें आहे. याकरितां सरकारनें प्रत्येक खेडेगांवांत प्राथमिक शिक्षणाची शाळा स्थापून लोकांना आपलीं मुलें शाळेंत पाठविण्यास उत्तेजन द्यावें व मुलांना शिक्षणाची गोडी लागण्याकरितां शिकलेल्या मुलांना कांहीं एक मानाचें चिन्ह द्यावें किंवा अप्रत्यक्ष रीतीनें सरकारनें सक्तीही करावी. कोणत्याही माणसानें स्वतंत्र धंदा करूं लागण्यापूर्वीं सामान्य शिक्षण मिळविल्याचा दाखला मिळविला पाहिजे, असा सर्वसाधारण नियमही सरकारला करतां येईल. सारांश, या बाबतींत जरी **ॲडाम स्मिथनें** प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें असावें असें स्पष्टपणें म्हटलें नाहीं, तरी याच मताचा ध्वनि त्याच्या लेखांत आहे व हल्लींच्या अर्थशास्त्राप्रमाणें या शिक्षणाचें महत्त्व त्याला अवगत होतें यांत शंका नाहीं.

सरकारच्या तिसऱ्या कर्तव्यकर्मांपैकीं शेवटला भाग म्हणजे धार्मिक संस्था चालविणें होय. ज्याप्रमाणें **ॲडाम स्मिथनें** दुसऱ्या भागांत युरोपांतील शिक्षणसंस्थांच्या उदयाचा, वाढीचा व त्यांच्या तत्कालीन स्थितीचा इतिहास संकलित केला आहे, त्याचप्रमाणें या भागांत त्यानें युरोपांतील धार्मिक संस्थांचा

उदय, त्यांची वाढ व त्यांची तत्कालीन स्थिति यांबद्दलचा इतिहास दिला आहे. परंतु या इतिहासाचेंही येथें फारसें प्रयोजन नाहीं. म्हणून त्याचा गोषवारा येथें दिला नाहीं.

वर दिलेलीं सरकारचीं कर्तव्यकर्में पार पाडण्याकरितां सरकारला जो खर्च करावा लागतो तो कसा भागवावयाचा त्याचा येथपर्यंत विचार झाला. परंतु सरकारचा मुख्य प्रतिनिधि जो राजा त्याचाही दर्जा राहण्याकरितां देशाला खर्च पडतो. तेव्हां ही खर्चाची शेवटची बाब होय. हा खर्च राष्ट्राच्या वैभवाप्रमाणें त्याला शोभेसारखा असला पाहिजे हें उघड आहे.

समाजाचें संरक्षण करणें व त्यांतील मुख्य प्रतिनिधीचा मान राखणें या खर्चाच्या बाबी समाजांतील सर्व लोकांच्या फायद्याकरितां आहेत, म्हणून समाजांतील सर्व व्यक्तींनीं आपापल्या ऐपतीप्रमाणें या खर्चाकरितां कर दिले पाहिजेत हें रास्त आहे. न्याय देण्याच्या व्यवस्थेचा खर्चही सर्व समाजाकरितां आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. व म्हणून तोही सरकारच्या सामान्य उत्पन्नांतून घेण्यास हरकत नाहीं. परंतु या बाबतींत न्यायकोर्टांची पायरी चढणाऱ्या व्यक्तींना या न्यायव्यवस्थेचा विशेष फायदा होतो, म्हणून या खर्चाचा बराच भाग वादीप्रतिवादींकडून कोर्टफीच्या रूपानें घेण्यास हरकत नाहीं. फौजदारी खटल्यांत मात्र सरकारनें खर्च केला पाहिजे हें उघड आहे. जीं कामें विशेष ठिकाणच्या किंवा प्रांताच्या उपयोगाचीं आहेत, त्यांचा खर्च सर्व समाजांवर पडणें रास्त नाहीं. रस्ते, कालवे वगैरे कामें सर्व समाजाच्या उपयोगाचीं आहेत खरीं, तरी पण यांचा जे लोक प्रत्यक्ष उपयोग करतात त्यांनीं त्याचा खर्च सोसावा हें रास्त आहे. जकाती हा तो खर्च भागविण्यास उत्तम मार्ग आहे. तसेंच शिक्षणसंस्थांचा खर्चही फीमधून भागविणें एकंदरींत श्रेयस्कर आहे. परंतु सरकारच्या सर्व कर्तव्यकर्मांच्या पूर्ततेमध्यें कोठेंही खर्चाची नड आल्यास ती सरकारच्या सामान्य उत्पन्नांतून भागविली पाहिजे हें उघड आहे.

**ॲडाम स्मिथचें** सरकारच्या कर्तव्यकर्मांबद्दल व त्याप्रीत्यर्थ सरकारला पडणाऱ्या खर्चाबद्दलचें मत आम्ही थोड्या विस्तारानें येथें दिलें आहे. याचें कारण असें आहे कीं, **ॲडाम स्मिथ** हा अप्रतिबंध व्यापाराचा मोठा समर्थक असल्यामुळें सरकारच्या कर्तव्यांबद्दल त्याची कल्पना फार संकुचित होती असें मान-

ण्याचा सांप्रदाय आहे. परंतु वरील विवेचनावरून अॅडाम स्मिथची कल्पना सामान्य समज आहे तितकी संकुचित नाहीं असें दिसून आल्यावांचून राहणार नाहीं. अॅडाम स्मिथनें सरकारचीं कर्तव्यकर्में व्यावहारिक तऱ्हेनें दिलेलीं आहेत. अर्थात् सुधारलेल्या सरकारकडे पाहिलें म्हणजे त्या सरकारचीं प्रत्यक्ष सृष्टींत जीं जीं कर्तव्यकर्में दिसून येतात त्यांना शास्त्रीय किंवा तात्विक स्वरूप न देतां जशींच्या तशीं दिलीं आहेत. उदाहरणार्थ, प्रत्येक सरकारचें लष्करी आरमारी खातें असतें. पुढें न्याय व अम्मलबजावणी व पोलिसखातें; व नंतर शिक्षणखातें व धर्मखातें. शेवटीं सार्वजनिक कामाचें खातें व व्यापारी खातें. हीं सामान्यतः सरकारचीं कर्तव्यकर्में होतात. परन्तु ज्यांनीं राष्ट्रीय जमाखर्चाचें नवें शास्त्र बनविलें आहे, त्यांनीं सरकारच्या कर्तव्यकर्मांचें थोडें तात्विक व शास्त्रीयदृष्ट्या वर्गीकरण केलें आहे. अर्वाचीन काळीं सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें सरकारच्या कर्तव्यकर्मांची व्याप्ति बरीच वाढली आहे हें खरें, तरी पण त्या सर्वांचा समावेश पूर्वीच्या व्याख्येंत करतां येण्यासारखा आहे. म्हणजे त्या कर्तव्यांची मर्यादा वाढली इतकेंच. पुढील भागांत अर्वाचीन शास्त्रज्ञांनीं केलेल्या सरकारच्या कर्तव्यकर्मांच्या वर्गीकरणाचें विवेचन करूं.

---

# भाग तिसरा.

## सरकारचीं कर्तव्यकर्में.

मागील भागांत अॅडाम स्मिथच्या मताप्रमाणें सरकारचीं कर्तव्यकर्में कोणतीं व तीं पूर्ण करण्यास समाजाच्या निरनिराळ्या अवस्थांमध्यें किती व कसा खर्च लागतो याचा विचार केला. अॅडाम स्मिथच्या काळीं सरकारच्या कर्तव्यकर्मांची कल्पना फार संकुचित होती—फार कोती होती—असें नेहमीं म्हणण्यांत येतें. परन्तु मागील भागांतील विवेचनावरून ती कल्पना बरीच व्यापक आहे व हल्लींच्या काळीं सुधारलेलें सरकार ज्या ज्या गोष्टी हातांत घेतें त्या त्या सर्वांचा अन्तर्भाव अॅडाम स्मिथच्या कर्तव्यचतुष्टयांत करतां येईल, हें सहज

दिसून येईल. सरकारनें व्यापाराच्या कामांत ढवळाढवळ न करितां खुल्या व्यापाराचें तत्त्व स्वीकारावें असें जें मत ॲडाम स्मिथनें प्रतिपादन केलें, त्यावरून हा समज झालेला आहे. शिवाय त्याच्या सृष्टिविषयक एका धर्मकल्पनेमुळेंही असा समज झालेला आहे. त्याचे मतानें ईश्वरानें सृष्टीची व मानवी स्वभावाची अशीच रचना केली आहे कीं, प्रत्येक मनुष्याला आपलें हिताहित कळतें व स्वहित आणि परहित यांमध्यें कधीं विरोध नसतो. परन्तु असा विरोध जेथें असेल किंवा निदान व्यक्तींना सार्वजनिक काम करण्यास जेथें स्वहिताचा मोठा पाठिंबा नसेल तेथें सरकारनें हात घालणें अवश्य आहे, असें ॲडाम स्मिथनें प्रतिपादन केलें आहे. सुधारलेल्या देशांत सरकार ज्या ज्या गोष्टी हल्लीं हातीं घेतें त्यांचें त्यांचें समर्थन या मुद्यांवर करतां येईल.

परन्तु अर्वाचीन काळीं सरकारच्या कर्तव्यकर्मांचें वर्गीकरण निराळ्या पद्धतींवर केलें जातें. ॲडाम स्मिथच्या विवेचनाला कर्तव्यकर्मांचें वर्गीकरण म्हणण्यापेक्षां--ज्याला तर्कशास्त्रांत व्यक्तिगणन म्हणतात तसलें--व्यक्तिगणन म्हणणें जास्त सयुक्तिक होईल. वर्गीकरणामध्यें वस्तुसमुदायाचे गुणागमावरून पोटभेद पाडले जातात. तसा प्रयत्न ॲडाम स्मिथनें केला नाहीं; तर त्यानें एकामागून एक अशी सरकारच्या कर्तव्याची यादी दिली आहे. अर्वाचीन काळीं अर्थशास्त्रकारांनीं सरकारच्या कर्तव्यकर्मांचें शास्त्रीय वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

सरकारच्या कर्तव्यकर्मांचें वर्गीकरण सरकारपासून प्रजेला होणाऱ्या फायद्याच्या तत्त्वानुरूप केलें आहे व त्याप्रमाणें एकंदर कर्तव्यांचे चार पोटभेद होतात.

कर्तव्यांचा पहिला वर्ग--ज्या कर्तव्याच्या अंमलबजावणीपासून देशांतील सर्व प्रजेचा फायदा होतो तो कर्तव्याचा पहिला वर्ग होय. या वर्गामध्यें देशांतील अन्तर्बाह्य शांतता राखणें हें मुख्य कर्तव्य होय. म्हणजे देशांतील सर्व लोकांचें जीवित व मालमत्ता यांचें संरक्षण करणें हें तें कर्तव्यकर्म होय; हें साधण्याकरितां प्रत्येक सुधारलेल्या सरकारला सैन्य व फौजफांटा, आरमार, किल्ले, तटबंदी व पोलीस वगैरे संस्था लागतात. या सर्वांचा मुख्य उद्देश जीवित व मालमत्ता यांना सुरक्षितता आणणें होय. यापासून अमुक व्यक्तीचा फायदा व अमुक व्यक्तीचा नाहीं असा मुळींच प्रकार नाहीं. यापासून सर्व प्रजेला सामान्य फायदा होतो. याच वर्गांत दळणवळणाच्या साधनांचा, तसेंच प्राथमिक शिक्षण--सामा-

न्य व औद्योगिक-या दोन कर्तव्यांचा समावेश होतो. या दोन्ही गोष्टी सरकारनें हातीं घेतल्या पाहिजेत व शिक्षण तर सार्वत्रिक व सक्तीचें केलें पाहिजे, असें अर्वाचीन काळचें मत आहे. त्याचें कारण या गोष्टी प्रजेच्या सर्वसाधारण फायद्याच्या आहेत, व म्हणून त्या सरकारनें जीवित व मालमत्तेच्या संरक्षणाप्रमाणें आपल्या आद्य कर्तव्यांपैकीं समजल्या पाहिजेत. टांकसाळी व पैसा यांसंबंधाचें कर्तव्यकर्म, तसेंच एकंदर उद्योगधंद्यांवर नजर ठेवणें हेंहि या वर्गातच मोडतें.

कर्तव्यांचा दुसरा वर्ग–कांहीं सरकारी कृत्यांचा उपयोग कांहीं विशेष व्यक्तींनाच होतो खरा; तरी पण हा उपयोग सर्व सामान्यजनांना होतो असें धरलें जातें; कारण ज्या व्यक्तींना त्याचा उपयोग होतो त्यांना खर्च करण्याचें सामर्थ्य नसतें. अशा प्रकारचीं कृत्यें दुसऱ्या वर्गातल्या कर्तव्यकर्मांमध्यें मोडतात. उदाहरणार्थ, अनाथ व पंगू लोकांचे पालनपोषणाचीं अनाथालयें, आजाऱ्यांकरितां दवाखाने, वयातीत लोकांकरितां पेन्शनची व्यवस्था, गरीब मजुरांचा आजारीपणा, अपघात, वगैरेकरितां विमा उतरण्याची पद्धति; इत्यादि प्रकारचीं कर्तव्यकर्में सुधारलेलें सरकार अर्वाचीन काळीं अंगावर घेतें. या सर्वांच्या मुळाशीं हेंच तत्त्व आहे कीं, जरी या कर्तव्यापासून विशिष्ट व्यक्तींना–मग संख्येनें त्या पुष्कळ का असेनात—फायदा होत असला तरी सरकारनें हीं कामें हातीं घेतल्याखेरीज चालावयाचें नाहीं. कारण, ज्या विशिष्ट लोकांना यापासून फायदा होणार त्यांना आपण होऊन या गोष्टी करणें त्यांच्या सांपत्तिक सामर्थ्याच्या मर्यादेबाहेरचें आहे. करितां हीं कर्तव्यकर्में सार्वजनिकच समजलीं पाहिजेत व त्यांना लागणारा खर्च सरकारनें आपल्या उत्पन्नांतून केला पाहिजे.

कर्तव्यकर्मांचा तिसरा वर्ग—यामध्यें ज्या कृत्यांनीं कांहीं विशिष्ट व्यक्तींना फायदा होऊन सर्वसाधारण लोकांनाही त्याचा फायदा होतो, अशा कृत्यांचा समावेश होतो. म्हणजे सरकारच्या या कर्तव्यकर्मांच्या अंमलबजावणीनें व्यक्तींचा फायदा व सामान्य फायदा असें दुहेरी हित होतें. या वर्गामध्यें न्यायकोर्टांची व्यवस्था, ज्या ज्या ठिकाणीं एखादा विशिष्ट धर्म सरकारनें अंगीकारला आहे, तेथें तेथें त्या धर्मखात्याचा खर्च, पोस्ट व तारायंत्रखातें (हीं केव्हां केव्हां चवथ्या वर्गांतही धरलीं जातात.), हक्क-नोंदीची व्यवस्था, तसेंच कांहीं विशिष्ट धंदे व उद्योगांना दिलेल्या सवलती व बक्षिसें, या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष व

पहिला उपयोग कांहीं विशिष्ट व्यक्तींना होतो खरा; तरी पण त्याचा अप्रत्यक्ष व दुसरा उपयोग बहुजनसमाजाला होतो. उदाहरणार्थ, जरी न्यायकोर्टाचा प्रत्यक्ष उपयोग न्यायकोर्टाची पायरी चढणारांना होतो तरी न्यायाची व्यवस्था चोख असली म्हणजे एकंदर जीवित व मालमत्ता यांची सुरक्षितता वाढते व याचा फायदा सर्वत्रांनाच मिळतो. त्याप्रमाणें जरी उद्योगधंद्यांच्या संरक्षणानें प्रत्यक्षतः कांहीं कारखानदार व कांहीं व्यापारी इतक्या व्यक्तींनाच फायदा होतो, तरी एकंदर देशाची सांपत्तिक स्थिति सुधारल्यामुळें अप्रत्यक्ष रीतीनें सर्व लोकांचाच फायदा होतो.

कर्तव्यकर्मांचा चवथा वर्ग—यामध्यें सरकार जीं कृत्यें करतें त्यांचा उद्देश फक्त विशिष्ट व्यक्तींच्या फायद्याचा असतो किंवा सरकारला इतर कर्तव्यकर्में बजावतां यावीं म्हणून जें उत्पन्न पाहिजे असतें तें उत्पन्न मिळविण्याचा हेतु असतो. सरकार जे प्रत्यक्ष उद्योगधंदे हातीं घेतें त्यांचा यांत समावेश होतो. या धंद्यांच्या वस्तू ज्यांना पाहिजे असतात, त्यांनाच यापासून फायदा होतो. बाकीच्यांचा येथें संबंध येत नाहीं.

हल्लींचीं सुधारलेलीं सरकारें जीं जीं कामें हातीं घेतात त्या त्या कामांचा या कर्तव्यचतुष्टयामध्यें समावेश होतो, असें थोड्या बारकाईनें विचार केला म्हणजे दिसून आल्याखेरीज राहणार नाहीं.

आतां हीं कर्तव्यकर्में बजावण्याकरितां सरकारला पैसे लागतात. कारण यांतलीं शेवटल्याखेरीज बाकीचीं कर्तव्यकर्में म्हणजे बऱ्याच खर्चाचीं असतात. तेव्हां सरकारला हीं कर्तव्यकर्में बजावतां येण्याकरितां कायमच्या उत्पन्नाच्या बाबी लागतात. कारण हीं कर्तव्यकर्में कायम व सतत चालणारीं असतात. सरकारचीं कांहीं कर्तव्यकर्में यांमधूनच परंतु प्रसंगानें व आकस्मिक तऱ्हेनें उद्भवतात. जसें, लढाई किंवा एखाद्या शोधाकरितां लागणारा खर्च किंवा खानेसुमारीचा खर्च. तेव्हां सरकारलाही दोन तऱ्हांचा खर्च आहे. एक सततचा व नेहमींचा लागणारा खर्च, व एक आकस्मिक व प्रासंगिक कारणांनीं लागणारा खर्च. पहिल्या प्रकारचा खर्च सरकार बहुतेक कायमच्या व नेहमीं येणाऱ्या करांपासून्या उत्पन्नांतून भागवितें व दुसऱ्या प्रकारचा खर्च व एकंदर कर्तव्यांपैकीं उद्योगधंद्यांचा प्रारंभींचा खर्च सरकार कर्ज काढून भागवितें. तेव्हां या दोन्ही प्रकारच्या

उत्पन्नांचा विचार निरनिराळा करणें सोईचें आहे. म्हणून पुढल्या भागांत सरकारच्या कायमच्या उत्पन्नाच्या बाबींचा विचार करूं.

---

# भाग चवथा.

## सरकारच्या उत्पन्नाच्या बाबी.

अर्वाचीन काळीं सुधारलेल्या सरकारच्या उत्पन्नाच्या बाबींचे तीन वर्ग करतां येतील. पहिला व प्रमुख वर्ग करांचा होय; दुसरा फीचा होय; तिसरा किंमतीचा किंवा संपत्तीच्या विक्रीचा होय. सरकारच्या कर्तव्यकर्मांच्या अंमलबजावणीस लागणाऱ्या खर्चाकरितां-हीं कर्तव्यकर्मे प्रजेच्या फायद्याचींच असतात-सरकारी अधिकाऱ्यानें व्यक्तीकडून अगर व्यक्तिसमूहाकडून त्यांच्या संपत्तीपैकीं सक्तीनें घेतलेला हिस्सा अगर भाग म्हणजे कर होय. प्राप्तीवरील कर, जमिनीवरील कर मिठावरील कर, आयात मालावरील जकात, वगैरे प्रकारच्या सर्व उत्पन्नाच्या बाबी कर या सदरांत मोडतात. या सर्वांमध्यें सरकारी कर्तव्यकर्मांच्या अंमलबजावणीकरितां लागणाऱ्या खर्चाकरितां सक्तीनें व्यक्तीच्या संपत्तींतून एक भाग घेणें हा सामान्य गुण आहे. मग उत्पन्न काढण्याची तऱ्हा कोणतीही असो. प्राप्तीवरील कर हा ठरलेल्या प्राप्तीवरच्या प्रत्येक माणसाकडून रोख घेतला जातो. जमिनीवरील कर असाच जमिनदारांकडून रोख घेतला जातो. पूर्वकाळीं डोईपट्टी, म्हैसपट्टी, अशा प्रकारचे कर असत, ते असेच सक्तीनें घेतले जात असत. निरनिराळया आयात अगर निर्यात मालावर बसविलेल्या जकाती याही व्यापाऱ्यांकडून सक्तीनें वसूल केल्या जातात. परंतु या कराच्या निरनिराळया प्रकारांचा विचार पुढें येणारच आहे.

सरकारच्या उत्पन्नाची दुसरी बाब फीची होय. मागील भागांत सांगितलेंच आहे कीं, सरकारचीं कांहीं कर्तव्यकर्में विशिष्ट व्यक्तींच्या फायद्याचीं असतात. तेव्हां अशा कर्तव्यकर्मांच्या बजावणीस लागणारा खर्च त्या व्यक्तींकडून घेण्यांत यावा हें वाजवी आहे. ॲडाम स्मिथनें हें विशिष्ट व्यक्तिहिताचें तत्त्व पुष्कळ

गोष्टींना लागू केलें आहे. व अशा गोष्टींचा खर्च त्या त्या लोकांकडून घ्यावा असें त्याचें ह्मणणें होतें. त्याच्या मतें न्यायखात्याचा खर्च, रस्ते सडका यांचा खर्च, शिक्षणाचा खर्च, हे खर्च फी किंवा विशेष पट्टी यांतून भागवितां येतील. त्याकरितां सर्वसामान्य कर बसविण्याचें कारण नाहीं. परंतु अर्वाचीन काळीं एकंदर सामान्य कर बसविण्याकडे सरकारची प्रवृत्ति जास्त आहे. तरी पण कांहीं कांहीं उत्पन्नाच्या बाबी फीच्या वर्गांत येतात. दिवाणी कोर्टांचा पुष्कळ खर्च वादीप्रतिवादींकडून फीच्या रूपानें घेतला जातो. तसेंच कागद रजिष्टर करण्याची फी, वारसाच्या सरटीफिकिटाची फी, शिक्षणाकरितां घेतली जाणारी विद्यार्थ्यांची फी, वगैरे तऱ्हेच्या बाबी या वर्गांत मोडतात. या उत्पन्नाच्या प्रकाराचा हा विशेष आहे कीं, ही फी सरकार जें काम करतें, त्याच्या मोबदल्याबजा असतें. म्हणून तें काम करण्यास जितका खर्च येतो, तितकीच किंवा केव्हां त्यापेक्षां कमी फी ठेवण्यांत येते व या दृष्टीनें ही बाब करापासून भिन्न आहे.

उत्पन्नाची बाब ही किंमतीची होय. सरकार कांहीं संपत्ति उत्पन्न करीत असेल व इतर खाजगी व्यक्ति ज्याप्रमाणें आपला माल विकून उत्पन्न अगर नफा मिळवितात, त्याप्रमाणें सरकार खाजगी व्यक्तीप्रमाणेंच संपत्ती गिऱ्हाईकांना विकून त्यापासून उत्पन्न काढीत असेल. सरकार कांहीं कारखाने प्रत्यक्ष चालवीत असेल; तसेंच सरकार जमिनीचें मालक असेल व त्याबद्दल त्याला भाडें मिळत असेल; किंवा सरकारच्या मालकीचें जंगल असेल व त्याच्या विक्रीपासून सरकारला सालोसाल उत्पन्न मिळत असेल; तसेंच सरकार पाटबंधाऱ्याचीं कामें करून लोकांना पाणी देऊन त्यापासून उत्पन्न काढीत असेल; सरकारच्या मालकीच्या रेल्वे असतील व त्यांपासून सरकारला उत्पन्न होत असेल. सारांश, सरकार मालक अगर कारखानदार या नात्यानें जें उत्पन्न मिळवीत असेल, तें सर्व या सदरांत येतें.

पूर्वकाळीं या सदराला महत्त्व असे. युरोपांतील जहागिरीपद्धतीच्या काळीं राजाला कराची गरजच नसे. कारण त्याचा खर्च स्वतःच्या मालकीच्या जमिनीच्या खंडांतून भागे. शिवाय दुसऱ्याही सदरापासून राजाला उत्पन्न मिळे. परंतु सुधारलेल्या सर्व राष्ट्रांमध्यें दुसरे दोन्ही वर्ग कमी महत्त्वाचे झाले आहेत व सरकारची मुख्य उत्पन्नाची बाब ह्मणजे करच होय. तरी आतां या करांच्या निरनिराळ्या प्रकारांकडे वळूं.

करांचें वर्गीकरण निरनिराळया अर्थशास्त्रकारांनीं निरनिराळया तत्त्वांवर केलें आहे. **अॅडाम स्मिथनें** उत्पन्नाचे जे मुख्य तीन प्रकार त्यांवरून करांचें वर्गीकरण केलें आहे. १ जमिनीच्या खंडावरील कर, २ नफ्यावरील कर, ३ मजुरीवरील कर व ४ ज्या कराचा कोणत्याही विशेष उत्पन्नाशीं संबंध नाहीं अशा कराचा एक स्वतंत्र वर्ग त्यानें केला आहे. मिळून त्यानें करांचे चार वर्ग केले आहेत. परंतु या ग्रंथाच्या पहिल्या पुस्तकामध्यें सांगितल्याप्रमाणें हल्लीं उत्पन्नाचे चार वर्ग समजतात. शिवाय नफा, व्याज व मजुरी हे तीन उत्पन्नाचे प्रकार अर्थशास्त्र-दृष्टया भिन्नभिन्न असले तरी करांच्या दृष्टीनें त्यांत फरक नाहीं. यामुळें या उत्पन्नावर सरसहा कर बसविला जातो व यालाच प्राप्तीवरील कर म्हणतात. तेव्हां जरी **अॅडाम स्मिथचें** वर्गीकरण तात्विक दृष्टीनें ठीक असलें तरी त्याचा प्रत्यक्ष व्यवहारांत फारसा उपयोग नाहीं. याचें कारण निरनिराळया उत्पन्नाच्या प्रकारांवर पडणारे कर प्रत्यक्ष सृष्टींत फार थोडे आहेत. तेव्हां हें वर्गीकरण एका दृष्टीनें रिकामें राहतें. सरकारी जमाखर्चाच्या दृष्टीनें कराचा बोजा कोणावर किती पडतो हें पाहणें विशेष महत्त्वाचें आहे. व याच दृष्टीनें करांचें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हें जें वर्गीकरण केलेलें आहे तें जास्त उपयुक्त आहे.

प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर यांमध्यें दोन बाजूंनीं फरक दाखविला जातो. ज्या करांमध्यें कर देणारा व ज्यावर कराचा बोजा पडतो तो, अगर कर सहन करणारा या व्यक्ति एकच असतात तो प्रत्यक्ष कर होय. परंतु ज्या करामध्यें कर देणारा व कर सहन करणारा या व्यक्ति निरनिराळया असतात, तो अप्रत्यक्ष कर होय. दुसऱ्याही एका दृष्टीनें या दोहोंमध्यें फरक दाखविला जातो. प्रत्यक्ष कर हा पूर्वीं ठरलेल्या कांहीं एका विशिष्ट गुणावरून—जसे पदवी, मालमत्ता, उत्पन्न किंवा दर्जा—कांहीं ठरलेल्या परिमाणानें आकारला जातो. अर्थात् या कराचा आकार व आंकडा हा आधीं निश्चित असतो व अशा कर भरणारांची यादी असते व तो कर यादीप्रमाणें वसूल केला जातो. अप्रत्यक्ष कर हे पूर्वीं निश्चित करतां येत नाहींत. ते कांहीं भावाप्रमाणें कांहीं व्यवहार ठरविलेले असतात व ते कोष्टकांतील नियमानें वसूल केले जातात. जमिनीवरील कर, प्राप्तीवरील कर, मालमत्तेवरील कर, घरपट्टी, डोईपट्टी, कांहीं विशिष्ट वर्गावरील कर, विशिष्ट धंद्यांवरील कर, हे सर्व प्रत्यक्ष कराच्या वर्गांत येतात. हे कर ज्यांकडून वसूल

केले जातात त्यांच्यावर पडतात किंवा ते त्यांवर पडावे असा कर बसविणा-रांचा उद्देश तरी निदान असतो. आयात व निर्यात जकाती व अन्तर्जकाती या सर्व अप्रत्यक्ष कराच्या वर्गांत मोडतात. आयात मालावरील जकातींना आयात जकाती म्हणतात, निर्यात मालावरील जकातींना निर्यात जकाती म्हण-तात व देशांतच उत्पन्न झालेल्या व देशांतच खपणाऱ्या मालावरील जकातींना अन्तर्जकाती म्हणतात. या सर्व जकाती आयात व्यापारी, निर्यात व्यापारी व कारखानदार किंवा घाऊक व्यापारी प्रथमतः देतात खरे; तरी पण हा कर शेवटीं निरनिराळ्या प्रकारचा माल खरेदी करणाऱ्या गिऱ्हाइकांवर पडतो. म्हणूनच अशा करांना अप्रत्यक्ष कर म्हणतात. केव्हां केव्हां अमुक कर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आहे हें सांगणें फार कठिण आहे. कारण, चढाओढीनें कराचा बोजाही दुसऱ्यावर टाकण्याची सार्वत्रिक प्रवृत्ती असते. उदाहरणार्थ, जमिनी-वरील कर व घरांवरील कर, हे प्रत्यक्ष करामध्यें मोडतात खरे. तरी पण घर-वाल्याचा प्रयत्न कराच्या मानानें जास्त भाडें काढण्याचा असतो. म्हणजे आपल्या-वरील कराचा बोजा होतांहोईल तों भाडेकऱ्यांवर टाकण्याचा त्याचा प्रयत्न असतो. तसेंच जमिनीच्या भाड्याचा बोजा कुळांवर टाकण्याचा प्रयत्न जमिनीचा मालक करीत असतो. व कुळें अनन्यगतिक असलीं म्हणजे त्यांनाच असा नवा कर देणें भाग पडतें. परन्तु याप्रमाणें जरी विशिष्ट करासंबंधानें अडचण पडली तरी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर हें वर्गीकरण स्पष्ट आहे व तें उपयुक्तही आहे.

करांचें आणखीही पुष्कळ तऱ्हेनें वर्गीकरण केलेलें आहे. त्यांपैकीं भांडवला-वरील व उत्पन्नावरील कर हा भेद केव्हां केव्हां ध्यानांत ठेवण्यासारखा असतो. हा भेद त्याच्या नांवावरूनच स्पष्ट होत आहे. राष्ट्रीय जमाखर्ची शास्त्राचें एक तत्व असें आहे कीं, कर होतांहोईल तों भांडवलावर असूं नये. कारण, अशा करानें देशाचें भांडवलच कमी होतें व भांडवल वाढविण्याच्या प्रवृत्तीला धक्का बसतो. म्हणून ही गोष्ट देशाच्या अहिताची आहे.

वर सांगितलेंच आहे कीं, देशाच्या औद्योगिक व सांपत्तिक वाढीबरोबर सर-कारच्या उत्पन्नाचा तिसरा वर्ग थोडा कमी महत्त्वाचा होतो; कालेंकरून दुस-ऱ्याचेंही महत्त्व कमी होतें. व सर्व सुधारलेल्या देशांत करांना जास्त महत्त्व येतें. कांहीं कांहीं अर्थशास्त्री व मुत्सद्दी हे प्रत्यक्ष करांपेक्षां अप्रत्यक्ष करच जास्त

चांगले असें ह्मणतात. कारण, अप्रत्यक्ष कर हे वसूल करण्यास फार सोईचे असतात. शिवाय, अशा करांत सक्तीचा अंमल किंचित् कमी असतो; निदान तो लोकांच्या डोळ्यांपुढें तरी फार येत नाहीं. कारण, हा कर पदार्थांच्या वाढलेल्या किंमतीच्या रूपानें दिला जातो. शिवाय, कर द्यावयाचा नसल्यास कर बसलेला माल न घेतल्यानें आपल्याला करापासून आपली सुटका करून घेतां येते. या दृष्टीनें अप्रत्यक्ष कर हे सरकारला व प्रजेला असे दोघांनाही सोईस्कर असतात. यामुळें सुधारलेल्या सरकारची प्रवृत्ति या करांकडे बरीच आहे. परन्तु एकंदर उत्पन्नाच्या स्थितीचा विचार करण्यापूर्वी कराच्या तत्त्वांचा आतां विचार केला पाहिजे.

---

# भाग पांचवा.

## करांचीं तत्त्वें.

ज्याप्रमाणें ॲडाम स्मिथचें श्रमविभागाचें विवेचन एकदम सर्वमान्य झालें किंवा ज्याप्रमाणें त्याचें मजुरांच्या व नफ्याच्या विविधतेच्या कारणांचें विवेचनही एकदम पसंत झालें व पुढील अर्थशास्त्रकारांनीं ॲडाम स्मिथचें विवेचन बहुतेक त्याच्याच शब्दांनीं सांगितलें, त्याप्रमाणें कराच्या तत्वाच्या विवेचनाची गोष्ट आहे. ॲडाम स्मिथच्या पहिल्या तत्वाच्या अर्थाबद्दल मात्र पुष्कळ वाद माजून राहिलेला आहे. हा वाद ॲडाम स्मिथच्या ह्मणण्याच्या अर्थाबद्दल ह्मणण्यापेक्षां त्या म्हणण्यांत अन्तर्भूत झालेल्या परस्परविरोधी उपपत्तींच्या सयुक्तिकपणाबद्दल आहे.

कराचें पहिलें तत्व, कराची समता:—" प्रत्येक देशांतील प्रजाजनांनीं आपल्या सरकारच्या योगक्षेमाकरितां होतां होईल तों आपापल्या ऐपतीप्रमाणें कर दिला पाहिजे. अर्थात् सरकारच्या सुरक्षित छत्राखालीं आपल्याला ज्या उत्पन्नाचा उपभोग घेण्यास सांपडतो त्या उत्पन्नाच्या मानानें प्रत्येकानें कर दिला पाहिजे. सरकारचा खर्च हा एखाद्या संयुक्त मालमत्तेच्या व्यवस्थेसारखा आहे. त्या मालम-

तेमध्यें ज्याचा जितका हितसंबंध आहे, त्यानें तितक्यापुरता खर्च देणें अवश्य आहे. त्याचप्रमाणें एखाद्या सरकारच्या प्रजाजनांनींही करणें आवश्यक आहे. करांचें हें तत्त्व पाळलें नाहीं म्हणजे करामध्यें असमता आली असें म्हणतां येईल व हें तत्व पाळलें गेलें म्हणजे करामध्यें समता राहिली असें म्हणतां येईल."

ॲडाम स्मिथनें प्रतिपादन केलेल्या कराच्या पहिल्या तत्वाचा हा केन्द्रीभूत भाग आहे. परंतु आतां वादग्रस्त प्रश्न असा आहे कीं, समता कशावरून मोजावयाची ? यासंबंधानें अर्वाचीन काळीं तीन मीमांसा पुढें आलेल्या आहेत. कराची १ त्यागमीमांसा; २ सामर्थ्य-मीमांसा व ३ लाभ-मीमांसा.

( १ ) कराची त्यागमीमांसाः-प्रत्येक मनुष्य सरकारला कर देतो. यामध्यें तो कांहीं आत्मत्याग करीत असतो. तेव्हां हा त्याग सर्वांचा सारखा झाला पाहिजे, म्हणजे करामध्यें समता आली असें म्हणतां येईल. श्रीमंत माणसानें कांहीं-एक रक्कम सरकारला देण्यामध्यें त्याचा जितका आत्मत्याग होतो त्यापेक्षां किती तरी पटीनें जास्त त्याग गरीब मनुष्यास तितकीच रक्कम द्यावी लागल्यास करावा लागतो. म्हणून कर हा उत्पन्नाच्या मानानें वाढता पाहिजे, इतकेंच नाहीं तर मनुष्याच्या आवश्यकांना लागणारें उत्पन्न कराच्या मर्यादेंतून काढून टाकलें पाहिजे. याच मुद्यावर बहुतेक सर्व ठिकाणीं प्राप्तीवरील कर बसविण्याची मर्यादा असते; म्हणजे त्या मर्यादेखालील प्राप्तीवर कर ठेवीत नाहींत. तसेंच हा प्राप्तीचा कर वाढता असतो, म्हणजे कांहीं एका विशिष्ट प्राप्तीच्या वरच्या प्राप्तीवर कराचा दर जास्त ठेवलेला असतो. याच मुद्यावर सुधारलेल्या देशांत आयुष्यांतील आवश्यकांवर कर बसविणें गैर मानतात. कारण आयुष्याचीं आवश्यकें हीं गरीबांना व श्रीमंतांना सारखींच लागतात. परंतु यामुळें गरीब व श्रीमंत हे कर सारखाच देतात. अर्थात् अशा कराच्या पद्धतींत गरीबश्रीमंतांचा आत्मत्याग सारखा राहात नाहीं. परंतु कोणत्या करानें कोणत्या व्यक्तीचा किती आत्मत्याग होतो, हें समजणें फार कठिण आहे. कारण आत्मत्याग ही मानसिक गोष्ट आहे. यामुळें जरी या मीमांसेमध्यें तथ्यांश असला तरी तिचा पूर्णावलंब शक्य नसतो.

( २ ) कराची सामर्थ्यमीमांसा.-यामध्यें मनुष्याच्या उत्पन्नावरून त्याची ऐपत ठरविली जाते. ॲडाम स्मिथनें समतातत्वाचा हाच स्वाभाविक अर्थ घेतला आहे. या तत्वानुरूपही प्राप्तीवरील कराच्या मर्यादा त्यागमीमांसेप्रमाणेंच ठरतात.

ज्याचें उत्पन्न जास्त, त्याची कर देण्याची ऐपत जास्त हें उघड आहे. ह्मणून प्राप्तीवरील कर वाढता पाहिजे व कांहीं प्राप्ती करापासून मुक्त पाहिजे, असें या मीमांसेवरूनही होतें. त्यागमीमांसा व सामर्थ्यमीमांसा या परस्परसंलग्न आहेत. पहिली मनुष्याच्या अन्तःस्थितीकडे ह्मणजे मनाकडे पहाते; व दुसरी त्याच्या बहिःस्थितीकडे अगर उत्पन्नाकडे पहाते. पहिली, कर भरण्यापासून किती त्रास, किती स्वार्थत्याग व किती घस सोसावी लागते या मानसिक गोष्टींकडे पाहते, तर दुसरी मनुष्याजवळ कर भरण्यास किती पैसा किंवा किती उत्पन्न आहे याकडे पाहाते. दोन्ही मीमांसांमध्यें सत्याचा अंश आहे, तरी पण सामर्थ्यमीमांसा ही जास्त व्यवहार्य आहे. कारण मनुष्याचा आत्मत्याग शोधून काढण्यापेक्षां मनुष्याचें वार्षिक उत्पन्न किती आहे हें शोधून काढणें सोपें आहे. तरी ही मीमांसा सर्वतोपरी लागू केल्यानें पूर्ण समता साधेल असें मात्र नाहीं. उदाहरणार्थ, दोन माणसांचें उत्पन्न अगदीं सारखें असेल. परन्तु एक जर ब्रह्मचारी असला व दुसरा जर कुटुंबवत्सल असला तर कर देण्याचें दोघांचें सामर्थ्य सारखें नाहीं हें उघड होतें.

( ३ ) कराची लाभमीमांसा-सरकारचा मनुष्याला जितका जितका फायदा होतो त्या मानानें त्यानें सरकारला कर दिला पाहिजे, असें या मीमांसेचें ह्मणणें आहे. या दृष्टीनें ज्याअर्थी श्रीमंतापेक्षां गरीबाला सरकारचा जास्त फायदा होतो त्याअर्थी त्यानें श्रीमंतापेक्षां जास्त कर दिला पाहिजे असें होतें. परन्तु कांहीं लोक या तत्त्वापासून उलटच अनुमान काढतात. त्यांचें ह्मणणें असें कीं, खरोखरी श्रीमंताला सरकारचा उपयोग जास्त होतो. कारण त्याची मालमत्ता मोठी असते, शिवाय त्याचें जीवितही जास्त महत्त्वाचें असतें. या दोहोंची सुरक्षितता जर सरकार घडवून आणतें तर श्रीमंतांनाच सरकारपासून जास्त लाभ होतो. ह्मणून श्रीमंतांनीं गरिबांपेक्षां जास्त कर दिला पाहिजे. मागच्या भागांत सरकारच्या कर्तव्यकर्मांचा विचार करतांना या प्रजेच्या लाभाचेंच तत्त्व वर्गीकरणास घेतलें होतें. यावरून या तत्वांतही तथ्यांश आहे असें ह्मणणें प्राप्त आहे. याच मुद्यावर सरकार आपल्या कांहीं कर्तव्यकर्मांबद्दल फी घेतें. कारण या कर्तव्यकर्मांचा प्रत्यक्ष लाभ कांहीं विशिष्ट व्यक्तींनाच होतो. ज्या कर्तव्यकर्मांचा लाभ सर्वसाधारण प्रजाजनांस होतो, त्यासंबंधींच्या खर्चाकरितां सरसहा कर

सरकार घेतें. परन्तु प्रत्येक मनुष्याला सरकारच्या कर्तव्यकर्मापासून किती लाभ होतो हें मोजणें प्रत्येक करांत मनुष्याचा किती स्वार्थत्याग होतो हें मोजण्याइतकें अवघड आहे, व यामुळें ही मीमांसा सर्वस्वी व्यवहार्य नाहीं.

याप्रमाणें समतेच्या कसोटीसंबंधानें वरच्या तीन मीमांसा प्रतिपादन करण्यांत आलेल्या आहेत. यांपैकीं अमुकच सर्वस्वी खरी असें ह्मणणें रास्त होणार नाहीं. प्रत्येकींमध्यें थोडा फार सत्याचा अंश आहे. व्यवहार्यतेच्या दृष्टीनें कराची सामर्थ्यमीमांसा हीच सर्वांत चांगली आहे, यांत शंका नाहीं. कारण सामर्थ्याची कसोटी पुष्कळ अंशानें दृश्य व सहज लागू करतां येण्यासारखी आहे व यामुळें सुधारलेल्या देशांत या तत्त्वाचा अवलंब थोड्याफार अंशानें केला जातो.

कराचें दुसरें तत्त्व—कराची निश्चितताः-“कर भरण्याची वेळ, कर भरण्याची तऱ्हा, व कराची रकम, या सर्व गोष्टी कर भरणारास व दुसऱ्या प्रत्येक माणसास स्पष्टपणें व मुक्ररपणें ठाऊक पाहिजेत.” हें तत्त्व अगदीं स्पष्ट आहे. याचें रहस्य कराची निश्चितता व त्याची प्रसिद्धता यांमध्यें आहे. अमुक कर द्यावयाचा हें कर भरणारांस निश्चितपणें ठाऊक असलें म्हणजे सरकारी अमलदारांस जुलमजबरदस्ती करण्यास अवसर मिळत नाहीं. या तत्त्वाप्रमाणें किंमतीवरून ठरविल्या जाणाऱ्या आयात जकाती अनिश्चित होतात. आयात व्यापाऱ्याला आपल्याला काय जकात द्यावी लागेल हें माहित नसतें. यामुळें असा व्यापारी कस्टमखात्याच्या अंमलदाराच्या तावडींत सापडतो व अशामुळें लाचलुचपत होण्यास कारण होतें. जमिनीवरील दरवर्षी उत्पन्नाच्या मानानें ठरविला जाणारा कर प्रजेला फार त्रासदायक होतो; याचें कारण या तत्त्वाचें पालन होत नाहीं, हें होय. फ्रान्सच्या राज्यक्रांतीपूर्वी फ्रान्समध्यें जमिनीवरील हा कर वर्षास बदलणारा अनिश्चित कर होता. यामुळें शेतकऱ्यांवर सरकारी अंमलदारांस जुलूम करण्यास फार अवसर मिळे. या कराच्या अनिश्चिततेचा परिणाम संपत्त्युत्पादनावर फार अनिष्ट होतो.

कराचें तिसरें तत्त्व—कराचा सोईस्करपणाः-“कर भरण्यास सोईचें होईल अशा वेळीं व अशा रीतीनें कराची वसुली करावी.” हें तत्त्वही अगदीं स्पष्ट आहे. प्रजेला सोईस्कर होईल अशा रीतीनें कर वसूल करण्याचें तत्त्व सुराज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें चांगलें आहे, इतकेंच नाहीं तर अशा रीतीनें बसविलेल्या करापासून

उत्पन्नही जास्त होतें. या तत्वानुरूप अप्रत्यक्ष कर प्रत्यक्ष करापेक्षां सोईस्कर असें ठरतें व म्हणून सुधारलेल्या सरकारचा या कराकडे जास्त ओढा दिसून येतो. कारण अप्रत्यक्ष कर मनुष्याला फार सोईस्कर असतात. कारण हा कर एकदम एकरकमी द्यावा लागत नाहीं. तर तो अगदीं बारीक बारीक हप्त्यांनीं व पदार्थांच्या किंमतीच्या अंशभूत रीतीनें न कळत दिला जातो. अशी कर भरण्याची रीत सोईच्या तत्वास अनुसरून आहे हें उघड आहे.

करांचें चवथें तत्त्व कराची काटकसर. प्रत्येक कराची अशी योजना पाहिजे कीं, त्यापासून लोकांच्या खिशांतून बाहेर जाणारी रकम व सरकारच्या तिजोरींत येणारी रकम यांमध्यें होतां होईल तितकें कमी अंतर असावें. अर्थात् कर वसूल करण्याचा खर्च होतां होईल तितका काटकसरीनें व्हावा. कारण कराचा उद्देश सरकारला उत्पन्न मिळविण्याचा असतो. आतां एखादा कर वसूल करण्यास जर फार खर्च लागला तर लोकांच्या खिशांतून पुष्कळ पैसे जाऊन त्या मानानें सरकारच्या तिजोरींत फार रकम येत नाहीं. कांहीं कर या फार खर्चाच्या मुद्यावर वाईट ठरतात. उदाहरणार्थ, पायगाडीवरील कर. हा वसूल करण्यास फार खर्च लागेल व त्या मानानें त्याचें उत्पन्न होणार नाहीं, या मुद्यावर नुकताच मुंबई म्युनिसिपालिटीनें हा कर कमी केला.

करांचीं वरील चार तत्त्वें **अॅडाम स्मिथचीं** करांचीं तत्त्वें या नांवानें प्रसिद्ध आहेत. पुढील अर्थशास्त्रकारांनीं आणखीं कांहीं किरकोळ तत्त्वें सांगितलीं आहेत. त्यांचाही संग्रह येथें करणें वाजवी आहे. यांपैकीं कांहीं तत्त्वें हीं वरच्या तत्त्वांपासून निष्पन्न होतात असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सरकारला लागणाऱ्या एकंदर उत्पन्नाची रकम भाराभर अनुत्पादक बारीक बारीक करांपासून काढण्यापेक्षां थोड्याशा उत्पादक मोठ्या करापासून काढणें चांगलें, हें तत्त्व काटकसरीच्या तत्त्वाचेंच पर्यायभूत तत्त्व आहे. कारण या योगानें करवसुलीचा खर्च पुष्कळच कमी होतो. १८४६ सालापूर्वी इंग्लंडांतील आयात जकाती किती तरी भानगडीच्या व किती तरी पदार्थांवर होत्या. परंतु कराच्या व जकातीच्या पद्धतींतील हा गोंधळ, घोटाळा व विविधता **सर रॉबर्ट पील व ग्लॅड्स्टन** या दोन मुत्सद्यांनीं काढून टाकली, व इंग्लंडच्या कराच्या पद्धतीस सोपें व साधें स्वरूप आणलें.

तसेंच देशांतील कराची पद्धती अशी असावी कीं, वेळप्रसंग आल्यास फार खर्च न वाढवितां कराचें उत्पन्न वाढवितां यावें. प्राप्तीवरील कर अशा तऱ्हेचा असतो. तो कर पौंडाला अमुक पेन्स या दरानें ठरविलेला असतो. आतां वेळप्रसंगीं हा दर वाढविला म्हणजे झालें. हिंदुस्थानांतील मिठावरील कर अशा तऱ्हेचाच आहे. अधिक खर्च न वाढवितां या कराचें उत्पन्न पेनाच्या फटकाऱ्यासरसें वाढवितां येतें.

शेवटीं कराची एकंदर पद्धति अशी असावी कीं, सरकारच्या वाढत्या गरजांबरहुकूम कराचें उत्पन्न आपोआप वाढतें असावें. अप्रत्यक्ष करामध्यें हा गुण असतो. लोकांच्या भरभराटीबरोबर या कराचें उत्पन्न आपोआप वाढत जातें. अन्तर्जकातींची वाढ हें एक देशाच्या भरभराटीचें चिन्ह समजलें जातें.

आतां निरनिराळ्या प्रकारच्या करांचा लोकांवर बोजा कशा रीतीनें पडतो हें पहावयाचें राहिलें; करांच्या या संपातमीमांसेचा विचार पुढील भागांत करूं.

---

# भाग सहावा.

## कराची संपात-मीमांसा.

मागील भागांत करांच्या प्रसिद्ध तत्त्वांचा विचार झाला. एखाद्या देशांतील प्रजाजनांवर कराचा बोजा त्यांच्या ऐपतीप्रमाणें पडावा हें समतातत्त्वाचें रहस्य आहे. आतां ही समता कोणत्या गुणांत समजावयाची याबद्दल वाद असेल. परंतु कराचा बोजा अगर संपात देशांतील एका वर्गावर अत्यंत तर एका वर्गावर फारच कमी अगर मुळींच नाहीं, असा नसावा हें उघडच आहे. कारण संपात अशा तऱ्हेचा असला तर तो अगदीं अन्यायाचा होईल; तो समतेच्या तत्त्वाविरुद्ध होईल—मग त्या समतातत्त्वाचा अर्थ कांहींही करा—हेंही उघड आहे. फ्रान्सच्या प्रसिद्ध राज्यक्रांतीपूर्वी फ्रान्सच्या कराच्या पद्धतींत हाच मोठा दोष होता, कराचा बहुतेक सर्व भार शेतकरीवर्गावर पडे. हा वर्ग आधींच गरीब होता व त्यावरच कराचा संपात विशेष होता. सरकारी अंमलदार, सरदार-

लोक, बडेबडे धर्मोपदेशक, वगैरे श्रीमंत लोक करापासून बहुतेक मुक्त होते. ही अन्यायाची कराची पद्धति व त्यानें उत्पन्न झालेला असंतोष हें एक फ्रान्समधील राजक्रांतीचें महत्त्वाचें कारण होतें, असें इतिहासकार सांगतात. यावरून या कराची संपातमीमांसा किती महत्त्वाची होती हें दिसून येईल. परंतु ही मीमांसा जितकी महत्त्वाची आहे तितकीच ती कठीण, भानगडीची, घोंटाळयाची व म्हणून दुर्ज्ञेय आहे. कारण या मीमांसेमध्यें प्रत्येक कर शेवटीं समाजांतील कोणत्या व्यक्तीवर किंवा व्यक्तिसमूहावर पडतो हें पहावयाचें आहे. परंतु समाजांतील व्यवहार व त्याचे परस्परांवर होणारे परिणाम इतके विविध असतात कीं, एका कराचा परिणाम काय होतो व शेवटीं तो कोण भरतो हें सांगणें कठीण होतें. "एका पाण्याच्या थेंबाचा प्रवास" या गोष्टीप्रमाणेंच 'कराच्या एका रुपयाचा प्रवास' याचीही मजेदार गोष्ट होईल. परंतु ठोकळ तऱ्हेनें तरी करांचा हा संपात शोधून काढणें अवश्य आहे. कारण यायोगानेंच कराचीं तत्वें पाळलीं जात आहेत किंवा नाहींत हें समजून येणार आहे.

परंतु येथें अशी एक शंका निघण्याचा संभव आहे कीं, कराच्या संपाताची मीमांसा मुळींच कठीण नाहीं. कारण ज्याअर्थी करांचें वर्गीकरणच मुळीं या तत्वावर केलेलें आहे, त्या अर्थी कर कोणत्या वर्गांतील आहे हें ठरविलें कीं काम झालें. कारण ज्या करामध्यें कर देणारा व कर सोसणारा या व्यक्ति एकच असतात तो प्रत्यक्ष कर होय, अशी मागें प्रत्यक्ष कराची व्याख्या केली आहे. तेव्हां प्रत्यक्ष करामध्यें कर देणारावरच कराचा संपात आहे. अर्थात् प्रत्यक्ष कराचा बोजा कर देणारावरच पडतो हें उघड झालें. याच विचारसरणीप्रमाणें अप्रत्यक्ष कराचा संपात कर देणारावर न पडतां दुसऱ्या व्यक्तीवर पडतो हेंही उघड होतें. सकृद्दर्शनीं हा कोटिक्रम खरा वाटतो. परन्तु तो बरोबर नाहीं. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर हें वर्गीकरण कराच्या संपाताच्या तत्वाला अनुसरून केलेलें आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु या कराच्या वर्गीकरणामध्यें सरकारचा हेतु विशेष तऱ्हेनें दिसून येतो. मात्र वस्तुस्थिति तशीच बनते असें मात्र नाहीं. प्रत्यक्ष कराचा बोजा कर देणारावर पडावा अशी सरकारची इच्छा असते. याच हेतूनें तो कर बसविलेला असतो खरा. तरी अर्वाचीन काळच्या व्यवहाराच्या संकीर्ण स्वरूपामुळें तसें घडेलच असें नाहीं. उलटपक्षीं, अप्रत्यक्ष कर

कर देणारावर पडूं नयेत अशी सरकारची इच्छा असते खरी; परन्तु ती इच्छा सदासर्वदा परिपूर्ण होते असें मात्र नाहीं. सारांश, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हें वर्गीकरण सामान्यतः खरें असलें व तें जमाखर्चाच्या दृष्टीनें सोईचें असलें तरी त्यावरून कराची संपातमीमांसा पुरी होते असें कांहीं नाहीं. कर शेवटीं कोणत्या व्यक्तीवर किंवा व्यक्तिसमूहावर पडतो याची स्वतंत्र मीमांसा करणें जरूर असतें. कारण, प्रत्यक्ष-कराचें ओझेंही कांहीं परिस्थितींत दुसऱ्यावर टाकतां येतें, तर अप्रत्यक्ष करांचें ओझें केव्हां केव्हां कर देणारावरच पडतें. तेव्हां प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर हे वर्ग जरी सामान्यतः बरोबर असले तरी त्यावरून कराच्या प्रत्यक्ष संपाताची बरोबर कल्पना होणार नाहीं. याकरितां अर्थशास्त्री सुधारलेल्या देशांतील प्रमुख करांचीं उदाहरणें घेऊन कराच्या संपाताचा विचार करितात. तोच मार्ग येथें स्वीकारणें-रास्त होईल. परन्तु निरनिराळ्या करांच्या या विशिष्ट विचारांस लागण्यापूर्वीं एक सामान्य गोष्ट येथें सांगितली पाहिजे. ती ही कीं, ज्या देशांत संपत्तीची वांटणी रूढीनें व कायद्यानें ठरलेली असते त्या देशांत कराचा संपात फारसा बदलत नाहीं. तो बहुशः कर देणारावर पडतो. परन्तु जेथें संपत्तीची वांटणी पूर्ण चढाओढीनें ठरते तेथें कराच्या संपाताचा प्रश्न बिकट होतो. कारण, कर बसवितांना कायद्याचा उद्देश कांहींही असला तरी चढाओढीच्या अंमलांत तो हेतु बाजूसच राहून प्रत्यक्ष कराला अप्रत्यक्ष कराचें रूप येतें आणि अप्रत्यक्ष कराला प्रत्यक्ष कराचें रूप येतें. ज्याप्रमाणें अर्वाचीन काळीं मजुरी, नफा, व्याज व पदार्थांच्या किंमती यांच्या भावाच्या मुळाशीं कोणत्याना कोणत्या रूपांत मागणी व पुरवठा यांच्या नियमांचा संबंध येऊन त्या नियमांनुरूप हे भाव ठरतात, त्याचप्रमाणें कराच्या संपाताची गोष्ट आहे. ती ही कीं, संपात कांहीं एका स्वरूपाच्या मागणी व पुरवठा यांच्या नियमावर अवलंबून असतो. हें पुढील उदाहरणावरून सहज ध्यानांत येईल.

जमिनीवरील कर हे प्रत्यक्ष करांपैकीं आहेत. सामान्यतः हे कर जमीनदारावर पडतात. परन्तु केव्हां केव्हां हे कर दुसऱ्यावरही टाकले जातात. जमिनीवरील करांचे दोन वर्ग होतात. एक शेतकीच्या कामाला लाविलेल्या जमिनीवरील कर व एक घरें बांधावयाच्या कामाला लाविलेल्या जमिनीवरील कर. याच्याच जातीचा तिसरा कर म्हणजे घरपट्टी होय. आतां हे तिन्ही कर सामान्यतः जमिनीच्या

व घराच्या मालकावर पडावें अशी कायदे करणारांची इच्छा असते; परंतु सर्वत्र असाच या कराचा संपात होईल असें मात्र नाहीं. समजा, एका ठिकाणीं जमिनी-वर एक नवा कर बसविला किंवा पूर्वींचा कर वाढविला तर, तो कर जमीनदार लोक देतील; परन्तु ज्या ठिकाणीं जमीनधाऱ्याची पद्धति कायमची ठरलेली नाहीं तेथें जमीनदार लोक आपल्या उपरी कुळांकडून जास्त भाडें घेण्याचा प्रयत्न करतील व तेथलीं कुळें आयरिश कुळांप्रमाणें अनन्यगतिक असलीं व त्यांची जमीन लागवडीस मिळविण्याबद्दल फार चढाओढ असली तर हा जादा कर उपरी कुळांवरच पडेल. परन्तु कसणारे शेतकरी बऱ्या स्थितींत असले व जमीनदार-वर्गही मोठा असला तर त्यांना आपलीं भाडीं वाढवितां येणार नाहींत. कारण, भाडीं वाढविल्यास शेतकरी शेतें करण्यास खंडानें घेणार नाहींत. अशा परिस्थि-तींत जमिनीवरील कर जमीनदारांवरच कायद्याच्या उद्देशाप्रमाणें पडेल व तो खरोखरी प्रत्यक्ष करच राहील. परन्तु जमीनदार थोडे व एकवटलेले आणि कुळें अनन्यगतिक, गरीब व एकमेकांशीं चढाओढ करणारीं अशीं असलीं ह्मणजे या जमिनीवरील कराचा संपात कुळांवर पडेल. अर्थात् या कराला अप्रत्यक्ष करांचें स्वरूप प्राप्त होईल. तसेंच घरावरील घरपट्टी व जमीनपट्टी हेही प्रत्यक्ष कर आहेत व ते मालकावर पडतील. परन्तु घरें थोडीं व गरजवंत बिऱ्हाडकरू पुष्कळ अशी स्थिति असल्यास हा कर बिऱ्हाडकरांवर ढकलला जाईल; मग बिऱ्हाडकरांना जास्त भाडें देण्याचें सामर्थ्य नसल्यास त्यांना पूर्वीपेक्षां कमी सोयीचें घर घ्यावें लागेल. परन्तु घरवाले पुष्कळ असले व त्यांना भाडेकऱ्याची गरज असली ह्मणजे हा कर घरवाल्यांवरच पडेल. अर्थात् त्याचा संपात काय-द्याच्या हेतूप्रमाणें राहील. वरील दोन्हीतिन्ही उदाहरणांवरून कराच्या संपाताची मीमांसा ध्यानांत येईल. जेथें जेथें कर देणाराची मक्तेवाल्यासारखी स्थिति असेल तेथें तेथें त्याला कर दुसऱ्यावर टाकतां येईल. परंतु हा कर दुसऱ्यावर टाकल्यानें जर त्या वस्तूच्या मागणींत फरक होईल तर मग तो सर्वांशीं दुसऱ्यावर टाकतां येणार नाहीं.

प्राप्तीवरील कर सर्व प्रकारच्या प्राप्तीवर सरसहा असला ह्मणजे तो कर कर देणारावरच पडतो. तो दुसऱ्यावर ढकलणें शक्य नसतें. यामुळें हा कर प्रत्यक्ष करांपैकींच होतो. या कराच्या या स्थिरसंपातामुळें सर्व सुधारलेल्या

देशांत हा कर कायम ठेवण्याकडे प्रवृत्ति आहे. समतेच्या दृष्टीनें तो चांगला आहे. जरी कराच्या इतर तत्वांच्या दृष्टीनें तो तितका चांगला नाहीं, तरी पण तो सर्वांवर त्यांच्या ऐपतीच्या मानानें पडत असल्यामुळें हा कर एक चांगल्या करांपैकीं समजला जातो. बाकी हा निश्चित नसतो. या कराची आकारणी करण्यांत सरकारी अंमलदारास लाचलुचपतीला अवसर सांपडतो. आपल्यावर पुढल्या वर्षी किती कर बसेल याचा मनुष्यास अंदाज करतां येत नाहीं. तसेंच, हा कर अप्रत्यक्ष करांपेक्षां वसूल करण्यास व लोकांस देण्यास जास्त अवघड आहे. असे या करावर बरेच आक्षेप आहेत. तरी समतेच्या दृष्टीनें हा कर पुष्कळ वरच्या पायरीचा आहे. जुन्या व जुलमी पद्धतींत सुरू असलेले डोईपट्टीसारखे कर हे प्रत्यक्ष करांपैकींच आहेत. कराच्या संपाताच्या दृष्टीनें त्याचा संपात निश्चित असतो. तो दुसऱ्यावर ढकलतां येत नाहीं. परंतु हे कर कराच्या बाकीच्या तत्त्वांविरुद्ध आहेत. हे कर प्रजेला फार त्रासदायक आहेत. शिवाय हे कर वसुल करण्यास खर्चही जास्त लागतो. यामुळें सुधारलेल्या देशांतून हे दृष्टोत्पत्तीस येत नाहींत.

अप्रत्यक्ष करांपैकीं विचार करण्यासारखे प्रकार म्हणजे आयात जकात, निर्यात जकात आणि अन्तर्जकात. हे तिन्ही कर व्यापारी लोक प्रथमतः देतात खरे; तरी पण ते शेवटीं तो माल खरेदी करणारावरच पडण्याच्या हेतूनें बसविलेले असतात व सामान्यतः हें खरेंही आहे. परन्तु केव्हां केव्हां त्याचा दुसराच अनपेक्षित परिणाम घडतो. उदाहरणार्थ, एका आयात मालावर नवा कर बसविला; तर व्यापारी तितक्या मानानें त्या मालाची किंमत वाढवितील व जर तो माल आयुष्याच्या आवश्यकांपैकीं असेल व त्याची मागणी कमी होण्यासारखी नसेल तर हा कर हा माल वापरणारांवर पडेल हें उघड आहे. सामान्यतः आयात जकाती या देशांतील माल वापरणारांवरच पडतात. परन्तु मालाची किंमत वाढली म्हणजे त्याची मागणी कमी होते व यामुळें अशा करानें देशांत माल कमी येऊं लागेल किंवा परदेशांतील कारखानदारांना तो स्वस्त करावा लागेल. परन्तु परदेशचे व्यापारी प्रथमतः ज्या ठिकाणीं अशी आयात जकात नसेल तेथें आपला माल पाठवूं लागतील व त्यांना असा खुला बाजार मोकळा नसल्यास आपल्या नफ्यांत कमी करून ते माल थोडा स्वस्त करतील. अशा वेळीं कराचा थोडा अंश परकी व्यापारी देतील; परन्तु मुख्यत्वेंकरून आयात जका-

तीचा संपात देशांतील गिऱ्हाइकांवरच पडतो असें म्हणण्यास चिंता नाहीं. सुधारलेल्या देशांत कराचा महत्त्वाचा भाग अशा जकातींपासूनच उत्पन्न केला जातो. आतां निर्यात जकाती घ्या. एखाद्या बाहेर देशीं जाणाऱ्या मालावर जकात बसविली आहे असें समजा. आतां ज्याप्रमाणें आयात जकात देशांतील माल वापरणारांवर पडते, त्याप्रमाणें निर्यात जकात परदेशीं तो माल वापरणारांवर पडते असें सामान्यतः समजलें जातें. परन्तु असा परिणाम खात्रीनेंच होईल असें मात्र म्हणतां येत नाहीं. व्यापाऱ्याकडून ही जकात घेतली म्हणजे ते लोक त्या मालाची किंमत त्या मानानें वाढवितील. परन्तु दुसऱ्या देशांतील लोक या देशाचा माल न घेतां तसला माल दुसऱ्या देशांतून घेऊं लागतील. असें झालें म्हणजे या देशाच्या मालाचें गिऱ्हाईक कमी होईल. म्हणजे हा माल स्वस्त होईल. अर्थात् हा कर देशांतल्या कारखानदारांना द्यावा लागेल किंवा हे कारखाने देशांतून अजीबात नाहींसे होतील. परंतु निर्यात मालाचा त्या देशाला पूर्ण मक्ता असला व हा माल आयात करणाऱ्या देशाची मागणी लवचिक नसून ती दुसऱ्या तऱ्हेनें भागविण्यासारखी नसली तर ही मालाची वाढलेली किंमत परदेशचा माल वापरणारांवरच पडेल. परंतु निर्यात जकातीच्या योगानें देशांतील धंद्याला धक्का बसण्याचा पुष्कळ संभव आहे. यामुळें निर्यात जकाती परकी देशांवर पडतात, असें समजणें चुकीचें आहे.

वरील उदाहरणांवरून कराचा संपात शोधून काढणें हें बरेंच कठिण असतें हें दिसून येईल. अमुक कराचा संपात काय आहे, या प्रश्नाचें उत्तर तात्विक तऱ्हेनें देतां येणार नाहीं. हें देण्याकरितां त्या कराबद्दल व त्या देशाबद्दल विशिष्ट माहिती अवगत पाहिजे; तरच अशा प्रश्नाचें उत्तर देतां येईल.

येथें सरकारच्या उत्पन्नाच्या बाबींचा तात्विक विचार आटपला. आतां सरकारला प्रसंगीं जो खर्च लागतो, तो अर्वाचीन काळीं राष्ट्रीय कर्जानें भागवितात. तेव्हां आतां राष्ट्रीय कर्जाची मीमांसा काय आहे हें पाहिलें पाहिजे.

---

# भाग सातवा.

## राष्ट्रीय कर्ज.

आमच्या मराठेशाहींतील मुत्सद्दी, राज्याच्या जमाबंदी व जमाखर्ची बाबतींत बरेच प्रवीण होते. म्हणूनच मुसलमानी रियासतीपेक्षां मराठी रियासतीमध्यें या कामीं बराच व्यवस्थितपणा व पद्धतशीरपणा दिसून येतो, असें इंग्रज इतिहासकारांनींसुद्धां कबूल केलेलें आहे; परंतु याचें उत्कृष्ट प्रमाण म्हणजे इंग्रजी अंमलांतील वसुलीपद्धत इंग्रजांनीं पेशवाईच्या वेळच्या पद्धतीवरून उचलली हें होय. तालुका, जिल्हा व प्रांत हे जमाबंदी विभाग पेशवाईंतीलच आहेत. परंतु आमच्या ईस्ट-इंडिया-कंपनी-सरकारनें पेशवाईंतील दोन गोष्टी मात्र आपल्या पद्धतींतून काढून टाकिल्या. पहिली ग्रामसंस्था व दुसरी मिरासदारी. काळीचा वसूल करण्यांत पेशवाईंतल्या मुत्सद्यांनीं जुन्या ग्रामसंस्थेंत ढवळाढवळ केलेली नव्हती. गांवचे जुने सर्व अधिकारी कायम ठेविले होते. गांवच्या बंदोबस्ताबद्दलचे, गांवचे तंटे मिटाविण्याबद्दलचे, तसेंच गांवच्या सार्वजनिक हिताबद्दलचे सर्व प्रकारचे अधिकार त्या संस्थेकडेच ठेवून सरकारचा सारा वसूल करण्यांत याच अधिकाऱ्यांचा उपयोग पेशवाईंतील मुत्सद्यांनीं केला होता. शतकऱ्यांची जमिनीवरील पूर्ण मालकी कबूल करून त्यांचे मिरासदारीचे हक्क कायम ठेविले होते. परंतु या दोन्ही बाबतींत कंपनी सरकारनें नवीन धोरण सुरू केलें; म्हणजे गांवांतल्या प्रत्येक कुळाशीं स्वतंत्रपणें साऱ्याचा ठराव करून स्थानिक स्वराज्याचा मूळपाया जी ग्रामसंस्था ती नाहींशी केली व शेतकऱ्यांना निव्वळ जमीन कसणारीं कुळें बनवून त्यांचा मालकीहक्क नष्ट केला. पुण्याच्या पेशवाईच्या दफ्तरांचें कै० रा० ब० वाड यांनीं संशोधन केलें आहे. त्या दफ्तरांमध्यें पेशवाईंतील राष्ट्रीय जमाखर्चाच्या व्यवस्थितपणाचें निदर्शन करणारे कागदपत्र बरेच बाहेर येणार आहेत असें म्हणतात. आमच्या इंग्रज सरकारप्रमाणें जमाखर्चाचीं अंदाजपत्रकें वगैरे करण्याची त्या वेळीं पद्धत नसे खरी, तरी राजकीय जमाखर्चाचें तोंड मिळवण्याचें तत्त्व त्या काळच्या फडणिसांना व मुत्सद्यांना ठाऊक होतें असें दिसतें. इतकेंच नव्हे, तर ज्या ' राष्ट्रीय कर्जाच्या ' युरोपियन

पद्धतीचा साद्यंत इतिहास देण्याचें आम्हीं योजिलें आहे, त्या तऱ्हाचा बोजरूपानें पेशवाईत प्रारंभ झाला होता याला सबळ पुरावा आहे. म्हणूनच आम्ही पेशवाईतील जमाखर्चाच्या पद्धतीचा प्रारंभीं उल्लेख केला आहे. महाराष्ट्राची त्या वेळची स्थिति, या राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीच्या वाढीला अनुकूल नव्हती, म्हणून त्या पद्धतीचा प्रसार झाला नाहीं इतकेंच. पुढें मराठेशाही मोडकळीस येऊं लागून शेवटीं रावबाजींच्या कारकीर्दीत महाराष्ट्राचीं सर्व सूत्रें इंग्रजांच्या ताब्यांत आलीं व त्यांची राष्ट्रीय कर्जाची पद्धत सुरू झाली, हा इतिहास सर्वांना श्रुत आहेच. मराठेशाहींतील पहिल्या तीन चार पेशव्यांचा सर्व वेळ लढाया करण्यांत व नवीन मुलूख काबीज करण्यांत गेला; परन्तु लढाया करण्यास नेहमींचा जमाबंदी वसूल पुरा पडत नसल्यामुळें पेशव्यांना कर्ज करणें अवश्य होई. पहिल्या बाजीरावास ५० लाखांचे वर कर्ज झालें होतें असें सांगतात. सावकारांचे तगादे त्याचेमागें नेहमीं लागलेले असत. हें कर्ज त्यानें आपल्या खासगी पतीवर काढलेलें असे. नानासाहेबांसही असेंच पुष्कळ कर्ज होतें. थोरले माधवराव यांचा जीव आपण आपलें कर्ज फेडिलें नाहीं अशा हृद्रोगानें मरणकाळीं घुटमळत होता. जवळच्या मुत्सद्यांनीं कर्जाच्या फेडीबद्दल आपण काळजी करूं नये, आम्ही आपणास कर्जांत ठेवणार नाहीं, आपल्या सर्व कर्जाचा आपल्या पश्चात् निकाल लावूं, असें आश्वासन दिल्यावर थोरल्या माधवरावांनीं सुखानें प्राण सोडला, असें जुन्या कागदपत्रांवरून कळतें. हीं सर्व कर्जें खरोखर राज्याकरितां व राष्ट्रीय लढाया चालविण्यासाठीं असत खरीं, परन्तु तीं प्रत्येक पेशवा आपल्या स्वतःच्या पतीवर व हिंमतीवरच काढीत असे. अजून त्याला राष्ट्रीय कर्जाचें पूर्ण स्वरूप आलें नव्हतें. एका पेशव्याच्या कर्जाबद्दल दुसरा पेशवा कायदेशीर रीतीनें जबाबदार नसे. तरी पण, हें कर्ज राष्ट्रीय आहे असेंच समजत असत; इतकेंच नव्हे, तर युरोपांतल्याप्रमाणें कर्जाच्या राष्ट्रीयत्वाची मोठी खूण जी कर्जफेडीकरितां सर्व लोकांवर कर बसवावयाचा अधिकार, तोही केव्हां केव्हां पेशव्यांनीं अंमलांत आणलेला आहे असें दिसतें. कर्जपट्टी म्हणून एक प्रकारचा कर जहागिरदार, इनामदार वगैरे श्रीमंत लोकांवर कर्जाच्या फेडीकरितां बसविल्याचे दाखले आहेत. यावरून युरोपांत ज्याप्रमाणें कांहीं कर राष्ट्रीय कर्जाचे व्याजामुद्दलाच्या फेडीकरितां निराळे काढून ठेवितात, त्याप्रमाणें पेशवाईतील पद्धत

होऊं पहात होती असें वाटतें. कराचा वसूल हळू हळू होत असतो; परंतु सरकारला केव्हां केव्हां पैशाची एकदम जरूर लागते. तसेंच पुढें वसूल होणाऱ्या कराचा पैसा आधींच खर्च करण्याची पाळी येते. अशा वेळीं युरोपांत सरकार बँकांकडून पैसे घेतें. मग जसजसा कराचा वसूल होईल तसतसा पैसा बँकेंत भरला जातो. या तात्पुरत्या कर्जावरही बँकेस व्याज मिळतें. ही पद्धतही पेशवाईच्या कारभारांत वारंवार दृष्टोत्पत्तीस येते. पेशव्यांना पैशाची गरज लागली व खजिन्यांत पैसे नसले, तर ते एखाद्या जिल्ह्याच्या किंवा प्रांताच्या जमीनसाऱ्याइतका पैसा एखाद्या सावकाराकडून किंवा इतर योग्य माणसाकडून १५ टक्के कसरीबद्दल कापून देऊन आगाऊ घेत व तो प्रांत किंवा जिल्हा एका वर्षाच्या करारानें जमीनबाबीच्या वसुलीकरितां त्याचे हवालीं करीत. म्हणजे या तात्पुरत्या व थोड्या मुदतीच्या कर्जाकरितांसुद्धां पेशव्यांना १५ टक्के व्याज द्यावें लागे. पुष्कळ दिवसांच्या मुदतीनें काढलेल्या कर्जावर तर यापेक्षांही जास्त व्याज द्यावें लागे. शेंकडा २० हा व्याजाचा साधारण दर असे. परंतु शेंकडा ३०–३५ व्याज दिल्याचे उल्लेख पेशवाईदफ्तरांत व कागदपत्रांत सांपडतात!

राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीला अनुकूल स्थिति युरोपांत असल्यामुळें या पद्धतीचा फैलाव युरोपच्या सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत अतोनात झाला आहे. राष्ट्र जेवढें मोठें, धनसंपन्न व बलाढ्य तितकें त्याचें राष्ट्रीय कर्ज मोठें! जणूं काय, राष्ट्रीय कर्जाची वाढ ही सुधारणेच्या व संपन्नतेच्या वाढीची खूणच आहे! ज्याला इंग्रजी इतिहास व अर्थशास्त्र यांची चांगलीशी माहिती नाहीं त्याला हें काय गौडबंगाल आहे असें वाटतें! इंग्लंडसारखा सर्व जगामध्यें धनाढ्य देश, पण त्याचें राष्ट्रीय कर्ज अजमासें ७४ कोटी पौंड आहे! व त्याचें वार्षिक व्याज २॥ कोटी आहे. महायुद्धामुळें इंग्लंडच्या राष्ट्रीय कर्जांत विलक्षण वाढ झाली आहे. ती येणेंप्रमाणें—

| सन | एकंदर कर्ज, कोट पौंड | वार्षिक व्याज. |
|---|---|---|
| १९१४ ( युद्धापूर्वी ) | ७०-८ | २·४५ |
| १९१७ ( मार्च ३१ ) | ४०६-४ | १२·७३ |
| १९१८ ( „ ) | ५९२-१ | १८-९९ |
| १९१९ ( „ ) | ७४८·१ | २७-० |
| १९२० ( „ ) | ७८७-९ | ३३-२ |
| १९२१ ( „ ) | ७५७-३ | ३४-९६ |

इंग्लंडप्रमाणें जर्मनी, फ्रान्स, वगैरे युद्धमान राष्ट्रांचें कर्ज वाढलेलें आहे. हिंदुस्थानचेंसुद्धां कर्ज वाढलेलें आहे.

अमेरिका ( १९२० ) = अदमासें २४ अब्ज डॉलर्स.
फ्रान्स ( १९२१ ) = ,, २३८ अब्ज फ्रांक्स.
हिंदुस्थान ( १९२०.) = ,, ४६ कोट पौंड.

अमेरिका तर संपत्तींत इंग्लंडच्या पुढें जात आहे. त्या देशाच्या अवाढव्यते-प्रमाणें त्याचें राष्ट्रीय कर्जही अवाढव्यच आहे. अमेरिकेचें कर्ज हल्लीं सुमारें २॥ अब्ज डॉलर्स इतकें आहे. अशीच युरोपांतल्या इतर राष्ट्रांची स्थिति आहे. फ्रान्सचें कर्ज सुमारें ३० अब्ज फ्रँक आहे. युरोपांतली सुधारणा उचलणाऱ्या जपानलाही कर्ज काढावें लागलें. मागच्या लढाईत आणखी कोट्यवधि येनचें कर्ज काढावें लागलें आहे. कंपनीसरकारनें आमच्या हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कर्जास प्रथम प्रारंभ केला. तेव्हांपासून वाढत वाढत १९०२ सालीं हिंदुस्थानचें कर्ज २२॥ कोटी पौंड इतकें होतें! निरनिराळ्या राष्ट्रांच्या कर्जांची ही यादी हवी तितकी वाढवितां येईल; परंतु तसें करण्याचें प्रयोजन नाहीं.

राष्ट्रीय कर्जाच्या या प्रश्नाचा ऐतिहासिकदृष्ट्या व अर्थशास्त्रदृष्ट्या विचार पुढील क्रमानें करण्याचें आह्मीं योजिलें आहे. ह्मणजे प्रथम राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीच्या उत्पत्तीचा व वाढीचा इतिहास द्यावयाचा. नंतर या पद्धतीचा देशा-च्या सांपत्तिक व औद्योगिक स्थितीवर काय परिणाम होतो तें सांगावयाचें. नंतर कोणत्या वेळीं सरकारनें पैसे मिळविण्याच्या पद्धतीचा अंगीकार करणें इष्ट आहे व अपरिहार्य आहे, व या पद्धतीचा वाजवीपेक्षां फाजील अवलंब केला अस-तां काय दुष्परिणाम घडतात तें दाखवावयाचें. सारांश, या प्रश्नाची अर्थशास्त्रा-च्या रीतीनें मीमांसा करण्याचा आमचा मानस आहे. पुढल्या भागांत हिंदु-स्थानच्या राष्ट्रीय कर्जाचा इतिहास देऊन त्या कर्जाचा देशाच्या सांपत्तिक स्थिती-वर काय परिणाम झाला आहे हें सांगून या विषयाची आह्मी रजा घेणार आहों.

कोणत्याही देशांत राष्ट्रीय कर्जाची पद्धति सुरू होण्यास कांहीं विशेष परिस्थिति व कांहीं अनुकूल गोष्टी लागत असतात. प्रथमतः देशांतील सरकारास स्थैर्य आलें पाहिजे. जोंपर्यंत कायमचें असें सरकार नसतें, तोंपर्यंतची—अर्थात् रानटी स्थिती-ची—गोष्ट बोलावयास नको; परंतु आज हा राजा, तर उद्यां दुसरा कोणी जास्त

सैन्य घेऊन येणारा मनुष्य राजा, अशी जोंपर्यंत स्थिति असते, तोंपर्यंत देशांतील सरकारास स्थैर्य आलें आहे असें ह्मणतां यावयाचें नाहीं. तसेंच देशांत शांतता व न्यायपद्धति असली तरच राष्ट्रीय कर्जाची पद्धत सुरू होण्याचा संभव आहे. जोंपर्यंत देशांत दंगेधोपे राजरोस होत आहेत, जोंपर्यंत प्रजेचें जीवित व मालमत्ता यांचें रक्षण करणाऱ्या पोलिसादि संस्था उत्पन्न झाल्या नाहींत, जोंपर्यंत व्यक्तिव्यक्तींचे तंटे मोडणाऱ्या व व्यक्तींमधील करारमदार यांची न्यायानें अंमलबजावणी करणाऱ्या संस्था प्रचलित झाल्या नाहींत, तोंपर्यंत देशांत व्यापारधंद्याची फारशी वाढ होऊं शकत नाहीं व देशांत संपत्तीही मुबलक नसते. प्रसंगीं उपयोगी पडण्याकरितां मनुष्याच्या स्वाभाविक दूरदर्शीपणानें जितका लोक पैसा शिल्लक टाकितात, तितका ते पुरून ठेवितात किंवा दुसऱ्याच्या नजरेस न येईल अशा तऱ्हेनें आपल्या संग्रहीं ठेवितात. परंतु देशांतील सरकारास बरेंच स्थैर्य आलें, सरकारनें देशांतील फंदफितुर मोडून जीवितास व मालमत्तेस सुरक्षितता आणली, न्यायाचीं कोर्टें स्थापून व्यक्तींचे व्यवहार सुरळीत चालतील अशा प्रकारची व्यवस्था केली व देशाच्या व्यापारधंद्याला उत्तेजन दिलें म्हणजे देशांत बरेच संपन्न लोक दृष्टीस पडूं लागतात. पुष्कळ लोकांजवळ आपल्या धंद्यांत पुरून उरे इतका पैसा असतो. साधारण सुखवस्तु लोकांनाही आपली थोडीशी पुंजी घरांत निरुपयोगी पडून न राहतां व्याजानें लागेल तर चांगलें असें वाटूं लागतें. अशी देशांतील स्थिति राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीच्या उत्पत्तीला अनुकूल स्थिति होय. कारण अशा लोकांच्या मनःस्थितींत सरकारला जर पैशाची जरूर लागली, व करानें पैसा वसूल करण्यास विलंब लागणार पण तेवढी तर अवधि नाहीं, ह्मणून व्याजानें कर्जाऊ पैसे घेण्याचा सरकारनें विचार केला, तर लोक सरकारास कर्ज देण्यास एका पायावर तयार असतात. कारण सरकारसारखा शहाजोग कर्जदार दुसरा कोण मिळणार आहे? सरकारच्या स्थैर्यामुळें व सरकारच्या न्यायपद्धतीनें सरकारवर लोकांचा विश्वास बसतो व आपला शिल्लक पैसा नुसता पुरून किंवा पेटींत न ठेवतां थोडया व्याजानें सरकारास तो कर्जाऊ देण्यांत लोकांचें नुकसान न होतां उलट फायदाच होत असतो. अशा वेळीं सरकारासही थोडया व्याजावर पैसे मिळतात. कारण देशांतील सर्व सुखवस्तु लोकांची सरकारास कर्ज देण्यांत चढाओढ असते.

युरोपखंडांत ही राष्ट्रीय कर्जाची पद्धति प्रथमतः इटली देशांतील व्हेनिस, जिनोआ, फ्लॉरेन्स वगैरे संस्थानांत सुरू झाली. कारण, वर निर्दिष्ट केलेली अनुकूल परिस्थिति या संस्थानांना फार लवकर प्राप्त झाली. केप ऑफ गुड होप-ला वळसा घालून जलमार्गानें हिंदुस्थानांत जाण्याचा मार्ग वास्कोडिगामा यानें शोधून काढण्यापूर्वी इटलींतलीं बंदरें व शहरें युरोप व एशिया यांमधील दळण-वळणाचीं व व्यापाराचीं नाकीं होतीं. त्या काळीं युरोपपेक्षां हिंदुस्थान व चीन वगैरे एशियांतील देशांची जास्त सुधारणा झाली असल्यामुळें व हेच देश व्यापार-धंद्यांत युरोपपेक्षां पुढें असल्यामुळें इटली देशांतील शहरांना या व्यापारापासून फार फायदा होत असे. यामुळें या शहरांना या काळीं फार महत्त्व असे व तीं फार धनाढ्य झालीं होतीं. याच व्यापारी फायद्याच्या लालुचीनें युरोपच्या पश्चि-मेकडील स्पेन, पोर्तुगाल, इंग्लंड व हॉलंड या देशांतील व्यापारी व खलाशी एशियाशीं दळणवळणाचा नवा मार्ग शोधून काढण्यास धडपडत होते. या स्वार्थी-पणाच्या धडपडींतच अमेरिका या नवीन खंडाचा शोध लागला. इटली देशां-तील हीं शहरें व्यापारानेंच कीर्तीस चढलीं असल्यामुळें व्यापारी लोकांचें प्राबल्य तेथें फार झालें व म्हणूनच तेथील राज्यें प्रजासत्ताक म्हणण्यापेक्षां धनिकसत्ताक होतीं, असें म्हणणें वाजवी आहे. लहान लहान संस्थानांत सरकारचें स्थैर्य अस-ल्यामुळें व शांतता असल्यामुळें व्यापाऱ्यांचा आपल्या सरकारावर पूर्ण विश्वास होता व अशा स्थितींत व्यापारी आपल्या धंद्यास न लागणारें भांडवल सरकारास देण्यास अगदीं एका पायावर तयार असत.

इंग्लंड, फ्रान्स वगैरे मोठमोठ्या राष्ट्रांनीं इटली देशांतल्या या संस्थांच्या पद्ध-तीवरून राष्ट्रीय कर्जाची पद्धति उचलली. युरोपांतल्या मोठमोठ्या सर्व राष्ट्रांमध्यें इंग्लंडला लवकर अनुकूल स्थिति आल्यामुळें इंग्लंडमध्यें या पद्धतीचा प्रचार फार लवकर झाला. यामुळें इंग्लंडचें राष्ट्रीय कर्ज इतर सर्व देशांपेक्षां फार जुनें आहे. नॉर्मन लोकांनीं इंग्लंड काबीज केल्यापासून तेथें जोरदार सरकार उत्पन्न झालें व सर्व देशभर शांतता झाली. फ्रान्सप्रमाणें सरदार लोकांचें प्राबल्य तेथें राहिलें नाहीं. इंग्लंडमध्यें जहागिरीपद्धति सुरू होती तोंपर्यंत राजाला लढाई-करितां खर्च नसे. कारण, प्रत्येक सरदारानें व इनामदारानें कांहीं लोकांनिशीं राजा बोलावील तेव्हां आलेंच पाहिजे असा नियम होता. राजाच्या स्वतःच्या

जमिनीही पुष्कळ असत. त्यांचें उत्पन्न त्याच्या नेहमींच्या खर्चास पुरत असे. परंतु जहागिरीपद्धतीचा नाश झाल्यावर लढाईकरितां पैशाची जरूर लागूं लागली. तसेंच, राजाच्या जमिनी नाहींशा झाल्यामुळें राजाच्या नेहमींच्या खर्चास करानें पैसे वसूल करणें भाग पडूं लागलें. इंग्लंडच्या राजकीय प्रगतीमुळें पैशासंबंधीं व करासंबंधीं सर्व अधिकार पार्लमेंट सभेस आला होता; जेव्हां राजास पैशाची जरूर लागे तेव्हां त्याला पार्लमेंटची पायधरणी करणें भाग पडे. पार्लमेंटच्या परवानगीवांचून कर वसूल करण्याचें धाडस केल्याबद्दल व इंग्रजी साम्राज्यपद्धतीच्या विरुद्ध वर्तन केल्याबद्दलच इंग्लंडच्या पहिल्या चार्लस राजास आपल्या प्राणास मुकावें लागलें हें महशूरच आहे. तेव्हांपासून इंग्लंडच्या राजांचा अधिकार फारच मर्यादित झाला व बहुतेक सर्व बाबतींत पार्लमेंटच्या सल्ल्याखेरीज राजास वागतां येईनासें झालें; इतकेंच नव्हे, तर पुढें पार्लमेंटामध्यें ज्या पक्षाचें बहुमत असेल त्या पक्षांतूनच आपले प्रधानसुद्धां त्यास निवडावे लागले. कराचे पैसे वसूल होण्यास विलंब लागल्यास राजाचे प्रधान पार्लमेंटजवळ तात्पुरतें कर्ज काढण्यास परवानगी मागत व पुढें पुढें तें कर्ज कायमच करावें लागे. कारण, आणखी नवीन खर्च उत्पन्न होतच असत. इंग्लंडचें राष्ट्रीय कर्ज दुसरा चार्लस याचे वेळेपासून सुरू झालें आहे. पूर्वीं सुरक्षितपणाकरितां लोक आपलें जडजवाहीर लंडन येथील सरकारी किल्ल्यांत ठेवीत असत. दुसऱ्या चार्लस राजाला पैशाची फार जरूर लागल्यामुळें त्यानें त्या किल्ल्यांतील जडजवाहीर घेऊन त्याचा विनियोग करून टाकला. याप्रमाणें चार्लस राजानें दांडगाईनें व बळजबरीनें लोकांचे पैसे घेतले. यामुळें लोक आपली शिल्लक सरकारी किल्ल्यांत न ठेवतां लंडनमधल्या सराफांजवळ ठेवूं लागले व त्यांच्याच पुढें मोठमोठ्या पेढ्या झाल्या. सरकारला झालेलें कर्ज एकच करण्याकरितां व सरकारास वेळोवेळीं लागणारें कर्ज जास्त सुलभतेनें काढतां यावें म्हणून बँक ऑफ इंग्लंड नांवाची एक नवीन पेढी तिसरा वुइल्यम राजा याच्या कारकीर्दींत स्थापन झाली. या पेढीनें सरकारचें पूर्वींचें सर्व कर्ज फेडून तें आपल्याकडे घेतलें व नवें लागणारें कर्ज उभारून देण्याची हमी घेतली. याबद्दल त्या बँकेला सरकारनें विशेष प्रकारच्या सवलती दिल्या. चार्लस राजानें जुलुमानें व बळजबरीनें घेतलेल्या लोकांना या बँकेचे शेअर दिले व त्यांना नियमित रीतीनें व्याज मिळेल अशी तजवीज

केली. जसजसा इंग्लंडचा राज्यविस्तार वाढत चालला, तसतसा राज्याचा खर्च वाढत चालला. लढाया वगैरे विशेष करणांचा खर्च कर्जानें भागविणें सोयीचें असल्यामुळें इंग्लंडचें राष्ट्रीय कर्ज इंग्लंडच्या राज्यविस्ताराप्रमाणेंच अवाढव्य होत गेलें. परंतु या राज्यविस्ताराबरोबरच इंग्लंडच्या व्यापारधंद्यांची वाढ होत जाऊन इंग्लंडास व्यापारी बाबतींत वर्चस्व मिळाल्यामुळें इतक्या मोठया राष्ट्रीय कर्जाचें जड जूं इंग्लंडसारख्या धनाढ्य देशास लीलेनें उचलतां आलें व या राष्ट्रीय कर्जापासून इंग्लंडच्या व्यापारावर अनिष्ट परिणाम झाला नाहीं. परंतु दुसऱ्या पुष्कळ देशांचें अवाढव्य राष्ट्रीय कर्जापायीं फार नुकसान झालें; असो.

अर्वाचीन काळच्या राष्ट्रांतील सरकारांस तीन कारणांमुळें राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीचा अंगीकार करण्याचा प्रसंग येतो. प्रथमतः वार्षिक जमाखर्चाची तोंडमिळवणी न झाल्यामुळें तिजोरींत येणारी तूट भरून काढण्यास कर्ज काढण्याची पाळी येते. तसेंच हल्लींच्या काळीं एखाद्या राष्ट्रांतील सरकारास परराष्ट्राशीं युद्ध करण्याचा प्रसंग आला ह्मणजे कर्जाखेरीज गत्यंतर नसतें. तसेंच, सरकारचे हातीं कांहीं धंदे राजकीयदृष्ट्या असणें जरूर असल्यास ते धंदे अनुत्पादक असले तरी सरकारास चालविणें भाग पडतें. अशा वेळीं किंवा उत्पादक धंदे उभारण्यास देशांतील खासगी व्यक्ति किंवा व्यक्तिसमूह धाडस करून पुढें येत नाहीं, ह्मणून असे उत्पादक धंदे देशांत सरकारनें काढणें जरूर असेल, अशा वेळीं भांडवलाचे पैसे कर्जानेंच काढणें प्राप्त असतें.

सुधारलेल्या प्रत्येक राष्ट्रांत प्रजासत्तातत्वाचा अंमल कमीअधिक प्रमाणानें चालू असल्यामुळें अशा राज्यांतल्या सरकारानें वार्षिक जमाखर्चाचा खर्डा वर्षारंभापूर्वी तयार करून प्रजेच्या प्रतिनिधिसभेस सादर करून त्या जमाखर्चास त्या सभेची संमति घेतली पाहिजे, असा साधारण नियम असतो. अर्वाचीन राष्ट्रांची उत्पन्नाची मुख्य बाब ह्मणजे निरनिराळ्या प्रकारचे कर होत. यांतील बरेच कर अप्रत्यक्ष असल्यामुळें त्यांचा बरोबर अंदाज करतां येत नाहीं. ज्या करांचें उत्पन्न मालाच्या खपावर अवलंबून आहे, त्या करांचें उत्पन्न कमीजास्त झालें पाहिजे. तसेंच विशेष कारण नसतांनासुद्धां खर्चाच्या अंदाजांतही फरक पडणें साहजिक आहे. जमेकडील व खर्चाकडील दोन्ही बाजूंकडे अशा प्रकारानें अनिश्चितता असल्यामुळें वर्षअखेर जमाखर्चाची तोंडमिळवणी होत नाहीं व

तिजोरींतून तूट येते. अशा वेळीं सरकारास तात्पुरतें कर्ज काढावें लागतें. कारण नवीन कर बसविण्यास प्रतिनिधिसभेची परवानगी लागते, हें एक; व कर बसविला तरी त्याचें उत्पन्न एकदम वसूल होत नाहीं हें दुसरें. बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांत अगदीं अवश्य लागणाऱ्या खर्चाचा अंदाज आधीं करतात आणि त्या खर्चाला लागतील इतकेच कर बसवितात. ह्मणजे जमाखर्चाच्या खर्ड्यांत होतां होईल तों शिल्लक दाखवीत नाहींत. जेमतेम दोन्ही तोंडें मिळालीं आहेत असें दाखवितात व नेहमींच्या साधारण खर्चापुरता वसूल लोकांकडून करतात. कोणत्याही विशेष प्रसंगीं नवीन कर बसवितात किंवा कर्ज काढतात. अशी हातावरच्या धंद्यासारखी जमाखर्चाची पद्धत पुष्कळ ठिकाणीं असते. याला तुटीची जमाखर्ची पद्धत म्हणतात; परंतु कांहीं देशांत आपल्यास कर्ज काढण्याचा प्रसंग पडूं नये व प्रसंगविशेषीं उपयोगी पडावी, म्हणून जास्त शिल्लक पडण्यासारखा जमाखर्चाचा खर्डा तयार करतात. या पद्धतींत खर्चाचा अंदाज पुष्कळ अधिक करून त्या सर्व खर्चास पुरून उरे इतका पैसा कररूपानें प्रजेकडून वसूल करतात. या पद्धतीला शिलकेची जमाखर्ची पद्धत ह्मणतात. अलीकडे पांचसात वर्षे हिंदुस्थानसरकारच्या फडणिसांनीं या दुसऱ्या पद्धतीचा आपल्या जमाखर्ची खर्ड्यांत अवलंब केलेला आहे, हें वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. या दुसऱ्या पद्धतीनें सरकारास फार मोठ्या अवघड व खर्चाच्या प्रसंगाशिवाय कर्ज काढण्याची पाळी येत नाहीं हें उघड आहे. कारण सरकारी तिजोरींत हजारों रुपये शिल्लक असतात. आतां अर्थशास्त्रदृष्टीनें तुटीच्या जमाखर्ची पद्धतीची व शिलकेच्या जमाखर्ची पद्धतीची तुलना करणें इष्ट आहे. प्रथमदर्शनीं दुसरी पद्धत चांगली असें भासतें. कारण ज्याप्रमाणें खासगी मनुष्य वेळप्रसंगाकरितां ह्मणून कांहीं शिलक मागें टाकतो, या त्याच्या कृत्यास आपण दूरदर्शीपणा ह्मणतों; आणि जितका आदा तितकाच खर्च करणाऱ्यास आपण उधळा समजतों; त्याप्रमाणें वेळप्रसंगाकरितां शिल्लक ठेवणारें सरकार व त्याची जमाखर्ची पद्धत तुटीच्या जमाखर्ची पद्धतीपेक्षां जास्त दूरदर्शीपणाची आहे व म्हणूनच ती अर्थशास्त्रदृष्ट्याही ग्राह्य असावी असें सकृद्दर्शनीं वाटतें खरें; परंतु या बाबतींत खासगी व्यक्ति व सरकार यांमध्यें साम्य नाहीं व ह्मणूनच जें व्यक्तीच्या दृष्टीनें चांगलें तें राष्ट्राच्याही दृष्टीनें चांगलें असलेंच पाहिजे, असें येथें

म्हणतां येत नाहीं. खरोखरी पाहतां तुटीच्या जमाखर्चाची पद्धतच सरकारच्या व प्रजेच्या फायद्याची आहे. कारण सरकार ही कांहीं एक व्यक्ति नाहीं. तिजोरींत पैसे शिल्लक असले कीं, सरकारी अंमलदारांना ते खर्च करण्याचा मोह होणें अगदीं स्वाभाविक आहे. तेव्हां शिलकेच्या जमाखर्ची पद्धतीनें सरकार दूरदर्शी न राहतां उधळें मात्र होण्याचा फार संभव आहे. या गोष्टीला ऐतिहासिक प्रमाणें आहेत. अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांमध्यें कांहीं दिवस ही पद्धत चालू होती. पण तीमुळें नेहमींचाच खर्च अतोनात वाढला. इंग्लंडमधला हाच अनुभव आहे. हिंदुस्थानांतही तीच स्थिति झाली. लिटनसाहेबांच्या कारकीर्दींत दुष्काळाकरितां अगदीं स्वतंत्र कर बसविला व याचा दुसरीकडे विनियोग करावयाचा नाहीं, असें प्रजेस आश्वासन दिलें, परंतु त्याचा काय उपयोग झाला ? सरकारी अंमलदारांनीं त्याची वाटेल ती विल्हेवाट लाविली. सारांश काय कीं, राष्ट्रांतील सरकारच्या तिजोरींत पैसा जास्त शिल्लक असणें हा दूरदर्शीपणा नसून उधळेपणाचा पाया होय. दुसरें असें कीं, सरकारच्या तिजोरींत असलेली शिल्लक अनुत्पादक राहिल्यास तिचा राष्ट्रीय संपत्ति वाढविण्याकडे कांहीं उपयोग होत नाहीं. परंतु हेच पैसे औद्योगिक वृत्तीच्या राष्ट्राच्या प्रजेचे हातीं असले म्हणजे ते देशांतील धंद्यांना उत्तेजन देऊं शकतात व अशा तऱ्हेनें लोकांचे जवळ ते पैसे राहिल्यास त्यांत सरकारचा व प्रजेचा असा दुहेरी फायदा आहे. अगदीं अवश्य खर्चाइतकेच पैसे वसूल करण्याची पद्धत असली म्हणजे सरकारला काटकसर करण्याची संवय लागते व अशी संवय राष्ट्रास फार हितकर आहे हें उघड आहे. कारण खिशांतून जितके कमी पैसे सरकारच्या तिजोरींत जातील, तितक्या मानानें लोक संपन्न राहतील व विशेष प्रसंगीं सरकारास थोड्या व्याजानें पैसे देण्यास एका पायावर तयार असतील व करांचें ओझें सहन करण्याचें सामर्थ्यही त्यांचेमध्यें राहील. तुटीच्या जमाखर्ची पद्धतीमध्यें खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां केव्हां केव्हां सरकारास कर्ज काढावें लागेल हें खरें; परंतु अशा तात्पुरत्या कर्जापासून प्रजेचें कांहींएक नुकसान होत नाहीं. सालोसाल तिजोरींत तूट येत गेली, तर कर्जाचा बोजा वाढत जाईल व तें कर्ज कायमच्या स्वरूपाचें करावें लागून व्याजाचें सर्व ओझें पुढील सर्व पिढ्यांवर बसेल हें खरें, परंतु याला उपाय म्हणजे सालोसाल तूट न येऊं देणें हाच होय. एका वर्षी तूट आल्यास

दुसऱ्या वर्षी एखादा कर वाढवून किंवा एखादा खर्च कमी करून मागल्या सालचें तात्पुरतें कर्ज फेडिलें पाहिजे. या बाबतींत सरकारनें कायमचें कर्ज करून पुढल्या सर्व पिढ्यांवर आपल्यावरची जबाबदारी ढकलूं नये म्हणजे झालें. बाकी तात्पुरतें कर्ज काढणें इष्टच आहे.

अर्वाचीन काळीं सरकारास कर्ज काढण्याची पाळी आणणारें दुसरें कारण म्हणजे लष्करी खातें व प्रत्यक्ष युद्ध करण्याचा प्रसंग होय. प्राचीन काळीं राजास लष्करी खात्याचा खर्च मुळींच नसे. कारण त्या काळीं देशांतील प्रत्येक पुरुष हा शिपाईच असे. लष्करी ज्ञान आत्मसंरक्षणाकरितां प्रत्येकास सहजच मिळे. यामुळें स्वतंत्र पगारी सैन्य ठेवण्याचें कारण नसे. राजानें युद्धास तयार राहण्याची द्वाही फिरविली कीं, सर्व लोक तयार असत. शिवाय त्या काळीं लढाई शेतकीचें काम संपल्यानंतर सुरू होऊन बरसातीचे सुमारास संपविण्याची पद्धत असल्यामुळें प्रत्येक मनुष्यास आपला शेतकीचा धंदा संभाळून सैन्यांत सामील होऊन देशाकरितां व राष्ट्राकरितां लढाईला जाण्यास सवड असे. यामुळें त्यास वेतन देण्याचें कारण नसे. लढाईकरितां अन्नसामुग्रीची तजवीज केली म्हणजे झालें. तसेंच लढाई करण्याचीं हत्यारें तलवार, तीरकमठा, कुऱ्हाड वगैरे प्रकारचीं साधीं व सोपीं असल्यामुळें त्यांकरितांही सरकारास फार खर्च नसे; परंतु कवायती पलटणें, तोफा, बंदुका, दारुगोळा वगैरे गोष्टींचा समावेश झाल्यापासून पूर्वीच्या सर्व गोष्टी पालटल्या. आतां लष्करी शिक्षण फार महत्त्वाचें झालें व त्यामुळें श्रमविभागाचें तत्त्व अंमलांत आणणें भाग पडलें. आतां शांततेच्या दिवसांत लढाईच्या वेळीं उपयोगी पडणारीं मोठमोठीं सैन्यें जय्यत तयार ठेवणें प्रत्येक राष्ट्रास भाग पडूं लागलें. दारुगोळ्याच्या शोधामुळें लढाईचें काम अत्यंत खर्चाचें झालें, इतकेंच नाहीं तर पूर्वीच्या एकंदर पद्धतींत सर्व प्रकारें क्रांति झाली. आतां व्यक्तीची शक्ति, बळ व धैर्य यांपेक्षां बुद्धि, कौशल्य व शिस्त यांचें महत्त्व जास्त झालें. ज्या देशाच्या जवळ मुबलक पैसा व ज्या देशाच्या सैन्यांत नवीन प्रकारचें लष्करी शिक्षण आणि अगदीं अर्वाचीन तऱ्हेचीं हत्यारें आहेत त्या देशाला अर्वाचीन काळीं लढाईंत जय मिळण्याचा संभव आहे. व म्हणूनच व्यापारी राष्ट्रांपुढें नुसत्या शूर परंतु रानटी लोकांचा हल्लींच्या काळीं टिकाव निघणें शक्य नाहीं. हल्लीं लढायांचा खर्च किती झाला

आहे, हें अलीकडच्या दोन युद्धांवरून सहज दिसून येईल. ब्रिटिश साम्राज्यासारख्या बलाढ्य साम्राज्याच्या सरकारला, ज्यांचा ५१७ जिल्ह्यांएवढा विस्तार नाहीं अशा दोन यःकश्चित् बोअर संस्थानांना जिंकण्यास २५ कोटी पौंड खर्च आला! म्हणजे इंग्लंडच्या आजपर्यंतच्या जमलेल्या सर्व राष्ट्रीय कर्जाच्या एकतृतीयांश खर्च या एका भिकार युद्धाला लागला. कांहीं दिवसांपूर्वी झालेल्या रूसो-जपानी युद्धांत दोन्ही पक्षांना किती खर्च आला असेल, याचा अंदाज रशियाचा प्रत्येक आठवड्याचा खर्च एक लक्ष रुबलसवर असे, या एकाच गोष्टीवरून सहज करतां येईल.

हल्लींच्या काळीं अशा तऱ्हेनें लागणाऱ्या लढाईच्या अवाढव्य खर्चाची तरतूद कशी करावयाची, हा सरकारला मोठा बिकट प्रश्न असतो. राष्ट्रीय कर्जाची पद्धत रूढ होण्यापूर्वी लढाईस लागणारा खर्च कर उभारून भागवावा लागे, हें उघड आहे. यामुळें, लढाईपासून देशांतील प्रत्येक माणसास आपल्या पोटास चिमटा घेऊन सरकारास कराची भरती करण्याचा प्रसंग येई. यामुळें लढाईचें दुःख अप्रत्यक्ष रीतीनें व प्रत्यक्ष रीतीनें प्रत्येक माणसास भासे. प्रजासत्ताक राज्यांतील सरकारांस लढाई सुरू करण्यापूर्वी बराच विचार करावा लागे. परंतु राष्ट्रीय कर्जाची पद्धत सुरू झाल्यापासून युद्धाला एक प्रकारचें उत्तेजन मिळूं लागलें आहे, असें अर्थशास्त्राचा जनक **ॲडाम स्मिथ** याचें ह्मणणें आहे. हल्लीं प्रत्यक्ष चालू असलेल्या वस्तुस्थितीचा आदर्श असा त्याच्या पुस्तकांतील उतारा वाचनीय म्हणून खालीं दिला आहे. "अर्वाचीन काळच्या बहुतेक सरकारांचा शांततेच्या वेळचा नेहमींचा साधारण खर्चच त्यांच्या उत्पन्नाबरोबर असतो. यामुळें लढाई सुरू होतांच नवीन वाढणाऱ्या खर्चाच्या प्रमाणानें आपलें कराचें उत्पन्न वाढविण्यास सरकार नाखुष असतें व असमर्थही असतें. एकदम फार मोठया कराच्या बोजामुळें लोक लढाईला लवकर कंटाळून सरकारच्या विरुद्ध जातील, या भीतीनें सरकार कर वाढविण्यास नाखुष असतें व आपल्यास लागणारा पैसा कोणत्या करानें ताबडतोब उत्पन्न होईल असें सांगणें कठिण असल्यामुळें तसें करणें अशक्य असतें; परंतु कर्ज काढण्याच्या सोप्या युक्तीनें या अडचणींतून सरकार मुक्त होतें. थोड्याशा कराच्या वाढीनें लढाईस लागणारा खर्च वर्षानुवर्ष कर्जाच्या पद्धतीनें उभारतां येतो व देशांतील व्याज फार हलकें असलें म्हणजे कायमच्या कर्जाच्या पद्धतीनें तर अत्यंत कमी वाढीनें फार मोठी रकम सरकार-

च्या हातीं येते. मोठमोठ्या राज्यांत लढाईच्या ठिकाणापासून दूर राहणाऱ्या लोकांची, तसेंच राजधानींतील लोकांची लढाईमुळें कांहींच अडचण किंवा गैरसोय होत नाहीं; उलट त्यांस आपल्या आरमाराच्या व सैन्याच्या विजयाच्या बातम्या व वर्णनें वर्तमानपत्रांतून स्वस्थपणें वाचावयास सांपडतात. शांततेच्या काळाच्या करापेक्षां फार थोड्या प्रमाणानें वाढलेल्या कराच्या वाढीचा मोबदला म्हणून लढाईची करमणूक अशा लोकांना बरस असते. यामुळें लढाई संपून शांतता झाल्यास हे लोक खुष नसतात. कारण लढाई जास्त दिवस चालल्यानें होणाऱ्या करमणुकीला व राष्ट्रीय वैभवाच्या व जयाच्या काल्पनिक तरंगसुखाला ते मुकतात."

अर्थशास्त्रदृष्ट्या कर्जानें लढाई चालविणें म्हणजे आपल्या कृत्यांचीं फळें पुढील सर्व पिढ्यांस भोगावयास लावण्यासारखें आहे. कारण या कर्जाच्या व्याजाचा बोजा सततचा असतो व तो पुढील सर्व पिढ्यांस सोसावा लागतो. एखादें युद्ध दुसऱ्या राष्ट्रानें अन्यायानें आपल्यावर हल्ला केला असतां स्वसंरक्षण करण्याकरितां जर फक्त असेल, तर त्यांत पुढील पिढींचा संबंध आहे. अशा वेळीं राष्ट्रीय कर्ज काढणें रास्त आहे; परंतु सरकारच्या चुकीनें किंवा साम्राज्यमदधुंदीनें एखादें युद्ध सुरू झाल्यास त्याबद्दलचा खर्च दुसऱ्या पिढ्यांवर घालणें अन्यायाचें होईल. यामुळें लढाईचा खर्च होतां होईल तों अधिक करानें उत्पन्न करणें न्याय्य आहे, असें कित्येक अर्थशास्त्रज्ञांचें व मुत्सद्यांचें मत आहे. प्रसिद्ध लिबरल मुत्सद्दी ग्लॅडस्टन हे दुसऱ्या मताचे होते. "लढाई सुरू करण्याची जबाबदारी जे लोक आपल्या शिरीं घेतात, त्यांनींच तिच्या खर्चाची जबाबदारी अंगावर घेतली पाहिजे. अर्वाचीन काळीं लढाईस लागणारा अवाढव्य खर्च हा एक लढाया कमी होण्याकरितां ईश्वरनिर्मित आळा आहे, म्हणूनच सरकारानें लढाई सुरू करणें म्हणजे एक अत्यंत बिकट व पवित्र कर्तव्य आहे असें समजलें पाहिजे" असें आपल्या एका भाषणांत त्यांनीं म्हटलें आहे. मिस्टर ग्लॅडस्टन यांनीं क्रिमियन लढाईचे वेळीं होतां होईल तों कर्ज काढावयाचें नाहीं व लढाईचा खर्च इतर काटकसर व कराची वाढ या दोन तजविजींनीं भागवावयाचा असा निश्चय केला होता. शेवटीं, हा त्यांचा निश्चय सिद्धीस गेला नाहीं व त्यांनासुद्धां कर्ज काढण्याचा प्रसंग आला, ही गोष्ट निराळी. असो.

सरकारास कर्ज काढण्याचें तिसरें कारण म्हणजे उत्पादक धंद्यांकरितां भांडव

वल पुरविण्यासाठीं लागणारा खर्च हें होय. सरकारास कर्ज काढण्यास लागणाऱ्या तिन्ही कारणांमध्यें या कारणाच्या सयुक्तिकतेबद्दल मुळींच मतभेद नाहीं. कांहीं धंदे राजकीयदृष्टया सरकारचे ताब्यांत असणें जरूर असतें. व असे कारखाने सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत सरकारकडेच असतात. दारूगोळा किंवा लढाईचीं हत्यारें करण्याचे कारखाने सरकारच्या देखरेखीखालींच होणें इष्ट असतें. तसेंच तारायंत्रें व पोस्ट ऑफिसें वगैरेसारख्या गोष्टीही एकतंत्री असणें अवश्य असतें व म्हणूनच हीं खातींही सरकारच्या ताब्यांत असणें रास्त आहे. तसेंच देशांतील लोकांमध्यें साहस, ज्ञान व इतर अवश्य गोष्टींची अनुकूलता नसल्यामुळें खासगी रीतीनें एखादा कारखाना निघणें शक्य नसेल व राष्ट्रहिताच्या दृष्टीनें असे कारखाने काढणें अवश्य असेल, तर ते कारखाने सरकारनेंच हातीं घेतले पाहिजेत. अशा सर्व कारखान्यांना लागणारें भांडवल कर्जानेंच काढणें रास्त आहे; करानें उत्पन्न करणें बरें नाहीं. कारण या कारखान्यांपासून पुढील अर्थ पिढ्यांना फायदा व्हावयाचा असतो. म्हणून त्या पिढ्यांनीं व्याजाच्या रूपानें या कारखान्यांस हातभार लावणें न्याय्य आहे. असे कारखाने व्यापारदृष्टया पूर्णपणें फायदेशीर नसले तरीसुद्धां कर्ज काढणें इष्ट असतें. हे कारखाने खासगी मनुष्य काढणार नाहीं हें उघड आहे. अशा वेळीं सरकारनें पुढें येऊन अशा कारखान्यांची जबाबदारी आपल्या अंगावर अर्थातच घेतली पाहिजे.

तसेंच, खासगी लोकांस जीं मोठमोठीं कामें करणें अशक्य, अशा लोकोपयोगी कामांकरितांही कर्ज काढणें रास्त आहे. अशा प्रकारचीं कामें हल्लींच्या काळीं बहुधा स्थानिक स्वराज्याच्या संस्थांकडे असतात. राष्ट्रीय-कर्जाबरोबर या म्युनिसिपालिट्यांसारख्या स्थानिक संस्थांनीं या कर्जाच्या पद्धतीचा जास्त अवलंब केलेला आहे व ही गोष्ट योग्य आहे. शहराचें आरोग्य वाढविण्याकरितां शहरास ड्रेनेज करावयाचें असल्यास किंवा शहरास चांगल्या पाण्याचा पुरवठा करावयाचा असल्यास किंवा दुसऱ्या कोणत्याही शहरसुधारणेच्या कामाकरितां पैसे पाहिजे असल्यास कर्ज काढण्याची पद्धत आहे व ती रास्तही आहे. तसेंच, देशांतील बंदरांकरितां लागणारे मोठमोठे धक्के, गोद्या व व्यापाराला उपयोगी पडणाऱ्या इतर लोकोपयोगी कामांसही कर्जेच काढतात. देशांतील शेतकीला उपयोगी पडणारे कालवे, पाटबंधारे व इतर मोठमोठीं कामें, तसेंच दळणवळणाकरितां

काढावयाचे कालवे, रेल्वे व रस्ते यांकरितांही कर्ज काढणें रास्त आहे. सारांश, जीं कामें खासगी माणसांकडून होणें शक्य नाहीं, परंतु जीं अत्यंत लोकोपयोगी आहेत, त्या सर्व बाबतींत राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीचा अवलंब करतात. यामध्यें पुढील पिढ्यांवर गैरवाजवी बोजा बसत नाहीं. कारण त्या सर्व कामांचा फायदा पुढील पिढ्यांना मिळतो; उलट अशीं मोठमोठीं कामें चालू पिढीच्या जवळून पैसा घेऊन करणें म्हणजेच अन्यायाचें आहे. कारण, पुढल्या पिढ्यांकरितां हल्लींच्या पिढीवर अशानें विनाकारण जबर बोजा बसविल्यासारखें होतें.

येथपर्यंत राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीच्या स्वीकाराच्या कारणांचा विचार झाला. आतां या कर्जाच्या पद्धतीनें देशांतील धंद्यांवर काय परिणाम होतात, व व्यक्तिमात्राच्या उत्पन्नावर तिचा काय परिणाम होतो याबद्दलच्या साधकबाधक प्रमाणांचा विचार करावयास पाहिजे; तसेंच देशांतल्या देशांत काढलेल्या कर्जाचा काय परिणाम होतो व परदेशांत कर्ज काढल्यापासून काय परिणाम होतो याचाही विचार केला पाहिजे.

सुधारलेल्या राष्ट्रांतल्या सरकारांना कोणत्या कारणांमुळें कर्ज काढण्याचा प्रसंग येतो याचें विवेचन वर केलें आहे. आतां राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीच्या साधकबाधक प्रमाणांचा विचार करून देशाच्या सांपत्तिक स्थितीवर या पद्धतीनें काय परिणाम होतात व कराच्या पद्धतीनें किंवा कर्जाच्या पद्धतीनें पैसे उत्पन्न करण्यापासून कमीजास्त नफानुकसान काय होतें, हें आधुनिक अर्थशास्त्रदृष्ट्या ठरवावयाचें आहे. हें झालें म्हणजे हातीं घेतलेल्या विषयाचा शास्त्रीय भाग आटपला म्हणावयाचा. मग पूर्वसंकल्पाप्रमाणें हिंदुस्थानच्या कर्जाचा इतिहास देऊन, त्याचा देशाच्या उद्योगधंद्यांवर कसकसा परिणाम घडत आहे, एवढें पाहणें राहिलें.

राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीपासून सर्वथा व सर्व प्रकारें फायदा असल्यामुळें देशास झालेलें कर्ज फेडण्याच्या भानगडींत मुत्सद्यांनीं कधींही पडूं नये, उलट गरज लागेल तेव्हां नवीन कर्ज काढीत रहावें, असें एक मत आहे. या लोकांचें म्हणणें असें आहे कीं, राष्ट्रीय कर्ज हें देशांत एक तऱ्हेनें नवीनच भांडवल उत्पन्न करतें; म्हणजे व्यापारांत असलेल्या भांडवलाखेरीज हें निव्वळ पडून राहिलेल्या पैशापासून सरकारास कर्ज मिळतें. व कर्जावर दिलें जाणारें व्याज हें

कांहीं लोकांचें एक कायमचें उत्पन्न बनतें. या उत्पन्नानें नवीन व्यापारधंदे सुरू करतां येतात. तेव्हां या राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीनें व्यापारधंद्यांस धोका न बसतां उलट उत्तेजनच मिळतें. तसेंच राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीनें देशांतील पेढयांच्या व्यापारास चांगला अवसर मिळतो व पेढया देशांतील लोकांचें भांडवल वाढविण्यास व अप्रत्यक्ष रीतीनें व्यापारधंद्यांच्या वाढीस कारणीभूत होतात हें मशहूर आहे. राष्ट्रीय कर्जावर द्याव्या लागणाऱ्या व्याजाचा एक बोजा आहे असें सकृद्दर्शनीं वाटतें खरें; परन्तु यानें देशाचें काडीभरही नुकसान होत नाहीं. कारण, सरकार कराच्या रूपानें कांहीं लोकांकडून पैसे घेतें व व्याजाच्या रूपानें ते कांहीं लोकांस देतें, म्हणजे 'ताटांतलें वाटींत आणि वाटींतलें ताटांत' अशांतलाच हा प्रकार होतो. या पद्धतींत नुसती पैशाची अदलाबदल होते. व यानें देशाचें नुकसान न होतां कांहीं अंशीं फायदाच होतो. तसेंच या राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीनें देशांतील सुखवस्तु लोकांना आपल्या शिलका फायदेशीर रीतीनें ठेवण्याचें एक सुलभ, खात्रीचें व सोयीचें साधन होतें. या कारणाकरितां कराच्या पद्धतीपेक्षां कर्जाची पद्धत श्रेयस्कर आहे. अशा प्रकारचें अनुमान कांहीं लोकांनीं काढलेलें आहे, असें **ॲडाम स्मिथ** यानें आपल्या पुस्तकांत निर्दिष्ट केलें आहे. **ॲडाम स्मिथ**च्या मतानें कराच्या पद्धतीपेक्षां कर्जाची पद्धति जास्त नुकसानीची व देशाच्या व्यापारधंद्याला हानिकारक आहे. म्हणून होतां होईल तों या पद्धतीचा अंगीकार करूं नये. केल्यास अपरिहार्य गोष्ट म्हणूनच करावा, असा **ॲडाम स्मिथ** यानें आपला अभिप्राय दिलेला आहे. **ॲडाम स्मिथ**चे मतें राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीनें नवीन भांडवल तयार होतें हा समज भ्रममूलक आहे. कारण, सरकारला कर्ज मिळतें तें देशांतील भांडवलांतूनच मिळतें. सरकारनें कर्ज काढलें नसतें तर हें भांडवल नवीन धंद्यांच्या वृद्धीकडे खर्च झालें असतें. तेव्हां कर्जानें जुनें भांडवल नष्ट होतें हें विसरतां कामा नये. इतकें खरें कीं, कर्जाच्या पद्धतीच्या योगानें प्रजेची शिलक टाकण्याची शक्ति फारशी कमी होत नाहीं; म्हणून जरी सरकार आपल्या अनुत्पादक खर्चानें देशांतील भांडवल जलदीनें नष्ट करीत असलें, तरी तितक्याच जलदीनें तें देशांत प्रजेच्या शिलकेच्या रूपानें वाढत असतें. म्हणूनच या कर्जापासून देशाच्या उद्योगधंद्यांवर वाईट परिणाम होत नाहीं. तसेंच राष्ट्रीय कर्जावरील व्याजानें देशाचें

मुळींच नुकसान होत नाहीं, हेंही खरें नाहीं. सरकार कर वसूल करतें तें देशांतील धनोत्पादक लोकांकडून करतें व सरकार व्याज देतें तें चैनी, खुशालचंद लोकांना देत असतें. यामुळें अशा अदलाबदलीनें देशाच्या व्यापारावर विपरीत परिणाम घडण्याचा संभव आहे. शिवाय कर्जाच्या पद्धतीनें भावी पिढयांवर कराचें जास्त ओझें पडत जातें, हें विसरतां कामा नये. वर्षानुवर्ष राष्ट्रीय कर्ज वाढत गेल्यास प्रजेवर त्याचें ओझें इतकें होईल कीं, तिची शिल्लक टाकण्याची शक्ति नाहींशी होईल व यापासून देशांतील धंद्यांवर अनिष्ट परिणाम होईल. शिवाय राष्ट्रीय कर्ज परक्या देशांतून घेतलेलें असल्यास त्या देशांत व्याजाच्या रूपानें संपत्तीचा प्रवाह सुरू होईल. व यापासून कर्ज काढणाऱ्या देशाचा व्यापार व संपत्ति कमीकमी होत जातील.

आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मतें 'कर कीं कर्ज' हा एक मोठा विकट प्रश्न आहे. याचें कोणतेंही एकच उत्तर देतां येणार नाहीं. निरनिराळ्या देशांच्या स्थित्यनुरूप दोन्ही पद्धतींपासून इष्ट किंवा अनिष्ट परिणाम घडतील. कारण कर किंवा कर्ज या दोन्ही गोष्टी शेवटीं प्रजेच्या उत्पन्नावर अवलंबून असतात. देशांतील धनोत्पादक लोक कर बहुधा आपल्या चैनीचा खर्च कमी करून देतात, म्हणजे करानें देशाचें भांडवल कमी होत नाहीं, किंवा उद्योगधंद्यांस व्यत्ययही येत नाहीं. इंग्लंडच्या लोकांस जबर कर द्यावा लागतो, परंतु त्यापासून त्यांच्या व्यापारावर वाईट परिणाम होत नाहीं. कारण, देशांतील लोकांचें उत्पन्नही मोठें आहे व हा कर लोक आपल्या स्वतःच्या खर्चाकरितां ठेवलेल्या पैशांतून देतात, यामुळें त्यांच्या व्यापारधंद्यांस कर आड येत नाहीं, किंवा त्यांची शिल्लक पाडण्याची शक्तीही या करानें नाहींशी होत नाहीं. परन्तु जर धंद्याच्या भांडवलामधून किंवा शिल्लक टाकण्याच्या पैशांतून सरकारचे कर देण्याची पाळी आली तर उद्योगधंद्यांवर अशा करांचा वाईट परिणाम झालाच पाहिजे. तसेंच सरकारास कर्ज द्यावयाचें तें आपल्या धंद्यास लागणारें भांडवल ठेवून राहील त्यांतून जोंपर्यंत दिलें जात आहे तोंपर्यंत कर्जाच्या पद्धतीनेंही व्यापारास धक्का बसणार नाहीं अशी साधारणतः स्थिति असते; कारण सरकारचा व्याजाचा दर फार हलका असतो व धंद्यांचा फायदा त्यापेक्षां पुष्कळ अधिक असतो. त्यामुळें कोणताही मनुष्य व्यापारांतील पैसा काढून सरकारास कर्ज देणार नाहीं; परंतु

आपल्या गरजेखातर व्याजाचा दर वाढवून सरकार कर्ज काढूं लागलें व या दरामुळें जर लोक पैसे धंद्यांतून काढून सरकारास देऊं लागले, तर उद्योग-धंद्यांस धक्का बसल्याविना राहणार नाहीं. तेव्हां अमक्या एका पद्धतीनें व्यापारास धक्का बसेल असें निश्चयानें केव्हांही सांगतां येणार नाहीं. कांहीं एका मर्यादेपर्यंत कराच्या पद्धतीपासून अनिष्ट परिणाम होणार नाहीं, तसेंच कर्जाच्या पद्धतीपासूनही विवक्षित मर्यादेपर्यंत अनिष्ट परिणाम होणार नाहीं; परंतु त्या मर्यादे-बाहेर गेल्यास दोन्ही पद्धतींपासूनही अनिष्ट परिणाम होतील; तरी पण ही मर्यादा तात्विक दृष्टीनें ठरवितां येणार नाहीं. देशाची एकंदर स्थिति पाहून हुशार मुत्सद्दी ही मर्यादा सहज ओळखूं शकतो. तेव्हां हा प्रश्न नुसता अर्थशास्त्राचा नाहीं, त्यांत व्यावहारिक शहाणपणाचा बराच भाग आहे. म्हणूनच नुसत्या अर्थशास्त्रानें त्याचा निकालही लागावयाचा नाहीं. जरी देशाच्या सांपत्तिक दृष्टीनें 'कर कीं कर्ज,' याचा निर्णय करणें कठिण असलें, तरी दुसऱ्या एका तत्वानें तें कांहीं बाबतींत तरी ठरवितां येतें. तें तत्त्व हें कीं, कर हा कर बसविल्या काळचे लोकांनाच द्यावा लागतो; त्याचे सततचे असे परिणाम मागें रहात नाहींत. परन्तु कर्जाला मागें शेंपुट असतें. तें मारुतीच्या शेंपटाप्रमाणें अनंत असतें. म्हणजे कर्जाच्या पद्धतीनें व्याजाचा बोजा सततचा होतो व तो बोजा कर्ज काढणाऱ्या पिढीच्या पुढील सर्व पिढ्यांस द्यावा लागतो. याकरितां सरकारच्या नेहमींच्या कारभाराला किंवा दुसऱ्या किरकोळ कामांना लागणारा खर्च करानेंच उत्पन्न करणें रास्त आहे, हें उघड होतें. अशा वेळीं कायमचें कर्ज काढणें म्हणजे आपल्याबद्दल भावी पिढ्यांस भुर्दंड पाडण्यासारखें आहे. तसेंच ज्या लोकोपयोगी कामांचा फायदा पुढील सर्व पिढ्यांना मिळावयाचा आहे, अशा कामांस लागणारा पैसा कर्जानें काढणेंच रास्त. असा खर्च करानें भागविणें म्हणजे भावी पिढीकरतां हल्लींच्या पिढीस भुर्दंड पाडण्यासारखें आहे. तेव्हां या दोन बाबींबद्दल मतभेद नाहीं. खरोखर वादग्रस्त प्रश्न युद्धाचा आहे. युद्धाचा खर्च करानें भागवावयाचा किंवा कर्जानें, हें वर दिलेल्या तत्त्वानें ठरविणें कठिण आहे. मागें आम्हीं सांगितलेंच आहे कीं, सुधारलेल्या राष्ट्रांचीं मोठमोठीं कर्जे हीं बहुधा लढाईनें झालेलीं आहेत. आतां लढाई करणारें प्रत्येक सरकार असेंच म्हणतें कीं, आम्ही लढाई करीत आहों ती देशाच्या संरक्षणाकरितां किंवा देशाच्या भर-

भराटीकरितां करीत आहों; ह्मणजे आमचें लढाईचें कारण न्यायाचें आहे व भावी पिढ्यांचें यांत हित आहे. ह्मणूनच आम्हीं कर्जानें लढाई चालविणें रास्त आहे व न्याय्य आहे. परन्तु लढाईची न्याय्यान्याय्यता ठरविणें कठिण असल्यामुळें या प्रश्नाचा निकालही करणें तितकेंच कठिण आहे.

शेवटीं राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीबद्दलचें एक राजकीय प्रमाण सांगून हा भाग आटपतों. राष्ट्रीय-कर्जाच्या पद्धतीनें देशांतील पुष्कळ लोकांचें हित देशांतील सरकार चालू राहण्यांत असतें. जितक्या लोकांनीं सरकारास कर्ज दिलेलें असतें, त्या लोकांचें राज्यक्रांतीपासून नुकसान होण्याचा संभव असतो व ह्मणून असे लोक शांतताप्रिय होतात. असे लोक बंडफितुरीच्या विरुद्ध असतात. तेव्हां प्रत्येक सरकारानें या पद्धतीचा अंगीकार करून आपल्या पाशांत लोक गुंतवून ठेवावे; म्हणजे त्या सरकाराला स्थैर्य येईल व देशांतील राजकीय परंपरा बदलणार नाहीं व या योगानें देशाची सारखी प्रगति होत राहील.

---

# भाग आठवा.

## हिंदुस्थानसरकारचें कर्ज.

हिंदुस्थानसरकारच्या कर्जाचा इतिहास म्हणजे पर्यायेंकरून ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदुस्थानांतील राज्यस्थापनेचा व त्यानंतर ब्रिटिश इंडियांतील राज्यव्यवस्थेचा इतिहासच होय. ज्याप्रमाणें साता समुद्रांपलीकडील एका खासगी व्यापारी कंपनीनें हिंदुस्थानासारख्या प्रचंड देशाचें राज्य अवघ्या एक शतकांत संपादन केलें, ही गोष्ट कल्पनातीत, आश्चर्यजनक व विस्मयकारक वाटते, त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या कर्जाचा इतिहासही कल्पनातीत, आश्चर्यजनक व विस्मयकारक आहे. परंतु हा इतिहास सविस्तरपणें देणें म्हणजे वर लिहिल्याप्रमाणें ईस्ट इंडिया कंपनीचा इतिहास देणें होय. आणि हा इतिहास थोडक्यांत तरी माहीत असणें इष्ट आहे. त्यावरून सुधारलेली राज्यपद्धति व कमी सुधारलेली राज्यपद्धति या दोन्हींमधील फरक दिसून येईल व एक समाधानकारक बोधही आपल्याला

घेतां येईल. सबब हा इतिहास या भागांत थोडक्यांत द्यावयाचा विचार आहे.

हिंदुस्थानचें सध्यांचें राष्ट्रीय कर्ज दोन तऱ्हेचें आहे. पहिलें अनुत्पादक कर्ज, व दुसरें उत्पादक कर्ज. दुसऱ्या प्रकारचें कर्ज अगदीं अलीकडच्या काळचें आहे. हें कर्ज म्हणजे सरकारनें उत्पादक धंदे आपल्या हातीं घेऊन त्या धंद्यांच्या भांडवलाकरितां काढलेलें कर्ज होय. हें कर्ज मुख्यतः रेल्वे व पाटबंधारे यांकरितां काढलेलें आहे. हिंदुस्थानांत प्रथमतः १८५४ मध्यें रेल्वे काढण्याचें ठरलें व तेव्हांपासून सरकारनें सारखा रेल्वेचा रस्ता वाढविण्याचा क्रम चालविलेला आहे. या रेल्वेच्या प्रसारानें हिंदुस्थानचा विस्तीर्णपणा कमी होऊन, हिंदुस्थान हा एकदेश व एकराष्ट्र बनत चाललें आहे. या रेल्वेच्या योगानें हिंदुस्थानांतील प्रांतांप्रांतांमध्यें दळणवळणाची सोय झाली आहे; त्यांच्या योगानें एका प्रांतांत दुष्काळ पडल्यास दुसऱ्या प्रांतांतून धान्य येण्यास सोयीचें होतें. सरकारनें कांहीं रेलवे, दुष्काळ निवारण्याचा–निदान दुष्काळाची तीव्रता कमी करण्याचा–एक मार्ग म्हणून सुरू केलेल्या आहेत व त्यांचा खर्च दुष्काळफंडांतून केला जातो. या रेल्वेच्या सोयीमुळेंच सर्व हिंदुस्थानचा एक बाजार बनून सर्व पदार्थांच्या किंमती चोहोंकडे एकसारख्या चालल्या आहेत; तसेंच, या रेल्वेच्या योगानें युरोपांतील माल या देशाच्या कोनाकोपऱ्यांत जाऊं लागला व देशांतील कच्चा माल बाहेरदेशीं जाऊं लागला. अलीकडील पंचवीस तीस वर्षांत आयातनिर्यात व्यापार जो विलक्षण वाढलेला दिसतो त्याचें प्रमुख कारण देशांतील रेल्वेंचा विस्तार होय, यांत शंका नाहीं. पहिल्या अर्ध-शतकापर्यंत हिंदुस्थानांतील रेल्वे या आंतबट्ट्याच्या होत्या व सरकारास दरवर्षी हजारों रुपयांचा तोटा सरकारच्या वार्षिक करांच्या उत्पन्नांतून भरावा लागे. परंतु गेल्या आठदहा वर्षांपासून रेल्वेंतून सरकारास निव्वळ उत्पन्न होऊं लागलें आहे. परंतु पाटबंधाऱ्यांवरील भांडवलावर नेहमीं ५।७ टक्केपर्यंत व्याज सरकारला पडत आलें आहे. तेव्हां या उत्पादक कर्जाबद्दल म्हणण्यासारखी तक्रार करण्यास जागा नाहीं. मात्र रेल्वेचा विस्तार देशांतील औद्योगिक प्रगतीच्या वेगाच्यापुढें जात आहे कीं काय, अशी केव्हां केव्हां शंका येऊं लागते. परंतु या संबंधांत रेल्वे बोर्ड झाल्यापासून नवी रेल्वे किफाईतशीर होईल किंवा नाहीं, हें जास्त कसोशीनें पाहिलें जातें. तसेंच पूर्वीची ग्यारंटीची पद्धति काढून टाकल्यामुळें कंपन्यांना रेल्वेच्या बांधकामावर

अद्वातद्वा पैसा खर्च करण्याचा मोह उत्पन्न होण्याचें कारण राहिलें नाहीं. तसेंच फीडर लाइन्सकरितां देशांतील कंपन्यांना विशेष सवलती देण्याचा उपक्रमही सरकारनें आतां सुरू केला आहे. आतांपर्यंत एकंदर रेल्वेविस्तार किती झाला आहे व त्यावर एकंदर किती खर्च झाला आहे, हें खालील आंकड्यांवरून दिसून येईल. रेल्वेचा विस्तार कसा झाला याचें कोष्टकः—

| | |
|---|---|
| सन १९०७—३०,०१० मैल. | सन १९१८-१९—३६,६१६ मैल. |
| सन १९१३-१४—३४,६५६ मैल. | सन १९१९-२०—३६,७३५ मैल. |
| सन १९१४-१५—३५,२८५ मैल. | |

३१ मार्च १९२० रोजीं खालीलप्रमाणें रेल्वे रस्ते सुरू होते, व त्यांच्यावर १९१९-२० अखेर एकंदर खर्च इतका झाला होता—

| वर्णन. | मैल. | एकंदर खर्च |
|---|---|---|
| सरकारी मालकीची व सरकारनें चालविलेली. | ७,३६९ | १,५६,१३,९२,००० |
| सरकारी मालकीची व कंपनीनें चालविलेली. | १९,०१९ | ३,४६,५४,३३,००० |
| ग्यारंटी व रिबेट ब्रँच लाइनी. | २,१३४ | १६,४९,६९,००० |
| सरकारनें मदत दिलेल्या लायनी. | २,३०६ | १७,७०,१८;००० |
| सरकारनें मदत न दिलेल्या लायनी. | ११० | ३५,८६,००० |
| डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या लायनी. | २३७ | १,३०,०४,००० |
| डिस्ट्रिक्ट बोर्डानें मदत दिलेल्या पण कंपनीनें चालविलेल्या. | ३०८ | १,४७,९०,००० |
| देशी संस्थानांच्या व त्यांनीं चालविलेल्या. | २,५९५ | ११,१२,८२,००० |
| देशी संस्थानांच्या पण कंपनीनें चालविलेल्या. | १८२३ | १०,८७,७६,००० |
| देशी संस्थानांनीं ग्यारंटी दिलेल्या व कंपनीनें चालविलेल्या. | ७६० | ८,८६,०७,००० |
| परकी सरकारच्या पण ब्रिटिश कंपन्यांनीं चालविलेल्या. | ७४ | २,०७,३४,००० |
| अवांतर खर्च ( कोळशाच्या खाणी वगैरे ) | | १,१३,०१,००० |
| एकूण | ३६७३५ | ५,७४,०८,९२,००० रु. |

आतां पाटबंधाऱ्यांचा १९०९ सालापर्यंतचा विस्तार व त्यावर झालेला खर्च किती आहे तें पाहूं.

| | भिजलेली जमीन एकर. | खर्च. |
| --- | --- | --- |
| मोठे पाटबंधारे | १,४८,७४,०२९ | ३,२१,४३,२८८ पौंड |
| लहान कामें | ७१,७४,०४२ | ४१,२८,२९४ पौंड |

अगदीं अलीकडील आंकडे खालीलप्रमाणें आहेत. ( सन १९१८-१९ )

| | भिजलेली जमीन एकर |
| --- | --- |
| मोठे पाटबंधारे | २,११,९८,००० |
| तळीं वगैरे | ७२,६८,००० |
| विहिरी ,, | १,४२,१६,००० |

सरकारी इरिगेशन कामांमुळें सुमारें २ कोटी ५० लक्ष एकर जमीन भिजली आहे. त्या जमिनीवर उत्पन्न झालेल्या पिकाची किंमत सुमारें १४९ कोट रुपये होती व व्याज वगैरे वजा जातां त्यापासून सरकारला निव्वळ उत्पन्न ५॥ कोट रुपये झालें ( १९१८-१९ ).

हिंदुस्थानच्या अनुत्पादक कर्जाचा इतिहास फार विलक्षण व मोठा विस्मयजनक पण एका दृष्टीनें बोधप्रद आहे. हिंदुस्थानसरकार ही प्रचंड संस्था निर्माण होण्याच्या पूर्वीपासून हिंदुस्थानचें हल्लींचें कर्ज चालत आलेलें आहे; इतकेंच नव्हे, तर ज्या काळीं अशी मोठी राज्यपद्धति पुढें थोड्याच काळांत निर्माण होणार आहे अशी कल्पनासुद्धां कोणाच्या डोक्यांत आली नसेल, त्या वेळेपासून या कर्जाला सुरवात झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत म्हणजे १६०१।१६०२ सालीं ईस्ट इंडिया कंपनी प्रथम स्थापन झाली. त्या कंपनीच्या भांडवलावर अजूनही हिंदुस्थानसरकारच्या कर्जाचें व्याज या रूपानें प्रत्येक हिंदुस्थानवासी गृहस्थ देत आहे! हें कोणास सांगितलें तरी खरें वाटणार नाहीं. परंतु वस्तुस्थिति तशी आहे. इ. स. १८५७ नंतर ईस्ट इंडिया कंपनी जेव्हां मोडली, तेव्हां तिचें मूळचें भांडवल हिंदुस्थानसरकारच्या राष्ट्रीय कर्जांत सामील केलें गेलें. शिवाय, हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कर्जांतील बराच भाग म्हणजे हिंदुस्थान जिंकण्याकरितां कंपनी सरकारनें ज्या लढाया केल्या त्या सर्वांचा खर्च होय. शिवाय कंपनी सरकारनें इंग्रज सरकारला जें कर्ज दिलें त्याचाही थोडाबहुत भाग यांत आहे व जेव्हां जेव्हां हिंदुस्थानचा कारभार आंतबट्ट्याचा असे व कंपनीच्या भागीदारांना व्याज पाठवावें

लागे, तेव्हां तेव्हां तिजोरींतील तूट भरून काढण्याकरितां काढलेल्या कर्जाचा अंश-ही हल्लींच्या कर्जांत आहे ! असे या कर्जाचे विचित्र व विविध घटकावयव आहेत. परंतु यावरून एकदोन गोष्टी सध्यांच्या हिंदुस्थानच्या रहिवाशांनीं खूणगांठ म्हणून सदैव ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. प्रथमतः या इतिहासावरून सुधारलेल्या संस्थांचें स्थैर्य उत्तम तऱ्हेनें आपल्यास दिसून येतें. इ. स. १६०२ मध्यें जी सुधारलेल्या पद्धतीची संस्था निघाली तिची परंपरा आजपर्यंत टिकली आहे. सुमारें तीनशें वर्षांच्या काळांत हिंदुस्थानांत कित्येक प्रचंड राज्यें उदयास आलीं व विलयही पावलीं; याच काळांत दुसऱ्याही हजारों घडामोडी झाल्या. परंतु एक पाश्चात्य खाजगी कंपनी इतके दिवस चालून, तिनें येथें मोठा राज्यविस्तार केला व ह्या राज्यविस्ताराचा कारभार आपल्या देशबांधवांच्या स्वाधीन करून ती संस्था विलीन झाली; अशी ही संस्था जरी नामशेष झाली तरी १६०१ मधलें तिचें भांडवल अजून हिंदुस्थान सरकारच्या कर्जांत जीव धरून आहे. सुधारलेल्या राज्यपद्धतीचें व संस्थांचें स्थैर्य असें असतें; म्हणूनच आपल्याला सुधारलेल्या राज्यपद्धतीशिवाय व संस्थांशिवाय गत्यंतर नाहीं.

दुसरी गोष्ट–हिंदुस्थानचें राज्य इंग्रजसरकारनें किंवा कंपनीसरकारनें आपल्या शौर्यानें मिळविलें असें म्हणतात व यामुळें हिंदुस्थानांतील सर्व रहिवासी हे जित आहेत असें समजलें जातें. परन्तु हिंदुस्थानच्या कर्जाच्या इतिहासाकडे लक्ष दिलें असतां हिंदुस्थानवासीयांनीं आपण होऊन आपल्याला जिंकून घेतलें असें म्हणणें रास्त होईल असें स्पष्ट होतें. कारण, या राज्यस्थापनेचा पैन्‌पैच खर्च हिंदुस्थाननें दिला आहे. असें असूनही हिंदुस्थानवासी लोक त्या कर्जाचें व्याज भरीत आहेत. पाश्चात्य सुधारणांची व प्रगतीची जोड पौर्वात्य संस्कृतीस दिल्यानें भविष्यकाळीं हिंदुस्थानची उन्नति स्पृहणीय होईल, व त्याकरितां प्रस्तुतची किंमत देण्यांत आली आहे. गुरुगृहीं वास म्हणजे परवशता नसून भावी सुखाची पूर्व तयारी आहे, असें मानून ब्रिटिश साम्राज्याबद्दल स्वाभिमानपूर्वक बोलण्यास प्रत्यवाय नाहीं. ईस्ट–इंडिया–कंपनी हें हिंदुस्थानवासीयांनीं आपल्या देशाला एकदांची सुधारलेली कायद्यांची राज्यव्यवस्था मिळवून देण्याकरितां, भाड्यानें घेतलेलें एक यंत्रच होतें असें मानतां येईल. कारण, या राज्यव्यवस्थेनेंच हिंदुस्थानचें खंडत्व जाऊन त्याला एकराष्ट्रीयत्व येत चाललें आहे. पाश्चात्य

शिक्षण, पाश्चात्य कायदा, पाश्चात्य दळणवळणाचीं साधनें, पाश्चात्य सुव्यवस्थित व नियंत्रित राज्यव्यवस्था, हीं कंपनीसरकारचें हिंदुस्थानांत राज्य झालें म्हणून इकडे आलीं व त्या गोष्टीच हिंदुस्थानवासीयांचें एकराष्ट्र बनविण्यास कारणीभूत होत आहेत. तेव्हां ही राज्यपद्धति हिंदुस्थानवासीयांनीं आपल्या खर्चानें विकत घेतली असें म्हणणें हिंदुस्थानच्या कर्जाच्या इतिहासाकडे लक्ष देतां वस्तुस्थितीस धरून असून अन्वर्थकही आहे. हें खरें आहे कीं, ही राज्यस्थापना निर्माण होत असतांना इंग्रज व हिंदी लोक या दोघांनाही या कल्पना नव्हत्या. एकामध्यें स्वार्थ, आपमतलब, व दुसरीकडे मत्सर, द्वेष इत्यादि मनोविकार होते. परन्तु यालाच कै० न्यायमूर्ति रानडे 'दैवी संकल्पित' म्हणत. हिंदुस्थानावरील ब्रिटिश साम्राज्य हें मानवी संकल्पित नाहीं तर दैवी संकल्पित आहे असें ते म्हणत असत. त्याचा अर्थ हाच कीं, जरी मानवी दृष्टीनें हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य हें स्वार्थबुद्धीनें निर्माण झालें असलें तरी ही स्वार्थबुद्धीच परमेश्वरानें आपले संकल्पित हेतु तडीस नेण्याकरितां साधनीभूत केली. हिंदुस्थानचें हित होण्याकरितां, त्या देशांतील निरनिराळया जातींचा कायमचा मिलाफ होण्याकरितां, सारांश, त्या देशाला पूर्ण एकराष्ट्रत्व येऊन त्याला त्याचें पूर्ववैभव प्राप्त होण्याकरितां हिंदुस्थानदेश हा दैवी संकल्पिताप्रमाणें सुधारलेल्या एकछत्री नियंत्रित राज्यपद्धतीकडे येणें अवश्य होतें. हें संकल्पित घडवून आणण्याकरितां परमेश्वरानें मनुष्याच्या स्वार्थी मनोवृत्तीचाच उपयोग करून येथें ईस्ट-इंडिया-कंपनीची स्थापना करविली व तिच्या स्वार्थी डायरेक्टरांच्या हस्तें ब्रिटिश साम्राज्याचा प्रचंड वृक्ष येथें रुजविला. व तो वाढवून शेवटीं १८५७ सालच्या बंडानंतर तो खुद्द ब्रिटिश पार्लमेंटाचे हातीं देवविला. या इतिहासापासून बोध घेण्यासारखा आहे असें सांगून आतां त्या इतिहासाचा थोडक्यांत विचार करूं.

या कर्जाच्या उत्पत्तीची बरोबर कल्पना येण्याकरितां ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाराचें सामान्य स्वरूप लक्षांत आलें पाहिजे. कारण त्या काळीं इंग्लंड देशाचा हिंदुस्थान देशाशीं कशा प्रकारचा व्यापार होता, याची कल्पना हल्लींच्या व्यापारावरून मुळींच करतां येण्यासारखी नाहीं. कारण त्या काळीं हिंदुस्थान देश हा कलाकौशल्याच्या कामांत फार पुढें होता व युरोप हें या कामांत अगदीं रानटी स्थितींत होतें. तेव्हां युरोपांतून कांहीं माल आणून तो हिंदुस्थानांत खपवून

त्यावर लाखों रुपयांचा फायदा जसे हल्लींचे व्यापारी मिळवितात, तसा प्रकार ईस्ट इंडिया कंपनीचे वेळीं नव्हता. कांहीं बारीकसारीक चमत्कारिक स्वभावजन्य वस्तूंखेरीज तिकडून हिंदुस्थान देशांत आणण्यासारखें कांहीं नव्हतें. अमेरिकेंत सोन्यारुप्याच्या खाणी सांपडल्यामुळें युरोपांत सोन्यारुप्याचा ओघ सुरू झाला. हें सोनेंरुपें गलबतांत भरून ईस्ट इंडिया कंपनीचे नोकर हिंदुस्थानांत आणीत, व हे पैसे येथल्या कारागिरांना आगाऊ देऊन त्यांचेकडून सुती, लोंकरी व रेशमी तलम कापड करवून घेत. तसेंच हस्तिदंती व लांकडी हस्तकौशल्याचें काम, सोरा, मसाल्याचे पदार्थ, चहा, कॉफी वगैरे सर्व विकत घेत. सारांश, युरोपांत ज्या ज्या मालाचा खप असतो, तो माल ते येथून गलबतांत भरून नेत व युरोपमध्यें विकीत. हा कंपनीचा व्यापार फार फायद्याचा असे. कारण, हा सर्व माल युरोपांत फारच महाग असे. याचें कारण जलमार्गाचा शोध लागण्यापूर्वीं फार खर्चाच्या, धोक्याच्या व त्रासाच्या खुष्कीच्या मार्गानें हिंदुस्थान व युरोप यांमधला व्यापार चालत असे. परन्तु जलमार्ग निघाल्यामुळें फार कमी खर्चानें हा माल युरोपांत जाऊन पोंहोंचे व त्या वेळीं व्यापारांत चढाओढ नसल्यामुळें ईस्ट-इंडिया-कंपनीला शेंकडा २०० टक्के सुद्धां फायदा पडत असे ! एवढें खरें कीं, त्या काळच्या जलमार्गाच्या व्यापाराला काळ फार लागे. एक सफर पुरी होण्यास दोनपासून तीन वर्षें लागत. तेव्हां त्या मानानें इतका फायदा एक प्रकारें वाजवीच होता. हा व्यापार चालविण्याकरितां ईस्ट इंडिया कंपनीचें मूळचें भांडवल ४२ लक्ष पौंड होतें. या कंपनीला इंग्रजसरकाराकडून वेळोवेळीं सनदा मिळत व या सनदांची मुदत सरून पुनः कांहीं काळची नवी सनद करून देतेवेळीं इंग्रज सरकार कंपनीकडून सवलतीच्या व्याजानें कर्ज घेई. इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याचे कारकीर्दीत एक प्रतिस्पर्धी कंपनी निघाली होती. परंतु १७०७ मध्यें दोन्ही कंपन्यांचा मिलाफ होऊन समाईक कंपनीचें काम सुरळीत चालूं लागलें. युरोपांतून हिंदुस्थानला गलबतें आल्यावर त्यांचा मालाकरितां केव्हां केव्हां फार खोळंबा होऊं लागला, म्हणून इंग्लंडांतून दुप्पट रक्कम एक दोन सालीं पाठविण्याचें ठरलें. या व्यापाराकरितां काढावे लागणारे पैसे भांडवलांत धरले जात असत. परंतु इंग्लंडांतल्या सरकारास देण्याकरितां काढिलेले पैसे कंपनीच्या पतीवर व मालमत्तेवर काढलेलें कर्ज समजत असत. तसेंच गलबतांची खोटी

होऊं नये म्हणून कारागिरांना आगाऊ पैसे देण्याकरितां हिंदुस्थानांतही कर्ज काढण्याची कंपनीच्या एजंटांना परवानगी दिली होती. या दोन प्रकारच्या कंपनीच्या कर्जाला Bond debts म्हणत असत. अशी स्थिति सन १७३२ पर्यंत होती. सन १७३२ पर्यंत कंपनीनें इंग्रजसरकारला ३२ लक्ष पौंडांचें कर्ज दिलें होतें. या सालीं आणखी एका नव्या कंपनीला सनद देण्याचा बूट मंत्रिमंडळांत निघाला. मंत्रिमंडळाची समजावणी करण्याकरितां कंपनीनें दोन लक्ष पौंड सरकारला देण्याचें कबूल केलें. पुढें १७४४ मध्यें आणखी ३६ वर्षें मुदतीची सनद वाढवून घेण्याकरितां सरकारास शेंकडा तीन टक्के व्याजानें १० लक्ष पौंड देऊं केले व हे पैसे कंपनीनें आपल्या पतीवर उभारले. याप्रमाणें कांहीं व्यापाराकरितां, कांहीं इंग्लंडांत इंग्रज सरकारला देण्याकरितां व कांहीं हिंदुस्थानांत माल वगैरेच्या खरेदीकरितां कर्ज कंपनी आपल्या पतीवर काढीत असे. परंतु १७५७ सालीं प्लासीची लढाई झाली व पुढें लवकरच बंगाल, बहार व ओरीसा या प्रांतांची दिवाणी कंपनीला मिळाली. तेव्हांपासून ईस्ट इंडिया कंपनी ही हिंदुस्थानांत सरकार बनली व तिला राजकीय महत्त्व आलें. आधींच इंग्लंडच्या लोकांचा हिंदुस्थानच्या संपन्नतेबद्दल फाजील समज, त्यांत ईस्ट इंडिया कंपनीच्या विलक्षण फायद्याच्या व्यापारावरून व कंपनीच्या नोकरांना थोडया दिवसांत खाजगी तऱ्हेनें मिळालेल्या विलक्षण किफायतीवरून तो समज जास्त वाढला होता. तेव्हां अशा स्थितींत बंगालसारख्या सुपीक व संपन्न प्रांताचा अधिकार कंपनीच्या हातांत आल्याबरोबर ज्याच्या त्याच्या तोंडास पाणी सुटलें. कंपनीच्या भागीदारांना व्याज वाढविण्याची घाई झाली. त्यांनीं शेंकडा ६ टक्क्यांपासून १२॥ टक्क्यांपर्यंत आपल्या भागांचें व्याज वाढविण्याचा सपाटा चालविला. परंतु इंग्रजी मंत्रिमंडळाला हें करणें आवडलें नाहीं. कारण, इंग्रजसरकारचा असें करण्यापासून तोटा होता. एवढ्या मोठ्या शिकारींतील त्यांच्या वांट्यास कोणताच तुकडा येईना, सर्वच भागीदार घेऊं लागले. परंतु कंपनीच्या भागीदारांना शह देण्याची शक्ति मंत्रिमंडळांत होती. कारण इंग्लंडच्या राजापासून कंपनीस व्यापाराची व प्रांताचा अंमल चालविण्याची सनद मिळालेली होती. तेव्हां या अधिकाराप्रमाणें १७६९ मध्यें मंत्रिमंडळानें पार्लमेंटांत एक कायदा पास करून घेतला. या कायद्यांत कंपनीला नवीन मिळविलेल्या प्रांतांवर ५ वर्षें अंमल चाल-

विण्याची परवानगी दिली व त्याबद्दल कंपनीनें सरकारनें इंग्रजी खजिन्याला दर वर्षी ४ लक्ष पौंड द्यावे; तसेंच आपल्या भागावरील नफा एकदम ११॥ टके न करतां प्रत्येक वर्षी एकएक टक्क्याप्रमाणें १२॥ पर्यंत वाढवीत जावा व जास्त शिल्लक राहिल्यास कंपनीनें आपलें Bond debt कमी करावे, असें ठरविलें. हा अॅक्ट बंगालच्या दिवाणीपासून विलक्षण फायदा होणार अशा समजावर केलेला होता. परंतु त्या समजाप्रमाणें प्रांताचा खर्चवेच जाऊन उत्पन्न होईना व इकडे तर डायरेक्टरांचे खलित्यावर खलिते कीं, पुष्कळ पैसे पाठविले पाहिजेत! मग कंपनीसरकारच्या नोकरांना जुलमानें राजेरजवाडे यांचेकडून पैसे कसे घ्यावे लागत, याचें सुंदर वर्णन मेकॉले व बर्क या दोन मुत्सद्यांच्या पुस्तकांत पुष्कळ ठिकाणीं आलेलें आहे. नवीन प्रांत मिळाल्यापासून कंपनीसरकारचा हिंदुस्थानांतल्या राजेरजवाड्यांशीं संबंध येऊं लागला व नेहमीं लढाया व तंटेबखेडे होऊं लागले व त्यामुळें लष्करी खर्च वाढत चालला. विलायतेंतील डायरेक्टरांचा तर पुष्कळ माल खरेदी करून पाठवून देण्याचा तगादा. आतां डायरेक्टर तिकडून पैसे पाठविनासे झाले; गलबतें पाठवीत व प्रांताच्या वसुलांतून माल खरेदी करून पाठवावा लागे. गलबतें आल्यामुळें व लढायांमुळें वर्षास तोटा येऊं लागला. ह्मणून १७६९ मध्यें कंपनी सरकारला आपल्या गरजेकरितां कर्ज काढण्याची परवानगी मिळाली व तेव्हांपासून कंपनीचें कर्ज भराभर वाढत गेलें. कंपनीला राज्य मिळाल्यापासून तिचा व्यापार बुडत चालला व कंपनीच्या खाजगी नोकरांचा मात्र व्यापार वाढला. असें झालें तरी डायरेक्टरांना नफ्याबद्दलची मात्र रकम जाऊं लागली. कित्येक दिवसपर्यंत कंपनीचे व्यापारी हिशेब व राजकारणी हिशेब निराळे ठेवीत नसत. यामुळें कर्ज कशामुळें होत असे हें ठरविणें कठीण होतें. कंपनीच्या राज्यविस्ताराबरोबर तिच्या व्यापारास उतार लागत चालला व कंपनीच्या भांडवलावर तर नफ्याच्या रूपानें व्याज सालोसाल जात होतें. हें कर्जाचें एक कारण; व दुसरें कारण, वारंवार होणाऱ्या लढाया. याप्रमाणें कंपनीच्या सारख्या वाढत जाणाऱ्या कर्जावरून व्यापाराची व राज्याची अव्यवस्था होत आहे असें पार्लमेंटच्या नजरेस आलें व तिनें १७७३ मध्यें रेग्युलेटिंग अॅक्ट पास करून कंपनीच्या कारभारावर जास्त देखरेख ठेवण्याची व्यवस्था केली. त्याच वर्षी हिंदुस्थानांतील कंपनीनें निरनिराळे स्वतंत्र प्रांत मोडून सर्व प्रांत

एका अधिकाऱ्याच्या ताब्यांत ठेवावेत व त्याचें नांव हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल ठेवावें असें ठरविलें. या वर्षी कंपनीच्या एकंदर देण्याघेण्याचा हिशेब पार्लमेंटनें घेतला होता व तो प्रसिद्ध झालेला आहे. तो पुढें दिला आहे.

इंग्लंडांत कंपनीची एकंदर मालमिळकत ७७,८४,६९० पौंडांची होती, व कर्ज ९२,१९,११५ पौंड होतें. हिंदुस्थान व चीन मिळून एकंदर मालमिळकत ६३,९७,३०० पौंडांची होती व कर्ज २०,३२,३०६ पौंड होतें व मूळचें भांडवल ४२ लक्ष पौंडांचें होतें. म्हणजे इंग्लंड व हिंदुस्थान मिळून २० लाख पौंडांचा भांडवलांत तोटा झालेला होता.

१८१३ मध्यें व्यापारी हिशेब व राजकीय हिशेब निराळे ठेवण्याचा ठराव झाला व राज्याच्या उत्पन्नांतून लष्करी खर्च, कंपनीच्या सर्व नोकरांचा खर्च व हिंदुस्थानच्या कर्जावरील व्याज हें सर्व भागवावें असें ठरलें, व व्यापारी उत्पन्नांतून व्यापारी देवघेवीचें देणें, कंपनीच्या भागीदारांचा नफा व कंपनीच्या चालचलाऊ कर्जाची फेड हीं करण्याचें ठरलें. परंतु कंपनीचा व्यापार आंतबट्ट्याचाच असल्यामुळें नफ्याची रक्कम व कंपनीच्या सर्व कर्जावरील व्याज राजकीय उत्पन्नांतून दिलें जात असे हें उघड आहे.

१८३३ मध्यें कंपनीच्या जुन्या सनदेची मुदत सरली होती. त्या सनदेची फेरसनद देतांना कंपनीचा आंतबट्ट्याचा व्यापार संपुष्टांत येत चालला होता, म्हणून व कंपनीच्या राज्यविस्तारामुळें राज्यकारभाराचा बोजा वाढत होता म्हणून यापुढें कंपनीनें फक्त राज्यकारभार पहावा व आपला व्यापार अजीबात बंद करावा अशा शर्ती ब्रिटिश पार्लमेंटानें कंपनीच्या फेरसनदेंत घातल्या. या वेळीं ठरलेली जमाखर्ची-व्यवस्था ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. यापुढें कंपनीनें कोणत्याही प्रकारचा व्यापार करूं नये, तर फक्त हिंदुस्थानचा राज्यकारभार पहावा; कंपनी-सरकारचें कर्ज राज्याकरितां काढलेलें असो किंवा ब्रिटिश सरकारास देण्याकरितां काढलेलें असो, सर्व प्रकारच्या कर्जाचा बोजा हिंदुस्थानच्या तिजोरीवर टाकावा. कंपनीच्या मूळ भांडवलावर १०॥ टक्केप्रमाणें हिंदुस्थानच्या तिजोरींतून भागीदारांस व्याज द्यावें व पुढें केव्हांही हिंदुस्थानचें राज्य कंपनी सरकारच्या हातून ब्रिटिश सरकारनें घेतलें तर कंपनीच्या मुख्य भांडवलाच्या प्रत्येक शंभर पौंडांबद्दल दोनशें पौंड भागीदारांस हिंदुस्थानच्या तिजोरींतून द्यावे.

वर सांगितलेंच आहे कीं, १७७३ सालीं हिंदुस्थानचें कर्ज २० लक्ष पौंड होतें. तेव्हांपासून १८५७ पर्यंत कर्जाची वाढ कसकशी होत गेली हें आतां पाहूं. १७७३ पासून १७९२ पर्यंत ७० लक्ष पौंड कर्ज झालें. हैदरअली व टिपू यांच्या लढायांमुळें तें कर्ज १ कोटी पौंडांवर १७९९ मध्यें गेलें. पुढें लॉर्ड वेल्स्ली यांच्या कारकीर्दींत मराठ्यांशीं लढाया सुरू झाल्या, त्यामुळें १८०५ मध्यें तें कर्ज २ कोटींवर गेलें. व १८०७ मध्यें ३ कोटी ७० लक्ष पौंड झालें. पुढें बरींच वर्षे कर्ज वाढलें नाहीं; परन्तु, १८२९ मध्यें तें ३ कोटी झालें. या वर्षी लॉर्ड विल्यम बेंटिंग हे गव्हर्नर जनरल होऊन आले. कंपनीच्या कारकीर्दींतील याच गव्हर्नर जनरलनें हिंदुस्थानचा कारभार लोकांच्या हिताकडे लक्ष देऊन काटकसरीनें चालवून कर्ज कमी केलें. तो हिंदुस्थान सोडून गेला, तेव्हां ४० लाख पौंडांनीं कर्ज कमी झालें होतें. म्हणजे पूर्वीच्या कारकीर्दीप्रमाणें ७ वर्षांत कर्ज मुळींच न वाढतां उलट बरेंच कमी झालें. बेंटिंग गेल्यानंतर पुनः कर्जाच्या वाढीस सुरवात झाली, परन्तु ही वाढ फार नव्हती. हिंदुस्थानच्या कर्जानें मोठी उडी इ. स. १८४० पासून १८४४ पर्यंत मारली. या सालांत लॉर्ड ऑक्लंडला अफगाण लढाई ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या सांगीवरून सुरू ठेवावी लागली व हिंदुस्थानचें कर्ज १८३९ मध्यें ३॥ कोटी होतें तें ४॥ कोटी पौंड झालें. ही लढाई ब्रिटिश सरकारच्या धोरणावरून सुरू झाली; परन्तु एका कोटीचा खर्च हिंदुस्थानास भरावा लागला. या वेळीं कंपनीसरकारनेंसुद्धां या अन्यायाबद्दल ब्रिटिश मुत्सद्यांजवळ तक्रार केली, परन्तु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें सिंधप्रांत काबीज केला गेला. लॉर्ड डलहौसीसाहेबांनीं तर नेटिव्ह संस्थानें खालसा करण्याचा सपाटा चालविला. त्यामुळें व इतर कारणांनीं १८५७ सालचें शिपायांचें बंड झालें. या बंडाच्या शमनार्थ एका वर्षांत १ कोटी पौंड खर्च आला. बंडाचे पूर्वी हिंदुस्थानचें कर्ज ६ कोटी पौंड होतें तेंच दुसरे वर्षी ७ कोटी झालें. बंडाचा एकंदर खर्च ५ कोटी पौंडांवर झाला. पुढें हुंडणावळीच्या भानगडीमुळें व दुसऱ्याही किरकोळ खात्यांकरितां व दुष्काळाकरितां हिंदुस्थानचें राष्ट्रीय कर्ज वाढत चाललें व नंतर रेल्वे आणि पाटबंधारे या उत्पादक कामांकरितां कर्ज होऊं लागलें. १९०८।१९०९ सालअखेरची हिंदुस्थानच्या कर्जाची स्थिति खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

हिंदुस्थान सरकारचें १९०९ अखेर कायमचें कर्ज.

| | | |
|---|---|---|
| हिंदुस्थानांत | ८,९७,१०,७०० | पौंड |
| विलायतेंत | १६,६९,७३,३६९ | पौंड |

व्याज द्यावें लागणाऱ्या कायम व तात्पुरत्या एकंदर कर्जांचा आंकडा.

| | | |
|---|---|---|
| हिंदुस्थानांत | ९,११,११,०६० | पौंड |
| विलायतेंत | १७,६०,८९,३२७ | पौंड |
| एकूण | २६,७२,००,३८७ | पौंड |

टीप—मागें एका टिपेंत सांगितल्याप्रमाणें महायुद्धामुळें व रेल्वे व पाटबंधारे यांवर झालेल्या जास्त खर्चांमुळें हिंदुस्थानचें राष्ट्रीय कर्ज सध्यां फारच फुगलेलें आहे. १९२० मार्च ३१ रोजीं व्याज द्यावें लागणाऱ्या व न लागणाऱ्या एकंदर कर्जांची स्थिति खालीलप्रमाणें होती—

| | | |
|---|---|---|
| हिंदुस्थानांत | २७,२२,४१,५८२ | पौंड |
| विलायतेंत | १९,२६,३५,५५६ | पौंड |
| एकंदर | ४६,४८,७७,१३८ | पौंड |

लढाईच्या खर्चाकरितां म्हणून हिंदुस्थानानें दिलेल्या १० कोट पौंड देणगीपैकीं जवळजवळ ८ कोट पौंड १९१७ व १९१८ मध्यें कर्ज काढून उभे केले गेले आहेत.

# भाग नववा.

## हिंदुस्थानचा जमाखर्च.

मागील भागांत राष्ट्रीय कर्जाची मीमांसा देऊन तेथेंच हिंदुस्थानसरकारच्या कर्जांचा इतिहास व सद्यःस्थिति दिली आहे आतां या पुस्तकाच्या या शेवटल्या भागांत हिंदुस्थानसरकारच्या जमाखर्चाचें सामान्य स्वरूप देऊन व हिंदुस्थानांतील कर हे कराच्या तत्त्वानुरूप योग्य आहेत किंवा नाहींत हें दाखवून हें पुस्तक संपविण्याचा विचार आहे.

सुधारलेल्या राज्यव्यवस्थेला अनुरूप अशीच हिंदुस्थानची जमाखचपद्धति आहे. जरी हिंदुस्थानसरकार लोकसत्तात्मक नाहीं तरीसुद्धां कौन्सिलपुढें हिंदुस्थानच्या जमाखर्चाचा खर्डा आणण्याची पद्धति फार दिवसांची आहे. कौन्सिलसुधारणेपासून लोकप्रतिनिधींना या बाबतींत आतां बरेच नवे अधिकार मिळालेले आहेत व अलीकडे नामदार गोखल्यांसारख्या उत्तम आंकडेशास्त्रज्ञांनीं हिंदुस्थानच्या जमाखर्चावर मार्मिक टीका करून जमाखर्चपद्धतींत पुष्कळ हितकर असे फेरफार घडवून आणलेले आहेत. कारण, पूर्वीच्या पद्धतीवरून हिंदुस्थानसरकारच्या जमाखर्चाची खरी स्थिति समजण्यास कठीण जात असे; कारण या जमाखर्चांत उगीच दुसरे जमाखर्च आणीत असत. उदाहरणार्थ, स्थानिक स्वराज्याच्या जमाखर्चाचे सर्व आंकडे हिंदुस्थानच्या जमाखर्चांत घालीत असत. तसेंच रेल्वेचें सर्व उत्पन्न व सर्व खर्च हिंदुस्थानच्या जमाखर्चांत घालीत. परन्तु वास्तविक रीतीनें या हिंदुस्थानसरकारच्या उत्पन्नाच्या बाबी नव्हेत. सरकार जे धंदे व कारखाने चालवितें त्यांचा खर्च वजा जातां जें उत्पन्न राहील तेंच फक्त सरकारचें खरें उत्पन्न होय. तसेंच करांच्या बाबींतही कांहीं ठरीव रकमा संस्थानिकांस किंवा दुसऱ्या हक्कदारांस द्यावयाच्या असतात किंवा कायद्याप्रमाणेंच आयात मालावरील जकाती तो माल परदेशीं पाठविला तर परत करावयाच्या असतात त्या उत्पन्नांतून वजा केल्या पाहिजेत. सारांश, जेवढे निव्वळ दुबेरजी जमाखर्च आहेत तेवढे वजा करून बाकी राहील तो सरकारचा खरा जमाखर्च होय. परन्तु सरकारच्या प्रसिद्ध झालेल्या जमाखर्चांत हे सर्व दुबेरजी जमाखर्च धरलेले असल्यामुळें हिंदुस्थानसरकारचा आदा व खर्च यांची बरोबर कल्पना येण्यास कठीण जातें. तेव्हां हे सर्व दुबेरजी जमाखर्च वजा करून, हिंदुस्थानसरकारचें निव्वळ उत्पन्न किती व निव्वळ खर्च किती याचे १९०८।१९०९ सालचे आंकडे तयार केले आहेत त्यांवरून कोष्टक खालीं देतों. सरकारच्या उत्पन्नाच्या बाबींचें मागें एका भागांत जें वर्गीकरण केलें आहे त्याला अनुसरून हें कोष्टक केलें आहे.

## हिंदुस्थानसरकारचा १९०८।१९०९ सालचा निव्वळ जमाखर्च.

| जमा. | पौंड | खर्च. | पौंड |
|---|---|---|---|
| **प्रत्यक्ष कर-** | | | |
| जमीनसारा- | १९००५०३८ | व्याज- | +९७९५०७ |
| प्राप्तीवरील कर- | १५४४५७६ | करवसुली खर्च- | +६०२६५७२ |
| प्रांतिक कर- | ५३२९७६ | लष्करी खर्च- | +१९६०२९८८ |
| | २१०८२५९० | मुलकी खर्च- | +२१८५०९७९ |
| **अप्रत्यक्ष कर-** | | दुष्काळी खर्च- | +१६४५१७९ |
| आयातनिर्यात जकाती | ४७२५०८३ | शिलकेंतून केलेला खर्च- | ६६७३४२ |
| अन्तर्जकाती- | ६३१३७७९ | | |
| मिठावरील कर- | ३००८७०३ | | |
| | १४०४७५६५ | एकंदर खर्च | ४९४३७८८२ |
| **फी**- स्टांप- | ४२९३९५५ | १९०८।०९-सालीं जमाखर्चांत | |
| रेजिस्ट्रेशन- | ४२९९७५ | थालेली तूट. | ३७३७७१० |
| | ८७२३९३० | | |
| **उत्पन्न-** | | | |
| अफूवरील कर- | -४६४५११३ | | |
| खंडणी- | +३८७५५७ | | |
| जंगल- | +१६९१८६५ | | |
| टेलिग्राफ- | -४९९७६ | | |
| पोस्ट- | -७११३३ | | |
| रेल्वे- | +१२४२२५० | | |
| पाटबंधारे- | +६०८८२३ | | |
| टांकसाळ- | -८९४७५ | | |
| हुंडणावळ- | -१४४१७ | | |

निव्वळ उत्पन्न ४५७००१७२ पौंड.

१९१९ च्या सुधारणांपूर्वी हिंदुस्थानसरकार व प्रांतिकसरकार यांचा जमा-

खर्च एकत्र दाखविला जात असे. येवढेंच नव्हे तर उत्पन्न व खर्च, नवे कर बसविणें, कर्ज काढणें, किंवा कर्ज देणें वगैरे प्रत्येक बाबतींत हिंदुस्थानसरकार प्रत्येक प्रांतिक सरकारावर ताबा चालवीत असे व यामुळें प्रांतिकसरकारास जमाखर्चाच्या बाबतींत मुळींच स्वातंत्र्य नसे. उत्पन्नाच्या व खर्चाच्या कांहीं बाबी मध्य व प्रांतिक सरकारामध्यें निमेनिम किंवा दुसऱ्या ठरीव प्रमाणांत वाटल्या जात असत. उदाहरणार्थ-जमीनमहसूल, दारूवरील कर, उत्पन्नावरील कर, स्टांपविक्रीचें उत्पन्न वगैरे.

परन्तु १९१९ च्या कायद्यानें प्रांतिक राज्यकारभारांत लोकांना स्वराज्याचा पहिला हप्ता मिळाल्यामुळें, प्रांतिकसरकारावर असलेला हिंदुस्थानसरकारचा ताबा बराच कमी करावा लागला. व इतर बाबींप्रमाणें जमाखर्चाच्या बाबतींत-सुद्धां प्रांतिकसरकारला पुष्कळ स्वातंत्र्य द्यावें लागलें. उत्पन्नाच्या बाबतींत या दोन सरकारांमध्यें वांटणीबद्दल खेंचाखेंच होणार नाहीं. कारण, प्राप्तीवरील कराशिवाय बाकी प्रत्येक कराची पूर्णपणें एका किंवा दुसऱ्या सरकारकडे कायमची नेमणूक झाली आहे. यामुळें हिंदुस्थानसरकारच्या तिजोरींत दरसाल पडणारी तूट प्रांतिकसरकारांच्या ठरावीक वार्षिक खंडणीनें भरून काढण्यांत आली आहे.

१९२१-२२ मध्यें खालीलप्रमाणांत खंडणी ठरविण्यांत आली आहे.

| | | |
|---|---|---|
| मद्रास- | ३४८ | लाख |
| मुंबई- | ५६ | " |
| बंगाल- | ६३ | " |
| यू. पी.- | २४० | " |
| पंजाब- | १७५ | " |
| ब्रह्मदेश- | ६४ | " |
| बिहार ओरिसा- | ० | " |
| सेंट्रल प्रॉविन्सेस- | २२ | " |
| आसाम- | १५ | " |

कालांतरानें ही वार्षिक खंडणी बंद करण्याचें ठरलें आहे. व त्याप्रमाणें हिंदुस्थानसरकारनें आपल्या खर्चांत काटकसर करावी अशी शिफारस करण्यांत आली आहे.

त्याचप्रमाणें विशिष्ट नवे कर बसविण्यांत व विशिष्ट कामांकरितां कर्ज काढण्यांत प्रांतिकसरकारला जास्त सवड मिळाली आहे. या सर्व नियमांचा असा परिणाम होणार आहे कीं, प्रांतिकसरकारला जमाखर्चाच्या बाबतींत पुष्कळच स्वातंत्र्य मिळेल व त्यामुळें प्रांतिक बाबतींत तरी लोकमताला अधिकार

गाजाविण्यास जास्त मोकळीक मिळेल.

ही विभागणी होण्यापूर्वी म्हणजे १९१९–२० ह्या वर्षी हिंदुस्थानसरकारचा जमाखर्च खालील कोष्टकाप्रमाणें होता. सरकारच्या उत्पन्नाच्या बाबींचें मागें एका भागांत जें वर्गीकरण केलें आहे त्याला अनुसरून हें कोष्टक केलें आहे.

## हिंदुस्थानसरकारचा १९१९–२० सालचा निव्वळ जमाखर्च.

| उत्पन्न ( १ पौंड = १५ रु. ) | | | खर्च | |
|---|---|---|---|---|
| **प्रत्यक्ष कर** | | | | |
| जमीन सारा. | २२,०९०,८०० | | व्याज | ४,५५४,१०० |
| प्राप्तीवरील कर. | १५,७७१,००० | | मुलकी खर्च | २३,६८७,६०० |
| | ३७,८६१,८०० | | पब्लिक वर्क्स | ६,५४५,५०० |
| **अप्रत्यक्ष कर** | | | लष्करी खर्च | ५२,९५०,००० |
| आयातनिर्यात जकाती | १४,९१९,५०० | | करवसुली खर्च | १२,१६२,८०० |
| अन्तर्जकाती | १२,७५२,३०० | | इतर मुलकी खर्च | ४,६३५,४०० |
| मिठावरील कर | ३,७५४,००० | | दुष्काळी खर्च | १,२४८,१०० |
| | ३१,४२५,८०० | | एकूण खर्च | १०५,७८३,५०० |
| **फी** | | | | |
| स्टांप | ७,२२३,१०० | | | |
| | ७,२२३,१०० | | | |
| **उत्पन्न** | | | | |
| अफूवरील कर | २,९९०,८०० | | | |
| पोस्ट व तारखातें | १,२७१,५०० | | | |
| टांकसाळ | १,३१३,५०० | | | |
| रेलवे | ७,०१७,१०० | | | |
| पाटबंधारे | १,६२२,४०० | | | |
| इतर खातीं | ५,०४५,७०० | | | |
| | १९,२६१,००० | | | |
| एकूण उत्पन्न | ९५,७७१,७०० | | | |
| तूट | १०,०१,१८,००० | | | |
| | १,०५,७८३,५०० | | | |

या सालीं (१९०८-९) रेल्वेच्या उत्पन्नांत फारच तोटा आल्यामुळें व आयात-निर्यात जकाती व मिठावरील कर यांमध्येंही उत्पन्न कमी झाल्यानें एकंदर जमाखर्चांत तूट आली आहे. शिवाय या जमाखर्चांत सर्व दुबेरजी रकमा गाळून टाकल्यामुळें निरनिराळया खात्यांतील जमा मुळींच नाहींत. एका दृष्टीनें त्या बाबी सरकारच्या उत्पन्नाखालीं येतील व त्या सुमारें ३० लाख पौंड असतात असें समजण्यास हरकत नाहीं. तसेंच सरकारी कारखान्यांत व विशेषतः रेल्वेंत तोटा आला नाहीं तर यापासून एकंदर उत्पन्न वीस लाख पौंड येतें. एकंदर करांचें सरासरी ४ कोटी ५० लाख पौंड उत्पन्न येतें. म्हणजे कर व कारखाने मिळून ठोकळ मानानें हिंदुस्थान सरकारचें पांच कोटी पौंड निवळ उत्पन्न आहे. त्यांपैकीं २ कोटी पौंड लष्करी खर्चाला जातात; सुमारें ७० लक्ष पौंड कर्जावरील व्याज व करवसुलीकरतां होणारा खर्च यांकरितां खर्च होतात व बाकीचे २ कोटी ३० लक्ष पौंड एकंदर प्रजेच्या उपयोगाकरितां खर्च होतात. आतां यांपैकीं इंग्लंडांत किती खर्च होतो व हिंदुस्थानांत किती होतो हेंही पाहाण्यासारखें आहे. एकंदर ५ कोटी पौंडांपैकीं १ कोटी विलायतेस तेथल्या खर्चाप्रीत्यर्थ लागतात. यांनाच 'होमचार्जेस' म्हणतात. २ कोटी पौंड लष्करी खर्चाला लागतात व २ कोटी मुलकी खर्चाला लागतात. म्हणजे हिंदुस्थानच्या एकंदर उत्पन्नाचा पांचवा हिस्सा उत्पन्न विलायतेंत खर्च होतें व मागें एका भागांत सांगितल्याप्रमाणें या कारणानेंच हिंदुस्थानचा निर्यात व्यापार आयात व्यापारापेक्षां नेहमीं जास्त असतो. कारण हे १ कोटी पौंड पैशाच्या रूपानें विलायतेंत जात नाहींत तर मालाच्या रूपानें जातात. वरील आंकडे एकंदर हिंदुस्थानच्या जमाखर्चाची ढोबळ कल्पना येण्याकरितां दिलेले आहेत. आतां हेच आंकडे रुपयांमध्यें दिल्यानें निवळ मराठी वाचकांस जास्त चांगली कल्पना येईल. हिंदुस्थानसरकारचें सामान्यतः ७५ कोटी रुपयांचें उत्पन्न आहे. यांपैकीं ३० कोटी रुपये लष्करी खर्च आहे, ३० कोटी रुपये मुलकी खर्च आहे व १५ कोटी रुपये विलायतेंत खर्च होतात. यांपैकीं अफूचें सुमारें ७ कोटी रुपयांचें उत्पन्न हें खरोखरी चिनी लोक देतात. तेव्हां कराचा संपात काढतांना हें उत्पन्न वजा केलें म्हणजे ६८ कोटी रुपयांचें उत्पन्न हिंदी प्रजेपासून हिंदुस्थानसरकारला मिळतें. ब्रिटिश हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या बावीस कोटींच्यावर आहे.

यावरून पाहिलें असतां एकंदर करांचा संपात दर माणशीं तीन रुपये बसतो. यामध्यें सरकारच्या उत्पन्नाच्या बाबी व खंडण्या धरल्या आहेत; परंतु खंडणीचा आंकडा जमेंत धरण्यासारखा नाहीं; कारण ही रकम संस्थानिकांकडून येते. त्याचा बोजा ब्रिटिश मुलुखांतील प्रजेवर पडत नाहीं. उत्पन्नाच्या बाबी शेवटीं लोकांच्या उत्पन्नांतूनच येतात. तेव्हां करांच्या संपाताच्या बाबतींत त्या जमेस धरण्यास हरकत नाहीं. परंतु या दोन्ही बाबी कमी केल्या तरी दर माणशीं करांचा संपात २॥ रुपये पडतो. ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रजेवरील करांच्या संपाताचा विचार करते वेळीं आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. ब्रिटिश व संस्थानी दोन्ही सरकारच्या प्रजेवर मीठ, जकात, चलनी, पोस्ट, तार, रेल्वे वगैरे उत्पन्नांचें ओझें पडतें. संस्थानी अंमलाखालीं एक तृतीयांश मुलुख व एक चतुर्थांश प्रजा हिंदुस्थानपैकीं आहे. तेव्हां वरील खात्यांच्या उत्पन्नांपैकीं एक तृतीयांश निदान एक चतुर्थांश उत्पन्न संस्थानी प्रजेपासून मिळतें; व त्यामुळें संपाताचा आंकडा तितका कमी होणारा आहे.

आतां हिंदुस्थानच्या निरनिराळ्या करांचें करांच्या तत्त्वानुरूप थोडेंसें विवेचन केलें पाहिजे. हिंदुस्थानसरकारचा मुख्य कर म्हणजे जमीनसारा होय. तेव्हां प्रथम जमीनसाऱ्याचा विचार करूं. याबद्दल दोन वादग्रस्त प्रश्न आहेत. एक, जमीनसारा हा एक कर आहे कीं खंड आहे? व दुसरा, जमीनसारा कायमचा असणें चांगलें किंवा मुदतीचा असणें चांगलें? तेव्हां या दोन प्रश्नांचा प्रथमतः विचार करूं. दुसऱ्या प्रश्नाचा थोडासा विचार मागें तात्विक भागांत झालाच आहे. मोठी शेती चांगली कीं छोटी शेती चांगली, या प्रश्नाच्या विवेचनाचे वेळीं व सामाजिक पंथी योजनांचा विचार करण्याच्या वेळीं या प्रश्नाचा निकाल पर्यायेंकरून सांगण्यांत आला आहे. जमिनीवरील कर कायमचा न ठरवितां तो मुदतीचा व कालेंकरून वाढणारा असावा ही कल्पना अभिमत अर्थशास्त्रकार **रिकार्डो व मिल** यांच्या अनुपार्जित वाढीच्या उपपत्तीवर बसविलेली आहे, हें मागें सांगितलेंच आहे. देशाच्या भरभराटीबरोबर जमिनीचा खंड सारखा वाढत जातो व त्याबद्दल जमीनदाराला कांहीं एक खटपट करावी लागत नाहीं. म्हणून या भाड्याचा कांहीं अंश सरकारनें घेणें रास्त आहे. असा जमिनीवरील कर हा आपोआप वाढत जाणारा व ज्याचा कोणावरही संपात पडत नाहीं असा

कर आहे असें अभिमतपंथी मत आहे. परंतु हें मत सर्वांशीं खरें नाहीं, असें मागें दाखविलें आहे. कारण अनुपार्जित वाढ ही फक्त जमिनीच्या उत्पन्नांत होते व दुसऱ्या कोठेंच होत नाहीं असें नाहीं. नफ्यांत व इतर उत्पन्नांच्या बाबींतही अनुपार्जित वाढीचा अंश असतो. तेव्हां जमिनीच्या उत्पन्नाचा हा विशेष आहे असें मानण्याचें कारण नाहीं. शिवाय जमिनीचा खंड हा नेहमीं वाढतच गेला पाहिजे, असाही कांहीं नियत नियम नाहीं. केव्हां केव्हां व कांहीं कांहीं परिस्थितींत जमिनीचे खंड उतरतात: या ठिकाणीं जमीनदारांचा अनुपार्जित तोटाही होतो. तेव्हां जर सरकार अनुपार्जित नफ्याच्या वाढीचें भागीदार होणार, तर न्यायानें पाहतां तें अनुपार्जित तोट्याचेंही भागीदार झालें पाहिजे. परंतु वस्तुस्थिति व्यवहारांत तशी नाहीं. तेव्हां जमीनसारा हा नेहमीं वाढत जाणारा कर आहे ही कल्पना बरोबर नाहीं; त्या अर्थी मुदतीचा सारा चांगला कीं कायमचा सारा चांगला, या प्रश्नाचा निकाल नफ्याच्या अनुपार्जित वाढीच्या कल्पनेवरून करण्यांत अर्थ नाहीं. या प्रश्नाचा निकाल, कोणती पद्धति संपत्तीच्या उत्पादनास जास्त अनुकूल आहे हें ठरवून त्यावरून केला पाहिजे. या दृष्टीनें कायम साऱ्याची पद्धति निर्विवाद फायदेशीर ठरते. कायमसाऱ्याच्या पद्धतींत जमीनदारांना मालकीची जाणीव जास्त असते व आपल्या शेतीची आपण सुधारणा केली तर तिचा पूर्ण फायदा आपल्या मुलाबाळांना मिळणार आहे, अशी स्वामित्वाच्या जाणीवेपासून उत्पन्न होणारी खात्री शेतीच्या सुधारणेस अवश्य आहे असें छोट्या शेतीच्या विवेचनांत दाखविलें आहे. तेव्हां त्याची पुनरावृत्ति येथें करण्याचें प्रयोजन नाहीं. मुदतीच्या साऱ्याच्या पद्धतींत ही खात्री व ही जाणीव कधींही वाटणें शक्य नाहीं. तिच्यामध्यें आपल्या शेताची सुधारणा केल्यास आपल्यावरील सारा वाढेल ही धास्ती जमीनदारांना नेहमीं राहते. जरी लांब मुदतीच्या साऱ्यामुळें—उदाहरणार्थ, ३०।३० वर्षांच्या मुदतीच्या नियमामुळें—हा आक्षेप थोडा कमी होतो, तरी पण साऱ्याची मुदत सरत आली म्हणजे जमीनदार व शेतकरी शेताची मुद्दाम हयगय करूं लागतात. निदान अशा वेळीं जास्त सुधारणा करण्याचे भरीस पडत नाहींत ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. वरील विवेचनावरून कायमच्या साऱ्याची पद्धति ही अर्थशास्त्रदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या जास्त श्रेयस्कर आहे यांत शंका रहात नाहीं. हिंदुस्थानामध्यें अव्वल इंग्रजीमध्यें इंग्रजी मुत्स-

द्दोही कायमच्या साऱ्याच्या पद्धतीला अनुकूल होते. कायमच्या साऱ्याच्या पद्धती-खेरीज देशांत सुखवस्तु मध्यम वर्ग तयार होणार नाहीं; तिच्या प्रचारानेंच सर्वत्र शेतीची सुधारणा झपाट्यानें होईल व लोकांची राजनिष्ठा दृढतर होईल. तेव्हां या कारणाच्या जोरावर ही पद्धति सुरू करावी असे हुकूमही सुटलेले होते. कोठें कोठें जाहीरनामेही लागलेले होतें. त्या काळीं जमिनीच्या उत्पन्नाच्या मानानें सारा फारच असल्यामुळें खंडाच्यापैकीं कोठें कोठें शेंकडा ९० या प्रमाणांत सरकारसारा आकारला होता. या जबर दराच्यामुळें लोकही कायमच्या साऱ्याच्या पद्धतीबद्दल मोठेसे उत्सुक नव्हते. परंतु पुढें या अनुपार्जित वाढीच्या कल्पना समाजांत पसरल्या व वाढतें उत्पन्न सरकारनें कां सोडावें अशी स्वार्थबुद्धि बळावली व या कायमच्या साऱ्याच्या प्रश्नाचा हिंदी प्रजेच्या कल्याणाविरुद्ध निकाल झाला. परंतु शास्त्रीयदृष्टीनें कायमच्या साऱ्याची पद्धति श्रेयस्कर होय यांत संदेह नाहीं. यापुढें तरी सरकारनें या पद्धतीचा अवलंब अविलंबेंकरून करणें इष्ट आहे. सरकार ही पद्धती सुरू करील तरच शेतीची सुधारणा जास्त झपाट्यानें होईल. जोंपर्यंत साऱ्याच्या वाढीचा बागुलबोवा लोकांच्या डोळ्यांपुढें राहील तोंपर्यंत शेतींत भांडवल घालण्यास लोकांनीं कचरावें हें मानवी स्वभावास अनुसरूनच आहे.

आतां जमिनीच्या साऱ्याबद्दलचा दुसरा वादग्रस्त प्रश्न राहिला. तो प्रश्न म्हणजे सारा हा खंड आहे कीं कर आहे? त्याचा आतां विचार करूं.

जमीनलागवडीचा सर्व खर्च वजा जातां जी उत्पन्नापैकीं शिल्लक राहते ती शिल्लक कुळांच्या चढाओढीच्या अमदानींत जमिनीच्या मालकास जाते व तिलाच जमिनीचें भाडें म्हणतात, असें या ग्रंथाच्या तिसऱ्या पुस्तकांत सांगितलें आहे. आतां येथें जमिनीचा सारा खंडाच्या निम्म्यापेक्षां जास्त असूं नये असा नियम आहे, त्या अर्थी सरकार सर्व खंड घेत नाहीं हें उघड आहे. परंतु ब्रिटिश अमलाच्या अव्वल अमदानींत खंडाच्या शेंकडा ९० पर्यंतसुद्धां सरकार सारा घेत असे; परंतु पुढें खंडाच्या अर्ध्यापेक्षां जास्त सारा घ्यावयाचा नाहीं असा सरकारनें आपल्याला निर्बंध करून घेतला. परंतु जमीनसाऱ्याला कर म्हणावयाचा कीं खंड म्हणावयाचा, या प्रश्नाच्या मुळाशीं दुसरा एक प्रश्न आहे तो हा कीं, हिंदुस्थान-सरकार सर्व जमिनीचें मालक आहे कीं काय? जमिनीची सर्व मालकी सरकारची

आहे अशी कल्पना केली तर जमीनसारा हा खंड बनतो. मग सरकार अर्थशास्त्रदृष्ट्या शक्य तितका खंड घेवो किंवा मेहेरबानीखातर कांहीं अंश प्रजेला ठेवो. परंतु सरकार जर जमिनीचें मालक नसलें तर मग जमीनसारा हा कर होतो, मग तो कर कितीही जबर असो. युरोपांतून युरोपियन लोक प्रथमतः इकडे आले तेव्हां त्यांना युरोपांतील जहागिरीपद्धतीची माहिती होती. येथें आल्यावर त्यांना जमिनीच्या बाबतींत जहागिरीपद्धतीचें साम्य दिसून आलें. जहागिरीपद्धतींत राजा हा सर्व जमिनीचा मालक समजला जात असे; यामुळें हिंदुस्थानांतही राजा किंवा सरकार हेंच जमिनीचें मालक असलें पाहिजे, अशी युरोपियन लोकांची समजूत झाली व हिंदुस्थानांत जमिनीची खाजगी मालकी नाहींच असें मत ते प्रतिपादन करूं लागले. हिंदुस्थानांत वारंवार होणारे राज्याचे फेरबदल हेही हा समज दृढ करण्यास कारणीभूत झाले. कारण देश जिंकणारा, राज्य जिंकलेला देश आपला असें मानूं लागे, असें युरोपियनांस वाटे. व पूर्वीचे राजे हे जमिनीचे मालक होते व त्यांचे जागीं जर ब्रिटिश सरकार आलें आहे तर अर्थात् त्या पूर्वीच्या राजांचे सर्व हक्क हिंदुस्थानसरकारास प्राप्त झाले आहेत व ह्मणूनच हिंदुस्थानांतील सर्व जमीन सरकारची, अशा प्रकारचा कोटिक्रम या प्रश्नासंबंधें लढविला जातो. परंतु विल्कस व बेडन पॉवेल हे दोघेही ग्रंथकार या मताच्या विरुद्ध आहेत. त्यांच्या मतें हिंदुस्थानांत खाजगी मालकीची कल्पना फार जुन्या काळापासून चालत आलेली आहे. जो मनुष्य जमिनीवरील जंगल काढून टाकून ती जमीन कृषियोग्य करतो तो जमिनीचा मालक होय, असें मनुस्मृतींत स्पष्टपणें विधान केलेलें आहे. तसेंच राजाला जमिनीच्या उत्पन्नाचा सहावा भाग कर म्हणून घेण्याचा अधिकार आहे व अडचणीच्या प्रसंगीं हा कर एकचतुर्थांश केला तरी चालतो असेंही तींत सांगितलें आहे. जमिनीच्या उत्पन्नाचा सहावा भाग राजा कर ह्मणून घेतो, त्याचप्रमाणें प्रजेच्या पापपुण्याचा सहावा हिस्सा राजाला जातो असेंही तींत विधान केलेलें आहे. यावरून मनुस्मृतिकाळीं जमिनीवरील खाजगी मालकीची कल्पना होती व सरकार सर्व जमिनीचें मालक समजलें जात नव्हतें असें सिद्ध होतें. मात्र सरकार हें जमिनीच्या उत्पन्नाचा सहावा हिस्सा कर ह्मणून घेत असे. परंतु हा वांटा ह्मणजे मालकी हक्काबद्दल नव्हे. हा कर धान्यांत घेतला जात असे किंवा तो उत्पन्नाच्या एखाद्या

प्रमाणांत हिस्सेरशीनें घेतला जात असे. या कर घेण्याच्या तऱ्हा झाल्या. यावरून सरकार जमिनीचें मालक झालें असा त्याचा अर्थ होत नाहीं. कर न दिल्यास जमीन सरकारास विकतां येते यावरूनही सरकारची मालकी सिद्ध होत नाहीं. जमिनींवर कराचा पहिला बोजा व इतर कर वसूल करण्याकरितां ज्याप्रमाणें केव्हां केव्हां कडक उपाय योजावे लागतात, त्यांपैकींच जमीनविक्री हा एक उपाय आहे. जमीनविक्रीच्या किंमतींतून साऱ्याची रकम पुरी वसूल झाल्यावर जी शिल्लक राहील त्यावर जमिनीच्या मालकाचा हक्क असे व ती रकम त्याला परत मिळत असे. यावरूनही जमिनीवरील खाजगी मालकीहक्कच शाबीत होतो. नापीक जमिनीवरील सरकारच्या मालकीहक्कावरून किंवा ज्याला कोणीही वारस नाहीं त्याची जमीन सरकारजमा होते यावरून किंवा राजद्रोहाकरितां अपराध्याची जमीन खालसा करतां येते यावरून सर्व जमिनीवरील सरकारची मालकी शाबीत होत नाहीं. कारण हे सर्व अधिकार सरकार सर्व प्रजेचें संरक्षक या नात्यानें त्याजकडे येतात. व हें जंगम व स्थावर अशा दोन्ही मालमत्तेला लागू आहे. परंतु हे हक्क जंगम मिळकतीसंबंधानें सरकारला आहेत यावरून सरकार सर्व लोकांच्या जंगम मिळकतीचें मालक असें कोणीही समंजस मनुष्य ह्मणणार नाहीं. त्याप्रमाणेंच स्थावर मिळकतीसंबंधानें हे हक्क सरकारला असले ह्मणून सर्व जमीन सरकारची असें कोणीही ह्मणणार नाहीं. तेव्हां ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें किंवा प्रत्यक्ष व्यवहाराच्या दृष्टीनें पाहिलें किंवा सारासारविचाराच्या दृष्टीनें पाहिलें तरी देशांतील सर्व जमीन सरकारची हें मत मुळींच सिद्ध होत नाहीं. तर उलट जमीन खाजगी व्यक्तीची हीच कल्पना हिंदुस्थानांत पूर्वापार चालत आलेली आहे व म्हणून ती आजही मान्य असली पाहिजे असेंच ह्मणणें प्राप्त आहे.

वास्तविक हा प्रश्न आतां निव्वळ तात्विक आहे. सरकारही सर्व जमिनीचा मालकीहक्क सांगूं इच्छित नाहीं हें खरें आहे; तरी पण हिंदुस्थानांत जमिनीच्या मालकीसंबंधाची काय व्यवस्था होती हें जाणणें अवश्य आहे. कारण जमीनसारा हा कर नाहीं तर खंडाचा अंश आहे व ह्मणून त्याचा बोजा प्रजेवर मुळींच पडत नाहीं; कारण खंड हा कोणातरी मालकाला द्यावा लागणारच, तेव्हां जमीनसारा हा हिंदुस्थानच्या कराच्या संपाताचा विचार करतांना जमेत धरतां कामा नये, असे केव्हां केव्हां व कोठें कोठें उद्गार निघतात. म्हणून या तात्विक प्रश्नाचा

निकाल करणें जरूर आहे. कारण जमीन सरकारची नाहीं असें सिद्ध झालें म्हणजे जमीनसारा हा कर नाहीं असें म्हणण्यास जागा राहणार नाहीं व मग त्याचा बोजा लोकांवर पडत नाहीं हें म्हणणेंही आपोआप नाहींसें होईल. असो.

बाकी हा कर ॲडाम स्मिथच्या बहुतेक तत्वानुरूप आहे. कारण हा कर शास्त्रीय रीतीनें जमिनींचा मगदूर ठरवून तरी बसविलेला असतो किंवा प्रत्यक्ष खंडाच्या ठरीव प्रमाणांत तरी बसविलेला असतो. यामुळें तो समतातत्वानुरूप आहे. शिवाय तो निश्चित आहे, यामुळे यांत लांचलुचपतीला, किंवा जुलूमजबरदस्तीला अवकाश नसतो. हा कर सोयीच्या मात्र तत्वाविरुद्ध आहे. कारण पुष्कळ ठिकाणीं हा कर देण्याच्या वेळेच्या ज्या तारखा ठरविल्या आहेत त्या फार गैरसोयीच्या आहेत. शेतांतील पीक तयार होण्याचे आधींच साऱ्याच्या हप्त्याची मागणी केली जाते व इंग्रजी अंमलांत शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचें एक कारण ही सारा देण्याची गैरसोय हें होय. सारा–निदान हल्लीं तरी–जबर आहे असें म्हणतां येणार नाहीं. परंतु ज्या वेळीं शेतकऱ्याच्या हातीं पीक आलेलें नसतें किंवा ज्या वेळीं त्याच्या पिकाला गिऱ्हाईक मिळण्याचा संभव कमी अशा वेळीं सारा देण्याची मुदत ठरविल्यामुळें शेतकऱ्यांना सावकाराच्या दारीं जाण्याचा प्रसंग सरकार आणतें असें सिद्ध होतें. तेव्हां जमीनसाऱ्याच्या बाबतींत सोयीच्या वेळीं सारा घेण्याची सुधारणा होणें अवश्य आहे.

गेल्या दहा वर्षांत जमीनमहसूल देण्याच्या नियमामध्यें पुष्कळ इष्ट फरक झालेले आहेत. कर देण्याच्या तारखा रयतेस सोइस्कर होतील अशा बेतानें ठरविल्या आहेत व शेतसारा मनीऑर्डरीनें भरण्याची सोय केली आहे. शिवाय अवर्षण किंवा अतिवृष्टि किंवा अन्य कारणानें पिकाची नुकसानी झाल्यास साऱ्याची माफी देण्याचे नियमसुद्धां पुष्कळ लवचिक करण्यांत आले आहेत.

दुसरा प्रत्यक्ष कर प्राप्तीवरील कर होय. हा करही करांच्या तत्वाविरुद्ध नाहीं. विशेषतः ५०० पासून १००० रु. उत्पन्नावर या कराची मर्यादा केल्यापासून यासंबंधीं कांहीं तक्रार राहिली नाहीं. सध्यां ही मर्यादा २००० रुपयांपुढें नेण्यांत आलेली आहे. मात्र हा कर दरवर्षी बसविला जाणारा असल्यामुळें यामध्यें कराच्या निश्चितपणाच्या तत्त्वाची अंमलबजावणी होत नाहीं. शिवाय कराची आकारणीही फक्त सरकारी अंमलदारांच्याच हातीं असल्यामुळें हा कर

लोकांवर नाहक वाढविला जाण्याची भीति असते. तसेंच केव्हां केव्हां या कराच्या आकारणींत लांचलुचपतीला अवसर मिळण्याचा संभव असतो. तेव्हां या बाबतींत सुधारणा म्हणजे करआकारणीच्या कामांत सरकारी अंमलदाराबरोबर एखादा लोकप्रतिनिधि नेमला जावा व करआकारणी दोघांच्या सल्ल्यानें व्हावी ही होय.

अप्रत्यक्ष करांपैकीं प्रमुख कर म्हणजे मिठावरील कर हा होय. हा कर मात्र अर्थशास्त्राच्या दृष्टीनें चांगला नाहीं. हा कर शक्य तेव्हां काढून टाकणें अवश्य आहे, असें इंग्रजी मुत्सद्यांनींसुद्धां वेळोवेळीं कबूल केलें आहे. प्रथमतः हा कर जीविताच्या आवश्यकावर आहे व आवश्यकावर कर बसवूं नये असें अर्थशास्त्रीय मत आहे. कारण आवश्यकांत ही वस्तु गरीबांना व श्रीमंतांना सारखीच जरूर असल्यामुळें हा कर गरीब-श्रीमंतांवर सारखाच पडतो, म्हणजे तो समतेच्या तत्त्वाविरुद्ध जातो हें उघड आहे. शिवाय या करामुळें हिंदुस्थानांत शास्त्रीयदृष्टीनें आरोग्याला जितकें मीठ खाणें अवश्य आहे तितकें मीठ घेण्याइतकें सामर्थ्य गरीब लोकांत नसल्यामुळें हा कर प्रजेच्या आरोग्याच्या दृष्टीनें अहितकर आहे.

आयात-निर्यात मालावरील जकातींबद्दल वादच नाहीं. हे कर योग्यच आहेत. सरकारच्या उत्पन्नाकरितां असे कर बसविणेंही योग्य आहे. बहुतेक सुधारलेल्या सर्व देशांत सरकारच्या उत्पन्नाचा बराच मोठा भाग याच जकातींपासून उभारला जातो. इंग्लंडांतील बराच मोठा भाग तर कांहीं ठळक आयात मालावरील जकातींपासून उभारला जातो. यंदांचे हिंदुस्थानच्या जमाखर्चांत ही सुधारणा घडवून आणलेली आहे. तंबाखू व चांदी या दोन आयात मालांवर जकात बसविली आहे. या जकाती अगदीं योग्यच आहेत. हिंदुस्थानांतील निर्यात जकातीस अगदींच योग्य असा पदार्थ म्हणजे बंगाल्यांतील ताग होय. या पदार्थाचा हिंदुस्थानाला जसा कांहीं मक्ताच मिळालेला आहे. व हा कर हिंदुस्थानवासीयांवर न पडतां अफूच्या उत्पन्नाप्रमाणें परकी लोकांवर पडणारा आहे. तेव्हां पुढेंमागें ही आयात जकातही हिंदुस्थानच्या जमाखर्चांत अन्तर्भूत व्हावी व ती होईल यांत शंका नाहीं.

अन्तर्जकातींपैकीं देशी कापडावरील जकात मात्र अगदीं अन्यायाची आहे. व ही गोष्ट हिंदुस्थानांतील अस्वस्थतेच्या कारणांचा सविस्तर विचार करणाऱ्या लंडन टाइम्सच्या बातमीदारानेंसुद्धां कबूल केली आहे. यावरून हा अन्याय

किती उघड आहे हें दिसून येतें. हा कर अप्रतिबद्ध व्यापाराच्या तत्त्वपालना-करितां ठेवण्यांत आला आहे असें वरकरणीं सांगण्यांत येतें; परंतु अर्थशास्त्रा-प्रमाणें सरकारच्या उत्पन्नाकरितां आयात जकाती बसविण्यानें अप्रतिबद्धव्यापा-राचें तत्त्व मुळींच उल्लंघिलें जात नाहीं. शिवाय देशी कापड व आयात विलायती कापड यांमध्यें चढाओढ मुळींच नाहीं. कारण जितक्या बारीक धाग्याचें कापड आयात होतें तसलें कापड देशी गिरण्यांत होत नाहीं. तर येथें माल फक्त जाड्याभरड्या सुताचा होतो व तो माल बहुतेक गरीब लोक वापरतात. तेव्हां या अन्तर्जकातींचा बोजा गरीबांवर पडतो हें एक, व ह्याच्या योगानें गिरणीच्या धंद्याच्या गळयांत एक विनाकारण धोंड अडकविल्यासारखें होऊन त्याच्या प्रगतीला अडथळा येतो हें दुसरें. तेव्हां कोणत्याही दृष्टीनें पाहतां ही जकात अन्यायाची आहे असें म्हणणं भाग आहे. बाकीच्या करांसंबंधीं किंवा सरकारच्या दुसऱ्या उत्पन्नाच्या बाबींसंबंधानें फारसें लिहिण्याचें प्रयोजन नाहीं; कारण त्या सर्व अर्थशास्त्राच्या कोणत्याही तत्त्वाविरुद्ध आहेत. त्यासंबंधीं पुष्कळ वादग्रस्त प्रश्न आहेत, परंतु ते अर्थशास्त्रविषयक नसल्यामुळें त्यांचा येथें विचार करण्याचें प्रयोजन नाहीं.

महायुद्धामुळें वाढलेला खर्च भागविण्याकरितां आयात-निर्यात जकातींत आतां पुष्कळ फेरफार करण्यांत आला आहे. साखर, तंबाखू, दारू व कापड यांवरील जकात पुष्कळच वाढविली आहे. उलटपक्षीं कापडावरील अन्तर्जकात पूर्वीइतकीच कायम ठेविली आहे. अर्थात् अप्रतिबद्ध व्यापाराचें तत्त्व हिंदुस्थान सरकारनें केव्हांच सोडून दिलें आहे. १९१९ च्या कायद्यानें जरी हिंदुस्थानास पूर्ण आर्थिक स्वातंत्र्य देण्यांत आलें नाहीं, तरी जर एखाद्या विवक्षित व्यापारी धोरणांत हिंदुस्थानसरकारचें व लोकनियुक्त मध्यवर्ती कौन्सिलचें एकमत्य असलें तर तें धोरण ब्रिटिश सरकारनें सहसा बदलूं नये असा निर्बंध घालण्यांत आला आहे. हें व्यापारी धोरण काय असावें याचा सांगोपांग विचार करण्याकरितां, मागें सांगितल्याप्रमाणें, नुकतेंच एक, सर इब्राहिम रहिमतुल्ला यांचे अध्यक्षते-खालीं, कमिशन नेमण्यांत आलें आहे.

# अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें.

## पुस्तक ६ वें.

### हिंदुस्थानदेशाची सद्यः सांपत्तिक स्थिति.

मागील पांच पुस्तकांत अर्थशास्त्राच्या निरनिराळ्या अंगांचें काळ व जागा यांच्या अवकाशाप्रमाणें यथामति विवेचन केलें. आतां या शेवटल्या पुस्तकांत मथळ्यांत लिहिलेल्या विषयाचें प्रतिपादन करावयाचें आहे; परंतु या विषयाचें विवेचन करणें कांहीं स्वाभाविक व कांहीं आगंतुक कारणांनीं बरेंच अडचणीचें झालेलें आहे.

प्रथमतः मथळ्यांतील विषयाविवेचन हें शास्त्राच्या तात्विक सिद्धांतांचें प्रत्यक्ष व्यवहाराला उपयोजन होय. हें करणें नेहमींच अवघड व बिकट असतें. कारण अशा उपयोजनाला दुहेरी ज्ञान लागतें. एक शास्त्राच्या तत्त्वांचें व सिद्धांतांचें पूर्ण ज्ञान व दुसरें, ज्या परिस्थितीला या तत्वांचें व सिद्धांतांचें उपयोजन करावयाचें त्या परिस्थितीचें पूर्ण ज्ञान. हें दुसरें ज्ञान निव्वळ व्यासंगानें, वाचनानें किंवा विचारानें येणारें नाहीं, तर त्याला अनुभव व प्रत्यक्ष व्यवहाराशीं संबंध लागतो व अशी ज्ञानाची जोडगोळी थोड्याच लोकांच्या हातीं असते.

या विषयाचें विवेचन अडचणीचें होण्याचें दुसरें कारण यासंबंधींच्या माहितीचा अभाव. कारण हिंदुस्थानची सद्यःसांपत्तिक स्थितीची परीक्षा करून त्यावर उपाययोजना करण्याचा हा विषय आहे. म्हणून हा रोग्याला औषध देण्यासारखा बिकट आहे. प्रथमतः रोगाची बरोबर चिकित्सा झाली पाहिजे; परन्तु ही चिकित्सा बरोबर होण्यास रोग्याच्या आजपर्यंतच्या प्रकृतिमानाची पूर्ण माहिती पाहिजे. तेव्हां हिंदुस्थानची सद्यःसांपत्तिक स्थिति कळण्याकरतां हिंदुस्थानच्या पूर्वस्थितीची माहिती पाहिजे; परंतु ही माहिती संगतवार अशी कोठेंही नाहीं.

कारण युरोपांतील देशांप्रमाणें हिंदुस्थानचा औद्योगिक इतिहास उपलब्ध नाहीं. कारण तशा दृष्टीनें अजून हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास लिहिलेला नाहीं व त्याच्या अभावामुळें सद्यःस्थितीसंबंधीं केलेला अंदाज चुकण्याचा संभव असतो व त्यामुळें उपाययोजनाही चुकण्याचा संभव आहे.

हिंदुस्थानच्या पूर्वस्थितीच्या अज्ञानामुळेंच या विषयाच्या विवेचनांत तिसरी एक अडचण उत्पन्न झालेली आहे. ही अडचण म्हणजे तीव्र मतभेदाची होय. ज्याप्रमाणें एखाद्या विचित्र रोगानें पछाडलेल्या मनुष्याशेजारीं दोन डॉक्टर बसावेत व रोग्याच्या लक्षणांच्या परीक्षेवरून त्यांनीं परस्परविरुद्ध अशी रोगचिकित्सा करावी व अर्थात् या रोगचिकित्सेच्या भिन्नतेमुळें या दोघांची औषधयोजना अगर उपाययोजनाही भिन्न व प्रसंगीं परस्परविरोधी व्हावी हें साहजिकच आहे, तशीच गोष्ट हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीच्या बाबतींत झालेली आहे. एका पक्षाचें म्हणणें हिंदुस्थानची सद्यःसांपत्तिक स्थिति पूर्ण भरभराटीची आहे. या निदानाचा खरेपणा भासविणारीं लक्षणेंही हा पक्ष दाखवूं शकतो. कारण, रोग्याचा रोग विचित्र तऱ्हेचाच असल्यामुळें लक्षणांमध्यें कांहीं कांहीं लक्षणें आरोग्यसूचक व शरीरसामर्थ्यसूचक भासतात हें खोटें नाहीं. दुसऱ्या पक्षाचें निदान याच्या अगदीं उलट आहे. तो म्हणतो कीं, हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति अगदीं खालावत चाललेली आहे; या रोग्याची शक्ति दिवसेंदिवस क्षीण होत चालली आहे, व हा रोगी आतां थोड्याच दिवसांचा सोबती आहे. या निदानाच्या समर्थनार्थ हा पक्ष रोग्याच्या हातापायांच्या झालेल्या काड्यांकडे बोट दाखवितो व सशक्त माणसाच्या एकंदर शरीरशक्तीकडे बोट दाखवून "हें चित्र पहा व तें चित्र पहा" असें प्रतिपादन करितो. यामुळें या पक्षाचें म्हणणें खरें भासतें. प्रत्यक्ष रोग्याला विचारावें तर त्याचें म्हणणें आपण अत्यंत खंगत चाललों आहों असेंच पडतें. परन्तु हें त्याचें विधान त्याच्या निरोगी स्थितीशीं तुलना करून केलेलें असतें. समजा कीं, एखादा मनुष्य मोठ्या भयंकर रोगानें आजारी पडून बेशुद्ध पडला व पुढें हळूहळू तो शुद्धीवर येऊं लागला. आतां ज्या डॉक्टरानें त्याला फक्त बेशुद्ध स्थितींत पाहिला असेल तो डॉक्टर असें म्हणणार कीं, हा मनुष्य आतां शुद्धीवर आला आहे; तेव्हां याची प्रकृति सुधारण्याच्या मार्गाला लागलेली आहे व योग्य जोपासना केल्यास हा मनुष्य पुनः

निरोगी व सुदृढ होण्यास हरकत नाहीं. परन्तु अशा वेळीं रोग्यास कसें वाटतें असें विचारल्यास तो ह्मणतो, मी अत्यंत अशक्त झालों आहें. कारण त्याला ज्या आपल्या प्रकृतीची आठवण आहे, तीपेक्षां हल्लींची प्रकृति वाईट आहे हें अगदीं उघड आहे. परन्तु मध्यंतरीं त्याची प्रकृति हल्लींपेक्षांही जास्त बिघडली होती. परन्तु त्या वेळीं तो बेशुद्धींत असल्यामुळें त्याची त्याला स्मृति नव्हती. या स्थितींत डॉक्टर व स्वतः रोगी या दोघांचेंही म्हणणें कांहीं कांहीं अंशीं खरें आहे, असें निःपक्षपातानें विचार करतां कबूल करणें प्राप्त आहे. हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीला व तिच्या निदानाला हा दाखला चांगला लागू पडतो, हें पुढील विवेचनावरून स्पष्ट दिसून येईल. परंतु या विषयासंबंधानें तीव्र मतभेद आहे व त्यामुळें त्यामधून सत्य शोधून काढणें हें कठीण व अडचणीचें काम आहे, हें सहज दिसून येणार आहे.

या विषयविवेचनाच्या अडचणींचें शेवटचें कारण आगंतुक आहे. या विषयाला हल्लीं हिंदुस्थानच्या विशेष परिस्थितीमुळें फार नाजूक स्वरूप आलेलें आहे. वरच्या कलमांतील दाखलाच पुढें चालवून त्या नाजूक स्वरूपाचें स्पष्टीकरण करतां येईल. रोगी पुष्कळ दिवस आजारी पडलेला असावा, व डॉक्टर त्याची पहिल्यापासून शुश्रूषा व औषधोपचार करीत असावा. अशा स्थितींत पहिल्यांदा रोगी डॉक्टराचे आभार मानीत असतो--कारण त्याला डॉक्टराबद्दल फार आदरबुद्धि असते; परंतु दुखणें खितपत पडलें व डॉक्टराचें औषध सारखें चालू असतांनाही रोग्याला गुण वाटत नाहींसा झाला, म्हणजे रोगी डॉक्टरवर रागावूं लागतो. "इतके दिवस झाले, तुमचें औषध सारखें चालू आहे, तुमची सुधारलेली शस्त्रक्रिया चालू आहे, तुमची सारखी शुश्रूषा चालू आहे, तरी मला गुण येत नाहीं; तेव्हां तुम्ही औषधें बरोबर देत नाहीं. माझा सावकाशपणें परंतु जीव जावा अशीच तुमची योजना आहे. तेव्हां तुमच्या इतक्या महागड्या पद्धतीची जरूरी नाहीं." असें रोग्यानें म्हटलें तर डॉक्टर संतापतो व रोग्याला कृतघ्न म्हणूं लागतो. "अरे, मी तुला मरतां मरतां वांचविलें, बेशुद्धींतून शुद्धीवर आणिलें आणि असें असूनही माझ्या औषधयोजनेस नांवें ठेवतोस, तेव्हां तूं किती कृतघ्न व मित्रद्रोही आहेस!" अशा तऱ्हेचे डॉक्टरच्या तोंडून साहजिक उद्गार निघतात. परंतु या रोग्याचा तरी काय इलाज असतो? तो किती तरी

महिने खितपत पडलेला असतो. हातपाय हलविण्याचेंही त्याला सामर्थ्य नसतें. आपल्यामागून आजारी पडलेले रोगी याच औषधयोजनेनें आपल्या आधीं बरे होऊन निरोगी व सशक्त माणसाप्रमाणें जिकडेतिकडे वावरतांना पाहून अंथरुणाला खिळलेल्या माणसानें उतावीळ व्हावें, व आपल्याला अजुन गुण येत नाहीं ह्मणून डॉक्टरास व त्याच्या औषधयोजनेस त्यानें शिव्याशाप देऊं लागावें हें मनुष्य-स्वभावास धरून आहे. परंतु अशा स्थितींत डॉक्टरानें रोग्यावर न संतापतां आपली औषधयोजना चालू ठेवावी व ती चालू ठेवणें हेंच शहाणपणाचें आहे हें उघड आहे. उपमा टाकून स्पष्टपणें बोलावयाचें म्हणजे या विषयावर लिहिणें हल्लींच्या स्थितींत फार नाजूक काम झालें आहे. कारण अर्थशास्त्रांतील विषयांचा राजकीय विषयांशीं फारच निकट संबंध आहे व हल्लीं ब्रिटिश सरकारच्या मनांत हिंदी-प्रजेच्या राजनिष्ठपणाबद्दल शंका उत्पन्न झालेली आहे. यामुळें सरकारी अंमलदारांस हल्लीं कोठें राजद्रोह दिसेल याचा नेम नाहीं. अशी स्थिति उत्पन्न होण्यास आमच्यांतील कांहीं जबाबदार लेखक व वक्ते हे कारणीभूत झालेले आहेत हेंही कबूल करणें भाग आहे. कारण मनुष्यामनुष्यांमधले सर्व व्यवहार विश्वासावर अवलंबून आहेत. कांहीं कारणानें हा विश्वास एकदां उडाला म्हणजे अगदीं साध्या व स्वाभाविक कृत्याबद्दलही मनुष्याच्या मनांत संशय उत्पन्न होतो; हा मनुष्यस्वभाव आहे याकरितांच लोकांचे पुढारी म्हणविणाऱ्या लोकांनीं ही गोष्ट मनांत ठेवून आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. असो. तेव्हां सध्यां स्थिति नाजूक झालेली आहे ही गोष्ट सिद्ध आहे व यामुळेंच या विषयावर लिहिणें कठिण झालेलें आहे. परंतु या लेखकाला जें जें सत्य वाटत आहे, तें तेंच तो या ठिकाणीं लिहीत आहे. पुढील विवेचनांत कांहीं कांहीं गोष्टी ब्रिटिश राज्यपद्धतीविरुद्ध लिहिलेल्या आहेत, परंतु त्या सत्य आहेत अशी त्याची समजूत आहे, ह्मणून त्यानें त्या लिहिल्या आहेत. त्याचा उद्देश द्वेषबुद्धि वाढविण्याचा नाहीं हें येथें सांगणें जरूर आहे. मानवी संस्था चुकीस पात्र असतात व त्याप्रमाणें ब्रिटिश-राज्यव्यवस्थेंत पुष्कळ चुक्या होणें स्वाभाविक आहे. परंतु असल्या चुक्या लपवून, आपल्या म्हणण्याचा विपर्यास होऊं नये या शुद्ध हेतूनें कां होईना, परंतु सत्याचा अपलाप करण्यापासून कांहींएक फायदा होत नाहीं. उलट केव्हांना केव्हां तरी सत्य बाहेर हें येतें. व शुद्ध हेतूनें सत्य मागें ठेवणारांचा हेतु तडीस

जाते उलट त्यानें ज्या इतर चांगल्या व हितकर गोष्टी लिहिल्या असतील त्यां-वरील मात्र लोकांचा विश्वास उडतो. बर्कनें म्हटल्याप्रमाणें स्तुति ही स्तुति करणारास किंवा स्तुति स्वीकारणारास दोघांनाही कमीपणा आणणारी आहे. तीच गोष्ट अशा ठिकाणींही लागू आहे. व याच बुद्धीनें जें सत्याला धरून आहे अशी या लेखकाची समजूत आहे तेंच या एकंदर ग्रंथांत व या शेवटल्या पुस्तकांत सदर लेखकानें ग्रथित केलें आहे.

शेवटीं, या विषयाचें सविस्तर विवेचन या शेवटल्या लहानशा पुस्तकांत होणें शक्य नाहीं हें लेखक जाणून आहे. हा विषय इतका गहन, बिकट व अवघड आहे कीं, त्याचें यथास्थित विवेचन करण्यास एक मोठा प्रचंड स्वतंत्र ग्रंथच लिहिला पाहिजे. परंतु हें या लेखकाच्या आटोक्याबाहेरचें काम आहे. येथें लेखकानें आपल्या थोड्याबहुत अवलोकनानें, कमीजास्त व्यासंगानें व थोड्याफार विचारानें हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीबद्दल जीं अनुमानें काढलीं आहेत, त्यांचें थोडक्यांत व संक्षेपतः निरूपण करून वाचकांची रजा घेण्याचा त्यानें विचार केला आहे. येवढी आवश्यक असलेली प्रस्तावना करून आतां या कठिण विषया-कडे आपण वळूं.

या पुस्तकांतील प्रतिपाद्य विषयाचे स्वाभाविक दोन भाग पडतात. हिंदुस्था-नची सद्यःसांपत्तिक स्थिति कशी आहे हा पहिला भाग, व मग ही स्थिति सुधा-रण्यास अर्थशास्त्रदृष्ट्या योग्य अशी उपाययोजना कोणती करावी हा दुसरा भाग. परंतु हिंदुस्थानच्या सद्यःसांपत्तिक स्थितीचें यथार्थ स्वरूप समजण्यास हिंदु-स्थानच्या औद्योगिक स्थितीची पूर्वपीठिका समजली पाहिजे. परंतु ही पीठिका फार लांबवर गेलेली आहे. कारण औद्योगिक स्थितीच्या बाबतींत हिंदुस्थान व युरोपांतील अर्वाचीन राष्ट्रें यांमध्यें पुष्कळ अंतर आहे. युरोपियन राष्ट्रांची सुधा-रणा व सांपत्तिक प्रगति ही बरीच अलीकडील आहे; व रानटी स्थितीपासून हल्लींच्या भरभराटीच्या स्थितीमधला काल फारसा मोठा नाहीं. हीं राष्ट्रें जीं एकदां सुधारणेच्या मार्गाला लागलीं तीं सारखीं वरवर चढतच गेलीं व आतां-पर्यंत त्यांचा वर चढण्याचा क्रम चालूच आहे. हिंदुस्थानची गोष्ट याहून फार निराळी आहे. हा देश फार पुरातनकालचा आहे. येथली सुधारणाही फार जुनी आहे अशी विशिष्ट सुधारणा फार जुन्या काळींच शिखरास पोहोंचली होती.

या सुधारणेस अचल स्वरूप आल्यानंतर तिचा दुसऱ्या लोकांशीं व दुसऱ्या सुधारणांशीं संबंध आला. ब्रिटिश अंमलामधील हिंदुस्थानची सध्यांची स्थिति या दोन सुधारणांच्या मिश्रणानें बनलेली असल्यामुळें हिंदुस्थान हल्लीं एका प्रकारच्या संक्रमणावस्थेंत आहे; तेव्हां या दोन सुधारणांच्या मिलाफानें हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीवर काय इष्टानिष्ट परिणाम झाले आहेत हें प्रथम पाहिलें, तरच आपल्याला त्याच्या सद्यःसांपत्तिक स्थितीची यथार्थ कल्पना येईल. तेव्हां आपल्याला हिंदुस्थानच्या अर्वाचीन काळचें सिंहावलोकन केलें पाहिजे. हिंदुस्थानच्या अर्वाचीन काळचा प्रारंभ म्हणजे वास्कोडिगामानें हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढला त्या सालापासून होय. तेव्हांपासून युरोपाशीं हिंदुस्थानचा जास्त निकट संबंध येऊं लागला व दोघांमध्यें जोराचा व्यापार सुरू झाला. तेव्हांपासून आजपर्यंतचा काळ म्हणजे हिंदुस्थानचा अर्वाचीन काळ होय. या काळाबद्दल थोडीफार माहिती उपलब्ध आहे. आतां औद्योगिक दृष्टीनें या काळाचीं तीन पर्वें पडतात. पहिलें १५ व्या शतकापासून १७५० पर्यंत, दुसरें १७५० पासून १८५० पर्यंत व तिसरें म्हणजे गेल्या ६० वर्षांचें होय. यांत पहिलें पर्व २५० वर्षांचें आहे, दुसरें १०० वर्षांचें आहे व तिसरें ६० वर्षांचें आहे. पहिल्या पर्वांतच हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या सत्तेचा उदय व भरभराटीचा काळ येतो. या काळांत युरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांचा हिंदुस्थानांत व्यापाराच्या दृष्टीनें प्रवेश झाला होता. १७५० ते १८५० या शंभर वर्षांचा काळ हिंदुस्थानांतील ब्रिटिश-साम्राज्य-स्थापनेचा काळ होय. या शंभर वर्षांत ईस्ट इंडिया कंपनीनें बहुतेक सर्व हिंदुस्थानचें साम्राज्य संपादन केलें. याच काळांत युरोपमध्यें उद्योगधंद्यांत निरनिराळे शोध लागून युरोप व विशेषतः इंग्लंड यांची औद्योगिक भरभराट झाली. तिसऱ्या पर्वामध्यें हिंदुस्थानचें राज्य ईस्ट-इंडिया कंपनीकडून निघून ब्रिटिश पार्लमेंटकडे गेलें, अर्थात् ब्रिटिश-साम्राज्यव्यवस्थेला निव्वळ राजकीय स्वरूप आलें. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारकीर्दींत कंपनीच्या हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेला व्यापारी व राजकीय असें मिश्र स्वरूप होतें.

या तीन पर्वांपैकीं औद्योगिक दृष्टीनें पहिलें पर्व हें हिंदुस्थानच्या भरभराटीचें व सुस्थितीचें होतें. दुसरें पर्व हिंदुस्थानच्या अवनतीचें होतें व तिसऱ्या पर्वांत पुनः औद्योगिक पुनर्घटना सुरू झाली. म्हणजे हिंदुस्थानच्या औद्योगिक गति-

चकाची अत्यंत नीचावस्था १०० वर्षांच्या पर्वांत आली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. या आमच्या विधानांची सत्यता पुढील विवेचनावरून दिसून येईल.

आतां हिंदुस्थानच्या औद्योगिक इतिहासाच्या प्रथम पर्वाचें अवलोकन करूं. या पर्वापूर्वी व या पर्वामध्यें हिंदुस्थानांत कलाकौशल्याची व घरगुती उद्योगधंद्यांची उत्तम प्रगति झालेली होती, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. तेव्हां हिंदुस्थानच्या सुबक मालाची सर्व जगभर ख्याति होती व हिंदुस्थानाला सुवर्णभूमि म्हणत असत. इटाली देशांतील शहरें हिंदुस्थानच्या या व्यापारामुळें गबर झालीं होतीं व पोर्तुगाल, स्पेन वगैरे ॲटलांटिक महासागरावरील राष्ट्रांचा सर्व प्रयत्न हिंदुस्थानचा नवा जलमार्ग शोधून काढून हा किफायतीचा व्यापार आपल्या ताब्यांत आणण्याचा होता. कोलंबसानें जें नवें खंड शोधून काढलें तें हिंदुस्थानतर नसेलना, अशा समजुतीवर त्याला त्यानें प्रथम हिंदुस्थान असें नांव दिलें. पुढें खरोखरीचें हिंदुस्थान सांपडल्यावर अमेरिकेस पश्चिम हिंदुस्थान म्हणूं लागले.

हिंदुस्थानांतून त्या काळीं पक्का कारागिरीचा माल देशाबाहेर जात असे. जातिभेदाच्या मुळाशीं श्रमविभागाचें एक तत्त्व असल्यामुळें हिंदुस्थानच्या औद्योगिक व्यवहाराला एक संघटित स्वरूप आलें होतें. प्रत्येक जातीच्या चालीरीती, राहणी, गरजा व वासना या ठरीव झालेल्या होत्या. लोकांच्या गरजा फार थोड्या होत्या व राहणी साधी होती; व या राहणीस लागणारी सर्व संपत्ति देशांतच उत्पन्न होत असे. हिंदुस्थान हा त्या काळीं पूर्ण स्वावलंबी व स्वयंपूर्ण असा देश होता, इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानाला परकी राष्ट्रांची मागणी भागविण्याचें सामर्थ्य होतें. हिंदुस्थानांतून कापसाचें कापड, लोकरीचें कापड, धातूंचीं भांडीं, हस्तिदंती सामान, गालीचे व इतर कलाकौशल्याचीं कामें युरोपांतील सर्व देशांत व इतरत्र बाहेर देशीं जात व बाहेरदेशांतून मुख्यतः सोनें–रुपें हिंदुस्थानांत येई. युरोपीयन राष्ट्रांनीं हिंदुस्थानचा नवा मार्ग शोधून काढला त्या वेळीं युरोप अजून कलाकौशल्याच्या कामांत अगदीं मागें होतें. ईस्ट–इंडिया कंपनीचा व्यापार म्हणजे अमेरिकेंतून इंग्लंडमध्यें आलेलें सोनेंरुपें व कांहीं किरकोळ दुर्मिळ वस्तु पैदा करून त्या गलबतांत भरून हिंदुस्थानांत आणावयाच्या. येथें आपल्या ठाण्याला विणकर व इतर कारागिर यांना बोलावून घेऊन त्यांना आगाऊ पैसे देऊन त्यांचेकडून युरोपांत पसंत असलेला माल तयार

करून घ्यावयाचा व तो माल युरोपांत नेऊन विकावयाचा व फायदा पदरांत टाकावयाचा हा होता. त्या काळीं हिंदुस्थानांत बहुजनसमाजामध्यें सुखशांति व समाधान नांदत असावें. कारण, लिस्ट यानें म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थानांत धंद्यांची व उद्योगांची बहुविधता होती. सर्व लोकांना उपजीविकेचें साधन म्हणजे एक शेती, असा प्रकार तेव्हां नव्हता. शिवाय देशामधल्या निरनिराळ्या राजेरजवाड्यांचा कारागिरांना आश्रय होता. कारागिरीच्या मालाला परदेशांची मागणी होती, यामुळें सर्व कारागिरांना काम भरपूर मिळे. शिवाय मजुरी व पदार्थांच्या किंमती या रूढीनें ठरल्यामुळें व्यापारांत किंवा उद्योगधंद्यांत चढाओढ नव्हती. प्रत्येक जातीचा मनुष्य आपला धंदा सुखासमाधानानें करी व त्याच्या मालाला गिऱ्हाईक ठरीव असल्यामुळें व मालाच्या किंमतीही ठराविक असल्यामुळें त्याचें पोट भरण्यास पंचाईत पडत नसे. बाहेरदेशीं जो माल जाई, त्याचे बदला माल इकडल्या लोकांना नको असे. कारण, यांची राहणी साधी असे. यामुळें नेहमींच्या राहणीपेक्षां फायदा राही तो दागदागिन्यांच्या किंवा सोन्यारुप्याच्या रूपानें ठेवण्याची पद्धति होती. शिवाय देशामध्यें अन्तःशांतता कमी असल्यामुळें मिळकतीला सुरक्षितता नव्हती, म्हणून सोनें-नाणें व दागदागिने पुरून ठेवण्याची पद्धतही फार प्रचलित होती. हिंदुस्थानांत नेहमीं पुष्कळ सोनें-रुपें गडप होत असे याचें कारण हेंच होय. अशी पुरलेली व घरांत असलेली सोन्यारुप्यांची संपत्ति येथें फार असल्यामुळें हिंदुस्थान फार सधन देश आहे असें परकीयांस वाटे. हिंदुस्थानावर ज्या हजारों स्वाऱ्या झाल्या त्यांमध्यें पुष्कळ संपत्ति लुटून नेली जाई. कंपनीसरकारचे नोकरही अतोनात पैसा आपल्या देशीं नेत.

शिवाय त्या काळीं राजाराजांमध्यें वारंवार लढाया होत असत. यामुळें लोकसंख्या साहजिक कमी होई. यामुळें शेतकीवर जास्त लोकांचा मारा पडत नव्हता. व म्हणून मागें राहिलेले लोक यांची स्थिति चांगली राही. अवर्षणानें दुष्काळ पडत, परंतु त्यांची तीव्रता इतकी भासत नसे. कारण देशांत धान्य लोकसंख्येला पुरून उरे इतकें तयार होई. व शिल्लक राहिलेलें धान्य पेवांत ठेवण्याची सार्वत्रिक रीत असे. कारण त्या काळीं हल्लींसारखीं दळणवळणाचीं सुलभ साधनें नसल्यामुळें धान्यासारख्या मोठ्या आकाराचा व मोठ्या वजनाचा माल बाहेरदेशीं जाणें शक्य नव्हतें.

देशामध्यें एकंदर लोकसंख्या किती व एकंदर संपत्तीची उत्पत्ति किती व दर-माणशीं संपत्तीचें मान किंवा उत्पन्न काय पडे हें अजमावण्यास साधन नाहीं. कारण त्या काळीं लोकांना किंवा सरकारला अर्वाचीन काळच्या खानेसुमारीसारख्या पद्धति अवगत नव्हत्या. परंतु त्या काळीं आलेल्या परदेशच्या प्रवाशांनीं हिंदुस्थानच्या लोकांविषयीं जी माहिती लिहून ठेविली आहे, तीवरून लोक त्या काळीं साधारणतः बरेच सुखी व संपत्तिमान् होते, व संपत्तीची वांटणी फारशी असमतेची नव्हती असें म्हणणें भाग आहे.

या म्हणण्याच्या प्रत्यंतराकरितां ऐनेअकबरींतून घेतलेली खालील माहिती बरीच उपयोगी पडेल असें वाटतें. या माहितीवरून अकबराच्या कारकीर्दीमध्यें लोकांची सांपत्तिक स्थिति कशी होती याचें बरेंच चांगलें अनुमान काढण्यास जागा आहे. अकबराच्या कारकीर्दींतील कांहीं कामदारांच्या मजुरीची खालील कोष्टकावरून कल्पना येईल.

| कामदाराचें नांव. | दररोजची मजुरी. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | आणे | पै. | | आणे | पै. |
| गवंडी ... ... | २ | ११ | पासून | ० | ८ |
| सुतार ... ... | २ | ११ | ,, | ० | १० |
| पाथरवट ... ... | २ | ६ | ,, | २ | १ |
| बेलदार ... ... | १ | ६ | ,, | १ | ३ |
| विहीर खणणारे ... | ० | ० | ,, | ० | ६ |
| बुरुड ... ... | ० | ० | ,, | ० | १० |
| भिस्ती ... ... | १ | ३ | ,, | ० | १० |
| सामान्य मजूर ... | ० | ० | ,, | ० | १० |

कांहीं मालाच्या किंमती:—

| मालाचें नांव | दरमणीं किंमत | | | मालाचें नांव | दरमणीं किंमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै. | | रु. | आ. | पै. |
| गहूं ... ... | ० | ५ | ० | जवस ... ... | ० | ४ | २ |
| बाजरी ... ... | ० | ३ | ४ | मोहोरी ... ... | ० | ५ | ० |
| ज्वारी ... ... | ० | २ | ६ | तांदूळ ... ... | ० | ३ | ४ |

| मालाचें नांव | रु. | आ. | पै. | मालाचें नांव | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दरमणीं किंमत | | | | दरमणीं किंमत | | |
| तांदूळ ... ... | १ | ० | ८ | तूप ... ... | २ | १२ | ० |
| तांदूळ ... ... | १ | ४ | ८ | दूध ... ... | ० | १० | ५ |
| डाळ ... ... | ० | ५ | ० | साखर ... ... | ० | २ | ६ |
| पीठ ... ... | ० | ८ | ४ | खडीसाखर... ... | ० | २ | ४ |
| कांदा ... ... | १ | ० | ८ | चिंच ... ... | ० | ० | १० |
| लसूण ... ... | ० | २ | ६ | ओवा ... ... | ० | ० | १० |
| सुंठ ... ... | ० | १ | १ | मीठ ... ... | ० | ६ | ८ |

वरील दोन कोष्टकांवरून अकबराच्या काळच्या लोकांची सांपत्तिक स्थिति अजमावण्याचें चांगलें साधन उपलब्ध झालें आहे. निरोगी धान्याहारी माणसास दर महिन्यास सामान्यतः खालील प्रमाणानें अन्न लागतें व त्याची अकबराच्या काळची किंमत खालच्याप्रमाणें येते;

| | | आ. | पै. |
|---|---|---|---|
| पीठ अगर तांदूळ २५ शेरांस | | ३ | ९ |
| डाळ ५ शेरांस ... | ० | ० | $७\frac{१}{२}$ |
| तूप १ शेरास ... | ० | १ | $\frac{१}{२}$ |
| मीठ १ शेरास ... | ० | ० | $२\frac{४}{५}$ |
| | ० | ५ | $७\frac{४}{५}$ |

म्हणजे प्रत्येक माणशीं दर महिन्यास ६ आणे खर्च पुरे. आतां कुटुंबाचीं ५ माणसें धरलीं—नवरा, बायको व ३ मुलें—तर कुटुंबाचा खर्च दरमहा सवा रुपया होतो व अगदीं सामान्य मजुराची मजुरी वरील कोष्टकांत दिल्याप्रमाणें दरमहा १ रुपया ९ आणे होते. अर्थात् दरमहा ५ आणे त्याला इतर सुखसोईंच्या खरेदीस रहात. त्या काळीं पैशाच्या मोठ्या मोलाकडे पहातां दरमहा ५ आणे हे इतर खर्चाला पुष्कळ आहेत. परंतु ही झाली अगदीं निवळ सांगकाम्या मजुराची गोष्ट. अकबराच्या काळीं कामदाराची सांपत्तिक स्थिति बऱ्याच वरच्या दर्ज्याची होती असें वरील कोष्टकावरून दिसतें.

या वेळच्या निरनिराळ्या प्रवाशांनीं लिहून ठेविलेल्या प्रवासाच्या हकीकतींवरून व उद्गारांवरून हेंच अनुमान निघतें कीं, हिंदुस्थानच्या इतिहासाच्या या पहिल्या पर्वांत बहुजनसमाजाची सांपत्तिक स्थिति बऱ्या प्रकारची असावी. देशांत नाणीं फारच कमी होतीं. यामुळें त्यांचें मोल फार होतें. म्हणून सर्व पदार्थांची स्वस्ताई होती व मजुरीही कमी असे; परन्तु त्या मजुरीचें खरें मोल अगर क्रयशक्ति मोठी होती.

हिंदुस्तानच्या इतिहासाच्या दुसऱ्या पर्वातील औद्योगिक स्थितीची बरोबर कल्पना होण्यास युरोपांत किंचित् त्याचे आधीं व विशेषतः त्या पर्वामध्यें कसकसे फेरफार होत गेले, त्याचेंही थोडें सिंहावलोकन केलें पाहिजे. म्हणजे या दुसऱ्या पर्वांत हिंदुस्थानची अवनति कां झाली हें ध्यानांत येईल.

हिंदुस्थानचा नवा जलमार्ग व अमेरिका खंड यांच्या शोधापासून युरोपांत औद्योगिक जागृति झाली व तेव्हांपासून युरोपच्या औद्योगिक प्रगतीस आरंभ झाला. त्यांतल्यात्यांत हॉलंड व इंग्लंड या देशांत या सुधारणेस थोडी आधीं गति मिळाली. कारण इंग्लंडमध्यें अन्तःशांतता युरोपांतील इतर राष्ट्रांच्या आधीं प्रस्थापित झाली. इंग्लंडमध्येंही प्रॉटेस्टंट व रोमन कॅथलिक धर्मांमुळें आपापसांतलीं युद्धें व कलह झाले खरे; तरी पण एलिझाबेथ राणीच्या राज्यापासून इंग्लंडमध्यें पूर्ण शांतता नांदूं लागली व जरी इंग्लंडचा सरकारी असा एक धर्मपंथ राहिला तरी बाकीच्या पंथांना संरक्षण मिळूं लागलें. कारण तेथें सहिष्णुता होती. यामुळें फ्रान्स, हॉलंड, नेदर्लंड वगैरे देशांमधील औद्योगिक बाबतींत थोडे पुढें असलेले कारागीर लोक इंग्लंडमध्यें सुरक्षित स्थळ व धार्मिक छळापासून मुक्त असें ठिकाण म्हणून राहूं लागले. इंग्लंडच्या राजांनींसुद्धां त्यांना उत्तेजन दिलें. हें होईपर्यंत इंग्लंड देश हा कचा माल तयार करणारा होता. तेथून धान्य व लोंकर, लोखंड व कातडीं हे जिन्नस बाहेरदेशीं जात. परंतु पुढें लोंकरीच्या विणकरांचा धंदा तेथें उदयास येऊं लागला. तसेंच फ्रान्समधल्या रेशमी कापडाचा धंदाही सुरू झाला. पुढें कापसाच्या कापडाचाही धंदा सुरू झाला. नंतर लोखंड व कोळसे हे दोन पदार्थ महत्त्वाचे झाले व त्यांच्या खाणी इंग्लंडांत सांपडल्या; या धंद्यांत नवीन नवीन शोध लागून इंग्लंडचा माल बराच चांगला होऊं लागला. धंद्याची ही सर्व प्रगति इंग्लंडनें संरक्षणतत्त्वानेंच संपादन केली. कारण हिंदुस्थानचा सुबक माल जरी इंग्लिश व्यापारी हिंदुस्थानांतून नेत, तरी तो ते आपल्या देशांत खपवीत नसत. कारण अशा मालावर जबर जकाती असत. तो माल ते युरोपियन राष्ट्रांमध्यें खपवीत. याप्रमाणें इंग्लंडनें हिंदुस्थानच्या उत्तम मालानें युरोपांतले उद्योगधंदे बुडविले व संरक्षणाच्या योगानें आपले माल सुस्थितीला आणले.

याप्रमाणें इंग्लंडमध्यें उद्योगधंद्यांची वाढ होत असतांनाच इंग्लंडनें अमेरि-

केंत व इतर ठिकाणीं वसाहती स्थापिल्या व हिंदुस्थानांत कंपनी सरकारच्या राज्यास प्रारंभ होऊन त्याचा विस्तार होऊं लागला. ईस्ट-इंडिया कंपनीची स्थिति अर्धे व्यापारी व अर्धे राज्यकर्ते अशी झाली. वसाहतींनीं इंग्लंडला धान्य व कचा माल पुरवावा अशा प्रकारचें धोरण इंग्लंडच्या मुत्सद्यांनीं व व्यापाऱ्यांनीं सुरू केलें. अमेरिकेंमध्यें इंग्लंडच्या वसाहती त्यांच्या हातून जाण्यास हें धोरण कारण झालें. हिंदुस्थानासही हेंच धोरण लागू केलें गेलें. कंपनी सरकारनें या धोरणानुरूप जाणूनबुजून व बुद्धिपुरस्सर हिंदुस्थानांतील कलाकौशल्यास मारण्याचा प्रघात ठेविला. ज्या ज्या वस्तू व पक्का माल इंग्लंडमध्यें होऊं लागला तो तो माल हिंदुस्थानांतील कारागिरांना करूंच द्यावयाचा नाहीं, असे सक्त नियम केले गेले. परंतु इंग्लंडच्या सुदैवानें पुढें हे सक्तीचे नियम करण्याची गरज राहिली नाहीं. कारण इंग्लंडमध्यें १७५० नंतरच्या थोड्या काळांत धंद्यांची क्रांति करणारीं अशीं यंत्रें व उपकरणें अस्तित्वांत आलीं आणि विशेषतः विणकरांच्या धंद्याची फारच प्रगति झाली. त्यांतच वाफेच्या शक्तीच्या शोधाची भर पडली व एंजिनें तयार झालीं. यामुळें हातमागाचीं व मनुष्याच्या श्रमानें कापड करण्याच्या धंद्याची पिछेहाट होऊन वाफेच्या शक्तीनें चालणारे प्रचंड कारखाने निघूं लागले. या कारखान्यांत श्रमविभागाच्या तत्वाच्या योगानें, तसेंच सृष्टीच्या स्वाभाविक शक्तीच्या उपयोगाच्या योगानें मनुष्याच्या स्वतःच्या श्रमाच्यापेक्षां किती तरी पट जास्त माल होऊं लागून तो स्वस्तही पडूं लागला. त्यामुळें हातमागाच्या मालाचा या मालापुढें टिकाव निघेना. विणकरी लोकांचा धंदा या असम चढाओढींत आपोआपच बुडत चालला. त्याप्रमाणें युरोपमध्यें धातूच्या खाणी सांपडून अशुद्ध धातूपासून शुद्ध धातू काढण्याच्या सुलभ कृतीचा शोध लागला. व या सर्व प्रकारच्या धातू बाहेरदेशांतून आलेल्या येथल्यापेक्षां स्वस्त पडूं लागल्या. म्हणून धातू गाळणाऱ्या जातीचा धंदा बुडाला. आणखी रसायनशास्त्राच्या शोधानें नवीन व सहज होणारे रंग पैदा झाले व म्हणून रंगाऱ्यांचाही धंदा बुडाला. याप्रमाणें एकएक धंदा नाहींसा होत जाऊन सर्व लोकांचा मारा शेतकीवर पडत चालला व हिंदुस्थानामध्यें पहिल्या पर्वांत जें धंद्याचें बहुविधत्व होतें, तें दुसऱ्या पर्वांत हळूहळू नाहींसें होऊन हिंदुस्थान देश कचा माल तयार करणारा व केवळ शेतीवर अवलंबून असणारा कृषिवृत्ति देश बनत चालला.

वरील म्हणण्याच्या समर्थनार्थ नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या इंपीरीयल गॅझीटीयरच्या तिसऱ्या भागांतून तीन उतारे खालीं नोटेंत दिले आहेत. त्याचें पुस्तकावरून देशांतील लोकांचा शेतीवरच मारा कसा होत चालला याचा आंकडा दिला आहे. १८९१ च्या खानेसुमारींत शेतकीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचें प्रमाण ६१ होतें, तेंच १९०१ मध्यें ६८ वर गेलें. म्हणजे अवघ्या दहा वर्षांत शंभरांपैकीं सहा लोकांना इतर धंदे सोडून शेतकीकडे धांव घ्यावी लागली. या सर्व कारणांनीं या पर्वामध्यें हिंदुस्थानची औद्योगिक व सांपत्तिक स्थिति अगदीं नीचीची होती, हें निर्विवाद सिद्ध होतें.

" In this respect India of to-day stands in contrast to the India of a century ago. The European chemist armed with cheap supplies of sulphuric acid and alkali and aided by low sea freights and increased facilities for internal distribution by the spreading net work of railways has been enabled to stamp out in all but remote localities the once flourishing native manufactures by alum, the various alkaline compounds, blue vitriol, copperas, copper, lead, steel and iron and seriously to curtail the export trade in nitre and borax. The high quality of the native made iron, the early anticipation of the processes now employed in Europe for the manufacture of high class steel and the artistic products in copper and brass gave the country a prominent position in the ancient metallurgical world, while as a chief source of nitre India held a position of peculiar political importance until, less than forty years ago, the chemical manufacturer of Europe found, among his bye-preducts cheaper more effective compounds for the manufacture of explosives.

The influence of the modern mineral dyes (more especially aniline and alizarine ) has been more destructive to the tinctorial and textile industries of India than is commonly supposed. These cheap colours have injured the artistic

feelings of the people and demoralised many of the indigeneous crafts.

Cotton-weaving was only introduced into England in the 17th century and in 1721 an Act was passed prohibiting, in the interests of Manchester the importation of printed calicoes from India . . . . . . .

Soon after this the whole aspect of the cotton trade of the world had changed and India then fell into a position of very secondary importance. Instead of furnishing Europe with cotton goods, she now became dependent on England for her own supplies, a remarkable instance of the triumph of improved mechanical contrivances and intelligent agriculture over hereditary skill and primitive traditions."

—*Imperial Gazetteer of India, Vol. III.*

हिंदुस्थानामध्यें कंपनीसरकारचा अंमल सुरू असतांना अशा प्रकारची क्रांति घडून येत होती. कंपनीसरकारच्या अमलापासूनही कांहीं अनिष्ट प्रकार घडून आले. पूर्वींचे मुसलमान राजे कितीही जुलमी असले तरी ते देशांतच रहात असत व त्यांनीं घेतलेले कर पुनः लोकांमध्यें निरनिराळ्या रूपांनीं परत येत. शिवाय कलाकौशल्याच्या करागिरांना त्यांच्या कारकीर्दीमध्यें उत्तेजन मिळे. सर्व सरकारी नोकर एतद्देशीयच असल्यामुळें सरकारच्या खजिन्यांतील पैसा देशांतील लोकांनाच परत मिळे. हिंदुस्थानचें राज्य कंपनी सरकारच्या ताब्यांत गेल्यापासून अगदीं निराळी स्थिति झाली. आधीं कंपनीचा व्यापारी पेशा होता, नंतर पुढें कंपनीला राज्याधिकार मिळाला. परंतु मेकॉलेसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें व्यापारी पेशा व राज्याधिकार या गोष्टी अमृतविषासारख्या परस्परविरोधी आहेत. यामुळें दोन्ही कामें कंपनीकडून वाईट तऱ्हेनें झालीं. व्यापार बरोबर साधला नाहीं व राज्यकर्त्यांचींही कर्तव्यकर्मे बरोबर झालीं नाहींत. कंपनीच्या डायरेक्टर लोकांचें लक्ष पुष्कळ व्याज मिळण्याकडे असे. परंतु व्यापारांत तर कांहींच फायदा नाहीं. तेव्हां व्याज राज्याच्या करवसुलांतून जाऊं लागलें. शिवाय राज्यविस्तार होत असतांना पुष्कळ लढाया कराव्या लागत. त्यांचा खर्च होतां होईतों आपलें नवें भांडवलच समजून त्याच्यावर व्याज मिळविलें जात

असे. याप्रमाणें एकीकडे राज्य काबीज करावयाचें व तें काबीज करण्याला लागणारा पैसा हिंदुस्थान देशाचें राष्ट्रीय कर्ज समजावयाचें, असा दुहेरी तोटा हिंदुस्थानचा होत होता. राजाची कर्तव्यकर्में करण्याची बुद्धि कंपनीसरकारला होत नसे. अन्तर्गवस्था कशी कां असेना, देशांत दंगेधोपे कां असेनात व राज्यकारभार कितीही वाईट तऱ्हेचा कां होईना, त्याबद्दल खरी काळजी त्यांना नसे. होतांहोईल तितके कर वसूल करून, जितके जास्त पैसे मिळतील तितके मिळविण्याकडे त्यांची प्रवृत्ति असे. डायरेक्टरांची इच्छा हिंदू लोकांना चांगल्या तऱ्हेनें वागविण्याची नव्हती असें नाहीं. यामुळें कंपनीच्या डायरेक्टरांच्या इकडील गव्हर्नरांना आलेल्या हुकमांमध्यें परस्परविरोध असे. त्याची मेकॉलेनें मजेदार थट्टा उडविली आहे. त्याच्या मतें सर्व हुकमांचें सार हें कीं, "प्रजेला न्यायानें वागवा पण पैसा पाठवा. देशांत शांतता ठेवा पण पैसा जास्त पाठवा. लोकांवर जुलुम करूं नका पण पैसा पाठवा." कंपनीचे नोकर यांपैकीं कोणचा हुकूम पाळीत असतील हें उघडच आहे. येथें राहणाऱ्या लोकांना हिंदुस्थान ह्मणजे सोन्याची खाण नाहीं असें दिसून येई. तेव्हां कंपनीला पैसे जास्त कसे पाठवावयाचे? अर्थात् लोकांना दाबून त्यांच्यावर जास्त कर लादून व राज्यकर्त्यांचीं कर्तव्यकर्में सोडून देऊन, हें उघड आहे.

तरी हिंदुस्थानचें राज्य कंपनीसरकारच्या ताब्यांत असे तोंपर्यंत त्या सरकारवर एक तरी दाब होता. तो दाब ह्मणजे इंग्रजी पार्लमेंटचा होय. कंपनीसरकारच्या सनदेची मुदत प्रत्येक २० वर्षांनीं सरे व पुनः फेरसनद करून तीस घ्यावी लागे. त्या वेळीं पार्लमेंटांत वादविवाद होऊन ती सनद कंपनीला मिळे. कंपनीसारख्या एका खाजगी संस्थेच्या हातीं एवढा मोठा राज्याधिकार असावा याचा इंग्रजी मुत्सद्यांना व पार्लमेंटच्या मेंबरांना मोठा हेवा वाटे. यामुळें प्रत्येक सनदेच्या वेळीं कंपनी सरकारच्या राज्यकारभारपद्धतीवर कडक टीका होत असे. यामुळें कंपनी सरकारच्या अमलांत हिंदुस्थानांत प्रत्येक वीस वर्षांनीं कांहीं तरी हितकर सुधारणा घडून येत असत.

येथपर्यंत हिंदुस्थानच्या औद्योगिक इतिहासाच्या दुसऱ्या पर्वांत हिंदुस्थानच्या कारागिरीची व उद्योगधंद्यांची अवनति कां व कशी झाली याचें थोडक्यांत विवेचन केलें. आतां शेतकी व शेतकरी वर्ग यांची व इतर वर्गांची या पर्वांत

काय स्थिति झाली याचा विचार केला पाहिजे. म्हणजे एकंदर बहुजनसमाजाच्या या पर्वातील सांपत्तिक स्थितीचा अंदाज करण्यास ठीक पडेल.

कंपनी सरकारचा अंमल इकडे सुरू होण्यापूर्वी इकडील शेतकऱ्यांची बऱ्यापैकी स्थिति असावी असें म्हणण्यास पुष्कळ जागा आहे. कारण कंपनी सरकारच्या काळाच्यापेक्षां त्या काळचे सारे जास्त दिसतात तरी त्यांबद्दल दोन गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. एक, कागदोपत्रीं जरी कमाल दर जास्त दिसले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणींत ते कडक तऱ्हेनें घेतले जात नसत शिवाय सारा पैशांत घेण्याची वहिवाट नव्हती, तर प्रत्यक्ष शेतीच्या उत्पन्नाचा कांहीं वांटा घेण्याची पद्धति होती. यामुळें दुष्काळाच्या किंवा कमी पिकाच्या सालीं आपोआपच सूट किंवा सवलत मिळे. आणखी दुसरे अप्रत्यक्ष कर फारसे नसत. एखादा जुलुमी राजा आपल्या चैनीकारितां कदाचित् कराच्या नव्या बाबी वाढवीत असे. परंतु हा प्रकार क्वचित् ठिकाणींच व कधीं कधींच होत असे. ब्रिटिश अंमलापूर्वीची आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, शेतकरी हे बहुतेक ठिकाणीं शेतीचे मालक व कसणारे असल्यामुळें शेतसारा दिल्यानंतर, शेताचें सर्व उत्पन्न त्यांनाच राही. पुढील काळांत या स्थितींत कां फरक झाला हें पुढें समजेल. पांढरपेशा जातीचे लोक यांना लष्करी, मुलकी व राजदरबारीं सर्व प्रकारच्या कारभारांचा अधिकार असे, म्हणून त्यांना उद्योगाची वाण नसे. यामुळें समाजांतल्या या तिन्ही वर्गांची साधारण बऱ्या प्रकारची स्थिति होती. तसेंच देशांतला व्यापार सर्व एतद्देशीय लोकांच्या हातांत होता. परदेशचा जो थोडा निर्गत व्यापार होता तेवढा मात्र परकी लोकांच्या हातांत होता. हिंदुस्थानांत कंपनीसरकारच्या राज्यस्थापनेचा काळ म्हणजे एकंदरींत आपसांतील कलहाचा व देशांतील अंदाधुंदीचा काळ होता. यामुळें ही स्थिति संपत्तीच्या वाढीस व लोकांच्या सुखासमाधानास अनुकूल नव्हती. याच काळांत युरोपांतील कलाकौशल्याची व विशेषतः यंत्रकलेची जी प्रगति झाली तिच्यायोगानें हिंदुस्थानांतील कारागीर वर्ग खालावत चालला व त्याची स्थिति सांपत्तिकदृष्ट्या हलाखीची होत चालली हें वर दाखविलेंच आहे; शेतकऱ्यांची स्थितीहि वाईट होण्यास कारणें उपस्थित झालीं तीं अशीं:–कंपनीला राज्याधिकार मिळाला तरी प्रथमतः सर्व राज्यकारभार नेटिव लोकांमार्फत व पूर्वपद्धतीनेंच चालत असे. परंतु पुढें

कंपनी-सरकार आपल्या ताब्यांतील मुलुखाचा कारभार स्वतःच पाहूं लागलें. यामुळें शेतकरी वर्गावर एक अनिष्ट परिणाम झाला. त्याचें बीज पाश्चात्य सुधारणेच्या एका कल्पनेंत आहे.

पाश्चात्त्य सुधारणेचा हा एक विशेष दिसून येतो कीं, तींत व्यक्तीच्या हक्काच्या कल्पनेची पूर्ण वाढ झाली आहे व प्रत्येक व्यक्ति आपआपले संपादिलेले हक्क कडक रीतीनें बजाविते. इंग्रज लोकांमध्यें तर हा गुण जास्तच परिणत झालेला आहे. इंग्रज लोकांनीं राजापासून एकदां एखादा हक्क मिळविला, कीं तो ते पुढें कधींही गमावीत नसत. ते त्याचा नेहमीं उपभोग घेत, व त्या पहिल्या हक्काच्या जोरावर आणखी हक्क मिळवीत. अशा क्रमानें इंग्लंडनें आपल्याला पूर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळविलें व आपलें राज्य वस्तुतः प्रजासत्ताक केलें. या इंग्रजांच्या विशिष्ट गुणामुळेंच त्यांचें साम्राज्य सर्व जगभर पसरलें आहे, असें म्हणण्यास फारशी हरकत नाहीं.

जेव्हां कंपनी-सरकार आपल्या ताब्यांतील मुलुखाचा स्वतः कारभार पाहूं लागलें, तेव्हां त्यानें सारा रुपयांमध्यें ठरविला व जो सारा एकदां ठरला तो नियमितपणें व वेळच्या वेळीं दिलाच पाहिजे असा सक्त नियम झाला. आतां इकडच्या शेतकऱ्यांना ही कराराच्या अटीची कल्पना मुळींच नव्हती. सारा द्यावयाचा खरा, परंतु तो आपल्या सवलतीप्रमाणें व सवडीप्रमाणें द्यावयाचा. बरें, येथल्या सरकारचा कारभार तरी फारसा कडक नसे. हा आपला हक्क आहे व त्याची अंमलबजावणी एकदम झालीच पाहिजे, अशी कदर दोन्ही पक्षांना नव्हती. सारांश, प्रजा ज्याप्रमाणें साध्याभोळ्या स्वभावाची होती, त्याप्रमाणेंच सरकारी कारभारही सवलतीचा व सौम्य होता. म्हणजे कारभार व प्रजा हीं उत्क्रांतितत्वानुरूप परस्परांशीं समानरूप झालेलीं होतीं; परंतु कंपनी सरकारच्या राज्यापासून राज्यकारभार सुधारलेल्या कडक कर्तबगारीचा तर लोक मात्र जुन्या भोळवट जातीचे असा विषम प्रकार झाला. याचा परिणाम प्रजाजनांस फार त्रासदायक झाला. याचें प्रत्यंतर हल्लींच्या एका उदाहरणावरून येईल. बोअर-लोकांचें ट्रान्सवालमध्यें राज्य होतें तेव्हांसुद्धां हिंदी वसाहतवाल्यांबद्दल पुष्कळ कडक नियम होते, परंतु ते नुसते कागदोपत्रीं होते. त्यांची कडक अंमलबजावणी बोअर सरकार करीत नव्हतें; व हिंदी रहिवाशांना त्या अंमलांत म्हणण्यासारखा

प्रत्यक्ष त्रास झाला नाहीं. तेंच दोन वर्षांनंतर इंग्रज सरकार कारभारी झाल्या-पासून हिंदी रहिवाशांना 'दे माय धरणी ठाय' झालें! हा प्रभाव इंग्रज लोकांच्या आपल्या हक्काबद्दलच्या जागृतीचा व कायद्याप्रमाणें अंमलबजावणी करण्याच्या प्रवृत्तीचा आहे. पूर्वीच्या हिंदु किंवा मुसलमान राजांच्या काळीं कमाल जमाबंदी इंग्रजी अमलापेक्षां कदाचित् जास्त असेल; परंतु ती फक्त कागदोपत्रीं होती. त्याची अंमलबजावणी कडक तऱ्हेनें होत नसे.

यामुळें कंपनीच्या अवल अमदानींत शेतसाऱ्याबद्दल लोकांना फार त्रास व हाल भोगावे लागत अशाबद्दल पुरावा आहे. साऱ्याची कडक वसुली ही साऱ्याच्या रकमेपेक्षां लोकांना जास्त जाचक होई व लोक आपापलीं शेतें सोडून रानांत जात असत, व या साऱ्याच्या कदरीमुळें त्यांना सावकाराचें दार पहावें लागे. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणास एव्हांपासून सुरुवात झाली. तेव्हां कंपनी सरकारच्या कारकीर्दींमध्यें—ही कारकीर्द म्हणजे हिंदुस्थानची एक प्रकारें संक्रमणावस्था होती—शेतकऱ्यांची, कारागीर लोकांची व मध्यम वर्गाची, अशा तिन्ही वर्गांची स्थिति खालावत चालली होती हें वरील विवेचनावरून दिसून येईल.

येथपर्यंत हिंदुस्थानच्या औद्योगिक इतिहासाच्या दुसऱ्या पर्वाचें थोडक्यांत सिंहावलोकन केलें. १७५० ते १८५७ हीं शंभर वर्षें हिंदुस्थानला राजकीय दृष्ट्या वाईट गेलीं; इतकेंच नाहीं तर तीं सांपत्तिक दृष्ट्याही वाईट गेलीं. या शंभर वर्षांत सर्व हिंदुस्थानचें राज्य हळूहळू हिंदू व मुसलमान राजांच्या हातून ईस्ट इंडिया कंपनीच्या हातीं गेलें व बाकी जे संस्थानिक राहिले ते कंपनी-सरकारचे मांडलिक बनले. ही क्रांति होत असतांना देशांत कमीअधिक प्रमाणा-वर सारख्या लढाया चालू होत्या व देशांतील एकंदर सर्व बहुजनसमाजाची सांपत्तिक स्थिति खालावत होती. परंतु या सर्व राजकीय व सांपत्तिक अवनतीची लोकांनाः कल्पना नव्हती. कारण पुढील पर्वांत जो पाश्चात्य शिक्षणप्रसार झाला तो त्या काळीं झालेला नव्हता. सर्व हिंदुस्थानचे रहिवासी अज्ञानांधकारांत गढून गेलेले होते, आणि देश व त्याची सांपत्तिक किंवा राजकीय स्थिति यांचा विचार करण्यासारखी जनमनाची तयारीच झाली नव्हती, म्हणून मागें एका दाखल्यांत सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थान हें पहिल्या पर्वांत औद्योगिक आरोग्यांत होतें;

या पर्वांत त्याला औद्योगिक रोग होऊन तें अगदीं बेशुद्ध पडून राहिलें होतें. हल्लींच्या काळीं सुशिक्षित लोक हिंदुस्तानच्या औद्योगिक अवनतीबद्दल जे उद्गार काढतात ते जास्त अन्वर्थक रीतीनें याच पर्वाला लागू आहेत. कंपनी-सरकारच्या अंमलांत कांहीं स्वाभाविक व कांहीं कृत्रिम अशा कारणांनीं हिंदुस्थानच्या सांपत्तिक भरभराटीचा नाश होऊन हिंदुस्थान एक कच्चा माल तयार करणारा व शेतकीवर पूर्ण अवलंबून असणारा देश बनला; परंतु याच्या पुढल्या पर्वांत ही स्थिति कांहीं अंशानें तरी सुधारली आहे हें खास. त्यांतही भरती-ओहोटीप्रमाणें प्रकार झाला आहे. ह्मणजे या ६० वर्षांपैकीं कांहीं वर्षांमध्यें देशाची सांपत्तिक बाबतींत प्रगति झाली तर कांहीं वर्षांत पुन्हां पीछेहाट झाली. हा सांपत्तिक स्थितीचा व व्यापाराचा क्रम नेहमीं भरतीओहोटीसारखाच चालतो. ज्याप्रमाणें समुद्राच्या किनाऱ्यावर उभें राहिलें असतां लाटांची गति मागेंपुढें होत असतांना दिसते, परंतु भरतीची वेळ असली ह्मणजे एकंदर पाणी वरच चढत असतें; तोच प्रकार देशाच्या सांपत्तिक स्थितीचा आहे. थोड्या थोड्या वर्षांचा अवधि घेऊन देशाच्या सांपत्तिक स्थितीचें निरीक्षण बरोबर होणार नाहीं; त्याला बराच मोठा अवधि घेतला पाहिजे व तसा अवधि ह्मणजे १८५० पासून आजपर्यंतचा आहे. तेव्हां आतां या काळांतील हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीचें निरीक्षण केलें पाहिजे व प्रथमतः यापूर्वींच्या सर्व पर्वांपेक्षां या काळाचे विशेष काय आहेत हें पाहिलें पाहिजे.

प्रथमतः सर्व देश एका छत्राखालीं आला. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत व द्वारकेपासून पुरीपर्यंत सर्व देश सुधारलेल्या राज्यपद्धतीखालीं आला; व या सरकारनें सरकारचें प्रथमकर्तव्यकर्म जें जीवित व मालमत्ता यांचें संरक्षण तें उत्तम प्रकारें केलें. या सर्व काळांत देशांत केव्हांही लढाई झाली नाहीं. १८५७ सालच्या बंडाची धामधूम थोडे दिवस झाली, परंतु ती क्षणिकच होती. परंतु त्यानें देशाच्या अंतःशांततेला ह्मणण्यासारखा अडथळा आला नाहीं. देशांतील पूर्ण शांतता, दंग्याधोप्याचा अभाव व जीविताची व मालमत्तेची सुरक्षितता हीं या पर्वांत पूर्णपणें अमलांत आलीं, ही गोष्ट निर्विवाद आहे. या ग्रंथाच्या दुसऱ्या पुस्तकांत सांगितल्याप्रमाणें अशी देशाची शांततेची स्थिति ही एक संपत्तीच्या उत्पादनाचें अमूर्त कारण होय. तेव्हां या कारणापुरता विचार करतां

या पर्वांत देशामध्यें संपत्तीची वाढ झाली असली पाहिजे व तशी ती झाली आहे असें ह्मणणें भाग आहे व ती हिंदुस्थानच्या वाढत्या आयातनिर्यात व्यापारावरून स्पष्टपणें दिसतही आहे. जो पक्ष हिंदुस्थानची ब्रिटिश अंमलांत सारखी भरभराट होत आहे असें म्हणतो, त्या पक्षाच्या म्हणण्यामधील सत्यासत्य आतां निवाडितां येईल. कारण वरील विवेचनावरून ब्रिटिश अंमलाचे, पहिला शंभर वर्षांचा व दुसरा साठ वर्षांचा असे दोन भाग होतात. या पर्वांमधील हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति व गति अगदीं भिन्नभिन्न आहे असें दिसून येईल.

या काळांतील सांपत्तिक स्थितींत क्रांति घडवून आणणारी दुसरी गोष्ट ह्मणजे सुधारलेलीं सुलभ व जलद दळणवळणाचीं साधनें. आगगाड्या, तारायंत्रें, पोस्टऑफिसें, सडका, रस्ते व आगबोटी या सर्व साधनांचा झपाट्यानें या ६० वर्षांत हिंदुस्थानांत प्रसार झाला. तसेंच सुवेझचा कालवा झाल्यानेंही हिंदुस्थान व युरोप यांचा जास्त निकट संबंध येऊन त्याचा व्यापारावर परिणाम होऊं लागला. या सर्व साधनांचा संपत्तीच्या उत्पादनावर व एकंदर देशाच्या व्यापारावर व देशांतील पदार्थांच्या किंमतीवर परिणाम झाल्याखेरीज राहिला नाहीं हें उघड आहे. उपभोग्य माल किंवा संपत्ति ही गिऱ्हाइकांच्या हातीं पडेपर्यंतच्या सर्व क्रिया उत्पादनापैकींच आहेत असें धरलें ह्मणजे या दळणवळणाच्या साधनांनीं देशांतील संपत्तीचें उत्पत्तिच अप्रत्यक्षपणें वाढली असें म्हणणें प्राप्त आहे. या दळणवळणाच्या साधनांनींच देशाचा आयातनिर्गत व्यापार वाढला. हिंदुस्थानची सांपत्तिक भरभराट होत आहे हें ह्मणणारा पक्ष या वाढत्या आयातीनिर्यातीकडेच विशेषतः बोट दाखवितो.

या काळांत तिसरी सांपत्तिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे हिंदुस्थानांत संपत्तीच्या व शेतकीच्या नव्या पिकाचे पुष्कळ नवे नवे प्रकार उदयास आले ही होय. इंग्रजी राज्याच्या पूर्ण व स्थिर स्थापनेनंतर इंग्रजी व्यापारी व हिंदुस्थानसरकार यांचें लक्ष हिंदुस्थानांतील बिन लागवड केलेल्या जमिनीकडे जाऊन त्यांनीं नव्या पिकांची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्याचा उपक्रम केला. तदनुरूप चहाची लागवड १८५१ मध्यें सुरू झाली व आतां हिंदुस्थान चहा निर्यात करणारा एक महत्त्वाचा देश बनला आहे. कॉफीची प्रचंड शेती १८६० मध्यें सुरू झाली. त्याच वर्षी निळीची प्रचंड शेती सुरू झाली. चहाप्रमाणें या दोन पिकांची

सारखी भरभराट होत गेली नाहीं. कारण ब्राझीलमधल्या स्वस्त कॉफीनें व जर्मनीमध्यें रासायनिक पद्धतीनें निळीचे स्वस्त रंग बनविण्याचे कारखाने निघाल्यापासून या दोन धंद्यांची पीछेहाट होत गेली. तसेंच १८६२ मध्यें कोयनेलच्या झाडांची लागवड मोठ्या प्रमाणावर होऊं लागली.

परंतु याच काळांत या कृषिज संपत्तीपेक्षां विशेष महत्त्वाच्या अशा दोन खनिज संपत्तींचा शोध लागून त्यांचा झपाट्यानें प्रसार झाला. हे दोन खनिज पदार्थ म्हणजे रॉकेल व दगडी कोळसा हे होत. हिंदुस्थानांत हे खनिज पदार्थही १८५० ते १८६० च्या दरम्यानच मोठ्या प्रमाणावर खाणींतून बाहेर पडूं लागले.

या काळापूर्वीच माहीत झालेले परंतु याच काळांत ज्यांची लागवड विशेष जोरानें होऊं लागली असे कृषिज पदार्थ म्हणजे तंबाखू व ताग हे होत. यांपैकीं दुसऱ्याचा हिंदुस्थानाला जणूं कांहीं पूर्ण मक्ताच मिळून हें पीक बंगाल्यांत सर्वत्र पसरलें व गोणपाटें व इतर कापड तयार करणारे कारखानेही बंगाल्यांत जागोजाग झाले. या सर्व जुन्या व नव्या कृषिज व खनिज संपत्तीची वाढ या पर्वामध्यें झपाट्यानें झाली ही गोष्टही आंकड्यांनीं सिद्ध करतां येते.

या काळांतील एका दृष्टीनें अत्यंत मोठा विशेष म्हणजे हिंदुस्थानांतील पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार होय. हिंदुस्थानांतील सर्व विश्वविद्यालयें १८५७ च्या नंतरचीं आहेत. शिक्षणखात्याचा जोराचा प्रसार याच काळानंतर झाला. कांहीं कांहीं प्रांतांत यापूर्वीही पाश्चात्य शिक्षणाला सुरवात झाली होती हें खरें आहे, तरी मोठ्या प्रमाणावर शिक्षणाचा प्रसार याच काळांत झाला हें सर्वश्रुतच आहे. या शिक्षणाचा परिणाम देशांतील सांपत्तिक स्थितीवर झाल्यावांचून राहिला नाहीं. पाश्चात्य शिक्षणानें लोकांमध्यें नव्या नव्या कल्पना उद्भवूं लागल्या. मानसिक कल्पनांच्या विस्तारानें मानवी गरजा, अभिरुचि व वासना यांची वाढ होते, असा सार्वत्रिक नियम आहे. त्याप्रमाणेंच शिकलेल्यांच्या व त्यांच्या सहवासानें व अनुकरणानें दुसऱ्यांच्याही गरजा पुष्कळ वाढल्या. यामुळें पूर्वीची साधी राहणी राहिली नाहीं. तसेंच देशांत शांतता स्थापित झाल्यापासून पैसे पुरून ठेवण्याची पद्धतीही कमी कमी होत चालली व लोक आपआपल्या उत्पन्नाच्या मानानें जास्त जास्त खर्च करूं लागले. याचाही परिणाम संपत्तीच्या वाढीवर व व्याप-

रावर झाल्यावांचून राहिला नाहीं.

यांप्रमाणें संपत्तीच्या वाढीचीं दोन अमूर्त कारणें व दोन प्रत्यक्ष कारणें या ६० वर्षांच्या पर्वांत अस्तित्वांत आलीं व यामुळें या कालांत संपत्तीची वाढ होऊं लागली. तसेंच, या काळांत सर्वत्र शांतता झाल्यानें व लढाया वगैरे चालू नसल्यानें लोकसंख्येच्या वाढीस जोरानें सुरुवात झाली. लोकसंख्येची वाढ ह्मणजे श्रम करणारांची वाढ अथवा संपत्तीच्या एका मूर्त कारणाचीच वाढ होय. यामुळें ही संपत्ति जास्त वाढावी हें स्वाभाविक आहे. या लक्षणावरूनच एक पक्ष हिंदुस्थानची सांपत्तिक भरभराट होत आहे असें प्रतिपादन करीत आला आहे. परंतु ही संपत्तीची वाढ दर माणशीं किती वाढली व ती हिंदुस्थानच्या पहिल्या पर्वापेक्षां जास्त वाढली किंवा काय याची तुलना करण्यास पुरेशी माहिती नाहीं. परंतु १७५० पासून १८५० पर्यंतच्या काळापेक्षां या काळांत संपत्तीची वाढ अधिक झालेली आहे ही गोष्ट निर्विवाद आहे.

परंतु ज्याप्रमाणें इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रांतीपासून संपत्तीची देशांत विलक्षण वाढ झाली तरी या वाढीच्या मानानें बहुजनसमाजाची सांपत्तिक स्थिति सुधारली नाहीं, तर ती उलट कांहींशी वाईटच झाली; मात्र या क्रांतीपूर्वी समाजामध्यें सामान्यतः संपत्तीची वांटणी समान होती ती या काळांत फारच विषम झाली; अर्थात् श्रीमंत व गरीब यांमध्यें जो पूर्वी फारसा फरक नव्हता, तो आतां या दोन वर्गांमध्यें जमीनअस्मानाचा फरक पडला. या विषम वांटणीनें सामान्य लोकांची स्थिति इंग्लंडच्या भरभराटीच्या दिवसांतही वाईट झाली; त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील गेल्या ६० वर्षांतील स्थिति झाली आहे. देशांत संपत्ति पुष्कळ वाढली ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु या संपत्तीच्या वाढीबरोबरच संपत्तीच्या विषम वांटणीचीं कारणें अस्तित्वांत आल्यानें हिंदुस्थानांतील सामान्य लोकांची सांपत्तिक स्थिति वाईट झाली, निदान संपत्तीच्या वाढीच्या मानानें सुधारलेली नाहीं. तेव्हां आतां या कारणांचा विचार केला पाहिजे. म्हणजे हिंदुस्थानच्या संपत्तिविषयक तीव्र मतभेदांतील सत्यासत्याचा भाग तेव्हांच ध्यानांत येईल.

या काळांत संपत्तीची विषम वांटणी होण्याचें पहिलें कारण हें कीं, बरेच धंदे व व्यापार इंग्रज व्यापारी व भांडवलवाले यांच्या हातांत गेले. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांत गेल्या साठ वर्षांत जें नवीन कृषिज व खनिज संपत्ति उत्पन्न करण्याचे कारखाने

निघाले ते बहुतेक युरोपियन कंपन्यांनीं व युरोपीयन लोकांनींच काढले. यामुळें या धंद्यांत मिळणारे भांडवलावरील व्याज, नफा व जमिनीचा खंड हे तिन्ही नव्या संपत्तीचे वांटे युरोपियनांस मिळाले. अर्वाचीन काळीं संपत्तीचे हेच वांटे मोठे असतात. येथल्या लोकांना फक्त या संपत्तीपैकीं मजुरीचा वांटा मिळाला; परंतु या देशांतील एकंदर समाजाच्या साध्या राहणीनें पूर्वापार चालत आलेला मजुरीचा दर फार हलका होता. तेवढा हलका दरच येथल्या लोकांना मिळाला. सांपत्तिक बाबतींत मागसलेल्या देशानें पुढारलेल्या देशांतील भांडवलाचा उपयोग केला पाहिजे व त्याप्रमाणें जपानसारखीं स्वतंत्र राष्ट्रें हीं परकी भांडवलावर देशांत कारखाने काढतात व ही गोष्ट देशाच्या फायद्याचीच आहे. मग हिंदुस्थानांत युरोपियन भांडवल आल्यानें हिंदुस्थानचें नुकसान कां व्हावें, असा एक मुद्दा या ठिकाणीं केव्हां केव्हां आणण्यांत येतो. त्याचाहि येथें खुलासा होईल. देशाच्या सांपत्तिक भरभराटीकरितां भांडवल जरूर आहे व लागल्यास तें परदेशाहून आणावें; परंतु हें भांडवल देशांतील लोकांनीं आणून त्यांनींच देशांत कारखाने उभारले तर त्यांत देशाचा जास्त फायदा आहे. कारण त्यायोगानें संपत्तीच्या चार वांट्यांपैकीं खंड, नफा व मजुरी असे तीन वांटे देशांत राहतात व फक्त व्याज हा एक वांटा मात्र परदेशीं जातो. परंतु हिंदुस्थानांत याच्या उलट स्थिति झाली आहे. यामुळें या संपत्तीच्या वाढीपासून बहुजनसमाजास फारसा फायदा झाला नाहीं.

संपत्तीच्या विषम वांटणीस उत्तेजन देणारें दुसरें कारण म्हणजे इंग्रजी न्यायपद्धति हें होय. या न्यायपद्धतीनें हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची स्थिति या काळांत फार हलाखीची झाली यांत संशय नाहीं. तेव्हां त्याचा थोड्या विस्तारानें येथें विचार केला पाहिजे.

इंग्रजांपूर्वींची इकडची न्यायपद्धति अगदीं साधी व बिनखर्चाची होती. बहुतेक तंट्याभांडणांचा निकाल गावपंचाइतीनें होई. आधीं ठरीव असे कायदेकानू नव्हते; निकाल गांवांतल्या पोक्त माणसांनीं आपल्या व्यवहारचातुर्यानें द्यावयाचा असे. या पद्धतींत वकिलांची गरज नव्हती, कागदपत्रांची गरज नव्हती, पुराव्याची भानगड नव्हती. लोक साधेभोळे व देवावर भरंवसा ठेवणारे होते. तेव्हां बहुधां निकाल पंचांस सहज लावतां येई. पुराव्याची अडचण असली तर गाईच्या

शेंपटीला हात लावून किंवा मारुतीपुढें शपथ घेऊन एका पक्षानें आपलें म्हणणें खरें करण्याची तयारी दाखविल्यास दुसरा पक्ष त्यास तयार होई. ज्याप्रमाणें युरोपांत द्वंद्वयुद्धानें तंट्याचा निकाल जलदीनें लागे, तशा तऱ्हेची झटकाफटकी व बिनखर्चाची ही न्यायपद्धति होती. गांवपंचाइतीचा किंवा कांहीं ठिकाणीं सरकारनें नेमलेल्या न्यायाधीशाचा निकाल एखाद्या पक्षास पसंत नच पडला तर हुजुरांकडे म्हणजे मुख्य राजाकडे धांव घेण्याची प्रजेस मुभा असे. तेथें त्याला नजराण्याचा खर्च पडे हें खरें, तरी पण यापेक्षां दुसरा खर्च नसे. इंग्रजी न्यायपद्धति उत्तम तत्त्वावर बसविलेली खरी व सुधारलेल्या राज्यपद्धतीला अनुरूप खरी; परंतु ती पद्धति अज्ञानी, साध्याभोळ्या अशिक्षित प्रजेस निरुपयोगी होती. इतकेंच नव्हे तर ती त्यांना पुष्कळ तऱ्हेनें घातक झाली. कारण, या न्यायपद्धतीनें आमच्या शेतकरीवर्गाची संपत्ति व जमिनीही दुसऱ्याकडे गेल्या.

हें कसें झालें हें खालील विवेचनावरून दिसून येईल. इंग्रजी कायद्याचें पहिलें तत्त्व म्हणजे ' कायद्याचें अज्ञान ही कांहीं न्यायासनापुढें सबब चालत नाहीं.' अर्थात् प्रत्येक मनुष्याला कायदा ठाऊक आहे असें इंग्रजी कायदा गृहीत धरतो. परंतु भोळसर लोकांस अशा भानगडीचा कायदा कसा समजावा ? तेव्हां अपरिचित अशा कायदेकानूंच्या तडाक्यांत वादीप्रतिवादींचा पूर्वीच्याप्रमाणें स्वतः निभाव लागणें दुरापास्त झालें. यामुळें या कायद्यानें वकीलवर्गाची जरूरी उत्पन्न झाली. व असा एक नवाच वर्ग इंग्रजी कायद्यानें अस्तित्वांत आला. या वर्गाची भली मोठी मिळकत शेतकऱ्यांच्या संपत्तींतूनच प्रायः आली. कारण, हिंदुस्थानांतील बहुतेक दिवाणी खटले अगदीं लहानलहान रकमांचे असतात हें सर्वश्रुतच आहे, व ते शेतकऱ्यांच्या कर्जाबद्दल असतात. पूर्वीच्या काळीं शेतकऱ्यास कर्जाची गरज लागली म्हणजे तो सावकाराकडून कर्ज काढी व सावकार त्याला चिठ्ठीपट्टीशिवाय कर्ज देई, व चिठ्ठीपट्टी घेतली तरी बिनखर्चानें होई. कारण, शेतकऱ्याची कर्ज बुडविण्याची बुद्धीच नसे. ' कर्जाला मुदत ' ' कांहीं काळानंतर मुदतीबाहेर जाणें ' या कल्पना त्यास ठाऊकच नव्हत्या. अजूनसुद्धां पाश्चात्य कल्पनांनीं दूषित न झालेल्या माणसास मुदतीनें कर्ज न देणें कसें होतें हें समजत नाहीं. कर्ज म्हणजे कर्ज, व आपल्याला सवड होईल तेव्हां तें दिलें पाहिजे, ही अशा माणसाची बुद्धि. शेतकऱ्याच्या या अज्ञानाची व त्यापासून शेतकऱ्याच्या होणा-

ऱ्या नुकसानाची निदर्शक अशी एक गोष्ट येथें सांगण्यासारखी आहे. इंग्रजी कायद्याच्या नव्या कल्पनांचा गंधही नसलेला एक साधाभोळा जुन्या चालीचा शेतकरी होता. त्यावर एका सावकारानें कर्ज घेतल्याबद्दल व तें परत मागण्याबद्दल फिर्याद लावली. कर्जरोखा वगैरे कांहीं नव्हता. तोंडचा करार करून कर्ज घेतलें होतें असें फिर्यादीचें म्हणणें होतें. हा शेतकरी कोर्टापुढें आला व त्यानें सरळ उत्तर दिलें कीं, मी या सावकाराचें कर्ज घेतलें होतें; परन्तु तें मी परत केलें आहे. तेव्हां आतां याचें मी कांहींएक देणें नाहीं. यावर कोर्टानें सांगितलें कीं, तुला देणें कबूल आहे, तेव्हां ही गोष्ट आतां शाबीत झाली. परन्तु तूं तें कर्ज परत केलेंस, याला आतां पुरावा आणला पाहिजे. यावर तो शेतकरी उत्तर देतो— " याला पुरावा कसला? मी कर्ज घेतलें होतें असें मीच सांगितलें व मी कर्ज परत केलें असेंही मीच सांगितलें. तर माझीं दोन्हीं म्हणणीं तरी खरीं असलीं पाहिजेत किंवा दोन्हीं खोटीं असलीं पाहिजेत." परन्तु इंग्रजी कायद्याप्रमाणें कोर्टाला हें पसंत नव्हतें. आपल्याविरुद्ध जाणाऱ्या आपल्याच विधानाला स्वतःच्या कबुलीखेरीज दुसरा पुरावा लागत नाहीं. परन्तु आपल्या हिताच्या म्हणण्याला स्वतंत्र पुरावा पाहिजे, असें इंग्रजी कायद्याचें तत्त्व आहे. परन्तु याची भोळसर शेतकऱ्यास कल्पना होईना. कारण, तो म्हणे " माझें जर एक म्हणणें तुम्ही खरें मानतां तर दुसरेंही खरें मानलेंच पाहिजे." परन्तु इंग्रजी कायद्याप्रमाणें या खटल्यांत सावकारास दावा मिळतो. कारण, प्रतिवादी कर्ज कबूल करतो तेव्हां तें शाबीद ठरतें; व कर्ज परत केल्याबद्दलच्या पुराव्याचा बोजा प्रतिवादीवर पडतो व तसें त्याला करतां न आल्यास त्याच्यावर दावा लागू होतो. या कज्ज्यांत जर प्रतिवादीनें दोन्ही गोष्टींसंबंधानें कानावर हात ठेविले असते—मी कर्ज घेतलें नाहीं व मला परत केल्याचें माहिती नाहीं, असें म्हटलें असतें—म्हणजे पुराव्याचा बोजा वादीवर पडला असता व मग शेतकरी कर्जाच्या जबाबदारींतून सुटला असता. परन्तु आपली बाजू खरी करण्याकरितां इंग्रजी कायद्याप्रमाणें केव्हां केव्हां खोटें बोलावें लागतें, ही गोष्ट प्रथमतः भोळसर शेतकऱ्यास समजत नव्हती व जेव्हां समजूं लागली तेव्हांपासून त्यांना कोर्टामध्यें खऱ्याखोट्याचा विधिनिषेध वाटत नाहींसा होऊन शेतकऱ्यांची दानत अगदीं नाहींशी झाली. चांगल्या कायद्याच्या तत्त्वांचा अयोग्य परिस्थितींत

उपयोग झाल्यामुळें असा मोठा अनिष्ट परिणाम झाला.

यापमाणें इंग्रजी कायद्यामध्यें असलेली 'मुदतीची कल्पना' 'दाव्याच्या कारणांची कल्पना' 'पुराव्याच्या जबाबदारीची कल्पना' 'दाव्याच्या खर्चाच्या जबाबदारीची कल्पना' या सर्व कल्पना शेतकऱ्यांस नव्या होत्या. या कल्पना, तसेंच कराराच्या अटी अक्षरशः पाळल्या पाहिजेत; पाळल्या नाहींत तर त्याची जबाबदारी अटी मोडणारावर पडते, वगैरे सर्व तत्त्वें न्यायास धरून आहेत व सुधारलेल्या न्यायपद्धतींत अवश्य आहेत हें आम्हांस माहिती आहे. परन्तु ही न्यायपद्धति व हीं कायद्याचीं तत्त्वें समजण्यासारखी खालच्या वर्गाची स्थिति नव्हती. पांढरपेशा वर्गाला हीं तत्त्वें तेव्हांच समजलीं व या वर्गानें या कायद्याच्या तत्वांचा आपल्या फायद्याकडे उपयोग करून घेतला. यामुळेंच या गेल्या ५०।७५ वर्षांमध्यें शेतकरी वर्गाची शेतकीची मालकी जाऊन बहुतेक सर्व शेतकरी उपरी कुळें बनत चालले आहेत. या गोष्टीचें प्रत्यंतर खानेसुमारीच्या आंकड्यांत सहज दिसून येतें. १८९१ ते १९०१ या अवघ्या दहा वर्षांत शेतकीवर निव्वळ मजुरी करणारांचा वर्ग पहिल्याच्या दुप्पट झाला. म्हणजे १८९१ च्या खानेसुमारींत शेतकीचे मजूर १॥ कोट होते ते १९०१ मध्यें ३ कोट झाले. यांतली कांहीं वाढ वर्गीकरणभेदामुळें झालेली आहे. इंग्रजी कायद्याप्रमाणें तोंडी पुराव्यापेक्षां लेखी पुराव्याची मातबरी जास्त, त्यांतल्या त्यांत रजिष्टर व स्टांपावरच्या पुराव्याची मातबरी जास्त. या कायद्याच्या तत्त्वामुळें सर्व सावकार लोक आतां शेतकऱ्यांना तोंडी कबुलीवर कर्ज देतनासे झाले. यामुळें सर्वत्र कर्जरोखे आले व याचा खर्च शेतकऱ्यावरच बसला. कारण तो गरजू. तेव्हां इंग्रजी अंमलांतील स्टँपाचें उत्पन्न बहुतेक शेतकऱ्यांकडूनच येतें. त्यांच्यावर हा एक अप्रत्यक्ष करच आहे. शेतकऱ्यानें कर्जरोखा लिहून दिला व त्यांत अमुक दिवसांनीं पैसे परत देईन असा करार केला, कीं ती अट पाळण्याची जबाबदारी शेतकऱ्यावर आली. त्यानें वेळेवर पैसे आणून दिले नाहींत कीं फिर्यादीचें कारण प्रतिवादीकडून घडतें व म्हणून सर्व खर्च प्रतिवादीच्या डोक्यावर बसतो. बरें, सावकारास फिर्याद करणें जरूर. कारण अमुक मुदतींत फिर्याद न केल्यास कर्ज मुदतीबाहेर जाईल. तेव्हां त्याला फेरखत करून घेणें किंवा फिर्याद करणें भाग. परंतु याचा सर्व खर्च मात्र शेतकऱ्यावर

पडणार. सारांश, सुधारलेला कायदा व अज्ञानी शेतकरी यांचा मिलाफ म्हणजे राक्षस व वामनमूर्ति यांच्या सहकारित्वासारखा होय. ज्याप्रमाणें या सहकारीपणांत वामनमूर्तीचाच नेहमीं तोटा व्हावयाचा, तसाच प्रकार शेतकऱ्यांचा झाला. तेव्हां आमच्या शेतकरीवर्गाचा कर्जबाजारीपणा हा पुष्कळ अंशानें अलीकडील १०० वर्षांत इंग्रजी अंमलांतील मागें सांगितलेला करवसुलीचा कडक नियम, स्टँपाची भानगड व कायदेकानूंचीं तत्वें यांनीं उत्पन्न झालेला आहे. यामुळें इंग्रजी अंमलांत शेतकीचें उत्पन्न वाढलें खरें. एकंदर शेतींत पहिल्यापेक्षां उत्पन्न जास्त होऊं लागलें. याला शेवटचें म्हणजे १८९६-९७ सालापासून आजपर्यंतचें पर्व अपवाद आहे. कारण या पर्वांत पुष्कळ वर्षें अवर्षणाचीं, कमी पावसाचीं किंवा दुष्काळाचीं होतीं व या पर्वांत शेतकऱ्यांचीं गुरेंढोरें मरून शेतकीची हलाखी झाली. तरी पण त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळाला नाहीं. त्यांना सावकार, वकील व स्टँपाच्या रूपानें सरकार, इतके नवे वांटेकरी उत्पन्न झाले. यामुळें दळणवळणाच्या योगानें शेतकऱ्याच्या मालाला गिऱ्हाईक वाढलें व किंमत वाढली. तरी पण त्याचा फायदा त्याला मिळाला नाहीं. शिवाय प्रत्येक जमाबंदीच्या वेळीं त्याच्यावरील सारा वाढला तो निराळाच. आणखी एका कारणानें शेतकऱ्यांची हलाखी झाली. तें म्हणजे जंगलखात्याची स्थापना. पूर्वींच्या काळीं शेतकऱ्यांस जंगलें हीं सृष्टीच्या देणगीसारखीं असत. यामुळें लांकुडफांटें, शेताच्या खतांस लागणारा चोळामोळा व गुरांस चरण हीं मुबलक असत व त्याला त्याबद्दल शेताच्या उत्पन्नांतून कांहींएक द्यावें लागत नसे. उलट जंगलाच्या या अप्रत्यक्ष उत्पन्नाची त्याच्या उत्पन्नांत एक प्रकारें भर पडत असे. एखाद्या नोकरास पैशाची मजुरी देऊन शिवाय कांहीं जिनसा वर दिल्या म्हणजे तितकी त्याची मजुरी वाढल्यासारखीच झाली. परंतु पुढें या जिनसा जर धन्यानें देण्याचें कमी केलें तर त्याचा पैशांतला पगार वाढविणें अवश्य आहे. तरच त्याची जुनी मजुरी त्याला मिळाल्यासारखें होईल; नाहीं तर त्याची मजुरी कमी होऊन त्याला जास्त दारिद्र्य येईल. जंगलखात्याच्या स्थापनेनें येथल्या शेतकरीवर्गावर अशाच तऱ्हेचा परिणाम झाला. ज्या गोष्टी पूर्वीं त्यांना सृष्टीच्या देणग्या म्हणून मिळत, त्या जंगल सरकारचें झाल्याबरोबर नाहींशा झाल्या व त्याबद्दल त्याला किंमत द्यावी लागली. गुरचराईची फी पडूं झाली. लांकुडफाट्याच्या परवान्याला फी

सुरू झाली. म्हणजे हा भाग शेताच्या उत्पन्नांतून त्याला द्यावा लागला. वास्तविक जंगलखात्याची स्थापना झाल्यानें शेतकऱ्यांची सृष्टीची देणगी कमी झाली. म्हणून न्यायानें त्यांचा सारा कमी करावयास पाहिजे होता.

वरील कारणांनीं शेतें स्वतः करणाऱ्या वर्गाची स्थिति पूर्वीच्या काळापेक्षां वाईट झालेली आहे यांत शंका नाहीं. कारण पूर्वीच्या काळीं त्यांना शेताची मालकी असल्यामुळें जो फायदा रहात असे, तो हल्लीं दुसऱ्या वर्गामध्यें म्हणजे सावकार व पांढरपेशा वर्ग यांमध्यें वांटला गेला आहे.

शेतकऱ्याची स्थिति खालावत चालली आहे असें हिंदी मुत्सद्दी कां म्हणतात हें वरील विवेचनावरून दिसून येईल. हें म्हणणें सर्व देशांतील एकंदर शेतकऱ्यांबद्दल बरोबर आहे. कारण वर निर्दिष्ट केलेली कारणपरंपरा सर्वत्र लागू होती. आतां कांहीं कांहीं प्रांतांत शेतीच्या लागवडींत फरक झाल्यानें थोडी फार सुधारणा झाली हें खोटें नाहीं. उदाहरणार्थ, बंगालमध्यें कायमधाऱ्याची पद्धत आहे. यामुळें जरी जमीनदारांचें उत्पन्न पुष्कळ वाढलें असलें तरी या कायमच्या धाऱ्याच्या पद्धतीचा फायदा तेथल्या शेतकऱ्यांसही मिळाला आहे, हें दत्तासारख्या त्या प्रांतांची पूर्ण माहिती असलेल्या सरकारी अंमलदाराचें म्हणणें आहे तसेंच जेथें हलक्या प्रतीच्या पिकाऐवजीं शेतकरी लोक वरच्या प्रतीचें पीक करूं लागले आहेत, जेथें पिकाच्या फरकामुळें अजून जमीनधाऱ्यांत वाढ झाली नाहीं तेथेंही शेतकऱ्यांची स्थिति किंचित् सुधारली आहे. उदाहरणार्थ, वऱ्हाड व खानदेश हे भाग घ्या. येथें दर वर्षास कापसाची लागवड वाढत आहे. पूर्वी खानदेशांतून धान्य बाहेर जात असे. हल्लीं खानदेशाला बहुतेक इंग्लंडची अवस्था आली आहे. म्हणजे त्या प्रांतांतील लोकसंख्येला लागणारें धान्य दुसऱ्या प्रांतांतुन आणावें लागतें. या प्रांतांतही शेतकऱ्यांची स्थिति किंचित् तरी सुधारत आहे; निदान खालावत तरी नाहीं खास. तसेंच ज्या ठिकाणीं पाटबंधाऱ्यांचीं कामें झालीं आहेत त्यालगतच्या शेतकऱ्यांची स्थितीही बऱ्यापैकीं आहे. या बाबतींत सर्व हिंदुस्थानामध्यें पंजाबसारखी सुधारणा कोठेंच झाली नाहीं. पंजाबांत सरकारनें पाटबंधाऱ्यांचीं कामें फारच मोठ्या प्रमाणावर सुरू केलीं आहेत व कालव्याच्या लगतीला सरकारनें नवी वसाहत केली आहे. या सर्व लोकांची सांपत्तिक स्थिति फार चांगली आहे. कालव्याच्या प्रसारानें एकं-

दर पंजाब प्रांताची भरभराट होत चालली आहे असें जर जेम्स विलसन यांनीं या वर्षाच्या प्रारंभीं रॉयल एकॉनॉमिक सोसायटीपुढें वाचलेल्या निबंधावरून दिसून येतें.

येथपर्यंत हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीचा पूर्व इतिहास व हिंदुस्थानची सद्यःसांपत्तिक स्थिति याचें शब्दचित्र वाचकांपुढें मांडलें. आतां हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास अर्थशास्त्रांतील कोणतीं तत्वें व सिद्धांत लागू पडतील हें पहावयाचें राहिलें. तें आतां थोडक्यांत आटोपून या लांबलेल्या लेखनसत्राची समाप्ति करण्याचा बेत आहे.

वरील विवेचनावरून हिंदुस्थान हा अजून प्रायः कृषिवृत्ति देश आहे असें दिसून येईल. कारण जुन्या काळची उद्योगविविधता नाहींशी होऊन अलीकडील दोन पर्वांत हिंदुस्थानांत शेतकीवर लोकांचा मारा पडूं लागला. अजूनही जवळजवळ शेंकडा ७०।७५ लोक शेतकीवर निर्वाह करणारे आहेत. या लोकांची सामान्यतः दैन्यावस्था आहे हेंही आपण पाहिलें. परंतु प्रसिद्ध जर्मन अर्थशास्त्री लिस्ट यानें म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थान हें हल्लीं कृषिवृत्ति स्थितींतून उद्योगवृत्ति स्थितींत जाण्यास योग्य अशा स्थितींत आलें आहे. अधिक सुधारलेल्या देशांशीं असलेल्या दळणवळणानें व आजपर्यंतच्या खुल्या व्यापारतत्वानें देशांत नानातऱ्हेचा माल येऊं लागला आहे व त्यायोगें व पाश्चात्य शिक्षणानें लोकांमध्यें चांगल्या रहाणीची अभिरुचि उत्पन्न झालेली आहे. लोकांच्या वासना व खर्च करण्याची प्रवृत्ति पुष्कळच वाढलेली आहे. तेव्हां ही परिस्थिति देशांत उद्योगधंद्यांचा उदय व वाढ जोरानें होण्यास योग्य आहे. व त्याप्रमाणें हिंदुस्थानांत नवीन धंद्यांचा प्रारंभ होऊं लागला आहे. पण आतां खुल्या व्यापाराचें तत्व टाकून दिलें पाहिजे. कारण हल्लींच्या स्थितींत खुला व्यापार चालू राहिला तर या नव्या बालउद्योगांचा पूर्ण वाढलेल्या दुसऱ्या देशांच्या उद्योगांच्या चढाओढींत टिकाव लागावयाचा नाहीं. तेव्हां अर्थशास्त्रदृष्ट्या या धंद्यांच्या वाढीकरितां सरकारनें व लोकांनीं संरक्षणतत्त्वाचा होतां होईल तितका अवलंब केला पाहिजे. म्हणजे हिंदुस्थानच्या सद्यःसांपत्तिक स्थितीला संरक्षणतत्व आवश्यक आहे असें लिस्टच्या विवेचनाप्रमाणें ठरतें व तें सर्वांशीं खरें आहे अशी आमची समजूत आहे. कारण, आमच्या शेतकऱ्यांची सुधारणा दोन तऱ्हांनीं करतां

येण्यासारखी आहे. एक शेतकीवरील मारा कमी करून; व दुसरी, शेतकींत सुधारणा करून. शेतकीवरील मारा कमी होण्यास देशांत उद्योगविविधता वाढली पाहिजे, व, उद्योगविविधता वाढण्यास देशांत धंदे किफायतशीर होऊं लागले पाहिजेत. असें होण्यास त्यांना पूर्ण वाढलेल्या धंद्यांशीं टक्कर मारतां आली पाहिजे. परन्तु हें या बालधंद्यांचे हातून होण्यास संरक्षणतत्त्वाचा अवलंब केला पाहिजे. परन्तु हिंदुस्थानास जमाखर्ची स्वातंत्र्य मिळेतोंपर्यंत या उपायाचा अवलंब होणें अशक्य कोटींपैकीं आहे. म्हणून या उपायाचें जास्त विवेचन करण्याची जरूरी नाहीं. मात्र हिंदुस्थानास सध्यांच्या स्थितींत संरक्षणतत्त्वाचा जर दुजोरा मिळेल तर उद्योगधंद्यांची वाढ हां हां म्हणतां होईल यांत शंका नाहीं.

आतां हिंदुस्थानची सद्यःसांपत्तिक स्थिति सुधारण्यास अर्थशास्त्रांतील सिद्धांतास धरून शक्य असे उपाय कोणते याचा विचार करावयाचा राहिला. पर्यायानें याचा विचार या ग्रंथाच्या तात्विक भागांत झालाच आहे. तेव्हां येथें त्यांचा फक्त नामनिर्देश व उल्लेख बस्स आहे. या ग्रंथाच्या तात्विक भागांत संपत्तीच्या उत्पत्तीच्या कारणांचा सविस्तर विचार केलेला आहे. आतां देशांत संपत्ति वाढण्यास या कारणांची वाढ झाली पाहिजे हें उघड आहे. तेव्हां या संपत्तीच्या कारणांच्या वाढीस उत्तेजन देणें हाच संपत्ति वाढविण्याचा खरा उपाय होय. परंतु या कारणांचे दोन वर्ग आहेत. एक अमूर्त कारणें व दुसरा मूर्त कारणें. मालमत्तेची सुरक्षितता व वासनांची वाढ हीं दोन्ही कारणें हल्लीं हिंदुस्थानांत पूर्णपणें वास करीत आहेत यामध्यें संशय नाहीं. या दोन्ही गोष्टी सुधारलेली ब्रिटिश राज्यव्यवस्था व पाश्चात्य शिक्षण यांनीं घडवून आणल्या आहेत. तेव्हां त्यासंबंधानें अधिक कांहीं एक कर्तव्य राहिलें नाहीं. संपत्तीचीं मूर्त कारणें चार आहेत. त्यांपैकीं सृष्टिशक्ति अगर कच्चा माल हिंदुस्थानांत हवा तेवढा आहे. हा कच्चा माल परदेशीं जाऊन त्याचा पक्का माल होऊन आयात होत आहे, ही मुळीं हिंदुस्थानच्या अवनतीची गुरुकिल्ली आहे. तेव्हां या सर्व कच्च्या मालाचा येथेंच पक्का माल होऊं लागला म्हणजे हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति हां हां म्हणतां सुधारेल. परंतु हें घडून येण्यास अडचणी फार आहेत. तसेंच येथें शेतीच्या सुधारणेसही अवसर बराच आहे. कारण सुधारलेल्या देशांच्या मानानें येथें दर एकरीं शेतीचें उत्पन्न फारच कमी आहे. तेव्हां हें उत्पन्न वाढविणें हें एक औद्यो-

गिक प्रगतीचें जरूर काम आहे व सरकार यासंबंधीं हल्लीं बरीच खटपट करीत आहे. सुधारलेल्या शेतीचें ज्ञान वाढविण्याकरितां व त्याचा प्रसार करण्याकरितां सरकार प्रयत्न करीत आहे. यामध्यें लोकांनीं सहकारित्वानें काम केलें पाहिजे. परंतु या नवीन ज्ञानाचा शेतकरीवर्गास मिळावा तितका अजून फायदा मिळत नाहीं. याच्या मुळाशीं त्यांचें अज्ञान आहे. संपत्तीच्या वाढीचें दुसरें कारण जें श्रम, तें या देशांत पुष्कळ आहे. कारण नुसत्या ब्रिटिश इंडियाचीच लोकसंख्या २३ कोटींवर आहे. परंतु आमच्या देशांतील मजूरवर्ग कमी कर्तबगारीचा आहे. त्याची कार्यक्षमता वाढविणें म्हणजे संपत्तीच्या वाढीस मदत करणें होय. ही मजुरांची कार्यक्षमता वाढविण्याचा एक रामबाण उपाय. म्हणजे त्या वर्गामध्यें प्राथमिक शिक्षण—सामान्य व औद्योगिक—याचा प्रसार करणें होय. हा सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न सरकारनें हातीं घेतल्याखेरीज सुटणारा नाहीं. तेव्हां प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक सक्तीचें करणें हा एक संपत्तीच्या वाढीचाच मार्ग आहे. हिंदुस्थान सरकार या शिक्षणाच्या प्रश्नाकडे अजून राजकीय व लष्करी दृष्टीनें पहात आहे. परंतु औद्योगिक बाबतींत पुढारलेले देश सामान्य शिक्षणाकडे औद्योगिक दृष्टीनें पाहतात. तरी लोकांच्या पुढाऱ्यांनीं या प्रश्नाचीही औद्योगिक बाजू सरकारपुढें मांडली पाहिजे. सामान्य लोकशिक्षण हा एक श्रमाची कार्यक्षमता वाढविण्याचा मार्ग आहे. जर सरकार या उपायाकडे कानाडोळा करील तर सरकारचा शेतकीची प्रगति घडवून आणण्याचा प्रयत्न व्यर्थ जाईल; कारण नवीन ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोंचणारच नाहीं. ही गोष्ट लोकनायकांनीं सरकारच्या ध्यानांत आणून दिली पाहिजे. शेतकऱ्यांसंबंधींचा दुसरा प्रश्न त्यांच्या कर्जबाजारीपणाचा व त्यांच्या शेतकींत सुधारणा करण्याकरितां त्यांना कमी व्याजानें कर्ज मिळवून देण्याचा आहे. हे दोन्ही प्रश्न सहकारी तत्त्व व सहकारी पेढ्यांचें तत्त्व या दोन तत्त्वांनीं सुटण्यासारखे आहेत. या बाबतींत उशीरानें कां होईना परंतु सरकारनें उपक्रम केला आहे व या दोन तत्त्वांचा सरकारनें व लोकांनीं होईल तितका प्रसार केला पाहिजे. परंतु हें होण्यासही शिक्षण पाहिजेच आहे.

आतां संपत्तीच्या वाढीचीं दोन कारणें राहिलीं; एक भांडवल व दुसरें त्यास योजक. हिंदुस्थानांत भांडवलाची वाढ फारच सावकाश होते. येथेंच 'औद्योगिक

स्रावाचा ' प्रश्न येतो. हिंदुस्थान देशाचीं राज्यसूत्रें विलायतसरकारच्या हातांत असल्यामुळें विलायतेंत हिंदुस्थानास पैसे धाडावे लागतात. सरकारी नोकरांच्या पेन्शनांचे पैसे द्यावे लागतात. तसेंच लष्करी खर्चाकरितांही त्यास कांहीं पैसे द्यावे लागतात व हिंदुस्थाननें विलायतेहून पुष्कळ कर्जे काढलें असल्यामुळें त्या कर्जाच्या व्याजाचे पैसे त्यास द्यावे लागतात. याशिवाय "हिंदुस्थानचा बराच व्यापार युरोपियनांच्या हातीं असल्यामुळें त्यांच्या नफ्याच्या रूपानेंही बरेच पैसे हिंदुस्थानांतून जातात. यालाच हिंदी अर्थशास्त्रज्ञ ' औद्योगिक स्राव ' ह्मणत आलेले आहेत. हे सर्व पैसे हिंदुस्थानांतून अगदीं उगीच जातात असें म्हणण्याचा कोणाचा भाव नाहीं; प्रत्येकाचा कांहीं मोबदला हिंदी प्रजेस मिळतो परंतु हा मोबदला अमूर्त स्वरूपाचा आहे व यायोगें प्रत्यक्ष संपत्तीची वांटणी असमतेची होते. यामुळें शिलकेनें भांडवल वाढण्याचा वेग फार सावकाश होतो. हीच संपत्तीची वांटणी जर कमी असमतेची झाली असती तर भांडवलाची वाढ जास्त जोरानें झाली असती. इतकाच या स्रावाच्या उपपत्तीचा अर्थ आहे. तेव्हां या बाबतींत सरकारनें होतां होईल तों विलायतेंतील खर्च वाढवूं द्यावयाचा नाहीं येवढें धोरण ठेविलें म्हणजे झालें. लोकांनीं मात्र या बाबतींत अजून पुष्कळ करण्यासारखें आहे. प्रथमतः संपत्ति पुरून ठेवण्याची पद्धति अजीबात टाकून दिली पाहिजे. तसेंच आपल्या शिलकेंतील पुष्कळ भाग उपभोग्य भांडवलांत—मोठमोठीं घरेंदारें, दागदागिने वगैरेंत—न घालतां उत्पन्नी किंवा उत्पादक भांडवलांत घालावयास शिकलें पाहिजे. हें साधण्याकरितां पेढ्यांची संख्या होतां होईल तितकी वाढली पाहिजे व याकरितां व्यापारी सचोटी इत्यादि गुण आपल्यांत आणले पाहिजेत.

योजकांचा वर्ग वाढविण्याकरितां धंदेशिक्षणाकडे लोकांनीं—विशेषतः देशांतील बुद्धिमान् लोकांनीं—जास्त लक्ष दिलें पाहिजे. याकरितां योग्य व खऱ्या गुणी माणसांना परदेशीं पाठवून त्यांना धंद्यांत व मोठया प्रमाणावरील कारखाने चालविण्याच्या कामांत तरबेज करून आणलें पाहिजे. याकरितां देशांत शास्त्रीय व यांत्रिक ज्ञानाचा जितका प्रसार होईल तितका केला पाहिजे. या कामींही सरकार व लोकपक्ष यांनीं सहकारित्वानें काम केलें पाहिजे.

हिंदुस्थानच्या सद्यःसांपत्तिक स्थितींत सुधारणा करण्याचे वरील उपाय अर्थ-

शास्त्राच्या तत्त्वानुरूप आहेत हें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. हे उपाय एकसमयावच्छेदेंकरून व होतां होईल तितक्या झपाट्यानें अंमलांत आणल्यास हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति भराभर सुधारत जाईल यांत शंका नाहीं. परंतु हिंदुस्थानच्या सांपत्तिक अवनतीचा शेवटचा फेरा आतां ओलांडून गेलेला आहे व त्याला वरची गति मिळाली आहे यांत शंका नाहीं. हीच गति कायम ठेवणें व तिलाच आणखी वेगवान् करणें हें सुशिक्षितांचें खरें काम आहे. अशी जोराची गति गेल्या चारपांच वर्षांत मिळालीही आहे. ही गति देणारें कारण स्वदेशीची वाढती भावना होय. वास्तविकपणें पाहतां स्वदेशीचा प्रसार होणें म्हणजे स्वावलंबनानें संरक्षणतत्त्वाचा स्वीकार करणें होय. वर सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानची स्थिति हल्लीं संरक्षणतत्त्वाच्या स्वीकारास अनुकूल आहे. परंतु अधिक आवेशाच्या भरांत, अर्थशास्त्राला अनुनत अशा या स्वदेशीमध्यें, बहिष्काराचें मिश्रण करण्याचा जो प्रयत्न झाला, तो मात्र देशाला हानिकर आहे यांत शंका नाहीं. कारण, स्वदेशी व बहिष्कार यांचा संयोग म्हणजे अमृतविषाच्या संयोगासारखा आहे. कारण स्वदेशी ही प्रेममूलक भावना आहे तर बहिष्कार ही द्वेषमूलक भावना आहे; स्वदेशी ही सात्विक मनोवृत्तीची दर्शक आहे, तर बहिष्कार हा तामसवृत्तीचा दर्शक आहे; स्वदेशी खऱ्या स्वदेशाभिमानाची सूचक आहे, तर बहिष्कार परदेशाच्या वैराचा सूचक आहे; स्वदेशी ही संयोजक शक्ति आहे तर बहिष्कार ही भेदक शक्ति आहे; स्वदेशी ही सहिष्णुतावर्धक आहे तर बहिष्कार हा असहिष्णुतावर्धक आहे. सारांश, स्वदेशीची भावना अर्थशास्त्रदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या, राजकीय दृष्ट्या, सर्वांशीं हितकारक व प्रवर्तक अशी आहे; तर बहिष्कार ही अर्थशास्त्रदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या व राजकीयदृष्ट्या अहितकारक व म्हणूनच प्रतिगामी भावना आहे. तरी देशाच्या सद्यःसांपत्तिक स्थितीच्या सुधारणेच्या मार्गांत अशा हितकर प्रवृत्तीचा लोकांनीं उपयोग करून घेणें श्रेयस्करच होईल. असा उपयोग करून घेण्याची बुद्धि आमच्या देशांतील लोकांना होईल अशी आशा प्रदर्शित करून या शेवटल्या पुस्तकाचा हा उपायचिंतनाचा विचार येथेंच थांबवून व या ग्रंथाची समाप्ति करून वाचकांची रजा घेतों.

समाप्त.

